उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१८/१/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८/१/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक १८.१.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३ श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४ श्री. श्रीमती. मोकल सिमा
५ श्रीमती.सोनावणे यमुना
६ श्रीमती.कालानी ज्योती
७ श्री.ढेणवाल बनवारी
८ श्रीमती. वेलकर सुरेखा
९ श्री. यादव नरेश
१० श्री.सोनावणे राजु
११ श्रीमती. दासानी मिनु
१२ श्रीमती.पंचशिला पवार
१३ श्री.टाले प्रमोद
१४ श्री. आढाव रामभाऊ
१५ श्री. बगाडे सुनिता
१६ श्री.भांडे भगवान
१७ श्री. ठाकुर सेवलदास
१८ श्री.वनवारी किशोर
१९ श्री.तेजी कैलाश
२० श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
२१ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२२ श्री.प्रमनानी ईश्वर
२३ श्रीमती.वसीटा बेबी
२४ श्रीमती मटाई जोनिता
२५ श्री.चौधरी राजेंद्र
२६ श्री.लांडे पांडुरंग
२७ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२८ श्री.मोरे भानजी.
२९ श्रीमती. राजवानी सुनिता
३० श्री.वारींगे पंढरीनाथ
३१ श्रीमती. टेकचंदानी चंद्रा
३२ श्री.पुरस्वानी जमनादास
३३ .श्री. वाधवा गिरधारी
३४ श्री.पारवानी रामचंद्र
३५ श्री. तलरेजा विनोद
३६ श्री.रोहडा श्यामसुंदर
३७ श्री.गुप्ता प्रभुनाथ
३८ श्रीमती.करोतिया मालतीश
३९ श्री. बहरानी ठाकुरदास
४० श्री.जाधव सुरेश
४१. श्री.मोरे भिमसेन
४२ श्री.चव्हाण रमेश
४३ श्री.महाडिक प्रकाश
४४श्रीमती.साधवानी जया
४५ श्रीमती.वनवारी मोना
४६ श्री.राजानी नरेंद्र
४७ श्री.मनसुलकर सुभाष
४८ श्रीमती. नाईक यशस्विनी
४९ श्रीमती.राजानी भारती
५० श्रीमती.कुंदनानी लविना
५१ श्रीमती.वलेचा पदमा
५२ श्रीमती.गजवानी कांता
५३ श्रीमती.भठिजा इंदिरा
५४ श्री.केणी जयकुमार
५५ श्री.पंजाबी नारायण
५६ श्री.आयलानी कुमार
५७ श्री.अचनानी पम्मीकुमार
५८ श्रीमती.वारिंगे पन्ना
५९ श्रीमती. राधवानी आशा
६० श्री. प्रकाश माखिजा
६१ श्री. रामरख्यानी मोहनदास
६२. श्री. बेहरानी गोप
६३ श्री.क्रिशनानी गोदुमल
६४. श्री. ठाकुर नरेंद्र
६५ श्री.पंजाबी लाल
६६ श्री.केसवानी किशोर

१.वाघे शामु बाबु २.श्री.चौधरी गणेश,३.श्री.उमाप रामदास ४.श्रीमती. रूपचंदानी भगवंती ५. श्री.भाटिया जयप्रकाश ६.श्रीमती.जेस्वानी आशा ७. श्री. जग्यासी राजु ८.श्री. सचदेव गिरधारी हे सन्माननिय सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ . ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.
कॉंग्रेस, युपीपी, अपक्ष, आरपीआय चे बरेचसे सदस्य सभागृहात अनुपस्थित होते.

मा.सचिव :-प्रश्न क्र.५४६ श्री.बी.बी.मोरे यांचा आहे. ते उपस्थित नसल्याने प्रश्नोत्तराची कार्यवृत्तांत नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र.५४६:-आपल्या महानगरपालिकेतर्फे सूवर्ण जयंती महोत्सव योजना राबविली जात असुन सदर योजनेतर्फे शहरातील जवळपास २८ प्रभागातील नागरी सुविधा विषयक कामांना मंजुरी मिळाली असुन सदर मंजुर कामांची यादी मा.जिल्हाधिकारी, कार्यालय यांचेकडुन महापालिका कार्यालयात पाठविली आहे. सदर योजनेच्या कामकाजास गती येणेसाठी व यशस्वीरित्त्या कार्यान्वित करणेसाठी महानगरपालिकेने सदर कामकाजावर नियंत्रणासाठी मा.उप आयुक्त यांची नेमणुक केली आहे. तरी सुध्दा सदर योजनेचे काम का होत नाही?

उत्तर :-पूर्वी फक्त एक कनिष्ठअभियंता असल्याने सर्व कामावर नियंत्रण ठेवणेस विलंब होत होता नव्याने पाच कनिष्ठ अभियंता सदर योजने कामी दिल्याने कामांना चांगली प्रगती झालेली असून कामे संपण्याच्या मार्गावर आहे. तसेच नविन ८६ कामांना मंजुरी मिळालेली असुन रूपये. ४३३८०००/- चा प्रथम हप्ता मंजुर करून नागरी मंजुरी योजनेसाठी रूपये. ३३३४०००/- अनुदान तात्त्काळ प्राप्त होणार आहे. अनुदान प्राप्त होताच कामांना सुरूवात करणेत येणार आहे. व सदर कामांवर उप आयुक्त (जकात) हे चांगल्या प्रकारे कामे करीत आहेत व सर्व कामांवर चांगले नियंत्रण आहे व कामे योग्यरितीने होत आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-एक मिनिट. आमच्या नगरसेविका श्रीमती इंदु भठिजा यांच्या पतीचे निधन झाले आहे तर आमचे असे म्हणणे आहे की, सभेची कारवाई सुरू होण्यापूर्वी त्यांना श्रध्दांजली आर्पित करावी.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- जशी प्रथा आहे नेहमी सारखी सभा सुरू होणेआधी शोक प्रस्ताव मांडावा लागतो.

मा.सचिव :- कोणताही प्रस्ताव प्रश्नोत्तरानंतर आला तर योग्य आहे. परंतु श्रध्दांजली असल्यामुळे आधी घेतो.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आधी शोक प्रस्ताव मांडतो.

मा.महापौर :- हो.बरोबर आहे परंतु तसा लिखित शोक प्रस्ताव आधीच दिला आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-सभा झाल्यानंतर एखादया गोष्टीवर दुःख जाहिर करणे हे चुकीचे आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आपणांस सुचक अनुमोदक म्हणुन कुणाचेही नाव घालायचे तर घाला पण श्रध्दांजली आधी अर्पित करा.

मा.सचिव :- तसे आपल्याला प्रस्तुत देखिल केलेले आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-मा.महापौरजी मोठ्या दुःखाने म्हणावे लागते की...

मा.महापौर :- काही सदस्य अजुन यायचे राहिले आहेत सर्व जण आल्यावर आपण श्रध्दांजली अर्पित करावी असे मला वाटते.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- सभा सुरू झाली आहे प्रत्त्येकाने हजर राहायला पाहिजे.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :- आपण श्रध्दांजली देऊ या.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- आम्ही दोन मिनिटे मौन पाळून त्यांच्या आत्त्म्यास शांती अर्पित करू इच्छितो. महापौरजी, असे तर कायदयात नाही ना? की श्रध्दांजली आम्ही अर्पित नाही करू शकत. जरूरी आहे का कागदावर दुःख जाहिर केले गेले पाहिजे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आपण नेहमी श्रध्दांजली अर्पित करून मगच सभेचे कामकाज चालवितो.

मा.महापौर :- सचिवजी आपण तसा प्रस्ताव वाचुन दाखवा.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-यापुर्वी तर आपण असे प्रस्ताव कधी वाचले नव्हते.

मा.महापौर :- कारण की हा शोक प्रस्ताव आधीच आला आहे.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे :- चार वाजताच्या सभेची सुरूवात पाच वाजता झाली आहे व सुचक आणि अनुमोदक अजुन उपस्थित नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- वाटते ज्यांनी हा प्रस्ताव आणला आहे त्यांना त्यांची जवाबदारी माहित नाही.

कॉंग्रेस, युपीपी, अपक्ष, आरपीआय चे काही सदस्य सभागृहात आले.

मा.सचिव :- हा शोक प्रस्ताव आपणांस आधीच प्रस्तुत केला आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- हे पहा सुचक अनुमोदक म्हणुन कुणाचेही नाव लिहा आमची त्यावर काही हरकत नाही. पण ते जर आपली जवाबदारी पार नाही पाडु शकत तर आम्ही काय करायचे?.

काही विपक्ष सदस्य :-श्रध्दांजलीत राजकारण नाही आले पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-श्रध्दांजली मध्ये राजकारण नाही आले पहिजे. आम्ही हे नाही विचारत सुचक आणि अनुमोदक कोण आहेत?

मा.महापौर :- मी हे म्हणतो की, हा प्रस्ताव वाचला जावा.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-आम्हाला लिखित प्रस्ताव दिला आहे ना? वाचायची काय गरज?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आम्ही दोन मिनिटे मौन पाळण्यासाठी उभे आहोत ना?

मा.सचिव :- दोन शोक प्रस्ताव अजुन आहेत. एकाचवेळी श्रध्दांजली आर्पित करू या. त्यांचे नाव श्री.मधुसुदन उर्फ मधू पाटील महाराष्ट्र राज्याच्या कब्बडी संघाचे कर्णधार व श्री. जितेंद्र प्रसाद यांचे पण निधन झाले. दोन मिनिटे त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी आपण उभे रहावे.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून मृतात्म्यांस श्रध्दांजली अर्पित केली.

शोक प्रस्ताव :-

महाराष्ट्र राज्याच्या कबड्डी संघाचे कर्णधार, श्री.शिवछत्रपती पुरस्काराचे प्रथम मानकरी आणि कबड्डी खेळाचे शहेनशहा श्री. मधुसुदन उर्फ मधु पाटील यांचे सोमवार दि.१५ जानेवारी २००१ रोजी दिर्घ आजाराने निधन झाले.

कबड्डी खेळाच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे यात दुमत होणार नाही. उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण समिती तर्फे आयोजित शालेय क्रिडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास ते आजारी असतानाही प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. त्यानिमित्ताने त्याना पाहण्याचे, त्यांचेशी बोलण्याचे भाग्य आम्हाला लाभले. श्री. मधु पाटील ही कबड्डी खेळाला लाभलेली दैवी देणगी होती. ''झाले बहुत होतीलही बहुत, परी या सम हा'' ही उक्ती त्यांनाच सार्थ ठरते. अनेकवेळा त्यांनी संघाच्या हातुन गेलेल्या सामन्यात विजश्री खेचुन आणली, त्यांनी कबड्डी खेळात आपल्या देशास आशिया खंडात मानाचे स्थान मिळवून दिले. त्यांचे निधनाने महाराष्ट्राचे व कबड्डी खेळाचे झालेले नुकसान भरून येणार नाही.

तसेच कॉंग्रेसचे जेष्ठ नेते जितेंद्र प्रसाद यांचे दि.१६.१.२००१ रोजी दुपारी सव्वाबारा वाजेच्या सुमारास निधन झाले ते ६२ वर्षाचे होते.

नोव्हेंबर १९३८ रोजी लखनौ येथे त्यांचा जन्म झाला. नैनीतालच्या शेरवुड कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. १९७०-७१ या काळात ते उत्तर प्रदेश विधानसभेचे सदस्य होते. १९७१ साली ते प्रथम लोकसभेवर निवडुन आले. १९८० आणि ८४ साली सुध्दा त्यांनी लोकसभेची निवडणुक जिंकली होती. १९८५ साली कॉंग्रेसच्या सरचिटणीसपदी त्यांची निवड झाली. राजीव गांधी आणि पी.व्ही.नरसिंहराव यांच्या पक्षाध्यक्षपदाच्या कारकिर्दीत त्यांचे राजकीय सचिव म्हणुन त्यांनी काम पाहिले होते.

श्री. मधु पाटील व श्री. जितेंद्र प्रसाद यांचे कुटूंबियाचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभावी. अशी प्रार्थना करणेसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३० (अ) दिनांक :-१८.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री.जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. मधु पाटील व श्री. जितेंद्र प्रसाद यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच



त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

शोक प्रस्ताव :-

श्री.रामचंद तोलाराम भठीजा यांचे दि. २३.१२.२००० रोजी अकस्मित निधन झाले. ते कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष होते, नगरपालिकेच्या कालावधीत ते दोनवेळा नगरसेवक म्हणुन निवडून आले होते. लॉरी ऑपरेटर असोसिएशन चे ते अध्यक्ष होते. समाजकार्यात त्यांना विशेष आस्था होती.

शहरातील विकास कार्यात विशेषतः रस्ते विकास कामात त्यांचा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष सहभाग होता.

श्री. रामचंद भठीजा यांच्या दुःखाने शहराचे फार मोठे नुकसान झालेले असून ते भरून काढणे मुश्किल आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्याच्या आत्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

त्यांचे कार्य नेहमीच स्मरणात रहावे व त्यापासुन प्रेरणा मिळावी म्हणुन लॉरी ऑपरेटर असोसिएशन कार्यालयाच्या समोरील चौकास रामचंद्र तोलाराम भठीजा चौक असे नाव दिल्यास तीच त्यांना खरी श्रध्दांतली ठरेल.

लॉरी ऑपरेटर असोसिएशन कार्यालयासमोरील चौकात एक मोकळी जागा उपलब्ध असून ती असोसिएशनच्या ताब्यात आहे. या जागेचा रस्त्यास,

चौकास काहीही अडथळा नसल्याने ही जागा सुशोभित करून तेथे श्री.रामचंद्र तोलाराम भठीजा यांचा पुतळा बसविण्याकामी होणारा सर्व खर्च करण्यास भठीजा कुटूंबिय तयार असुन हा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रस्तावित.

--६--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३० (ब) <u>दिनांक:-१८.१.२००१</u>

सुचकांची नावे :-१)श्री. किशोर वनवारी.

२)श्री. बी.बी.मोरे.

३)श्री. सुभाष मनसुलकर.

अनुमोदकाची नावे:-१)श्रीमती.सुनिता राजवानी.

२)श्री. प्रकाश माखिजा.

३)श्री.रामचंद्र पारवानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री.रामचंद्र भठीजा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच मृत व्यक्तींच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

तसेच रस्ता व चौकातील वाहतुकीला अडथळा येणार नाही अशा प्रकारे त्यांचा पुतळा बसविणेकामी शासकीय परवानगीची आवश्यकता भासली तर त्या परवानगीच्या अधिन राहुन लॉरी ऑपरेटर असोसिएशनच्या कार्यालयाच्या शेजारी मोकळया जागेत भठीजा कुटूंबियांच्या खर्चातून श्री. रामचंद्र तोलाराम भठीजा यांचा पुतळा बसविणे, सुशोभिकरण करणे व डर्बी हॉटेलच्या बाजुला चौकास श्री.रामचंद्र तोलाराम भठीजा चौक असे नाव देण्यास मंजुरी देत आहे.

सुचकांच्या सहया/-१)

२)

३)

अनुमोदकांच्या सहया/-१)

२)

३)

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.महापौर :- मी सदनाला असे सुचवू इच्छितो की, श्री.रामचंद भठिजा हे आपल्या पुर्व नगरपालिकेचे वरीष्ठ सदस्य होते व कॉंग्रेसचे नेते पण होते. त्यांच्या स्मरणासाठी



म्हणुन लॉरी ऑपरेटर असोसिएशनच्या बाजुला एक पुतळा बनविण्याचा प्रस्ताव देखिल यात आहे. आणि चौकाला त्यांचे नाव देखिल दिले जावे असा प्रस्ताव आहे. तर मी सदनाच्या सर्व संमतीने सदरचा प्रस्ताव पारीत झाला असे समजतो.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-मा.महापौर, सदरचा प्रस्ताव आपण सर्व संमतीने पारीत करत आहात. परंतु बरेचशे असे काही ठराव आहेत. जे आम्ही आमच्या प्रभागामध्ये जे काही चौक आहेत त्यांच्यासाठी आम्ही आपल्याकडे काही प्रस्ताव दिले होते त्याबाबतीत आपण आता पर्यंत काही विचारच केलेला नाही?

मा.महापौर :- आपल्या महानगरपालिकेची पुढील सर्वसाधारण महासभा होणार आहे त्याबाबत मी सर्व पक्षीय नेत्त्यांना असे निवेदन करतो की,त्यांनी एकत्र बसावे. बरीचशी नावे आली आहेत त्यातील पंचवीस-पन्नास नावे निवडुन त्यांची एक यादी तयार करून पुढील महासभेत ती आणण्यात येईल.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- पुढील महासभेत नक्की आणणार का?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- मागील वेळी पण आम्ही नावे दिली होती ती महासभेपुढे आणली नाहीत.

मा.महापौर :- सर्व पक्ष्यांचे नेतेगण बसल्यावर योग्य ते निर्णय घेतला जाईल.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- असे नाही की, नाहीतर असे होईल की, आमच्या प्रभागात पण दुस-या कुणाचे नाव दिले जाईल आणि आम्ही असेच मागे राहू.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-बरीचशी नावे दोनदा आली होती म्हणुन तो विषय मागे आपण डिफर केला. आता विपक्ष व सत्त्ताधारी पक्ष दोघांनी विचार करून ते अंमलात आणले पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- महापौरजी, ज्यांचे दोनदा नाव आले आहे ते बाजुला ठेवून दुसरी नावे दया.

मा.महापौर :- ज्या प्रस्तावावर सर्वांची संमती असेल तो प्रस्ताव पारीत केला जाईल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- एक सेकंद. श्री. बी.बी.मोरे हजर नाही म्हणुन त्यांच्या प्रश्नाची इतिवृत्तांत फक्त नोंद करणार आहात. ५४६ क्र.चा प्रश्न आहे तो सुवर्ण जयंती रोजगार योजने विषयी आहे. त्याबाबतीत आम्ही वर्तमानपत्रात खुप वाचतो. आम्हाला याबाबत माहिती दयावी. वर्तमानपत्रात असे येते की, या योजनेत घोटाळा झाला आहे. तर सदस्यांच्या माहितीसाठी आयुक्तांनी सांगीतले तर बरे होईल.
श्री.पाटणकर (उपायुक्त):-सुवर्ण जयंती योजनेचे प्रकल्प अधिकारी व कनिष्ठ अभियंत्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- गुन्हा दाखल केला आहे. ठिक आहे पण त्या कामाची अंमलबजावणी का होत नाही. कलेक्टर ऑफीस मधुन जी प्राकलने मंजुर

होऊन आली आहेत ती कामे का होत नाहीत?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- नाही नाही. वर्तमानपत्रात घोटाळयाविषयी जी बातमी येते त्याबाबत माहिती दयावी.



मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- पाटणकर साहेब तुम्ही कोणत्त्या कारणाने गुन्हा दाखल केला आहे. काय गुन्हा केला त्याने की तुम्ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- पाटणकर साहेब, गुन्हा काय दाखल झाला आहे? ते जर सविस्तर पणे सांगाल तर बरे होईल.

श्री.पाटणकर (उपायुक्त):-लेखा अहवालानुसार जे काही मुद्दे उपस्थित झाले होते. त्या आधारावर या दोन कर्मचा-यांवर गुन्हा दाखल केला गेला. काही पैशांची अफरातफर व गैरवापर केला गेला म्हणुन शासन निधी कसा वापरला गेला याची तपासणी करण्यासाठी गुन्हा दाखल केला.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- आम्ही पैशाची अफरातफर व गैरवापर विचारत नाही तर आम्हाला हे सांगा की किती रकमेचा घोटाळा झाला आहे. निधीचा गैरवापर म्हणजे इकडुन तिकडे पैसा वापरला. इथे तर पैशाचाच घोटाळा झाला आहे. तर याचा खुलासा सरळ स्पष्ट हिंदी भाषेत करावा.

मा.महापौर :-माझ्या माहितीप्रमाणे २९ लाख रू.ची अफरातफर झाली आहे. महापालिकेने तशी तक्रार पोलीस स्टेशनला नोंदवली आहे. पोलीसांनी तशी तक्रार नोंदवून घेतली आहे. त्यात विलास सोनावणे, अनिल जयसिंघानी आणि इतर वरिष्ठ अशात-हेने गुन्हा दाखल केला आहे. यासंबंधि चौकशी केली जाईल आणि कोणकोणती अफरातफर झाली आहे व कोण कोण त्यात सामील आहेत ते नंतर प्रकाशात येईलच.

मा.सदस्या श्रीमती.जया साधवानी सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- कोण अधिकारी निलंबित केला आहे? काहीतरी माहिती दया.

मा.महापौर :- विलास सोनावणेंना निलंबित करण्याचा आदेश महासभेनेच दिला होता.

मा.सदस्य श्री. सुनिता राजवानी :- त्याला निलंबित केले का?

मा.महापौर :- त्याला निलंबित केले आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- एकच अधिकारी निलंबित झाला आहे ना? कोणीतरी व्यवस्थित माहिती दिली पाहिजे ना? आम्ही वर्तमानपत्रात वाचतो.

श्री.सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- आता जी माहिती पाटणकरांनी दिली आहे. गुन्हा दाखल झाला आहे आणि दोनजणांना निलंबित केले आहे विलास सोनावणे व अनिल जयसिंघानींना १७ तारखेला निलंबित केले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- प्रश्न असा आहे की, इतका मोठा २९ लाखाचा घोटाळा झाला. तो कोणत्त्याप्रकारे झाला? सदनाला याची माहिती तर हवी ना? एफ.आय.आर कोणी दाखल केला? आपल्याला त्याची काय चुकी दिसली? हे

सर्व वर्तमानपत्रातु न सदस्यांना माहित पडते. हि माहिती सभागृहात सर्व सदस्यांना माहिती पाहिजे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- आयुक्तांनी सांगीतले पाहिजे ना? की घोटाळा कसा झाला? त्यांना कसे माहिती पडले?

--९--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आपण किती जागरूक होता. केवळ एका व्यक्तीला पकडुन बाकीचे मागचे पुढचे व्यक्ती त्यात सामील असले तरी सुटून जातील? असे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होतात.

मा.महापौर :- ते कसे सुटतील?
मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- ती शासनाची योजना आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आम्हाला ही माहिती पाहीजे की, एफ.आय.आर कोणी दाखल केला? काहीतरी घोटाळा झाला आहे. अचानक तुम्ही २९ लाख आकडा कुठून आणलात? त्यांनी काही कर्मचारी ठेवले असतील त्यांचा पगार दिला नसेल तो पगार कसा निघायचा? कोण घेत होते? ही सर्व माहिती आम्हाला मिळाली पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-मा.महापौरजी, हा जो २९ लाखाचा घोटाळा आहे. तशीच एक अफरातफर १९९३ मध्ये श्री.शिवकुमार यांच्या हातून घडली होती. त्याला परत कामावर घेतले गेले. तर सहा महिन्याने विभागीय चौकशी करून त्याला कामावर घ्यायचे की नाही असा एक ठराव महासभेने केला होता. त्यानंतर शिवकुमार यांना कामावर घेण्यात आले असेच यांना देखिल परत कामावर घेतले जाणार का? असे झाले आहे.

मा.महापौर :- हे पहा याबाबतची चौकशी पोलीस करत आहे. त्याच्यावर दोष सिध्द झाला तर त्याला शिक्षा दिली जाईल.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- सन ९३ मध्ये सुध्दा अशी चौकशी पोलीसांतर्फे करण्यात आली होती. ते प्रकरण शिवकुमार सारस्वतशी संबंधित होते. मला उत्तर दिले की या प्रकरणाची पण पोलीसांकडे तशी तक्रार दाखल केली आहे. त्यांचा सर्व रेकॉर्ड पोलीसांकडे आहे. यांनी काही पत्रव्यवहार केला की नाही. २९ लाखाचा घोटाळा ज्यांनी केला त्यांना परत कामावर घेणार का?

मा.महापौर :- असे नाही होत?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-असेच होते मी तुम्हाला आणखी एक उदाहरण देऊ का? नरसिंघाणी यांनी मस्टरवर घोटाळा केला १९८९ मध्ये तेव्हा त्यांना निलंबित केले गेले १९९९ मध्ये. दहा वर्षानंतर त्यांना बडतर्फ केले. विभागिय चौकशी ही दहा वर्षा पर्यंत चालु असते का?

मा.महापौर :- हे पहा जर कर्मचारी चौकशी नंतर दोषी आढळला तर त्याला कामावर ठेवले जात नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-म्हणजे याची चौकशी सात वर्षानंतर पुर्ण झाली तर तो पर्यंत काय करायचे? महेश्वरीच्या प्रकरणात असे का घडले की, महासभेत असा ठराव आणला गेला की त्याला परत कामावर ठेवण्यात येऊ नये. जर सर्वांसाठी समान कायदा आहे तर याच्यासाठी हा कायदा लागु का नाही केला गेला. एक तर सर्वांना कामावर ठेवा नाहितर सर्वांना काढून टाका. जर महासभा जो ठराव करते तो कायदेशिर असतो. शिवकुमारचा ठराव शासनाकडे

खिंडीत करण्यासाठी पाठविण्यात आला का?शिवकुमार यांना कामावर घेण्याचा ठराव बेकायदेशिर आहे. जर बेकायदेशीर ठराव इथला कायदा झाला तर शासन कशासाठी आहे. आपण आपला कायदा स्वतः बनवायचा दुस-या कायदयाचे आपणांस महत्त्व नाही. उल्हासनगरच्या महापालिकेला इतके अधिकार दिले आहेत की,आपण आपला कायदा स्वतः बनवायाचा दुस-या कायदंयाची आपणांस गरज नाही. ना लेजिसलेशनची गरज  आहे ना पार्लमेंटची.



मा.महापौर :- मला हे समजत नाही तुम्ही काय म्हणु इच्छिता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- आपले हे म्हणणे आहे की, जर सहा महिन्याच्या आत विभागीय चौकशी पुर्ण झाली नाही तर त्यांना परत कामावर घेतले जावे. म्हणजे आपण त्यांना पगार देतो. म्हणजे आपण त्यांच्याकडून काम करवून घेतले पाहिजे. आता जो २९ लाखाचा घोटाळा झाला आहे. तुम्ही परत सहा महिन्याने त्याला कामावर घ्या असा ठराव आणणार.

मा.महापौर :- या प्रकरणात असे नाही आहे, यात पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- अशाच प्रकारचे प्रकरण श्री. शिवकुमार यांच्या हातून घडले होते. त्यामध्ये पण आयपीसीचे कलम ४०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा गुन्हा क्रमांक आय.७८/९४ आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- ते प्रकरण वेगळे होते.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-नाही.नाही वेगळे कसे होते. सारखंच आहे. तेव्हाही पैशांची अफरातफर झाली होती.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-नाही नाही वेगळे नाही जर त्यावेळी काही कार्यवाही कर्मचा-यांवर झाली असती तर आज घोटाळयावर घोटाळे झाले नसते. यापुर्वी पण कर विभागात चार-सहा लाखाचा घोटाळा झाला होता. तुम्हीच बघा किती घोटाळे झाले आहेत?खुप मोठा भ्रष्टाचार झाल्यावरच कसे माहित पडते?

मा.महापौर :- मॅडम मला वाटते तुमचा या संदर्भात वेगळा प्रश्न आहे. आणि उत्तर देखिल तुम्हाला दिलेले आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-मला माहित आहे की, माझा प्रश्न आहे पण या प्रकरणासारखाच तो प्रश्न असल्याने मी शंका विचारल्या कारण दोन्ही आय. पी.सी अंतर्गत येतात. त्यांची सात वर्षापासुन विभागीय चौकशी होत आहे. यांची पण सात वर्ष विभागीय चौकशी चालु ठेवणार का? जसे दहा वर्षानंतर श्री. नरसिंगाणी यांना डिसमिस केले. यांना पण दहा वर्षांनी बडतर्फ करणार का?

मा.महापौर :- असे नाही होणार.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- नाही.नाही. तुम्ही असे कसे म्हणु शकता?

मा.महापौर :- कारण की पोलीस तक्रार झाली आहे. ते लवकर चौकशी करतील.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- १९९३मध्ये तुम्ही नगरपालिकेत नगरसेवक होतात. त्यावेळी तुम्ही असे म्हणाला होता का? की असे होणार नाही मग आज

तुम्ही असे कसे आश्वासन देता? आपणाकडुन फक्त आश्वासन मिळते त्यावर अंमलबजावणी कधीच होत नाही.



मा.महापौर :- देअर वील बी इम्पार्शल इनक्वायरी अगेन्स दी पर्सेनल बाय दी पोलीस डिपार्टमेंट.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- इम्पार्शल इनक्वायरी किती कालावधीत पुर्ण होईल? नंतर आपण म्हणाल की, रेकॉर्ड हा संबंधित पोलीस खात्त्याकडे आहे.

मा.महापौर :- जर हे प्रकरण पोलीसांच्या हातात आहे तर मी कसे सांगु शकतो किती दिवसात चौकशी होणार?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- मग तुम्ही असे कसे म्हणता की, या प्रकरणात असे घडणार नाही. मला याचे उत्तर दया. तुम्ही जे उत्तर दिले त्यावरच मी विचारत आहे की तुम्ही असे कसे म्हणालात की या प्रकरणात असे होणार नाही?

मा.महापौर :- या प्रकरणाला तुम्ही शिवकुमारच्या प्रकरणाशी जोडु नका.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-ते पण अफरातफरीचेच प्रकरण होते. आपण निवडुन आलेल्या सदस्यांनी असे म्हंटले की, या प्रकरणास त्या प्रकरणाशी जोडु नका. म्हणजे प्रत्येकाने महापालिकेच्या निधीचा गैरवापर करावा आणि आपण म्हणायचे विभागीय चौकशी झाल्यावर कार्यवाही करू. असे कसे चालेल?

मा.महापौर :- तुम्हाला याबाबत अजुन काही माहिती हवी का?

मा.सदस्या श्रीमती. पन्कना वारिंगे :- तुम्ही हीच माहिती देऊ शकत नाही तर अजुन काय माहिती देणार?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- अजुन माहिती दिली कुठे?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- इन द सेम मेटर १,७०,०००/- गीवन टु ॲडमिनिस्ट्रेशन. तरतुद नसुन देखिल खर्च झाला आहे. तर हाऊ अबाऊट २,७०,०००/-.

मा.महापौरः- मी महापालिका सचिव यांना माहिती दयायला सांगतो. कारण की ते उपायुक्त पाटणकर यांच्या बरोबर पोलिसांकडे तक्रार नोंदवायला गेले होते. त्यांना याबाबतीत चांगली माहिती आहे ते तुम्हाला सांगतील.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- दोन-तीन दिवसापासुन वर्तमानपत्रात येत आहे की, विलास सोनावणे यांच्यावर एफ.आय.आर दाखल केला आहे. माझे म्हणणे आहे की, आयुक्त साहेबांनी किंवा उपायुक्त साहेबांनी काल-परवा जो गुन्हा दाखल केला या अगोदर वर्ष-दिड वर्षापासुन हे वारे विलास सोनावणे या प्रकल्प अधिका-या विरूध्द आवाज उठवत होते. परंतु त्याला पाठीशी घालण्याचे काम आयुक्तांनी त्यावेळी केले. आम्ही लक्षवेधी सुचना मांडली होती.त्यावेळेस पण आयुक्तांनी विलास सोनावणे यांना पाठीशी घातले. आम्ही ब-याच वेळा

नगरसेवकांनी त्याच्या विरोधात प्रश्न विचारले. त्याची उत्तरे त्यावेळेस मिळाली नाहीत. जर त्याच वेळेस आयुक्तांनी त्याला पाठिशी घातले नसते तर आज हा मोठा भ्रष्टाचार झाला नसता आणि याला जबाबदार नुसता विलास सोनावणेच नाही तर बाकीचे येथील अधिकारी पण आहेत. आयुक्त स्वतः सुध्दा आहेत त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.



मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- सन्माननिय महापौर, उपमहापौर, व आयुक्त साहेब विलास सोनावणेंनी जो २९ लाख रू.चा जो घफला केलेला आहे. आणि कलेक्टर कडुन जे काही पैसे आपल्या उल्हासनगर शहराचा विकास करण्यासाठी जे पैसे आले होते. ते पैसे प्रभागात खर्च न होता जो काही भ्रष्टाचार झाला किंवा इतरत्र काम सुरू करून जे काही कुरण उभे केले आहे तर हा पैसा आमच्या प्रभागात खर्च न होता आमची कामे अर्धवट पडली आहे. आणि २९ लाखाचा जो काही भ्रष्टाचार घडला आहे तर हा पैसा तुम्ही कुठल्या मार्गाने परत गोळा करून अर्धवट राहिलेली कामे पुर्ण करणार आहात याचा सविस्तर खुलासा करावा.

मा.सचिव :- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेला तीन भागात विभागले होते. १)शहरी मजुर रोजगार योजना त्यासाठी आपल्याला ४९,७२,५००/- अनुदान शासनाकडुन मिळालेले होते. साहित्त्य मागविण्यासाठी ६० टक्के खर्च करायचा होता. आणि ४० टक्के मजुरांवर पगार खर्च करायचा. त्यात जे कामगार दारिद्य रेषेखाली आहेत त्यांना कामावर घ्यायचे आहे. जेव्हा लेखा परिक्षण अहवाल मिळाला तेव्हा असे दिसुन आले की, श्री. विलास सोनावणे प्रकल्प अधिकारी. व कनिष्ठ अभियता अनिल जयसिंघाणी यांनी मिळून घोटाळा केला. आपणांस ४९,७२,५००/- यापैकी ३२,२८,९५३/-चे साहित्त्य मागवायचे होते. आणि जास्तीत जास्त ११ लाखा पर्यंत मजुरांवर खर्च करायचा होता. परंतु यांनी साहित्त्य मागवले २६,०७,०३०/- आणि २४ कामे करायची होती. गटार, सी.सी. पॅसेज गटार बांधणे, शौचालय बांधणे, समाज मंदिर बांधणे असे बांधकाम होते. आणि मजुरी झाली ३१,५७,७३३/- ११ लाख खर्च करायचा होता. ३१ लाख मजुरांवर खर्च झाला. म्हणजे १९ लाख रू.जास्त खर्च केला आहे.तेवढा निधी दोखिल उपलब्ध नव्हता. म्हणजे १६३ टक्के जास्त मजुरीवर खर्च झाला म्हणुन यामुळे काय झाले बाकीचे दोन भाग उरले. प्रशिक्षण योजना व स्वयं रोजगार योजना त्यासाठी सुध्दा शासनाकडुन अनुदान दिले गेले होते. प्रशिक्षण योजना ही दारिद्य रेषेखाली असणा-या व्यक्तीसाठी होती त्यासाठी ४,३४,०००/- दिले होते. आणि स्वयंरोजगार योजनेसाठी २६,२५,०००/- रक्कम होती. त्यांनी पहिल्याच योजनेत १९ लाख रूपये जास्त खर्च केला म्हणुन त्यांनी बाकी दोन योजनेच्या रक्कमेचा गैरवापर केला. व जे २६लाखाचे जे साहित्त्य मागविले त्यापैकी आठ लाखाचे साहित्त्य जागेवरच नाही. त्याचा काही हिशोब लागत नाही. १९ लाख जास्त मजुरी गेली व आठ लाखाचे साहित्त्य जागेवर नाही. व मजुरांना पैसे देण्यासाठी त्यांनी अकाऊंट मधुन पैसे घेतले. ६६ हजार त्यांनी ते स्वतः कडे ठेवले. काही लोक अनपेड वेजेस आहेत. ती रक्कम त्यांनी बॅंकेत जमा करायला पाहिजे होती. ते त्यांनी जमा नकरता स्वतः कडे ठेवले होते. आणि जी प्रशिक्षण योजना आहे. त्यात त्यांनी अशी नावे पाठवली ज्यांची महापालिकेने शिफारस नव्हती केली त्या लोकांना संगणक प्रशिक्षणासाठी पाठवले व त्याचे पैसे महापालिकेतर्फे भरले गेले. काही असे पण विद्यार्थी आहेत त्यांची नावे महापालिकेने देऊन सुध्दा त्यांना लाभ मिळाला नाही परंतु पैसे मात्र भरण्यात आले. आणि बॅंकेत कॅश बुक, पास बुक मेंटेंन करायचा होता. बॅंकेच्या पासबुक मध्ये व महापालिकेच्यपा पास बुक मध्ये रक्कम वेगवेगळी आहे. त्यांचा हिशोब लागत नाही. चौविस कामे आपल्याला सुरु करायची होती त्यापैकी एक काम सुरुच नाही झाले. २३ कामापैकी ८ कामे पूर्ण करण्यात आली आहे. बाकीची कामे अर्धवट राहिली आहेत.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा. महापौरजी, आता सचिव साहेबांनी जी माहिती दिली आहे, त्यानुसार हा घोटाळा सहा महिन्यापासून चालू आहे. आमचे मित्र श्री. बी.बी. मोरे यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर उपायुक्त श्री. पाटणकर यांनी दिले आहे. तो प्रश्न १०.१०.२००० रोजी विचारला आहे. त्याचे उत्तर पाटणकर साहेब असे देतात की, पूर्वी फक्त एक कनिष्ठअभियंता असल्याने सर्व कामावर नियंत्रण ठेवणेस विलंब होत होता नव्याने पाच कनिष्ठ अभियंता सदर योजने कामी दिल्याने कामांना चांगली प्रगती झालेली असून कामे संपण्याच्या मार्गावर आहे. तसेच नविन



८६ कामांना मंजुरी मिळालेली असुन रूपये. ४३३८०००/- चा प्रथम हप्ता मंजुर करून नागरी मंजुरी योजनेसाठी रूपये. ३३३४०००/- अनुदान तात्काळ प्राप्त होणार आहे. अनुदान प्राप्त होताच कामांना सुरूवात करणेत येणार आहे. व सदर कामांवर उप आयुक्त (जकात) हे चांगल्या प्रकारे कामे करीत आहेत व सर्व कामांवर चांगले नियंत्रण आहे व कामे योग्यरितीने होत आहे. सहा महिन्यापासून फ्रॉड चालू आहे. एफ आय आर पण पाटणकर साहेबच दाखल करतात. आणि मागच्या सभेत पण त्यांनी उत्तर दिले होते की, सोनावणे माझे ऐकत नाही. आणि वरती हेच उत्तर देतात की, सदर कामावर उपायुक्तांचे नियंत्रण आहे. नियंत्रण ह्या शब्दाचा अर्थ काय होतो? हे जर पाटणकर साहेबांनी सांगितले तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- त्यांनी क्लीन चीट कशी दिली, अधिकारींना...

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- उत्तर चूकीचे आहे, महासभेत उत्तर बरोबर देत नाही.

मा. महापौर :- मला वाटते पाटणकराची ह्या लोकांनी दिशाभूल केली आहे,म्हणुन त्यांनी असे उत्तर दिले, त्यांना फसवले गेले होते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- कोणत्त्याही अधिकारींना क्लीन चिट देण्याची त्यांना असे उत्तर देण्याची गरज काय होती?

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- त्यांचे नियंत्रण सोनावणे वर देखील नाही. आणि उत्तर देतात की, सर्व कामावर चांगले नियंत्रण आहे. व कामे योग्य रितीने होतात.

मा.महापौर :- पाटणकरांनी स्वत: कित्त्येक नगरसेवकांकडे कबुल केले होते की, विलास सोनावणे माझी दिशाभुल करतो, माझे त्याच्यावर काही नियंत्रण नाही, ना मला काही रेकार्ड दाखवत ,ना कोणता पेपर हातात देत हे त्यांनी कित्त्येकदा कबूल केले आहे. त्यांना प्रश्न विचारुन काही फायदा नाही.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- महापौरजी माझ्या प्रभागात ज्यांनी काम केले त्यांना अजून पगार नाही मिळाला. त्यांचेकडे हजेरी देखील आहे. तशी पावती देखील त्यांच्याकडे आहे, तरी त्यांना पगार नाही दिला. अशी पण काही लोक आहेत ज्यांना दोन तीन महिन्यांचा पगार नाही मिळाला, त्यांची हजेरी लागली आहे. तरी पाटणकर साहेब म्हणतात ते काम रेकॉर्ड वर नाही आहे. तिथे खडी रेती पडली आहे. तिथे मजूरांनी हजेरी पटावर सहया केल्या, ते सर्व खोटे आहे काय?जे गरीब लोक आहेत त्यांना पगार मिळाला पाहिजे ना? अजून काही लोक बाकी आहेत.

मा.महापौर :- सुवर्ण जयंती योजने मध्ये ज्या ज्या लोकांनी काम केले होते व त्यांच्या पगाराचे वाद निर्माण झाले होते. उपोषणाला जेव्हा ते बाहेर बसले होते

तेव्हा महापालिकेने निर्णय घेतला होता की,त्यावेळी उप महापौर, स्थायी समिती सभापती, मा.आयुक्त सभागृह नेते आमच्या बरोबर होते. ज्यांनी पण काम केले आहे त्यांना पगार मिळाला पाहिजे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- तर सर्वांना पगार मिळायला पाहिजे जर कुणाला पगार मिळाला नसेल तर त्यांना देण्यास महापौर तुम्ही जबाबदार आहात.



मा.महापौर :- हो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- कारण की, ऑफीस मध्ये हजेरी लावली आहे त्यांना पण पगार मिळाला पाहिजे. व असे काही चाळीस-पन्नास लोक राहीले आहेत की त्यांना अद्याप पगार मिळाला नाही.

मा.महापौर :- हो. नक्कीच पगार मिळणार.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौरजी याचे जे उत्त्तर आहे. यांनी जे उत्त्तर दिले आहे ते कमीत कमी यांनी बदलून दयायला पाहिजे होते. अजुन पण म्हणत आहे चांगल्या त-हेने काम चालु आहे असे कसे उत्त्तर देतात?

मा.महापौर :- हे त्यांनी ऑक्टोबर मध्ये उत्त्तर दिले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-हा प्रश्न आज आलेला आहे. आजच्या स्थितीत तो सांगीतला गेला पाहिजे. प्रश्नाचे उत्त्तर आज आले आहे. चांगल्या रितीने काम चालु आहे.

मा.महापौरः- आज ते आपले स्टेटमेंट बदलतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- महापौरजी, माझा एक सल्ला आहे की, हा आपल्याकडे सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत येणारा जो पैसा आहे त्या पैशाचा महत्त्वपुर्ण उपयोग होणार आहे. महत्त्वाचा विषय आहे हे लाखो करोडो रूपये शहराच्या विकास कामी येतील. या पैशाचा चांगल्या त-हेने उपयोग व्हावा म्हणुन या संदर्भात एक विशेष सभा बोलवावी. टू रिव्युव्ह द सुवर्ण रोजगार योजना अशी एक सभा आपण तात्त्काळ बोलावली पाहिजे. सर्व नगरसेवकांकडुन प्रभागात या कामाची काय प्रगती आहे. अधिकारींनी काम कुठ पर्यंत आणले आहे हे सर्व माहिती पडले असले आणि नंतर एक ठराव करून या योजनेचे समाधान काढले पाहिजे.

मा.महापौर :- चांगला सुझाव आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- सन्माननिय महापौरजी व सदनातील सर्व सदस्य माझाच प्रश्न होता, मला यायला जरा उशीर झाला त्याबददल मी सदनाची माफी मागतो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- सारखी माफी मागु नका.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-आज जो हा प्रश्न आला आहे. मी याआधी पण लक्षवेधी दिली होती की, विलास सोनावणे बरोबर काम करत नाहीत. महापालिकेत भ्रष्टाचार होत आहे. तो थांबवला पाहिजे. तेव्हा आयुक्तांनी सोनावणेंना पाठिशी घातले त्यांची शिफारीस केली की ते चांगले काम करत आहेत व तशी यादी पण त्यांनी दिली. तसेच श्री.महाडिक मागे पण म्हणाले

होते की, मोरेजींनी जी लक्षवेधी आणली होती ती बरोबर होती. त्याचवेळेस जर सोनावणेंना तिथुन हटविले असते तर ही वेळ आली नसती. कोणी उपायुक्ताने जर तिथे नीट लक्ष दिले असते तर आज हा घोटाळा नसता झाला. आज उल्हासनगर शहर व महासभेचे नाव बदनाम होण्याची वेळ आली आहे. दुसरी गोष्ट अशी की, श्री. पाटणकर जे अजुन इथुन गेले नाही. ते जेव्हा आले तेव्हा आम्ही वारंवार विचारायचो पाटणकर साहेब, हे काम होणार की नाही होणार? तर प्रत्येकवेळी पाटणकर हेच उत्तर देत होते की मोरे साहेब, सोनावणे मला कार्यभार देत नाही, काम करू देत नाहीत व



अडचणी निर्माण करतात. काही फाईल देत नाही. तर मी म्हणालो साहेब तुम्ही उपायुक्त आहात. आयुक्त साहेबांना सांगा. ते म्हणाले मी हजारदा लिहुन दिले आहे पण काही होत नाही तर मी म्हणालो की हे असेच काम करत राहीले तर शासन निधीचा गैरवापर होईल व खुप मोठी बदनामी होईल. तर यावर बी.बी.मोरेंनी जी लक्षवेधी आणली होती ती बरोबर होती हे आज दिसुन येते. माझी एक विनंती आहे की, पाटणकरांना येऊन किती महिने झाले आहेत त्यांनी काय केले. हे पण तर पाहिले पाहिजे. मी वारंवार म्हणतो की, एका उपायुक्तांवर साठ-सत्तर हजार खर्च होतो आणि एक कारकुना ऐवढे पण काम उपायुक्तांनी नाही केले तर आम्हाला दुःख होते. मी सर्व सदनासमोर सांगु इच्छितो की, आमच्या महापालिकेत पैसा नाही आणि एका उपायुक्तांवर साठ-सत्तर हजार खर्च करतो. त्यांनी जर काम नाही केले तर महापालिकेवर भिक मागायची पाळी येईल. व माझा हा आरोप आहे की, ज्या उपायुक्तांनी काम नाही केले त्यांच्यावर काय कार्यवाही करणार? हे महापौरांनी सांगावे आणि हे जे घडले आहे याला कोण कोण कारणीभुत आहे ते आज सर्व सदनात सांगावे व त्याच्यांवर योग्य ती कार्यवाही केली जावी. ही माझी सदनाला विनंती आहे आणि ही जी कामे खोळंबली आहेत. मी पाटणकरांना विचारले ही कामे कधी होणार ते म्हणाले निविदा मागवु. पण अजुन काही मागविले नाही. आज काल जे उपायुक्त मागविले जातात ते लोकप्रतिनिधींना अशा प्रकारची उत्तरे देऊन दिशाभुल करतात. अशा उपायुक्तांना परत पाठविण्यापुर्वी त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. माझी आयुक्त, महापौर व सदनाला विनंती आहे की, अशा उपायुक्तांवर चार्ज लावले जावेत व त्यांच्यावर कार्यवाही केली जावी. जसे महाडिक म्हणाले ज्या लोकांनी काम केले त्यांना पैसे दिले नाहीत तर ही महापालिकेची जबाबदारी आहे. मी तर विचार करतो की,उपायुक्तांवर जो खर्च होतो तो ज्या गरीबांनी काम केले आहे. तर त्यांना या उपायुक्तांचा पगार वाटून टाकला पाहिजे. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे :</u>- हे जे दोन कर्मचारी निलंबित केले गेले त्यात अनिल जयसिंघानी यांना लिखित आदेश दिले आहेत का? अनिल जयसिंघानी यांना सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे लिखित आदेश आहेत का बघा जरा?

मा.सचिव :- हो आहेत. कॅम्प नं. १ व २चे आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-सचिव साहेब, जर त्यांचा प्रश्न ४४६ घेतला असेल तर बाकीचे दोन पण घ्या. ५४७ व ५४८ पण घेतले पाहिजेत.यावर पण चर्चा झाली पाहिजे.

मा.सचिव :- मोरे साहेब नव्हते. ठिक आहे करा चर्चा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मोरे साहेब विंनती आहे जरा लवकर बोला.

*<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u> मोरे साहेब जरा थांबा. आता जी सोनावणे, जयसिंघाणी, उपायुक्त यांच्या बाबत चर्चा झाली त्यावर महापौरांनी आपले मत प्रकट केलेले नाही. प्रत्येक वेळेस आम्ही नगरसेवकच बोलतो त्यावर महापौर चर्चा करतात किंवा अधिकारींना पाठिशी घालतात की, त्यांनी काम चांगले केले आहे, त्यांची वाहवा करतात. तर बी.बी.मोरेंनी जी सविस्तर चर्चा केली*



*आहे त्याबाबत महापौरांनी जर आपले मत प्रकट केले तर चांगले होईल. (एक दोन मिनिटे थांबा त्यांचे मोबाइल वरील संभाषण संपु दया). नंतर मग ते आपल्याशी सविस्तर बोलतील. नंतर आपले प्रश्न पुढे आहेतच. महापौर साहेब, प्रत्येक गोष्टीवर चर्चा झाल्यानंतर आपण एक तोडगा काढता परंतु बी.बी.मोरे साहेबांनी जी चर्चा केली सुवर्ण जयंती रोजगार योजना व इतर अधिकारींविषयी त्यावर आपण आपले काही मत प्रकट केलेले नाही.*

*मा.महापौर :- हे पहा एफ.आय.आर दाखल झाला आहे. त्यात अनिल जयसिंघानी, विलास सोनावणे व इतर वरिष्ठ असे लिहिले आहे. पोलीस तपासणीत इतर जे पण लोक सामील दिसतील त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल. हे स्वाभाविकच आहे.*

*मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- इतर अधिकारी वर्ग कामचुकारपणा करतात. त्याबाबत तुम्ही काय कार्यवाही करणार याचे उत्तर दिले नाहीत. आणखी एक प्रश्न असा आहे की, ज्या निराधार महिला आहेत, बेरोजगार आहेत त्यांना काम दिले पाहिजेत. त्यांनी दोन महिने काम केले त्यांना पगार नाही मिळाला. अजुनही ते महापालिकेमध्ये बसले आहेत. त्यांना आपण पगार देणार आहात असे आताच आपण कबुल केले आहे. लाल पंजाबींनी हा प्रश्न उपस्थित केला होता. जे बेरोजगार आहेत ज्यांनी कामे केली आहेत ज्यांची हजेरी भरली आहेत त्यांना तुम्ही कुठून पगार देणार? महापालिकेच्या पैशातून? कारण सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे आलेले पैसे सर्व संपवुन टाकले आहेत विलास सोनावणे यांनी. आणि पाटणकर साहेब म्हणतात की, नविन आलेला पैसा नव्या कामांसाठी वापरला जाणार आहे. मग या लोकांचा राहीलेला पगार देणार कुठून?*

*मा.महापौर :- आपण जरा घाईत बोललात. हिंदीत बोला मला समजले नाही.*

*(मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे यांनी हिंदीत महापौरांना सांगीतले).*

*मा.महापौर :- हे पहा जे लोक उपोषणाला बसले होते. ज्यांनी या योजने अंतर्गत काम केले आहे. त्यांना आम्ही जे आश्वासन दिले ते या त-हेचे होते की, ज्यांनी काम केले त्यांना पगार मिळेल. पगार दयायला जर सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत पैसा नसेल तर कुठून देणार हे आयुक्तांनी आम्हाला सांगीतले असते तर बरे झाले असते. आम्ही त्यांना लिखित आश्वासन दिले आहे.त्यांचा पगार देण्यास आम्ही बांधील आहोत.*

*मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- आताच्या आयुक्तांनी सांगावे ते कुठून पगार देणार?*

*मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- कोणत्त्या निधीतुन देणार असे यांना म्हणायचे आहे.*

*मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- योग्य प्रश्न आहे. कुठून पैसा देणार?*

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- जो पण पैसा आला आहे तो संपवुन टाकला आहे. तुम्ही काय कलेक्टर कडुन पैसे मागविणार आहात का? तो पर्यंत लोकांनी थांबायचे का? तुम्ही लिखित दिले पगार देऊ. पण देणार कुठून? याचा सविस्तर खुलासा करावा.



मा.महापौरः- जो पगार दिला आहे तो त्याच खात्त्यातुन दिला आहे आणि अजुन काही शिल्लक आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-म्हणजे अजुन रक्कम शिल्लक आहे. आमच्या प्रभागात अर्धवट राहिलेले काम कुठल्या पैशातून पूर्ण करणार? सहा बैठकीचे शौचालय तिथे बांधले आहे. ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. ३० टक्के काम शिल्लक आहे. उरलेल्या पैशामधुन ते काम पूर्ण करून देणार आहात की, मजुरांचा पैसा देणार आहात?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- मा.महापौर, जर घोटाळा झाला आहे तर पैसे कसे शिल्लक उरले?

मा.महापौर :- हे पहा १९ लाखाचा घोटाळा झाला आहे. जरूरी नाही १९ लाखच त्यामध्ये होते. जास्त रक्कम सुध्दा त्या खात्त्यात असू शकते. काही शिल्लक उरले असतील.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- अधिकारींनी खुलासा करावा. कुठले आणि कसे पैसे उरले?

मा.सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी :- मा.महापौरजी, मी एक छोटासा प्रश्न विचारू इच्छितो की, हे जे अनुदान शासनाकडून मिळाले ते विलास सोनावणेच्या खाजगी अकाऊंट मध्ये गेले होते की, महापालिकेच्या. जरा सांगा इतका मोठा घोटाळा झाला तो लेखाधिकारी आणि लेखा परिक्षक यांना माहितच पडले नाही. तर ही मोठी आश्चर्यकारक गोष्ट आहे. हसु नका हे जरा गंभीर प्रकरण आहे. जर त्यांच्या खाजगी खात्त्यात निधी गेला असेल आणि खर्च झाला तर वेगळी बाब आहे. जेव्हा विषय समित्त्यांचे सभापती आपले प्रस्ताव घेऊन जातात तेव्हा लेखाधिकारी व लेखापरिक्षक दहा-वीस हजारासाठी त्यांना छोटे छोटे प्रश्न विचारतात. तर लाखो रू. चा हा घोटाळा झाला तेव्हा यांचे लक्ष का नाही गेले? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

मा.सचिव :- मी वर जेव्हा तुम्हाला माहिती दिली होती तेव्हा सांगीतले होते की, सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे तीन भाग आहेत. जी पहिली शहरी रोजगार योजना आहे त्यात त्यांनी मजुरांवर अतिरिक्त पैसा १९ लाख खर्च केला आहे. तिसरी जी योजना आहे स्वयंरोजगार योजना त्यातील निधी त्यांनी त्यात वापरला.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- असे कसे तुम्ही बोलत आहात.

मा.सचिव :- पेमेंट तर दिले गेले आहे ना...

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- तुम्ही सरळ सरळ हे सांगा की, किती पैसा आला होता, किती खर्च झाला?

मा.सचिव :- तिन्ही योजनांसाठी शासनाकडुन वेगवेगळे अनुदान मिळाले. ८० लाख रू. मिळाले होते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-हेच मी तुम्हाला विचारू इच्छिते.

मा.सचिव :- मी आधी पण तुम्हाला हे सांगीतले आहे.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-तीन म्हणाला होतात परंतु कोणत्त्या खात्त्यात पैसे उरले आहेत. जे देणार. व सर्वात मोठी गोष्ट ही आहे की, जे लोक उपोषणाला बसले होते किंवा जसे महाडिकजी म्हणाले होते की,महिला शाखेवर येतात. तर हे सिध्द आहे की, ते गरीब आहेत रोज विहिर खोदुन नंतर रोज पाणी पितात. आता हे प्रकरण पोलीसांकडे चौकशीसाठी गेले आहे. हे जे उपोषणाला बसतात त्यांना कधी पगार देणार? जो मनुष्य रात्री जेवुन झोपतो त्याला दुस-या दिवशी दिवसभर काम करावे लागते तेव्हा त्याला रात्री जेवण मिळते. साठ दिवस त्यांनी उपासात कसे काढले असतील? त्यांना पगार कधी देणार?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौरजी, असे सांगीतले जाते की, अतिरिक्त लेबर पेमेंट झाले आहे. तर पैसा शिल्लक कसा उरेल? हे लेखाधिका-यांनी सांगितले पाहिजे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मी शेवटचा प्रश्न विचारतो, ११ लाख रू. लेबरवर खर्च झाला पाहिजे होता पहिल्या योजनेत. त्याऐवजी ३१ लाख रू. खर्च झाला आहे तर हे जे २० लाख रू. आपण त्यांना जास्तीचे पगार म्हणुन दिले आहेत ते जादा २० लाख रू. आपण कुठून आणणार? किंवा साहीत्त्य कमी मागविले जाणार? किंवा काम कमी करवून घेणार. दुसरे ज्यांना प्रशिक्षण नाही दिले गेले. आणि पैसे असेच दिले गेले. म्हणजे जितक्या विद्यार्थ्यांना आपल्याला प्रशिक्षण दयायचे आहे ते आपण दिले नाही.म्हणजे प्रशिक्षण देणार नाही का?योजनेवर या घोटाळयाचा परिणाम झाला का अतिरिक्त पैसे लागले आहेत. ८० लाखापैकी २९ लाखाचा तर घोटाळा झाला आहे. म्हणजे ५० लाख योजना राबवण्यासाठी शिल्लक राहीले. हा जो तीस लाखाचा घाटा झाला आहे तो आपण कुठून पुर्ण करणार? या तीस लाखात जे काही काम करायचे होते ते काम कमी होईल. म्हणजे योजनेवर याचा परिणाम होईल. हे स्पष्ट करा.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-सुवर्ण जयंती योजनेचे खाते हे म्यनसिपल खात्त्यापासुन वेगळे आहे. या योजनेत प्रकल्प अधिकारी होल ॲन्ड सोल होते. त्यांना सर्व अधिकार होते. लेखा विभागाचे फक्त एवढे काम होते की, ते जे पण आम्हाला तपासायला दयायचे ते आम्ही तपासायचो. मजुरी बरोबर दिली की नाही. साहित्त्य मागवले की नाही. एवढेच आमचे काम होते. २ + २ त्र ४ होते का ५ हे बघायचे आमचे काम होते. वजाबाकी, बेरीज करून ते बरोबर आहे की नाही हे बघायचे आमचे काम होते. बाकी प्रत्त्यक्षात क्षेत्रात काय घडते हे आम्हाला माहित नाही. आणि ते पहायचा आम्हाला अधिकार देखील नाही. दुसरी गोष्ट उपोषणाला बसणा-या कामगारांना जे पेमेंट दिले गेले आहे ते याच तिन्ही योजनेतून आलेल्या निधीतून दिले आहे. आम्ही हजेरी पत्रके तपासली व त्याप्रमाणे रक्कम दिली इतर जणांना जो पगार दयायचा राहीला आहे त्यांचे हजेरी पत्रक आमच्याकडे नाही. जर ते उपलब्ध झाले तर तपासुन त्यांना पगार देण्यास आम्हाला काही हरकत नाही. आणि तिसरे असे आपण म्हणत आहात की, जादा पेमेंट दयावे लागणार आहे. अजुनही निश्चित नाही झाले की किती जादा पेमेंट दयायचे आहे. जी अर्धवट कामे झाली आहेत

त्यांची किंमत काय? ते अजुनपर्यंत निश्चित नाही झाले. साहेबांनी अभियंत्त्यानां ते बघायला सांगितले आहे. त्यानंतर नक्की किती रक्कम येते ते पहायचे आहे. व नंतर जी रक्कम शिल्लक राहील ती सुवर्ण जयंती रोजगार योजनेतून वापरली जाईल. जर नाही तर म्युनसिपल फंडात करावी लागेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- ८० लाखाची जी योजना होती. जेव्हा या योजनेतर्फे काम सुरू करण्यात आले तेव्हा प्रत्येक प्रभागात मुव्ही काढली



होती. कोणते काम आहे? किती काम आहे? सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंतानी प्राकलने तयार केली होती. ती प्राकलने पाठवली होती व त्यानुसारच इथे निधी पाठवला गेला होता. आणि आपण म्हणत आहात की, कामाची किंमत किती हे माहित नाही.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-ॲक्चुली एक्झीक्युशन किती झाले?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-तुम्ही मान्य करताना की, कामावर या घोटाळयाचा परिणाम होणार आहे. जर तुम्ही पेमेंट बरोबर दिले तर साहित्त्यात कमतरता आणाल.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-जे पण जादा पेमेंट होईल ते म्युनसिपल फंडातून करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- म्हणजे महापालिकेला पेमेंट दयावे लागेल. हि गोष्ट तुम्ही कबुल करता आयुक्तजी?

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-दुसरी गोष्ट अशी आहे की, यात प्रोव्हीजन अशी आहे की जो पण जादा खर्च होईल तो महापालिकेच्या फंडातून करायचा आहे असे शासनाचे आदेश आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- म्हणजे २९ लाख जे जादा झाले आहेत ते महापालिकेला दयावे लागणार आहेत. तुम्ही दयायला तयार आहात? कोणत्त्या निधीतून दयाल.

मा.महापौर :- वुई वील हॅव टू डू इट. असा नियम देखिल आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आयुक्तांनी तसे बोलले पाहिजे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- कोणत्त्या शिर्षातुन हे पैसे घेणार आहेत. असा काही निधी आहे काय? अफरातफर निधी, घोटाळा निधी असे काही आहे का?

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-आमच्याकडे तर एकच फंड आहे.

मा.महापौर :- पंजाबी साहेब, तुम्हाला चांगल्या त-हेने माहित आहे की, अशात-हेचे फंड नसतात. अफरातफर होते पण त्याचा फंड नसतो.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-अफरातफरीचा निधी नसतो पण जितके पेमेंट जादा होईल त्याचा तपशिल अभियंता आम्हाला देतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आताच आपल्याकडे बाहेर उपोषणाला बसलेल्या ठेकेदारांना दयायला पेमेंट नाही. त्यांनी कामे बंद ठेवली आहेत त्यांना दयायला आपल्याकडे पैसा नाही. पेमेंटसाठी त्यांनी तुम्हाला तशी पत्रे दिली आहेत

त्यावर हे वीस लाखाचे ओझे आपण उचलायला सक्षम आहेत का? आयुक्त साहेब, तुम्ही जरा यावर प्रकाश टाका. तुम्ही काहीतरी बोला ना? नाहीतर उद्या तुम्ही म्हणाल आमचे शेंडे साहेब असे म्हणाले होते मी नाही? जर तुम्ही महापौर फंडातून दयायला तयार असाल तर तुम्ही तसे बोला.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-महापौर फंड हा देखिल महापालिका फंड आहे ना?



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- तो तर इतर ठिकाणी खर्च न करता इथे खर्च होईल हे तर नक्की होईल.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-आधी किती आपल्याकडे होते? त्यातुन किती उरतात? त्यातुन उरले तर आपण आपल्याकडे वापरू.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- २० ते २९ लाखांमध्ये काही तरी आकडा येईलच.

इथे शेंडे साहेब, महापौर, आयुक्त साहेब बोलत असताना.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-महापौर साहेब तुमच्या मध्ये काय बोलणे झाले ते आम्हाला सांगा.

मा.महापौर :-आय टोल्ड हिम व्हाय डोन्ट यु कमिट फॉर मेकींग पेमेंट.

श्री. सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- मा.महापौरजी, आता जी मा.नरेंद्रजीने जी माहिती आता मुख्य लेखाधिकारींकडुन घेतली आहे. फंडाविषयी त्यांनाच जास्त माहित आहे. आता सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत प्राकलनिय किंमती पेक्षा जर जास्त खर्च झाला असेल तर त्याबाबतीत शहर अभियंता यांना वेरिफाय करून दयायला सांगीतले आहे. ज्यांनी काम केले आहे त्यांना पगार दयायचा सर्वांनी मान्य केले आहे. आणि मी अजुन काही कमिटमेंट दयावी. असे गरजेचे वाटत नाही. ज्यांनी काम केले त्यांना पेमेंट दयायचे ठरले आहे. आणि फंडाचे कसे समायोजन करायचे हे वेरिफिकेशन झाल्यावर निश्चित करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- ६६ हजाराविषयी आम्ही बोलत नाही. परंतु २९ लाखाचा घोटाळा झाला आहे. ते जे जास्त २० लाख खर्च झाले आहेत तो खर्च आपण दयायला तयार आहोत का? इतके फक्त तुम्ही सांगा ना?

श्री. सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- त्यावर मार्ग काढण्यासाठी आम्ही तुमच्या बरोबर बसु. तिथे चर्चा करून काही तरी मार्ग काढु. कारण की, सत्त्य परिस्थिती आता तुमच्या समोर आहे. त्यावर काही तरी मार्ग काढायचा आहे. लेखा अहवाल आला आहे तो बरोबर आहे. खर्च झाला आहे. तर पिठासिन अधिकारी व आपण सर्व मिळून जो निर्णय घ्याल त्यावर अधिकारींना अमंलबजावणी करावीच लागेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- महासभेत आणु नका. कारण महासभा बांधील नाही की, एका अधिका-याने भ्रष्टाचार करावा दुस-या अधिका-याने पहात बसावे व महासभेत नंतर आणावे.

श्री. सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- माझे असे म्हणणे आहे की, काही तरी चर्चा करून मार्ग काढावा. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-महापौरजी, यासारख्या प्रकरणात पोलीस चौकशी तर होतेच परंतु त्याबरोबर विभागीय चौकशी देखिल होते. कारण की, विभागास जास्त माहिती असते. या केस मध्ये विभागीय चौकशी अधिकारी कोण आहेत? त्यांना आदेश दिले पाहिजेत की, लवकरात लवकर चौकशी पुर्ण करा. सहा-सात वर्ष चौकशी चालली नाही पाहिजे तर चौकशी किती कालावधीत पुर्ण झाली पाहिजे यास मर्यादा घालावी.

--२१--

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-सुवर्ण रोजगार योजने अंतर्गत काही ठिकाणी ६०-७५ टक्के कामे झालेली आहेत. काही अर्धवट राहीली आहेत ही जी कामे आहेत त्यासाठी आपण कुठून फंड उपलब्ध करून घेणार आहात व तशी काही वेगळी तरतुद केलेली आहे का? आणि ज्यावेळेस त्याची प्राकलने बनवली होती. जयसिंघाणी कनिष्ठ अभियंता यांना याकामी नियुक्त केले होते. शहर अभियंता यांची या योजनेत काही नैतिक जबाबदारी होती का? किंवा या सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत झालेल्या कामांवर यांचे काही नियंत्रण होते का?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- चौकशी अधिकारी कोण आहे त्याचे नाव सांगा.

मा.महापौरः- डिपार्टमेंटल इंन्क्वायरी इज गोइंग ऑन.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- चौकशी अधिकारी कोण आहेत?

मा.महापौर :- मुख्य लेखा परिक्षक ए.एन.काळे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-टाईम लिमिट आहे का इन्क्वायरीला?

मा.सचिव :- सहा महिन्यात चौकशी पुर्ण झाली पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- सचिव साहेब आता तुम्ही म्हणालात की, साधारणतः सहा महिन्याच्या आत चौकशी झाली पाहिजे. यापुर्वी अशा प्रकरणात कधी सहा महिन्याच्या आत चौकशी पुर्ण झाली आहे? चार वर्ष, आठ वर्ष, चौकशी झाली आहे?

मा.सचिव :- ते त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबुन आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मी चौकशी झाली आहे का विचारले.

मा.सचिव :- हो.हो. खुपश्या प्रकरणात चौकशी झाली आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-सहा महिन्याच्या आत.

मा.सचिव :- हो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मग जरा सांगा बर कोणत्या प्रकरणात.

मा.सचिव :- ती माहिती तुम्हाला यावेळी नाही देता येणार. रेकॉर्डमध्ये आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-बरोबर आहे. तुम्ही मला नंतर दया. मी तुम्हाला तसे पत्र देते. मी फक्त विचारले आहे की, चौकशी झाली का?

मा.सचिव :- झाली आहे. याची माहिती तुम्हाला श्री.ढाकरे देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-अशी किती प्रकरणे आहेत ज्यांच्या चौकशी साठी आठ-दहा वर्ष लागली आहेत? का ते निवृत्त पण झाले. अशी किती प्रकरणे चौकशी साठी आहेत?



मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- कितीदा चौकशी अधिकारी दोन-दोनदा आले आहेत?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मुदयाची गोष्ट ही आहे की, एक अधिकारी निलंबित होतो, दोन वर्षांनी परत कामावर येतो. परत कोणत्त्यातरी कारणाने निलंबित होतो परत कामावर येतो. जो पहिले निलंबित झाला त्याची चौकशी नाही झाली जसे मेठवाणी, रामसिंघानी यांची ही चौकशी संपत नाही तोपर्यंत दुस-यांदा पण निलंबित झाले. चौकशी अधिकारींना आपली जबाबदारी समजत नाही का? हा जो कायदा शासनाने काढला आहे. म्हणजे कायदयाला न पाहिल्यासारखे करतात. आठ-आठ वर्ष चौकशी अहवाल दाबुन टाकतात. हे चौकशी करत नाही किंवा करू इच्छित नाहीत का एखादया गोष्टीला प्रोत्त्साहन देतात.

मा.महापौर :- हे पहा कोणीही चौकशी अधिकारी ही जबाबदार व्यक्ती असते आणि ते आपली जबाबदारी बरोबर निभावतात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-बरोबर. महापौर साहेब, जे चौकशी अधिकारी आपले कर्तव्य विसरले त्यांनाही निलंबित केले जावे. म्हणजे यापुढे चौकशी अधिकारी आपल्याला चौकशी अहवाल बरोबर देईल. बरोबर ना?

मा.महापौर :- आमचे काळे साहेब हे जबाबदार अधिकारी आहेत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-हे मी पण मानते. प्रत्त्येक अधिका-याने आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. परंतु जे अधिकारी आपले कर्तव्य बरोबर पार पाडत नाही अशा अधिकारींना निलंबित केले जावे.

मा.सचिव :- श्री.बी.बी.मोरे....

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-मा.सचिव साहेब एक मिनिट थांबा. मी जी चर्चा केली होती त्या संदर्भात महापौरांनी सविस्तर उत्त्तर दिले नाही.

मा.महापौर :-श्री. लांडे आपणांस काय माहिती हवी आहे विचारून घ्या.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-माझ्या प्रभागात सहा बैठकीच्या शौचालयाचे ७० टक्के काम झाले आहे. ३० टक्के शिल्लक राहीले आहे. आणि जो काही पैसा तुमच्या कडे शिल्लक आहेत तुम्ही सांगत आहात की, तो पैसा आम्ही ज्यांनी कामे केली आहेत त्यांना देणार आहे. मग ही शिल्लक राहिलेली कामे कुठल्या फंडातून करणार आहात. आणि या योजनेवर नियंत्रणासाठी आपल्याकडे शहर अभियंता होते त्यांचे काही यावर नियंत्रण होते का? कारण की प्राकलने ही बांधकाम विभागातर्फेच बनविण्यात आली होती. तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे यावर काही नियंत्रण होते का?

मा.महापौर :-सार्वजनिक बांधकाम विभागाचे यावर काही नियंत्रण नव्हते. ते काम वेगळेच चालु होते. असे शहर अभियंतांचे म्हणणे आहे. आम्ही फक्त प्राकलने तयार करून दिली आहेत.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-राहिलेली कामे कोणत्त्या फंडातून तुम्ही पुर्ण करून घेणार आहात का आम्ही आमच्या नगरसेवक निधीतून पुर्ण करायची आणि या योजनेचे नाव काढुन टाकायचे आणि नगरसेवक फंडाचे नाव दयायचे का? ७० टक्के सुवर्ण जयंती रोजगारचे नाव दयायचे व ३० टक्के आमचे? नेमके कोणाचे नाव दयायचे? महापौर साहेब, आपण



घेतलेल्या सभेत प्रत्येक विषयावर चर्चा झाली आहे. परंतु कुठल्याही प्रश्नाचे समर्पक उत्तर आम्हाला मिळत नाही. याचा अर्थ आपली जी सत्ता आहे कुठून तरी असमर्थ आहे.

श्री. सोनाळे (प्रभारी आयुक्त):-लांडे साहेब, आपणांस नेमके काय अभिप्रेत आहे. आणि जे अभिप्रेत आहे ते तुम्हाला माहित आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-मला जे अभिप्रेत आहे ते जर मला माहित असते तर मी सभागृहा समोर तो विषय ठेवला नसता. मला अभिप्रेत आहे की, माझ्या प्रभागात सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत करण्यात आलेल्या सहा बैठकी शौचालयाचे ७० टक्के काम पुर्ण झाले आहे, ३० टक्के शिल्लक आहे तर ते काम आपण कुठल्या फंडातून करून देणार आहात?

श्री. सोनाळे (प्रभारी आयुक्त) :-आता पर्यंत चर्चा हीच झाली आहे की, प्रत्येक कामावर वाजवी पेक्षा जास्त खर्च झाला आहे.त्यामुळे दुस-या टप्यामधील कामे जेव्हा सुरू करतील त्यावेळेला त्या फंडामध्ये जी निधी उपलब्धता आहे त्यानुसार त्यावर काम केले जाईल.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- हो बरोबर आहे. पण जो मजुरीसाठी खर्च झालेला आहे.

श्री.सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- ११ लाखा ऐवजी ३१ लाख खर्च आधीच झालेला आहे. त्यामुळे आता आपण जे विचारता त्यामध्ये ही उरलेली कामे आहेत ती कशामधुन पुर्ण केली जाणार? निधी उपलब्ध झाला तरच पुर्ण होतील.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-तोपर्यंत अर्धवटच राहणार का ती कामे?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- जी कामे अर्धवट आहेत त्याबददलच आम्ही बोलत आहोत. ती कामे कुठल्या फंडातून पूर्ण करण्यात येतील?

श्री.पाटणकर (उपायुक्त):-या योजने अंतर्गत खर्च झाला आहे किंवा जो जादा खर्च झाला आहे तो खर्च नगरपालिका फंडातून करायचा असे शासनाचे आदेश आहेत. तसा तो निर्णय घ्यावा लागेल.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-सुवर्ण जयंती रोजगार योजनेसाठी नगरसेवक फंड देणार कसा? हा फंड वेगळा आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- स.आयुक्त साहेब तुम्ही बजेट मध्ये तरतुद करून अर्धवट राहिलेली कामे पुर्ण करणार का?

श्री.सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- शासनाने आधीच निर्देश दिलेले आहेत की,कामे जर अपुर्ण राहिलेली असतील तर ती नगरपालिकेने निधी उपलब्धतेनुसार पुर्ण करावयाची आहेत. त्यात काही वेगळी तरतुद करण्याची आवश्यकता नाही.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- नगरसेवक निधी व्यतिरिक्त आपण आपल्या महापालिका फंडातून करणार आहात का?आता बजेट मध्ये तरतुद करणार आहात का?



श्री.सोनाळे (प्रभारी आयुक्त) :- शासनाचे तसे निर्देश देखिल आहेत. जर तो पैसा कमी पडला तर नगरपालिकेच्या फंडातून ती कामे पुर्ण करावी.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- म्हणजे शासनाच्या आदेशाप्रमाणे कामे पुर्ण करणार का?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-आमचे म्हणणे तेच आहे की, महापालिकेच्या फंडातून काम करणार ना? नगरसेवक फंडातून नाही ना?आपण काही तरतुद करणार आहात का येणा-या बजेटमध्ये? जनरल फंडातून कामे करून घ्या आमचा फंड कसा घेणार? सुवर्ण जयंतीची अर्धवट राहिलेली कामे पुर्ण करण्यासाठी येणा-या बजेटमध्ये काही तरतुद करणार आहात का? सन्माननिय महापौर साहेब, मी बोलतो त्याकडे आपले लक्षच नाही.

मा.महापौर :- मी असे समजतो की, जे उपायुक्त आयुक्तांच्या स्थानी आज बसले आहेत त्यांना याबाबत माहिती कमी आहे.आणि जे संबंधित उपायुक्त आहेत त्यांना पण अपुरी माहिती आहे. म्हणुन तुम्ही यांना प्रश्न न विचारता जे नियमित आयुक्त आहेत त्यांना प्रश्न विचारा.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-मग पुढच्या सभेत त्यांना प्रश्न विचारायचे का?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- या विषयावरच ना?

मा.महापौर :- हो फक्त या विषयावरच.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- यांना माहिती नाही असे कसे.

मा.महापौर :- या विषयाबाबत फक्त त्यांना पुर्ण माहिती नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- मग काय लोकप्रतिनिधींना याची माहिती आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-आयुक्तांना आता जे सांगीतले की उर्वरित अर्धवट राहिलेली कामे ही महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग फंडातून पुर्ण केली जातील आणि तसे शासनाचे आदेश पण आहेत हे बरोबर आहे. त्यासाठी बजेटमध्ये वेगळी तरतुद करण्याची गरज नाही.

श्री. सोनाळे (प्रभारी आयुक्त):- शासनाच्या निर्देशानुसार कामे होणार आहेत. मी येथे काही स्पष्ट करू इच्छितो की, १०-११ वाजता मला माहित पडले की, आयुक्त नाही म्हणुन मला येथे बसावे लागेल. म्हणुन मला एवढी माहिती नाही. जे संबंधित उपायुक्त आहेत त्यांनी सर्व सांगितले पाहिजे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-आमचा पाण्याचा प्रश्न पण येईल आता? झोपडपट्टी याविषयी पण प्रश्न येणार आहे.

मा.सचिव :- प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. येथे दोन लक्षवेधी आल्या आहेत. एक श्रीमती. जोनिता मटाई व श्री. नरेंद्र राजानी यांच्यातर्फे आली आहे. ती

याविषयी आहे त्याचा विषय आहे. कॉलिंग अटेंन्शन मोशन ऑन द इशयु ऑफ ऑन गोइंग इल्लीगल कंन्स्ट्रशन ॲन्ड इनक्रोचिंग द डि.पी.रोड.दुसरी लक्षवेधी सुचना उल्हासनगर महापालिकेच्या समोर महापालिकेचे कॉन्ट्रक्टर उपोषणास बसले आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्येक प्रभागातील कामे बंद केली आहे. त्यामुळे प्रभागातील नागरिकांच्या तक्रारी आहेत व विकासाची कामे बंद पडली आहे. त्यांना आपण त्याची बिले अदा करण्यास विलंब का करता या विषयावर



चर्चा करण्यास सदरची लक्षवेधी महासभेत मांडावी. या लक्षवेधीचे सुचक श्री. पंढरीनाथ वारिंगे असुन अनुमोदक श्री.पांडुरंग लांडे आहेत.

मा.महापौर :- दुसरी लक्षवेधी जी आहे ती २.२५ वाजता उशीरा आल्याने ती घेण्यात येत नाही. आणि जी श्रीमती. जोनिता मटाई व नरेंद्र राजानीनी लक्षवेधी दिली आहे त्याविषयी मी सांगु इच्छितो की,महापालिका त्या प्रकरणाकडे लक्ष देत आहे त्यामुळे लक्षवेधी घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही. आयुक्त आणि संबंधित विभाग या प्रकरणाकडे लक्ष देत आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-त्यांना अजुन नोटीस सुध्दा पाठविली नाही. मग महापालिका लक्ष देते असे कसे म्हणता. आपण आयुक्त वा उपायुक्तांना विचारा त्यांनी साधी एक नोटीस देखिल त्यांना दिलेली नाही.

मा.महापौर :- आय थिंक यस्टरडे यु हॅड गिवन द रिप्रेझेंटेशन ऑल सो.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>कोणतेही अनाधिकृत बांधकाम तोडल्याचे अधिकार आयुक्तांना आहे. आज ते त्यांचे कर्तव्य आहे. ते होत नाही आहे म्हणुन संबंधित नगरसेवक प्रतिनिधीत्त्व घेऊन आयुक्तांना भेटले त्यानंतर देखिल त्यांच्यावर काही कार्यवाही करण्यात आलेली नाही म्हणुन लक्षवेधी आणण्याचा प्रसंग आला. नाहीतर आणलीच नसती. अतिक्रमण विभागाकडुन एखादी नोटीस तरी पाठविली आहे का?

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे</u> :- स.महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, व सचिव चारच्या सभेची पावणे पाचला सुरूवात झालेली आहे. आणि जे काही महासभेमध्ये वातावरण आहे. सत्ताधारी पक्षाचे कुठल्याही अधिका-यांवर नियंत्रण नाही. सुवर्ण जयंती रोजगार योजनेचा पुर्णपणे बोझवारा झाला आहे. सहा महिने झाले त्याची संपुर्ण चर्चा महासभेत व उल्हासनगर शहरात होत आहे. आणि आज ठेकेदार बाहेर बसले आहेत त्यांना पगार दिला जात नाही. आणि उल्हासनगर शहरातील प्रत्येक प्रभागात विकासाची कामे ठप्प झाली आहेत. आणि महापौर सांगतात की सुचना महत्त्वाची नाही.

मा.महापौर :- टाईम बार आहे.
मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- असु दया ना? टाईमबार आहे म्हणुन काय झाले.
मा.महापौर :- मी कधी म्हणालो सुचना महत्त्वाची नाही आहे. मी असे म्हणालो की लक्षवेधी टाईम बार आहे. आपण ती सुचना दोन वाजेच्या आत दयायला पाहिजे होती. दोन तासापुर्वी पण तुम्ही २.२५ वाजता दिली.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-ज्यावेळेस २.०० वाजता लक्षवेधी सुचना तयार झाली तेव्हा सचिव कार्यालयात कोणी उपस्थित नव्हते.

मा.महापौर :-सदर सुचना २.२५ वाजता आम्हाला प्राप्त झाली आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- तुम्ही निदान त्यावर काही बोलु तरी शकता.

मा.महापौर :- मी त्या संदर्भात आयुक्तांकडुन माहिती घेतली आहे.

*मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-आता आयुक्त म्हणाले की, मला एक तास अगोदर समजले की, मला आयुक्त म्हणुन बसायचे आहे. तर दोन तास आधी येणारी सुचना सोनाळे साहेब घेणार आहेत हे आम्हाला काय माहित?*



*<u>मा.महापौर</u> :- जे पण ठेकेदार बाहेर उपोषणाला बसले आहेत त्यांचे एकुण ४ करोड रूपये महापालिकेला दयायचे आहे. त्यातील सव्वा करोड आय.आर.डी.पी. चे पेमेंट आहे. महापालिकेचे आयुक्त आणि लेखाविभाग प्रयत्न करत आहेत की, कशा त-हेने हे पेमेंट लवकरात लवकर दिले जाईल. ठेकेदारांना पेंमेंट मिळावे म्हणुन वसुलीकडे व आय.आर.डी.पी कडुन रक्कम आणण्याचा प्रयत्न करत आहेत.मी समजतो जे ठेकेदार उपोषणाला बसले आहेत त्यांचा जो उददेश होता की, महानगरपालिकेतील निवडुन आलेल्या प्रतिनिधींचे व प्रशासनाचे लक्ष याकडे आकर्षित केले जावे.तो पुर्ण झाला आहे. आता त्यांनी उपोषण सोडले पाहिजे. मी आपणासोबत महासभा पुर्ण झाल्यावर त्यांना जाऊन अनुरोध करून आणि महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारली की त्यांना लगेच पेमेंट दिले जाईल.*

*मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- महापौर साहेब, आपण म्हणता की, ठेकेदारांचा जो काही उददेश होता की, सभेमध्ये हा मुददा घेण्यात यावा. महापौरजी आताच सुवर्ण जयंती योजनेबाबत चर्चा झाली. कित्येक अशी कामे होती ज्यात आर.डी.शिंदे साहेबांनी आम्हाला सांगितले की, या योजने व्दारे पुर्ण करता येईल. परंतु ती योजना पण नाकामयाब झाली. जर ठेकेदारांना लहान मोठे पेमेंट नाही दिले तर ही आमची मागणी नाही. मागील चार-पाच महिन्यापासुन काम होत नाही. तिथुन आम्ही लज्जेने खाली मान घालून जातो. जनता म्हणते तुम्ही तर म्हणाला होतात सी.सी.पॅसेज, पाईप लाईन, इत्त्यादी बनेल. जनता ही भोळी आहे तिला हे माहित नाही की इथे काय घडत आहे. येथे बजेट काय आहे? पैसा नाही, रिकव्हरी नाही. जनता तर मागणी करते कारण जनता कर भरते. पाणी बिल भरते, लाईट बिल भरते. तरी त्यानां सुविधा मिळत नाही तर आम्ही त्यांना काय उत्तर दयायचे. आपण पण नगरसेवक आहात ना? आपल्यापुढे पण असे प्रसंग आले असतील? ठेकेदारांना जर पगार दिला तर कामे सुरू करतील ना? ठेकेदार उपोषणाला बसले आहे, तसेच सिमेंट पण महाग झाले आहे. मग कशात-हेने कारभार चालणार?*

*मा.महापौर :- महापालिका पुर्णपणे प्रयत्न करत आहे की, वसुलीत जास्तीत जास्त वाढ व्हावी. जास्तीत जास्त उत्पन्न वाढावे आणि दुसरा टप्पा आय.आर. डी.पी कडुन जो पैसा येणार आहे. दहा करोडचे जे लोन आहे. ते पैसे पण येणार आहेत. कागदोपत्री व्यवहार पुर्ण झाला आहे. त्यातील एक दोन हप्ते जरी आले तरी आर्थिक परिस्थिती सुकर होईल. आणि ही जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती संपेल.*

*मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- महापौर साहेब, महासभा पुर्ण झाल्यावर आपण त्यांना तसे आश्वासन दया.*

*<u>मा.महापौर</u> :- होय.*

*<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-</u>त्यांना कधी देयक देणार तशी वेळ देखिल दया.*

*मा.महापौर :- आपण सोबत जाणार आहोत. तुम्ही उपमहापौर, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती, सर्व गटनेते.*

*मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- शहरात छोटया छोटया कामांची जास्त गरज असते ते सर्व काम बंद पडले आहे.*

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आम्ही दिलेली लक्षवेधी आपण या कारणासाठी नाकारू शकत नाही की आयुक्तांनी तुम्हाला पुर्ण माहिती दिली आहे. हे काही कारण नाही लक्षवेधी नाकारण्याचे. आपणांस आयुक्तांनी माहिती दिली आहे. अवैध निर्माणाविषयी लक्षवेधी आहे. आणि आपण आपणांस आयुक्तांनी माहिती दिली आहे हे कारण सांगुन लक्षवेधी नाकारता

--२७--

मा.महापौर :- मी असे नाही म्हणालो की मला माहित आहे. मी असे म्हणालो की, महापालिका या प्रकरणाकडे लक्ष देत आहे. तुमचा बोलण्याचा हेतु काय? लक्षवेधी आणण्याचा उदेदश काय? हेच ना की, सभागृहाचे लक्ष वेधले जावे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आणि यावर चर्चा व्हावी. मी इथे एक प्रश्न विचारतो की, एखादी नोटीस तरी त्यांनी पाठविली आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- सन्माननिय महापौर, उपमहापौर, आयुक्त व सचिव साहेब व स.सदस्य जी लक्षवेधी इथे आणली आहे. त्याबाबतीत मी माहिती देतो की, हे जे पवई चौकावर बांधकाम होत आहे. त्याचा नकाशा नगररचना विभागाकडुन मंजुर झाला आहे. क्र ५७८ १२ सप्टेंबर २०००.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- माझा साधा प्रश्न आहे की, तिथे वायोलेशन झाले आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :-होय. तिथे वायोलेशन झाले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- रोडवर त्यांनी अतिक्रमण केले आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- डी.पी.रोडवर त्यांनी किमान अंतर सोडले पाहिजे. त्यात त्यांनी अडिच फुटाचा जिना इथे आणला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- एका दुकानाचे तिथे वायोलशन आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- वायोलेशनमध्ये तळमजल्यावर एक दुकान आले आहे. पाहिल्या माळयावर काही वायोलेशन नाही आहे. आणि सहा तारखेला जेव्हा वायोलेशन डिटक्ट केले होते. त्यावेळी दुस-या मजल्यावर "७ ग "६ चा स्लॅब टाकला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-त्यांना नोटीस दिली आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- त्यांना अजुन नोटीस दिलेली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- देणार आहात?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- हो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- कधी देणार अजुन पर्यंत का नाही दिले गेले?जर तिथे वायोलेशन झाले आहे तर? किती दिवस झाले?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- ६ तारखेला वायोलेशन झाल्याचे समजले.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- सहा तारीख व आज १८ तारीख आहे. दोन आठवडे झाले. तरी आपण वायोलेशन हटविण्यासाठी नोटीस नाही पाठवली. का नाही पाठविली?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त) :- शहरातील इतर कामांची जबाबदारी आयुक्तांनी माझ्यावर सोपविली होती. जसे कर वसुली.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- या कालावधीत कोणालाही नोटीस दिली नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- नोटीस देण्याची जबाबदारी कोणाची आहे?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मी इथे सांगु इच्छितो की आपले कामकाज कसे चालले आहे. ओव्हर ॲन्ड अबाऊ ॲन्ड ओल्ड बिल्डिंग व्हीच इज सपोर्टेड असे म्हंटले जाते की, श्री. नरेश मटाई यांच्या नातेवाईकांची इमारत आहे. ९५-९६ मध्ये ती इमारत बांधली गेली होती. तिचे मोजमाप करण्यासाठी आपले बीटवाले तिथे गेले होते. बरोबर. हे जर खरे नसेल तर मला सांगा. जर तुम्ही नाही म्हणालात तर मी पुरावा दयायला सुध्दा तयार आहे. ज्याच्यावर महापौरांचा सुध्दा शेरा आहे. आयुक्तांचा शेरा आहे.

मा.महापौर :- माझा काही शेरा नाही. महापौरांचा काय शेरा आहे. हे तुम्ही सदनाला सांगा. सांगा ना आपण.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आयुक्तांचा शेरा आहे.

मा.महापौर :- ते मला माहित नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> इथे एक नगरसेवक आहे पन्ना वारिंगे त्यांच्या एका प्रश्नाचा पोटप्रश्न सी मध्ये असे उत्तर दिले जाते की, जुलै ९९ च्या आधीचे बांधकाम आम्ही तोडणार नाही. आणि ज्या इमारतीचे मोजमाप करण्यासाठी पाठविले ती काय ९९ नंतरची इमारत आहे. म्हणजे एक नगरसेवक दुस-यांच्या इमारतींविषयी तक्रार करतो तर त्याच्या नातेवाईकाच्या जुन्या इमारतीचे मोजमाप करायला पाठवितात. या प्रकारची व्यवस्था तुम्ही शहराला देऊ इच्छिता? अशा प्रकारची व्यवस्था जर तुम्ही शहराला देणार असाल तर आम्ही सामना करायला तयार आहोत.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी</u> :- मा.महापौर, मला तुम्ही हे सांगा की लक्षवेधी दाखल केली आहे का? आणि जर तुम्ही दाखल नाही केली तर त्यावर चर्चा करण्याची गरज आहे का?

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-दर्शनासिंगजी तिथे अवैध निर्माण होत आहेत.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- तुम्ही अवैध निर्माणा विरूध्द आवाज उठविला त्याविषयी मी तुमच्या सोबत आहे. मी हे विचारू इच्छितो की, लक्षवेधी जर दाखल केली आहे तर चर्चा करा नाहीतर चर्चा कशाला करता.

मा.महापौर :- मि. पंजाबी डोन्ट गेट यु ऐजिटेटेड. ट्राय टू अंडरस्टॅण्ड दिस. आय हॅव रिजेक्टेड द कॉलिंग अटेंन्शन मोशन.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- असे कसे आपण म्हणता?

मा.महापौर :- जस्ट लिसन मी. सी इन गुड फेथ आय अलाऊड राजानी सम डिसकशन ही वॉन्टेड. इट डझन्ट मिन यु टू हॅव इलोबरेट डिसकशन ओव्हर ॲण्ड अबाऊ ओव्हरइट.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-यापुर्वी एका लक्षवेधीस आपण रदद करून सुध्दा आपण निर्णयास नेले होते.

--२९--

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौरजी, अजुन एक मुददा आहे तुम्ही कोणत्त्या आधारे लक्षवेधी रिजेक्ट करत आहात. तुमच्या मनात आले तर रिजेक्ट करता का? काही तरी प्रोसिजर असली पाहिजे.
मा.महापौर :- मी तुम्हाला कारण सांगितले आहे.

मा.सदस्य श्री.नरेंद राजानी

मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगे:-महापौरजी, हे म्हणतात की, आपण आपली चामडी मजबुत करा व ऐकुन घ्या, याचा अर्थ काय?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:- याचा अर्थ काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-नरेंद राजानीजी, हा राजकिय मंच नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-महापौरजी, आपण किशोर वनवारी यांना शिस्त शिकवा.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- मेहरबानी करा, शिस्त राखा, एकएक जण बोला.

--३८--

मा.महापौर :- श्री. राजानीजी, या प्रकारे आपणास आपल्या क्युरीजचे उत्तर मिळु शकणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-महापौरजी, ते काय म्हणाले, आपणास समजले काय?

मा.महापौरः- आपल्या काही सूचना असतील तर त्यांचा समावेश केला जाईल. परंतु गो इन प्रॉपर मॅनर.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- महापौरजी, नगरसेवक कशी भाषा वापरत आह?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- असंसादिय भाषा वापरत आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-श्री.ठाकुर बेहरानी यांचेवर शाब्दीक हल्ला करता, भाभी ज्योती कालानींवर शाब्दीक हल्ला करता?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- चुकीची भाषा वापरून आपण ते भरून काढत आहात काय?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-माझ्या क्युरीजच्या सुचना असतील त्या १९९७च्या बजेटबाबत असतील की, २००१चे? माझे म्हणणे हे आहे की, जर १९९७च्या बजेटवर बोलले जात आहे तर मी १९९५चा बजेट सुध्दा बरोबर आणला आहे, जेव्हा भाभी ज्योती कालानी नगराध्यक्षा होती.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-चालेल. चालेल.

मा.महापौर :- चालु अर्थसंकल्पावर चर्चा केली जावी.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- चालेल, चालेल म्हणतात तर मग का?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.महापौरजी, विरोधी पक्षीयांनी आपल्या क्युरीज दिल्या तेव्हा आम्ही कुणी त्या बाबत हरकत घेतली नाही. यास्तव माझी विरोधी पक्षीयांना विनंती आहे की, सभागृहनेता बोलत असताना त्यांचे बोलणे थांबवु नये. त्यांचे ऐकुन घ्या, आपल्या क्युरीजचे ते उत्तर देत आहेत. विरोधी पक्ष सदस्य सभागृह नेत्त्यांना बोलु देत नाहीत हा आपला अपमान आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- मा.महापौरजी, विरोधी पक्षीय बोलले ते अजेंड्यावरील विषयावर बोलले.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः- सभागृह नेत्त्यांना मंचावर बसवा व उत्तर दयावयास सांगा?

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः- विरोधी पक्षवाले चुप बसा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौर हे पहा किती लोक उभे आहेत?

मा.महापौरः-सभागृहनेता, आपण बोला.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगेः- सभागृह नेता म्हणतात, आपली चामडी मजबुत करा. त्यांच्या बोलण्याबाबत मला हरकत नाही, ते ज्याप्रकारे भाषा वापरतात त्यावर माझी हरकत आहे. ते दुस-या नगरसेवकांबाबत कशाप्रकारची भाषा वापरत आहेत?

मा.महापौर :-कृपया आपण बसुन घ्या.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगेः- दुस-या नगरसेवकाची बेइज्जत केल्यानंतर आपण आम्हासच म्हणता बसा म्हणुन?

मा.महापौर :-दोन मिनिटे बसा. कृपया बसा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- पाचवे वेतन आयोग कधीपासुन लागु झाले होते ते ज्या सभागृह नेत्त्याला माहित नाही ते चामडीचीच गोष्ट करतील आणखी कोणती गोष्ट करतील?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- चुक माणसाकडुन होते. ऐकण्यात चुक झाली असेल तर वांदा नाही आपण हजार वेळा बोलला आहात सॉरी. सॉरी.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सभागृहात नौटंकी होत आहे. सभागृहात नौटंकी होत आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- हे जोकर आहेत, हे जोकर आहेत. सभागृह नेता नाही जोकर आहेत. जोकर आहे, पुन्हा एकदा. पुन्हा एकदा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी- महापौरजी, मी जो बजेटवर बोलत आहे. ही कोणाचीही वैयक्तिक बजेट नाही. महानगरपालिकेची बजेट आहे. कारण की मी पहिल्या वर्षापासुन स्थायी समितीचा सदस्य आहे. म्हणुन मला माहीत आहे की, १९९७ साली ६१ कोटीचा बजेट सादर केला गेला होता. परंतु त्यावर्षी

शेवट पर्यंत जे उत्पन्न झाले होते ते ३८ कोटीचे म्हणजे २२ कोटी तुटीचा अर्थसंकल्प झाला होता. १९९८-९९ मध्ये ६२कोटीचा अर्थसंकल्प तयार केला गेला होता. उत्पन्न प्राप्त झाले होते. ५१ कोटी म्हणजे ११ कोटी तुट आली होती. ज्यांनी बजेट सादर केला त्यांचे नाव घेणार नाही. १९९९-२०००मध्ये ८३ कोटीचा बजेट होता. ७७ कोटी उत्पन्न आले होते. त्यावेळी ५ कोटी तुट आली होती. १९९७ मध्ये एम.आय.डी.सी.चे कर्ज ५७ कोटी होते. यांनी फक्त बारा कोटी व ५ कोटी ६० लाख थकबाकी पोटी तरतुद करून बाकी रक्कम उडवुन लावली होती. म्हणजेच यापुर्वी जे सत्तेवर होते त्यांनी जर हे पैसे भरले असते तर आमच्यावर ही पाळी आली नसती. आम्हालाही खाडाखोड करावी लागली नसती. दुसरे असे की, आमचे बंधु श्री. ठाकुर बेहरानी यांनी १३३ कोटीचा बजेट सादर केला होता. आज भाभी ज्योती कालानी यांनी १६१ कोटीचा बजेट सादर केला आहे. म्हणजे तो ६१,६२,८३ यापेक्षा कितीतरी जास्त आहे. मी असा खुलासा करू इच्छितो की, आमच्या कारकिर्दीत आम्ही खुप मोठ्या रक्कमेचे बजेट सादर केले आहेत.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-</u> मागच्या वर्षी कितीचा बजेट होता?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>१३३ कोटीचा.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-</u> उत्पन्न किती आले?



<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-९९ कोटी. जर तो बजेट तुटीचा होता तर आपल्या कारकिर्दीत सुध्दा तुटीचेच अर्थसंकल्प होते ना? स्पष्ट करतो. पाणीपटटी किंवा मालमत्ता कर आपण सुध्दा वाढविलेले होते, नाही हे ठिक नाही. ऐवढे आले पाहिजे. आमच्या कालावधीत बजेट मागे जाण्याची कारणे आहेत. मालमत्ता कराबाबत लोक न्यायालयात गेले होते. कोण गेले? हे आपणांस माहीत आहे. त्यामुळे वसुली उशीरा झाली. दुसरा मुददा होता टाऊन हॉल, ज्याची वसुली येणार होती ती रदद केली गेली. आज बोलले जात आहे की, टाऊन हॉल, स्वीमींग पुलसाठी काहीच तरतुद केली नाही. का केली नाही? कोणी करून घेतले?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :-शासनाबाबत असे बोलता कामा नये.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> आपल्या शासनाने रदद केले, आपली सरकार चुकीची असेल तर मग प्रश्नच उदभवत नाही.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मध्ये बोलले नाही तर थोडी शिस्त.....

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आपण विचारले ना? की कुणी केले म्हणुन? मी आपणांस सांगतो.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> आपणास सवय आहे ना मध्ये मध्ये बोलण्याची?

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u> कोणी केले कोणी केले? असे विचारताना म्हणुन सांगितले.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> आज आम्ही जो बजेट सादर केला त्यासाठी एक-एक सदस्य एक-एकवेळ बोलेल तर बरे होईल परंतु इथे एकेक सदस्याला एकेक गोष्ट लक्षात येते. तसे दहादा बोलतात. महासभेत ज्यापण सदस्यास बोलायचे असेल त्यांनी एकाच वेळी बोलावे.

दुसरे यावर्षी आमची वसुली न होण्याचे कारण आहे जनगणना. पल्स पोलीओ प्रोग्राम. महानगरपालिकेने यावर्षी जो पल्स पोलीओचा प्रोग्राम केला. असा प्रोग्राम कधीच झाला नाही. पुर्ण स्टाफ त्याकामी गेला त्यामुळे वसुली होऊ शकली नाही. यावेळेस जनगणनेमध्ये स्टाफ कार्यमग्न आहे. पुढच्या वेळेस वसुली भरपुर येईल. स्टाफ बाबत असे सांगण्यात आले की, दहा कोटीची तरतुद कमी केली आहे. त्याचे कारण आहे १९९९ पासुन पाचवे वेतन लागु करण्यात आले त्यापोटी मागच्या पुर्ण वर्षात २५०० रू. देण्यांत आले. यावर्षी प्रत्येकास प्रत्येक महिन्याला १५०० रू. मिळतील. करारानुसार आयुक्त साहेब त्यांना आणखी पैसे देऊ शकतात परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन चालु वर्षात जेवढे पैसे देऊ शकतो तेवढया सात कोटीची तरतुद केली बाकी दहा कोटी देण्याबाबत आम्ही वचनबध्द आहेत. आम्हाला अपेक्षा आहे की यावर्षी आमचे कर्मचारी अधिक चांगल्याप्रकारे वसुली करतील. मागच्या वर्षी टाटा इन्फोटेक बाबत न्यायालयात केस गेली होती? पाण्याची बिले मालमत्ता कराचे बीला बरोबर पाठवायचे होते. ती पाठविली गेली नाहीत. आता ती बिले पाठविली गेली आहेत. ७० टक्के लोकांना पाठविली आहेत. बाकी लोकांना अदयाप बिले पोहचविली नाहीत. यावर्षीची सुध्दा बिले पाठवायची आहेत. व आयुक्त साहेबांनी जसे १२ कोटीचा खर्च दाखविला आहे त्याबाबत आम्ही स्पष्ट केले आहे की, आम्ही ४ कोटीची तरतुद केलेली आहे. आम्हाला प्रत्येक वर्षी १.७८ कोटी दयावयाचे आहेत. ३ कोटी होतात एक कोटी आणखी आम्ही तरतूद करून ठेवले आहेत. ४ कोटी बाबत सर्वपक्षियांनी ठराव पारीत केलेला आहे. की आम्ही ही रक्कम भरणार नाही, आपण आम्हाला ही



रक्कम माफ करा, तो ठराव शासनाचे विचाराधीन आहे, मंजूर झाले तर हे पैसे भरण्याची काहीही आवश्यकता नाही. मला खात्री आहे. शासन ती रक्कम माफ करेल व ते लोक जे आम्हाला व्याजावर व्याज आकारत आहेत त्यांनी आमच्या ठेकेदाराला अदयाप पेमेंट केलेले नाही. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाची योजना यासाठी गेल्या ६ महिन्यापासून बंद होती की त्या लोकांनी त्यांना पेमेंटच केलेले नाही. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामार्फत आपल्या ज्या योजनेचे काम चालु आहे त्यासाठी बाजारातून पैसे घेतले परंतु दिले त्यांच्या ठेकेदारांना तर ते सुध्दा दिले जातील, आम्ही जो बजेट तयार केला आहे तो या सर्व गोष्टी लक्षात घेवून तयार केलेला आहे. यावर्षी आम्ही किती देवू शकतो. यापूर्वी जे सत्ताधारी होते त्यांनी आमच्यावर हा बोझा टाकलेला आहे. त्यांनी जर त्यावेळी हे पैसे भरले असते तर आम्हाला आज हे करण्याची वेळ आली नसती व विरोधी पक्षियांकडुन वारंवार विचारणा केली जाते हे कोठे ॲडजेस्ट कराल? हे कोटे ॲडजेस्ट कराल? आम्ही जो बजेट तयार केला त्यामध्ये शहरवाशीयांवर कोणताही नविन कर आम्ही लादला नाही. हे सत्ताधारी पक्षाचे स्पष्ट मत आहे, भले ही जकातकर असो, मालमत्ता कर असो, पथकर असो, ड्रेनेज टॅक्स असो, किंवा पाणी पुरवठा लाभकर असो असा कोणताही नविन कर बसविणार नाही. शहरवाशियांवर आणखी कर लादून आम्ही बोजा वाढवू इच्छित नाही, पुन्हा पुन्हा विराधी पक्षीयांकडुन जर अशी मागणी येवू लागली की, हे ॲडजेस्ट केले जावे विरोधी पक्षीयांना जर असे वाटत असेल की आम्ही कर वाढवावेत तर त्यास ही आम्ही तयार आहोत हा जो बजेट आम्ही तयार केला आहे तो सर्व संमतीने मंजूर केला जावा. यावर चर्चा बरीच झाली आहे, कृपया आपण बजेट मंजूर करावा.

<u>मा. महापौर :-</u>चर्चा बरीच झाली आहे, मला असे वाटते की, विरोधी पक्षीय सदस्यांनी जे मुददे उपस्थित केले आहेत,त्याचे आयुक्तांनी उत्तर दयावे त्यानंतर मी दोन मिनिटे बोलेन व चर्चा पूर्ण करु या.

<u>मा.सदस्य श्री. जमनु पुरस्वानीः-</u> मा. महापौरजी, उपमहापौरजी, स्थायी समिती सभापती श्रीम. ज्योती कालानीजी, नव्याने आलेले आयुक्त साहेब, सभेत

उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य, १६३ कोटीचा बजेट या सभेमध्ये सादर केला गेला आहे, त्यामध्ये जो खर्च दाखविला आहे तो तर बरोबर आहे. त्यामध्ये जो खर्च दाखविला आहे तो तर बरोबरच आहे, परंतु माझ्यामते जे उत्पन्न दाखविले आहे १६३ कोटीचे ते बरोबर नाही, १६३ कोटी ऐवजी आमचे उत्पन्न १८० कोटी पर्यंत जाईल असा माझा अंदाज आहे, त्याबाबत काही मुददे मी सभेत विशद करून सांगतो की हे उत्पन्न १८० कोटी पर्यंत कसे जाईल? यापूर्वी सन २०००-२००१ चा जो बजेट तयार केला होता तो १३३ कोटीचा होता. यावर्षीच्या उत्पन्नामध्ये फक्त ३० कोटीचा फरक आहे. त्यातील १४ कोटी रुपये तर जकाती पासून भरुन मिळत आहेत. बाकी १७-१८ कोटी जे आहेत ते काही फार मोठी गोष्ट नाही. यावर्षी मे. टाटा इन्फोटेक कंपनीचा असेसमेंट बाबतचा जो अहवाल प्राप्त होईल, त्यातुन कमीत कमी १० कोटी रुपये आम्हाला आणखी जास्त मिळतील, पाणी पटटी पोटी ३५ कोटी चे उत्पन्न दाखविले आहे परंतु आमची वसूली ५२ कोटी रुपयांपर्यंतची आहे. आम्ही त्यापैकी फक्त ३५ कोटी अपेक्षित धरले आहेत. दुसरी एक गोष्ट मी सांगू इच्छितो की १२ १/२ कोटीचे जे कर्ज दर्शाविले आहे त्यापैकी ३ कोटी आम्ही देत आहोत. शहरातील आरक्षित भुखंडावर ज्या मिळकती उभ्या राहिल्या आहेत त्यांचे कडुन २५ टक्के रक्कम महानगरपालिकेला मिळते अशा किती तरी मिळकती आहेत आज महानगरपालिकेची किती तरी मार्केटस भाडयाने दिलेली आहेत त्यांचे उत्पन्न ३ ते ५ लाख येते. आज आमच्याकडे १० ते १५ कोटीच्या मिळकती अशाच पडून आहेत माझी अशी सूचना आहे की,आरक्षित भुखंडावरील विकासापोटी २५ टक्के एफ.एस.आय च्या ज्या मिळकती आमच्याकडे पडुन आहेत, जर त्यांचा लिलाव



केला तर १० ते १५ कोटी रुपये महानगरपालिकेस मिळू शकतात, व १२ १/२ कोटी रुपयांचे जे कर्ज आहे ते आम्ही यातून फेडु शकतो. आमची संकल्पशक्ती जर दुढ असेल तर १६३ कोटीचे उत्पन्न जमविणे फार मोठी गोष्ट नाही. मिळकतकराची वसूली, टाटा इन्फोटेक चा अहवाल, पाणी पटटी यांचा विचार केला तर १८० कोटी उत्पन्न जमविणे मोठी गोष्ट नाही. मागील ४ वर्षात ६० कोटीचा बजेट आम्ही १६० कोटी पर्यंत आणला आहे. माझ्यामता नुसार २५ टक्के एफ. एस.आय च्या ज्या मिळकती आहेत त्यांचा लिलाव केला तर त्यातून १० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल पाणी पटटीची वसूली व कर वसूलीवर लक्ष दिले तर कमीत कमी आमचा बजेट १८० कोटी पर्यंत जाईल , धन्यवाद.....

<u>मा.महापौरः-</u> आता फक्त श्री. भिमसेन मोरे यांनी बोलावे, दुसरे कोणी नाही.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- मा. महापौर साहेब, आभारी आहे, मा. उपमहापौर , मा. आयुक्त व माझे सहकारी नगरसेवक...

सन २००१-२००२ चा बजेट आमच्या स्थायी समितीच्या सभापतींनी सादर केलेला आहे. मागील वर्षीचा बजेट आमच्या श्री. ठाकूर बेहरानी साहेबांनी सादर केला होता. त्यामध्ये त्यांनी जी आश्वासने दिली होती ती आश्वासने त्यांनी पूर्ण केली नाहीत मागच्यावेळी त्यांनी एक घोषणा केली होती, आमचे त्यावेळेचे आयुक्त आता येथे उपस्थित नाहीत. परंतु मा. सभापतींनी त्यावेळी जी शुन्य कचरा (झिरो गारबेज)ची ती घोषणा केली होती. त्यासाठी जी काही साामुग्री त्यांनी आणायची होती त्यापैकी एक सुध्दा सामुग्री त्यांनी मागील वर्षात आणलेली नाही, वर आता या सभापतींनी हा बजेट सादर केला आहे, मी साफसफाई बाबत का बोलत आहे? कारण की आमच्या महापौर साहेबांनी "सुंदर उल्हासनगर" अशी घोषणा केली होती. त्यांनी सुध्दा बरीच आश्वासने दिली होती आयुक्तांचे म्हणणे ऐकून शुन्य कच-याची घोषणा केली होती, मी साफसफाई बाबत का बोलतो? कारण की या शहरामध्ये जेव्हा बाहेरची व्यक्ती येते तेव्हा शहर बघुन ती व्यक्ती म्हणते काय हे शहर

आहे? या शहरात दुर्गंधी आहे असे बोलले जाते जर साफसफाई वर लक्ष दिले तर शहराचे चांगले नाव होते, आज साफसफाईवर लक्ष दिले तर शहराचे चांगले नाव होते, आमच्या कर्मचा-यांना गणवेशाचा कपडा योग्य त्या प्रतीचा पुरविला जात नाही. बाहेरच्या लोकांकडुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचा काय तो गणवेश आहे? असे बोलले जाते, गणवेशाच्या कपडयामध्ये सुध्दा पैशाची कपात केली आहे, आमच्या स्थायी समितीच्या सदस्यांनी कर्मचा-यांच्या गणवेशाच्या ज्या कपडयास संमती दिली आहे त्याबाबत मी बोलत आहे, कर्मचा-यांना मफतलाल कंपनीचा कपडा गणवेशासाठी दिला जाईल असे सांगितले गेले होते परंतु प्रत्यक्षात कुठला कपडा दिला गेला आहे ते आपण बघा, त्यावरुन दिसून येते की, आरोग्य विभागासाठी काय तरतुद केली आहे? साफसफाई कामी श्री. पनवेलकर याकामामध्ये अयशस्वी ठरले आहेत असे आजपर्यंतच्या अहवालावरुन दिसून येत आहे. त्यांनी मध्यंतरी आम्हाला असे उत्तर दिले की, शहरात ३३ रस्त्यांच्या रूंदीकरणाचे जे काम चालु आहे त्यामुळे आम्ही कचरा उचलु शकत नाही, रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ अदयाप पुर्ण झालेला नाही. तरीही श्री. पनवेलकर शहरातील कचरा उचलण्यात पुर्णपणे अयशस्वी ठरले आहेत, आमचे बंधु श्री. किशोर वनवारी यांनी आताच सांगितले की, आमचे कर्मचारी जनगणनेचे कामी मग्न आहेत. आमच्या आयुक्त साहेबांनी उपआयुक्तांना बैठक घेऊन मिळकतकरांची वसुली करण्याच्या सुचना दिल्या होत्या. १९९५ पासुनची मिळकत कर वसुलीची काही माहिती मी गोळा केलेली आहे. १९९४-९५ची मिळकत कराची वसुली होती ३ कोटी ४३ लाख म्हणजे १७ टक्के त्यानंतर १९९५-९६ जेव्हा आपली सत्ता होती, ४ कोटी-१६ म्हणजे लाख १६ टक्के



१९९६-९७ --४ कोटी - ५५ लाख -१७ टक्के
१९९७-९८ --७ कोटी ३९ लाख --१९ टक्के
१९९८-९९ --७ कोटी ७० लाख --२२ टक्के
१९९९-२००० - २०कोटी ४० लाख --यावेळी आयुक्त म्हणुन श्री. टी. चंद्रशेखर हे आले होते. त्यांच्या कारकिर्दीत एवढी वसुली झाली होती.

आताच आमचे सभागृह नेता म्हणाले की, आमचे कर्मचारी जनगणनेच्या कामात व्यस्त आहेत त्यामुळे मागील वर्षी वसुली होऊ शकली नाही, आपल्या महापालिकेशेजारीच अंबरनाथ नगरपालिका आहे. कल्याण महानगरपालिका आहे. त्यांच्याकडील वसुली पाहा व आपणाकडील वसुली पाहा, जनगणनेच्या कामाचा बहाणा करून कर्मचारी वसुलीचे काम करत नाहीत. शेजारील अंबरनाथ नगरपालिकेतील व कल्याण महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सुध्दा वेळ दिलेली होती. जनगणनेचे काम करून वसुलीचे काम करण्यासाठी, यावरुन माहिती पडते आपली वसूली काय आहे? वसूलीवर लक्ष दिले पाहिजे तसेच साफसफाई कामी जी तरतूद केली आहे त्यात आणखी तरतूद केली गेली पाहिजे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

<u>मा.महापौर</u> :-आयुक्त साहेब आपण स्पष्टीकरण करावे.

<u>मा.आयुक्त (श्री.बक्षी):-</u>मा.महापौर महोदय,जे जे मुददे इथे उपस्थित केले गेले आहेत त्यामध्ये काही मुदयांचे मी पहिलेच स्पष्टीकरण दिले आहे. स्थायी समिती आपल्या अधिकारानुसार कोणत्त्याही शिर्षातील खर्चात कपात प्रस्तावित करू शकते व आपल्या अंदाजानुसार कोणत्त्याही शिर्षातील अपेक्षित उत्त्पन्नात वाढ करू शकते यासाठी जकात मिळकत कर व हुडको कडुन कर्ज घेण्याचा जो प्रस्ताव दिला गेला आहे. त्यामध्ये तांत्रिक दृष्टया काही चुकीचे केले आहे. असे प्रशासनाचे मत नाही. जकात उत्त्पन्नात ५२ कोटीच्या ठिकाणी ५० कोटी दाखवले गेले आहे. यावर्षी मिळकत कराची देयके देण्यामध्ये बराच विलंब झाला होता त्यामुळे मिळकत कराची वसुली पाहिजे तेवढी झाली नव्हती. स्थायी समितीच्या काही सदस्यांशी माझी चर्चा झाली त्यांचे म्हणणे आहे की, पुढच्या वर्षी मिळकत करांची वसुली यापेक्षा अधिक होऊ शकते जर यावर्षी

आपण ३५ कोटीची वसुलीची अपेक्षा ठेवत होतो तर पुढील वर्षात २८ किंवा ३० कोटी वसुलीची अपेक्षा ठेवण्यामध्ये चुकीचे नाही त्यामुळे त्यांनी जो आकडा दिला आहे तो ठिक आहे. त्याच्याशी प्रशासन सहमत आहे. हुडको कडुन कर्ज घेण्याची जी गोष्ट आहे. हुडको कडुन कर्ज घेऊन आपण आपल्या शहरातील मोठमोठी कामे करू शकतो. जी कामे आपण आपल्या नेहमीच्या बजेटमधुन करू शकत नाही. मोठमोठ्या कामांसाठी हुडको कडुन कर्ज घेऊ शकतो व हुडको कर्ज देण्यास तयार सुध्दा आहे. हुडको कडुन कर्ज घेण्यासाठी सर्व महानगरपालिकातुन प्रस्ताव आहेत. हुडको लोन बजेटमध्ये घेण्यामध्ये कोणत्त्याही प्रकारची चुक होणार नाही. कोणकोणती मोठमोठी कामे केली जावीत हे नंतर हुडकोशी विचारविनिमय चर्चा करून निश्चित केले जावु शकते. उत्त्पन्नामध्ये जी कपात सुचविली आहे त्यास आम्ही पुर्णपणे सहमत आहोत त्यामध्ये कोणत्त्याही प्रकारची चुक नाही. परंतु खर्चामध्ये जी कपात दर्शविली आहे त्यामध्ये जसे आपण उल्लेख केला की, की याबाबत आपण असा मुददा उपस्थित केला होता की,जर आम्हाला ४० कोटी किंवा ५० कोटी दयायचे असतील तर ते कमी करून आम्ही कसे दाखवु शकतो. तर ही थकबाकीची गोष्ट आहे. चालु पगारामध्ये कोणत्त्याही प्रकारे कपात नाही. परंतु जी थकबाकी आहे १ जानेवारी १९९६ च्या नंतरची ती थकबाकी दोन-तीन टप्यामध्ये देण्याचा प्रस्ताव आहे.त्यामध्ये प्रशासनास असहमत होण्याचे काही कारण नाही. जेथे जेथे आम्ही सहमत आहोत,व आपल्या निर्देशनास आणले आहे ते हे आहे की,(एम.जे.पी)महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दोन देय रकमा देय होतात व ज्याची तरतुद बजेटमध्ये करणे अत्त्यंत आवश्यक आहे ते आहे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण भुयारी गटार योजना ७ कोटी ७९ लाखाची अधिक तरतुद करणे आवश्यक आहे.



व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणीपुरवठा योजना टप्पा क्र. १ मध्ये ४ कोटी ६३ लाख या दोन्ही रकमांची तरतुद करणे जरूरीचे आहे. कारण की, आपण तरतुद केली नाही तर जसे मी यापुर्वीच सांगितले की त्यामधुन असा अर्थ काढला जाईल की, महासभेची अशी इच्छा नव्हती की, हे पेमेंट केले जावे. परंतु आता आपण जर तरतुद केली व नंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी चर्चा करून प्रत्येक वर्षी किंवा महिन्यास दहा लाख किंवा १५ लाख देण्याचा आपसात एक समझौता केला तर सुधारीत अर्थसंकल्पात या आठ कोटी ७९ लाखा ऐवजी जवळ जवळ २ कोटी ८० लाखाची तरतुद सुधारीत अर्थसंकल्पात करू शकतो व पाणी पुरवठा टप्पा क्र. १ मध्ये ३ कोटी ऐवजी ४ कोटी २० लाखाची तरतुद जर आम्ही रिवाईज अर्थसंकल्पात केली तर ते चुकीचे होणार नाही. त्यात टेक्नीकल काही ऑबजेक्शन येणार नाही. ऑडीट आपणांस पकडणार नाही कारण की, आपसामध्ये झालेल्या समझौता नुसार ते रिशेड्युल केले गेले आहे परंतु आता ते रिशेड्युल नाही. रीशेड्युल नसल्याने ही देय रक्कम आहे. ही देय रकमेची आपण बजेटमध्ये तरतुद ठेवली नाही तर ९६ जे कलम आहे. त्यांचे उल्लंघन होते व जे बरेच गंभीर स्वरूपाचे होईल त्यासाठी या रकमेची तरतुद करणे जरूरीचे आहे. आताच मी आपणांस सांगितले की, १२ कोटी ५२ लाखाची तरतुद करण्यासाठी खर्चामध्ये कुठेना कुठे आपणास कपात करणे जरूरीचे आहे किंवा उत्त्पन्नामध्ये कुठेना कुठे आपणास वाढ करावी लागेल. प्रशासनाचे हे मत आहे की, जसे काही वस्तुच्या जकात करामध्ये वाढ करण्याच्या जो प्रस्ताव दिला होता तो अत्त्यंत योग्य होता. तरीही आपल्या अडचणी आम्ही समजतो. जकात दरामध्ये किंवा इतर कोणत्त्याही शिर्षामध्ये वाढ करणे आपणांस संभव वाटत नसेल तर कमीत कमी जी वसुली आहे ती वसुली जकात कराची आहे. पाणी पटटीची आहे, मालमत्त्ता कराची आहे, त्याचे अधिकाधिक उददीष्ठ प्रशासनास दिले जावे. ज्यामुळे उत्त्पन्नामध्ये थोडी वाढ होईल व खर्चामध्ये जे दोन-तीन महत्त्वाचे शिर्ष आहे. उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, कर निर्धारक व संकलन विभाग व खर्च यामध्ये आपण जर थोडी कपात केली व जकात ,मालमत्त्ता कर, पाणी पटटी वसुली, विकास शुल्क

या चार शिर्षामध्ये थोडी वाढ केली तर यादोन्हीची तोंडमिळवणी करणे आपणांस शक्य होईल. ही स्टेप आपल्यासमोर आहे या व्यतिरिक्त अन्य कुठल्याही शिर्षात आपण कमी अथवा अधिक तरतुद केली तर प्रशासन त्यास असहमत नाही. सहमत होईल परंतु निर्णय आपणास दयायचा आहे. कारण की स्थायी समितीचा निर्णय झालेला आहे त्याच्यावर प्रशासनाचा निर्णय नसतो. निर्णय महासभेचा होईल व महासभेला मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. २६ तारखेचे आपणास जे पत्र दिले आहे. प्रशासनाचे मत बाजुला ठेवुन आपण १६३ कोटीचाच बजेट ठेवण्याचा निर्णय घेतलात तर आपण तो घेऊ शकता त्यात आम्हाला काही म्हणायचे नाही. मार्गदर्शन करणे आमचे काम होते ते आम्ही केले आहे. निर्णय घेणे आपल्यावर आहे जबाबदारीही आपलीच राहिल या जबाबदारी नुसार आपण निर्णय घ्यायचा आहे. यासाठी यामध्ये कुठे कपात करायची आहे. व कुठे वाढ करायची आहे याबाबत आपणामधुन दोन-चार लोक जसे की, विरोधी पक्षनेता, सभागृह नेता आपण व आणखी दोन-चार लोक मिळुन एकत्र बसुन निर्णय घेतला तर मला वाटते मोठी अडचण होणार नाही. ही समस्या सोडविता येईल व टेक्नीकली सुधारणा करणे शक्य होईल. परंतु टेक्नीकली बजेट चुकीचा झाला तर खुपच गंभीर स्वरूपाचे होईल. परंतु जर आपण वसुली ५२ कोटी दाखविली व आम्ही ५० कोटीच केली तर ते एवढे गंभीर होत नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u> कामगार संघटनेबरोबर आमचा करार झालेला आहे की, आम्हाला त्यांना १७ कोटीचे पेमेंट दयायचे आहे. महानगरपालिकेने कामगार संघटनेबरोबर करार केलेला आहे. करार केला नसता तर विषय वेगळा होता मी या विषयाबाबत आपणाकडुन स्पष्टीकरण मागु इच्छित होतो.

--४५--

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u> मा.आयुक्त साहेब, त्याच बरोबर एम.आय.डी.सीचे जे पत्र आलेले आहे. १७ कोटी रूपयाबाबत २० एम.एल.डी पाणी आम्ही जर घेऊ इच्छित असु तर जे या शहरासाठी अति आवश्यक आहे त्यासाठी १७ कोटी एम.आय.डी.सी. ने पाणी अनामत रक्कम म्हणुन मागीतले आहे त्यासाठी काहीच तरतुद केलेली नाही. त्याबाबत सुध्दा आपले मत पाहिजे.

<u>मा.आयुक्त (श्री. बक्षी):-</u> त्यासाठी आपण टोकन प्रोव्हीजन करू शकता परंतु जेव्हा आपण आपल्या विकास कामांनाच गती देऊ शकत नाही. तर या १७ कोटीची तरतुद कशी करणार?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u> याचा अर्थ असा स्पष्ट आहे की, २० एम.एल.डी.पाणी आम्हाला मिळणारच नाही.

<u>मा.आयुक्त (श्री. बक्षी):-</u> हा निर्णय तर आपला आहे ना? जर आपणास पाणी पाहिजे तर कुठेतरी कपात केली पाहिजे. मिळकत कर वाढवु इच्छित नाहीत?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u> मा. महापौरांनी शासनास जे पत्र लिहिले आहे की, आम्हास २० एम.एल.डी. पाणी पाहिजे. व एम.आय.डी.सी ने पत्र पाठवुन १७ कोटीची तरतुद करण्यास सांगीतली आहे. त्याबाबत आपण काहीतरी विचार केला पाहिजे ना? कारण की, पाण्याची समस्या फारच गंभीर आहे. तरतुद तर करून ठेवा.

<u>मा.महापौरः-</u>मी याचे उत्तर देतो, एम.आय.डी.सी कडुन जे पत्र आले आहे. १७ कोटी रू.च्या पेमेंट बाबत जर उल्हासनगर महानगरपालिका १७ कोटी रू. भरेल तर त्यांना २० एम.एल.डी. पाणी वाढवुन दिले जाईल हा अधिका-यांचा दृष्टीकोन आहे. हा शासनाचा दृष्टीकोन नाही. आम्ही शासनाशी याबाबत भांडत आहोत. व मला अपेक्षा आहे की, सध्याचे जे शासन आहे. महाराष्ट्र

शासन जेथे कॉंग्रेसचे शासन आहे ते शासन उल्हासनगर महानगरपालिकेने १७ कोटी रू. भरले नाहीत तरीही २० एम.एन.डी. पाणी वाढवुन देईल त्यामुळे यासाठी तरतुद ठेवण्याची काही जरूरी नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u> वॅाट इज द डिफ्रंन्ट बीटवीन ऑफिशिअल ॲण्ड गर्व्हनमेंट? अधिकारी व शासन यांच्या दृष्टीकोनामध्ये काय फरक आहे?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u>व्हाल्व बंद करण्यासाठी शासन येत नाही. शासन व प्रशासनाचे अधिकारी येतात. वॉल बंद करताना? तेथे शासन येत नाही. तेथे प्रशासनाचे अधिकारी येतात.

<u>मा.महापौरः-</u> श्री. महाडिक ऐकुन घ्या. सरकारच्या ॲप्रोचमध्ये व अधिका-यांच्या ॲप्रोचमध्ये फरक असतो. सरकारी अधिकारी (ब्युरोक्रॅट) कोणत्त्याही समस्येस आपल्या दृष्टीने पाहिल. शासन जे आहे, संबंधित जे मंत्री आहेत मुख्यमंत्री आहेत त्यांच्याकडे आम्ही गेलो तर ते आपल्या दृष्टीकोनातुन पाहतील व हे जरूरी नाही की, उल्हासनगर महानगरपालिकेला २० एम.एल.डी. पाणी जास्त मिळविण्यासाठी १७ कोटी रू. तेथे जमा करावे आवश्यक नाही. आम्ही जे वाढीव पाणी घेऊ त्याचे एम.आय.डी.सी. ला नियमित बिल देऊ. १७ कोटी रू. देण्याचा प्रश्न नाही.



<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :-बिलासाठी तर तरतुद झाली पाहिजे ना?२० एम. एल.डी. जे ज्यादा पाणी घेऊ त्याचे बिलासाठी तर तरतुद असली पाहिजे ना? जे ज्यादा पाणी घेऊ त्यासाठी तरतुद कुठे आहे?

<u>मा.महापौरः-</u> २० एम.एल.डी. पाण्याचे जे बिल होईल ते इतके काही होणार नाही की, ज्यासाठी तरतुद केली जावी.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> २० एम.एल.डी. पाण्याचे बिल किती होते? खुप होते ना?

<u>मा.महापौर :-</u> १०० एम.एल.डी. चे दिड कोटी होतात तर २० एम.एल.डी.चे किती होतील?

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u> तर २० एम.एल.डी.चे किती होतील? ३० लाख प्रत्त्येक महिन्याला....वर्षाला किती होतात?

<u>मा.महापौरः-</u>वर्षाला ३ कोटी किंवा साडेतीन कोटी.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u> तरी या रक्कमेची तरतुद नाही.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u> याची तरतुद केली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u> २० एम.एल.डी. पाणी जे दिले जाईल त्याची वसुली पण होईलच ना?

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u> नाही तर पाणी वाढविण्याची आपण अपेक्षाच ठेऊ नये.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> आपण काय म्हणता?सरकारी अधिकारी २० एम.एल.डी. पाणी देण्यास तयार आहे. परंतु आपली सरकार तयार नाही असे आहे का?

मा.महापौर :-नाही. आमचे सरकार तयार आहे. सन्माननिय सदस्यांनी बजेट बाबतचे मुददे उपस्थित केले त्याबाबत आयुक्तांना मी......

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-कर्मचारी संघटने बरोबर झालेल्या कराराची गोष्ट राहिली आहे.

श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय):- सन्माननिय महापौर,उपमहापौर, आयुक्त व सन्माननिय सदस्य,

कामगारांच्या संघटनेने ५ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीची जी मागणी केली, आधी मराठीत सांगतो नंतर हिंदीत सांगतो ,मागणी जेव्हा केली होती तेव्हा आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव होता की, कर्मचा-यांची थकबाकी देण्यास आम्ही तयार आहोत परंतु त्या प्रमाणे कर्मचा-यांनी वसूली केली पाहिजे. तर करार जो झाला आहे तो या अटीनिशी आहे. कर्मचा-यांनी वसूली केली पाहिजे तर करार जो झाला आहे तो या अटीनिशी आहे. कर्मचा-यांनी रोज जर २० लाख रुपयांची वसूली आणली तर आम्ही तुम्हाला थकबाकी देण्यास तयार आहोत असे प्रशासन व यूनियन मध्ये ठरलेले आहे.

मा.महापौर :- इट इज लिंक विथ रिकव्हरी, ॲग्रीमेंट लिंक विथ रिकव्हरी.

--४७--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- इट इज अ रिसपोन्सीबल स्टेटमेंट? उदया जर महासभेमध्यचे कूणी अशी मागणी केली की, असे कुठे झाले आहे दाखवा तर?

मा.महापौरः- (डी.एम.सी. मेंकिंग अ स्टेटमेंट इन द हाउस)उपआयुक्तांनी सभागृहात असे निवेदन केलेले आहे.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः- काय ढाकरे साहेब, युनियनने तूम्हाला असे लिहून दिले आहे का? की आमचे कर्मचारी दररोज तूम्हाला २० लाख रुपये आणून देतील म्हणून? असे युनियनने लिहून दिले आहे?

श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय):- युनियनने लिहून दिलेले नाही. परंतु युनियनच्या प्रशासनाशी ज्या सभा झाल्या त्यांचे इतिवृत्तांतात आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-इतिवृत्त नको , आम्ही कराराबाबत बोलत आहोत.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसूलकरः- मा. महापौरजी, श्री. राजानीजी मला बोलु दया.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-कराराबाबत बोलणार ना?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसूलकर :- मा. महापौरजी आज २००१-२००२ चा जो बजेट सादर केला आहे, हा बजेट उल्हासनगर शहराकरीता, शहरातील व्यापारी कर्मसाठी व गोरगरीब जनतेसाठी, दिलासा देणारा बजेट आहे, यासाठी कर न लावता, हा बजेट सादर केला गेला आहे. यासाठी स्थायी समिती सभापती श्रीम. ज्योती कालानी यांना धन्यवाद देतो. त्याच प्रमाणे मा. मुख्यमंत्री महोदय श्री. विलासराव देशमुख यांचेही मी अभिनंदन करतो, कारण दोनच दिवसापूर्वी आमचे जे शिष्टमंडळ त्यांना भेटण्यासाठी गेले होते. या शिष्टमंडळाचे म्हणो ऐकून घेवून या शहरासाठी लागू करण्यांत येणारी पाणी कपात त्यांनी मागे घेवून नेहमीप्रमाणे नियमित पाणी पुरवठा

करण्याकामी त्यांनी मंजूरी दिलेली आहे. यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांचा मी आभारी आहे. व त्यांचे अभिनंदन करु इच्छित आहे. व विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांना मी विनंती करतो की हा बजेट सर्व संमतीने मंजूर केला जावा.

मा. उपमहापौर (श्री. धनंजय बोडारे) :- श्री. मनसूलकर, मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन केले ठिक आहे, आम्ही सुध्दा अभिनंदन केले आहे, आम्ही सुध्दा अभिनंदन करतो, परंतु ज्या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांची भेटच झाली नाही, मुख्यमंत्री महोदयांशी चर्चाच झाली नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसूलकरः- टेलिफोनवर चर्चा झाली आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- आम्ही ४.०० वाजता भेटलो होतो.

मा.महापौरः- मुख्यमंत्री महोदयांकडे शिष्टमंडळ घेवून गेलो होतो. निवेदनावर त्यांचे शेरे घेतले आहेत. आम्ही लोकांनी व ते एम.आय.डी.सी ला पोहचविले आहे, आमच्या रेकार्डला पत्र आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- असा शेरा लिहीला आहे. रिक्वेस्ट मे बी कंसिडर.



मा.सदस्य श्री. सुभाष मनसूलकरः- मला वाटते तुम्ही त्या वेळेला नव्हते त्या वेळेला......

मा.उपमहापौरः- तीन तास ऐकतो आहे, आता पाच मिनिट तरी बोलू दया.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- आपण हिंदीत बोला, मराठीत बोललात तर कुणाला समजणार नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-मी थोडे बोललो तर माझे समाधान होईल.

मा.उपमहापौर :-सर्वांना समजते, फक्त आपणाशिवाय, बाकी सर्वजण समजतात. तुम्हाला समजते का? समजते......

नुकतीच जी सभा झाली, १०० एम.एल.डी. वर जी १५ टक्के कपात करण्यांत येणार होती ती वाढविण्याची मुदत पुढच्या १० तारखेपर्यंत घेतली म्हणजे फक्त यू.डी. सेक्रेटरी एम.आय.डी.सी. चे अधिकारी , आयुक्त, महापौर आणि आम्ही बाकीचे जे काही लाल पंजाबी, रमेश चव्हाण, कैलाश तेजी वगैरे असे नगरसेवक होते , मुख्यमंत्री महोदयाशी सभा तुम्ही कूठे... ॲन्टी चेंबरमध्ये घेतली असेल मला माहित नाही. ज्या मिटींगचे मला माहित होते ते मी बोललो, आणि त्या मिटींगमध्ये एम.आय.डी.सी. च्या धोटे साहेबांनी सांगितले की , आम्हाला जी माहिती आहे, आम्हाला जे निर्देश दिले आहेत ते सोमवार पर्यंत रिस्टोर करायचे आहे. आयुक्त साहेब बरोबर आहे ना? सोमवार पर्यंत आहेत. त्याच्यावर आम्ही करु शकणार नाही. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांचे आम्ही अभिनंदन केले, त्यापेक्षा सेक्रेटरीचे केले असते तर?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसूलकर :- नगरविकास विभाग हा मुख्यमंत्रीमहोदया कडेच आहे सचिव त्यांच्या हाताखालचे आहेत.

मा.उपमहापौर :- ऐकुन घ्या, त्या ठिकाणी एम.आय.डी.सी च्या अधिका-यांना, उल्हासनगर महानगरपालिकेकडुन एम.आय.डी.सी. ला पैसे देण्यामध्ये काहीहि चुक होत नाही. आणि उल्हासनगरची परिस्थिती तुम्ही समजून घ्या. नसेल

तर तुम्ही प्रतिनियुक्तीवर या, असे दरडावून सांगणारे आमचे अधिकारी, आमचे आयुक्त श्री. बक्शी साहेब यांचे प्रथम अभिनंदन करणे आवश्यक होते. ते तुम्ही कुणीही केले नाही. फक्त लाल पंजाबी यांनी सुरुवातीलाच सांगितले अगदी स्पष्ट भाषेत त्यांनी सांगितले होते, उल्हासनगरच्या परिस्थितीत तुम्हाला फक्त कायदयाच्या चौकटीतच राहून कामकाज कराचे असेल तर उल्हासनगर मध्ये येवून करा तेथील लोकांना तोंड दया. असे सांगितल्या नंतर त्यांचे तोंड बंद झाले. आणि यु.डी. सेक्रेटरी यांनी सुध्दा त्यांच्यावर दबाव टाकून १० तारखेपर्यंत म्हणजे मा. मुख्यमंत्रीमहोदयांची भेट होत नाही तो पर्यंत ॲज इट इज ठेवण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. ही फ ॅक्ट आहे, त्याच्या नंतर आयुक्तांनी सांगितल्या प्रमाणे १२.५२ कोटी ची जी रक्कम देय आहे या रक्कमेची बजेटमध्ये तरतूद केली नाही तर (टेक्नीकल फॉल्ट होतो. )तांत्रिकदृष्टया बजेट चुकीचा होतो. त्यासाठी त्यांनी सांगितले की, उत्त्पन्नाच्या बाबी व्यवस्थित आहेत, तुम्ही खर्चाच्या बाबींमध्ये कपात करु शकता. याबाबत त्यांनी दोन पर्याय ठेवले होते. एक तर तुमचे उत्त्पन्न वाढवा किंवा खर्च कमी करा, खर्च कमी करा, खर्च कुठी कमी करता येईल? ते ही येथे नमुद करणे गरजेचे आहे. किंवा उत्त्पन्न वाढविले पाहिजे. त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. १७ कोटीसाठी महापौरांनी आश्वासन दिलेले आहे. आणि महापौरांनी आश्वासन दिले असल्याने ते अंतीम होईल यासाठी मी माहापौराचे अभिनंदन करतो की, २० एम.एल.डी.पाणी त्यांनी लवकरात लवकर घेवून यावे, १७ कोटी रुपये न भरता, त्याची तारीख जाहिर करावी, म्हणजे पुढच्या महासभेमध्ये आम्ही त्यांचे अभिनंदन करु, मोकळया मनाने सांगतो तेवढे आम्ही संकुचित वृत्तीचे



नाहीत. ज्याचे (क्रेडिट) श्रेय असेल, त्यास ते देण्यास आम्ही तयार आहेत, त्यानंतर हे जर आम्ही देवू शकलो नाहीत, मध्यंतरी छोटे छोटे ठेकेदार बरेच दिवस बाहेर उपोषणास बसले होते, त्यांना महापौरांनी खात्री दिली होती की, आम्ही तुम्हाला पेमेंट करु. परंतु ते अदयाप शक्य झाले नाही पेपरवर आमचा बजेट १६३ कोटीचा आहे, श्री. जमनु पुरस्वानी म्हणतात १८० कोटी होईल, असे सांगतात परंतु वस्तुस्थिती काय आहे? तेही पाहिले पाहिजे आजूनही ठेकेदार त्याच स्थितीत आहेत. अशी माझी खात्री आहे, जर तसे नसेल तर मा. महापौर व सभागृह नेता मोठया अभिमानाने सांगतात तर अशी स्थिती आहे की नाही ती त्यांनी स्पष्ट करुन सांगावी, ठेकेदारांना त्यांनी जे आश्वासन दिले होते ते त्यांनी पूर्ण केले आहे? किंवा होणार आहे तर या दोन तीन गोष्टीचे समाधानकारक उत्तर मा महापौरांनी दयावे अशी मी त्यांना विनंती करतो.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> मा. महापौर, प्रभाग समिती बाबत उत्तर दिलेले नाही, ते राहून गेले आहे, आपण उत्तर दिलेले नाही, आम्ही विचारले होते.

<u>मा.आयुक्त(श्री. बक्शी):-</u> मा. महापौर महोदय, पुढच्या वर्षी पहिलेच वर्ष आहे, प्रभाग समितीसाठी ठाण्यामध्ये सुध्दा आम्ही प्रभाग समितीसाठी कमीच रक्कम ठेवली होती.

६ लाखाची जी रक्कम ठेवण्यांत आलेली आहे ती पहिल्या वर्षासाठी पुरेशी आहे. दुस-या वर्षासाठी ती वाढवायला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u> ठाण्यात किती ठेवली होती? पहिल्या वर्षी..
<u>मा.आयुक्त (श्री. बक्शी):-</u> एक एक लाख.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u> पहिल्या वर्षी फक्त एक-एक लाख ठेवली होती?

मा.महापौरः- बजेट वरील चर्चा अंतीम टप्यात आणतांना मी सभागृहास सांगू इच्छितो की, प्रशासनाकडुन स्थायी समितीत बजेटचे जे आकडे गेले होते, तेव्हा महसूली उत्पन्नाच्या बाजूला १२१ कोटी व खर्चाच्या बाजूला १४१ कोटी असे आकडे स्थायी समितीपूढे ठेवले होते, स्थायीउ समितीच्या सभापती श्रीम. ज्योती कालानी व स्थायी समितीच्या सदस्यांनी या आकडयांवर सखोल अभ्यास करुन उत्पन्न व खर्चाच्या आकडयाची तोंड मिळवणी करण्यास प्रयत्न केला, प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चाचे आकडे मांडण्याचा प्रयत्न केला, बजेट तर उत्पन्न व खर्चाचा अंदाज असतो, प्रत्यक्षात किती उत्पन्न होते व खर्च होते ते नंतर पुढील वर्षी पहावयास मिळेल परंतु त्या आकडयांना त्यांनी जो आकार दिला आहे. त्याबददल मी माझ्या श्रीमती. ज्योती कालानी व स्थायी समितीच्या सदस्यांना धन्यवाद देतो, कारण की, अशा परिस्थितीत,अशा आर्थिक वर्षात त्यांनी जो बजेट तयार केला आहे तो मोस्ट प्रॅक्टीकल बजेट आहे अतिशय वस्तुस्थिती दर्शक अर्थसंकल्प आहे. त्याच बरोबर शहरवाशीयांसाठी त्यांनी जे लक्ष घातले आहे विशेषतः जकातदरांमध्ये काहीही वाढ केलेली नाही. उलट मागील वर्षी आम्ही जे पाणी दर निश्चित केले होते, दुकानदारासाठी १२५ रुपये प्रतिमहा, गलिच्छवस्त्यांमध्ये विट बांधकाम असलेल्या पक्या घरांना १०० रुपये प्रतीमहा याप्रमाणे पाणी पटटी बिल आकारले जात होते याबाबत व्यापारी व गलीच्छ वस्तीतील नागरीकांची जी तक्रार होती की आम्हास आकारली जाणारी पाणी पटटी जास्त असल्याने ती कमी करावी या लोकांची ही मागणी विचारात घेवून स्थायी समितीने व्यापारी वर्गासाठी पाणीपटटी १२५ रू. ऐवजी ५० रुपये प्रतिमहा याप्रमाणे पाणीपटी निश्चित केली यासाठी मी माझी भगिनी श्रीमती. ज्योती कालानी व स्थायी समितीच्या



त्यांच्या टिमला धन्यवाद देतो व शहरवाशियांवरील कर कमी करण्याची त्यांनी जी कृतीकेली ती शहरवाशी कधी विसरु शकणार नाहीत, या बजेटबाबत आमच्या विरोधी पक्षीयांनी जेवढया काही क्युरीज रेझ केल्या होत्या मुदे उपस्थित केले होते. त्या सर्वांचे आयुक्तांनी समाधानकारक उत्तर दिले आहे असे मला वाटते. जकात करापोटी जी ५० कोटीची तरतूद केली आहे काही क्वार्टस कडुन अशा काही सूचना आल्या आहेत की, कदाचित ५० कोटीचे उददीष्ट आम्ही पुर्ण करु शकणार नाही, ५० किंवा ५१ कोटीचे जे उदिष्ट ठेवले होते त्यामध्ये आयुक्तांनी प्रशासनाचेवतीने काही वस्तूचे जकात करामध्ये वाढ करुन ८ -८ १/२ कोटीची वाढ करण्याची शिफारस केली होती. तो प्रस्ताव आम्ही पारीत केलेला नाही. यासाठी मी आयुक्तांना सांगेन की, सदयाच्या ठेकेदाराकडून ज्या दराने जकात येत आहे. टेंडर ला त्याच दराने फ्लोअट केली जावी. ४६ कोटीवर ४६ कोटी फ्लोअट केल्यानंतर जर ५० कोटी उत्पन्न येत असेल तर ५१ कोटी येत असेल तर महानगरपालिकेसाठी ती भाग्याची गोष्ट असेल. या बजेटला जो बजेट आहे, प्रॅक्टीकल आहे, पिपल फ्रेन्डली आहे अशी बजेट आपल्या समोर आहे, आपणसर्वांना माझी विनंती असेल की, बजेट सर्व संमतीने मंजूर केला तर चांगले होईल व त्यामध्ये आपली आमची व आपणासर्वांची इज्जत आहे व आपल्या ५ वर्षाच्या कार्यकालामधील हा शेवटचा बजेट आहे. त्यास सर्व संमतीने मंजूर करुन एकतेचा पुरावा दयावा. असे आपणा सर्वांना माझे निवेदन आहे. तर मला वाटते, चर्चेमध्ये जास्त वेळ न घालविता बजेट सर्व संमतीने मंतूर करावे जेणे करुन तो एकमताने मंजूर केला जावा.

दुसरे असे की, १२ १/२ कोटीचे देणे देण्याबाबत आयुक्तांनी जे सांगितले की त्याची तरतूद करणे जरुरीचे आहे त्यासाठी त्यांनी उत्पन्नाच्या बाजूचे जे वेगवेगळे शिर्ष सांगितले त्या शिर्षामध्ये तरतूद वाढवून शकता, त्यासाठी सत्ताधारी व विरोधी पक्षाचे जे जबाबदार पादाधिकारी आहेत उदा. सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, गटनेता यांना एकत्रित बसवून आपण चर्चा करु शकतो. दॅट प्रोविजन कॅन बी मेड इन डिफरंट हेड आपण सहमत असाल तर दोन, तीन-चार शिर्षामध्ये वाढ करु शकतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी रामभाउ आढावः- बजेट पास--पास-----

मा.आयुक्त (श्री. बक्शी) :-नाही, मी सुचना केली होती की, हे जे तीन-चार शिर्ष आहेत त्यामध्ये थोडे फार उत्पन्न वाढवून दाखविले जावू शकते, व दुसरे (खर्चाचे)जे शिर्ष आहेत त्यामध्ये थोडी कपात करता येण्यासारखी आहे जणे करुन १२ कोटी ५२ लाखाचा जो फरक आहे तो भरुन काढता येवू शकेल. सार्व-आरोग्य विभाग, कर निर्धारक व संकलक विभाग या विभागामधील (खर्चात)थोडी कपात करावी व जकात, मालमत्ता कर व पाणीपटटी व विकास शुल्क इत्त्यादीमध्ये थोडी वाढ करावी. या मुदयावर आपण चर्चा करुन निर्णय घेतला तर अंतिम स्वरुप देता येईल नाही तर.......

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-मी सांगितले होते की आम्ही ४ कोटी बाबत जो ठराव पास केला आहे की, व्याज देणार नाही म्हणून व आम्ही ४ कोटीची जी तरतूद केली आहे व त्यांनी आमच्या योजनेसाठी अदयाप ठेकेदाराला पैसे दिलेच नाहीत, तरीही कर्ज परतफेड करण्यासाठी आम्ही बजटमध्ये तरतुद केली आहे, त्या व्यतिरिक्त आयुक्त साहेब जर आणखी पैसे देवू इच्छित असतील तर आम्ही ते रिवाइज्ड बजेटमध्ये ॲडजेस्ट करु. महापालिकेची जी आर्थिक स्थिती आहे, त्यानुसार आपण यास मंजूरी दयावी.

मा.महापौरः- नाही, नाही आयुक्तांची जी सुचना आहे, माझ्यामते ती बरोबर आहे, आपण सभागृहाची त्यास स्विकृती घेवू या.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आम्ही आयुक्तांना अधिकार देतो.

मा.आयुक्त (श्री. बक्शी):- येथेच १० मिनिटात यावर निर्णय घेतला तर तो अधिक योग्य होईल.

मा.सदस्य श्री. जमनु पुरस्वानीः- मा. आयुक्त साहेब, महानगरपालिकेच्या ज्या मालमत्ता पडुन आहेत त्याबाबत आपण काय करणार आहात? ज्या मिळकती आरक्षित भुखंडावर तयार झालेल्या आहेत, ज्याच्या पासून महानगरपालिकेस २५ टक्के एफ.एस.आय मिळणार आहेत ज्या १० कोटीच्या मिळकती आहेत त्यांचे आपण काय करणार?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- श्री. जमनु पुरस्वानी यांना मी सांगु इच्छितो की, श्री. लाल पंजाबी यांनी जो प्रश्न विचारला होता की, मार्केट यावर्षी मार्केटमधुन जास्त वसुली येईल का? असे आम्ही दाखविले आहे. २५ लाख रू. आम्ही यासाठी दाखविले आहेत की जे चार असे प्लॉट होते की, ते आरक्षित होते अशा प्लॉटवर मार्केट बांधण्यास महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. त्यातुन २५ टक्के आम्हास परत घ्यायचे आहेत. या चारही मिळकती तयार झालेल्या आहेत ते जे आम्ही त्यांच्याकडुन घेऊ व भाडयाने देऊ किंवा महानगरपालिका त्यांचे विक्री करू शकते यासाठी आजपर्यंत मार्केटच्या शिर्षामध्ये जी तरतुद केली नव्हती. ती यावर्षी आम्ही २५ लाखाची तरतुद केलेली आहे.

मा.सदस्य श्री. जमनु पुरस्वानीः- दहा कोटीची प्रॉपर्टी ठेऊन जर आम्ही वर्षाला ५ लाख रू. वाढविले तर मी विचारू इच्छितो की, प्रॉपर्टी विकली जाऊ शकते काय?

मा.महापौरः-आयुक्तांची सुचना आहे उत्पन्नाच्या बाजुस जकातीमध्ये एक कोटी रू. वाढविण्याची त्यांनी सुचना केली आहे. मालमत्ता करामध्ये एक कोटी रू. वाढविण्याची सुचना केली आहे. पाणी पटटी वसुलीत साडे सात कोटी रू.

वाढविण्याची सुचना केली आहे व विकास श ुल्कामध्ये ५० लाख रू. वाढविण्याची सुचना केली आहे. एकुण दहा कोटीची वाढ उत्त्पन्नाच्या बाजुस आहे व खर्चामध्ये विकास कामांमध्ये ५२ लाख सार्व. आरोग्य विभागात दिड कोटीची कपात करण्याची सुचना केली आहे. कर निर्धारक व संकलन विभागासाठी ५० लाख रू. कमी करण्याची सुचना केली आहे. अशाप्रकारे साडे बारा कोटीची तुट भरून काढता येऊ शकते. मला वाटते की, सभागृहाने यास आपली स्विकृती दयावी.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौर, जकात विभागामध्ये किती वाढ करण्याची सुचना आहे? एक कोटी?

मा.महापौर :-एक कोटी.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-५० कोटीचे ५१ कोटी करावे असे म्हणणे आहे?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- मा.महापौरजी, हे टेक्नीकली बरोबर नाही. महासभेपुढे ज्या सुचना / शिफारसी येतात त्या स्थायी समिती कडुन येतात आयुक्तांकडुन नाही. तर आयुक्तांनी स्थायी समितीला शिफारस करणे व स्थायी समितीने आम्हाला म्हणजे महासभेला शिफारस करणे हे बरोबर आहे.

--५२--

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-स. महापौरजी, विरोधी पक्षाचे सदस्य म्हणतात की, श्री. बी.बी.मोरे बोलत असतील तर आम्ही बजेट एकमताने मंजुर करू तर मी म्हणतो ठिक आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानीः- दुर्बल घटकांसाठी ५० लाखाची तरतुद कमी केली आहे. ते आपणास कबुल आहे काय?

मा.सदस्य श्री. गिरधारी वाधवाः- झोपलेल्या वाघाला उठवु नका. बघा आता आमचा वाघ उठला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी- तो उठु दया. परंतु माईक मध्ये फु केले नाही पाहिजे.

श्री. इदनानी(उपमुख्य लेखाअधिकारी):-दिड कोटी रू.ची जी ॲडजेस्टमेंट आहे ती या प्रकारची आहे.

पाणी पुरवठा कामी आमचे जे एकुण पोटेन्शल आहे. आमचे कडे उपलब्ध आहे ते जवळ जवळ ५० ते ५२ कोटी त्यापोटी आम्ही तीस कोटीचे उददीष्ठ ठेवले आहे अशा प्रकारे साडे सात कोटीची वाढ सुचविली आहे त्यानुसार जकातीमध्ये १ कोटी
मालमत्ता करामध्ये १ कोटी

विकास शुल्कामध्ये ५० लाख अशाप्रकारे दहा कोटीची वाढ उत्त्पन्नाच्या बाजुस. तर खर्चामध्ये जी कपात केली आहे त्यात विकास कामामध्ये ५२ लाखाची कपात सार्व आरोग्य विभाग दिड कोटी व कर निर्धारक व संकलन विभागात ५० लाखाची कपात केली आहे. खर्चामध्ये अडीच कोटी कपात व उत्त्पन्नामध्ये १० कोटीची वाढ अशाप्रकारे ही ॲडजेस्टमेंट केली जात आहे.

मा. महापौरः-बजेट एकमताने मंजुर?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- आम्ही अगोदर सांगितले आहे की, आमचा या बजेटला विरोध आहे म्हणुन?

मा.महापौर :-मी बजेट मतदानास टाकत आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा.महापौर, २० रस्त्याची तरतुद आपल्या हाती आहे ते २० रस्ते बजेटमध्ये नोंदले जावेत.

मा.महापौर :- ठिक आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- रस्त्याची संख्या आपण कशी निश्चित करत आहात?२० ,१५ ,१० किंवा ५ येथे बजेट पास करत आहात की रस्त

मा.महापौरः- बजेट पास करित आहोत.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- बजेट पास करत आहात की, रोड पास करत आहात.

मा.महापौरः- मी बजेट मतदानास टाकत आहे. जे सदस्य बजेट पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

मा.सदस्य श्रीमती सुनिता राजवानीः-भले ही मतदान घ्या.



मा.सदस्य श्री. बनवारी ढेणवालः-महापौरजी, सार्व.आरोग्य विभागाची तरतूद आपण आता किती कमी केली ? कॉलरा पासून शहर अदयाप मुक्त झालेले नाही अशा परिस्थितीत सार्व. आरोग्य विभागाची तरतूद आपण दिड कोटी ने कमी करत आहात?
मा.महापौरः- जे बजेटच्या बाजूने आहेत त्यांनी आले हात वर करावेत.

मा.सचिव :-श्री. ढेणवालजी , आपण बजेट मंजूर करण्याच्या बाजूने आहात किंवा नाही?
मा.महापौरः-श्री. ढेणवाल आपण बजेट मंजूर करण्याच्या बाजूने आहात किंवा नाही ते सांगा.
मा.सदस्य श्री.बनवारी ढेणवाल :- आरोग्य विभागाबाबत मी चर्चा करू इच्छितो.
मा.महापौर :- नाही, आता चर्चा पुर्ण झाली.
मा.सचिवः- बजेट मंजुर करण्याच्या बाजुने ३५ सदस्य आहेत. त्यांची नावे येणे प्रमाणे आहेत.
प्रस्तावाच्या बाजुने मतः-

१. श्रीमती. कालानी ज्योती
२. श्रीमती. दासानी मिनु
३. श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई
४. श्री. खेमाणी देवेंदसिंह
५. श्री. पमनानी ईश्वर
६. श्री. वाधवा गिरधारी
७. श्री. तलरेजा विनोद
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१० श्रीमती. वनवारी मोना
११ श्रीमती. कुंदनानी लविना
१२. श्री. रामरख्यानी मोहनदास

१३. श्री. वनवारी किशोर
२. श्री. यादव नरेश
३. श्रीमती. पवार पंचशिला
४. श्रीमती. बगाडे सुनिता
५. श्री. टाले प्रमोद
६. श्री. आढाव रामभाऊ
७. श्री. मोरे भानजी
८. श्रीमती. करोतिया मालती
९. श्री. ढेणवाल बनवारी
१०. श्री. सेवलदास ठाकुर
११. श्रीमती. वसिटा बेबी
१२. श्री. बेहरानी ठाकुर
१३. श्रीमती. साधवानी जया
१४. श्री. मनसुलकर सुभाष
१५. श्रीमती. वलेचा पदमा
१६. श्रीमती. गजवानी कांता
१७. श्रीमती. भठिजा इंदीरा
१८. श्री. केणी जयकुमार
१९. श्री. माखिजा हरदास
२०. श्री. सोनावणे राजु
२१. श्री. पुरस्वानी जमनु
२२. श्री. आयलानी कुमार
२३. श्री. जाधव सुरेश



मा.महापौरः- जे सदस्य बजेट मंजुर करण्याच्या बाजुने नाहित त्यांनी आपले हात वर करावेत.

मा.सचिवः- बजेट मंजुर न करण्याच्या बाजुने २१ सदस्य आहेत त्यांची नावे येणे प्रमाणे आहेत.

प्रस्तावाच्या विरोधात मतः-

१. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
२. श्रीमती. सोनावणे यमुना
३. श्रीमती. वेलकर सुरेखा
४. श्रीमती. यशस्विनी नाईक
५. श्री. तेजी कैलास
६. श्री. बोडारे धनंजय
७. श्री.चौधरी राजेंद्र
८. श्री. लांडे पांडुरंग
९. श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई
१०. श्रीमती. राजवानी सुनिता
११. श्री. वारिंगे पंढरीनाथ
१२. श्री. भिमसेन मोरे
१३. श्री. चव्हाण रमेश
१४. श्री. महाडिक प्रकाश
१५. श्रीमती. मोकल सिमा
१६. श्री. उमाप रामदास
१७. श्री. रामचंद्र पारवानी
१८. श्री. आशा रधवानी
१९. श्री. माखिजा प्रकाश
२०. श्री. राजानी नरेंद्र
२१. श्री. भारती राजानी

मा.महापौरः-

हा बजेट बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सरकारी वर्ष २००१-२००२ करिता करांचे दर व मर्यादा निश्चित करणे व अर्थसंकल्पिय अंदाजाचे अंतिम स्विकृती बाबत.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ९६च्या तरतुदीनुसार स्थायी समितीने २०००-२००१ चे अंदाजपत्रक व सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक ठराव क्र.१९४ अ दिनांक १२/२/२००१ अन्वये पारीत करून अधिनियमाचे कलम १०० च्या तरतुदीनुसार अंतिम मान्यतेसाठी सादर केले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

सन २०००-२००१चे सुधारीत अंदाजपत्रकः-

१. वित्तिय वर्ष सन २०००-२००१ साठीचे अ अंदाजपत्रकीय उत्पन्न :- ८७३४१३०००

२. वित्तिय वर्ष सन २०००-२००१ साठीचे अ अंदाजपत्रकीय खर्च :- ७०२२२४०००

३. वित्तिय वर्ष सन २०००-२००१ साठीचे क अंदाजपत्रकीय उत्पन्न :- १०३६८२०००

४. वित्तिय वर्ष सन २०००-२००१ साठीचे क अंदाजपत्रकीय खर्च :- २७४६६००००

--५५--

सन २००१-२००२ चे सुधारित अंदाजपत्रक :-

१. वित्तिय वर्ष सन २००१-२००२ साठीचे अ अंदाजपत्रकीय उत्पन्न :- ११७२३४९०००

२. वित्तिय वर्ष सन २००१-२००२ साठीचे अ अंदाजपत्रकीय खर्च :- ११९३१४७०००

३. वित्तिय वर्ष सन २००१-२००२ साठीचे क अंदाजपत्रकीय उत्पन्न :- ४६१५४२०००

४. वित्तिय वर्ष सन २००१-२००२ साठीचे क अंदाजपत्रकीय खर्च :- ४४०२२४०००

स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे २०००-२००१ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००१-२००२चे रूपये ५,२०,००० शिल्लक दर्शविणारे रूपये १६३,३८,९१,००० रक्कमेचे मूळ अंदाजपत्रक तसेच २००१-२००२ करिता जकात वसुलीसाठी अभिकर्त्यांची नेमणुक निविदा मागवुन करणेचे प्रस्तावास अंतिम मंजुरी देणे बाबत.

महासभा ठराव क्रमांक :- ४१ दिनांक :- ५.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन २०००-२००१ करिता रूपये ९७,७०,९५,०००/-रूपयांचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये स्थायी समितीने वर्ष २००१-२००२ करिता सादर केलेले अर्थसंकल्पीय अंदाज

विचारात घेवून त्यात, सभेमध्ये सुचविल्याप्रमाणे फेरफार करून रूपये १७३,३८,९१,०००/- रक्कमेचे अंदाजपत्रकास अंतिम स्विकृती देत आहे. तसेच नगरपालिकेकरिता शासनाने जकात अभिकर्ता नेमण्यासंबंधी ठरविलेल्या अटी व शर्तींशी विसंगत नसलेल्या अशा अटी व शर्तींवर सन २००१-२००२ करिता जकात वसुली अभिकर्ता नेमणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

तसेच उक्त अंदाजपत्रक छापुन प्रत्येक पालिका सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--५६--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- २० रस्त्यांचा समावेश केला जावा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-जसे आम्ही राष्ट्रगीत गातो तसेच प्रारंभिचे वंदेमातरम आपण स्वतः म्हंटले पाहिजे. कॅसेट ठिक नाही आहे.
मा.सचिव :-होय. गाऊ. गाऊ.
मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- महापौरांना बोलु दया ना.

मा.सचिवः- ठिक आहे. गाऊ गाऊ. बिल्कुल, बिल्कुल. करू करू.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- काहीतरी एकत्र मिळुन गाऊ?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- हे श्री. राजानी यांच्यावर सोपवु या.
मा.सचिव :- कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जन गन मन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.३२ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौरांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महापालिका सचिव

उल्हासनगर

महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१९/३/२००१.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/३/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.३.२००१ रोजी दुपारी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.
मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. चौधरी गणेश
५. श्री. वाघे शामु बाबु
६. श्रीमती. मोकल सीमा
७. श्रीमती.सोनावणे यमुना
८. श्रीमती.कालानी ज्योती
९. श्री.ढेणवाल बनवारी
१०. श्री. उमाप रामदास
११ श्रीमती. वेलकर सुरेखा
१२. श्री. यादव नरेश
१३. श्री.सोनावणे राजु
१४. श्रीमती. दासानी मिनु
१५. श्रीमती.पंचशिला पवार
१६. श्री.टाले प्रमोद
१७. श्री. आढाव रामभाऊ
१८. श्रीमती बगाडे सुनिता
१९. श्री.भांडे भगवान
२०. श्री. ठाकुर सेवलदास
२१. श्री.बनवारी किशोर
२२. श्री.तेजी कैलाश
२३. श्रीमती.रूपचंदानी भगवंती
२४. श्रीमती.लक्ष्मीबाई लुंड
२५. श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२६. श्रीमती.बसीटा बेबी
२७. श्रीमती. मटाई जोनिता
२८. श्री.चौधरी राजेंद्र
२९. श्री.लांडे पांडुरंग
३०. श्रीमती.ससाणे लक्ष्मी
३१. श्री.मोरे भानजी.
३२. श्रीमती. राजवानी सुनिता
३३. श्री.वारींगे पंढरीनाथ
३४. श्रीमती. टेकचंदानी चंदा
३५. श्री.पुरस्वानी जमनादास
३६. श्री. वाधवा गिरधारी
३७. श्री. पंजाबी लाल
३९. श्री.पारवानी रामचंद्र
४०. श्री. तलरेजा विनोद
४१. श्री. रोहडा श्यामसुंदर
४२. श्री. गुप्ता प्रभुनाथ
४३. श्रीमती.करोतिया मालती
४४. श्री. बहरानी ठाकुरदास
४५. श्री.जाधव सुरेश
४६. श्री.मोरे भिमसेन
४७. श्री.चव्हाण रमेश
४८. श्री.महाडिक प्रकाश
४९ श्रीमती.साधवानी जया
५०. श्री.भाटीया जयप्रकाश
५१. श्रीमती. वनवारी मोना
५२. श्रीमती. जेस्वानी आशा
५३. श्री. राजानी नरेंद्र.
५४. श्री. सुभाष मनसुलकर
५५. श्रीमती.नाईक यशस्विनी
५६. श्रीमती.राजानी भारती
५७. श्रीमती.कुंदनानी लविना
५८. श्रीमती.बलेचा पदमा
५९. श्रीमती. गजवानी कांता
६०. श्रीमती.भठिजा इंदिरा
६१ श्री.केणी जयकुमार
६२. श्री.पंजाबी नारायण
६३. श्री.आयलानी कुमार
६४. श्री. अचनानी पम्मीकुमार
६५. श्रीमती. वारिंगे पन्ना
६६. श्रीमती. राधवानी आशा
६७. श्री. माखिजा प्रकाश
६८. श्री. रामरख्यानी मोहनदास
६९. श्री.जग्यासी राजु
७०. श्री.बेहरानी गोप
७१. श्री. क्रिशनानी गोदुमल
७२. श्री.ठाकुर नरेंद्र
७३. श्री. केसवानी किशोर

३८. श्री. पमनानी ईश्वर    ७४. श्री. सचदेव गिरधारी



सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सचिव :- विषय क्र. १ वाचून दाखवितात.

विषय :- स्थायी समितीच्या सोळा सदस्यांपैकी १ एप्रिल, २००१ रोजी निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी आठ नविन सदस्यांची नेमणुक करणे.

स्थायी समितीचे जे आठ सदस्य निवृत्त होत आहेत मी त्यांची नावे वाचुन दाखवत आहे. १ एप्रिल पासुन जे आठ सदस्य निवृत्त होत आहेत त्यांची नावे वाचुन दाखवितो.

१. श्रीमती. ज्योती कालानी.
२. श्री. किशोर वनवारी.
३. श्री. ठाकुर बेहरानी.
४. श्रीमती. कांता गजवानी
५. श्री. नारायण पंजाबी
६. श्री. रामचंद पारवानी.
७. श्री. राजेंद्र चौधरी
८. श्री. भांडे भगवान

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-आयुक्त साहेब नाही आहेत.

मा.सचिव :-स्थायी समिती सदस्य पदासाठी आठ पदे रिक्त आहेत. आठ पदे आपणांस भरायची आहेत. त्यासाठी ९ उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र भरले होते. अजुन कोणीही आपले नामनिर्देशन पत्र मागे नाही घेतले. जे ९ उमेदवार अंतीम यादीत आहे त्यांची मी नावे येथे घेत आहेत.

१. श्रीमती. कालानी ज्योती पप्पु (सुरेश)
२. श्री. केणी जयकुमार दत्तात्रय
३. श्री. पारवानी रामचंद कुटूमल
४. श्री. बहरानी ठाकुर वर्यलदास
५. श्री. मोरे भानजी भिकाजी
६. श्रीमती. राधवानी आशा सुंदर
७. श्री. वनवारी किशोर नारायणदास
८. श्रीमती. वेलकर सुरेखा राजन
९. श्रीमती. सोनावणे यमुना शालीग्राम

जर कुणा उमेदवाराला आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यायचे असेल तर पाच मिनिटे वेळ दिला जात आहे. (पाच मिनिटे वेळ संपल्यावर )आहे कुणी उमेदवार ज्यांना नामनिर्देशन पत्र मागे घ्यायचे आहे? नाही. तुम्हाला काही सुचना दयायच्या आहेत.मतपत्रिका स्थळ विभागापासुन फाडुन घेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादा रेषेंच्या दोन्ही बाजुस मिळुन मुद्रेचा ठसा उमटवलेला आहे. पिठासिन अधिका-यांची स्वाक्षरी आहे.

१. तुम्हास ८ मते आहेत.
२. प्रत्येक मत (ग) च्या अशा खुणेत दाखवायचे आहे.
३. तुम्ही तुमची ८ मते कोणत्याही एका उमेदवारास वा ८ उमेदवारास विभागुन तुमच्या मर्जीप्रमाणे देऊ शकता.
४. एकाच उमेदवाराच्या नावापुढे आठ पेक्षा जास्त फुल्या करू नका.

५. उमेदवारांच्या नावासमोरील रकान्यात उमेदवाराच्या नावापुढे खुण व खुणा करणेची आहे.



६. (ग)अशी फुलीची खुण तुम्हास दिलेल्या साहित्यानेच करणेची आहे.

आपणास दिलेल्या मतपत्रिकेमागे सुचना आणि कोणकोणत्त्या कारणांमुळे मतपत्रिका रदद होईल ते लिहिले आहे. तुम्हाला जे मत देण्यासाठी साहित्य दिले आहे त्यानेच तुम्हाला मतदान करायचे आहे. तो पेन मतदान कक्षात ठेवला आहे.

मतपत्रिका कोणत्त्या कारणामुळे रदद होईल ते मी तुम्हाला सांगतो.

१ सभासदाने मतपत्रिकेवर स्वाक्षरी केली किंवा त्याची ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर.

२. मतपत्रिका स्थळ विभागापासुन फाडून घेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादा रेषेच्या (परफोरेशन)दोन्ही बाजुस मिळुन मुदचा ठसा उमटविलेला नसेल तर किंवा पिठासिन अधिकारींची स्वाक्षरी नसेल तर ती मतपत्रिका अवैध ठरेल.

३. मतपत्रिकेवर मत निर्देशक खुणा (फुल्या)नसतील तर किंवा त्या कोणत्त्या उमेदवाराच्या नावापुढे केल्या आहेत त्याबददल संदेह उदभवल्यानंतर.

४ मतपत्रिकेवर एकाच उमेदवाराच्या नावापुढे आठ पेक्षा अधिक फुल्या असतील तर व आठ उमेदवारापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावापुढे फुल्या असतील तर.

५. मतपत्रिकेवर फुली करण्यासाठी जी जागा आहे त्याऐवजी इतर कोठेही फुली केल्यास.

६. तुम्ही एका किंवा अनेक उमेदवारांच्या नावांपुढे एकुण फुल्यापेक्षा जास्त फुल्या केल्या तर.

मतपेटी बंद करण्याआधी ती मी तुम्हाला दाखवतो पुर्ण रिकामी आहे हे पाहुन घ्या.(मतपेटी सर्व सदस्यांना दाखवुन) बंद करू?

<u>काही सदस्य</u> :- हो.

<u>मा.सचिव</u> :- आता एकेका सदस्याचे नाव घेतले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> निवडणुक सुरू होण्यापुर्वी मी महापौरांना विनंती करतो की, आमचे जे तीन सदस्य आहेत त्यांना जर मतदान आधी करू दिले तर बरे होईल. १ श्री. गोप बेहरानी, २. श्रीमती. भगवंती रूपचंदानी, ३ श्रीमती. पदमा वलेचा, ४. श्री. शामु बाबु वाघे यांना जर आधी मतदान करू दिले तर बरे होईल.

<u>मा.महापौर:-</u> ठिक आहे.

<u>मा.सचिव :-</u> ज्यात-हेने महापौर व उपमहापौर निवडणुकीत परिनिरिक्षक नियुक्त केले जातात ती पध्दत या निवडणुकीत नाही. परंतु मागच्यावेळेस आपण सर्वांनी ठरवले होते की, मतगणनेसाठी त्यांची मदत घेतली जावी. जे मुख्यलेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक आहेत. मी हे पण सांगतो की, मतपत्रिका वैद्य आहे की अवैद्य हे ठरविण्याचा त्यांना अधिकार नसेल ते केवळ मतगणना करू लागतील. मतपत्रिका वैद्य आहे की अवैद्य हे ठरविण्याचा अधिकार मा. पिठासिन अधिकारी यांना असेल. ते फक्त मदत करतील. दुसरे असे की, मतदान सुरू करतेवेळी जी वेळ नोंदली जाईल. मतदानाची वेळ एक तास असेल. जर नाव घेताना कुणी सदस्य उपस्थित नसेल, ते जर एका तासात आले तर त्यांना मतदान करण्याची संधी मिळेल.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे</u> :-एक मिनिट, सचिव साहेब, मतपत्रिका चुकीची असेल किंवा कोणी स्केचपेन ने निशाणी केली तर हे कोण ठरवणार की मतपत्रिका चुकीची आहे की बरोबर?

मा.सचिव :- मा.पिठासिन अधिकारी ठरवतील.

--४--

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-जे अधिकारी बसले आहेत ते मत देणार की नाही की, बरोबर आहे की चुक ते?

मा.सचिव :- त्यांना फक्त मतगणनेसाठी बसविले आहे. या निवडणुकीत ही पध्दत नाही की, छाननी करणारा कुणी असला पाहिजे. महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी छाननी करणारे स्वतंत्र परिनिरीक्षक असतात. या स्थायी समिती सदस्य निवडणुकीत स्वतंत्र परिनिरीक्षक नेमण्याची तरतुद नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-नाही. नाही मागच्या वेळेस त्यांनी निर्णय दिला होता एका मतासाठी. यासाठी विचारत आहे.

मा.सचिव :-तो अधिकार मा.पिठासिन अधिकारींना असेल हे मी आधीच तुम्हाला सांगीतले. मतपत्रिका वैद्य आहे की अवैद्य हे ठरविण्याचा अधिकार मा.पिठासिन अधिकारी यांना आहे.जर समसमान मते पडली तर निर्णयात मत देण्याचा अधिकार पण पिठासन अधिकारी यांना असेल. जर पिठासिन अधिकारींना वाटले तर ते स्वत: निर्णायक मत देतील किंवा लॉटरी काढतील. त्यांच्या मर्जी नुसार असेल. आपणास मतदानपत्रिका इथुन घ्यायची आहे व तेथे मतदान कक्षात मतदान करण्यासाठी जायचे आहे व मतदान केल्यानंतर मत पेटीमध्ये मतपत्रिका टाकावयाची आहे. माझ्या मागे असलेल्या घडयाळानुसार ४. ५० झाले आहेत. मी मतदानासाठी आता सदस्यांची नावे पुकारत आहे.

१. श्रीमती. भगवंती रूपचंदानी
२. श्री. श्याम बाबु वाघे
३. श्री. जयप्रकाश भाटीया
४. श्री. गोप बेहरानी
५. श्रीमती. पदमा वलेचा
६. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
७. श्री. गणेश चौधरी

मा.सदस्य श्री. गणेश चौधरी :-मी मतपत्रिकेवर सुरवातीलाच एक फुली स्वत:च्या पेनाने मारली व इतर सात रकान्यात तिथे ठेवलेल्या साहित्त्यानेच फुल्या मारल्या आहेत. तरी मला दुसरी मतपत्रिका देण्यांत यावी.

मा.सचिव :- मा.सदस्य श्री. गणेश चौधरी यांचे म्हणणे आहे की, त्यांनी सुरूवातीलाच आपल्या पेनाने एक फुली केली. आणि बाकीच्या सात रकान्यात तिथे ठेवलेल्या साहित्त्याने फुल्या मारल्या आहेत. त्यांना दुसरी मतपत्रिका हवी आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-म्हणजे त्यांचे मत रदद झाले.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-दुसरी मतपत्रिका देण्याची तरतुद आहे.

मा.सचिव :-ते मतपत्रिका पेटीत टाकण्याच्या आधी सांगत आहेत. ते मा. पिठासिन अधिकारी यांना सांगत आहेत की, ही मतपत्रिका रदद करून मला दुसरी मतपत्रिका दया. निर्णय पिठासिन अधिकारी घेतील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- ते नंतर ठरवु आता तुम्ही मत पेटीत टाका.
काही विपक्ष सदस्य :- असे कसे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- प्रत्त्येकवेळी असे होते का? मागच्या वेळेस श्रीमती. सुरेखा वेलकर यांचे पण असे झाले होते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आपणांस काय झाले?



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- सचिव साहेब, आपण माहिती दया.

मा. सचिव :- ही मतपत्रिका कोणी पाहिली नाही. कुणाला मत दिले ते. कुणाला माहित नाही की कुणाच्या बाजुने मत दिले आहे. कोणी कुणालाही मत देऊ शकतो. मतपत्रिका पेटीत टाकण्यापुर्वी त्यांनी मा. पिठासिन अधिकांरींना तसे सुचित केले आहे. ही रदद करून त्यांना दुसरी मतपत्रिका दिली तर ते मतदान करू शकतील. ही मतपत्रिका रदद केली जाईल.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- असे कायदयात आहे का?

मा.सचिव :- कायदयाची काही अडचण नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सचिव साहेब, पिठासिन अधिकारी ते ठरवतील ना? ते ठरवतील.

मा.महापौरः-शहराचे प्रथम माजी महापौर आहेत. चुकीने झाले तर काय झाले?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महापौर साहेब, तुम्ही जसा सहयोग देता तसा यांनी पण दिला पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- नियमाप्रमाणे साथ दिली आहे त्याबददल आभारी आहे.

(मा.सदस्य श्री. गणेश चौधरी यांना दुस-यांदा मतपत्रिका देण्यात आली)

मा.सचिव :- पहिली दिलेली मतपत्रिका रदद घोषित करण्यात आलेली आहे. ती मतपत्रिका मोहरबंद करून लखोटयात सिल करण्यात येत आहे. हि मतपत्रिका नंतर नष्ट केली जाईल.

८. श्रीमती. सोनावणे यमुना
९. श्रीमती.कालानी ज्योती
१०. श्री.ढेणवाल बनवारी
११. श्री.उमाप रामदास
१२. श्रीमती. वेलकर सुरेखा
१३. श्री. यादव नरेश
१४. श्री.सोनावणे राजु
१५ श्रीमती. दासानी मिनु
१६ श्रीमती.पंचशिला पवार
१७. श्री.टाले प्रमोद
१८. श्री. आढाव रामभाऊ
१९ श्रीमती बगाडे सुनिता
२०. श्री.भांडे भगवान
२१. श्री. ठाकुर सेवलदास
२२. श्री.वनवारी किशोर
२३. श्री.तेजी कैलाश
२४. श्रीमती.लक्ष्मीबाई लुंड
२५. श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२६. श्री. पमनानी ईश्वर
२७. श्रीमती.वसीटा बेबी
२८. श्रीमती. मटाई जोनिता
२९. श्री.चौधरी राजेंद

३०. श्री.लांडे पांडुरंग
३१. श्रीमती.ससाणे लक्ष्मी
३२. श्री.मोरे भानजी.
३३. श्रीमती. राजवानी सुनिता
३४. श्री.वारीगे पंढरीनाथ
३५. श्रीमती. टेकचंदानी चंदा
३६. श्री.पुरस्वानी जमनादास
३७. श्री. वाधवा गिरधारी
३८. श्री.पारवानी रामचंद्र
३९. श्री. तलरेजा विनोद
४०. श्री. रोहडा श्यामसुंदर
४१. श्री. गुप्ता प्रभुनाथ
४२. श्रीमती.करोतिया मालती
४३. श्री. बहरानी ठाकुरदास
४४. श्री.जाधव सुरेश
४५. श्री.मोरे भिमसेन
४६. श्री.चव्हाण रमेश
४७. श्री.महाडिक प्रकाश
४८. श्रीमती.साधवानी जया
४९. श्री.भाटीया जयप्रकाश
५०. श्रीमती. वनवारी मोना
५१. श्रीमती. जेस्वानी आशा
५२. श्री. राजानी नरेंद्र.
५३. श्री. सुभाष मनसुलकर
५४. श्रीमती.नाईक यशस्विनी
५५. श्रीमती.राजानी भारती
५६. श्रीमती.कुंदनानी लविना
५७. श्रीमती. गजवानी कांता
५८. श्रीमती.भठिजा इंदिरा
५९ श्री.केणी जयकुमार
६०. श्री.पंजाबी नारायण
६१. श्री.आयलानी कुमार
६२. श्री. अचनानी पम्मीकुमार
६३. श्रीमती. राधवानी आशा
६४. श्री. मारिवजा प्रकाश
६५. श्री. रामरख्यानी मोहनदास
६६. श्री.जग्यासी राजु
६७. श्री. धनंजय बोडारे
६८. श्री. हरदास मारिवजा

संध्याकाळचे ५. ५० वाजले आहेत व १०० : मतदान झाले आहे. आता ६८ मतदान झाले आहे. मतदानपेटी उघडली जाईल त्यावेळी मंचावर उमेदवार किंवा त्यांचा एक प्रतिनिधी येईल. मतदान पेटी उघडण्यापुर्वी येथे नऊ उमेदवार आहेत ज्यास सर्वात कमी मते मिळतील त्यास वेगळी करून उर्वरित आठ उमेदवार निवडले जातील. जर अशी काही परिस्थिती निर्माण झाली की, दोघांनाही समसमान मते मिळतील, तर निर्णायक मत पिठासिन अधिकारी कडे राहिल. फक्त नऊ सदस्य व्यासपिठावर येऊ शकतात. जे उमेदवार आहेत, जर उमेदवार येऊ इच्छित नसेल तर त्यांचा प्रतिनिधी येऊ शकेल. परंतु नऊ पेक्षा अधिक सदस्य असता कामा नयेत.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- सचिव साहेब, व्यासपिठावर जास्त लोक दिसत आहेत.

--७--

मतपेटी उघडुन मतगणना करण्यात आली.

मा.सचिव :-कृपया सर्वांनी लक्ष दयावे. आता निवडणुकीचा निकाल जाहिर होत आहे.

मा.महापौर :- सर्वसन्माननिय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसुन घ्यावे. स्थायी समितीच्या सदस्यांची निवडणुक जी आज झाली, हया निवडणुकीमध्ये नऊ सदस्यांनी भाग घेतला त्यातुन ८ सदस्यांची निवड करावयाची होती.

निवडणुकीत उभ्या राहिलेल्या सदस्यांची नावे व मतसंख्या घोषित करतो.

विषय :-स्थायी समितीच्या सोळा सदस्यांपैकी १ एप्रिल, २००१ रोजी निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी आठ नविन सदस्यांची नेमणुक करणे.

प्रस्तावना:-

माहे फेब्रुवारी १९९७मध्ये झालेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रित निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यापैकी उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या एकुण १६ सदस्यांची नेमणुक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २० पोटकलम २ अन्वये करण्यात आली होती. या १६ सदस्यापैकी सन १९९८-९९ वर्षी ८ सदस्य चिठ्ठी काढुन निवृत्त झाले होते. त्यांच्या जागी सर्वसाधारण महासभा ठराव क्र.३२, दि. १९.३.९९ प्रमाणे ८ नविन सदस्यांची नेमणुक करण्यात आली होती. तसेच सन १९९९-२०००सालाकरिता १ एप्रिल,९९ रोजी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त कालापर्यंत असतील ते निवृत्त होणार होते. त्यांच्याजागी सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३७ दि.२९.३.९९ प्रमाणे ८ (आठ) नविन सदस्यांची नेमणुक करण्यांत आली होती. तसेच सन २०००-२००१ करीता महासभा ठराव क्र. २५ दि. १८.३.२०००प्रमाणे ८ नविन स्थायी समिती सभासदांची नेमणुक करण्यात आली होती.

तसेच यावर्षी सन २००१-२००२ करिता १ एप्रिल २००१ रोजी निवृत्त होणा-या ८ सदस्यांच्या जागी नविन ८ स्थायी समिती सभासदांच्या नमेणुकीसाठी एकुण ९ उमेदवारांनी दि. १२.३.२००१ रोजी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. दि.१३.३.२००१ रोजी नामनिर्देशन पत्राच्या छाननीच्या दिवशी व विहित मुदतीत सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे वैद्य घोषित करण्यात आल्यामुळे नेमणुकीसाठी एकुण ९ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिली होती. त्यापैकी कुणाही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व विहित मुदतीत त्यांची नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्याने निवडणुक लढवणा-या ९ उमेदवारांची अंतिम यादी सभेत घोषित करण्यांत आली. स्थायी समितीवर एकुण ८ सदस्य नेमायचे असल्याने या नेमणुकी करिता ९ उमेदवार शिल्लक राहिल्याने गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेऊन मतदानाअंती ९ उमेदवारांना स्थायी समितीच्या सभासद पदासाठी पुढील प्रमाणे मते मिळाली.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. कालानी ज्योती पप्पु (सुरेश) | ६० |
| २. | श्री. केणी जयकुमार दत्तात्रय | ६४ |
| ३. | श्री. पारवानी रामचंद्र कुटूमल | ५५ |
| ४. | श्री. बहरानी ठाकुर वर्यलदास | ६४ |
| ५. | श्री. मोरे भानजी भिकाजी | ४८ |
| ६. | श्रीमती. राघवानी आशा सुंदर | ६९ |
| ७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५६ |

८. श्रीमती. वेलकर सुरेखा राजन ६४
९. श्रीमती. सोनावणे यमुना शालीग्राम ६४

--८--

श्री. मोरे भानजी भिकाजी यांचे व्यतिरिक्त ८ सदस्यांची स्थायी समिती सभासद म्हणुन नेमणुकीस प्रस्तावित करण्यांत येत आहे.

महासभा ठराव क्र. ४२ दिनांक :-१९.३.२००१

ही महासभा वरील प्रस्तावने नुसार खालील दर्शविलेल्या उमेदवारांची स्थायी समिती सभासद या पदावर नेमणुक केल्याचे जाहिर करीत आहे.

१. श्रीमती. कालानी ज्योती पप्पु (सुरेश)
२. श्री. केणी जयकुमार दत्तात्रय
३. श्री. पारवानी रामचंद्र कुटूमल
४. श्री. बहरानी ठाकुर वर्यलदास
५. श्रीमती. राधवानी आशा सुंदर
६. श्री. वनवारी किशोर नारायणदास
७. श्रीमती. वेलकर सुरेखा राजन
८. श्रीमती. सोनावणे यमुना शालीग्राम

मतदानाव्दारे मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सर्वात जास्त मते श्रीमती. राधवानी आशा यांना मिळाली आहेत, त्यांना ६९ मते मिळाली आहेत.

मा.महापौर :- वर नमुद केलेले आठ सदस्यांची स्थायी समितीत नेमणुक झाल्याचे घोषित करीत आहे.

मा.सचिव :- आता हि सभा समाप्त होत आहे. कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन ह्या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.३० वाजता सभा संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखिजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/४/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/४/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०.४.२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री. हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. वाघे शामु.
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्री. ढेणवाल बनवारी
७. श्रीमती. वेलकर सुरेखा
८. श्री. यादव नेरश
९. श्री. भांडे भगवान
१०श्री. ठाकुर सेवलदास
११ श्री. वनवारी किशोर
१२ श्रीमती.बेबी वसीटा
१३ श्री. चौधरी राजेंद
१४ श्री. लांडे पांडुरंग
१५ श्री.मोरे भानजी
१६ श्री.राजवानी सुनिता
१७ श्री.वारिंगे पंढरीनाथ
१८ श्री. पुरस्वानी जमनादास
१९ श्रीमती. मालती करोतिया
२० श्री.बहरानी ठाकुरदास
२१ श्री. मोरे भिमसेन
२२ श्री. रमेश चव्हाण
२३ श्री. महाडिक प्रकाश
२४ श्रीमती.साधवानी जया
२५ श्रीमती.नाईक यशस्विनी
२६ श्री.केणी जयकुमार
२७ श्री.पंजाबी नारायण
२८ श्री. आयलानी कुमार
२९ श्री. अचनानी पम्मीकुमार
३० श्रीमती. वारिंगे पन्ना
३१ श्री.रामरख्यानी मोहनदास
३२ श्री. कृष्णानी गोदुमल
३३. श्री.सचदेव गिरधारी.

तर

१ श्री. चौधरी गणेश, २ श्रीमती. मोकल सिमा, ३. श्रीमती. ज्योती कालानी, ४. श्री.उमाप रामदास, ५ श्री.सोनावणे राजु, ६. श्रीमती. पंचशिला पवार, ७. श्रीमती. दासानी मिनु, ८. श्री.टाले प्रमोद, ९. श्री.आढाव रामभाऊ,१०. श्रीमती. बगाडे सुनिता, ११ श्री.तेजी कैलास, १२ श्रीमती. रूपचंदानी भगवंती, १३, श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई, १४ श्री.खेमाणी देवेंद्रसिंह, १५. श्री.प्रमनानी इश्वर, १६. श्रीमती. मटाई जोनिता, १७. श्री.ससाण लक्ष्मीबाई,१८. श्री.वाधवा गिरधारी, १९. श्री. पारवानी रामचंद्र, २०. श्री. तलरेजा विनोद, २१. श्री.रोहडा श्यामसुंदर, २२ श्री. गुप्ता प्रभुनाथ, २३. श्री. जाधव सुरेश, २४. श्री. भाटीया जयप्रकाश, २५ श्रीमती. वनवारी मोना, २६ श्री.जेस्वानी आशा, २७. श्री. राजानी नरेंद, २८. श्री.सुभाष मनसुलकर, २९. श्री.राजानी भारती, ३०. श्रीमती. कुंदनानी लविना, ३१ श्रीमती. वलेचा पदमा, ३२. श्रीमती. भठिजा इंदिरा, ३३. श्रीमती. राधवानी आशा, ३४. श्री. माखिजा प्रकाश. ३५. श्री.

जग्यासी राजु, ३६. श्री.बहरानी गोप, ३७ श्री. नरेंद ठाकुर, ३८. श्री. पंजाबी लाल, ३९ श्री.केसवानी किशोर. ,४० श्रीमती. टेकचंदानी चंदा, ४१. श्री. गजवानी कांता हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.



सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी</u> :- मा. महापौर आमचे निवेदन आहे की, पुर्व महापौर श्री. कुमार आयलानी यांचे बंधु श्री. रमेश आयलानी यांचे १५ तारखेला रविवारी निधन झाले तरी त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित केली.

<u>शोक प्रस्ताव</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक असणारे मा.सदस्य श्री. कुमार आयलानी यांचे बंधु श्री. रमेश आयलानी यांचे दि. १५ एप्रिल, २००१ रोजी अचानक निधन झाले. तरी त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> १
<u>दिनांकः-२०/४/२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनु पुरस्वानी.
.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. रमेश आयलानी यांच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. ५५१ श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे.

--३--

प्रश्न क्र५५१:-टाऊन हॉल भाडे तत्त्वावर देण्यासाठी टेंडर नोटीस कोणत्त्या वर्तमानपत्रामध्ये जाहिर केली होती? याचा पुर्ण खुलासा करावा?

उत्तर :-टाऊन हॉल भाडे तत्त्वावर देण्यासाठी जा.क्र. उमपा/मालमत्ता /०७ दि, २०.९.२००० अन्वये खालील वर्तमानपत्रामध्ये निविदा नोटीस जाहिर करण्यात आलेली होती. वर्तमानपत्र व प्रसिध्दी दिनांक, पुढीलप्रमाणेः-

१. इंडियन एक्सप्रेस, दि. २५.९.२०००.
२. लोकसत्त्ता, दि. २५.९.२०००.
३. महाजन शक्ती, दि.२३.९.२०००.
४. धनुषधारी, दि. २२.९.२०००.
५. उल्हास विकास, दि. २४.९.२०००.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५२ श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे. तो पण टाऊन हॉल बाबत आहे. हे सर्व निर्णय झाले आहेत. शासनाने ठराव रदद केला तर आता त्या प्रश्नाचा काही संबंध रहत नाही.

प्रश्न क्र. ५५२:-अपने शहर के टाऊन हॉल का नाम जनरल अरूणकुमार वैदय नाटयगृह देखने के लिए स्थायी समिती या महासभा में मंजुरी दि गई थी क्या?

उत्तर :-टाऊन हॉल का नाम जनरल अरूण कुमार वैदय नाटयगृह देखने के लिए महासभा व्दारा दि. ७.१.८७ को मंजुरी दि गई है. ठराव क्र. ७३ (सभेत छायांकित प्रत जोडली आहे).

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५३ श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५५३:-उल्हासनगर महानगरपालिका का भंगार बेचनेके लिए आखीर टेंडर कब मंगाया था? कितने में दिया गया था? कौनसी कंपनी थी?

उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिका की भंगार (पुरानी गाडीया)बेचने का टेंडर सप्टेंबर २००० में मंगाया गया था. कुल ६ निविदाधारकोंने निविदा भरी

है. कौनसीभी कंपनी का टेंडर स्विकृत नही हुआ है. किंतु आगे की, कार्यवाही चालु है.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त व सदनातील सर्व सदस्य मी हा प्रश्न विचारला आहे भंगाराबाबत निविदा काढल्या होत्त्या की नाही? यांनी वरील प्रमाणे उत्तर दिले आहे. सोनाळे साहेब जरा कंपनी कोणती ते सांगा.

श्री.सोनाळे (उपआयुक्त):- याविषयी मी थोडी माहिती देऊ इच्छितो, २० फेब्रुवारीला गाडयांचा लिलाव करण्याबाबत महासभेत परवानगी मागीतली होती. ती परवानगी मिळाल्यावर ३० तारखेला लिलाव लावला होता. १३ वाहनांपैकी ६ वाहने अपसेट किंमतीपेक्षा जास्त किंमत त्यांना मिळाली. ती सहा वाहने देण्यांत आली. आता जी सात वाहने शिल्लक आहेत त्यांची परत किंमत निश्चित करून परत लिलाव करायचा आहे.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- हे २००० सालचे आहे ना? तुम्ही वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती का? २०००-२००१मध्ये? कधी निविदा मागवल्या होत्त्या.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):- हो वर्तमानपत्रात दिले होते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- निविदा सप्टेंबर २००० मध्ये मागवल्या होत्त्या. आता काय चालु आहे.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):- सहा निविदाधारकांनी निविदा भरल्या होत्त्या. परंतु कोणाही निविदाकारानी अपसेट किंमतीपेक्षा जास्त किंमत निविदेत भरली नव्हती. म्हणुन महासभेची परवानगी घेऊन आम्ही लिलाव लावला होता. ३० मार्चला लिलाव झाला. त्याची एक समिती आहे. त्यांच्यापुढे हा लिलाव झाला.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-जेव्हा तुम्ही जाहिरात दिली तेव्हा तुम्ही वाहने नमुद केली होती का?

श्री. सोनाळे (उपआयुक्त):- होय.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-तुम्ही मला इथे प्रत दिली नाही. ऐका सोनाळे साहेब जेव्हा प्रश्न येतो तेव्हा तुम्ही प्रश्ना संबंधी प्रत जोडत जा. तुम्ही मला इथे प्रत दिली नाही. मला कसे माहित पडेल? याची प्रत मला दया कमीत कमी मी अभ्यास करेन. नाहीतर मी प्रश्न कसे विचारणार? मी विचारले निविदा मागवल्या तुम्ही म्हणालात मागवल्या. परंतु काय झाले हे कळण्यासाठी आपले कर्तव्य होते तशी प्रत जोडुन मला देणे.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):- आपल्याला वर्तमानपत्राची कॉपी हवी.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-हो. मला दया. असे नाही की, मी प्रश्न जाऊ देईन आणि चार महिन्या नंतर उत्तर घेईन. तुम्ही मला ती प्रत दया. मी पंधरा मिनिटात अभ्यास करते. नंतर परत माझा प्रश्न घ्या.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):- ठिक आहे. देतो.

मा. श्री. किशोर वनवारी, श्रीमती. जया साधवानी, श्री. वाघे शामु, श्री. रामरख्यानी मोहनदास हे सदस्य /सदस्या सभागृहातुन बाहेर पडले / पडल्या.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५४ श्रीमती. सुनिता बगाडे यांचा असुन ते उपस्थित नसल्याने कार्यवृतात त्याची नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ५५४:-अ)महानगरपालिकेने पुर्णपणे विकसित केलेली आरक्षणे किती? अंशत: विकसित आरक्षणे किती?खुली जागा असलेली आरक्षणे किती? पक्के बांधकाम (आर.सी.सी)असलेली आरक्षीत भुखंडे कोणती? गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनेखाली येणारे आरक्षित भुखंडे कोणते? अंशत: अतिक्रमित असलेली आरक्षणे कोणती?
ब)आरक्षित भुखंडापैकी किती भुखंड पुर्णत: मोकळी आहेत?
क)या मोकळया भुखंडांना अद्याप पर्यंत एक-एक कुंपण का घालण्यांत आले नाही.
ड)त्त्याकामी शहर अभियंता साहेब यांनी कुचराई केली हे खरे आहे का?
इ)त्त्यासाठी शहर अभियंता साहेब यांच्या विरोधात कोणती कार्यवाही करण्यांत आली.

--५--

उत्तर :-अ) एकुण १५८ आरक्षित भुखंडापैकी उल्हासनगर महानगरपालिकाने एकुण बारा आरक्षित भुखंड पुर्णपणे विकसित केलेली आहेत व २५ भुखंड अंशत: विकसित व सहा आरक्षणे मोकळे आहेत. तसेच एकुण ८८ भुखंड अतिक्रमित आहेत. गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनेसाठी भुखंडाचा विशेष उल्लेख नाही.
ब)आरक्षित भुखंडापैकी सहा भुखंड मोकळी आहेत.
क)ड)ई)अजुन पर्यंत सर्व भुखंडाचे सिमांकन नकाशे या कार्यालयात उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यालयाकडुन उपलब्ध न झाल्याने कुंपण भिंत घालण्यांत आलेली नाही. सिमांकन नकाशे प्राप्त होताच पुढील कार्यवाही तातडीने हाती घेण्यांत येईल.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५५ श्रीमती. सुनिता बगाडे यांचा असुन ते उपस्थित नसल्याने कार्यवृतात त्याची नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ५५५:-मी विचारलेल्या प्र. क्र. ४६५च्या उत्तरात नेमलेल्या त्रिसंदर्भिय समितीचा अहवाल सविस्तर मिळावा आपण त्यावर काय कार्यवाही केली? संबंधित भुखंड विकसित व्हावा असे तुमचे मत आहे काय?
सदरील भुखंड विकसित करणे कामी आपण मा. शहर अभियंता साहेब यांना काही आदेश दिले आहेत काय?

उत्तर :-उल्हासनगर महानगरपालिकेस एकुण १५८ आरक्षित भुखंड, उपविभागीय अधिकारी कार्यालय उल्हासनग्रर यांनी कागदोपत्री १९८७ साली हस्तांतरीत केलेले आहेत. त्यानंतर सर्व भुखंडाची पहाणी करून किती भुखंड अतिक्रमित आहेत याची माहिती घेण्यांत आली. भुखंड हस्तांतरण झाल्यावर आजच्या तारखेपर्यंत उपविभागीय कार्यालयातर्फे या कार्यालयाने वारंवार विनंती करून सुध्दा सिमांकन नकाशे उपलब्ध करून दिलेले नाहीत. व जो पर्यंत सिमांकन नकाशे या कार्यालयास प्राप्त होत नाही. तोपर्यंत पुढील कार्यवाही होणे शक्य होणार नाही. कुपण भिंत घालण्या अगोदर प्लॉटच्या हददी निश्चित होणे गरजेचे आहे. व उपविभागीय अधिकारी व नगरभुपान अधिकारी यांचे कार्यालयाशी या कार्यालयाचा पत्र व्यवहार सुरू असुन त्यासंबधात मा.आयुक्त यांचे कार्यालयात दि. १६.११.२००० रोजी संयुक्त बैठक या संदर्भित आयोजित करण्यांत आली आहे.
मा.सदस्य श्री. अचनानी पम्मीकुमार, श्री.कुमार आयलानी, श्री. नारायण पंजाबी सभागृहातुन बाहेर पडले.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५६ श्रीमती. कांता गजवानी यांचा असुन ते उपस्थित नसल्याने कार्यवृतात त्याची नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ५५६:-अ)एम.आय.डी.सी. तर्फे उल्हासनगर शहराला दररोज किती दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जातो?
ब)या एकंदरीत केल्या जाणा-या मिळणा-या पाणी पुरवठयापैकी, किती दशलक्ष लिटर पाणी टॅंकर वाल्यांना पुरविण्यांत येते?
क)टॅंकरव्दारे पुरविण्यात येणा-या पाण्याचा रोजचा खर्च किती?
ड)टॅंकरव्दारे पुरविण्यात आलेला पाण्याचा आतापर्यंतचा एकंदरीत खर्च किती?

उत्तर :-अ)एम.आय.डी.सी. तर्फे उल्हासनगर शहराला दररोज सुमारे १०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जात आहे.
ब)एकंदरीत केल्या जाणा-या(मिळणा-या)पाणी पुरवठयापैकी सध्या सुमारे १.०५ दशलक्ष लिटर पाणी टॅंकर वाल्यांना पुरविण्यात येत आहे.
क)टॅंकरर्स व्दारे पुरविण्यात येणा-या पाण्याचा रोजचा खर्च सुमारे रू. ३०,४५०/- इतका आहे.



ड)महानगरपालिकेचा टॅंकरव्दारे पुरविण्यात आलेल्या पाण्याचा आता पर्यंत एकंदरीत सुमारे रू. ७५,८०,०००/- इतका झालेला आहे.(१९९६-२०००).

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५७ श्री. प्रमोद टाले यांचा असुन तो प्रश्न त्यांनी मागे घेतला आहे. त्यामुळे तो प्रश्न वगळण्यांत येत आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५८ श्री. प्रमोद टाले यांचा असुन ते उपस्थित नसल्याने कार्यवृतांत त्याची नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र.५५८:-पंजाबी कॉलनी बॅरेक क्र. ११४६च्या बाजुला ळ . ३ समोर व पाठीमागे ळ . ४ चे काम चालु आहे. सदर काम रितसर चालु आहे का? सदर कामात किती व्हायोलेशन आहे?

उत्तर :-अनु क्र. १ मधील बेसमेंट ळ . २चे आर.सी.सी.चे बांधकाम श्री.सुरेश मंगतराम जनाजनी व श्रीमती. कांचन जनाजनी विकासधारक/मालक यांचे बांधकाम परवाना क्र. उमपा / नरवि /बांप /१३/२०००/३०६, दि. २३.६.२००० अन्वये सुरू असुन विकास धारक यांनी केलेले बांधकामामध्ये मंजुर आराखडयापेक्षा वाढीव बांधकाम केल्याचे निर्दशनास आलेले आहे. संबंधित वाढीव बांधकाम निष्कासित करणेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यांत येत आहे. अनु क्र. २ मधील ळ . ४ ची आर.सी.सी.चे बांधकाम श्री. प्रकाश मोहनलाल कटारिया विकासधारक मालक यांचे महानगरपालिकेचे परवाना क्र. उमपा/ नरवि/ बांप/३६/९९/१३८८, दि. ३१.३. २००० अन्वये सुरू असुन ते मंजुर आराखडयानुसार असल्याचे कनिष्ठ अभियंता यांचे तपासणीत आढळुन आले आहेत.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५५९ श्री. प्रमोद टाले यांचा असुन तो प्रश्न त्यांनी मागे घेतला आहे. त्यामुळे तो प्रश्न वगळण्यांत येत आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५६० श्रीमती. सुनिता बगाडे यांचा असुन ते उपस्थित नसल्याने कार्यवृतात त्याची नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ५६०:-प्र. क्र. ४६१ च्या पहाणी प्रकरणी मा. आयुक्त यांचे कार्यालयात दि. १७.१.२००० रोजी उपविभागीय अधिकारी व नगरभुमापक

अधिकारी यांची मिटिंग घेण्यांत आली होती. त्या मिटिंगमध्ये सदरील भुखंडाबाबत काय निर्णय घेण्यांत आला?

<u>उत्तर :</u>-१७.१.२००० रोजी मा. आयुक्त यांचे सोबत उपविभागीय अधिकारी व नगरभुमापन अधिकारी यांची चर्चा झाली त्यावेळेस त्यांचे कार्यालयात मनुष्य बळ कमी असल्याने तातडीने सर्व सिमांकन नकाशे देण्याविषयी असमर्थता दर्शविली, या संदर्भात मा. आयुक्त यांनी परत दि. १६.११.२००० रोजी बैठक आयोजित केलेली आहे त्यानंतर पुढील कार्यवाही करणे संबंधात खुलासा करता येईल.

शिवसेनचे सदस्य /सदस्या श्री. राजेंदसिंग भुल्लर, श्रीमती. सोनावणे यमुना, श्रीमती. वेलकर सुरेखा श्री. राजेंद चौधरी, श्री. लांडे पांडुरंग, श्री. वारिंगे पंढरीनाथ, श्री. भिमसेन मोरे, श्री. रमेश चव्हाण, श्रीमती. यशस्विनी नाईक, श्रीमती. वारिंगे पन्ना हे सर्वजण उठुन सभागृहातुन बाहेर पडले.



फक्त मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक व मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी सभागृहात उपस्थित होते.

<u>मा.महापौर :-</u> महाडिकजी, काय झाले?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- कोरम नाही. सभा चालवण्यासाठी गणपुर्तीची आवश्यकता आहे. ती पुरेशी नाही.

<u>मा.महापौर</u> :- सदरची सभा अर्ध्यातासासाठी स्थगित करण्यांत येत आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- नाही. नाही. नियमात असे लिहिले आहे की, सभा चालु असताना कोणत्याही वेळी, अध्यक्षस्थानी असलेला प्राधिकारी धरून उपस्थित पालिका सदस्यांची संख्या हि एकुण संख्येच्या एक चतुर्थांश पेक्षा कमी आहे. असे अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याच्या निर्देशनास आणण्यात आले तर अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याने ती सभा सभेसाठी त्यास सोयीस्कर वाटेल अशी वेळ व ठिकाण ठरवुन अन्य एखादया दिवसा पर्यंत तहकुब केली पाहिजे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- मा.महापौर, आपण नियमाप्रमाणे कधीही सभा ठेवा.

<u>मा.महापौर</u> :- आजच थोडयावेळाने परत ठेवतो.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी/ मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- नाही. नाही. आजचा दिवस सोडुन कधीही ठेवा.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> चार-पाच दिवसांनी ठेवा.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- तो तुमचा अधिकार आहे. पण आजचा दिवस सोडुन तुम्ही कधीही ठेवा.

मा.महापौरः- सदरची सभा शनिवार दि.२१/४/२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजे पर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका

महासभा ठराव क्र. २ दि.२० ४ २००१.

सुचकांची नावे :-१)श्री. किशोर वनवारी.

२)श्री. नारायण पंजाबी.

३)श्री. ठाकुर बेहरानी.

४)श्री. नरेंद्र राजानी.

अनुमोदकांची नावेः- १)श्री. प्रकाश माखिजा

२)श्रीमती. सुनिता राजवानी.

३)श्री. पांडुरंग लांडे.

४)श्री. प्रकाश महाडिक.

हि महासभा सोबत जोडलेल्या दि. ३१ ३ २००१ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. २२६ ला अनुसरून काही जकात पात्र वस्तुंवर जकात कर दर वाढ, पुर्ननिश्चित करणेस मान्यता देत नाही. तसेच जकात वसुलीकरिता अभिकर्ता नेमणेबाबत फेरनिविदा मागविणेस निर्देश देत आहे.

वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकांच्या सह्या/-१.

२.

३.

४.

अनुमोदकांच्या सहया-१.

२.

३.

४.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांक :-२०/४/२००१.

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/४/२००१ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक २०.४.२००१ रोजी सायंकाळी ५. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.
मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह | २९. | श्रीमती. टेकचंदानी चंदा |
| ४. | श्री. वाघे शामु बाबु | ३०. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| ५. | श्रीमती.सोनावणे यमुना | ३१. | श्री. वाधवा गिरधारी |
| ६. | श्रीमती.कालानी ज्योती | ३२. | श्री. तलरेजा विनोद |
| ७. | श्री.ढेणवाल बनवारी | ३३. | श्रीमती. मालती करोतिया |
| ८. | श्रीमती. वेलकर सुरेखा | ३४. | श्री.बहरानी ठाकुरदास |
| ९. | श्री. यादव नरेश | ३५. | श्री.जाधव सुरेश |
| १०. | श्री.सोनावणे राजु | ३६. | श्री. मोरे भिमसेन |
| ११. | श्रीमती.पंचशिला पवार | ३७. | श्री. चव्हाण रमेश |
| १२. | श्री. आढाव रामभाऊ | ३८. | श्री. महाडिक प्रकाश |
| १३. | श्रीमती बगाडे सुनिता | ३९. | श्रीमती. साधवानी जया |
| १४. | श्री.भांडे भगवान | ४०. | श्री.रजानी नरेंद्र |
| १५. | श्री. ठाकुर सेवलदास | ४१. | श्रीमती. नाईक यशस्विनी |
| १६. | श्री.बनवारी किशोर | ४२. | श्रीमती.कुंदनानी लविना |
| १७. | श्रीमती.रुपचंदानी भगवंती | ४३. | श्रीमती. गजवानी कांता |
| १८. | श्रीमती.लक्ष्मीबाई लुंड | ४४. | श्री. आयलानी कुमार |
| १९. | श्री.खेमाणी देवेंद्रसिंग | ४५ | श्री.केणी जयकुमार |

२०. श्री. पमनानी ईश्वर
२१. श्रीमती.वसीटा बेबी
२२. श्री.चौधरी राजेंद
२३. श्री.लांडे पांडुरंग
२४. श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२५. श्री.मोरे भानजी.
२६. श्रीमती. राजवानी सुनिता
२७. श्री.वारीगे पंढरीनाथ
२८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
४६. श्रीमती. वनवारी मोना
४७. श्री.पंजाबी नारायण
४८. श्री. अचनानी पम्मीकुमार
४९. श्रीमती. वारिंगे पन्ना
५०. श्रीमती. राधवानी आशा
५१. श्री. माखिजा प्रकाश
५२. श्री. बेहरानी गोप
५३. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
५४. श्री. पंजाबी लाल.

तर

१ चौधरी गणेश, २. श्रीमती. मोकल सिमा. ३. श्री उमाप रामदास, ४ श्री. टाले प्रमोद, ५. श्री. तेजी कैलास, ६ श्रीमती. मटाई जोनिता, ७. श्री. पारवानी रामचंद, ८. श्री. रोहडा श्यामसुंदर, ९. श्री. भाटीया जयप्रकाश, १०. श्रीमती. जेस्वानी आशा, ११. श्री. सुभाष मनसुलकर, १२. श्रीमती. राजानी भारती, १३. श्रीमती.पद्मा वलेचा, १४. श्रीमती. भठिजा इंदिरा, १५. श्री. रामरख्यानी मोहनदास, १६. श्री. जग्यासी राजु, १७ श्री. क्रिशनानी गोदुमल, १८. श्री. सचदेव गिरधारी, १९. श्री. केसवानी किशोर,२०. श्रीमती. दासानी मिनु हे सदस्य /सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

--२--

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ६.०० वाजता सभेची सुरवात करण्यात आली.

<u>मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर</u> :-मा.महापौर, काही दिवसापुर्वी आमचे कॉग्रेस गटनेता श्री. सुभाष मनसुलकर यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. हि खुप दुःखाची गोष्ट आहे. आम्ही सदनास विनंती करतो की, पोलिसांनी जी चौकशी केली आहे ती अर्धवट केली आहे. काही आरोपी पकडले गेले आहेत. परंतु या हल्यामागे कुणाचा हात आहे ते पकडले गेले नाहीत. तरी सदनास आमची विनंती आहे की, इथले पोलिस आयुक्त, पोलिस उपायुक्त, मा. गृहमंत्री, मा. मुख्यमंत्री यांना महासभेतर्फे शिफारस पाठवावी की, हल्ला करणा-यांना लवकर पकडले जावे असे निवेदन घेऊन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे गेले पाहिजे असा ठराव पास करण्यांत यावा.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :-मा.महापौर, ही विशेष महासभा आहे. विशेष महासभेत इतर कोणते विषय घेतले जात नाहीत.
च
<u>मा.महापौर</u> :- हे आपल्या सदस्यांवर अवलंबुन आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> महापौर साहेब आम्हाला या गोष्टीचे दुःख आहे. आपल्या लक्षात असेल जेव्हा हमला झाला तेव्हा आपण पोलीस आयुक्तांकडे गेलो होतो. त्याच दिवशी जाऊन आलो.

<u>मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर</u> :- आरोपी अजुन सापडलेला नाही. म्हणुन आमचे सदनाला निवेदन आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-सेवलजी, आम्हाला पण या गोष्टीचे दुःख आहे. महापौरांना सल्ला मीच दिला होता की, इथुन आपण पोलिस आयुक्तांकडे जाऊ. हे चुकीचे घडले आहे. जर एका नगरसेवकाशी असे घडते तर उदया कोणा दुस-या नगरसेवकाशी पण असे होऊ शकते.

*<u>मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :-</u> परत एकदा सगळे मिळुन जाऊ.*

*<u>मा.महापौर</u> :- एक मिनिट बसा. मी सदनाला याबाबतीत थोडी माहिती देतो. हि विशेष सभा आहे यात दुमत नाही. श्री. सेवलदास यांनी मनात जे होते ते सदनासमोर मांडले त्यावर विचार करणे जरूरी आहे. आपल्या सदनातील कॉंग्रेसचे गटनेते यांच्यावर प्राणघातक हल्ला केला त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला गेला होता. सौभाग्याने, परमेश्वर कृपेने योग्य वेळी त्यांच्यावर उपचार केले गेले. त्यांना सिंघानिया हॉस्पीटलमध्ये नेले. तिथे ऑपरेशन करून डॉक्टरांनी त्यांना वाचवले. परंतु यामध्ये पकडले गेलेल्या आरोपीविषयी किंवा यामागे कुणाची भुमिका आहे हे तपासण्यासाठी आमची अशी इच्छा होती की, पोलिसांनी हे प्रकरण क्राइम ब्रॅंचला दयावे. पोलिस आयुक्तांकडे विपक्ष नेता पण होत्त्या. कॉंग्रेस जिल्हाअध्यक्ष मोहन बहरानी देखिल होते. आम्ही पोलिस आयुक्तांकडे जी मागणी केली होती ती मागणी अजुनपर्यंत त्यांनी पुर्ण केली नाही. ना त्यांनी ते प्रकरण क्राइमब्रॅंचला दिले, ना त्यांनी सुभाष मनसुलकर यांचे स्टेटमेंट घेतले. ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. म्हणुन सदनात त्यांनी आवाज उठवलेला आहे. त्यांची जी मागणी आहे ती योग्य आहे. मी पण त्यांच्याशी सहमत आहे. पुर्ण सदन याच्याशी सहमत पाहिजे. आज कॉंग्रेस सदस्यावर हमला करण्यांत आला, उदया कोणा दुस-या सदस्यावर हमला करण्यांत येईल. पोलिस विभागाने याबाबत जो निष्काळजीपणा दाखवला आहे त्याचा मी विरोध करतो. पुर्ण सदनानी पण त्याचा विरोध केला पाहिजे. यामागे कुणाचा*



*हात आहे हे शोधुन पोलिसांनी जनतेसमोर आणले पाहिजे. आणि त्यांना शिक्षा दिली पाहिजे.*

*<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> मा.महापौरजी, आपण जे विचार मांडले ते खुप चांगले आहेत. आज एका नगरसेवकावर हमला झाला उदया कोणा दुस-या नगरसेवकावर हमला होईल. आपली जर अशीच एकता राहिली तर अपराध घडणार नाही. परंतु खेदाची गोष्ट आहे, जेव्हा माझ्या पतीची हत्त्या करण्यात आली आपणांस माहित आहे कुणाचे नाव घेतले गेले होते. तेव्हा तर सदनात अशी काही कार्यवाही केली नाही. हा आपण दुजाभाव करत आहात. आम्हाला सुभाष मनसुलकरांविषयी खेद आहे. देव करो त्यांना शंभर वर्षे आयुष्य लाभो. जेव्हा माझ्या पतीची हत्त्या करण्यांत आली तेव्हा सदन कुठे होते, महापौर आपण कुठे होतात. तेव्हा पण हा आवाज उठवला पाहिजे होता. तेव्हा जर आवाज उठवला असता तर मनसुलकरवर हा हमला झाला नसता. तेव्हा जर आयुक्तांकडे गेलो असतो तर आज हे घडले नसते. वर्तमानपत्रात आले आहे की, तेच लोक त्यांच्याशी जाऊन गळयात गळे घालुन आले आहेत. हे आपणांस पण माहित असेल. तर माझ्या पतीची इथे काही भुमिका नव्हती. माझे पती शिवसेनेचे कार्यकर्ते नव्हते. केले पाहिजे तर सर्वांसाठी केले पाहिजे. ही चांगली गोष्ट आहे. जेव्हा मनसुलकरांवर हल्ला झाला तेव्हा मीच आपणांस सांगितले की, आताच्या आता पोलिस आयुक्तांकडे चला उल्हासनगरमध्ये अपराध खुप वाढत चालले आहेत. मी पण आशा करते की,जे पण या हत्त्येमागे आहेत त्यांना कैद केले जावे अशी मी प्रार्थना पण करते. पण माझ्या म्हणण्याचे तात्त्पर्य असे आहे की, आपण शहराचे महापौर आहात, आपणांस माझ्या पतीशी सहानुभूती नव्हती का?*

*<u>मा.महापौर</u> :- आपले पती तर शिवसेनेचे जेष्ठ नेते होते.*

*<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> आपले पंचविस वर्षापासुन ते मित्र होते. आपण एकत्र काम केले आहे. तुम्ही मानवतेच्या नात्त्याने देखिल हे केले असते.*

मा.महापौर :- खरे आहे. मी तर म्हणतो की, खुप मोठे नेते होते. त्यांच्याशी आमचा संबंध होताच होता. जर सामान्य नागरिकांवर असा हल्ला झाला. तरी आम्ही असेच पाऊल उचलु.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- बरोबर आहे आपण म्हणता ते. मला आज खुप आनंद झाला आहे की, आपण ही ॲक्टीवीटी दाखविली यासाठी मी आभार प्रकट करते. दुःख या गोष्टीचे होते की माझ्या पतीच्या हत्त्या झाली त्यावेळी का नाही केले गेले? ते शिवसेनेचे नेते नव्हते तर तुमचे तीस वर्षापासुन मित्र देखिल होते. त्यावेळी हे का नाही केले?

मा.महापौर :- हे पहा त्यावेळी तुम्ही आम्हाला आरोपीच्या कठड्यात उभे केले होते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- नाही नाही. आम्ही तुम्हाला आरोपीच्या कठड्यात नव्हते उभे केले. हे चुकीचे आहे.

मा.महापौर :- आपण आठवा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- ज्यांना आम्ही आरोपीच्या कठड्यात उभे केले होते. त्यांची जी स्टेटमेंट होती त्यांच्यावर देखिल आपण काही कार्यवाही केली नाही.

--४--

मा.महापौर :- करणारे पोलिस आहेत. आम्ही फक्त मागणी करू शकतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- आपण ज्या खुर्चीवर बसला आहात. त्या पदाची मोठी गरीमा आहे.

मा.महापौर :- आपण मागणी करू शकतो. आपल्याला अधिकार नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मी असे नाही म्हणत आपण अधिकार गाजवा, त्यांना बोला. परंतु माझे असे म्हणणे आहे की, सामान्य नागरिकाशी जरी असे घडले तरी आपल्याला दुःख वाटले पाहिजे. अज्ञात-हेने एकत्र मिळुन आपण घडणारे अपराध थांबवले पाहिजे. माझ्या बोलण्यातील तात्पर्य हे आहे की, सामान्य नागरिकाला ३०२ लागु होतो, मोठयाला लागु होत नाही.

मा.महापौर :- मी आपल्याशी शतप्रतिशत सहमत आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- आपण माझ्याशी सहमत आहात परंतु आपण यावर अंमलबजावणी करा. ही माझी विनंती आहे.

मा.महापौर :- आज सदनातील दोन सन्माननिय सदस्य जे महाराष्ट्र राज्याच्या आरपीआय पक्षाचे सचिव व सदनातील आरपीआयचे गटनेते श्री.बी.बी.मोरे यांचा आज वाढदिवस आहे. मी त्यांना पुर्ण शहरवासियांतर्फे अभिनंदन करतो. त्यांचे हार घालुन अभिनंदन देखिल करीन. व सर्वांचे तोंड गोड केले जाईल. दुसरे आमची बहिण पंचशिला पवार यांचाही वाढदिवस आहे. तर पाच मिनिटासाठी सभा स्थगित करत आहोत. त्याआधी दोन पत्र माझ्याकडे आली आहेत. आमची बहिण श्रीमती. ज्योती कालानी यांची स्थायी समिती सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याने त्यांचे पण आम्ही अभिनंदन करतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- महापौर साहेब, आपल्याला आमचे देखिल पत्र मिळाले आहे.

मा.महापौर :- ते पण सांगतो. माझ्याकडे दोन पत्र आले आहेत. एक ठाणे जिल्हा शिवसेना शाखेचे जे अध्यक्ष आहेत धर्मवीर श्री. आनंद दिघे यांच्यातर्फे एक पत्र आले आहे की, येणा-या २००१-२००२ वर्षासाठी उल्हासनगर महानगरपालिकेत शिवसेना गटनेता म्हणुन त्यांनी मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे यांची नियुक्ती शिवसेना गटनेते म्हणुन केली आहे त्यांचे मी अभिनंदन करतो.

सर्वांनी टाळया वाजवुन स्वागत केले.

मा.महापौर :- दुसरे पत्र आहे ते मॅडम ज्योती कालानी यांचे पत्र आहे. त्यांचा जो पक्ष आहे. पवित्र हिंन्दुस्तान कझगम त्या पक्षातर्फे श्री. किशोर वनवारी यांची सभागृह नेता म्हणुन नियुक्ती केली आहे. मी त्यांचे देखिल अभिनंदन करतो. त्याच बरोबर दुसरे पण एक पत्र आले आहे. आरपीआयचे जितके पण सन्मानिय नगरसेवक, नगरसेविका आहेत त्यांनी श्री. बी.बी.मोरे यांची २००१-२००२ करिता आरपीआय गटनेता म्हणुन नियुक्ती करण्यासाठी निवेदन दिले आहे. त्यांचे देखिल अभिनंदन करतो.

सर्वांनी टाळया वाजवुन स्वागत केले.

मा.महापौरः- आता पाच मिनिटासाठी सभा स्थगित करीत आहे. श्री.बी.बी.मोरे, श्रीमती. पंचशिला पवार, श्रीमती. ज्योती कालानी, श्री. किशोर वनवारी,



श्री. पांडुरंग लांडे या सर्वांचे स्वागत करण्यांत येईल व मिठाई वाटली जाईल. असे म्हणुन पाच मिनिटासाठी ६.२० ला सभा स्थगित करण्यांत आली.

स्थगित केलेली सभा ६.२० वाजता पुन्हा सुरू करण्यांत आली.

मा.सचिव :- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

दि. ३१.३.२००१ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. २२६ ला अनुसरून काही जकातपात्र वस्तुंवर जकात कर दर वाढ निश्चित करणे बाबत.

मा.महापौर :- या विषयावर सदनात काही चर्चा करण्यापुर्वी मी सदनाला सुचित करतो की, स्थायी समितीत हा ठराव पारीत झाला. जकातीच्या काही वस्तुंवर दरवाढ करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्तांतर्फे आला होता. आताची जी एजेन्सी आहे मोनार्च तर सर्व पक्षांची एक बैठक घेतली होती. त्यानुसार काही वस्तुंवर दर वाढविण्याचे ठरवले होते व तसा ठराव स्थायी समितीत पास केला गेला. त्यानंतर शहरातील व्यापारी वर्ग किंवा छोटे मोठे व्यवसाय करणारे व्यापा-यांकडुन यागोष्टीचा तीव्र निषेध केला गेला व विरोध करण्यांत आला. त्यांनतर एक बैठक आम्ही व्यापारी मंडळाशी याच महापालिकेत आयुक्तांच्या अनुपस्थितीत व इतर सर्व पक्षातील निवडलेले प्रतिनिधी आहेत व इतर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ही बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत असे ठरले की, व्यापा-यांचा विरोध लक्षात घेऊन त्यांचे असे म्हणणे होते की, आज उद्योग व्यवसायात भरपुर स्पर्धा आहे. हवा तेवढा व्यापार होत नाही. जर तुम्ही कर वृध्दी केली तर व्यापार क्षेत्राला मोठ धक्का बसेल. त्यामुळे असे होऊ शकते की, अनेक व्यापारी किंवा कारखानदार, उद्योगपती किंवा होलसेलवाले हे बाहेरगावी जाऊन शेजारच्या शहरात जाऊन जिथे जकात आकारला जात नाही तिथे निघुन जातील हे सर्व लक्षात घेऊन सर्व पक्षांचे असे मत ठरले की, व्यापा-यांची जशी इच्छा आहे की, कोणताही दर वाढविण्यासंबंधी निर्णय घेतला आहे. तो वाढवला जाऊ नये. त्या विषयाला घेऊन आज मी आपला विचार महासभेत मांडतो की, सर्वांचे मत पाहता

आयुक्तांना निर्देश देतो की, त्यांनी फेरनिविदा मागवाव्यात, व कोणत्त्याही वस्तुंवर दरवाढ केली जाऊ नये. तसे माझे सदनास निवेदन आहे. या महासभेत प्रेक्षक वर्गात जे व्यापारी वर्ग बसले आहेत त्यांना हा निर्णय ऐकुन समाधान मिळाले असेल. मी आधीच्या सभेत देखिल म्हंटले होते की कोणत्त्याही पक्षाचे प्रतिनिधी व्यापारी वर्गाच्या विरोधात नाही. आम्ही जो निर्णय घेतला होता ती महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन व आयुक्तांनतर्फे प्रस्ताव आला होता. म्हणुन त्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रयत्न केला होता. की जेणे करून महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकेल आणि या शहराचा विकास खोळंबला नाही पाहिजे. परंतु व्यापारी वर्गांनी त्याचा कडक विरोध केला तर त्यास आम्ही बाजुला नाही ठेऊ शकत. म्हणुन आम्हाला हा निर्णय घ्यावा लागला. मी आयुक्तांना निर्देश देतो की, त्यांनी परत याबाबत फेरनिविदा मागवाव्यात. माझ्या या विचारांवर कोणा सदस्यांना आपले विचार प्रकट करायचे असतील तर त्यांनी करावे. मी माझे मत सदनाला सांगितले आहे. आणि माझी ही इच्छा आहे की, माझ्या या मतांना सर्वसंमतीने मान्य करावे.धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी</u> :- महापौर साहेब, आधी मी तुमचे अभिनंदन करतो की, आयुक्तांतर्फे आलेला दरवाढीचा प्रस्त्ताव आपण न मानता व्यापारी वर्गाचे विचार लक्षात घेऊन आपण दर वाढु दिले नाही. अशास्थितीत अशा कंपनीला अजुन सव्वा महिने मुदत देणे योग्य नाही. ते आधीच बेकायदेशिर



काम करीत आहे. तो अनाधिकृतरित्त्या व्यापारी वर्गास सतवत आहे. आता स्थायी समितीत सभागृहात झालेल्या बैठकीत सर्व व्यापारी वर्गाने आपल्याला तशी तक्रार दिली आहे. त्याला त्वरीत रिजेक्ट करून लवकरात लवकर तीन दिवसाची शॉट नोटीस देऊन तुम्ही फेरनिविदा मागवा. ते अंबरनाथ मधुन देखिल जकात कर वसुल करतात. असे सर्व वर्तमानपत्रात आले आहे. त्यांना अंबरनाथचे देखिल जकात दिले आहेत का? अशी काही शर्त निविदेत आहे का?

(असे म्हणुन श्री. नारायण पंजाबी यांनी थंब एक्सप्रेस वर्तमान पत्र मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सचिव यांना दिले).

<u>मा.महापौर</u> :- या मुदयाकडे आयुक्तांनी लक्ष दयावे. मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी यांनी केलेल्या तक्रारीची पहाणी करून यावर निर्णय घ्यावा.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- मा.महापौर, आज आपण सर्वात आधी स्वतःचे मत मांडले यापुर्वी तर तुम्ही कधी असे नव्हते केले याचे कारण सांगु शकाल का?

<u>मा.महापौर</u> :- मी याकरिता मत मांडले कारण बैठकीत मी सर्व पक्षांचे मत पाहिले होते.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- असे कित्त्येकवेळा बैठकीत निर्णयांवर एकमत झाले आहे. परंतु पहिल्यांदा लवकर मत मांडले.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- मा.महापौर, मी आणि संभाजी पाटील यांनी याचा प्रथम विरोध केला होता.

<u>मा.महापौर :-</u>तुमचे जर यावर काही वेगळे मत असेल तर तुम्ही मांडा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मी, सुनिता राजवानी आणि संभाजी पाटील यांनी विरोध केला होता. आम्हाला व्यापारी वर्गाने पाठिंबा दिला होता त्यांचे मी आभार मानते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- ज्या मताचे आपण नेतृत्त्व केले होते त्या मताला बदलुन इथे प्रथम मांडत आहात. अशी तत्परता तुम्ही नेहमी दाखवा. फक्त आपण याबाबतीत आजच प्रथम पुढाकार घेतला. आम्ही या मताशी सहमत आहोत की, व्यापारी वर्गावर कर लावला जाऊ नये. जकातीचे दर वाढवले जाऊ नये यात काही शंका नाही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- आपण आपल्या मर्जीने हा निर्णय नाही घेतला तर व्यापारी वर्गाच्या विरोधामुळे घेतला ही व्यापारी वर्गाची जीत आहे.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- मा.महापौर, आपण व्यापा-यांचे हित लक्षात घेऊन जो निर्णय घेतला आहे आम्ही त्याचे स्वागत करतो आणि आपले याबाबत धन्यवाद देखिल करत आहोत.

इथे मा.आयुक्त श्री. के.पी. बक्षी मंचावरून खाली उतरून जात असतानों

--७--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- उल्हासनगर मेनिफॅक्चर असोसिएशन जिंदाबाद.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- मा.महापौर, आयुक्तांचे यावर मत घ्या. ते जात आहेत. ते का जात आहेत?

मा.सदस्य श्री. पन्ना वारिंगे :-आयुक्तांचे मत घेणे जरूरी आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

इकडे विपक्ष पक्षातील काही सदस्य उठुन उभे राहिले.

मा.सदस्य श्री. पन्ना वारिंगे :- मा.महापौर साहेब, आमचा आवाज दाबु नका. आम्हाला बोलु दया सर्वांना आम्हाला यावर बोलायचे आहे. महापौर तुम्ही क्रॅडिट नका घेऊन जाऊ. तुम्ही एकटेच क्रॅडिट घेत आहात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-आम्हाला आयुक्त साहेबांना काही प्रश्न विचारायचे आहे.

मा. महापौर :- आयुक्तांना यावर काहीच बोलायचे नाही आहे.

मा.सदस्य श्रीमती. पन्ना वारिंगे :- आम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- लोकप्रतिनिधींचा अपमान करू नका.

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

महासभा ठराव क्र. २ दि.२०.४.२००१.

सुचकांची नावे :-१)श्री. किशोर वनवारी.

२)श्री. नारायण पंजाबी.

३)श्री. ठाकुर बेहरानी.

४)श्री. नरेंद्र राजानी.

अनुमोदकांची नावे:- १)श्री. प्रकाश माखिजा

२)श्रीमती. सुनिता राजवानी.

३)श्री. पांडुरंग लांडे.

४)श्री. प्रकाश महाडिक.

--८--

हि महासभा सोबत जोडलेल्या दि. ३१.३.२००१ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. २२६ ला अनुसरून काही जकात पात्र वस्तुंवर जकात कर दर वाढ, पुर्ननिश्चित करणेस मान्यता देत नाही. तसेच जकात वसुलीकरिता अभिकर्ता नेमणेबाबत फेरनिविदा मागविणेस निर्देश देत आहे.

वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकांच्या सह्या-१.

२.

३.

४.

अनुमोदकांच्या सह्या-१.

२.

३.

४.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका



<u>आयत्यावेळचाविषय :-</u>

<u>विषय :-</u>सन २००१-२००२ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुली अभिकर्त्यांची नियुक्ती करणे व काही <u>वस्तुंवर वाढीव जकात कर दर निश्चित करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका सन २००१-२००२ या कालावधीसाठी जकात वसुली कामी (किमान उददीष्ठ रू. ४६ कोटी)खाजगी अभिकर्त्यांची नेमणुक करणे साठी टाईम्स ऑफ इंडीया, मुंबई इंडियन एक्सप्रेस मुंबई, लोकसत्ता मुंबई, फि प्रेस जर्नल मुंबई, सामना मुंबई, धनुषधारी उल्हासनगर, हिंदु सिंधी,अहमदाबा उल्हास विकास, उल्हासनगर, देशभगत, उल्हासनगर इत्यादी वर्तमानपत्रामध्ये दि. ७.३.२००१ रोजी जाहिर निविदा प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्त्या. सदर निविदा सुचनेत दि. १६.३.२००१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा फॉम विक्रीची अंतिम वेळ ठेवण्यांत आली होती. या निर्धारित वेळेपर्यंत एकुण दहा निविदा फॉम विविध संस्थांकडुन खरेदी करण्यांत आल्या होत्त्या. सदर निविदा सुचनेत दि.१७.३.२००१रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारण्याची वेळ निर्धारित केलेली होती. सदर निर्धारित केलेल्या मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्त्या. मुदतीत प्रात्प झालेल्या निविदा त्याच दिवशी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आयुक्तांच्या दालनात आयुक्त यांनी उपायुक्त जकात, उपायुक्त मुख्यालय, मुख्यलेखा अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व विधी अधिकारी या अधिका-यांची गठीत केलेल्या समितीपुढे निविदा धारक व त्त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उघडण्यांत आल्या. सदर उघडण्यांत आलेल्या निविदेमध्ये निविदा धारकांनी उल्हासनगर महानगरपालिका जकात वसुली कामी

सन २००१-२००२ या कालावधीसाठी खालील प्रमाणे देयका रक्कम दिलेली आहे.

१. मेसर्स जयहिंद कॉन्ट्रक्टरर्स लिमिटेड, नवी मुंबई. १,५२,००,०००/-

२. महादेवराव रा. महाडिक , कोल्हापुर
१,४४,४४,४४४/-

३ मे. मोनार्च इंफास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर
४१,६७,००,०००/-

उपरोक्त निविदा धारकांनी जकात वसुलीची देयका रक्कम ही महापालिकेने किमान निर्दिष्ठ केलेल्या रक्कम रू. ४६ कोटी पेक्षा कमी असल्याने उक्त समितीने छाननी करून आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे सविस्तर अहवाल सादर केला असता सदर प्रस्ताव स्विकार्य नसल्याचे आयुक्त यांनी नियमानुसार निविदाधारकांशी वाटाघाटी करणे बाबत उक्त समितीस निर्देशित केले. त्यानुसार निविदाधारकास दि.१९.३.२००१ रोजी सायंकाळी ६.०० वाजता आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका व उक्त समितीच्या समक्ष वाटाघाटीसाठी निविदाधारकांना पाचारण करण्यात आले. निविदाधारकाने महापालिकेने निर्दिष्ठ केलेल्या किमान देयका रक्कम रू. ४६ कोटी इतकी देयका रक्कम वाढविण्याची तयारी न दर्शविल्याने आयुक्तांनी अंतिमरित्त्या सर्व निविदाधारकांना दि. २२.३.२००१ रोजीच्या पत्रांन्वये सिलबंद लखोटयात जकात वसुलीची अंतिम देयका रक्कम दि. २७. ३.२००१ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे बाबत लेखी स्वरूपात कळविले. त्यानुसार दिनांक २७.३.२००१ रोजी उपरोक्त ३ निविदाधारकांपैकी मे. जयहिंद कॉंट्रक्टर्स, लि. नवी मुंबई यांनी फॅक्सव्दारे जादा मुदत मिळणेबाबत विनंती करून सिलबंद लखोटयात अंतिम देकार रक्कम सादर करणेस असमर्थता दर्शाविली व मुदतवाढ मागितली त्यांनी मागितलेली मुदतवाढीचा प्रस्ताव नामंजुर करण्यात आला. उर्वरित २ निविदाधारकांनी खालीलप्रमाणे सुधारीत अंतिम देकार रक्कम सिलबंद लखोटयात आयुक्तांच्या दालनात उक्त समितीच्या उपस्थितीत व निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधीच्या उपस्थितीत सादर केली.

१. महादेवराव रामचंद महाडीक, कोल्हापुर रू.४१,८०,००,०००/-

२. मे. मोनार्च इं.प्रा.लि. उल्हासनगर रू.४२,०३,००,०००/-



वरील अंतिम सुधारीत देकार रक्कम देखिल महापालिकेने निर्दिष्ट केलेल्या किमान देकार रक्कम रू. ४६ कोटीपेक्षा कमी असल्याने देकार रक्कम स्विकारता येणे शक्य नसल्याबाबतचा अहवाल उक्त समितीने आयुक्तांना सादर केला सदर अहवालानुसार महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने निविदाधारकाने सादर केलेली किमान देकार रक्कम रू.४६ कोटीपेक्षा कमी असल्याने महापालिकेचे आर्थिक हित जोपासण्याच्या दृष्टीने किमान देकार रक्कम रू. ४६ कोटीपेक्षा जास्त रक्कमेची देकार मिळणेसाठी अल्प कालावधीचा विचार करता शेवटचा प्रयत्न म्हणुन निविदाधारकांस आयुक्तांनी त्यांच्या ठाणे येथील कार्यालयात पाचारण करणेबाबत निर्देशित केले. त्यानसुार मे. मोनार्च इं.प्रा.लि. यांचे पदाधिकारी श्री. जयराज कल्याणी यांना दि. ३०.३.२००१ रोजी उपायुक्त जकात व उपायुक्त मुख्यालय यांच्या उपस्थितीत मा. आयुक्त यांच्या दालनांत ठाणे येथे पाचारण केले त्यावेळी उपस्थित उपायुक्त व आयुक्त यांच्या समक्ष निविदाधारकांशी चर्चा करून त्यांनी दिलेली वरील देकार रक्कम रू. ४२ कोटी व ०३ लाख किमान देकारापेखा कमी असल्याने देकार स्विकारता येत नसल्याचे त्यांना सांगुन किमान देकार रू. ४६ कोटी पेक्षा जास्त रकमेचा देकार देणेबाबत महापालिकेच्या हितासाठी सुचित केले. परंतु त्यांनी सादर केलेल्या देकार रक्कमेत वाढ करणेबाबत असमर्थता दर्शाविल्याने नाईलाजास्तव आयुक्त यांनी सन २००१-२००२ करिता जकात वसुली अभिकर्त्याची नियुक्ती

करणेबाबतच्या सर्व निविदा रद्द करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर केला , व त्याचवेळी मे. मोनार्च इं.प्रा. लि. यांच्या प्रतिनिधीने जकातीच्या काही आयटममध्ये दरवाढ करून व गोठवलेले आणि परिक्षित दुध, होल मिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर यावर जकात आकरणीस व जकात चुकणा-यांविरूध्द खटला भरण्याची परवानगी दिल्याने जादा मिळणा-या जकात वसुलीच्या रक्कमेपोटी रू. ५० लाख या दराने म्हणजेच ४६ कोटी २६ लाख त्याच अटी व शर्तीनुसार मुदतवाढीचा (सन २००१-२००२ या मुदतीकरीता) प्रस्ताव सादर केला. त्याचवेळी आयुक्त यांनी सदरच्या सुधारीत प्रस्तावास दुरध्वनीवरूनच मा.महापौर, उमपा व मा. सभापती स्थायी समिती उमपा यांची संमती घेतली.

त्यानुसार मोनार्च इं. प्रा. लि. यांनी सादर केलेल्या सुधारीत प्रस्ताव त्यांच्या दि. ३१.३.२००१ रोजी संपणा-या मुदतीनंतर सन २००१-२००२करीता पुर्वीच्याच दराने म्हणजेचे रू. ४५ कोटी ७६ लाख अधिक जकात वाढीच्या काही आयटममध्ये दर वाढ करून व गोठवलेले आणि परिक्षित दुध, होल मिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर यावर जकात आकरणीस व जकात चुकणा-यांविरूध्द खटला भरण्याची परवानगी दिल्याने जादा मिळणा-या जकात वसुलीच्या रकमेपाटी रू. ५०लाख या दराने म्हणजेच ४६ कोटी २६ लाख १२ महिन्यांकरिता पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार काही आयटममध्ये दरवाढ करून, गोठवलेले आणि परिक्षित दुध, होल मिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर यावर जकात आकारणीस व जकात चुकविणा-याविरूध्द खटला भरण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसल्याने मे. मोनार्च इं. प्रा. लि. यांना सन २००१-२००२ या कालावधीसाठी जकात वसुली अभिकर्ता म्हणुन नेमणुकीस मान्यता देणेत यावी, असे वाटते. तरी, उल्हासनगर महानगरपालिका जकात वसुली अभिकर्ता नियुक्ती बाबत मोनार्च इं.प्रा.लि. यांना १ वर्षाची म्हणजेच दि. १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००२ पर्यंत मुदतवाढ द्यावी किंवा कसे? प्रस्तावरूपी निर्णयासाठी मा. स्थायी समिती समोर सादर.

--११--

महासभेच्या पुर्ननिश्चितीस अधिन राहुन काही वस्तुंना पुढीलप्रमाणे जकात कराचे वाढीव दर प्रस्तावित करीत आहे.

| अनुसुचीतील बाब.क्र. | मालाचे नाव | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | खाद्य पदार्थ बेकन व हॅम, टेबल बटर मार्गारिन, ताजी फळे व सुपारी वगळुन | १.६५% | २.५०% |

सुकवलेली किंवा जतन
केलेली फळे व कवच फळे,
डबाबंद मासळी, चीझ,
मिठाई, मुरंबा व जेली,
गोठवलेली व जन केलेले दुध,
आईस्क्रीम, सर्व प्रकारचे पिठुळ
अन्न, लोणची, कोको,
कोकोचे बी व चॉकलेटस्
बिस्किटे व केक, डुकराची
पातळ चरबी, (लॉर्ड)किंवा
प्राण्यांची खाद्य चरबी, मावा,
दुधाची मलई, चक्का व दही,
फहांचे रस सरबते व सर्व
पेये, ग्लुकोज, डेक्सट्रोज किंवा
कोणतीही फलशर्करा (फ्रुट शुगर)
खाद्य तेलाव्यतिरिक्त तेल्याच्या
दुकानातील माल जतन केलेला
किराणा माल, बेकिंग किंवा
करी पावडर, सॅकरीन, सर्व
प्रकारचे खाद्य रंग व अर्क,
इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज,
सातुचे वाळलेले सत्त्व
(माल्ट एकट्रॅक्ट) मध,
कापड बटाट्याचे वेफर्स,
कोणत्त्याही वापरासाठी जतन
केलेले मांस आणि होल मिल्क
किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम
मिल्क पावडर किंवा निरा यांच्या
व्यतिरिक्त विशेषरित्त्या तरतुद
न करण्यात आलेले सर्व प्रकारचे
अन्न किंवा पेय.



| अनुसुचीतील बाब क्र. | मालाचे नाव | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ३८ अ | सर्व प्रकारची खनिज तेल, डिझेल तेल, पेट्रोल, विमान चालक स्पिरिट, सर्व प्रकारची वंगणे, व्हाईट ऑईल, तुर्क तेल (स्पिन्डल ऑईल)फर्नस ऑईल, पेट्रोलियम पदार्थ, माक्याचे तेल, शेवसाल ऑईल, साल्वहंट ऑईल, द किटकनाशके म्हणुन | २.०० % | ४. ०० % |

वापरली जाणारी इतर इंधन
तेले, नैसर्गिक गॅसोलीन,
रंग (नोंद ४८ खाली येत
असतील त्याव्यतिरिक्त इतर)
सोल्युशन्स व कम्पोजिशन्स,
टर्की रेड ऑईल व खनिज
तेलाचे उप पदार्थ , परंतु
यात यामध्ये या आधी
अंतर्भूत केलेल्या वस्तुंमध्ये
या पोट-नोंदीखाली घासलेटचा
अंतर्भाव होणार नाही.

४० ब सर्व प्रकारची रसायने,
सोडियम सल्फेट सायसिंग
साल्टोआर्यन सल्फेट,कॉपर
सल्फेट(मोरचुद)ॲल्युमिनियम ३.०० % ४. ००
%
सल्फेट सोडा सिलीकेट,
कॉस्टिक सोडा आणि अन्यथा
विनिर्दिष्ट केलेले नसतील असे
इतर क्षार असे इतर क्षार,
सल्फर पोटेशचे क्लोराईड
स्ट्रॉन्टिया, झिंक क्लोराईड,
मॅग्नेशियम क्लोराईड,
सोरा (सॉल्ट पिटर) सर्व
प्रकारची आम्ले सॅलेमोनिॲक
बोरेक्स, पांजणीचे पीठ.

४६ चकाकी दिलेल्या विटा, टाईल्स,
संगमरवरी दगड, भट्टीच्या
विटा, विटा, सर्व
प्रकारची छप्परी कौले,
फरसबंदीच्या टाईल्स,
फरशीच्या लादया, इत्त्यादी
चायना मोझइक चिप्स,
मोझाइकचा संगमरवरी दगड,
मोझाइकची किंवा टॅरेझोची ३.०० % ४.०० %
कौले, मातीचे नळ, चिनीमातीचे नळ,
सिमेंटचे नळ,आणि ॲसबेसटॉस
सिमेंटचे पत्रे.



---------------------------------------------------------------
अनुसुचीतील मालाचे नाव सध्याचे दर प्रस्तावित
दर
बाब क्र.
---------------------------------------------------------------

५१ इमारती लाकुड,वल्या, बांबु,
वेत व यापासुन तयार
केलेल्या वस्तु, दरवाजे व ३.०० % ४. ००
%
खिडक्या, चौकटी, खुंटया,
जिने, चंदनाचे लाकुड व अशा

लाकडापासुन तयार केलेल्या
वस्तु.

५३क लेसेस, टेप्स, लाकडी व
धातूच्या रिंग्ज, भरतकामाच्या
वस्तु, सेल्युलाईड, व
सेल्युलाईडच्या वस्तु,
सर्व प्रकारचे मणी,
कृत्रिम मोती, प्लास्टीक
व प्लास्टीकचा माल,
प्लास्टिक पावडर, बेकेलाईट २.०० % ३.५० %
व बेकेलाईटचा माल,
हस्तीदंत व हाडे यापासुन
बनविलेल्या वस्तु व सर्व
प्रकारची बटने आणि किरकोळ
जिन्नस, (इंबरडेशरी)

६१ लोकरी, रेशमी, लिनन, ताग,
कापुस, कृत्रिम व सिंन्थेटीक
वस्तुंचे कापड व वरील वस्तुंपैकी
कोणत्त्याही एकाच्या किंवा
अंशतः अशा वस्तुच्या व १.६० % १.८५ %
अन्यथा निर्दिष्ट करण्यात
आल्या नसतील अशा वस्तु
आणि वरील वस्तुंपासुन
बनविण्यात आलेल्या तयार वस्तु.

७१ लोखंड व पोलाद २.५० % ४.०० %

७४ यंत्र सामुग्री व त्यांचे घटक
व सुटे भाग ३.१० % ४.०० %

७७ अलोह धातु म्हणजेच पितळ,
तांबे, टीन,ॲल्युमिनियम,
शिसे, जस्त, जर्मन,
सिल्वर, स्टेनलेस स्टील १.२० % २.०० %
व त्यांचे मिश्र धातु, तारा
सामान व पत्रे इन्गॉट्स
व सर्कलस् इत्यादी.

काही वस्तुंवरील जकात करांचे वाढीव दराचे प्रस्ताव विचारात घेऊन सध्या कार्यरत असलेले जकात अभिकर्ता मे. मोनार्क इं.प्रा.लि. यांना पुढील एक वर्षासाठी किमान देकार रक्कम रू. ४६,२६,००,०००/- या दराने



पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेस व त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करण्यास प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. २२६ दिनांक :- ३१.३.२००१.

सुचकाचे नाव :-१)श्री. प्रमोद टाले.

२)श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-१)श्री. कुमार आयलानी.

२)श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आणि उपरोक्त कारणांमुळे जकात नियमांतर्गत जकातपात्र मालावर आकारणी योग्य कमाल व किमान दर दर्शाविणा-या अनुसुचीतील काही वस्तुंवर वर प्रस्तावित केलेले जकात कराचे वाढीव दर पुर्ननिश्चित करणे कामी महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन, जकात अभिकर्त्ता म्हणुन मागील आर्थिक वर्षापासुन कार्यरत असलेल्या मे. मोनार्च इंफास्ट्रक्चर प्रा.लि. यांना सन २००१-२००२ या सरकारी वर्षासाठी मुदत वाढ देवून रू. ४६,२६,००,०००/- या किमान देकार रक्कमेस पुर्वीच्या निविदेतील अटी व शर्तीवर त्यांना जकात अभिकर्त्ता म्हणुन नेमणेस व त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- आता हि सभा समाप्त होत आहे. कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.३० वाजता सभा संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखिजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२१/४/२००१.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२१/४/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. २०.४.२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. ती सभा स्थगित करून शनिवार दि. २१.४.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री. हरदास मारवीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास मारवीजा.
मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. वाघे शामु बाबु
५. श्रीमती. मोकल सीमा
६. श्रीमती.कालानी ज्योती
७. श्री.ढेणवाल बनवारी
८. श्रीमती. वेलकर सुरेखा
९. श्री. यादव नरेश
१०. श्री.सोनावणे राजु
११. श्रीमती.पंचशिला पवार
१२. श्री. आढाव रामभाऊ
१३. श्रीमती बगाडे सुनिता
१४. श्री.भांडे भगवान
१५. श्री. ठाकुर सेवलदास
१६. श्री.बनवारी किशोर
१७. श्री.तेजी कैलाश
१८. श्रीमती.लक्ष्मीबाई लुंड
१९. श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२०. श्रीमती.बसीटा बेबी
२१. श्री. पमनानी ईश्वर
२२. श्री.चौधरी राजेंद
२३. श्री.लांडे पांडुरंग
२४. श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२५. श्री.मोरे भानजी.
२६. श्रीमती. राजवानी सुनिता
२७. श्री.पुरस्वानी जमनादास
२८. श्री. वाधवा गिरधारी
२९. श्री. पारवानी रामचंद
३०. श्री.तलरेजा विनोद
३१. श्री. रोहडा श्यामसुंदर
३२. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३३. श्री. बहरानी ठाकुरदास
३४. श्रीमती.मालती करोतिया
३५. श्री.चव्हाण रमेश
३६. श्री.महाडिक प्रकाश
३७ श्रीमती.साधवानी जया
३८. श्री. मोरे भिमसेन
३९. श्रीमती.नाईक यशस्विनी
४०. श्रीमती.कुंदनानी लविना
४१. श्रीमती.बलेचा पदमा
४२. श्रीमती. गजवानी कांता
४३. श्री.केणी जयकुमार
४४. श्री.पंजाबी नारायण
४५. श्री.आयलानी कुमार
४६ श्री. अचनानी पम्मीकुमार
४७. श्रीमती. वारिंगे पन्ना
४८. श्री. मारिवजा प्रकाश
४९. श्री. रामरख्यानी मोहनदास
५०. श्री.बहरानी गोप
५१. श्री. सचदेव गिरधारी
५२. श्री. राजु जग्यासी
५३. श्री. पंजाबी लाल

तर

१ श्री. चौधरी गणेश, २. श्रीमती. सोनावणे यमुना, ३. श्री. उमाप रामदास, ४. श्रीमती. दासानी मिनु, ५ श्री. टाले प्रमोद, ६. श्रीमती. भगवंती रूपचंदानी, ७. श्रीमती. मटाई जोनिता, ८. श्री. वारिंगे पंढरीनाथ, ९. श्रीमती. टेकचंदानी

चंद्रा, १०. श्री. जाधव सुरेश, ११ श्री. भाटीया जयप्रकाश, १२. श्रीमती. वनवारी मोना, १३. श्रीमती. जेस्वानी आशा, १४. श्री. रजानी नरेंद्र, १५. श्री. मनसुलकर सुभाष ,१६ श्रीमती. रजानी भारती, १७. श्रीमती. इंदिरा भठिजा,



१८. श्रीमती. राधवानी आशा, १९ श्री क्रिशनानी गोदुमल, २०. श्री. नरेंद्र ठाकुर, २१. श्री. केसवानी किशोर हे सदस्य /सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सचिव :- </u>विषय क्र. २ वाचून दाखवितात.

मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-</u>प्रश्नोत्त्तरे चालु होती ना? माझा प्रश्न राहिला आहे. मला प्रत मिळाली आहे. मी तो प्रश्न कंन्टीन्यु करू इच्छिते.

<u>मा.महापौर</u> :- मॅडम आज स्थगित सभा आहे. यात प्रश्नोत्त्तरे घेणे जरूरी नाही. इट इज नॉट ऑबलीगेटरी, आपण पुढच्या सभेत प्रश्नोत्त्तरे घेऊ.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मागील सभेचे राहिलेले कामकाज चालु केले पाहिजे. हा नियम आहे. त्याप्रमाणे जर प्रश्नोत्त्तरे तीन झाली आहे तर पुढे देखिल ती घेतली गेली पाहिजेत.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-</u>महापौर साहेब, आम्ही आणखी काही आणलेले नाही.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> आपण सचिवांना विचारा? जिथे काम संपवले तिथुन सुरवात केली पाहिजे.

<u>मा.महापौर :-</u> माझ्या मते हे जरूरी नाही की, स्थगित सभेत प्रश्नोत्त्तरे कंन्टीन्यु करणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> सचिव साहेब, असे म्हणत असतील तर आमची काही हरकत नाही. सचिव साहेब सांगा.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> पाण्याचे प्रश्न आहेत आवश्यक आहेत.

<u>मा.महापौर</u> :- महाडिकजी, स्थगित सभेत प्रश्नोत्त्तरे घेतलेच पाहिजे असे काही आवश्यक नाही.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- तहकुब केलेल्या सभेत जिथे ज्या विषयावर सभा तहकुब करण्यांत आली त्या विषयापासुन पुन्हा सुरूवात केली पाहिजे.

<u>मा. महापौर</u> :-मला मान्य आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- त्याप्रमाणे प्रश्नोत्त्तराला सुरूवात केली पाहिजे.

मा.महापौर :- असे काही कायदयात स्पष्ट नाही की घेतले पाहिजे.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-सचिवांनी कायदयाप्रमाणे सांगावे आमची काही हरकत नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- सचिवजी कायदयानुसार सांगा.

मा.सचिव :-ज्याप्रमाणे आज परिस्थिती आहे अशी स्थिती यापुर्वी कधी नव्हती. कायदयात काय लिहिले आहे की, सभा तहकुब केल्यावर उरलेले कामकाज करायचे आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-त्याप्रमाणे पहिला विषय अर्धवट उरला आहे तोच घेतला पाहिजे. जर नियमाप्रमाणे सभा नाही घेतली तर आम्ही सभा त्याग करू.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- प्रश्नोत्त्तरे सोडुन बाकीचे महत्त्वाचे विषय घेण्यांत यावे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-काल संपवलेल्या प्रश्नापासुन सुरूवात करण्यांत येईल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- तुम्ही प्रश्नोत्त्तरे का घेत नाहीत कारण काय आहे?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- काही समस्या आहे काय?

मा.महापौर :-महाडिकजी, प्रश्नोत्त्तरे सोडुन इतर जे विषय आहेत ते आता घेतले जातील. प्रश्नोत्त्तरे पुढच्या सभेत घेऊ.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-का नाही घेत आता?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- प्रश्न का घेत नाहीत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- चार-चार महिन्यांनी आमचे प्रश्न येतात ते तुम्ही घेऊ इच्छित नाही याचा अर्थ काय?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- जे आम्ही प्रश्न टाकले आहेत ते जनतेसाठी आहे आमच्यासाठी नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-आठ नऊ महिने उरले आहेत आता आचारसंहिता लागु होईल नंतर महासभा होणार नाही तर प्रश्न शिल्लक राहतील. प्रश्न वाढत वाढत जातील नंतर ते प्रश्न घेतलेच जाणार नाहीत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- आधीच आमचा प्रश्न तीन महिन्या नंतर येतो तुम्ही तारीख पहा, प्रश्नोउत्त्तरे आम्ही आमच्यासाठी नाही केले.

मा.महापौर :- सभागृह नेत्त्यांचे काय म्हणणे आहे?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-प्रश्न घेण्यांत काय समस्या आहे?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- आपण प्रश्नोत्तरे घ्या, सचिवांचे पण ॲज पर ॲडमिनिस्ट्रेशन असे म्हणणे आहे.



मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- प्रश्नोत्तरे न घेण्याचे कारण काय?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- सचिवांचे काय म्हणणे आहे.

मा.महापौर :-सचिव म्हणतात कायदयात तसे स्पष्ट लिहिले नाही की, जरूरी आहे घेणे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-जिथे कार्यसुची संपली तिथुनच सुरूवात केली पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- सचिव साहेब, असे म्हणाले की, यापुर्वी कधी अशी परिस्थिती निर्माण झाली नाही. जी परिस्थिती आहे तीला नियमित करायचे आहे असे सचिव साहेबांनी स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणुन मी सांगते की, प्रश्नोत्तरे नियमित करा.
मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-आज प्रश्नोत्तरे घेण्यास कुणालाही रस नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- हे तुम्हाला कुणी सांगीतले? आम्ही आहोत इंटरेस्टेड, आम्हाला आहे रस.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी कालच्या विषयी बोललो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :मी आजचे बोलत आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-तुम्हाला जे प्रश्न नंतर घ्यायचे ते नंतर घ्या.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हो. हो करायला आम्हाला पण येते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-महापौर साहेब वनवारी साहेब निर्णय कसा घेतात?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- बोलु की नको, चार-चार जण एकत्र बोलत आहात.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-जर नियमात स्पष्ट दिले नाही तर सर्व सदस्यांचे मत घ्या.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मतदान घ्या, मतदान.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-आम्ही सचिवांशी बोलत आहोत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- आम्ही सचिवांना विचारले ना?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- महापौर उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-जेव्हा सचिवांनी उत्तर दिले. तर विषय संपला ना?

--५--

मा.महापौर:-महाडिकजी, सदनाचा विचार घेऊ.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-एक तास प्रश्नोत्तराचा आहे तो आम्हाला पाहिजे.

मा.महापौर :-तुमचे प्रश्न पुढच्या महासभेत येतील ना?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-या सभेत घेण्यास हरकत काय? याचे कारण सांगा.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-महापौरजी, तुम्ही चाळीस मिनिटे उशीरा आलात ते चालते आणि प्रश्नोत्तर बाकी चालणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-आज तुम्ही पाऊणे पाच वाजता आला. आज पण तुम्ही उशीरा आलात.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-ही सभा किशोर वनवारींच्या आवडी-निवडीवर चालते का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- माझे दोन प्रश्न काल झाले आहेत अजुन एक प्रश्न बाकी आहे.

मा.महापौर :-ठिक आहे. फक्त ४५ मिनिटे प्रश्नोत्तरे चालतील. महाडिकजींचा मान ठेवतो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-आभारी आहे. माझा नाही कायदयाचा मान ठेवा.

मा.महापौर :-महाडिकजींचा आम्ही या सदनात आम्ही आदर करतो म्हणुन त्यांचे म्हणणे ऐकले आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-महापौरजी, आम्ही पण तुमचा आदर करतो. उपमहापौरांचा, सदनातील सर्व सदस्यांचा आदर करतो.

मा.सचिव :- प्रश्नोत्तराची वेळ फक्त पंचेचाळीस मिनिटे राहील. काल पंधरा मिनिटे होऊन गेली होती. आता ४वाजुन ४० मिनिटे झाली आहेत. प्रश्न क्र. ५६१ श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आधी माझा प्रश्न राहीला आहे. मी दोन मिनिटे वेळ मागीतला होता. अभ्यास करून त्यावर प्रश्नोत्तरे करेन.

मा.सचिव :- तुम्हाला त्यांनी प्रत दिली का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-हो मी तयारी करून आले आहे.

मा.सचिव :-ठिक आहे. कालचा अर्धवट राहिलेला प्रश्न क्र. ५५३ घेण्यांत येत आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-सोनाळे साहेब तुम्ही मला काल प्रत दिली. मला हे सांगा या आधी तुम्ही कधी निविदा मागवल्या होत्त्या.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):-मॅडम तुम्हाला प्रश्नाचे उत्तर दिले आहे. तुमच्या प्रश्नात उपप्रश्न आहेत. त्याचे जे उत्तर हवे आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-माझे ऐका आधीच्या दोन प्रश्नांवर माझे समाधान झाले आहे मी काही हरकत घेतली नाही. या उत्तराने मी समाधानी नाही म्हणुन मी तुम्हाला विचारत आहे. दोन प्रश्नावर मी तुम्हाला काही प्रश्न विचारले का? कारण उत्तर बरोबर होते.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):-आधीची निविदा मार्च ९८ ला मागविली होती. त्यावेळी केवळ चार निविदाधारकांनी निविदा भरल्या होत्या.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मार्च ९८ ला मागवल्या नंतर २००० मध्ये मागविल्या.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):-एक मिनिट आधी माझे ऐका . मी पुर्ण करतो. दुसरी निविदा सप्टेंबर २००० मध्ये मागविल्या. त्यावेळी सहा निविदाधारकांनी निविदा भरल्या होत्या. जी अपसेट प्राईज आहे ३ ,९० ,७००/- तेवढी किंमत कोणाही निविदाधारकांने नव्हती भरली म्हणुन असा निर्णय घेतला की, जुन्या वाहनांचा लिलाव काढला. ३० मार्चला तो लिलाव घेण्यात आला. त्यामध्ये सहा वाहनांना अपसेट प्राईज पेक्षा जास्त किंमत मिळाल्याने ती देण्यांत आली. बाकीच्या सात वाहनांना कमी किंमत आली. व कोणी काही बोललेही नाही. म्हणुन त्यांची अपसेट प्राईज करून लिलाव लावायचा आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मी फक्त वाहनांविषयी नाही विचारले, भगांरविषयी विचारले त्यात ट्रॉली येते, वाहने येतात, इत्त्यादी आपण मला विचारायला पाहिजे होते की, कशा विषयी तुम्हाला उत्तर हवे आहे. शुळ साहेब जेव्हा होते, तेव्हा ट्रॉली मागविण्यात आला होता. त्याचे भंगार निघाले होते का? खुप सारे शौचालय तुटली होती, ती मालमत्ता कुठे आहे? हे सर्व भंगार मध्ये येते. आपल्या महापालिकेत अशी काही जागा आहे का जेथे भंगार गोळा केले जाते. उल्हासनगर मध्ये असे काही मैदान आहे? जसे मुंबई मध्ये कंपाउंड दिले जाते तिकडे वॉचमन असतात, भंगार तिकडे गोळा केला जातो, या महापालिकेत अशी काही सुविधा आहे?

श्री. सोनाळे (उपायुक्त):- हे उत्तर भांडार अधिकारी श्री. गोपाल जेसवानी यांनी दिले आहे. मी आणि ते बसलो होतो. सप्टेंबर २००० मध्ये वहानांसाठी निविदा निघाल्या होत्या.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-सर , मी तूम्हाला हे नाही विचारले की कुणी ठरविले, तुम्ही पण अधिकारी आहात, तूम्ही येथे उत्तर दयायला येता तर तयार होऊन या. नाहीतर माझा प्रश्न पुढच्या सभेत दया, नाहीतर गोपाल जेसवानी यांना बोलावले जावे. ते मला बरोबर उत्तर देतील.

श्री. सोनाळे (उपायुक्त) :-भंगाराबाबत विचारता शेवटचे टेंडर सप्टेंबर, २०००ला निघाले.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- भंगारमध्ये फक्त गाडया येत नाहीत. तूम्ही मला विचारायला पाहिजे होते कश्या बाबतीत हवे? महापालिकेतील सर्व भंगार ज्यांच्या निविदा निघतात, तुम्हाला माहित आहे सर्व एकत्र गोळा करून ठेवतात व निविदा मागविल्या जातात. जर इकडे अशी प्रथा आहे, गाडयांचे वेगळे, ट्रालीचे वेगळे , मालमत्तेचे वेगळे, तुम्ही मला प्रश्न

विचारायला पाहिजे होता, कश्या बाबतीत माहिती हवी आहे? आपण असे काही प्रश्न विचारला नाहीत.

श्री. सोनाळे (उपायुक्त) :-आम्ही कसा प्रश्न विचारणार?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-आपण प्रश्न कसे विचारता?

श्री. सोनाळे (उपायुक्त) :- तुम्ही प्रश्न विचारता, आम्ही त्यावर उत्तरे देतो.

मा.सदस्य श्रीमती सुनिता राजवानीः- उत्तरामध्येच कित्येक वेळा तुम्ही प्रश्न टाकले आहे. मी आपणास वेरिफिकेशन नाही केले की, गाडयांचा भंगार.... जर मी वेरिफकेशन नाही केले तर आपण फक्त गाडयांचेच का दिले?

मा.महापौर :- एका प्रश्नामागे दहा आणखी प्रश्न विचारु नका. एक्च्युली इट इज नॉट अलाउड ऑल सो. ठिक आहे. काही क्लेरिफीकेशन पाहिजे असेल तर तर ती चुकीची गोष्ट आहे. एका प्रश्नामागे दहा प्रश्न जोडले तर, ऑफिसर तुम्हाला एका पण प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- व्यवस्थित जर आम्हाला खुलासा केला तर ते तीन पानांचे होईल. मी भंगार विषयी विचारले त्यांनी फक्त गाडयांचे सांगितले आहे. भंगार मध्ये तर सर्व वस्तु येतात. त्यांनी सांगायला पाहिजे होते की, नंतर बाकीचे करणार आहोत. एक वर्ष आधी त्यांनी लिलाव केला होता. त्यांनी उत्तरात असे लिहीले आहे की, काम प्रगती पथावर आहे. एक वर्षानंतर त्यांनी परत नाही मागवले. तुम्ही उत्तर पहा काय उत्तर दिले ते. पहा. एक वर्ष झाले आहे तुम्ही कालावधी पहा.

श्री. सोनाळे (उपायुक्त) :-मॅडम टेंडर मागवल्यानंतर अपसेट किंमत पहा. अपसेट किंमतीपेक्षा कमी किंमत आल्याने आम्ही भंगार देऊ नाही शकलो. पुढची कार्यवाही म्हणजे लिलाव. लिलाव महासभेची परवानगी घेऊन केला जातो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मी असे नाही म्हणाले कमी किंमतीत दया. मी फक्त निविदेविषयी बोलत आहे. आपण फक्त गाडयांविषयी लिहिले आहे. आता मी परत प्रश्न टाकते. महापौर साहेब हि परवानगी दया.परत मी ते प्रश्न देईन. श्री. कुकरेजा तुम्ही माझे प्रश्न स्विकारा. नाहीतर तुम्ही म्हणाल हा प्रश्न होऊन गेला मी नाही घेऊ शकत. मला परवानगी दया. आभारी आहे.

मा.सचिव :-प्रश्न क्र. ५६१ श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र.५६१:-महानगरपालिकेने शहरातील एकुण ३२ रस्त्यांचे रूंदीकरण व विस्तारीकरणाचे काम हाती घेतले असुन त्यापैकी किती रस्त्यांचे काम पुर्ण झाले आहे? किती रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत? व कोणत्या कारणास्तव?

उत्तर :- १)एकुण ३३ रस्त्यांचे कामापैकी एक रस्त्यांचे काम अंशतः पुर्ण झालेले आहे.
२)एक काम रूंदीकरणाच्या धोरणात्मक निर्णया अभावी प्रलंबित आहे (कल्याण अंबरनाथ रोड)
३)उर्वरित ३१ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u>मला वरील प्रमाणे उत्तर दिलेले असुन त्यात सांगीतले आहे की, एकुण ३३ रस्त्यांचे कामापैकी एक रस्त्यांचे काम अंशतः पुर्ण झालेले आहे. तर कोणता रस्ता पुर्ण झाला आहे? ते सांगा. कोणता रस्ता पुर्ण झाला आहे. शहर अभियंत्यांची महासभेसमोर मुलाखत घ्यायला पाहिजे ना?

<u>श्री.चिजवानी (शहर अभियंता)</u> :-बॅरेक नं. ११९७ ते वॉटर सप्लाय कंपाऊंड समता नगर समोर ५ नंबर मध्ये.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव</u> :-प्रभात टॉकीज ते भाटीया चौक पर्यंत केले नाही आहे.

<u>श्री.चिजवानी (शहर अभियंता)</u> :-तो हा रोड नाही आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-</u> मग कसा म्हणता पुर्ण झाला म्हणुन?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :-वॉटर सप्लाय समोर समता नगरचा रोड आहे. तो तयार झाला आहे. ठेकेदार राजन ठाकुर नी केला आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>तुम्ही हे लिहायला पहिजे होते ना?

<u>श्री.चिजवानी (शहर अभियंता)</u> :-नाही दिले त्याबददल माफी असावी. सॉरी.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः</u>-काय म्हणता सॉरी. आणि दुसरे असे की, हे काम रूंदीकरणाच्या धोरणात्मक निर्णया अभावी प्रलंबित आहे (कल्याण अंबरनाथ रोड हे काय आहे. मेन रोड आहे साईबाबा मंदीरापर्यंत हा का नाही काढला जात. हा प्रलंबित का आहे? काय कारण आहे. आज आयुक्त साहेब नाही आहेत. ढाकरे साहेबांना चार्ज दिला आहे. तर आज ढाकरे साहेब तुम्ही आयुक्त म्हणुन आणि शहर अभियंताने म्हणुन माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. कोणत्त्या कारणामुळे या रस्त्याचे काम होत नाही. काम का थांबवले आहे? ३३ रस्त्यांचे काम चालु होते वेळेस खुप गरीब लोकांची घरे तोडली गेली आणि रस्ते बनविणे सुरू केले. आणि शहराचे नाक ज्या रस्त्याला म्हणतात. माणुस आपल्या नाकासमोर चालत असताना त्याला चांगले दिसते, चांगले करतो. कल्याण अंबरनाथ रोड शहराचे नाक आहे तो असा का राहिला गेला याचे कारण काय? व यात काम न करण्याचे काय कारण आहे? यामध्ये कोणाला रस आहे? का नाही होत? हा रोड डीपी मध्ये नाही आहे? हा मेन रोड आहे.

<u>श्री.चिजवानी (शहर अभियंता)</u> :-या रोडची लांबी रूंदी किती करायची याचा निर्णय अजुन घेण्यांत आला नाही. आणि डिमॉलेशन होऊन मिळाले नाही. म्हणुन ठेकेदार म्हणाला की, हे काम जर तुम्ही लवकर केले तर ठिक आहे. नाहीतर मी यावर दावा ठोकेन.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-</u> डिपी प्रमाणे तो रोड किती फुट आहे?

<u>श्री.चिजवानी (शहर अभियंता)</u> :-शंभर फुट आहे.

<u>मा सदस्य श्री. रामभाऊ आढावः-</u>मग बस ना. ते फायनल आहे ना? ते फायनल कोण करणार आहे? ॲज पर डिपी रोड करतात ना?

मा.महापौर :- एक मिनिट, चिजवानी मी आमचे मित्र आढाव व मोरे साहेबांना सांगु इच्छितो की, महासभेमध्ये आपण जे ३३ रोड पास केले त्यात कल्याण अंबरनाथे रोडचा समावेश आहे. व त्या रस्त्याची रूंदी ५० ते १०० फुट आहे. कुठे ५० फुट आहे तर कुठे १०० फुट आहे. राधास्वामी सतसंग हॉलच्या पुढे साईबाबा मंदिरापर्यंत तेथे एक इमारत आहे ती ३५ फुट रोड मध्ये प्रभावित होते. त्यामध्ये ऑडनन्स फॅक्टरीचे कर्मचारी रहात होते मी आणि आयुक्तांनी कित्त्येकदा तिथे भेट दिली त्यामुळे थोडयाकालावधी साठी तो रोड आम्ही डिफर केला. जो पर्यंत आपण त्यावर काही उपाय नाही काढु शकत. तो पर्यंत आम्ही हा रोड नाही घेऊ शकत. माझ्या मते हेच कारण आहे की, रोडचे काम सुरू होत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-आता आमचे महापौर साहेब सदनासमोर म्हणतात की,कुठे ५० फुट करायचे आहे तर कुठे १०० फुट आहे. हे खरे आहे.

मा.महापौरः- महासभेत तसा ठराव झाला आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-तुम्ही म्हणता की, ऑडनन्स फॅक्टरीचे तिथे कामगार राहतात. ती बिल्डींग त्या रोडमध्ये येते.

मा.महापौर :-राधास्वामी सतसंग हॉलच्या लाईनीमध्येच ती इमारत आहे. तळमजला अधिक सहा. अशी इमारत आहे. ३५ फुट ती इमारत त्यामध्ये येते.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-उल्हासनगर शहाड फाटक ते उल्हासनगर महापालिका रस्ता बनला त्यामध्ये इमारत असो, झोपडी असो ते सर्व काढले गेले. मग ही इमारत का नाही काढली जात. जर रोड डिपी मध्ये येतो. तर त्यावर कार्यवाही झाली पाहिजे. जर तो रोड असा ठेवला आहे तर संपुर्ण रोड असा ठेवणार का?

मा.महापौरः-असे नाही थोडया कालावधीसाठी पुढे ढकलले आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-या ३३ रोडचा ठराव आपण कधी केला आहे?

मा.महापौर :-सन ९९ मध्ये.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- हे कोणते वर्ष चालु आहे.

मा.महापौर :-सन २००१.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :- मग इतके दिवस का राहिले आहे? कारण काय आहे?

मा.महापौर :-हा एकच रोड राहिला आहे. बाकीचे रोड आपल्या तेज गतीने पुर्ण होत आहेत. आणि मी असे समजतो की, ७५ टक्के रोड ३१ मे पर्यंत पुर्ण होतील.शहर अभियंता आपण सदनासमोर तसे सांगा.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे :-श्री. चिजवानी तुम्ही बोला.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-७५ टक्के रोड ३१ मे पर्यंत पुर्ण होण्याची खात्री आहे . आणि तसे प्रयत्न चालु आहेत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-आज किती तारीख आहे?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-२१ एप्रिल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-जर ३१ मे च्या आधी नाही झाले तर?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-आमचे पुर्ण त-हेने प्रयत्न चालु आहेत. आम्ही नक्की यशस्वी होऊ.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

विपक्ष सदस्य :-मोरे साहेब माईकमध्ये बोला काही ऐकु येत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-म्हणजे सर्व सदस्यांना माझे बोलणे ऐकायचे आहे. धन्यवाद. मला हे विचारायचे आहे. किती दिवस ते प्रलंबित ठेवणार आहे. आधी हे उत्तर दया. कुणाचा यात रस आहे डीले करण्यात? त्याचे नाव सदनासमोर सांगा?शहराच्या विकासाचा हा रस्ता आहे तो का राहीला? कोणत्त्या कारणामुळे राहीला ? मेन रोड आहे.

मा.महापौर :-याचे उत्तर तर मी आपणांस दिले ना?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-शहर अभियंतांना उत्तर देऊ दया. पुर्ण शहराची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-महापौर साहेबांनी उत्तर दिल्यावर मी काय उत्तर देऊ.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-महापौर साहेबांनी पण बरोबर उत्तर दिले नाही आहे. मी म्हणतो ना?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-महापौरांनी उत्तर बरोबर दिले आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-नाही नाही त्यांनी टाळाटाळ करतात असे उत्तर दिले.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासी :-महापौर साहेब, जसे मोरे साहेब म्हणतात तशी शहर अभियंत्यावर कार्यवाही झाली पाहिजे. शहरातील रोड पुर्ण नाही झाले याला जबाबदार कोण आहे? तुम्ही उत्तर दिले म्हणजे आम्ही संतुष्ट होऊन खाली बसायचे का? त्यांची जबाबदारी संपते का? शहर अभियंता आपण उत्तर दया.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-असे नाही आहे. जे रोड पुर्ण नाही झाले, कारण की, डेमोलेशन नाही झाले. पुर्नवसनाची समस्या होती. मार्किंगचा प्रॉब्लेम होता. एक गोष्ट नाही आहे. आमच्या तर्फे पुर्ण प्रयत्न चालु आहे की, लवकरात लवकर रोड पुर्ण केले जावे.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-कुठपर्यंत तुमचे प्रयत्न चालु राहणार?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-चिजवानी आपण हे तरी चुकीचे सांगु नका, की मार्कींगचा प्रॉब्लेम होता, डेमोलेशनचा प्रॉब्लेम होता हे सर्व चुकीचे आहे.जर तो रोड डि.पी.त आहे. त्याची रूंदी १०० फुट आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ते जनरल विचारत आहेत.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-चिजवानी साहेब, अजुन कुठे मार्कींगचा प्रॉब्लेम असेल पण आज फर्निचर बाजारातील रोड तयार होऊन, तिथे कडेच्या बाजुला डांबर लावणे बाकी आहे. तो डांबर तुम्ही पावसाळयात लावणार का? पावसाळयात डांबर निघुन जाईल.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ते लवकर करून देतो.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः- लवकर म्हणजे कधी? पावसाळा झाल्यावर डांबरचे काम करणार का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आम्ही यांना पंधरा वेळा तक्रार दिली आहे.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-पावसाळा जवळ येत आहे कधी करणार डांबराचे काम? प्रत्येक वेळी डांबराचे काम पावसाळयात करतात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः- सर्वजण एकत्र बोललात तर मंचावरून पळुन जातील.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-महापौरजी, आपण शहर अभियंता वर कार्यवाही करा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-सांगा चिजवानी साहेब मी तुम्हाला कित्येकदा सांगीतले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-जो यात मुख्य दोषी आहे. त्याच्याकडे आपले लक्ष जात नाही.हे शहरातील रोड तयार नाही झालेत त्याला जबाबदार उत्तर इंजिनियरिंगचा ठेकेदार ओसवाल आहे. त्याचे कर्मचारी चुकीचे उत्तर देतात. बरोबर सुपरविजन करत नाहीत. व रोड पुर्ण करत नाहीत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-असा रिपोर्ट दिला आहे का?शहर अभियंतांनी तसे सांगीतले आहे का?

इकडे विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-सभागृह नेता असुन चुकीची स्टेटमेंट देतात. आपले शहर अभियंता काय करतात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौर, जर सभागृह नेता असे म्हणतात की, ओसवालजी जबाबदार आहेत. त्यांचा ठेका संपल्यावर तुम्ही महासभेत एक ठराव आणला होता. त्यावेळी तुम्ही म्हणाला होता की, हे डिफर

करू या व लवकरात लवकर ओसवाल इंजिनियरींग बाबतीत बैठक घेऊन निर्णय घेऊ या. या घटनेला जवळ जवळ एक वर्ष झाले आहे. त्यानंतर कार्यसुचीवर हा विषय आला नाही. त्यावेळी कार्यसुचीवर हा विषय आणला असता तर असे घडले नसते. तेव्हा तुम्ही हा निर्णय घेतला होता की, जोपर्यंत काही निर्णय होत नाही तोपर्यंत ओसवालना कंटीन्यु करण्यांत यावे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-जेव्हा मनात येते तेव्हा सभागृहनेता स्वत:ची जबाबदारी झटकुन देतात. चुकीचे उत्तर देऊ नका.शहर अभियंता जर उत्तर देत आहेत तर...

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी-ते सभागृहाची दिशाभुल करत आहेत.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मा.महापौर साहेब,

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-आधी मला माझ्या प्रश्नाचे उत्तर तर घेऊ दया.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.महापौर:-आधी बी.बी.मोरेंचे तर पुर्ण होऊ दया.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-सभागृहामध्ये एक एक प्रश्न तर आधी पुर्ण होऊ दया. नंतर तुम्ही बोला ना त्यावर.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मोरे साहेब , बोलता का बोलु मी.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-मी बोलतोय ना? तेच तर विचारतो ना? सांगा चिजवानी साहेब का इतका विलंब लागतोय, कुणाचा यात इंटरेस्ट आहे. जर आपल्या महापालिकेला करायचे नाही आहे का? ते पण सदनाला सांगा?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-जेव्हा इमारत तोडण्याचा निर्णय घेतला जाईल. आम्हाला तोडुन देतील तेव्हा आम्ही आमचे काम सुरू करू.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-काय निर्णय घ्यायचा आहे?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-इमारत तोडल्यावर आमचे काम सुरू केले जाईल.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-महापौर साहेब, आपली परवानगी घेऊन बोलत आहे. दोन वर्ष झाले अजुन काही निर्णय घेण्यांत आला नाही.आता आपण सांगीतले की, ३१ मे पर्यंत काम पुर्ण करण्याचे प्रयत्न करू. आपणास वाटते दोन वर्षात पुर्ण झाले नाही ते काम दिड महिन्यात पुर्ण होणार का?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-मी या कामासाठी नाही म्हणालो.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-तुम्ही आज पर्यंत ती इमारत तोडण्यासाठी काय काय कार्यवाही केली. कार्यवाही तर केली पाहिजे त्यावर?

मा.महापौर :-आढावजी, ते म्हणाले ७५ टक्के काम ३१ मे पर्यंत पुर्ण होईल त्यात या रोडचा समावेश नाही. बाकीच्या ज्या ३०-३१ रोडचे काम चालु आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:- महापौरजी, चर्चा त्या रोड विषयी चालु आहे.

मा.महापौर :-तुम्ही जे विचारत आहात त्याचे मी उत्तर देत आहे की, हा रोड सोडुन इतर जे ३१ रोडचे काम चालु आहे. ओसवालांचे ते पुर्ण होतील.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः- म्हणजे हा रोड पुर्ण नाही होणार.

मा.महापौरः- महापालिकेने अजुन या रोड संबंधी निर्णय घेतला नाही. तिथे सैन्यात काम करणा-या कर्मचा-यांचे कुटूंब आहेत त्यामुळे आम्ही ते काम थांबवले होते. जो पर्यंत त्यांना स्थापन करण्याचा निर्णय नाही घेत जोपर्यंत त्या रोडला प्रलंबित केले आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-जेव्हा डिफेन्सवाले कार्यवाही करतात तेव्हा आपल्या लोकांना देखिल नुकसान होते तेव्हा ते विचार करतात का? मागच्यावेळी १९८८ मध्ये जे जुने रेशनिंग ऑफिस होते. त्यावेळी त्या लोकांनी खुपश्या लोकांना तिथुन हटविले. जर डिफेन्सवाले, मिलेटरीवाले आपल्याशी असा व्यवहार करतात तर आपण का त्यांच्याशी चांगला व्यवहार करायचा. नाही. नाही. याचा विचार करा. मिलिंद नगरमध्ये १९८८ मध्ये तुम्हाला चांगले आठवत असेल त्यावेळी त्यांनी कुणाचे काही ऐकले नाही.

मा.महापौर :-रक्षा विभागात काम करणा-या कर्मचा-यांविषयी उ.म.पा. नगरसेवकाना सहानुभुती आहे. म्हणुन आम्ही त्याचा निर्णय घेतला नाही. आता घेऊ.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-दोन वर्ष झाले आहेत, दोन वर्षातत काय नाही होत. तर त्यावर काय कार्यवाही करणार?कधी त्यांचा निर्णय देणार? हे सांगा ना.

मा.महापौर :-लवकरच याबाबत निर्णय घेऊ.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- एक मिनिट, महापौर साहेब, मी आपली परवानगी मागितली आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- इथे लिहिले आहे, ३१रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. तुम्ही इथे सविस्तर सांगाला का कोणते कोंणते रस्ते आहेत ते.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ते मी तयार करून तुम्हला दोन दिवसात देतो.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-का नाही यादी तयार केली. मी प्रश्न कधीच टाकला आहे. जर चार चार महिने अगोदर प्रश्न विचारून देखिल यादी दिली जात नाही. तर मग प्रश्न टाकायचा फायदा काय? मला काय विचारायचे आहे. कारण जे ए.व्ही.नारायण रोड आहे. इथे आपण सांगितले की, ३१ रोड प्रगतीपथावर आहेत. त्यात ए.व्ही.नारायण रोड आहे का?ते काम पुर्ण झाले आहे का? ते प्रगतीपथावर आहे का ते पण सांगा?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ए.व्ही.नारायणचे काम अजुन सुरू नाही केले आहे. कारण बाजुला जो दुसरा रोड आहे. अजुन तिथले अतिक्रमण हटविले नाही आहे. ते अतिक्रमण हटविले की, आम्ही काम सुरू करू.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- अशी काही कार्यवाही सुरू केली आहे का?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-मार्कींग करून दिले आहे पण अतिक्रमण अजुन हटविले नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-हे चुकीचे आहे. त्या रोडचा या रोडशी काही संबंध नाही. ए. व्ही. नारायण रोडचा व पेट्रोलपंपच्या बाजुच्या रोडचा काही संबंध नाही. तो वेगळा रोड आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-उलट तो त्याला जोडुन आहे.

मा.सदस्य बी.बी.मोरे :-तो रोड पण डि.पी.त आहे ना?

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा.महापौर, शहर अभियंतांना कोणत्त्या रोड विषयी चर्चा चालु आहे हेच माहित नाही. आज दोन वर्ष झाले शहर त्रास सहन करत आहे. मागच्या पावसाळयात यांनी कबुल केले होते की, पुर्ण करून देऊ. आता दुसरा पावसाळा आला. त्यानंतरही त्यांना ए.व्ही.नारायण रोड कोणता आहे हे माहित नाही. ओसवाल कंन्सल्टंटवाले आमच्या इंजिनियरशी चांगले बोलत देखिल नाही. आपले इंजिनियर ऐवढे चांगले आहेत त्यांच्या इंजिनियरशी मदत मागतात. तर ओसवालचे इंजिनियर ठेकेदारांशी आपल्या व्यवस्थित बोलत नाही. ठेकेदारांना म्हणतात जा. नाही घ्यायचे माप. काम उदया करा. आज बंद करा. हि कुठली पध्दत आहे. पुर्ण शहर भोगत आहे. शहर अभियंताचे काम आहे लक्ष देणे.

(इकडे विपक्ष सदस्य शेम शेम म्हणुन ओरडत होते)

हि कुठली पध्दत आहे की, ओसवालचे इंजिनियर आमच्या इंजिनियर वर हावी होत आहेत. आज आमच्या इंजिनियरचे कुणी ऐकत नाही. त्यांचे सर्व ऐकतात. याकडे लक्ष दयावे आपण? शहरात पुर्ण नाव खराब झाले आमचे. आणि शहर अभियंताना हे माहित नाही की, ए. व्ही. नारायण रोड कोणता आहे ते?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ए.व्ही. नारायण रोड मला माहित आहे. शांतीनगरच्या तिकडे आहे. तो रोड मला कसा नाही माहित?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-मग या लिंक रोडचे काम कधी सुरू केले जाईल.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-डेमोलशन केल्यावर लगेच हे काम चालु केले जाईल.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-का नाही, डेमोलेशन केले गेले आजपर्यंत?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-आम्ही त्यांना लिहुन दिले आहे. दोन-तीनदा मिटिंगमध्ये बोललो आहोत. जोपर्यंत तिथुन निर्णय घेत नाही आम्ही काही करू शकत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- आपल्याला व शहर अभियंतांना काही रस नाही का तो रोड काढावा म्हणुन?

मा.महापौर :-आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-मग का नाही तो रोड काढत दोन वर्ष झाली. या दोन वर्षात शहराला किती भोगावे लागले आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-डेमोलशन केल्यावर लगेच हे काम चालु केले जाईल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-कधी हटविणार अतिक्रमण?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ते तर अतिक्रमण विभाग सांगेल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-आयुक्त साहेब, आम्हाला लिखित उत्तर हवे आहे की, कल्याण अंबरनाथ रोडचे काम का नाही सुरू केले गेले? कधी सुरू करणार आहात?डेमोलेशन कधी करणार आहात, कधी रोडचे काम सुरू करणार आहे?दुसरे ए.व्ही. नारायण रोड, तिसरा डॉलफिन क्लबच्या शेजारचा रोड शहाड फाटकापर्यंत जातो. हे तीनही रोड जर तुम्ही लवकर सुरू नाही केले व मला लिखित उत्तर दिले नाही तर मी स्वत: महापालिकेच्या इमारतीवरून उडी मारेन. जर लवकर हे काम नाही केले तर.

मा.महापौर:-मोरे साहेब, हे तुम्ही काय म्हणता, कालच तुमचा वाढदिवस साजरा केला.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-पाण्यासाठी किंवा शहराच्या विकासासाठी आम्ही मेलो तर आमचे नाव तरी होईल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-महापौर साहेब, सत्ताधारी पक्ष इतका वैतागला आहे का. कुणी म्हणतो आग लावेन, कुणी म्हणतो उडी मारेन.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:- सुनिता भाभी सत्ताधारी व विपक्ष असा इथे प्रश्न नाही आहे.शहरावर दबाव येत आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आपले म्हणणे बरोबर आहे. तुम्ही इतके वैतागला आहात तर आम्ही किती वैतागलो असु?

मा.महापौर:- मोरे साहेब, आता इतरांना बोलायची संधी दया.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-इतरांना संधी दया म्हणजे हे असेच चालु राहिल का? आमचे पाच वर्ष असेच निघुन जातील.

मा.महापौर :- आपणांस आयुक्त उत्तर देत आहे.

मा.सदस्या श्री. बी.बी. मोरे :-ठिक आहे, आयुक्तांना उत्तर देऊ दया.ढाकरे साहेब, मेहरबानी करून सदनासमोर बोलतो, उलट सुलट उत्तर देऊ नका. योग्य उत्तर दया. आम्हाला चॉकलेट देऊ नका. हे मी का बोलतो कारण माझ्या प्रत्येक प्रश्नात मी हे पाहिले की, तुम्ही प्रत्येक वेळी मला वेगवेगळया प्रकारची चॉकलेट दिली आहेत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-तुम्ही घेतले का? तुम्ही खाल्ले का?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-मी चॉकलेट खात नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- महापौर साहेब, आम्हाला याविषयावर बोलायचे आहे. पंधरा ते वीस मिनिटे झाले आहेत मी आपणांस इशारा करत



आहे. आयुक्तांनी उत्तर दिल्यानंतर देखिल मला बोलता येईल. हि मी तुम्हाला फक्त आठवण करून देतो. मला बोलायचे आहे. ठिक आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-लांडेजी, आयुक्तांना उत्तर देऊ दया.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- तुम्ही तुमचे समाधान करून घ्या.मी नंतर विचारेन.

मा.महापौर :-लांडेजी, आयुक्तांना उत्तर देऊ दया.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मी फक्त आठवण करून देतो. मला बोलायचे आहे. तुमच्या उत्तराचे समाधान झाले नाही तर बोलेन नाहीतर नाही बोलणार.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-एकाचे समाधान झाल्यावर दुस-याला बोलु दया. मा. प्रभारी आयुक्त बोला.

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-मा. सदस्य श्री.बी.बी.मोरेंनी जो प्रश्न विचारला आहे. त्या प्रश्नाला शहर अभियंता यांनी बरोबर उत्तर दिले. आणि त्यांना जे उत्तर अपेक्षित आहे. त्यांनी जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे. त्याच्यात काही चुक नाही. त्यांनी लिहिले आहे की, शांतीनगर ते साईबाबा मंदीर पर्यंत जाणारा रस्ता धोरणात्मक निर्णयामुळे प्रलंबित आहे. आणि रस्त्याचे धोरण सर्व पक्षीय गटनेते महापौर, उपमहापौर, सर्व सभागृहातील सदस्य यांनी तो कसा करायचा हे धोरण ठरवले आहे. आणि ते धोरण काय आहे? आणि ते कसे प्रलंबित आहे हे सदनाला सर्वांना माहित आहे. हे धोरण सदनाने ठरवायचे आहे. मग शहर अभियंता त्वरीत काम सुरू करतील.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-ते धोरण कधी ठरविणार?

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- डि.पी.चा काय प्रॉब्लेम आहे? धोरणा नंतरच डि.पी. ठरविली जाते ना? डि.पी. ला मान्यता कधी मिळते? याचा खुलासा तुम्ही करा.

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-मी नम्रपणे निवेदन करतो, की डि.पी. मध्ये रस्त्याची रूंदी निश्चित केलेली असताना देखिल आपण तो रस्ता धोरणात्मक बाबीसाठी मागे ठेवला. कशासाठी मागे ठेवला हे सदन जाणेल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-इतर ठिकाणी धोरणात्मक बाब नाही आली. इतर रस्त्यांचे डेमोलेशन करताना ही बाब नाही आली. डी.पी.चा रोड आहे. त्याच्याठिकाणी धोरणात्मक बाब नाही आली. आणि एका रोडसाठी शहराच्या धोरणात्मक बाब आली.

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-मोरे साहेबांच्या लक्षात आणुन देतो नम्रपणे कि शहर अभियंतांचा त्यात दोष नाही. हे आपण ठरवलेल्या धोरणामुळे थांबविले आहे. आपण स्वत: म्हणजेच आपण स्वत: एक सदनाचा भाग आहात.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-आम्हाला असे दाखवा कुठल्या लोकप्रतिनिधीने आयुक्तांना धोरणात्मक बाबीसाठी सांगितले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-कोणत्त्या लोकप्रतिनिधींनी तुमच्या कडे मागणी केली आहे की रोड बनवु नका म्हणुन? तो ३३ रोड मध्ये आला कसा? लोकप्रतिनिधींनी मागणी केली म्हणुन ना?



श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-मी आपणांस परत आठवण करून देतो. ३३ रस्त्यांचा प्रोजेक्ट आपण हाती घेतला. विस्थापित लोकांचे पुर्नवसन सर्व पक्षीय

मिटिंग तत्त्कालिन आयुक्त महापौर,उपमहापौर, सर्व सभापती, स्थायी समिती, गटनेते, सर्वांनी मिळुन रस्त्याचे नियोजन केले आहे. त्या एका रस्त्यासाठी हे धोरण ठरवण्याचा निर्णय आपण सावकाश घेऊ. सावकाश कधी घ्यायचे हे आपण ठरवा ना?

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u> :-ढाकरे साहेब अशी कधी बैठक झाली? गटनेते नगरसेवक एकत्र झाले. असे झाले का?

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-</u>सर्व पक्षीय गटनेते, महापौर, उपमहापौर, आयुक्त होते तेव्हा ठरले होते रोड १०० फुट बनवायचा म्हणुन?

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u> :-लांडेंनी आणि मी वेळोवेळी या गोष्टीवर प्रकाश टाकला आहे प्रश्न विचारला आहे. तो रोड काढा म्हणुन.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी</u> :-मा.महापौरजी, लालचक्की ते विनस पर्यंत जे रोडचे काम झाले होते तेव्हा डेमोलेशन केले होते. तेथिल लोकांचे पुर्नवसन केले पण अजुन पर्यंत त्यांना लाईट आणि पाणी काही मिळाले नाही. जोपर्यंत तुम्ही लोकांचे पुर्नवसन व्यवस्थित करू शकत नाही तो पर्यंत नव्याने तोडफोड करू नका.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः-</u> महापौरजी, देवेंद्रसिंगचा गैरसमज झाला आहे. लालचक्कीला जेवढया लोकांचे तोडले त्यांचे पुर्नवसन झाले आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी</u> :-पुर्नवसन झाले आहे पण त्यांना लाईट पाणी मिळाले नाही. त्यांना या सुविधा मिळाल्या नाही.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :-त्यांना बेघर करून रस्त्यावर फेकायचे का?

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः-</u>देवेंद्रसिंग काय म्हणाले त्यांना बेघर केले आहे. तसे नाही आहे त्यांना घर दिले आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी</u> :-पुर्नवसन झाले आहे पण त्यांना लाईट पाणी मिळाले नाही. त्यांना या सुविधा मिळाल्या नाही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :</u>-आधी आयुक्तांना उत्त्तर देऊ दया मग बोला.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :-लाईट पाण्याचा प्रश्न आहे. आयुक्त म्हणाले होते की, कोर्ट मॅटर आहे त्यानंतर ते देखिल दिले जाईल.

<u>मा.महापौरः-</u>बरोबर.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी</u> :-तोपर्यंत दोन वर्ष हे भोगतच राहणार का? त्यांना लाईट पाण्याची सवलत दिली पाहिजे.

<u>मा.महापौर</u> :-देवेंद्रसिंगजी बसा. लांडेजी बसा.



<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे</u> :-एक मिनिट मला बोलु दया.

<u>मा.महापौर :-</u> आयुक्तांनी उत्त्तर दिले ना आपणांस.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:- ते काय काय उत्तर देतात. लोकप्रतिनिधी, महापौर, वगैरे वगैरे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-महापौर साहेब, तुम्ही पण होता त्यावेळी.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :- हे गोलमाल उत्तर दिले आहे.

मा.महापौर :- एक मिनिट ऐका. एका सदस्याचे अजुन पुर्ण झाले नाही तर सदस्य मध्ये बोलत आहात तर असे कसे चालेल.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मला बोलायचे आहे मी फक्त आठवण करून देतो.

मा.महापौर :-आधी एकाचे तर समाधान होऊ दया.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-ढाकरे साहेबांनी जे गोलमाल उत्तर दिले आहे. मला जरा विचारू दया. मग तुम्ही एकेक जण विचारा.

मा.महापौर:- मोरे साहेबांचे समाधान होऊ दया मग तुम्ही बोला.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-सांगा आयुक्त साहेब लोकप्रतिनिधी आणि महापौरांनी असा ठराव कधी केला आहे. आम्ही ब-याच वेळा हा प्रश्न विचारला आहे की, हा रोड का प्रलंबित आहे म्हणुन? मग आम्हीच लोकप्रतिनिधी इथे बसणार का?

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):- मोरे साहेबांना मी परत नम्रपणे सांगतो. ते महापौर साहेबांच्या अध्यक्षतेखाली सभागृहात नाही पण सर्व पक्षीय बैठक घेऊन रोडचे नियोजन ठरवले आहे. महापौर साहेब जर नाही म्हणतील तर मी माफी मागुन बाहेर जायला तयार आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मोरे साहेब, मी खुलासा करतो, जे ३३ रोड महासभेच्या अजेंडयावर ठेवले होते. तेव्हा प्रत्येक रोडचे डि.पी.त किती रूंदीकरण आहे हे लिहिले होते. त्यानंतर आता अस्तित्त्वात किती रोड आहेत हे होते त्यानंतर किती फुटचा रोड बनवायचा असे तीन कॉलम केले होते. त्यापैकी ३२ रोड ६० फुट डि.पीत असतील प्रत्यक्ष अस्तित्त्वात चाळीस फुट असेल तर तो ६० फुट बनवायचा असे ठरवले. परंतु हा रोड डि.पीत १०० फुट आहे. अस्तित्त्वात ५०-१०० फुट आहे. आता किती बनवायचा? आता ५० चा १०० फुट बनवायचा असा ठराव महासभेत पास झाला आहे. हे सर्व संमतीने ठरले आहे.

मा.महापौर :- महाडिक जे म्हणतात ते १०० टक्के खरे आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-मी मानतो ते बरोबर आहे. ते जे म्हणतात ते बरोबर आहे. पण ढाकरे साहेब असे काही सांगतात का? नाही सांगत.



मा.महापौर :-मी सांगितले, ढाकरे साहेबांनी सांगायची काय गरज आहे. आयुक्तांच्या आधी मीच खुलासा केला होता.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-आता महाडिकजी म्हणाले कुठे ८० फुट कुठे ५० फुट बनवयाचा आहे. पण त्यावर काही कार्यवाही झाली का? का नाही झाली? शहराचा रोड असाच ठेवायचा आहे.

मा.महापौर :- असे काही नाही तो रोड बनवायचा आहे. तेथे राहणा-या लोकांच्या पुर्नवसनाची व्यवस्था करून.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-आमच्या झोपडपट्टीत राहणा-या लोकांना अक्कल नाही. त्यांनी बिचा-यांनी पुर्णच्या पुर्ण घरे तोडुन दिली. हि कोणती पध्दत आहे.

मा.महापौर :-महापालिकेने त्यांच्यासाठी व्यवस्था केली आहे. त्यांचे पुर्नवसन केले आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-महापौर साहेब, प्रश्नोत्त्तराचा तास पुर्ण झाला आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-महापौर साहेब मी ते मानतो. ज्याप्रमाणे इतर रस्त्यांचे काम तोडफोड करून सुरू करण्यांत आले तसे याचे पण करण्यांत यावे.

काही सदस्य :- पाच मिनिटे बाकी आहेत.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-बोला ढाकरे साहेब बोला. माझ्या प्रश्नाचे उत्त्तर दया माझे समाधान नाही झाले. तुम्ही कसे खाली बसलात. चिजवानी साहेब पण खाली उतरून आले.

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-मोरे साहेब मला बसु देणार नाहीत.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-मला लिखित उत्त्तर दया.आज सदनाला लिखीत दया की रोड कधी सुरू करणार? कधी संपवणार? दुसरा टप्पा सुरू होणार आहे ते कधी होणार? हे महापालिकेत काय चालले आहे?

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-३३ रस्त्यांचे जे नियोजन झाले आहे त्यात हा एक रोड आहे. शहर अभियंतांना मी निर्देश देतो त्यांनी सांगावे कधी सुरू करणार आहेत. महासभेत काय ठरले आहे?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-ढाकरे साहेब, महापालिकेत जे गोलमाल चालले आहे. इथे लिहिले आहे ३३ रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. मग ३३ रोडमध्ये हा रस्ता नाही का?सांगा. इथे खोटे खोटे लिहितात शहर अभियंता. जे लोक प्रतिनिधी प्रश्न विचारतात त्यांना गोलमाल उत्त्तरे दिली जातात.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-कल्याण अंबरनाथ रोड आहे ना त्याच्यावर अजुन काही कार्यवाही केली नाही म्हणुन ठेकेदाराला डिपॉझिट परत केले गेले. आयुक्तांच्या आदेशानुसार धोरणात्त्मक निर्णय झाल्यावर निविदा पुन्हा मागविण्यात येऊन हे काम सुरू केले जाईल.



मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा.महापौर साहेब,आपण तर या रोडला या बजेटमधुन काढुन टाकले. या वर्षाचा जो बजेट आहे, त्यात कल्याण अंबरनाथ रोड आहे का?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-त्यात आहे. त्यातुन काढुन टाकलेले नाही. ते पेंडीग ठेवले आहे.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-बजेटमध्ये याचा समावेश नाही केला आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-आधीच तो समाविष्ट आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-कधी पासुन सुरू करणार?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-धोरणात्मक निर्णय झाल्यावर.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे- तो रोड केव्हा पासुन सुरू करणार?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-तुम्ही निर्णय घेतल्यावर त्वरीत निविदा मागवल्या जातील व काम सुरू केले जाईल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:- ए.व्ही. नारायण रोडचे काय?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-तिथे डिमॉलेशन केल्यावर रोड सुरू करण्यांत येईल. शांतीनगर पंचवटी स्टीलच्या बाजुला जो रस्ता जातो त्यास जाऊन तो मिळतो. मी लहानपणापासुन तिकडे ये जा केली आहे. ते जे म्हणाले मला रोड माहित नाही ते चुक आहे. मला रोड माहित आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-इथे लिहिले आहे ना उर्वरित ३३ रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. शहरातील ३३ रोड पैकी दोन -तीन रोडची कामे अजुन सुरू पण नाही केली. पण प्रगतीपथावर आहे असे लिहिले आहे. प्रगतीपथावर आहे म्हणजे काय ते सांगा.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ए.व्ही. नारायण रोड आहे तो शांतीनगर ते कमला अपार्टमेंट पवई पर्यंतचा तो भाग आहे. तो ३३ रोड पेक्षा वेगळा नाही. मेन रोडचा तो भाग आहे. मेन रोड चालु आहे आणि त्याचा भाग नाही चालु तरी असे समजले जाते की, तो रोड चालु आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे- तर हा मेन रोड कधी चालु होईल?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-त्याचे डेमोलेशन केल्यावर चालु केले जाईल. जसा हा जो रोड आहे. टर्निंग पॉइंट ते गोल मैदान पर्यंत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-महापौर व आयुक्तांना माझी विनंती आहे. जर या रोडचे काम लवकर सुरू नाही केले तर महापौर म्हणाले आयुक्त म्हणाले शहर अभियंता म्हणाले त्याप्रमाणे कार्यवाही नाही झाली तर आजचे जे प्रभारी आयुक्त आहेत आणि शहर अभियंता यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. जर कार्यवाही नाही केली तर आमचा ५ वर्षाचा कालावधी असाच निघुन जाईल आणि तो रोड बनणार नाही. मी आज महापौरांचे जे उत्तर ऐकले आहे. त्यातुन असेच कळते की, या टप्यात हा रोड होणार नाही. असे मला उत्तर मिळाले आहे.



श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-ए.व्ही.नारायण रोडचे डिमोलेशन काढल्यावर व धोरणात्मक निर्णय ठरल्यावर निविदा मागविल्या जातील व नंतर काम सुरू केले जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा.महापौर, यावर माझा उपप्रश्न आहे. शहाड ते महापालिकेपर्यंत जो रोड तयार केला आहे. सी ब्लॉक मध्ये खोदायला सुरूवात केली आहे. त्यासाठी परवानगी दिली आहे का? शहर अभियंतांना विचारा मी त्यांना तक्रार पण दिली आहे. त्यांचे काही उत्तर नाही यावर. मी चार-पाच दिवसापासुन तक्रार दिली आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-भुल्लर साहेबांनी ज्यावेळी मला सांगितले होते त्याच दिवशी मी कार्यकारी अभियंता यांना पहाणी करण्यासाठी पाठविले होते. ते चौकशी करून आले तिथे पाणी पुरवठा विभागाचे काम चालु आहे. बाकीची माहिती ते देतील.

काही.सदस्य :-तुम्ही शहर अभियंता आहात तुम्हाला काही माहित नाही का?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-असे नाही मला माहित आहे. पाणी पुरवठा विभागाचे काम तिथे चालु आहे. बाकीची माहिती कार्यकारी अभियंता देतील.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही काय कार्यवाही केली ते सांगा. त्यांना कशाला विचारता? परत दुस-यांदा रोड बनवणार का? तुम्ही म्हणता आर्थिक अडचण आहे तर कधी रोड बनणार?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- कार्यकारी अभियंता ज्युनियर इंजिनियर यांना सांगतील मग कशा त-हेने काम चालणार?

मा सदस्य श्री. राजेंद सिंग भुल्लर :-तुम्ही यांच्यावर हे त्यांच्यावर अशी जवाबदारी टाकुन झटकत आहात.

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-पाणी पुरवठा विभागाचे तेथे महत्त्वाचे काम होते.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- त्यांनी परवानगी घेतली का तुमच्याकडुन?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-पाणी पुरवठा विभाग महापालिकेचाच आहे ना? त्यांना आम्ही आधीच सुचित केले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर :-एक महिना आधी पाणी पुरवठा विभाग झोपला होता का?लाईन टाकण्यासाठी आम्ही आधीच सांगीतले होते ना?

मा.महापौर :-महाराजजी शहर अभियंतांना आम्ही निर्देश देतो की, तुम्ही दिलेल्या तक्रारीवर पुर्णपणे कार्यवाही केली जावी.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंग भुल्लर :-कार्यवाही ते करतच नाही, रोड खोदला गेला आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.



मा.महापौर :-शहर अभियंता यांना निर्देश देतो की त्यांनी कार्यवाही करावी.

मा.सचिव :-प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. विषय क्र. २ वाचुन दाखवतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- बजेटचे पण यात आहे ना?

मा.सचिव :-हो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-जो ठराव आपण करतो त्याची अंमलबजावणी होत नाही. जसे आपण इतिवृत्त पास करतो. जसे प्लास्टीक पिशवी विषयाचे महापौर म्हणाले होते की, १.३.२००१ पासुन नियम लागु केला जाईल. आज १ मे २००१ आले तरी आपण ठराव करतो इतिवृत कायम करतो त्यानंतर त्याचे काय होते.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- प्रशासनातर्फे त्यांची अंमलबजावणी होते की नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-आपण इथे मग का मंजुर करतो.

मा.महापौर:-आपले म्हणणे बरोबर आहे महाडिकजी. प्लास्टीक पिशव्यां विषयी आपण जो ठराव केला होता. त्यावर महानगरपालिकेच्या प्रशासनातर्फे काही कारवाई केली गेली नाही. आयुक्तांना आम्ही सांगतो.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौर, दुसरे पण ठराव आहेत. जसा ग्रीन कोलचा ठराव. रोड वर नादुरूस्त वाहने उभी आहेत त्यासाठी कमिटीची नियुक्ती करायच्या ठरावाला देखिल आपण मंजुरी दिली आहे. परंतु अजुन पर्यंत त्यावर काही अंमलबजावणी झाली नाही. या तीन चार प्रश्नांचे उत्तर दयायला सांगा आयुक्तांना.

मा.महापौर:-आयुक्त याची दखल घेतील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. महापौरजी, मागच्या फेब्रुवारीत बजेट पास केला गेला होता. सभा स्थगित होऊन होऊन मार्चच्या पहिल्या आठवडयात बजेट पास केले होते. त्यानंतर १ ते ५ पर्यंतच्या सर्व नगरसेवकांचे जेटपंप स्थायी समितीने पास केले होते. त्यासाठी तरतुद ठेवायला सांगीतली होती त्यावेळी पण त्यांनी तरतुद ठेवली नव्हती. आमचे आर.डी. शिंदे साहेब जेव्हा आयुक्त होते तेव्हा तरतुद नसताना देखिल त्यांनी १ ते ५ कॅम्पामधील नगरसेवकांची जितकी पण प्राकलने होती त्यास मंजुरी दिली. पाण्याची त्रुटी कमी



करण्यासाठी तर मेहरबानी करून जे जेटपंप पास केले गेले आहेत ते लावले गेले पाहिजे त्यासाठी तरतुद राखली गेली पाहिजे. नाहीतर आम्ही रिवाईज बजेटमध्ये करू ते अत्त्यावश्यक काम होते.

मा.महापौर :-कृपया याची नोंद घ्यावी.

मा.सचिव:- ठिक आहे.

मा.महापौर :-सदर इतिवृत सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मागील सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

( दिनांक २०. २. २००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे व दि. २०.२.२००१ सह २७.२.२००१ , १. ३.२००१ व ५.३.२००१ च्या विशेष महासभेचे आणि दि. १९.३.२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.)

मा.सचिव :-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा.महापौर :-पास ना.

काही सदस्य :-पास.

मा.महापौर :-सदर प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.



मा.सचिव :-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-प्रभाग समिती समिति नियमाची जी प्रस्तावना दिली गेली आहे त्याचे सुचक आहेत श्री. किशोर वनवारी व अनुमोदक आहे श्रीमती. जया साधवानी. त्यांनी या प्रस्तावामध्ये जे नियम दिले आहेत. काय झाले?

मा.महापौर:-प्रभाग समिती स्थापन करण्याचे आपण मान्य केले ना?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-हो नियमांमध्ये आम्हाला हरकत आहे.

मा.सचिव:-प्रभाग समिती तुम्ही मंजुर केली ती आताच्या गोषवा-यानुसार ना?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-विषय ४ वर आमची हरकत आहे.

मा.सचिव:-मला फक्त स्पष्टीकरण हवे आहे की, ३ नंबर विषय पास केला ना?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-त्याचा गोषवारा वेगळा होता प्रभाग रचनेसाठी तो होता. आम्हाला नियमावर बोलायचे आहे. ते मंजुर आहे. परंतु विषय क्र. ४ वर आमची हरकत आहे. प्रभाग समिती कामकाज विषयक नियमावली उपलब्ध नसल्याने त्याविषयी कर्तव्य पार पाडणेस अडचण निर्माण होईल म्हणुन शेजारच्या महानगरपालिकेने आपल्या ठरावाव्दारे विनियम ठरवुन शासन अधिकृत नियमावली होईपर्यंत आपल्या ठरावाव्दारे विनिमय ठरवुन त्याप्रमाणे प्रभाग समितीचे कामकाज सुरू केले आहे. परंतु २९ अ मध्ये प्रभाग समिती कामकाज विषयक नियम दिले आहेत. त्यात लिहिले आहे की, प्रभाग समितीची मुदत महानगरपालिकेच्या मुदती बरोबरच समाप्त होइल. यात आपण लिहिले आहे पहिल्या सभेत प्रभाग समिती आपल्या कमीत कमी निम्म्या किंवा बहुसंख्य सदस्यांच्या विशिष्ठ ठरावाव्दारे सभापतीची नेमणुक करेल. येथे २९(अ)६ मध्ये लिहिले आहे निवडणुक होईल असे लिहिले आहे. आपण ठरावाव्दारे सभापती निवडला जाईल असे लिहिले आहे ते चुकीचे आहे. ,
मा.महापौर-आम्ही जो प्रस्ताव ठेवला आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-नाही. नाही. येथे लिहिले आहे कलम २९ अ पोटकलम २ चे उपखंड अ मध्ये निवडुन आलेले पालिका सदस्य प्रभाग समितीच्या प्रत्येक सरकारी वर्षाच्या पहिल्या सभेमध्ये त्यांच्या स्वतःमधुन सभापती निवडुन देतील असे लिहिले आहे. आणि येथे लिहिले आहे की ठरावाव्दारे त्यांची नेमणुक केली जाईल. ठरावाव्दारे नाही, सभापती साठी निवडणुक घेतली जाईल.

मा.महापौर :-निवडणुक समितीचे सदस्य करतील ना?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- इथे लिहिले आहे पहिल्या सभेत प्रभाग समिती आपल्या कमीत कमी निम्म्या किंवा बहुसंख्य सदस्यांच्या विशिष्ठ ठरावाव्दारे सभापतीची नेमणुक करेल. ठरावाव्दारे नाही होणार निवडणुकीव्दारे होईल. वोटींग घेतली जाईल. आपण ठरावाव्दारे घेतले आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-बरोबर आहे ना?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-ठरावाव्दारे नाही होणार, वोटींगनी होईल.

गुप्त मतदान पध्दतीने ते दिले जाईल ते लिहिले नाही.

--२७--

मा.महापौर :-सचिव याबाबतीत स्पष्टीकरण देतील.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- महापौर साहेब, यांचा म्हणण्याचा अर्थ असा आहे की, गुप्त मतदान पध्दतीने सभापती निवडला गेला पाहिजे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-बरोबर आहे. पण हे म्हणतात ठरावाव्दारे सभापती निवडले जातील.

मा.सचिवः-हा जो प्रस्ताव आहे यात लिहिले आहे की, विशिष्ठ ठरावाव्दारे सभापतीची नेमणुक केली जाईल असे लिहिले गेले आहेआपण कलम २९ (अ)वाचत आहात. आपण म्हणत आहात त्यात असे लिहिले आहे की, निवडणुकी व्दारे सभापती निवडला जाईल. मी सांगतो तुम्हाला. निवडणुक दोन त-हेने होते. एक तर ठरावाव्दारे व दुसरे गुप्त मतदान पध्दतीने. हा जो प्रस्ताव आला आहे तो मा. नगरसेवक श्री. किशोर वनवारी यांच्याकडुन आला आहे. आपणांस जर त्यात बदल सुचवायचा आहे तर आपण तो सुचवा. तुम्हाला गुप्त मतदान पध्दतीने पाहिजे आहे तसे तुम्ही सांगा त्याप्रमाणे ठराव करा. आपण त्यात सुधारणा करू इच्छिता त्याप्रमाणे प्रस्ताव दया.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-गुप्त मतदान पध्दतीने झाले पाहिजे.

मा.सचिव :-तुम्ही तसा सुझाव दया.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौर :- महाडिकजी तुम्ही जे सुचवत आहात त्यसाठी सदनासमोर सुधारणा प्रस्ताव मांडावा लागेल व तो पारीत झाला पाहीजे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- सभागृह नेत्त्याने जो प्रस्ताव मांडला आहे त्यात ते चुकीचे लिहितात की शेजारच्या महापालिकेने. तर शेजारच्या महापालिकेत गुप्त मतदान पध्दत चालते तर त्यांनी हे नाही म्हंटले पाहिजे.

मा.महापौरः-माझ्यामते नवी मुंबई येथे ठरावाव्दारे केले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- माझ्या मते सर्व ठिकाणी गुप्त मतदान पध्दतीने केले आहे. महाराष्ट्रात जितक्या पण महानगरपालिका आहेत त्यात गुप्त मतदान पध्दतीने केले जाते. हे जे नियम आहेत ते नेहमीसाठी राहतील. प्रभाग समिती एका वर्षानंतर संपतील पण नियम कायम राहतील. त्यामुळे चुकीचे नाही झाले पाहिजे.

मा.महापौरः-खुले मतदान पध्दत चांगली आहे ना?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- नाही नाही. गुप्त मतदान पध्दत पाहिजे. नियमानुसार कामकाज चालले पाहिजे.

मा.महापौर :-ओपन वोट इज स्टील बेटर.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-नियमानुसार चालले पाहिजे नाहितर आमची हरकत आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-मतदान घ्या.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-नियमानुसार घ्या. गुप्त मतदान घ्या.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- नाही तर हा ठराव चुकीचाच आहे. या ठरावात सभागृह नेताच असे लिहितात की...

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी नाही लिहिले टाईप केले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-तेच जे टाईप केले आहे. वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.सचिवजी हे चुकीचे लिहिले आहे. कारण कलम ४५४ नुसार जर तुम्ही लिहिता तर ४५४ मध्ये हे लिहिले आहे की, कलम ४५४ अन्वये करण्यांत आलेले सर्व नियम

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-राजपत्रात आल्याशिवाय ठराव होऊ शकत नाही. मा.महापौरजी यात प्रस्तावनेत लिहिले आहे. महापालिकेने मागील वर्षातील दोन महासभेमध्ये मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९चे कलम ४५४ व ४५५ अन्वये प्रभाग समित्त्या कामकाजा विषयक कलम ४५४ हे म्हणते की, कलम ४५४ अन्वये करण्यांत आलेले सर्व नियम अंतिम रित्त्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यांत आले पाहिजे. आणि त्यानंतर जणु ते अधिनियमात अधिनियम करण्यांत आले आहे असे समजुन अमलात येतील. जर ४५४ नुसार शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यावर अंमलात येणार असेल हा जो नियम आपण बनविणार आहोत. व येथे जे ठरावात लिहिले आहे की, वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल. व ४५४ नुसार शासकीय राजपत्रात प्रकाशित होण्यापुर्वी ते लागुच होत नाही तर हा ठरावच चुकीचा आहे. सांगा.

मा.सचिवः- हा जो कलम ४५४ वाचत आहात तो नियमावली बनविण्यासाठी लागु आहे. मी आपणांस सांगतो. जर तुम्ही नियमावली बनविण्यास जाल तर त्यासाठी खुप मोठी प्रोसिजर आहे. पहिले असे की, महासभेत एक ठराव करायचा आहे त्यानंतर प्रारूप नियम प्रसिध्द करायचे आहे. त्यानंतर हरकती आणि सुचना येतील. त्यानंतर परत महासभेत येईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९चे कलम ४५४ व ४५५ अन्वये प्रभाग समित्त्या कामकाजा विषयक प्रारूप नियमावलीचा विषय नियमित सर्वसाधारण महासभेच्या कार्यसुचीवर आणला होता. जर त्यानुसार तुम्ही आणला तर...

मा.सचिवः- माझे म्हणणे आधी ऐका. हरकती आणि सुचना ऐकल्या नंतर अंतिम नियमावली महासभेत मंजुरीसाठी आणली जाते. त्यानंतर शासनाकडे मंजुरीसाठी पाठवली जाते. हि एक पध्दत आहे नियमावली तयार करण्याची. मागच्या वेळेस जेव्हा आम्ही प्रभाग समितीसाठी प्रारूप नियमावली आणली होती. तर काही कारणामुळे दोन्ही वेळा पुढे ढकलण्यांत आली. जर नियमावली असे समजुन चाललो तर हा ठराव लागु होणार नाही. हे विनिमय आहे. रेग्युलेशन.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-ही नियमावली आहे.

मा.सचिवः-नाही मी सांगतो ना? ऐका ना? आपण वाचा ते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- दुस-या पॅरेग्राफमध्ये लिहिले आहे. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९चे कलम ४५४ व ४५५ अन्वये प्रभाग समित्त्या कामकाजा विषयक प्रारूप नियमावलीचा विषय नियमित सर्वसाधारण महासभेच्या कार्यसुचीवर आणला होता.

मा.सचिव :-ते मागे दोन वेळा आणले होते. त्यावेळी नियमावली आणली होती हे बरोबर आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मग हि नियमावली कोणत्त्या नियमानुसार आपण बनवत आहात.

मा.सचिवः-मी तुम्हाला सांगतो तुम्ही नंतर प्रश्न विचारले तर बरे होईल. पहिल्यांदा नियमावली दोनदा आम्ही सभेत आणली होती. प्रारूप नियम तयार करण्यासाठी आणली होती. ते कलम ४५४ अन्वये आम्ही आणले होते परंतु

दोनदा तो विषय वगळण्यांत आला. व शासन पण कॉमन नियमावली सर्व महापालिकांसाठी बनविण्यास इच्छित आहे. म्हणुनच हा ठराव नियमावली नाही आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>का नाही तुम्ही इथे लिहिले आहे.

<u>मा.सचिवः-</u>कृपया आधी आपण माझे म्हणणे ऐकावे त्यानंतर जर काही शंका प्रश्न असतील तर विचारावे. ठाणे महापालिकेने प्रारूप नियमावली बनविली आहे. परंतु अंतिम नियमावली बनवू नाही शकले कारण शासनाने मान्यता दिली नाही. म्हणुन त्यांनी ठराव केला, प्रारूप नियमावलीच्या आधारे प्रभाग समित्त्यांचे कामकाज चालु होईल. कल्याणमध्ये ठराव केला आहे. की स्थायी समितीत जी नियमावली आहे. तिच नियमावली प्रभाग समितीसाठी लागु केली. आता तुमच्या पुढे जो ठराव आहे असा ठराव नवी मुंबईत आहे. कशात-हेने कामकाज चालवावे त्यासाठी विनिमय बनविले. विनिमय, उपविधी आणि नियमावली यात फरक आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>असे कसे म्हणुन चालेल. मग कोर्टात जावे लागेल तिथे डिफर करतील.मला हे सांगा १९४९च्या कोणत्त्या नियमान्वये हे नियम तयार केले आहेत.

<u>मा.सचिवः-</u> कलम ४६५ अन्वये.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>तिथे कुठे लिहिले? सांगा आपण. स्थायी समिती करता लिहिले आहे.

<u>मा.सचिव</u> :-फाइनल जे करायचे आहे ते महासभेला करायचे आहे.मी सांगतो तुम्हाला. मी हि पण तुम्हाला माहिती देतो की, कलम ४६५मध्ये याविषयाकरिता विनिमय बनविण्याची तरतुद नाही आहे. हे बरोबर आहे. परंतु विनिमय कशा त-हेने कार्यवाही झाली पाहिजे. ४६५ची पध्दत आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- हे</u> तुम्ही चुकीचे करत आहात. विनिमय आणि प्रारूप नियमावली यात चुकीचे करत आहात. प्रभाग समितीसाठी प्रारूप



नियमावली तयार करत आहात. ४५४नुसार तर शासकीय राजपत्रात ते प्रसिध्द झाले पाहिजे.

<u>मा.सचिव :-</u> नियमावली साठी जे तुम्ही म्हणत आहात ते १०० टक्के बरोबर आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>प्रभाग समितीसाठी नियमावली आवश्यक आहे. दोन महासभेमध्ये तुम्ही ४५४ नुसारच ठराव आणला होता.

<u>मा.सचिवः-</u> हे पण बरोबर आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>मग या महासभेत तुम्ही असे कसे वेगळे आणले. प्रभाग समित्त्या काय वेगळया आहेत का?

इथे किशोर वनवारी काही बोलत असताना....

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>असे चालणार नाही. घरचे काम आहे का? सभागृहाला सर्व सरळ वाटते. सभागृह नेत्त्यांना जरा परिपक्वता दाखवायला सांगा. तुम्ही पिठासन अधिकारी आहात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-तुम्ही ऐकले मी काय म्हणालो ते?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-सभागृहात जरा परिपक्वता दाखवा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी काय म्हणालो ते ऐका. मी म्हणालो की यांचे संपु दया. मग बोलतो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-याचे पण टाऊन हॉल होईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-महाडिकजी माझे ऐका तुम्ही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-टाऊन हॉल सारखे हे पण रदद होईल. तुम्हाला हे माहित नाही. पाचवा वेतन आयोग कधी लागु झाला.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी-मी हे म्हणालो की, महाडिकजींचे पुर्ण होऊ दया मग सचिवजी तुम्ही उत्तर दया म्हणजे सर्वांना समजेल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-हे पहा हे नियम नेहमीसाठी राहणार आहेत. पुढील पाच-दहा वर्षासाठी हे नियम लागु होणार आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-तुम्ही आणि सचिव एकत्र बोलत होता म्हणुन मी बोललो. आम्हाला पण समजुन घ्यायचे आहे. आपण नीट ऐकले नाही. आपणांस जेवढे बोलायचे बोला मग सचिवजी उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- तुम्ही चुकीचे बोलता.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी-मी चुकीचे नव्हतो बोललो. तुम्ही चुकीचे उत्तर देता.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-हे नियमानुसार झाले पाहिजे कारण कायमस्वरूपी नियम राहणार आहेत. नाही केले तर शासनाकडे जाऊ ठराव



रदद करू. जे नियम तयार होतील ते नेहमीसाठी राहतील आपल्या सारख्या महापौरांकडुन आम्ही नियमानुसार अपेक्षा करतो. येणा-या सदस्यांना त्रास व्हायला नको. तुमच्या कालावधीत जे नियम तयार होतील ते कायदयान्वये आणि बरोबर झाले असे पुढच्या येणा-या सदस्यांनी नाव घेतले पाहिजे. मा. महापौर हरदास मखिजा यांच्या कालावधीत चुकीचे नियम बनले असे म्हटले जाईल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी-महापौर साहेब, न्याय मिळविण्यासाठी नेहमी आम्हाला उच्च न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते. नियमानुसार आपण चाला आपले नाव होईल.

मा.महापौर:- मॅडम मला बोलु दया.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-महापौर आमचे निवेदन आहे की, खुली मतदान पध्दत असली पाहिजे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. महापौर :-येणा-या कालावधीत ज्यांना सभापती म्हणुन निवडले जातील त्यांना पुढे जाऊन त्रास होऊ नये म्हणुन खुली मतदान पध्दत ही योग्य आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-हे नियम कायम स्वरूपी राहतील.

मा.सदस्या श्रीमती. पचशिला पवारः-मा.महापौर....

मा.महापौर :-सदर प्रस्ताव मी मतदानासाठी सदनासमोर ठेवत आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-हे चुकीचे आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तुम्हाला बहुमत यासाठी दिले आहे का की तुम्ही कायदयाचे उल्लंघन करा.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा. महापौरजी, याविषयावर आधी पण जेव्हा ठराव आणला होता. दोनदा महासभेत नियमावली आणली होती. त्यावेळी तुम्ही हे म्हणुन डिफर केले की, सर्व पक्षांचे गटनेते एकत्र बसुन आम्ही ही नियमावली बनवु त्यानंतर कार्यसुचीवर आणु हे आपले शब्द होते. व त्यानंतर तुम्ही तो विषय वगळला होता. तुम्ही सर्व पक्षीय नेत्त्यांबरोबर बैठक घ्या. नियमावली तयार करा. कार्यसुचीवर आणा. तो पर्यंत तुम्ही विषय वगळा. माझी तुम्हाला विनंती आहे की मागच्यावेळेस तुम्ही डिफर करताना असे म्हणाला होता की, नियमावलीत काही चुका आहेत. सर्व पक्षीय बसुन ही नियमावली तयार करू.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- तुम्ही तुमच्या वचनापासुन माघार घेत आहात. सर्वांना बसवुन तुम्ही नियमावली बनवा. आमची काही हरकत नाही.



मा.महापौर :- ज्यांनी हि नियमावली बनवली त्यांना हे सांगीतले होते की, कायदयानुसार बनवुन सदनासमोर ठेवा व त्यानुसार त्यांनी तयार करून ठेवली आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-सचिवांनी नियमावली बनवली का? तुम्ही हो म्हणता ते नाही म्हणतात.

मा.महापौरः-ज्यांनी ठराव केला त्यांच्याविषयी मी बोलत आहे. सुचक आणि अनुमोदक यांच्याविषयी मी बोलत आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-हे सर्व चुकीचे चालले आहे.

मा.महापौर :- हा ठराव मी सदनासमोर मांडत आहे. जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासी :-महापौरजी, तुम्ही हे चुकीचे करत आहात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मतदानाच्या जोरावर सरकार चालत नाही. आम्ही कोर्टात जाऊ.

मा.सदस्य श्री.बी.बी. मोरे :- ही नियमावली बरोबर नाही.

मा.महापौरः- या प्रस्तावाच्या बाजुने जे आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौर साहेब, आम्ही तुम्हाला प्रतिवादी बनवु. तुम्हाला उत्तर दयावे लागेल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-आमच्या आर.पी.आय. पक्षाचा पण विरोध आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-विरोध आहे ना तुमचा आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ.

काही विपक्ष सदस्य :-आर.पी.आयच्या चारही सदस्यांना सभापती करायचे.

इतक्यात श्री. लाल पंजाबी सभागृहात आले.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-विरोध आहे ना तुमचा? तुम्हाला चारही पदे दिली. शिव शक्ती, भिम शक्ती युतीचा विजय असो.

शिव शक्ती, भिम शक्ती युतीचा विजय असो असे विपक्ष सदस्य घोषणा देत होते.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौरजी, कोणत्त्या बेकायदेशिर कामासाठी मतदान घेत आहात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-घ्या मतदान घ्या.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आम्ही पुन्हा कोर्टात जाऊ. घ्या वोटींग.
मा.महापौर :-आधी मतदान घेऊ दया. मग बोला.

मा.सचिव- सदनात प्रस्तुत केलेल्या जसा आहे तसा प्रस्तावाच्या बाजुने जे आहेत त्यांनी आपले हात वर करावे.

प्रस्तावाच्या बाजुने मतः-

१. श्रीमती. ज्योती कालानी
२. श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई
३. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
४. श्री. पमनानी ईश्वर
५. श्री. तलरेजा विनोद
६. श्री. रोहडा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्रीमती. कुंदनानी लविना
९. श्री. रामरख्यानी मोहनदास
१० श्री. बनवारी किशोर
११ श्री. सेवलदास ठाकुर
१२ श्रीमती. वसिटा बेबी
१३ श्री. बेहरानी ठाकुर

१४ श्रीमती. साधवानी जया
१५ श्री. वाघे शामु
१६ श्रीमती. गजवानी कांता
१७ श्री. केणी जयकुमार
१८ श्री. माखिजा हरदास
१९ श्री.बेहरानी गोप
२० श्री. सोनावणे राजु
२१ श्री. पुरस्वानी जमनु
२२ श्री. पंजाबी नारायण
२३ श्री. आयलानी कुमार

मा.सचिव- जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावे.

प्रस्तावाच्या विरोधात मतः-
१. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
२. श्रीमती. वेलकर सुरेखा
३. श्री. भांडे भगवान
४. श्री. तेजी कैलास
५. श्री. बोडारे धनंजय
६. श्री.चौधरी राजेंद्र
७. श्री. लांडे पांडुरंग
८. श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई
९. श्रीमती. राजवानी सुनिता
१०. श्री. भिमसेन मोरे
११. श्री. चव्हाण रमेश
१२. श्री. महाडिक प्रकाश
१३. श्रीमती. मोकल सिमा
१४ श्री. माखिजा प्रकाश
१५. श्री. जग्यासी राजु
१६. श्री. यादव नरेश



१७ श्रीमती. पवार पंचशिला
१८ श्रीमती. बगाडे सुनिता
१९ श्री. आढाव रामभाऊ
२० श्री. मोरे भानजी
२१ श्रीमती. करोतिया मालती

तटस्थ :-श्री.ढेणवाल बनवारी.

मा.महापौर :-हा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

विषय :- प्रभाग समित्त्यांचे कामकाज विषयक विनियम
प्रस्तावास मान्यता देणे बाबत.

प्रस्तावनाः-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २९अ अन्वये व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशान्वये उल्हासनगर शहरात ४ प्रभाग समित्त्या त्वरीत स्थापन करणे आवश्यक आहे. तसेच माहे डिसेंबरच्या महासभेत चर्चेअंती झालेल्या मतानुसार सरकारी वर्ष २००१-२००२

मध्ये मा. महापौरांच्या निवेदनावर प्रभाग समितीची रचना करणेचे मत झाले होते.

महापालिकेने मागील वर्षातील दोन महासभेमध्ये मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९चे कलम ४५४ व ४५५ अन्वये प्रभाग समित्त्या कामकाजा विषयक प्रारूप नियमावलीचा विषय नियमित सर्वसाधारण महासभेच्या कार्यसुचीवर आणला होता परंतु दोन्ही वेळेस काही कारणास्तव हा विषय पुढे ढकलण्यांत आला.

तसेच महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या अधिकारात मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९चे कलम ४५६ व ४५६ अ अन्वये प्रभाग समिती कामकाज विषयक नियम तयार केले नाहीत पण शासनाने मुंबई उच्च न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञा पत्रानुसार राज्यातील प्रत्त्येक शहरात प्रभाग समिती त्वरीत रचनेचे कबुल केले असुन त्यानुसार प्रत्त्येक महापालिकेकडे वेळोवेळी प्रभाग समिती रचनेचा आग्रह शासनातर्फे करण्यांत येत आहे.

प्रभाग समिती कामकाज विषयक नियमावली उपलब्ध नसल्याने त्याविषयी कर्तव्य पार पाडणेस अडचण निर्माण होईल म्हणुन शेजारच्या महानगरपालिकेने आपल्या ठरावाव्दारे विनियम ठरवुन शासन अधिकृत नियमावली होईपर्यंत आपल्या ठरावाव्दारे विनिमय ठरवुन त्याप्रमाणे प्रभाग समितीचे कामकाज सुरू केले आहे. त्याचप्रमाणे या महानगरपालिकेत प्रभाग समितीची रचना करून पुढील विनिमयाच्या अधिन राहुन कामकाज करणेस पुढीलप्रमाणे प्रस्तावित आहेत.

१. अ)प्रत्त्येक महिन्यात प्रभाग समितीची निदान एकतरी सर्वसाधारण सभा भरवण्यात आली पाहिजे. आणि ती त्या महिन्याच्या २० तारखेच्या आत भरवण्यात आली पाहिजे.
ब) प्रभाग समिती स्थापन झाल्यानंतर प्रभाग समितीची पहिली सभा सोयीस्कर होईल तितक्या लवकर महापौर ठरविल अशा दिवशी, अशावेळी व अशाठिकाणी भरवण्यात आली पाहिजे. आणि ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर ती महापौर ठरविल अशा नंतरच्या एखादया दिवशी भरवण्यात आली पाहिजे.



२. महापौर ठरवतील अशा दिवशी व अशा वेळी व अशा जागी नगरपालिका प्रभाग अधिकारीकडुन प्रत्त्येक सरकारी वर्षात किंवा अध्यक्षाच्या अधिकार पदाचा अवधी समाप्त होण्यापुर्वी ते रिकामे होईल. नविन अध्यक्ष निवडण्यासाठी प्रभाग समितीची पहिली सभा बोलवण्यात येईल. आणि त्यादिवशी सभा नाही झाली तर महापौर ठरवु शकतील अशा कोणत्त्याही नंतरच्या दिवशी सभा घेण्यांत येईल. नंतरच्या सर्व सभा प्रभाग समितीचा सभापती ठरवेल अशा वेळी व अशा जागी भरवण्यांत येतील. पहिल्या सभेत प्रभाग समिती आपल्या कमीत कमी निम्म्या किंवा बहुसंख्य सदस्यांच्या विशिष्ठ ठरावाव्दारे सभापतीची नेमणुक करेल. समसमान मत पडतील तेव्हा महापौरांना निर्णायक मत असेल.

३. अन्य प्रत्त्येक बाबतीत सभेचा दिवस वेळ व ठिकाण सभापतींनी ठरविले पाहिजे.

४. प्रभाग समिती सभापतीची नेमणुक करीस्तोपर्यंत प्रत्त्येक प्रभाग समितीच्या पहिल्या सभेत महापौर अध्यक्ष म्हणुन काम करील आणि त्यानंतर अशा रितीने नेमण्यात आलेल्या सभापती अध्यक्ष पद ग्रहण करील.

५. प्रभाग समितीच्या सभापती, त्यास योग्य वाटेल तेव्हा प्रभाग समितीची विशेष सभा बोलावीता येईल आणि त्याने महापौर किंवा प्रभाग अधिकारी किंवा प्रभाग समितीच्या सात पेक्षा अधिक नसतील इतके सदस्य यांनी लेखी विनंती केल्यास आणि सभापतीकडे अशी विनंती सादर करण्यांत आल्या पासुन चार दिवसापेक्षा उशीराची नसेल अशा तारखेस, अशी विशेष सभा बोलाविली पाहिजे.

६. प्रभाग समितीने एकदा निकालात काढलेली कोणतीही बाब सभेत हजर असणा-या निदान निम्या सदस्यांनी म्हणजेच नऊ पेक्षा कमी नसतील इतक्या मतांनी त्या बाबीचा पुर्नविचार करण्याबददलच्या प्रस्तावाचे बाजुने मत दिले असेल त्याशिवाय, तीन महीने मुदतीच्या आत, पुन्हा उपस्थित करता कामा नये.

परंतु वस्तुस्थिती वा कायदेशिर परिस्थिती याबददल चुकीची कल्पना करून, कोणत्त्याही बाबीवर कोणताही निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत, ती बाब पुन्हा उपस्थित करता येईल व उपस्थित आणि मतदान करणा-या सदस्यांच्या बहुमताने, कोणत्त्याही वेळी, घेतलेला निर्णय रदद करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल. प्रभाग समितीच्या सभेत कोणत्त्याही वेळी, सभापती धरून उपस्थित सदस्यांची संख्या, ६ पेक्षा कमी असल्याचे सभापतींच्या निदर्शनास आणण्यात येईल तर सभापती इतर कोणत्त्याही दिवसापर्यंत सभा स्थगित करील व त्यास सोयीस्कर अशी वेळ अशा सभेसाठी ठरविता येईल. आणि अशा सभेतील अनिर्णीत कामकाज, अशा स्थगित करण्यांत आलेल्या सभेत किंवा अशी स्थगित सभा पुन्हा स्थगित करण्यांत आल्यास, नंतरच्या स्थगित सभेत, मग त्यासभेत सभापती धरून उपस्थित अशा सहा सदस्यांनी गणपुर्ती झालेली असो किंवा नसो निकालात काढण्यांत येईल.

७. प्रभाग समिती पुढील प्रत्त्येक प्रश्नाचा निर्णय, उपस्थित असणा-या व त्या प्रश्नावर मतदान करणा-या, प्रभाग समितीच्या सदस्यांच्या बहुमताने करण्यांत येईल. समसमान मते पडतील तेव्हा, सभापतीस दुसरे किंवा निर्णायक मत असेल.



८. प्रभाग समितीच्या प्रत्त्येक सभेत उपस्थित असणा-या सदस्यांची नावे व अशा सभेतील कामकाज यांचे टिपण त्या प्रयोजनासाठी तरतुद करण्यांत आलेल्या पुस्तकात महानगरपालिका प्रभाग अधिकारी व सर्व प्रभाग समित्त्यांसाठी एकाच लघुलेखकाच्या साहाय्याने ठेवण्यांत येईल व व्यवहार्य असेल तेथवर, आगामी सभेतील पिठासिन अधिकारी त्यासभेत त्यावर सही करेल. उक्त समितीचा सदस्य म्हणुन एखादया व्यक्तीस प्रभाग समितीच्या सभेत हजर राहण्याचा व तीमधील चर्चेत भाग घेण्याचा जो अधिकार असेल तो अधिकार, प्रभाग अधिकारी किंवा त्यांनी यथोचित रित्त्या प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी यास असेल.परंतु त्यास मतदान करण्याची किंवा अशा सभेत कोणताही प्रस्ताव सादर करण्याची मोकळीक असणार नाही.

९. प्रभाग समितीचा सदस्य ज्या कोणत्त्याही प्रकरणामध्ये त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा, अधिनियमाच्या कलम १० पोटकलम (२) मध्ये वर्णिल्याप्रमाणे प्रत्त्यक्ष वा अप्रत्त्यक्षपणे, कोणताही हिस्सा वा हितसंबंध असेल

अशा कोणत्त्याही प्रकरणासंबंधात उक्त समिती पुढील चर्चेत, मतदान करणार नाही. किंवा तीमध्ये भाग घेणार नाही.

१०. सभेचे अध्यक्ष स्थान सभा भरवण्यासाठी नेमलेल्या वेळी सभापती उपस्थित असेल तर त्याने स्विकारले पाहिजे. आणि सभापती पद रिकामे असेल किंवा सभापती अनुपस्थितीत असेल तर सभेकडुन त्याप्रसंगी अध्यक्ष म्हणुन निवडण्यात येईल अशा उपस्थित असलेल्या समिती सदस्यापैकी एका पालिका सदस्याने अध्यक्ष स्थान स्विकारले पाहिजे.

११. तहकुब सभे व्यतिरिक्त अन्य प्रत्येक सभेची सर्वसाधारण पणे निदान तीन पुर्ण दिवसाची नोटीस दिली पाहिजे. व तहकुब सभेच्या बाबतीत तहकुबीचा कालावधी लक्षात घेऊन व्यवहार्य असेल अशी आगाऊ नोटीस देण्यात आली पाहीजे.

१२. पिठासन अधिका-यांनी, सभेच्या कार्यसुचीवरील कामकाज चालवण्यासाठी म्हणुन आसन ग्रहण केल्यानंतर कोणत्त्याही वेळी पालिका सदस्यास काही कारणावरून, त्याच दिवशी नंतरच्या वेळे पर्यंत किंवा इतर कोणत्त्याही दिवसापर्यंत सभा तहकुब करण्याबददल प्रस्ताव मांडता येईल. व बहुसंख्य पालिका सदस्य त्या प्रस्तावाच्या बाजुने मत देतील तर त्याचादिवशी नंतरच्या वेळेपर्यंत किंवा इतर कोणत्त्याही दिवसापर्यंत सभा तहकुब ठेवण्यात येईल.

महासभा ठराव क्र. ४ दिनांकः- २१.४.२००१

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. जया साधवानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार शासन अधिकृत नियमावली येईपर्यंत या ठरावाव्दारे प्रभाग समितीच्या कामकाज विषयक विनियम प्रस्तावनेस मान्यता देत आहे.



वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिवः- कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.३०वाजता सभा संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखिजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१९/५/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/५/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १९.५.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.
मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. वाघे शामु.
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. ज्योती कालानी
७. श्री. ढेणवाल बनवारी
८. श्रीमती. वेलकर सुरेखा
९. श्री. यादव नरेश
१० श्रीमती. दासानी मिनु
११ श्रीमती. पवार पंचशिला
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. आढाव रामभाऊ
१४श्रीमती. बगाडे सुनिता
१५ श्री. भांडे भगवान
१६ श्री. ठाकुर सेवलदास
१७ श्री. वनवारी किशोर
१८ श्री. तेजी कैलाश
१९ श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई
२० श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१ श्री. पमनानी ईश्वर
३१ श्री. पुरस्वानी जमनादास
३२ श्री. पारवानी रामचंद
३३ श्री. तलरेजा विनोद
३४ श्री. रोहडा श्यामसुंदर
३५ श्रीमती. करोतिया मालती
३६ श्री. बहरानी ठाकुरदास
३७ श्री. भिमसेन मोरे
३८ श्री. महाडिक प्रकाश
३९ श्रीमती. साधवानी जया
४० श्रीमती. वनवारी मोना
४१. श्री. राजानी नरेंद
४२ श्री. मनसुलकर सुभाष
४३ श्रीमती. नाईक यशस्विनी
४४ श्रीमती. राजानी भारती
४५ श्रीमती. कुंदनानी लविना
४६. श्रीमती. वलेचा पदमा
४७ श्रीमती. गजवानी कांता
४८ श्रीमती. भठिजा इंदिरा
४९ श्री. केणी जयकुमार

२२ श्रीमती.बेबी वसीटा
२३ श्रीमती. मटाई जोनिता
२४ श्री. चौधरी राजेंद्र
२५ श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२६ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२७ श्री मोरे भानजी
२८ श्रीमती.राजवानी सुनिता
२९ श्री.वार्रिंगे पंढरीनाथ
३०. श्रीमती. पन्ना वार्रिंगे

५० श्री. पंजाबी नारायण
५१. श्री. आयलानी कुमार
५२ श्री. अचनानी पम्मीकुमार
५३ श्रीमती. राधवानी आशा
५४ श्री. माखीजा प्रकाश
५५. श्री.रामरख्यानी मोहनदास
५६ श्री. जग्यासी राजु
५७ श्री. बहरानी गोप
५८ श्री.पंजाबी लाल
५९ श्री. केसवानी किशोर

तर

१ श्री. चौधरी गणेश, २ श्रीमती. मोकल सिमा, ३. श्री.उमाप रामदास, ४ श्री. सोनावणे राजु, ५श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ६. श्री.लांडे पांडुरंग,७.श्रीमती. टेकचंदानी चंदा, ८ श्री. वाधवा गिरधारी, ९ श्री. गुप्ता प्रभुनाथ, १०. श्री. जाधव सुरेश, ११. श्री.चव्हाण रमेश,१२. श्री. भाटीया जयप्रकाश, १३ श्रीमती. जेस्वानी आशा, १४. श्री. किशनानी गोदुमल, १५. श्री. सचदेव गिरधारी, हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

--२--

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.५० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सदस्य श्री. सेवल ठाकुर</u> :- मा. महापौरजी ज्याप्रकारे आपल्या शहरातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्त्यंत बिघडत चालली आहे. दोन दिवसापुर्वी उल्हासनगर २ येथे एका व्यापा-याची हत्त्या झाली. ही खुपच दुःखाची गोष्ट आहे. कायदा आणि सुव्यवस्था या गोष्टीकडे पोलिसांचे लक्ष वेधले गेले पाहिजे, महासभेचे लक्ष वेधले गेले पाहिजे. मा. मुख्यमंत्री महोदयांकडे एक शिष्टमंडळ घेऊन आपण सर्वांनी गेले पाहिजे. हे खुप जरूरीचे आहे. या अगोदर देखिल श्री. सुभाष मनसुलकर यांच्यावर सुध्दा प्राणघातक हल्ला झाला होता त्यातुन ते वाचले. परंतु तो व्यापारी मात्र मृत्त्युमुखी पडला. ही खुप दुःखाची गोष्ट आहे यासाठी कायदा व सुव्यवस्थेबाबत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना आपण लेखी निवेदन दिले पाहिजे. त्त्यांच्याकडे शिष्टमंडळ घेऊन गेले पाहिजे. जेणेकरून यापुढे असे प्रकार घडु नयेत.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :-सन्माननिय महापौरजी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांचे निधन झाले आहे त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित केली तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः</u>-मा.महापौरजी, शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांचे घनिष्ठ मित्र श्री. सुधाकरराव नाईक यांचे नुकतेच निधन झाले ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुध्दा होते त्यांच्या आत्त्म्यास शांती लाभावी म्हणुन या सभागृहात श्रध्दांजली अर्पित करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>मा.महापौरः</u>- शहरातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्याबाबत कॉंग्रेसचे नगरसेवक श्री. सेवलदास ठाकुर यांनी जो मुददा उपस्थित केला आहे. त्याबाबत मी सदनास असे सांगु इच्छितो की, मार्च महिन्यात कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक श्री. सुभाष मनसुलकर यांच्यावर जो प्राणघातक हल्ला झाला होता. त्या विषयासंबधी आम्ही मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना मागच्या मंगळवारी भेटलो होतो व त्यांना या शहरातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेची जाणीव करून दिली आहे. तसेच शहरातील या समस्यांना राज्य शासनापर्यंत आम्ही पोहोचवले आहे. शहरातील प्रमुख अशी बाजारपेठ, सिरू चौक, जेथे रात्री दोन-दोन वाजेपर्यंत आईस्क्रिम, फालुदा इत्त्यादींची दुकाने चालु असतात अशा ठिकाणी एका वाईन मर्चंन्ट, श्री. सतरामदास यांच्यावर

प्राणघातक हल्ला झाला ज्यामध्ये त्यांचे निधन झाले आहे. त्यांचेवर आज अंन्त्यसंस्कार झाले. पंचायत हॉलमध्ये शहरातील या कायदा आणि सुव्यवस्थेबाबत एक सभा झाली होती. त्यामध्ये भाजपाचे जे जिल्हाअध्यक्ष आहेत ते श्री. नरेंद्र राजानी, कॉंग्रेस पक्षाचे जिल्हयाचे नेते श्री. मोहन बेहरानी, व्यापारी महामंडळाचे अध्यक्ष श्री. ठाकुरदास बेहरानी हे होते, मी होतो व बाकी काही आमचे कार्यकर्ते होते. याबाबत त्यांच्या मनामध्ये सुध्दा बरीच चिड होती. या सभागृहामध्ये पण याबाबत जी चिड व्यक्त करण्यांत आलेली आहे. तर या समस्येबाबत पुन्हा एकदा आम्ही राज्याचे गृहमंत्री व मुख्यमंत्री महोदयांकडे जाऊ. आज सभागृहामध्ये श्री. सेवलदास ठाकुर यांनी याबाबत जो आवाज उठविला आहे तो सुध्दा आम्ही राज्य शासनापर्यंत पोहचवु. व दुसरे असे की,श्री. सुधाकरराव नाईक, जे आमच्या राज्याचे मुख्यमंत्री होते. कॉंग्रेसचे मुख्यमंत्री होते. त्यांचे निधन झाले आहे त्याचबरोबर उल्हासनगर शहरातील महिला मंडळाच्या त्या अध्यक्षा होत्त्या, श्रीमती. मोहिनी शर्मा त्यांचे सुध्दा निधन झाले आहे. त्या दोघांना श्रध्दांजली देण्यासाठी या सभागृहामध्ये दोन मिनिटाचे मौन पाळले जाईल. श्री. सतरामदास, श्रीमती. मोहिनी शर्मा व श्री. सुधाकरराव नाईक या तीघांनाही श्रध्दांजली अर्पित केली जाईल.

--३--

शोक प्रस्ताव

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील थोर समाजसेविका श्रीमती. मोहिनी शर्मा यांचे दि४. ५.२००१रोजी निधन झाले. त्या दक्षता समितीच्या सदस्या होत्त्या.

तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, हिमाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल व महाराष्ट्र राज्य जल संधारण समितीचे अध्यक्ष मा. श्री. सुधाकरराव नाईक यांचे दि. १०.५.२००१ रोजी निधन झाले. ते ६७ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी सुमनताई, पुत्र जय नाईक, कन्या अर्चना चव्हाण व आराधना नाईक असा परिवार आहे.

तसेच सिरू चौकातील एम.व्ही. वाईन शॉपचे मालक श्री. मोटुमल माधवानी यांचे दि. १९.५.२००१ रोजी निधन झाले. दि. १६.५.२००१ रोजी रात्री ११.०० वाजता त्यांच्यावर अज्ञात व्यक्तींनी प्राणघातक हल्ला केला होता.

वरील मृतात्त्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ४ (अ) दिनांक:-१९/५/२००१.

सुचकाचे नाव :- श्री. सेवलदास ठाकुर.
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती मोहिनी शर्मा, श्री. सुधाकरराव नाईक व श्री. सतरामदास माधवानी यांच्या दुःखद निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिकेतील कॉंग्रेसपक्षाचे तरूण व तडफदार नगरसेवक श्री. सुभाष मनसुलकर यांच्यावर नुकताच काही दिवसापूर्वी प्राणघातक हल्ला झाला. त्यात त्यांचे हातापायांना फार मोठया प्रमाणावर मार लागला आहे. परंतु श्री. मनसुलकर यांच्या हल्लेखोरांना पकडण्यात अदयाप पोलिसांना यश आलेले नाही.

--४--

ही घटना ताजी असतानाच दि. १६.५.२००१ रोजी सिरु चौक उल्हासनगर-२ येथिल एम. व्ही. वाईन शॉपचे मालक श्री. सतरामदास मोदुमल माधवानी यांच्यावर रात्री ११ वाजता रिवाल्वर मधुन गोळया झाडल्या या हल्यातून बचावलेल्या श्री. सतरामदास माधवानी यांचे दि. १९.५.२००१ रोजी निधन झाले.

यावरून शहरात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती बिघडलेली आहे. रहिवाश्यांवर घडणा-या अपराधांबाबत गंभीर दखल घ्यायचे शासनाचे धोरण असल्यामुळे सदरच्या फौजदारी गुन्हयाच्या संदर्भात खटल्यांचे काटेकोर अन्वेषण करणे कामी शासनाला विनंती करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ४ ब दिनांकः-१९/५/२००१.

सुचकाचे नाव :- श्री. सेवलदास ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. देवेंद्रसिंग खेमाणी.

हि महासभा या ठरावाद्वारे शासनाला विनंती करीत आहे की, उल्हासनगर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी उल्हासनगर शहरातील पोलिस कार्यालयांना सक्त ताकिद देण्यात यावी. तसेच नगरसेवक श्री. सुभाष मनसुलकर व श्री. सतरामदास माधवानी यांच्यावर झालेल्या हल्याचे संदर्भात गुन्हयाचे काटेकोरपणे अन्वेषण व ख-या आरोपींना त्वरीत अटक करण्याचे पोलिसांना निर्देश दयावेत.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा.महापौर साहेब, सभा चालु होण्या अगोदर मी आपणांस निवेदन करू इच्छितो की गेल्या पाच-सहा महिन्यापासुन,जेव्हा पासुन श्री. बक्क्षी साहेबांनी आयुक्त म्हणुन या महापालिकेचा कार्यभार स्विकारला आहे, तेव्हा पासुन, जेव्हा जेव्हा आपल्या सभा होतात तेव्हा पासुन आज पर्यंत बक्क्षी साहेब आजपर्यंत सभेस हजर राहीले नाहीत. कुठल्याही महासभेत, जेव्हा शहराचे मुख्य व महत्त्वाचे मुददे चर्चेस येतात तेव्हा आयुक्तच जर हजर नसतील तर ती सभा चालविण्यात अर्थच काय? जर श्री. ढाकरे साहेब त्यांच्या आसनावर बसले असतील व ते निर्णय घेत असतील तर ही सभा चालविण्यात अर्थ आहे. अन्यथा ही सभा बरखास्त करण्यात यावी.

--५--

मा.महापौर:-मुख्यालयाचे उपायुक्त श्री. ढाकरे साहेब आहेत त्यांना श्री. बक्क्षी साहेबांनी कोणतेही निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत केले आहे. यासाठी सभा बरखास्त करण्याची जरूरत नाही.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-ते निर्णय देणार आहेत काय?

मा.महापौर:-ते निर्णय घेतील ना?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- नाही, कारण काय मागच्या वेळेस स्थायी समितीची जी सभा झाली होती तेव्हा प्रभारी आयुक्त म्हणुन त्यांनी सांगितले की माझ्याकडे कार्यभार नसल्याने मी स्वाक्षरी करू शकणार नाही. असे जेव्हा जेव्हा मुददे येतात. असेच होत असेल तर सभा चालविण्यात काय अर्थ आहे?

मा.महापौर:-मी श्री.ढाकरे साहेबांना सांगतो की त्यांनी सभागृहाला स्पष्टीकरण दयावे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-मा.महापौरजी, त्यांच्याबाबत मला बोलायचे आहे. श्री. बक्क्षी साहेबांबाबत श्री. प्रमोद टाले यांनी जो प्रश्न विचारला तो बरोबर आहे. मला वाटते श्री. बक्क्षी साहेब फक्त एकाच सभेत उपस्थित होते.

जेव्हा ते अतिरिक्त पदभार स्विकारतात तेव्हा ठाणे महापालिकेतील व उल्हासनगर महानगरपालिकेतील महासभेंच्या तारखा व वेळ यांची आखणी करून त्यांनी त्या तारखा ठरवुन दिल्या पाहिजेत. परंतु असे होत नाही. श्री. ढाकरे साहेबांना कार्यभार दिलेला नाही. श्री. ढाकरे साहेब, मागील सहा-सात वर्षापासुन उपायुक्त म्हणुन काम पहात आहेत व ते आश्वासन देतात परंतु त्याच्याजवळ लेखी अधिकार आहेत का? जर आमचा कोणी सदस्य प्रश्न विचारतो, प्रश्नाचे उत्तर मागतो त्यावेळी योग्य उत्तर दिल्यानंतर त्यावर कायदेशिर कार्यवाही करण्याची जवाबदारी ते घेतील का? माझ्यामते त्यांच्याकडे कार्यभार नसल्यामुळे ते जबाबदारी घेणार नाहीत असे त्यांनी कालच्या स्थायी समितीत सभेचे उदाहरण देऊन सांगितले आहे. आता आम्ही येथे असे नमुद करत आहोत की, जर आयुक्त साहेब सभा संबोधित करत नसतील तर ही सभा चालविण्यांत काहीही अर्थ नाही. म्हणुन सभा स्थगित करण्याचा आम्ही प्रस्ताव ठेवत आहोत.

मा.महापौरः-मला जी माहिती आहे त्याप्रमाणे श्री. ढाकरे साहेब हे निर्णय घेऊ शकतात. कारण त्यांना आयुक्तांनी प्राधिकृत केलेले आहे. मी श्री. ढाकरेंना सांगेन की त्यांनी सभागृहाला स्पष्टीकरण दयावे. त्यांना प्राधिकृत केले आहे कींवा नाही? जर त्यांना श्री. बक्क्षी साहेबांनी प्राधिकृत केले नसेल तर आपण विचार करू. व जर प्राधिकृत केले असेल तर यासभचे कामकाज आपण चालु करू.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-फक्त सभेचे कामकाज चालविण्यासाठी त्यांना नियुक्त केले आहे की, निर्णय घेण्यासाठी?

मा.महापौरः-सभेमध्ये जे पण महत्त्वाचे काही मुददे येतात त्याबाबत निर्णय घेण्यासाठी मला वाटते बक्क्षी साहेबांनी त्यांना नियुक्त केले आहे. मला असे वाटते की त्यांनी आपल्या शब्दात सभागृहाला सांगावे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा.महापौरजी, श्री. ढाकरे साहेबांना अधिकार दिले आहेत की नाही हे आपणांस अद्याप माहित नाही?



मा.महापौरः- आहे ना, मी तर सांगतो आहे ना?मला वाटते की श्री. ढाकरे साहेबांनी सभागृहाला स्पष्टीकरण करावे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-त्यानंतर मुददाच संपुष्टात येतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आपण काय म्हणालात, मला वाटते की,

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-हे आपण ठरवायचे आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:- श्री. ढाकरे यांनी का स्पष्टीकरण करावे?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- श्री. ढाकरे आयुक्त म्हणुन येथे बसु शकतात काय?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-आपण म्हणतात की, त्यांना आयुक्तांनी प्राधिकृत केले असेल तर मुददाच संपला.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जर आपणांस माहित असेल की,आजची महासभा चालविण्यासाठी जर त्यांना प्राधिकृत केले असेल तर मुददाच संपला. आपण

निर्णय देऊ शकता. मुददा तेथेच संपतो. त्यांनी येथे बसावे असे तुम्हाला वाटते का? किंवा नाही.

मा.महापौरः-मला वाटते त्यांनी आयुक्तांच्या आसनावर बसावे. प्रश्न तुमच्या लोकांचा आहे. त्यांनी येथे बसावे किंवा नाही?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- मा.महापौरजी, इथे श्री. प्रमोद टाले यांनी जो मुददा उपस्थित केला आहे की, श्री. ढाकरे साहेब, निर्णय घेऊ शकतील किंवा नाही. परंतु श्री. ढाकरे साहेबांपुर्वी श्री. बक्षी साहेब होते, दुसरे साहेब होते त्यांच्या कार्यकालामध्ये येथे जे जे ठराव पारित केले गेले आहेत. त्याठरावांची अंमल बजावणी कुठे झाली? मागील महासभेत प्लास्टिकच्या पिशव्यांबाबत श्री. ढाकरे साहेबांना आदेश दिले होते, महासभेमध्ये आपण आदेश दिले होते की, हे झालेच पाहिजे म्हणुन? परंतु १ मार्च पासुन हे चालु होणार होते, परंतु आता मे महिना संपण्यास आला आहे तरीही ते चालु झाले नाही. मागच्या महासभेत जेव्हा याबाबींकडे आपले लक्ष वेधले होते. तेव्हा आपण श्री. ढाकरे साहेबांना आदेश दिले होते की, त्याची अंमलबजावणी त्वरीत झाली पाहीजे. परंतु अद्याप ती होत नाही आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः- ठराव पास करण्याचा प्रश्न नाही आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- ठराव कोणीही बनविला तरी त्याची अंमलबजावणी होते काय?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-ठराव पास होण्याबरोबर त्याची अंमलबजावणीही झाली पाहिजे.

डॉ. लांजेवार सहाय्यक आरोग्य अधिकारी हे स्पष्टीकरण देण्यासाठी व्यासपिठावर उभे राहिले.

मा.महापौरः-महाडिकजी आपणांस ते (श्री. डॉ. लांजेवार)स्पष्टीकरण देत आहेत.



डॉ. लांजेवार (सहाय्यक आरोग्य अधिकारी):-सर्व सन्माननिय नगरसेवक....

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा. महापौरजी, फक्त ग्रीन कोलचाच प्रश्न नाही असे अनेक प्रश्न आहेत. ज्याबाबत समिती नेमण्याचा आपण निर्णय घेतला होता. जी नादुरूस्त वाहने रस्त्यावर पडुन आहेत ती हटविण्याचा आपण निर्णय घेतला होता. या समितींमध्ये पोलीस उपायुक्तांना सुध्दा आपण सहभागी करून घेणार होतो. त्याची सुध्दा अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. ज्या प्लास्टिकच्या पिशव्या आहेत त्या किती मायक्रॉनच्या (जाडीच्या)वापरायच्या? त्याचाही ठराव आपण पास केला परंतु त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. यासर्व गोष्टीचा निर्णय आज झाला पाहिजे. आपण त्यांना आदेश देऊन एक महिना झाला परंतु अद्याप काहीच झालेले नाही.

मा.महापौरः-प्लास्टिक पिशव्यांबाबत ते सांगत आहेत. ...

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-मा.महापौर साहेब, हा मुददा घेण्यापुर्वी मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर तर दया. जर ते निर्णय घेऊ शकत असतील तर सभा चालवा नाहीतर सभा चालविण्यांत काही अर्थ नाही.

मा.महापौरः-मी आपणांस सांगितले आहे की, निर्णय घेण्यासाठी त्यांना प्राधिकृत केले आहे.

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:</u>-त्यांना सांगु दया. श्री. ढाकरे साहेबांना बोलु दया. स्थायी समिती सभेत एका प्राकलनावर शहर अभियंत्त्यांची स्वाक्षरी नव्हती तेथे थेट आयुक्तांची सही होती.*

*<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:</u>-महापौरजी, आता या सभेमध्ये श्री. प्रमोद टालेंनी जो प्रश्न विचारला आहे. त्यावर आपण वारंवार असे बोलत आहात की,त्यांना प्राधिकृत केले आहे. परंतु आपले श्री. ढाकरे साहेब बोलत आहेत का?पहा ना, प्रत्त्येक वेळी महासभा बोलावली जाते....*

*<u>मा.महापौर:</u>-सदनास श्री. ढाकरे साहेबांचे उत्त्तर नको आहे?*

*<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:</u>-महापौरांवर विश्वास नाही ही वेगळी गोष्ट आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:</u>- महापौरजी, सदनाची दिशाभुल करू नका.*

*<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे:</u>-ही गोष्ट बरोबर आहे की, जर इथे कोणी निर्णय घेऊ शकत नाही तर महासभा चालविण्यात काही अर्थ नाही. शहरातील अनेक समस्यांसाठी, ऐवढा अभ्यास करून देखिल शहरात पाणी नाही, कच-याच्या समस्यांवर आपण जे प्रश्न विचारतो, ज्यावर विचारविनिमय करतो त्यावर काही तरी निर्णय घेतला गेला पाहिजे, जर हा निर्णय कोणी घेऊ शकत नसेल तर त्या महासभेस काहीच अर्थ रहत नाही. यामुळे सचिव साहेब आजची सभा स्थगित करण्यांत यावी, रदद करण्यांत यावी.*

*<u>मा.महापौर:</u>-आजच्या महासभेची जी सभा आहे, मी सभागृहावर हे सोपवु इच्छितो, सभागृह जर या सभागृहाचे काम काज पुढे ढकलु इच्छित असेल तर माझी काही हरकत नाही. सदनास योग्य वाटेल तसे त्यांनी करावे.*

*<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:</u>-मा.महापौरजी, सांगण्यातील तात्त्पर्य हे आहे की, आजची महासभा जर रदद केली गेली तर श्री. बक्षी साहेबांना हा निरोप दया.*



*की, आपण या महापालिकेचा कार्यभार स्विकारला असुन आपण महासभेत उपस्थित रहात नसल्यामुळे महासभेचे कामकाज चालु दिले जात नाही. यासाठी आपण महासभेमध्ये उपस्थित रहाणे आवश्यक आहे.यानंतर सुध्दा आपण विशेष महासभा बोलावु शकतो......*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:</u>-मा.महापौरजी, मागच्या वेळी महासभेमध्ये अशी चर्चा झाली होती की, आयुक्तांच्या आसनावर ज्या अधिका-याला बसविले जाईल तो अधिकारी आयुक्तांचे अधिकार वापरू शकतो. असे आमच्या सचिव साहेबांनी आम्हांला सांगितले होते. जसे आपण एखादया अधिका-याला प्राधिकृत करतो. उदा. स्थायी समिती सभेमध्ये एखादया उपायुक्तांना आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होण्यासाठी प्राधिकृत केले जाते त्यावेळी तो अधिकारी आयुक्तांचे अधिकार वापरू शकतो. तर यागोष्टीचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. आज श्री. ढाकरे साहेब आयुक्तांच्या आसनावर बसले आहेत. तर ते आयुक्तांचे अधिकार वापरू शकतात ना? जर ते अधिकार वापरू शकतात तर मुददा संपतो. असे सचिव साहेबांनी सांगितले होते, कायदा असा आहे.*

*<u>मा.महापौर:-</u>या व्यतिरिक्त....*

*<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:</u>-मा.महापौरजी, मी सांगु इच्छितो, लोकप्रतिनिधी प्रत्त्येक सभेत, प्रत्त्येक ठिकाणी आश्वासने देत असतात. परंतु आपले हात वर करतात. तसे आमचे महापौर लोकप्रतिनिधी यानात्त्याने येथे बसलेले आहेत.*

परंतु जे उत्तर श्री. ढाकरे साहेब देतील, काल त्यांच्याकडुन जे उत्तर आम्हाला मिळाले त्यामुळे आम्ही उपोषण मागे घेतले आहे. श्री. ढाकरे साहेबांनी जर सांगितले की मला आयुक्तांनी प्राधिकृत केले आहे तर आम्ही मानु महासभेचे कामकाज चालविणे ठिक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-सन्माननिय महापौरजी,....

मा.महापौर:-यांना बोलु दया.

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-सन्माननिय महापौर, सर्व सदस्य, महापौरांनी एकदा निर्णय दिल्यानंतर आयुक्त किंवा कोणत्त्याही अधिका-याला बोलण्याची कर्तव्यकक्षा संपते हा पहिला मुददा त्यातजर पिठासिन अधिका-यांनी आयुक्त म्हणुन मला इथे बसण्यास परवानगी दिली तर मला आयुक्त म्हणुन या सभेचे कामकाज करणे हे माझे कर्तव्य आहे. सभेमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार सदनाला आहे. धोरणात्मक निर्णय काय घ्यायचे तो अधिकार सदनाचा आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-मग त्याची अंमलबजावणी कोणी करायची आहे? प्रभागनिहाय आम्ही जे प्रश्न विचारतो त्याची अंमलबजावणी कोणी करायची?ती आम्ही करायची?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरजी याचा निर्णय आपण घ्यायचा आहे. हा त्यांचा आणि यांचा प्रश्न नाही. आपणासच निर्णय घ्यायचा आहे. हि काही बोलण्याची पध्दत नाही. श्री. ढाकरे साहेबांनी का उत्तर दयावे?

मा.महापौर:-पंजाबी साहेब मी सभागृहास सांगितले आहे की, श्री. ढाकरे साहेब आयुक्त म्हणुन आयुक्तांच्या खुर्चीत बसले आहेत. व सभागृहात जो निर्णय होईल त्याची त्यांना अंमलबजावणी करावी लागेल. याव्यतिरिक्तही जर काही सदस्यांच्या मनात याबाबत शंका असेल तर, व त्यांना असे वाटत असेल की, सभागृहाचे कामकाज पुढे ढकलले जावे तर त्याबाबत मी सभागृहाचे मत



आजमावु इच्छितो. आपणांस वाटत असेल की, सभागृहाचे कामकाज पुढे ढकलावे तर यावर माझी काही हरकत नाही.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा.महापौरजी, आमची आपणांस विनंती आहे की, आयुक्त जर येथे येऊ शकत नसतील, आमच्या उल्हासनगर शहरासाठी ते वेळ देऊ शकत नसतील तर कृपया नविन आयुक्त मागविण्यात यावेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, याचा अर्थ असा आहे की, श्री. ढाकरे साहेब आता येथे आयुक्त म्हणुन जो निर्णय घेतील तो निर्णय श्री. बक्क्षी साहेबांना मंजुर असेल? नाही तर बक्क्षी साहेब म्हणतील की त्यावेळी त्याखुर्चीत श्री. ढाकरे साहेब प्रभारी आयुक्त म्हणुन बसले होते व त्यांनी तो निर्णय घेतला होता.

मा.महापौर:-अंतर्गत प्रशासन तो निर्णय अंमलात आणील. प्रशासनाला त्या निर्णयाची अंमलबजावणी करावी लागेल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौरजी, वारंवार सभचे कामकाज पुढे ढकलण्या ऐवजी राज्यस्तरावर आपल्या पक्षाचे सरकार असल्याने व आपण सुध्दा त्याच पक्षाचे महापौर असल्याने आपण कायमस्वरूपी आयुक्तांची मागणी केली तर ते बरे होईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-प्लास्टिकच्या पिशव्यांबाबत श्री. लांजेवार साहेबांनी सांगावे.

डॉ.लांजेवार(सहाय्यक आरोग्य अधिकारी):- सभागृहातील सर्व सदस्यांना मी माहिती देऊ इच्छितो की, १ मार्च पासुन २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी आणण्याबाबतचा जो ठराव संमत केला होता तो ठराव १ एप्रिल पासुन अंमलात आणायचा होता. परंतु काही तांत्रिक कारणामुळे त्याच्या अंमलबजावणीस थोडा विलंब होत आहे.येत्त्या पंधरा दिवसात त्यांच्या वापरावर बंदी येईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा.महापौरजी, एक मिनिट. समिती नेमण्याबाबत जे म्हंटले होते व नादुरूस्त वाहने जी रस्त्त्यांवर उभी केली जात आहेत. आपले रस्ते आता चांगले झालेले आहेत. रस्त्त्यावरील नादुरूस्त वाहने हटविण्यासाठी आपण जी समिती नेमणार होतात त्याचे काय झाले? ते पण सांगितले तर बरे होईल. संबंधित जे अधिकारी असतील त्यांनी सांगितले तर बरे होईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- मा.महापौरजी, बी.एम.आर.डी.ए. कडुन आपण जे कर्ज घ्यायचे होते त्यावेळी त्यांना अशी हमी दयायची होती की, हे जे रस्ते तयार होतील त्यावर जी अनाधिकृत व नादुरूस्त वाहने उभी केली जातील ती आम्ही हटवु म्हणुन. या प्रकारच्या प्रस्तावास आम्ही मंजुरी दिली होती. व तो प्रस्ताव आम्ही बी.एम. आर.डी.ए. कडे पाठविला होता. श्री. चौधरी यांचे म्हणणे आहे की, त्या ठरावाचे काय झाले? ते फक्त बी.एम.आर.डी.ए. ला दाखविण्यासाठी होते काय? की त्याची काही अंमलबजावणी होईल.

मा.महापौरः-याबाबत श्री. चौधरी साहेबांनी जो मुददा उपस्थित केला आहे त्याबाबत मी स्वतः असे सांगु इच्छितो की, एम.एम.आर.डी.ए. कडुन कर्ज घेण्यासाठी आम्ही जो ठराव सभागृहामध्ये पारीत केला आहे. व ज्यामध्ये आम्ही एम.एम.आर.डी.ए. ला हमी दिली होती की जे रस्ते आम्ही शहरात तयार करू त्या रस्त्त्यांवर कोणत्त्याही प्रकारचे अतिक्रमण किंवा वाहनांची अनाधिकृतपणे पार्किंग होऊ देणार नाही. व रस्ते वाहनांच्या वाहतुकीसाठी पुर्णपणे खुले ठेवू व



पदपथ पादचा-यांसाठी मोकळे ठेऊ. महापालिकेला व आयुक्तांना मी हे सक्त आदेश देत आहे की,सभागृहामध्ये आम्ही जो ठराव पारित केला आहे. त्याची कठोरपणे कार्यवाही करण्यांत यावी.अन्यथा याबाबत मी वरीष्ठांना अहवाल सादर करेन. जर ते कार्यवाही करणार नसतील तर जे संबंधित आयुक्त आहेत त्यांच्याविरूध्द आम्ही कार्यवाही करू. असे मी सभागृहामध्ये स्पष्टपणे त्यांना सांगत आहे. रस्ते आणि पदपथांवर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमणे होऊ नये अशी आमची इच्छा आहे, आम्ही जो प्रस्ताव पारित केला आहे त्याची शंभर टक्के कार्यवाही झाली पाहिजे.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :-मा.महापौरजी, यापुर्वी सुध्दा आपण निर्देश दिले होते त्याची अद्याप कार्यवाही झालेली नाही. आता आपण थेट आयुक्तांना ताकीद दिली आहे त्याऐवजी संबंधित जे विभाग प्रमुख आहेत त्यांना आपण ताकीद दिली पाहिजे.

मा.महापौरः-संबंधित विभागाकडुन काम करवुन घेणे कुणाचे काम आहे? आयुक्तांचे काम आहे. मी याबाबत आयुक्तांना विचारणा करेन.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर -मा.महापौरजी, प्लास्टीकच्या पिशव्यांबाबत डॉ. लांजेवार साहेब जे सांगत आहेत की, त्यांच्या वापरावर बंदी येणार आहे.

डॉ.लांजेवार(सहाय्यक आरोग्य अधिकारी):- प्लास्टीक पिशव्यांच्या वापरावर दि. १ एप्रिल पासुन बंदी आणण्यांत येणार होती. काही तांत्रिक कारणामुळे ते थांबविले होते. येत्त्या १५ दिवसात ते होईल.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-तांत्रिक कारणे थांबुन थांबुन येतात काय? आज होईल, उदया होईल, १५ दिवसांनी होईल, २० दिवसांनी होईल,एकीकडे शहर बरबाद होत आहे. आज शहरात कच-याची सफाई होत नसल्याने शहरात रोगराई पसरली आहे. आरोग्य विभागाच्या कार्यालयात फिनेल, झाडु, डी.डी.टी. पावडर नाही. काहीच नाही. अशा या अस्वच्छतेमुळे श्री. दर्शनसिंग खेमाणी यांचा मुलगा आजारी पडला आहे. आठ दिवसापासुन तो रूग्णालयात आहे. आपण शहरात काय करत आहात? शहरामध्ये नास्त्त्याची जितकी दुकाने आहेत ते लोक बोरींगचे पाणी वापरत आहेत. यामुळे रोगराई पसरली तर त्यास जबाबदार कोण असेल?

डॉ.लांजेवार(सहाय्यक आरोग्य अधिकारी):-पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी पाणी पुरवठा विभागाची आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-विषयांतर करू नका. जे हातगाडीवाले, हॉटेलवाले ज्यांना पाणी मिळत नाही ते लोक काय करतात तर बोरींगचे पाणी वापरून चहा तयार करतात व लोकांना देतात. उदया कदाचित जर शहरात रोगराई पसरली तर त्यास जबाबदार कोण असेल?

डॉ.लांजेवार(सहाय्यक आरोग्य अधिकारी):- ठिक आहे. याबाबत आम्ही चौकशी करू, शहरात किती हॉटेल्स आहेत? की जे बोरींगचे पाणी वापरत आहेत.

मा.महापौरः-श्री. सेवलदासजी, आपणास जर काही ठराविक असा प्रश्न विचारायचा असेल तर आपण लेखी स्वरूपी दया.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-हा वेळ काढु पणा आहे.



मा.महापौरः-वेळ काढु पणा नाही आहे. आपल्याच सदस्यांनी प्रश्न दिलेले आहेत. त्यांना पण उत्तरे मिळविण्याचा हक्क आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-हा प्रश्न पण जरूरीचाच आहे ना?

मा.महापौर-तर मग आपण लेखी प्रश्न दया.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर-शहरामध्ये रोगराई पसरावी. दहा-दहा दिवस लोकांनी रूग्णालयात रहावे. व आम्ही फक्त हे पहात रहावे का?

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-मा.महापौरजी, अतिशय दुःखाने म्हणावे लागत आहे, जसे श्री. राजेंद चौधरी यांनी सांगितले की, अंमलबजावणी नाही झाली. श्री. सेवलदास ठाकुर यांनी सांगितले की, अंमलबजावणी झाली नाही. श्री.लाल पंजाबी साहेबांनी पण याबाबीकडे आपले लक्ष वेधले. तरी पण काय शाश्वती आहे की, या सभेमधील या प्रश्नासंबंधी कार्यवाही होईल? कारण की, यापुर्वीच्याच प्रश्नांची अंमलबजावणी झालेली नाही. तर आपण महासभेमध्ये कशासाठी येतो? आपली वेळ खर्ची घालतो, जनतेसाठी प्रश्न विचारतो, त्याच्या उत्तरासाठी एक महिनाभर वाट पहातो. जनतेला काही समाधानच मिळत नाही. सभा एक-एक तास उशीराने सुरू होते. आम्ही वाट पहातो की शहराचे काही चांगले होवो. शहराच्या विकासाबाबत आम्ही येथे चर्चा करतो, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. तर या अंमलबजावणीवर आपण लक्ष

दिले तर फार चांगले होईल. त्यामुळे शहराची प्रगती, विकास व साफसफाई होईल. जर अंमलबजावणी होत नाही तर आम्ही येथे का बसत आहोत? अंमलबजावणी करण्याबाबत आपण कठोरपणे आदेश दया. त्यानंतर महासभेचे कामकाज चालविले जावे. मागच्या सभेत अंमलबजावणीविषयी आपण जे आदेश दिले होते त्याची तर अद्याप कार्यवाही झालेली नाही. तर मग आम्ही कसा विश्वास ठेवयाचा की, आमचा जो दुसरा प्रश्न चर्चेस येणार आहे, आम्ही जी चर्चा करत आहेत त्याची कार्यवाही होईल म्हणुन?याबाबत तर आपण आश्वासन दया ना.

<u>मा.महापौरः</u>- महासभेमध्ये जे निर्णय घेतले जातात त्यांची अंमलबजावणी प्रशासनाला करायची आहे. जर त्यात प्रशासन कोणत्त्याही प्रकारचे दिरंगाई करत असेल किंवा कोणत्त्याही निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर संबंधित अधिका-यावर कार्यवाही केली जाईल. त्याला दंडित केले जाईल.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानीः-</u> महापौर साहेब, कदाचित असे होत नाही की, महासभा संपल्यानंतर संबंधित अधिका-यांना बोलावुन महासभेत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत सक्त ताकीद देत नाहीत. आपण त्याकडे लक्षच देत नाहीत.

<u>मा.महापौरः</u>-मी सांगितले आहे ना की, जो त्याकडे दुर्लक्ष करेल किंवा विलंब करेल त्याच्यावर कारवाई केली जाईल म्हणुन....

<u>मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः</u>-महापौर साहेब, एक मिनिट यापुर्वीच किती उशीर झालेला आहे. कित्त्येक प्रकरणांमध्ये दिरंगाई झालेली आहे. येथे जे अधिकारी निर्णयांची अंमलबजावणी करत नसतील त्यांना निलंबित केले जावे. आता तर आपणास अधिकार आहेत आपण महापौरांच्या आसनावर बसला आहात. दोन-चार अधिका-यांना निलंबित केले जावे. येथे फक्त चर्चाच होत राहील कामे काहीच होत नाहीत.



<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः</u>-एक मिनिट, महापौरजी,पॉइंट ऑफ ऑर्डर च्या माध्यमातुन सर्व सदस्यांचे मी लक्ष वेधु इच्छितो, असे माहित पडले आहे की, काही दिवसापुर्वी महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मेट्रोपोलिएन रिजिनल डेव्हलपमेंट ऑथोरीटीने आपल्या शहरासाठी रिवाईज्ड ड्राफ्ट प्लॅन प्रसिध्द केला आहे. तो गॅझेटमध्ये सुध्दा आला आहे, डेव्हलपमेंट प्लॅन गॅझेटमध्ये आला आहे. शहरासाठी हा अतिशय महत्त्वाचा मुददा आहे. पुर्वीचा आमचा शहर विकास आराखडा १९७४ साली मंजुर झाला होता. त्याची मुदत दहा वर्षाची होती. व आता सध्याच मला एका व्यक्तीने असे सांगितले की, रिवाईज्ड ड्राफ्ट प्लॅन प्रसिध्द झाला आहे. त्यासाठी काही सुचना व हरकती मागविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. परंतु असे वाटते की, इथे बसलेल्या नगरसेवकांना याची माहिती नाही आहे. इथे बसलेल्या ब-याचशा नगरसेवकांना हे माहित नसेल की, आपल्या शहराचा रिवाईज्ड ड्राफ्ट प्लॅन प्रसिध्द झाला आहे म्हणुन याबाबत आमच्या नगररचनाकारांनी अधिक विस्तृतपणे न सांगता थोडक्यात सांगीतले तरी चालेल. त्याची कार्य पध्दती काय आहे. व त्याची प्रत सर्व ७४ नगरसेवकांना मिळाली पाहिजे. त्यावर जितका काही खर्च येईल तो केला जावा कारण की, आमचा हक्क आहे की, प्रत्त्येक नगरसेवक आपल्या प्रभागाबाबत विचार करत असतो, शहराबाबत विचार करत असतो.व त्यावर लोकांचे भविष्य अवलंबुन असते. रस्ते रूंदीकरणाचा प्रश्न असो, झोपडपटयांचा प्रश्न असो, मोकळया जागांचा प्रश्न असो. बरेचसे प्रश्न लोकांच्या मुलाबाळांशी निगडीत आहेत. यासाठी जरूरी आहे की, नगररचनाकारांनी आम्हाला याबाबत

माहिती दयावी. एक आठवडयाच्या आत सर्व नगरसेवकांना या नकाशाची प्रत मिळाली पाहिजे. व आपण सुध्दा आपल्या सुचना व हरकती दिल्या पाहिजेत. जेव्हा रिवाईज्ड ड्राफ्ट प्लॅन महानगरपालिकेपुढे मंजुरीसाठी येईल तेव्हा त्याच्यावर विचार करण्यासाठी आपणांस वेळ कमी पडु नये. असे माझे निवेदन आहे.

मा.महापौरः-मी सर्व सदस्यांना सांगु इच्छितो की, उल्हासनगर शहरासाठी रिवाईज्ड ड्राफ्ट प्लॅन शासन अधिसुचने व्दारा प्रसिध्द झाला आहे. त्याची प्रत महानगरपालिका कार्यालयात लावली जावी. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, कल्याण मधील एम.एम.आर.डी.एच्या कार्यालयातील या प्लॅनची प्रत उपलब्ध करून फ्रेम करून ती महापालिका कार्यालयात लावली जाईल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा.महापौर त्याचबरोबर डी.सी. रूल्स सुध्दा आहेत. आज इंडियन एक्सप्रेस मध्ये एक नोटीस सुध्दा प्रसिध्द झाली आहे.७४ नगरसेवकांसाठी त्याची प्रत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जावी.

मा.महापौरः-मी आयुक्तांना निर्देश देतो की, त्यांनी रिवाईज्ड ड्राफ्ट प्लॅनची प्रत सर्व सदस्यांना उपलब्ध करून दिली जावी. फी भरून प्लॅनची प्रत आपण घेऊ शकतो. हा प्लॅन महानगरपालिकेमध्ये सुध्दा लावला जावा. त्यावर सुचना व हरकतींसाठी साठ दिवसांची वेळ दिलेली आहे. ज्या कुणा नगरसेवकास त्याबाबत सुचना व हरकती दयायच्या असतील ते त्या देऊ शकतात.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-माझे म्हणणे असे आहे की, या प्लॅनची प्रत प्रशासनाकडुन सर्व नगरसेवकांना देण्यांत यावी.

मा.महापौरः-निशुल्क ?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-महानगरपालिकेकडुन निशुल्क देण्यांत यावी.

मा.महापौरः-त्याची काही फी आहे. इंडियन एक्सप्रेसमध्ये जी नोटीस प्रसिध्द झाली आहे. त्यामध्ये फि बाबत लिहिलेले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-फी जर जास्त नसेल तर....



मा.महापौरः-फि जास्त नसेल तर, आम्ही देण्याची व्यवस्था करू. फि जास्त असेल तर आयुक्तांना मी निर्देश देतो की, त्यांनी या प्लॅनच्या प्रती उपलब्ध कराव्यात ज्यांना त्या हव्या असतील ते पैसे देऊन घेऊ शकतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- त्याचे पैसे महापालिका देईल किंवा नगरसेवक देईल. परंतु प्रत उपलब्ध झाली पाहिजे. हे महत्त्वाचे आहे.

मा.महापौरः- बरोबर आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः- सन्माननिय महापौरजी,आपण म्हंटला होतात की, हि महासभा चालवायची की नाही हे सभागृहाने ठरवायचे आहे परंतु त्याबाबत तर आपण विचारलेच नाही.

मा.महापौरः-सभागृहाचे मत आहे महासभा चालविण्याबाबत.

मा.सचिवः-विषय क्र. १ प्रश्नोत्तरे. आता ५वाजुन २० मिनिटे झाली आहेत.

प्रश्न क्र. ५६२ हा श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५६१ :- १) मोनार्च इन्फास्ट्रक्चर अस निजि चुंगी वसुलने वाली कंपनी को सपना गार्डन में जो ऑफिस और गोडाउन दिया गया है वह ऑफिस क्या महानगरपालिका ने दि है?

२) इस तरह सार्वजनिक बांधकाम विभाग का का कार्यालय खाली कराकर और कुछ नया बांधकाम बनाकर देने का अधिकार महानगरपालिका ॲक्ट में है क्या? ऑफिस देने संदर्भ में टेंडर या करारनामा में कुछ उल्लेख किसर गया है क्या?

३)मोनार्च कंपनी को जिस तरह से ऑफिस दिया गया क्या? इस तरह से मोनार्च कंपनी को भी दिया गया क्या?

उत्तर :- १)पत्र क्र. युएमसी / जकात/२३/२००० , दिनांक ११.५.२००० द्वारे (ऑफिस)कार्यालय व सपना गार्डनचा भाग दिलेला आहे.

२)जकात अभिकर्त्यास ऑफिस व जागा देण्याबाबत उल्लेख करारनाम्या मध्ये आहे. महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नाशी सदर बाब निकडीत असल्याने व महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने प्रशासकिय निर्णय घेण्यास माननिय आयुक्त सक्षम आहेत.

३) कोनार्क कंपनीला गार्डनची मोकळी जागा दिली होती त्यांनी ऑफिसची मागणी केलेली नव्हती. मेसर्स मोनार्च कंपनीने सपना गार्डन व ऑफिसची जागा दोन्ही बाबत मागणी केलेने त्यांना देण्यात आली आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-या प्रश्नाचे संबंधित अधिकारी कोण आहेत? श्री. पाटणकर, पाटणकर मी या प्रश्नात असे विचारले आहे की, मोनार्च कंपनीला जे पी.डब्लु. डीचे ऑफिस दिले आहे. तर आपण उत्तर दिले आहे. होय दिलेले आहे. त्यानंतर मी विचारले आहे की, अशा प्रकारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय खाली करून काही नविन बांधकाम करून देणे महापालिकेच्या कायदयात आहे का? तर आपण येथे उत्तर दिले आहे की, आम्हाला उत्पन्न पाहिजे म्हणुन आम्ही ते दिले आहे. आम्ही विचारले काय व आपण उत्तर काय दिले. बघा जरा यावर विचार करा. मी कायदा विचारला



आहे. उत्पन्न पाहिजे असेल तर पी.डब्लु. डी. ची अशी किती कार्यालये आहेत. जी आम्ही भाडयाने देऊ.बघा इथे काय लिहिले आहे ते. तुम्ही अभ्यास करून का येत नाही? महापौर साहेब, हे अधिकारी लोक अभ्यास करून का येत नाहीत? मग आम्हीच अभ्यास करून का यायचे? नाही, आम्ही एक-एक, दोन-दोन तास बसुन जो अभ्यास करतो तो कशासाठी? याच्यांसमोर सभा सुचनेवरील विषयांना काही मान्यताच नाही का? मी आपणांस काय प्रश्न विचारला आहे? आपण हिंदीमध्ये सांगा. व त्याचे उत्तर सुध्दा आपण सांगा. जेणेकरून सभागृहाला माहित पडेल की आपण कशाप्रकारचे उत्तर मला दिले आहे.

श्री. पाटणकर (उपायुक्त):-प्रश्न असा आहे,

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- आयुक्त साहेब, जेव्हा आपणांस विचारू तेव्हा आपणही उत्तर दया, मी आपणांसही विचारीन. या प्रश्नाबाबत मी आपले मत घेईन.

श्री. पाटणकर (उपायुक्त):-अशाप्रकारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय खाली करून व काही नविन बांधकाम करून देण्याचा अधिकार

महापालिका कायदयात आहे का? ऑफिस देण्यासंबंधी निविदेमध्ये काही उल्लेख केला आहे का? आम्ही उत्तर दिले आहे की, जकात अभिकर्त्यास ऑफिस देण्याचा उल्लेख करारनाम्यामध्ये आहे. महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नाशी सदर बाब निगडीत असल्याने व महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने प्रशासकिय निर्णय घेण्यास माननिय आयुक्त सक्षम आहेत. असा यात उल्लेख केला गेला आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- उदया ते मागणी करतील की, आम्हाला रहाण्यासाठी जागा नाही, आयुक्तांचा बंगला आम्हाला राहण्यासाठी दया. तर काय तुम्ही देणार काय?

श्री. पाटणकर (उपायुक्त):-ती गोष्ट वेगळी आहे, ही गोष्ट वेगळी आहे, अशाप्रकारची कोणी मागणी करणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आपण जी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची जागा दिलीत....

श्री. पाटणकर (उपायुक्त):-त्यावेळी जर सार्वजनिक बांधकाम विभागाने हरकत घेतली असती तर योग्य झाले असते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- काय. काय म्हंटलात आपण?

श्री. पाटणकर (उपायुक्त):-करारामध्ये आहे. महापालिकेची मिळकत.....

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- जेव्हा आपण निविदा काढली होती, तेव्हा असा उल्लेख होता की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय खाली करून आम्ही देऊ म्हणुन. असा उल्लेख होता का? नाही. निविदेत होते का?

श्री. पाटणकर (उपायुक्त):-अभिकर्त्यास जागा उपलब्ध करून दयायची आहे. ती, महापालिकेने उपलब्ध करून दयायची आहे. अभिकर्त्यास जो जकात नाका पाहिजे, मध्यवर्ती जकात नाका पाहिजे. तो महापालिकेने उपलब्ध करून दयायचा आहे.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- निविदेमध्ये आपण याचा उल्लेख केला होता का? नाही ना? मी निविदेची गोष्ट करत आहे. महापौर साहेब, जेव्हा आम्ही अभ्यास करून येतो परंतु हे अधिकारी लोक अभ्यास करून येत नाहीत, अशाने आम्ही सभा कशी चालु देऊ?

मा.महापौरः-ते उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- महापौर साहेब, संबंधित विभागाचे अधिकारी अशी जी आम्ही मागणी करतो तर या सर्वांना बाहेर बसवा ना?आयुक्त साहेब देतील ना उत्तर?ते लोक अभ्यास करून येत नाहीत, आम्ही अभ्यास करून येतो. का  नाही ते अभ्यास करून येत? यांना जनतेची काही पर्वा नाही. सभा सुचनेवरील विषयांची यांना काही पर्वा नाही. यांना आमच्या शहराविषयी काही सारस्य नाही.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-साहेब, असे अधिकारी, जे काम करत नाहीत, त्यांना परत का नाही पाठवत? कुणी जबाबदारी घेत नाहीत, येऊन फक्त उभे रहतात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आयुक्त साहेब, संबंधित अधिका-यास उत्तर देऊ दया. आपण यांना जो पगार देतो तो कशासाठी देतो? शासन आणि प्रशासन हे दोन्ही कायदयानुसार चालले पाहिजेत.

मा.महापौरः-मॅडम आपणांस जर संबंधित अधिकारी उत्तर देऊ शकत नसेल तर आयुक्त आपणांस उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- याचा अर्थ असा आहे की, आज मी उत्तर देऊ शकत नाही माझ्या वतीने श्री. मोरे हे उत्तर देतील. तर आपण ते स्विकाराल?

मा.महापौरः-आयुक्त हे सर्व प्रशासनाच्या कामकाजात जबाबदार आहेत. ते आपणांस उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आयुक्तांनी त्यांना आदेश किंवा नोटीस बजावली पाहिजे की, ते याविषयाबाबत अभ्यास करून का आले नाहित? त्याचा उल्लेख करावा. जे सभा सुचनेवरील विषयांवर अभ्यास करून येत नाहीत. त्यांच्याबाबत काय मत आहे. त्यांच्यासाठी कोणती नोटीस बजावणार आहात, त्यांना काय शिक्षा करणार आहात, ताकीद देणार आहात?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-संबंधित अधिका-यांना प्रश्नोत्तराची तयारी करून येण्यासाठी त्यांना निर्देशित करण्यांत येईल. आणि ...

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- बघा ते पाटणकर तर बिना विचारता निघुन गेले. आपला त्यांनी आदर ठेवला का? आपण काय ताकीद देणार ते ऐकण्याच्या अगोदरच ते निघुन गेले आहेत, महापौर साहेब, आपण कशी सभा चालवत आहात? त्यांना उभे राहु दया. त्यांना ऐकु दया ना? त्यांचा अभ्यास कसा होणार?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-खाजगी जकात अभिकर्त्याची नियुक्ती करताना.....

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- मी वाचले आहे, त्यांना मी प्रश्न विचारला होता तेथेच मी थांबले आहे. निविदेत असे काही दिले होते का की,



सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय आम्ही खाली करून देऊ म्हणुन? असे होते?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-जकात अभिकर्त्याला जकात वसुलीसाठी नाके, मध्यवर्ती जकात नाके उपलब्ध करून देण्याची जबाबदरी या निविदेत आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- कृपया आपण हिंदीत बोला. मी पुन्हा आपणांस सांगत आहे. मी हिंदीमध्ये प्रश्न विचारला आहे, आपण मराठीत उत्तर दिले आहे. मला ते समजले आहे परंतु सभागृहात नेहमी हिंदीत चर्चा होते, म्हणजेच मागणी केली जाते. जो मी प्रश्न विचारला त्या प्रश्नाचे उत्तर आपण दया.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-जकात वसुलीसाठी जी निविदा मागविण्यांत आली होती, त्या निविदेत जकात नाके, मध्यवर्ती जकात नाके हे सर्व उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. त्यानुसार नाके दिले परंतु मध्यवर्ती जकात नाका कुठे दयायचा हे तत्कालिन आयुक्तांनी प्रशासकीय निर्णय घेतलेला आहे. सपना गार्डनमध्ये त्यांना मध्यवर्ती जकात नाका दयायचा

होता. कोनार्कला पहिले दिला होता, त्यानंतर मोनार्च ला दिला व सध्या सलगपणे त्यांच्याकडे आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- कोनार्कला दिला कसा? सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय खाली करून, किती भाडे घेत होते? कोनार्कला दिले होते का?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-पार्किंगची जागा त्यांना उपलब्ध करून दिली होती.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- त्यांनी आपले कार्यालय घेतले होते की, महानगरपालिकेने उपलब्ध करून दिले होते.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- त्यांना सपना गार्डनमध्ये पार्कींगची जागा उपलब्ध करून दिली होती. त्याप्रमाणे यांना सुध्दा ती जागा उपलब्ध करून दिली. व मध्यवर्ती जकात नाका तयार करून देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय उपलब्ध करून दिले. तत्कालिन आयुक्तांच्या आदेशानुसार.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- मी गार्डन बददल विचारले नाही, विशेष करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाबाबत विचारले आहे,

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-मध्यवर्ती जकात नाक्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची जागा आयुक्तांनी करार करून त्यांना उपलब्ध करून दिली.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- हे त्या करारामध्ये पहिले होते का? नाही ना? सांगा ना नव्हते म्हणुन?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-आयुक्तांनी त्यांच्याशी करार केला आहे. त्यानुसार मध्यवर्ती जकात नाक्यासाठी त्यांना ती जागा उपलब्ध करून दिली आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- त्यांनी मागणी केली होती का?



श्री. ढाकरे(उप आयुक्त):-होय. त्यांच्या मागणी नुसारच त्यांना ती जागा उपलब्ध करून दिली.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- तर परवा ते म्हणतील आम्हास राहण्यास जागा नाही तर काय आयुक्तांचा बंगला खाली करून देणार?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-आयुक्त प्रशासकीय निर्णय घेतात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- जे निविदा भरतात त्यांना माहित असले पाहिजे, मी निविदा घेईन ,मला कुठे कार्यालय उघडायचे आहे? ते लोक इ.एम. डी. ची व्यवस्था करतात. बॅंकेची व्यवस्था करतात. तर काय ते आपल्या कार्यालयाची व्यवस्था करू शकत नाहीत? त्यांनी हे केले पाहिजे की नाही? ,

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-आयुक्त साहेब, आपण त्यांच्याकडुन काही भाडे घेतले होते का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-त्यांच्याकडुन किती भाडे घेत होतात?

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-ते लोक व्यापार करतात, आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय व पुर्ण मैदान त्यांना देतो तर काय महानगरपालिका त्यांच्याकडुन काही भाडे घेते काय?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- किती भाडे घेत होतात?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-करारानुसार त्यांना जागा उपलब्ध करून दयायची आहे.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-करारानुसार पुर्ण मैदान त्यांना दयायचे आहे काय?असे निविदेत होते का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-त्यांच्याकडुन किती भाडे घेत होतात?

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः- श्री. ढाकरे साहेब, आज जर आम्ही एखादया लग्न समारंभासाठी जागा दिली तर १५००-२००० पर्यंत भाडे घेतले जाते. व जकात ठेकेदारास पुर्ण वर्षासाठी पुर्ण मैदान देता? व हे निविदेमध्ये होते?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-जकात अभिकर्ता आपल्यासाठी (महापालिकेसाठी)काम करतो. त्यासाठी त्यास सर्व सुविधा उपलब्ध करून देणे..

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तो आपल्यासाठी (महापालिकेसाठी)काम करत नसुन फायदा मिळविण्यासाठी काम करत आहे. जर त्यास फायदा मिळत नसेल तर तो आपली निविदा घेणार नाही. जे लोक निविदा भरतात. मग ती जकातीची निविदा असो किंवा रस्त्त्याच्या कामाची निविदा असो फायदा मिळविण्यासाठीच ते भरत असतात. त्यांना जो फायदा मिळतो त्या फायदयानुसार त्यांनी विचार करायला पाहिजे. आपणांस ऑफिसची जागा कुठे ठेवायची आहे. कुठे भाडयाने घ्यायची आहे. व आमची महानगरपालिका त्यांच्याकडुन किती भाडे घेत आहे.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- रस्त्त्याच्या कामाची निविदा दिल्यानंतर त्यांनी सुध्दा ऑफिससाठी जागेची मागणी केलेली आहे. व ती त्यांना दयावी लागते.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मी रस्त्त्याचे उदाहरण दिले आहे. की ते लोक फायदा मिळविण्यासाठीच महानगरपालिकेची निविदा घेतात. तर आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे किती भाडे घेत आहात?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्या कार्यालयाचे भाडे घेतले जात नाही. प्रशासनाने त्यांच्याशी करार केलेला आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-का घेत नाही? आपण जेव्हा निविदा मागविल्या होत्त्या तेव्हा हे नव्हते. आपण त्यांना ते कार्यालय फुकट वापरायला का दिले? ठिक आहे. मग येथे जे ठेकेदार काम करतात त्यांचे मजुर कोणी बदलापुर, कर्जतला रहातात, कुणी कुठे रहातो तर असे एखादे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय त्यांना सुध्दा रहाण्यासाठी दया. कारण मजुरांना येण्याजाण्यासाठी उशीर होतो. तसेही रस्त्त्याचे काम वेळेवर पुर्ण होत नाही. मजुर येथे राहिले तर लवकर काम पुर्ण होईल. मजुरांचे येण्याजाण्यासाठी दोन तास जाणार नाहीत. त्यांना त्रास होणार नाही. जर आपणांस विचार करायचा आहे तर सर्वांचाच विचार करा. हे रस्ते ३१ मार्च पर्यंत पुर्ण होणार असे सांगीतले जात होते परंतु अद्याप पुर्ण झालेले नाहीत. तर या ज्या अडचणी येतात त्यासर्व अडचणींची जबाबदारी महानगरपालिकेने घ्यावी ना? सर्वां समवेत घ्यावी एकासाठीच का?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-प्रश्न होता त्याचे उत्तर दिलेले आहे. करारामध्ये तत्त्कालिन आयुक्तांनी तरतुद केली होती त्यानुसार...

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-याचाच अर्थ आपण त्यांच्याकडुन भाडे घेत नाहीत?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- भाडे घेत नाहीत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तर मग मैदानात जे लग्न समांरभ होतात त्याचेकडुन भाडे का घेतले जाते? काय ते येथील शहरवासी नाहीत? ते लोक कर भरत नाहीत?ते लोक पाण्याचे बिल देत नाहीत?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- ते महानगरपालिकेने ठरविले आहे त्यांच्याकडुन भाडे घ्यायचे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-शहरवासी आपणांस कर देतात, पाण्याचे बिल देतात, सर्व प्रकारे आपणांस सहकार्य करतात जेणेकरून शहराचा विकास व्हावा. हे जे शहरवासी कर भरतात त्यातुनच आपणांस पगार दिला जातो. तर त्यांच्याकडुन आपण पैसे घेता, परंतु जे लोक निविदा भरतात, पैसे कमवतात त्यांच्याकडुन आपण भाडे घेत नाहीत .

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-महापौर साहेब, मी या गोष्टीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो की, महासभेच्या एका सभेमध्ये श्री. शिंदे साहेबांनी खात्री दिली होती की, हया निविदेचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर येथुन मध्यवर्ती जकात नाका हटविला जाईल. येथे मध्यवर्ती जकात नाका असल्याने सभोवतालच्या शाळा, हरिकिर्तन दरबार येथे येणा-या-जाणा-या सर्वांना त्रासाचे होत आहे. मी त्याबददल माहिती घेऊ इच्छितो की, आता यांच्या निविदेचा कालावधी पुर्ण झालेला आहे. तर आता मध्यवर्ती जकात नाका स्थानांतरीत करण्याबाबत आपण काय निर्णय घेतला आहे?

--१९--

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तर आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे ते कार्यालय खाली करून घेतले का?

मा.महापौरः- मॅडम, मला वाटते की आपल्या प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनी दिले आहे. निविदेमध्ये जी शर्त होती त्यानुसार महानगरपालिकेने ठेकेदाराला कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दयायची होती. त्यानुसार महानगरपालिकेने त्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे. सपना गार्डन मध्ये मध्यवर्ती जकात नाका ठेवण्याबाबतचा जो मुददा आहे तो मध्यवर्ती जकात नाका तेथे ठेवला पाहिजे किंवा नाही. जर त्यावर कुणा सदस्यांची हरकत असेल तर जसे की श्री. राजु जग्यासी, हे तेथील संबंधित नगरसेवक आहेत. त्यांची सुध्दा हरकत आहे. शहरातील कित्येक नागरिकांच्या हरकती आहेत. जसे की श्री. नरेंद्रकुमार ठाकुर जे नव्याने नगरसेवक झालेले आहेत. त्यांची सुध्दा हरकत आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः- मा.महापौरजी, याबाबत मी महासभेमध्ये एक प्रश्न विचारला होता, जकात विभागाच्या उपायुक्तांनी मला उत्तर दिलेले आहे. नविन जी निविदा उघडेल त्यावेळी सपना गार्डनमध्ये मध्यवर्ती जकात नाका दिला जाणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- याचा अर्थ असा आहे की, आपण चोरी केली, ठिक आहे. उदयापासुन करणार नाही.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-मला वाटते आपण याबाबतीत खुलासा करावा की, येथुन मध्यवर्ती जकात नाका हटविला जाईल.,

मा.महापौरः-नागरिकांच्या सुध्दा याबाबत तक्रारी आलेल्या आहेत की, हा जो मध्यवर्ती जकात नाका आहे तो तेथुन हटविला जावा. व तो दुस-या एखादया योग्य त्या ठिकाणी स्थानांतरीत केला जावा. कारण लोकांना जे गैरसोयीचे होत आहे ते होऊ नये.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-महापौरजी, धन्यवाद.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौरजी मी आपणांस विनंती करते की, एक वर्षा पासुन त्यांना जे मैदान दिले आहे त्याचे काही भाडे घेतले जावे. त्यांच्याकडुन भाडे वसुल केले जावे. ते ठरवा किती घ्यायचे ते?लग्न समारंभासाठी जर २००० रू. घेतले जातात तर हे तर व्यवसायीक वापर करतात. तर त्याच्याकडुन भाडे तर आपण घ्या ना, कारण की, आपणांस महसुल पाहिजे.

मा.महापौरः-ही जी निविदा त्यांनी मागविली होती त्यामध्ये त्यांनी भाडया बाबत काय शर्त घातली होती? घातली असेल तर ते त्यानुसार भाडे आकारणी करतील.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानीः-निविदा मागविली होती, निविदेची वेगळी गोष्ट आहे. दुसरी एखादी गोष्ट आपण त्याबरोबर जोडत आहात तर वेगळी गोष्ट आहे.

मा.महापौरः-त्यांना ते निःशुल्क देण्यात आलेले आहे. जकात नाका म्हणुन महापालिकेच्या वतीने ती जागा देण्यात आलेली आहे.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौर साहेब, माफ करा अशाप्रकारे हे फिरवुन फिरवुन उत्तर देणे आपल्याला शोभा देत नाही. जसे की, मी चोरी केली आहे, उदयापासुन करणार नाही.

मा.महापौरः-जी वस्तुस्थिती आहे ती मी आपल्या समोर ठेवली आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-ठिक आहे. आपण ऐवढे तर म्हटंलात की, हे चुकीचे आहे. अशाप्रकारच्या चुका महानगरपालिकेचे अधिकारी करू नयेत अशी मी आपणांस विनंतीही करते. व अपेक्षा सुध्दा ठेवते.
मा.सचिवः- प्रश्न क्र. ५६३ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५६३:-१)महानगरपालिकेत अस्तित्त्वात असलेला अन्न विभाग सद्या कोणाच्या अधिकाराखाली आहे?
२)सद्या तेथे प्रमुख कोण आहे?
३)त्यांचे वेतन कोण देते?
४)त्या विभागापासुन मिळणारे उत्पन्न (परवाना फी, नुतनीकरण फी, दंड इ. भरणा कोठे केला जातो?

उत्तर :- १)महापालिकेत अस्तित्त्वात असलेल्या अन्न विभाग वैद्यकीस आरोग्य अधिकारी, उमपाच्या अधिनसत आहे. २)म.न.पाच्या अन्न विभागात अन्न निरिक्षक हे प्रमुख असुन या विभागाचे सर्व काम वैद्यकीय आरोग्य अधिका-यांच्या देखरेखीखाली करतात.
३)श्री. के. व्ही. पिलाई सध्या मेसर्स मोनार्च इन्फा. प्राव्हेट लि. ऑक्ट्राय आहेत व त्यांचेवेतन मे. मानार्च के. अदा करते (११.५.२००० पासुन)ऑक्ट्रायचे कामा सोबत ते अन्न विभागातील कामे सुदधा करतात उदा. न्यायालयीन केसेस, तक्रारी प्रमाणे हॉटेल व अन्न विक्रेताची तपासणी.
४)मुख्यत: अन्नविभाग महाराष्ट्रशासन अधिनस्त असुन अन्न विक्रेत्याचे, हॉटेलचे परवाने नुतनीकरण, तपासणी इत्त्यादी (शुल्क आकारणी)विभागाकडे असल्यामुळे याबाबतीत म. न. पालिकेच्या त्यांच्यावर कोणत्त्याही प्रकारचे नियंत्रण नाही. तथापि न्यायालयीन केसेसमध्ये अशाबाबतीत दंडाच्या रक्कमेपैकी ८० टक्के रक्कम म.न.पा. केस प्राप्त होत असते. हेच एकमेव म.नगरपालिकाचे उत्पन्न आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-सन्मानानिय महापौरजी, महापालिका अस्तित्त्वात आल्यापासुन अन्न विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी म.न.पा यांच्या अधिन आहे. म.न.पाच्या अन्न विभागात अन्न निरिक्षक प्रमुख असुन या विभागाचे सर्व काम वैद्यकीय अधिकारी यांच्या देखरेखीखाली करतात. श्री. के.व्ही. पिलाई सध्या मेसर्स मोनार्च प्रा. लि. ऑक्ट्राय कॉन्ट्रक्टर यांच्याकडे प्रतिनियुक्तीवर आहेत. त्यांचे वेतन हे मोनार्च कंपनी अदा करते. परंतु हे ११.५.२००० पासुन ऑक्ट्रॉयचे काम सोबत ते अन्न विभागाचे काम सुध्दा करतात. उदा. न्यायालयीन केसेस, तक्रारी प्रमाणे हॉटेल व अन्न विक्रेता तपासणी हे काम सुध्दा ते करतात.

तर माझे म्हणणे आहे की, आजपर्यंत एक वर्षामध्ये किती तपासणी केली? एक वर्षापासुन ते ऑक्ट्रॉय मध्ये काम करत आहेत. तर त्यांचा पगार प्रायव्हेट ऑक्ट्राय वाले देतात, परत महानगरपालिका पण त्यांचा पगार देते का?

श्री. लांजेवार (सहाय्यक वैद्यकीय अधिकारी):-आजच्या परिस्थितीमध्ये सध्या ते कोनार्क किंवा मोनार्च मध्ये काम करत नाही. आज ते महानगरपालिकेतच काम करत आहे. सध्या त्यांच्याकडे कर निरिक्षकाचा चार्ज देण्यात आलेला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-मग हा पण चार्ज आहे का त्यांच्याकडे?



श्री. लांजेवार (सहाय्यक वैद्यकीय अधिकारी):-होय. अन्न निरिक्षकाचा चार्ज देण्यात आलेला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:- त्यांनी एका वर्षामध्ये काय काय केले? किती केसेस केल्या, किती आमदनी त्यांनी महापालिकेला मिळवुन दिली?

श्री. लांजेवार (सहाय्यक वैद्यकीय अधिकारी):-यासर्व, जितक्या काही केसेस करावयाच्या असतात त्याची जबाबदारी अन्न निरिक्षक जे महाराष्ट्र राज्याचे, ठाणे येथील आहेत त्यांच्याकडे फि, नुतनीकरण, दंड करणे ही सर्व कारवाई त्यांच्याकडुन केली जाते. नगरपालिकेच्या कालावधीमधील ज्याकाही केसेस कोर्टामध्ये जुन्या व प्रलंबित आहेत. त्याबाबतीत माहिती देण्यासाठी कोर्टात हजर होतात. व कोर्टामध्ये जो काही दंड वगैरे केला जातो. त्यापैकी ८० टक्के दंडाची रक्कम ही महानगरपालिकेला मिळत असते.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-ते खाजगी ठेकेदाराकडे काम करत असताना आपण पण त्यांना पगार देतो का?

श्री. लांजेवार (सहाय्यक वैद्यकीय अधिकारी):-आपण पगार देत नव्हतो.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-ठिक आहे. ठिक आहे.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५६४ हा श्री. राजेंद चौधरी यांचा असुन त्यांनी तो मागे घेतल्यामुळे तो वगळण्यांत आला आहे त्यामुळे कार्यवृतांतात त्याची नोंद घेता येत नाही.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५६५ हा श्रीमती.सुनिता राजवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५६५:-१)उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाची निवडणुक कधी पर्यंत होणे अपेक्षित आहे?
२)शिक्षण विभाग मंत्रालयातुन किंवा इतर कार्यालयातुन शिक्षण मंडळाची निवडणुकीबाबत कोणतेही आदेश किंवा या संदर्भास पत्र आलेले आहे का? आलेले असल्यास त्याची सविस्तर माहिती दयावी.

उत्तर :-१)दोन महिन्यात.
२)सदर विषयाबाबत शासनाचे शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग यांचे पत्र दिनांक ४.५.९९ सविस्तर माहितीसाठी सोबत जोडले आहे. आणि त्या संदर्भात उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी दिलेले उत्तर सोबत जोडलेले आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-मा.महापौर साहेब, मी असे विचारले आहे की, महापालिकेच्या शिक्षण मंडळाची निवडणुक कधी पर्यंत होणार? हा प्रश्न मी दि. ६.१२.२००० रोजी दिलेला आहे. तर येथे उत्तर दिलेले आहे, दोन महिन्यामध्ये. म्हणजे फेब्रुवारी पर्यंत? तर आता कुठला महिना आहे? चौथा महिना आहे.

मा.महापौर:-पाचवा महिना.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-दोन वर्षापुर्वी श्री. मनोहर जेस्वानी यांनी प्रश्न विचारला होता तेव्हा सुध्दा आपण असेच उत्तर दिले होते की, दोन महिन्यांमध्ये. आपले हे दोन महिने कधी पुर्ण होतील?

मा.महापौर:-जुन महिन्यामध्ये करू. जुन महिन्यामध्ये निवडणुका घेऊ या.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-नाही. नाही. किती वर्षापासुन निवडणुका घेतल्या नाहीत?

मा.महापौर:-जुन महिन्यामध्ये निवडणुका घेऊ. येणा-या महिन्यामध्ये.
मा.सचिव:- प्रश्न क्र. ५६६ हा श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा असुन त्यांनी तो मागे घेतल्यामुळे तो वगळण्यांत आला आहे. त्यामुळे कार्यवृतांतात त्याची नोंद घेता येत नाही.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५६७ हा श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा असुन त्यांनी तो मागे घेतल्यामुळे तो वगळण्यांत आला आहे. त्यामुळे कार्यवृतांतात त्याची नोंद घेता येत नाही.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५६८ हा श्री.नारायण पंजाबी यांचा असुन त्यांनी तो मागे घेतल्यामुळे तो वगळण्यांत आला आहे. त्यामुळे कार्यवृतांतात त्याची नोंद घेता येत नाही.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५६९ हा श्री. प्रमोद टाले यांचा असुन त्यांनी तो मागे घेतल्यामुळे तो वगळण्यांत आला आहे. त्यामुळे कार्यवृतांतात त्याची नोंद घेता येत नाही.

मा.सचिवः- प्रश्न क्र. ५७० हा श्रीमती. पन्ना वारिंगे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५७०:-ऐ)वेदर शिवकुमार सारस्वत, टॅक्स कलेक्टर हॅव मिस-अप्रोप्रिएटेड द म्युनिसिपल फंडस् टु द टयुन ऑफ रू.१,७५,०००/- ?
बी)वेदर डिपार्टमेंट इनक्वायरी वॉज इनीशिऐटेड अगेन्स्ट हीम ॲन्ड हु इज द इनक्वायरी ऑफिसर?
सी)व्हाय द इन्क्वायरी इज नॉट कंप्लीटेड ॲन्ड व्हाय द फायडिंगस् ऑफ द इन्क्वायरी आर नॉट रिपोर्टटेड येट?
डी)वेदर द इन्क्वायरी हॅज बीन स्ऑप टू फेवर ही ऑर टू कंन्टीन्यु द इमोरल कॅरेक्टर ॲट द कॉस्ट ऑफ म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन?
ठ)वेदर यु इनटेड टू कंम्पेन्ट द इन्क्वायरी ऑर नॉट?

उत्तर :-अ)यस, द अमाऊंट इन क्वेश्चन इज डिपोझिटेड वाइड रिसिप्ट नं. १९६६०, डेटेड. १६.१०.१९९६)
बी)यस, इनीशिऐटली मिस्टर. जे. एन. थदानी, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर वॉज अपॉइंटेड ॲज ॲन इन्क्वायरी ऑफिसर आफ्टर हिज रिटायरमेंट श्री. टी. जे. बालकृष्णन इज अपॉइंटमेंटेड ॲज ॲन इन्क्वायरी ऑफीसर.
सी)इन्क्वायरी प्रोसिडींग इज हेल्ड अप बिकॉज रेकॉर्ड /डॉक्युमेंट सिझड बाय पोलिस डिपार्टमेंट ॲन्ड सबमिटेड टू द कोर्टस. आफ्टर ऑब्टेंन्ड द सेम, इन्क्वायरी प्रासिडींग वील बी स्टाटेड ॲकॉडींग नेसेसरी इन्स्ट्रक्शन हॅज बीन गीवन टू इन्क्वायरी ऑफिसर.
डी)क्वेश्चन डझ नॉट ॲरिस.
इ)यस.
मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मागे घेतलेले प्रश्न किती होते व ते कोणाचे होते?
मा.सचिवः-पाहिजे तर मी सांगतो. प्रश्न क्र. ५६६ श्री. प्रभुनाथ गुप्ता, प्रश्न क्र. ५६७श्री. प्रभुनाथ गुप्ता, प्रश्न क्र. ५६८ श्री. नारायण पंजाबी, प्रश्न क्र. ५६९ श्री. प्रमोद टाले.
मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-प्रश्न कोणते होते? जे वगळण्यांत आले?

मा.सचिवः-जे प्रश्न वगळण्यांत आले आहेत त्यांचा उल्लेख करता येत नाही.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-मा.महापौरजी, माझा प्रश्न वरील प्रमाणे होता आणि मला त्याचे उत्तर दिले आहे की, त्यांने ती रक्कम जमा केली आहे. श्री. ढाकरे हे माझ्या प्रश्नाचे उत्तर देणार आहेत. श्री. ढाकरे साहेब मी आपणांस विचारले आहे की,श्री. शिवकुमार यांनी अफरातफर केली आहे. तर आपण उत्तर दिले आहे की, त्यांनी ती रक्कम जमा केली आहे. म्हणजे याचा अर्थ असा की, कुणी अफरातफर करून रक्कम जमा करेल तर ठिक आहे? म्हणजे एखादयाने गुन्हा करायचा आणि त्यानंतर त्याची भरपाई केली म्हणजे झाले?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-श्री. शिवकुमार सारस्वत यांच्यावर अफरातफरीचा आरोप होता. या अफरातफरीच्या आरोपानुसार जी रक्कम त्यांनी अफरातफर केली होती. ती रक्कम त्यांनी भरली आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-त्यांनी ती रक्कम भरली म्हणजे त्यांचा गुन्हा संपला?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-त्यांचा गुन्हा संपला नाही. त्याच्याविरोधात खातेनिहाय चौकशी व फौजदारी चौकशी....

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-खातेनिहाय चौकशी कधी पर्यंत चालु राहील? माझा पुढचा प्रश्न हाच आहे. आपण चौकशी अधिकारी म्हणुन श्री. जे.एन.थदानी यांची नेमणुक केली होती. त्यांची नेमणुक कधी केली होती?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-तत्कालिन नगरपालिकेच्या कालावधीतील हे प्रकरण आहे. तेव्हा श्री. थदानी हे उप मुख्याधिकारी होते. व त्यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक केली होती.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-नेमणुक केल्यानंतर त्यांनी काय केले? आपली जर एखादया पदावर नेमणुक केली. परंतु आपण काही कार्यवाहीच केली नाही तर आपली नेमणुक करण्याचा फायदाच काय?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-चौकशी अधिकारी म्हणुन त्यांची नेमणुक केली होती. तत्कालिन नगरपालिकेने ठराव पारीत केला होता की, चौकशी पुर्ण न करता त्यांना कामावर घेतले जावे. कोर्टाचा जो निर्णय होईल तो बंधनकारक राहील. त्यानंतर सुध्दा कोर्टाच्या निर्णयावर अवलंबुन न राहता चौकशी अधिकारी श्री. थदानी साहेब, यांच्या निधनानंतर खरेदी अधिकारी श्री. टी.जे. बालकृष्णन यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक केली. परंतु कागदपत्रा अभावी त्यांच्या चौकशीचे काम थांबले होते. याप्रकरणीचे कागदपत्र कोर्टामध्ये सादर करण्यासाठी पोलिसांनी जप्त केले होते.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-आपण मला हे सांगा की, पोलिसांनी जे कागदपत्र जप्त केले ते मागविण्यासाठी आपण पोलिसांना पत्र लिहिले होते का? मुळ कागदपत्र परत करा म्हणुन? आपण काय केले?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-पोलिसांना पत्र लिहिले आहे की, कोर्टाकडुन मुळ कागदपत्र आम्हाला परत मिळवुन दया. या प्रकरणाची खातेनिहाय चौकशी आम्हाला पुर्ण करावयाची आहे.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-पोलिसांनी काय उत्तर दिले? हि अफरातफर कधी झाली होती?

श्री.ढाकरे(उप आयुक्त):-१९९६ मध्ये पैसे भरून......

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-पैसे भरून नाही. अफरातफर कधी झाली होती हे मी विचारत आहे.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-नेमकी कधी अफरातफर झाली होती याची माहिती सध्या माझ्याकडे येथे नाही आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-अंदाजे १९९४-१९९५, १९९६ मध्ये त्यांनी पैसे भरले. त्याअगोदर हे झाले असावे?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- बरोबर, बरोबर.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- बरोबर आहे ना? १९९७ मध्ये तर अफरातफर केली नाही ना? पहिले पैसे भरून नंतर अफरातफर केली असे तर नाही ना? निश्चितच ते १९९५ असेल, १९९५-२००१ पर्यंत आपण चौकशी अधिकारी बदलत, कधी श्री. जे.एन.थदानी तर कधी श्री. बाळकृष्णन.

महापालिका नागरिकांना म्हणते की, आपण वेळेवर कर भरा. व जेव्हा नागरिक आपणांवर विश्वास ठेऊन करांचे पैसे भरतात तेव्हा आपले अधिकारी त्या पैशांची अफरातफर करतात. व सहा महिन्यापर्यंत चौकशी केल्यानंतर सुध्दा जर त्या चौकशीतुन काहीही निष्पन्न होत नाही व आपण त्यांना पुन्हा कामावर घेता. याच प्रकारे श्री. नरसिंगानी यांनी १९८९ मध्ये हजेरी पत्रकावर हेराफेरी केल्या मुळे त्यांना १९९९ मध्ये म्हणजे दहा वर्षांनंतर कामावरून काढुन टाकले. याचा अर्थ असा की, दहा वर्षामध्ये आपली खातेनिहाय काही चौकशी होत नाही. त्यांना कोर्टाने कामावरून काढुन टाकले आहे. आपण कोर्टाच्या निर्णयाची वाट पहाता की, केव्हा कोर्ट निर्णय देते. त्यानंतर आपण निर्णय घेणार? खातेनिहाय चौकशीचा खोटा देखावा का देता? खातेनिहाय चौकशी, खातेनिहाय चौकशी असे का सांगत रहता? कोणत्या प्रकारची खातेनिहाय चौकशी आपण करता?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-चौकशी पुर्ण झाल्यानंतर सुध्दा फौजदारी केसची चौकशी चालु राहील त्या केसचा निर्णय बंधनकारक राहील. त्या आधारावर त्यांना पुर्ववत कामावर घेतले आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-</u>हे तुम्ही मला सांगु नका. जेव्हा गुन्हयाची नोंद होते. तेव्हा ती भारतीय दंडसंहितेच्या कलमाखाली होत असते. ते आपण मला शिकवु नका.मी आपणांस खातेनिहाय चौकशी बाबत विचारत आहे.आपणांस जर खातेनिहाय चौकशीचे अधिकार आहेत तर त्या चौकशीस काही कालावधी? सात वर्ष, आठ वर्ष? कोर्टाच्या निर्णयानंतर सुध्दा आपण खाते निहाय चौकशी करत राहणार?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- चौकशी अधिका-यांना निर्देश दिलेले आहेत की, कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्याच्या आत खातेनिहाय चौकशी पुर्ण करा.

<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-</u>तर सहा महिने सहा वर्षात सुध्दा झाले नाहीत का अद्याप पर्यंत?



श्री. ढाकरे(उप आयुक्त):- कोर्टाकडुन कागदपत्रे आणि पावती पुस्तके अद्याप मिळाली नाहीत.

<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-</u>कागदपत्रे मिळविण्यासाठी आपण काय कार्यवाही केली? आपण किती वेळा पत्र लिहिली, पोलिसांना व कोर्टाला?

श्री. ढाकरे(उप आयुक्त):- पोलिसांना पत्र लिहिले आहे की, मुळ कागदपत्र आम्हाला परत करा.

<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-</u>कितीवेळा? एक वेळा, दोन वेळा, चार वेळा, सहा वेळा? व पोलिसांनी काय उत्तर दिले? ते सांगा.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-या प्रकरणी दोन दिवसात लेखी स्वरूपात मी आपणांस उत्तर देता. पोलिसांना जी पत्र लिहिली आहेत, किती वेळा पत्र लिहिली आहेत?

<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-</u>मी माझा प्रश्न १ जानेवारी ला दिलेला आहे. पाच महिन्यामध्ये आपण समाधानकारक उत्तर देऊ शकला नाहीत. पाच महिन्यामध्ये आपण काही करू शकला नाहीत तर आणखी दोन दिवसाची वेळ मागत आहात. आपणांस वेळ देण्यास मी तयार नाही.जसे श्रीमती. सुनिता राजवानी यांनी सांगितले की, अधिका-यांनी सभेला येताना अभ्यास करून

आले पाहिजे. तर मग आपण काय अभ्यास केला आहे? जेव्हा आपण दुस-या अधिका-यांना निर्देश देता की, महासभेत येताना प्रश्नोत्तराच्या तासा संबंधी अभ्यास करून यावा. तर आपण स्वतः काय अभ्यास केला आहात? याचे उत्तर आपण दया.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-_यासाठी चौकशी अधिका-याची नेमणुक केली आहे त्यांना आदेश दिले आहेत की, सहा महिन्याच्या आत चौकशीचे काम पुर्ण करा.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-तुम्ही तेच तेच उत्तर देत आहात. तुमच्या उत्तराने मी समाधानी नाही. याबाबत माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-_आपणांस कागदपत्रानुसार तारीख वार सविस्तर माहिती पाहिजे,....

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-जेव्हा श्री. आर.डी. शिंदे हे आयुक्त होते तेव्हा त्यांनी याबाबतची सविस्तर माहिती मला दाखविली होती. श्री. बालकृष्णन हे दुसरे चौकशी अधिकारी होते त्यांनी असे लेखी स्वरूपात दिले आहे की, या प्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने चौकशीचे काम थांबविण्यांत आले आहे.

श्री. ढाकरे(उप आयुक्त):-आपल्या प्रश्नानुसार चौकशी अधिका-यास निर्देश दिले आहेत.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारींगे:-परंतु चौकशीचे काम का थांबविले? कोणत्त्या केस संदर्भात आणि कोणात्त्या आधारावर?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-शिवकुमार यांना पुन्हा कामावर घेताना त्यावेळच्या महासभेने असा निर्णय घेतला होता की, चौकशी पुर्ण केली जाऊ नये.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- जर महासभा काही निर्णय घेत असेल तर तो कायदयाशी विसंगत आहे. जर आपण टाऊन हॉल बददल बोलत असाल तर तो ठराव सुध्दा का रदद केला गेला? कोणत्ताही नियम हा कायदयाशी सुसंगत असतो महासभा कायदयाच्या विसंगत निर्णय घेत आहे? महासभेला जर अधिकार आहेत तर ते किती आहेत? महासभेच्या अधिकाराला काही मर्यादा आहेत. प्रत्येक अधिकारांना मर्यादा आहेत. तुम्ही जर अधिकार देत असाल तर ते कायदयाशी विसंगत आहेत.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-त्यावेळच्या नगरपालिकेच्या निर्णयास आम्ही काय करणार?नगरपालिकेच्या पुर्ण महासभेचा तो निर्णय होता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-नगरपालिकेचा निर्णय होता, परंतु चौकशी अधिकारी म्हणुन श्री. टी. जे बालकृष्णन यांची जी नियुक्ती केली होती. त्यांनी काय चौकशी केली?

श्री. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-श्री. टी. जे बालकृष्णन यांना जे कागदपत्र पाहीजे होते ते उपलब्ध करण्याची जबाबदारी....

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-आपण त्यांना ते कागदपत्र उपलब्ध का करून दिले नाहीत?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-पोलिसांना पत्र लिहिले आहे. न्यायालयीन प्रकरण आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगे:- पाच महिन्यापासुन आपण फक्त पोलिसांना पत्रच लिहिले आहे. पोलिसांनी आपणांस ते कागदपत्र दिले नाहीत. हे कसे शक्य आहे. आपण त्यांना पत्र दिले आहे. परंतु ते लोक आपणांस कागदपत्रांच्या प्रती देत नाहीत. ना मुळ कागदपत्र देत आहेत.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-न्यायालयीन प्रकरणात आम्ही काय करणार?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगे:-जर त्यांनी अफरातफर केली नसती तर त्यांनी ते पैसे जमा केले असते? नाही. त्यांनी पैसे जमा केले यावरून स्पष्ट होते की ते निष्पाप नाहित. त्यांची त्यात चुक आहे.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-त्यांनी अफरातफर केली म्हणुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगे:-हे पहा, अफरातफर केली म्हणुन फौजदारी गुन्हा दाखल केला यामध्ये आम्हाला काही सारस्य नाही. चौकशी मध्ये तुम्ही काय केलेत?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-चौकशी सहा महिन्याच्या आत पुर्ण केली जावी असे चौकशी अधिका-यांला निर्देश दिले आहेत.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगे:-१९८९ मध्ये जेव्हा श्री. नरसिंघानी यांनी हजेरी पत्रकात हेराफेरी केली होती तेव्हा १९९९ मध्ये जेव्हा कोर्टाने त्यांना कामावरून कमी करण्याचा निर्णय दिला. म्हणजे दहा वर्ष आपण खातेनिहाय चौकशीच करत होतात? म्हणजे याचा अर्थ असा की, खातेनिहाय चौकशी



करण्यात तुम्ही सक्षम नाहीत? व अशा लोकांना तुम्ही पुन्हा कामावर का घेत आहात?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-खातेनिहाय चौकशीचा अहवाल पुर्ण झाल्यानंतरही कोर्टाच्या निर्णया पर्यंत वाट पहायची आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वार्रिंगे:-कोणत्त्या कलमानुसार? खातेनिहाय चौकशी पुर्ण झाल्यानंतर ..... विधी अधिकारी कृपया मला या प्रश्नाचे उत्तर दया की, जेव्हा खातेनिहाय चौकशी पुर्ण होते. एखादया व्यक्तीने जेव्हा अफरातफर केलेली असते आणि त्याप्रकरणामध्ये दोषी असल्याचे आढळुन येते. तर काय आपण कोर्टाच्या निर्णयाची वाट पहात रहायची?आपण म्हणालात की त्यांना निलंबित केले होते.

मा.सचिव:- आपल्या माहितीसाठी मी हे सांगु इच्छितो की,या केसमध्ये त्यांनी जी अफरातफर केली होती त्याबाबत गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर त्यांना निलंबितही करण्यांत आले होते. निलंबित केल्यानंतर त्यांनी एक पत्र देखील दिले होते की, मी (जी अफरातफर केली आहे) ती सर्व रक्कम भरण्यास तयार आहे आणि त्यावेळची जी नगरपालिका होती. नगरपालिकेच्या महासभेसमोर एक ठराव समंत झाला होता की, यांना कामावर घेतले जावे व पैशांची भरपाई करून घेतली जावी. व पोलिसात जो गुन्हा दाखल केला आहे,

जी फौजदारी केस चालु आहे. त्याचा निर्णय येईपर्यंत ही खातेनिहाय चौकशी थांबविण्यात यावी.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-हे कायदयाशी सुसंगत आहे की विसंगत आहे?

मा.सचिव:-तो ठराव चुकीचा होता की बरोबर? कृपया माझे ऐकुन घ्या.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-मी काय विचारत आहे? आपण मला सांगत आहात, ठराव. ठराव अ, ब,क, ड कोणताही असो. मला त्याच्याशी सारस्थ नाही. मी आपणांस हेच विचारत आहे की, ते कायदयाशी सुसंगत आहे की, विसंगत?ते चुकीचे आहे की बरोबर?

मा.सचिव-ठराव चुकीचा जरी असला तरी जोपर्यंत त्यास आव्हान दिले जात नाही तो पर्यंत त्याची अंमलबजावणी करायचीच आहे. त्यावेळच्या नगरपालिकेने किंवा अधिका-याने सदरचा ठराव रदद करण्यासाठी शासनाकडे पाठविला नव्हता. त्यामुळे त्या ठरावाची अंमलबजावणी झालेली आहे. जर आपणांस वाटत असेल की, त्या ठरावामध्ये काही बदल केले जावेत तर आपण त्या ठरावामध्ये सुधारणा करण्यासाठी तो ठराव पुन्हा महासभेपुढे आणला पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-जर त्या ठरावामध्ये चुक आहे तर निश्चितच त्या ठरावामध्ये सुधारणा होऊ शकते. जर चुक नसेल तर सुधारणा करता येणार नाही. मी आपल्याला विचारू इच्छिते ते, एकदम स्पष्ट आहे की, ते चुकीचे आहे की बरोबर?

मा.सचिव-ठराव चुकीचा होता परंतु कुणी त्यास आव्हान दिले नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-नाही, नाही, नाही. आव्हानाबाबत मी बोलत नाही. मी याबाबत विचारत आहे. आपण पहिले जे वाक्य म्हंटलात की, ठराव चुकीचा होता?



मा.सचिव:-ठराव चुकीचा होता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-तर त्याची अंमलबजावणी का झाली?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-चुकीच्या ठरावांवर अंमलबजावणी होते?

मा.सचिव:-कृपया ऐकून घ्या. येथील जे उच्चतम प्राधिकरण असते ते महासभा असते. जर त्यांचा ठराव रदद करायचा आहे तर त्यांच्यावर राज्य शासन आहे. त्यावेळी कुणी शासनाला हा ठराव रदद करण्याबददल लिहिले नाही. त्यामुळे महासभेचा जो ठराव होता तो अंतिम होता.तो चुकीचा असो किंवा बरोबर त्याबाबत आता काही बोलु शकत नाही. जर आता आपणांस असे वाटत असेल की, त्या ठरावामध्ये बदल केला जावा. किवा सुधारणा केली जावी. तर तो ठराव पुन्हा एकदा महासभेपुढे ठेवावा लागेल. व चौकशीची प्रक्रिया चालु करावी लागेल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-नाही. नाही. तो ठराव शासनाकडे का पाठविण्यांत आला नाही? महापौर साहेब ठराव चुकीचा होता. परंतु त्याची अंमलबजावणी झाली. असे आहेत येथील अधिकारी. ठराव चुकीचा होता हे ते मान्य करतात. परंतु तरीही त्याची अंमलबजावणी झाली.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-याचा अर्थ असा की, येथील महासभा चुकीचा ठराव करत असेल तरीही त्याची अंमलबजावणी होते. तरी ते असेच चालेल?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- आता आपले याबाबत मत काय आहे? ठराव चुकीचा असुन त्याची अंमलबजावणी व्हावी, महापौर साहेब याबाबत आपले काय मत आहे?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-हा ठराव पुढच्या महासभेत सुधारणा करण्यासाठी आणला जाईल असे आपण मला आश्वासन देता का?अन्यथा.... याचप्रकारे श्री. अनिल जयसिंघानी व इतरांनी अफरातफर केली आहे अशाप्रकारे अफरातफर होत राहील तर, जर सक्त कार्यवाही केली नाही तर जनतेचे पैसे.....

मा.महापौर:- मॅडम, चौकशी पुन्हा चालू करण्यासाठी महासभेला दुसरा ठराव करावा लागेल. असे विधी अधिका-यांचे कायदेशिर मत आहे. तो जो ठराव होता तो नगरपालिकेच्या कालावधीतील होता. आता नव्याने ठराव तयार करावा लागेल.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-नवीन ठराव, आपण चौकशी बाबत बोलत आहात. मी त्या ठरावाबाबत बोलत आहे. जो चुकीचा होता. त्या कर्मचा-यास पुन्हा कामावर घेतले आहे.

मा.महापौर:-तो यापुर्वीच्या नगरपालिकेने केलेला ठराव आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-ठिक आहे. जर ठराव कोणत्त्या सभेने पारित केला आहे. हा प्रश्न नाही तर तो ठराव पूर्ण बरोबर आहे. कि चुकीचा?

मा.महापौर:-आता तुम्हाला काय पाहिजे ते सांगा.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-मला त्या ठरावामध्ये सूधारणा करुन पाहिजे. आपण तो ठराव सुधारणा करण्यासाठी ठेवला जावा. व निलंबित केले जावे.

मा.महापौर:-चौकशी ?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-नाही, नाही, त्या कर्मचा-यास निलंबित केले जावे.

मा.महापौर:- त्या कर्मचा-यास निलंबित केले पाहिजे ना?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-त्या कर्मचा-याला निलंबित केले पाहिजे.

मा.महापौर:- चौकशी पूर्ण होण्याअगोदर दोषारोप सिध्द होण्याअगोदर आपण त्यांना बडतर्फ करु शकत नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-ठिक आहे, सहा वर्ष कार्यालयाने काय केले ते मला सांगा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- मा. महापौरजी, ठराव चूकीचा, चौकशी १० वर्षापासून चालु आहे.

मा.महापौर:- एक वेळ त्यांना निलंबित केले होते, त्यानंतर त्यांना पुन्हा कामावर घेतले.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-ठिक आहे की, जर आपण कायदेशीर मुददयांचा विचार केला तर, त्यांनी पैसे भरले याचा अर्थ त्यांनी गुन्हा कबुल केला आहे. एका दोषारोपित माणसास आपण कामावर ठेवले आहे. श्री. शिवकुमार यांना कामावर ठेवल्यामुळे श्री. नरसिंघाणी यांच्या वेळेस कार्यालयाने हा मुददा उपस्थित केला. त्यामुळे श्री. अनिल जयसिंघाणी यांनी सुध्दा पैशाची अफरातफर केली.

मा.महापौरः- संबंधित कर्मचा-यांविरूध्द खातेनिहाय चौकशी चालु आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-महापौर साहेब,मी आपणांस काय सांगत आहे. महासभेच्या कोणत्त्याही निर्णयाची कठोरपणे कार्यवाही केली नाही तर कोणताही व्यक्ती सहजपणे त्याचे उल्लंघन करेल. एकीकडे आपण जनतेला आश्वासन देता की, आपले कर वेळेवर भरा व दुसरीकडे येथील अधिकारी त्यांची अफरातफर करतात.

मा.महापौरः- आयुक्तांना निर्देश देतो की, संबंधित व्यक्ती जर चौकशी अंती दोषी आढळुन आला तर त्यास कामावरून काढुन टाकले जावे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- आपण मला आश्वासन देता?

मा.महापौरः- जर ते दोषी आढळुन आले तर त्यांना कामावरून काढून टाकले जाईल.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-ठिक आहे.

मा.सचिवः- प्रश्न क्र. ५७१ हा श्रीमती.पन्ना वारिंगे यांचा आहे.

--३०--

प्रश्न क्र. ५७१:-वेदर द बिल्डिंग धरम पॅलेस कंन्स्ट्रक्टींग ऑफ ग्राऊंड प्लस ३ स्टोरी सिटयुएटेड ॲट शांतीनगर, उल्हासनगर-३ इज मेड ॲज पर प्लान ऑर विदआऊट प्लॅन?
बी)इफ मेड विदआऊट परमिशन ऑर इन वायोलेशन ऑफ सॅक्शनड प्लान, व्हाय द ॲक्शन ऑफ डिमोलेशन इज नॉट कंम्पेन्टेड?
सी) वेदर यु वुल्ड डिमॉलिश द स्ट्रक्चर इन क्वेश्चन ऑर नॉट?

उत्तर :-ओ) द बिल्डींग धरम पॅलेस सिच्युएटेड ॲट शांतीनगर उल्हासनगर-३ इज ऑफ ग्राऊंड + ३ आरसीसी कंन्स्ट्रक्शचन कंन्स्ट्रटेड विदआऊट प्लान इन द यीअर १९९८ ॲन्ड बिफार.
बी)द स्ट्रक्चर इन क्वेश्चन वॉज डिमॉलिश्ड बाय ॲन्टी इनक्रोचमेंट डिपार्टमेंट. वद ४.२.९८ ॲन्ड १५.४.९८ डिपॉझिट ऑफ डिमॉलिशड टवॉइस, द बिल्डर हॅज अगेन कंन्स्ट्रशन द सेम स्ट्रक्शचर इन १९९८.
सी)ॲज पर डिसकसींग जी. बी. मिटिंग ऑफ जुलै, ९९ इट वॉज डिसकस नॉट टू डिमॉलिश ओल्ड स्ट्रक्चर पीरीअर टू जुलै, ९९. हेन्स नो ॲक्शन हॅज बीन टेकन आफ्टर जुलै, ९९ बाय ॲन्टी इन्क्रोचमेंट डिर्पामेंट.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे यांनी आपला वरील प्रश्न वाचुन दाखविला.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-आपण मला याचे उत्त्तर दिले आहे की, या इमारतीचा प्लॅन पास झालेला नाही. व ही इमारत १९९८ मध्ये तयार झाली आहे. नाही. नाही. ही धरमपॅलेस इमारत म्हणजे काय आहे? निवासी की व्यावसायिक इमारत, रेस्टॉरंट, हॉटेल, पार्कींग इत्त्यादी काय आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-मी हे बांधकाम पाहिलेले नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- आपण हे बांधकाम पाहिले नाही? पाच महिन्यापासुन माझा प्रश्न आहे, परंतु आपणांस तेवढा वेळ नाही, बांधकाम पाहण्यास?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- क्षेत्रिय अधिका-यांकडुन मी चौकशी केली...

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-आपण मला उत्तर दिले आहे. आपण उत्तर देऊन पाच महिने झाले. आपण काय समजता की, उत्तर देऊन आरामशिर झोपणे,

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- वापर काय त्याबाबत आपण विचारले नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- ज्या इमारतीबाबत प्रश्न आलेला आहे. त्या इमारतीची पहाणी करून आले पाहिजे. ऐवढा सुध्दा आपण विचार केला नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- क्षेत्रिय अधिका-यांकडुन मी जो अहवाल मागविला होता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-त्यामध्ये त्यांनी आपणांस काय सांगितले? ते निवासी की व्यावसायिक आहे.

--३१--

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- हॉटेल आहे म्हणुन सांगितले.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- हॉटेल सह लॉजिंग? त्यास जो परवाना मिळालेला आहे. त्यासाठी त्यांनी काहीतरी कागदपत्रे त्यांना पुरविली असतीलच? विना कागदपत्र त्यांना परवाना तर दिला नसेलच? तर त्यांनी कोणकोणते कागदपत्र दिले? या बांधकामाबाबत आपण स्वत: लिहिले आहे की, हे बांधकाम प्लॅन प्रमाणे नाही. प्लॅन पास झाला नाही असे आपण लिहिले आहे. तर अशाप्रकारे त्यांना परवाना कसा मिळाला?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- परवाना पास करण्याचा जो प्रश्न आहे तो माझ्या विभागाशी संबंधित नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-तर मग आपण उत्तर का दिले, जर आपल्या विभागाशी संबंधित नाही?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- उत्तर जे दिले आहे ते आपल्या प्रश्नाचे दिले आहे, परवाना देणा-या प्राधिकरणाबददल मला काही विचारले गेले नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- मी हे विचारते आहे की, असे कोणते कागदपत्र आहेत त्यांच्याकडे की ज्यानुसार त्यांना परवाना दिला गेला आहे. एकतर आपण प्लॅन मंजुर केला आहे किंवा आपण काही लेखी दिले आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- नाही. नाही. आपण इथे आता मला जे प्रश्न विचारत आहात ते पोलिस खात्याशी संबंधित आहेत.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- पोलिस खात्त्याशी संबंधित आहेत?जेव्हा आम्ही एखादे बांधकाम करतो तेव्हा पोलिस खाते आम्हाला कागदपत्र देतात की, ज्यावरून आम्ही जाऊन परवाना काढावा? परवाना त्यांनी दिला आहे ते नाही. परवान्यासाठी त्यांनी कोणकोणते कागदपत्र जमा केले त्याबाबत मी विचारत आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- आपण जे म्हणत आहात की, परवाना मिळविण्यासाठी त्यांनी तेथे कोणकोणते कागदपत्र जमा केले आहेत?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-होय . निश्चितच.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- हे मला कसे माहित पडेल?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- हे पहा. एकतर महानगरपालिकेने त्यास बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला दिला असेल?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- परवाना मिळविताना परवाना प्राधिकरणाकडे त्यांनी कोणकोणते कागदपत्र जमा केले ते मी कसे सांगु शकेन?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला दिला असेल त्याशिवाय परवाना दिला जात नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):- बांधकाम पुर्णत्त्वाच्या दाखल्याबाबतचा जो प्रश्न आहे त्याबाबत मी आपणांस सांगतो की, ते पुर्ण



बांधकाम पुर्णपणे बेकायदेशिर आहे. त्यामुळे त्यास बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- तर मग तोडणार कधी?जर अनाधिकृत आहे?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-बांधकाम अनाधिकृत आहे म्हणुन सांगता, पाच महिन्यापासुन प्रश्न दिलेला आहे. आजपर्यंत आपण ते बांधकाम तोडले नाही. त्यावर लक्ष सुध्दा दिले नाही. तर ठिक आहे आपण त्याबाबत निकाल दया. पुढच्या महासभेत आम्ही त्याबाबत प्रश्न विचारू. ठिक आहे? महापौर साहेब. माझे बरोबर आहे की चुकीचे?

मा.महापौर:- आपल्या प्रश्नाचा भाग सी जो आहे, त्याचे उत्तर दिले गेले आहे की, ते बांधकाम जुलै १९९९ पुर्वीचे आहे. व महापालिकेच्या धोरणानुसार जी बांधकामे विकास आराखडयास बाधीत होत नाहीत.......

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- झोपडपट्टीसाठी शासनाचा निर्णय (जी. आर)आला होता. हॉटेलसाठी नव्हता. आपण प्रत्त्येक वेळी १९९५ ची री ओढता.

मा.महापौर:-मी १९९५ बाबत बोलत नाही तर १९९९ बाबत बोलत आहे. १९९९ च्या जुलैनंतर जी बांधकामे तयार झाली आहेत महानगरपालिका त्यावर कारवाई करेल. त्याअगोदर जर काही बांधकामे तयार झाली असतील, विकास आराखडयास बाधीत होत नसतील तर ती वगळली जातील. या महासभेत कित्त्येकवेळा याबाबत चर्चा झालेली आहे. व महापालिकेचे ते सर्वश्रुत धोरण आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-ते या प्रश्नाच्या बरोबर आपण दिले असते......

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- टिल्सन मार्केट कधी तोडले होते?
मा.महापौरः-त्यासाठी उच्च न्यायालयाने आदेश दिला होता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- महासभेचा १९९९चा जो ठराव आहे तो वैद्य आहे का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौर साहेब, म्हणजे प्रत्येक गोष्टीसाठी आम्ही कोर्टात जावे?

मा.महापौरः-जे महापालिकेचे धोरण आहे. महापालिका त्याची कार्यवाही करत आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-महापालिकेचे धोरण सांगु नका. महापालिकेचे धोरण हे लोकांशी असते. कायदयाशी विसंगत नसते. आपण म्हणाल की, जे बांधकाम पुर्णपणे अनाधिकृत आहे. व १९९८चे आहे तर आम्ही त्यास तोडणार नाही. हे बरोबर आहे का? विधी अधिका-यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे. कारण की हा कायदेशिर मुददा आहे त्यांना स्पष्टीकरण करू दया.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-मा.महापौरजी, श्रीमती. पन्ना वारिंगे यांनी जो प्रश्न विचारला आहे तो एकदम बरोबर आहे. परंतु आपण वारंवार सांगितले आहे की, १९९९ पुर्वीची बांधकामे असतील ती तोडली जाणार नाहीत. हे जेव्हा



पासुन चालु झाले, जेव्हा मी श्री. बोधा यांची इमारत तोडण्याबाबत सांगितले होते. तेव्हा पासुन हे शब्द आपण चालु केले आहेत.

मा.महापौरः-कुणाची इमारत?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- अशोक बोधा यांची, ऐकुन घ्या.

मा.महापौरः-मी आपणांस सांगु इच्छितो की, या गोष्टीचा कुण्या एका इमारतीशी काहीही संबंध नाही. हे सर्वसाधारण धोरण आहे. जेव्हा श्री. चंद्रशेखर इथे आले होते तेव्हा सर्व पक्ष्यांच्या नेत्त्यांची त्यांच्याबरोबर सभा झाली होती त्या सभेत हा निर्णय घेतला होता.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-परंतु मी श्री. चंद्रशेखर यांना पत्र देऊन विचारणा केली आहे. व नागपुर येथे त्यांना मी भेटलो आहे. व त्यांना विचारले की, आपण स्थायी समिती सभागृहात महापौरांबरोबर अशी काही चर्चा केली आहे का? की, १९९९ पुर्वीचे बांधकाम तोडले जाणार नाही. तर ते म्हणाले की, मी असे काही आश्वासन नाही दिले, ना मी चर्चा केली, ना काही केले. आपण मला पत्र दया त्या पत्राचे उत्तर आता जे आयुक्त आहेत त्यांना मी देईन, असे आश्वासन त्यांनी मला नागपुर येथे दिले. दुसरी एक गोष्ट मी सांगु इच्छितो की, महापालिका म्हणते की, १९९९ पुर्वीची बांधकामे तोडली जाणार नाहीत. त्यांना आश्रय दिला जाईल. लोक आयुक्तांकडे जेव्हा एखादे प्रकरण जाते व तिकडुन आदेश आल्यानंतर ढाकरे साहेब म्हणतात की, जाऊन हे बांधकाम तोडा. कोर्टाची, सुप्रीम कोर्टाची, हाय कोर्टाची ऑर्डर आल्यानंतर जसे पन्ना वारिंगे यांनी सांगितले की, टिल्सन मार्केट कसे तोडले गेले? तर आपण काय म्हणालात की कोर्टाची ऑर्डर होती. बरोबर आहे? महापालिका जेव्हा एखादा निर्णय घेते तेव्हा त्याबाबत कोर्टाकडुन आदेश

आल्यानंतर महापालिकेची किती बेइज्जत होते? १९९९पुर्वीच्या बांधकामास महापालिका आश्रय देते व वरुन जेव्हा त्याविरुध्द निष्कासनाचे आदेश येतात, तेव्हा महापालिकेची किती बेईज्जत होते?जेव्हा अशा प्रकारचे आदेश लोक-आयुक्त व कोर्टाकडुन येतात, त्यामुळे महापालिकेची काही इज्जतच रहात नाही, तर महानगरपालिका जे धोरण ठरविते त्याला काही किंमतच नाही. श्री. ढाकरे साहेब मी जे बोलत आहे, ते आपण ऐकत आहात ना? ढाकरे साहेब आपण ऐकत आहात ना? मी काय बोलत आहे ते? उप-महापौरांशी नंतर बोला. माझ्या प्रश्नाचे उत्तर दया, १९९९ पर्यंतची जी बांधकामे आहेत त्यांना महापालिकेकडुन आश्रय दिला जात आहे. अशा प्रकारे ठरले आहे, कित्त्येक वेळा महासभेमध्ये अशी चर्चा झाली आहे. परंतु मी हे विचारु इच्छितो की, लोक-आयुक्तांकडे ज्या तक्रारी केल्या जातात किंवा कोर्टात जातात, तर महापालिका जे नियम तयार करते त्यांची किंमतच काय? आपण सांगा ना, अशा प्रकारे ठराव तयार करत जाणार, अंमलबजावणी करत जाणार, व वरुन निष्कासनाचे आदेश येणार त्यामुळे महापालिकेला काही किंमतच नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- श्री. कुकरेजा साहेब, मी आपणांस विचारु इच्छिते की, महासभा ठराव पारित करण्यामध्ये सक्षम आहे काय?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- आता अनाधिकृत बांधकाम विभागाच्या अधिका-यांशी चर्चा करतो, आम्ही लोकप्रतिनिधी शहराच्या विकासासाठी दोन-दोन, चार-चार तास वेळ खर्ची घालून येथे येऊन चर्चा करतो,परंतु ज्या महासभेत प्रश्नाचे बरोबर उत्तर मिळत नाही, त्या महासभेचे कामकाज चालविण्यात काय अर्थ आहे.या उल्हासनगर शहरामध्ये असे आहे की, आंधळा दळतो व कुत्रा पिठ खातो. असे चालले आहे. अधिकारी लोक याचे उत्तर देऊ



शकत नाहीत. उत्तर देऊ शकले असते तर म्हणाले असते, माईक दया इकडे आम्ही उत्तर देतो.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-मोरे साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, सन्माननिय नगरसेविका श्रीमती. पन्ना वारिंगे,शहरातील अनाधिकृत बांधकाम त्याचा कालावधी याबाबत सर्व पक्षीय गटनेते, नेते, तत्त्कालिन आयुक्त यांनी निर्णय घेतलेला आहे. तो निर्णय कायदयाने बंधनकारक आहे. तो शहराचे हीत पाहता.......

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-कृपया हिंदी किंवा इंग्रजित बोला.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-कित्त्येक दिवसापासुन उल्हासनगर शहरामध्ये जी अनाधिकृत बांधकामे तयार झाली आहेत. त्यातील कोणती तोडायची कोणती ठेवायची?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आयुक्त साहेब, प्रश्नासंबंधी बोला. आपण मोघमपणे बोलणार का?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-श्री. बी.बी.मोरे साहेब यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी बोलत आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- त्यांनी त्याप्रश्नावर प्रकाश टाकला आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- श्रीमती. पन्ना वारिगे यांनी टिल्सन मार्केटचे जे उदाहरण दिले त्यावर मी बोललो आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- ढाकरे साहेब,मी कायदेशिर मुददयानुसार विचारू इच्छित आहे की, १९९९ च्या पुर्वीची अनाधिकृत बांधकामांचे निष्कासन थांबविण्याचा महासभा ठराव करण्यामध्ये सक्षम आहे काय? होय किंवा नाही? माझ्या प्रश्नाच्या सी भागाकडे आपण लक्ष दया. आपण लिहिले आहे की, जुलै १९९९ मध्ये झालेल्या महासभेतील चर्चेनुसार जुलै १९९९ पुर्वीची बांधकामे तोडली जाऊ नयेत. अशी चर्चा झाली असल्याने या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यांत आली नाही. १९९९ मध्ये जी अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. ती त्यांचे निष्काशन थांबविण्यामध्ये महासभा सक्षम आहे का?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-महासभेमध्ये अशाप्रकारचा ठराव पारीत झालेला नव्हता.

मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगेः- आपण शासनाकडे पाठविला होता.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):- अशाप्रकारचा ठराव महासभेमध्ये पारित झालेला नव्हता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- तर आपण कसे लिहिता की, ठराव पास झाला म्हणुन?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-महासभेमध्ये या मुदयावर चर्चा झाली होती. व धोरण ठरले होते.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-सभेमध्ये जी चर्चा होते त्याला आपण कायदा मानु शकतो काय? काय अशा चर्चेला कायदा मानु शकतो काय? काय अशा चर्चेला कायदयाची मान्यता आहे? किंवा कायदा ती मानेल? तर महासभेच्या चर्चेवर आपण ऐवढे लक्ष देता? ठिक आहे. अशाप्रकारची अनेक वेळा चर्चा झालेली आहे त्यावर का नाही लक्ष देत? बांधकाम तोडण्याकडे लक्ष न देता बांधकाम वाचविण्याकडेच कसे लक्ष देता? कामावरून काढुन टाकण्यावर लक्ष देत नाहीत. कामावर ठेवण्याकडे लक्ष देता? तर हे धोरण कधी पर्यंत आहे?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):- हा निर्णय जुलै १९९९ मध्ये झालेला आहे याव्यतिरिक्त जर सभागृह दुसरा काही निर्णय घेत असेल, सभागृह जो निर्णय घेईल त्याप्रमाणे प्रशासन चालेल. १९९४चा असो ९५चा असो,कोणतीही बांधकामे असोत. तोडण्याची कार्यवाही करू.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मी आपणांस विचारते की, सध्या अनाधिकृत बांधकामे तोडण्यासाठी आपण किती नोटीसा काढल्या आहात? दोन-तीन दिवसात, मागील आठवडयापर्यंत.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-श्री. ढाकरे साहेब, मी आपणांस एक अतिशय साधा प्रश्न विचारत आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- फोनवरून सुध्दा अनाधिकृत बांधकामांबाबत तक्रारी येतात. अमुक एका ठिकाणी चटई क्षेत्राचे उल्लंघन झालेले आहे. अशावेळी आपणांस कोणी लेखी पत्र न देताही आपण ती

*बांधकामे तोडता. हे काय धोरण आहे आपले? कालचीच प्रेमनगरमधील घटना सांगते ना? कुणी दिले आहे आपणांस पत्र? कोणी सांगीतले? ते अनाधिकृत बांधकाम तोडले आहे हे मी मान्य करते. त्याच्या सभोवतालच्या किती इमारती तोडल्या आहेत? आयुक्त साहेब, आपणांस जो प्रश्न विचारला आहे कृपया त्याचे उत्तर दया. सर्वसाधारण मुददा आणु नका. सर्वसाधारण मुददा आणला तर कित्येक लोकांनी प्रश्न दिलेले आहेत. कित्येक लोकांनी आपणांस पत्र दिली आहेत की, अमुक एका ठिकाणी चटई क्षेत्राचे उल्लंघन झालेले आहे. येथे हे आहे तेथे ते आहे. याच्याशी माझा काही संबंध नाही. प्रश्न विचारून पाच महिने झाले अजुन उत्तर का दिले नाही.*

*<u>मा.महापौरः-</u>मॅडम, पाच महिन्यापुर्वी त्यांनी जो प्रश्न दिला आहे. त्याचे उत्तर तर बरोबर मिळाले आहे ना?*

*मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- कुठे उत्तर?*

*<u>मा.महापौरः-</u>आपण मला सांगा की, येथे असे धोरण ठरले नाही का? आपणांस असे वाटते का, जुलै १९९९ पुर्वीची जेवढी काही अनाधिकृत बांधकामे आहेत ती सर्व तोडली जावीत?*

*<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-</u> मी काय सांगितले....*

*मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-तोडा किंवा जोडा. यामध्ये मला काही फरक पडत नाही. माझा जो प्रश्न आहे त्याचे मला उत्तर हवे आहे.*



*मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानीः-कित्येक अनाधिकृत बांधकामे आहेत तर आम्ही काय सांगणार की त्यांना जोडा. त्यांना ठेवा? आम्ही नाही बोलु शकत. कायदयानुसार जे आहे ते करा.*

*मा.महापौर :- असा निर्णय झाला होता...*

*मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-आपण निर्णयाने या गोष्टी कायम करत आहात? महासभेतील चर्चेला किती महत्त्व आहे? मी अतिशय साधा प्रश्न विचारत आहे मला त्याचे आपण उत्तर देऊ शकला नाही. जुलै १९९९ मध्ये महासभेत झालेल्या चर्चेप्रमाणे चर्चेच्या आधारावर अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन थांबविण्याचा अधिकार आहे? किंवा महासभा अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन थांबविण्याचा सक्षम प्राधिकारी आहे का? त्यास काय ऐवढे अधिकार आहेत की, एक अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन थांबवु शकते.*

*मा.महापौरः- महासभेला अधिकार आहेत किंवा नाहीत हे कायदा पाहिल?परंतु या सभागृहात असे धोरण निश्चित केले होते की, जुलै १९९९ पुर्वीची जी काही अनाधिकृत बांधकामे आहेत. जर ती महापालिकेच्या विकास आराखडयास बाधित होत नसतील तर ती तोडली जाऊ नयेत.*

*मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-मी आपणांस हे विचारत आहे की, हे बरोबर आहे की चुकीचे? अतिशय साधा प्रश्न आहे माझा.*

*मा.महापौरः- मला महित नाही. हे बरोबर आहे की चुकीचे?*

*मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-तर विधी अधिका-यांना उत्तर देऊ दया. हा कायदेशिर असा मुददा आहे त्यांना उत्तर देऊ दया. पुढचा प्रश्न कसा? माझ्या प्रश्नाचे उत्तर न देता पुढचा प्रश्न कसा पुकारता?*

मा.सचिवः- महापौर साहेबांचे निर्देश नसल्याने मी आपल्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-महापौर साहेब, मी आपणांस प्रश्न विचारत आहे व (सचिव) म्हणतात की, महापौर साहेबांचे परवानगी शिवाय मी आपणांस उत्तर उत्तर देऊ शकत नाही.

मा.सचिवः- आपल्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी मला महापौरांची परवानगी पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- तर मा. महापौर आपणास परवानगी देत नाहीत?

मा.सचिवः- त्यांनी म्हंटले आहे की, मी उत्तर दिलेले आहे तर आणखी माहिती देण्याची आवश्यकता नाही.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- त्यांनी म्हंटले आहे की, मला नाही माहित. मला माहित नाही म्हणजे?माझे समाधान झाले पाहिजे, आपणांस माहित नसेल तर आपण खुर्ची सोडा.

मा.महापौरः- मला आपणांस जे स्पष्टीकरण दयायचे होते ते मी दिले आहे.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- मी स्पष्टीकरण मागीतले नाही. मी आपणांस प्रश्न विचारला आहे की, महासभेने जो ठराव पारित केला आहे. एखादया अनाधिकृत बांधकामाचे निष्काशन ते थांबवु शकतात काय? महासभेला निष्काशन थांबविण्याचे अधिकार आहेत काय? याबददल आपण म्हणता की, मला माहित नाही.

मा.महापौरः-आपणांस आयुक्तांनी सांगितले आहे की, असा काही ठराव पारीत झालेला नाही. परंतु महासभेमध्ये कित्त्येकवेळा अशी चर्चा झाली आहे. व महासभेचे हे मत आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- आपण मला काय उत्तर दिले की, मला नाही माहित.

मा.महापौरः-हे धोरण समजुन प्रशासन त्याची अंमलबजावणी करत आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-माझा हा प्रश्न पुढच्या सभेत घ्या. व त्यावेळी यावर चर्चा करा. तर मी बसु शकते.

मा.महापौरः-ठिक आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-पुढच्या सभेत?

मा.महापौर :-ठिक आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- महापौर साहेबांनी उत्तर देण्यास आपणांस मनाई केली आहे ना?आपण आपले बोलणे चालु ठेवा.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- श्री. कुकरेजा साहेब, महापौरांनी सांगितले मला माहित नाही. मी एक महिन्याचा कालावधी देते. कृपया माझा प्रश्न पुढच्या महासभेत उत्तरासाठी ठेवा.

मा.महापौरः- आपण त्याच्या कायदेशिरपणाचा प्रश्न केला आहे. त्याबाबत मी बोललो आहे. जी वस्तुस्थिती होती ती मी आपल्या समोर ठेवली आहे. माझ्यामते आपण तीच्याशी संतुष्ट असले पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-जेव्हा टिल्सन मार्केट तोडले गेले तेव्हा आपल्या महानगरपालिकेने सर्वोच्च न्यायालयाला असे कळविले होते का की, १९९९ पर्यंतच्या बांधकामांबाबत महासभेत चर्चा झालेली आहे. ते बांधकाम तोडु शकत नाहीत. मग ते बांधकाम का तुटले?

मा.महापौरः-तो सर्वोच्च न्यायालयाचा आदेश होता.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-सर्वोच्च न्यायालय आपल्या महासभेच्या निर्णयास मान्यता देत नाही. म्हणुन तर ते बांधकाम तोडण्यासाठी त्यांनी आदेश दिले ना?याचा अर्थ महासभेच्या त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालय मान्यता देत



नाही. मी हेच तर विचारू इच्छिते की, आपल्या महासभेला असा अधिकार आहे का की, अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन थांबविणे. आपण म्हणता मला माहित नाही. तर मग आपण महासभा कशी चालविणार जर आपल्याला माहित नाही.
मा.महापौर :-एखादे निष्कासन थांबविण्याचा महासभेला अधिकार आहे.
मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-असा अधिकार आहे? तर मग टिल्सन मार्केटचे निष्कासन आपण का थांबविले नाहीत? त्या हिशोबाने अे.पी. शहा यांची १९९६ची जी जज्मेन्ट होती त्यामध्ये काय म्हंटले आहे?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- तर टाऊन हॉलबाबतचा आपला निर्णय चुकीचा कसा झाला असता?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-महापौर साहेब, तुम्ही मला अतिशय चुकीचे उत्तर देत आहात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी- उच्च न्यायालयाला महासभेपेक्षा जास्त अधिकार आहेत. जसे की, जकाती बाबतची निविदा,महापालिकेला अधिकार तर होते. ठराव तर पारीत केला होता. परंतु त्याबाबत उच्च न्यायालयाने काय आदेश दिला?आम्ही कायदयाबरोबर चालु.

मा.महापौर :-न्यायालय हे महासभेपेक्षा वरिष्ठ आहे. हे तर आम्ही सुध्दा म्हणतो ना?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-महापौरजी, म्हणजे आम्ही प्रत्त्येकवेळा न्यायालयाचे दरवाजे ठोठवयाचे? मग महासभा व ठराव का ठेवता? आपण आदरणिय अशा व अतिशय जबाबदारीच्या खुर्चीत बसला आहात. व आपण बेजबाबदारपणे म्हणतात की मला माहित नाही. तुम्ही मला समाधानकारक असे

उत्तर देऊ शकत नाही का? आपण महासभेला समाधानकारक अशी उत्तरे देऊ शकत नाही. तर आपण येथे कसे बसता.

मा.महापौरः-यापेक्षा अधिक असे स्पष्टीकरण मी देऊ शकत नाही. आयुक्त उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-ठिक आहे. त्यांना उत्तर देऊ दया.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-जुलैच्या महासभेमध्ये जी चर्चा झाली होती. त्या चर्चेनुसार हे धोरण ठरले नसते तर या इमारतीचे बांधकाम तुटले असते.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-चर्चा झाली आहे. धोरण कायम झालेले नाही. कायम होण्यासाठी आपण पाठविले आहे काय?

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-हे सभागृह जर आम्हाला संमती देत असेल की, महासभेतील चर्चेनुसार आम्ही चालु नये किंवा ते आमच्यावर बंधनकारक नसेल तर कोणत्त्याही प्रकारचे बांधकाम.......

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-नाही. नाही. आपण मला सांगा की, कोणते नियम आपणावर बंधनकारक आहेत.आमच्या महानगरपालिकेची जी महासभा चालते ती कोणत्त्या कायदयानुसार चालते? मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६० काय म्हणते? जेव्हा दोन वेळा एखादे बांधकाम

--३९--

तोडले जाते तेव्हा २४ तासाची नोटीस देणे सुध्दा जरूरीचे नाही. कधीही ते बांधकाम तोडु शकतो.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-कायदा तर हे म्हणतो की, कोणतीही इमारत जिला पुर्णत्त्वाचा दाखला नाही. व रहिवासाचा दाखला नाही. तर त्यामध्ये कुणीही राहता कामा नये.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-या इमारतीचा तर प्लॅन सुध्दा पास नाही आहे. तरीही चर्चेमध्ये वेळ घालवत होतात. तर मग आपण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार चालता की, महासभेच्या ठरावानुसार चालता?आपण अतिशय आदरणिय व उच्च पदावर बसला आहात. परंतु तरीही तुम्ही मला उत्तर देऊ शकत नाहीत. आमची महासभा मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमानुसार चालते की, महासभेतील चर्चा व ठरावानुसार चालते.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-आपण जे निर्देश दिलेले आहेत. ते मानु नयेत असे म्हणत असाल तर आम्ही मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमानुसार चालु.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-तर, मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमानुसारच चालायचे आहे ना? चर्चेनुसार कुठे चालायचे आहे? विधी अधिकारी साहेब आपण मला सांगा की, मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम सोडुन महासभेतील चर्चेनुसार कामकाज चालवु शकतो असे कुठले कलम किंवा नियम आहे का? मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमामध्ये? आपण तिघेही माझ्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊ शकत नाहीत? महापौरजी, मी आपणांस प्रश्न विचारला आहे आपण उत्तर दया नाहीतर, विधी अधिका-यांना उत्तर देण्यास सांगा. विधी अधिकारी मला हे सांगा की, आपली महानगरपालिका मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमानुसार चालते की, सभेतील चर्चेनुसार, आपल्या नियमानुसार?

विधी अधिकारीः- हा प्रश्न आपण श्री. भडकवाड यांना विचारावयास पाहिजे होता. कारण की, उत्तर त्यांनी दिले आहे. व ज्या पदावर ते बसले आहेत त्यानुसार त्यांना कायदयाची पुर्ण माहिती आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- मी आपणांस विचारू इच्छिते.

विधी अधिकारीः- मला तेव्हा विचारा, जेव्हा त्यांना काही शंका असेल तर?

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- शंका आहे. म्हणुनच तर ते स्वतः म्हणत आहेत ना की, मी जे उत्तर दिले आहे ते समाधानकारक आहे. परंतु मला ते उत्तर समाधानकारक नाही.

मा.सचिवः- आपण श्री. भडकवाड यांना विचारा की, ....

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-ठिक आहे. आपण श्री. भडकवाड यांना बोलवा. भडकवाडजी, आपण माझ्या प्रश्नाच्या सी भागाचे जे उत्तर दिले आहे. ते कृपया आपण वाचुन पहा.

श्री.दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि):-मी जे उत्तर दिले आहे. त्याचे स्पष्टीकरण करू इच्छितो की, १९९५ पर्यंतची जी बांधकामे आहेत. त्याअगोदची जी बांधकामे आहेत ती न तोडण्याचे शासनाचे परिपत्रक आहे. त्यानंतर जी बांधकामे झाली आहेत, उल्हासनगर शहरामध्ये ऐवढी अनाधिकृत



बांधकामे आहेत की, अतिक्रमणाची रोगराईच पसरली आहे. कॅन्सर पसरला आहे. त्यास नियंत्रित करण्यासाठी सध्या जी बांधकामे तयार होत आहेत. ती थांबविणे हे त्यावेळच्या महासभेत ठरले होते.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- आता पर्यंत आपण अशी किती बांधकामे थांबविली आहेत?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-भडकवाड साहेब, १९९५ चे आपण बोलत आहात ते इमारतीसाठी आहे की, झोपडपट्टीसाठी?

श्री.दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि):-सर्वांसाठी आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-धरम पॅलेस ही इमारत १९९८ची आहे १९९५ची नाही.

मा.महापौरः- मॅडम मी समजतो की, प्रश्नोत्तराची वेळ पुर्ण झाली आहे. पुढच्या विषयाकडे वळुया.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः- एकतर माझ्या प्रश्नावरील चर्चा पुर्ण करा किंवा माझा प्रश्न पुढच्या महासभेत पुन्हा चर्चेस घ्या.

मा.महापौरः- मला वाटते मी पुरेसे उत्तर दिलेले आहे. आयुक्तांनी उत्तर दिलेले आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-तुम्ही मला उत्तर दिलेले नाही. माझा हा प्रश्न पुढच्या महासभेत ठेवायचा आहे. तर म्हणाल नाही मी नाही ठेवणार? हे बरोबर नाही. आपणांस माझ्या प्रश्नाचे उत्तर देणे जरूरीचे आहे. आपण लहरीपणाने असे उत्तर देऊ शकत नाही.

मा.सचिव- पुढचा विषय.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- पुढचा विषय कसा काय घेता? जर पहिला विषय पुर्ण झाला नाही. एक तर आपण....

मा.सचिव :- मा. पिठासिन अधिकारी यांनी घोषित केले आहे की, प्रश्नोत्तराची वेळ पुर्ण झाली आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-माझ्या प्रश्नावरील चर्चा अपुर्ण असल्याने हा प्रश्न पुढच्या महासभेत घेतला जावा.

मा.सचिव:-याबाबतचा निर्णय मा. पिठासिन अधिकारी यांनी घ्यायचा आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:- आपण माझा हा प्रश्न पुढच्या महासभेत चर्चेसाठी ठेवावा. कारण की त्यावरील चर्चा अपुर्ण आहे.

मा.महापौर:-हे पहा, आपणांस लेखी उत्तर मिळाले आहे. आयुक्तांकडुन उत्तर मिळाले आहे. पिठासिन अधिका-यांकडुनही उत्तर मिळाले आहे. आपणांस उपायुक्त अनाधिकृत बांधकामे हे उत्तर देतील.



मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-आपणांस काय असे वाटते का की आम्ही सरळ उच्च न्यायालयात जाऊन तेथे निर्णय लावुन घ्यावा.हा काही रस्ता नाही आहे.

मा.महापौर:-ती आपली पसंती आहे. मी त्याबाबत काही बोलु शकत नाही.

१० अनाधिकृत बांधकामे व इतर बांधकामाबाबत महापालिका सदस्य श्री. बी.बी. मोरे, श्री. प्रमोद टाले, श्री. रामभाऊ आढाव, श्री. नरेश यादव इत्यादींनी जी लक्षवेधी सुचना दिली आहे ती नाकारण्यांत येत आहे. कारण अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करणे हे आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात आहे आणि ते कारवाई करतील.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-मा.महापौरजी, आम्ही जी लक्षवेधी दिली आहे. त्याबाबत आम्हाला काही उत्तर मिळाले नाही. तरी..

मा.महापौर:-आपणाकडुन जी लक्षवेधी आली आहे. ती मी स्विकृत करीत नाही आहे. व ज्या ज्या इमारतीबाबत ज्या तक्रारी आहेत त्याबाबत मी अनाधिकृत बांधकाम विभागास आदेश देतो, आपण त्यांना अशा इमारतीची यादी दया. कायदयानुसार त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-लक्षवेधी स्विकृत का करून घेत नाहीत?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:- त्याचे कारण काय?

मा.महापौर:- हे पहा ,हे काम जे विभाग करते त्यांच्याकडे आपण तक्रार दया.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:- अशा प्रकारच्या मी कित्येक तक्रारी दिलेल्या आहेत.

मा.महापौर:- नाही, या बांधकामांबाबत...

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-या बांधकामांबाबत मी कित्येक तक्रारी दिलेल्या आहेत. तक्रारींचे काही उत्तरच मिळत नाही. आजपर्यंत कुठल्या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे?

मा.महापौरः-आयुक्तांना निर्देश देतो ते याबाबत कारवाई करतील.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- आजपर्यंत प्रश्नाचे काही उत्तर मिळाले नाही. लेखी स्वरूपात तर काहीच मिळत नाही. त्यानंतर आम्ही लक्षवेधी सुचना मांडतो परंतु ती आपण स्विकृत करून घेत नाहीत. हे बरोबर नाही.

मा.महापौरः-अतिक्रमण विभागाकडुन एका आठवडयाच्या आत आपल्याला कार्यवाही झाल्याचे दिसुन येईल, मी आयुक्तांना सांगतो.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-नाही. नाही. याचा अर्थ असा होतो की, महापौरांचेच म्हणणे आहे की, अतिक्रमणे वाढवत रहा.अनाधिकृत बांधकामे करत रहा. शहरात आज काय चालले आहे ते पहा. उल्हासनगर नदीच्या किनारी जवळ जवळ शंभर लोक अनाधिकृत बांधकामे करत आहेत. इकडे कॅम्प १ मध्ये नाल्याशेजारी इमारतीचे बांधकाम केले जात आहे. अशाप्रकारे संपुर्ण शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे चालु आहेत. व आपण म्हणता की तुमची लक्षवेधी आम्ही स्विकृत करत नाही.



मा.महापौरः-लक्षवेधी सुचनेमध्ये जेवढया इमारतींची नावे आली आहेत. मी आयुक्तांना निर्देश देतो की, एक आठवडयाच्या आत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-ही जी यादी दिली आहे ती उदाहरणा दाखल दिली आहे. परंतु येथे स्पष्ट असे लिहिले आहे की, ही जी अनाधिकृत बांधकामे चालु आहेत ती संपुर्ण शहरामध्ये चालु आहेत त्याचा परिणाम आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग यावर होत आहे. या ज्या लोकांच्या तक्रारी येत आहेत त्या समजुन घेऊन त्यातील गांभीर्य लक्षात घेऊन आपण लक्षवेधी सुचना स्विकृत केली पाहिजे.

मा.महापौरः-श्री. मोरे साहेब, सुचना दिलेल्या आहेत त्यावर कारवाई होईल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-मा.महापौरजी, आम्ही या तक्रारीमध्ये जी नावे दिली आहेत. त्याबाबत जर आम्हाला लेखी उत्तर मिळाले नाही तर पुढची महासभा आम्ही चालु देणार नाही. चालु देणार नाही.

मा.महापौरः-मी आयुक्तांना सांगतो ते आपणांस त्याचे लेखी उत्तर देतील.

मा.सचिवः-कृपया लक्ष दया. आयत्त्यावेळच्या विषयामध्ये एक विषय आलेला आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-सभा सुचनेवरील विषय कुठे पुर्ण झाले आहेत? ते तर पुर्ण होऊ दया.

मा.सचिव :-तो विषय स्विकृत करून घेण्या बाबत बोलत आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-सचिव साहेब, श्रीमती. पंचशिला नाना पवार यांच्याकडुन एक ठराव आलेला आहे.

मा.सचिव :-आयत्त्यावेळचा जो विषय आहे. तो जकात अभिकर्ता नेमण्याबाबतचा आहे. तो विषय सभा सुचनेवरील विषयांनंतर चर्चेस घेतला जाईल. हा विषय स्विकृत करून घ्यायचा किंवा नाही याचा निर्णय मा.पिठासिन अधिकारी यांना घ्यायचा आहे. विषय स्विकृत करत आहे. काही हरकत तर नाही ना?

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला नाना पवार यांचे एक पत्र आहे. नाका क्र. ८च्या समोर महानगरपालिकेचे जे प्रवेशव्दार आहे. त्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश व्दार असे नामकरण करण्यांत यावे. परंतु त्यांच्या स्वतःच्याच पत्रात असे लिहिले आहे की, हा ठराव पुढच्या महासभेत घेण्यांत यावा.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-काय लिहिले आहे ते पहा?

मा.सचिवः-आजची तारीख १४.५.२००१ अशी आहेच नाही, आजची तारीख १९. ५.२००१ अशी आहे. आपण लिहिले आहे, नंतरच्या महासभेत घ्या.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-त्या पत्राची प्रत सर्वांकडे आहे. वाचुन पहा काय लिहिले आहे ते. पहा त्यावर काय लिहिले आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौरजी, आमची बहीण श्रीमती. पंचशिला पवार यांनी जे पत्र दिले आहे त्याच्याशी मी देखिल सहमत आहे. वेलकम टू उल्हासनगर असे जे आमचे तीन गेट आहेत त्यांना जी नावे



दयायची आहेत. जसे मागच्यावेळी अनौपचारिक निर्णय झाला होता की, शांतीनगर येथील प्रवेशव्दारास छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार असे नाव दिले जावे. तसेच साईबाबा मंदीराजवळील प्रवेशव्दारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार असे नाव दिले जावे. तसेच कॅम्प नं. ५ येथील, कैलास कॉलनी येथे जे प्रवेशव्दार आहे त्यास आम्हा सिंधी लोकांचे अष्टदेव झुलेलाल प्रवेशव्दार असे नाव दिले जावे. हा ठराव कोणत्त्याही परिस्थीतीत जुन महिन्याच्या महासभेमध्ये आलाच पाहिजे.

मा.महापौरः-बिल्कुल येईल.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-जेवढे पण रस्ते आहेत, चौक आहेत...

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-रस्ते व चौकांचा ठराव ब-याच दिवसापासुन प्रलंबित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने हा प्रस्ताव तयार सुध्दा केला आहे. येथे जितकेही सामाजिक कार्यकर्ते किंवा थोर पुरूष यांची नावे दयायची आहेत. तो प्रस्ताव सुध्दा या प्रस्तावाबरोबरच्या सभा सुचनेवर आला पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौरजी, मी आपले लक्ष वेधु इच्छिते महापालिका होऊन पाच वर्ष झाली. महापालिका तर करा, आतासुध्दा नगरपालिका आहे. वेलकम टू उल्हासनगर म्युनिसिपल कॉन्सील असा मागच्या बाजुला बोर्ड आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-ज्या नावांबाबत मतभेद आहेत. ते बाजुला ठेऊन ज्या बाबत मतभेद नाहीत.....,

मा.महापौरः-जुन महिन्यामध्ये ,शहरातील जितकी काही प्रवेशव्दारे आहेत, तिन्ही प्रवेशव्दारे आहेत. त्यातील शांतीनगर येथील प्रवेश व्दारास छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दाराच्या नावाने, साईबाबा मंदीर शेजारी जे प्रवेशव्दार आहे. त्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार असे नाव देऊ. व कैलास कॉलनी येथील जे प्रवेशव्दार आहे त्यास झुलेलाल प्रवेशव्दार यानावाने एक प्रस्ताव येणा-या महासभेमध्ये आम्ही आणु. व तो सर्वसंमतीने पारित करू. त्याच

बरोबर रस्ते व चौकांच्या नावाची जी यादी आली आहे. व ज्याबाबत कुणाही सदस्याची कोणत्याही प्रकारची हरकत नाही, अशा काही नावांचा प्रस्ताव आम्ही पुढल्या महासभेत आणु व पारीत करू.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-महापौरजी, जरूर होईल ना?नाही तर आम्ही आमच्या वतीने बोर्ड लाऊ.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-जर पुढच्या महासभेत हा प्रस्ताव सभासुचनेवर आला नाही तर मी हरकत घेईन.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवार:-मा.महापौरजी, एक मिनिट. सचिव साहेबांनी ते पत्र बरोबर वाचले आहे का? काय लिहिले आहे त्यामध्ये.

मा.सचिव:-आपल्या माहितीसाठी मी वाचुन दाखवितो. असा ठराव आज दिनांक १४.५.२००१ नंतरच्या महासभेमध्ये घेण्यांत यावा.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवार:-१४.५.२००१च्या नंतरची महासभा कोणती? १४ तारखेला आम्ही हे पत्र दिले होते.

--४४--

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-मा.महापौरजी, आता हे ठरले आहे, आपण निर्णय दिलेला आहात. आम्ही तो मान्य करतो. त्याचे स्वागतही करतो. पुढच्या महासभेमध्ये हे झाले पाहिजे.

मा.सचिव:-ठिक आहे?

पुढचा विषय विषय क्र. २
मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. कायम?

मा.महापौर :-दि. २०.४.२००१ सह २१.४.२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे व दि.२०.४.२००१ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव:-पुढचा विषय. विषय क्र. ३.

''महापौर चषक'' क्रिकेट सामन्यांचे आयोजन करणे बाबतचा क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक ५.५.२००१ रोजीचा ठराव क्र. २ कायम करणे बाबत.

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक:-मा.महापौरजी, मागच्यावेळी सुध्दा महापौर चषक क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यांत आले होते. २०.१२.२०००रोजी प्रभारी आयुक्त म्हणुन श्री. भडकवाड साहेब होते त्यांनी मला उत्तर दिलेले आहे की, हा प्रस्ताव क्रिडा समिती कडुन आलेला आहे. मी याबाबत आढावा घेऊ शकलो नाही. पण जो खर्च झाला आहे तो अंदाजित आहे. त्याच्यावर मुख्य लेखाअधिकारी यांचा अभिप्राय घेऊनच खर्चाची रक्कम अदा केली जाईल. मग त्यावेळेला अभिप्राय घेतलेला काय? मागच्यावेळेला महापौरचषक बाबत जी सभा झाली होती. त्यावेळेला खर्चाचे विवरण दिले होते. त्यावेळी श्री. भडकवाड साहेब प्रभारी आयुक्त म्हणुन होते. त्यावेळी त्यांनी उत्तर दिले होते की, मुख्य लेखाधिका-यांकडुन या खर्चाची छाननी करून नंतरच खर्चाची रक्कम अदा केली जाईल. तर ती खर्चाची रक्कम छाननी करून दिली गेली होती का?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा.महापौर, याबाबत मी बोलु इच्छितो, हा जो विषय आहे महापौर चषक क्रिकेट सामन्यांचा, हा विषय जेव्हा पारीत होण्यासाठी दिनांक २०४.२००१ रोजीच्या सभेत आला होता. त्यावेळी या सभागृहात याबाबत बरीच चर्चा झाली होती. व काही लोकांनी येथे महापौरचषकामध्ये घोटाळा असल्याचेही म्हंटले होते. आपणास आठवण असेलच की, असे प्रश्न विचारले जात होते की, तेथे सोन्याची माती टाकली होती काय?१००० रू. एक ट्रक मातीचे बिल लावले होते. व चांदीचे बॉल खेळण्यासाठी वापरले होते काय?अशाप्रकारची चर्चा झाली होती. व उत्तरामध्ये आपण असे म्हंटले होते की, खर्चाचे सर्व विवरण सर्व सदस्यांना लेखी स्वरूपाची माहिती दिली जाईल. आज पाच महिने झाले तरीही ही माहिती देण्यांत आलेली नाही. पाहिजे तर मी आपणांस इतिवृत्त दाखवु, इतिवृतांतील पृष्ठ क्र. ३२ वर अशी नोंद आली आहे की, आपणांस हवी असेल तर ते लेखी माहिती देतील. आपण आश्वासन दिले होते की, प्रत्यक्ष खर्चाची ते लेखी माहिती सर्वांना देतील. ती अद्याप मिळालेली नाही. दुसरी गोष्ट अशी की मागच्यावेळी प्रस्तावित खर्च दाखविला होता. ३,७०,०००/- व आता जो महापौरचषकाचा प्रस्तावित खर्च दाखविला आहे तो ५,४०,०००/- ज्या चषकाशी महापौरांचे नाव



जोडले आहे. तो वादग्रस्त असता कामा नये. त्यामध्ये घोटाळा आहे असे कोणी बोलता कामा नये. यासाठी त्यामध्ये पुर्णपणे पारदर्शकता असली पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा.महापौरजी, यामध्ये संबंधित कर्मचारी जे आहेत त्यांनी घोटाळा केला आहे असे आम्ही त्यावेळी म्हंटले होते. परंतु तरीही दुस-या महापौर चषक क्रिकेट सामन्यांचे आयोजन केले जात आहे व तेच अधिकारी करत आहेत. त्यावेळेला साडे तीन लाख रूपये खर्च केले होते. त्याबाबत आम्ही हरकत घेतली होती. व आज साडेपाच लाख रू. खर्च दाखवत आहेत. व तेच कर्मचारी तेथे काम करत आहेत. ज्यांनी मागच्यावेळी घोटाळा केला ते, तरी कृपया त्या कर्मचा-याला तेथुन बदली केले जावे.

मा.महापौरः-महापौर चषक बाबत तर काही हरकत नाही ना?

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईकः-महापौर चषक बाबत आमची काही हरकत नाही.

मा.महापौरः-हरकत घोटाळयाबाबत आहे?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी / मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईकः-होय हरकत घोटाळयाबाबत आहे. त्याची चौकशी झाली पाहिजे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मागच्या वेळच्या खर्चाचा ताळेबंद (लेखाजोखा)दिला पाहिजे ना?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः- नागपुरच्या महानगरपालिकेमध्ये याच क्रिडा समितीत घोटाळा झाला. दहा नगरसेवकांवर आरोप ठेऊन त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यांत आले आहेत. त्याप्रकारचा घोटाळा उल्हासनगर महानगरपालिकेत होता कामा नये. नाहीतर पहिला क्रमांक नागपुर महानगरपालिकेचा व दुसरा क्र.

उल्हासनगर महानगरपालिकेचा लागेल. म्हणुन सांगतो अशाप्रकारचा घोटाळा करू नका.

मा.महापौरः- महापौर चषक बाबत सभागृहात अतिशय चांगल्या प्रकारची हरकत घेण्यांत आली आहे. मी तीचे स्वागत करतो. मला सुध्दा वाटते की, नागपुर प्रमाणे येथे सुध्दा महापौर चषक मध्ये काही घोटाळा होऊ नये यासाठी मी आयुक्तांना आदेश देतो की,यामध्ये कोणकोणता खर्च येत आहे. तो वाजवी आहे की नाही याबाबत त्यांनी वैयक्तिकपणे लक्ष दयावे. व मागील जो खर्च आहे त्याबाबत सभागृहामध्ये मी जे आश्वासन दिले होते की त्याचा हिशोब दिला जाईल. सात दिवसाच्या आत तो दिला जाईल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- पाच महिन्या पर्यंत हिसाब दिला गेला नाही. आपण तर आता एक आठवडयाची गोष्ट करत आहात. परंतु प्रत्यक्षात पाच महिन्यात हिसाब दिला गेला नाही.

मा.महापौरः-एक आठवडयात आपणांस हिसाब दिला जाईल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-हेच उत्तर आपण यापुर्वी सुध्दा दिलेले आहे.

मा.महापौरः-सात दिवसाच्या आत देऊ.



मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः-मा.महापौरजी, महापौर चषक बाबत आमची काही हरकत नाही. परंतु खेळाबाबत मी बोलत आहे. मागच्यावेळी जसा क्रिकेटमध्ये घोटाळा झाल्याचे येथे बोलले गेले. म्हणुन सांगतो की, आपण खेळामध्ये बदल का करत नाही?कब्बडी का नाही ठेवत? हॉलीबॉल का नाही ठेवत? क्रिकेटच का ठेवता? आपण खेळामध्ये बदल करा. क्रिडा समितीला सांगा. क्रिडा समितीचे जे सभापती आहेत त्यांनी हे केले पाहिजे, प्रत्येक वर्षी क्रिकेटच का? काही नविन खेळ आणा ना?

मा.महापौरः-आणु, संबंधित सभापतींना सांगु की, दुसराही कोणता खेळ ठेवला जावा.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-महापौर चषक जो सध्या रदद केला आहे तो कधी होईल?कारण की, शहरामधील संघानी दोनशे दोनशे रूपये फी भरलेली आहे. याबाबत शहरात चर्चा चालु आहे. म्हणुन विचारू इच्छितो की, महापौर चषक केव्हा होईल. याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-मा.महापौरजी.....

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-किती वेळा बोलाल? एकाचवेळी बोला ना?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-आम्ही पुन्हा पुन्हा यासाठी म्हणतो की, आपल्या उल्हासनगर शहराचे नाव दुस-या क्रमांकावर येऊ नये.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानीः-मा.महापौरजी, महापौर क्रिकेट चषकामध्ये मागच्यावेळी घोटाळा झाला होता. आता तो होता कामा नये. असे बोलले जात आहे.

मा.महापौरः-मी असे नाही म्हंटले की, घोटाळा झाला होता. आपण चुकीचे बोलत आहात. मी असे कधीच बोललो नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तर आपण असे कधी म्हणाला नाहीत?

मा.महापौरः-आपण माझ्या तोंडुन ती गोष्ट वदवुन घेऊ नका जे आपण बोलु इच्छित आहात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपण म्हणालात की, घोटाळा झाला नाही पाहिजे.

मा.महापौरः-आपण ज्या घोटाळयाबाबत बोललात त्याबाबत मी बोललो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-याचा अर्थ घोटाळयाची संभावना आहे. परंतु तो झाला नाही पाहिजे. हा विषय क्र. १ माझे काही प्रश्न या विषयाशी निगडित आहेत. मागच्यावेळी ज्या संघानी भाग घेतला होता. त्यांच्याकडुन दोनशे दोनशे रू. घेतले होते. किती संघानी भाग घेतला किती पैसे जमा झाले? याचा हिशोब दिला गेला नाही. हा झाला घोटाळा क्र. १. मागच्यावेळी १०००रू. ची एक मातीची गाडी तेथे उतरवली गेली. प्रत्यक्षात बाजारात दोनशे रू.एक मातीची गाडी सहजपणे मिळते. किती मध्ये मिळते, श्री. विनोदजी?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-सोन्याची माती आहे?



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मातीची गाडी एक हजार रू एक असे दाखविले गेले आहे. व त्याशिवाय येथे ३०० बॉल घेतले जातील असे दाखविले आहे. पंधरा दिवसामध्ये किती मॅच होतील. ज्यासाठी आपणास तीनशे बॉलची आवश्यकता आहे, ते तीनशे बॉल, स्टंम्प तर तेच लागतील. म्हणजे हे काही सिझनचे बॉल ज्याने स्टंम्प तुटतील, बॅट तुटेल अशाप्रकारे या सर्वांची एकुण किंमत आपण २५,०००/- रू. दाखविली आहे. अशाप्रकारे एकेक खर्च आणी त्याची रक्कम पाहिली तर हा जो एकुण ५,४०,०००/-चा खर्च दाखविला आहे. तो एक घोटाळा आहे. होण्याची गोष्ट तर सोडा. पण हा प्रस्तावच घोटाळा आहे. दुसरा विषय असा आहे. या क्रिडा समितीने दुसरी एक उप समिती नेमली आहे. माझा प्रश्न असा आहे की, क्रिडा समितीला दुसरी उप समिती नमेण्याचा अधिकार आहे का? जी फक्त ॲडव्हायझरी कमिटी आहे. जिला फक्त सल्ला दयायचा आहे की आपण हे काम करा. जिला काही स्वतःचे अधिकार नाहीत. त्यांना बजेट तयार करण्याचा अधिकार नाही. जर त्यांना अधिकार नाही तर ते आमच्याकडे कसे शिफारस करून पाठवतात की, ऐवढा खर्च करायचा आहे. व ही जी समिती नेमली आहे या समितीमध्ये कोणत्या विचाराचे लोक घेतलेले आहेत. हे लोक घेण्याचे त्यांना अधिकार आहेत का? अधिकार नसतील तर ही समिती रद्द केली जावी. अधिकार नसतानाही बहुमताने आपण करू इच्छित असाल तर येथे बहुमत हा नियम आहे. संवेदनाशिलता हा नियम नाही. बहुमत हा नियम असुन तो येथे विजय मिळवुन देत आहे. संवेदनाशिलता येथे विजय मिळवुन देऊ शकत नाही. येथे फक्त बहुमतच विजय मिळवुन देईल. यानुसार आपण करू इच्छित असाल तर....

मा.महापौरः-मला वाटते तुम्ही चुकीचे बोलत आहात. असे वाटते , हे पहा बहुमत नेहमीच विजय मिळवुन देत असतो, शतकोनशतके बहुमत विजय मिळवून देत आला आहे. व यापुढे सुध्दा विजय मिळवुन देईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-पाच मिनिट थांबा. टाइम वील पुव्ह. त्याशिवाय या समितीमध्ये जी नावे दिली आहेत त्यामध्ये कुणाला खेळा विषयी काही माहिती दिसत नाही. खेळाविषयी माहिती असणारे काही लोक या समितीत आहे का?

कि ज्यांना आम्ही या समितीमध्ये घेतले आहे. असे प्रश्न, आपण विचार न करता, समिती तयार करून क्रिकेट सामन्यांचे आयोजन करू इच्छिता. दुसरे असे की, महानगरपालिकेची आजची आर्थिक स्थिती अतिशय बिकट आहे. त्या आर्थिक परिस्थितीशी आम्ही झुंज देत आहोत. आमच्या महसुलाची बरोबर वसुली होत नाही. आमच्या नगरसेवक निधीवर अंकुश लावण्यांत आला आहे. फक्त दोन लाखाची कामे करा. असे सांगण्यांत येते. महापौर क्रिकेट चषकाची फक्त पाच लाखाची छोटीशी रक्कम आहे असे सांगितले जाते. परंतु जेव्हा आर्थिक स्थिती बिकट असते तेव्हा असे हे छोटे छोटे खर्च सुध्दा मोठे वाटतात.असे खर्च वाचवुन जर आम्ही तो पैसा शहराच्या विकासासाठी लावला तर? सध्या जर काही प्रकल्प आमच्याकडे नसतील तर आम्ही खेळांवर हा खर्च करावा, मी स्वत: एक खेळाडु आहे. खेळाविषयी आस्था ठेवणारा व्यक्ती आहे. माझ्या या वक्तव्याचा कोणी हा गैर अर्थ काढु नये की, श्री. राजानी खेळाच्या विरोधात बोलत आहेत. क्रिकेट सामन्यांच्या विरोधात बोलत आहेत. परंतु आमची आर्थिक परिस्थिती हे करण्यासाठी परवानगी देत नाही. तसेच मागील क्रिकेट स्पर्धांच्या खर्चाचे विवरण महासभेपुढे अद्याप ठेवले गेले नाही. म्हणुन आम्ही या प्रस्तावाचे समर्थन करत नाही. दॅट इज अ सेन्सीबीलीटी.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा.महापौरजी, क्रिडा समितीमध्ये ठराव पारीत होऊन तो कायम होण्यासाठी महासभेपुढे आला आहे. प्रत्येक वर्षी बजेटमध्ये आम्ही पाच लाख रूपयांची क्रिडा समितीसाठी तरतुद करीत असतो. व जे सभापती निवडले जातात त्यांना हा अधिकार आहे की, एक वर्षा मध्ये



कोणताही खेळ, मग तो क्रिकेट असो किंवा कब्बडी. किंवा दुसरा काही सण असेल. चालिया साहेब मेळा, तेथे प्रसाद वाटायचा असो. कुठेही जनतेच्या हितासाठी काही करायचे असेल तर ते करू शकतात. जेव्हा महापौर चषक क्रिकेट सामने जाहिर होतात. तेव्हा प्रत्येक नगरसेवकास एकेक फॉम दिला जातो. त्यानंतर कित्येक नगरसेवक म्हणतात की, मला दहा फॉम पाहिजे, वीस पाहिजेत, पन्नास पाहिजेत. नाहीतर प्रभागवाशी नाराज होतील. निवडणुकांचे वर्ष आहे म्हणतील आम्ही मत देणार नाही. ऐवढे फॉम दया, तेवढे फॉम दया. यासाठी खुप गर्दी होते. त्यानंतर आज महापौर चषक होऊ शकले नाही याचे कारण आहे आमच्या श्री. दर्शनसिंग यांचा मुलगा जो सिंघानिया हॉस्पीटलमध्ये दाखल असुन, त्याची प्रकृती खुपच बिकट होती. व परमेश्वराच्या कृपेने कालपासुन त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. ते वेळ देऊ शकत नव्हेत म्हणुन त्यांनी आपणांस पत्र लिहिले की, कोणत्त्याही प्रकारचा घोटाळा होऊ नये. काही अडचणी येऊ नयेत. मी वेळ देऊ शकत नाही. माझ्यावर येऊ नये म्हणुन आपण ते पुढे ढकलावे. व त्त्या समितीने जी एक समिती नेमली आहे. त्यामध्ये तेच सदस्य आहेत जे क्रिडा समितीमध्ये आहेत. त्यांची एक समिती नेमली आहे. जेणेकरून कोणत्त्याही प्रकारचा घोटाळा होऊ नये. त्यानंतर आपण आयुक्तांना जे अधिकार दिले आहेत. ते पण खुप चांगले केले. जर श्री.दर्शनसिंग यांचा मुलगा पावसाळयापुर्वी हॉस्पीटलमधुन बरा होऊन आला तर हे खेळ पावसाळयापुर्वी होतील. अन्यथा ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्ये हे खेळ होतील. व नागपुरचे जे उदाहरण दिले गेले, ही एक विचार करण्याची गोष्ट आहे की, श्री. चंद्रशेखर साहेबांनी तेथे काय केले? हे त्यांना आता कळले सर्व उल्हासनगर वासीयांना? नागपुरमध्ये राज्य कुणाचे आहे? कुणाच्या राज्यामध्ये हा घोटाळा झाला आहे. असा घोटाळा कॉंग्रेस, युपीपी, आरपीआय, अपक्षांच्या राज्यात येथे होऊ नये असे आम्ही त्यांना आश्वासन देतो व ती जी समिती आहे. ती क्रिडा समितीचीच आहे. तरूणांना संधी दिली जावी. जेणे करून ते लोक आपले खेळ शिकु शकतील यासाठी हा ठराव कायम करणे खुपच आवश्यक आहे. आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांचे म्हणणे आहे की, तरूणांना पुढे आणले पाहिजे. महापौर चषक क्रिकेट सामने होत आहेत हे अतिशय चांगले होत आहे. मागच्या वर्षी १००० रू. एक मातीची गाडी टाकली जात होती त्यामध्ये ते सपाटीकरण सुध्दा करून देत होते. मजुर त्यांचे होते. अशाप्रकारचे आरोप तर प्रत्येक वर्षी क्रिडा समितीवर

लावले जातात. श्रीमती. आशा जेस्वानी सभापती होत्त्या त्यावेळी सुध्दा हे आरोप लावले गेले होते. चालीया मंदीर येथे प्रसाद वाटणे व महापौर चषकातील घोटाळा श्रीमती आशा जेसवानी यांना कुठे क्रिकेट खेळता येत होते. कुणाला येते कुणाला नाही हे त्याच्यासाठी नाही. ज्या तरूणांना क्रिकेट खेळता येते त्यांचे संघ यामध्ये भाग घेतात यासाठी माझे संपुर्ण सभागृहास असे निवेदन आहे की, कृपा करून हा ठराव सर्व संमतीने पारीत केला तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आपले सभागृह नेते यांनी किती चुकीचे म्हंटले आहे. त्यांनी म्हंटले आहे की, हि जी उप समिती नेमली त्यामध्ये सर्व क्रिडा समितीचे सदस्य आहेत.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा.महापौरजी, मी सांगु इच्छितो की, ...

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>माझा पहिला प्रश्न होता अधिकार आहेत का? माझ्या प्रश्नाचे कुणी उत्तर दिले नाही. विचार केला होता सभागृह नेता उत्तर देतील म्हणुन.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>अधिकाराचा प्रश्नच उपस्थित होत नाही. कृपया माझे ऐकुन घ्या. जे सदस्य क्रिडा समितीत आहेत तेच सदस्य या समितीमध्ये आहेत. कारण की महापौर चषक होत आहे. यासाठी मा.महापौरांना अध्यक्ष म्हणुन नेमले आहे. आणि क्रिकेट सामन्यांच्या माहिती बाबत नरेंद्र



राजानी यांनी जे म्हंटले त्याबाबत मी सांगु इच्छितो की, श्री मालवणकर हे महानगरपालिका क्रिकेट संघाने कप्तान आहेत त्यासाठी त्यांना बरोबर ठेवले आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>मा.महापौरांना कोणत्त्याही समितीचे अध्यक्ष नेमण्याचा या समितीला अधिकार आहे का?

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा.महापौरांच्या संमतीने हे केलेले आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>सहमतीचा विषय वेगळा आहे. आपल्या समितीला अधिकार नाही आहे की,आपण महापौरांना दुसरे एखादे पद देण्याचा. आपणांस हा अधिकारच नाही आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u>अधिकाराची ही गोष्टच नाही आहे. महापौर चषक क्रिकेट सामन्यांचे आयोजन केले जात आहे. महापौरांचा सन्मान ठेवून. त्यांना आपल्याबरोबर घेऊन आयोजन केले आहे. यामध्ये काही चुकीचे नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>करा ना. महापौरांचे नाव दिले तरी महापौर त्यात सामील झालेच ना?आपण, महापौर श्री. हरदास माखीजा असे नाव देऊन सुध्दा महापौर चषकाचे आयोजन करू शकता. आमची त्यास काही हरकत नाही. परंतु महापौरांना एका समितीचा अध्यक्ष बनविणे हा आपल्याला अधिकार आहे का?

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>ही घोटाळयाची गोष्ट आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>नाही. नाही आपण कसे म्हणता घोटाळयाची गोष्ट? आपण सिध्द केले आहे का? असे कसे म्हणता आपण घोटाळे वाली गोष्ट म्हणुन?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-मागील वर्षीच्या खर्चाचे अद्याप विवरण दिले नाहीत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-पहिले तर अधिकाराची गोष्ट करा. अधिकार आहेत का?

मा.सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:- स्पर्धा अद्याप झाल्याच नाहीत तर घोटाळयाची गोष्ट कशी करता?

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव- मंजुर करा. मंजुर करा. मंजुर, मंजुर सर्वानुमते मंजुर.

मा.महापौरः-श्री. राजानीजी आपण शिवसेना भाजपाचे एक-दोन सदस्य या समितीत दया.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-हे असंभव आहे.

--५०--

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-पहिले मागील वर्षीच्या खर्चाचे विवरण दया. त्यानंतर आम्ही विचार करू.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपण त्यामध्ये आम्हाला सामील करून घेऊ इच्छिता मात्र ते आमच्या कडुन होणार नाही.

मा.महापौरः-सामील होण्याबाबतची मी गोष्ट करत नाही. मला वाटते की, त्यामध्ये सर्वांचा सहभाग असावा.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः-हॅम्पायर चांगला ठेवा नाहीतर त्यामध्ये सुध्दा घोटाळा होईल.

मा.महापौरः-सर्व पक्षांचा सहभाग असला पाहिजे. शिवसेनेचे दोन व भाजपाचे दोन सदस्य, श्री. देवेंदसिंगजी आपण शिवसेना भाजपाचे दोन-दोन सदस्य या समितीत घ्या.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:-जे जे सदस्य या समितीत येऊ इच्छितात त्यांनी हात वर करावेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी अधिकाराची गोष्ट करत आहे. सदस्य बनुन जाण्याची नाही. मी अशी हरकत घेतली नव्हती की, शिवसेना भाजपाचे सदस्य या समितीत नाहीत. अशी माझी काही हरकत नव्हती.

मा.महापौरः-पंजाबी साहेबांनी जे म्हंटले की मागच्यावेळी जो महापौर चषक झाला होता त्याचा हिसाब आठ दिवसाच्या आत देण्याबाबत मी आयुक्तांना सांगितले आहे. व आता जो महापौर चषक होणार आहे. त्यामधील हिशोबात काही गडबड होऊ नये म्हणुन मी आयुक्तांना सांगतो की, मुख्य लेखा परिक्षक श्री. काळे यांना खास यासाठी नेमावे. ते प्रत्येक खर्चाची छाननी करतील. मी सर्वांना विनंती करतो की, या चषकाच्या ठरावास सर्व संमतीने मंजुरी दिली तर बरे होईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-माझा केवळ एक विषय आहे. माझी पहिली हरकत अशी होती की, अधिकार आहे का? खेळांना प्रोत्त्साहन देणे, एका

महापौर चषकाने खेळांना प्रोत्साहन दिले जात नाही. आपण खेळाची मैदाने सुस्थितीत ठेवत नाहीत. जर आपण हे पाच लाख रूपये व्ही.टी.सी ग्राऊंडची देखभाल करण्यासाठी वापरले तर पुर्ण वर्षभर लहान मुले तेथे खेळु शकतील.

मा.महापौरः-आपणास वाटत असेल की, महापौर चषक होऊ नये तर तेही आपण सांगा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-नाही आम्हांला नाही वाटत. आम्हाला वाटते हे पैसे एखादया भरीव कामासाठी वापरले जावेत. आम्ही या प्रस्तावाचा विरोध करतो.

मा.सचिवः-मंजुर? आपल्या विरोधाची नोंद घ्यायची आहे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आनंद आहे, बहुमताने विजय मिळवून दिला.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आपण लोकांनी तर ३५-३४ अशा अल्प बहुमतावर कामकाज चालविले होते. आता आमच्याकडे तर ४०-२९ असे भरीव बहुमत असताना आम्ही कामकाज चालवु शकणार नाहीत का?

मा.महापौरः-सभेत हजर असलेल्या शिवसेना भाजपा पालिका सदस्यांचा या प्रस्तावास विरोध असून सभेत हजर असलेल्या बहुसंख्य सत्ताधारी पक्षाच्या सदस्याच्या ध्वनीमताने सदरचा ठराव बहुमताने पारीत झाल्याचे मी घोषित करीत आहे.

विषय :-''महापौर चषक'' क्रिकेट सामन्यांचे आयोजन करणे बाबतचा क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक ५.५.२००१ रोजीचा ठराव क्र. २ कायम करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती तर्फे मा. महापौर चषक मर्यादित क्रिकेटचे सामने रात्र दिवस गोलमैदान भगवंती नावानी स्टेज समोर असलेल्या मोकळया जागेवर उल्हासनगर-१ येथे दि.१३. ५.२००१ ते दि.२७. ५. २००१ पर्यंत आयोजित करावयाचे आहे. त्यासाठी खालील प्रमाणे खर्च अंदाजित आहे.

सदरची स्पर्धा फक्त १५० संघासाठी मर्यादित आहे.

| अ. क्र. | लागणारे साहित्य | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | पारितोषिक (प्रथम फेरी पासुन अंतिम फेरी पर्यंत) | १,००,०००/- |
| २. | विद्युत खर्च (जनरेटर, व्हॅन) | १,००,०००/- |
| ३. | निमंत्रण पत्रिका प्रमाणपत्र (३ प्रकारचे)ओळखपत्र | १५,०००/- |
| ४. | मंडप २०x४० पंधरा दिवसासाठी (खेळाडूंकरिता)<br>मंडप १०x१० पंधरा दिवसासाठी (समालोचक व स्कोअरर)<br>मंडप १५x२० पंधरा दिवसासाठी (कॅंटीनकरिता)<br>मंडप १५x२० मंडप व तीन बाजुनी स्टेज बंद करणे १५ दिवसासाठी. | ३०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ५. | खुर्च्या एकूण ४०० खेळाडू, पोलिस कर्मचारी स्वयंसेवक, समालोचक स्कोअरर, इतर मान्यवरांसाठी १५ दिवस | २०,०००/- |
| ६. | लाईट फोकस ७० टयुबलाईट, २०,१५ दिवसासाठी | ५०,०००/- |
| ७. | क्रिकेट साहित्य ३०० बॉल (सुपर खन्ना मेक) स्टंप सहा नग , स्कोअर बुक, ५० चुन्याच्या गोण्या २० रस्सी बंडल, १० नग पंच, व समालोचक स्कोअरर यांना सिटी २० नग. | २५,०००/- |
| ८. | ४ पंच, ४ स्कोअरर, समालोचक ४, २० स्वयंसेवक १५ दिवसासाठी. | ५०,०००/- |
| ९. | मैदानांवर लाल माती, ३० गाडया टाकुन लेवलिंग पसविणे, रोलर फिरविणे व पीच तयार करणे. | ३०,०००/- |



| | | |
|---|---|---|
| १०. | हार व पुष्पगुच्छ, नारळ,शॉल दि.१३.५.२००१ रोजी | १५,०००/- |
| ११. | ध्वनी क्षेपण पंधरा दिवसासाठी | १५,०००/- |
| १२. | खेळाडु, पाहुणे, मान्यवर व्यक्ती, कर्मचारी पंचासाठी समालोचक, स्कोअरर, पोलिस कर्मचारी, नगरसेवक यांचेसाठी चहापान,अल्पोपहार १५ दिवस | ४०,०००/- |
| १३. | फोटो पंधरा दिवसासाठी | १५,०००/- |

उपरोक्त स्पर्धेस होणारा अंदाजित खर्च रू.५,४०,०००/- येणार असुन महापालिकेच्या अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष ड-१ उप शिर्ष क्रिडा खर्च या शिर्षाच्याखाली केलेल्या संकीर्ण १५,००,०००/- शिल्लक तरतुदीतून करावयाचा आहे.

सदरच्या स्पर्धा मे नंतर जुन महिन्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर घेऊ शकत नाही. यामुळे मे महिन्यात स्पर्धा घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त स्पर्धेसाठी होणारा अंदाजित खर्च रू. ५,४०,०००/- यास मान्यता मिळणेसाठी मा. क्रिडा समितीपुढे प्रस्तावित आहे.

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम ठराव क २ दि.५.५.२००१

सुचकाचे नाव :-श्री. सेवलदास ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

हि क्रीडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सोबत जोडलेले प्रवेश पत्रकावरील नमुद केलेल्या अपवादांच्या मर्यादांच्या व शर्तीच्या अधिन राहुन दिनांक १३.५.२००१ ते २७. ५.२००१ पर्यंत उल्हासनगर-१ येथील गोल मैदानातील भगवंती नावानी स्टेज समोरील मैदानात ''महापौर चषक'' क्रिकेट सामने आयोजित व कार्यान्वित करणे तसेच त्या अनुषंगाने होणा-या अंदाजित रूपये ५,४०,०००/- च्या खर्चास (महासभेच्या अधिन राहून) प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच वरिल निर्णय अंर्तभुत असणारा ठराव महासभेकडुन कायम होण्याची वाट न पहाता, आणि विलंब न लावता ''महापौर चषक'' क्रिकेट सामने आयोजन व कार्यान्वित उपाययोजना करण्यात यावी असे निर्देश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापति / पिठासीन अधिकारी
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
उल्हासनगर महानगरपालिका



---

महासभा ठराव क्र. ८ दि. १९. ८. २००१

सुचकाचे नाव :- श्री. देवेंद्रसिंग खेमाणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. सेवल ठाकुर.

हि महासभा क्रिडा,समाज कल्याण आणि सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या दि. ८. ८. २००१ रोजीच्या ठराव क्र. २ मधील तरतुदी अन्वये मा. महापौर कार्यक्रम फेर निश्चित करतील त्या कालावधीसाठी आणि मुख्यलेखा परिक्षकांनी करावयाच्या लेख्यांच्या छाननीचे अधिन राहून ''महापौर चषक'' क्रिकेट सामन्यांचे आयोजन व कार्यान्वीत करणे कामी या फेरफारासह वरील ठराव कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिवः-पुढचा विषय आयत्त्यावेळीचा आहे. जकात अभिकर्त्यांच्या नेमणुकी बाबतचा. आपणा सर्वांना गोषवारा दिलेला आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे / श्री. रामभाऊ आढाव :-मंजुर, मंजुर.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मंजुर, मंजुर बोलण्याचा यांचा आवाज बंद झाला तर मी बोलु?

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-सात वाजले.

--५४--

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-सात वाजले तर काय? सभा आठ-नऊ वाजे पर्यंत कधी चालली नाही?

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-जन गन मन सुरू करा.

मा.महापौर :- पंजाबी साहेब हा ठराव बहुमताने पारीत झालेला समजायचा की, सर्व संमतीने?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-नाही. नाही. बहुमताचा हा अर्थ नाही.

मा.महापौरः-सर्व संमतीने पास?

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-राष्ट्रगीता कडे लक्ष दिले जावे, प्रकाशजी?

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-सर्व संमतीने पास.पास.

मा.सचिव :-श्रीमती. सुनिता राजवानी यांच्या व्यतिरिक्त सर्व जण या प्रस्तावास सहमत आहेत?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आम्हाला चर्चा करू दया. सुनिता राजवानी या विरोधी पक्ष नेत्या आहेत. मी शिवसेना भाजपाच्या वतीने बोलत आहे. आपण या लोकांना खाली बसण्यास सांगा म्हणजे मी बोलेन. हे जे कोनार्क ने आपल्याला पत्र दिले आहे त्याचा उल्लेख आपण केला आहात का? सभागृहाला आपण ते सांगा. सभागृहाला वाचुन दाखवा. आयुक्तांना याबाबत बोलु दया. असा कोणताही निर्णय घेऊ नका.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानीः-माझी एक सुचना आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- महापौर साहेब, आपण हा अन्याय करू नका. दुसरा ठेकेदार जर जास्त पैसे देण्यास तयार असेल तर त्यास सुध्दा बोलावले जावे. जास्त पैसे मिळत असतील तर ते शहराच्या विकासासाठी कामी येतील.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः- मा.महापौरजी, राष्ट्रगीत?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आपण ही दोन्ही पत्रे वाचुन तर दाखवा.

मा.महापौरः-शेवटचा जो विषय आहे. आयत्त्यावेळच्या विषयान्वये जो आणण्यांत आला होता तो सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

--५५--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- मा.महापौरजी, जकातीबाबतचा हा विषय मागील काही दिवसापासुन शहरामध्ये बराच चर्चेचा विषय झाला आहे.फक्त जकातीची निविदा हाच चर्चेचा विषय झालेला नाही. तर कित्येक लोक जे या विषयाशी संबंधित आहेत ते चर्चेचा विषय झाले आहेत. आता सभागृहाचे मत पाहता, आयुक्तांचा प्रस्ताव पाहता जो निर्णय सभागृह सर्वानुमते घेईल त्यामध्ये कुणाच्या विरोधात किंवा बाजुने जाण्याचा प्रश्न नाही. परंतु विषय हा आहे की, आपल्या शहरामध्ये ही एक प्रथा चालली आहे. आपल्या शहरामध्ये पुढच्या निविदा कोणत्त्या प्रकारच्या होतील व हा प्रस्ताव पुर्णपणे कायदेशिर अटी शर्तीमध्ये बसतो का? आम्ही हे जे काही करत आहोत शेवटी आयुक्त किंवा प्रशासन जे काही करत आहेत ते स्थायी समिती व महासभेच्या माथी मारले जात आहे. तर हे सर्व नियमामध्ये किती बसते? याचेही कधी ना कधी निर्णय झाले पाहिजेत. समजा उदया जर महासभेच्या माध्यमातुन एखादा चुकीचा ठराव पारीत झाला तर बाहेर ज्या अडचणींना तोंड दयावे लागते ते या शहरातील निर्वाचित सदस्यांना. आणि जे अधिकारी असतात ते यातुन निसटुन जातात. ते म्हणतात की, आम्ही नियमांमध्ये सर्व काही केले. तर अधिका-यांनी हे सांगितले पाहिजे की हे नियमांमध्ये आहे का? अधिका-यांनी त्याची जबाबदारी घेतली पाहिजे. अधिका-यांनी हे सांगितले पाहिजे की, हे नियमांमध्ये आहे.व याशिवाय आपल्याकडे काही पर्याय नाही. तर मग पुर्ण सभागृह आम्ही तशी परवानगी देऊ.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-श्री. राजानी यांनी जे म्हंटले त्याबाबत मी एक मिनिटात सांगु इच्छितो की, शहरामध्ये अशी चर्चा होत आहे. तशी चर्चा होत आहे. चांगले काही म्हंटले तरी चर्चा होते दुसरे काही म्हंटले तरीही चर्चा होते. ते सोडुन दया. परंतु आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता आम्हाला हा निर्णय लवकरात लवकर घ्यायचा आहे. व त्या निर्णयास आमच्या सभागृहाच्या सर्व सदस्यांची संमती आहे. मी महापौरांना ही विनंती करतो की, हा प्रस्ताव पारीत झाल्याचे त्यांनी लवकरात लवकर जाहीर करावे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-कोनार्कचे पत्र आले आहे ते आपण सांगा, ते काय म्हणतात, होऊ शकते ते आम्हास जास्त पैसे देऊ शकतील.

श्री. ढाकरे (उप आयुक्त):-पिठासिन अधिका-यांनी एकदा निर्णय दिलेला आहे. त्याबाबत आता आयुक्तांनी बोलण्याची जरूरत नाही. तरीही जो प्रस्ताव आम्ही येथे आणला आहे तो सर्व बाजुने कायदेशिर असा आहे.

मा.महापौरः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--६०--

मा.सचिव :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.००वाजता सभा संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखिजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/६/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/६/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.६.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. चौधरी गणेश
५. श्रीमती. मोकल सिमा
६. श्रीमती. सोनावणे यमुना
७. श्रीमती. ज्योती कालानी
८. श्री. ढेणवाल बनवारी
९. श्रीमती. वेलकर सुरेखा
१०. श्री. यादव नरेश
११ श्री. राजु सोनावणे
१२ श्रीमती. दासानी मिनु
१३ श्रीमती. पवार पंचशिला
१४ श्री. टाले प्रमोद
१५श्रीमती. बगाडे सुनिता
१६ श्री. भांडे भगवान
१७ श्री. ठाकुर सेवलदास
१८ श्री. वनवारी किशोर
१९ श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई
२० श्री. पमनानी ईश्वर
२१ श्रीमती.बेबी वसीटा
२२ श्रीमती. मटाई जोनिता
२३ श्री. चौधरी राजेंद
२४ श्री. लांडे पांडुरंग
२५ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२६ श्री.मोरे भानजी
२७ श्रीमती.राजवानी सुनिता
२८ श्रीमती. टेकचंदानी चंद्रा
२९ श्री. पुरस्वानी जमनादास
३० श्री. वाधवा गिरधारी
३१ श्री. पारवानी रामचंद
३२श्री. तजरेजा विनोद
३३ श्री. रोहडा श्यामसुंदर
३४. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३५. श्री. मालती करोतिया
३६ श्री. बहरानी ठाकुरदास
३७ श्री. सुरेश जाधव
३८. श्री. भिमसेन मोरे
३९. श्री. महाडिक प्रकाश
४०. श्रीमती. साधवानी जया
४१. श्री. जयप्रकाश भाटीया
४२. श्रीमती. वनवारी मोना
४३ श्रीमती. जेसवानी आशा
४४ श्री. राजानी नरेंद
४५. श्री. मनसुलकर सुभाष
४६. श्रीमती. नाईक यशस्विनी
४७. श्रीमती. राजानी भारती
४८. श्रीमती. कुंदनानी लविना
४९. श्री. केणी जयकुमार
५०. श्री. पंजाबी नारायण
५१. श्री. आयलानी कुमार
५२. श्री. अचनानी पम्मीकुमार
५३. श्रीमती.राधवानी आशा
५४. श्री. माखीजा प्रकाश
५५. श्री. जग्यासी राजु
५६. श्री. किशनानी गोदुमल
५७. श्री. सचदेव गिरधारी
५८. श्री.रामरख्यानी मोहनदास
५९. श्री. ठाकुर नरेंदकुमार
६० श्री.पंजाबी लाल
६१ श्री. केसवानी किशोर

तर



१. श्री. वाघे शामु ,२. श्री.उमाप रामदास, ३ श्री.आढाव रामभाऊ, ४श्री. तेजी कैलास, ५. श्री.खेमाणी देवेंद्रसिंह ,६ श्री.वारिंगे पंढरीनाथ, ७ श्री. चव्हाण रमेश, ८ श्रीमती. वलेचा पदमा, ९. श्रीमती. गजवानी कांता, १०. श्रीमती. भठिजा इंदिरा ,११. श्रीमती. वारिंगे पन्ना, १२ श्री. रामरख्यानी मोहनदास, १३ श्री. बहरानी गोप हे सन्मानानिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४० वाजता सभेची सुरूवात
करण्यात आली.

<u>मा.महापौरः-</u>सभागृहाला हे सांगण्यास मला आनंद वाटतो की, उल्हासनगर महापालिकेला पुर्ण वेळ आयुक्त श्री. पोखरकर यांच्या रूपात मिळाले आहेत. ते आज पहिली महासभा अटेंड करीत आहेत. मी त्यांचा परिचय देत आहे आणि सभागृहातील सदस्यांना निवेदन करीत आहे की, त्यांनी त्यांचा परिचय आयुक्तांना दयावा. बहुतेक सदस्यांची, गटनेत्त्यांची आयुक्तांशी ओळख झाली आहे. तरी पण प्रत्येकानी त्यांना परिचय करून दिला तर एकमेकांचे सहकार्य घेऊन कामकाज करणे सोपे जाईल. पंजाबी साहेब तुमचे काय मत आहे?

<u>मा.सदस्य श्री. सेवल ठकुरः-</u> महापौर,हि आनंदाची गोष्ट आहे की, श्री. पोखरकर नवीन आयुक्त पुर्ण वेळ आपल्या शहरात आले आहेत. तसेच तुम्ही नॉन हॉकर्स झोन जाहिर केले त्यासाठी व्याप-यांतर्फे व शहरवासीयां तर्फे आपले आभार मानत आहे. सर्वांना आनंद झाला आहे. म्हणुन आम्ही आपले पुष्पगुच्छ देऊन स्वागत करणार आहोत.

(मा.सदस्य श्री. सेवलदास ठकुर यांनी मा. आयुक्त व मा. महापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले).

<u>मा.महापौरः-</u>सर्वांनी आपली ओळख करून दिली तर बरे होईल, मोरे साहेब आपणा पासुन सुरूवात करा.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः</u>-मी बी. बी. मोरे आर.पी.आय पक्षाचा गटनेता असुन प्रभाग क्र.३१ येथील नगरसेवक आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती.पंचशिला पवारः</u>-मा.महापौर साहेब, मा. पोखरकर साहेब, मा. उपमहापौर, मा.सचिव व सर्व सदस्य आम्हाला आनंद आहे की, आम्हाला पुर्ण वेळ आयुक्त उपलब्ध झाले आहेत. व आम्ही अशी आशा करतो की, महापौर साहेब सर्व शहरवासीयांना दिलासा देतील व नागरिक सुविधा देण्यात हातभार लावतील व मिळुन काम करतील आम्ही त्यांना हार्दिक अभिनंदन करतो. आम्ही त्यांना प्रभाग क्र. १३ व सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे शुभेच्छा देतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः</u>-मी आर.पी.आय. नगरसेविका सुनिता बाबुराव बगाडे, माझ्या तर्फे व माझ्या प्रभागातर्फे हार्दिक शुभेच्छा.

(असे एक एक सदस्य स्वतःचा परिचय करून देत असताना)

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आता नगरसेवकांची ओळख करून देणे एवढे आवश्यक नाही.



मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौर, जेव्हा आयुक्त आले होते तेव्हा काही नगरसेवक स्वागत करायला गेले असता त्यावेळेस त्यांनी ओळख करून घ्यायला पाहिजे होती कोण आपल्याकडे आले आहेत. कित्येक जण गेले होते पण त्यांनी लक्ष दिले नाही. क्षमा करा मी माफी मागते पण हि पध्दत मला आवडली नाही.

मा.महापौरः-ज्यांना ओळख करून देण्यात स्वारस्य वाटत नसेल त्यांनी नका देऊ.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आयुक्त साहेब, पहात असतील की इथे दोन-दोन नगरसेवकांसमोर विपक्ष नेत्त्यांचे फलक लावले आहेत. अशात-हेने इथल्या प्रशासनाचे काम चालते. इकडे पण विपक्ष नेता, तिकडे पण विपक्ष नेता. यात-हेने आपल्याला सभागृहाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. उल्हासनगर मध्ये दोन विपक्ष नेता आहेत अशी खुपशी अंधाधुंदी प्रशासनात आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे-सन्माननिय सचिव साहेब इथे शिवसेना गटनेता पाहिजे.

मा.सचिवः-आहे ना. फलक बरोबर लिहिला आहे. तुमच्या पहाण्यात चुक झाली आहे. एक फलक विपक्ष नेत्त्याचा आहे. एक गटनेत्त्याचा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-असु दे, असु दे हरकत नाही. होते चुक. कधी कधी इंग्रजीतील सहाचा आकडा मागच्या बाजुने नऊ दिसतो.

मा.महापौरः-आयुक्तांचा तर परिचय नको ना?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-सन्माननिय महापौर व उल्हासनगर महापालिकेत नव्याने आणि प्रथम महासभेत आलेले आयुक्तांचे आम्ही आर.पी.आय तर्फे तसेच पुर्ण सभागृहातर्फे अभिनंदन करतो. परंतु आज ९७ पासुन ते आजपर्यंत उल्हासनगर महानगरपालिकेला कोणी कायमस्वरूपी आयुक्त दिले गेले नाही. त्यामुळे शहरवासीयांना व नगरसेवकांना असे वाटत होते की, आमचे शहर सुधारेल की नाही, कामे होतील का नाही म्हणुन खुप अडचणी यायच्या. जसे पाणी समस्या साफसफाई समस्या अनेक अडचणी यायच्या कारण की जे प्रभारी आयुक्त होते. तेव्हा प्रत्त्येक कागद सही साठी ठाण्याला घेऊन जावा लागत असे. आणि जे पण आयुक्त होते ते चांगले होते, परंतु दोन महानगरपालिकेचा कार्यभार त्यांच्याकडे असल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेला वेळ कमी दिला जायचा. त्यामुळे असे वाटायचे की आमच्या पाच वर्षाच्या कालावधीत जर कामकाज नाही झाले तर पुढे या शहराचे काय होईल. असे प्रत्त्येक सदस्याला वाटत होते. आधी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे, कारण की महाराष्ट्र शासनाने शहराचे प्रथम नागरिक आमचे महापौर यांना अडीच वर्षाचा कालावधी मिळाला. त्याशिवाय महाराष्ट्र शासनाने त्यांना कॅबीनेटमंत्री महोदयांचा दर्जा दिला आहे. तसेच शासनाने जाहिर केले आहे की नागपुर आणि मुंबई येथील जे महापौर आहेत त्यांना कॅबिनेट मंत्री महोदयांचा दर्जा दिला जाणार आहे.

काही विपक्ष सदस्य :- अजुन कुठे जाहिर झाले आहे? जर जाहिर झाले असते तर आम्ही सुध्दा महापौरांचे स्वागत केले असते.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-सर्व काही सभेमध्ये ठरले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- अजुन जाहिर नाही केले आहे. आम्ही सुध्दा महापौरांचे स्वागत केले असते.



मा.महापौरः-बरोबर आहे अजुन जाहिर नाही केले.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-माझे बोलुन झाल्यावर तुम्हाला काय बोलायचे ते बोला. ते आमच्या पक्षाचे आहेत आम्हाला अभिनंदन करायचे आहे. वर्तमान पत्राात आले नाही पण कागदोपत्री सर्व झाले आहे. आणि दुसरी गोष्ट अशी आहे की, श्री. बी. आर. पोखरकर हे पहिल्यांदा महासभेत आले आहेत. त्यांना आमची विनंती आहे सर्व सभागृहातर्फे, प्रथम नागरिकांतर्फे, व व्यापा-यांतर्फे पुर्ण झोपडवासियांतर्फे मी त्यांचे स्वागत करतो. कृपा करून तुम्ही आता या शहराला नंदनवनासारखे सुंदर बनविण्यासाठी आपला पुर्ण वेळ काम करा, आम्ही ७४ नगरसेवक आपणांस सहयोग देऊ आपणास पाठिंबा देऊ.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आमचे कशाला बोलता?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-सत्ताधारी पक्ष पाठिंबा देत असतो विरोधी पक्ष विरोध करत असतो पण त्या विरोधास आम्ही जुमानत नाही. आम्ही आर.पी. आय तर्फे शहरवासीयांतर्फे आपले अभिनंदन करीत आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा.महापौरजी, आम्ही आपल्या पक्षांतर्फे नविन आयुक्तांचे स्वागत करीत आहोत. अभिनंदन करतो त्याचबरोबर आम्ही त्यांना एक शाब्दीक संकेत पण देतो की, आजपर्यंत उल्हासनगरमधुन जे पण अधिकारी गेले ते कधी ना कधी या शहरामुळे अडचणीत आले आहेत. आम्ही एवढीच आशा करतो की तुम्हाला अशी अडचण न येवो. धन्यवाद.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौर मी शिवसेने तर्फे विपक्ष नेता म्हणुन आयुक्तांचे स्वागत करीत आहे, व जसे लाल पंजाबी साहेब म्हणाले या शहरास तुमच्या कडुन खुप अपेक्षा आहेत. कारण की तुमची नेमणुक तीन वर्षासाठी झाली आहे. त्यामुळे लोकांना असे वाटते की, कायमस्वरूपी आयुक्त आहेत शहराचा विकास होईल. लोकांनी आपल्याकडुन जी अभिलाषा ठेवली आहे ती आपण पुर्ण कराल, शहराला सुंदर बनवाल. व रिकव्हरीकडे लक्ष दयाल. आम्ही नेहमी ऐकत आलो आहोत की, निधी नाही. आम्हा नगरसेवकांसाठी बजेटमध्ये दहा लाखाची तरतुद आहे. तर नगरसेवकांनी निधी मिळण्यासाठी कित्त्येक पत्र दिली आहेत. तर म्हणतात की निधी उपलब्ध नाही. रिकव्हरी करणे आयुक्तांचे काम आहे. मी आशा ठेवते की, जो नगरसेवक निधी मंजुर केला आहे, दहा लाखाचा. दोन-चार नगरसेवकांचे मंजुर झाले आहे, इतर नगरसेवकांचे पण मंजुर करण्यांत यावे, तर खुप मेहरबानी होईल धन्यवाद.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौर साहेब, आम्ही नविन आलेल्या आयुक्तांचे स्वागत करतो, इतर नेता गण सर्वकाही बोलले आहे परंतु मी या गोष्टीचे स्पष्टीकरण करू इच्छितो की या शहरात चंद्रशेखर साहेब पण होते त्यांनी खुप चांगले काम केले. आमच्या शहराच्या विकासासाठी त्यांनी खुप चांगले काम केले. त्यानंतर बक्षी साहेब आले, ते भले वेळ कमी दयायचे तरी त्यांनी पण चांगले काम केले. जसे चंद्रशेखर साहेब, आर.डी.शिंदे यांनी काम केले तसे त्यांनी पण ते काम चालु ठेवले. आता पोखरकर साहेबांना पुर्ण वेळ आयुक्त म्हणुन पाठविण्यात आले आहे त्यामुळे आम्ही महाराष्ट्र शासनाचे खुप

आभार मानतो. आम्ही उल्हासनगर महापालिकेतर्फे सर्व नगरसेवकांतर्फे त्यांना सहयोग देऊ. गण्याला असे म्हंटले जाते की, साहेब जेव्हा पासुन तिकडुन इकडे आले आहेत तिकडचे नगरसेवक रडत आहेत. त्यांची सेवा तिथे एवढी चांगली होती ते यांची आठवण काढत आहेत. तर इथे उल्हासनगरमध्ये देखिल



तीन वर्ष नाही दहा वर्ष राहोत व असे काम करून जावे त्यांनी की आम्ही पण यांच्यासाठी रडावे. तर आता उल्हासनगर महानगरपालिकेचे हे निवडणुकीचे वर्ष आहे त्यागोष्टीला लक्षात घेऊन आयुक्तांना काही लोक घाबरवत आहेत, घाबरण्याचे काही कारण नाही. उल्हासनगरमध्ये जे पण झाले आहे. श्री. चंद्रशेखर साहेबांनी जे केले त्यांच्यापेक्षा जास्त कायदा मानणारे कोणी नव्हते. आमचे श्री. बक्षी साहेब हे देखिल आय.एस अधिकारी होते त्यांनी पण कायदयाला धरून काम केले आहे. त्यांनी जसे केले तसे काम तुम्ही करत राहीलात तर तुम्हाला काही अडचण येणार नाही. आम्ही प्रत्त्येक क्षण, प्रत्त्येक वेळी आपल्या बरोबर आहोत.आपणास सहकार्य देऊ त्याबददल आम्हाला पण आपल्याकडुन सहकार्याची अपेक्षा आहे. जयहिंद.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे. प्रश्न क्र. ५७२ श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे. यावेळी ४. ५० मिनिटे झाली आहेत.

<u>प्रश्न क्र. ५७२</u> :-आरक्षण क्र. २०३, सिट नं. ५३ या राखीव असणा-या भुखंडावरील अतिक्रमण कधी हटविणार?

<u>उत्तर :</u>-शिट क्र. ५३ मधील आरक्षण क्र. २०३ चे क्षेत्र हे अंदाजे ४२००० चौ. वाल एवढे असुन सदरच्या आरक्षित भंखंडामधील नेमके कोणते अतिक्रमण हटवणे अभिप्रेत आहे. याबाबत प्रश्नामध्ये नेमका उल्लेख नाही व सदर आरक्षीत भुखंडामध्ये, अनेक चाळी, घरे मंदीर कुंपन भिंत या गोष्टीचा समावेश आहे.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-</u>सन्मानानिय महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असुन मला वरील प्रमाणे उत्तर दिले आहे परंतु जे आरक्षित भुखंड आहे त्यावर जे अतिक्रमणे झाले आहे ते अतिक्रमण हटविले नाही आहे. आणि श्री. भडकवाड साहेबांनी जे उत्तर दिले आहे ते चुकीचे आहे. ती भिंत तोडली आहे. अजुनही रेल्वे लाईनच्या लगतची असणारी भिंत आपण तोडली नाही. मी आपणाशी प्रत्यक्ष चर्चा केली होती त्यावेळी देखिल सांगीतले होते की, भिंत बांधण्यासाठी महानगरपालिकेची कोणत्त्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. आपण ते अनाधिकृत बांधकाम तोडुन दयावे. परंतु अद्याप पर्यंत आपण ते तोडुन दिलेले नाही आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-</u>मा.महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, सचिव साहेब व सन्मानानिय सदन, सन्मानानिय सदस्य श्री. लांडे साहेबांना जे उत्तर दिले आहे त्या उत्तरात काही चुक नाही. जसा प्रश्न विचारला आहे तसे स्पष्ट उत्तर दिले आहे.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-</u>नाही नाही, तुम्ही म्हणता त्याच्यामध्ये कचुक नाही असे नाही. तुम्ही जी भिंत निष्कासित केली त्याच्या शेजारी असणारी जी भिंत आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.स.):-</u>आपल्या प्रश्नामध्ये कुठेही भिंतीचा उल्लेख नाही. आरक्षण क्र. २०३ मधील अतिक्रमणे कधी हटविणार?याचे उत्तर दिलेले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मी काय पुर्ण खन्ना कंपाऊंड हटवायला नाही सांगीतले.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-आपल्या दुस-या प्रश्नाचा भिंतीमध्ये उल्लेख आहे तो पुढे प्रश्न येईल त्यावेळेस मी उत्तर देईन.

--६--

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मग चला ५७३ नं घ्या.

मा.सचिव :-प्रश्न क्र. ५७३ व प्रश्न क्र.५७४ श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५७३:-आरक्षण क्र. २०३, सिट नं ५३, या आरक्षित भुखंड टिम्बर मार्टसाठी राखीव असतांना तेथे आपण वालकंपाऊंडची परवानगी दिली आहे काय?

उत्तर :-आज पर्यंत आरक्षण क्र. २०३, शिट नं. ५३ या आरक्षित भुखंड टिम्बर मार्ट साठी राखीव असताना तेथे आजपर्यंत वालकंम्पाऊंडची परवानगी दिलेली नाही.

प्रश्न क्र. ५७४:- आरक्षण क्रमांक २०३, सिट नं. ५३ येथे अनधिकृत वॉल कंपाऊंड आहे ती आपण कधी जमीन दोस्त करणार?

उत्तर :- आरक्षण क्र. २०३, शिट नं. ५३ येथे श्री. जगदिशसिंह व श्रीमती शांताबाई नायडु यांनी नव्याने सुरु केलेल्या अनधिकृत वॉल कंपाऊंडच्या बांधकामाचे दिनांक २७.१२.२०००रोजी निष्कासन करण्यात आलेले असून सदयस्थितीत तेथे कोणतेही नविन अनधिकृत बांधकाम सुरु नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-आपण वरील प्रमाणे उत्तर दिले आहे. तरी पण तेथे सुरक्षित वॉल कंपाऊंडची भिंत बांधलेली आहे. ती अनाधिकृत आहे मग ती अद्याप पर्यंत का जामिनदोस्त केलेली नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-या महासभेमध्ये ब-याच वेळा चर्चा झाली आहे. मा. चंद्रशेखर साहेब असताना या महासभेनेच असे धोरण ठरवले होते की, जुलै ९९ नंतरच्या होणा-या अनाधिकृत बांधकामावर कारवाई करावी. त्याप्रमाणे आरक्षण क्र. २०३ मध्ये शिट नं. ५३ येथे जगदिश सिंग आणि शांताबाई नायडु यांनी एक नव्याने वॉल कंपाऊंडचे काम सुरू केले होते. ते नव्याने सुरू करण्यात आलेले बांधकाम २७.२.२००१ रोजी तोडण्यात आले आहे. आणि त्याठिकाणी नव्याने आता कुठल्याही परिस्थितीमध्ये दुसरे बांधकाम चालु नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे- जी भिंत तोडली त्याच्या शेजारी नविनच भिंत होती. तुमच्या कडे काय पुरावा आहे की, ती १९९५ च्या अगोदरची भिंत आहे. याचा अर्थ तुम्ही अनाधिकृत बांधकामांना पाठिंबा देता. ती भिंत अनाधिकृत आहे हे मी आपल्या निर्दशनास आणुन दिले होते. मी महापालिकेच्या बिट निरिक्षकांना प्रत्यक्ष साईटवर घेऊन गेलो होतो. ती भिंत सुध्दा त्यांना दाखविली होती. परंतु त्यांचे जगदिशसिंग आणि शांताबाई या अनाधिकृत बांधकाम करणा-या नागरिकांशी त्यांचा संबंध आहे त्यामुळे आजपर्यंत ती भिंत तोडण्यात आली नाही. भिंत अनाधिकृत आहे की नाही हा प्रश्न आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-अनाधिकृत बांधकामांना आम्ही संरक्षण देतो या म्हणण्यात काहीही तथ्य नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-तथ्य कसे नाही मग ती भिंत का नाही तोडली?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-अनाधिकृत बांधकाम नव्याने सुरू झालेले भिंतीचे जे बांधकाम होते ते आम्ही निष्कासित केले आहे.



मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-तुम्ही कशा वरून म्हणता हे बांधकाम जुने आहे ते? त्याला काय पुरावा आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-आमच्या कालावधीत जे बांधकाम सुरू झाले ते आम्ही तोडले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-नाही नाही, तुमच्याच कालावधीत ते बांधकाम झाले आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:'-मा.महापौर ते म्हणतात आमच्या कालावधीत झाले नाही जर कुणी घोटाळा करून गेला असेल तर ते तोडणार नाहीत?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-आमच्या कालावधीत नक्कीच तोडु.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-सदरची भिंत अनाधिकृत आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-सदरची भिंत अनाधिकृत आहे परंतु मी आपल्याला सुरवातीलाच सांगितले की, याच महासभेने .......

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-भडकवाड साहेब, माझा एक साधा प्रश्न आहे. ती भिंत अनाधिकृत आहे की अधिकृत आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-अनाधिकृत आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-अनाधिकृत आहे तर तोडणार का नाही?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-तेच सांगितले सुरवातीला आपल्याला या महासभेमध्ये चर्चा झाली आहे की जुलै ९९ च्या अगोदरचे.......

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-हा प्रश्नच नव्हता आला आजपर्यंत.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-अनेक वेळा चर्चा झाली आहे या विषयावर.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-काय चर्चा झाली?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-जुलै ९९च्या अगोदरची बांधकामे तोडु नयेत.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-नाही नाही, असे काही नाही. तो आरक्षित भुखंड आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-महापौरजी माझा एक प्रश्न आहे यांच्या समोर जर महासभेमध्ये चर्चा झाली आहे ती चर्चा अधिकृत, अनाधिकृत बांधकामांना तोडणे ना तोडणे यासाठी लागु आहे का? हे आपल्यावर बंधनकारक राहिल. इथे अनेकदा कारणे दिली जातात. ९४च्या अगोदरचे, ९५च्या अगोदरचे हे सर्व

राहत्त्या घरांसाठी लागु होते. व्यावसायिक जागांसाठी नाही. तेथे रहिवासी राहतात का? तिथे फक्त वॉल कंपाऊंड आहे. नगरसेवकाची मागणी आहे की, ती भिंत अनाधिकृत आहे तर ती तुम्ही तोडा. जर आज महासभेने असा प्रस्ताव पारीत



केला की एकही बांधकाम तोडु नये. आता आम्ही एक ठराव पारीत करतो जे पण बांधकाम आहे ते जुलै २००१ पर्यंत करा. नंतर जुलै २००१ नंतरचे बांधकाम तोडण्यात येईल.

श्री.दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-मी मागच्या महासभेमध्ये सुध्दा उत्तर दिले आहे की, तत्कालिन आयुक्त यांनी निर्णय घेतला होता की, जुलै ९९ नंतर आम्ही अनाधिकृत बांधकाम होऊ देणार नाही त्यावर नियंत्रण ठेऊ. मी त्यांचा हाताखालील अधिकारी आहे. यासाठी मी ९९ नंतर जितके पण अनाधिकृत बांधकाम होते ते तोडले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-मला हे सांगा ती भित ९९ च्या अगोदरची आहे. की नंतरची आहे यासाठी तुमच्याकडे काय पुरावा आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-मी शहर अभियंताकडुन तसा अहवाल घेतला आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- त्यांनी जो अहवाल दिलेला आहे तो चुकीचा आहे. आज प्रत्येक वर्तमानपत्रात सर्वांची नावे येतात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मला हे कळु दया शहर अभियंता कसा असा अहवाल देऊ शकेल.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-क्षमा करा, क्षमा करा मी माझे शब्द परत घेतो. बिट निरिक्षकाने दिला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-परंतु तक्रारी येत आहेत. तर तुम्ही त्यावर काय केलेत?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-जी तक्रार आली होती ते बांधकाम मी निष्कासित केले आहे. हे मी तुम्हाला सांगितले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-ती तक्रार पुर्ण बांधकामासाठी आलेली आहे असे नाही की आज चालु आहे काल चालु होते.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-तक्रार अशी आली नव्हती.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-धिस शो दॅट इव्हन फॉर दी रिझर्व्ह प्लॉट हाऊ द कार्पोरेशन इज फंक्शनिंग? हाऊ इन द मेंन्टलिटी ऑफ डिपार्टमेंट?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-मी आपणांस पुन्हा स्पष्ट करतो की,...

मा.महापौर:-राजानी साहेब अशी गोष्ट नाही आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-महापौर साहेब, एक सेकंद माझे ऐकुन घ्या. त्यांनी स्वत: कबुल केले की ती भिंत अनाधिकृत आहे. आणि त्यांनी ठरवुन दिले आहे की मी तोडणार नाही म्हणुन.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-असे मी म्हंटलेलो नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-जुलै ९९ च्या अगोदरची भिंत आहे तर पुरावा दाखवा.



श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-गटनेते साहेब मी असे बोललो नाही की तोडणार नाही म्हणुन?

मा.महापौरः-आपल्याला यांचे म्हणणे समजले नाही. यांचे म्हणणे आहे की, चंद्रशेखर साहेब आल्यानंतर महापालिकेने अनाधिकृत बांधकामाविषयी जे धोरण ठरविले होते की, जे पण बांधकाम अनिाधिकृत आहे, १२ जुलै ९९ च्या अगोदरचे त्यांना तोडले नाही जाणार. जर ते कोणत्त्याही योजनेला प्रभावित करत नसेल तर. जर हा आरक्षित भुखंड आहे एखादया योजनेवर त्याचा परिणाम होत असेल,जेव्हा महापालिका आरक्षित भुखंडावर कार्यवाही करेल त्यावेळी त्याच्यावर कार्यवाही केली जाईल परंतु जर जुलै नंतरचे बांधकाम असेल तर ते तोडले जाईल. त्याच्या अगोदरचे नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-याचा अर्थ जोपण धोरणात्मक निर्णय घेतला आहे त्यानुसार काय सगळीकडे काम चालु आहे?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौरजी, आपण चंद्रशेखर साहेबांनी धोरण निश्चित केल्याची जी गोष्ट बोलता. माझ्यामते यावर श्री. बी.बी.मोरे साहेबांनी खुलासा केला होता. की कोणतेही धोरण निश्चित नव्हते झाले. फक्त चर्चा झाली होती. याचा खुलासा त्यांनी केला होता. आतापण आपण त्यांना विचारा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तो आरक्षित भुखंड आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आपण दिशाभुल करू नका.

मा.महापौर :-मला माहित आहे आरक्षित भुखंड आहे. परंतु जेव्हा महापालिका तो भुखंड विकसित करण्याचा निर्णय घेईल त्यावेळी तिथले अतिक्रमण हटविले जाईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापालिका आरक्षित भुखंड विकसित करण्याचा निर्णय घेणारच नाही हे मला माहित आहे. परंतु हा आरक्षित भुखंड आहे एक नगरसेवक तक्रार करतोय त्याकडे तुम्ही लक्ष देत नाही मग साधारण माणसाचे काय होईल?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-हा आरक्षित भुखंड आहे, महापालिका दहा वर्षाने विकसित करेल तो पर्यंत त्याला तिथेच राहु दयायचे. त्याने कोर्टात जायचे ताबा घ्यायचा हे तुम्हाला चालेल ना? म्हणजे महापालिकेला एखादी मालमत्ता निर्दशनास आणुन दिली तर तुमचे काम नाही का सांभाळणे?

मा.महापौरः-मला हे सांगा किती आरक्षित भुखंडावर वसाहती आहेत? सर्वांना तोडायचे?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-नका तोडु चांगली गोष्ट आहे.

मा.महापौरः-हजारो झोपडया आहेत, हजारो बांधकामे आहेत.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आता बांधकाम चालु होत आहे, ते निर्दशनास आणुन दिल्यावर तोडायचे नाही का?

मा.महापौरः-जे आताचे आहे ते तोडायचे आहे.

--१०--

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-तेच तर मी म्हणत आहे ना?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-लांडे साहेब मी एक गोष्ट स्पष्ट करतो. तो आरक्षित भुखंड टिंम्बर मार्केटसाठी आहे. त्या जगजितसिंगकडे त्याचा ताबा आहे. त्याच्या ओनरशिप प्लॉटवर त्याने कंपाऊंड वॉल आधीच बांधली होती. जे नव्याने सुरू केले ते आम्ही तोडले. त्याने जे विनापरवानगीने बांधले ते तोडले.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-ती भिंत पण नविन आहे, जुनी आहे म्हणता तुमच्याकडे काय पुरावा आहे. मला पुरावा दया ना तुम्ही. तुमच्याकडे काय पुरावा आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-आता माझ्याकडे पुरावा नाही नंतर तुम्हाला पुरावा देतो.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-भिंत अनाधिकृत आहे हे शंभर टक्के खरे आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-ती अनाधिकृत आहे हे मी स्पष्ट सांगितले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-तरी तुम्ही तोडणार नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-असे मी बोललो नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-तुम्ही सभागृहाची दिशाभुल करत आहात.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुकत अ.बा.वि.):-सध्या तत्कालिन आयुक्तांनी जे निर्देश दिले होते त्याप्रमाणे एक अधिकारी म्हणुन मी वागत आलो आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-काही असे धोरण ठरलेले नाही आहे. चंद्रशेखर साहेबांनी महासभेमध्ये निवेदन केलेले नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-हे निवेदन मागच्या महासभेतील इतिवृत्तात आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आज जरी बांधकाम झाले ना तरी विटवाले ठरवतात ते ९९च्या आधीचे आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.):-मागचे इतिवृत आपण पाहिले तर स्वतः मा.आयुक्त श्री. आर.डी. शिंदे यांनी निवेदन केले आहे. आपण मागचे प्रोसेडिंग पहा.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-ठिक आहे मी यावर सचिव साहेबांचे मत मागतो. काय असेल ते लिगल, इलिगल, अनाधिकृत असेल तर त्यांनी त्यांचे मत दयावे व अधिकृत असेल तरी दयावे. महापालिकेची संपत्ती आहे, तुमच्या निर्दशनास आणुन दिली आहे. तुम्ही वरून सांगता की, सगळया उल्हासनगरमध्ये अनाधिकृत वसाहत आहे. जी वसली ती वसली पण जी वसत आहेत ती तुमच्या निर्दशनास आणुन देत आहोत. ती जर तुम्ही काढणार नसाल तर महापौर साहेब, तुम्ही या सभागृहाची व पुर्ण उल्हासनगरची दिशाभुल करत आहात.

मा.महापौरः-माझे म्हणणे ऐका.



मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-ऐकायची गरज नाही. जे अनाधिकृत आहे ते ऐकण्याची गरज काय?

मा.महापौरः-मी नाही तुम्ही दिशाभुल करीत आहात.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-नाही नाही. मी दिशाभुल नाही करत मी तुम्हाला उलट सांगत आहे.

मा.महापौरः-मी स्पष्टीकरण दिले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-तुम्ही हीच वाट बघत आहात ना की बांधकाम पुर्ण होऊ दे.

मा.महापौरः-मी स्पष्टीकरण दिले आहे की, १२ जुलै ९९च्या अगोदर जितके पण शहरात अनाधिकृत बांधकाम आहे. तिकडे दुर्लक्ष केले जाणार आहे. जर ते शहराच्या विकासाला अडथळे आणत नसतील तर. आणि जर ते अडथळे आणत असतील तर ते बांधकाम निष्कासित केले जाईल. ५० वर्ष जुने बांधकाम देखिल तोडले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मागच्या आठवडयात आपण एक बांधकाम तोडले होते ते आठ वर्ष जुने होते. तोडले होते की नव्हते हे अतिक्रमण विभागाने उत्तर दयावे. मग का तोडले?

मा.महापौरः-कुठे?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-कॅम्प नं. ३ पंजाबी कॉलनी. ते तोडले की नाही ते सांगा.

मा.महापौरः-मला याविषयी माहिती नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-असे कसे तुम्हाला फक्त तुमच्या सवलतीचे माहित असते.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.)ः-राजानी साहेबांनी ज्या बांधकामाचा उल्लेख केला ते नालीवर होते. त्यामुळे तोडले.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-केव्हा बनले होते?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.)ः-जुने होते परंतु नाल्यावर....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-किती वर्ष जुने होते? इथे एक अपंग व्यक्ती पी.सी.ओ चालवायचा.

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.)ः-परंतु ते नाल्यावर होते. सेव्हरेजचा प्रश्न होता.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-ते काय १२ जुलै ९९ च्या अगोदरचे नाही आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त अ.बा.वि.)ः-महापौरांनी स्पष्ट केले आहे की, जे विकासास अडथळा आणत असतील ते........

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-नाली काय आता तयार करत होते काय? तिथे अजुन काही प्रगती झाली नाही आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-नाल्यावर कोणतेही अनाधिकृत बांधकाम असेल ते तुम्ही तोडाल का? आम्ही तुम्हाला यादी देतो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तुम्हाला यादी देऊ.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तुम्हाला यादी देऊ तोडाल तुम्ही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तुम्हाला लाज वाटली पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तुम्ही सभागृहाची दिशाभुल करत आहात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मिस्टर भडकवाड तुम्ही खाली बसा. आयुक्त साहेब तुम्ही उत्तर दया तुमचे काय धोरण आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- आयुक्त साहेब तुम्ही उत्तर दया.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-प्रत्येक उत्तरावर तुमची सही आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-नाल्यावरील अनाधिकृत बांधकामाविषयी तुमचे काय मत आहे?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामूळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. नरेश यादवः-इतकया वर्षाचे जुने बांधकाम त्यांनी तोडले.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानीः-उल्हास नदीवर बांधकाम चालु आहे. मी उपायुक्तांना कॅबीनमध्ये बोलावून विचारले हे काय चालु आहे? ते म्हणाले की, हे चांगले बांधत आहे. ठिक आहे आम्ही पण चांगले बांधतो आम्हाला दया परवानगी.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सन्माननिय महापौरजी,..

मा.महापौरः- पंजाबी साहेबांनी आयुक्तांचे स्टेटमेंट मागीतले आहे. या मुदयावर तर आयुक्तांनी ते स्टेटमेंट दयावे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः- महापौरजी,एक मिनिट मला पण बोलु दया.

मा.सदस्य श्री. नरेश यादवः-पंजाबी कॉलनीतील २० वर्ष जुने बांधकाम तोडले. तिथे एक अपंग व्यक्ती एस.टी.डी. चालवुन आपला उदरनिर्वाह करायचा. ते का तोडले याचे उत्तर दया?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- ते कसे तोडले ते उत्तर दया ना. बाकीच्या नाल्यावरचे बांधकाम तोडाल का?



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-तोडावेच लागेल त्यांना.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी ५० कामांची यादी देतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आम्ही तुम्हाला यादी देतो तुम्ही ते तोडण्याचे आदेश काढा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी आता इथेच देतो तुम्हाला यादी.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-तुम्ही मान्य करा आम्ही यादी देतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी- उदया पासुन तोडायला सुरूवात कराल? आयुक्त साहेब, महापौर साहेब तुम्ही बोला.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मा.महापौर साहेब मी आयुक्तांना विचारू इच्छितो ते म्हणतात की १२ जुलै ९९ आधिचे बांधकाम महासभा किंवा चंद्रशेखर साहेबांनी ठरविल्याप्रमाणे तोडायचे नाही. आता आयुक्तांचे वर्तमानपत्रात स्टेटमेंट आले की, जो कुणी घर पावती भरणार नाही त्याचे बांधकाम तोडले जाईल. आता १२ जुलै ९९ च्या निर्णयाला हे आयुक्त सहमत आहेत की नाही. हे आम्हाला माहित पडले पाहिजे. जर ते तुमच्या ठरावाशी सहमत नसतील तर ते बांधकाम तोडणे चालु करतील.

मा.आयुक्त श्री. बी.आर.पोखरकर:-मा.महापौर, मा.उपमहापौर सर्व सन्माननिय सदस्य, उल्हासनगर महानगरपालिकेचा पदभार स्विकारून मला २० दिवस झाले आहेत.

काही सदस्य:-हिंदीत बोला. किंवा इंग्रजित बोला.

मा.आयुक्त श्री. बी.आर.पोखरकर:-मला हिंदी येत नाही. मराठी किंवा इंग्रजित बोलेन. हिंदीत बोलणे मुश्किल आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आम्हाला मराठीत बोललेले चालेल.

मा.आयुक्त श्री. बी.आर.पोखरकर:-चालेल, मराठीत चालेल?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-तुम्हाला हिंदी येत नसेल तर....

मा.आयुक्त श्री. बी.आर.पोखरकर:-मला हिंदी येते परंतु निट येत नाही, तुम्हाला समजणार नाही. उल्हासनगर महानगरपालिकेचा पदभार स्विकारून मला २० दिवस झाले. सभागृहात खुप गरमागरम चर्चा चालु आहे की, अनाधिकृत बांधकामाविषयी काय धोरण आहे? तर मी आपणास सांगु इच्छितो मी रसायनशास्त्राचा विद्यार्थी आहे. आणि मला सांगितले गेले आहे की, उल्हासनगरचे रसायन वेगळे आहे. इथले रसायन शास्त्र समजणे जरा अवघड आहे. मी यावर अभ्यास करीत आहे. कुठे, कसे अनाधिकृत बांधकाम बांधले गेले आहे. कधीपासुन बांधले आहे व पुढे काय धोरण निश्चित करायचे? मला माहित नाही चंद्रशेखर साहेबांनी काय केले, काय निर्णय घेतला होता. अभ्यास करून नंतरच मी आपणांस भक्कम इंग्रजित ज्यास क्रॉक्रिट म्हणतात. नंतरच मी निश्चित असे सांगु शकेन मला यावर अभ्यास करायला दोन-तीन महिने देखिल लागतील. आता जे बांधकाम चालु आहे, त्यावर नियंत्रण आणण्याचा माझा प्रयत्न असेल आणि जे बांधकाम `जुने आहे त्यावर माझा अभ्यास चालु आहे. अभ्यास संपल्यावर मला पण काहीना काही निर्णय घ्यावाच लागेल आणि तो मी घेईनच आणि आता एक प्रश्न होता की, जे नागरीक



मालमत्ता कर अदा करणार नाही त्यांचे काय? कोणतेहि बांधकाम तोडण्याचे अधिकार प्रशासनाचे आहे, असे मी समजतो. आणि मला विश्वास आहे, कोणते बांधकाम तोडायचे हे प्रशासन निश्चित करेल, आणि आपणा सर्वांस

माहित आहे की, या महापालिकेची आर्थिक स्थिती खुप गंभीर आहे. आपल्याला आपले उत्पन्न वाढवायचे आहे. आम्ही पुर्ण त-हेने प्रयत्न करु आपला पण सहयोग पाहिजे. आणि उत्पन्न वाढविण्यासाठी काहितरी कडक निर्णय घ्यावाच लागेल.जे कायदयात आहे, त्याप्रमाणे कार्यवाही होणारच, परंतु त्याचबरोबर जे अनधिकृत बांधकाम आहे, जे लोक मालमत्ता कर भरत नाही, त्याविषयी मला गंभीर पणे विचार करावा लागेल. असे मी म्हणालो आहे, ते तोडायचे की नाही असे मी काही स्टेटमेंट दिले नाही आहे. परंतु यावर गंभीरपणे विचार करावा लागेल. ज्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल. आणि शहराच्या विकासात वाढ होईल. माझ्या मते अनाधिकृत बांधकामाविषयी जे मी सांगितले त्यात सर्व काही सांगितले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- म्हणजे १२ जूलै ९९ च्या निर्णयाशी हे सहमत आहे की नाही. हे पाहिजे आम्हाला.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-महापौर सुध्दा अनधिकृत बांधकामांना पाठिंबा देत आहे. आपण देणार आहात काय? आपले जे काही उत्तर असेल ते मला पटेल. त्यांनी स्पष्ट सांगितले आहे की अनधिकृत बांधकाम चालेल. शहराचे प्रथम नागरीक असे म्हणत आहे.

मा.सदस्य श्री. स ुभाष मनसुलकर:-लांडे साहेब सोडा तुम्ही जरा तोंड सांभाळून बोला.

मा.महापौर:- मी कधी असे म्हणालो नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:- तुम्ही महापौरांवर आरोप लावत आहात.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-ते स्वत: असे बोललेत.

मा.महापौर:- मी असे काही म्हणालो नाही आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:- आता पर्यंत मी बोलत नव्हतो परंतु आता बोलण्याची वेळ आली आहे. आमचेच सन्मानानिय सदस्य पॉलिसी तयार करतात आणि नंतर तेच ओरडतात. महापौरांना आरोपी ठरवितात हे बोलताना थोडे शब्द तुम्ही सांभाळुन बोला.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-स्वत: महापौरांनी सांगितले आहे. मी शब्द सांभाळुन बोललो आहे आणि सांभाळुन बोलतो. त्यांनी नाही सांगितले म्हणुन आम्ही सचिवांना विचारले. आम्ही कुठलाही अपशब्द बोललो नाही पाहिजे तर त्यांना विचारून घ्या. पुर्ण सभागृह साक्षीदार आहे, कुठलाही अपशब्द आम्ही बोललो नाही. आणि जरी बोललो असेल तरी इतिवृत्तात येणार आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-इतिवृत्तातुन आम्ही ते काढायला सांगु.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा.महापौरजी,

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आता दुसरा प्रश्न घ्या ना. असाच प्रश्नोत्तराचा तास संपेल.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी विपक्ष नेत्त्यांच्या बोलण्याला पाठिंबा देतो. आता लांडे साहेबांच्या प्रश्नावर कित्त्येक जण बोलले. ते या लोकांनी लक्षात

घेतले पाहिजे. आता ते म्हणत आहेत प्रश्नोत्त्तराचा तास संपेल, सचिव साहेब दुसरा घ्या. तर लांडे साहेबांच्या प्रश्नावर कित्त्येक जण बोलले त्यात किती वेळ गेला हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. हे बोलण्यासाठी मी उठलो, मेहरबानी करून संबंधित नगरसेवकांनी......

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौरजी, यांना सांगा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आता माझे बोलणे यांना सहन होणार नाही मी यांचे बोलणे वीस मिनिटांपासुन ऐकत आहे. आणि आता माझे अर्धा मिनिट बोलणे सुध्दा ते सहन करीत नाहीत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौर साहेबांची परवानगी होती.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मला माझे बोलणे पुर्ण करू दया.

मा.महापौरः-मॅडम आता त्यांना बोलु दया. तुम्ही बोललात. तुम्हाला मी बोलु दिले ना, त्यांना आता बोलु दया.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी तर म्हणेन की, पहिल्या पासुन ते शेवट पर्यंत लांडे साहेबांनी सभागृहाची दिशाभुलच केली आहे. आजपर्यंत जेव्हा जेव्हा १२ जुलै ९९ च्या निर्णयाची गोष्ट आली तेव्हा तेव्हा हे गप्प बसले होते ऐकत होते आणि आता म्हणतात काही निर्णयच झाला नाही. मा. चंद्रशेखर साहेबांनंतर तीन तीनदा उठुन श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी इथे संभाषण केले होते की, पन्नास वर्षाचे जुने बांधकाम देखिल अनाधिकृत आहे. परंतु आम्ही भुतकाळातील बांधकाम सोडु. जेव्हा पासुन चंद्रशेखर साहेब आले तेव्हा पासुन बांधकामावर नियंत्रण ठेऊ म्हणजे कमीत कमी भविष्यामध्ये तरी अनाधिकृत बांधकाम वाढणार नाही. त्याप्रमाणे भडकवाड साहेबांनी बरोबर उत्त्तर दिले आहे. आता मी त्यांना पाठिंबा देतो की त्यांनी जे सांगितले आठ वर्षा नंतर जी कंपाऊंड वॉल बांधली गेली ती त्यांनी तोडली. त्यानंतर देखिल ते तिथे नजर ठेऊन आहेत. जी आठ वर्ष अगोदर भिंत बांधली गेली आहे त्यावेळी मी उपायुक्त नव्हतो व लांडेसाहेब नगरसेवक नव्हते. तर दुस-या उपायुक्तांच्या व नगरसेवकांच्या कालावधीत हे बांधकाम झाले आहेत तरीही ते त्यावर लक्ष ठेऊन आहेत. आपण चिंता करू नका भडकवाड साहेब पुर्ण बांधकाम तयार होऊ देणार नाहीत. तिथे फक्त भिंतच राहिल. ती आठ वर्ष जुनी आहे तिचा निर्णय १२ जुलैला झाला आहे. असे जर तोडायला गेले तर पुर्ण उल्हासनगर मधील असे बांधकाम तोडावे लागेल. तर मेहरबानी करून जो प्रश्न चांगलाप आहे त्यावरच चर्चा करा. उगाचच उलट सुलट बोलुन सभागृहाची दिशाभूल करण्यास काहीही फायदा नाही. अशी माझी सर्व सदस्यांना विनंती आहे. श्री. लांडे साहेबांचा प्रश्न आहे त्यांनीच बोलावे.

मा.सचिवः-प्रश्न क्र. ५७५ श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५७५ः- सन १९९८-९९ व सन १९९९-२००० या वर्षामध्ये टॅकर व्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी एकूण किती रक्कम खर्च करण्यांत आलेली आहे? त्या संबंधाची प्रश्नांवर चर्चा व्हावी?



उत्त्तर :-१) सन १९९८-९९ या वर्षात टॅकरने पाणी पुरवठा करण्यासाठी एकुण रू.३४,१६,१६६.०० खर्च झाला आहे.

२)सन १९९९-२००० या वर्षात टॅकरने पाणी पुरवठा करण्यासाठी एकुण रू. ५७,८९,५६०/- खर्च झालेला आहे.
मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-माझा प्रश्न वरील प्रमाणे असुन मला वरील प्रमाणे उत्तर देण्यात आले आहे. त्यानुसार एका वर्षात टॅकरर्सचा दुप्पट खर्च याचे कारण काय?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-९८-९९ मध्ये एकुण ३४ लाख खर्च झाला होता. ९९-२००० मध्ये ५७ लाख खर्च झाला आहे. जशी जशी गरज वाढत गेली. त्याप्रमाणे टॅकर्स लागत गेले.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-९८-९९ मध्ये पाणी टंचाई नव्हती?
श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-९८-९९ मध्ये पाणी टंचाई कमी होती. टॅकर्स कमी जायचे. मागच्यावर्षी पाणी टंचाई खुप होती त्यामुळे जास्त टॅकर्स लागले.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-पाणी टंचाई त्यावेळी नव्हती?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-त्यावेळी पण टंचाई होती. परंतु जी लाईन टाकली आहे पण जी पाणी वाटप करणारे लाईन आहे ती १९४८ साली टाकण्यांत आली. ती खुप जुनी लाईन आहे. जशी जशी लोकसंख्या वाढत गेली शहराचा विकास होत गेला त्याप्रमाणे नळजोडण्या करत गेले. जिथे जिथे उंच क्षेत्र आहेत तिथे तिथे पाणी पाहोचत नाही. तिथे तिथे टॅकर्स पाठवावे लागतात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-एका वर्षात दुप्पट? ३४ चे थेट ५७. यापेक्षा तुम्हाला असे नाही वाटत का? महापालिकेचा स्वत:चा एक टॅकर असावा जो पुर्ण शहराला पाणी पोहचवेल. असा एखादा प्रस्ताव तुम्ही स्थायी समिती सभेला किंवा महासभेला दिला होता का?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-स्थायी समितीमध्ये असा प्रस्ताव ठेवला होता. त्यात असा प्रस्ताव होता की, चार-पाच टॅकर्स महापालिकेने स्वत:चे घ्यावेत. परंतु तो प्रस्ताव नंतर रद्द करण्यांत आला.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-कोणी रद्द केला?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-प्रशासना तर्फे हा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-कुठे ठेवला स्थायी समिती मध्ये? स्थायी समितीमध्ये रद्द केला ना? याचा अर्थ महापालिका स्वत:चे टॅकर्स घेऊ इच्छित नाही. आणि टॅकर लॉबीला प्राधान्य देऊ इच्छिते का? याचा अर्थ हाच निघतो ना?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-प्रशासनातर्फे प्रस्ताव ठेवला होता.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-मा.महापौर साहेब, स्थायी समितीमध्ये टॅकरसाठी प्रस्ताव आणला होता. मागच्यावर्षी बजेटमध्ये वीस लाखाची तरतुद



टॅकर्स खरेदीसाठी केली होती. त्यावर्षी पाणीपुरवठा विभागातर्फे एकही प्रस्ताव स्थायी समिती कडे आला नाही. आणि यावर्षी टॅकर्स साठी बजेटमध्ये एकाही पैशाची तरतद नाही. हे माहित असुन देखिल व प्रशासनाचे आपण एक अंग

असुन देखिल आपण स्थायी समितीमध्ये पाच नविन टॅकर्स खरेदी करण्यासाठी प्रस्ताव पाठविला होता. त्यावेळी असे तिथे लिहीले की बजेटमध्ये तरतुद नसल्याने आम्ही मंजुर करत नाही. जर आपणास टॅकर्सची इतकी आवश्यकता होती तर जेव्हा प्रशासनाने बजेटमध्ये तरतुद केली होती तेव्हा का नाही पाठवले? आता तुम्हाला माहित आहे बजेटमध्ये तरतुद नाही तरी प्रस्ताव पाठविला. आपण जबाबदार अधिकारी आहात. आपणास हे माहित असले पाहिजे की, टॅकर्ससाठी तरतुद आहे की नाही? यावेळी बजेटच्या चर्चेमध्ये यामुदयावर खुप चर्चा झाली होती. आणि आम्ही हे पण म्हणालो होता की, बजेटमध्ये टॅकर्स खरेदी करण्यासाठी तरतुद ठेवा. त्यावेळी तरतुद केली गेली नाही.मग आपण कसे म्हणता स्थायी समितीने नामंजुर केले.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-आम्ही प्रशासनातर्फे प्रस्ताव ठेवला होता.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-कसा ठेवला तुम्ही प्रस्ताव? बजेटमध्ये जर तरतुद नाही तर प्रशासनातर्फे असा प्रस्ताव का पाठविला गेला. मागच्यावर्षी बजेटमध्ये तरतुद होती. २० लाख रू. ठेवले होते. त्यावेळी एकही प्रस्ताव ठेवला नव्हता. आणि यावर्षी एकही टॅकर्ससाठी तरतुद नाही आणि स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवता?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-मागच्या वर्षी त्यावेळचे तत्त्कालिन आयुक्त यांच्याशी जी चर्चा झाली होती तेव्हा म्हणाले होते की, जर टॅकर्स खरेदी केले तर त्याच्यासाठी ड्रायव्हर,क्लीनर, डीझेल इत्त्यादी खर्च येईल.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-आपण सकींग मशिन ठेवली आहे त्यासाठी ड्रायव्हर नाही का ठेवला?आपण हे काय उत्त्तर देत आहात. ड्रायव्हर, क्लीनरची काय गोष्ट करता? दोन गाडया घेतल्या शुळ साहेबांनी त्यावर आपण ड्रायव्हर नाही का ठेवले? यावर आपण ड्रायव्हर ठेऊ शकत नाही का? सभागृहाची दिशाभुल करू नका.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-त्त्यांना कंत्राटी पध्दतीने कामावर ठेवले आहे.

मा.महापौरः-तुम्हाला आयुक्तांकडुन उत्त्तर हवे आहे का?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, हा टॅकर्स खरेदीचा मुददा जेव्हा स्थायी समितीत आला, तेव्हा कार्यकारी अभियंता श्री. धुत होते, धुत यांनी जेव्हा प्रस्ताव स्थायी समितीत आणला तेव्हा आम्ही व सभापती महोदयांनी विचारले की, बजेटमध्ये यासाठी तरतुद आहे का? ते म्हणाले नाही. आम्ही म्हणालो नाही तर तुम्ही प्रस्तावामध्ये असे का लिहिले की, प्रोव्हीजन आहे. तेव्हा ते म्हणाले की, माझ्या कर्मचा-यांकडुन चुक झाली आहे. तर आम्ही म्हणालो जर तुम्हाला आवश्यक असेल तर तरतुद नसतांना तुम्ही घेऊ शकता स्थायी समितीची हरकत नाही. तेव्हा० ते म्हणाले ड्रायव्हर ठेवावे लागेल, गॅरेज नाही आहे देखभाल दुरूस्तीसाठी खर्च करावा लागेल. तेव्हा आम्ही म्हणालो की, तुम्ही प्रस्तावात हे लिहून आणा की बजेटमध्ये तरतुद नाही. त्यानंतर कधी तो प्रस्ताव आला नाही. उल्हासनगर महानगरपालिकेत असे खुपसे नगरसेवक आहेत, ज्यांच्या प्रभागात आठ-दहा अठरा असे संख्येने टॅकर्स जातात. तेव्हा त्यांचे पण



म्हणणे असे होते की, पाच टॅकर्स खरेदी करून काय होणार आहे, भाडयानेच असू दया. पाच टॅकर्सने पाणी पुरवठा होणार नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन

बजेटमध्ये भाडयाने टॅकर्स घेण्यासाठी तरतूद दिली गेली. हे बरोबर आहे, त्यात खरेदीसाठी तरतुद नाही आहे.

<u>मा. सदस्य श्रीप्रकाश महाडिकः</u>-मा. महापौरजी जेव्हा बजेटची चर्चा चालु होती, तेव्हा मागच्या वर्षी टॅकर्ससाठी फक्त २५ लाख रुपये ठेवले गेले होते. त्या नंतर जेव्हा २५ लाख तरतुद असून ६५ लाख बील झाले असे कळल्यावर आम्ही विचारले होते की, महापालिका टॅकर्स स्वतःचे का नाही खरेदी करत. आणि शहरात देखिल वर्तमानपत्रातून याबाबतीत बरीच चर्चा झाली की, कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे, आणि इथले अधिकारी टॅकर्स लॉबी पुढे वाकत आहे,आणि त्यांना पैसा मिळविण्याची संधी देत आहे. खुपसे धंदेवाईक लोक आपला जुना धंदा सोडुन टॅकर्स खरेदी करीत आहे, हे सर्व समोर आल्यावर तेव्हा स्वतःचा बचाव करण्यासाठी म्हणून इथल्या अधिका-यांनी महापालिकेला स्वतःचा टॅकर्स असला पाहिजे. म्हणुन स्थायी समितीमध्ये प्रस्ताव पाठविला. नाहीतर आधीच हा प्रस्ताव विभागातर्फे आयुक्तांकडे दयायला पाहिजे. परंतु तसा प्रस्ताव आयुक्तांकडे गेलाच नाही. आणि बजेटमध्ये टॅकर्ससाठी काहीच तरतुद केली गेली नाही. म्हणुन कृत्रिम पाणी टंचाईच्या माध्यमाने टॅकर लॉबी मालामाल होत आहे हे सिध्द झाल्यावर स्वतःच्या बचावासाठी त्यांनी प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला. हे जे होत आहे ते चुकीचे आहे. या वर्षी बजेटमध्ये पाण्यासाठी कितीची तरतुद आहे सांगा आणि आतापर्यंत किती बिल झाले ते सांगा. जर १ एप्रिल २००१ पासुन ते ३१ मार्च २००२ पर्यंत किती तरतुद आहे सांगा आणि आताचे बिल किती आहे ते सांगा. कारण आम्ही जेव्हा माहिती मागीतली होती तेव्हा एकेका प्रभागात २४-२४ फे-या टॅकर्सच्या व्हायच्या.तेव्हा आपण लिखित यादी पण दिली होती.याचा अर्थ एका टॅकर्सचे २१० रू. म्हणजे ५०,००० महिन्याचे होतात आणि वर्षाचे सहा लाख होतात. तेव्हा आमच्या आर.पी.आयच्या बहिणीने विचारले होते की, तुम्ही जर टॅकरसाठी एवढा खर्च करत आहात तर आमच्यासाठी नविन नळ जोडणी का नाही टाकत? हा प्रश्न मला वाटते बगाडे मॅडमने विचारला होता. त्यावेळी गंभीरतेने ही बाब घेतली गेली नाही. आणि आता श्री. राजेंद्र चौधरीने प्रश्न विचारला आहे की, दुप्पट बिल कसे झाले आहे? आणि कृपया हे पण सांगा की यावर्षाच्या बजेटमध्ये टॅकर्स साठी किती पैशाची तरतुद केली आहे? आणि आता पर्यंत किती खर्च झाला आहे? हे आपण सांगु शकता?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):</u>-आपण जसे म्हणाला की, जितका पैसा टॅकरसाठी खर्च होतो तितक्या पैशात नविन नळ जोडणी टाकली जावी. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की, टाक्या केवळ तीन आहेत. जोपर्यंत हेड डेव्हलप होत नाही तोपर्यंत पाणी पुढे जाणार नाही. कितीही लाईनी टाकल्या तरी फायदा नाही. आता जी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना चालु आहे. डिसेंबर पर्यंत ती पुर्ण करण्याचे ध्येय आहे ते जोपर्यंत पुर्ण होत नाही. तोपर्यंत लाईन्स टाकुन पाणी वाटप योजना करण्याचा काहीच फायदा होणार नाही.

<u>मा. सदस्य श्रीप्रकाश महाडिकः</u>-ठिक आहे. सभागृहाचे जर असे मत आहे की, टॅकर्स लॉबी मध्ये गडबड आहे. तर तुमचे यावर काय लक्ष आहे. आता हे पहा कोणत्त्या प्रभागात इमारतीसाठी टॅकर्स देतात तर कोणत्त्या प्रभागात देत नाही असे कसे? संपुर्ण शहरासाठी एकच कायदा आहे ना?आमच्या प्रभागात ५० इमारती आहेत, प्रत्येक इमारतीसाठी टॅकर्स मागीतला तर तुम्ही दयाल का? जर इतर प्रभागात देतात तर आमच्या प्रभागात सुध्दा दयायला पाहिजे. सगळीकडे एकच धोरण लागु करा. आजच्यास्थितीत तुम्ही काही प्रभागात इमारतींना टॅकर्सव्दारे पाणी पुरवता ना? आपण टॅकर्स कशाला देत आहेत लोकांच्या सुविधेसाठी की इमारतीमध्ये टाक्या भरण्यासाठी? कृपा करून आपण खुलासा केला तर बरे होईल. टॅकर्सच्या माध्यमातुन शहरवासीयांना ज्या सुविधा

मिळाल्या पाहिजेत त्या न मिळता इमारतींच्या टाक्यामध्ये पाणी भरतात तर ठिक आहे आमच्या इथे ज्यांच्या ज्यांच्या घरी टाक्या आहेत तेथे पाणी भरण्यास सांगु. आमच्या प्रभागातील लोक रस्त्यावर लाईन लावुन, भांडणे करून पाणी भरतात आणि इथे काही इमारतीत थेट पाणी टाकीत सोडले जाते. २४-३० टॅकर्स एका प्रभागात पुरविले जातात असा भेदभाव का आहे?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-आधी जेव्हा टॅकर्स पाठवायचे तेव्हा ९९-२००० पर्यंत त्यावेळेस सर्व साधारण जनतेसाठी टॅकर्स पाठवले जायचे व तेथून त्यांची सही घेतली जायची पण नंतर अशी तक्रार आली की टॅकर्स पाहोचलेच नाहीत.नंतर असा निर्णय घेण्यात आला की त्याप्रभागातील नगरसेवक जोपर्यंत सर्टीफाय करत नाही. तोपर्यंत .....

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-आम्ही आता टॅकर्स मागवु तर तुम्हाला दयावे लागेल. जो नगरसेवक मागणी करेल त्यांना तुम्हाला टॅकर दयावा लागेल.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-जोपर्यंत नगरसेवक सर्टीफाय करीत नाही तोपर्यंत टॅकर्स पाठविला जाणार नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-ठिक आहे. आम्ही पण दाखवु आमच्या प्रभागात पाणी समस्या आहे. तुम्ही स्वत: येऊन पहा. आणि इमारतीला पाणी पाहिजे. तर आपण तिथे पाणी दयाल? ते खाजगी टॅकर्स घेणार नाहीत ते महापालिकेचे टॅकर्स घेतील.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-जेवढी पाण्याची गरज आहे तेवढे पाणी जर इमारतीत मिळत नसेल तर आम्ही देऊ.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-आयुक्त साहेब तुम्ही यांच्या उत्तराने समाधानी असाल असे मला वाटते. यांच्या म्हणण्याप्रमाणे उल्हासनगरमध्ये जेवढया इमारती आहेत तिथे जर महापालिकेचे पाणी पोहचत नसेल तर तिथे महापालिकेच्या टॅकर्स व्दारे पाणी पोहचवण्यात येईल हे तुमचे म्हणणे आहे. आमच्या प्रभागातील इमारतीतील लोक खाजगी टॅकर्स मागवूने पाणी घेतात म्हणजे ते चुकीचे करतात तिथे पण आम्हाला महापालिकेचे टॅकर्स मागविले पाहिजे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-आता जी परिस्थिती आहे त्यानुसार जर इमारतीमध्ये अजिबातच पाणी नसेल तर.....

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:- अजिबातच पाणी नाही तिथलेच म्हणतो मी. आमच्या प्रभागात अजिबात पाणी नाही अशा इमारती तुम्ही स्वत: येऊन चेक करायच्या, तिथे तुम्ही टॅकर्स देणार आहात.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-ठिक आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.आयुक्त साहेब, तुम्ही या उत्तराशी सहमत आहात असे मला वाटते. आणि राजेंद चौधरींचा जो पैशाविषयीचा प्रश्न आहे त्याविषयी खुलासा केला तर बरे होईल.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-आता माझ्याकडे सविस्तर माहिती नाही. मी नंतर देतो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.आयुक्त साहेब, जर बजेटमधील तरतुदी पेक्षा जास्त बिले निघत असतील तर त्याच्यावर कसे लक्ष दयाल हे सांगा. जर

बजेटमध्ये तरतुद ३० लाखाची असेल आणि आताचे बिल ७० लाख निघत असेल तर हे कुठपर्यंत चालणार आहे हे सांगा? मग बजेटचा अर्थच काय होतो. तुम्ही सभागृहाला सांगा याबाबतीत काय तरतुद आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः</u>- मा.महापौर साहेब,

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-मा.महापौर साहेब आता आमचे बंधु श्री. प्रकाश महाडिक म्हणाले. उल्हासनगरमध्ये इमारतींना पाणी पुरविले जाते. हा जो फरक निर्माण करत आहे तो चुकीचा आहे. आधी मी त्यांना हे सांगतो की, टॅकर्स झोपडपट्टी क्षेत्रात सुध्दा जातात. चाळ बॅरेक व इमारतीत सुध्दा टॅकर्स दिले जातात.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः</u>-सर्वात आधी इमारतीत टॅकर्स जातात नंतर झोपडपट्टी क्षेत्रात दिले जातात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>- असे नाही की फक्त इमारतीमध्ये टॅकर्स जातात इतर कुठे नाही. आणि हे पण खरे आहे की, जिथुन जिथुन पाण्याची मागणी झाली आहे. त्याप्रमाणे टॅकर्सची संख्या वाढत गेली आहे. जिथे जिथे नगरसेवकांनी मागणी केली तिथे अधिकारी जाऊन पहाणी करून आल्यानंतरच टॅकर दिले आहेत. जसे बक्क्षी साहेब म्हणाले होते की, पाणी पुरवठा विभागात जे पण काम असेल, नळ जोडणीचे ते कधीही करू शकतात. जेणेकरून त्याचा पाण्याचा प्रश्न सुटेल. जसे आमचे सदस्य श्रीमती. बेबी वसिटा यांनी सांगितले की, आम्हाला पाच लाखाची नळ जोडणी टाकुन दया. जे १५-२० टॅकर्स पुरवतात त्यापैकी पाच टॅकरची पण गरज नंतर लागणार नाही. तर अशाप्रकारे जर नगरसेवक नळजोडणी करून पर्यायी व्यवस्था करून घेत आहे. अशांना बक्क्षी साहेबांनी परवानगी दिली होती. नगरसेवक निधीतुन जर नळजोडणी करायची असेल बुस्टर लावायचा असेल तर मी ते करून दयायला तयार आहे.आता पावसाळा सुरू झाला आहे टॅकर्सची मागणी कमी झाली पाहिजे. आमचे महाडिक बंधु म्हणतात की, त्यावर लक्ष ठेवले पाहिजे जिथे गरज आहे तिथेच टॅकर्स गेले पाहिजे. याकडे जर लक्ष दिले तर बरे होईल. आमचे काही सदस्य असे आहेत ज्यांना नळजोडणी करायची आहे. तर आम्ही स्थायी समितीमध्ये कधीही बजेटमध्ये समायोजन करू शकु. आता आम्ही एक मोठ्या चेंम्बरसाठी एक तरतुद ठेवली आहे. १ करोड २० लाखाची तर ते यावर्षी नाही करू शकले तर बजेटमध्ये समायोजन करून टॅकर्स खरेदी करायचे असतील किंवा नळ जोडणी करायची असेल कुणाला बुस्टर लावायचे असेल तर  ते करू शकतील व पाण्याची टंचाई संपेल व टॅकरमुक्त शहर होईल. जर आपण आपले टॅकर खरेदी केले तर आपण जे नारेबाजी करतो उल्हासनगर टॅकर मुक्त करू. तो डॉयलॉग इथे लागु होणार नाही. म्हणुन जास्तीत जास्त हा प्रयत्न करावा की लोकांना पाणी मिळेल व शहर टॅकरमुक्त होईल.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :</u>- मा.महापौरजी, आता जे आमचे सभागृह नेता म्हणाले की, नळ जोडणी करून पाण्याची समस्या सुटेल व टॅकर्स कमी होतील. असेच मी थोडयावेळा पुर्वी बोललो होतो की बगाडे मॅडम म्हणाल्या होत्त्या सहा लाख रू. तुम्ही दर महिन्याला टॅकर्स साठी देता त्याऐवजी तुम्ही नळ जोडणी करून दया. तर तुम्ही उत्तर दिले की, पाण्याची टाकी कमी असल्याकारणाने तिथे पाणी पोहचत नाही. सभागृहनेता हे म्हणतात की, पाण्याची लाईन टाका. टॅकर्स कमी होतील. खरे काय आहे. हे म्हणतात बक्षी साहेबांचे असे म्हणणे होते की, पाण्याच्या लाईन्स टाका. टॅकर्स कमी होतील. आणि श्री. दशोरे म्हणतात की, पाण्याची लाईन टाकुन काही फायदा होणार नाही. टाक्यातीनच आहेत. म्हणजे बक्षी साहेब बरोबर बोलत आहेत की दशोरे साहेब तुम्ही?

<u>मा.सदस्य श्री. सेवल ठाकुर</u>- महापौर, एक मिनिट, आमच्या प्रभागात देखिल सहा लाख रू. टॅकर्स साठी जातात. सहा लाखाची जर एम.एस. लाईन टाकली गेली तर आमच्या प्रभागातील समस्या सुटेल. हे आम्ही बक्षी साहेबांना सांगितले होते ते म्हणाले आम्ही करून देऊ. दोन कोटी पर्यंत खर्च करू. त्यासाठी आमचे जे प्रस्ताव प्रशासनाकडे जात आहेत ते परत येत आहेत. ही बजेटमध्ये तरतुद नाही. म्हणुन आयुक्तांचे लक्ष वेधु इच्छितो की, सहा लाख रू. एका वर्षात टॅकर्ससाठी जातात त्याऐवजी जर एकदाच सहा लाखाची एम. एस लाईन टाकुन दिली तर दरवर्षाचे सहा लाख तुमचे शिल्लक राहतील. म्हणुन आपण नळ जोडणी करण्याकडे जास्तीत जास्त लक्ष दयावे. म्हणजे महापालिकेच्या पैशाची बचत होईल. आणि समस्या देखिल सुटेल.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>- मा.महापौरजी, जो प्रश्न सदस्याने विचारला आहे. त्याचे मुळ उददेश हा आहे की, मागच्या वर्षी पेक्षा दुप्पट खर्च यावर्षी झाला आहे.एका टॅकर्समधुन दहा हजार लिटर पाणी पुरवितो तर किती टॅकर्स पाणी जाते? किती एम.एल.डी. पाणी टॅकर्सव्दारे पुरविले जाते. मला हे सांगा महापालिकेचा विकास होत आहे की, आपण मागे जात आहोत. टॅकर्सची संख्या दुप्पट होत आहे. हे काय दर्शवते? महापालिका प्रगती करत आहे की अधोगती कडे जात आहे. तुम्ही त्यांना पाठिंबा देत आहात. तुम्ही म्हणता टॅकर्सची व्यवस्था ठिक आहे. आम्ही पाणी नाही पोहचवु शकत, किर्लोस्कर योजना चालु आहे, लाईन नाही टाकु शकत, अमुक आहे तमुक आहे जे पण कारण तुम्ही देत आहात. यातुन हेच सिध्द होते की, महापालिका दिवसेंदिवस मागे पडत आहे. प्रगती नाही करत आहे. इथे आपण टॅकर मुक्त शहराच्या गोष्टी करतो. टॅकरमुक्त राज्य, टॅकरमुक्त देशाच्या गोष्टी बोलतो आणि इथे आपण टॅकर्सची संख्या दुप्पट करीत आहोत. त्याचे कारण शोधता की, टॅकर्स संख्या का वाढली आहे. बक्षी साहेबांनी हे केले चंद्रशेखर साहेबांनी ते केले. जो अधिकारी निघुन जातो त्याच्या नावाने आपण काही ना काही कारण दाखवुन स्वतःला मोकळे करता.तर्कवितर्क करता खरे हे आहे की महापालिकेची अधोगती होत आहे. महापौर साहेब, तुमचे काय म्हणणे आहे?

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:</u>-मा.महापौर, व सन्माननिय सदस्य इथे टॅकर्सचा विषय चालला आहे. टॅकर मुक्त शहर होवो. तुम्ही हे विसरत आहात की, किर्लोस्करची जी योजना आहे ती आपण राबवली आहे. पहिल्या टप्याचे पैसे देखिल आले आहेत. शहरात पाण्याच्या टाक्या देखिल लावल्या आहेत. तर माझ्या मते या योजनेचा पहिला टप्पा पुर्ण झाल्यावर अर्ध्यापेक्षा जास्त पाण्याची समस्या दुर होईल. आणि टॅकर मुक्त उल्हासनगर व्हावे हे जे स्वप्न आपण पहात आहोत ते पुर्ण होऊ शकते.

मा.सचिव:-प्रश्न क्र५७६ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे. ते उपस्थित नसल्याने कार्यवृतात त्याची नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ५७६:-१)कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची परिवहन सेवा ही आपल्या हददीत सुरू करण्यात आलेली आहे. तेव्हा त्यासाठी अवश्य लागणारी परवानगी आपणाकडुन देण्यात आलेली आहे का?
२)जर परवानगी दिली असल्यास त्या मोबदल्यात कल्याण डोंबिवली महानगरपालिका काय देणार आहे?

उत्तर :-१)परवानगी दिलेली नाही.
२)त्यामुळे प्रश्नच उदभवत नाही.

मा.महापौर:-श्री. रमेश चव्हाण यांचा जो प्रश्न आहे. ते सदनात उपस्थित नाही परंतु मला त्यावर काही बोलायचे आहे. जरा प्रश्न वाचा.

मा.सचिवांनी वरीलप्रमाणे प्रश्न वाचुन दाखविला.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मला काही बोलायचे आहे. मला हे सांगा नगरसेवक उपस्थित नसेल तर त्याच्या ऐवजी दुसरे कोणी बोलु शकेल का?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-जर तुम्ही तशी प्रथा चालु करत असाल तर नेहमीच करावे लागेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जर तुम्हाला तो अधिकार आहे तर आम्हाला पण तसा अधिकार आहे.

मा.महापौर:-राजानीजी, मी नियमांस तोडु इच्छित नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- तुम्ही चुकीचा नियम काढत आहात उदया आमच्या मधले पण कोणी उठुन बोलेल मला या प्रश्नावर काही बोलायचे आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-आम्ही स्पष्टपणे सांगतो की, आम्ही याचा फायदा घेऊ.

मा.महापौर :-ठिक आहे.

मा.सचिव:-प्रश्न क्र. ५७७ श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५७७:-उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीत मुस्लीम जमातीचे लोक संख्या आज बघितली असता जवळ जवळ ८० हजारावर गेली आहे व त्यांना कब्रस्तानासाठी जागा नसल्यामुळे त्यांना कल्याण इकडे तिकडे जावे लागत असता त्यांना महापालिकेने म्हारळ जागा देऊ केली होती त्याचे काय झाले अगर ती जागा दिली गेली नसेल तर त्यांना त्वरीत दुसरी जागा देण्यात यावी. अगर त्यांना दुसरी जागा देत नसाल तर का देत नाही याचा खुलासा महासभेत व्हावा.

उत्तर :-उल्हासनगर महानगरपालिकेने आरक्षण क्र४६ महापालिकेहददी जवळील म्हारळ गावा मधील (एम.आय.डी.सी) जवळील जागा मुंबई म. प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयात सुरू असलेले सुधारित विकास योजनेत कब्रस्थानसाठी राखुन ठेवण्याबाबत विनंती केली होती. वरील जागेचा तहसिलदार कल्याण हयांचे कार्यालयातुन ७/१२उतारा उपलब्ध झाला असुन त्यामधील नोंदीप्रमाणे

सदर जागा फॉरेस्ट खात्त्याच्या नावांवर आहे व ती जागा केंद्र सरकारच्या अखत्त्यारीत आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात त्याप्रमाणे जमिन भुसंपादनासाठी कळविण्यात आले आहे. अजुनपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन या कार्यालयास वरील दि.३१.१०.२००० च्या पत्रानुसार खुलासा प्राप्त झालेला नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, व सदनातील सर्व सदस्य मी जो वरीलप्रमाणे प्रश्न विचारला आहे. त्यावर नगररचनाकार साहेब जे उल्हासनगर शहराचे भले करतात. बांधकाम करतात, तोडतात, भले करतात. तर त्यांना जी जागा दिली होती ती केंद्र सरकारकडे गेली व त्याव्यतिरक्त ऑक्टोबर २००० मध्ये लिखित पत्र आले आहे त्याव्यतिरिक्त अजुन काही त्यांच्यासाठी केले नाही. हे २००१ वर्ष चालु आहे तर मी विचार करतो ज्या लोकांसाठी पुर्ण सदनात इतकी मोठी चर्चा झाली. पुर्ण उल्हासनगर शहरात चर्चा झाली तरीही आयुक्त साहेबांना हे माहित होते की, ती जागा आपल्या अधिकार क्षेत्रातील नाही. महाराष्ट्र शासन अखत्त्यारित नाही. तर हे जाणुन बुजून करायचे नाही म्हणुन बहाणा होता जसे म्हणतात ना काम करता येईना त्याचे काय वाकडे असे काही तरी म्हणतात, त्यांना जागा तर दयायचीच नव्हती. अशाठिकाणी जागा दिली त्यांचा प्रश्न आयुष्यभर सुटणार नाही. मी असा विचार करतो की, हे जे उत्तर दिले आहे. या उत्तराचे स्पष्टीकरण प्रथम नगररचनाकार तर देतीलच परंतु नव्या आयुक्तांचे स्वागत केले आहे ते पण देतील.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-जेव्हा या जागेची गोष्ट झाली तेव्हा कुणाला हे माहित नव्हते की, ही जागा कोणाच्या नावाने आहे. तिथे कोणत्त्याही जंगल खात्त्याचा फलक लावलेला नव्हता. जेव्हा आम्ही तहसिलदारांकडे ७/१२ उतारा मागीतला तेव्हा आम्हाला कळले ती जागा जंगल खात्त्याच्या क्षेत्रात येते. तर तसा प्रस्ताव आम्ही जिल्हाधिकारींकडे पाठविला त्यानंतर बी.एम.आर.डी.चे अधिकारी जे कल्याणमध्ये बसतात त्यांच्याबरोबर जाऊन मी स्वत: जागा पाहुन आलो. वडोळ गावामध्ये स्मशानभुमीसाठी चांगली जागा आहे. तिथे तिन्ही समाजासाठी स्मशानभुमी बनु शकते. त्या जागेचा ७/१२ आम्ही तहसिलदारांकडे मागितला आहे. कारण तिकडे शेती पण आहे. तेव्हा तहसिलदारांनी उत्तर दिले की, ती जागा खाजगी नाही सरकारी आहे. तेव्हा मी एस.डी.ओं ना मागणी केली की, या जागेचे डिर्माकेशन व जे कागदपत्र आहेत ते कोणाच्या नावाने आहेत. ते लिखित दया. मग आम्ही जिल्हाधिकारी कडे बसुन ती जागा ताब्यात घेऊ. पंरतु या व्यतिरिक्त १५ दिवस अगोदर जिल्हाधिकारींकडे एक सभा देखिल झाली. तिथे एस.डी.ओ. ना सदर बाबतीत स्पष्टीकरण दयायला सांगीतले होते परंतु आजपर्यंत काहीही उत्तर आले नाही. आता आमचा नविन नकाशा देखिल जाहिर झाला आहे. त्यात आम्ही जी जागा पाहीली तिथे रेसिडेंन्शीयल झोन नाही आहे. तेव्हा हरकती व सुचना आल्यावर आम्ही ती जागा स्मशानभुमीसाठी मागवु शकतो. आणि जशी जागा आम्हाला ताब्यात मिळेल तेव्हा आम्ही प्राधान्य देऊन त्यांना ती जागा देण्याचा प्रयत्न करू.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:- ती जागा किती चौरस फुट आहे. व किती लांब आहे. जर शहाड फाटकातील मुस्लिम जमातीचा व्यक्ती मेला तर ते काय वडोळ गावात जातील?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-तसे नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-इथुन शवयात्रा काढतील ते तिथपर्यंत जातील त्यांना किती त्रास होईल हा विचार केला आपण? पुर्ण शहरातुन जातील का शहराच्या बाहेरून जातील याचा पण विचार करा? आज या उल्हासनगरमध्ये

प्रत्येक जातीजमातीसाठी स्मशानभुमी आहे. एक नंबरमध्ये आहे, शांतीनगर ,४ नंबर मध्ये आहे. माझ्यामते ८० ,००० लोकसंख्या मुस्लिम जमातीची इथे आहे. त्यांच्यावर हा अन्याय का केला जात आहे?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आता आमचा प्रारूप विकास आराखडा जाहिर झाला आहे. त्यात आपणांस सुचना व हरकती टाकण्याचा हक्क आहे. त्यामध्ये १ ,२ ,३ मध्ये सुध्दा यासाठी मागणी करू शकता.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-मला वाटते सोनावणे साहेब जेव्हा मी नगरसेवक झालो. आमचे महापौर पण इथे आहेत, आम्ही नेहमी त्यांना हेच आश्वासन देतो की, आम्ही तुम्हाला जागा देऊ. ही खुप लाजीरवाणी गोष्ट आहे की, आपण त्यांना जागा नाही देऊ शकलो. आणि आता त्यांना आपण दुसरी जागा देत आहोत. जिल्हाधिकारींशी बैठक घेत आहोत. अजुन हरकती आणि सुचना घेणार आहोत. किती वेळ हे सर्व चालणार? याला जबाबदार कोण? महापालिका ऑक्टोबर २००० पासुन काय करत आहे? किती स्मरणपत्रे शासनाकडे पाठविली आहे. सांगा?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आम्ही आमच्या तर्फे पुर्ण प्रयत्न केला आहे. १ ,२ ,३ ,४ ,५ मध्ये जितके पण आरक्षित भुखंड आहेत त्यापैकी एकही जागा अशी नव्हती की, आपण त्यांना देऊ शकु. साईट नं. ४७ जो सम्राट अशोक नगर येथे आहे. तिथे एक आरक्षित भुखंड आहे. तो भुखंड रिकामा नाही तो आम्ही नाही देऊ शकत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-आता आपण जी जागा दाखवत आहात तिथे पण एक शाळा आहे. प्रभाग क्र. १३ मधीलच नाही तर आजुबाजुच्या झोपडपट्टीतील व इमारतीमधील मुले तिथे शाळा शिकतात आणि शाळेच्या बाजुची ती जागा तुम्ही आम्हाला दाखवता.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-मंजुर विकास आराखडयातील प्रस्ताव सांगतो आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-अशी जागा दाखवा की कोणी हरकत नाही घेतली ापाहिजे. तिथे शाळा चालवली जाते. त्या शाळेत विद्यार्थ्यांची भरभराट आहे. श्रीमती. रमाबाई आंबेडकर या नावाने ती शाळा चालवली जाते तिथे जागा देणे योग्य नाही.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-मी तेच तुम्हाला सांगीतले. जर तिथे नाही देऊ शकत तर कुठे तरी त्यांना दयावे लागेल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे- आरक्षित भुखंड आहेत तिथे तुम्ही का नाही देत? काय अडचण आहे?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आजपर्यंत आपल्या मंजुर विकास आराखडयात यासाठी एकच जागा होती त्यावर पण अतिक्रमण झाले आहे. त्यामूळे आता खिश्चन समाजासाठी पण कोर्टाच्या आदेशाप्रमाणे जागा दिली आहे. आता जी आम्ही जागा ठरविली आहे त्याला पण एस.डी.ओ. कार्यालयातुन अजुन उत्तर आलेले नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-मला वाटते आयुक्त साहेब, महापौर साहेब, आपण सोनावणे साहेब तुम्ही जबाबदार व्यक्ती आहात.तुम्ही जर प्रांत अधिकारी श्री. गिरी यांच्याकडे जाऊन त्यांच्याशी चर्चा करत नाही. त्यांना काही पत्र देत नाही. तोपर्यंत ही समस्या सुटणार नाही.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-स्वत: जिल्हाधिकारींनी गिरी साहेबांना आदेश दिले आहेत. आम्ही जिल्हाधिकारींना लिहिले आहे की, कायदा व सुव्यवस्थेचे पण हे प्रकरण आहे. तर जिल्हाधिकारी साहेबांनी गिरी साहेबांना सांगितले आहे की, तुम्ही ते कागदपत्र स्वत: सादर करा. लवकरात लवकर आमच्याकडे पाठवा म्हणजे आम्ही त्यांना जागा देऊ शकाते. आम्ही आमच्या तर्फे पुर्ण प्रयत्न केले आहेत.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-मा.महापौर साहेब, नगररचनाकार म्हणतात ती जागा जंगल विभागाची आहे. आम्हाला आजपर्यंत एस.डी.ओं नी जागा सुचविली नाही. असे खुपशे आरक्षित भुखंड आहेत. जेथे भुमाफिया जाऊन नकली सनद काढतात. उच्च न्यायालयात जातात खोटे पेपर दाखवतात. असे खुपसे आरक्षित भुखंड आपल्याकडे आहेत. त्यातील एखादा आरक्षित भुखंड त्यांना दिला तर?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-तुम्ही प्रस्ताव मांडा. महासभेने त्याला मंजुरी दिली पहिजे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-टेलिफोन विभागाच्या समोर जी पर्यायी जागा आहे. उदया कोणी भुमाफिया येऊन तेथील आरक्षण हटवेल सनद काढेल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-सन्माननिय सदस्य आता आजारातुन उठले आहे. त्यांचे डोके ठिकाणावर नाही. जिथे पर्यायी जागा दिली आहे तिथे हा मुर्दे गाडायला देतो आहे त्याचे डोके ठिकाणावर नाही.

इकडे काही सदस्य हसत असताना...

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:- हि हसण्यासारखी गोष्ट नाही. २५ एकर ती जागा आहे. कोणी भुमाफिया येऊन...

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-अरे भुमाफियावाला ज्यांना आपण पर्यायी जागा दिली त्यांचा विकास करण्यासाठी ती जागा आहे. ज्या लोकांनी आपल्याला शहराच्या विकासासाठी सनदची जागा दिली तिथे जागा दयायची. अरे तु त्यावेळेला पप्पु कालानीच्या समोर जर हा शब्द वापरला असता तर तु शहरात राहीला नसता. तिथे एक मोठे स्टेडियम उभे राहणार होते, अशा जागेवर म्हणतो मुर्दे गाडा तिथे.

मा.महापौर:-मोरे साहेब बसा खाली.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-मी सन्माननिय सदस्यांना आवर्जुन सांगतो. माझाच सदस्य आहे. म्हणुन मी महापौरांना व आयुक्त साहेबांना अशी विनंती करतो की, या मुस्लिम जमातीशी असा अन्याय होता कामा नये. आम्ही शहरात एकता असल्याचे दाखवतो आहे की, आम्ही सर्व एक आहोत. कोणावर अन्याय होऊ देत नाही. आणि या मुस्लिम जमातीच्या कब्रिस्तानसाठी जागा नसल्यामूळे ते लोक म्हणतील, उल्हासनगर हे असे शहर आहे जेथे मुस्लिम जमातीला कब्रिस्तानसाठी जागा दिली जात नाही. ते काय म्हणतील? तर आमची विनंती आहे की, नव्या आयुक्तांने या सभागृहात मुस्लिम जमातीना अशी काही जागा दयावी जी कब्रिस्तानसाठी योग्य असेल.

मा.महापौर:-मोरे साहेबांनी जो कब्रिस्तानाचा प्रश्न विचारला आहे. ही खुप गंभीर बाब आहे मला आठवते जेव्हा ज्योती कालानी नगराध्यक्षा होत्त्या त्या वेळेपासुन हे प्रकरण चालु आहे. महापालिकेने नगररचना विभागाच्या शिफारसीने एक भुखंड दिला देखिल होता. पण दुर्दैवाने हि जागा जंगल खात्त्यात नव्हती.

त्यामुळे त्यांना ताबा मिळाला नव्हता. आता नविन विकास आराखडा आला आहे त्यामध्ये त्यांनी जो भुखंड दर्शाविला आहे कब्रिस्तानासाठी तरी मी आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी लवकरात लवकर नगररचनाकारांशी सल्लामसलत करून ती जर जागा सरकारी असेल तर लवकरात लवकर मुस्लिम जमातींना स्मशानभुमीसाठी देत आहे.

मा.महापौरः-माझ्याकडे तीन लक्षवेधी आल्या आहेत. एक राजेंदसिंग भुल्लरची आहे. ती मी स्विकारतो. व दुसरी लक्षवेधी श्री. पांडुरंग लांडे यांनी दिली आहे. ती पण मी स्विकारतो. तिसरी लक्षवेधी श्री. राजानी यांनी दिली आहे. माझ्या मते दोन पेक्षा अधिक लक्षवेधी घेता येत नाही. म्हणुन राजानी साहेबांची लक्षवेधी मी स्विकारत नाही.

लक्षवेधी सुचनाः-

सुचक :-श्री. राजेंद्रसिंग भुल्लर (महाराज)

अनुमोदक :- श्री. रमेश चव्हाण.

विषय :- बाळकृष्ण नगर ते क्रांतीनगर ए-ब्लॉक मधील मुख्यनाला खुला करण्याबाबत लक्षवेधी सुचना....

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.१ मधील बाळकृष्णनगर ते क्रांतीनगर हा परिसर अत्त्यंत सखल भागात आहे. सालाबाद तेथे पावसाळयात सदर परिसर जलमय होतो. बाळकृष्णनगर ते क्रांतीनगर मधुन जाणारा मुख्यनाला पावसाळयात तुडुंब भरून वाहतो सदर पुराचे पाणी आजुबाजुच्या परिसरात जाऊन नागरिकांना मोठी वित्तहानी होते. तेथील चंदर नामक व्यक्तीने मुख्य नाल्यात मातीची व कच-याची भर टाकुन नाला बंद केला आहे. सदर ठिकाणी तत्त्कालिन आयुक्त श्री. शिंदे साहेब यांनी तक्रारी वरून नाला सफाई करण्याचे आदेश दिले व सफाई करून घेतली होती. तसेच या मुख्य नाल्यावर कोणतेही बेकायदेशिर व अनाधिकृत काम करण्यास १.१०.१९९९ पासुन शेषन न्यायालयाचा स्थगन (स्टे) आदेश असुन ही श्री. चंदन यांनी पुन्हा भर टाकुन नाला जाम केला आहे. अशाने यावर्षी आसपासच्या परिसरात नाल्याचे पाणी शिरण्याची दाट शक्यता आहे. तसेच या पावसाळयात कोणते ही आकालिन घटना घडली तर त्यास प्रशासन जबाबदार राहील. याबाबत अनेक तक्रार करून ही कोणी ही लक्ष देत नाही.

तरी या विषयावर दिनांक २०.६.२००१ च्या सर्व साधारण महासभेत चर्चा व खुलासा होणे आवश्यक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सचिव साहेब, तुम्ही आम्हाला दोनच लक्षवेधी दिल्या आहेत तिसरी कुठे आहे?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-सन्माननिय महापौर साहेब, आमच्या नरेंद्र राजानी यांनी जी लक्षवेधी दिली आहे ती स्विकारावी अशी मी आपणांस विनंती करतो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी-महापौर साहेब लांडे यांनी लक्षवेधी मागे घेतली आहे.



मा.महापौरः-ठिक आहे. फक्त एकच लक्षवेधी स्विकारत आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-कोणती लक्षवेधी?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-एकच का? आता तर आपण म्हणालात कायदयाने दोन लक्षवेधी स्विकारता येतात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-एक मागे घेऊन करून आपणांस दोन घ्यायच्या आहेत.

काही विपक्ष सदस्य :- महापौर साहेब हे तुम्ही चुकीचे करत आहात.

इथे विपक्ष सदस्य हे तुम्ही चुकीचे करत आहात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-महापौर साहेब म्हणाले दोन पेक्षा अधिक लक्षवेधी स्विकारू शकत नाही. मग असे कसे करता तुम्ही अनाधिकृत बांधकामाला मदत करता.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-महापौरांना अधिकार आहेत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-महापौर साहेब स्वतः उत्तर देऊ शकतात.

मा.महापौर:-मी महाराजांना विनंती करेन त्यांनी आपल्या लक्षवेधीवर बोलावे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- दुसरी लक्षवेधी का नाही घेत तुम्ही?

इकडे मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी हाऊ कॅन यु डू दॅट असे म्हणत मंचाजवळ आले व पंख्याला लाथ मारली.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-लक्षवेधी नाकारण्याचे कारण सांगा. एका मिनिटात बोलणे फिरविले असे कसे? पिठासिन अधिकारी आपले बोलणे का फिरवत आहेत.

इथे विपक्ष सदस्य मंचाजवळ येऊन महापौरांशी काही तरी बोलत होते, एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-वैयक्तिक हेवेदावे इथे आणु नका.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-पिठासिन अधिकारी आपले बोलणे का बदलत आहेत?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- ही तुमची दादागिरी आहे.

मा.महापौर:-दादागिरीचा प्रश्न नाही.

इकडे विपक्ष व सत्ताधारी पक्ष मंचाजवळ येऊन महापौरांशी काही तरी बोलत होते, एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.



मा.महापौर:-राजेंद्रसिंग भुल्लरजी आपण आपल्या लक्षवेधीवर बोला.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-नाहीतर आम्ही विशेष सभा बोलवू.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी-तुम्हाला काय त्रास आहे लक्षवेधी स्विकारण्यास?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.महापौर, हे तुमचा अपमान करत आहेत, तुमचे म्हणणे ऐकत नाही आहेत.

इकडे विपक्ष व सत्ताधारी पक्ष मंचाजवळ येऊन महापौरांशी काही तरी बोलत होते, एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः- सचिवांना विचारा?

इथे मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी व काही विपक्ष सदस्य महापौरांची दादागिरी चालणार नाही अशा घोषणा देत होते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी- लक्षवेधी न स्विकारण्याचे कारण दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आपण महापौर शहराचे आहात का फक्त सत्ताधारी पक्षाचे आपणांस लक्षवेधी स्विकारण्यास काय हरकत आहे?

मा.महापौरः-सर्व सदस्यांनी बसुन घ्यावे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौर साहेब कॉंग्रेसचे आहेत. महापौर साहेब नाही म्हणत आहेत, कॉंग्रेस गटनेता नाही म्हणत आहेत. हे कॉंग्रेस पक्षाचे नाव खराब करत आहेत हे इतिवृत्तात आले पाहिजे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.महापौरः-सभागृह नेता व विरोधी पक्षातील जे आमचे वरीष्ठ नेते आहेत त्यांच्या सांगण्यावरून मी श्री. नरेंद्र राजानी व लाल पंजाबी तर्फे दुसरी लक्षवेधी पुढील विषयावर लक्षवेधणेकरिता आलेली आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र राजानी.
अनुमोदक :- श्री. लाल पंजाबी.

विषय :-उल्हासनगर महापालिकेच्या विकास आराखडयामधील साईट क्र. ७४,८०, १४७ व १९३ या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित होत्त्या. जसे साईट क्र. ७४ ही डिशोझर्ड/ प्राथमिक शाळेसाठी आरक्षित होती आणि तिथे आता मल्टी स्टोरेड बिल्डीग बांधली आहे. तसेच साईट क्र. ८० शॉपिंग कॉम्पेलेक्स / प्रायमरी शाळेसाठी आरक्षित होते तिथे आता मार्केट + टॅरेस फ्लॅट बांधले आहे. तसेच १४७ नं. होलसेल मार्केटसाठी आरक्षित होते तिथे वुडलॅन्ड बिल्डींग बांधली आहे. १९३ नं. पार्किंग शॉपिंगसाठी आरक्षित होते तिथे ॲब्रोसिया हॉटेल बांधले गेले आहे. सदर महापालिकेच्या आरक्षित जमिनीवर खाजगी विकास करताना महापालिका तर्फे बेकायदेशिर व अरितसर बांधकाम परवाने देण्यांत आलेले आहेत तसेच जनहीत व महापालिकेचे हित लक्षात न घेता. त्सास धक्का लागला म्हणुन लक्षवेधी आपल्यासमोर मांडत आहे.

मा.महापौरः- या दोन्ही लक्षवेधीसाठी अर्ध्यातासाची पंधरा-पंधरा मिनिटांची वेळ निश्चित करत आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-सात वाजेपर्यंत आम्ही सभा संपवू. ठिक आहे. यांचे पाच मिनिटात संपु शकते ना मग पंधरा मिनिटे कशाला?

मा.महापौरः-दोन्हीसाठी अर्धातास ना? महाराजजी आपण बोला.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर-सन्माननिय महापौरजी, बालकृष्णनगर पासुन एक नाला रेल्वे लाईन खालुन तो बालकृष्ण ते क्रांतीनगर पर्यंत जातो तिथे चंदर नावाच्या एका माणसाने जबरदस्तीने नाला बंद केला आहे. हा नाला यापुर्वी दोनवेळा चालु केला होता. श्री. शुळ साहेबांच्या वेळी एकदा चालु केला होता. त्यानंतर त्याने परत प्रशासनअधिका-यांच्या मदतीने पुन्हा नाला बंद केला. नंतर पुन्हा श्री. शिंदे साहेबांनी मागच्यावर्षी हा नाला चालु केला. नाला चालु केल्यानंतर पुन्हा अधिका-यांनी मिळुन बंद केला. त्यावर स्टे आहे. परंतु अधिकारी त्याकडे लक्ष देत नाहीत. तक्रार केल्यानंतरही नाला सुरू करण्याचे सोडुन डोळे बंद करून झोपतात. नाला साफ झाला पाहिजे.

मा.महापौरः-सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर यांनी जी लक्षवेधी दिली आहे की, बालकृष्ण नगर ते क्रांतीनगर कडुन जो नाला येत आहे. व ज्या चंदरनावाच्या व्यक्तीने त्यास बंद केले आहे. त्याबाबत मी सभागृहास माहिती देऊ इच्छितो की, सन्माननिय विरोधी पक्षनेता श्रीमती. सुनिता राजवानी यांनी त्यांच्या प्रभागातील राजीव गांधी नगरमधील रहिवाश्यांचा एक मोर्चा महापालिकेवर आणला होता. व मी त्यांना सांगितले होते की आज संध्याकाळी महापालिकेचे आयुक्त, उपायुक्त, (अतिक्रमणे व अनाधिकृत बांधकाम)नगररचनाकार , शहर अभियंता इत्त्यादी या प्रशासनाच्या टीम बरोबर मी प्रत्यक्ष जागेवर येईल व पहाणी करेन. या जागेची पहाणी केल्यानंतर असे आढळुन आले की, हा मोठा नाला असुन गेल्या ५० वर्षापासुन पुर्ण शहरातील, पावसाळयाचे पाणी वालधुनी नदीमध्ये जाते. अशा या नाल्याला चंदर नावाच्या व्यक्तीने बंद केले आहे. पाण्याचा जो नैसर्गिक प्रवाह होता तो बदं केला आहे. त्यामुळे राजीव गांधी नगर, बालकृष्ण नगर, क्रांती नगर ते गोल मैदाना पर्यंत तसेच ४४४ गार्डन पर्यंत जो माझ्या प्रभागाचा भाग आहे. श्री. पम्मीकूमार यांचा प्रभागामध्ये व श्री. बी.बी. मोरे यांच्या प्रभागा मार्गे हा नाला जात आहे. तो पुराचे एक कारण झाला आहे. व आयुक्त व सर्व अधिका-यांना मी स्वतः व विरोधी पक्षनेता यांनी पहाणी करून माहिती दिली आहे. व त्याबाबत कोण्या अधिका-याचे असे मत होते की, याबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे काही आदेश आहेत की याप्रकरणी काही हस्तक्षेप केला जाऊ नये. परंतु मला जी माहिती मिळाली आहे की, शेषन कोर्टाचे जे आदेश आहेत ते जैसे थे स्थिती बहाल करण्याचा, त्या खाजगी व्यक्तीने कोर्टाच्या आदेशाचे पालन न करता. या नाल्यामध्ये भराव केला आहे. त्यांनी कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन केले आहे. त्यासाठी मी आयुक्तांना आदेश देतो की, हा नाला साफ करून नाल्याचा प्रवाह मोकळा करून घ्यावा. जेणे करून गोलमैदान पासुन पुढील भागामध्ये जो पुर येतो. तो येऊ नये. याकामासाठी त्यांनी त्वरीत आपले अधिकारी कर्मचारी लावावेत. व त्वरीत हा नाला साफ केला जावा.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा.महापौरजी हा नाला साफ केल्यानंतर तेवढयाच नाल्याचे पक्के बांधकाम केले तर पुढे मागे त्रासाचे होणार नाही.

मा.महापौर :-तसे केले जाईल....

*<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-रिटनिंग व्हाल बाबत मी बरेच पत्र दिली आहेत. तसेच त्यादिवशी आपण सर्वजण माझ्या बरोबर तेथे होतात. माझ्या मते लवकरात लवकर हा नाल्याचे काम केले पाहिजे. कारण की पावसाचा काही भरोसा नाही, केव्हा सुरू होईल तो?पहिले श्री. भडकवाड साहेब तेथे गेले होते तेव्हा तीन फुटापर्यंत पाणी साचले होते. तर माझ्यामते आपण उदयाच याबाबत आदेश दया.*

*<u>मा.महापौरः</u>-महाराज आपणांस याबाबत काही बोलायचे आहे काय? मला वाटते की, आयुक्तांनी याबाबतचे आपले विचार सदनासमोर मांडावेत.*

*<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः</u>-मा. महापौरजी व आयुक्त साहेब व सदनातील सर्व सहकारी आज जी लक्षवेधी दिली गेली आहे. ती श्री. राजेंद्रसिंग भुल्लर यांच्या प्रभागाशी संबंधित आहे. श्रीमती. सुनिता राजवानी व श्री. बी.बी.मोरे यांच्या प्रभागाशी संबंधित आहे. तर मी लक्षवेधी बाबत असे बोलु इच्छितो की, प्रत्त्येक वर्षी पावसाळा येतो. पावसाळा आल्यानंतर त्याबाबत अशी एक म्हण आहे की, पाऊस पडल्यानंतर शेतकरी नांगरणी करण्यासाठी सतर्क होतो. त्याप्रकारे नगरसेवकांची स्थिती झाली आहे. पावसाळा आला की, नाला भरून झोपडपट्टीमध्ये पाणी शिरते. हे दाखविण्यासाठी महासभेमध्ये कित्त्येकवेळा चर्चा झाली आहे. मोर्चे आले आहेत. श्रीमती. सुनिता भाभी यांनी सुध्दा मोर्चा आणला होता. हा नाला तिन्ही प्रभागासाठी फार अडचणीचा आहे. हा नाला जेव्हा तिन्ही प्रभागातुन जातो, तर या नाल्याचा पुढील भाग अतिशय अरूंद आहे. रेल्वे लाईन जवळ या नाल्याचा भाग अतिशय अरूंद आहे. व त्यातुनच पाणी पुरवठा विभागाची जलवाहिनी गेली आहे. कोनार्क कंपनीने मातीचा भराव टाकल्याने पाणी तेथे थांबुन रहाते. परवा जेव्हा मा. महापौर, सुनिता भाभी, आयुक्त इत्त्यादींनी जेव्हा या भागास भेट देण्यास गेले. तेव्हा तो नाला कुणी बंद केला आहे. त्यामध्ये कुणी मातीचा भराव केला? हे सर्व बरोबर आहे. परंतु रेल्वे लाईन जवळ हा नाला अतिशय अरूंद आहे त्याकडे कुणी लक्ष दिले नाही. पुर्णिमा टॉकीजच्या शेजारी रेल्वेचा जो ब्रिज तयार केला आहे. कमीत कमी १०० फूट नाही तर ६०-७० फुट तरी आहे. म्हणुनच उल्हासनदीचे पाणी त्यातुन जात आहे. यासाठी आपल्या महापालिकेने रेल्वेला पत्र पाठविले पाहिजे येथे पुल बांधला गेला पाहिजे जेणे करून दरवर्षी बाजुच्या तीन प्रभागातील झोपडपट्यांमध्ये जे पाणी भरते ते भरणार नाही. परंतु इथे असे होते की, श्री. बी.बी. मोरे आले, श्रीमती. सुनिता राजवानी आल्या त्यांनी तक्रार केली म्हणुन असे म्हणाल की, चला आम्ही भिंत तोडुन पाणी जाण्याचा रस्ता मोकळा करून देतो. हे म्हणणे म्हणजे जखमेवर मलमपट्टी करण्यासारखे आहे. यामध्येच चार महिने निघुन जातात. त्यानंतर आठ महिने आमचे मा.महापौर, मा.आयुक्त, व सदस्य किंवा महापालिका प्रशासन कुणीही लक्ष देत नाहीत. नंतर जेव्हा राजीव गांधी नगरमध्ये पावसाचे पाणी शिरते तेव्हा श्रीमती. सुनिता राजवानी, श्री. राजेंद्रसिंग भुल्लर, व मी येतो तेव्हा कुठे कार्यवाही होते परंतु कायमस्वरूपी याबाबत काहीही कार्यवाही केली जात नाही. जर पुर्णपणे काम करायचे असले तर रेल्वे अधिका-यांशी विचारविनिमय करून या नाल्याची रूंदी वाढवुन व त्यावर ब्रिज तयार केला तर पाणी सहजपणे पुढे जाईल जेणे करून झोपडपट्टीमध्ये या नाल्याचे पाणी भरणार नाही.*

*<u>मा. उपमहापौर श्री. धनंजय बोडारेः-श्री</u>. मोरे साहेब या लक्षवेधीसाठी फक्त पंधरा मिनिटाची वेळ निश्चित करून दिलेली आहे. इतरांनाही बोलु दया ना.*

*<u>मा.सदस्य श्री. सुनिता राजवानीः</u>-मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना तर आदेश तर दिलात, इथे फक्त चर्चा होते कार्यवाही होत नाही. कार्यवाही झाली पाहिजे. हा नाला जर यावेळेस आपण काढत आहोत तर तो कायमस्वरूपी राहिला पाहिजे. रिटनिंग वॉल साठी आपण हुडको कडुन जे कर्ज घेणार आहोत*

ते तर खुप लांब आहे. रिटनिंग वॉल वर पुल बांधला जावा. व दुसरी गोष्ट अशी की ते कायमचे राहिले पाहिजे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-व या तिन्ही प्रभागाच्या नगरसेवकांना कुणी मतदान करणार नाही याचा कुणी विचार करतो का? त्याचा कुणी विचार करत नाही. या नाल्याचे चांगल्याप्रकारे आम्ही काम केले व लोकांच्या घरात पाणी शिरले नाही तर लोकांकडुन आम्हाला चांगल्या प्रकारचे मतदान होईल. याचा प्रथम विचार केला गेला पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-मोरे साहेब, आमची फिकीर करू नका.

मा.महापौरः-उपमहापौरांना बोलु दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-प्रभाग क्र. ६४ ,६३ ,३० ,६१ व श्री. बी.बी. मोरे आपला प्रभाग क्र. ३१ व भुल्लर महाराज यांचा प्रभाग तसेच माझा प्रभाग येतो. हा शहराचा प्रश्न आहे.

मा.महापौरः-सुनिता मॅडम, आता उपमहापौर बोलतील.

मा.उपमहापौर धनंजय बोडारेः-श्री. भुल्लर महाराजांनी जी लक्षवेधी दिली आहे. त्याबाबत मी बोलु इच्छितो, मागच्या वर्षी याच नाल्यावर किंवा याच नाल्यामुळे संपुर्ण उल्हासनगर १ ,२ ,३ मध्ये कधी न येणारा पुर आला होता. पाणी तुंबले, रस्यातुन जाणारे पाणी संपुर्ण १ ,२ ,३ नंबर मधुन येणारे पाणी तुंबले. नाला अचानक बंद झाला आणि १ ,२ ,३ मध्ये पुर आल्यानंतर चोपडा कोर्टाला सुध्दा पाणी लागले. आदल्या दिवशी रात्री डॉ. लांजेवार(आरोग्य अधिकारी), श्री. भडकवाड, श्री. पानपटटे व मी आम्ही सर्वजण उल्हासनगरमध्ये फिरत असताना ६१९ प्लॉटच्या मागच्या बाजुला दुस-या माळयावर लोक बसले होते. फायर ब्रिगेट व कल्याण खाडी जवळील मच्छिमार लोकांना बोलावुन जवळ जवळ १९ लोकांना टयुबच्या आधारावर पाण्यातुन बाहेर काढले. तिथे पाणी साचण्याचे कारण काय होते ते रात्री समजु शकले नाही परंतु दुस-यादिवशी ज्या लोकांनी तेथे जेव्हा उत्तस्फुर्त रास्ता रोको केले तेव्हा समजले की चंदर बाबलानी या नावाच्या इसमाने पाणी जाण्याचा जो मार्ग होता तो बंद केला. दोन नाल्यांपैकी फक्त एकच नाला चालु राहिला. पाणी तुंबले आणि तिथे धरणासारखे पाणी वाढत गेले. लोकांनी त्यावेळचे आयुक्त श्री. शिंदे साहेब यांना अडविले. आणि मग मी व प्रशासन उपमहापौर म्हणुन मी होतो. आमचे नगरसेवक त्यावेळी बाहेर होते. प्रशासनाने ही बाजु मांडली की मिळकत त्याची आहे. त्याच्या स्वतःच्या मालकीची आहे. आमच्या नगररचनाकारांनी कंपाऊंड वॉलची परवानगी सुध्दा त्यांना दिली. त्यामुळे प्रशासनाने असमर्थता दर्शविली. की, या मिळकतीबाबत आम्ही काही करू शकत नाही. शेवटी मी सांगितले की,लोकांच्या भल्यासाठी काही तरी केले पाहिजे, श्री. चंदर बाबलानी यांना काय करायचे ते करू दया. असा पाऊस पुन्हा झाला तर लोकांची जिवित व वित्तहानी होईल. म्हणुन मी स्वतः तेथे उभा राहुन, महापौर साहेब तेथे आले होते, तो नाला खोदुन घेतला आणि पाणी जाण्यासाठी मार्ग केला. कालांतराने आता महापौर साहेबांनी सांगितल्या प्रमाणे साधारणतः एक महिना भर तो नाला खोदलेला राहीला. त्यानंतर त्या इसमाने तेथे भराव टाकुन तो नाला पॅक केला आहे. या महिन्याभरात कधी जोरात पाऊस झाला तर किंवा धरणाचे पाणी सोडले तर किंवा भरती आली तर पुन्हा मागच्या वर्षासारखी परिस्थिती येणार. आणि मागच्या वर्षा पेक्षाही जास्त परिणाम या उल्हासनगर शहर वासियांना भोगावे लागतील याची प्रशासनाने दखल घ्यावी. स्टे आहे वा नाही आहे. ही चर्चा राहु न देता, पुर्वीचा जो नाला होता तो तसाच रहावा त्यासाठी तांत्रिक अडचणी दुर सारून जे जे करता येईल. तांत्रिक अडचणी दुर सारून कशा

प्रकारे हे काम करता येईल, नुसती तांत्रिक अडचण पुढे करून लोकांचे भले कितीही नुकसान झाले तरी चालेल हा दृष्टीकोन बाजुला ठेऊन, लोकांसाठी जे करता येईल, श्री. चंदर बावलानी यांचे नुकसान व्हावे हा सुध्दा आमचा दुष्टीकोन नाही. परंतु लोकांना ज्यापासुन फायदा होईल असा काहीतरी पर्याय, ठोस उपाय महापालिका प्रशासनाकडुन व्हावा अशी माझी अपेक्षा आहे.

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.ब्रा.वि):-सभागृहामध्ये आता जी लक्षवेधी चालु आहे. जी शहरासाठी आहे विशेषत: कॅम्प १ मधील बालकृष्ण नगर, राजीव गांधी नगर व आजुबाजुच्या विभागात प्रत्यक वर्षी जे पाणी साठते त्याचा पुर्व इतिहास पहाता असे दिसुन येते की, जेव्हा सतत एक दोन दिवस पाऊस पडत राहतो, जेव्हा समुद्राला भरती येते व कर्जत भागामध्ये जेव्हा मोठया प्रमाणावर पाऊस पडतो तेव्हा शहरातील पाणी सुमद्रात जाऊ शकत नाही. त्यावेळी जास्तीत जास्त अडचणी या विभागात निर्माण होतात. परवा १६ व १७ तारखेला जेव्हा सतत पाऊस पडत होता तेव्हा १७ तारखेला मा.आयुक्त साहेबांचा मला फोन आला होता की, त्या विभागात पाणी शिरले आहे. आपण जाऊन त्याची पहाणी करावी. मी वैयक्तिकपणे जाऊन राजीव गांधी नगर व बालकृष्ण नगर मध्ये पहाणी केली त्यावेळी तेथे ३ फुट पाणी होते. मी तात्काळ आयुक्त साहेबांना अहवाल सादर केला व आयुक्त साहेबांनी सांगितले की, १८ तारखेला मी स्वत: त्या जागेची पहाणी करेन व त्यावर काही उपाय निघत असेल तर पाहु. पुर्ण तांत्रिक टिमसह त्यात शहर अभियंता, नगर रचनाकार, मी, मा.महापौरजी, व मा. विरोधी पक्षनेता यासर्वांनी त्या विभागाची पुर्ण पहाणी केली. तिथे महापौर साहेबांनी जे स्पष्टीकरण दिले होते की चंदर बावलानी यांनी नाल्यामध्ये भराव केल्यामुळे पाणी पुढे जात नाही यासाठी त्वरीत कार्यवाही केली जावी. आयुक्त साहेबांनी मला ज्या सुचना दिल्या होत्त्या त्या संदर्भात कायदेशिररित्त्या त्या संबंधिच्या कागदपत्रांची पुर्ण छाननी केल्यानंतर बी.पी.एम.सी ॲक्ट ची पुर्ण छाननी केली असता त्यात असे आढळुन आले की, उच्च न्यायालयात ७२०१/९९ या क्रमांकाची याचिका दाखल झाली होती. जी चंदर बावलानी या व्यक्तीने आपणाकडे १९६५पुर्वीपासुनचे पझेशन असल्याचे दर्शवुन सि.डी. मिळण्यासाठी केले होते. त्यानुसार त्या याचिकेचा निर्णय २६ जुलै २००० ला झाला. मा.उच्च न्यायालयाने उप विभागीय अधिकारी यांना असे निर्देश दिले की, त्यांना सी.डी. (सनद)दिली जावी. व उपविभागिय अधिकारी यांच्या कार्यालयाकडुन त्यांना दिनांक २४.११.२००० रोजी त्या जागेची ३,७५६ चौ.यार्ड जागेची त्यांना सनद देण्यांत आली. नगररचनाकार यांच्या समवेत डी.पी. शिटची जेव्हा पडताळणी केली गेली तेव्हा हा नाला कुठेही दर्शविलेला नाही. व श्रीमती. शांताबाई दयालदास बावलानी, वनिताबाई चंदर बावलानी व चंदर दयालदास बावलानी यांच्या नावे सनद देण्यांत आलेली आहे. त्यानुसार ही खाजगी मालमत्ता आहे. कुणाच्याही खाजगी मालमत्तेतुन महानगरपालिकेस नाला काढायचा असल्यास बी.पी.एम.सी ॲक्ट च्या सेक्शन १६२ नुसार मा.आयुक्त साहेबांना याचा अधिकार आहे. परंतु या अधिकाराचा वापर करतेवेळी त्यामध्ये असे दर्शविण्यांत आले आहे की, खाजगी व्यक्तीचे कमीत कमी नुकसान करावयाचे आहे.यासाठी मा.आयुक्त साहेबांनी विधी अधिकारी व आमची जी टेक्नीकल विंग आहे, शहर अभियंता, नगररचनाकार, सर्व अधिका-यांची सभा घेतली व सभेमध्ये असे निर्देश दिले की, सखल भागातुन पाण्याचा निचरा होण्यासाठी जी काही उपाययोजना करावयाची आहे. त्यासाठी शहर अभियंत्त्यांकडुन तेथील सर्वेक्षण केले जावे. जेणे करून पाण्याचा सहजपणे निचरा होऊ शकेल. त्या हिशोबाने शहर अभियंता साहेबांनी सर्वेक्षणाचे काम सुरू केले आहे. व जसा त्त्यांचा अहवाल प्राप्त होईल तसा बी.पी.एम.सी ॲक्टच्या सेक्शन १६२ नुसार कार्यवाही करू.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर :-हा तर त्याला वाचवण्याचा प्रयत्न आहे. आयुक्तांना पण अधिकार आहेत ना, शुळ साहेबांनी त्यावेळी स्वत:चे

अधिकारांचा वापर करून काम केले. आणि कोर्टाचे आदेश आहेत आयुक्तांच्या अधिकाराची पण गरज नाही. हवे तर सचिवांना विचारा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी- कोर्टात कोणत्त्या कारणास्तव याचिका दाखल केली आहे. नाल्यासाठी टाकली होती का सनद साठी टाकली होती. तुम्ही दिशाभुल का करत आहात?

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि):-मी दिशाभुल करत नाही सनद मिळण्यासाठी म्हणुन त्यांनी याचिका दाखल केली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्रीमती. सुनिता राजवानी:- सनदशी नाल्याचा काय संबंध आहे?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-हे वेगळे प्रकरण आहे. तुम्ही कोर्टाचे कारण का सांगत आहात. दिशाभुल का करत आहात?

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि):-मॅडम मी याकरिता म्हणतो कारण की ती आता खाजगी संपत्ती झाली आहे. कोर्टाच्या आदेशानुसार.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मी तुम्हाला हे विचारते की उच्च न्यायालयात कशाप्रकारे याचिका दाखल झाली?

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि):-मी याकरिता सांगितले कारण आपल्याला आपले अधिकार वापरायचे आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर:- मा.सचिवजी, आपण यावर पुर्ण माहिती दया, नाला बंद करू शकतो का नाही?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- सचिव साहेब आम्हाला पुर्ण माहिती दया.

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि):-या विषयाबाबत आम्ही विधी अधिका-यांशी चर्चा केली आहे. महापालिकेवर काही स्टे  नाही आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- हे त्यांना स्पष्ट करू दया.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर:-सचिव सांगतील.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-मी तुम्हाला उपाय सुचवितो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- जो प्रश्न आहे त्याचे उत्तर दयायला आपण उभे आहात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- सीडी इज डिफंन्ट इश्यु, नाला इज डिफंन्ट इश्यु, व्हाय आर यु मिक्सींग देम डोन्ट टॉक हाय टाय लो टाय, आय नो व्हॉट मिनिंग ऑफ हाय टाय लो टाय.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-महापौरजी, किती चौरस फुट यार्डची मिळु शकते.


मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-नो लिमिटेशन इन उल्हासनगर?

मा.सचिवः-आपण १५०० च्या सिलिंगच्या आधारे बोलत आहात. इथे चार लोकांना पंधरा-पंधराशे वॉलची सनद दिली गेली आहे. शांती बावलानी, चंदर बावलानी, वनिता बावलानी, गितु बावलानी या नावाने सनद दिली गेली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-त्यांचे वय काय आहे?

मा.सचिवः-मला नाही माहिती, मी कशाला ती माहिती ठेऊ.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आक्युपेशनचे त्यांचे वय काय? त्यांचे वर्ष काय? जेव्हा पासुन ते दोन वर्षाचे होते तेव्हा पासुन आहे?

मा.सदस्य श्री. बी.बी मोरे :-फक्त एक मिनिट मला बोलु दया,

मा.सदस्य श्री. राजेंदसिंग भुल्लरः-सचिव साहेब, तुम्ही त्यांना स्टे विषयी काय आहे सांगा?

मा.महापौरः-महाराजजी, सचिव सांगत आहेत जरा एक मिनिट मोरे साहेबांना बोलु दया.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-माझी सर्व सभागृहाला विनंती आहे. हा जो प्रश्न आहे तो सुटणार नाही. का नाही सुटणार? कारण दरवर्षी हे होतच आहे. तर माझी एक विनंती आहे, सदस्यांना व अधिकारींना कारण ते कोर्टात गेले आहेत. आम्ही लोक प्रतिनिधी काही करायला तयार आहोत. आज करू पण उदया नाही म्हणु. परंतु शासकीय अधिका-यांची अडचण काय आहे हे शिंदे साहेबांनी पण आम्हाला सांगितले होते. कोर्टाचे आदेश आहेत आम्ही नाही करू शकत. आम्ही ते तोडले होते मागच्यावर्षी. हे तोडफोड करण्यापेक्षा मी अशी विनंती करू इच्छितो, ती जागा ४००० चौ.फुट आहे.त्यापैकी पाव हिस्सा जर त्यांना उल्हासनगरमध्ये इतर ठिकाणी दिला व नंतर ते हटविले व नाला साफ केला तर बरे होईल. हाच एक त्यावर चांगला उपाय आहे. त्या चंदरला समजवण्याचा प्रयत्न आम्ही नगरसेवक करू. की इथे या शहराला या नाल्यापासुन अडचण निर्माण होते, जर तुम्हाला शहरात कुठे तरी जागा दिली तर चालेल का? हा उपाये सर्वात चांगला आहे. नाहीतर उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय असे करत करत दहा वर्ष निघुन जातील. आम्ही नगरसेवक आज आहोत उदया नसु. मग दुसरे येतील ते पण जातील. परंतु न्यायालयाचा निर्णय लवकर लागणार नाही. म्हणुन सदनाला माझी विनंती आहे आणि महापौर साहेब आपण जर हा उपाय केला तर खुप चांगले होईल.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.सचिव साहेब एक मिनिट, आता भडकवाड साहेब म्हणाले की असा काही तरी आयुक्तांना अधिकार आहे बी.पी. एम.सी ॲक्ट मध्ये ते हे काम करू शकतात.मग आयुक्तांनी स्वतःच्या अधिकाराचा वापर करून ते काम करून टाकावे म्हणजे प्रश्नच मिटेल.

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि):-मी पुन्हा एकदा सांगतो की, मा. आयुक्तांनी याबाबतीत सर्व अधिका-याची बैठक घेतली आहे. ते १६२ अन्वये अधिकाराचा वापर करणार आहेत. परंतु त्याआधी तिथुन कशाप्रकारे नाला काढता येईल त्यासाठी सी.टी. इंजिनिअर सर्व्हे करत आहेत.जेणेकरून पाण्याचा प्रवाह सरळ जाऊ शकेल.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-समजा पुन्हा पुर आला तर?

श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.व्रा.वि):-मी हे सांगितले की, बी.पी.एम.सी. ॲक्टचा १६२ कलमाचा वापर ते खाजगी संपत्ती साठी करू शकतात. ती मालमत्ता खाजगी कशी झाली याचा मी इतिहास सांगितला.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-आयुक्तांना उत्तर देऊ दया केव्हा पर्यंत नाला तयार होईल.

मा.महापौरः-माझे असे म्हणणे आहे की, या परिस्थितीत कायदयान्वये काय करू शकतो याचे स्पष्टीकरण सचिवांनी करावे. व शेवटी आयुक्तांनी सदनाला आश्वासन दयावे ते काय करू इच्छित आहेत.

मा.सचिवः-मा.सदस्य श्री. भुल्लर महाराज यांची जी हरकत आहे. ते म्हणतात त्यांना या प्रकरणावर स्थगती आदेश मिळाला आहे. हे बरोबर आहे, कुणीतरी शेख नावाच्या व्यक्तीने दावा दाखल केला आहे व त्याचे प्रतिवादी चंदर बाबलानी व इतर आहेत. व महानगरपालिका देखिल औपचारिकरित्त्या त्यात प्रतिवादी आहे. या केसचे स्वरूप असे आहे की, ज्यांनी दावा दाखल केला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, चंदर बाबलानी व इतर कंपाऊंड भिंत बांधुन
नाला बंद करण्याच्या तयारीत आहेत. म्हणुन कोर्टाने त्यांना जसे आहे तसे असे आदेश दिले आहेत की, जेणे करून त्यांनी कंपाऊंड वॉल बांधु नये व नाल्यास अडथळा आणु नये. ते आदेश महानगरपालिकेच्या विरोधात नाही आहेत. या चार प्रतिवादीच्या विरूध्द आहेत. दुसरी गोष्ट अशी की, ज्या जमिनीबाबत आपण बोलत आहात त्या जमिनीवर कंपाऊंड वाल बांधण्याची महापालिकेने परवानगी दिली आहे व त्यानंतर त्यास सनद देखिल मिळाली आहे. मागे दोनदा पण अशी घटना घडली होती, पाणी दोनदा भरले होते. त्यांचे कंपाऊंड वाल तोडावे लागत होते. कंपाऊंड वाल तोडल्यानंतर महापालिकेतर्फे त्यांना पुन्हा पुर्नबांधकाम करण्याची परवानगी दिली. दोनदा नाही तिनदा परवानगी दिली आहे. आता समस्या हि आहे की, कंपाऊंड वाल बांधण्याची परवानगी महापालिकेने दिली आहे. आणि नाला काढणे फार गरजेचे आहे. जर नाला नाही काढला तर शेजारी असलेल्या राजीव गांधी नगरातील रहिवासींना त्रास होईल. म्हणुन त्याच्या जमिनीतुन जर नाला काढायचा असेल तर १६२ कलमाचा वापर इथे करावा. त्यासाठी त्याला तीन दिवसाची पुर्व सुचना देण्याचा विचार केला आहे. व त्यानंतर तिथुन नाला काढला जाईल. अशी प्रशासनाची तयारी आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-सचिव साहेब, तिथे पंधरा वर्षापासुन नाला आहे.

मा.महापौरः-मॅडम आयुक्तांना बोलु दया ते आश्वासन देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आम्ही त्यांना बोलु देतो परंतु त्यांना मागचा रेकॉर्ड माहिती असणे जरूरी आहे. की वीस वर्षापासुन तिथे नाला आहे. अचानक तेथुन नाला नेहमी बंद होतो आणि आम्ही तिथुन मार्ग काढतो. एस.डी.ओ. अधिकारी यांच्याकडुन काही चुक तर नाही झाली. त्यांनी सनद दिली त्यात नाला दाखविला नाही का? नाला दाखवला असेल ना? महापौरजी, डि. पी. प्लॅन पहा त्यात काही चुका झाल्या आहेत की नाही. तिथे रस्त्ता नाही तरी दाखवला आहे. त्याप्रमाणे पण येथे चुक झाली असेल, चुकीची दुरूस्ती करणे आपले काम आहे. तिथे दोन हजार झोपडपट्या आहेत, सहा हजार लोकांची वस्ती आहे. तिथे सहा हजार लोकांची वस्ती आहे. दरवर्षी लोक बेघर होतात. माझ्या मते फ्लर्ड केस मध्ये यासाठी विशेष कलम आहे. आणि आयुक्त साहेब आपल्याला देखिल अधिकार आहेत. आपण यावर प्रकाश टाकला तर बरे होईल. धन्यवाद.

मा.आयुक्त (श्री. बी.आर.पोखरकर):-मा.महापौर सर्व सन्माननिय सदस्य परवाच महापौरांनी मला याकरीता बोलावले होते. महापौर व आमचे इतर अधिकारी नगररचनाकार, उपायुक्त, वैदयकीय अधिकारी इत्त्यादींबरोबर जाऊन आम्ही तिथे पहाणी केली, राजीव गांधी नगर मधील लोकांना खरोखर तिथे त्रास आहे. मला सांगण्यात आले की, तिथे कोर्टाचे आदेश आहे, मी अजून पाहिले नाही, ते मी जरूर पाहिन. जर कोर्टाचे असे काही असेल तर कायदयान्वये करावे लागते. तेथिल पूर्ण पहाणी करून नंतर मी अधिका-यांशी सविस्तर चर्चा केली. चर्चा करते वेळेस दोन-तीन पर्याय माझ्या समोर आले. तिथे अडचण आहे काहीतरी मार्ग काढावाच लागेल. मी अधिका-याला सांगितले जर शक्य असेल तर लॅंड रिक्वीझीशन करु शकतो तर बघा. हा एक मार्ग आहे. दुसरा मार्ग त्याला टी.डी.आर. देऊ शकतो का? हा दुसरा मार्ग. तिसरा मार्ग मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील १६२ कलमामध्ये त्यासाठी तरतुद आहे. त्याचे अधिकार आयुक्तांना आहे. आम्ही याबाबतीत विधी अधिका-यांशी विस्तृत चर्चा केली आहे. दोन न्यायालयाचे आदेश पाहिल्यानंतर आम्ही लवकरच काहीना काही मार्ग काढु शकु असा मला विश्वास आहे. कोणता मार्ग निघेल हे मी आता काही सांगु शकत नाही. परंतु मी सांगितलेल्या दोन- तीन पर्यायापैकी एकाचा वापर करु. मला विश्वास आहे,लवकर काहीतरी मार्ग निघेल आणि त्याचा रिझल्ट आपणांस पाहण्यास मिळेल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- मा.महापौरजी, तुम्ही रूलिंग दया की, नाला काढण्यात यावा नाहीतर ५० लोक मरतील. अशाने नाला उघडणार नाही, आम्हाला बघायचे आहे, आम्हाला करायचे आहे, असे म्हणुन कधी होणार साहेब?

मा.महापौरः-मी आधीच आयुक्तांना सांगितले आहे ती, लवकरात लवकर कार्यवाही केली जावी.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही त्यांना तसा कालावधी दया.

मा.महापौरः-या पावसाळयातच तिथे पुर येऊन काही नुकसान नाही झाले पाहिजे, म्हणून जे पण काही कार्यवाही करायची आहे की, आयुक्तांच्या अधिकारात आहे, कायदयान्वये ती करून नाला उघडण्यात यावा.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- स. महापौरजी, पाऊस केव्हाही येऊ शकतो. लवकरात लवकर करावयास सांगा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महाराजजी, एक मिनिट, महापौर साहेब पूर्ण सभागृहाचे असे मत आहे की, १६२ कलमाचा वापर करून लवकरात लवकर केले जावे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-या नाल्यामुळे पुर्ण शहरात पूर येतो.

मा.महापौरः-ठिक आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मा. महापौरजी, माझी जी लक्षवेधी आहे, एक तर माझ्यावर अन्याय नाही झाला पाहिजे. कारण आधीच पहिल्या लक्षवेधीत चाळीस मिनिटे गेली आहेत.

मा.महापौरः-तुम्ही इतरांवर अन्याय करु नका.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-मी कुणावर अन्याय करीत नाही मी शहराचे हित पहात आहे. सोनावणे साहेबांना, मी प्रश्न विचारणार आहे महापौर साहेब तुम्ही चिंता करु नका. चार आरक्षित जागा आहेत , ज्यावर तुम्ही प्लॉन मंजूर केला आहे. मी तुम्हाला उत्तर दयायला सांगत नाही, मला माहित आहे, तुम्ही काय उत्तर देणार. आपले उत्तर हे असेल की, हे चार प्लॉन मी शासनाच्या जी.आर. नुसार पास केले आहे. एक साईट क्रमांक १९३ विठ्ठलवाडी स्टेशन समोर जिथे एम्ब्रोसिया हॉटेल नावाची इमारत आहे. दुसरी जागा आहे, साईट क्रमांक ८० जी इंदिरा गांधी मार्केट उल्हासनगर-३ जवळ कर्माशियल मार्केट बनले आहे, व त्यावर एक रेसिडेंशीसल प्लॅट तयार केला आहे. तिसरी साईट आहे, देना बँकच्या मागे जिला वुडलॅंड नावाने ओळखले जाते. ती जागा होलसेल मार्केटसाठी आरक्षित आहे. तिथे इमारत बांधली गेली आहे. चौथी साईट आहे, ६१९ नं प्लॉट साईटनं. ७४ घेऊ आपण.

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार):</u>-त्यात रिझर्व्हेशन नं. नाही आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-ठिक आहे ६१९ नं साईट डिसहाऊस साठी होता. डिसहाऊस साठी तेथे नोटीफिकेशन होते. सहा-सहा मजली दोन इमारती तिथे उभारली आहेत व दुकाने देखिल बांधली आहेत. हे आरक्षित भुखंड होते त्यावर तुम्ही बांधकामाची परवानगी दिली आहे. प्लान पास केले आहे. एक विषय आहे प्लान पास करण्याचा दुसरा विषय आहे प्लानचे उल्लंघन करून अतिक्रमण करण्याचा. आपण प्लान कसा मंजुर केला?

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार):</u>-१९८७ मध्ये याजागा महापालिकेला हस्तांतरीत करण्यांत आल्या होत्या.मी उदाहरण म्हणुन सांगतो उपविभागीय अधिकारींनी काय केले समजा दहा हजार चौरस फुट ऐरीया आहे त्यातुन दोन हजार ऐरीया दिली. ती कशातुन दिली याची त्यांनी हदद नाही दाखवली. जेव्हा आम्ही त्यांना दुस-यांदा स्मरणपत्रे पाठवले तेव्हा त्यांचे उत्तर आले आमच्याकडे कर्मचारी वर्ग नाही आहे. आम्ही आपणांस उत्तर देऊ शकत नाही. यानंतर दुस-या प्रकरणात आम्ही उपविभागीय अधिकारी यांना लिहिले होते की, ज्या तुम्ही जागा महापालिकेला हस्तांतरीत केल्या आहेत त्याची मालक महापालिका आहे असे आम्ही समजतो. या बदल्यात त्यांचे असे उत्तर आले आहे की, विषयांकित जागेचा तात्पुरता ताबा उल्हासनगर महानगरपरिषदेस १९८७ मध्ये दिला होता. परंतु जागा नगरपारिषदेकडे ती जागा वर्ग झाली नव्हती. सनद धारकाने जेव्हा सनद दाखवली त्याआधी ती जागा शासनाची होती. आम्ही त्याला दिली. त्यानंतर आमचे आयुक्त श्री. बक्शी साहेब होते त्यांच्यासमोर हे मी प्रकरण नेले. तेव्हा त्यांनी तावडतोब सांगीतले की, जिल्हाधिकारींना पत्र लिहा. तसे पत्र आम्ही जिल्हाधिकारींना लिहिले. जी जागा १९८७ साली महापालिकेकडे हस्तांतरीत प्रांत विभागाने केली तीच जागा खाजगी व्यक्तीला डिमार्केशन सहित दिली तर त्याची सविस्तर चौकशी व्हावी व ती आरक्षित जागा आम्हाला दयावी.त्याच पत्रामध्ये आम्ही डि.एल.आर यांना देखील लिहिले आहे की, आपले जे प्रॅापर्टी कार्ड आहे. भले आपल्याकडे डिमार्केशन नाही आहे. पण प्लॉट नं. दिला आहे, सर्वे नं. दिला आहे. यावरही आमचे अतिक्रमणदार म्हणुन नाव टाकले तरी चालेल कारण हे सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात जाईल इथे आम्ही पार्टी म्हणुन जरी असलो तरी तर मा. उच्च न्यायालय सहजतेने त्यांना सनद देणार नाही जी आज त्यांना देत आहे. आपण ज्या चार इमारतीविषयी विचारले आहे. ॲब्रॉसिया हॉटेलची जागा हे पार्किंगसाठी आरक्षित होती, जेव्हा १९७४ मध्ये डि.पी. मंजुर झाला तेव्हा. त्यानंतर ३५८२ मध्ये त्यात नव्याने बदल करून पार्किंग कम कमर्शीअल कॉम्प्लेक्स असा बदल १९८२ मध्ये करण्यांत आला. आणि आरक्षित भुखंड क्र. ८० इंदिरा गांधी मार्केटच्या बाजुला तिथे पण आधी प्राथमिक शाळेसाठी आरक्षण होते. १९८२ मध्ये त्यात पण बदल करून मार्केटसाठी आरक्षित करण्यांत आले. या दोन्ही

जागा स्वत: उपविभगीय अधिकारींनी लिहुन दिली की, जेव्हा महापालिकेला जागा हस्तांतरीत केल्या तेव्हा



या दोन्ही जागा सोडुन केल्या होत्त्या. त्यात शासन परिपत्रकानुसार आरक्षण असल्यामुळे भले आपली जागा नसली परंतु आरक्षित आहे. त्यावेळी श्री. चंद्रशेखर साहेब होते. जेव्हा प्लानची रिवीजन झाली तेव्हा हा विषय आला होता की आपण तेथे दुकाने घेऊ या की, पार्किंग घ्यावे. दोन्ही आरक्षण आहेत. तेव्हा साहेब म्हणाले की, आमच्या शहरात पार्किंगसाठी जागा नाही आम्हाला पार्किंग साठी आरक्षण दया.त्याप्रमाणे आम्ही पार्किंगसाठी करारनामा करून घेतला. आणि ती जागा आजपण आपल्याकडे आहे. असेच इंदीरा गांधी मार्केटमध्ये पण आहे. पहिल्या मजल्यावर त्यांनी २५ टक्के दुकाने आपल्याला बांधुन दयायची आहे. ते देणार आहेत परंतु आता हा जो स्टॅम्प डयुटीचे मेटर आले आहे. जेव्हा आम्ही रजिस्ट्रेशन करायला गेलो तेव्हा स्टॅम्प डयुटीची किंमत जवळ-जवळ वीस पंचवीस लाख होती. तर आम्ही कलेक्टर ऑफ स्टॅम्पस यांना लिहिले आहे की, आपण शासनाच्या निर्णयानुसार आम्हाला फी ऑफ कॉस्ट रजिस्टर करून द्या. त्याऐवजी तुम्ही १०० रू.चा स्टॅम्प पेपर करून दया. परंतु आज पर्यंत त्यांचे काही उत्तर आले नाही. करारनामा तयार आहे. होलसेल मार्केट जे आहे त्यात एका इमारतीत त्यांनी दुस-या मजल्यावर अर्धी दुकाने, व तिसरा माळा पुर्ण असे आजच तसे पत्र आले की, बांधकाम पुर्ण झाले आहे. तुम्ही हस्तांतरीत करून तुमच्याकडे ताबा घ्या. आणि दुसरी गोष्ट अशी हाऊसिंग, फॉर दिस हाऊस त्यात दहा टक्के त्यांनी आपणांस बांधुन दयावयाचे आहे. ते बांधुन देणार आहेत. आता शासनाने १९९४ मध्ये जी.आर. काढला जर महापालिका विकसित नाही करू शकत तर त्याचे मालक खाजगी आहेत. त्यासाठी त्यांनी एक यादी दिलेली आहे. त्यात त्यांनी निर्देशन दिले आहे की, कोण डेव्हलप करू शकतो कसे करू शकतो. याचे मार्गदर्शन दिले आहे. हा जी. आर. १९९४चा आहे. मला वाटते जेव्हा नगरपालिका नव्हती, प्रशासकीय अधिकारी होते. ठराव क्र. ३३२ ,दि. २७/७/९४ ला पारीत केला, ९४चा शासनाचा जो निर्णय आहे त्यासही अंमलात आणले जावे. व तसे आम्ही बी.एम.आर.डी.ए ला लिहिले होते. तेव्हा बी.एम.आर.डी.ए नी दि.११.९.९७ ला असे लिहुन दिले आहे की, आपणांस विनंती करण्यांत येते की, या दोन्ही शासन निर्णयात दिलेले आदेश लक्षात घेऊन दि. ७.४.९४ च्या निर्णयामध्ये जमिन वापर व विकास करण्याच्या पध्दतीच्या दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तरतुदी तावडतोब अंमलात आणाव्या. आणि आमची प्लानिंग ऑथर्टी बी.एम.आर. डी.ए आहे. जेव्हा हे डि.सी रूल बनवले ते १९८६ मध्ये झाले हा जी.आर. १९९४ चा आहे. अजुन डि.सी रूल मध्ये त्याचा समावेश नाही झाला. आपल्याकडे जो मंजुर विकास आराखडा ड्रॉफ्ट डि.सी. रूल आला आहे. त्यात ही प्रोव्हीजन केली आहे. त्यामुळे आपल्याला ३७ कलम वा दुसरे काही करण्याची आवश्यकता नाही. आणि १९९४चा शासन निर्णय आहे. त्याप्रमाणे हे सर्व नकाशे मंजुर केले आहेत.

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी</u> :-एक सेकंद, आता तुम्ही म्हणालात महापालिकेला जागा हस्तांतरीत केल्या. जेव्हा उच्च न्यायालयात कोणतेही एखादे प्रकरण आरक्षण काढण्यासाठी म्हणुन जाते तेव्हा महापालिका प्रतिवादी म्हणुन असते का?

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार)</u>:-नाही. आम्ही जिल्हाधिकारींना लिहिले आहे. त्याची एक प्रत डि.एल.आर. कार्यालयात दिली आहे. आजपर्यंत असे झाले नाही, आमच्याकडे जागा ताब्यात असल्याच्या जितक्या पण पावत्त्या आहेत. त्याची प्रत आम्ही जिल्हाधिकारी व डि.एल. आर यांना पण दिली आहे. त्यात बॉन्ड्री कुठे आहे हे दाखविले नाही परंतु प्लॉट नं. दाखविला आहे. सर्व्हे नं आहे. आम्हाला भले तुम्ही अतिक्रमणदार म्हणुन समजले तर जेव्हा उच्च न्यायालयात हे प्रकरण जाईल तेव्हा ते आमचे देखिल प्रतिवादी म्हणुन नाव घालतील. तेव्हा आम्ही सांगु शकु की, हा आरक्षण भुखंड आह, आमच्या ताब्यात आहे. आज

पर्यंत असे झाले नाही. जितकेपण आरक्षण भुखंडावर न्यायालयाने आदेश दिले आहेत मला नाही वाटत त्यात महापालिका प्रतिवादी म्हणुन आहे.



मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-मग काय महापालिका काही करू शकत नाही. प्रतिज्ञापत्र भरू शकत नाही की, आम्हाला पण तुम्ही प्रतिवादी बनवा.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आम्हाला माहित पडत नाही जेव्हा ते सनद घेऊन येतात. जेव्हा ते प्लान सहित डिमार्केशन घेऊन येतात तेव्हा आम्हाला माहित पडते की, उच्च न्यायालयाने त्यांना जागा दिली आहे.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-तुम्ही कधी उपविभागीय अधिकारी यांना दबाव टाकला आहे का? की तुम्ही प्रतिज्ञा पत्र भरा की ही जागा महापालिकेची आहे. न्यायालय कसे त्यावर आदेश काढु शकते जर संपत्ती महापालिकेची आहे तर ?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-म्हणुनच जेव्हा आम्हाला महित पडले तेव्हा आम्ही डी.एल.आर. ला लिहिले आहे. सविस्तर माहिती दिली आहे.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-समजा जर कोर्ट आरक्षण काढुन त्यांना जागा देते तर आपण पण न्यायालयात जाऊ शकतो ना? की महापालिकेची मालमत्ता आहे, आम्हाला प्रतिवादी केल्याशिवाय तो व्यक्ती कोर्टात कसा गेला. आणि न्यायालय आदेश कसे देऊ शकते. याची चौकशी करशी केली आहे.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आता मार्च महिन्यामध्ये आम्ही पत्र दिले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तुम्ही पत्रा विषयी सांगु नका. भाभी कोर्ट विषयी विचारत आहे. बी.पी.एम.सी. ॲक्ट अन्वये कलम ८० मध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, महापालिका कोणत्या जागेविषयी दावा करू शकते. प्रांत अधिकारी व कलेक्टर यांनी याचा वापर केला आहे का? १६-१८ मध्ये यांनी स्पष्टपणे लिहिले आहे. ती व्यक्ती महापालिकेला प्रतिवादी करीत नाही ठिक आहे. कोर्टाच्या आदेशान्वये सनद घेऊन आला. सनद घेऊन आल्यावर चार वर्षाने प्लानच्या मंजुरीसाठी तो अर्ज देतो. त्यासाठी जेव्हा आपल्याकडे कागदपत्र येतात, तेव्हा आपण बघतो की, आरक्षण भुखंडावर त्यांनी सनद आणली होती. तेव्हा आपले काय कर्तव्य बनते.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-यासाठीच शासनाने निर्णय दिला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आधी माझे ऐका मी आपले म्हणणे ऐकले ना? मी विचारेन त्या प्रश्नाची उत्तरे दया. आपला स्वतःचा प्लॉट असेल त्यावर मी जर सनद काढली तर चालेल का? तुम्ही एस.डी. ओ. कडे वेरीफिकेशनसाठी पाठविता ते काय करणार?त्यांनीच तर सनद दिली आहे. तुम्ही कसा प्लान मंजुर करता? असे कसे तुम्ही कोर्टात आव्हान केले नाही. तुम्ही १९९४च्या ज्या जी.आर. चा उल्लेख करत आहात त्यातील सेक्शन ३७ चा वापर त्यावेळच्या मुख्य अधिकारींनी केला होता. मुख्य अधिकारी ही प्लॅनिंग ऑथर्टी आहे.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-त्यावेळी प्रशासकीय अधिकारी होते त्यांनी ठराव केला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-ते काय नियोजन प्राधिकारी आहेत का? एम.आर. टी.पी. सेक्शन ३७ मध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, नियोजन प्राधिकरीलाच या कलमान्वये पुढची कार्यवाही करायची मुख्य अधिकरी किंवा प्रशासक नियोजन प्राधिकारी म्हणुन पुढची कार्यवाही करू शकत नाही. त्यावेळची नगरपालिका त्यावेळी नियोजन प्राधिकारी होती तुम्ही कसे मानता याचा अर्थ



तुम्ही बिल्डरना संरक्षण देण्यास उत्सुक आहात. म्हणुन मार्ग काढता. तिसरा मुद्दा असा की जेव्हा प्लॅन पास करण्यासाठी तुमच्याकडे येतात. एम.आर.टी. पी. ॲक्ट ४६ मध्ये स्पष्ट लिहिले आहे की, आरक्षित असलेल्या भुखंडावर तुम्ही प्लान पास करू शकत नाही. तुम्ही एकाच जी.आरचा उल्लेख करत आहात.ज्यात सेक्शन ३७चा वापर नाही केला गेला. सेक्शन ८० बी.पी.एम.सी चा तो पण नाही वापरला. सेक्शन ३७ हा प्लॅनिंग ॲथोर्टी यांनी फॉलोव्ह न करता एका प्रशासकाने फॉलोव्ह केला आहे त्याचा तुम्ही पाठिंबा घेत आहात. या विषयानंतर जेव्हा आपल्याकडे प्लॅन पास करण्यास येतात तेव्हा जेव्हा मोठा भुखंड असतो. या केसमध्ये तुम्ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सल्ला घेतला होता का?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-बी.एम.आर.डी. कडुन परवानगी घेण्याची गरज नाही. कारण हे सर्व सॅन्शनड् डेव्हलपमेंट प्लॉन प्रस्ताव आहे. यास मान्यता शासन देते. शासनानेच मंजुर केलेल्या प्रस्तावांना परत विचारण्याची काय गरज आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- याचा अर्थ तुम्ही तुमचा एक आरक्षित भुखंड जो पार्किंगसाठी आरक्षित आहे. त्यासाठी महापालिकेला काय खर्च येणार आहे. महापालिकेने काय डिसाइड केले, आमच्याकडे पार्किंगसाठी सोय करायला पैसा नाही. काय खर्च येतो म्हणजे पार्किंगचा प्लॉट देऊन टाकता.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-हे तर १९८७ पासुन चालु आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तुम्ही म्हणता श्री. बक्शी साहेबांनी पत्र लिहिले आहे. तुम्ही ते येण्याआधीच प्लॅन मंजुर केला. मी तुम्हाला तारखा सांगु शकतो. पहिला प्लॅन १४ जुलै १९९८ ला साईट नं. ८० वर तुम्ही मंजुर केला. त्यावेळी बक्शी साहेब होते.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-नाही ना. नव्हते. यापुर्वी जे नाही झाले ते करू इच्छितो ना. ही आम्ही आमची कार्यवाही सांगतो जी सुरू केली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मी काय म्हणतो तुम्ही प्रामाणिकपणे म्हणा जे झाले ते झाले यापुढे काय करायचे याचा विचार करा. प्रामाणिकपणे आमचे ऐका. तेव्हा बक्षी साहेब नव्हते तुम्ही प्लॅन मंजुर केला. दि. १४.८.९८ ला वुडलॅन्ड चा प्लॅन आपण पास करता,दि. १९.८.९८ ला मा. संचालक नगरविकास विभाग, कोकण भवन यांना तुम्ही लिहिता की, मी मार्गदर्शनासाठी पत्र लिहितो असे कसे?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):- असे काही नाही झाले मी ९८ साली इथे नव्हतो. तुम्ही जे सांगत आहात ती फाईल काढुन मी बघेन. जोपर्यंत मी फाईल बघत नाही तोपर्यंत मी काही बोलत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तुम्ही होता नव्हता, दुसरे नगररचनाकार होते. प्लॅन मंजुर करताना तुम्ही जे पत्र मा. संचालक यांना लिहिले आहे त्यावर त्यांनी उत्तर दिले आहे ते तुम्ही त्या प्लॅन सोबत फाईलमध्ये लावुन ठेवले आहे. प्लॅन मंजुर करण्यासाठी, बचाव करण्यासाठी ते पत्र तिथे लावले आहे. त्यांनी आपणांस काय उत्तर दिले आहे. ते तुम्ही वाचुन दाखवा.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):- मी इथे प्लॅनची कॉपी आणली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- मी आणली आहे ना, तुम्ही कशाला चिंता करता. पहिल्या परिच्छेदात संचालकांनी लिहिले आहे मला कळत नाही तुम्ही हा



विषय माझ्याकडे का पाठविला. दुस-या परिच्छेदात त्यांनी तुम्हाला डिटेल दिले जे तुम्ही विचारले त्याविषयी. तिस-या परिच्छेदात लिहिले आहे संबंधित मालकाला विकण्याचे अधिकार दयावयाचे असतील तर महानगरपालिकेने तसा निर्णय प्रथम घेणे आवश्यक आहे असा एकत्रित प्रस्ताव संपुर्ण आरक्षण क्र. १९३च्या जागेवर महानगरपालिकेने राबविणे योग्य ठरेल. आणि शेवटी त्यांनी तुम्हाला लिहिले आहे तरी आपण आपल्या स्तरावर निर्णय घ्या. तुम्ही का प्लॅन पास केला. तुम्ही तर उत्तर यायच्या आधीच पास केला.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):- हे उत्तर आल्यावर संबंधित नगररचनाकाराने प्लॅन पास केला असेल. त्यांना वाटले असेल की, करू शकतो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- हे उत्तर आल्यानंतर देखिल तुम्ही दोन प्लॅन मंजुर केले आहेत. महासभा व महापालिकेला विश्वासात घेतले नाही. आणि असेच प्लॅन मंजुर करतात.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):- इथे शासनाचा जीआर आहे. प्लॅनिंग ॲथोर्टी बीएमआरडीए. आहे. ते लिहितात की ठराव तुम्ही इनकार्पोरेट करा. प्रांत अधिकारी म्हणतात आम्ही तुम्हाला जागाच दिली नाही. तुम्ही जागेचे मालकच नाही आहात. दोन ठिकाणचे त्यांच्याकडे प्रॉपर्टी कार्ड आहे. टायटल होल्डर ते आहेत. याचा अर्थ हा आहे की ती जागा महापालिकेकडे नाही आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-टायटल होल्डर आहेत असे सांगुन तुम्ही मिरवु नका. त्या मुदयावर पण मी येतो, खुप काही त्रुटया आहेत त्यात. टायटल क्लीअर नाही प्लॅन पास करता. माझ्याकडे पुर्ण प्रमाण आहे, साक्ष आहे असे नाही बोलणार मी. आपण किंवा आपल्या अगोदरचे नगररचनाकार पत्र लिहिता शासनाचा जीआर येतो. त्या जीआरचा हेतु काय? तुम्हाला हे मान्य असेल की, जितके पण आरक्षित भुखंड आहेत ते जर महापालिका विकसित नाही करू शकत त्यामुळे त्या भुखंडाचा फायदा लोकांना मिळत नाही. कुठे शाळेसाठी जागा असते, कुठे बागेसाठी जागा आरक्षित असते. जर त्या भुखंडावर अतिक्रमण असेल जर तो ओनर म्हणुन सिध्द होत असेल तर त्या व्यक्तीला ज्या हेतुसाठी भुखंड आरक्षित आहे तो हेतु साध्य करण्यासाठी प्लॅन मंजुर करून देऊ शकतो. त्यासाठी त्याने फार्मुला दिला आहे २५ टक्के, ३० टक्के. जीआर चा उददेश शहराच्या फायदयासाठी आहे, बिल्डरच्या फायदयासाठी नाही. जीआर. आल्यानंतर नगररचनाकार जे आपल्या आधी होते ते संचालकांना पत्र लिहितात. कोकण भवन उत्तर देते की, याचे एकुण भुखंडाचे तुम्ही निर्णय घ्या आणि प्रस्ताव पारीत करा. जर तुम्ही त्यांना पत्र लिहिता तर त्यांचे तुम्ही ऐकले पाहिजे ते तुम्ही ऐकत नाही आणी काहीही ठोकंमठाक करून प्लॅन पास करता. आणि म्हणता आमच्याकडे शासनाचा जी. आर आहे. बीएमआरडीए. चे पत्र आहे. संचालक कोकण भवन आपणांस लिहिते की, प्रस्ताव पारीत करा. तुम्ही प्रस्ताव पारीत नकरता असेच थेट पास करता. कारण सांगता की, आमच्याकडे शासनाचा जी. आर आला आहे. हे चुकीचे आहे, योग्य नाही. प्लॅन बेकायदेशिररित्या पास करता हे अन्यायकारक आहे. आता मी एकेक साईट घेऊन बोलतो. साईट क्र. १९३ ठिक आहे. यात प्रॉपर्टी मालक आहेत श्री. जामनदास सेवुमल जाहिर , जियाराम जेठानंद, मोहन लक्ष्मणदास हे सर्व संपत्तीधारक होते. ही जागा शाळेसाठी पार्किंगसाठी व नंतर

कर्माशियल शॉपिंग कॉम्पलेक्ससाठी आरक्षित केले गेली. आणि आता नव्या डिपी प्रमाणे ही जागा पार्किंगसाठी आरक्षित आहे, बरोबर?
श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आम्हाला सुचना व हरकती घेऊन काढव्या लागेल कारण की, हा जो बदल केला आहे तो शासनाने केला आहे.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी जो प्रश्न विचारतो त्याचे उत्त्तर दया ना? नव्या डिपीत पार्किंगसाठी आरक्षित आहे की नाही?
श्री. सोनावणे (नगररचनाकार):-पार्किंगसाठी नाही ट्रान्सपोर्टसुविधेची आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- मी जे विचारतो त्यामागे काहीतरी तथ्य आहे, दुसरी एक जागा आहे त्याला सेंच्युरी प्ले गार्डन्ड म्हणतात.त्यासाठीपण आपल्याकडे मंजूरीसाठी प्रस्ताव आला होता. तर नव्या डिपीत काय आहे, आयुक्तसाहेब तुम्ही लक्ष दया. कारण की, तुमची पण भुमिका महत्त्वाची आहे. नव्या डिपीप्रमाणे तुम्ही बी.एम.आर.डी. ला लिहिता. बी.एम.आर.डी.म्हणते नका पास करु आरक्षणामध्ये आहे.तुम्ही पास करत नाही पण त्या व्यक्तीला अपिलसाठी पाठवता. इकडे का नाही असे केले. इकडे का प्लॉन मंजूर केला. २००० मध्ये तुम्ही प्लॉन पास केला.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-तुम्ही जो म्हणत आहा तो भुखंड मंजूर विकास आराखडयात रेसिडीएंशल झोनसाठी आरक्षित होता. मोठ प्लॉट होता, त्यात बहुतेक रिझर्वेशन असेल म्हणुन.............

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-म्हणुन तर मी म्हणत आहे, आधी पण आरक्षण नंतर पण आरक्षण.
श्री.सोनावणे(नगररचनाकार) :- पार्किंगसाठी आरक्षित आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-त्यांचे नाही पास करत, त्यांना बी.एम.आर.डी.कडे पाठवता.

श्री. सोनावणे(नगररचनाकार):- परत पाठवण्याचा अर्थच नाही कारण शासनानेच मंजूर विकास आराखडयात आरक्षण दाखवले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी काय म्हणतो ते ऐका, आधी तेथे रेसिडेंशल झोनसाठी आरक्षण होते.

श्री. सोनावणे(नगररचनाकार):-कोणत्त्या प्लॉटवर?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-सेंच्युरीच्या प्लॉट विषयी.जर तिथे कोणी व्यक्ती बिचारा प्लॉन पास करण्यासाठी येतो, त्याला मी बिचारा मानत नाही, मी फक्त उदाहरणार्थ, देत आहे. तुम्ही त्याला म्हणता आता तर तिथे रेसिडीएंशल झोन आहे, मला बी.एम.आर.डी. ए ला विचारावे लागेल की, पुढे काही तो आरक्षणासाठी आहे का?असे बी.एम.आर.डी.ला तुम्ही देता. परंतु या प्रकरणामध्ये आधीच जी जागा आरक्षित आहे, ती नंतर पण आरक्षितच असणार. त्यासाठी तुम्ही बी.एम.आर.डी.ए. ला विचारतच नाही.

श्री. सोनावणे(नगररचनाकार):-आरक्षणच आहे ना, पार्किंगचे पार्किंगलाच आरक्षीत ठेवले आहे. भुखंड क्रमांक १९३ पहा, ८२ मध्ये ते पार्किंगसाठी होते, आता पण पार्किंगसाठी आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुम्ही आता पार्किंगसाठी जागा बनवाल उदया शाळेसाठी आरक्षण असेल तर....

श्री.सोनावणे(नगररचनाकार):- प्रश्नच येत नाही. ७४ मध्ये मंजुर विकास आराखडयाप्रमाणे त्यांना मान्यता मिळाली आहे.त्यावर अंमलबजावणी करण्यासाठी



आम्हाला कोणी थांबवु शकत नाही. कारण शासनानेच त्यांना मान्यता दिली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तसेच तिथे पण रेसिडेंन्शीअल झोन आहे ते तुम्ही का नाही मंजुर केले?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-कोणते?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-प्लॉट नं. ७४.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-येणारा जो मंजुर विकास आराखडा आहे. तो अंमलबजावणीत आणला पाहिजे ना? तो झोन रेसिडेंन्शीअल होता. नाहीतर आम्ही बी.एम.आर.डी.ओ. कडे नसता पाठविला.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुमचे कारण समाधानकारक नाही. मी त्या फक्त त्या प्लॉटविषयी बोलत नाही.

मा.महापौर:- राजानीजी,

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-भरीव चर्चा चालु आहे मला बोलु दया. सगळयांना माहिती मिळेल. त्यानंतर वर उल्लेखीलेल्या तीन व्यक्ती सनदधारक ही मालमत्ता विकतात. जीतु जेठानी, नरेंद्र दासानी दासानी कडे लक्ष दयावे, नरेंद्र कडे लक्ष दयावे. व पुरूषोत्तम भागचंदानी यांना ते विकतात. त्यानंतर प्लॅन मंजुर करून घेण्यासाठी त्यांचा कुणीतरी आर्किटेक्ट नवल शिवलकर ते प्लॅन पास करण्यासाठी जीतु जेठानीच्या नावाने प्लॅन पास करायला देतात, दोन -चार दिवसांनी पुरूषोत्तम भागचंदानी च्या नावाने प्लॅन पास करायला देतात. त्यानंतर तो काय करतो स्वत:चे पत्र देतो त्यात तो दाखवतो, वरील एक, दोन व तिसरा नरेंद्र दासानी या तिघांना मिळुन एक इमारत बनवायची आहे आपण प्लॅन मंजुर करा. आणि तुम्ही तिघांचे मिळुन एकच प्लॅन मंजुर करता. त्या तिघांचा आपसात काही करारनामा?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-हे मी फाईल बघुन सांगु शकतो. हे ९८ मध्ये झालेले आता नाही सांगु शकत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी आपणांस सांगतो. या केसमध्ये त्या तिघांची काही भागीदारी नाही आणि तुम्ही प्लॅन मंजुर केला. आत तुम्ही त्यांना काय सांगणार जुन्या तारखेत करारनामा तयार करा. आम्ही फाईलमध्ये टाकतो त्याशिवाय तुमच्याकडे दुसरा काही मार्ग नाही. पण मी तुम्हाला सांगतो तुम्ही हे पण नाही करू शकणार. कारण की मी त्यांनी केलेला कागदोपत्री व्यवहार सांभाळुन ठेवला आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-आम्ही काही करणार नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नाही केले तर चांगलेच आहे. नाहीतर फसुन जाल. म्हणण्याचा उददेश हा आहे की, भागीदारी नसुन देखिल तुम्ही प्लॅन मंजुर

केला. व्हॉट आय से धिस इज टु ॲन्ड यु प्रुव्ह. तुम्ही अशात-हेने प्लॅन मंजुर केले त्यावर उपाय काय?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-ते पाहिल्या शिवाय मी काही सांगु शकत नाही. जे तुम्ही सांगत आहात ते खरे आहे की, नाही हे तर आधी पहावे लागेल.

--४४--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- मी उल्हासनगर विषयी नाही बोलत आहे. कल्याणच्या नगररचनाकारांने कुणाचा तरी प्लॅन भागीदारीचा करारनामा झाला नसताना देखिल , डीड नसताना देखिल न पहाता प्लॅन पास केला. केवळ आरकीटेक्टच्या साध्या एका पत्रावरून. तर काय केले पाहिजे त्याचे?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-याविषयी मी काही नाही बोलणार.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-कसे काही नाही बोलणार?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-जोपर्यंत मी पुर्ण डिटेल नाही पहात तोपर्यंत काय सांगु.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नियमात तसे आहे. वेगवेगळया नावाने मालमत्ता आहे. त्या तिघांची भागीदारी डीड असली पाहिजे ना.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी तेच म्हणत आहे ना की, जोपर्यंत मी फाईल बघत नाही तोपर्यंत काही सांगु शकत नाही. ते १९९८ चे प्रकरण आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुम्ही फाईलला विसरा. साईट क्र. १९३ ला विसरा मी जनरल बोलत आहे. मी, प्रकाश माखिजा, लाल पंजाबी तीन वेगवेगळया संपत्तीचे मालक आहोत. आमचा वास्तुविशारद चार्ली आहे. तो फक्त तुम्हाला पत्र देतो. आमची आपसात भागीदारी असल्याचा करारनामाही नाही. आपण प्लॅन मंजुर कराला का?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-त्यांनी अमालगमेशन दिले असेल असे होऊ शकते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- नाही दिले ना?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-म्हणुनच मी म्हणतो ना फाईल पाहिल्याशिवाय मी काहीही सांगु शकत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नाही दिले. मग काय प्लॅन पास केला पाहिजे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी फाईल पाहिल्यावर सांगेन.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- अरे जनरल विचार करा ना? मी साईट क्र. १९३ विषयी नाही बोलत. तुम्ही विसरा ते तिथे आमच्या मित्रांनी देखिल काम केले आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-अशा प्रकारचे प्रश्न माझ्याकडे अजुन आले नाही आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-असे जर केले तर काय केले पाहिजे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-आम्ही उपसंचालकांना लिहु की असे असे त्यांनी काम केले आहे.

--४५--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नकाशा नगररचनाकाराने पास केला आहे. तुम्ही जाणुन बूजुन विषयाकडे दुर्लक्ष करत आहात किंवा तुमच्याकडे उत्तर नाही. मी साधा प्रश्न विचारतो फक्त वास्तुविशारदच्या एका पत्रावरून तुम्ही प्लान पास कराल का? नाही करू शकत.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-तेच मी म्हणत आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:- आयुक्तांना विचारा काय केले पाहिजे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):- जर तिघही मिळून प्लान टाकता तर विषयच संपतो. जे मालमत्ताधारक आहेत. जर ते तिघे मिळुन प्लान पुटअप करतात तर ठिक आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-याचा अर्थ तिघांची पार्टनरशिप पाहिजे ना? समजा एकच बिल्डींग बनवली आणि मी भांडण केले तरें

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-समजा त्यांना पार्टनरशिप करायची आहे, प्लान तिघांच्या नावाने टाकला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आयुक्त साहेब, मला वाटते हे जाणुन बुजुन करत आहेत. मुख्य मुदयावर ते येत नाहीत. मी साधा प्रश्न विचारत आहे. ते वेगळेच काहीतरी बोलत आहेत. जर ॲग्रीमेंट नाही तर प्लान कसा पास केला, ते तिघे वेगवेगळे होल्डर आहेत. त्यापुढे मी येतो. नाहीतर तुम्ही इथेच अडकुन रहाल. तुम्ही यापुढे जाऊ शकणार नाही. कारण जर खोटे मनात असेल तर माणुस पुढे जाऊ शकत नाही.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-इथे खोटे बोलण्याचा प्रश्न येत नाही. फाईल पाहील्याशिवाय मी काही सांगु शकत नाही. प्रश्नच येत नाही उत्तर देण्याचा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- मी जर चोरी नसेल केली आणि मला जर कोणी विचारले की, चोरी करणे चांगले आहे की नाही. मी लगेच सांगेन वाईट काम आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-चुकीचे उत्तर देण्यापेक्षा उत्तर न देणे चांगले. मी फाईलच पाहिली नाही तर उत्तर काय देणार?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-यापुढे जाऊ. जे नरेंद्र दासानी आहेत त्यांनी एक रिलिझ डिड दिली आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे की, मी साईट क्र. १९३ येथे राहतो. आपण इथे बसलेले सर्व साक्षी आहोत. इथले काही अधिकारी शहरातच राहतात, महापौर देखिल. बालपणापासुन तिकडुन आम्ही जातो. लहानपणी जेव्हा आम्हाला सायकल शिकायची होती तेव्हा आम्ही तिकडे जाऊन शिकायचो. स्कुटर शिकायची असली तरी तिकडे जायचो. तिथे रिकामा भुखंड होता, काही अतिक्रमण नव्हते. रिलिझ डिडमध्ये तो दाखवत आहे की मी तिथे रहायचो. टॅक्स पावती कुठे आहे? टॅक्स पावती असणे आवश्यक आहे ना? मी जनरल गोष्ट विचारतो.

<u>श्री.सोनावणे(नगररचनाकार)</u>:-आज आम्ही बघतो, ९८ साली काय व्हायचे माहित नाही.



<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-मी आताची गोष्ट करत आहे. साईट क्र. १९३ ची त्याच्याकडे टॅक्स पावती नाही. खातेच नाही त्यासाईटचे. तुम्ही कसा प्लान मंजुर करू शकता? तुम्ही कसे मान्य करता की, तो तिथला रहिवासी आहे. हे शहरासाठी ठिक नाही. तुम्ही अधिकारी म्हणुन इथे येता पगार घेता. शहराचे लोक कर भरतात त्यातुन तुमचा पगार येतो. तुम्ही शहराचा भुखंड विकुन टाकता.

<u>श्री.सोनावणे(नगररचनाकार)</u>:-भुखंड विकायचा अधिकार माझा नाही उपविभागीय अधिकारींचा आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-तुम्ही प्लान तर पास करता ना?

<u>श्री.सोनावणे(नगररचनाकार)</u>:-करतो शासनानुसार....

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>- सोडा शासन शासन. माझे घर हिंदुस्तान काय कोणत्त्याही सरकारने त्याला हात तर लावुन दाखवून दे. मी प्राण देईल पण एक इंच देखिल जागा देणार नाही. हे आमच्या शहराचा प्लॉट आहे. तुम्ही असा का नाही विचार करत. तुम्ही त्याचा बचाव करू शकता. सरकार-सरकार काय सरकार जनतेसाठी आहे. तिथले जे अधिकारी आहेत ते जनतेसाठी आहेत. आम्ही नाही त्यांच्यासाठी ते जनतेसाठी आहेत. हा प्लान मंजुर करताना स्पष्टपणे दिसुन येते की, किती चुका झाल्या आहेत. दुस-या साईटवर येतो मी आता तुम्ही १९३ हुन थोडे मोकळे व्हाल. आपणास काही फरकच नसेल पडत कारण हे तुमचे शहर नाही.

<u>श्री.सोनावणे(नगररचनाकार)</u>:-तो प्रश्न नाही आहे हे सर्व ९८ सालीच पास झाले आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-तुम्ही इतके कॅज्युअल आहात.

<u>श्री.सोनावणे(नगररचनाकार)</u>:-कॅज्युअल होण्याचा प्रश्नच नाही. ते ९८ सालीच पास झाले आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-होल्ड युवर ब्रीथ.

<u>श्री.सोनावणे(नगररचनाकार)</u>:-ज्यावेळी ९८ साली प्लान मंजुर झाला त्याचवेळी तुम्ही हे विचारायला पाहिजे होते. आज तर प्लान पास नाही झाला २००० मध्ये तेव्हा तर तुम्ही विचारू शकत होता.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-तेव्हा मला महित नव्हते मला आज माहित पडले. तुम्हाला तर सनदेची माहिती मिळाली तरी तुम्ही विचारत नाही. मला तर माहित पडले आणि तुम्ही विचारले. तीन पत्र मी लिहिले याआधी त्यानंतर इथे हा विषय आणला आहे. त्या लक्षवेधीला पण थांबवण्याचा प्रयत्त्न केला जात होता. पुर्ण गळा फाडुन छाती फाडुन ओरडल्या नंतर हे बोलण्याचा अधिकार मला मिळाला आहे. तुम्ही कधी असे केले का? कुणी बोगस सनद आणुन तुमच्यासमोर उभा राहतो. साईट नं. ८० याची सनद ती गगीबाई हसनदास, दिपचंद चांडुमल यांच्या नावे आहे मोठा इतिहास आहे. त्यांच्या नावाने १९९२ मध्ये सनद काढली गेली आहे. हा भुखंड देखिल प्राथमिक शाळेसाठी आरक्षित

होता नंतर त्यात बदल करून कमर्शिअल कॉम्पलेक्स साठी ठेवले आणि आता परत नव्या डि.पी मध्ये तो कशासाठी आरक्षित आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मार्केटसाठीच असेल.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- असेल असे नाही आपण पाहिले पाहिजे.आपण नगररचनाकार आहात. तो भुखंड पुन्हा शाळेसाठी आरक्षित केला आहे. हे तुम्ही डि.पी मध्ये पहा. आता काय करणार? इमारत तोडुन प्राथमिक शाळा बनवा माझा विषय संपेल. तिथे १९३ वर जो विचारा नरेंद्र दासानी रहात होता. एक विचारा नरेंद्र इथे आहे एक तिथे आहे. इथे लिहिले आहे भोलेनाथ चाळ, निअर बॅरेक नं. ५१ , उल्हासनगर-२ . एकच व्यक्ती दोन्ही ठिकाणी एकाच वेळी कसा राहु शकतो? अजुन पण आहेत तिसरा पण त्याचा पत्ता आहे. एक व्यक्ती दोन जागेवर सनद घेतो, मालमत्ता घेतो, वेगवेगळे करारनामे करून वेगवेगळे पत्ते देतो आणि तुम्ही ते मंजुर करता न पाहता, न वाचता. फाईल आली ओह लवकर सही करा. आम्ही इतके सक्षम अधिकारी आहोत की, एक-दोन दिवासातच प्लान मंजुर करतो. आम्हाला विश्वास आहे. हे दाखवण्याच्या घाईत असतात. जिथे तुम्ही प्लान मंजुर केला तिथे किती दुकाने आहेत?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-हे जे चार भुखंड....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुम्हाला सविस्तर माहिती नाही मी देतो.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-२८ दुकाने आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-साईट क्र. १९३ मध्ये आपण १३ दुकानांसाठी मंजुर केले आहे. आता तिथे एक हॉटेल आहे. हे माहित आहे ना?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-बरोबर आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- इज इट हॉटेल ऑर शॉप. तिथे प्लान रिवाइज करून दिला आहे दोनदा. मध्ये काहीतरी कंम्प्लीशन झाले नाही त्याच्या आधीचे कंम्प्लीशन तुम्ही देऊन ठेवले आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-पार्ट कंम्प्लीशन दिले आहे ग्राऊंड फ्लोअरसाठी.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जेव्हा पार्ट कंम्पलीशन देतात, तिथे हॉटेल तयार होते. तिथे दुकाने किती आहेत हे मी मोजले नाही.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-महापालिकेने त्यांना एन.ओ.सी दिली नाही आहे. प्लान मध्ये दुकान आहे. त्यावर ऑफीसेस आहेत ही आम्ही परवानगी दिली आहे. कंम्प्लीशन घेतल्यावर ते काय करतात. हे तर अतिक्रमण विभाग सांगेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- श्री. भडकवाड साहेबांना याविषयावर तयार करत आहे. आधी तुमचे पुरे होऊ दया मग त्यांना विचारणार, नाहीतर ते म्हणतील मला तर माहित नाही. नगररचनाकारांनी सर्व मंजुर केले आहे. इथे जी २८ दुकाने तुम्ही मंजुर केली आहे. व तिथे १३ दुकाने मंजुर केली आहेत. साईट नं. ८० मध्ये पुन्हा रिवाइज प्लान केला आहे. महापालिकेस सात दुकाने दयायची होती. २५ टक्के महापालिकेला त्यांनी दयायचे आहेत ना? ते सात मोठे गाळे होते. जेव्हा ते दयायचे असतात तेव्हा ते अर्धे करून देतात. त्या तिन्ही दुकानांमध्ये भिंत बांधली आहे. ते म्हणतात की, आम्हाला

महानगरपालिकेला जी दुकाने दयायची होती ती आम्ही दिली आणि अर्धी दुकाने स्वत: कडे ठेवतात.

--४८--

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-त्यांना एकुण ऐरीयापैकी २५ टक्के त्यांना बांधुन दयायचे आहे ते असे करू नाही शकत. दुकानांच्या क्रमांकावर जाऊ नका. जितका ऐरीया त्यांना आपल्याला दयायचा आहे ते करारात लिहिलेले आहे. तेवढा त्यांना दयायचाच आहे. आजपर्यंत त्याला कंम्पलिशन सर्टीफिकेट दिलेले नाही. जेव्हा ते याची मागणी करतील तेव्हा हे पाहिले जाईल. तुम्ही म्हणता तसे होणार नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तो बिचारा, ज्याची तुम्ही इतकी बाजु घेत आहात. दुकाने दिल्यानंतर त्यांनी भिंत बांधली आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-अजुन पर्यंत दुकाने दिली नाहीत त्यांना कंम्प्लीशन सर्टीफिकेट दिलेले नाही. आता पण प्रकरण प्रलंबित आहे. अजुन पर्यंत त्यांना सर्टीफिकेट दिलेले नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- तुम्ही त्यांना बेसमेंट फि दिले आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-हो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तो अधिकार आहे ना, त्या बिचा-याला? त्याने सनद काढण्यासाठी एवढी मेहनत केली असेल. रिव्हेन्यु खात्त्यात गेला असेल, काय माहित काय काय पापड त्यांनी लाटले असतील. त्यामुळे त्यांना तळघर मोफत दिले आहे. काय त्यावर आपला अधिकार नव्हता. बेसमेंटमधुन २५टक्के आपण घ्यायला नको पाहिजे होते?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-एकुण भुखंडापैकी २५ टक्के त्यांना बांधुन दयायचे आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपल्या फायदयाचा विचार का नाही करत?तळघरामधुन २५ टक्के फि जागा आपल्याला पण घ्या ना? जिथे ॲम्बासिया हॉटेल तयार झाले आहे, तिथे तुम्ही केवळ पार्किंगसाठी जागा घेतली. बांधकाम काहीच नाही? मग तुम्ही घेतले काय त्याच्याकडुन ? २५ टक्के जमीन देऊन टाकली.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-त्यावेळी आयुक्तांशी चर्चा झाली.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आयुक्तांनी केले असेल हे मी मानतो, हे बरोबर आहे की चुक आहे. आयुक्तांनी केले असेल, मागच्या नगररचनाकारांनी केले असेल, तुम्ही का चुक करत आहात, त्या आयुक्तांना बोलवा तुम्ही येथे?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-हे निर्णय घेण्याचा अधिकार पूर्ण आयुक्तांना आहे. ते ठरवतात काय घ्यायचे काय नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- तुमच्या समोर तर्क करुन मी पूर्ण शहरासमोर आणू इच्छितो की, शहरात काय चालु आहे. आयूक्तांनी केले असेल इतर कोणी केले असेल.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-आयुक्तांनी शिफारस केली होती की, आमच्या शहरात पार्किंगसाठी जागा नाही. आम्हाला ती जागा पाहिजे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- पार्किंगसाठी शंभर टक्के आपल्याकडे भुखंड होता ना?

--४९--

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-अजुन भुखंड आहे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-७५ टक्के देऊ २५ टक्के घेता?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-आज पण पुर्ण भुखंडावर इमारत नाही आहे. खुप सारा भुखंड मोकळा आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मोकळा आहे त्यातील २५ टक्के आपण घेत आहोत, ७५ टक्के त्यांना देत आहेत. मग त्याने आपल्याला दिले काय?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-जी जागा आपली नाही, त्यातुन त्याने दिले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आपली जागा कशी नव्हती?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-एस.डी.ओं नी.....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-एस.डी.ओ सोडा.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-ते म्हणतात तुम्हाला ही जागा दिलीच नाही. जोपण भुखंड दिला आहे तो हि जागा सोडुन दिली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-सोनावणे साहेब, तुम्ही इथे मागील आयुक्त, मागील नगररचनाकार यांचे कारण सांगता. मागील एस.डी.ओंनी इथे आधी असलेल्या अधिकारीना हे भुखंड हस्तांतरीत केले आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी त्याच प्रमाणे बोलत आहे की, हा भुखंड महापालिकेचा नाही असे एस.डी.ओंचे पत्र आहे. परंतु भुखंड आरक्षित आहे म्हणुन आपण २५ टक्के त्यांच्याकडुन घेतले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तुम्ही माझे म्हणणे ऐकाल? मागील एस.डी.ओ. आपल्या अधिकारींना २४३ भुखंड हस्तांतरीत करतो. नवे एस.डी. ओ येऊन जर म्हणतात की, यातील चार भुखंड तुमचे नाहीत. हजार चौरस फुट त्याला दिले. पाच हजार चौरस फुट याला दिले तेव्हा तुम्ही हे का नाही सांगत की, मागचे उपविभागिय अधिका-यांनी सर्वच्या सर्व प्लाट आम्हाला हस्तांतरीत केले आहे. नव्या एस.डी.ओंनी येऊन आपले भुखंड दुस-याला दिले आहे. कोर्टाचे आदेश असतील किंवा दुसरे काही असेल. इथे तुम्ही जुन्या अधिकारींना सोडुन नवे अधिकारी म्हणुन स्वतःला मोकळे करतात. आणि आपली सवलत पहातात.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-म्हणुनच मी म्हणतो आम्ही जिल्हाधिकारींना पत्र दिले आहे जे झाले त्यावर आम्ही काहीही करू शकत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आम्ही आजपर्यंत सोनावणे साहेबांची सही नाही पाहिली. आपण वांरवार म्हणता मी नाही केले, मी नाही केले. मी तुम्हाला नाही बोलत आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी असे बोलत नाही मी नगररचनाकाराच्या अधिकाराने उत्तर देतो की, जो नकाशा ९८ साली पास झाला त्या नकाशाला

महापालिका आता रदद करू शकत नाही. कारण की एकदा प्लॉन पास झाल्यावर त्यावर अंमलबजावणी करायची आहे.

--५०--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-ते बरोबर आहे की चुकीचे ते तर तुम्ही सांगा? ते पण तुम्ही बोलायला तयार नाही.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-आयुक्त साहेब यावर उत्तर देतील. तुम्ही जर म्हणता नगररचनाकाराने केले तर त्यांनी ते बरोबर केले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तिस-या साईटविषयी बोलु या?

मा.महापौर:-राजानीजी किती साईट आहेत अजुन?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-माझ्याकडे फक्त चार भुखंडाविषयी माहिती आहे. तुम्हाला जर त्यापेक्षा जर जास्त माहित असेल तर मला सांगा.

मा.महापौर:-मला कळले तर मी तुम्हाला सांगेन.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आभारी आहे. तिसरा भुखंड आहे ६१९ जो डिसहाऊससाठी नोटीफाईड होता. तुम्ही किती मीटरसाठी त्याचा प्लान पास केला.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):- मी आधीच सांगितले की, प्लॉटचे डिटेल्स माझ्याकडे नाहीत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मी सांगतो ना? मी जे सांगतो त्याची नोंद होत आहे. इतिवृतात ते येणार आहे. यापैकी एकही शब्द चुकीचा असेल तर मी आपले सर्व शब्द मागे घेईन. तुम्ही म्हणाल तर मी राजीनामा देईन. पण जर तुम्ही चुकीचे ठरलात तर तुम्ही राजीनामा दयाल का? किंवा एखादा जुना आयुक्त, नगररचनाकार राजीनामा देईल का? ज्यांनी या शहराचे चार मोठे भुखंड ज्यांचे क्षेत्रफळ तेरा हजार यार्ड होते. चार हजार चौरस फुट प्रमाणे त्याची ५२कोटी किंमत होते. ज्यांनी ऐवढे मोठे स्कॅन्डल या शहरात घडु दिले ते कोणी राजीनामा देतील? मी आव्हान देतो की, माझा एकही शब्द चुकीचा असला तर मी उदयापासुन महापालिकेत येणार नाही. राजीनामा देईन. त्या इमारतीसाठी तुम्ही वीस मीटर उंचीचे प्लान मंजुर केले आहे. तळमजला अधिक सहा मजले. मी श्री. भडकवाड साहेबांना म्हणुन म्हणतो की, तिथे जाऊन माप घेऊन या किती उंच ती इमारत गेली आहे. तुम्ही खाली दुकानांची परवानगी दिली आहे. तुम्ही ती का परवानगी दिली जर तो भुखंड बेघर लोकांसाठी आहे तर?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-बेघर लोकांना त्यांना जी जागा दयायची होती. एकुण भुखंडा पैकी दहा टक्के त्यांना दयायचे आहे. ते बांधुन देणार आहेत. जर चाळीस फुट रोड आहे तर आर.टी.ओ. रहिवाशी झोनमध्ये दुकानाची तर परवानगी देण्यास हरकत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जर तो शाळेसाठी आरक्षित असेल तर?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-खुप सारे भुखंड आपल्याकडे प्राथमिक शाळेसाठी वीस हजार मीटरचे आहेत. तर काय ऐवढी मोठी शाळा आपण बांधणार? जसे मुंबई मध्ये .....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- मी मुंबई नाही इथले बोलत आहे. सदर जागा डिसहाऊस साठी रिझर्व्ह होती. शासनाचा जी.आर. यासाठी आहे की,



आरक्षणाच्या हेतुचा फायदा लोकांना झाला पाहिजे. तुम्ही तिथे दुकाने बांधण्याची कशी परवानगी दिली?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी आधीच सांगितले की, तिथे काही आरक्षण नाही. ती जागा महापालिकेला मिळालीच नाही. ती खाजगी जमिन आहे. त्यात असे डेसिगनेशन दिले गेले आहे की, ही जागा या हेतुसाठी तुम्ही वापरू शकता.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-भुखंड क्र. कोणता आहे त्याचा? प्लॉट नं कोणता आहे त्या जमिनीचा?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-६१९ आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुम्ही त्याचे आरक्षण पाहिले आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-पाहिले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-काय आहे त्यात?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-६१९ खुप मोठा प्लॉट आहे. त्यात तीन-चार आरक्षण येतात. एक खेळाच्या मैदानासाठी आहे, शाळेसाठी आहे व बाकी रेसिडेंन्शीअल झोन साठी आहे. खुप मोठा भुखंड आहे तो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-६१९ हा डिसहाऊससाठी आरक्षित आहे असे नोटीफाईड आहे का?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी सांगतो ना, डि.पीत डेसिग्नेशन आहे. ती जागा आजपण महापालिकेची नाही, काल पण नव्हती. फक्त खेळाच्या मैदान व शाळेसाठी आरक्षण होते. तिथे आपण डिसहाऊसवाल्यांना घरे दिली. पर्यायी जागा दिली. ही जागा महापालिकेला हस्तातर केली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नाही केली ही जागा चला मी मानतो. तर मग तुम्ही फ्लॅटस का घेतात?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-ते तर घेऊ शकतो ना, शासन निर्णयाप्रमाणे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-हा शासन निर्णय कशाला लागु होतो.

मा.महापौरः-राजानीजी, इथे कोर्ट रूम बनवु नका. तुम्हाला जे बोलायचे आहे ते सर्व बोला ते नंतर तुम्हाला उत्त्तर देतील. तुम्ही एक प्रश्न विचारता ते उत्त्तर देतात असे किती वेळ चालेल?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-ते चुकीचे उत्त्तर देतात तर त्यांना मी क्रॉस नाही का करणार?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-महापौरजी, आमच्या मा. सदस्यांनी जी लक्षवेधी आणली आहे त्यावर ते चांगल्यात-हेने बोलत आहेत. परंतु आता खुप वेळ झाला आहे. मला हे म्हणायचे आहे की, त्या चारही भुखंडाच्या तपासणीसाठी एक



समिती नेमावी व चौकशी व्हावी. जर कोणी त्यात दोषी असेल तर त्याला सरळ घरी पाठवावे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मोरे साहेब, मी लवकर बोलतो तुमच्या वेळेचे भान ठेवतो.

मा. उपमहापौरः-राजानी साहेब मला बोलायचे आहे. सोनावणे साहेब तुम्ही आता म्हणालात त्या जागेवर आरक्षण नाही मग तुम्ही फ्लॅट कसे घेता? तिथे अग्रीमेंट केले आहे का? ते डिसहाऊस साठी नाही का?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-प्लॉटस् आहेत. डीसहाऊससाठी आहेत.

मा.उपमहापौरः-प्लॉटस् आहेत डीसहाऊससाठी.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-डिसहाऊससाठी आरक्षित नाही.

मा.उपमहापौरः-डिसहाऊससाठी नाही, मग तुम्ही ॲग्रीमेंन्ट कसे केले? याआधी चर्चा झाली आहे. जी.आर नुसार त्याठिकाणी त्या बिल्डरने ५० टक्के फ्लॅटस् डिसहाऊससाठी म्हणजे ३० चौरस मीटरचे बांधले पाहिजेत. तशी तुम्ही शर्त टाकली आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-होय.

मा.उपमहापौरः-मग ती कुठल्याआधारे टाकली.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-आधार जी.आरचाच आहे.

मा.उपमहापौरः-त्यानुसार तिथे बांधकाम चालु आहे का?३० चौरस मीटरचे फ्लॅट तिथे आहेत का? ५० टक्के ३० चौरस मीटरचे आहे का?

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-बांधकाम तिथे चालु आहे, अजुन पुर्ण झाले नाही. त्याचे प्लीन्थ अजुन झाले नाही. त्याचे उत्तर मी तुम्हाला तिथे जाऊन आल्यावर देईन.

मा.उपमहापौरः-याआधी सुध्दा याविषयावर आपली चर्चा झाली आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-साईड इन्स्पेक्शन ३० स्क्वेअर मीटर पेक्षा कमी आहे जास्त आहे पहावे लागेल. प्लान मध्ये तर ३० स्क्वेअर मीटर आहे.

मा.उपमहापौरः-म्हणजे डिसहाऊससाठी आहे हे तुम्ही मानता.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-डि.पीमध्ये डेसिग्नेशन डिसहाऊससाठी आहे. मार्केट आणि पार्किंग याच्यामध्ये एस.डी.ओंनी लिहुन दिले आहे की तुम्हाला जी जागा आरक्षणामध्ये दिली आहे. जे भुखंड हस्तांतरीत केले आहे त्यामध्ये ही जागा नाही. फक्त त्याच्याकडुन २५ टक्के....

मा.उपमहापौरः-तुम्ही एस.डी.ओ. काय बोलतात हे फक्त का सांगतात? स्वतःचे मत काय? महापालिकेचे मत काय? महापालिकेने तुम्हाला नियुक्त केले आहे.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-तेवढीच जागा आपल्याला दिली असती तर तुमचे म्हणणे मान्य करता आले असते. पण तो भुखंड ऐवढा मोठा आहे त्यांच्यामधील



काही भाग तुम्हाला दिला आहे. आणि जागा देण्याचे ज्याला अधिकार आहे. तो म्हणतो की तुम्हाला जी जागा दिली आहे ती ही जागा वगळुन दिली आहे. तेव्हा....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-सोनावणे साहेब, मला हे म्हणायचे आहे की, तो शासन निर्णय कोणाला लागु होतो.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-हे पहा डि.पी. दिले आहे. रिझर्व्हेशन आणि डेसिग्नेशन आरक्षित जागा आपल्याला ८७ मध्ये हस्तांतरीत केली आहे पण हे जे डेसिंग्नेशन झाले आहे डिसहाऊस साठी ती जागा आजपण आपल्याकडे नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जीआर तुम्हाला वाचुन दाखवु? महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीचे पालन करून महाराष्ट्र...

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांनी जीआर मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक यांना वाचुन दाखवण्यासाठी दिला.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-जीआर असा आहे की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. १०९४, दि.७एप्रिल १९९४ महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीचे पालन करून महाराष्ट्रातील सर्व शहरांचा विकास योजना शासनाने मंजुर केल्या आहेत. या मंजुर विकास योजनेतील बहुतांशिय आरक्षण सम्मुचित प्राधिकरण असुन त्या त्या नगरपरिषदेत विकसित करायच्या आहेत. तथापि नगरपरिषदांना सर्वच आरक्षणे विकसित करणे शक्य होत नाही अशा परिस्थितीत नागरिकांना ब-याच सार्वजनिक सुविधांपासुन वंचित रहावे लागते. विकास योजनेतील जास्तीत जास्त आरक्षणांचा विकास व्हावा यासाठी जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे. त्यासाठी आरक्षणासाठी असलेल्या समुचित प्राधिकरणामध्ये योग्य ते बदल होणे आणि जमिन मालकांना आरक्षणाचा विकास करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीकोनाने मला दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकांना महानगरपालिकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ न्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यांत येत आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-सोनावणे साहेब, हा जीआर आपल्यासाठी वाचुन दाखवला जात होता.

श्री.सोनावणे(नगररचनाकार):-मी वाचला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तिथे कुठे असे लिहिले आहे जे आपण सांगत आहात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-महाराष्ट्रातील बृहन्मुंबई सोडुन इतर सर्व नगरपरिषदेने, महानगरपालिकेने अस्तित्त्वातील विकास नियंत्रण नियमावली मधील संबधित तरतुदीमध्ये बदल करून खालील नियमाचा समावेश करण्यासाठी त्यामध्ये स्थानिक पातळीवर आवश्यक ते बदल करून .....

मा.महापौर :-राजानीजी, तुम्ही चारही भुखंडाविषयी स्पष्ट काय ते बोला. तुम्हाला काय पाहिजे आहे, ते सदनाला सांगा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-हो, मी सांगतो. मला हे म्हणायचे आहे. या महत्त्वपुर्ण विषयावर पाच दहा मिनिटे अजुन लागतील कृपया सर्वांनी सहकार्य दयावे. विषय शहराच्या हितासाठी आहे. पुढे आपल्या शहरातील आरक्षित भुखंड कसे सुरक्षित राहतील हे समजेल. इथे चारही भुखंडावर प्लॅन मंजुर केले. त्या



प्लान मधील तुम्हाला मी चुका सांगीतल्या. कुठेही टायटल होल्डरचे आपसात ताळमेळ नाही. वेगवेगळया साईटसाठी वास्तुविशारद आहेत. तीन ठिकाणी शिवलकर आहे एके ठिकाणी रूपाणी वास्तु विशारद आहे. चारही जणांचे ॲग्रीमेंट नाही. टायटल क्लीअर नाही आणि तरी तुम्ही प्लान मंजुर केलात. तर हे चुकीचे आहे. जे चुकीचे आहे तें सुधारले पाहिजे. व ज्यांनी चुकीचे केले आहे त्यास शिक्षा मिळाली पाहिजे. दुसरे असे की, सोनावणे साहेब तुम्ही जा, आता अतिक्रमणा विषयी आहे. तिथे प्लान मंजुर केला आहे १९३ वर केवळ १३ दुकानांसाठी एक लॉन्ड्री रूमसाठी, एक ऑफिस स्टाफ साठी तिथे हॉटेल तयार झाले आहे. अतिक्रमण विभाग काय करत आहे.

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-आजची महासभा बहुते या इमारतीच्या दुस-या मजल्यावर कोसळणार आहे. पुर्ण महासभा याविषयावरच चालेले.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-या इमारतीच्या दुस-या मजल्यावर महासभा चालेल. इथे इमारत तर नाही ना बनणार?

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-जसे नगररचनाकार साहेबांनी सांगितले शासनाच्या जी.आर. नुसार चारही भुखंड विकसित करण्याचे प्लान मंजुर केले आहेत आणि त्युतन काही टक्के जागा महापालिकेला मिळणार आहे. ते मिळायच्या अगोदर जो कोणी डेव्हलपर असेल त्याला प्लीन्थ नंतर पार्ट कंम्प्लीशन नंतर कंम्प्लीशन सर्टीफिकेट मिळेल. त्याआधी त्यांनी जोपण भाग महापालिकेला हस्तांतरीत करायचा आहे ते आम्ही घेऊ शकणार नाही. त्यामुळे त्याला ते सर्टीफिकेट मिळणार नाही. जेव्हा तशी परिस्थिती येईल, नगररचनाकार आम्हाला सांगतील की, यामधुन ऐवढा भाग घ्यायचा आहे व प्लान व्यतिरिक्त जे पण बांधकाम केले असेल त्यावर अतिक्रमण विभागातर्फे कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-यु आर दी डेप्युटी कमीशनर इन इनक्रोचमेंट डिपार्टमेंट. तुमच्या सोबत बीट इन्स्पेक्टर, बीट मुकादम यांची टिम आहे. इथे प्लानचे वायोलेशन झाले आहे. व हा भुखंड आपला होता. आपण कुणाला तरी दिला मेहरबानी केली. कारण की त्याने फायदा नाही घेतला पाहिजे. त्याने तिथे वायोलेशन केले आहे. तुम्हाला याबददल काही रिपोर्ट आला.

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-मी हेच सांगतो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुम्ही कंम्प्लीशन सर्टीफिकेट वगैरे सांगु नका ना? मी सांगतो वायोलेशन झाले.

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-मला रिपोर्ट दिला नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-का नाही दिला? तिथे हॉटेल चालु आहे की, नाही. कंम्प्लीशन सर्टीफिकेट शिवाय तिथे हॉटेल चालु आहे. हे बरोबर आहे.

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-मला काही कल्पना नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मला काही कल्पना नाही असे नका म्हणु. हॉटेल चालु आहे की नाही. चला आता दाखवु का? आताच मी आपल्याला दाखवु शकतो की तिथे हॉटेल चालु आहे.

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-हा हॉटेल चालु आहे.

--५५--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-कंम्प्लीशन सर्टीफिकेट शिवाय तिथे हॉटेल चालु होते. आणि प्लान हॉटेल साठी नाही. तरी खुला बोर्ड लागला आहे. ॲब्रोसिया हॉटेल लॉजिंग ॲन्ड बोर्डींग. रोज टिव्हीवर जाहिरात येते. तुमच्या लक्षात कसे नाही आले.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-बीट वाल्यांनी का नाही रिपोर्ट दिला?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-ते काय करत आहेत? निलंबित करा सर्वांना.
काही विपक्ष सदस्य :-निलंबिंत करा सर्वांना.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-निलंबित करा सर्वांना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आता काय करणार?

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-त्याचेच उत्तर देत आहे. येथे जे अतिक्रमण विभागाबाबत सांगितले गेले की, अतिक्रमण विभाग चटई क्षेत्राचे उल्लंघन डोळे मिटून पहात आहे. ते बिल्डरचे हित पहात आहेत. परंतु असे काही नाही आहे. आम्ही डोळे बंद केलेले नाहीत. आम्ही अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करू.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आज पर्यंत का नाही केले? तेथे हॉटेल चालु आहे. तेथे रस्त्याचे काम चालु आहे. सर्व लाईट लागलेल्या आहेत. पुर्ण विभागातील लोक तेथुन येतात जातात, तेथील तो मुख्य रस्ता आहे. तिथे कोण कोण, मी कुणाचे नाव घेणार नाही घाबरू नका. कोण कोण लोक त्या हॉटेलमध्ये येतात ते सुध्दा मला माहित आहे. तर परंतु तरीही त्या साईटवर आपण कारवाई केलेली नाही, आपण ते बांधकाम तोडले आहे का?

मा.सदस्य श्री. किशनानी गोदुमलः-तिथे चटई क्षेत्राचे उल्लंघन नाही झाले.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- माझे बंधु, माझे मित्र मी तुम्हाला नाही बोलत, जनरल आहे.
श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-चटई क्षेत्र उल्लंघनाचा जो काही भाग असेल तो आम्ही तोडु.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे.

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-मी माझा दृष्टीकोन श्री. नरेंद्र राजानी यांच्या समोर स्पष्टकरू इच्छितो. अतिक्रमण विभागाचा दृष्टीकोन मी स्पष्ट करू इच्छितो.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आयुक्त साहेब आपण या विषयाकडे लक्ष दया. आता जी घटना घडली ती आपण लक्षात ठेवा.
श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-मी अतिक्रमण विभागाचा दृष्टीकोन स्पष्ट करू इच्छिता, चटईक्षेत्र उल्लंघनाचा जो काही भाग असेल तो आम्ही निष्कासित करू.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-साईट क्र. ८० , तेथे जे गाळे मंजुर केले आहेत ते केवळ २८ आहेत ,आता किती गाळे तेथे बनविले गेले आहेत?

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):- मी आता तेच सांगितले.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-माझे ऐकुन घ्या, तेथे किती गाळे तयार केले आहेत? ते प्लानमध्ये आहेत का? ऐवढा मोठा फ्लॅट आपल्याला दिसला नाही का?

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-जे पण प्लान मध्ये नसेल, तेवढया चटईक्षेत्राचे बांधकाम निष्कासित केले जाईल. त्याच्यावर अतिक्रमण विभाग कारवाई करेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-नाही. मी म्हणेन येथे चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले आहे आपण त्यास निष्कासित कराल?

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-होय, करेन.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- फारच चांगले आहे. आजपर्यंत का नाही केले?

श्री.दत्ता भडकवाड(उपायुक्त अ.बा.वि.):-आजपर्यंत केले नाही, हे मी सांगतो आहे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आजपर्यंत का नाही केले? बीटवाले काय करत होते?

मा.महापौरः-आज पर्यंत आपली लक्षवेधी सुचना आली नव्हती म्हणुन केले नसेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आयुक्त साहेब, केव्हा निष्कासित होईल हे बांधकाम? कारवाई कधी करणार? मी जे बोलत आहे ते सत्य आहे त्यामध्ये एकही शब्द खोटा असेल, तेथे जर बिना कंम्प्लीऐशन सर्टीफिकेट हॉटेल चालत नसेल तर? तेथे जर रेसिडेंन्शीअल फ्लॅट तयार केला नसेल तर? जे कमर्शिअल वापरासाठी आरक्षित होते त्यावर रेसिडेंन्शीअल फ्लॅट तयार झाला नसेल तर मी उदयाच राजीनामा देईन. आपणापैकी कोणी या आव्हानास स्विकारत आहे का की उदया हे बांधकाम निष्कासित कराल?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-श्री. भडकवाड साहेब, ज्या बीट इन्स्पेक्टरनी....

मा.महापौरः-श्री. लांडेजी, एक मिनिट, माझे ऐकुन घ्या.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-कमाल आहे, काय ऐकुन घ्यायचे.

मा.महापौरः-श्री. नरेंद्र राजानी यांनी आपल्या लक्षवेधी व्दारे जेवढे काही आरोप अतिक्रमण विभाग व नगररचना विभागावर केले आहेत. मी आयुक्तांना सांगतो की, त्याचे त्यांनी उत्तर दयावे व ही चर्चा येथेच थांबवावी.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-कुणाला आमच्या प्लॉटची सनद दिली, व तो ती सनद घेऊन प्लान पास करण्यासाठी आला. आम्ही सेक्शन ८० चा कधी उल्लेख केला नाही. जिल्हाधिका-यांकडे कधीच अर्ज केला नाही. आम्ही ते होऊ

दिले फक्त सनद वेरिफिकेशन करून त्याचे प्लान पास करून दिले. जसे तो आमचा मुलगा नव्हता जसे की, एखादा माणुस आपला मुलगा एखादयाला देतो. त्याप्रमाणे हे झाले. व त्यांना प्लॉन मंजुर करून दिला. आरक्षित भुखंडाबाबतचा तो प्लान होता. याबाबत ज्या जी.आरचा वापर करण्यांत आला. तो जी.आर. असे म्हणतो की, सेक्शन ३७ वापरात आणला पाहिजे. सेक्शन ३७ नियोजन प्राधिकरणाने अमंलात आणला पाहिजे. संबंधित प्रशासक हे काही नियोजन



प्राधिकरण नव्हते. त्यामुळे या केसमध्ये सेक्शन ३७चे उल्लंघन झाले आहे. तिसरे असे की, प्लान पास करण्यासाठी आम्हास जी कागदपत्रे लागतात ती साधीशी कागदपत्रे आहेत. सनद आहे त्याचबरोबर प्लॉन आहे. डिमार्केशन आहे. त्याचबरोबर टायटल कार्ड आहे. त्याबरोबर टॅक्स पावती आहे. येथे सर्व पार्टनरर्सचे टायटल कार्ड नाही आहे. टॅक्स पावती नाही आहे. तरी प्लान पास केला आहे. तर हा प्लान कसा पास केला? तर येथे बरेचसे उल्लंघन झालेले आहे. ते मी पटवुन देऊ शकतो. प्लान पास करताना ब-याचशा बाबींचे उल्लंघन केले आहे. त्यांना शिक्षा झाली पाहिजे. ही माझी पहिली मागणी आहे आणि त्यांना कामावरून काढुन टाकले पाहिजे. व चौकशी चालु झाली पाहिजे. याप्रकरणात सभागृहाची चौकशी मला अभिप्रेत नाही आहे. हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व सिआयडी कडे सोपविण्यांत यावे अशी मी मागणी करत आहे. शेवटी तुम्हाला मी एक मजेशिर गोष्ट सांगतो. तिसरे असे की त्यात जितके वायोलेशन झाले आहे. तिथे मोठे हॉटेल चालु आहे. जर कुठे कोणा गरीबाच्या घराचे छप्पर पावसाळयात उडते. आणि तो ते जेव्हा बनवतो तेव्हा बीटवाले लोक इतके सतर्क असतात की तत्परतेने तेथे जाऊन पोहोचतात. आणि त्याला विचारतात तुम्ही महापालिकेची परवानगी घेतली आहे का? आणि इथे एवढे मोठे हॉटेल चालु आहे विना कंम्प्लीशन सर्टीफीकेट शिवाय आणि अतिक्रमण विभागाने ते हॉटेल अजुनपर्यंत पाहिले नाही. तिथे ऐवढी मोठी इमारत तयार झाली तुम्ही जरा इमारत पाहुन तर या. आपण साहेब ती इमारत पाहुन तर या इंदिरा गांधी मार्केटच्या बाजुला आरक्षित भुखंडावर किती गाळे, किती दुकाने बनली आहेत आणि त्यावर राहण्यासाठी फ्लॅट बनवले आहेत. टॅरीस फ्लॅट तिथे तयार झाला आहे त्या टेरीस फ्लॅटवर एक व्यक्ती राहील. म्हणजे एका व्यक्तीला फ्लॅट दिला तर तो व्यक्ती सरकार होणार. हे काय करत आहात? तेथील अतिक्रमण तोडले नाही जात आहे. तर माझी इथे मागणी आहे. हे जे पण अधिकारी, कर्मचारी यात सामील आहेत त्या सर्वांना निलंबित करावे.

दुसरे असे की, याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी. तिसरे असे की, या केसमध्ये जी रिलिज डिड होती. तो म्हणाला होता, त्याऐवजी मी दुकाने देईन काहीतरी देईन. त्या डिड वर दोन नगरसेवकांनी साक्षीदार म्हणुन सहया केल्या आहेत. दोन्ही नगरसेवक काळजीत असतील की, आमचे नाव येत आहे.परंतु ते तर येईलच? श्री. किशोर वनवारी व श्री ठाकुरदास बेहरानी यांनी साक्षीदार म्हणुन त्यावर सहया केल्या आहेत, रिलिज डिडवर. आपल्या त्यावर ज्या सहया आहेत. त्या बोगस आहेत काय? ते आपण पहा. परंतु आपल्या त्यावर स्वाक्ष-या आहेत. या चारही प्लॉटचे जे कागदपत्र आहेत ते आपण तात्त्काळ सिल करावेत. येथुन कुणालाही हलू देऊ नयेत. कागदपत्र हलु देऊ नयेत. या शहरामधुन शेकडो प्लानची कागदपत्रे गायब झाली आहेत. बिल्डरची इमारतीची पी.सी. सुध्दा मिळत नाही. जवळ जवळ पाचशे पी.सी या शहरातुन गायब झाल्या होत्त्या. जेव्हा महानगरपालिका नव्याने स्थापन झाली होती तेव्हा पाचशे पी.सी गायब झाल्या होत्त्या. या चारही पी.सी. गायब होतील त्यातील कागदपत्रे काढुन घेतली जातील. तोडली जातील म्हणुन आपण तात्त्काळ हे कागदपत्र आपल्या ताब्यात घ्या व आपल्या प्रमाणिकपणाचा पुरावा देऊन नविन आयुक्त म्हणुन या शहरास न्याय दया. व हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व सिआयडी विभागाकडे सुपूर्त करण्यात यावी.ज्यांची चुक आहे त्यांना शिक्षा करा. अतिक्रमण विभागाकडुन याबाबत आजपर्यंत काही

कारवाई करण्यांत आलेली नाही. उदयाच्या उदया आपण त्यावर कारवाई करू शकता. तेथे चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले आहे. प्लान प्रमाणे काम झालेले नाही. शहराच्या नविन विकास आराखड्याचे जे चार्टर आहेत. त्याचे पृष्ठ क्र. १५४ वर, श्री. भडकवाड व श्री. सोनावणे आपण लक्ष देत आहात ना?मी वाचुन दाखवतो. डिलिंग विथ दि अनअॅथोराईज्ड कंन्स्ट्रक्शन इन उल्हासनगर दि पॉइंट नं. १ॲण्ड पॉइंट २. त्यातील परिच्छेदातील काही भाग जास्त वेळ न घेता मी वाचुन दाखवितो. हाऊअेव्हर दी म्युनिसिपल कार्पोरेशन शुल्ड टेक. सिरियस व्हयु, पक्का कंन्स्ट्रक्शनस् दॅट अ कमअप ॲट दि साईटस् रिझर्व्हड् फार दि



पब्लीक परपझ रिझर्व्हेशन ॲन्ड रोडस् ॲन्ड इनिशिऐट ॲक्शन्स पुल डाऊन सच कंन्स्ट्रकशन शुड बी गीवन टॉप प्रीऑरिटी. आपण सर्वांनी जी सात वाजेची वेळ निश्चित करून दिली होती, तिचे मी थोडे उल्लंघन केले आहे. त्याबददल मला क्षमा करा. परंतु मी शहराच्या हितासाठी भांडत आहे. कोणा एका व्यक्तीचा हा विषय नाही मी कोणाच्याही विरोधात बोलत नाही. जे शहरामध्ये घडत आहे त्याच्याविरूध्द मी बोलत आहे. त्यासाठी ही लढाई आहे. व त्या लढाईसाठी आपण येथे रिझल्ट दिला नाही तर ही लढाई शहराच्या बाहेर फैलावेल. विधानसभेमध्ये यावर आवाज उठविला जाईल. त्यानंतर जे परिणाम होतील ते यापेक्षाही गंभीर व भयंकर स्वरुपाचे असतील. आयुक्त साहेब, बी.पी.एम.सी ॲक्ट मधील तरतूदीनुसार आपल्या स्तरावर जी कार्यवाही व्हायला हवी त्याबाबत मी आपणांस एक पत्र सुध्दा लिहीले आहे. तुम्ही आम्हास त्याबाबत सहकार्य करायला हवे. आपण बाहेरच्या व्यक्तीस सहकार्य करायला नको. आमच्यामधील कुणी एखादी व्यक्ती यापुस्तकामधील तरतुदीच्या बाहेरील जर मदत मागत असेल, तर तुम्ही त्यास स्पष्ट पणे नकार दया. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तावडतोब कार्यवाही करा, अशी माझी मागणी आहे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः</u>-मा. महापौरजी, ..............................

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः</u>-आयूक्त साहेबांचे निवेदन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>- मा. महापौर साहेबांनी मला बोलण्यास परवानगी दिलेली आहे. राजानी साहेब आता तुम्ही खाली बसा.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः</u>-श्री. किशोर मर्यादा सांभाळुन वागा.

यावेळी सत्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-एक तासापासुन आम्ही आपले ऐकुन घेत आहोत. आम्ही पाच मिनिटे बोलत आहोत तर आपणांस त्रास होत आहे? मा. महापौरजी यांनी एकच गोष्ट शंभर-शंभर वेळा सांगितली आम्ही ते ऐकुन घेतले. त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले, हे सर्व प्लान १९९८मध्ये मंजुर झालेले आहेत. त्यावेळी कुणाची सत्ता होती?

यावेळी पुन्हा सत्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः</u>- हे सर्व प्लान २०००मध्ये पास झालेले आहेत. दि. ६.३.२०००, दि.६.४.२०००.....

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मध्ये कुणी बोलले नाही तर बरे होईल.

मा.महापौरः-श्री. रजानीजी, आपण बोलला आहात, आता त्यांना बोलु दया.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-बिचारे, पाच मिनिटे सुध्दा माझे ऐकुन घेऊ शकत नाही. काय त्रास होतोय कुणास ठाऊक?

मा.सदस्य श्री. नरेंद्र रजानीः-मा.महापौरजी, मला उत्तर देण्यचा अधिकार आहे.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-एक तासापासुन नाही मिळाले का उत्तर, आणखी पाहिजे का उत्तर? तर १९९८मध्ये प्लान मंजुर झाले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, यापुर्वीच्या नगररचनाकारांनी प्लान मंजुर केले. हे सुध्दा त्यांनी सांगितले की, नविन जीआर आले आहेत. सुधारणा झाल्या. त्यानंतर बी.पी.एम.सी. ॲक्टनुसार हे प्लान पास झालेले आहेत. २५ टक्के, वीस टक्के जेवढी काही मिळकत आहे. त्या हिशोबानुसार त्यास ती मिळकत महापालिकेस दयायची आहे. तर हा प्रस्ताव महापालिकेच्या फायदयाचा आहे. श्रीआरडीशिंदे साहेब, आयुक्त असताना आमच्या उपमहापौरांनी इंदिरागांधी भाजी मार्केटच्या बाजुच्या जागेविषयीच्या मुदयाबाबत आवाज उठविला होता. त्यावेळी आयुक्तांनी असे सांगितले होते की, एकतर आमच्या महापालिकेची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. जर कुणी मालक रिझर्व्हेशन मधील मालमत्तेची देखभाल करत असेल, याबाबत तरतुद सुध्दा आहे की, आपण त्याजागेवरील बांधकामाचा प्लॅन मंजुर करू शकतो. त्यानंतर त्यांच्याकडुन ती मिळकत आपण घेऊ शकतो. महापालिकेची आर्थिकस्थिती सुधारेल. आपण ती मिळकत विकु शकतो, भाडयाने सुध्दा देऊ शकतो. श्री. शिंदे साहेबांनी सुध्दा म्हंटले होते की, आपण भाडयाने सुध्दा देऊ शकतो. ती मिळकत विकु सुध्दा शकतो त्यामुळे महापालिकेची आर्थिकस्थिती सुधारेल. श्री. भडकवाड यांनी जे भाषण केले त्यात त्यांनी सांगितले की, आम्ही त्यांना कंम्प्लीशन सर्टीफिकेट तोपर्यंत देणार नाही जोपर्यंत, अग्रीमेंटमध्ये त्यांच्याकडे जेवढी मिळकत आहे, अग्रीमेंट करण्यासाठी स्थायी समितीच्या दोन सदस्यांची स्वाक्षरी लागते. ती स्वाक्षरी करण्यासाठी आम्ही कुणाला विचारायला जाणर नाही की, महापालिकेच्या फायदयासाठी यांच्या ॲग्रीमेंटवर सही करू का? जर २० टक्के किंवा २५ टक्के मिळकत तो ठेकेदार महापालिकेला देणार आहे. महापालिकेने बी.पी.एम. सी ॲक्ट नुसार जो प्लान मंजुर केला आहे. व जो प्लॉट रिझर्व्हेशन मध्ये आहे. तर तो पास होऊ शकतो. तर महापालिकेत जेवढी काही मिळकत मिळणार आहे ती महापालिकेने लवकरात लवकर आपल्या ताब्यात घेतली पाहिजे. असे आम्हाला सुध्दा वाटते. हे झाले एक आणि दुसरे असे की, ९८ पासुन ते २००१ पर्यंत ज्या इमारती तयार झाल्या त्याबाबत आज मुददा का उपस्थित झाला. त्यामागे काय कारण आहे? काय पाहिजे? मी सविस्तर बोलणार नाही. मी त्यांना सांगेन ज्यांनी बांधकामे केली आहेत. जरा यांचे सुध्दा समाधान करा. ही जी अचानक लक्षवेधी आली आहे. त्याऐवजी प्रश्न आला असता तर अधिकारी अभ्यास करून आले असते. राजकीय पक्षाचे लोक अभ्यास करून आले असते. यांनी दोन तासापुर्वी जी लक्षवेधी सुचना दिली. त्यामुळे अधिकारीगण अभ्यास करू शकले नाहीत. जर याबाबत प्रश्न दिला असता तर अधिकारीगण त्यावर अभ्यास करून आले असते. त्यांना वेळ मिळाला नाही. त्यानंतर जे प्लान यापुर्वीच मंजुर झालेले आहेत, श्री. सोनावणे साहेब यांनी सांगितले की, यापुर्वी जे प्लान मंजुर झालेले आहेत ते मी रदद करू शकत नाही. श्री. चंद्रशेखर साहेबांनी जे निर्णय घेतलेले आहेत ते श्री. पोखरकर साहेब बदलु शकत नाहीत. त्यांनी जर पर्यायी जागा दिल्या तर हे तोडु शकत नाहीत. त्यावेळच्या आयुक्तांनी त्यावेळी जो निर्णय घेतला होता. , त्यांनी, श्री. शिंदे साहेबांनी येथे भाषण केले होते. त्यात त्यांनी म्हंटले होते की, आम्हाला २५ टक्के मिळकत मिळणार आहे. आमचा फायदा होणार आहे. यासर्व गोष्टी लक्षात घेता,निवडुन आलेले जे लोक आहेत. त्यांच्या

कार्यकालावधीतच या मिळकती घ्यायच्या आहेत. त्या आम्ही ताब्यात घ्यायच्या आहेत. त्यामुळे महापालिकेचाही फायदा होईल व आमच्या मा. सदस्यांचेही समाधान होईल. आता जी एक तासाची आमची वेळ खर्ची झाली, त्याचा काही ना काही महापालिकेचा फायदा झाला पाहिजे. व आमचे जे मा.सदस्य मागणी करत आहेत त्याच्यावर विचार झाला पाहिजे. व महापालिकेला ज्या मिळकती ताब्यात घ्यायच्या आहेत. त्या त्वरीत ताब्यात घेतल्या गेल्या पाहिजेत. जयहिंद.

--६०--

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-आयुक्त साहेब,मला माझ्या लक्षवेधीचे उत्तर मिळाले पाहिजे.

<u>मा.महापौर:</u>-तुम्हाला काय उत्तर पाहिजे? तुम्ही तुमच्या लक्षवेधीमध्ये सर्वसाधारण मुदयांवर बोलत आहात. आयुक्त तुम्हाला उत्तर देत आहेत. त्यांना उत्तर देऊ दया.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u> माझी काही हरकत नाही.

<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर.पोखरकर)</u> :-मा.महापौर, सन्माननिय सदस्य, आपणांसर्वांना माहिती आहेच, लक्षवेधी सुचना सभेचे कामकाज सुरू होण्याच्या दोन तास अगोदर दिली जाते. व लक्षवेधी सुचनेवर अधिकारीगण काही माहिती गोळा करतात व ती सभागृहामध्ये सादर करतात. त्यावेळी सन्माननिय सदस्य सुध्दा आपले मत मांडत असतात. मला आपणांस हे सांगायचे आहे की, जी लक्षवेधी असते ती सभागृहाचे व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी असते आणि माझ्यामते लक्षवेधी सुचना सर्वसाधारण धोरणाबाबत असते. वैयक्तिक प्रकरणांबाबत नसते. कोणतीही लक्षवेधी सुचना वैयक्कि स्वरूपाची नसते तर वैयक्तिक स्वरूपाबाबत काही कार्यप्रणाली आहे. त्यानुसार ती सभागृहासमोर मांडली जाते. वैयक्तिकरित्त्या अर्ज देऊन त्यावर चौकशी सुध्दा होते. काल्पनिक प्रश्नावर तर लक्षवेधी बिल्कुल मांडली जात नाही. आणि माझ्यामते आपले जे सन्माननिय सदस्य आहेत, त्यांची जी तक्रार आहे. त्यात माझ्या निदर्शनास जे आले आहे त्यानुसार काही राखीव भुखंड आहेत. त्यांचा योग्यप्रकारे वापर होत नाही. तर त्याबाबत मी ऐवढेच सांगु इच्छितो की, हे पुर्ण प्रकरण १९९८चे आहे. दोन-चार वर्ष होऊन गेली आहेत. त्याचा पुर्ण अभ्यास करावा लागेल. व मी जरूर त्याचा पुर्ण अभ्यास करेन व त्यानंतरच मी काही ठोस निर्णय घेऊ शकेन. ऐवढेच मी यावेळेला सांगु शकेन.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:</u>-आयुक्त साहेब, प्लानचे जे उल्लंघन झाले आहे, त्यासाठी कुठल्याही प्रकारची चौकशी किंवा अभ्यास करण्याची आवश्यकता नाही. प्लानचे जे उल्लंघन झाले आहे त्याबाबत त्वरीत कार्यवाही झाली पाहिजे.

<u>मा.महापौर:</u>-ते यासर्व प्रकरणांचा अभ्यास करतील व कार्यवाही करतील.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- </u>मी म्हणतो की, हा धोरणात्त्मक मुददा आहे. राखीव भुखंडावर कोणत्त्याप्रकारे प्लॅान मंजुर करायचे? ही काही वैयक्तिक स्वरूपाची केस नाही. एका नाल्याची केस वैयक्तिक स्चरूपाची होऊ शकते. व शहरातील राखीव भुखंडांचे प्रकरण आपण वैयक्तिक मानता? तिथे अनाधिकृत विभागाने काहीच कारवाई केलेली नाही. बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला नसतानाही तेथे हॉटेल वगैरे चालु आहे. त्याबददल मी विचारत आहे. याबददल आपण काही म्हणालात काय?राखीव भुखंडावरील प्लानच्या उल्लंघनावर अतिक्रमण विभागाने काहीही कार्यवाही केली नाही. अतिक्रमण विभागाने काही कार्यवाही केली नाही.

मा.महापौरः-रजानीजी, त्यांनी सांगितले आहे की, ते सर्व प्रकरणांचा अभ्यास करतील व त्यानंतर कार्यवाही करतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र रजानीः-मी अतिक्रमणाबाबत बोलत आहेत.

मा.महापौरः-उदया ते अभ्यास करतील व आदेश जारी करतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र रजानीः-ठिक आहे.

--६१--

मा.सचिवः-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १९.५.२००१ रोजीचे सर्वसाधारण महासभेचे इतिवृत कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौरजी, पृष्ठ क्र.२१ वर प्रश्नोत्त्तराची जी नोंद आलेली आहे. आमच्या मा.विरोधी पक्ष नेत्त्यांनी आपणांस प्रश्न विचारला होता की,शिक्षण मंडळाची निवडणुक केव्हा होईल? त्याबाबत पृष्ठ क्र. २१ वर महापौरांच्या नावाने अशी नोंद आली आहे की, जुन महिन्यात निवडणुका घेऊया. परंतु दुर्भाग्याने ते चुकीचे असल्याचे सिध्द झाले आहे. निवडणुका घ्यायच्या तर त्याबाबत घोषणा तर झाली पाहिजे ना? निवडणुकांचा कार्यक्रम तर जाहिर झाला पाहिजे ना?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- त्यावेळेला मी म्हंटले होते की, आपला एक महिना कधी पुर्ण होणार नाही. दोन वर्षापुर्वी सुध्दा आपण एक महिन्यानी निवडणुका घेऊ असे म्हंटले होते. व आज ते सिध्द झाले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-यासाठी आपण खोटे बोलत आहात असे मी म्हणत नाही. आपण जे आश्वासन देता त्याची पुर्तता करत नाहीत. त्यामुळे आम्हाला असे दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे. ठिक आहे.

यावेळी पुन्हा सत्त्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-नाही. नाही. महापौरजी, सभागृह नेता नेहमीच या सभेस तमाशाचे स्वरूप आणतात.

यावेळी पुन्हा सत्त्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- जर सभागृह नेत्त्यांचे हे म्हणणे असेल की, चुकीने म्हंटले आहे. तर पृष्ठ क्र. २२ पहा. पृष्ठ क्र. २२वर आपल्याच नावाने नोंद आहे की, जुन महिन्यामध्ये निवडणुका घेऊ, येणा-या महिन्यामध्ये, असे आपण मागच्या महिन्यामध्ये म्हंटला होतात. तर सभागृहनेत्त्यांना सांगावे की, त्यांनी अभ्यास करून यावे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौर साहेब, मी प्रश्न दिला होता त्यास सहा महिने झाले. त्याच्या उत्त्तरात दोन महिन्यात निवडणुका घेऊ ०असे लिहिले होते. चार महिने जास्त झाले आहेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-पृष्ठ क्र. ४५वर महापौर चषकाबाबतच्या चौकशीबाबत आपण जे सांगीतले होते की, सात दिवसाच्या आत खर्चाचे विवरण दिले जाईल. परंतु आपण ते १० दिवसांनंतर दिले आहे. आम्ही जे तीन लाख चाळीस हजार च्या चौकशीबाबत सांगितले होते, त्यात आपण एक लाख सत्तर हजार आणखी समाविष्ट करून मंजुर केले आहेत. आम्ही म्हंटले होते की, तीन लाख चाळीस हजारबाबत आमची हरकत आहे. तेव्हा आपण म्हणाला होतात की, त्याची पुर्ण चौकशी केली जाईल. व सात दिवसामध्ये आपणांस त्याचा अहवाल दिला जाईल. परंतु २५ दिवसांनंतर आम्हाला अहवाल दिला गेला



आहे. तो अहवाल सुध्दा जबाबदार अधिका-याचा नाही व त्यात अहवालात पुष्कळ चुका आहेत. मी मा. सचिव साहेबांना विचारू इच्छितो की, हा जो अहवाल आहे महापौरचषकाचा तो आपल्याकडे आहे का? त्यात असे लिहिले आहे की,आणखी ८८ संघांची निवड केली गेली त्यामुळे १२८ संघ झाले. त्यासाठी एक लाख सत्तर हजार जे जास्त खर्च झाले. त्यासाठी ५(२)(२)अन्वये मा.आयुक्त यांना खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. मी आयुक्त साहेबांना विचारू इच्छितो की, असे आहे का? जसे तीन लाख चाळीस हजारबाबत आम्ही म्हंटले होते चौकशी करा म्हणुन. तीन लाख चाळीस हजार बाबत त्यांनी चौकशी केली नाही. तीन लाख चाळीस हजाराचा खर्च तर आहेच आणखी एक लाख सत्तर हजार आणखी खर्च झाला आहे. असे आम्हाला उत्तर दिले गेले आहे. त्यात असे लिहिले आहे की, प्रकरण ५(२)(२)अन्वये मा.आयुक्त यांना खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत त्यानुसार एक लाख सत्तर हजार आणखी मंजुर केले आहेत. हे लेखी उत्तर येथे आले आहे. त्याचबरोबर येथे असा गोलमाल का आहे हे मी आपणांस सांगु इच्छितो की, ज्या महासभेत महापौर चषकासाठी जो ठराव झाला होता, महासभा ठराव क्र. २३ तो महासभा ठराव क्र. २३ कसा मंजुर झाला होता? त्याचे आम्हाला उत्तर पाहिजे. हे जे लिहिले आहे त्याप्रमाणे महासभेमध्ये तो जो ठराव मंजुर झाला होता. तो कोणत्त्याप्रकारे मंजुर झाला होता. बहुमताने झाला होता की, एकमताने? सचिव साहेब आपण सांगा. मी सांगतो माझ्याकडे आहे.

मा.महापौरः-ठराव कोणत्त्या तारखेचा आहे?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-ठराव बहुमताने समंत झाला आहे. परंतु येथे सारासार चुकीचे लिहिले आहे. एकमताने मंजुर झाल्याचे लिहिले आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- महापौरजी, यासाठीच तर आम्ही म्हणतो की इतिवृत्त इंग्रजित दया. आम्ही पण त्यावर अभ्यास करू.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-या महासभेमध्ये जे ठराव होतात ते बहुमताने होतात की एकमताने त्याकडे सुध्दा लक्ष नाही? आम्ही बहुमताने ठराव पारीत केला होता. त्यावर मतदान घेतले होते. व चौकशी समिती नेमण्यास सांगितले होते.

मा.महापौरः-श्री. महाडिकजी ती चुक होऊ शकते. जाणीवपुर्वक केलेले नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-ऐवढी मोठी चुक होऊ शकत नाही. कारण की, ज्या ठरावाबाबत आम्ही हरकत घेतली होती, तीन लाख चाळीस हजाराच्या खर्चास आम्ही हरकत घेतली होती.

मा.महापौरः-क्लरिकल मिस्टेक आहे. त्यात काय?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:- आम्ही बहुमताने ठराव पारीत केला होता, व आपण आम्हाला जे कागदपत्र देता त्यावर एकमताने असे लिहिले आहे.

मा.महापौर:-ती क्लरिकल मिस्टेक आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, पृष्ठ क्र.११ वर अशी नोंद आली आहे की, आपण म्हणता महासभेमध्ये जे निर्णय घेतले जातात त्याची अंमलबजावणी प्रशासनास करायची आहे. जर त्यामध्ये प्रशासन कोणत्त्याही प्रकारची दिरंगाई करत असेल किंवा कोणत्त्याही निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर संबंधित अधिका-यावर कारवाई केली जाईल. त्याला दंडीत केले जाईल. असा आपला आदेश आहे. त्याची मी आपणांस आठवण करून देऊ



इच्छितो की, दोन महिन्यापुर्वी प्रभाग समित्त्यांची निवडणुक झाली होती त्याचे ठरावामध्ये असे लिहिले होते की, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता ठरावाची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्या ठरावानुसार जर प्रभाग समित्त्या स्थापन झाल्या असतील तर त्याची पहिली सभा बोलाविण्याचा अधिकार आपणांस आहे. प्रभाग समित्त्यांचे जे प्रारूप नियम तयार केले आहेत त्यामध्ये असे लिहिले आहे की, प्रभाग समित्त्यांची पहिली सभा महापौर बोलावतील. आज दोन महिने झाले ठराव होऊन परंतु आजपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. असे का होत आहे? या महापालिकेत जे ठराव पारीत होतात त्याची अंमलबजावणी आपण सुध्दा करू शकत नाहीत. प्रशासनास दोष देतात. का असे होत आहे? प्रारूप नियमांमध्ये पहिला नियम असा होता की, प्रभाग समित्त्यांची पहिली सभा महापौर बोलावतील. त्याच ठरावामध्ये लिहिले होते की, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता ठरावाची अंमलबजावणी होईल. त्यास आज तीन महिने होत आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-विरोधी पक्षांनी हरकत घेतली होती म्हणुन नाही केले.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-ठराव पारीत झालेला आहे. लहान मुलांसारख्या हरकती करू नका.

मा.महापौर:-महाडिकजी, प्रभाग समित्त्यांची सभा बोलवण्यासाठी सहमती घेण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:- आम्ही असा ठराव पारीत केला आहे की, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहाता सदर ठरावाची अंमलबजावणी केली जाईल. तर मग त्याची अंमलबजावणी का होत नाही. आपण म्हणता की, ठरावाची अंमलबजावणी प्रशासन करत नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- जोपर्यंत सभापतींसाठी दालने तयार होत नाहीत. प्रभाग कार्यालय तयार होत नाहीत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-तर मग ठरावामध्ये असे का लिहिले?

यावेळी पुन्हा सत्त्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-ठराव शासनाकडे पाठवा आणि शासनास सांगा की आम्ही अशा प्रकारचा ठराव केला आहे. आमच्या महाराष्ट्र शासनाने येथे किती पत्र पाठविली आहेत. प्रभाग समित्त्या स्थापन झाल्या पाहिजेत म्हणुन?महाराष्ट्रात सगळीकडे प्रभाग समित्त्या स्थापन झालेल्या आहेत. फक्त

येथेच नाहीत. व महाराष्ट्र शासनाने येथे अनेक वेळा स्मरणपत्रे पाठविली आहेत की, उल्हासनगर महानगरपालिकेत अद्याप प्रभाग समित्त्या का स्थापन झाल्या नाहीत? त्यानंतर आम्ही आवाज उठविल्यानंतर महापौरांनी प्रभाग समित्त्या नेमल्या परंतु प्रभाग समित्त्या झाल्यानंतरही त्यांचे कामकाज अद्याप चालु झाले नाहीत. व ठराव पारीत झाल्यानंतर जी पहिली सभा महापौरांनी बोलावयाची असते. ती अद्याप बोलावली गेली नाही. तरी कृपया या ठरावाबाबत आपण शासनाकडे पत्र पाठवा.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.महापौरजी,........



मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-तुम्ही तर बोलु शकता, आम्हाला तर बोलु दया. महापौर ठरावाची अंमलबजावणी करण्यास सक्षम आहेत म्हणुन हॉकर्सच्या ठरावाची सुध्दा अर्धवट अंमलबजावणी केली आहे. असे किती तरी ठराव आहेत त्याची अंमलबजावणी होत नाही. आपल्या प्रशासनावर आपले नियंत्रण नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- इतिवृत कायम करण्याचा विषय आहे. रात्रीचे आठ वाजत आहेत.

मा.महापौरः-श्री. लांडेजी, इतिवृत कायम करण्याचा विषय आहे, आपण इतिवृतांताबाबत बोला.

यावेळी पुन्हा सत्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-ठरावाची अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-इतिवृत्त कायम करणे म्हणजे इतिवृत्तांतात ज्याकाही क्लेरिकल मिस्टेक्स इतिवृतांतात आल्या असतील त्यांची सुधारणा करणे त्याच्यावर चर्चा करणेचा विषय नाही. रात्रीचे आठ वाजत आहेत लोकांना आपल्या घरी जायचे आहे.

मा.महापौरः-इतिवृत्त कायम झाल्याचे समजायचे?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-मा.महापौरजी, क्लार्क लोक रात्री आठ-आठ वाजे पर्यंत महासभेत बसुन इतिवृत्त लिहितात व हे लोक त्यांच्या चुका काढतात हे चुकीचे आहे.

मा.महापौरः-शिक्षण मंडळाची निवडणुक आम्ही लवकरच घेणार आहोत. मी आपणांस सांगितले होते. जुन महिन्यात घेऊ म्हणुन. जुन महिन्यामध्ये त्याची नोटिफीकेशन आम्ही काढु.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.महापौरजी, इतिवृतांतावर इतकी चर्चा करण्याचे गरजच नाही. प्रत्येक मुदयावर ऐवढी चर्चा करतात. रात्रीचे आठ वाजले आहेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-एक लाख सत्तर हजार जादा खर्चास मान्यता देऊ शकता का? महापौर चषक क्रिकेट सामन्यांसाठी तीन लाख चाळीस हजार खर्च झाला होता. त्यावर आम्ही या सभागृहात हरकत घेतली होती. त्यानंतर हा ठराव बहुमताने पारित झाला होता. त्याबाबत चौकशी करा म्हणुन

आम्ही सांगितले होते. त्याबाबत आपण सांगितले होते की, सात दिवसामध्ये आम्ही खर्चाचा अहवाल देऊ. या अहवालामध्ये तीन लाख चाळीस हजार खर्च तर मंजुर केला आहेच. त्याबरोबर एका लाख सत्तर हजार आणखी खर्च जोडुन, पाच लाख सात हजार होतात. अशाप्रकारे एक लाख सत्तर हजारास देखिल मान्यता दिली आहे. ५(२)(२) अन्वये आयुक्तांना अधिकार आहेत त्यानुसार आम्ही या एक लाख सत्तर हजार खर्चासही मान्यता दिली आहे. हे खरे आहे का?

मा.महापौरः-महाडिकजी, महापौर चषक आता होणार नाही. मी आयुक्तांना.........

--६५--

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-क्रिकेट संघाकडुन दोनशे-दोनशे रूपये प्रवेश फी घेण्यात आली आहे. त्याचे काय?

मा.महापौरः-महाडिकजी, मी आयुक्तांना सांगतो की, मागील जो खर्च झाला आहे त्याची चौकशी केली जावी.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.महापौरजी, इतिवृत्त कायम करणे म्हणजे मागच्या महासभेत आम्ही जे काही बोललो आहोत त्याच्या व्यतिरिक्त जर काही इतिवृतांतात आले असेल तर ते काढुन टाकले जावे. जसेकी महाडिक यांनी सांगितले की ठराव बहुमताने पारित झाला होता की एकमताने यावर निर्णय घेऊन त्याप्रमाणे शब्द काढुन टाकले जावेत. क्लेरिकल मिस्टेक्स साठी जर सर्वांना जबाबदार धरत असाल, रात्रीचे आठ वाजेपर्यंत आमचा क्लेरिकल स्टाफ महासभेचे इतिवृत लिहिण्यासाठी बसला आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-त्यांना घरी जाऊ दया ना. कोणी थांबायला सांगितले आहे. जरूरी नाही थांबायची.

यावेळी मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक व श्री. सुभाष मनसुलकर हे जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-हे आयुक्तांचे काम आहे. महिन्यातुन एकदा महासभा होते.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः- सभागृहाची वेळ घेण्याचा हा प्रकार आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी- मागच्यावर्षाची गोष्ट हे आता करत आहेत.

मा.महापौरः-महाडिकजी, आपणांस काय आश्वासन पाहिजे ते आयुक्तांकडुन घ्या.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-५(२) (२)अन्वये एक लाख सत्तर हजार देण्याचा अधिकार आहे का? स्थायी समितीत मंजुरी घेतली आहे का?जर असेल तर मा.स्थायी समिती सभापतींकडुन मी माहिती घेऊ इच्छितो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-एक वर्षापुर्वीचा मुददा कोणी उपस्थित करतो का?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आता मी याबाबत लेखी उत्तर मागतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- एक वर्षापुर्वीचा मुददा या सभेचा विषय नाही आहे. इतिवृत्त कायम करण्याचा हा विषय आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-इतिवृतांतात चुकीचे आले असेल त्यावर बोला.

मा.महापौर:-इतिवृत्त आपण कायम करत आहात ना?



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:- आम्ही महापौरांचा आदर करतो. आम्ही असे नाही म्हणत की, महापौर खोटारडे आहेत.

यावेळी मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक व श्री. सुभाष मनसुलकर हे जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:- तर मग मी आता बोलतो की, महापौर खोटारडे आहेत त्यांनी जे आश्वासन दिले होते त्याचे पालन केले नाही. जे इतिवृतांतात आले त्याची अंमलबजावणी झाली नाही. जर मी चुकीचे बोलत असेल तर आपण सांगा की, श्री. प्रकाश महाडिक चुकीचे बोलत आहेत. सांगा, जे बोलले गेले आहे त्याबददलच मी बोलत आहे. जे आश्वासन दिले त्याचे पालन केले जात नाही हेच आम्ही म्हणत आहोत.

मा.महापौर:-ठिक आहे ना. इतिवृत्त सर्व संमतीने कायम करत आहात की, मी त्यावर मतदान घेऊ?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-आम्ही दिलेल्या सुचनांचे पालन झाले पाहिजे.

मा.महापौर:-होईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- ५(२)(२)अन्वये या एक लाख सत्तर हजाराचे खर्चास मंजुरी देऊ शकतात काय? स्थायी समितीत हा ठराव पारीत झालेला नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-सभागृहनेता जे बोलत आहेत ते चुकीचे बोलत आहेत. त्याचा मी खुलासा करू इच्छितो की, तो स्थायी समितीचा विषय नाही. मी आठवण करून देतो की, तो क्रिडा समितीमध्ये जो ठराव पारीत होतो त्यास महासभेची मान्यता घ्यायची असते. स्थायी समितीमध्ये नाही. व यासाठी जे काही आहे ते या सभागृहास मंजुरी दयावी लागेल जर ५(२)(२)अन्वये मंजुरी दिली असेल तर स्थायी समिती त्यास मंजुरी देऊ शकत नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- तुम्ही ठरावाची अर्धवट अंमलबजावणी करतात. हो जो ठराव आहे तो तुमच्या हिताचा नसल्यामुळे, तुमच्या म्हणा किंवा तुमच्या पक्षाच्या किंवा तुमच्या सरकारच्या हिताचा नसल्यामुळे तुम्ही अंमलबजावणी केली नाही. परंतु हॉकर्स बाबत आपले स्वत:चे हितसंबंध असल्यामुळे त्या ठरावाची मात्र अर्धवट अंमलबजावणी केली आहे. आणि आज कमीत कमी दोनशे हॉकर्स रस्त्यावर उपाशी आहेत. आपण शहराचे प्रथम नागरिक आहात. ही आपली नैतिक जबाबदारी असली पाहिजे. ठरावाची जर अंमलबजावणी करायची झाली तर ती पुर्ण केली पाहिजे. तसेच प्रभाग समितीचा हा जो विषय

आला तेथे आपल्या पक्षाचे हित नाही. हे आपल्या लक्षात आल्यानंतर त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यास आपण तयार नाहीत. परंतु आता तिथे दोनशे ते अडिचशे हॉकर्स उपाशी मरत आहेत. आणि तुम्ही मात्र त्या ठरावाची अर्धवट अंमलबजावणी केली आहे. आणि तेथे जाऊन तुम्ही कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करता. आणि पोलिसांना तुम्ही आव्हान देता की, हॉकर्स तुमच्यावर दादागिरी करतात. खरे तर तुम्ही हॉकर्स वर दादागिरी करत आहात व दोनशे ते अडिचशे लोकांना उपाशी मारतात.

मा.महापौरः-कोण दादागिरी करत आहे?



मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-तुम्ही स्वतः मार्केटमध्ये गेला होतात.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-कसली दादागिरी केली?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आपण पोलिसांना बोलावले.

मा.महापौरः-पोलिस अगोदरपासुनच तेथे उपस्थित होते. नाही. नाही. आपले हे म्हणणे आहे की, आम्ही पोलिसांना बोलावले. पोलिस अगोदर पासुनच तेथे होते.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आमचे हे म्हणणे आहे की, ज्यामध्ये आपले हितसंबंध आहेत. त्याचीच अंमलबजावणी करता. ज्यामध्ये आपले हित नाही त्याची अंमलबजावणी करत नाहीत.

मा.महापौरः-कुठल्या बाजारात जाण्यासाठी मला आपल्याकडुन परवानगी पाहिजे काय? हे मी आपणांस विचारू इच्छितो.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आपण स्वतः पोलिसांना बोलावले होते.

मा.महापौरः-आपणांस असे वाटत असेल की कुठल्या बाजारात जाण्यासाठी मला आपल्या परवानगीची आवश्यकता आहे. तर आपले हे बोलणे चुकीचे आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आपण पोलिसांना चिथावणी देत आहात. हॉकर्स हॉकर्स असे आव्हान देत आहात.

मा.महापौरः-मी कुणालाही चेतावनी दिली नाही. मी तेथुन जात होतो. महापालिकेच्या प्रत्येक ठरावाची अंमलबजावणी होईल. मी इतिवृत्त कायम करण्यासाठी सादर करीत आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-हॉकर्सचा विषय कुठून आला. हा काय सभेचा विषय आहे का?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-मी ठरावाच्या अंमलबजावणी बाबत बोलत आहे.

मा.महापौरः-आपल्या हॉकर्सना महापालिकेने पर्यायी जागा दिलेली आहे. आपण त्यांना सांगा तेथे जाऊन धंदा व्यापार करा म्हणुन.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-अदयाप ते लोक तेथे उभे आहेत.

मा.महापौरः-याचा अर्थ ते लोक जाऊ इच्छित नाहीत?

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-हा सभेचा विषय आहे का महापौरजी? आपण इतिवृतांतावर मतदान घेत आहात ना?

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः- इतिवृतांतातुन ही चर्चा वगळुन टाका.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-नाही. नाही. कशी वगळणार? ठरावाची अंमलबजावणी करताना दोन्हीची अंमलबजावणी झाली पाहिजे.

--६८--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-हॉकर्स आमचे बंधु आहेत. आम्ही हॉकर्सच्या विरोधात नाहीत. आपण आमच्याशी येथे बोलता आणि दुसरीकडे उच्च न्यायालयात याचिका दाखल करतात.

यावेळी पुन्हा सत्ताधारी व विरोधी पक्षीय काही सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानीः-जर उच्च न्यायालयात जायचे होते तर मग इथे का बोलता?

मा.महापौरः- सदर इतिवृत्त सर्वानुमते जसे आहे तसे कायम करण्यांत येत आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-जागा देण्यास आम्ही वचनबध्द आहोत.

मा.सचिवः- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-मा.महापौरजी, हॉकर्सचे काय झाले? जागा देणार की, नाही?

मा.सचिवः-विषय क्र. ३. महापालिकेमध्ये निहित असलेल्या...

मा.महापौरः-मधुबन हॉटेल पासुन डी.टी. कॉलेजचा जो रोड आहे. आपण हॉकर्सना सांगा की, तेथे जाऊन धंदा व्यापार करा.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-महापौरजी, हा सभेचा विषय नाही. आपण विषयाच्या बाहेर का जात आहात? सोडुन दया.

मा.सचिव :-विषय क्र. ३वाचुन दाखवितात. महापालिकेमध्ये निहित असलेल्या तीन प्रवेशव्दारांना नावे देण्याबाबत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-पास. पास.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- मा.महापौरजी, उपमहापौरजी,हा प्रस्ताव बरोबर आहे परंतु आज सुध्दा महापालिका मुख्यालयाच्या मागील प्रवेशव्दारावर उल्हासनगर नगरपालिका असे लिहिले आहे. मेहरबानी करून तेथे सुशोभिकरण करून उल्हासनगर महानगरपालिका असे लिहिले जावे.

मा.महापौरः-दुरूस्ती केली जाईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौर, हे पास करणारच, परंतु त्याच बरोबर येथे असे लिहिले गेले आहे की, या प्रवेशव्दारांची दुरूस्ती करावी लागणार आहे. शिवमंदीर, कैलास कॉलनीचे जे प्रवेशव्दार आहे. ज्यास आपण झुलेलाल प्रवेशव्दार असे नाव देणार आहेत. त्याच्या बाजुने एक मोठा रोड झालेला आहे. परंतु प्रवेशव्दार खुपच लहान आहे. यापुर्वीच्या रस्त्यासाठी तर जी दुरूस्ती करायची आहे. तर झुलेलाल प्रवेशव्दार पण थोडे मोठे केले जावे. चांगल्याप्रकारे झाले पहिजे. नविन विकास आराखडयानुसार....

मा.महापौर:-खुपच चांगली सुचना आहे.

--६९--

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरजी, पुज्य झुलेलाल असे नाव दिले जावे.

काही सदस्य जय झुलेलाल असे नाव देण्याबाबत बोलत होते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-जय झुलेलाल साहाब असे नाव देण्यांत यावे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-महापौर साहेब, शांतीनगरचे जे प्रवेशव्दार आहे, उल्हासनगर महानगरपालिकेचे, त्यावर कुठल्या तरी राजकीय पक्षाचे काही तरी उददेश लिहिलेले आहेत. कृपया ते मिटवुन टाकावेत. आणि ते गेट पुर्ण अवस्थेत असल्याने त्याची दुरूस्ती करण्याची काहीही आवश्यकता नाही. त्यास श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार हे नाव जर आपण तुर्त लगेचच्या लगेच देऊ शकता. कारण की बाकी सर्व दुरूस्ती झालेली आहे. कुठल्याही प्रकारची दुरूस्ती करण्याची गरज नाही. त्यास फक्त नाव देण्याची गरज आहे. तरी मी आपणांस विनंती करतो की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार आपण जे लिहिले आहे त्यामध्ये फक्त छत्रपती लिहिले आहे. माझे म्हणणे आहे की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार तसेच पुढे आल्यानंतर शिवाजी महारांजाचा जो चौक आहे. म्हणुन कल्याण अंबरनाथ रोडला छत्रपती शिवाजी महाराज रोड असे नाव दिले तर...

मा.महापौर:-त्या रस्त्याला पहिल्यापासुन नाव दिलेले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, या ठरावाची अंमलबजावणी कधी होईल ते सुध्दा सांगा?

मा.महापौर:-तीन प्रवेशव्दारांना जी आम्ही नावे दिली आहेत. त्याबाबतची कार्यवाही इतिवृत्त कायम होण्याच्या अगोदर आम्ही करू.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-जी तीन प्रवेशव्दारे आहेत त्यांच्यासाठी भलेही पाच-पाच, दहा-दहा लाख रू. खर्च होवोत. त्यांचे सुशोभिकरण करून त्यांना नावे देऊ.

मा.महापौर:-सदर ठराव पुढील प्रमाणे समंत करण्यात येत आहे.

विषय :-महापालिकेमध्ये निहित असलेल्या तीन प्रवेशव्दारांना नाव देणे बाबत.

प्रस्तावना:-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या तीन प्रवेशव्दारांना खालील प्रमाणे नांवे देण्याकरिता सुचना मा. महापौर यांनी त्यांच्याकडील पत्रानुसार केलेल्या आहेत.

१)शांतीनगर, उल्हासनगर-३. :-श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार

२)साईबाबा मंदिर,फर्स्ट गेट उल्हासनगर-३. :-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार

३)शिवमंदीर कैलास कॉलनी, उल्हासनगर-५. :-जय झुलेलाल प्रवेशव्दार

--७०--

उपरोक्त ठिकाणी तत्त्कालीन उल्हासनगर नगरपालिकेने अनु.क्र.१ व ३ ही प्रवेशव्दारे बांधलेली आहेत. अनुक्रमांक २ येथील प्रवेशव्दार अपुर्णावस्थेत आहे व अनुक्रमांक १ व ३ च्या प्रवेशव्दारांना दुरूस्ती करावे लागणार आहे. उपरोक्त प्रवेशव्दारांना नावे देण्याकरिता महासभेपुढे प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ७ दिनांक:-२०/६/२००१.

सुचकांची नावे :-१) श्रीमती. ज्योती कालानी.

२) श्री. किशोर वनवारी.

३)श्रीमती. सुनिता राजवानी.

४) श्री. बी.बी. मोरे

५) श्री. लाल पंजाबी.

६) श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

अनुमोदकांची नावे :-

१)श्री. सुभाष मनसुलकर

२)श्री. ठाकुरदास बेहरानी

३)श्रीमती. पंचशिला पवार

४)श्री. पांडुरंग लांडे

५) श्री. प्रकाश माखिजा

६) श्री. नारायण पंजाबी

हि महासभा वरील प्रस्तावने अनुसार महापालिकेमध्ये निहित असलेल्या खालील तीन जागीचे प्रवेशव्दारांना आवश्यक त्या दुरूस्ती व सुशोभिकरणाच्या अधिन राहुन त्यांचे समोर विर्निदिष्ट केल्याप्रमाणे नावे देण्यास मान्यता देत आहे.

१)शांतीनगर, उल्हासनगर-३. :-श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार.

२)साईबाबा मंदिर,फर्स्ट गेट उल्हासनगर-३. :-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार

३)शिवमंदीर कैलास कॉलनी, उल्हासनगर-५. :-जय झुलेलाल प्रवेशव्दार



वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यांत येईल व पुढील महासभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकांच्या

सहया/- १.

२.

३.

४.

५.

६.

अनुमोदकांच्या

सहया/- १.

२.

३.

४.

५.

६.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :</u>- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.महापौरः-</u>शहरात जी तीन प्रवेश व्दारे आहेत त्यांनाच फक्त आज नावे दिली जात आहेत. रस्ते व चौकांना नावे देण्याचा जो पुढचा विषय आहे तो विषय आता घेता येत नाही कारण आजची ही महासभा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे. आणि हि महासभा पूढील लेखी सूचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>लवकरात लवकर करा. नाहीतर आम्ही आमच्या वतीने चौकांमध्ये बोर्ड लावु.

<u>मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे:</u>-नावे देण्यास काही हरकत नाही ना? नावे तर आता सुध्दा देऊ शकतो ना लगेच.

<u>मा.महापौरः-</u>आजच्या सभेतील विषय क्र. ४ सर्वानुमते पुढील लेखी सुचना देईपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.



<u>मा.सचिवः</u>-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ८. ३० वाजता मा.महापौर श्री. हरदास माखिजा यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांक <u>:-७/७/२००१.</u>

<u>इतिवृत्त</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.७/७/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक ७.७. २००१ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. चौधरी गणेश
५. श्री. वाघे शामु
६. श्रीमती. मोकल सिमा
७. श्रीमती. सोनावणे यमुना
८. श्रीमती. ज्योती कालानी
९. श्री. उमाप रामदास
१० श्रीमती. वेलकर सुरेखा
११ श्री. यादव नरेश
१२ श्री. राजु सोनावणे
१३ श्रीमती. पवार पंचशिला
१४ श्री. टाले प्रमोद
१५ श्री. आढाव रामभाऊ
१६ श्रीमती. बगाडे सुनिता
१७ श्री. भांडे भगवान
१८ श्री. वनवारी किशोर
१९ श्री. तेजी कैलाश
२० श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई
२१ श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
२२ श्री. पमनानी ईश्वर
२३ श्रीमती.बेबी वसीटा
२४ श्रीमती. मटाई जोनिता
२५ श्री. चौधरी राजेंद्र
२६ श्री. लांडे पांडुरंग
२७ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२८ श्री.मोरे भानजी
२९ श्रीमती.राजवानी सुनिता
३० श्री. वारिंगे पंढरीनाथ
३१ श्री. पुरस्वानी जमनादास
३२ श्री. वाधवा गिरधारी
३३ .पारवानी रामचंद
३४. श्री. रोहडा श्यामसुंदर
३५. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३६. श्री. मालती करोतिय
३७. श्री. बहरानी ठाकुरदास
३८. श्री. जाधव सुरेश
३९. श्री. भिमसेन मोरे
४०. श्री. चव्हाण रमेश
४१. श्री. महाडिक प्रकाश
४२. श्रीमती. साधवानी जया
४३. श्रीमती. वनवारी मोना
४४. श्रीमती. जेसवानी आशा
४५. श्री. राजानी नरेंद्र
४६. श्री. सुभाष मनसुलकर
४७. श्रीमती.यशस्विनी नाईक
४८. श्रीमती. राजानी भारती
४९. श्रीमती. कुंदनानी लविना
५०. श्रीमती. वलेचा पदमा
५१. श्रीमती. गजवानी कांता
५२. श्रीमती. भाठिजा इंदीरा
५३. श्री. पंजाबी नारायण
५४. श्री. अचनानी पम्मीकुमार
५५. श्रीमती. राधवानी आशा
५६. श्री. माखिजा प्रकाश
५७. श्री. बहारानी गोप
५८. श्री. तजरेजा विनोद
५९. श्री. किशनानी गोदुमल
६०. श्री. सचदेव गिरधारी
६१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
६२. श्री. पंजाबी लाल
६३ श्री. केसवानी किशोर

तर



१. श्री. ढेणवाल बनवारी ,२. श्री.दासानी मिनु ३ श्री.ठाकुर सेवलदास, ४. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ५. श्रीमती.टेकचंदानी चंदा ,६ श्री.भाटिया जयप्रकाश, ७. श्री. केणी जयकुमार, ८ श्री. आयलानी कुमार, ९. श्रीमती.

वारिंगे पन्ना, १० श्री. रामरख्यानी मोहनदास, ११ श्री. जग्यासी राजु हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन दुपारी १ . ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-मा.महापौरजी, नविन विकास आराखडयाबाबत सूचना आणि हरकतींबाबतची सभा तर यापूर्वीच झालेली आहे. परंतु नगररचनाकार यांना येथे मी एक गोष्ट विचारू इच्छितो की, प्रशासक शहर वसाहत यांच्या कार्यालयाकडुन आपणांस मागच्यावेळी जे भुखंड हस्तांतरीत केले ते किती भुखंड हस्तांतरीत केले? जर त्याची थोडी फार माहिती मिळाली तर खुपच चांगले होईल. कारण की, त्यातील बहुतांश भुखंड मोकळे आहेत. त्यावेळी ते भुखंड मोकळे असताना सुध्दा काही लोकांनी ते हस्तगत केले आहेत. त्यांच्यावर बांधकाम केले आहे. बिल्डर लोकांनी इमारती बांधल्या जर महापालिका पहिल्यापासुन भुखंडाबाबत जागृत असती तर आता विकास आराखडयाबाबत या सूचना व हरकती आल्या नसत्त्या. तर माझ्यामते याचा खुलासा तर तुम्ही केलात तर खुपच चांगले होईल.

मा.महापौर:-मला असे वाटते की, सभा सुचनेवरील विषया व्यतिरिक्तच्या विषयावर बोलले नाही पाहिजे. आज प्रारूप विकास आराखडयावर नियमावलीवर मागच्या वेळी जी सर्व पक्षीय सभा झाली त्या सभेमध्ये निर्णय घेऊन आज आम्ही महासभेमध्ये हा प्रस्ताव चर्चेस आणलेला आहे. तर फक्त प्रारूप विकास आराखडयाबाबत आपण आपल्या सुचना हरकती दिल्या तर बरे होईल.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-हा मुददा विकास आराखडयाशी संबंधित आहे.

मा.महापौर:-आपल्या या मुदयाबाबत आपण महासभेपुढे उत्तरासाठी प्रश्न दया म्हणजे त्याचे आपणांस उत्तर मिळेल.

मा.सचिव:-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

उल्हासनगर शहरासाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणातर्फे प्रस्तुत करण्यांत आलेल्या विकास योजनेच्या व विकास नियमावलीच्या मुसदयावर हरकती घेणे बाबत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:- मा.महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्तजी,व सहकारी जेव्हा आपण प्रारूप विकास आराखडयाबाबत बोलत असतो, तेव्हा मला असे वाटते की, उल्हासनगर शहराचा इतिहास, उल्हासनगर शहर कसे निर्माण झाले त्याचा उल्लेख करणे जरूरीचे आहे. हे सर्वांना माहित आहे. परंतु ते कागदोपत्री आणणे आवश्यक आहे. त्यासाठी मी काही गोष्टी सांगु इच्छितो, पुर्ण शहराबाबत विचार केला गेला पाहिजे. विशेषत: लोकांच्या ज्या मुलभुत सुविधा आहेत. धंदा व्यापार करण्याची सुविधा याच बरोबर ब-याचशा गोष्टी या विषयाशी निगडित आहेत. तर मला असे वाटते की, पुर्ण शहर कसे तयार झाले. त्याबाबत सुध्दा नोंद कागदोपत्री आली पाहिजे. व त्याबाबत मी काही शब्द सांगु इच्छितो की, आपणा सर्वांना ते माहित असेलही परंतु तरीही मी त्या गोष्टीचा उल्लेख करू इच्छितो की, काही लोकांना हे माहित नसेल की, हे जे



शहर आहे, ते निर्वासितांचे शहर आहे. पुर्वी हे पूर्ण शहर लष्करी छावणी होती. व आपले हे शहर कॅम्पांमध्ये विभागले आहे. कॅम्प नं, १ ,२ ,३ ,४ ,व ५

त्यात बॅरेक येतात, सेक्शन येतात व प्रत्येक कॅम्पाला एक ओ.टी सेक्शन दिले गेले होते. ओ.टी. सेक्शनचे नाव जर आपण पाहिले तर ओ.टी. सेक्शनचा अर्थ आहे अधिका-यांचे निवास. त्या कालावधीत सैनिक लोक बॅरेक मध्ये राहत होते, सेक्शनमध्ये रहात होते. कॅम्प मध्ये रहात होते. व जे अधिकारी होते त्यांची वेगळी कॉलनी होती. ते थोडे दुर रहात होते. म्हणुन त्यास लोकांनी नाव दिले होते अधिका-यांचे निवास. तर हा शहराचा इतिहास आहे. १९४७ नंतर पाकिस्तानातून जे लोक विस्थापित झाले त्यांच्यासाठी हे शहर दिले गेले. या शहरामधील तरण तलावाच्या बाजुला १९४९मध्ये श्री. टी. राजगोपालाचारी हे उदघाटन करण्यासाठी आले होते. ऑगस्टच्या महिन्यामध्ये १९४९ मध्ये. त्याची एक कोनशिला त्या घटनेचे प्रतिक म्हणुन आजही आहे. तर हे शहर जे आहे ते विस्थापितांसाठी निवडलेले व तयार केलेले शहर आहे. व नंतर जस जसे शहर वाढत गेले. तसे बिगर निर्वासित लोक सुध्दा इथे राहु लागले. व हे शहर हळुहळु सर्व जातीय लोकांचे शहर म्हणुन ओळखले जाऊ लागले आज या शहरामध्ये सर्व जाती धर्मांचे लोक रहात आहेत. व शहरामध्ये असे एक मत तयार झाले होते की, १९६७ पुर्वीचे ज्यांचे वास्तव्य आहे अशा लोकांना सनद दिली जावी. व आज महाराष्ट्रात जे शासन आहे. त्यांचे सुध्दा धोरण बदलले आहे. व नंतर आम्ही सर्वजणांनी मिळुन एक निर्णय घेतला की, १९९७पुर्वी जी बांधकामे झाली असतील, भले ती झोपडपट्टी असो. किंवा कमर्शिअल सेक्टर असो. किंवा रहिवाशि जागा असोत. १९९७ पर्यंतची बांधकामे नियमित केली जावीत. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने जे कायदे तयार केले आहेत. १९९७ पुर्वी जी बांधकामे झाली आहेत. ती हटविली जाऊ नयेत. झोपडे असो, चाळ असो, दुकाने असोत की, कॉलनीज असोत. ती सर्व बांधकामे तशीच्यातशी राहिली पाहिजेत. तरच या शहराचे १९४७चे स्वरूप आणि आजचे स्वरूप यामध्ये बराच बदल झालेला आहे. हे शहर सर्व जाती धर्मीयांचे शहर झाले आहे. यासर्व मुदयांचा इतिवृतांतामध्ये उल्लेख आला पाहिजे. त्याचबरोबर विकास आराखडयाच्या मूदयाकडे मी वळतो. नवीन विकास आराखडयामध्ये ब-याचशा त्रुटी आहेत. आता शहराचे स्वरूप असे आहे हे शहर विस्थापितांचे शहर आहे. धंदेवाईक लोकांचे शहर आहे. तर येथे असे आहे की, पहिले शहर वसले व त्यानंतर नियोजन आले. पहिले जो मास्टर प्लान तयार झाला तो १९५४मध्ये त्यानंतर १९७४मध्ये विकास आराखडा तयार करण्यात आला. आणि त्यानंतर आता असे एकुण मास्टर प्लान सह हि तिसरी योजना आहे. व शहराचे आजचे स्वरूप पाहता या शहराचा शासनाने जो विकास आराखडा तयार केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जो आराखडा तयार केला आहे त्याची तर अंमलबजावणी केली तर या शहरामध्ये बरीचशी बांधकामे तुटली जातील. व शहराचा ज्याप्रमाणे विकास आम्हाला अभिप्रेत आहे. कारण की, आम्हाला असे वाटते की, कमी नुकसान करून जास्तीतजास्त विकास होवो. व यासाठी आम्ही १९७४ मध्ये शासनाने जो विकास आराखडा तयार केला होता. त्यामध्ये असे काही रस्ते दाखविले होते. की ज्यांची रूंदी ९० फुट दाखविली होती. मला आठवण आहे. तसेच जे जुने लोक आहेत त्यांना सुध्दा माहित आहे की, त्यावेळेला मी सभागृहात नव्हतो. कारण की मी देखिल १९७८मध्ये पहिल्यांदाच निवडुन आलो होतो. जेव्हा १९७४ मध्ये जो विकास आराखडा तयार केला होता. त्याचा मी अभ्यास केला आहे. त्यावेळी काही रस्त्ते वाजवीपेक्षा जास्त रूंद दाखविले होते. फर्निचर बाजारातील रस्ता पाहिला तर १९७४मध्ये तो ९० फुट रूंद दाखविला होता. नंतर तो कमी करून त्यावेळी नगरपालिका नव्हती. कारण की, तो निलंबनाचा कालावधी होता. शहरवासियांनी हरकती घेतल्या होत्त्या. त्यावर त्यांनी निर्णय घेऊन रस्त्याची रूंदी ९० फुटावरून ४५ फुट केली होती. नेहरू चौकापासुनचा जो रोड होता तो सुध्दा ९० फुट रूंदीचा होता. त्याची सुध्दा रूंदी कमी करून ३५ फुट केला गेला. तर सरकारचे सुध्दा हेच धोरण राहिले आहे की, कमीत कमी नुकसान व जास्तीत जास्त विकास झाला पाहिजे. व मला असे वाटते की, आज आम्ही जो सर्व पक्षांनी मिळून जो

ठराव ठेवला आहे तो सुध्दा याच धोरणाचा पाठपुरावा करत आहे. हा ठराव आम्ही सर्व लोकांनी मिळुन तयार केला आहे. आम्ही त्याचे अनुमोदन करतो व त्याचबरोबर मी असे आपणांस सांगु इच्छितो की, हा जो नविन विकास आराखडा आहे, याची जर आम्ही कार्यवाही केली तर. वाजवी पेक्षा जास्त नुकसान होईल. उदा. ब-यासश्या ज्या झोपडपट्टया त्या आरक्षित भुखंडावर आहेत. त्या तर हटवु शकत नाहीत. नैसर्गिक आहे की, त्यांचे जे आरक्षण आहे ते वसाहतीसाठीचे आरक्षण म्हणुन केले जावे. व आम्ही सर्व त्यास तयार आहोत. व्यावसायिक शहर आहे. बरेचसे आमचे दुकानदार बंधु आहेत त्यांची जी दुकाने आहेत. ती ४५ फुट रूंदीचा रस्ता असो की, ३५ फुट रूंदीचा रस्ता असोत तेथे सुध्दा दुकाने आहेत. नविन जो विकास आराखडा आहे त्यामध्ये असे आहे की,दुकाने जी आहेत ती फक्त ६० फुट रूंदीच्या रस्त्यावरच असतील. आमच्या शहराचा ढाचा असा आहे की, आमच्या शहरामध्ये छोटया छोटया धंदयावाले आहेत. विशेषत: रस्ते ४० ते ३५ फुट रूंदीचे आहेत. त्यासाठी आम्ही असा विचार केला आहे की, ४० फुट रूंदीचे जे रस्ते आहेत त्यांच्यावर सुध्दा व्यवसाय चालु राहीले पाहिजेत. व त्याबाबत विकास आराखडयामध्ये जे बंधन आहे ते हटविले गेले पाहिजे. अशा प्रकारच्या ब-याचशा गोष्टी आहेत ज्याबाबत आम्ही लोकांनी आपसात चर्चा करून निर्ण घेतलेला आहे. व त्यासाठी या ठरावाचे आम्ही अनुमोदन करत आहोत. व त्याचबरोबर या सभागृहात आम्ही हे सुध्दा सांगु इच्छितो की, उदाहरणा दाखल दोन-तीन मुददे विशद केले. काही रस्ते असे आहेत की, ज्याबाबत जुन्या विकास आराखडयानुसार आम्ही कार्यवाही केली आहे. त्याबाबत आम्हास असे वाटते की, असेच रस्ते तयार झाले पाहिजेत. हि चर्चा चालु असतानाच मी हे जाणुन घेऊ इच्छितो की, प्रशासनाच्या वतीने आयुक्तांनी आपल्या वतीने काही प्रस्ताव पाठविला आहे का? त्यांना काय वाटते. प्रशासनाचे मत व निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधींचे मत हे सर्व एकत्रित व ठोस असावी. तर आयुक्तांनी प्रशासनाच्या वतीने काही प्रस्ताव पाठविले आहेत का? जर पाठविले असतील तर ते सुध्दा सभागृहासमोर आले पाहिजेत. ऐवढाच माझा आग्रह आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-</u> मा.महापौरजी, आपली जी सर्व पक्षीय समिती होती. त्यासर्वांनी मिळुन एक ठराव तयार केला आहे. परंतु त्या समितीमध्ये सर्व नगरसेवक नव्हते. यासाठी तो ठराव सभागृहामध्ये वाचुन दाखविला जावा. किंवा त्याची प्रत सर्वांना दिली जावी. किंवा वाचुन दाखविले तरी चालेल.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u> प्रस्ताव वाचुन दाखविणे आवश्यक आहे. जसे श्री. महाडिक यांनी सांगितले तसे जर प्रस्ताव वाटप होत असेल तर अधिकच चांगले आहे. तसे श्री. लाल पंजाबी यांनी जो मुददा उपस्थित केला की, प्रशासनाच्या वतीने आयुक्तांनी जर प्रस्ताव पाठविला असेल तर त्याची माहिती सभागृहास असणे आवश्यक आहे. जो प्रस्ताव आम्ही सर्वांनी मिळुन तयार केला त्याची माहिती आम्हांस आहे. परंतु संपुर्ण सभागृहास नाही. व प्रशासन वेगळा प्रस्ताव पाठवत असेत तर त्याची सुध्दा माहिती सभागृहास असणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u> मा.महापौर, उपमहापौर, मा.आयुक्त साहेब, आजच्या या महत्त्वाच्या सभेमध्ये उल्हासनगर शहरासाठी बी.एम.आर.डी.ए. जो प्रत्येक शहराचा विकास आराखडा तयार करते. त्यानुसार उल्हासनगर शहराचा त्यांनी जो विकास आराखडा तयार केला आहे. त्याचा जर अभ्यास केला तर असे जाणवते की, या बी.एम.आर.डी.ए. ने हा नकाशा ऑफिसमध्ये बसुन उल्हासनगर शहराकडे बिल्कुल लक्ष न देता, टेबलावर बसुन बनवला आहे. दुसरी गोष्ट हा विकास आराखडा बनवताना उल्हासनगर शहरात फक्त १३ किलो मीटर परिसराचे क्षेत्र आहे. या १३ कि.मी.च्या परीसरात जर तुम्ही १०० फुटाचे असे १० रोड टाकले तर हे पूर्ण उल्हासनगर शहर उध्वस्त होण्याची

शक्यता आहे. दुसरी गोष्ट हा विकास आराखडा बनवताना ड्रेनेज सिस्टीमची जी टाटाची लाईन गेली आहे. तिचा काही विचार केला गेला नाही. आणि हे सर्व बनवत असताना आमचे जे झोपडपट्टीवासीय लोक आहेत किंवा दलीत वस्तीतील लोक आहेत किंवा इमारतीत राहणारे जे लोक आहेत. जे शहर अनाधिकृत शहर म्हणुन ओळखले जाते. ते शहर या नविन विकास आराखड्यामुळे उध्वस्त होण्याची वेळ येणार आहे. महापौर साहेब, माझी ही विनंती आहे की हा विकास आराखडा रदद करण्यात यावा. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा.महापौरजी, या विकास आराखड्यातील दोन-चार मुदयांकडे आपले लक्ष वेधु इच्छितो की, प्रभाग क्र.२३ मध्ये साईट नं. १९६ , १९७ ,१९८ ग्रीन झोनमध्ये दर्शाविले आहे. परंतु तेथील वस्तुस्थिती अशी आहे की, तेथे कृष्णानगर, योगेश नगर, वीर सावरकर नगर, व गणेश नगर या नावांनी तेथे वस्त्या वसल्या आहेत.व हजारोंच्या संख्येने तेथे लोक राहत आहेत. त्या साईटस् पूर्णपणे आक्युपाईड आहेत. व त्या जागेपासुन कोणालाही हटविणे शक्य नाही. तरी आपणांस हि विनंती आहे की, कृपया आपण ज्या काही हरकती किंवा सुचना पाठवाल. त्यात या लोकेशनचे सुध्दा नोंद घेतली जावी. व यास ग्रीन झोन व खेळाचे मैदाना ऐवजी रहिवासी झोन केले जावे अशी माझी विनंती आहे. व दुसरी गोष्ट अशी की, थोडयाच दिवसापुर्वी रस्त्यांची रूंदीकरण झाले आहे, ४ नं. व ५ नं. मध्ये या रस्त्यांमध्ये जे लोक विस्थापित झाले. ज्यांची पुर्णच्या पुर्ण दुकाने त्यात गेली. तर या लोकांना पाच. नंबर मध्ये, नेताजीच्या विभागात पर्यायी जागा दिली होती. परंतु ही अर्ल्टरनेट साईट पुन्हा आरक्षणामध्ये दाखविली आहे. तर एक वेळ ज्यालोकांना विस्थापित करून पुर्नवसित केले अशा लोकांना पुन्हा विस्थापित करणे बरे नाही. तर अशा ज्या लोकांना पर्यायी जागा दिलेल्या आहेत त्यांना पुन्हा तेथुन विस्थापित केले जाऊ नये. तसेच महासभेच्या मागील दोन-तीन सभांमध्ये मी आपल्या असे निर्दशनास आणुन दिले आहे की, ज्या लोकांना पर्यायी जागा दिलेल्या आहेत त्या लोकांना अदयाप काही कागदपत्रे दिलेली नाहीत. की ज्या आधारावर विद्युत जोडणी किंवा इतर काही नागरी सुविधा प्रदान करून घेऊ शकते. मला वाटते त्या लोकांना पर्यायी जागा देऊन एक-दिड वर्ष झालेले आहे. एकतर त्यांचे धंदे पहिलेच संपुष्टात आले आहेत. नविन ठिकाणी त्यांनी आपल्या खर्चातुन बांधकामे केली आहेत. त्यानंतर अद्याप त्यांना काही सुविधा मिळालेल्या नाहित. विद्युत जोडणी नाही त्यामुळे दारोदार फिरत आहेत तर ही खुपच खेदाची गोष्ट आहे. जर अशाप्रकारे आपल्या महापालिकेचे धोरण राहिले तर येत्त्या काही वर्षात विकास कार्यासाठी कुणी नागरिक सहकार्य कसे देईल? याचा आपणांस विचार करावा लागेल. तर कृपा करून ज्या लोकांना पर्यायी जागा दिलेल्या आहेत त्यांना त्याबाबतचे कागदपत्र दिले जावेत. या प्रकारचे आश्वासन मागील महासभेमध्ये दिले होते. जेणे करून त्यांना पुढे काही त्रासाचे होणार नाही. तसेच त्या जागेवर जे काही आरक्षण टाकले आहे ते हटविले जावे. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा.महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब शहराच्या विकास आराखड्याबाबत हरकती घेण्याबाबत जी समिती नेमली होती. तीचा निर्णय काय आहे. तो आम्हाला माहित नाही. परंतु माझ्या प्रभागात जे आरक्षण दाखविले आहे. ते हटविले पाहिजे. त्याबाबत मी बोलु इच्छितो की, प्लॉट क्र. १०१वर आरक्षण आहे, पार्कींगसाठी. तरीही प्लॉट क्र. १०२ वर पार्किंगसाठी आरक्षण दाखविले आहेत. तेथे शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार झालेले आहेत. व यापुर्वी तो प्लॉट शॉपिंग कॉम्प्लेक्स साठीच आरक्षित होता. तो त्यासाठीच आरक्षित राहीला पाहिजे. प्लॉट क्र.१०२ शाळेसाठी आरक्षित दाखविण्यात आलेला आहे. तो प्लॉट अर्धा शाळेसाठी, ती खाजगी मालमत्ता आहे. व अर्धा भाग रहीवासासाठी आहे. तो सुध्दा तसाच राहिला पाहिजे. प्लॉट

नं. १०३ हा खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. त्यावर अर्ध्या भागात खेळाचे मैदान आहे. अर्धा भाग रहिवासी आहे. तो सुध्दा तसाच्या तसाच राहीला



पाहिजे. प्लॉट नं. १०४ हा उद्योगधंदयांसाठी आरक्षित दाखविला आहे. आज तो मनोरंजनासाठी मोकळा दाखविला आहे. आज तेथे रहिवास आहे. लोक ४०-५० वर्षापासुन रहात असुन त्यांच्याकडे त्याबाबतचे कागदपत्र आहेत. हा प्लॉटसुध्दा रहिवासासाठी ठेवला गेला पाहिजे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः- मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त, सर्व विभाग प्रमुख, सन १९७० पासुन व त्यापुर्वीचा इतिहास श्री. लाल पंजाबी यांनी सांगितला आहे. परंतु १९७० पासुन जी मागणी होती ती शहराचा जो विकास आराखडा तयार केला आहे तो टेबलवर बसुन तयार केला आहे. त्याबाबत ब-याचशा नागरिकांनी व संघटनांनी आंदोलने केली. आंदोलन केल्यानंतर काही सुचना केल्या त्यानंतर १९८४मध्ये जो विकास आराखडा तयार होणार होता तो तयार झाला नाही. तो आता तयार होऊन आला आहे. त्यामध्ये काही चुका आहेत. काही झोपडपट्टीमध्ये आरक्षणे दाखविली आहेत. रस्त्याच्या साईटस् सुध्दा दाखविण्यात आल्या आहेत. या प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. सुचना दिलेल्या आहेत. हरकती दिलेल्या आहेत. याबाबत जास्त काही न बोलता आम्ही महापौरांना सांगु इच्छितो की, आम्ही ज्या सुचना / हरकती दिल्या आहेत. त्याबाबत काय कार्यवाही होईल. बी.एम.आर.डी.ए.चे लोक त्या सुचना मानतील किंवा नाही. त्याची कार्यवाही पाहणे. अतिशय आवश्यक आहे. जर त्यासाठी महापालिकेची एखादी समिती नेमण्याची आवश्यकता पडली तरी ती बनविली जावी. विकास आराखडयाबाबत आमच्या सदस्यांनी ज्या सुचना दिल्या आहेत त्याची पुर्तता होते की नाही हे पहाणे आमचे काम आहे. ऐवढे बोलुन मी माझे बोलणे संपवतो.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मा.महापौरजी, हा जो नविन विकास आराखडा आला आहे त्याबाबत ज्या सुचना व हरकती शहरवासियांकडुन दिल्या जात आहेत. मला असे वाटत नाही की, राज्य शासन त्या हरकतीचा काही विचार करेल म्हणुन? कारण की, यापुवी सुध्दा उल्हासनगर महानगरपालिकेने किंवा नगरपालिकेने ज्याकाही हरकती घेतल्या होत्त्या त्या राज्यशासनाने फेटाळून लावल्या होत्त्या तरीही मी माझ्या प्रभागातर्फे व शहरातर्फे काही सुचना देत आहे. त्याकडे जरा लक्ष दिले जावे. सेक्टर नं. ७ मध्ये साईट नं. ५० आहे तेथे दहा-पंधरा वर्षापासुन ब-याचशा इमारती तयार झालेल्या आहेत. माझ्या मते तो भाग गुजराती शाळेच्या बाजुला माझे मित्र श्री. कुमार आयलानी यांचा प्रभाग आहे. ते काही कारणास्तव या सभेत आले नाहीत. परंतु मी त्याबाबचा मुददा निर्दशनास आणु इच्छितो. तेथे ब-याच जुन्या इमारती आहेत. तरीही तेथे शैक्षणिक सुविधांसाठी आरक्षण दाखविले गेले आहे. तेथे ज्या जुन्या इमारती आहेत. त्यातील लोक कुठे जातील? याबाबत जरा लक्ष दिले जावे. दुसरे असे की, लवकुश पासुन गोल मैदाना पर्यंतचा जो रस्ता आहे. तो ३३ रस्त्यांच्या कार्यक्रमामध्ये नव्याने तयार केला गेला आहे, ४० फुटाचा. जुन्या विकास आराखडयामध्ये हा रोड ४० फुटाचा दाखविला असून तो बरोबर आहे. नविन विकास आराखडयामध्ये हा रस्ता ६० फुटाचा दाखविण्यात आला आहे. हा रस्ता ६० फुट रूंदीचा केला तर या रस्त्याच्या बाजुला ज्या इमारती तयार झाल्या आहेत त्यांचे खुप मोठे नुकसान होईल. लोकांचे आणि शहराचे नुकसान होईल. हा रस्ता सुध्दा जुन्या विकास आराखडयानुसार ४० फुटाचाच ठेवण्यात यावा. व तिसरे असे की, महानगरपालिकेसमोर जे एक गार्डन आहे. बाबासेवलदास गार्डन त्यावर महानगरपालिकेच्या वतीने लाखो रू. खर्च झाले आहेत. हे गार्डन आरक्षित करण्याबाबत यापुर्वी सुध्दा आम्ही बराच पत्रव्यवहार केला आहे. परंतु तरीही ते आरक्षणामध्ये आलेले नाही. त्या गार्डनला आरक्षणामध्ये आणले जावे अन्यथा त्यावर कुणी अतिक्रमण करून इमारतीचे बांधकाम करील. याची सुध्दा नोंद घेतली जावी.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे:-सन्माननिय महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब व माझ्या सहकारी, उल्हासनगर शहराचा विकास आराखडा जाहिर केला आहे त्यावर सुचना आणि हरकती दयायच्या आहेत त्या आम्ही दिलेल्या आहेत. जसे की, मी आज येथे सांगु इच्छितो की, ३३ रस्त्त्यांचे काम आम्ही हाती घेतले होते ते आता ९० टक्के पुर्ण झाले आहे. १९७४च्या विकास आराखडयानुसार आम्ही हे रस्ते तयार केले आहेत. त्यातील काही रस्ते तयार आहे तर काही उर्धवट आहेत. जसे की, शांतीनगर, शिवाजी चौक, साईबाबा मंदीर या रस्त्त्याचे काम अद्याप पुर्ण झाले नाही. जेथे जेथे रस्ता रूंदीकरण झाले तेथील घरे, दुकाने, तोडली गेली. त्या लोकांना पर्यायी जागा देण्याबाबत महानगरपालिकेने एक ठराव पारित केला होता. त्यानुसार पयार्यी जागा देऊन त्यांचे स्थलांतर करण्यात आलेले आहे. त्या स्थलांतरामध्ये काही चुका झालेल्या आहेत. ज्या लोकांनी रस्ता तयार करण्यासाठी आपल्या स्वत:च्या जागा, घरे, दुकाने इत्त्यादीच्या जागा दिल्या त्यालोकांना महापालिकेने जेथे पर्यायी जागा दिल्या तेथे त्यांनी आपल्या स्वत:च्या खर्चाने बांधकामे केली. परंतु तेथे त्यांना नळ, लाईट इत्त्यादी सुविधा अद्याप प्राप्त झालेल्या नाहीत. आम्ही अशा सुचना दिल्या आहेत की, आरक्षित भुखंडावर आम्ही ज्या वस्त्त्या बसविल्या आहेत. भलेही त्या भुखंडावर प्राथमिक शाळा किंवा उद्यानासाठीचे आरक्षण असो ते आरक्षण हटविले जावे. नविन विकास आराखडयामध्ये जे रस्ते दाखविले आहे. जे मुख्य रस्ते आहे. त्यांच्या रूंदीकरणाचे वेळी थोडीफार दुकाने तुटत असतील तर शहराच्या विकासासाठी ते ठिक आहे. १३ कि.मी. चे आपले एक छोटेसे शहर आहे. या शहरामध्ये त्या लोकांना पर्यायी जागा दिली गेली पाहिजे. नविन विकास आराखडयामध्ये जे रस्ते आहेत. ते मंजुर केले पाहिजेत. शहराच्या आजुबाजुला ज्या जागा आहेत जी शहरे वसली आहेत. त्या जागा आम्हाला दया. असे शासनाला लिहीले पाहिजे. या छोटयाशा शहरामध्ये जर हा विकास आराखडा आपण राबविला तर शहरातील बरेचसे लोक या शहरातून बाहेर पडतील, बेघर होतील. माझी अशी विनंती आहे की, आपण सर्व पक्षीय निवेदन घेऊन राज्यशासनाकडे जावे व शहराच्या आजुबाजुची जी गावे आहेत ती समाविष्ट करण्याबाबत निवेदन दयावे. धन्यवाद.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-मा.महापौरजी, हे जे दोन प्रस्ताव दिले आहेत. त्यापैकी कोणता एक लागु आहे. की दोन्ही लागु आहेत? दोन-दोन प्रस्ताव दिले आहेत. हे दोन्ही प्रस्ताव कायदेशिर आहेत की, यामधील कुठला एक बेकायदेशिर आहे?

मा.महापौर:-प्रस्ताव एकच पारीत करावा लागणार आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-(दोन्ही प्रस्ताव हातात घेऊन दाखवितात) यापैकी हा की हा.

मा.महापौर :- ते मी सभागृहावर सोपवितो. आपण तपासुन पहा. व जो प्रस्ताव आपणांस योग्य वाटेल तो पारीत करा. व दुसरा प्रस्ताव जो आहे तो त्याबरोबर जोडुन आपण पाठवु.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-माझ्यामते श्री. कुकरेजा विधी अधिकारी यांनी यावर प्रकाश टाकावा.

मा.महापौर:- जो प्रस्ताव अधिक कायदेशिर असेल तो पारीत करू.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:- मा.महापौरजी, आयुक्त साहेब, व सन्माननिय सदस्य, आज शहराच्या प्रारूप विकास आराखड्यावर सन्माननिय सदस्य चर्चा करत आहेत. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले आहे की, हे शहर



कशाप्रकारे वसले आहे, हे शहर निर्वासितांचे शहर आहे. या शहरामध्ये चार लाख मतदान आहेत. परंतु लोकसंख्या मात्र सात-आठ लाख आहे. १९७४ मध्ये जो विकास आराखडा तयार करण्यांत आला होता. त्याबाबत झोपडपट्टी वासियांच्या वतीने आम्ही अनेक वेळा निवेदने दिलेली आहेत. हा आराखडा झोपडपट्टी वासियांवर एक टांगती तलवार होती. त्या आराखड्यामध्ये बरीचशी आरक्षणे दाखविली होती. व आता हा जो विकास आराखडा तयार करण्यांत आलेला आहे तो शहराच्या हिताचा आहे कींवा नाही हे पाहणे आमचे काम आहे. ३० जुन पर्यंत पुर्ण शहरवासियांनी त्याची पहाणी केली. त्यांचा अभ्यास केला. प्रत्त्येक नगरसेवकाने काही हरकती व सूचना केल्या आहेत. त्या व्यतिरिक्त याकामी जी सर्व पक्षीय समिती नेमली आहे. त्या समितीने ही या विकास आराखड्यांचा अभ्यास केला असुन हे शहराच्या हिताचे आहे असा सर्वांनुमते एकमताने निर्णय घेतलेला आहे. मला असे वाटते की, सभागृहामध्ये या विरोधात कुणीही सदस्य नाही. दुसरे असे की, आता आता जी प्रस्तावना मिळाली आहे. त्या प्रस्तावने मध्ये असे लिहीले आहे की, ती मी वाचुन दाखवतो. ही महासभा वरील प्रस्तावना व कारणा अनुसार नियोजन व विकास समिती व मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली रचलेल्या विशेष समितीच्या अहवालावर सुसंगत अशी सोबत जोडलेल्या परिशिष्टातील विकास नियोजनाच्या मसुदयास व प्रारूप विकास नियमावलीच्या संदर्भात नमुद केलेल्या हरकती व सुचनांस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नियोजन समितीच्या सुनावणीच्या व राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.तसेच महापालिकेतर्फे...

श्री. किशोर वनवारी यांच्याकडे पहात, अहो तुम्ही सभागृह नेता आहात. मी वाचत आहे इकडे लक्ष दया. इकडे तुमचे लक्ष जास्त असले पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपण तोच प्रस्ताव वाचुन दाखवत आहात. जो सर्वांना मिळाला आहे. आम्ही आधीच वाचला आहे. तुम्ही बोला.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:- परंतु त्यामध्ये महत्त्वाचा जो मुददा आहे तो तुम्ही वाचला नाहीत. तो मी वाचुन दाखवितो. महापौर व विशेष तज्ञ श्री. बुलचंद सोनेसर यांना हरकती व सूचना करणा-या समितीमध्ये सभासद म्हणुन नेमणेस व महापालिकेच्या सूचना व हरकती विचारात घेतल्याशिवाय विकास योजना नियमावलीला अंतीम मंजुरी देण्यात येऊ नये अशी शासनास विनंती करीत आहे. तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्टातील हरकती व सूचना या ठरावाचा भाग मानला जाईल. आणि वरील निर्णय अंर्तभुत असलेला ठराव इतिवृत कायम होण्याची वाट न पाहता कायम समजण्यांत येईल.

मी सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो, महापौर व आयुक्तांना विनंती करतो की, जर इथे महापौर व विशेष तज्ञ श्री. बुलचंद सोनेसर हे दोनच लोक घेतले जात असतील तर आमच्या उपमहापौरांना सुध्दा या समितीत घेण्यात यावे. अशी मी या सभागृहाला आणि सन्माननिय महापौर व आयुक्तांना विनंती करतो की, त्याठिकाणी तिसरा प्रतिनिधी म्हणुन आमच्या उपमहापौरांना घेण्यांत यावे.

मा.महापौर:-स्विकार्य आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:- आभारी आहे साहेब, दुसरी गोष्ट अशी की, आजचा जो विषय आहे त्याबाबत मला असे वाटते की, आम्ही सकाळी साडे दहा पासुन महापालिकेत आहोत. आम्ही सर्व पक्षाच्या सदस्यांनी एकत्र बसुन याबाबतीत निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार हा ठराव पारीत करून शासनाकडे

पाठवायचा आहे. तर आर.पी.आय. पक्षाचा गटनेता या नात्त्याने मी असे सांगु इच्छितो की, विकास आराखडा या शहरास आवश्यक आहे. माझ्या एका सदस्याने म्हंटले की, विकास आराखडा रदद केला जावा. परंतु त्त्यावर मी



असे म्हणतो की, नाही. या शहरास विकास आराखडा आवश्यक आहे. कारण वीस वर्षांनंतर या शहरात ८ लाखाची लोकसंख्या आहे. त्त्यासाठी जिथे जिथे आरक्षण हटविणे आवश्यक असेल तिथे तिथे ते हटविले जावे. त्त्यासाठी आम्ही आमच्या सुचना, हरकती दिलेल्या आहेत. आणि आमच्या समितीच्या वतीने आम्ही तो ठराव पारीत करून पुढे पाठविणार आहोत. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, खाली जे वाक्य आहे ,प्रारूप विकास आराखडयात आरक्षित असलेल्या भुखंडावर जे नकाशे मंजुर करण्यांत आलेले आहेत. ते रदद करण्यांत यावेत. ही फार चांगली गोष्ट आहे. परंतु पुढे देखिल ते मंजुर करण्यांत येऊ नयेत अशी माझी विनंती आहे. ही सुचना सर्वांनी मान्य करावी. आणि हा ठराव एकमताने पास करावा अशी मी सर्व सदस्यांना आणि महापौरांना विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u> आमचे सर्व सन्माननिय सदस्य, आपल्या शहराचा विकास आराखडा १९९६ते २०१६ या कालावधीसाठीचा प्रसिध्द झाला आहे. आज आमच्याकडे जो प्रारूप विकास आराखडा आला आहे त्याबाबत महापालिकेने असा निर्णय घेतला की, एक समिती नेमली जावी. व त्यामध्ये याबाबतीत विचार विनिमय केला जावा. व त्याप्रमाणे ३० लोकांची एक समिती नेमण्यांत आली. उल्हासनगर एक निर्वासितांचे शहर होते हळूहळू लोकसंख्या वाढु लागली. शहर दाटीवाटीने वाढू लागले. सुंदर शहर उभे करण्यासाठी जमिन उपलब्ध नाही. शहरास क्षेत्र वाढवून दिले गेले नाही. नगरपालिकेची महानगरपालिका झाली तरीही तिचे क्षेत्र वाढविले नाही. व माझी अशी एक विनंती आहे की, आपण ज्या सुधारणा सुचविल्या आहेत. त्याबरोबरच क्षेत्र आम्हास वाढवून दिले जावे. यापूर्वी जे क्षेत्र वाढवून दिले होते. हा मुददा सुध्दा याबरोबरच उपस्थित केला गेला पाहिजे. विकास आराखडयाबाबत ३० लोकांची एक समिती नेमण्यांत आली. या समितीने लागोपाठ २०-२५ दिवसात समितीचे जे जे सदस्य येत होते. त्यांच्यामध्ये याबाबतीत चर्चा झाली. या विकास आराखडयाबाबत आमच्या सर्व सदस्यांनी बरीच चर्चा केलेली आहे. यापूर्वी जिथे आरक्षण नव्हते तेथे आरक्षण दाखविले गेले आहे. विस्थापित लोकांना आम्ही जेथे बसविले होते. त्या जागेवर सुध्दा आरक्षण टाकण्यांत आलेले आहे. रस्त्त्यांबाबत आमच्या ब-याच सभा झाल्या आहेत. व बरीच चर्चा झाली आहे त्यानंतर आम्ही सर्वांनी मिळुन एक प्लान तयार केला आहे. तो सर्वांच्या समोर आहे. आणि त्याचे श्रेय विशेषतः आर्किटेक्ट श्री. बुलचंद सोनेसर यांना आम्ही देऊ इच्छितो त्यांनी खुपच मेहनत करून आपले सहकारी जे त्यांचे आर्किटेक्ट होते. त्यांच्या बरोबर बसुन एक रिपोर्ट तयार केला आहे तो आमच्या समोर ठेवला आहे. त्याबाबत आम्ही श्री. सोनेसर यांना धन्यवाद देत आहोत. ज्यांनी आपली बहुमूल्य वेळ देऊन त्याचबरोबर त्यांचे जे सहकारी होते त्यांनी व आमच्या महापालिकेच्या कनिष्ट अभियंत्त्यांनी सुध्दा कठोर परिश्रम करून हा प्लान तयार केला आहे यात आपल्या सर्वाचा तर सहभाग आहे. या प्लान बाबत आम्ही श्री. बुलचंद सोनेसर यांना धन्यवाद देतो. व सर्व सदस्यांना सांगु इच्छिते की, सभा ब-याच झाल्या आहेत, सर्व प्रस्ताव आपल्या समोर ठेवले होते. जिथे जिथे आरक्षणे हटवायची आहेत किंवा रस्त्त्याची रूंदी कमी करायची आहे, जे ३३ रोड आम्ही मंजुर केले होते. त्यातील बहूतांश पुर्ण झाले आहेत. व याच रस्त्त्यांची रूंदी पुन्हा वाढवून दाखविली आहे. वाजवी असे जे बदल करायचे होते. ते केलेले आहेत. तर मी सर्वांना असे निवेदन करते की, आपण सर्वजण मिळून या विकास आराखडयास जो आपण सर्वजण मिळुन तयार केला आहे. तो आपण एम.एम.आर.डी.ए. ला पाठवू. व त्यांना विनंती करू की, तो आम्हास मंजुर करून दया. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, विकास आराखड्यावर चर्चा करण्यासाठी आज जी महासभा बोलावण्यांत आली आहे. त्यात आपणांस जो ठराव पारीत करून पाठवायचा आहे. जसे आम्ही पहिलेच सांगितले होते



की, ठराव काय आहे तो आम्हास वाचुन दाखविला जावा. किंवा त्याची प्रत दिली जावी. वाचुन तर दाखविला नाही. परंतु त्याची जी प्रत मिळाली आहे. त्यात दोन प्रकारचे ठराव आहेत. त्यातील महासभा ठराव क्र. ८ जो श्री. बी. बी.मोरे साहेबांनी वाचुन दाखविला व सभागृह नेत्त्यांनी सांगितले की, आमच्याकडे दिलेला आहे. तर तो ठराव हा आहे. व महापौरांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय सदस्यांच्या सभेत आज दुपारी १२ वाजे पर्यंत जो निर्णय घेण्यांत आला त्याचा जो ठराव आहे तो दुस-या कागदावर आहे. परंतु त्या कागदास महत्त्व न देता, ठराव क्र. ८ या दुस-या ठरावास म्हंटले जात आहे. या ठराव क्र. ८ मध्ये जी सुरूवात आहे. ती अशी आहे की, ही महासभा वरील प्रस्तावने व कारणानुसार नियोजन व विकास समिती व मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली रचलेल्या विशेष समितीच्या अहवालावर सुसंगत अशी सोबत जोडलेल्या परीशिष्ट, नियोजन समिती मध्ये काय ठराव पारीत झाला आहे ते आम्हाला माहित नाही. व या महासभेमध्ये जो ठराव क्र. ८ पारीत करण्यासाठी दिलेला आहे. त्यामध्ये सुरूवातीस असे लिहिले आहे की, ही महासभा असा ठराव पारित करित आहे की, नियोजन व विकास समितीचा जो ठराव पारीत झाला आहे. व महापौरांच्या अध्यक्षतेखाली जी सर्व दलीय समिती तयार केली होती त्यांनी जो निर्णय घेतलेला आहे त्यानुसार विकास योजनेच्या मसुदयास ज्या हरकती घेतल्या गेल्या होत्या त्या काल आम्ही हा जो गठ्ठा दिला होता. त्या हया आहेत. परंतु त्यानंतरही जे अंतीम निर्णय घेतले होते. ते हे आहेत. तर जर हा ठराव क्र ८ पारीत केला तर या दोन्ही समितींचा निर्णय एकत्रित करून जसे नियोजन व विकास समितीने तयार केलेला ठराव व आपल्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेला ठराव, आरक्षित भुखंडाबाबत ज्या हरकती घेतल्या त्याबाबतचा हा ठराव हे दोन्ही मिळुन आम्ही हा ठराव पारीत करीत आहोत असे आहे. असे केले तर चुकीचे होईल. आपल्या अध्यक्षतेखाली निर्णय घेऊन आम्ही जो ठराव तयार केला आहे. त्यामध्ये आठ-दहा मुददे आहेत. जसे की, सर्वदलीय सभेमध्ये असा निर्णय झाला होता की, ज्या आरक्षित भुखंडावर जर वस्ती असेल, इमारत असेल तर त्या आरक्षित भुखंडाचे रहिवासी झोन केले जावे. व बाकी जे भुखंड उरतात जेथे वस्ती नाही किंवा इमारती नाहीत असे भुखंड आरक्षित केले जावेत. असे आम्ही ठरविले आहे. परंतु ते झाले नाही. आता जसे की आम्ही म्हणतो की, समितीच्या सुनावणीच्या व राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन जो कायदेशिर ठराव आहे असे सांगितले जाते त्यामध्ये असे लिहीले आहे की, राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन व आम्ही आपल्या अध्यक्षतेखालील सर्वदलीय समितीमध्ये जो निर्णय घेतला त्यामध्ये असे लिहिले आहे की, प्रारूप विकास आराखडा शासनाने मंजुर करण्यापूर्वी शासनाने महापालिकेला विश्वासात घेऊन नंतरच मंजुर करावा अशी विंनती करण्यांत येईल. आता आम्ही दोन वेगवेगळया गोष्टी करत आहोत. एक तर आम्ही शासनाला विनंती करत आहोत की, आम्हाला विचारल्या शिवाय हे मंजुर करू नका. व या दुस-या ठरावामध्ये असे लिहिले आहे की, शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन आम्ही मान्यता देत आहोत. तर हे चुकीचे होत आहे. तर कोणता ठराव पारीत करायचा त्याबाबत सर्व सदस्यांना माहिती असली पाहिजे की, आपल्या अध्यक्षतेखाली सर्वदलीय नेत्त्यांच्या सभेमध्ये निर्णय झालेला ठरावच आम्ही येथे पारीत केला पाहिजे. नियोजन व विकास समितीने काय ठराव पारीत केला आहे ते आम्हाला माहित नाही. या दोन्हीं समित्त्यांचे निर्णय एकत्रित करून, व त्या समितीमध्ये जे सदस्य गैरहजर असतील त्यांच्या दुदैवाने त्यांच्यश जर सुचना व हरकती आल्या नसतील तर ते येणार नाही. आम्हाला या ठरावाशी काही देणे घेणे नाही. तरीही सर्वदलीय समितीने एकमताने हा ठराव पारीत केला आहे. परंतु तो कायदेशिर नसेल तर तो

कायदेशिर कसा होईल यासाठी आम्ही सर्वांनी एकत्र बसुन चर्चा करावयास पाहिजे. यासाठी दहा-पंधरा मिनिटे सभा स्थगित करून निर्णय घेतला जावा.

--११--

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :-महापौरजी, मगाशी मी जे बोललो की, नविन विकास आराखडा जो आहे. तो रद्द करण्यांत यावा. परंतु मगाशी मी ज्या पध्दतीने बोललो की, बी.एम.आर.डी.ए.नी जो नकाशा तयार केला आहे तो उल्हासनगर शहराच्या सामाजिक व भौगोलिक परिस्थितीचा विचार न करता तयार केलेला आहे. त्यामध्ये कुठल्याही अधिका-याला किंवा महापालिकेला विश्वासात घेतलेले नाही. त्याचप्रमाणे आताही या विकास आराखड्यावर हरकतींचे जे मुद्दे आणले आहेत. त्याबाबत तुम्ही या ठरावामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, कॉंग्रेस गटनेता, आर.पी.आय गटनेता, जिल्हाध्यक्ष या सर्वांना विश्वासात घेऊन हरकतीचे मुद्दे उपस्थित केले आहेत. परंतु माझे असे म्हणणे आहे की, आम्हा कोणालाही इथे विश्वासात घेतले गेलेले नाही. आणि असे विश्वासात न घेता जर असे मुद्दे उपस्थित करत असतील तर त्याला आमचा विरोध राहिल.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u>:-महापौरजी, सुरवातीलाच आम्ही म्हंटले होते की,प्रशासनाकडुन जो प्रस्ताव आहे. त्याचीही माहिती सभागृहास मिळाली पाहिजे. ती माहिती दिली तर त्यावर आणखी चर्चा होऊ शकेल.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> मा.महापौरजी, आम्ही जी रस्त्यांची यादी तयार केली आहे. त्यामध्ये शहाड फाटकच्या शिवाजी रोडचा कुठेही उल्लेख नाही. त्याबाबत आम्ही हरकत घेतलेली आहे. ४० फुट रूंदीचा रस्ता पुर्वीच्या विकास आराखड्यामध्ये होता, त्यानुसार सध्या तो ४० फुट रूंदीचा रस्ता आहे. आता नविन विकास आराखडयात ६० फुट रूंदीचा दाखविण्यांत आला आहे. त्याचा काही उल्लेखच नाही तर आम्ही हा प्रस्ताव कसा पास करणार?

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार)</u>:-३० लोकांच्या समितीने दिलेल्या ठरावाव्यतिरिक्त आयुक्त साहेबांनी / प्रशासनाने जो प्रस्ताव सुचना आणि हरकतींसाठी दिला आहे. मंजुर विकास आराखडयामधील ज्या भुखंडावर बांधकाम परवानगी दिली आहे. त्याबाबतचे जे प्लान महापालिकेने मंजुर केले आहेत. त्याबाबतची माहिती त्यांना दिली आहे की, या जागेवर बांधकामास परवानगी देण्यात आलेली आहे. त्याचा विचार झाला पाहिजे. व चार ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी आम्ही ३७चा जो प्रस्ताव पाठविला आहे. तो मंजुर केला पाहिजे. तसेच मुस्लिम कब्रिस्तानसाठी जागा नाही आहे ती त्यांना दिली गेली पाहिजेत. ख्रिच्छन धर्मीयांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये जागा दिली आहे. ती या विकास आराखडयामध्ये दाखविणे आवश्यक आहे. व ज्या चार साईटस् पर्यायी जागा म्हणुन आम्ही दिलेल्या आहेत. ७४ ,१०३ ,१४ व १६ यांच्याबाबतीत किरकोळ सुधारणा मंजुर करून मंजुर विकास आराखडयात ते दाखविले पाहिजे. तसेच जवाहर हॉटेलच्या बाजुला सध्या जी शाळा आहे. त्याबाबत उच्च न्यायालयात याचीका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने असे आदेश दिले आहेत की, आयुक्तांनी याबाबत निर्णय दयावा. त्या हिशोबाने त्यावेळच्या आयुक्तांनी श्री. बक्शी साहेबांनी असे लिहुन पाठविले आहे की, आम्ही याबाबतीत सुधारणा करून प्रस्ताव शासनास सादर करणार आहोत. शासनानी जर त्यास संमती दिली तर आम्ही ठेऊ नाहीतर कार्यवाही करू. ग्रीनकोल बाबत आम्ही जो ठराव पारीत केला होता. तो मंजुर करण्यासाठी पाठविण्यात आला आहे. व डॉल्फीनच्या समोर जे मैदान आहे ते प्रारूप विकास आराखडयामध्ये दाखविले आहे. परंतु मंजुर विकास आराखडयामध्ये ते रहिवासी झोनमध्ये दाखविले होते. त्यास महाराष्ट्र शासनाने ४७ च्या अपीलान्वये असे आदेश दिले आहेत की, मंजुर विकास

आराखडयामध्ये जो प्रस्ताव व जी मंजूर विकास नियंत्रण नियमावली आहे,ती लक्षात घेऊन ६० दिवसाच्या आत तो नकाशा मंजूर केला जावा. विकासकर्त्याने इमारत बांधकामासाठी परवानगी मागितली आहे, त्यानुसार



आम्ही त्यावर कार्यवाही करत आहोत. अशा प्रकारचा प्रस्ताव आम्ही पाठवत आहोत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मा. महापौरजी.........

मा. सदस्य श्री.बी.बी.मोरे :- मा. महापौरजी, श्री. राजानीजी, एक मिनिट मला बोलू दया.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-श्री. मोरे जी दुस-यांदा आपण मला बसण्यास सांगत आहात.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-यांनी आता जे सांगितले, मा. महापौरजी, डॉलफिन क्लबच्या समोर खेळण्यासाठी जे मैदान आरक्षित होते ते मैदान आता शासनाने रहिवाशी झोन म्हणून दर्शाविले आहे. दुसरे असे की, काही धनिक लोक आपल्या महापालिकेला न जुमानता थेट शासनाकडे जाऊन आरक्षित भुखंडावरील जमिनीची सनद घेऊन येतात, नकाशा मंजूर करुन घेऊन येतात, तर मी असा विचार करतो की आपल्या महानगरपालिकेचे कर्तव्य काय आहे? आपल्या महानगरपालिकेचे हे धोरण राहिले पाहिजे की, जो भुखंड ज्या कामासाठी आरक्षित केला आहे, त्याच कामासाठी तो विकासीत केला गेला पाहिजे. खेळण्याच्या मैदानासाठी जर एखादा भुखंड आरक्षित असेल तर तो त्यासाठीच राहिला पाहिजे. जर एखादी व्यक्ती शासनाकडुन अशा या भुखंडावरील जागेची सनद घेऊन येत असेल व आमचे नगररचनाकार त्या जागेवरील बांधकामाची परवानगी पुटअप करत असतील, व ती बांधकाम परवानगी मंजूर केली जाते, आज शहरामध्ये कुणी हॉटेल बांधत आहे, तर कुणी काय काय बांधकाम करत आहे, हे होता कामा नये. जी जागा आरक्षित आहे, ती आरक्षितच राहिली पाहिजे.

आयुक्त साहेब, श्री. पोखरकर साहेब,माझे ऐकून घ्या,जर शासन आपणास लेखी देते की, या भुखंडाचे जमीनीवरील बांधकामास परवानगी दिली जावी. परंतु आपण आपल्या महापालिकेच्या वतीने शासनास तसे करता येत नसल्याबाबत कळविले पाहिजे. कारण महासभेमध्ये लोकप्रतिनिधी जो ठराव पारित करुन शासनाकडे पाठवितात, त्या ठरावाची अंमलबजावणी झाली की नाही हे महानगरपालिका कधी पाहत नाही, समजा, जुलै महिन्यातील आजची हि विशेष महासभा झाली की, सर्वजण विसरुन जातात. परंतु तसे न करता आपण शासनाकडे स्मरणपत्र पाठविले पाहिजे. त्यानंतर झोपलेल्या राज्य शासनास जागे केले पाहिजे. व सांगितले पाहिजे की, आमच्या शहरात विकास कार्यासाठी जे भुखंड आरक्षित केले आहेत ते त्याच कामासाठी राहिले पाहिजे. अशाप्रकारे आपल्या महानगरपालिकेने आपले कर्तव्य निभावले पाहिजे.

श्री. सोनावणे (नगररचनाकार) :-एका केसमध्ये असे झाले होते की, त्यांनी बांधकाम परवानगीसाठी प्लान सादर केला तो प्लान आम्ही नामंजुर केला. कारण की, येणा-या विकास आराखडयामध्ये हा भुखंड खेळाच्या मैदानासाठी आरक्षित केलेला आहे. आम्ही प्लान नामंजुर केल्यानंतर विकासकर्ता अपिलमध्ये राज्यशासनाकडे गेला. त्या अपिलच्यावेळी मी स्वत: तेथे होतो. बी.एम.आर.डी.ए.चे प्रतिनिधी होते व मंत्री महोदय होते. सुनावणीच्यावेळीही मंत्रीमहोदयांना मी ते सांगितले होते. व ते जे आदेश आहेत त्यामध्ये स्पष्ट असे लिहिले आहे की, महानगरपालिकेच्या प्रतिनिधीने असे सांगितले होते की, याठिकाणी खेळाचे मैदान प्रस्तावित केले जाणार आहे. त्यामुळे या जागेवर बांधकाम

करण्यास आम्ही परवानगी देऊ शकत नाही. व बी.एम.आर.डी.ओ.चे जे अधिकारी आले होते त्यांनी सुध्दा लिहुन दिले होते की, नविन विकास आराखडयामध्ये आम्ही जे आरक्षण टाकले आहे. आपण याठिकाणी बांधकाम परवानगी दिली तर त्याचे आम्ही कार्यवाही करू शकणार नाही. यानंतर सुध्दा मंत्रीमहोदयांनी याकामी



आदेश दिले आहेत. आदेश देण्यापुर्वी जी सुनावणी झाली होती. त्यावेळी त्यांना हे सर्व माहित होते. व सुनावणीच्या वेळी आम्ही सांगितले होते. त्याप्रमाणे त्या आदेशामध्ये सुध्दा हे आलेले आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:</u>-एखादा विकासकर्ता अपिलमध्ये शासनाकडे जाऊन एखादया मंत्रीमहोदयांकडुन बांधकाम परवानगीचे आदेश आणत असेल तर त्या आदेशाचा येथे विरोध केला पाहिजे. नाहीतर प्रत्त्येकजण वैयक्तिकपणे शासनाकडे जाऊन आरक्षित प्लाटवर बांधकाम करण्यास परवानगी घेऊन येईल. त्यामुळे शहराचा विकास मात्र होऊ शकणार नाही. आम्ही जो विचार करतो की, उल्हासनगर शहर सुंदर झाले पाहिजे, नंदनवन झाले पाहिजे. परंतु ते होऊ शकणार नाही. माझी सदनास व महापौरांना विनंती आहे की, आपण हे राज्य शासनास लेखी कळविले पाहिजे. जर कुणी एखादा मंत्रीमहोदय किंवा अधिकारी राखीव भुखंडावर बांधकाम करण्यास परवानगी देत असेल तर त्याचे सुध्दा नाव या महासभेमध्ये जाहिर केले पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :</u>-मा.महापौरजी, परवानगी आहे ना? प्रशासनाचा जो प्रस्ताव बी.एम.आर.डी.ए.कडे पाठविला जात आहे. त्यामध्ये ज्या साईटस्‌चा उल्लेख केला आहे त्या साईटवर आरक्षण असुन सुध्दा प्लान पास केला आहे. व असा एक भुखंड आहे की, ज्यावर बांधकाम करण्यास ६० दिवसाच्या आत परवानगी दिली जावी. असा कुण्या एका मंत्रीमहोदयांचा आदेश आहे. ज्या भुखंडाबाबत आपण चर्चा करत आहोत श्री. मोरे ज्यावर चर्चा करत आहेत. त्याबाबत मंत्रीमहोदयांनी आपल्या आदेशात असे म्हंटले आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेची सुधारीत प्रारूप विकास योजना मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाने अद्याप प्रसिध्द केलेली नाही. त्याच्यामुळे त्यांनी आदेश दिला होता. परंतु आता ती प्रसिध्द झाली आहे. व जी प्रसिध्द झाली आहे ती शासन अधिसुचनेत आलेली आहे. त्यावर राज्यापालांची स्वाक्षरी आहे. राज्यपालांच्या स्वाक्षरी नंतर त्या शासन अधिसुचनेस विरोध करणे हे मंत्रीमहोदयांच्या हातात नाही.तसेच आपल्याही हातात नाही. आपण विकास आराखडा येण्याच्या अगोदर जर त्या आदेशाचे पालन केले असते तर वेगळे होते. अद्याप आपण त्या आदेशाचे पालन केलेले नाही. हा एक विषय दुसरा विषय असा आहे की, आरक्षित भुखंडावर आपण जे प्लान पास केलेत त्यासाठी आपण हा जो प्रस्ताव तयार केला आहे. या प्रस्तावामध्ये फार मोठी चतुराई केलेली आहे. ज्यांनी सुध्दा हा प्रस्ताव तयार केला आहे, मी कुणाचेही नाव घेत नाही. हा प्रस्ताव तयार करण्यामध्ये फार मोठी चतुराई आहे. या प्रस्तावामध्ये शेवटचा जो मुददा लिहिला आहे. तो हा आहे की, प्रारूप विकास आराखडयात आरक्षित असलेल्या भुखंडावर जे नकाशे मंजुर करण्यांत आले आहेत. ते रदद करण्यांत यावेत.

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार):</u>-याबाबत मी आपणांस असे सांगतो की, सन्माननिय नगरसेवक श्री. महाडिक साहेब, यांनी जसे सांगितले तसेच्या तसे लिहिले आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :</u>-माझे ऐकुन घ्या. या चतुराईबाबत मी सांगतो आहे ना, मी सुध्दा त्यावेळेला असे म्हंटलो होतो ते लिहा परंतु आपण श्री. महाडिक साहेबांचे ऐकले. माझे ऐकले नाहीत. नविन विकास आराखडयामध्ये आपण कोणते प्लान मंजुर केले आहेत?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-आपणांस मंजुर नसेल तर आपण बदल कराल ना?



मा.महापौरः-श्री. राजानीजी, आता मी सभा अर्ध्या तासासाठी स्थगित करीत आहे. आता आपण जेऊन घेऊ या. प्रस्ताव आपण सर्वजण मिळुन तयार करू या व त्यानंतर येऊ.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-दोन मिनिटामध्ये मी हा विषय समाप्त करतो. त्याशिवाय जेवण बरोबर लागणार नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, येथे असे लिहिले आहे की, प्रारूप किंवा आधीच्या, म्हणजे जो मंजुर विकास आराखडा होता.त्याच्या अंतर्गत जर आपण कोणता प्लान पास केला आहे. तो रद्द केला जावा.

मा.महापौरः-आपण प्रारूप विकास आराखडयावर चर्चा करत आहोत. मागच्या विकास आराखडयात काय टाकु इच्छितात? आज आपण येथे जो बसलो आहोत तो प्रारूप विकास आराखडयावर चर्चा करून योग्य तो ठराव पारीत करून बी.एम.आर.डी.ऐ.ला पाठवु इच्छित आहोत. मंजुर विकास आराखडयाबाबत काय उल्लेख करू इच्छित आहात?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मंजुर विकास आराखडयानुसार नविन प्रारूप विकास आराखडयामध्ये परिवर्तन आलेले आहे. त्याची त्याच्याशी जोड आहे.

मा.महापौरः-असे करू या, आपण अर्ध्या तासासाठी सभा स्थगित करू या.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-आपले जे उत्तर आहे ना, त्याची अनौपचारिकता काय आहे ते मी सांगु इच्छितो नविन विकास आराखडा आणि पुर्वीचा विकास आराखडा यामध्ये जोड आहे. विस्थापित झालेल्या लोकांना जेथे पर्यायी जागा दिली तो भुखंड शाळेसाठी आरक्षित आहे. जेथे पुर्वी पार्किंगचे आरक्षण होते. किंवा शॉपिंग कॉम्पेक्सचे परिवर्तित आरक्षण होते. तेथे ट्रान्सपोर्टचे आरक्षण आहे. तर अशाप्रकारे आपण कसे करणार. पुर्वीच्या विकास आराखडयानुसार प्लान पास केले. आता त्यामध्ये परिवर्तन आले आहे. पुर्वीच्या आणि आताच्या विकास आराखडयामध्ये जोड आहे.

दुसरा विषय असा की, आयुक्त साहेब, आपल्याकडे एखादा चार-पाच भुखंडाचा विषय प्रलंबित आहे. येथे महासभेमध्ये लक्षवेधीव्दारे तो विशेष विषय आणण्यांत आला त्यावर आपण अदयाप निर्णय घेतला नाहीत. तर त्यापुर्वीच आपण आपले मत लिहुन कसे पाठविणार? आम्ही हे प्लान पास केले म्हणुन विकास आराखडयामध्येय बदल केला पाहिजे. महासभेमध्ये आपण आपले मत दिले नाही. लक्षवेधी सुचना आणण्यांत आली होती. तिचे उत्तर आपण दिले नाहीत. आपण म्हणाला होतात की, मी अभ्यास करतो, त्यानंतर उत्तर देतो. त्याच्यावर अभ्यास केल्याविना, त्याचे महासभेत उत्तर दिल्याविना आपण बी.एम.आर.डी.ए.ला लिहुन पाठविणार की, आम्ही हे मंजुर केले आहे. आपण मंजुर करून दया. विकास योजनांमध्ये परिवर्तन आणा.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-एक गोष्ट मी आपणांस सांगु इच्छितो, ते प्लान त्यावेळच्या महापालिका आयुक्तांनी मंजुर केले होते. जोपर्यंत त्या कागदपत्रामध्ये काही फसवणुक आहे. हे सिध्द होत नाही. तोपर्यंत प्लान रिवोक करण्याची कार्यवाही करू शकत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-आयुक्तांकडे विषय प्रलंबित आहे. त्यांनी महासभेला उत्तर दिलेले नाही. असे असताना बी.एम.आर.डी.ए.ला आपण आपले मत कसे कळवु शकता?

--१५--

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-साठ दिवसाच्या आत आम्ही उत्तर दिले नाही. त्यानंतर आम्ही पाठवु शकणार नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-नका पाठवु ना, कोणाला चिंता आहे? आपणास त्याची का चिंता आहे?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-मी प्रशासन व महापालिकेच्या वतीने बोलत आहे. त्यामध्ये फक्त हा एकच मुददा नाही आहे. अनेक मुददे आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-जो विषय महानगरपालिकेत उपस्थित केला आहे त्याबाबत आपण चिंता का करत आहात? मी बाकीचे विषय सोडुन देत आहे. परंतु जो विषय लक्षवेधी सुचनेव्दारे महासभेमध्ये आणण्यांत आला त्याबाबत आपण काळजी का करत आहात?यामध्ये आपले काही वैयक्तिक सारस्य आहे काय?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-याबददल मी काही बोलु शकत नाही. आयुक्त साहेब उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मी आयुक्त साहेबांनाच विचारत होतो आपण का उत्तर देत आहात?

मा.महापौरः-आपणांस आयुक्तांकडुन उत्तर हवे आहे काय?

मा.आयुक्त(श्री. बी.आर. पोखरकर):-सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सदस्य मी असे समजतो की, आजची विशेष महासभा बी.एम.बार.डी.ए.ने तयार केलेल्या प्रारूप विकास आराखडयावर हरकती व सुचना जे सदस्य उपस्थित करतील त्याबाबत बोलावण्यांत आलेली आहे. आपणा सर्वांना माहित आहेच की, बी.एम.आर.डी.ए. ने या शहरासाठी प्रारूप विकास आराखडा तयार केलेला आहे. त्यावर नागरिकांच्या सुचना व हरकती घेण्यासाठी ठेवला आहे. आज जी विशेष सभा बोलावली आहे तीचा उददेश असा आहे की, एम.एम.आर.डी.ए ने जो प्लान बनविला आहे तो नागरीकांच्या आवश्यकतेसाठी असतो. तो समतोल आहे किवा नाही. त्यामध्ये रहिवास औदयोगिक, व्यापार इत्त्यादीसाठी पुरेशी तरतुद केलेली आहे किंवा नाही. ज्या सार्वजनिक उपयोगाच्या गोष्टी आहेत जसे रस्ते, दवाखाने, व अनेक सार्वजनिक वापरासाठीचे आवश्यक त्यागरजांसाठी पुरेशा जागेची तरतुद केलेली आहे किंवा नाही. यावर चर्चा करावयाची आहे. त्यावर सूचना व हरकती घ्यायच्या आहेत.

मागच्या महासभेत आपण जी लक्षवेधी सुचना मांडली होती. त्याबाबत मी अभ्यास सुरू केला आहे. अभ्यास पुर्ण झालेला नाही. ते जे प्लान आहे ते यापुर्वीच्या आयुक्तांनी मंजुर केलेले आहेत. जेव्हा आयुक्त प्लान मंजुर करतात तेव्हा त्यास अधिकृत स्वरूप येते. मी अदयाप निर्णायक स्थितीपर्यंत पोहोचलो नाही. ही गोष्ट बरोबर आहे कींवा नाही. परंतु आपल्या समोर जो प्रारूप विकास आराखडा सूचना हरकतीसाठी ठेवण्यांत आलेला आहे. निवडुन आलेले सदस्य त्याबाबत ज्याकाही सुचना, हरकती घेतील त्यासर्व विशेष नियोजन प्राधिकारी जे बी.एम.आर.डी.ए. आहे.

त्यांच्या समोर ठेवल्या जातील. आता आमच्या ज्याकाही सूचना, हरकती आहेत त्या मान्य करणे, नकरणे, अमान्य करणे, हा त्यांचा अधिकार आहे. सदस्यांचे जे मत आहे ते ठरावान्वये पारीत करण्यांत येणार आहे. त्याबाबत एकाच वाक्यात मी आपणांस सांगु इच्छितो,वॅटअेव्हर इज अे रिप्लेक्शन ऑफ पीपल्स रिप्रेझेंटेटीव्ह वील बी इंन्टीमेंटेड टू दी प्लानिंग ॲथोरीटी ॲन्ड ॲप्रुव्हल ॲज यु नो दी बॉडी ॲन्ड माय



सेल्फ वील आय थिंग. वील हॅव नो टू प्रीव्हेंन्ट ओव्हर दी स्पेशल प्लानिंग ॲथोरीटी तर तो त्यांचा अधिकार आहे. आजच्या महासभेचा जो उददेश आहे, आम्ही जो ठराव पारीत करू तो तिकडे पाठवु . मला वाटते यापेक्षा अधिक स्पष्टीकरण करण्याची काही आवश्यकता नाही.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :</u>-आयुक्त साहेब, एक सेकंद हा जो मुददा श्री. नरेंद्र राजानी यांनी उपस्थित केला. व आपणाकडुन उत्तरही मागीतले त्याबाबत आयुक्त म्हणुन प्रशासनाच्या वतीने एक स्वतंत्र प्रस्ताव, कारण की,मंत्रीमहोदयांचा आदेश आहे त्यासाठी आपण त्याची पुर्तता करत आहात. आपणास असे का वाटत नाही की जसे प्रारूप विकास आराखडा दिला आहे. त्याचे पृष्ठ क्र. १५४ वर जर आपण पाहिले तर खेळाच्या मैदानासाठी चार हेक्टर प्रती १० हजार लोकसंख्येस एक याप्रमाणे स्टॅंडर्ड आहे. अपेक्षित असे लिहिले आहे की, १७७.२० हेक्टर, व सध्या शहरात फक्त ४ हेक्टर उपलब्ध आहे. त्यासाठी या शहरात फार मोठी तुट आहे. प्रशासनाचे प्रमुख या नात्याने आपणांस असे का वाटले नाही की, शासनास असे लिहुन पाठवावे की, खेळाच्या मैदानासाठी हे जे आरक्षण आहे ते बदलले जाऊ नये. असे आपणांस का वाटले नाही? आयुक्त म्हणुन आपण शासनास अशा आशयाचे पत्र पाठवायला हवे होते. शहरामध्ये खेळाची मैदाने अगोदरच कमी आहेत त्यामुळे आम्ही हे आरक्षण बदलू इच्छित नाही. असा आपला प्रस्ताव असावयास पाहिजे होता. जो प्रत्यक्षात आला नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- </u>यापुर्वीच्या आयुक्तांनी जे प्लान मंजुर केले. त्यास अधिकृत स्वरूप प्राप्त होते. परंतु या फाईलींवरील आपला अभ्यास अद्याप बाकी आहे. कुणीही व्यक्ती चुक करू शकतो. परमेश्वराकडुन सुध्दा चुका होऊ शकतात, जर तेथे काही त्रुटी आहेत, चुका आहेत. तर त्या यापुर्वीच्या आयुक्तांनी केलेल्या आहेत, या फाईलींवरील आपला अभ्यास अद्याप बाकी आहे. आपला निर्णय याच्या विपरीत येवू शकतो. मागच्या आयुक्तांनी जे प्लान पास केले होते. होऊ शकतो कदाचित आपणांस त्यामध्ये काही चुका आढळून येऊ शकतात. आपण असे उत्तर दया की, त्यामध्ये चुका होत्त्या. मी प्लान रदद करतो. कलम २५८ अन्वये आपण ते प्लान रदद करा. परंतु त्यापुर्वी जर आपण बी.एम.आर.डी.ए.ला आपले मत दिले असेल तर आम्ही हा प्लान मंजुर केला आहे. आपण त्यावरील आरक्षण रदद करा. म्हणजे यामधुन दोन गोष्टी आपणांस दिसुन येतात. एकतर आपण म्हणता की प्लान रदद करा. व दुसरे असे की, बी.एम.आर.डी.ए.ला लिहुन पाठवत आहात. तर लिहुन पाठविण्याची गोष्ट होता कामा नये. जसे श्री. लाल पंजाबी यांनी म्हंटले की, आपल्या शहरामध्ये खेळाची मैदाने किती आहेत? आपल्याकडे किती प्लॉट आरक्षित आहेत? किती प्लॉट वाचले आहेत? कमीत कमी ३ टक्के जमिन उपलब्ध आहे. आपण शहराचे प्रतिनिधीत्त्व केले पाहिजे. आपण कुणाएका व्यक्तीचे वैयक्तिक प्रतिनिधित्त्व केले नाही पाहिजे. आपण जर प्रामाणिकपणे बी.एम.आर.डी.अे ला लिहुन पाठविले की,येथे असेअसे आहे. त्यानुसार मला असे वाटते, परंतु आपण असे म्हणाल की, यापुर्वीच असे झाले आहे. मंत्रीमहोदयांच्या आदेशानुसार साठ दिवसाच्या आत मला प्लान पास करायचा आहे. या भुखंडाचे आरक्षण हटविले पाहिजे. तर हे शहराच्या हिताच्या विरूध्द होईल.

मा.महापौर :-रजानीजी, ही सभा अर्ध्या तासासाठी मी स्थगित करीत आहे. आपण तिकडे बसुन प्रस्ताव तयार करू. जेवणासाठी सर्वांना निमंत्रित करतो.

दुपारी २. ४० वाजता सभा अर्ध्यातासासाठी स्थगित करण्यांत येत असल्याचे मा.महापौरांनी जाहिर केले.

--१७--

मा.सचिव :-कृपया सर्वांनी लक्ष दयावे. या सभेची पुन्हा सुरूवात करण्यांत येत आहे.

सायंकाळी ५. ३५ वाजता सभेचे कामकाज पुन्हा सुरू करण्यांत आले.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-प्रस्तावना आपणा सर्वांसमोर ठेवली आहे.

विषय :-उल्हासनगर शहरासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखडयाबाबत.

उल्हासनगर शहरासाठीचा प्रारूप विकास आराखडा दि.१०.५.२००० रोजी प्रसिध्द झाला असून सध्या त्यावर सुचना व हरकती मागविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रारूप विकास आराखडयावर चर्चा करण्यासाठी मा.महापौर उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली विविध पक्षांचे ३० नेते नगरसेवक तसेच शहरातील मान्यवर वास्तुविशारद यांची समिती स्थापन करून त्यात या समितीने २०.५.२००१ ते ३.७.२००१ या कालावधी दरम्यान प्रारूप विकास आराखडयावर सखोल चर्चा करून खालील मुदयांवर महानगरपालिकेतर्फे सुचना व हरकती घेण्याचे निश्चित करण्यात आले.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:- मा.महापौरजी, एक सेकंद, हे काय ठराव वाचुन दाखवित आहेत काय? नाही या अगोदर सभा स्थगित केली होती. त्यावेळी आयुक्त साहेबांना खेळाच्या मैदानांबाबत विचारणा करण्यांत आली होती. महानगरपालिकेचे जे कर्तव्य आहे. आज जे आरक्षित भुखंड आहेत. त्यावरजी खेळाची मैदाने होती. आमचे म्हणणे आहे की, प्रशासनाने प्रस्ताव पाठविला नाही पाहिजे. त्याबाबत आपण उत्तर दिलेले नाही. हे सभा स्थगित करण्याअगोदर विचारले होते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-सभागृहाला आपणाकडुन याचे आश्वासन हवे आहे. आपण कीती आरक्षित भुखंडांवर प्लान पास झाले आहे अशी सुचना बी. एम.आर.डी.ए.ला प्रशासनाच्या वतीने पाठवू इच्छित आहात. दॅट शुड बी मेयर सुचना ॲण्ड नो रिकमंडेशन.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-सभागृहात सांगितले तर बरे होईल.

मा.आयुक्त (बी.आर.पोखरकर):-मा.महापौर महोदय, सन्माननिय सदस्य, आरक्षित भुखंडाबाबत प्रशासन जो अहवाल एम.एम.आर.डी.ए.ला पाठविणार आहे त्याबाबत कशा प्रकारे तो पाठविला जाईल याबददल विचारणा केलेली आहे. याबाबत मी आपणाला सांगु इच्छितो की, हा जो अहवाल असेल तो वस्तुस्थिती दर्शक असेल. त्याच्या पलिकडे काहीही त्याच्यात नसेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- तुमच्या कडुन काहीच शिफारस नसेल?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):- समितीने २०.५.२००१ ते ३.७.२००१ या कालावधी दरम्यान प्रारूप विकास आराखड्यावर सखोल चर्चा करून खालील मुद्यांवर महानगरपालिकेतर्फे सुचना व हरकती घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

१. प्रारूप विकास आराखड्यात क्षेत्रफळ १३३४ हेक्टर ऐवढे दाखविण्यात आले आहे. आणि जो मंजुर विकास आराखडा आहे त्यामध्ये ते १३०० हेक्टर दाखविण्यात आले होते. ३४ हेक्टर क्षेत्रफळ जे वाढविण्यात आले आहे. यांचा खुलासा त्यांच्याकडुन,मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कडुन मागविणे आवश्यक आहे. कारण त्यानंतर उल्हासनगरला कोणतीही अतिरिक्त जागा



देण्यांत आलेली नाही. हे ३४ हेक्टर वाढले कसे याबाबत त्यांच्याकडुन अभिप्राय घ्यावा लागेल.

२. ब-याच अस्तित्त्वातील रोडची दिशा बदलण्यात आली आहे. रोडची दिशा व जागा अस्तित्त्वातील असलेल्या रोडप्रमाणे प्रारूप विकास आराखड्यावर दाखविण्यात यावी. तसेच मंजुर विकास आराखड्यातील रूंदीनुसार जे रोड आता आपण विकसित केले आहेत. त्या रूंदीमध्ये प्रारूप विकास आराखड्यात बदल करण्यात येवू नये.

३. प्रारूप विकास आराखड्यामध्ये अस्तित्त्वातील टाटा लाईन दाखविण्यात आलेली नाही. तसेच पाणी पुरवठा केंद्र व विद्युत केंद्र हे सुध्दा दाखविण्यात आलेले नाही. ते दाखविणे आवश्यक आहे.

४. संपुर्ण शहरातील अस्तित्त्वातील नाल्या विकास आराखड्यामध्ये दाखविण्यात आलेल्या नाहीत त्या दाखविणे आवश्यक आहेत.

५. प्रारूप विकास आराखड्यामध्ये जी आरक्षित भुखंडे दाखविण्यात आली आहेत त्यापैकी ज्या भुखंडावर इमारती अगर वस्ती आहे ते भुखंड वगळुन रिकाम्या जागेवर आरक्षणे ठेवावीत.

६ प्रारूप नियंत्रण नियमावलीमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. जसे कमी क्षेत्रफळाचे प्लॉट म्हणजे आता नियंत्रण नियमावली सुध्दा प्रसिध्द झालेली आहे. त्यामध्ये २१ मीटरच्या पुढच्या प्लाटस्ना परवानगी कशी दयावी. याबाबत उल्लेख आहे त्याखाली उल्हासनगरमध्ये एक यार्डापासुन ते २१ यार्डापर्यंत सनद लोकांना दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये सुध्दा विकास नियंत्रण नियमावलीचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच गावठाण म्हणजे दाटीच्या क्षेत्रासाठी नियम आहेत. त्याबाबत सुध्दा या नियंत्रण नियमावलीत तरतुद करण्यांत आलेली नाही. ती करणे आवश्यक आहे. तसेच उल्हासनगर क्षेत्र दाटीचे क्षेत्र घोषित करून, दाटीच्या क्षेत्रासाठी अनुज्ञेय असणा-या चटई क्षेत्र निर्देशकाची तरतुद उल्हासनगर क्षेत्रासाठी नियंत्रण नियमावलीमध्ये करणे आवश्यक आहे.

७. प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात सुचना व हरकती ऐकण्यासाठी जी समिती स्थापण्यात येईल त्या समितीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेचे किमान दोन प्रतिनिधी घेण्यात यावेत. तसेच तज्ञ समितीने जे निर्णय घेतले आहेत ते शहराचा विकास चांगल्या पध्दतीने व्हावा व जेणेकरून प्रारूप विकास आराखड्याप्रमाणे महानगरपालिकेस चांगल्या पध्दतीने अमंलबजावणी करता येईल. अन्यथा प्रारूप विकास आराखड्याची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस अवघड होईल याबाबी विचारात घेऊन निर्णय घेतले असल्याने त्याप्रमाणे प्रारूप विकास आराखड्यात बदल करणे आवश्यक आहे.

८. प्रारूप विकास आराखडा शासनाने मंजुर करण्यापुर्वी शासनाने महापालिकेला विश्वासात घेऊन नंतरच मंजुर करावा अशी विनंती शासनास करण्यात यावी.

९. प्रारूप विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या भुखंडावर जे नकाशे मंजुर करण्यात आले आहेत ते रदद करण्यात यावेत.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-नाल्या म्हंटलात तर त्यामध्ये छोटया छोटया नाल्या सुध्दा येतील, तर सोनावणे साहेब, मोठे नाले असा उल्लेख करावा.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):- येथे संपुर्ण शहरात अस्तित्त्वात असलेले नाले म्हंटले आहे. त्यामध्ये सगळेच आले. आणि या प्रस्तावाचे सुचक आहेत सभागृह नेते श्री. किशोर वनवारी व अनुमोदक आहेत विरोधी पक्षनेत्त्या श्रीमती. सुनिता राजवानी.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मा.महापौरजी, या प्रस्तावातील ९ नं.चा जो मुददा आहे,प्रारूप विकास आराखडयात आरक्षित असलेल्या भुखंडावर जे

--१९--

नकाशे मंजुर करण्यात आले आहेत ते रदद करण्यात यावेत. हे तर जुन्या विकास आराखडयानुसार...

मा.महापौर:-नववा जो मुददा आहे तो असा आहे की, प्रारूप विकास आराखडयामध्ये आरक्षित दाखविण्यांत आलेल्या भुखंडांवर जर महानगरपालिकेने काही प्लान मंजुर केले असतील तर ते रदद केले जातील.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-ते कितीतरी वर्षापूर्वी मंजूर केलेले असतील. व आता आपण म्हणता की, ते रदद केले जातील.

मा. महापौर :- प्रारुप विकास आराखडा .....

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :- प्रारुप विकास आराखडा जो नविन विकास आराखडा आला आहे तो , हे मी समजतो. परंतु ज्यांचे प्लॅन पाच-सहा महिन्यापूर्वी मंजूर झाले असतील त्याचे काय होईल?

मा. महापौर :- ते रदद होणार नाहीत.

मा. सदस्या श्रीमती पंचशिला पवार :- मा.महापौरजी , हा जो नऊ नंबचा मुददा आहे, प्रारुप विकास आरखडयात अरक्षित असलेल्या भुखंडावर जे नकाशे मंजुर, मंजूर च्या ऐवजी प्रस्तावित असा शब्द वापरला पाहिजे. प्रस्तावित करण्यात आले आहेत, ते रदद करण्यात यावेत. मंजुर नाही, मंजुर कुठे केले आहेत? प्रस्तावित केलेले आहेत ते रदद करण्यात यावेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मा. महापौरजी, त्यामध्ये मी जोडु इच्छितो की, जो नारायण पंजाबी यांनी प्रश्न विचारला, आमच्या भगिनी श्रीमती पंचशिला पवार यांनी जो प्रश्न विचारला, त्यामध्ये मी हे जोडु इच्छितो की, . ..................... आपण त्वरीत उत्तर दिले की, ते रदद होणार नाहीत. हा सभागृहाचा निर्णय नाही, किंवा महापौरांचा संकेत होऊ शकत नाही, जर कोणत्याही आरक्षित भुखंडावर नियमांच्या आधारावर .........

मा. महापौर :-आपण, प्रारुप विकास आराखडयाबाबत बोलत आहोत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपण त्यांना त्वरीत उत्तर दिले की, ते रदद होणार नाहीत. हा इतिवृतांताचा एक भाग आहे.

मा.महापौर:- प्रारूप विकास आराखडयाबाबत आपण बोलत आहोत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपण त्यांना उत्तर दिलेत ना? आपले उत्तर हे असले पाहिजे. जे यापुर्वीच्या मंजुर विकास आराखडयातील आरक्षित भुखंडावर नियमांच्या आधारावर जर काही चुक असेल तर तो प्लान रद्द केला जाईल. जर चुक नसेल तर नाही होणार.

मा.महापौर:-एक गोष्ट ऐकुन घ्या. चार महिन्यापुर्वी आपण प्रारूप विकास आराखडयामध्ये येथे कोणता प्लान पास करून घेतला आहे का? महानगरपालिकेने केला असेल का?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आपण त्यांना म्हणालात, जुने जे प्लान असतील ते रद्द केले जातील.

--२०--

मा. महापौर :- त्यांनी पाच महिन्यापूर्वीच्या प्लॉन ची गोष्ट केली आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:- पुर्वीचे प्लान रद्द होणार नाहीत. नाहीतर या ठरावास माझा विरोध आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-सोनावणे साहेब, पाच सहा महिन्यापूर्वी तुम्ही काही प्लान मंजुर केले आहेत काय? महापौरांनी जो प्रश्न उपस्थित केला की,..

मा.महापौर:- महापौरांनी नाही केला, सदस्यांनी केला.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- आपण त्याला जे उत्तर दिले. त्याबद्दल बोलतो आहे मी. तर असे काही चार-पाच महिन्यापूर्वी आपण प्लान मंजुर केले आहेत का?

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-प्लान रोजच मंजुर होत असतात. चार-पाच महिन्यापूर्वीचा काय प्रश्न येतो? आरक्षित भुखंडावरचे प्लान मंजुर केलेले नाहीत.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- आरक्षित भुखंडावरचे प्लान मंजुर केले आहेत का? नाही ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-सदस्यांची अपेक्षा हि आहे की, महापौरांनी उत्तर दीले पाहिजे. जे चुकीचे असेल ते चुकीचे असेल.

मा.महापौर:- ठराव सर्व संमतीने पास समजायचा?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा.महापौर साहेब, हा जो नवव्या क्रमांकाचा मुद्दा घेतलेला आहे. मराठी भाषा जशी वळवावी तशी वळते. याच्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे. प्रारूप विकास आराखडयामध्ये आरक्षित असलेल्या भुखंडावर जे नकाशे मंजुर करण्यांत आले आहेत. भले पूर्वीचे असतील, आताचे असतील, नंतरचे असतील ते सर्व रद्द करण्यांत यावेत. मराठी भाषेचा हा स्पष्ट अर्थ आहे. त्यामध्ये तुम्ही असे म्हणु शकत नाही की, पाच महिन्यापूर्वीचे झालेले नकाशे रद्द करण्यांत येत नाहीत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-म्हणजे श्री. टाले यांचे म्हणणे आहे की, मंजुर आराखडयामध्ये जे प्लान मंजुर झालेत ते पण त्यात रद्द झाले पाहिजेत. असे ना?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-मराठी भाषेचा स्पष्टपणे अर्थ वास्तविक...

मा.सचिव :-आता ठराव याप्रमाणे प्रस्तावित केलेला आहे. आपल्या समोर दोन प्रस्ताव ठेवण्यांत आले होते. एक कॉम्प्युटराईज्ड व दुसरा मॅन्युअल टायपिंगचा होता. जो कॉम्प्युटराइज्ड ठराव आहे तो जसाच्या तसा ठेवायचा आहे त्यामध्ये आपला जो मॅन्युअल टायपिंगकेलेला ठराव आहे तो समाविष्ट करायचा आहे. पान नं. १ वर जर आपण पाहिले तर ९.७.२००१ अशी आहे यानंतर आपला जो मॅन्युअल टाइपरायटिंगचा ठराव आहे. तो त्यात समाविष्ट करून बाकी जो दोन पानाचा ठराव आहे तो या बरोबरच सलगपणे घेतला जाईल. व ठरावाची जी कॉम्प्युटराईज्ड बॉडी आहे ती तशीच्या तशी ठेवली जाईल. व त्याबरोबर



परिशिष्ट अ,ब,क,ड, जोडले जातील ते नगररचनाकार आम्हास देतील. ते जोडुन हा ठराव पुर्ण केला जाईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- आपल्या प्रस्तावनेमध्ये असे लिहीले आहे की, नगररचना समितीचा प्रस्ताव आहे.

मा.सचिव :-कृपया लक्ष दया. नियोजन व विकास समितीचा ठराव यासाठी यामध्ये जोडला गेला आहे की, त्यामुळे अधिक प्रभाव पडेल. आपली विशेष समिती जी नियोजन व विकास समिती आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- हे चुकीचे आहे. नियोजन समितीमध्ये फक्त सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहेत. येथे विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षाचे मिळुन समिती बनविली आहे. त्यामुळे या समितीचा प्रभाव अधिक पडेल. नियोजन समितीमध्ये शिवसेना व भा.ज.पा. चा एकही सदस्य नाही. आपण कसे म्हणता की, त्यांच्या प्रस्तावामुळे जास्त प्रभाव पडेल?

मा.सचिव:-आपण म्हणत असाल तर त्या समितीचा उल्लेख काढुन टाकू. आम्हाला त्यात काही फरक पडणार नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-त्या समितीने याबाबत असा कोणताही ठराव पारित केलेला नाही.

मा.सचिव :-नियोजन व विकास समितीची जी सभा होती ती ५ तारखेला ठेवण्यांत आली होती. तेथे नगररचनाकार होते त्यांनी सांगितले की, सर्व पक्षीय जी समिती तयार करण्यांत आलेली आहे ती याच विषयावर स्थायी समिती सभागृहात विचार विनिमय करीत आहे. व ते जो निर्णय घेतील तो निर्णय या समितीने अंगीकारला पाहिजे. मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यांत आलेली आहे. तीला अधिक प्राधान्य दिलेले आहे. जर त्या समितीचे काही शब्द या प्रस्तावास जोडले तर या प्रस्तावास अधिक वजन प्राप्त होईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-या समितीचा जो अहवाल आला होता त्याआधारावर.....

मा.सचिव:-दोन्ही समित्त्यांचे प्रस्ताव सारखेच होतील. ठिक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर:-मा.महापौरजी, शहाड फाटकच्या शिवाजी रोड बाबत मी जे बोललो होतो. ते यामध्ये जोडले नाही. या यादीमध्ये त्या रस्त्याच्या नावाचा काही उल्लेखच नाही. पहिल्या विकास आराखडयामध्ये ४० फुट रूंदीचा रस्ता होता. व जागेवर ४० फुट रूंदीचा रस्ता आहे. नविन विकास आराखडयामध्ये तो साठ फुट रूंदीचा दाखविण्यांत आलेला आहे.

मा.महापौरः-आज सकाळी जी सर्व दलीय सभा घेण्यांत आली होती. त्यामध्ये आपण आपल्या सुचना, हरकती दयावयास हव्या होत्या.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-सुचना दिलेली आहे.

मा.महापौरः-दिलेली असेल तर यामध्ये आलेली असेलच.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- यादी पाहिली जावी. वाचण्यास सांगितली जावी.

--११--

मा.महापौरः-नगररचनाकार यांच्याकडुन खात्री करून घेऊ.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- यादी वाचुन पाहिली जावी. नसेल तर त्रासाचे होईल ना?

मा.महापौरः-येथे यादी उपलब्ध नाही. प्रस्ताव पारीत करू दया. नंतर...

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- रस्त्यांची यादी येथे आपणाकडे उपलब्ध आहे ना?

मा.महापौरः-तर त्यामध्ये आपण समाविष्ट करा ना?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- प्रथम नगररचनाकारांना विचारा. नाहीतर उदया ते म्हणतील असे काही नाही. आपण सांगा ना की ते समाविष्ट केले जाईल म्हणुन.

मा.महापौरः-निश्चितच होईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- नगररचनाकांरना सांगु दया.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-होईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः- एकमताने की, बहुमताने?

मा.सचिव :- आपण सर्वांनी एकमताने ठराव पारीत झाल्याचे जाहिर केले आहे.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर शहरासाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणातर्फे प्रसिध्द करण्यांत आलेल्या विकास योजनेच्या व विकास विनियमांच्या मसुदयावर हरकती घेणे बाबत.

प्रस्तावना

दि.२०.५.१९७४ साली उल्हासनगरच्या लहान नागरी क्षेत्रासाठी त्यावेळीचे नगरपालिकेने तयार केलेल्या विकास योजनेला शासनाची मंजुरी मिळाली होती.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६( यापुढे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ ला उपरोक्त अधिनियम म्हणता येईल) चे कलम ३८ अन्वये मंजुर विकास

योजना ज्या तारखेस अंमलात आली असेल त्या तारखेपासुन २० वर्षात निदान एकदा तरी नियोजन प्राधिकरणास विकास योजनेची फेर तपासणी करता येईल.

दि. १५.३.१९७६चे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील अधिसूचनेव्दारे व उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४० अन्वये उल्हासनगर क्षेत्रासाठी व इतर शेजारील स्थानिक प्राधिकरणाचे अविकसित क्षेत्रासाठी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ अन्वये स्थापन केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकारी म्हणुन नेमणुक करण्यांत आली. उल्हासनगर शहरासाठी विकास योजनेची फेर तपासणी २०



वर्षानंतर उपरोक्त अधिनियमाचे कलम २२,२३,२४,२५,२६,२७,२८ व २९ यांच्या तरतुदी अन्वये करण्याचे अधिकार उल्हासनगर महानगरपालिका हया स्थानिक प्राधिकरण व नियोजन प्राधिकरणास असतो. कारण शहरातील जमिनीचा विद्यमान वापर व परिस्थितीची सुचना तसेच जमिनीच्या वापरामध्ये बदल करण्यावर व तिच्या विकासावर निर्बंध इत्त्यादीची माहिती महानगरपालिका या स्थानिक प्राधिकरणाशिवाय अन्य दुसरा कुणी उपलब्ध करू शकत नाही.

उपरोक्त अधिनियमाच्या कलम २ (१९)अन्वये नियोजन प्राधिकरणाची व्याख्या पूढीलप्रमाणे आहे.

नियोजन प्राधिकरण म्हणजे, स्थानिक प्राधिकरण आणि त्यात,
(अ) कलम ४० अन्वये प्रस्थापित केलेल्या, नियुक्ती केलेल्या किंवा नियुक्ती करण्यात आलेली असल्याने मानण्यात येणा-या विशेष नियोजन प्राधिकरणाचा आणि
(ब) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम ३ क अन्वये घोषित केलेल्या झोपडपट्टी पुर्नवसन क्षेत्राच्या संबंधात उक्त अधिनियमाच्या कलम ३ अ अन्वये केलेल्या गलिच्छ वस्ती पूनर्वसन प्राधिकरणाचा समावेश असेल.

दिनांक १०.५.२००१चे शासन राजपत्रकातील अधिसूचनेव्दारे उपरोक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये विशेष नियोजन प्राधिकारी यांनी विकास योजना व विकास नियमावलीच्या मसुदयाच्या संबंधात नोटीस प्रसीध्द केली. आणि त्यावर हरकती घेणेची शेवटची तारीख ९.७.२००१ अशी आहे.

विशेष नियोजन प्राधिकारी यांनी महानगरपालिकेशी विचारविनिमय न करता विकास नियोजनाचा मसुदा व प्रारूप विकास नियमावलीची नोटीस थेट प्रसिध्द केल्यामुळे या महानगरपालिकेने शहरातील विविध पक्षाचे ३० नेते / नगरसेवक तसेच शहरातील मान्यवर वास्तुविशारद यांची समिती स्थापन करून त्या समितीने २०.५.२००१ ते ३.७.२००१ या कालावधी दरम्यान प्रारूप विकास आराखडयावर सखोल चर्चा करून खालील मुद्यांवर महानगरपालिकेतर्फे सुचना व हरकती घेण्याचे निश्चित करण्यात आले.

१. प्रारूप विकास आराखडयात क्षेत्रफळ १३३४ हेक्टर ऐवढे दाखविण्यात आले आहे. देय क्षेत्र विकास आराखडयामध्ये १३०० हेक्टर दाखविण्यात आले होते. ३४ हेक्टर क्षेत्रफळ वाढविण्यात आले आहे. यांचा खुलासा मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कडुन मागविण्यात यावा.

२. ब-याच अस्तित्त्वातील रोडची दिशा बदलण्यात आली आहे. रोडची दिशा व जागा अस्तित्त्वातील असलेल्या रोडप्रमाणे प्रारूप विकास आराखड्यावर दाखविण्यात यावी. तसेच मंजुर विकास आराखड्यातील रूंदीनुसार जे रोड विकसित झाले आहेत. त्या रूंदीमध्ये विकास आराखड्यात बदल करण्यात येवू नये.

३. प्रारूप विकास आराखड्यामध्ये अस्तित्त्वातील टाटा लाईन दाखविण्यात आलेली नाही. तसेच पाणी पुरवठा केंद्र व विद्युत केंद्र दाखविण्यात आलेले नाही. प्रारूप विकास आराखड्यावर दाखविणे आवश्यक आहे.



४. संपुर्ण शहरातील अस्तित्त्वातील नाल्या विकास आराखड्यामध्ये दाखविण्यात आलेल्या नाहीत त्या प्रारूप विकास आराखड्यात दाखविण्यात याव्यात.

५. प्रारूप विकास आराखड्यामध्ये जी आरक्षित भुखंडे दाखविण्यात आली आहेत त्यापैकी ज्या भुखंडावर इमारती अगर वस्ती आहे ते भुखंड वगळुन रिकाम्या जागेवर आरक्षणे ठेवण्यात यावीत.

६. प्रारूप नियंत्रण नियमावलीमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. जसे कमी क्षेत्रफळाचे प्लॉट गावठाण याबाबत नियंत्रण नियमावली मध्ये तरतुद करणे आवश्यक आहे. तसेच उल्हासनगर क्षेत्र दाटीचे क्षेत्र घोषित करून दाटीच्या क्षेत्रासाठी अनुज्ञेय असणा-या चटईक्षेत्र निर्देशाकाची तरतुद उल्हासनगर क्षेत्रासाठी नियंत्रण नियमावलीमध्ये करणे आवश्यक आहे.

७. प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात सुचना व हरकती ऐकण्यासाठी जी समिती स्थापण्यात येईल त्या समितीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेचे किमान दोन प्रतिनिधी घेण्यात यावेत. तसेच तज्ञ समितीने जे निर्णय घेतले आहेत ते शहराचा विकास चांगल्या पध्दतीने व्हावा व जेणेकरून प्रारूप विकास आराखड्यामध्ये महानगरपालिकेस चांगल्या पध्दतीने अमंलबजावणी करता येईल. अन्यथा प्रारूप विकास आराखड्याची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस अवघड होईल याबाबी विचारात घेऊन निर्णय घेतले असल्याने त्याप्रमाणे प्रारूप विकास आराखड्यात बदल करणे आवश्यक आहे.

८. प्रारूप विकास आराखडा शासनाने मंजुर करण्यापुर्वी महापालिकेला विश्वासात घेऊन नंतरच मंजुर करावा अशी विनंती शासनास करण्यात यावी.

९. प्रारूप विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या भुखंडावर जे नकाशे मंजुर करण्यात आले आहेत ते रदद करण्यात यावेत.

सद्याच्या विकास योजनेचा मसुदा व त्याची नोटीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उपरोक्त अधिनियमाच्या कलम २ (१९)च्या व्याख्ये व संज्ञे अनुसार उल्हासनगर महानगरपालिका हे नियोजन प्राधिकारी असुन त्यांच्याशी विचार विनिमय न

करता विशेष प्राधिकरणाने थेट विकास नियोजनाचा व विकास नियमावलीचा मसुदा प्रसिध्द केला आहे. उपरोक्त अधिनियमाचे कलम ४० (३)अन्वये कलम ११३ मध्ये पोट कलम ८ नंतर विशेष नियोजन प्राधिकरणाकरिता पुढील परंतुकाची भर घालण्यांत आलेली आहे.

'परंतु विशेष नियोजन प्राधिकरणाने या अधिनियमा खालील आपली उददीष्टे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्त्याही अधिसूचित क्षेत्रासाठी कोणतीही विकास योजना किंवा नगररचना तयार करणे आवश्यक असणार नाही. उक्त प्राधिकरणास, कलम ११५ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे अधिसूचित क्षेत्रातील (एकतर प्राधिकरणाकडे निहित असलेली किंवा कलम ११६ अन्वये जी संपादन करण्यात आली आहे किंवा संपादन करण्याचे योजिले आहे अशी जमिन) जमिनीचा विकास करण्यासाठी, आपले प्रस्ताव सादर करता येतील.



विशेष नियोजन प्राधिकारी यांनी महानगरपालिकेशी विचार विनिमय न करता विकास नियोजनाचा मसुदा व प्रारूप विकास नियमावलीची नोटीस थेट प्रसिध्द केल्यामुळे हया महानगरपालिकेने शहरातील विशेष तज्ञ, श्री. बुलचंद सोनेसर व श्री. भुषण रूपानी यांच्या सल्याने व साहयाने मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती,सभागृह नेता,विरोधी पक्ष नेता, आर.पी.आयच गटनेता, भाजपा गटनेता, कॉंग्रेस गटनेता, शिवसेना गटनेता, व इतर राजकीय पक्षाच्या जिल्हा अध्यक्षांच्या व महानगरपालिकेच्या नियोजन व विकास विशेष समितीच्या वरील प्रमाणेच्या अहवालामुळे सोबत जोडलेल्या विवक्षित परिशिष्टातील विकास नियमावली व योजनेच्या मसुदयाच्या मजकुरांवर, विद्यमान जमिन वापर किंवा जमिन वापरावर बदल, निर्बंध, रस्ताची रूंदी वाढविणे किंवा कमी करणे, आरक्षण समाविष्ट करणे किंवा वगळणे संबंधात नमुद केलेल्या हरकती व सूचना विशेष नियोजन प्राधिकारी यांना सुनावणी पुर्वी दि. ९.७.२००१ पर्यंत प्रस्तावित करणेस आवश्यक आहे. तसेच विकास योजनेच्या मसुदयावरील सूचना व हरकतींच्या सुनावणीकरिता नियोजन समितीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मा.महापौर व विशेष तज्ञ श्री. बुलचंद सोनेसर यांचा समावेश करणे करिता शासनाकडे विचारार्थ व मंजुरीसाठी विनंती पाठविणेस प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ८</u> <u>दिनांक:-७/७/२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती.सुनिता राजवानी.

ही महासभा वरील प्रस्तावने व कारणांअनुसार नियोजन व विकास समिती व मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली रचलेल्या विशेष समितीच्या अहवालावर सुसंगत अशी सोबत जोडलेल्या परीशिष्ट अ, ब, क, ड मधील विकास नियोजनाच्या मसुदयास व प्रारूप विकास नियमावलीच्या संबंधात नमुद केलेल्या हरकती व सूचनांस मुंबई महानगर प्रदेश विकास <u>प्राधिकरण / नियोजन</u> समितीच्या सुनावणीच्या व राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिके तर्फे मा.महापौर, मा.उपमहापौर व विशेषतज्ञ श्री.बुलचंद सोनेसर यांना हरकती व सूचना करणा-या नियोजन समितीमध्ये सभासद म्हणुन नेमणेस आणि महापालिकेच्या सूचना / हरकती विचारात घेतल्याशिवाय सदरचे विकास योजना / नियमावलीला अंतीम मंजुरी देण्यांत येवू नये अशी. शासनास विनंती करित आहे.

तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्टातील हरकती व सुचना या ठरावाचा भाग मानला जाईल. आणि वरील निर्णय अंर्तभुत असलेला ठराव इतिवृत कायम होण्याची वाट न पहाता कायम समजण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

--३५--

मा.सचिव:-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६. ०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौरांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-३०/७/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३०/७/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०.७.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदरची सभा स्थगित करून सोमवार दिनांक ३०.७.२००१ रोजी सायंकाळी ४.००वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
४. श्री. वाघे शामु
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. ज्योती कालानी
७. श्री. ढेणवाल बनवारी
८. श्री. उमाप रामदास
९. श्रीमती. वेलकर सुरेखा
१०. श्री. राजु सोनावणे
११ श्रीमती. पवार पंचशिला
१२. श्री. टाले प्रमोद
१३. श्री. आढाव रामभाऊ
१४. श्रीमती. बगाडे सुनिता
१५. श्री. भांडे भगवान
१६. श्री.बनवारी किशोर
१७. श्री. खेमाणी देवेंदसिंग
१८. श्री. पमनानी ईश्वर
१९. श्री. चौधरी राजेंद्र
२०. श्री. लांडे पांडुरंग
२१. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२२. श्री. मोरे भानजी भिकाजी
२३. श्रीमती. राजवानी सुनिता
२४. श्री. वारिंगे पंढरीनाथ
२५. श्री. पुरस्वानी जमनादास
२६. श्री.पारवानी रामचंद
२७. श्री. नरेश यादव
२८. श्रीमती. बेबी वसिटा
२९. श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई
३०. श्री. सेवलदास ठाकुर.
३१. श्री. रोहडा श्यामसुंदर
३२. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३३. श्रीमती. करोतिया मालती
३४. श्री. बहरानी ठाकुरदास
३५. श्री. जाधव सुरेश
३६. श्री. मोरे भिमसेन
३७. श्री.चव्हाण रमेश
३८. श्री. महाडिक प्रकाश
३९. श्रीमती. साधवानी जया
४०. श्री. श्रीमती. वनवारी मोना
४१. श्री. राजानी नरेंद
४२. श्री. मनसुलकर सुभाष
४३. श्रीमती. राजानी भारती
४४. श्रीमती. कुंदनानी लविना
४५. श्रीमती. वलेचा पदमा
४६ श्रीमती. भठिजा इंदिरा
४७ श्री. पंजाबी नारायण
४८. श्रीमती. राधवानी आशा
४९ श्री. माखिजा प्रकाश
५०. श्री. रामरख्यानी मोहनदास
५१ श्री. ठाकुर नरेंदकुमार
५२ श्री. पंजाबी लाल
५३. श्री. केसवानी किशोर
५४. श्रीमती. यशस्विनी नाईक
५५. श्रीमती. कांता गजवानी
५६. श्रीमती. जोनिता मटाई
५७. श्रीमती. आशा जेस्वानी

तर

१. श्री. चौधरी गणेश , २. श्रीमती. मोकल सिमा, ३ श्रीमती. दासानी मिनु ४ श्री.तेजी कैलास, ५. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ६ श्रीमती. टेकचंदानी चंदा ७. श्री. वाधवा गिरधारी,८. श्री.तलरेजा विनोद, ९. श्री. भाटीया जयप्रकाश,

१०. श्री. केणी जयकुमार, ११. श्री. आयलानी कुमार, १२. श्री. अचनानी पम्मीकुमार, १३. श्रीमती. वारिंगे पन्ना, १४. श्री. जग्यासी राजु, १५. श्री. वहरानी गोप, १६. श्री. क्रिशनानी गोदुमल, १७. श्री. सचदेव गिरधारी हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सचिव :-विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे.

प्रश्न क्र. ५७८ श्री. बी. बी. मोरे यांचा आहे. यावेळी ४. ४५ वाजले आहेत.

प्रश्न क्र. ५७८:-महापालिकेतील सुवर्ण जयंती रोजगार योजना प्रकल्प अधिकारी श्री. विलास सोनावणे यांच्याकडे या योजनेचे कामकाज बघणे कामी प्रकल्प अधिकारी म्हणुन नेमणुक केली परंतु सोनावणे यांनी सुवर्ण जयंती रोजगार योजनेचा पुरा बोजवारा वाजवला तेव्हा २०. १२. २००० रोजी महासभेत महापौर यांनी रूलिंग दिले की, विलास सोनावणे यांना त्वरित सस्पेंड करण्याचा आदेश देतात तर विलास सोनावणे सस्पेंड आहे का? कामावर आहे? याचा खुलासा महासभेत व्हावा अगर त्यास सस्पेंड केले नसेल तर त्याला का केले नाही व करणार असाल तर केव्हा व कधी याचा खुलासा व्हावा.

उत्त्तर :-उल्हासनगर महानगरपालकेच्या दिनांक २०.१२.२००० रोजी झालेल्या महासभेत मा. महापौर यांनी विलास सोनावणे यांना निलंबित करण्याचे निर्देशित केल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल)नियम १९७९ च्या तरतुदन्वये त्यांना ज्ञापन दिलेले सिन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवलेली आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :- मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य. माझा प्रश्न वरील प्रमाणे असुन उत्त्तर मला वरील प्रमाणे दिले आहे.

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय):-सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यांना त्यावेळच्या परिस्थितीनुसार उत्त्तर दिले आहे. परंतु त्यात अशी दुरूस्ती करण्यांत आली की, २० डिसेंबरला मा. महापौर यांच्या निर्देशानुसार १५ जानेवारी २००१ पासुन श्री. विलास सोनावणे आणि संबंधित कनिष्ठ अभियंता दोघांनाही निलंबित करण्यांत आले आहे. आणि त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यांत येईल.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-शिस्तभंगाची कार्यवाही कोणत्त्या पध्दतीने करण्यांत येईल? कायदेशिर सुरू आहे की विभागिय स्तरावर सुरू आहे.

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय):-विलास सोनावणे तत्त्कालिन प्रकल्प अधिकारी आणि कनिष्ठ अभियंता यांच्या विरूध्द पोलीसात फिर्याद दाखल करून फौजदारी गुन्हयाचा तपास चालु आहे. त्याचप्रमाणे त्यांना निलंबित करून विभागीय चौकशीचे काम देखिल चालु आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :- विलास सोनावणेंबददल कार्यवाही चालु आहे ठिक आहे. सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे जे काम चालु होते आता ते काम



कोणाकडे दिले आहे. कोण बघते गेल्या दोन वर्षापासुन एकही कामकाज निघालेले नाही त्याचे काय होणार आहे?

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय):-सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत श्री. गर्जे तरण तलाव व्यवस्थापक यांच्याकडे प्रकल्प अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवलेला आहे आणि प्रकल्प अधिकारी म्हणुन श्री. गर्जे सध्या काम पहात आहेत.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे:-मी असे म्हणतो श्री. ढाकरे साहेब, एका -एक अधिका-याकडे असे किती चार्ज देत रहतात आणि दोन-दोन, तीन-तीन चार्ज असल्यामुळे ते अधिकारी काम करू शकत नाहीत त्याला जबाबदार कोण आहे? आणि गर्जेंकडे चार्ज आहे असे आपण त्यांना लेखी दिले आहे का?

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय):-लेखी स्वरूपात प्रकल्प अधिकारी म्हणुन या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवलेला आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :- असे कधी पत्र दिले आहे गर्जेंना?

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय):-१५ जानेवारी, २००१ ला.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-कारण आम्ही जेव्हा गर्जेंना विचारतो तेव्हा गर्जे म्हणतात माझ्याकडे अधिकृत असे काही नाही. ना पाटणकर साहेब आहेत ना गर्जे आहेत मग काम कोण बघते. आणि त्या कामकाजासाठी असा गोंधळ उडाला की, सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या माध्यमातुन एकही काम व्यवस्थित झाले नाही. आणि जे काही झाले असेल त्याचे प्रायश्चित श्री. सोनावणेंना मिळाले आहे. परंतु बाकीच्या राहिलेल्या कामाचे काय आता?

मा.सदस्य श्री. रजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौर साहेब, यास पुरक माझा प्रश्न आहे. सुवर्ण जयंतीची जी अर्धवट अवस्थेत कामे पडली आहेत ती कधी पुर्ण होणार? आणि त्याबाबत आपण ज्यांच्याकडे कारभार सोपवला आहे त्याबाबत काय काय कार्यवाही करतात याचा पण खुलासा झाला तर बरे होईल.

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय):-सुवर्ण जयंतीची प्रलंबित अपुरी कामे किंवा सध्याची प्रगती पाटणकर साहेब सांगु शकतील.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-महापौरजी, आता जे श्री. ढाकरे साहेबांनी सांगितले की, श्री. पाटणकर साहेब त्याबाबत सांगतील परंतु मी हा विचार करतो की, गेल्या दिड-दोन वर्षात माझ्या प्रभागात गौतम बुध्द नगरमध्ये दोन शौचालये बांधण्यास काढले होते त्यावेळी श्री. विलास सोनावणे व श्री. पाटणकर होते. तिथला मुहूर्त केला गेला परंतु त्यानंतर देखिल आज पर्यंत कामकाज चालु नाही झाले खड्डा देखिल खोदला आहे. आज आमच्या नगरसेवकांची जी प्रतिमा आहे. ती प्रभागात कमी होते. त्याला जबाबदार कोण? आम्ही तिथे नारळ फोडतो आता कामकाज चालु होणार आहे. हे आम्ही जनतेला दाखवतो व त्यानंतर जर तिथे काम नाही झाले तर नगरसेवकाची प्रतिष्ठा कमी होते. यास जबाबदार कोण आहे? जो जबाबदार अधिकारी असेल त्याला काही तरी वाटले पाहिजे.



श्री. पाटणकर (उपआयुक्त):-जुनी जी कामे अपुर्ण आहेत त्या संदर्भात किती प्रमाणात अपुर्ण आहेत त्यासाठी किती निधीची आवश्यकता लागणार आहे. या संदर्भात शहर अभियंता यांना मा. आयुक्तांनी यापुर्वीच आदेश दिलेले आहेत. आणि त्याप्रमाणे प्राकलन तयार झाल्यावरच सर्व अहवाल सादर केल्यावर नंतर ती कामे सुरू करण्यांत येतील.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा. आयुक्त साहेबांनी शहर अभियंताना कधी आदेश दिले आहेत. तुम्ही म्हणता ना? दिड वर्ष होत आले आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-मा.आयुक्त साहेबांना माझी या सभागृहातर्फे विनंती आहे की, श्री. पाटणकर साहेब जे उत्तर देतात यांच्या उत्तरावर तुम्ही थोडे लक्ष दया. कारण हा प्रश्न मी एक-दोन नाही तर तीन वेळा विचारला आहे. याच महासभेमध्ये विचारला आहे. त्यावेळेला हेच उत्तर दिलेले आहे. की आम्ही सर्वे करतो. किती निधी लागेल हे बघतो. आणि आज शहर अभियंता इथे हजर आहेत का? नाही. कारण यांना माहित आहे की, आज नगरसेवक कोणता प्रश्न इथे विचारणार आहेत आणि त्या प्रश्नाचे उत्तर जे आम्हाला इथे देणे गरजेचे आहे आणि म्हणुन ते नेमके गायब होतात असे का? इथे ६९ नगरसेवक प्रश्न विचारण्याच्या तयारीत आहेत. आणि तुमचा अधिकारी वर्ग किती उपस्थित आहे? आणि म्हणुनच वेळोवेळी आम्ही जे प्रश्न विचारतो त्याचे जर चिज होत नसेल तर ही महासभो घेण्यामध्ये काही अर्थ नाही आहे. आणि आम्ही प्रश्न विचारण्यात काही अर्थ नाही. मी पाटणकर साहेबांना कित्येकदा विचारले आहे की, अनुदान जिल्हाधिकारींकडुन मंजुर होऊन आलेले आहे. त्याचे काय करणार त्याची काही विल्हेवाट तरी लावा. तर ते म्हणतात शहर अभियंताकडे आज दिले आहे. कित्त्येक कार्यभार त्याच्याकडे आहेत. तो व्यक्ती आता वयस्कर झाला आहे. वय झाल्यामुळे मला तरी असे वाटते की त्याचे अेजबार देखिल झाले आहे. परंतु या महापालिकेने डोळयावर पडदा टाकला आहे. आणि त्यामुळे श्री. चिजवानी अजुन कार्यरत आहे. ती म्हण आहे ना, आंधळा दळतो आणि कुत्रा पिठ खातो अशी परिस्थिती महापालिकेची आहे. असेच आहे आंधळी म्हातारी जात्त्यावर दळते आणि कुत्रा पिठ खातो ते तिला समजत नाही. अशी जर महापालिका चालत राहिली तर आम्ही नगरसेवक जीव तोडुन ओरडलो तरी काही होणार नाही. तर आमची आयुक्तांना एक विनंती आहे की आपण याकडे लक्ष दयावे. आणि पाटणकर साहेब जे बोलतात. हे कामकाज लवकरात लवकर सुरू नाही झाले तर पुढच्या महासभेत सर्व नगरसेवकांविषयी बोलत नाही पण कमीत कमी मी तरी हजर राहणार नाही.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-सन्माननिय महापौरजी, ज्या दोन लोकांना निलंबित केले आहे त्यांना महापालिका अर्धा पगार देते असे मला समजले आहे. त्यांनतर देखिल त्यांना नोटीस पाठवावी लागते. त्यांनी यावे आणि जे काम अर्धवट झाले आहे त्याकामाचे सर्व्हे करून किती काम झाले याचा अहवाल दयावा. त्यांच्यावर पोलिसात फिर्याद दाखल झाली आहे. तरी ते येत नाही. त्यांच्यावर महापालिका आयुक्त साहेब कार्यवाही का नाही करत? ज्या लोकांना अर्धा पगार दिला जातो. नोटीस पाठवुन देखिल ते येत नाही मग त्यांच्यावर आयुक्त साहेब कार्यवाही का करत नाहीत?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-मा.महापौर साहेब, आता जो मुददा उपस्थित केला. श्री. विलास सोनावणे यांनी सुवर्ण जयंती रोजगार योजनेत काही प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. आणि आताच सन्माननिय सदस्यांना



सांगण्यात आले की, त्यांच्या विरूध्द विभागीय चौकशी चालु आहे तसेच फौजदारी गुन्हा देखिल दाखल करण्यांत आलेला आहे. सन्माननिय सदस्यांनी आताच सांगितले की, त्यांना नोटीस पाठवुन देखिल ते त्यांच्या कालावधीत झालेल्या कामकाजाचा अहवाल देण्यासाठी उपस्थित राहत नाही हि वस्तुस्थिती आहे. हि वस्तुस्थिती आहे. त्यांना नोटीस पाठवुन देखिल श्री. विलास सोनावणे आणि त्यांचे दुसरे कर्मचारी यांनी त्यांच्या कालावधीमध्ये किंवा त्यांच्याकडे पदभार असताना जे काम झाले त्या कामाचे मोजमाप करण्यासाठी ते

उपस्थित राहिले नाहीत तर हा देखिल एक प्रकारचा शिस्तभंग आहे. आणि अशा प्रकारे त्यांनी पुन्हा महापालिका प्रशासनाच्या आदेशाची पायबंदी केली म्हणुन विभागीय चौकशीमध्ये हा एक अतिरिक्त चार्ज त्यांच्यावर लावण्यांत येईल. असे आदेश मी आमच्या प्रशासनाला आधिच दिले आहे. हा देखिल चार्ज त्यामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-मा. आयुक्त साहेब, आपण जे सांगीतले की त्यांनी भ्रष्टाचार केला, ज्याबाबत त्यांना निलंबित केले आहे. आणि त्यांना काही कामासाठी महापालिकेने पत्र दिले किंवा नोटीस दिली. त्या महापालिकेच्या नोटीसीला याठिकाणी हजर राहु शकले नाही. याचा अर्थ असा आहे की, ते महापालिकेचा कुठलाही आदेश किंवा आयुक्तांचा आदेश हा धाब्यावर बसवतात. तर यासाठी आपण कडक कार्यवाही काय करणार आहात? कारण मी आजच वर्तमानपत्रात वाचले की, ठाणे महापालिकेमध्ये किंवा मुंबई महापालिकेमध्ये अनाधिकृत बांधकामाबाबत किंवा नळ कनेक्शनबददल किंवा एखादया नगरसेवकाने एक अनाधिकृत बांधकाम तोडले जाते. स्टे दया म्हणुन सांगितले तरी देखिल त्याचे नगरसेवक पद रदद करण्यापर्यंत असा जर या महाराष्ट्र शासनामध्ये ठराव होतो. वा बिल पास होते तर मला असे म्हणायचे आहे की, या कर्मचा-याने महापालिका आयुक्तांचे किंवा महापालिकेचे म्हणणे ऐकले नाही किंवा त्याने लेखी उत्त्तर दिलेले नाही. तर त्याच्यावर तुम्ही काय कडक कार्यवाही करणार आहात? आयुक्त साहेब, कारण मी पाच वर्षाच्या कालावधीमध्ये ऐकले असे बघितले की, ज्यांना निलंबित केले जाते. त्याची साधी चौकशी किंवा फौजदारी गुन्हा देखिल दाखल होत नाही. आणि मग मला तरी असे वाटते की,(सचिव साहेब खाली मान घालुन बघत आहेत. त्यांनी वर बघावे) त्यांनीच सांगितले की, जर सहा महिन्याच्या आत चौकशी झाली नाही तर त्याला पुन्हा कामावर घेण्याचा अधिकार आहे. असे म्हंटलेले आहे. तर मला हे म्हणायचे आहे की, या लोकांना निलंबित केल्यानंतरही त्वरीत कार्यवाही करून योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे.

मा.उपमहापौरः-मोरे साहेब, तुमच्या प्रश्नाला पुरक प्रश्न मी विचारत आहे. आयुक्त साहेब, महापौर साहेब, महाराष्ट्र शासन किंवा केंद्रशासन ज्या काही योजना राबवते त्यांच्यामागे काहीतरी उददेश असतो. सुवर्ण जयंती रोजगार योजना केंद्र सरकारने दुर्बल घटकांसाठी, दुर्बल वसाहतीमध्ये राबवण्यासाठी गरीब लोकांना यातुन रोजगार मिळावा या उददेशाने राबवलेली योजना त्यातील पहिला टप्पा उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये नगरपालिका असताना किंवा महापालिका असताना पहिल्यांदा सुवर्ण जयंती रोजगार योजनेस सुरवात झाली. एक अकार्यक्षम अधिकारी किंवा कर्मचारी त्याठिकाणी भेटला आणि त्यांनी गैरव्यवहार केला. पहिल्या टप्प्यातील काम जवळ जवळ ४८ लाखाचे होते. श्री. पाटणकर साहेब, पहिल्या टप्प्यातील काम ४८ लाखाचे होते की, ५२ ? ४८ पैकी काम किती झाले? काय झाले किंवा नाही झाले? किती कामे पुर्ण झाली. अपुर्ण किती आहेत. अजिबात चालु नाही झाली. अशाप्रकारचा अहवाल तुमच्या समोर आला नाही आला ते अजुन तुम्ही स्पष्ट केले नाही. जवळ जवळ दिड वर्ष झाले आहे. वारंवार नगरसेवक प्रश्न विचारतात पण



आपण गोंधळलेली परिस्थिती निर्माण करता. सभागृहाचा फक्त वेळ काढू पणा करता. या परिस्थितीमुळे दुस-या टप्प्यातुन महाराष्ट्र शासनाने ४८लाख की ९२ लाख मंजुर केले होते. त्यापैकी ४६ लाखाचा चेक महापालिकेकडे सुपूर्त केला आहे. फक्त सोनावणे यांच्या अकार्यक्षमतेमुळे किंवा या प्रशासनातील त्या विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे ती योजना उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ठप्प झालेली आहे. ४६ लाखाचा निधी येऊन सुध्दा आपण तो वापरत नाही. जवळ जवळ दिड वर्ष झाले, त्याबाबत आपली चर्चा चालली आहे. अजुनही कुठले बांधेसुध असे उत्त्तर किंवा त्यावर पर्याय आपण शोधत नाही. त्यामुळे त्या दुर्बल घटकाचा विकास आपण पर्यायानी रोकत आहे.

लोकांना रोजगार मिळून दयायची जी संधी आहे ती आपण घालवत आहोत. यासाठी आयुक्तांना मी एक विनंती करतो की यासाठी गेले दिड वर्ष जे झाले गेले. सोनावणेवर आपण कार्यवाही करणार. विभागीय चौकशी चालु आहे, फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे. सोनावणेवर कार्यवाही होईल त्याचबरोबर सुवर्ण जयंतीच्या माध्यमातुन शहरासाठी जी विकास कामे होणार आहेत. महापालिकेचा निधी सोडुन शासनाचा जो निधी आहे. तो जास्तीते जास्त वापरण्यासाठी लवकरात लवकर प्रयत्न करा. आणि त्यादृष्टीने पावले उचलण्याची अधिकारींना आदेश दया. अशी मी आयुक्तांना आणि महापौरांना विंनती करतो की, काय पावले उचलणार? ही माहिती सभागृहास असु दया.

<u>मा.आयुक्तः-</u>महापौर महोदय, सुवर्ण जयंती रोजगार योजना यासंबंधी आठ-दहा दिवसापुर्वीच शहर अभियंता यांना बोलवले होते. त्यांच्याकडुन कामाचा आढावा देखिल मी घेतला. आणि त्यांना या कामाबाबत शक्य तेवढया लवकर प्राकलने तयार करून हे काम शक्य तेवढया लवकर पुर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत. आणि मागील दिड वर्षामध्ये प्रगती झाली नाही यासंबंधी मी आता काही भाष्य करणार नाही. पण निश्चितपणे मी आपल्याला सांगु इच्छितो की येत्त्या दोन महिन्यात या कामाला पुर्ण गती दिली जाईल आणि हे काम पुर्ण करून घेण्यासाठी पुर्णपणे आटोकाट प्रयत्न केले जातील.

<u>मा. सचिव :-</u>प्रश्न क्र. ५७९ श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र.५७९:-१)</u> अनाधिकृत बांधकाम विभाग यामध्ये १ ते ५ कॅम्प मध्ये काम करणारे बीट इन्स्पेक्टर व त्यांच्या सोबत काम करणारे मुकादम हे सदरच्या विभागात किती वर्षापासुन काम करतात. त्याचा स्पष्ट उल्लेख किती सालापासुन करत असावा?
२)प्रत्येक कॅम्पमध्ये काम करणारे बीट इन्स्पेक्टर व मुकादम यांचा मुळ विभाग कोणता आणि अनाधिकृत बांधकाम विभागामध्ये किती सालापासुन काम करत आहे?
३)प्रत्येक बीट मुकादम अथवा इन्स्पेक्टर अथवा कर्मचारी एकव विभागामध्ये किती वर्षे काम करू शकतो?

<u>उत्तरः-१)</u>सोबत तक्यात माहिती दिली आहे.
२)सोबत तक्त्यात माहिती दिली आहे.
३)महानगरपालिकेमध्ये कर्मचा-यांच्या बाबतीत सल्लंग किती वर्षे एकाविभागात काम देण्यात यावे याबाबतचे नियम तयार करण्यात आलेले नाही.
४) प्रश्न दिनांक २.२.२००१ च्या पत्रानुसार मागे घेण्यात आला आहे.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u> ठिक आहे.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र. ५८० श्री. राजेंद चौधरी यांचा आहे.



<u>प्रश्न क्र. ५८०:-</u>उल्हासनगर नगरपालिका अस्तित्त्वात असतांना सन १९८७ साली शासनाचे नगरविकास आराखडयानुसार किती आरक्षित भुखंड ताब्यात दिलेत? ताबा घेण्यासाठीची योग्य ती पुर्तता कार्यवाही नगरपालिकेने किंवा महानगरपालिकेने केली काय? त्याबाबतची माहिती दयावी.
२) विकास आराखडयापैकी आरक्षण असलेल्या भुखंडावर सदया किती भुखंडावर सनदा घेऊन नकाशे मंजूर झालेले आहेत. त्याची माहिती दयावी.

नकाशा मंजूर करतांना महाराष्ट्र शासनाने घालुन दिलेले नियम पाळण्यात आले आहेत काय? याबाबतची सविस्तर माहिती दयावी.

उत्तर :-१) उल्हासनगर नगरपालिका अस्तित्त्वात असतांना सन १९४७ साली प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांनी एकुण १५८ आरक्षित भुखंड नगरपालिकेकडे तात्पुरत्त्या स्वरुपात हस्तांतरीत केले होते, अशा प्रकारचे पत्र एस.डी.ओ. यांच्या कार्यालयाकडुन प्राप्त झाले आहे. सोबत प्रत जोडत आहे.

२) विकास आराखडयापैकी आरक्षण असलेल्या भुखंडावर सनदा घेऊन तिन नकाशे मंजूर झालेले आहे. १)साईट क्र.१९३ पार्किंगसाठी व शॉपिंग सेंटर साठी आरक्षित आहे. २)साईट क्र. १४९ होलसेल मार्केटसाठी राखिव आहे. ३)साईट क्र.८० मार्केटसाठी आरक्षित आहे.

नकाशा मंजूर करतांना उल्हासनगर महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.ए. चे घालून दिलेल पाळण्यात आले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-मा. आयुक्त साहेब, मी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत संबंधित अधिकारी कोणीही नाही. आयुक्त साहेब आपण दयाल का उत्तर?

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-मा.महापौर महोदय,सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रश्न आहे. आज नगररचनाकार श्री. सोनावणे यांनी रजेचा अर्ज पाठवला आहे त्यामुळे ते सभागृहात उपस्थित नाहीत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- साहेब, हिंदीत बोला जरा.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-आम्हाला पुर्णपणे समजत नाही म्हणुन आम्हाला कंटाळा येतो.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-मला हिंदी भाषा व्यवस्थित येत नाही. मराठी प्रशासकीय भाषा आहे. हिंदी बोलणे जरा मुश्किल आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः- कठिण आहे, अशक्य तर नाही ना. मग जरा बोला हळुहळु प्रयत्न करून.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-मी प्रयत्न तर करेनच पण मध्येमध्ये काही मराठी शब्द येतीलच.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-आंतरराष्ट्रीय भाषा बोला.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला लेखी स्वरूपात दिलेले आहे. व लिखित स्वरूपात जे उत्तर दिले आहे कायदयात



अशी तरतुद आहे की, जेव्हा लिखित स्वरूपात उत्तर दिले जाते तेव्हा सभागृहात असे बोलले जाते की, जसे छापले तसे त्याप्रमाणे उत्तर दिले आहे. याच्याव्यतिरिक्त जर काही सुचवायचे असेल तर सुचवा. या व्यतिरिक्त तुमचे काही उपप्रश्न असतील तर त्यावर तयार उत्तर माझ्याकडे नाही कारण याचा सर्व कार्यभार कामकाज नगररचनाकार पाहतात. तर जे काही उत्तर देऊ शकेन ते देईन. पुर्ण माहिती माझ्याकडे नाही. त्याचे पुर्ण उत्तर तुम्हाला दुस-या महासभेत देण्यात येईल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- आयुक्त साहेब, मी हे खुले बोलतो की, तुमचे हे उत्तर एक जबाबदार आयुक्त म्हणुन बरोबर नाही. कारण हा प्रश्न आधीच आला आहे. यावर लक्षवेधी देखिल आली होती त्यावर भरपुर चर्चा देखिल झाली आहे. आपण त्यावेळी पण म्हणाला होता की, मी इथे उत्तर देईन. आता माझ्याकडे माहिती नाही हे म्हणणे जबाबदार अधिकारींना शोभत नाही.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, मी असे काही म्हणालो नाही. मी हे सांगु इच्छितो की, नगररचनाकारांनी अचानक अर्ज तीन वाजता पाठवला आहे. मला काय माहित नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आयुक्त साहेब, मला हे समजत नाही की, जेव्हा पण आम्ही महासभेत प्रश्न विचारतो तेव्हा संबंधित अधिकारी हजर राहत नाहीत गायब होतात आणि अचानक अर्ज येतो की, ते आज सुट्टीवर आहेत. यात-हेने कसा कारभार चालणार? एक तर चार महिन्यानंतर प्रश्नोत्तरे येतात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- महापौरजी, कायदयात हे स्पष्ट लिहिले आहे की, सेक्शन ७१ मध्ये हे स्पष्ट लिहिले आहे की, जर उत्तराची मागणी सदस्यांनी केली तर त्या प्रश्नाचे उत्तर दुस-या महासभेत दयायचे आहे. त्या एक महिन्या ऐवजी दिड महिना झाला आहे. आणि सुदैवाने हि सभा एक आठवडयासाठी स्थगित देखिल केली गेली होती. तुम्हाला एक महिना दहा दिवस आधीच मिळाले आहेत. तसेच हा प्रश्न खुप आधी देखिल विचारला आहे. त्याशिवाय ११ मे २००१ ला मी पत्र दिले त्यानंतर १३ जुनला दिले ते याच मुदयावर होते. सो यु मस्ट बी थ्रोली स्टीडड बाय धिस टाईम. मी तुम्हाला कायदा वाचुन दाखवतो.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-कायदा वाचुन दाखवण्याची आवश्यकता नाही. ॲज पर ॲक्ट यु नो देअर इज ऑलसो प्रोव्हीजन इन दी रूल्स दॅट इफ द इन्फरमेशन इज नॉट रेडीली ॲव्हेलेबल वीथ द कमिशनर ही कान्ट गीव ॲन्सर.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- उत्तर तयार करण्यास आपणास किती वेळ लागेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-एक महिना झाला आहे. इट वॉज रेडीली ॲव्हलेबल इन युवर डिपार्टमेंन्ट.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-आज नगररचनाकार सुट्टीवर आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आमचा सोनावणे हजर राहो न राहो त्याच्याशी काहीही संबंध नाही.

--९--

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-पुढच्या सभेला ते उपस्थित राहतील आणि उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-पुढच्या महिन्यापर्यंत नगररचनाकारांची बदली झाली तर?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-धिस ॲक्ट रेफर्स टू यु. धिस ॲक्ट नॉट फॉर दी सोनावणे. इट इज वेरी क्लीअरली से जर एखादया सदस्याने मागणी केल्यावर तिचे तात्काळ अनुपालन केल्यास ते महानगरपालिकेच्या किंवा जनतेच्या हितास बाधक होईल असे आयुक्ताने जाहीर केल्यास त्याने तसे जाहिर केल्यानंतर, महानगरपालिकेची दुसरी सर्वसाधारण सभा ज्यावेळी भरेल त्यापेक्षा उशिरा नसेल इतक्या मुदतीपर्यंत त्याने असे अनुपालन लांबणीवर टाकणे कायदेशिर असेल.

मा.महापौर :-रजानी साहेब, मी असे समजतो की, आयुक्तांनी जे उत्तर दिले ते बरोबर नाही. सदनामध्ये जेव्हा सन्माननिय सदस्य प्रश्न विचारतात तेव्हा आयुक्तांचा संबंधित अधिकारी जर रजेवर असेल तेव्हा याची जबाबदारी आयुक्तांचीच असते. त्यांना उत्तर दयायची. तर हे बोलून टाळणे की आज अधिकारी नाहीत मी उत्तर देऊ शकत नाही हे बरोबर नाही. आयुक्तांनी दुस-या कनिष्ट अधिका-यांना उत्तर दयायला सांगितले पाहिजे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र रजानी:-मोर सो टू ॲक्ट व्हॉट यु आर सेइंग फॉर अेनी क्वश्चन कमिशनर इज सपोझ टू द रिप्लाय इन जनरल बॉडी. द फॅक्ट इज दॅट.

मा.महापौर :-ही कॅन सीक द असिस्टंट ऑफ ज्युनिअर ऑफीसर. चौधरीजी, तुमचे उत्तर मिळणे अजुन शिल्लक आहे का?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- माझा प्रश्न वरीलप्रमाणे असुन मला वरील प्रमाणे उत्तर दिलेले आहे. मी प्रश्न विचारून चार महिने झाले पण अदयाप मला यादी दिली नाही याचे कारण काय? सोबत प्रत जोडली आहे असे उत्तर दिले आहे. आणि मला प्रश्न विचारून चार महिने झाले तरी मला प्रत दिली नाही. आणि १५८ भुखंडे.......

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-महापौर साहेब, राजेंद्र चौधरींच्या उत्तराचे काय झाले? आयुक्त साहेब पण तयार नाहीत का? इथे एवढी शांतता पसरली आहे काय झाले? ते काय आता उत्तर दयायची तयारी करत आहेत. किती वेळ लागेल?

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, हा प्रश्न बहुतेक पाच महिन्या अगोदरचा आहे. त्यावेळीच उत्तर दिले आहे की, त्याची प्रत सन्माननिय सदस्यांना दिली जाईल परंतु आज पर्यंत दिली नाही ही एक वस्तुस्थिती आहे. संबंधित अधिका-याची जबाबदारी होती त्याने ती यादी दिली पाहिजे होती. मागील पाच महिन्यात काय झाले हे सांगणे जरा अवघड आहे. कारण मी त्यावेळी नव्हतो. परंतु ज्यावेळी प्रश्न विचारला जातो त्यावेळी पुर्ण उत्तर देणे ही प्रशासनाची जबाबदारी असते.ही पण वस्तुस्थिती आहे. परंतु अदयाप यादी दिली नाही आहे. पुढच्या वेळी हि यादी दिली जाईल तोपर्यंत मी महापौरांना विनंती करेन की, हा प्रश्न प्रलंबित केला जावा. तशी तरतुद पण आहे.



मा.महापौर:-ठिक आहे. दुस-या सभेत ठेऊ.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-नियम ५(१०)मध्ये तशी तरतुद देखिल आहे. जेव्हा एखादी माहिती आपल्याकडे नसते तेव्हा ती माहिती दुस-या सभेत देऊ शकतो.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-महापौर साहेब, माझा प्रश्न पुढच्या सभेत अखंड ठेवणार ना?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-महापौर साहेब, या प्रश्नावर मी गेल्या दिड वर्षापासुन बोलत आहे. तेव्हा शुळ साहेब होते. तेव्हा शुळ साहेब पण म्हणाले होते की, मी याचा अभ्यास करतो. ते गेल्यावर काळे साहेब आले ते पण म्हणाले मला पण अभ्यास करावा लागेल. तेव्हा मी म्हणाले होते की, आयुक्तांच्या बदल्या होत जातील आणि आमचा प्रश्न जिथे आहे तिथेच राहतो. तर याप्रमाणे काळे साहेबांनंतर शिंदे साहेब आले. शिंदे साहेबांनंतर बक्षी

साहेब आले. बक्षी साहेबांनतर आता इथे पोखरकर साहेब आले आहे. तर या प्रश्नावर निरूत्तर असणे हे काही ठिक नाही.

मा.महापौरः-हे आयुक्त तीन वर्षासाठी आहे,तुम्ही चिंता करू नका.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-याचा विचार आम्ही कशाला करायचा. आमच्या मागच्या प्रश्नाचे समाधान झाले नाही. तुमच्या म्हणण्याचा अर्थ आहे आज आम्ही प्रश्न विचारतो त्याचे उत्तर आम्हाला तीन वर्षानी मिळेल?

मा.महापौरः-पुढील महासभेत तुम्हाला उत्तर मिळेल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-नाही. नाही. हे लोक तयारी करून कव येत नाही. आमचा प्रश्न चार-चार महिन्यांनंतर येतो. मला हे समजत नाही मग अधिकारी लोक काय करतात? आणि आयुक्त म्हणतात की, आम्हाला पुढच्या महासभेत उत्तर देण्याची परवानगी दया.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मा. महापौर साहेब, आयुक्त या विषयावर कालावधी मागत आहेत. आयुक्तांना कायदया अधिन राहुन उत्तर दयायचे आहे. ॲक्ट मध्ये हे लिहिले आहे की, जर एखादी माहिती नगरसेवकांना हवी असेल तर एक महिन्याच्या आत ती दयावी. तुम्हाला एक महिना पुर्ण दिला आहे. तरी तुम्ही म्हणता की, माहिती तयार नाही. आणि त्याशिवाय आपण अशा प्रकारे उत्तर देत आहात तुम्ही चार भुखंडा विषयी जणु काही त्या भुखंडावर काही वायोलेशन झालेले नाही. लिखित उत्तर असे दिले आहे की, जे काही केले आहे ते नियमाप्रमाणे केले आहे. तुम्ही त्यावर कायम राहिला नाहीत. तुम्ही अशाप्रकारे उत्तर देता की, जणु काही झालेच नाही सर्व काही ठिक आहे. तुम्हाला पत्रकार विचारतात, त्यांनाच तुम्ही सांगता की काही वायोलेशन नाही. दोन छोटया गाळयांचे वायोलेशन होते. एकीकडे छोटे वायोलेशन होते ते आम्ही रीमुव्ह केले. नकाशा नियमाच्या आधारे मंजुर केला आहे. तुमची भुमिका संशयास्पद आहे यामुळे कुणीही तुमच्याकडे बोट दाखवु शकेल हे बरोबर नाही. आपणासं एक महिन्याचा अवधी दिला आहे आपल्याला त्या अवधीत उत्तर दयायचे आहे. लक्षवेधी नंतर दिड महिन्याचा अवधी आपणास मिळाला आहे. काय आपणास तयारी करायची आहे. मागे पण म्हणालात की, दोन तासापुर्वी लक्षवेधी मिळाली आहे. आज आम्ही उत्तर देऊ शकत नाही. लक्षवेधी मिळाल्यानंतर इतकी डिटेल चर्चा झाल्यावर इतिवृत



आपल्या हातात असुन देखिल आज आपण म्हणता की वेळ नाही मिळाला. आम्हाला माहिती काढण्यासाठी अजुन वेळ दयावा. किती वेळ लागेल? धिस इज वेरी अनफेअर दिस यु आर टेकींग होल कार्पोरेशन फॉर द राईड?

इकडे काही विपक्ष सदस्य एकत्र बोलत असल्याने कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौर साहेब, तुम्ही उगाचच कारण नसताना आयुक्तांना संरक्षण देत आहात. तुम्ही आयुक्तांना सांभाळुन घ्या नाहीतर जे चुकीचे लोक ाहे त्यांना संरक्षण देऊ नका.

मा.महापौरः-मी आयुक्तांचा बचाव करत नाही आहे. ते सभागृहाला सांगत आहे की, पुढच्याच महासभेत उत्तर देईन.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-तुम्ही त्यांचा खुला बचाव करीत आहात.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- हे मला तुमच्या समक्ष असे सांगतात की, जुन्या आयुक्तांना मी चुकीचे कसे म्हणू शकतो. ते म्हणतात की मी, शासन निर्णयाला आव्हान केले आहे. हा प्रश्न येतो कुठे मी शासन निर्णयाला आव्हान केले आहे. मी फक्त माहिती विचारत आहे, ती बरोबर आहे की नाही ते तुम्ही तरी सांगा किंवा आयुक्तांनी तरी सांगावे. मी तुम्हाला पुराव्यासहित सांगु शकतो. कायदयाच्या आधारे सांगु शकतो. कायदा आणि नियमाला धरून सांगु शकतो. मी तुम्हाला हे सांगितले आहे की शासन निर्णयाचा अवलंब कशाप्रकारे केला गेला नाही. सेक्शन ८०ला उल्लंघन केले आहे , सेक्शन ३७ एम.आर.टी.पी. ॲक्टचे उल्लंघन केले गेले आहे. सेक्शन ४६ , ४३ एम.आर.टी.पी. ॲक्टचे उल्लंघन केले गेले आहे. सेक्शन २ बी.पी. एम.सी ॲक्टचे उल्लंघन केले गेले आहे.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-मी प्रश्न क्र. ५८० विषयी बोललो आहे. मागील लक्षवेधी विषयी मी अजुन काही उत्तर दिलेले नाही. ते तुम्हाला पाहिजे तर मी देईन. आता जे उत्तर दिले आहे ते प्रश्ना बददल आहे. तुम्ही दोन्ही एकत्र करित आहात.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-मी तेच सांगतो की, प्रश्न क्र. ५८० आणि माझ्या लक्षवेधीचे स्वरूप एकच होते. तो प्रश्न पण चार भुखंडासाठी आहे,माझी लक्षवेधी पण त्यासाठी होती. वेगळे असे काही नव्हते. तुम्ही लक्षवेधीचे उत्तर दयायला तयार आहात या प्रश्नाचे नाही. या प्रश्नात काही वेगळे आहे का? दोन्ही सारखेच आहेत. काय फरक आहे? लक्षवेधीचे उत्तर दयायचे तर लक्षवेधीचे उत्तर दया.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-श्री. राजेंद्र चौधरींनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. चार-चार महिने झाले आहेत. आज इथे रचनाकार हजर राहु शकले नाहीत. मला असे म्हणायचे आहे की, येवढया महत्त्वाच्या प्रश्नावर अधिकारी हजर नाहीत तर कधी हजर राहतात? नगरसेवकांनी हा प्रश्न विचारला आणि ते हजर राहत नाही. मला तर अशी शंका वाटते की, अधिकारी का हजर राहत नाही. आजच्या वर्तमानपत्रात हिंदुस्थान समाज असा काही पेपर निघतो. इथे काही तरी मिलिंद सोनावणे यांचे मुखपृष्टावर फोटो आला आहे आणि काही भुखंडाविषयी लिहिले आहे. म्हणुन प्रश्नाकडे दुर्लक्ष



करून आपण त्याठिकाणी गैरहजर राहो असे तर काही नाही. आणि म्हणुनच आमची तुम्हाला सभागृहातर्फे विनंती आहे की, अधिकारी जर असे करत असतील तर त्यांच्यावर तुम्ही योग्य ती कार्यवाही केली पाहिजे कारण आम्ही चार-चार महिने आधी प्रश्न टाकायचा आणि तो आल्यावर नेमका अधिकारी जर नसेल, उत्तर देणारा जर नसेल कारण आजच्या प्रश्नावर श्री. राजेंद्र चौधरींनी म्हंटले आहे की, नकाशा मंजुर करताना महाराष्ट्र शासनाने घालुन दिलेले नियम पाळण्यात आले आहेत का? याबाबतची सविस्तर माहिती दयावी. ते म्हणुन दिले आहेत. त्यांनी काय म्हंटले आहे. नकाशा मंजुर करताना महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.ए.चे घालुन दिलेले नियम पाळण्यात आले आहेत. याचा अर्थ असा की, राखीव भुखंडावर एकतर सनद दिली आहे. आणि घालुन दिलेल्या नियमांचे उल्लंघन केलेले आहे. आणि उल्लंघन करून देखिल अशा पध्दतीने रचनाकाराने सही केलेली आहे. आणि उत्तर दिलेले आहे. आणि इथे ते उत्तर दयायला हजर रहात नाही ही खेदाची गोष्ट आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-जसे आयुक्त साहेबांनी आता सांगितले की, नगररचनाकारांनी तीन वाजता सुट्टीचा अर्ज दिला आहे. पण असे वाटते की, त्यांनी काही अर्ज दिला नाही ते जाणुन बूजून टाळत आहेत. आणि त्यांची बदली झाली आहे असे मला समजले आहे. म्हणुन आयुक्तांना माझी विनंती

आहे. जोपर्यंत भुखंडाविषयी चर्चा चालु आहे त्यावर चौकशी होत नाही. ते महासभेत उत्तर देत नाहीत. ज्याप्रमाणे श्री. भडकवाड आणि श्री. पाटणकर यांची बदली त्यांनी थांबवुन ठेवली त्याप्रमाणे नगररचनाकाराची पण बदली त्यांनी थांबवुन ठेवावी.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-श्री. नरेंद राजानी यांनी जे प्रश्न विचारले लक्षवेधी टाकली होती. त्यांनी विचारलेल्या प्रश्नावर जोपर्यंत निर्णय घेतला जात नाही तोपर्यंत कुणा अधिकारीना इथुन सोडु नये.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-मागच्यावेळेस आयुक्त साहेब आपण मला उत्तर दिले होते. मी जरूर त्याचा पुर्ण अभ्यास करेन व त्यानंतरच मी काही ठोस निर्णय घेऊ शकेल. ऐवढेच मी यावेळी सांगु शकत आहे. त्यावेळी पण तुम्ही ऐवढेच सांगु शकत होतात यावेळी पण ऐवढेच सांगत आहात असे कसे?

मा.महापौरः-राजानीजी, राजेंद चौधरींच्या प्रश्नाला त्यांना उत्तर देऊ दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-नाही. नाही महापौरजी, त्यांनी आम्हाला कबुल केले होते त्याविषयी आम्ही बोलु शकतो. प्रश्नाशी संबंधित जरी नसले तरी त्यांनी यापुर्वी पण तसे आश्वासन दिले होते.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-माझी लक्षवेधी आणि श्री. राजेंद चौधरींचा प्रश्न एकच आहे.

मा.महापौरः-तुम्ही जी लक्षवेधी दिली त्यावर सदनात भरपुर चर्चा झाली आहे. आयुक्तांनी त्यावर उत्तर दिले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-नाही दिले ना उत्तर.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-दिले ना उत्तर? की अभ्यास करून उत्तर देईन.



मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-तुम्ही इतिवृत वाचा ना? त्यात त्यांनी सांगितले की, मी पुर्ण अभ्यास करून उत्तर देईन. कायदयात लिहिले आहे की, एक महिन्यात त्यांना उत्तर दयायचे आहे. दुस-या महासभेत त्यांना उत्तर दयायचे आहे. ती लक्षवेधी आणि श्री. राजेंद चौधरी यांचा प्रश्न एकच आहे. तुम्ही उत्तर दिले पाहिजे.

मा.महापौरः-आयुक्तांना त्यावर अभ्यास तर करू दया ना?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:- किती वेळ अभ्यास करणार?

मा.महापौर-त्यांना थोडा अवधी दया. अजुन अभ्यास करण्याचा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-मा.महापौर साहेब तुम्ही असे कसे म्हणता की, त्यांना वेळ दया? त्यांना भरपुर वेळ दिला ना.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-इतका अभ्यास करणार की,....

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:- किशोरजी आम्ही तुम्हाला विचारत नाही. ते अभ्यास करून मगच उल्हासनगरमध्ये आले आहेत. त्यांना माहित आहे उल्हासनगर कोणत्त्या परिस्थितीतुन जात आहे.

मा.महापौरः-सुनिता बहन, उपमहापौरांना बोलु दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आम्ही उपमहापौरांना बोलु देऊ. आम्ही जे आयुक्तांना प्रश्न विचारले आहेत. त्याबाबतीत राजेंद्र चौधरी यांचे समाधान तर होऊ दया.

मा.महापौरः-ते सर्वात शेवटी फायनल उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-मा.महापौर, आमची विनंती आहे की, सोनावणे साहेबांनी आयुक्तांना जर सुटटीचा अर्ज दिला असेल तर आयुक्तांनी तो अर्ज सदनास दाखवावा. सदनास विश्वास वाटण्यासाठी तो अर्ज दाखवावा.

मा.आयुक्तः-महापौर महोदय, माझ्या समोर जे सोनावणेंचा अर्ज आला आहे. त्यांनी त्यांच्या सबऑर्डीनेटला फोनवर सांगितले त्यात त्यांनी असे लिहिले ाहे की, माझे नातेवाईक आजारी असल्याने मी कार्यालयात येऊ शकत नाही. असा निरोप माझ्या टेबलावर आहे. ते जर तुम्हाला पहायचे असेल तर दाखवु शकतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-त्यांनी सुटटी मागीतली नाही. त्यांनी सांगितले की, मी जात आहे.

मा.महापौरः-मी आयुक्तांना सांगु इच्छितो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-महापौर साहेब, त्यांनी फोन वर असे सांगितले की, मी आजारी आहे येऊ शकत नाही.

मा.महापौरः-हे सदन आयुक्तांवर विश्वास ठेवते. तुम्ही जेव्हा सांगितले की, त्यांनी अर्ज पाठवला आहे. त्यावर आम्ही विश्वास ठेवतो.



मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-महापौरजी, मी आपणास विचारतो की तुम्ही अधिकारींना का आश्रय देता?

मा.महापौरः-उपमहापौरांना बोलु दया.

मा.उपमहापौरः-नंतर काही गैरसमज नको आयुक्त साहेब, संपूर्ण प्रश्न क्र. ५८०चा भाग एक आणि भाग दोन दोन्ही मध्ये अपुर्ण आहेत. पहिल्या भागात १५८ आरक्षित भुखंडाच्या बाबतीत जे आहे त्यात लिहिले आहे की, ती यादी सोबत जोडत आहे. यादी दिली नाही. आणि फेब्रुवारी मध्ये राजेंद्र चौधरींनी प्रश्न विचारलेला आहे. मला असे वाटते की, जुन महिन्यामध्ये जेव्हा याच विषयावर लक्षवेधी आली तेव्हा चार भुखंडाबाबत चर्चा झाली होती. तर यामध्ये चौथा भुखंड कोणता तो नुमद केलेला नाही. तीन भुखंडाचे नमुद याठिकाणी केलेले आहे म्हणजे यात सुध्दा संबंधित अधिकारींनी यांत हातचे राखुन ठेवले आहे. त्याच्या मागचा उददेश काय होता ते सुध्दा आले पाहिजे. चौथी साईड यामध्ये आली नाही. चार भुखंडावर सनदा दिले आहे. असे लक्षवेधी मध्ये होते तर चौथा भुखंड कोणता? त्याबाबतीत सुध्दा पुढच्या वेळेस आपण उत्तर दयाल अशी मी आपणांस विनंती करतो.

मा.सचिव :-पुढचा प्रश्न...............

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-नाही नाही आयुक्त कधी उत्तर देणार?

काही सदस्यः- पुढच्या महासभेत देणार आहेत.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:-असे ते कुठे म्हणाले?

मा.उपमहापौरः-मी काही बाबी लक्षात आणुन दिल्या, प्रश्न श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे. मी त्यात हस्तक्षेप नाही करु शकत ,आयुक्तांनी कधी उत्तर दयावेत ते तेच सांगतिल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-उपमहापौर असे बोललेच नाही की पुढच्या सभेत उत्तर देतील. आयुक्तांचे काय म्हणणे आहे आम्हाला आजच्या सभेतच उत्तर हवे. आयुक्त साहेब आपले यावर निश्चित उत्तर काय? तुम्ही दुस-या महासभेत उत्तर देवू इच्छितात काय? तुमचे म्हणणे काय हे सदनाला समजले पाहिजे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- तुम्ही दोनदा उत्तर दिले तरी आमचे म्हणणे काही नाही, प्रश्न आणि लक्षवेधी दोन्ही एकच आहे, दोघांचे उत्तर एक आहे.

मा.महापौरः-मागच्यावेळी जी लक्षवेधी सदनासमोर आणली गेली. त्याचे उत्तर आयुक्तांनी आपणांस दिले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-नाही. नाही. त्यांनी सांगितले की, मी पुढच्यावेळेस उत्तर देईन.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-नाही. नाही महापौर साहेब, आता आयुक्त म्हणाले की, महापौर म्हणाले तर मी लक्षवेधीचे उत्तर देईन. तुम्ही त्यांना मग तसे आदेश दया. मागच्या वेळेस त्यांनी कबुल केले होते की, पुढच्या सभेत उत्तर देईन.



मा.महापौरः-एकाच लक्षवेधीचे उत्तर तुम्ही प्रत्येक महासभेत मागाल तर कसे होईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौरजी, नाही तर आम्ही इतिवृत कायम करताना आम्ही मग हरकत घेऊ.

मा.महापौरः-ठिक आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मा.महापौर आयुक्त म्हणाले होते की, मी अभ्यास करून पुढच्या सभेत उत्तर देईन. हे इतिवृतात देखिल लिहिले आहे.

मा.महापौरः-राजानीजी, ते प्रश्न क्र. ५८० वर फक्त आता बोलतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मला हे सांगा लक्षवेधी आणि प्रश्न क्र. ५८०मध्ये काय फरक आहे?

मा.महापौरः-जर तुम्हाला तुमच्या लक्षवेधीचे उत्तर हवे असेल तर मागच्या वेळेस त्यांनी आश्वासन दिले....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-त्यांनी काहीच स्पष्टीकरण दिले नाही.

मा.महापौरः-आधी माझे म्हणणे ऐका. सदनात त्यांनी आश्वासन दिले आहे आणि तुम्हाला जर वाटत असेल की, तुमचे उत्तर मिळाले नाही तर जेव्हा इतिवृत्त कायम करण्याचा विषय येईल तेव्हा तुम्ही प्रश्न विचारा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-इतिवृत्त कायम करताना काय करणार? त्यांनी जे सांगितले ते केले पाहिजे ना?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-प्रश्न पण तोच आहे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-यात त्यांनी लिहिले आहे,आणि तुमच्या पण लक्षात असेल ते काय म्हणाले होते ते इतिवृतात पण तसे आले आहे. ते म्हणाले होते की, आम्हाला हि लक्षवेधी दोन तास अगोदरच मिळाली आहे. दोन तासात आम्ही काय अभ्यास करू म्हणुन याचा पुर्ण अभ्यास करून नंतरच तुम्हाला पुढच्या महासभेत उत्तर देऊ. ते म्हणाले होते की, ठोस निर्णय घेऊन तुम्हाला उत्तर देऊ. कधी उत्तर देणार आहे? महासभेला त्यांनी कबुल केले आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-जेव्हा महासभा येते तेव्हा आम्ही तयारी करून येतो. यांनी पण उत्तर देण्याची तयारी करून आले पाहिजे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७१ मध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, यांना पुढच्या महासभेत कोणत्त्याही परिस्थितीत उत्तर दयायचे आहे. (श्री. राजानी यांनी इतिवृतातील आयुक्तांनी कबुल केलेले वाक्य वाचुन दाखवले.)

मा.महापौर:-म्हणुनच म्हणतो ना, त्यांना अभ्यास करू दया ते निर्णय घेतील.

--१६--

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-२० तारीख ते वीस तारीख एक महिना झाला वर अजुन दहा दिवस मिळाले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-कोणत्त्याही विदयार्थ्याला जर मार्च महिन्यात परिक्षा असेल तर मार्च महिन्यातच परिक्षेला बसावे लागते. तो असे नाही म्हणत की, मी एप्रिलमध्ये बसेन माझा अभ्यास अजुन पुर्ण नाही झाला असे नाही म्हणुन शकत.

मा.महापौर:-राजानीजी, मी आयुक्तांना उत्तर देऊ नये म्हणुन संरक्षण देत नाही आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-मुलाचा जीव घेणार का?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नापास तर करू शकतो.

मा.महापौर:-आय डोन्ट प्रीव्हेंन्ट हिम लेट हिम रिप्लाय व्हॉट यु वॉन्ट.

मा.आयुक्त:-महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांनी मागच्या महासभेत एक लक्षवेधी सुचना आणली होती. त्यांचा मजकुर मी आपणांस वाचुन दाखवतो. कॉलिंग अटेंन्शन मोशन, ॲज पर २ एक्स टू डीसकस द अनइथीकल, इल्लीगल, अनजस्टीफाईड ॲक्शन ऑफ प्लान ऑन रिझर्व्हड प्लॉटस् ॲन्ड फर्दर मोअर नो ॲक्शन अगेन्सट दी सबसिक्वंन्ट वायोलेशन ऑफ दि प्लान. यांनी जे मागच्या महासभेत मुदद निर्माण केले होते. त्यात त्यांनी काय अनइथिकल, इलिगल, काय अनजस्टीफाईड आहे काही लिहिले नाही. नंतर त्यांनी महासभेत काही मुददे उपस्थित केले. या मुदयानुसार चार फाइल आहेत. त्यातील तीन फाइल मला मिळाल्या आहेत. एक फाईल उपसंचालक यांच्या कार्यालयात काही कामासाठी पाठवली आहे. त्याचा अभ्यास मी केला. सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांचे म्हणणे आहे. शासन निर्णय टिपिअेस ते १०९४सीआर. १४/९४ युडी.९दिनांक ७४.

९४ इट इज नॉट प्रॉपर रिझोल्युशन ऑफ दी गर्व्हनमेंट दुसरा प्रश्न त्यांचा असा होता. जी सनद दिली जाते. ती व्यवस्थित दिली जात नाही. त्यात महापालिका प्रतिवादी म्हणुन असली पाहिजे. मी सुरवातीलाच सांगु इच्छितो की, जो शासन निर्णय असतो. त्यावर मी काही बोलु शकत नाही. कारण माझा अधिकार पण नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आम्ही हा प्रश्न नाही विचारला आहे. शासनच्या निर्णयाचा .........

मा.आयुक्तः-आधी मला बोलु दया.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- नाही तूम्ही चुकीचे बोलाल तर मी मध्ये बोललेलच ना? मला आपण थांबवता कसे? मी कधी असे नाही म्हणालो की शासन निर्णय चुकीचा होता, मी म्हणालो की, शासनाचा जो जी.आर. होता त्यात सेक्शन ३७ चा पाठ पुरावा करण्यास सांगितले होते. सेक्शन ३७चा पाठपुरावा एम.आर.टी.पी. ॲक्ट अन्वये एम.एम.आर.डी.ऐ. ला करायचा असतो. त्यांनी तसा पाठपुरावा केला नाही आहे. त्यानुसार तो शासन निर्णय आपल्याला लागु होत नाही. दुसरा विषय त्या शासन निर्णयात असे लिहिले आहे की,क्र. १ वर महानगरपालिकेने स्वतः बनवायचे आहे. २ वर एखादया संस्थेला दयायचे. ३ जर कोणी तिथे अतिक्रमण केले असेल. जो मालक असेल त्याला दयायचे.



मा.आयुक्तः-माझे बोलणे पुर्ण होऊ दया ना. नंतर तुम्ही बोला.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आपण म्हणता मी शासन निर्णयाला चुकीचे म्हंटले आहे. मी असे म्हंटले नाही. तुम्ही चुकीचे बोलाल तर मला उठावे लागेल ना?

मा.आयुक्तः-तुम्ही मला आधी बोलु तर दया ना. हा जो निर्णय आहे शासनाचा त्यावर मुंबई प्रांतिक महानगर विकास प्राधिकरण कमिशनरने देखिल महापालिका आयुक्त त्यावेळचे त्यांनी पत्र लिहुन त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास सांगीतली. एक साईटची फाईल माझ्याकडे नाही, तीन साईट आहे. एक नंबर साईट आहे १९३ त्यावर पार्किंग कम शॉपिंग सेंटर दुसरी साईट आहे क्र. ८० ती मार्केटसाठी आहे. आणि तिसरी जी साईट आहे ती हाऊसिंग फॉर डिसहाऊससाठी आहे. तो प्लॉट नं. ६१९ आहे. या खुप मोठया मोठया फाईल आहेत त्याचा मी अभ्यास केला. प्रशासकीय दृष्टीकोनातुन मी त्याचा अभ्यास केला. हा जो १९३ भुखंड आहे. त्यावर दोन वेळा सुधारणा परवानगी दिली आहे प्लानला. त्यावेळचे जे आयुक्त होते त्यांनी ३०.१०. ९८ ला मंजुरी दिली आहे. पहिली बांधकाम परवानगी जी झाली दि. १३.२०००ला झाली. दुसरी सुधारित परवानगी ९जुन २०००ला झाली आहे. त्यातुन पुर्ण भुखंड आहे. पुर्ण भुखंडाचे क्षेत्रफळ आहे. ३३१८. ५६आऊट ऑफ दॅट ॲज पर दी गर्व्हनमेंन्ट रिझोल्युशन, कार्पोरेशन इज टु गेट ८३० चौ.मी. ऑफ लॅंड. व दुसरा भुखंड ८० चे क्षेत्रफळ आहे. १२४०. ६१चौ.मी. त्यातील बांधकाम परवानगी प्रमाणे २५ टक्के तयार केलेले बांधकाम महापालिकेला दयायचे आहे. त्यांचे परवानगीत पण सुधारणा झाली आहे. तिसरा भुखंड आहे ६१९ नं. एकुण क्षेत्रफळ १०२७. ३५ चौ.मी. त्यातील दहा टक्के बांधकाम १०२. ५९ दयायचे आहे. मी प्रशासकीय दृष्टीकोनातुन अभ्यास केला असता मला त्रृटया आढळल्याने तिथे दोन शेड आढळले. आरक्षित भुखंड क्र. १९३ त्यातील पार्कींग ऐरीया ८३७ चौ.मी. आहे. तिथे मला अनाधिकृत झोपडे दिसले त्यांना मी तोडण्याचे आदेश दिले आहे. त्या भुखंडाचा विकास करताना पार्किंग एरिया त्यांना विकसित करून दयायचा आहे. अनाधिकृत दोन शेड हटविण्यास सांगितले आहे. दुसरी साईट आहे आरक्षण क्र. १४७ ती मार्केटसाठी आरक्षित आहे. त्याचा विकास करताना बांधकाम परवानगी दिली आहे. त्याचा क्र. आहे बी.पी. १३/९८ , दि. २४.७.१९९८ सुधारित परवानगी

नं. आहे ७१३/२००० आम्ही तेथे पहाणी केली त्या बिल्डरने एक जास्तीचे शौचालय बांधले होते. त्यावर कार्यवाही होईल. अजुन तिन्ही साईटना कंम्प्लीशन सर्टीफिकेट दिले नाही. कंम्प्लीशन सर्टीफिकेट दिल्याशिवाय विकास करताना किती चटई क्षेत्र व नियमांचे उल्लंघन केले ते सांगता येत नाही. प्रशासकीय दृष्टीकोनातुन मला दोन अनियमितता आढळुन आल्या त्यावर जरूर कार्यवाही केली जाईल. परंतु तांत्रिक बाबीसाठी बांधकाम परवानगी शासन निर्णयाप्रमाणे जागेवर जाऊन पहाणी करणे आवश्यक आहे. ते तांत्रिक निरिक्षण करण्याचे काम श्री. भिवारपुरकर यांना दिला आहे. ते काम प्रगती पथावर आहे. त्या दरम्यान त्यांच्या वडिलांचे नुकतेच निधन झाल्याने ते रजेवर गेले आहेत. याआधी जे पण वायोलेशन होईल जी पण अनियमितता आहे आता तर दोन प्रशासकीय तपासणीनुसार दोन शुल्लक त्रुटया आढळल्या. त्या आम्ही तुम्हाला सांगीतल्या यापुढे जे पण वायोलेशन व अनियमितता पहाणी अंती आढळेल त्यावर कडक कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आपण दिलेल्या उत्तरामध्ये फक्त हेच संशोधन. आपण आता म्हणालात की, डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅन यांनी असे उत्तर दिले की, तुम्ही नकाशा मंजुर करा. त्याउलट डायरेक्टर टाऊन प्लानने उलट आदेश दिले आहेत की, आपण आपल्या स्तरावर प्रस्ताव पारीत करून नंतर साईट नं. १९३चा विचार करा हा एक मुददा. दुसरे असे की,

--१८--

आपण ते जरूर पहा ते काय म्हणालेत ते. त्याचा पाठपुरावा इथे बरोबर झालेला नाही. दुसरे आपण असे म्हणालात की, आपण तिथे जाऊन साईट बघुन आला आहात. तिथे त्यांनी फक्त दोन गाळयांचे अनाधिकृत बांधकाम केले आहे. असे आपण म्हणाला आहात. तिथे हॉटेल बनले आहे ॲब्रोसिया ते हॉटेल चालु आहे. तिथे लॉजिंग वगैरे सर्व चालु आहेत. तुम्ही सांगा मार्केटसाठी आरक्षित असलेल्या जागेवर कुणीही हॉटेल उघडु शकतो. ती जागा मार्केटसाठी आरक्षित होती.

मा.महापौरः-श्री. राजानी आयुक्त साहेब म्हणाले की, मी योग्य ती कार्यवाही करेन आता हा विषय संपवा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मी हे म्हणतो.....

मा.महापौरः-आता ही काय लक्षवेधी नाही. आयुक्त म्हणाले आहेत की, मी योग्य ती कार्यवाही करेन. जे पण वायोलेशन आहे. काही गडबड असेल त्यावर ते कार्यवाही करतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मी अजुन एक गडबड त्यांच्या लक्षात आणुन देऊ इच्छितो. साईट नं. ८० ची सनद देखिल रदद झाली आहे. मी सांगितले होते त्यांचा प्लान कॅन्सल करा. तिकडे हॉटेल तयार झाले आहे.

मा.महापौरः-तुम्हाला जी काय माहिती दयायची असेल ती लिखित दया ते त्यावर कार्यवाही करतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मी लिखित दिले आहे. सेक्शन २ मध्ये स्पष्टपणे लिहिले आहे.

मा.महापौरः-त्यांनी सदनाला आश्वासन दिले आहे. की ते कार्यवाही करतील त्यामुळे हा विषय आता संपला.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-स. महापौरजी, प्रश्न ५८० पुढच्या सभेत घेणार ना?मला उत्तर नाही मिळाले. यादी नाही मिळाली.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मला वाटते सहा महिने या प्रश्नावरच चर्चा होईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-नाही. नाही. पण त्यांनी उत्तर नाही दिले तर प्रश्न परत घेणार नाही का? महापौर साहेब, आता आपण म्हणाला होतात की कंन्टीन्यु करू.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-एक तास झाला नुसते प्रश्नच विचारले जात आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-जर बरोबर उत्तर देत नाहीत तर कंन्टीन्यु करणार नाहीत का?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-नुसता एकच मुददा.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-भुखंडात श्रीखंड मिळाले आहे काय सभागृह नेत्यांना?

--१९--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-जेव्हा बघु तेव्हा भुखंडाचे विषय. भाभीजी विचारतात आहेत की आमचा नंबर कधी येणार?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आमच्या प्रश्नाचे उत्तर दयायला सांगा. आम्हाला प्रश्न विचारून सहा महिने झाले. अजुन उत्तर नाही दिले. नाहीतर आम्ही समजु कुणाला तरी भुखंडात श्रीखंड मिळाले आहे.

मा.महापौर:-चौधरीजी, आयुक्त आपणांस म्हणाले ना पुढच्या महासभेत उत्तर देईन.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५८१ हा श्री. नरेश यादव यांचा असून त्यांनी तो मागे घेतला असल्याने त्याची कार्यवृत्तात नोंद घेता येत नाही. तसेच प्रश्न क्र. ५८२व ५८३ श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा असुन ते उपस्थित नसल्याने कार्यवृतात त्याची नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ५८२ :-१) अ) जुना टेलिफोन एक्सचेंज के पिछे हरी इम्ब्रोडरी कंपाऊंड का महानगरपालिकामे कितने कितने एरिया का बिल्डींग बताने का परमिशन दिया है और कब?
ब)एरिया का क्षेत्रफळ कितना है? कितने मजले का परमिशन दिया गया है?
क) महानगरपालिकाने प्लॉन किसके नाम से दिया है, अभी?
२)कुछ समय पहले हरी इम्ब्रायडरी के काम से ही प्लॉन पास कि उसकी एफ.एस.आय. कितनी थी? और कितने मजले की बिल्डींग बनी थी?
ब)जब हरी इम्ब्राडरी के जगह पर प्लॉन पास हुआ है? काम हो चुका था तो उसी जगह पर बांधकाम कैसे चालु है, उसका खुलासा करो।

उत्तर :- जुना टेलिफोन एक्सचेंज चे पाठिमागे हरी इम्ब्राडरी कंपाऊड वर महानगरपालिकेने २४५. ६६ चौ.मि.साठी बांधकाम परवानगी दिलेली आहे.
ब)एरियाचे कुल क्षेत्रफळ २४५८१ चौ.मि. आहे.
क)श्री. गोप गिरधारीलाल अरतवानी आणि सुरेश वा अरतवानीचे नाव वर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे.

२)सदर विचारलेले प्रश्नाची माहिती अपूर्ण आहे. अपूर्ण माहिती असल्याने चौकशी केल्यानंतर उत्तर देता येऊ शकेल.

वरीलप्रमाणे...............

प्रश्न क्र. ५८३:-१) अ) रामदर्शन अपार्टमेंट के सामने डॉ. नाथानी के पिछे उल्हासनगर-१ में बिल्डिंग बनाने के लिए कितने मजले का गुप्ता परमिशन दिया गया है? एरिया कितने कितने कब है? एरिया कितने कितने का है?किस नामसे प्लान पास है?
ब)अवैध कितना बना है? आपने बना लिया है? और इसकी कारवाई कौन कर रहा है? एरिया इन्स्पेक्टर का नाम क्या है?
२) मातृछाया बंगले कब सामने, उल्हासनगर-५ ग्राउंड + ३ का बिल्डिंग का भाटिया हॉस्पीटल के सामने कितने मजले का परमिशन दिया गया है? प्लान पास किसके नाम से है? प्लान पास किसके नाम से है? एरिया की लम्बाई गुणिले चौडाई कितनी फुट है?
क)एरिया इन्स्पेक्टर कौन है? प्लान कब पास हुआ है? जगह की जांच की जाए....
३)बॅ. क्र. ए ८३, रूम नं. १८३ पोस्ट ऑफिस के सामने उल्हासनगर-१ में बांधकाम कब कितने का परमिशन है? चौं गुणिले लांबी कितनी है? एरिया इन्स्पेक्टर कौन है? अवैध बांधकाम कितना हुआ है?
--२०--
उत्तरः-अ)रामदर्शन अपार्टमेंन्ट चे समोर डॉ. नाथानीचे पाठीमागे उल्हासनगर-१ येथे तळमजला + मजले बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे. सदर बांधकाम परवानगी कुल १६९४७ चौ. मि. साठी दिलेली आहे. आणि श्रीमती लिलाबाई एच. माखिजा चे नावांवर प्लान पास केले आहे.
ब)सदर प्रश्न अतिक्रमण विभागाचे संबंधित आहे.
२)सदर माहिती अपुर्ण असल्याने ब्लॉक नं. रू. नं दिलेला नसल्याने पुर्ण माहिती मिळाल्यावर उत्तर देता येऊ शकेल.
सदर प्रश्न अतिक्रमण विभागाचे संबंधित आहे.
३)पोस्ट ऑफिस समोर ब्लॉक नं. ऐ. १८३ रू. नं. अस्तित्त्वात नाही.

मा.सचिवः-प्रश्नोत्त्तराचा तास संपला आहे.

मा.महापौरः-यु.पी.पी. पक्षातर्फे एक पत्र इथे आले आहे. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांना यु.पी.पी. पक्षाचे गटनेता म्हणुन नियुक्त केले आहे. व यासाठी त्यांचे अभिनंदन करतो.

मा. सचिवः-आता श्री. लाल पंजाबी व श्री. नरेंद राजानी यांची लक्षवेधी घेतली जाईल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः-मा.महापौरजी, उपमहापौर, मा.आयुक्त साहेब, तसेच सर्व स. सदस्य मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याआधी....

मा.महापौरः-आधी लक्षवेधीवर चर्चा होईल नंतर तुम्ही बोला.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः-माफ करा.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सर्व सदस्य कित्त्येक महिन्यापासुन टाटा इम्पोटेक कंपनीला असेसमेंटचे काम दिले आहे. आता शहरात राजकीय पक्षात हा चर्चेचा विषय झाला आहे. या कंपनीमुळे महापालिकेला भरपुर नुकसान देखिल झाले आहे. हे मी सांगु इच्छितो, आपणांस असे माहित आहे की, दर चार वर्षांनी शहरातील जागांची रिअसेसमेंट केली जाते. व संपत्तीत जर काही बदल झाला असेल त्यांना विशेष नोटीस दिली जाते. व दर चार वर्षांनी त्यात त्याप्रमाणे बदल केला जातो. व नवे बिल काढले जाते. मागच्या वर्षी २०००-२००१मध्ये आपल्याकडे भरपुर कर्मचारी वर्ग पण होता कारण जकातचे खाजगीकरण झाले होते. त्यामुळे तिथला कर्मचारी वर्ग महापालिकेत आला. त्यावेळी एक निर्णय घेतला गेला की, हे जे असेसमेंटचे काम आहे ते आपल्या कर्मचारी वर्गाला न देता

टाटा इम्पोटेक या कंपनीला जे वर्क ऑर्डर दिले गेले. एक वर्ष झाले, अटी व शर्तीमध्ये असे होते की, ते काम त्यांना चार महिन्यात पुर्ण करायचे आहे. मला आठवते की, हा विषय एकदा महासभेत पण आला होता. तेव्हा त्यावेळचे तत्कालिन आयुकत श्री. आर.डी. शिंदे त्यांनी त्यावेळी यांची बाजु घेऊन असे सांगितले होते की, आम्ही खाजगी कंपनीला देऊ कारण आपले कर्मचारी खुप चुका करतात त्या चुका होणार नाहीत. आणि या कंपनीला दिल्यानंतर ते आपणांस कॉम्प्युटराइज्ड यादी देतील त्यामुळे आपणांस पाच करोड रू. जास्त मिळतील. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपले तेवढे उत्पन्न वाढेल. परंतु आता आपण त्यांचे काम पाहिले तर लक्षात येईल की, ते काम योग्य नाही खुप जणांच्या तक्रारी देखिल आल्या आहेत. एका बैठकीत नगरसेवकांनी पण सांगितले की, त्यांच्याकडील लहान लहान मुले असेसमेंन्ट करण्याचे पैसे देखिल मागतात. व काम पण बरोबर करत नाहीत. ४ ऑगस्टला जेव्हा यांना वर्क ऑर्डर दिली होती त्यात त्यांना हे काम चार

--२१--

महिन्यात पुर्ण करायचे होते. परंतु ४ ऑगस्टला एक वर्ष होईल पण कंपनीने अजुन पर्यंत असेसमेंन्टचे काम पुर्ण केले नाही. त्यानंतर त्यांना एक एक्सटेंन्शन देखिल दिले गेले. व या एक्सटेंन्शला ३१ मे पर्यंत मुदत होती त्यानंतर परत त्यांना मुदत वाढ दिली गेली १० ऑगस्ट पर्यंत. आता १८ जुलैला कंपनीने पत्र लिहिले की आम्ही हे काम करू नाही शकत. आणि आम्हाला मुदत वाढ दया. आणि त्यांनी त्यात लिहिले आहे की, हे काम आम्ही १० जानेवारी २००० पर्यंत म्हणजे दिड वर्ष मुदतवाढीतच गेले. हे असे झाले की, रोड पेक्षा मोठा फुटपाथ. म्हणजे ठेकेदारांना काम करण्याची मुदत दिली होती चार महिने आणि दिड वर्ष त्यांना मुदत वाढ पाहिजे. यामुळे कित्येक प्रश्न निर्माण होतात की, महापालिकेला यामुळे जे नुकसान झाले पाच करोड रूपयाचे आणि लोकांना त्यामुळे जो त्रास झाला यासाठी जबाबदार कोण? पाच करोडचे नुकसान एक वर्षात हे काय कमी नुकसान नाही. याबाबत आपण विचार केला पाहिजे कंपनीच्या विरोधात कार्यवाही केली पाहिजे. आपल्या महापालिकेचे जे अधिकारी आहेत ज्यांचा यात सहभाग आहे त्यांच्यामुळे हा ठेका दिला गेला आहे. त्यांच्यावर पण चौकशी झाली आहे. व योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. मला संधी मिळाली तेव्हा मी करारनामावाचला होता आणि करारनामा वाचल्यावर असे वाटते की, हा जो करारनामा आहे त्यात खुप त्रुटी आहेत. मी निश्चितपणे सांगु शकातो की, हा करारनामा महापालिकेत नाही केला गेला. त्यातील अटी व शर्ती त्यापण महापालिकेत नाही तयार केल्या आहेत. माझ्याकडे पुरावा पण आहे. हा करारनामा टाटा इम्पोटॅक्ट कंपनीत तयार केला आहे. अटी व शर्ती आपल्याला अंधारात ठेऊन तयार केल्या गेल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती ठेकेदारांच्या फायदयाच्या आहेत. महापालिकेच्या नाही. करारनामा कंपनीतच तयार केला गेला आहे. महापालिकेत नाही.कंपनीतर्फे जेव्हा सर्व्हे झाला तेव्हा मी आधी सांगितल्याप्रमाणे खुप जणांनी नगरसेवकांनी देखिल तक्रारी दिल्या गेल्या आहेत. आणि मला नंतर हे देखिल समजले की, एक वर्षानंतर त्यांनी बारा तेरा प्रभागाचे काम दाखवले त्यात पण खुप चुका आहेत. आणि प्रत्येक चुकीवर १००० रू दंड आहे. जास्तीत जास्त २.५ टक्के म्हणजे २ लाख दहा हजार रू. आपण त्यांच्यावर दंड म्हणुन लाऊ शकतो. जर ७० टक्के त्यांनी चुका केल्या असतील कारण महापालिकेतर्फे पुन्हा आठ प्रभागाचे रिअेसेसमेंट केले तेव्हा त्यात कळले की, खुप त्रुटया आहेत. आपल्या महापालिकेने करारनाम्याप्रमाणे २१ लाख रू. दिले कारण त्यांना ॲडव्हान्स पाहिजे होता. म्हणजे आपले २१ लाख रू. देखिल वाया गेले. व त्यापेक्षा जास्त आपल्याला पाच कारोडचे मागील वर्षी नुकसान झाले. आणि अजुन पाच करोड म्हणजे दहा करोडचे नुकसान झाले याला जबाबदार कोण? याची पण चौकशी झाली पाहिजे. म्हणुन महापालिकेने विधी विभागाचा विचार घेऊन किंवा एखादया चांगल्या वकीलाला नेमुन त्या कंपनीविरूध्द कार्यवाही केली पाहिजे. २१ लाख रू. रिकव्हरी केली पाहिजे आणि आपले जे दहा करोडचे

नुकसान झाले आहे त्या नुकसान भरपाईसाठी देखिल आपण पाऊल उचलले पाहिजे. अशी आमची मागणी आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- </u>लाल पंजाबीनी जी लक्षवेधी आणली आहे. ८४ लाखाची निविदा होती. त्यापैकी २१ लाख रू. या कंपनीला दिले होते. त्या आपल्या २१ लाखाचे नुकसान झाले आहे. शहरात सव्वालाख प्रॉपर्टीज आहेत. एका प्रॉपर्टीचे त्यांनी चार-चार खाते तयार केले आहेत? इकडे जर कोणी कर विभागाचा बसला असेल तर त्यांना हे लक्षात येईल. चार विभागात एका संपत्तीला विभागुन टाकले आहे. व त्यांना चार वेगवेगळे खाते क्र. दिले आहे. जवळ जवळ एक लाख ४९ हजार प्रॉपर्टी शहरात अशा दाखवल्या आहेत. जर अशा आपण केसेस दाखवल्या तर फक्त ५० टक्केच सर्व्हे झाल्याचे आढळुन येईल. कित्येक इमारतीत जाऊन त्यांनी एकाच फ्लॅटचे सर्व्हे करून



इतर सर्व फ्लॅटचा पण त्याप्रमाणे माजमाप न करता एका फ्लॅट वरून इतरांचे समान मोजमाप लिहिले आहे. कित्येक जागी आर.सी.सी. बांधकाम आहे. तेथुन पैसे घेऊन तिथे त्यांनी पऱ्याचे बांधकाम ओपन असे दाखवले आहे. द नेम ऑफ टाटाज् हाऊ आर चिटेड अवर सिटी यात-हेने लाल पंजाबी जसे म्हणाले की, लहान लहान मुले जे दहावी-अकरावी शिकतात. ते घरात मोजमाप करायला आले होते. त्यांना टेप सुध्दा धरता येत नाही. त्यांना कॅलक्युलेशन देखिल करता येत नाही. ते पेन्सील घेऊन प्रयत्न करत होते तेव्हा त्यांना विचारले हा मी अनुभव घेतला आहे. मी त्यांना विचारले की, आपले वय काय? तेव्हा ते म्हणाले सोळा वर्ष. काय करता? म्हणाले अकरावीत आहे. मी विचारले रिपोर्ट कुठे करता? तुमचा अधिकारी कुठे आहे? ते म्हणाले आम्हाला माहित नाही. प्रभाग क्र. ५५ मध्ये साडेपाच वाजता एक माणुस येतो त्याला आम्ही रिपोर्ट देतो. म्हणजे टाटाने हा ठेका कुणाला तरी सबलेट केला आहे हे सिध्द होते. आणि त्या व्यक्तीने देखिल तिस-या कुणाला तरी हे काम सोपवले आहे. अशा प्रकारची फसवणुक टाटा इम्पोटॅक्ट कंपनीने आपल्याशी केली आहे. आपण त्यांना २१ लाख रू. ॲडव्हान्स दिले आहेत. आपल्या करारनाम्यात काही लिहिले असो ते अशा प्रकारे आपली फसवणुक करू शकत नाहीत. त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करून पुर्ण टाटा इम्पोटॅक्ट कंपनीचे स्वरूप वर्तमानपत्रात व इतर माध्यमांव्दारे जाहिर केले पाहिजे की ते कशा प्रकारे सात लाख लोकांची फसवणुक करीत आहेत. हे लोकांना कळले पाहिजे. आणि त्यांचा ठेका त्वरीत रदद करून त्यांच्यावर जो दंड लावु शकतो लावला पाहिजे. मी लाल पंजाबीचे अनुमोदन करीत आहे.

<u>मा.महापौरः-</u>अजुन कुणाला यावर बोलायचे आहे का?

<u>काही सदस्य :-</u>ठेका रदद केला आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>नाही. नाही. रदद नाही केला आहे. मला माहित नाही. रदद नाही झाला अजुन?

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी-</u>मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेचे उत्पन्नाची दोन साधने आहेत. कर विभाग व पाणी पुरवठा जकात सोडुन. अंदाजपत्रकाप्रमाणे २० टक्के देखिल वसुली झाली नाही. २०००-२००१ वर्षाची वसुली टाटा इम्पोटॅक्टमुळे थांबले आहे. आपण बिल लोकांना पाठवु नाही शकलो. त्यांची वाट बघत बसलो की, ते माप देतील मग आपण बिल काढू. त्यामुळे नाईलाजास्तव एक वर्ष पुर्ण झाल्यावर आपण बिले काढली. आपण एकसाथ बिले लोकांवर लादली त्यामुळे लोकांनी बिले भरलीच नाही. त्यानंतर कर विभाग आहे त्यात इतक्या अडचणी आहेत की, जर कुणावर पंधरा-वीस हजार कर असेल व तो जेव्हा तो कर भरण्यास येतो. तेव्हा त्याच्यावर जे व्याज लावले जाते तीच रक्कम

पंधरा-वीस हजारापेक्षा जास्त असते. लोक कर भरण्यास तयार आहेत. परंतु आपला विभाग तो घेण्यास तयार नाहीत. त्यावर आठ,दहा, वीस हजार व्याज दाखवले जाते. १९९७ पासुन, जेव्हा महापालिका झाली आहे तेव्हा पासुन व्याज घेण्याची तरतुदच नाही आहे. परंतु लोकांना हे माहित नसल्याने हा कर विभाग त्यांची दिशाभुल करतो. व त्यांना सांगतात की, तुमचे जुने कर बिल दहा हजार आहे त्यावर आठ हजार व्याज आहे. त्यामुळे लोक परत निघुन जातात व वसुली अर्धवट राहते. काही दिवसापुर्वी मी आयुक्तांना एक सुझाव दिला होता की, विधी अधिका-यांचा सल्ला घेऊन एक असा महिना ठेवावा. ज्यामध्ये आपण लोकांना सांगितले पाहिजे की, तुमच्याकडून व्याज घेतले जाणार नाही. जितके आपले जुने थकीत बिल आहे. तेवढे घेतले जाईल. असे



केल्याने आपल्या महापालिकेची जी दयनिय स्थिती आहे ज्यास टाटा इम्पोटॅक्ट कंपनीने भर घातली आहे ती स्थिती सुधरू शकते. जेव्हा मी स्थायी समितीचा सदस्य होतो त्यावेळी मी एक मुददा उठविला होता की, कर बिलातच व्याज लावुन पाठवा. कारण की, लोकांना खरे व्याज किती आहे हे समजत नाही त्यामुळे लोक व्याज भरू शकत नाहीत. परंतु त्यावेळच्या आयुक्तांनी मला आश्वासन दिले होते की, पुढच्या वेळेस जेव्हा बिल निघेल ९९-२०००सालचे त्यात व्याज देखिल लावले जाईल. परंतु तसे झाले नाही. अशाप्रकारे लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कृपया टाटा इम्पोटॅक्टची जी लक्षवेधी राजानी साहेबांनी आणली हा एक गंभीर विषय आहे. शहराची स्थिती व महापालिकेची स्थिती इतकी दयनिय झाली आहे की, आम्हा नगरसेवकांना प्रभागात काम करायला जो निधी ठेवला आहे तो मिळत नाही. आम्ही काम करू शकत नाही. आमच्या ठेकेदारांना एक-दिड वर्षापासुन पेमेंट दिले नाही. कृपया या विषयाला खुप गंभीरतेने घ्या. आणि आयुक्तांनी स्वत: विधी अधिकारीशी सल्लामसलत करून व्याजाचा जो मुददा आहे. यासाठी एक महिना जर वेगळा ठेवला तर लोकांना सवलत मिळेल.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>मा.महापौरजी, टाटा इम्पोटॅक्ट कंपनी ही असफल ठरली आहे. आम्हाला ही माहिती हवी आहे की, आपल्या महापालिकेच्या कर्मचा-यांकडुन असेसमेंटचे काम सुरू केले गेले आहे. खुप लोक आम्हाला विचारतात. आम्हाला असे कळले की, ते काम आता सुरू केले ग्रेले आहे. आमच्या प्रभागात पाच-सहा ठिकाणी महापालिकेचे कर्मचारी गेले होते आणि मोजमाप करण्यासाठी आलो असे सांगितले जाते. आम्हाला अजुन हे माहित नाही की, नव्याने मोजमाप करण्यास महापालिकेतर्फे सुरूवात करण्यात आली तर आयुक्तांनी ही आम्हाला माहिती दयावी.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, प्रथमत: मी एक गोष्ट लक्षात आणु इच्छितो की, टाटा इम्पोटॅक्ट ही जी कंपनी आहे. ही कंपनी या शहरात आली कशी? आयत्त्यावेळचा विषय घेऊन, (मी जे काही बोलतो ते गंभीरपणे ऐका) ८४ लाखाचे टेंडर न काढता आयत्त्यावेळचा विषय घेऊन एका टाटा इम्पोटॅक्ट नावाच्या साध्या कंपनीला कदाचित असेल मोठी कंपनी कधी तरी. पण आपल्या या शहराने निविदा न मागविता आयत्त्यावेळचा विषय घेऊन या टाटा इम्पोटॅक्टला जेव्हा काम करण्याची परवानगी दिली तेव्हाच पहिल्यांदा आपल्याला कळायला पाहिजे होते की, याच्यामध्ये सर्वात मोठा भ्रष्टाचार आहे. आणि मी निश्चितपणे आरोप करेन की, या कंपनीला काम देण्यामागे आपल्या इथल्याच महापालिकेच्या लोकांचा भ्रष्टाचारामध्ये हात आहे. तेव्हा पहिल्यांदा याची रितसर चौकशी झाली पाहिजे. दुसरा मुददा असा आहे की, या कंपनीने जेव्हा सर्व्हे करायला सुरूवात केली तेव्हा शहरातील किंवा प्रभागातील प्रत्येक विभागामध्ये हि कंपनी पोहोचलीच नाही. त्यांनी एका ठिकाणी कुठेतरी बसुन एका कार्यालयामध्ये बसुन एका एरियाचा सर्व्हे कागदावर केला आहे. मी माझ्या प्रभागाचे नाही तर स्वत:च्या घरचे उदाहरण सांगतो, जेव्हा माझ्याकडे हि माणसे आली सर्व्हे करायला तेव्हा त्यांनी मलाच तिनशे रूपये मागितले होते. मला वाटते अशी तक्रार श्री.

राजेंद्र चौधरी यांची पण होती. त्यांच्याकडे पण पैसे मागितले होते. आणि हे पैसे मागुन जर भ्रष्टाचार करून टाटा कंपनी सर्व्हे करत असेल तर त्याचा निश्चितपणे आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. मी आयुक्तांना विनंती करेन की, टाटा इम्पोटॅक्ट कंपनीची हि निविदा किंवा त्यांना दिलेले हे काम तावडतोब रद्द करून दुस-या नविन निविदा मागवाव्यात आणि खुल्या निविदा मागवुन हा ठेका दुस-या कंपनीला देण्यात यावा. धन्यवाद.

--२४--

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-स. महापौर व सर्व सन्माननिय सदस्य हो, आज नरेंद्र राजानी यांनी जी लक्षवेधी टाकली आहे. ती शहराच्या व आपल्या दृष्टीकोनातुन खुप चांगली आहे. परंतु त्या लक्षवेधी बददल आज जे उलटसुलट याठिकाणी चर्चा होते हे बरोबर आहे. कारण गेल्या कित्येक वर्षापासुन आपल्या महापालिकेमध्ये शहराचा नेहमी सर्व्हे केला जातो. आणि सर्व्हे करत असताना आपला कर्मचारी वर्ग असताना ते काम त्यांच्याकडुन न करवुन घेता. त्यांना फक्त बसुन पगार दिला व हे काम कंपनीला दिले गेले. त्यांना लाखो रू. दिले गेले ते मुळातच चुकीचे आहे. दुसरी चुकी अशी की, या कर्मचारींनी त्यांच्याकडुन हा सर्व्हे करून घ्यायला पाहिजे होता परंतु असे केले गेले नाही. माझे मित्र व सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी खरे म्हंटले आहे. कसे आणि काय दिले यात मी खोलात न शिरता. मी ऐवढेच म्हणु शकेन की, हा जो प्रकार झाला आहे. तो चुकीचा आहे. मी आयुक्तांना सांगतो की,महापालिकेने पुन्हा असा चुकीचा प्रकार करू नये. आणि झाल्यास त्याला जबाबदार कोण? याची चौकशी व्हावी. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी काही सदस्यांनी असे सांगितले आहे आणि मी स्वतः बघितले आहे की, त्यांनी एका ठिकाणी बसुन केले आहे. कारण त्यांना उल्हासनगर शहरातील कुठलाही ठाव ठिकाणा माहित नव्हता. झोपडपट्टी असो, बॅरेक असो इमारत असो, यांचे मोजमाप न करता, त्यांनी अंदाज पंचे दाहोशे अशा त-हेने एका झोपडीचे तीन झोपडे चार इमारतीचे बारा इमारती अस दाखवून त्यांनी आपले काम कसे आटोक्यात येईल आणि कसा आपला पैसा लवकर निघेल आणि त्यामागचा हेतु काय होता? उल्हासनगर शहराचा त्यांनी सर्व्हे केला, तो तर त्यांनी केलाच नाही परंतु सर्व्हे करत असतांना अनैतिक पदधतीने पैसा वसूल केला. उल्हासनगर शहरातील गरीब मंडळी श्रीमंत मंडळी त्रासुन गेली होती की, महापालिकेने यावेळी हे काम कंपनीला का दिले गेले? त्यामुळे शहरातील लोकांना राजकिय पुढा-यांना अशी शंका आली की महापालिकेचा यामागील हेतु काय? तर या हेतुची चौकशी झाली पाहिजे. हा ठेका त्यांना का दिला ठेका घेऊन त्यांनी अनैतिक पदधतीने पैसा वसूल केला आहे. त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. दंड वगैरे लावावा. तेवढयावरच न थांबता मला तरी असे म्हणायचे आहे की, त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी आणि यापुढे महापालिकेने कुठल्याही पध्दतीने हे काम दुस-या कुणास देऊ नये अशी आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे. आणि याउपर आयुक्त साहेबांनी देखील सभागृहामध्ये स्पष्टीकरण दिले तर फार बरे होईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा.महापौरजी, बराच वेळ या कपंनी विषयी चर्चा चालु आहे. जेव्हा हा मुददा स्थायी समिती समोर आला होता. तेव्हा श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी सर्व पक्षांची सहमती घेतली होती. व त्यांनी असे म्हंटले होते की, हे काम अत्यावश्यक आहे म्हणुन आयत्त्यावेळी आणत आहे. एक आठवडा पण मी वाया जाऊ देऊ इच्छित नाही. आणि जर हा ठेका ८४ लाखामध्ये या कंपनीला दिला तर ८४ लाख रू. खर्च महापालिकेला आला तरी कमीतकमी दहा करोड महापालिकेला या सर्व्हेमुळे उत्त्पन्न मिळेल. असे जेव्हा त्यांनी आश्वासन दिले तेव्हा स्थायी समितीने ८४ लाख रू. चे ऐवढा मोठा पैशाचा मुददा असुन देखिल फक्त महापालिकेचे उत्त्पन्न वाढणार आहे. हि गोष्ट लक्षात ठेवुन सर्व पक्षांच्या सदस्यांनी स्थायी समितीमध्ये तो ठराव पास केला. त्यांनतर जसे आमचे बंधु श्री. लाल पंजाबी म्हणाले जेव्हा करारनामा झाला तो महापालिकेत न होता टाटा इम्पोटेक्ट कंपनीमध्ये झाला.

माझ्या हातात आता करारनामा आहे. मी सांगु इच्छितो की, कंपनीच्या मालकाची त्यावर सही आहे त्यानंतर त्यावेळच्या आयुक्तांची श्री. आर. डी. शिंदे साहेबांची त्यावर सही आहे. करारनाम्यावर कधी आयुक्तांची सही असते का? दोन स्थायी समिती सदस्यांनी सही केल्यानंतर थेट सचिव साहेबांची सही असते व नंतर सिल केले जाते. या करारनाम्यात श्री. आरडी. शिंदे



साहेबांनी सही केल्यानंतर सुचक म्हणुन श्री. विनोद तलरेजा व अनुमोदक म्हणुन श्री. राजेंद्र चौधरी यांची सही घेतली आहे. त्यावेळी असा मुददा होता की, महापालिकेला १० करोड रू. उत्त्पन्न वाढणार होते. त्यावेळी आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, टाटा कंपनीवाले शहरातील जितक्यापण इमारती, झोपडपट्टी, बॅरेक आहेत त्यांचे सर्व्हे करून बरोबर मोजमाप देतील. त्यांनी करारनामा झाल्यावर स्वतः घेतलेला ठेका दुस-या हितांची नावाच्या कंपनीला देऊन टाकला. जसे आता श्री. नरेंद्र राजानी म्हणाले की, १६-१८ वर्षाची मुले सर्व्हे करायला आली होती. मी त्यावेळीच पत्र दिले होते १६. २००० ला दि.१२.७.२००१ मग यावर्षी पण मी दोन पत्रे दिली. आज मला ३०.७.२००१ला त्याचे उत्तर मिळाले आहे ते मी सर्व सदस्यांना दिले आहेत.व मा. महापौरांना त्याची प्रत दिली आहे. आज मला जे पत्र दिले आहे त्यात पण असे लिहिले आहे की, टाटा इम्पोटेक्ट कंपनीवाल्यांनी ज्या चुका केल्या आपण त्याची रिकव्हरी करू दंड घेऊ. अदयाप त्यात हा उल्लेख नाही केला की, त्यांचा ठेका रदद केला आहे. तो ठेका आधीच रदद करायला पाहिजे होता. उपायुक्त श्री. सोनाळे साहेब होते ते आता इथे नाहीत. त्यांनी दोन वेळा त्यांना मुदतवाढ दिली. त्यावेळी पण मी तक्रार दिली होती की त्यांना मुदतवाढ नाही दिली पाहिजे. ते म्हणाले होते की, २५ जुन पर्यंत ते सर्व बिल आम्हाला आणुन देणार आहेत. आज ३० जुलै आहे. यानंतर त्यांना मुदतवाढ देण्याचा प्रश्नच येत नाही. आता तर महापालिकेच्या कर्मचा-यांनी पण सर्व्हे सुरू केला आहे. आधी लोक टाटा कंपनीवाल्यांशी बोलायचे आता कर्मचा-यांशी बोलत आहेत. कंपनीमुळे शहराला तर नुकसान झालेच झाले. आता कर्मचारी वर्ग नव्याने मोजमाप करीत आहे. त्यांचे मोजमाप लागु करण्यासाठी कंपनीवाल्यांनी केलेले मोजमाप रदद तर केले पाहिजेत. व जे २१ लाख रू. त्यांना दिले गेले आहेत. करारनाम्यात तशी अट आहे की, जर त्यांनी या कामास उशिर लावला तर त्यांच्याकडुन त्याप्रमाणे रिकव्हरी केली जाईल. त्यामुळे त्यांना जे २१ लाख रू. दिले ते पण वसुल केले पाहिजेत व यानंतर त्यांना कोणतेही पेमेंट दिले नाही पाहिजे. हा जो शिंदे साहेबांचा फार्मुला होता त्यावेळी तो चांगला होता. परंतु तो असफल ठरला. आम्ही सर्व पक्षांतर्फे त्यांना सहयोग दिला होता. ती काय चुक नव्हती, किंवा घाईमध्ये काम नव्हते केले. जर आयुक्त म्हणतात की, महापालिकेची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. जर या कंपनीने असेसमेंट केले तर कमीत कमी दहा करोड रू. उत्त्पन्न वाढेल. म्हणुन सर्व पक्षीयांनी त्यांना सहमती दिली. तर हि गोष्ट जास्त न वाढवता. टाटा इम्पोटेक्ट कंपनीचा ठेका रदद केला पाहिजे. कर्मचा-यांना सर्व्हे करायला दिला आहे. त्यांच्यावर पण अन्याय केला जात आहे. त्यांना सांगितले आहे की, दहा दिवसाच्या आत सर्व्हे करा. कंपनीवाल्यांना दिडवर्ष देता आणि स्वतःच्या कर्मचा-यांना दहा दिवसच देतात. कमीत कमी त्यांना एक महिना, वीस दिवस, दिड महिना अशी तर मुदत दिली पाहिजे. ज्या चुकीच्या प्रॉपर्टीज आहेत. कुठे टेनंट लिहिले आहे, कुठे ए.सी.सी., आर.सी.सी. लिहिले आहे. अशाप्रकारे हजारो केस आहेत. त्याचे पण समाधान झाले पाहिजे. कंपनीवाल्यांनी कोणताही प्रश्न सोडवला नाही आहे. उलट त्यांना जे जे मिळाले ते घेऊन आले आणि तडजोड करून आले. आधी पण मी सहा पत्र दिली आहेत. टाटा कंपनीचा ठेका रदद केला जावा. त्यांची मुदत संपली आहे. त्यांना अजुन मुदत वाढ नाही दिली पाहिजे. महापालिका कर्मचा-यांकडुन लवकरात लवकर असेसमेंट करून घेतले पाहिजे. कंपनीवाल्यांनी करून घेतलेले असेसमेंट त्यांच्याकडुन घेतले पाहिजे. जेणेकरून कर्मचारीवर्ग लवकरात लवकर सर्व्हे करू शकतील. जे जुळत असेल ते ठिक आहे व जे जुळत नसेल त्यात योग्य तो बदल करून लवकरात लवकर असेसमेंट करून

घ्यावी. आणि कर्मचारीवर्गास फक्त दहा दिवस दिले आहेत ते पुरेसे नाहीत. एका ठेकेदाराला ८४ लाख रू. देतात. दिड वर्ष देतात आणि आपल्या



कर्मचा-यांना फक्त दहा दिवस देतात आणि त्यांना शिव्याही देतात. लवकर करा. लवकर करा. असे नाही झाले पाहिजे. आपल्या कर्मचारी वर्गाशी अन्याय नाही झाला पाहिजे.

मा.महापौरः-मी सदनात केलेल्या सदस्यांच्या वक्तव्याशी व ज्यांनी लक्षवेधी आणली त्यांच्या विचाराशी सहमत आहे. जसे सभागृह नेता म्हणाले की, शहरात असेसमेंट करण्याचा ठेका तत्कालिन आयुक्तांनी श्री. आर.डी. शिंदे यांना आणला होता. व त्यांनी आम्हाला सांगितले होते की, निविदा न मागवता ठेका दयावा. कारण नावाजलेली कंपनी आहे. जर यांना ठेका दिला तर महापालिकेचे उत्पन्न वाढेल व शहराच्या विकासासाठी एक मोठी संधी ठरेल. त्यांची हि गोष्ट लक्षात घेऊन महानगरपालिकेतील जितके पण राजकीय पक्ष आहेत ते यासाठी सहमत झाले. परंतु वर्ष-दिड वर्षात या कंपनीची काम करण्याची जी पध्दत होती त्यावरून हे सिध्द होते की, कंपनीने असेसमेंट करताना ७० टक्यापेक्षा जास्त चुका केल्या आहेत. मी कर निर्धारक आणि संकलन कर विभाग श्री. लाल पिंजानी यांना बोलावुन देखिल विचारले. त्यांचे पण हे म्हणणे आहे की, त्यांनी ७० टक्के पेक्षा जास्त चुका केल्या आहेत. इतकेच नाही तर त्या कंपनीचे जे कर्मचारी होते त्यांनी मोजमाप करताना भ्रष्टाचार केला आहे. लोकांकडुन पैसे घेतले आहेत. अशा पण तक्रारी खुप आल्या आहेत. ही माहिती आम्ही तत्कालिन आयुक्त श्री. आर. डी. शिंदे यांना पण दिली होती. दुर्दैवाने त्यावेळी ती गोष्ट दाबली गेली व कंपनीवर जी कार्यवाही करायला पाहिजे होती त्याकडे लक्ष दिले गेले नाही. मी आज पोखरकर साहेबांना असे निर्देश देतो की, कंपनीचा ठेका वीथ इमीजीएट इफेक्ट टर्मीनेट केला जावा. व इतकेच नाही तर त्यांना जी अग्रीम रक्कम दिली गेली आहे. त्याची पण वसुली केली जाईल व त्यांनी कामकाज करताना भ्रष्टाचार केला आहे. त्याची पण चौकशी केली जावी. व त्यांच्यावर जी कायदेशिर कार्यवाही केली जावी. आणि महापालिका कर्मचा-यांना पुरेसा वेळ दिला जावा. जसे सभागृह नेता म्हणाले. कारण इतक्या प्रॉपर्टीचे मोजमाप एवढया कमी अवधीत होणे शक्य नाही. कर्मचारी वर्ग ते करू शकणार नाही म्हणुन त्यांना योग्य तो कालावधी दिला जावा. आणि कंपनीवर योग्य ती कायदेशिर कार्यवाही केली जावी. आणि याबाबत मला असे वाटते की, आपण सदनास आजच आश्वासन दया.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- मी अजुन एकव गोष्टीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो. मी एक तिसरी गोष्ट पण सांगु इच्छितो की, आपल्या रिवेन्युचे जे नुकसान झाले आहे ते भरपाईसाठी जेव्हा कंपनीला मागणी कराल तेव्हा कंपनी सरळ होईल.

मा.महापौरः-बरोबर. बरोबर.

मा.आयुक्त(श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय व मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी जी लक्षवेधी आणली. त्याचे उत्तर मी देऊ इच्छितो, हा जो ठेका दिला गेला तो स्थायी समिती ठराव क्र. ३४, दि.२५.५.२००० प्रमाणे झाला होता. त्यानंतर हा ठेक्या बाबत मुंबई उच्च न्यायालय वा सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले होते. त्यावेळीच त्याची न्यायीक छाननी झाली आहे. त्या न्यायालयीन छाननी नुसार तो ठेका दिला गेला आहे. सन्माननिय सदस्य सर्वश्री. नरेंद राजानी, जमनादास पुरस्वानी, प्रकाश महाडिक, प्रमोद टाले, बी.बी.मोरे, सभागृह नेते, व सर्वात शेवटी मा. महापौर यांनी देखिल आपले विचार मांडले आहेत. या कंपनीला दोनदा मुदत वाढ दिली गेली आहे. या

मुदतीला अंतीम मुदत १० ऑगस्ट, २००० पर्यंत होती. व त्याबाबत जो निर्णय घ्यायचा तो या दरम्यानचा घेतला जाईल. याबाबत आणखी काही प्रश्न



उदभवले की, टाटा इम्पोटेक्ट कंपनीचे जे कर्मचारी होते त्यांच्या विषयी मी काही माहिती गोळा केली त्यावेळीच काही नगरसेवकांनी तक्रार केली होती. जी पण तक्रार होती ती तोंडी होती. लेखी स्वरूपात कोणतीही तक्रार नव्हती असे मला सांगितले गेले होते. जेव्हा कंपनीला तक्रार मिळाली तेव्हा कंपनीने त्यांच्या २४ कर्मचा-यांना कामावरून काढुन टाकले. व आता जो करार झाला आहे त्यानुसारच जी काही कार्यवाही करायची असेल ती करावी लागेल. अटी व शर्ती नुसारच कार्यवाही करावी लागेल. परंतु मी तुम्हाला हे सांगतो की, जी काही कंपनी विरूध्द कार्यवाही करावी लागेल ती कारवाई केली जाईल. त्यांना जो दंड आकारावा लागेल तो आकारला जाईल. त्यांचा कोणत्त्याही प्रकारे बचाव केला जाणार नाही. हे जे काम आहे ते मला नाही वाटत पुर्ण करू शकतील.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-१८ जुलैला त्यांनी मुदत वाढ पण मागीतली आहे. तिस-यांदा मुदतवाढ मागितली आहे.

मा.महापौर :-ती मुदतवाढ दिली जाणार नाही. आम्ही ठेका रदद करणार आहोत. आणि हे सर्व संमतीने ठरले आहे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापालिकेतील कर्मचा-यांना असेसमेंटसाठी जी मुदत दिली गेली आहे त्याविषयी असे की, त्यांना प्रभागातील ऐरिया माहित आहे. ते रोज त्या क्षेत्रात जातात, त्यांच्या प्रभागात जातात. त्यांना हे माहित असेल की, कोणत्त्या प्रॉपर्टीत बदल झाला कोणत्त्या नाही. त्यांना असे आदेश दिले आहेत की, ज्या प्रॉपर्टीत बदल झाला नसेल ते तसेच ठेवायचे काही करायचे नाही. परंतु जी प्रॉपर्टी नवी आहे. किंवा थोडा फार त्यात बदल झाला असेल त्याबाबतीत त्यानां सर्व्हे करायचा आहे. त्यांना दहा दिवस मुदत दिली होती ते दहा दिवस संपले आहेत. परंतु हे काम कधी ना कधी तरी संपवायचे आहे. पुर्ण करावे लागेल. चार वर्षात एकदा असेसमेंट रजिस्टर बनवावे लागते. ते करणे अनिवार्य आहे. त्यामुळे कर्मचा-यांना नव्या प्रॉपर्टीचा सर्व्हे करायचा आहे. जुन्या प्रॉपर्टीत तर काही बदल झाला नसेल. नव्या प्रॉपर्टीचे असेसमेंट जलदगतीने पुर्ण केले जाईल. अजुन एक मुददा आपणांस सांगु इच्छितो, जेव्हा कोणी व्यक्ती एखादे काम करते तेव्हा एखादे ध्येय डोळयासमोर असते. जी इंग्रज माणसे असतात त्यांना ध्येय गाठण्यात कठिण असते. जो असाधारण माणुस असतो त्यांना ध्येय गाठणे कठिण नसते. तुमची चिंता मला माहित आहे. कर्मचा-यांना मुदत कमी दिली आहे. तर माझ्यामते आपण जितका पाठपुरावा करू तितक्या लवकर हे काम होईल. परंतु मी विश्वास देऊ इच्छितो की, हे काम योग्य त्या कालावधीतच केले जाईल. व महानगरपालिकेचे जे असेसेमेंटचे काम आहे ते कमीत कमी ऑक्टोबरच्या आधी करून त्यानंतर बिल दिले जातील.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-त्यांचा ठेका रदद कधी करणार? त्यांना मुदत कुठ पर्यंत दिली आहे?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-त्यांची मुदत अजुन संपली नाही. त्या मुदतीच्या आतच निर्णय घेतला जाईल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-आयुक्त साहेब, १८ जुलैला त्यांनी महापालिकेला परत पत्र लिहिले आहे की, १० ऑगस्ट पर्यंत पण आमचे काम पुर्ण होणार नाही. म्हणुन त्यांनी पुन्हा मुदत वाढ मागितली आहे. आपण आताच निर्णय घेऊ शकता ना? जसा महापौरांनी घेतला.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-ही जी महासभा बोलावली जाते ती प्रशासकीय निर्णय घेण्यासाठी बोलावली जात नाही. आपण जो निर्णय घ्यायचा तो घ्या.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:- तुम्हाला त्यांचे पत्र आले की नाही?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-हो मला तसे पत्र मिळाले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-मग तर प्रश्नच येत नाही. १८ जुलैला त्यांनी पत्र दिले आहे की, आम्ही १० ऑगस्ट पर्यंत काम पुर्ण करू शकत नाही. मग निर्णय घ्या ना.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-तो निर्णय मी त्याच कालावधीमध्ये घेईन.

मा.महापौरः-आयुक्तजी, सदनाचे असे मत आहे की, हा जो ठेका आहे तो त्वरीत रद्द केला जावा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-महापौरजी, आयुक्त कायदयाची गोष्ट करतात. त्यांनी स्वत: पत्र दिले की, १० ऑगस्ट पर्यंत आम्ही काम पुर्ण करू शकणार नाही. मुदतवाढ दया. ते आयुक्त त्यावेळी निर्णय घेतील ते कायदयाने बरोबर राहिल. कारण त्यांच्याकडुन आपणांस रिकव्हरी करायची आहे.

मा.महापौरः-ज्या प्रकारे कंपनीवर आरोप लावले आहेत, सन्मानानिय सदस्यांनी अशा परिस्थितीत तो ठेका कंन्टीन्यु ठेवणे योग्य नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-ठेका तर रद्द करायचाच आहे. आपल्या कर्मचा-यांना काम दिले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-त्यांनी आधीच महापालिकेला लिहुन दिले की, आमचे काम १० ऑगस्ट पर्यंत पुर्ण होणार नाही. मग त्यांची वाट पाहण्यात काही अर्थ नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- आणि त्याच बरोबर एक चांगला अधिकारी टॅक्स वसुलीसाठी नियुक्त केला पाहिजे. ज्यावेळी तुम्ही ठेका रद्द कराल त्यावेळी त्वरीत तुम्ही एक चांगला अधिकारी कर वसुलीसाठी आणि असेसमेंटसाठी नियुक्त करा.

मा.सचिव :-पुढची लक्षवेधी सुचना श्रीमती. जया साधवानी आणि श्री. सुभाष मनसुलकर यांची आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मा.महापौरजी, (मला वाटते आयुक्त साहेब कामात व्यस्त आहेत).

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा.आयुक्त साहेब, जरा मोकळे व्हा.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-आधी मी मा. महापौर साहेबांचे आभार मानते कारण त्यांनी माझी लक्षवेधी स्विकारली. मा.महापौर मी आपल्या



परवानगीने आयुक्तांना मी एक प्रश्न विचारू इच्छिते. व अशी आशा करते की, आयुक्त प्रश्नाचे उत्तर नक्की देतील. प्रश्न असा आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र रजानीः- याच सभेत उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-हो. याच सभेत अभ्यासाला वेळ नाही. मी आपणांस हे विचारू इच्छिते की, आपल्या पुर्वीचे जे आयुक्त होते त्यांनी जर एखादा निर्णय घेतला असेल, सही केली असेल तर तो निर्णय तुम्ही मान्य कराल? मी आपणांस विचारत आहे, मग पुढे बोलेन. जर तुम्ही म्हणत असाल मान्य करेन तर पुढे बोलेन. जर तुम्ही म्हणत असाल मी मान्य नाही करणार तर मी लक्षवेधी आणली त्यात काही अर्थ नाही. मी फक्त हे विचारू इच्छिते की, श्री. बक्षी साहेबांच्या निर्णयावर आपण कायम रहाल की त्यावर बदल कराल? इतका सोपा प्रश्न आहे आणि उत्तर देऊ शकत नाही.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-हा थीअरीटीकल प्रश्न आहे की,....

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-नाही. मला हे विचारायचे आहे की, तुम्ही एखादा निर्णय घेतला त्या निर्णयावर सही देखिल केली. तो निर्णय तुमच्या नंतर येणा-या आयुक्तांनी मान्य नाही केला तर तुम्हाला दुःख होईल. होईल ना? आणि असे कायदयात देखिल नाही की, एका आयुक्तांनी घेतलेल्या निर्णय दुस-या आयुक्तांनी बदलावा. तुम्हाला मी हे विचारते तुम्ही मान्यता दयाल ना त्या गोष्टीला?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-प्रीझंम्शन करत आहात की, थीअरिटीकल प्रश्न विचारत आहात.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-नाही. नाही. मी तुम्हाला साधारण प्रश्न विचारत आहे. मी आपणांस हे विचारले की, जर श्री. बक्षी साहेबांनी घेतलेल्या निर्णयावर तुम्ही उत्तर देणे पसंत कराल? ते मान्य कराल?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, नियमाप्रमाणे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-मी तुम्हाला फक्त हे विचारत आहे की, तुम्ही मानणार की नाही मानणार?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-प्रश्न काय आहे?

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-मी फक्त तुम्हाला विचारते मान्य कराल की, नाही. तुमच्या म्हणण्याचा अर्थ हा आहे का की, आधीच्या आयुक्तांनी कायदयाच्या बाहेर जाऊन त्यांनी सही केली. हे आपण म्हणु इच्छिता. जेव्हा एखादा आयुक्त सही करतो तेव्हा तो नियमा अधिन राहुन सही करत असेल ना? मी बरोबर बोलत आहे ना?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-मी आपणांस विनंती करेन की, आपण जी काही परिस्थिती आहे ती पुर्णपणे स्पष्टपणे मांडा.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-माझी पुर्ण लक्षवेधी यावर आधारीत आहे की, तुम्ही त्यांचा निर्णय मान्य करता की नाही.



मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-नियम ७(२)अन्वये लॉजिकल आणि थीअरीटीकल प्रश्न विचारू शकत नाही.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-थीअरीटीकल प्रश्न विचारू शकत नाही. त्यावर तर माझी लक्षवेधी अवलंबुन आहे. मी आपल्या लक्षात आणु इच्छिते.

(इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.)

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे:-तुम्ही त्यांना स्पष्टपणे विचारा ना? प्रश्नोत्तरे काय करत आहात.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-का नाही प्रश्नोत्तरे विचारणार? तुम्ही इतक्या वेळेपासुन त्यांना प्रश्नोत्तरे करता तेव्हा?

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-जेव्हा तुमचे सदस्य प्रश्नोत्तरे विचारतात तेव्हा आम्ही मध्ये बोलतो का? तुम्ही कशाला विचारता?

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे:-शहरात दोनदा कॉलरा आला तेव्हा तुम्ही काय करत होतात.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-तुम्हाला मध्ये बोलायची गरज काय? तुमचे सदस्य पण प्रश्नोत्तरे करत असतात.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-मा.मोरे साहेब,

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-प्रश्नोत्तरे करणे आमचा अधिकार आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-मा.महापौर, मी मोरे साहेबांना हे सांगु इच्छितो की, मागे जे आयुक्त होते. त्यांनी जो निर्णय घेतला आहे. त्यावर हे श्री. पोखरकर साहेब, अंमलबजावणी त्याची बरोबर करत नाही आहेत. म्हणुन हा प्रश्न विचारला जात आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मी महापौरांना विचारते कारण आयुक्त मला उत्तर देत नाहीत. महापौरजी, २० तारखेला माझी लक्षवेधी स्विकारली गेली, आज ३० तारीख आहे. मी हे विचारू इच्छिते की, ज्याप्रमाणे आज नगररचनाकार सोनावणे नाहीत त्याप्रमाणे श्री. लांजेवार कुठे हरवले आहेत. त्यांनी पण रजा घेतली आहे का? लक्षवेधीत संबंधित अधिकारी नाहीत का?

मा.महापौर:-तुमची लक्षवेधी पाहुन आजारी पडले आहेत.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-इथे पुर्ण शहर आजारी आहे. शहरात कावीळ, अतिसार, कॉलरा इतके आजार पसरले आहेत. दवाखाने भरले आहेत. त्याकडे कुणाचे लक्ष नाही. २० तारखेला आम्ही लक्षवेधी दिली आहे. लक्षवेधी का दिली जाते. तुम्ही त्वरीत कार्यवाही करावी म्हणुन. तुम्ही काय कार्यवाही केली १० दिवसात? मी लक्षवेधी व्दारे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधले अशी शहराची स्थिती आहे. १० दिवसासाठी सभा स्थगित झाली. या १० दिवसात तुम्ही काय पाऊल उचलले? आयुक्त उत्तर देण्याच्या स्थितीत नाहीत. कुणाला मी सांगु? शहराची काय परिस्थिती आहे? कॉलेज शाळेमध्ये पाण्याचा एक थेंब नाही आहे. कॉलेजचे विद्यार्थी जे सायन्समध्ये प्रॅक्टीकल करतात त्यासाठी सुध्दा त्यांना पाणी नाही. काय उज्वल भविष्य



तुम्ही करणार उल्हासनगरचे? काय तुम्ही समजता? वरून मला म्हणता प्रश्न नका विचारू? असे कसे करणार आम्ही? पाण्याचा एक थेंब नाही. सेनिटेशनची हालत काय? प्रश्नावर प्रश्न विचारतो, पत्रावर स्मरण पत्रे पाठवतो. मी राजनीती सोडुन पक्षाची साथ सोडुन शहराच्या हितासाठी बोलत

आहे. ही गोष्ट आपण लक्षात ठेवा. आपण अजुन अभ्यास करत आहात. तुमच्या माहिती साठी म्हणुन मी काही फोटो तुम्हाला देत आहे.
(मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी यांनी काही फोटोग्राफ मंचावर नेऊन दिले) आयुक्त साहेब, जर तुम्हाला वेळ असेल दोन सेकंद, तर फोटोग्राफ पाहुन घ्या. फेब्रुवारी महिन्यात आम्ही भुक हडताल केली होती. पुर्ण कुर्ला कॅम्प मध्ये रोड बंद केले होते. कित्येक बसेस तोडल्या होत्त्या. रिक्षा बंद होत्त्या. त्यावेळी २२८ लोक उपोषणाला बसले होते. १३ दिवस उपोषण चालु होते. त्यात मी सहभाग घेतला होता. काही न खातापिता उपोषण केले होते. अशी हालत झाली की, आम्हाला नंतर रूग्णालयात दाखल करावे लागले. त्यावेळी श्री. बक्षी साहेब व महापौरांच्या समोर आम्हाला आश्वासन दिले होते. आम्ही म्हणालो होतो आम्हाला आश्वासन नको. लिखित करारनामा केला गेला. आपल्याकडे तो लिखित करारनामा आहे का? मी हे विचारू इच्छित होते, श्री. बक्षी साहेबांनी आम्हाला जे वचन दिले होते त्यावर तुम्ही अंमलबजावणी केली. मला मोठया दु:खाने म्हणावे लागते की, त्यातील एकही वचन, एकही मुददा पुर्ण केला नाही. का तुम्ही शहरवासियांशी खेळ खेळता? बक्षी साहेब सही करून जातात. महापौर तिथे हजर होते. अधिका-यांच्या देखिल त्यावर सहया आहेत. मला वाटते चिजवानी साहेबांची देखिल सही आहे. आज चिजवानी साहेब कुठे आहेत? काय चालले आहे हे?

(इकडे विपक्ष सदस्य शेम शेम म्हणुन ओरडत होते). आरोग्य खात्त्याचे लांजेवार नाहीत. मी कुणाला प्रश्न विचारू? त्यांना १० दिवस मुदत देखिल मिळाली होती अभ्यास करायला. आपल्या माहितीसाठी मी सांगते एका एरियात एक थेंब पाणी येत नव्हते. श्री. बक्षी साहेबांनी निर्णय घेतला होता की, तिथे ३ इंचाची पाईप लाईन टाकायची. बुस्टर लावले जाईल. मोठया दु:खाची गोष्ट आहे. तिथे फक्त पाया घातला गेला दोन महिन्यात. दोन महिन्यात तिथे फक्त एक खोली बांधली आहे, मला रोज तिथे घेऊन जातात आणि सांगतात की, इथे रोज मशिनरी लावणार आहोत. आज काय झाले, मशिनरी का नाही लावली विचारले तर म्हणतात की, आज लाईट नाही आहे. ते तर जाऊ दया. अजुन कनेक्शन नाही टाकले आहे. आज पुर्ण हॉस्पीटल भरले आहे. याला जवाबदार कोण? तुम्ही जवाबदार आहात. जर तुम्ही तुमच्या कर्मचारींवर नियंत्रण नाही करू शकत तर शहराच्या जबाबदा-या काय सांभाळणार? ही गोष्ट मी नियंत्रणा बाहेर न जाता जे खरे आहे. खरे कडु असते असे म्हणतात. आपण एम्बेसेडर गाडीतुन दिवा लावुन जेव्हा फिरता, आपण हा विचार करा की, मी गाडी या शहरामुळे मिळाली आहे. त्यात बसुन आपणांस भेट दयायची आहे. पहायचे आहे. माहिती घ्यायची आहे. काल नवभारत टाइम्स मधील पाच नंबर पान आपण वाचले असेल तर, नसेल वाचले तर कालचा नवभारत टाइम्स मागवुन घ्या. या उल्हासनगरचे नाव मंत्रालय व इतर ठिकाणी गेले आहे. ते नाव कुणामुळे खराब झाले आहे? नवभारत वर्तमानपत्राच्या पत्रकारास ते दिसते तो फोटो घेतो की, इतके घाण पाणी वाहत आहे. पाणी वाया जात आहे. ते त्यांना दिसते तुमच्या कर्मचा-यांना दिसत नाही असे कसे? का नाही माहित पडत? याची जवाबदारी कोण घेणार? तुम्ही घेता?मी स्वत: दोन दिवस दवाखान्यात होते, माझा मुलगा हॉस्पीटलमध्ये होता. श्री. सेवलदास ठाकुर यांची मुलगी दवाखान्यात होती. महापौर साहेब, तिथे आले होते. तिथे अशी स्थिती होती की, माझ्या सारख्या नगरसेविकेला देखिल रूम नव्हता. इतकी गर्दी तिथे होती. मला लाज वाटते आज इथे बिसलरीचे पाणी प्यायला. का मी इथे पाणी पिऊ?



काय अधिकार आहे मला बिसलरीचे पाणी पिण्याचा? तुम्हाला माझ्या बोलण्याचे हसु येत आहे. कमाल आहे तुमची. आपण असे का करत आहात? का शहराशी खेळ करीत आहात?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडे:-महापौरजी, शहरात ऐवढी पाणी टंचाई असुन ही बिसलरी बाटली कशाला पाहिजे? या शहरामध्ये किती लोक बिसलरी पाणी पितात. कशाला पाहिजे बिसलरी फेकुन दया ना तिकडे.
(असे म्हणुन श्रीमती. सुनिता बगाडे यांनी बिसलरीची बाटली मंचासमोर फेकली)

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-आयुक्त साहेब तुम्ही काहीही उत्त्तर देण्याच्या मुडमध्ये नाही का? या आजारांवर आपण काय उपाय केले आहेत? का मला फक्त हे माहित आहे. आयुक्त म्हणुन आपणांस माहित नाही. नाहीतर एवढे तरी सांगा की, मला काही माहित नाही. मी गुपचूप पणे खाली बसेन आणि तुम्हाला अजुन वेळ देईन. दहा दिवस, वीस दिवस की तुम्ही माहिती गोळा करा. आपणांस शहराची स्थिती आज माहित नाही का? उत्त्तर दया. महापौर साहेब, त्यांना सांगा आम्हाला कमीत कमी उत्त्तर तर दया.

मा.महापौर:-तुम्ही आधी आपले पुर्ण विचार मांडा. नंतर ते उत्त्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-विचार काय मांडायचे पुर्ण शहराची हालत खराब आहे. साफसफाई नाही. चिजवानी हजर नाहीत. लांजेवार नाहीत. कुणाला आम्ही प्रश्नोत्त्तरे करणार?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-जबाबदारी कुणाची आहे? आज संबंधित अधिकारी इथे नाहीत. ही जबाबदारी कुणाची आहे? याला जबाबदार कोण?लक्षवेधी आहे आणि संबंधित अधिकारी कुणीही नाही.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मागच्या आठवड्यात लक्षवेधी देण्यापुर्वी मी लांजेवार साहेबांशी बोलले होते. तुम्हाला देखिल मी आणि श्रीमती. कांता गजवानी यांनी पत्र दिले होते की, दहा-दहा दिवस आमच्या प्रभागातून कचरा उचलला जात नाही. आपण त्याकडे लक्ष दयावे. आपण अदयाप त्यागोष्टीचे समाधान केले नाही. दहा-दहा दिवस कचरा पडुन राहतो. शहर कचरा शुन्य करण्यासाठी आपण ठेका दिला आहे. काय करायचे त्याचे सांगा तुम्ही?काय तरी बोला आपण त्याविषयी. मी गप्प बसेन अशी शपथ खाल्ली आहे का? माझ्याशी काही शत्रुत्त्व आहे का? आपण उत्त्तर का नाही देत? लांजेवार साहेबांना विचारले तर ते म्हणाले की मी पाणी पुरवठा विभागाला पत्र दिले आहे. पाण्याची खुप गंभीर समस्या आहे. पाण्यात कचरा आहे. एक उपायुक्त दुस-या उपायुक्ताला पत्र लिहीतो. हे काय चालले आहे महापालिकेत? याकडे तर आपण लक्ष दया. दहा दिवसात तुम्ही काय पाऊल उचलले?

मा.महापौर:-मॅडम तुम्ही आधी तुमचे संपुर्ण विचार मांडा. त्यांनतर आयुक्त उत्त्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मी आता अर्ध्यातच त्यांचे उत्त्तर मागते, नंतर अर्धे बोलीन. दया उत्त्तर.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी-महापौर साहेब, मला असे वाटते आयुक्त साहेबांची महापालिकेवर पकडच नाही. त्यांच्या हाताखालचे अधिकारी काही चांगले आहेत काही नाही. ते आयुक्तांना महत्त्व देत नाही. जसे आज पहा



महासभेत खुपसे अधिकारी गैरहजर आहेत. सोनावणेंसाठी सांगितले की, ३ वाजता त्यांनी रजा पाठवली. लांजेवार कुठे आहेत? ते इतके गुन्हे करतात महापालिकेच्या नावाखाली मी आपणांस सांगतो त्यांनी आठ दिवस अगोदरचा अहवाल पाठवला की, २१ रूग्ण फक्त मध्यवर्ती इस्पितळात आहेत. आणि हॉस्पीटलचा रिपोर्ट आहे, लिखित ४१ रूग्ण आहेत. आणि हे अशी बोगस माहिती शासनाकडे पाठवतात. अशा खोटया अधिका-यांना त्यांनी ठेवले आहे.

कित्त्येक महिने झाले. उप अभियंता नाही, पाणी पुरवठा विभागात. रोज रोज जाऊन मी त्या विभागात ओरडतो. आमच्या प्रभागात पाणी नाही वरून पाऊस पडतो आणि तिथे जाऊन आम्ही टॅंकर मागतो. आठ दिवसापुर्वीची गोष्ट सांगतो आता मी श्री. कुमार आयलानी यांच्या बरोबर तिकडे गेलो. तर ते ओळखत नव्हते. कुमार आयलानींनी स्वतःची ओळख करून दिली की मी माजी उप महापौर होतो. ते म्हणाले सांगा काय काम आहे? आम्ही सांगितले की आमच्या प्रभागात पाणी नाही. ते म्हणाले कधी पासुन? आम्ही सांगितले पाच-सहा महिन्यापासुन. तेव्हा ते म्हणाले इतक्या महिन्यापासुन. शेजारी आता ज्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे,पाणी पुरवठा विभागाचा, ते उपअभियंता तिथे बसले होते. ते फक्त बसलेले असतात. ३ नंबर मध्ये तक्रार दयायला गेलो तर तिथे ते लोक डब्यात पाणी घेऊन फिरत असतात नमुने चेक करण्यासाठी. त्यांनी महापालिकेची हालतच खराब केली आहे. वरून पाऊस पडत आहे. इमारतीत पाणी नाही. आणि पाण्याचा जो अहवाल मागितला आहे त्यात लिहिले आहे की, दहापट पाणी इमारतीत येते. ५०-६० फ्लॅटना दहा मिनिटे पाणी कसे काय पुरणार? आम्ही टॅंकर नेतो त्यात घाण पाणी असते, बोरींगचे पाणी असते. त्या ठेकेदारांना पेमेंट देत नाही म्हणुन ते पण टॅंकर देत नाहीत. आमचा अर्धा दिवस इथे, अर्धा दिवस टॅंकरमध्ये जातो. त्यावर घाण पाणी. साफसफाईची तर इतकी खराब हालत आहे. लांजेवार स्वतः आजारी आहेत. ते म्हणतात आज जातो की, उदया जातो. पुर्ण दिवस त्यांच्या तोंडात पानपराग असते. काय काय खातात. त्यांच्याशी बोलताना पण भिती वाटते की, त्यांचा आजार आम्हाला देखिल होईल. कुठे आहेत ते आज? कुठे आहेत चिजवानी? त्यांनी बांधकाम विभागाचे काम ठप्प करून ठेवले आहेत. शहरात कुठे काम होत आहे? नाहीतर वर्तमानपत्रात घोषित करा महापालिका दिवाळखोर झाली आहे. काही काम होत नाही. अजुन पर्यंत यावर्षात दोन लाखाचे काम झाले नाही. जुलै महिन्यात दोन लाखाचे काम झाले ते ही झाले नाहीत. मी सहा लाखाचा नगरसेवक निधी स्वतःचा दयायला तयार आहे. तसे प्राकलन दिले आहे. आयुक्त साहेब म्हणतात आमच्याकडे पैसा कुठे आहे? एकतर नळाला पाणी देत नाही. टॅंकरही देत नाही. काय देणार आम्हाला मग? पावसाळयात नदी नाल्यात जे पाणी येते ते आम्ही यायचे का? महापौर साहेब, आपण बोला गोल मैदान ऐरीयात आमच्या ऐरीयात पाणी नाही. आमच्या प्रभागात पाणी नाही. टॅंकर जातात. आता पण मी इथुन टॅंकरसाठी फोन करत आहे. पाच वाजले तरी टॅंकरमध्ये पाणी नाही. अशा परिस्थितीत देखिल दोन-दोन तीन-तीन दिवस शट डाऊन करतात आणि सांगतात पाण्यात कचरा झाला तो साफ करत आहे. कधी लाईट बंद आहे. आपल्या उल्हासनगर शहराशी असा का अन्याय होत आहे? उल्हासनगरवाले काय गुन्हा करतात काय? आयुक्त साहेबांना सांगा इथे काय होते ते. आमचे आयुक्त साहेब ऐकत नाहीत. महापौर साहेब, तुम्ही तरी त्यांना सांगा. उप अभियंता नाही, पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी नाही. असाच अंधाधुद कारभार चालला आहे. लांजेवार असताना दुस-यांदा कॉलरा झाला आहे. अशा अधिकारींना महापालिका सांभाळत आहे. त्यांना परत नागपुरला पाठवा.

<u>मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-</u>फेब्रुवारी महिन्यात आम्ही उपोषण केले होते. उपोषण हा शेवटचा टप्पा असतो. यापुर्वीही आम्ही कित्त्येकदा स्मरणपत्रे



दिले आहेत. मार्च ३ ला करारनामा केला गेला आहे. आज इतके महिने झाले आहे. आज पर्यंत त्या करारनाम्यातील एक सुध्दा मुददा पुर्ण केला गेला नाही. तर आज आपण काय उत्तर देणार? मी आज आपणाकडुन उत्तर घेणारच.

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सन्माननिय महापौर साहेब,आमच्या यु.पी.पी. पक्षाची सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी यांचा काल मला फोन आला होता. व त्या म्हणाल्या होत्त्या की, ती आपल्याला देखिल दोन-तीनदा भेटली आहे. मा. चंद्रशेखर साहेब, इथे जेव्हा आले होते. त्यांना देखिल तक्रार दिली

होती. त्यांनी बुस्टर त्वरीत त्यांच्या प्रभागात लावले जावे. असे आदेश दिले होते. परंतु मोठया दुःखाने म्हणावे लागते. त्यांचा हा आरोप आहे की, त्यांच्या आजुबाजुमध्ये जितके पण प्रभाग आहेत. सगळीकडे पाणी भरपुर येते. माझा प्रभाग सोडुन व त्यांनी हे पण सांगितले की, दशोरे साहेब इंचार्ज आहेत. ते बरोबर लक्ष देत नाहीत. मला वाटते तुम्हाला हे चांगल्या त-हेने माहित आहे. त्या म्हणाल्या की, आम्ही आता उपोषणाला बसु. यु.पी.पी. पक्षाने देखिल साथ दयावी. पाण्याची इतकी गंभीर समस्या आहे. लोकांना दिलासा दयायचो की, पाऊस आल्यावर पाण्याची टंचाई कमी होईल. पाणी ठिक येईल. १०० एम. एल.डी. पाणी शहरास मिळत आहे. बरोबर आहे , परंतु पाणी वाटप पध्दत बरोबर नाही. कृपया प्रभाग क्र. ५५ मध्ये समस्या आहे ती सोडवावी. मी आपणांस निवेदन करते की, अधिकारींना बोलावुन त्या प्रभागाचे निरिक्षण करून त्यांना या समस्येचे समाधान करून दया. नाहीतर लोक उपोषणाला बसतील यापासुन आमचा तुम्ही बचाव करा. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा.महापौर, आयुक्त साहेब, आज श्रीमती. जया साधवानी आमच्या नगरसेविकेंनी जी लक्षवेधी सुचना आणली आहे. श्री. नारायण पंजाबी यांचे भाषण चांगले झाले. परंतु ती लक्षवेधी कॉलरा विषयी होती असे मला वाटते. पाण्याविषयी नव्हती. कॉलरा विषयी आहे. तर मला आयुक्त साहेबांना एक सांगायचे आहे की, जेव्हा आयुक्त साहेब ठाण्यावरून उल्हासनगरला आले. कदाचित ते कल्याणला पण असतील. जेव्हा उल्हासनगर शहरामध्ये आयुक्त साहेब येतात. मागच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०००चा हिशोब बघा. त्यावेळेस उल्हासनगरमध्ये कॉलरा झाला होता. कल्याण वा अंबरनाथला झाला नव्हता. त्यानंतर लागोपाठ सहा महिन्यांनी आता पुन्हा कॉलरा झाला. पुन्हा उल्हासनगर शहरातच झाला. कल्याणलाही नाही झाला, अंबरनाथलाही नाही झाला. हे का होत आहे असे? याचा विचार आयुक्तांनी करायला पाहिजे. आजुबाजुच्या शहरामध्ये कॉलरा होत नाही. परंतु उल्हासनगर शहराच्या फक्त झोपडवासियांमध्ये कॉलरा होतो. सम्राट अशोक नगरमध्ये कॉलरा झाला. मागच्या वेळेस दोन बळी गेले. यावेळेस आणखी किती बळी जातील हे सांगता येत नाही. हा जर विचार आयुक्तांनी केला तर हा कॉलरा निर्माण होण्याच्या मागे मागच्या वेळी एम.आय.डी.सी. वाल्यांनी सांगितले होते की, पुर्णपणे महानगरपालिकेची चुकी आहे. आणि आमचे पण असे ठाम मत झाले आहे की, हि पुर्ण चुकी जी आहे ती महापालिकेची आहे. महापालिकतील अधिका-यांची आहे. आमची जया साधवानी मॅडम उपोषणाला बसते. त्यावेळेस पाच-पाच दिवस आमचे एकही अधिकारी तिकडे फिरकत नाही. आमचा चंद्रशेखर भालेराव दुषित पाण्याविषयी उपोषणाला बसतो. परंतु एकही अधिकारी तिथे फिरकला नाही. हे का होते? दुषित पाण्याविषयी मी स्वत: तुमच्याकडे तक्रार केली होती की, आम्हाला तिथे एक पाईप लाईन बदलुन दया. परंतु त्याची अजुन दखल घेतली नाही. जर दुषित पाण्यामुळे कॉलरा होत असेल तर त्यात दुरूस्ती करणे कोणाचे काम आहे. म्हणजे आमच्या जनतेच्या भावनेशी तुमचे अधिकारी जर खेळ खेळत असतील आमची जनता हे कधी सहन नाही करणार. मी पुन्हा तुम्हाला विनंती करतो की, हा कॉलरा जर समुळ नष्ट करायचा असेल तर तुमच्या अधिका-यांना तावडतोब त्या



कामासाठी राबवावे. दुसरे मी आणखी एक सांगतो की, मागच्या वेळेस हा कॉलरा आला होता. तेव्हा आमच्या सचिवांनी इथे भेट दिली होती सम्राट अशोक नगरमध्ये श्री. रामानंद तिवारी साहेबांनी. मोठी आश्वासने दिली. पुढे काय झाले त्याचे? वीस लाख रूपये दिले आहेत पुढे काय झाले आहे त्याचे? आमचे खासदार मा.प्रकाश परांजपे यांनी मागच्या वेळेस १५ लाख रू. दिले आहेत. परंतु कॉलराचे एकही एस्टीमेंट तिथे गेले नाहीत. लोक पैसे दयायला तयार आहेत. आपले खासदार पैसे देत आहेत. तिवारी साहेब पैसे देत आहेत. पण ते पैसे घेण्याची ताकद महापालिकेत नसेल तर स्वत: पैसे काय वापरणार आहेत. मी पुन्हा विनंती करेन की, आयुक्त साहेबांनी या

गोष्टीचा सखोल विचार करावा आणि यावर निश्चित गांभीर्याने लक्ष दयावे. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.महापौर साहेब, आजची जी आम्ही लक्षवेधी आणली आहे. ती मुख्य म्हणजे कॉलरा विषयी आणि अनियमित येणा-या पाण्याविषयी आहे. पाण्याविषयी जया साधवानी बोलल्या आहेत. मला कॉलरा विषयी बोलायचे आहे. कुणी संबंधित अधिकारी असतील तर बोलवा. कारण मला दोन-तीन प्रश्न कॉलराविषयी विचारायचे आहेत.

(इथे श्रीमती. डॉ. रेलवानी या मंचावर आले असताना)

या पहिल्यांदा दिसत आहेत यांची ओळख कारण लांजेवार साहेब आहेत, मला माहित आहे. मॅडम मागच्या वर्षी कॉलरा जेव्हा शहरात आला होता. त्यावेळी किती रूग्ण डिटेक्ट झाले होते.

श्रीमती. डॉ. रेलवानी (उ.म. पा):- मला त्याची माहिती नाही.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-हे घ्या माझा भारत महान.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-आयुक्त साहेब, आपण उत्तर दया. या तर डॉक्टर आहेत यांना काय माहित? यांना आपण मेडिकल विषयी प्रश्न विचारू शकता. आरोग्य अधिकारी आणि उपायुक्त यांनी मंचावर यावे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-श्री. पानपटटे यांना बोलवा ना?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-म्हणुन तर मी म्हणालो ना? मी यांना पहिल्यांदा पहात आहे. आरोग्य अधिकारी वगैरे कुणी आहे की, नाही?

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-या इलाज वगैरे करू शकतात ना?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-काही इलाज करायचा आहे तर ठिक आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-कोणी आहे की नाही इथे उत्तर दयायला. गेल्या वेळेस आपल्या इकडे कॉलरा आला होता. तेव्हा कॉलरा पॉझिटीव्ह किती रूग्ण होते.

श्री. पानपटटे (उप आयुक्त):-मा. महापौर, आयुक्त साहेब, माझ्याकडे मागच्या वर्षीची माहिती नाही हे काम लांजेवार साहेब पाहतात. लांजेवार साहेब आज नाही आहेत.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-आयुक्त साहेब, तुम्ही सांगा मग.



मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-आज पासुन ही प्रथा सुरू झाली की, उत्तर दयायला अधिकारी हजर नसतील.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, तेव्हा ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्ये कॉलरा असलेले ५०० रूग्ण होते.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-५०० रूग्ण? यावेळेस किती झाले आहेत?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-यावेळी २१ रूग्ण कॉलराचे आहेत.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-आता श्री. नारायण पंजाबी यांनी सांगितले की, ८४ म्हणुन.
मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-सेंन्ट्रल हॉस्पीटलचा जो अहवाल आहे त्यात एका आठवडयापुर्वी ४१ रूग्ण आहेत असे सांगितले आहे. हे लांजेवार आणि जनार्दन यांनी मिळुन बोगस रिपोर्ट दिला आहे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-मध्यवर्ती रूग्णालयात असणा-या रूग्णांची संख्या ४४ आहे. परंतु उल्हासनगर शहरातील २१ जण आहेत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-कॉलराचे?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-हो.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-कावीळचे किती आहेत?गॅस्ट्रोचे किती आहेत? लेप्टोस्पायरोसिसचे किती पेशंट आहेत? हे सर्व पाण्यामुळेच रोग तयार होतात.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-गॅस्ट्रोचे २५४.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-आणि कावीळ वगैरेचे. म्हणजे पाण्यापासुन तयार होणारे रोग. यांची टोटल किती?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-कावीळीचे पेशंट नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-लेप्टोस्पायरोसिसचे किती आहेत?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-काही नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.आयुक्त साहेब, खाली बसु नका. कारण आपल्याला माहित आहे. गेल्या वेळेस कॉलरा हा जाहिर केला होता. त्यामुळे (काय झाले? मी काय इथे नक्कल तर करत नाही ना जोकर सारखी तुम्ही असे हसु नका) असे हसुन हसुन लोकांना तुम्ही मुर्ख बनवु नका. मी प्रश्न विचारतो, माझ्या प्रश्नाचे उत्तर दया तुम्ही. मेहरबानी करून तुम्ही हसु नका.
मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-इतकी गंभीर गोष्ट आहे आणि तुम्ही हसत आहात.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-लोक आज कॉलरा, गॅस्ट्रो, कावीळ पासुन त्रस्त आहेत. आम्ही शहराच्या समस्येविषयी लक्षवेधी आणली आहे.

--३७--

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-आम्ही काय तुम्हाला शायरी ऐकवली का? जोक सांगितला का? आपल्याला हसु येत आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा.साहेब, हे सर्व तुम्ही सेंन्ट्रल हॉस्पीटलची संख्या दाखवली आहे. जे खाजगी दवाखाने आहेत त्यांतील रूग्णांची संख्या तुम्ही दाखवली नाहीत. आणि आपल्याला ब-यापैकी माहित आहे की, जेव्हा गेल्या वेळेस कॉलरा जाहिर केला. राज्य शासनाकडुन आपल्याला तातडीने मदत मिळाली. तातडीने तिथुन डॉ. आले होते. यावेळेस का नाही जाहिर करण्यांत आले कॉलरा? कारण नवाकाळ मध्ये मी वाचले की, उल्हासनगर लेप्टोस्पायरोसिस आणि कॉलराग्रस्त शहर झाले आहे म्हणुन वर्तमानपत्रवाल्यांना माहित पडते आणि छापले जाते. आणि आपल्याकडील

येथील अधिकारीना किंवा तुम्हाला काही कळत नाही. एवढी कर्मचारी संख्या असताना देखिल ते जाहिर का करण्यांत आले नाही. जेणे करून जाहीर केल्यामुळे आपल्याला राज्य शासनाकडुन जी मदत मिळते तातडीची ती मदत आपल्याला मिळालेली नाही. आणि रूग्ण वाढत गेले आहेत. गेल्या वेळेस तातडीने कॉलरा जाहिर केल्यानंतर तातडीने त्यावर उपाय करण्यांत आले आहेत. इथे राज्य मंत्री दिग्विजय खानविलकर साहेब आले होते. का जाहिर करण्यांत आले नाही. याचे उत्तर मला दया आधी. ५०० पेशंट झाल्यावरच जाहिर करणार का?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, कॉलराचा जो प्रश्न घेतला गेला आहे. कॉलरा हा संसर्गजन्य आहे. बी.पी.एम.सी. ॲक्ट अन्वये एक आदेश काढला जातो. तो आदेश डिसेंबर २०००मध्येच काढला आहे. तो आदेश विथड्रॉ नाही केला. म्हणजेच तो आजपर्यंत लागु आहे. सिटी इज ऑल रेडी ॲफेक्टेड बाय कॉलरा. त्यानंतर आता मी २७ जुन रोजी पत्रकार परिषद घेऊन नागरिकांच्या हितासाठी एक सुचना जाहिर केली होती की, शहरात किती कॉलराचे रूग्ण आहेत. गॅस्ट्रोची पण त्यावेळी आमच्याकडे संख्या होती. फक्त गॅस्ट्रोची. आम्ही बी.पी.एम.सी. ॲक्ट अन्वये आदेशा व्दारे काढली होती. ते आदेश देखिल शासनाला पाठविले आहे. मा. मंत्री महोदयांबरोबर माझी बैठक देखिल झाली आहे. चर्चा झाली आहे. त्यांना मी सर्व माहिती दिली आहे. मला वाटते, डिसेंबर पासुन शहर कॉलराग्रस्त आहे. व जेव्हा पावसाळा येतो तेवहा वातावरणात बदल होतो. त्यानुसार ही संख्या वाढली आहे. मी असे समजतो की, हे जे शहर आहे,आपणांस देखिल माहित आहे की इथे ९५ टक्के अनाधिकृत बांधकाम आहे. हि परिस्थिती का आली? याचे कुणी कधी आत्मपरिक्षण केले आहे. यास कोण जबाबदार आहे? ही जबाबदारी कुणावर येते?
काही सदस्यः-आपल्यावर.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-नाही. जेव्हा एखादे शहर ९० -९५ टक्के अनाधिकृत बांधकाम होते याची जबाबदारी माझ्यामते येथील सोशल इन्वॉयरमेंट वर येते. त्याचे पृथक्करण मी असे करू इच्छितो की, तर याला जबाबदार प्रशासन तर आहे.पण....

मा.महापौरः-आयुक्त साहेब, कृपया खाली बसा. मी आयुक्तांना सांगु इच्छितो की, ते ठाणे महानगरपालिकेतून इथे आले आहेत. तिथे ते उपायुक्त होते. आता त्यांनी आयुक्त म्हणुन चार्ज घेतला आहे. आय हॅव अटेंड दी फस्ट कॉनफरन्स ऑफ मेयर्स ॲन्ड कमीशनरस् अेट सहयादी गेस्ट हाऊस व्हीच वॉज चेअर्ड बाय नॉट लेस देन विलासराव देशमुख हु इज दी चिफ



मिनिस्टर ऑफ गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र डेप्युटी मिनिस्टर छगन भुजबळवॉज ऑलसो देअर. युवर कमिशनर हु इज द नं.१ कमिशनर ऑफ दी होल स्टेट टी. चंद्रशेखर. ते तिथे उभे राहुन बोलले होते की, ठाणे महापालिकेत ७५ टक्यापेक्षा जास्त अनाधिकृत बांधकाम आहे. आणि मी ऐवढे सगळे बांधकाम तोडु शकत नाही. यासाठी या बांधकामांना तोडण्याविषयी विचार नाही केला पाहिजे कारण यांना तोडले तर आपण त्यांना परत दुसरीकडे निवारा नाही देऊ शकणार. याचा अर्थ असा नाही की, ज्या शहरात अनाधिकृत बांधकाम आहे. तिथे कॉलरा, गॅस्ट्रो यासारखे आजार पसरतात असे आयुक्तांचे म्हणणे माझ्यामते चुकीचे आहे. जर असे असते तर ठाण्यात पण कॉलरा झाला असता. या शहरात जी सफाईची स्थिती आहे. शहरातील जी अनहायजनिक कंडिशन आहे जर त्यात सुधारणा नाही केली गेली तर यात-हेचे रोग शहरात कधीही होऊ शकतात. मी आपणांस आठवण करून देतो आयुक्तजी, हा रोग पसरण्याआधी मी तुम्हाला माझ्या खाजगी कार्यालयात बोलावले होते नेहरू चौक इथे व मी माझ्या कार्यालयासमोर कच-याचे ढिग तुम्हाला दाखवले. आणि सांगितले की हे पहा पब्लिक हेल्थ विभागाचे काम पहा. ते पहा कसे

काम करत आहेत. ही सर्व जबाबदारी प्रशासनाची आहे. जर प्रशासनाने स्वतःचा बचाव करण्यासाठी म्हणुन अशी उत्तरे दिली की, अनाधिकृत बांधकाम शहरात आहे. हे एक कारण नाही. इन्फ्रॉस्ट्रक्चर शहराचे फेल झाले आहे. त्याचे एक कारण हे पण आहे. पण संपुर्ण कारण हे नाही. हे एकच कारण आजार पसरण्यासाठी नाही असु शकत. अनेक कारणामध्ये एक कारण असु शकते. अनाधिकृत बांधकामामुळे आजार पसरतात हे बोलणे उचित नाही. हे चुकीचे आहे असे मला वाटते. शहरात जी आजची परिस्थिती आहे आरोग्यास अपायकारक याला जबाबदार पब्लिक हेल्थ विभाग आहे. त्यांचे काम शुन्य आहे. मी लांजेवारांना पंधरा-वीस वेळा बोलावून खास सांगितले आहे की, तुमच्या विभागाचे काम शुन्य आहे. पाणी पुरवठा विभागाला बोलावुन सांगितले की, कमीत कमी शहरातील महापालिकेच्या पाणी पुरवठा करणा-या कनेक्शन आहेत. त्यात तरी घाण पाणी जाऊ देऊ नका. परंतु ज्या कनेक्शनमधुन लोकांना पाणी जाते. मेन सप्लाय लाईन मधुन जर दुषित पाणी गेले, आणि अजुन कुठे जर ते तुटले असेल त्या लिकेज मधुन घाण जाऊन पाणी दुषित होणारच आहे. म्हणुन महापालिका व अधिकारीन याकडे विशेष लक्ष दिले पाहीजे. महापालिकेची जी जबाबदारी आहे ती तरी त्यांनी कमीत कमी पार पाडणे जरूरी आहे. या त-हेने आपले बोलणे योग्य नाही.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u>मा.महापौर, मी आयुक्तांचे लक्ष याकडे वेधु इच्छितो की, चार महिने पहिले आम्ही महासभेत ठराव केला होता त्यानुसार मा. महापौरांनी प्रशासनाला आदेश दिले होते की, प्लास्टीक पिशव्यांवर त्वरीत बंदी घातली जावी. असे आदेश दिले. इतिवृत्तात देखिल आले. त्यानंतर आपण वर्तमानपत्रात जनतेला सुचना दिली होती की, एक जुलै पासुन पिशव्या बंद केल्या जाव्यात जर कुणी त्या वापरल्या तर त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल. आज ३० जुलै आहे. आपण दिलेली जाहिरात तशीच्या तशी कागदावर आहे. अजुनही सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात आहे. प्रशासन काय करत आहे? तुम्ही दिलेल्या जाहिरातीवर अंमलबजावणी होत नाही. लांजेवार साहेब आहेत, इतर अधिकारी आहेत त्यांना विचारा आज पण उल्हासनगर शहरात पुर्वीप्रमाणेच पिशव्यांचा वापर करत आहे.आम्ही लोक प्रतिनिधी ठराव करून आपणाकडे पाठवतो आपले अधिकारी कर्तव्य पार पाडत नाही.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा.महापौर, उपमहापौर, लक्षवेधीचा हा विषय गंभीर आहे त्यामुळे याविषयाकडे गंभीरतेने पाहिले पाहिजे. हे माझे सर्वांना



निवेदन आहे. उल्हासनगर हे एक असे शहर आहे की, या शहरात सहा-आठ महिन्यात दोनदा कॉलराची साथ पसरली आहे. जेव्हा पहिल्यांदा कॉलरा झाला तेव्हा त्याचे प्रसारण पुर्ण देशात विदेशापर्यंत गेले. कारण ही बातमी स्टार न्युज मध्ये टि.व्ही वर व जे पण प्रसार माध्यम आहे त्याव्दारे पुर्ण देशाविदेशात पसरली होती. आणि या शहराचे असे चित्र दाखवले गेले की, हे असे शहर आहे ज्यात सर्वात जास्त कचरा आहे. म्हणुन आपल्या शहराची बदनामी झाली आहे. म्हणुन म्हणतो याविषयाकडे गंभीरतेने पहावे. जेव्हा कॉलराची साथ पसरली तेव्हा मा. मंत्री श्री. दिग्विजय खानविलकर यांनी टाइम्स ऑफ इंडियात मुलाखत देताना म्हंटले धिस कार्पोरेशन डझंट सिन टू हॅव लर्न्ट लेसन फ्रॉम फस्ट कॉलरा असे म्हंटले होते की, या महापालिकेने पहिल्यांदा कॉलरा आला त्यातुन काही ते शिकले नाही म्हणुन आपण सर्वांनी जास्त सावधान झाले पाहिजेत. शहरात खुप काही आजार आहेत. लक्षवेधी पंधरा दिवस आधी दिली आहे. तरी लक्षवेधी संबंधित कुणीही अधिकारी महासभेत हजर नाहीत. याचा अर्थ हा स्पष्ट आहे की, कुणीही अधिकारी या विषयाकडे गंभीरतेने लक्ष देत नाहीत. पहिल्यांदा जेव्हा कॉलरा पसरला तेव्हा ब-याचशा प्रसार माध्यमाव्दारे लोकांना सुचना दिल्या होत्त्या. जसे महापौरांनी सांगितले की, पाण्याचे कनेक्शन नाल्याखालुन वाहत आहेत. त्या आपण

बदला. जेथे दुषित पाणी येते त्याची आपण व्यवस्था करा. शहरात सफाई नियमित व व्यवस्थित झाली पाहिजे. कचरा रोज उचलला गेला पाहिजे. कोणत्त्याही अशाप्रकारचे काम नाही झाले. हेच कारण आहे की, या शहरात दुस-यांदा देखिल कॉलरा झाला. आज न केवळ कॉलरा तर दुसरे आजार जसे गॅस्ट्रो, कावीळ अशा प्रकारचे आजार पसरले आहेत. ही पहिली महापालिका आहे की, जेथे या शहरात कचरा कुंडया बरोबर नाहीत. व एक वर्षापुर्वी जेव्हा कॉलरा पसरला होता. आयुक्तांनी डिसेंबर २०००मध्य एक वर्ष आधी कचरा कुंडीसाठी निविदा मागवल्या होत्त्या. जेव्हा श्री. चंद्रशेखर साहेब इथे आयुक्त होते तेव्हा नोव्हेंबर ९९ मध्ये त्यांनी कचरा कुंडीसाठी निविदा मागविल्या होत्त्या. आपले प्रशासन झोपुन राहिले. ती निविदा स्थायी समितीत एक वर्षानंतर डिसेंबर २०००मध्ये आणली गेली. एक वर्षानंतर निविदा मंजुर करण्यासाठी स्थायी समितीमध्ये आणली. व आज खुपशया कचराकुंडया महापालिकेमागे पडुन आहेत. शहरात नाही पण स्विमिंग पुलच्या मागे पडुन आहेत. शहरात त्याचा वापर होत नाही. अशा खुप काही गोष्टी आहेत. जसे दुषित पाण्यावर नियंत्रण ठेवणे. कचरा कुंडीची व्यवस्था करणे. महापालिका असे काही करत नाही आहे. आमच्या आयुक्तांची जी भुमिका आहे त्याविषयी मी एक गोष्ट बोलु इच्छितो की, त्यांनी फक्त वातानुकूलित कार्यालयात पुर्ण वेळ न बसता शहराच्या बाहेर देखिल पडले पाहिजे. दोन तास कार्यालयात बसा. दोन तास शहराची पहाणी करा. रस्त्त्यांवर किती कचरा आहे? महापौर सारखी व्यक्ती आपणांस सांगत आहे की, माझ्या कार्यालयासमोरील कचरा उचलला जात नाही. हे काय चांगले लक्षण नाही महापालिकेसाठी. म्हणुन आपण सकाळी दोन तास बाहेर पडले पाहिजे. शहरात साफ-सफाईची व्यवस्था कशी आहे. हे पहाणे आपली प्राथमिक जबाबदारी आहे. व मी आपणाकडुन अशी आशा करतो की, उदया पासुन आपण लोकांमध्ये दिसाल. जेणेकरून लोकांना वाटेल या शहराचा आयुक्त या विषयाकडे गंभीरतेने लक्ष देत आहे. आमच्यासाठी चांगले काम करत आहे. अशी माझी आपणाकडुन आशा आहे.

<u>मा. सदस्य श्री. भिमसेन मोरेः-</u>स.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व माझे सहयोगी, या शहरात दोनदा कॉलरा झाला. मोठया आश्चर्याची गोष्ट आहे. इथले प्रशासन आणि सत्त्ताधारी पक्ष यांच्यावर मी आरोप करतो. संबंधित सभापतींवर की ते असफल झाले आहेत. प्रशासनाचे अधिकारी जे काम करतात. जेव्हा आम्ही तक्रार करतो तेव्हा ते जातात पाणी चेक



करण्यासाठी म्हणुन नमुना घेऊन जातात. आणि सांगतात तिथे पाईप लाईन लिकेज आहे. दुस-या वेळेस नमुना नेतात तेव्हा म्हणतात आता पाणी ठिक आहे. आम्ही तिथे क्लोरिन टाकले आहे. असेच नेहमी उत्त्तर आम्हाला महापौर व आयुक्त साहेबांकडुन मिळते. मी यांना नेहमी सांगितले की, उल्हासनदीच्या नाल्यामधुन आतुन जी पंधरा इंचची लाईन ४ नंच्या अर्ध्या ऐरीयात पाणी पुरवठा करते. नाल्या आतुन ती लाईन येते. रसायनिक द्रव्ये आणि इतर घाण त्यातुन जाते. तिथे पाईप लिकेज आहे. ते पण सांगितले त्यानंतर त्यांनी उत्त्तर दिले की, एम.आय.डी.सी कडुनच पाणी खराब येत आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, यांनीच जर असे उत्त्तर दिले तर शहरात कॉलरा का नाही होणार? एकाने तर असे सांगितले की, आम्ही क्लोरीनचे प्रमाणे जास्त टाकले आहे म्हणुन त्यांना डिसेंन्ट्री झाली आहे. हे काय उत्त्तर आहे. आमच्या एम. पी. नी पंधरा लाख रू. जाहिर केले. आमच्या येथील आमदारांनी देखिल काही निधी जाहिर केला की, जुनी पाईप लाईन चार-चार इंची झोपडपटटीत आहे. सी.सी. पॅसेज गटारातुन ती जाते. ती रिपेअर केली जावी. त्या निधीचा पण त्यांनी वापर नाही केला मग शहरात दोनदा कॉलरा का नाही येणार. इथे जो विकास आराखडा मांडला त्यात खुले लिहिले आहे की, उल्हासनगर सारखे घाणेरडे शहर दुसरे नाही. याला जबाबदार येथील प्रशासन आहे. आमचे दुर्भाग्य आहे की, आमच्या इथे कुणी आयुक्त टिकत नाही. जे येतात ते दोन वर्षात निघुन जातात. आता न्यायालयाने निर्णय

चांगला दिला आहे. आपल्याकडे आता तीन वर्षासाठी श्री. पोखरकर साहेब आले आहेत. आम्ही अभिमानाने सांगु की, पोखरकर शहरासाठी काहीतरी चांगले काम करतील अशी आम्ही आशा करतो. आता पोखरकर साहेब तीन वर्षासाठी आपल्याला लाभले आहेत. सर्व नगरसेवकांनी त्यांना सहयोग देऊन त्यांच्याकडुन शहरासाठी फायदा करून घेतला पाहिजे. त्यांनी कॉलराचे निर्मुलन करावे अशी मी त्यांना विनंती करतो.

म.सदस्या श्रीमती. पंचशिला पवार:-आज जी लक्षवेधी दिली आहे. दुषित पाण्यासाठी त्याविषयी मी दोन शब्द बोलु इच्छिते. ऑक्टोबर, नोव्हेंबर २०००ला कॉलराची साथ सुरू झाली. व आता २००१ मध्ये पण कॉलराचे रूग्ण दाखल झाले आहेत. तुम्ही यासाठी काय उपाययोजना केली आहे. एक वर्षापासुन कॉलराची साथ सुरू आहे. दुस-यांदा कॉलरा शहरात आला आहे. आपण त्यासाठी काय उपाययोजना केली आम्हाला सांगु शकाल का?

मा. महापौर:-मॅडम आधी आपण आपले बोलणे पुर्ण करा.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवार:-२००१व २००२मध्ये पुन्हा कॉलराची साथ पसरली आहे. ती दुषित पाण्यामुळे पसरली आहे. महापालिका नेहमीप्रमाणे पाण्यामध्ये क्लोरीन नसल्यामुळे असे झाले असे सांगते. मला हे म्हणायचे आहे की, क्लोरीन तपासुनच कॉलराचे निर्मुलन होणार आहे का? आणि दुसरी गोष्ट अशी की, कॉलरा फक्त झोपडपट्टी मध्येच का होतो? कारण की तिथे साफ-सफाई होत नाही. आम्ही जेव्हा महापौर व आयुक्त साहेबांना सांगतो की, आमच्या प्रभागात पाणी दुषित येते. तुम्ही आम्हाला पाईप लाईनचा बंदोबस्त करून दया. उदा. वडोळ गावातील लोक इकडुन तिकडुन पाणी भरतात. कारण उल्हासनगरची पाईप लाईन तिथे नाही. तिथे कोणत्त्याही प्रकारे पाणी पोहचत नाही. तर इकडुन तिकडुन पाणी आणल्यामुळेच कॉलराची साथ पसरते आहे. मी आपणांस विनंती करते की, आपण मला सांगा याबाबतीत आपण काय उपाययोजना केली आहे. कृपया आम्हाला सांगा. कारण आम्हाला पण समजले पाहिजे. जेव्हा तुम्ही नव्हता तेव्हा ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये बैठक झाली तेव्हा शिंदे साहेब होते व नगर सचिव श्री. रामानंद तिवारी होते ते पण म्हणाले होते की, कॉलरा निर्मुलन साठी आम्ही अनुदान देणार आहोत. आणि



त्यांनी दिले देखिल. अनुदान येऊन नगरपालिकेत तसेच पडुन आहे. त्याचा वापर केला जात नाही याचा अर्थ काय? आपण लोकांना दाखवण्यासाठीच फक्त आश्वासन देता का?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-कॉलरासंबंधी जी लक्षवेधी सुचना नगरसेविका भगिनी जया साधवानी यांनी आणली आहे. एकतर आजच्या सभेत ज्यात-हेने नगरसेवक बोलत आहेत. भले तो विपक्षचा असो वा सत्ताधारी पक्षाचा दोघांचा त्रास एकच आहे. यावरून हे चित्र स्पष्ट होते की, शहराची परिस्थिती काय? कॉलराबाबतचा विषय आयुक्तांनी घेतला आहे, काही कारण शोधण्याचा प्रयत्न केला आहे. कारण शोधण्याची हि वेळ नाही. इथे कारण कोणते आहे. आपण म्हटले की, पावसाळा आल्याने वातावरणात बदल झाल्याने कॉलरा झाला आहे. मी पॅरामेडिकल स्टुडंन्ट होतो. पावसाळयामुळे किंवा हवेत बदल झाल्यामुळे कधी कॉलरा होत नाही. विब्रीओ कॉलरा किटाणु हे जो पर्यंत दुषित पाणी किंवा दुषित खाणे व्यक्ती खात नाही तोपर्यंत कॉलरा होत नाही. तर हे दुषित पाणी व खाण्यावर अंकुश लावणे गरजेचे आहे. तर सहा महिन्या अगोदर नोव्हेंबर डिसेंबर मध्ये कॉलराची साथ आली होती त्यावेळी पण रमाबाई आंबेडकर नगर, भैय्या साहेब आंबेडकर नगर, शास्त्री नगर , सम्राट अशोक नगर या एका पटयालाच कॉलराने प्रभावित केले होते. आता देखिल मुख्यतः याच भागात कॉलरा झाला आहे. याचा अर्थ त्या एकाच भागात काही तरी गंभीर समस्या आहे. ज्यामुळे पाणी दुषित येते. पाईप लाईन गटार व नाल्यातुन जाते. मागच्या वेळेस देखिल जेव्हा श्री.

रामानंद तिवारी आले होते. त्यावेळी पण पाईप लाईन हटविण्याविषयी उपाय सुचविले होते. ते करण्यासाठी पैसा आणला गेला परंतु ते केले गेले नाही. दुसरा महत्त्वपुर्ण विषय हा आहे की, आपण म्हणता नोव्हेंबर डिसेंबर मधील आदेश आजपर्यंत जारी आहेत. विथड्रॉ नाही केले. माझ्या माहितीप्रमाणे चुकीचेही असेल. आदेश विथड्रा करतात असे काही नसते. असे जाहिर नव्हते केले की, शहर कॉलरा मुक्त आहे. त्यावेळी असेही नव्हते म्हंटले की,जोपर्यंत हे आदेश विथड्रॉ नाही करत तोपर्यंत शहरात कॉलरा आहे असे समजावे.

<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>त्या आदेशात असे लिहिले आहे की, जोपर्यंत हे आदेश विथड्रॉ नाही होत तोपर्यंत ते जारी राहतील.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>ठिक आहे. व्हेन देअर इज अेनी ॲपिडेमिक. कोणत्याही शहरात जर असा आजार पसरला जो संसर्गजन्य असेल त्याला ॲपिडेमिक म्हणतात. त्यावेळी सेक्शन ३१९ अन्वये काही उपाय करायचे असतात. आपण काही अशा उपाययोजना केल्या. सेक्शन ३१९ सबसेक्शन २ मध्ये असे लिहिले आहे की, आपण त्वरीत महासभेला हे कळवले पाहिजे की, आपण कोणत्त्या उपाययोजना केल्या. आज श्रीमती. जया साधवानी यांनी प्रश्न केला आहे. नाही तर हा मुददा घेतला देखिल नसता. आदेश कधी विथड्रॉ केला आहे हे कुणाला कळले देखिल नसते. या ॲक्टनुसार जे तुम्हाला करणे आवश्यक होते ते तुम्ही केले नाही. दुसरे असे की, शहरात प्रदुषण किती आहे. पाणी प्रदुषण, हवा प्रदुषण या सर्वांची ३१ जुलैच्या आत आपणांस अहवाल महासभेला दयायचा असतो. आज ३० जुलै आहे. तरी पण आपणाकडे अहवाल तयार नसेल. या सर्व तरतुदी ॲक्ट मध्ये आहेत. आणि प्रशासन ॲक्टला बांधील आहे. त्यात स्पष्टपणे लिहिले आहे की, दरवर्षी तसा अहवाल महासभेला दयायचा आहे. आयुक्तांनी दिला पाहिजे तो अहवाल नाही मिळाला. दुसरे असे की, तुम्हीच महासभेला सांगायला पाहिजे होते परंतु लक्षवेधी आली नाही तर तुम्ही सांगितले देखिल नसते. पुर्ण सदन यामुळे त्रासात आहे की, शहरात दोन दोनदा कॉलराची साथ आली. श्री. लाल पंजाबी



म्हणाले की, पुर्ण देशात विदेशात टेलिव्हीजन वर हे सांगितले की, उल्हासनगर शहराला कॉलराग्रस्त शहर म्हणुन घोषित केले. आपल्या शहराला कॉलराग्रस्त म्हणुन डाग लागला. ही प्रशासनासाठी शरमेची गोष्ट आहे. व सत्ताधारी पक्षालाही लाजीरवाणी गोष्ट आहेच आहे आमच्यासाठी देखिल आहे. कारण आम्ही पण शहरात राहतो. आम्ही पण लोकप्रतिनिधी आहेत. दोन दोनदा शहरात कॉलरा पसरतो आणि कोणी अधिकारी हजर नाहीत. काही उपाय योजना केली नाही. एक आठवडयापूर्वी एका नगरसेविकेने यासाठी लक्षवेधी दिली आहे. मी हे मानतो की त्याच दिवशी लक्षवेधी दिली असती, दोन तासापूर्वी तर नविन अधिकारीला त्याची माहिती नसती. त्या दिवशी ते अधिकारी येथे हजर होते, त्यांना माहिती आहे की, आज हा विषय येथे येणार आहे. दोन्ही लक्षवेधींवर कोणी अधिकारी हजर नाहीत, याचा अर्थ असा की, प्रशासनावर आपले नियंत्रण नाही. तुम्ही प्रशासनावर नियंत्रण करण्यात असक्षम आहात. या नुसार जर शहराचे काम चालले तर कसे व्हायचे? बेकायदेशीर बांधकामाचा विषय आपल्या समोर आणला तरी आपण त्यावर काही ठोस निर्णय घेतला नाही. जे काल झाले ते विसरा पण उदयापासून काय करायचे हे तर लक्षात घेतले पाहिजे. आपण अनाधिकृत बांधकामावर अंकुश लावा. साफसफाई बाबतीत महापौर सारखी व्यक्ती त्यांच्या खाजगी कार्यालयासमोर असलेल्या कचरा दाखवतात. आपण शहरात चला कमीत कमी वीस टक भरुन कचरा इथे आणू शकतो. आणि सांगु शकतो की, शहरात कच-यांचे किती ढिग पसरले आहेत. कचरा शहराचा उचलला जात नाही, दहा दहा कामगार एका प्रभागात दिले आहे, त्यांच्यात देखील किती भ्रष्टाचार आहेत हे मी आपणास दाखवू शकतो. तिथे कश्या गोष्टी चालतात, कशा प्रकारे भ्रष्टाचार चालतो हे मी आपणास दाखवू

शकतो. याचे परिणाम पूर्ण शहराला भोगावे लागत आहे. यु मेकअप राईट पॉइंट इन युवर स्पीच. ते म्हणाले तुम्ही बसू नका आणि हसू नका. ते इथल्यासाठी नाही म्हणत पूर्ण शहरासाठी म्हणाले. तुम्ही शहरात फिरा पूर्ण परिस्थीतीचा आढावा घ्या. व काहीतरी कडक पाऊल उचला. कोणाही राजकिय पक्षाच्या हस्तक्षेपाची पर्वा करु नये. प्रशासनाने शहरात साफ स्वच्छता ठेवली पाहिजे. आपल्या शहरात कोणताही बाहेरचा व्यक्ती आला तर येथे राहू इच्छित नाही. खाऊ पिऊ इच्छित नाही. कोणत्त्या हॉटेलात जाऊ इच्छित नाही. आपण ठाण्याला रहाता, आपण इथे राहून पहा. तुम्ही आता तीन वर्षासाठी येथे आहात, तुम्हाला आवडो न आवडो तुम्ही इथे येऊन रहा. तुम्ही इथे आमच्याबरोबर रहा, खा, प्या, आमच्याबरोबर फिरा. या शहराच्या वातावरणाचा आपल्यावर पण प्रभाव झाला पाहिजे. तुम्ही ठाण्याहून उल्हासनगर ला येतात. तुम्ही उल्हासनगरची एक व्यक्ती आहात.

श्रीमती. यशस्विनी नाईक व श्रीमती. सुनिता राजवानी सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.सदस्य श्री. जमनु पुरस्वानीः-</u> मा. महापौरजी, सभेचे सर्व सदस्य, मी आयुक्तांना विचारु इच्छितो,की, जे वार्डाचेमध्ये सरकारी शौचालय आहे,त्याचे सेप्टीक टॅक हे पुर्णपणे भरले आहे. त्याला जर साफ केले गेले तर तो कचरा कोण उचलणार. पनवेलकर ठेकेदार उचलणार की महापालिकेतर्फे तशी काही व्यवस्था केली आहे. माझ्या प्रभागात १० दिवस अगोदर सार्वजनिक शौचालयातून घाण काढुन, खत्त्यावर महापालिका कर्मचा-यांनी टाकले आहे. मी कित्त्येकदा पनवेलकरांच्या कर्मचा-यांना सांगितले की, कचरा उचला, पण ते उचलण्यास तयार नव्हते. श्री. प्रकाश माखिजा यांच्या घरी पुजेमध्ये आयुक्त साहेबांशी माझी भेट झाली.मी आयुक्तांना पण म्हटले की, आपण चला आपण पहा. झोपडपट्टी क्षेत्र आहे. पावसाळयात कचरा वाहुन लोकांच्या घरी जाईल. मी सभापती बनवारी ढेणवाल यांना देखिल सांगितले की, तुम्ही पनवेलकरांना सांगा. हा कचरा कोण उचलणार? पनवेलकरांचे जे सुपरवायजर



आहेत त्यांना सांगितले त्यांनी सांगितले हे आमचे काम नाही. आयुक्त साहेबांना सांगितले तर आयुक्त साहेब म्हणाले लांजेवारांना सांगा. लांजेवारांना शोधुन शोधुन थकलो. महासभेची वाट पाहीली की निदान आज तरी महासभेत भेटतील. तिथे पण नाही भेटले. मग हा कचरा उचलणार कोण. आमचे जे बनवारी ढेणवाल साहेब आहेत. ते सात दिवसांनी आम्हाला भेटले सांगितले तुमचे काम झाले आहे. खत्ता तुमचा साफ झाला आहे. मी त्त्यांना म्हंटले तुम्हाला कुणीतरी सांगितले असेल तुम्ही आता माझ्या बरोबर चला मी दहा गाडी कचरा भरून दाखवु शकतो. शेवटी काय करावे? कुणी जबाबदारी घ्यायला तयार नाही?हा कचरा पनवेलकरचे कर्मचारी उचलणार की आपल्या महापालिकेने काही व्यवस्था केली आहे. आमच्या महापालिकेच्या सफाई कामगारांनी कचरा तर काढला पण तो कचरा खत्त्यावरून घेणार कोण? पाऊस पडत आहे आणि कचरा वाहुन झोपडपट्टीमध्ये जात आहे. पाईप लाईनमध्ये जात आहे. कुठे कुठे पाईप लाईनमध्ये लिकेज आहे. त्या पाण्यात तो कचरा जात आहे. मागच्या वेळेस जेव्हा कॉलराची साथ पसरली होती तेव्हा एम.आय.डी.सी. आणि महापालिका एकमेकांवर दोषारोप करत होती. सांगत होते की, क्लोरीनचे प्रमाण कमी झाले. आता काय होणार? क्लोरीनचे प्रमाण चेक करायला कुणी आहे की नाही. खत्त्यावरून कचरा उचलण्यासाठी गाडया नाहीत. कमीत कमी एक-दीड वर्ष झाले. असे ऐकण्यात येते की, दोन-अडीचशे लोकांची भरती होत आहे. साफ-सफाई साठी ते पण प्रकरण अजुन अर्धवटच राहिले आहे. ते लोक कधी भरती होणार? प्रभागात सफाई कामगार कधी देणार? ती संख्या कमी आहे. झोपडपट्टी एरिया दाटीवाटीचा असुन कुणी आयुक्त येतात ते एखादी प्रथा सुरू करतात. दुसरा आयुक्त ती प्रथा रद्द करतो. श्री. शुळ साहेबांनी घंटा गाडी कचरा उचलण्यासाठी ठेवली होती. दुस-या आयुक्तांनी येऊन ती योजना रद्द केली. शेवटी आम्ही करावे तरी काय? कोणतीही योजना वा प्रथा इथे सहा महिन्यापेक्षा जास्त

लागु होत नाही. हजेरी शेड तयार केले गेले. कमीत कमी ५० लाख खर्च करून ते तयार करण्यांत आले. त्या हजेरी शेडचा काही उपयोग नाही. हजेरी शेड मध्ये हजेरी लावली जात नाही. हि कच-याची समस्या पाण्याची समस्या आज दोन करोड रू. महापालिका पाण्यासाठी खर्च करत आहे. एकटया श्री. नारायण पंजाबीच्या प्रभागातच वर्षात २० लाख रू. चे पाणी लागते टॅकर व्दारे. शेवटी काय होणार?येणारा जो स्थायी समितीचा सभापती असेल, तो अर्थसंकल्प तयार नाही करू शकत. शंभर करोड तोटयाचा अर्थसंकल्प तो महासभे समोर सादर करेल. शहराच्या स्थितीकडे लक्ष देणारे कुणी नाही. सव्वा करोड पाण्यावर खर्च करण्यापेक्षा हे चांगले की त्यापेक्षा पाईपलाईन टाकुन पाण्याची व्यवस्था करणे. ते कुणी बघत नाही. फक्त एका प्रभागात वीस लाखाचे पाणी टॅकर व्दारा जाते. तर या शहराचे दिवाळ निघायला वेळ नाही लागणार. मी आपणांस असे निवेदन करतो की, या विषयावर पाण्याच्या टॅकरवर पाईप लिकेजवर व कच-याच्या समस्येवर गंभीरतेने लक्ष दया.

मा. सदस्या श्रीमती. भारती रजानी, श्रीमती. जोनिता मटाई, श्रीमती. आशा जेस्वानी या सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>स.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब आणि सहयोगी आज आमच्या कॉंग्रेसच्या सदस्या श्रीमती. जया साधवानींनी जी लक्षवेधी आणली. त्यावर खुप स. सदस्यांनी चर्चा केली. खुप काही संगितले परंतु त्याचा परिणाम काहीतरी महापाालिकेच्या अधिका-यांवर होईल? मला आज याचे उत्तर पाहिजे आहे की, स. सदस्य ४.०० वाजे पासुन इथे बसले आहेत. व शहरासाठी तनमनधन जे काही आहे ते शहरासाठी खर्च करतात. हे शहरात काय व्हावे काय नाही हे सांगतात. ऐवढे सांगितल्यावर आयुक्त साहेब आपण काय निष्कर्ष काढला ते सांगावे. आपण काय उपाययोजना करू



शकता? जसे आमची बहिण श्रीमती. पंचशिला पवार यांनी सांगितले की, मागच्या वेळेस देखिल कॉलरा झाला होता. यावर्षी पण कॉलरा झाला तर याबाबतीत आपण काय उपाययोजना केल्या आहेत. इथे मंत्रीमहोदय आले होते. मंत्रालयातील महाराष्ट्रातील सचिव आले होते. त्यांनी काही निधि सुध्दा जाहिर केला. महापौर, उपमहापौर मी सर्वजण जिथुन दुषित पाणी येते. सेंच्युरी रेयॉन इथुन ते पाणी येते. त्याविषयी काय उपाययोजना केली पाहिजे. कशात-हेने उल्हासनगरला चांगले पाणी मिळेल हे पाहिले पाहिजे. जेणेकरून कॉलरापासुन हे शहर मुक्त होईल. पालकमंत्री देखिल सांगुन गेले तरी त्याचे पालन होत नाही. तर आता त्यासाठी जबाबदार कोण?आयुक्त साहेब आपण सांगितले आहे की, शहरातील नागरिकांचे व लोकप्रतिनिधीचा पण यात दोष आहे. बिलकुल नाही. व दुसरी गोष्ट अशी की, आपण म्हणालात उल्हासनगर शहरात अनाधिकृत बांधकाम जास्त आहे. त्यामुळे पण कॉलरा पसरतो. मी सम्राट अशोक नगरमध्ये जी जाहिर सभा झाली त्यात मंत्री महोदय होते. नगरसचिव होते. त्यावेळी मी दाव्यासहित म्हणालो की, पुर्वीचे जे आयुक्त श्री. शिंदे साहेब होते आमचे लाडके आयुक्त होते तेव्हा. त्यांच्या समोर मी सांगितले की, पाणी कशात-हेने दुषित होते. झोपडपटटीतच विशेष करून का कॉलरा होतो? हे सर्व कारण सांगुन देखिल एकाही अधिकारीने या प्रकरणास गंभीरतेने घेतले नाही. आयुक्तांनी तरी गंभीरतेने घेतल की, नाही ते आज सांगतील. परंतु आमच्या श्री. लाल पंजाबीनी सांगितले की, आयुक्त साहेब अभ्यंगतांना भेटून शहराचे भले होणार नाही. महापालिका तेव्हा चालेल जेव्हा शहरातील कचरा पाण्याची समस्या आपण सोडवाल. तरच या शहराची महापलिका चालु शकेल. आज आम्ही इथे येऊन ओरडतो. जेव्हा क्रांती होते, लोक त्वेषात येतात. शहरातील नागरिक संतप्त होतील तेव्हा नगरसेवकांना तर ते त्रास देतीलच देतील. परंतु आपणांस पण ठाण्याहुन इथे येऊ देणार नाही. त्याने काय होईल त्यानेच उल्हासनगरचे नाव बदनाम होईल. लोक म्हणतील जे पण आयुक्त येतात त्यांना तुम्ही पळवुन लावता. सर्वात प्रथम माझे नाव येते. माझी आयुक्तांना विनंती आहे की, कुणाही आयुक्ताने

शहराचे काम करून स्वतःची खुर्ची सांभाळावी. आम्हाला तुम्ही लोकप्रतिनिधी म्हणुन आम्हाला खुची दिली आहे. त्याचा उपयोग आम्ही प्रभागासाठी शहरासाठी केला पाहिजे. यासाठी म्हणुनच मी खुर्चीवर बसण्यास लायक आहे. मी आपणांस विंनती करू इच्छितो की, आज उल्हासनगरमध्ये पाण्याच्या समस्येमुळे जी कॉलराची साथ पसरली. त्याबाबत आपण तातडीने काय केले? मी नवाकाळ वाचला आहे. जेव्हा कॉलराची साथ सुरू होते. हॉस्पीटलमध्ये रूग्ण दाखल होतात. तो पर्यंत तुम्ही म्हणता कॉलरा नाही आहे. मी वर्तमानपत्र वाचले आहे. जेव्हा जास्त कॉलरा पसरला तेव्हा तुम्ही म्हणालात. जेव्हा टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात जे झळकले. जेव्हा पत्रकारांनी व नगरसेवकांनी आपल्यावर दबाव आणला. तेव्हा तुम्ही,त्त्याला काय म्हणतात. मजबुरीचे नाव xxxxxx. यात-हेने तुम्ही जाहिर केले.

मा. सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी, मोना वनवारी, लक्ष्मीबाई लुंड, पदमा वलेचा सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.महापौरः-</u>मोरे साहेब, तुम्ही भावनाशिल होऊन काही बोलता. इतके भावुक होऊ नका.

मा.सदस्य /सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई, श्री. नरेश यादव सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-</u>मला असे म्हणायचे आहे की, त्यांच्यावर अन्याय अत्त्याचार झालो तरी ते शांत बसायचे. तुम्ही आयुक्त साहेब शांत राहु नका.

--४५--

<u>मा.महापौरः-</u>मला असे वाटते की, लक्षवेधी लवकर संपवावी. मोरे साहेबांनंतर सभागृह नेता व विपक्ष नेता बोलतील. आरोग्य विभाग सभापती देखिल विचार मांडतील.

मा.सदस्य श्री. उमाप रामदास, श्री. किशोर केसवानी सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-</u>नाही. नाही . मी पण बोलणार. मला जरूर बोलु दयावे.

मा. श्री. वहरानी ठाकुर, श्री. ठाकुर सेवलदास, श्री. राजु सोनावणे, सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>आता दोन महिन्यापुर्वी महापालिकेतर्फे काही सफाई कामगारांची भरती करण्यात आली. मी असे सुचवू इच्छितो की, जर त्त्यांना दोन महिने पाऊस संपे पर्यंत ठेवले असते तर चांगल्या त-हेने नाल्याची साफसफाई झाली असती. शहर साफ राहिले असते. कारण जे कायम कर्मचारी आहेत ते काम नीट करत नसल्यामुळे साफ-सफाई होत नाही. आता जे कर्मचारी लावले होते. भले सदस्यांना विचारा ते बिचारे दोन-दोन, चार-चार वर्षाची नाल्याची घाण काढत होते. लांजेवार साहेबांनी तसा रिपोर्ट आयुक्तांना दयायला पाहिजे होता की साहेब या लोकांची अजुन आवश्यकता आहे. परंतु त्त्यांनी तसे केले नाही. दुसरी असे की, २६७ सफाई कामगारांची भरती करणार होते. ती भरती अजुन केली नाही. कारण काय? ते आयुक्तांनी सांगितले पाहिजे. मला वाटते आमच्या झोपडपटटी प्रभाग क्र. १३ मध्ये कॉलराची साथ सुरू झाली याचे कारण काय? तिथे नदीचे जे पाणी आहे. बदलापुरहून जे घाण पाणी येते. तिथे एक रिटनिंग वॉल नसल्याने ते पाणी पुर्ण झोपडपटटीतील घरात कमरेइतके पाणी घुसले. त्त्या पाण्यात डुकरे, कुत्रे , उंदीर इत्त्यादी जनावरे मेलेली असतात. अशात-हेने कॉलरा निर्माण होतो. म्हणुन मी आयुक्तांना विंनती करू इच्छितो की, प्रथम याची उत्त्पत्ती कुठून झाली. आता पण तिथुनच कॉलराची सुरूवात झाली. तर त्त्या प्रभागात काय सुविधा असल्या पाहिजेत हे आयुक्तांनी पहावे. मी आयुक्तांना व महापौरांना, उपमहापौरांना सदनातर्फे विनंती करतो की, आम्ही इतका गळा फाडुन देखिल अधिकारी पुढच्या महासभेत हजर राहीले नाही तर त्त्यांना आम्ही पुढील महासभेत येऊ देणार नाही. आम्हाला आता काहीतरी क्रांती करायची

आहे. कारण आम्ही आता जास्त दिवस नाही. चार-सहा महिनेच आहोत. या चार-सहा महिन्यात आम्ही पण काहीतरी करू इच्छितो.

मा.सदस्य / सदस्या श्री. वाघे श्याम, श्रीमती. कांता गजवानी, श्रीमती. इंदु भठिजा सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.महापौरः-</u>तुम्ही परत निवडुन याल चिंता करू नका.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>ती पुढची गोष्ट आहे. आयुक्तांना मी विंनती करतो की, झोपडपटटीमध्ये डि.डी.टी. पावडर, फवारा इत्त्यादी जंतुनाशके वापरावी. कचरा जमा होऊ देऊ नये. पनवेलकरांना जो ठेका दिला आहे. त्या सर्व गाडया तुटल्या आहेत. त्यात थोडाच कचरा मावतो. तो कचरा सांडत सांडत जातो. मी एका गाडीवाल्याला विचारले की, तुम्ही असे का करता, तर ते म्हणाले की, ट्रक मध्ये कचरा जास्त होतो म्हणुन आम्ही फेकत फेकत जातो. तर शहरात आधिच जास्त कचरा आहे. व पनवेलकरांची माणसे अजुन त्यात भर टाकतात. म्हणुन माझे म्हणणे आहे की, पनवेलकरांचा ठेका रदद केला पाहिजे. आयुक्त साहेब, जो नवा इन्स्पेक्टर येतो तो जुन्या इन्स्पेक्टरचे काम बंद करतो. तुम्ही त्या पनवेलकरांचा ठेका रदद का नाही करू शकत? त्यांच्याविषयी खुपदा लक्षवेधी सदनात मांडली होती. परंतु काही होत नाही याचे कारण काय? पनवेलकर मध्ये अशी काय कला आहे की, त्याचा ठेका रदद होत नाही. मी हे विचारू इच्छितो की, पनवेलकरांमुळे शहर संकटात



येत आहे. आणि आले आहे म्हणुन मी विनंती करतो. आणि संपवण्याआधी सुचित करतो की, ऐवढे बोलुन देखिल तुमच्या अधिका-यांवर जर काही परिणाम होत नसेल तर याचा अर्थ एका कानातुन ऐकले ऐका कानातुन काढले. म्हणजे सोनाराने फुंकली नळी दोन्ही कडुन गेले वारे. असे जर होत असेल तर महापालिका चालविण्याचा आपणांस व आम्हाला काही अधिकार नाही. ऐवढे बोलुन मी आपले बोलणे संपवतो.

मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.सदस्य श्री. ढेणवाल बनवारीः-</u>मा.आयुक्त, महापौर, उपमहापौर, सर्व नगरसेवक, नगरसेविका, मी आपणांस सांगु इच्छितो, या कॉलराच्या लक्षवेधीवर सहा महिन्याआधी जेव्हा कॉलरा आला होता तेव्हा महापालिकेने एम.आय.डी.सी.वर नाव घेण्यांत आले की, दुषित पाण्यामुळे ही साथ पसरली. मला हे म्हणायचे आहे की, पाण्यामुळे जर कॉलरा आला तर फक्त झोपडपटटी का दुसरीकडे पण पाणी असते. मला नाही वाटत पाण्यामुळे कॉलरा झाला. सर्वजण म्हणतात पनवेलकर खुप चांगले ठेकेदार आहेत. ते शहराची साफ-सफाई चांगल्या त-हेने करतात. व असे म्हणतात की, लांजेवार आरोग्य अधिकारी हे बरेच अनुभवी अधिकारी आहेत. म्हणुन त्यांना सर्वांनी सदनात पाठिंबा दिला व त्यांना ठेवले. पंरतु दोन्ही अधिकारी व ठेकेदार यांच्यावर माझा असा आरोप आहे की, यांच्यामुळे शहरात कॉलरा झाला आहे.याचे मुख्य कारण या दोन व्यक्ती आहेत. मी आपणांस सांगु इच्छितो यापुर्वी कोर्टात जनहित याचिका दाखल करावी लागली होती. कारण शहरातील कचरा उचलला जात नव्हता. परंतु त्यावेळी कॉलरा नव्हता झाला. कारण याचे एक कारण होते. कारण त्यावेळी कचरा उचलणारे ठेकेदार आपल्या शहरातील होते. तर जो माणुस जिथे राहतो त्याला शहराविषयी प्रेम असते. की हे माझे शहर आहे माझे घर आहे. ते माझे स्वतःचे आहे. म्हणुन ते कचरा उचलायचे. परंतु आज पनवेलकरांनाक कचरा उचलण्यास ६४,००० रू. प्रतिदिन देतो. आयुक्त साहेब आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, पनवेलकरांना ऐवढे पैसे देतो ते सकाळ पासुन ते संध्याकाळ पर्यंत त्यांनी कचरा उचलला पाहिजे. परंतु नगरसेवक स्वतः महापौर व आयुक्तांनीही डोळयांनी पाहिल्यावर देखिल तुम्ही आजपर्यंत एकतरी त्यांचे बिल कापले आहे का? हे सांगा मला. का नाही? जर त्यांना आपण ६४,०००रू. रोज देतो तर त्यांनी कचरा उचलला पाहिजे. आपल्या समोर आल्यावर देखिल आपण त्यांना

दंड आकारला का? यात भ्रष्टाचार नाही तर काय आहे? यापुर्वी जे ठेकेदार होते त्यांना अजुन बिल दिले नाही. दोन वर्ष झाले. त्यांना सांगितले की, तुमचे काम बरोबर नाही. तुम्ही कचरा उचलला नाही. ते छोटे ठेकेदार होते. शहराचे होते त्यांना शहराविषयी थोडीतरी आपुलकी होती त्यामुळे ते काम करायचे. पनवेलकर बाहेरून ठेकेदार आला. त्याला शहराशी काही मतलब नाही. इथे कॉलरा येवो वा महाभंयकर रोग येवो त्यांना काही फरक पडत नाही. कोणी मरो जगो त्यांना काही देणे घेणे नाही. त्यांना फक्त पैसे हवे आहेत. ६४,०००/- प्रतिदिन. त्यांना १९,०००/-पेमेंट मिळते तुम्ही त्यांचे १९ रू. तरी कधी कापले आहेत का? मला वाटते कमीत कमी अर्ध्या नगरसेवकांनी लेटरपॅडवर लिहुन दिले आहे की, आमच्या येथील कचरा उचलला जात नाही हे खरे आहे की, खोटे? का नाही त्यांच्याकडे लक्ष दिले जात? याचा अर्थ कुठेतरी अधिकारी वर्गाशी त्यांचे संगनमत झाले आहे. याच्याआधी श्री. आर.डी. शिंदे साहेब होते तेव्हा पनवेलकरांना आठवडया, आठवडयाने पेमेंट दिले जायचे. माझे महापौरांना निवेदन आहे की, बाहेरून जे अधिकारी वा ठेकेदार येतात ते या शहराचा विचार करणार नाहीत. ते फक्त शहराचा विनाश करण्याचा विचार करतील. यापुर्वी जे ठेकेदार होते. नगरपालिका महापालिका असताना मला वाटते जेव्हा पासुन लांजेवार साहेब आले आहेत त्यानंतरच कॉलरा झाला. यापुर्वी कॉलरा नव्हता झाला असे का? यापुर्वी तर ऐवढे अधिकारीही नव्हते.



शहर तेवढेच आहे.जनता पण तेवढीच आहे. महापालिकेत ऐवढे अधिकारी येऊन देखिल हा कॉलरा का आला याचे कारण काय? दुसरे आपणांस सांगतो की, आपल्या लक्षात आले असेल, नाला सफाईमध्ये सातशे लोंकांना कामावर घेतले गेले. मला एखाही नगरसेवकाने सांगावे की, भरती झाल्यापासुन दहाच्या दहा सफाई कामगार प्रभागात हजर राहिलो आहे का?कोणी चौथ्या दिवशी हजर झाले. कुणी पाचव्या दिवशी हजर झाले. परंतु तुम्ही हजेरी पत्रक पहाल तर त्यात ज्या दिवसापासुन कामाचे आदेश दिले आहेत त्या दिवसापासुन १५ दिवसापर्यंतचा सलग पगार दिला गेला आहे. त्यात देखील भ्रष्टाचार झाला आहे, त्यानंतर मी पुढे सांगतो २६७ कामगारांची भरती होत नाही. त्यामुळे साफसफाईवर त्याचा परिणाम होत आहे. मी आपणांस पत्र दिले आहे, महापौरांना देखील दिले आहे,आमच्या शहरात बाराशे सफाई कामगार आहेत, त्यापैकी जवळ जवळ दिडशे असे कामगार आहेत की, ते सफाई चे काम करत नाही. कधी केले देखील नाही. त्यापैकी काही लोक कुणाच्या आर्शिवादामुळे मुकादम तरी आहे, तर काही लोक दादागिरी करुन मुकादम झाले आहे, हे मी आयुक्तांना सांगितले आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:-</u> आयुक्त साहेब, या गोष्टीकडे जरा लक्ष दया, दिडशे लोक काम करीत नाही.

<u>मा.सदस्य श्री. ढेणवाल बनवारी:-</u>आज उल्हासनगर महानगरपालिकेत १६ स्वच्छता निरिक्षक आहेत. मी आयुक्तांना पण सांगितले आहे, त्यात पिलाई नावाचा एस.आय आहे तो सर्वात जेष्ठ आहे. परंतु त्याला आता त्या पदावरून काढले आहे. आज तुम्ही जो सी.एस.आय. ठेवला आहे. त्याला तुम्ही ते काम देखिल देता व त्यांना पाच प्रभाग देखिल दिले आहे. त्या व्यक्तीला सी.एस. आय. मधुन हटवले तर त्याला पाच प्रभाग तरी दया. कोणत्त्या कारणावरून त्याला हटवले आहे. हे मी बोलणार नाही परंतु त्याला आपण पगार देतो त्याच्याकडुन कमीत कमी काम तरी करवुन घ्या. जर ती व्यक्ती काम करित नाही तर त्यावर काहीतरी कार्यवाही केली पाहिजे. मला सहा महिन्यात हे समजले नाही. जेव्हा सभापती झालो तेव्हा पासुन मी लांजेवारांना नेहमी सांगत आलो की, या व्यक्तीस नुसता बसुन पगार का देता?मी आयुक्तांना पण सांगितले आहे. आज पर्यंत जेवढे अधिकारी आलेत त्यांना दहा कर्मचा-यांची आवश्यकता भासली नाही. परंतु लांजेवारांना तर दहाही कर्मचा-यांची आवश्यकता भासते. आपण नेहमी पहातो की, आयुक्त साहेब देखिल दहा-अकरा वाजेपर्यंत कार्यालयात येतात परंतु लांजेवार तीन वाजले तरी येत नाहीत. रात्री दहा वाजता येतात. त्यावेळी उल्हासनगरची

साफ-सफाई बघतात की काय माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, हा जो कॉलरा झाला आहे त्यावर माझा खुला आरोप आहे की, तो अधिकारींच्या लापरवाहीमुळे झाला आहे.खास करून लांजेवार साहेबांच्या. कॉलरा पाण्यामुळे झाला असेल पण त्याचा वाढ होण्याचे कारण आहे की, शहरातील अस्वच्छता व दुसरे आजपर्यंत आरोग्य विभागाला नेहमी उपायुक्त देतात. आजही आहेत. परंतु आयुक्तांनी त्यावर लक्ष नाही दिले. ते उपायुक्त फक्त नावा करिता आहेत की, त्यांना काही कामही दिलेले आहे? डॉ. लांजेवार जे आरोग्य अधिकारी आहेत त्यांना आरोग्य अधिका-याचेच काम देण्यांत यावे. व दुस-या एखादया कार्यक्षम अधिका-यास आरोग्य विभागाच्या उपायुक्त पदाचा पदभार दयावा. त्यामुळे पाच दिवसामध्येच साफसफाईच्या कामामध्ये ब-याच प्रमाणात फरक दिसुन येईल. माझी अशी सुचना आहे की, आरोग्य विभागासाठी एक स्वतंत्र उपायुक्त देण्यांत यावा. व लांजेवार यांना आरोग्य अधिका-याचे काम देण्यांत यावे. अशी माझी सुचना आहे. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव सभागृहातुन बाहेर पडले.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-सन्माननिय महापौरजी, आज दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. एक लक्षवेधी पहिले आली होती व एक आता आली



आहे. पहिल्या लक्षवेधी बाबत आपण आपला निर्णय दिला आहे. या लक्षवेधीवर सुध्दा दयाल, परंतु आपण जो निर्णय दयाल त्याची कार्यवाही होईल की, नाही?

मा.महापौर :-बिल्कुल होईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-जर बिल्कुल होईल तर मग मागच्या महासभेमध्ये मी बाळकृष्ण नगरमधील एका नाल्याबाबत लक्षवेधी सुचना मांडली होती. त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले की, दोन-तीन दिवसामध्ये कार्यवाही होईल परंतु आजपर्यंत तो नाला बंद पडला आहे. व पावसाचे पाणी लोकांच्या घरात जात आहे. त्याचे काय झाले? त्याबाबत यांनी काय केले?

मा.महापौरः- मी आयुक्तांना सांगतो याबाबत काय केले ते सभागृहास सांगतील. सभागृह नेता आपण बोलु इच्छिता....

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौर,मा.उपमहापौर,व खासकरून मा. आयुक्त साहेब, या सभेमध्ये जो मुददा आहे तो आयुक्त साहेबांवर आधारित आहे म्हणुन मा. आयुक्त. आज सभागृहामध्ये श्री.बी.बी.मोरे यांनी म्हंटले की, सभागृह नेता हसत आहेत. खरोखरच मी हसत होतो. माझ्या भगिनी श्रीमती. जया साधवानी यांनी ज्या मुदयाबाबत लक्षवेधी सुचना मांडली आहे. त्याबाबत आम्ही हे नाही पाहिले पाहिजे की, आम्ही सत्ताधारी पक्षात आहोत की विरोधी पक्षात. आम्ही शहराशी प्रामाणिक राहु त्यानंतर राजकीय पक्षाचा विचार करू. वस्तुस्थिती जी आहे ती समोर आली पाहिजे. आज त्यांनी जो मुददा आणला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. त्याबाबत काही मुदयांचा मी खुलासा करू इच्छितो. आमच्या आयुक्तांची जी कार्यपध्दती आहे ती कशी आहे. यावर मी जरा प्रकाश टाकु इच्छितो. चंद्रशेखर साहेबांसारखा आयुक्त आमच्या या महापालिकेत होते. त्यांच्या सारखा आयुक्त संपुर्ण भारत देशात कुठेच नाही. ते ज्यावेळी येथे होते तेव्हा ३३ रस्त्यांच्या कामासाठी सर्व पक्षीयांनी त्यांना सहकार्य दिले होते. त्यांनी आमच्या नगरसेवक निधी व्यतिरिक्त तीन-तीन लाखाची कामे मंजुर केली होती. त्यांनी म्हंटले होते की, आपण सांगाल ते काम करण्यास मी तयार आहे. आपण फक्त मला ३३ रस्त्यांच्या कामात सहकार्य दया. महासभेत माझी ऐवढी इज्जत ठेवा. त्यावर आम्ही म्हंटले होते की, आपली इज्जत तीच आमची इज्जत आहे. आपण जे ३३ रस्ते तयार करत आहात ते आमच्या शहरातील आहेत. म्हणुन सर्व पक्षीय नगरसेवकांनी ३३ रस्त्याचे कामास एकमताने मंजुरी दिली. त्याच चंद्रशेखर साहेबांच्या हाताखाली श्री. पोखरकर हे उपायुक्त होते. मी या गोष्टीची यासाठी आठवण करून देत आहे की, श्रीमती. जया साधवानी यांनी म्हंटले की, काय आपण मागील आयुक्तांच्या आदेशाची कार्यवाही करणार? तर आज असे अनेक मुददे आहेत. श्री. बक्षी साहेब येथे होते.

त्यांच्याही हाताखाली श्री. पोखरकर साहेब, उपायुक्त म्हणुन होते. त्यांच्या स्वाक्ष-या झालेले काही कागदपत्र पडुन आहेत. आमचे श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचे कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील तीन पुलांच्या कामांची कागदपत्रे स्वाक्षरी होऊन पडुन आहेत. श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी ज्या विस्थापितांना पुर्नवसनासाठी जागा दिल्या होत्त्या. तेथील रस्त्याचे काम स्वाक्षरी होऊन पडुन आहे. स्थायी समितीमध्ये हे काम एक वेळ पुढे ढकलण्यांत आले होते. त्यावेळी कुणाएका नगरसेवकाने सांगितले होते की, याची माहिती दिली जावी. परंतु त्यावेळी संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव पुढच्या वेळी आणण्यास सांगण्यात आले होते. यांनी सांगितले होते की मी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करेन. हे अशा काही भेटी देतात जेथे भेटी देण्याची काहीच आवश्यकता नाही. जे करायला पाहिजे ते करत नाहीत. शहरामध्ये आज कॉलरा, गॅस्ट्रो इत्त्यादीचा मुददा आहे. कुणी नगरसेवक जर कचरा उठविण्याबाबत आवाज उठवतात कुणी नगरसेविका पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सर्व ठिकाणी सारखी नसल्याबाबत आवाज उठवतात. काही लोकांना



२४ तास पाणी मिळते तर काहींना बारा तास तर काहींना एक तास तरी पाणी मिळावे? श्री. आर.डी. शिंदे साहेबांसारखा आयुक्त मी आजपर्यंत पाहिला नाही. जे कार्यकारी अभियंता काम करत नव्हते. अशा त्या कार्यकारी अभियंत्त्याला त्यांनी चालत्त्या कार मधुन खाली उतरवुन चला चालते व्हा असे म्हंटले होते. आज पासुन तुम्ही महापालिकेत येऊ नका. अशी त्यांना ताकीद दिली होती. असे जे अधिकारी कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, उप अभियंता असे जे अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन आले आहेत. असे जे अधिकारी जे काम करत नव्हते त्यांना परत पाठविण्यासाठी त्याच दिवशी ते पत्र तयार करत व म्हणत की, चालते व्हा. म्हणजेच त्यांनी अधिका-यांवर आपली छाप पाडली होती. त्यांना कर्मचारी घाबरत होते. बक्षी साहेब यांनी चांगली कार्यपध्दती चालु केली होती. पाणी पुरवठ्याबाबत जर कुणाला दहा लाख पर्यंत काही काम करून घ्यायचे असेल तर तो करून घेऊ शकेल. मी त्यांना रोखणार नाही. आज श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागातील सहा लाखाच्या कामाचे प्राकलन पडुन आहे. हे ते काम करतील. परंतु ते कशाप्रकारे, जर कुणाचे दोन लाखाचे काम झाले असेल व आणखी दोन लाखाचे काम करायचे असेल त्यातुन थोडेही जरी काम झाले असेल तर ते करणार नाहीत. बक्षी साहेबांनी असा एक फार्मुला तयार केला होता. दोन लाखाचे काम जुन मध्ये आणि दोन लाखाचे काम जुलै मध्ये तर हे म्हणतात त्या प्राकलनावर मी ३१ जुलैलाच सही करेन. म्हणजे उदया करतील. मला असे वाटते की, उदया शुभ मुहूर्त असेल. म्हणुनच त्यांनी ३१ जुलैची तारीख निश्चित केली आहे. फक्त राजकारणासाठी इथे येऊन बसणे , त्यांच्या विरोधात जाणे, त्यांचे काम न करणे. याचा अर्थ हा आहे की, महापालिकेच्या आयुक्तांना ९९.९ नाही तर १०० टक्या पर्यंत अधिकार आहेत. यांना जर वाटत नसेल तर, आमच्या स्थायी समितीची ही स्थिती आहे की, साडे चार वर्षात असे कधी झाले नाही की, समितीची एक-एक महिना सभाच होत नाही. विषयच नाहीत हे कोणत्त्याच गोषवा-यावर स्वाक्षरी करीत नाहीत. त्यामुळे काही प्रस्तावच येत नाहीत. प्रलंबित, प्रलंबित तोपर्यंत प्रलंबित. मी जागेची पहाणी करेन पाहु विचार करू. हि अतिशय चुकीची गोष्ट आहे. आज मला अत्त्यंत दुःखाने बोलावे लागत आहे की, आमची जी हालत बक्षी साहेबांनी केली नाही, चंद्रशेखर साहेबांनी जी हालत केली नाही, आर. डी. शिंदे साहेबांनी आमची जी हालत केली नाही त्यांनी तर श्री. सोनाळे यांना काही अधिकार प्रदान केले होते की, नगरसेवक निधी पहाण्याची मला आवश्यकता नाही. त्या प्राकलनांवर तुम्ही स्वाक्षरी करत जा. परंतु हे असे सांगतात की, पैसे कुठे आहेत? जसे यांना घरून दयायचे आहेत. जर चंद्रशेखर साहेबांनी पैशाचा विचार केला नाही. त्यांनी ४० कोटीचे रस्ते केले. तसेच आर.डी. शिंदे, बक्षी साहेबांनी पैशाचा विचार केला नाही तर तुम्ही का विचार करत आहात? तुम्ही कितीही विचार केलात तरीही महापालिकेची परिस्थिती सुधारणार नाही. ती महानगरपालिकेची परिस्थिती नाही तर महाराष्ट्र

शासन देखिल आज तोटयात आहे. तसेच ठाणे महानगरपालिका साडे तीनशे कोटी तोटयात आहे. आज पुर्ण महाराष्ट्राचीच नव्हे तर कोणत्त्याही देशाची हि परिस्थीती अशीच आहे आमच्या कडे तरी जकातीचे उत्त्पन्न चालु आहे. नगरपालिकांमध्ये तर ते सुध्दा बंद झाले आहे. अतिक्रमणे व अनाधिकृत बांधकामे हटविण्यासाठी जो पोलिस बंदोबस्त असतो त्यासाठी तीन लाख रू. दर महिन्याला भरावे लागतात. हे आल्या आल्याच अतिक्रमण विभागास सुचना देतात. कार्यवाही करण्यासाठी सांगतात. त्याबरोबरच शहराच्या नगरसेवकांच्या ज्याकाही अडीअडचणी आहेत त्याबाबत यांच्या हे का लक्षात येत नाही. नगरसेवक ज्या अडचणी सांगत आहेत त्यासुध्दा शहराच्याच आहेत. कुणीही नगरसेवक आपल्या स्वतःच्या घरातील अडचणी सांगत नाहीत. नगरसेवकांच्या प्रभागात जी कामे आहेत ती शहरातच आहेत. यांनी जो आरोप लावला आहे की, अनाधिकृत बांधकाम ..अनाधिकृत बांधकामाबाबत चंद्रशेखर साहेबांनी



आल्या आल्याच म्हणजे १२ जुलै १९९९ नंतरची जी बांधकामे असतील ती मी तोडेन. प्रत्त्येक आयुक्तांनी हेच धोरण ठरवले होते की, मागील बांधकामे आपण तोडु शकणार नाही. परंतु यानंतर अनाधिकृत बांधकामे होऊ देणार नाही. त्यानंतर त्त्यांनी कधीच कर्मचा-यांवर कारवाई केली नाही. जसे की, अमुक अमुक हा संबंधित अधिकारी काम करत नाहीत. तर त्याला हटविले जावे. असा प्रकार जर चालु राहिला तर कोणताही अधिकारी काम करू शकणार नाही. आज लांजेवार म्हणतात की, मला अमुक अमुक हा त्रास आहे. आज श्री. चिजवानी यांचे नातेवाईक गंभीर आजारी आहेत. त्यांना पाहण्यासाठी त्यांना मुंबईला जायचे आहे. तर ही काही कारणे नाहीत. आजच्या तारखेला जेव्हा महासभा होते तेव्हा अधिका-यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच हे सुध्दा होता कामा नये जसे श्री. भुल्लर महाराज यांनी सांगितले की, महासभा झाली प्रश्नोत्त्तरे झाली. परत एक महिनाभर झोपा काढल्या. त्यानंतर पुढील महासभा जेव्हा येईल तेव्हा पाहु. फक्त उत्त्तरच देतील. कामे काही करणार नाहीत. असे होता कामा नये. प्रत्यक्षात कर्मचा-यांवर आपण कारवाई करा. आम्ही सर्व राजकीय पक्षीय आपल्या पाठीशी आहोत. आपल्या प्रशासनिक कामात आम्ही कधीच हस्तक्षेप करणार नाही. आपण पंधरा बीट इन्स्पेक्टर बदलले कुठल्याही राजकीय पक्षाचे लोक आपणांस बोलले नाहीत. की त्यांना पुन्हा घ्या म्हणुन. आपणास जसे पाहिजे तसे आपण प्रशासनाकडुन काम घ्या. कर्मचा-यांवर कडक कारवाई करा. आणि शहराला काम करून दाखवा. आज आम्ही प्रभागामध्ये सफाई कामगारांकडुन काम करवुन घेतो. त्यामुळे सफाई कामगार आमच्यावर नाराज होतात. परंतु नागरिक मात्र खुश होतात. यासाठी शहर वासियांना काम दाखविण्यासाठी कर्मचा-यांवर कारवाई करावी लागेल. ते लोक नाराज होतील. परंतु नागरिक आपणांस दुवा देतील. ऐवढेच बोलुन मी आपणांस विनंती करतो की, आमचे जेवढे सदस्य आहेत. भलेही सत्त्ताधारी पक्षाचे असोत, विरोधी पक्षाचे असोत. राजकीय लोकांना काहीच अधिकार नाहीत. अधिकार सर्व आपणांकडे आहेत. तर मेहरबानी करून शहरामध्ये जे ज्वलंत प्रश्न आहेत. शहरामध्ये अंडर ग्राउंड ड्रेनेजची जी लाईन आहे ती नाल्यामध्ये सोडलेली आहे. मोठ मोठे चेंम्बरस् तयार केलेले आहेत. अऊट लेटस् बरोबर नाहीत. त्यासाठी वार्षिक अर्थसंकल्पात एक कोटी रू.ची तरतुद केली आहे. संडासची लाईन नाल्यांमध्ये सोडली जाते ती चेंम्बर्समध्ये सोडली गेली पाहिजे. शहाड फाटक येथील जलवाहिनी बदली करण्यासाठी चार कोटी रू. ची तरतुद केली आहे. जसे आमचे सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, हे शहर कॉलरा आणि गॅस्ट्रोचे शहर म्हणुन घोषित राहिल. पुन्हा पुन्हा कशाला घोषित करावे. एकदाच घोषित करून टाका. असे पुन्हा पुन्हा होता कामा नये. ठाण्यामध्ये का नाही कॉलरा येत? येथेच का कॉलरा येतो? यामध्ये प्रशासनाची चुक आहे. यामध्ये राजकीय पक्षाच्या लोकांचे सहकार्य हवे आहे म्हणता तर आम्ही काय करणार? आपण जे काही म्हणाल त्यास आम्ही सहकार्य देण्यास तयार आहोत. तसेच ज्या ज्या नगरसेवकांच्या प्रभागात

पाणी येत नाही. भर पावसाळयात पाणी येत नाही तर उन्हाळयात काय परिस्थिती असेल. यासर्व गोष्टींचा गांभिर्यपुर्वक विचार करून सत्ताधारी पक्षाचा विचार न करता. सर्व पक्षीयांचा विचार करावा, आपण सर्वांचे ऐकुन घेतले. सर्व सदस्यांच्या भावना ऐकुन घेतल्या त्यावर कार्यवाही करावयास पाहिजे. पुर्ण शहरास आपण काम करून दाखविले पाहिजे. ऐवढे बोलुन मी माझे दोन शब्द समाप्त करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय झुलेलाल.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवार, श्रीमती. मालती करोतिया सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.महापौरः-</u>श्रीमती. जया साधवानी व श्री. सुभाष मनसुलकर यांची कॉलराबाबतची जी लक्षवेधी आहे मागच्यावेळी कॉलराची जेव्हा साथ आली



होती तेव्हा आम्ही एम.आय.डी.सी.ला दोषी ठरवले होते. आम्ही एम.आय.डी. सीच्या अधिका-यांकडुन माहिती घेतली होती. महापालिकेच्या अधिका-यांकडुन माहिती घेतली होती. सेंन्ट्रल हास्पीटलचे जे डॉक्टर आहेत त्यांच्याकडुनही माहिती घेतली होती. चारही बाजुंनी चौकशी केल्यानंतर आम्हाला जी माहिती प्राप्त झाली त्यानुसार आम्ही म्हंटले होते की,पाण्यामध्ये क्लोरीन चे जे प्रमाण पाहिजे होते तेवढे नव्हते. ही गोष्ट एम.आय.डी.सी.च्या रजिस्टरवरुन सुध्दा प्रमाणित झाली होती. परंतु यावेळी शहरात जी कॉलराची साथ आली आहे त्याबाबतही मी पूर्णपणे प्रशासनास जबाबदार धरतो. मुख्यत्त्वे करुन पाणी पुरवठा आणि आरोग्य विभाग हे दोन्ही विभाग दोषी आहेत. पुर्णशहरास बदनाम करण्यास एक ठेका उचलला आहे. यासाठी मी आयुक्तांना असे सांगतो की प्रशासनात जी दिरंगाई आहे असा दिरंगाईने काम चालणार नाही. संबंधीत जे अधिकारी आहेत त्यांच्यावर आपणास कारवाई करावी लागेल. आणि ही गोष्ट शहरात परत पसरु नये. परत शहराचे नाव खराब होऊ नये. यासाठी आपल्याला जे पण उपाय करायचे आहे लागतील ते आपण करावे. महानगरपालिकेचे महापौर , उपमहापौर, सर्व गटनेते, सर्व समितीचे सभापती सभागृह नेता, विपक्ष नेता, आपल्याला पूर्णपणे सहयोग देतील. आपणास हे पहायचे आहे की, अशा प्रकारचे कोणतेही प्रकरण शहरात होता कामा नये. आणि खास करुन मी आरोग्य विभागाच्या सभापतींनी भ्रष्टाचाराचा जो आरोप केला आहे, त्याबाबत आपणांस पूर्णपणे चौकशी करावयाची आहे. व जे पण अधिकारी या भ्रष्टाचारात सामिल आहेत, त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. मला असे वाटते की, सदनास या लक्षवेधी बाबत आपले मत काय आहे हे सांगावे.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे, श्री. रामचंद पारवानी, श्री. प्रकाश माखिजा सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u> महापौरजी , बालकृष्ण नगर येथील नाल्याबाबत स्पष्टीकरण करण्यास सांगावे.

<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u> महापौर महोदय, आजच्या महासभेत सन्माननिय सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी जी लक्षवेधी सूचना आणली आहे, लक्षवेधी सूचनेमध्ये जो काही मजकूर आहे, तो असा आहे, नाल्यापासून जाणा-या वहाण्याची दुरुस्ती होत नाही त्याकडे दुलर्क्ष केले जात आहे, त्यासाठी जबाबदार कोण आहे? शहरातील कचरा नाला सफाई व्यवस्थित होत नाही, त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. यासाठी जबाबदार कोण आहे? सुरुवातीलाच मी असे सांगु इच्छितो की, या सन्माननिय सभेचा मी ही एक सदस्य आहे. मला सुध्दा मतदान करण्या व्यतिरिक्त मत देण्याचा अधिकार आहे. माझ्या हसण्यावरही नियंत्रण आहे. इथे सर्व सदस्य एकत्रित येतात, त्यांची वागणूक कशी असते हे सर्वांना माहित आहे. आणि त्यांची अशी अपेक्षा आहे की, एखादया पुतळयाप्रमाणे इथे बसून राहू , आणि आपल्या सभागृहात जी काही चर्चा होते , ती एखादया पूतळयाप्रमाणे ऐकत राहू. मी पण एक माणूस आहे,सभागृहात जी काही चर्चा चालते, त्याविषयी माझ्या मनात काही भावना येऊ शकतात, आणि हसायला येणे ही एक नैसर्गीक

गोष्ट आहे, असे मी समजतो. याचा अर्थ असा नाही की, मी सर्व गोष्टी गंभीरतेने घेत नाही. मी सर्व गोष्टी गंभीरतेने घेऊ इच्छितो. व या शहराचे भवितव्य बनवू इच्छितो. मला आशा आहे की आपल्या सर्वांचा सहयोग असेल तरच मी हे भविष्य बनवू शकेन. आपल्याला मी हे सुध्दा सांगु इच्छितो की, या उल्हासनगर महापालिका आयुक्त बनण्याच्या आशेने मी आलेलो नाही. परंतु ही सेवा आहे, शासनाने मला पाठविले आहे, म्हणून मी गंभीरतेने काम करु इच्छितो. ज्यामुळे या शहराचा नावलौकिक वाढेल. यादृष्टीकोनातून मी काम करु इच्छितो. सर्व सन्माननिय सदस्यांनी काही प्रश्न विचारले, त्यातील प्रत्त्येकाला उत्तर देणे मला योग्य वाटले नाही. परंतु जे योग्य वाटले त्याचे



उत्तर मी आताच देईन. कित्त्येक सदस्यांनी प्लास्टिक च्या पिशव्यां विषयी मुददा उपस्थित केला होता. सन्माननिय स्थायी समिती सदस्यांनी हा ठराव पास केला होता. त्याबाबत काहीही कार्यवाही झाली नाही, मी सर्व सदस्यांना सांगु इच्छितो की, याबाबतची कार्यवाही चालु आहे. त्याबाबत कोणा अधिका-याला सक्षम अधिकारी ठरवावे याबाबतची कार्यवाही करायची आहे,याबाबतच वाद निर्माण झाला आहे. त्याबाबत लवकरच सभागृहाने व स्थायी समितीने जो ठराव पास केला आहे. त्यानुसार कार्यवाही होईल. कच-याच्या साफसफाई बाबत ज्या सदस्यांनी विचार मांडले आहे की, साफसफाई व्यवस्थित होत नाही. आपणास ज्या पध्दतीने सफाई व्हावी असे वाटते त्यापध्दतीने ती होत नाही. मी पण आज सकाळी शहरातील काही भागांना भेट दिली, मला असे वाटते की, आपण जसे म्हणतात तेवढी शहराची हालत नाही. काही ठिकाणी कचरा तर नक्की आहे, परंतु इतकी खराब हालत नाही. व हा जो पनवेलकर ठेकेदार आहे, त्यांच्याबाबतीत ही काही सदस्यांनी कार्यवाहीचा मुददा उपस्थित केला. त्याबाबतीत मी काही अहवाल आणले आहेत. व त्यांनाही कारणे दाखवा नोटिस देण्याचा विचार करत आहे. व दिली जाईल. कोणत्त्याही ठेकेदाराला किंवा कोणत्त्याही व्यक्तीवर कार्यवाही करायची असेल तर कारणे दाखवा नोटिस दयावी लागते, त्याच्यानंतरच ही कार्यवाही होऊ शकते. सर्व कचरा साफ करणे ही प्रशासनाची जबाबदारी जरुर आहे. आणि त्यानुसार प्रशासन जास्तीत जास्त प्रयत्नही करत आहे असे मी समजतो. व अशी आशा करतो की आपण जसे समजता त्याप्रमाणेच मी यशस्वी होईन. कित्त्येक सदस्यांनी भ्रष्टाचाराचा मुददा उपस्थित केला. भ्रष्टाचाराबाबत जर पुरावा दिला तर त्याबाबत कारवाई मी जरूर करेन. त्याबाबत ठोस पुरावा मिळाला पाहिजे. त्यावर कार्यवाही जरूर होईल. व नगरसेवक निधीबाबत सुध्दा सन्माननिय सभागृह नेत्त्यांनी विचारले की,......

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>श्री. पनवेलकरांना प्रतिदिन साफसफाई पोटी ६४ लाख रू. दिले जातात. परंतु रविवारी फक्त दोनच फे-या ते मारतात. दुपारी १२.०० नंतर ट्रक बंद केले जातात. असे का? रविवारचे पैसे कमी घेतले जातात का? व सुट्टीच्या दिवशी सुध्दा त्यांच्या गाडया येत नाहीत. तुम्ही अधिका-यांकडे त्याची चौकशी करा. मी दोन वेळा आरोग्य निरिक्षकांकडे गेलो होतो. त्यांनी सांगितले की, आज रविवार आहे. दोनच फे-या मारल्या जातील. बाकीचा कचरा उदया उचलला जाईल. असे का? रविवारचे पैसे कमी घेतात का?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>या मुदयाविषयी सुध्दा मी चौकशी करेन. या महापालिकेचा दोन महिन्या पुर्वीच मी कार्यभार स्विकारला आहे. मी जे काही आर्थिक मुल्यमापन केले. त्यात मी कुणाला दोष देऊ इच्छित नाही. वस्तुस्थिती जी आहे ती सांगणे माझे कर्तव्य आहे. असे मी समजतो. १३३ कोटीचा बजेट तयार केलेला आहे. व उत्त्पन्नाचा जो मी अंदाज घेतला त्यानुसार ७३ ते ८० कोटी रू. उत्त्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे. याचाच अर्थ हा बजेट कमीत कमी ५० टक्के तुटीचा असणार आहे. माझ्याकडे कित्त्येक

ठेकेदार येतात म्हणतात हे बिल नाही मिळाले, ते बिल नाही मिळाले. या महानगरपालिकेवर कर्ज किती आहे ते आपणांस माहित आहे. ते आकडे सुध्दा मी आपणांस सांगु इच्छितो. कमीत कमी १२० कोटीचे कर्ज या महापालिकेवर आहे. व २० कोटीची बिले प्रलंबित आहेत. म्हणजे १४० कोटीचा बोजा महापालिकेवर आहे. अशा परिस्थितीत काम करणे मुश्किल आहे. अशा स्थितीत बजेटच्या ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये कपात करणे आवश्यक आहे. व ती वस्तुस्थिती आहे. ते कसे करायचे याबाबत नंतर विचार केला जाईल.

--५३--

मालमत्ता कराचे दर वाढविण्याचा प्रस्ताव ठेवला होता. दुर्दैवाने तो मंजुर झाला नाही.सुधारित अर्थसंकल्प काही करांचे दर वाढविले तर परिस्थिती आटोक्यात येईल. नाही तर परिस्थिती अतिशय गंभीर आहे. व या महानगरपालिकेचे पुर्णपणे दिवाळे निघाले आहे असे माझे म्हणणे आहे. सदस्यांनी असे सांगितले की, मागील आयुक्तांनी काही सुधारणा घडवुन आणल्या त्यावेळी सुध्दा हीच परिस्थिती होती कदाचित होऊ शकते. परंतु माझ्याकडे जे ठेकेदार येतात. व म्हणतात की, आमची देयकाची रक्कत दया.परंतु माझ्याकडे तर त्या रक्कमा देण्यासाठी पैसे नाहीत. पैसे देण्याचा मी प्रयत्न करत आहे. व आपला जो नगरसेवक निधी आहे त्यामध्ये जाणीव पुर्वक अडथळा मी तर आणु इच्छित नाही. आपला जो निधी आहे त्यातील जास्तीत जास्त कामे मंजुर करण्याचे माझे प्रयत्न आहेत. व हे माझे आश्वासन आहे. दुसरे असे की, आपण अनेक प्रश्न विचारले. कॉलरा कसा पसरतो? याबाबत मला जी तांत्रिक माहिती दिली गेली आहे. त्याबाबत अतिशय थोडया वेळेत मी आपणांस सांगु इच्छितो, येथील जे राहणीमान आहे. जेथे वैयक्तिक स्वच्छता असते, खाण्यापिण्याची सवय असते, कित्त्येक लोक उघडयावर संडास करतात. घरातील केरकचरा उघडयावरच टाकतात. पिण्याचे पाणी साठविण्याची असुरक्षित व्यवस्था असते. इत्त्यादी कारणे असु शकतात. आपणांस सांगणे मी माझे कर्तव्य समजतो. स्वच्छतेबाबत लोकांच्या ज्या वैयक्ति सवयी असतात. त्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने एक निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये काही मुददे दिले आहेत. ती तर सत्त्य स्थिती आहे. त्यामध्ये असत्त्य असे काही नाही. त्यामध्ये पिटिशन नंबर. पी.आय.एल. नं. १० ,२००१ मध्ये असे दर्शाविले आहे. शहराची साफसफाई नागरिकांच्या स्वतःच्या मनावर व कर्तव्यावर अवलंबुन आहे. मी असे नाही म्हणत की आमच्या काही चुका नाहीत. मी आताच आपणांस सांगितले की, साफसफाईचे काम १०० टक्के आहे. असे तर मी म्हणत नाही. परंतु जे काही आहे त्यामध्ये सुधारणा करण्याचा जरूर प्रयत्न करेन. व पनवेलकरांच्या बाबतीत त्यांना नोटीस देऊन दंड वसुल करण्याचा प्रयत्न जरूर करेन. दुसरी गोष्ट अशी की कॉलरा बाबत आम्ही काय उपाययोजना केल्या? मी तर सर्व आरोग्य निरिक्षकांची सभा बोलावली त्यांना सुचना दिल्या. त्यांची कार्यवाही सुध्दा करत आहोत. व पुर्ण कचरा साफ करण्याचा प्रयत्न करत आहे. जंतुनाशकांची फवारणी करण्याचे काम चालु आहे. दुसरे असे की, क्लोरिनेशनची मात्रा वाढविण्याचाही आम्ही प्रयत्न करत आहोत. मात्रा वाढवत आहोत. पाण्याचे बरेचसे नमुने घेतले आहेत. खुपशया हातगाडया पकडल्या आहेत. हातगाडयांवर प्रतिबंध लावले आहेत. आम्ही पुर्णपणे असे प्रयत्न करत आहोत की, हातगाडयावंर जे अन्न पदार्थ विकले जात आहेत त्यावर प्रतिबंध लावला जावा. लोकांना आवाहन करण्यात आले आहे की, पाणी उकळुन प्यावे. महाराष्ट्र शासनाचे जसे निर्देश आहेत. त्यानुसार मी केले आहे. वर्तमानपत्रातुन लोकांना असे आवाहन केले आहे की, आपण वैयक्तिक स्वच्छता राखा. व त्याविषयी आम्ही पुर्ण शहराचे सर्व्हेक्षण केले आहे. कोणकोणत्त्या प्रकारचे रोग उदभवतात. त्याबाबत ९५ टक्के काही लोकांना औषधोपचारही दिले. व मी असे सांगतो की, कॉलरा पुर्णपणे नियंत्रणात आला आहे. शहराची स्थिती आपण सर्वजण चांगल्या प्रकारे जाणता त्यावर अधिक भाष्य मी करू इच्छित नाही. व पाण्याच्या ज्या नळजोडण्या आहेत त्या टाकण्यासाठी जागा नाही ही वस्तुस्थिती आहे. ती आपण नाकारू शकत नाही. काही पाण्याच्या लाईन्स गटारी शेजारून जातात. महापालिकेच्या पाईप

लाईन खुपच कमी प्रमाणात गटारातुन जवळुन जातात. जास्तीत जास्त खाजगी नळ जोडणी गटारातुन जात असतील त्या लिकेज असतील त्याबाबत आम्ही सर्व्हेक्षण सुरू केले होते. जवळ जवळ २१३१ लाईन्सचे आम्ही सर्व्हेक्षण केले त्या सर्व्हेक्षणमध्ये आम्हाला असे आढळुन आले की, ४३० लाइन्स लिकेज होत्या त्या आम्ही तोडुन टाकल्या आहेत. क्लोरीनच्या मात्रेचा डोस



तपासुन पाहण्यासाठी घरोघरी जाऊन पाण्याची तपासणी करतात. आतापर्यंत आम्ही ७०९८ नमुने गोळा केले आहेत. त्यात फक्त १५ नमुन्यामध्ये क्लोरीनची मात्रा नव्हती. जिथे जिथे बोरवेल आहे. तिथे पाणी पिण्या लायक नाही असे आवाहन करण्यांत आलेले आहे. व तश्या आशयाचे बोर्डस् सुध्दा कित्येक ठिकाणी लावलेले आहेत. काही नमुने आम्ही तपासणी साठी पाठविले आहेत त्यांची संख्या आहे ३७६. त्यामधील २७८चा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार तेथिल पाणी पिण्यालायक आहे. तर मी आपणांस हे सांगु इच्छितो की, या शहरामध्ये अनाधिकृत बांधकामांची संख्या ऐवढया प्रमाणावर असुन सुध्दा नियंत्रणात आहे. असे नाही की, साथ नियंत्रणतात नाही. आम्ही पुर्णपणे प्रयत्न करत आहोत त्यास आपले सहकार्य असले पाहिजे. व मी विश्वास करतो की, आपण सहकार्य दिले तर कॉलराचे पुर्णपणे उच्चाटन होईल.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मा. आयुक्त साहेब, आम्ही लोकांनी यापुर्वीच मागणी केलेली आहे. व नऊ महिन्यापासुन हे शहर कॉलराग्रस्त आहे. आपण स्वतःच सांगीतले आहे. आपण खात्री पुर्वक कधी सांगु शकाल की, दोन महिन्या नंतर किंवा तीन महिन्या नंतर हे शहर कॉलरा मुक्त होईल म्हणुन?
<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>मी आताच आपणांस सांगितले की, हे शहर कॉलराग्रस्त असल्याचे जाहिर झालेले असुन सध्याही अस्तित्त्वात आहे. कॉलरा मुक्त करण्याचे आम्ही प्रयत्न करत आहोत. परंतु निश्चित वेळ सांगणे कठिण आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच ते शक्य आहे. पदाधिकारी आणि प्रशासन हे महापालिकेच्या रथाची दोन चाके आहेत. महासभेत प्रशासन हा आपला शत्रुपक्ष आहे असे होता कामा नये. येथे जे कर्मचारी आहेत. त्यातील ९० ते ९५ टक्के कर्मचारी हे येथीलच आहेत. बाहेरून फक्त पाच-दहा अधिकारी आलेले आहेत. व हे सर्वच लोक जे आपले भाऊ-बहिणी असतील ते सर्वजण आपल्याला सहकार्य देतील तरच हे काम व्यवस्थितरित्त्या होऊ शकेल व हे शहर सुध्दा एक चांगले शहर होईल. व बाकी शहरांना जसा पुरस्कार मिळाला तसा पुरस्कार या शहराला सुध्दा मिळेल.

<u>मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-</u>मा.महापौरजी, मी आयुक्त व आपल्या आश्वासनानुसार मी अपेक्षा करते की, मी जी लक्षवेधी सुचना मांडली होती. तीच्याकडे लक्ष दिले जावे. परंतु ३ मार्चला श्री. बक्षी साहेब, व आपल्या स्वाक्षरीने बुस्टर लावण्याचा एक करार झालेला आहे. त्याची आजपर्यंत कार्यवाही झालेली नाही. श्री. दशोरे साहेब देखिल आज इथे उपस्थित आहेत. आपण त्यांना सुचना दया की, कशा प्रकारे काय करायचे आहे. त्यामध्ये काय कमी आहे. पाच महिन्यामध्ये एका आदेशाची का पुर्तता होत नाही. काय अडचण आहे? आम्हालाही ऐकु दया ना?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-</u>हा जो बुस्टरचा प्रस्ताव होता. त्याची २०.६.२००१ रोजी कार्यआदेश दिला होता. त्याची मुदत ५.७. २००१ रोजी संपली होती. त्यांना एम.एस.ई.बी.ची मंजुरी हवी होती त्यासाठी आपण १०.७.२००१रोजी एम.एस.ई.बी.ला पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर आज दि. ३०.७.२००१ला आले आहे. त्यानुसार सहा हजार रू. त्यांच्याकडे भरायचे आहेत. व सुरक्षा अनामत रक्कम रू. ४००० रू. भरायचे आहेत. त्यानुसार बुस्टरचे इंन्स्टोलेशन आता दोन दिवसामध्ये पुर्ण होईल. व एम.एस.ई.बीच्या कागदपत्रांची पुर्तता लवकरच पुर्ण केली जाईल.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-एकुण किती दिवस लागतील?तेथील लोकांना बिल्कुल पाणी नाही. मार्चमध्ये आपण मंजुरी दिलेली आहे. आता जुलै संपत आला आहे. मी किती आश्वासने देऊ लोकांना?

--५७--

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-बुस्टरचे इंन्स्टॉलेशन दोन दिवसामध्ये पुर्ण होईल.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-आपण मला तसे आश्वासन देता? मा. महापौरजी, आपल्या समोर सभागृहामध्ये हे आश्वासन देत आहेत की,दोन दिवसामध्ये पुर्ण होईल म्हणुन, तेथे थेंब थेंब पाण्यासाठी लोक त्रस्त आहेत.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-केवळ एम.एस.ई.बी.ची जी फॉर्मेलिटी आहे. ती दोन दिवसामध्ये पुर्ण होईल.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-ते मला सांगु नका.मला हे सांगा की, करारनामा होऊन पाच महिने झाले आहेत. बक्षी साहेब होते व मा.महापौर होते. त्यानंतर सुध्दा अदयाप ते काम झाले नाही. मला प्रत्येक वेळी आठ-पंधरा दिवसाची वेळ दिली जात आहे. आज आपण दोन दिवसाची वेळ मागत आहे. मी आपणांस आठवडयाची वेळ देत आहे. मा.महापौरजी यांना आपल्या वतीने व आमच्या वतीने एक आठवडयाची वेळ देत आहे. ठिक आहे.

मा.महापौरः-श्री. दशोरे आपण त्यांना १५ ऑगस्ट पर्यंतची वेळ दया. १५ ऑगस्ट पर्यंत सर्व कार्यवाही पुर्ण करा. व निकाल दया.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-मा.महापौरजी, हे काम मंजुर करून घेण्यास सुध्दा मला पाच महिने लागले ना? तर मी सर्वांना किती आश्वासने देत राहु.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-एम.एस.ई.बी.ची कार्यवाही पुर्ण करण्यासाठी दोन दिवस लागतील.................

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-मा.महापौरांनी आपणांस १५ ऑगस्ट पर्यंतची वेळ दिलेली आहे. जर हे १५ ऑगस्ट पर्यंत करू शकत नसतील तर मा.महापौरजी, आपण यांच्यावर काय कार्यवाही कराल?

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-श्री. दशोरे साहेब, प्रभाग क्र.५५ चे सुध्दा इनचार्ज आपणच आहात. त्यांची अडचण सुध्दा आपणांस माहित आहेच. मी आयुक्त साहेबांना सांगितले आहे की, गोष्ट हातारवालुन निघुन जाईल. त्यानंतर सांभाळणे खुप कठिण होईल. त्यासाठी हे चांगले आहे की, आपण इनचार्ज असल्याने आपण हे सांभाळुन घ्यावे. श्री. धुत साहेब, जोपर्यंत होते तोपर्यंत पाण्याची थोडी सुध्दा समस्या नव्हती. जेव्हा पासुन आपण पदभार स्विकारला आहे तेव्हा पासुन पाण्याची तेथे खुपच समस्या आहे. याचे कारण काय?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-तेथील जो बुस्टर होता त्याला बरोबर पाण्याचा दाब मिळत नव्हता. आजच तेथील काम सुरू केले आहे. बुस्टरला जे ३ के.जी. ब्लॉक झाले होते. आजच तेथील काम चालु केले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. महापौरजी, एक आठवडयापासुन पुर्ण शहरामध्ये कमालीची पाणी टंचाई आहे असे का?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-एमआय. डी. सी.चे जेव्हा शटडाऊन होते तेव्हा अशा प्रकारची समस्या निर्माण होते. जी एमआडीसी ची लाईन तुटली होती. ती आज साडेचार वाजता दुरूस्त केली गेली.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मी नव्हते का आपणांस सांगितले. नवभारत मध्ये सुध्दा आले होते.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-एमआयडीसीची चुकी होती. ती पाईप लाईन दुरूस्त करून साडेचार वाजता पाणी पुरवठा सुरू झाला.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-मा.महापौरजी, आता आता जो बुस्टरचा इथे मुददा उपस्थित झाला आहे. त्याबददल मी सांगु इच्छितो की, श्री. दशोरे साहेब यांच्या कारकिर्दीत कॅम्प १ येथे पाच लाख रू. खर्च करून. बुस्टर बसविला गेला आहे. तो बुस्टर काम करतो का? विचारा जरा. श्री. दशोरे साहेब मी आपणांस विचारू इच्छितो, त्या बुस्टरचे काय झाले?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-तो बुस्टर आता अंडर ट्रायल आहे. त्याची ट्रायल चालु आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-अजुन ट्रायल चालु आहे. श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागातील लोक मरतील.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-दिड महिन्यापासुन ट्रायल चालु आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-गोल मैदान येथे पाच लाख रू. खर्च करून जो बुस्टर लावला आहे. आजपर्यंत पाणी येत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-आयुक्त साहेब, तो जो बुस्टर बसविला आहे. तो चुकीच्या पध्दतीने बसविला आहे. हवे असेल तर मा.महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेबांना मी तो दाखवु शकतो. तो पुर्णपणे चुकीचा बसविला गेला आहे. त्यामध्ये चुक झाली आहे. तो बुस्टर बरोबर काम करत नाही आहे. मी त्यांचे जे कनिष्ठ अधिकारी आहेत. त्यांना सुध्दा त्याबाबत विचारले आहे. तो बुस्टर अदयाप का नाही. व्यवस्थितरित्त्या काम करत की, महापालिकेने दोन लाख रू. दंड भरला आहे.
मा.महापौरः-जी वस्तुस्थिती आहे ती आपण सांगा.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-पंधरा दिवसापुर्वी आयुक्तांच्या दालनात त्यांनी सांगितले की, ट्रायल चालु आहे. आणखी किती दिवस चालेल? पुर्ण वर्षभर चालेल काय? या मशिनरीमध्ये नेहमी काही ना काही बिघाड असतोच.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-मध्यंतरी आम्ही चालु केले होते तेव्हा लाईन चोकअप झाली होती. पंपामध्ये दगडी आल्या होत्त्या.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:- आज आम्ही येथे बसलो आहोत तरी फोनवर फोन येत आहे. १ नंबर विभागात अदयाप पाणी बंद आहे. कोणत्त्याही इमारतीत आज पाणी येत नाही. कोणत्त्या कारणास्तव आज पाणी बंद केले आहे? साहेबांच्या इमारतीत पाणी नाही, माझ्या इमारतीत पाणी नाही. बहुतेक

ठिकाणी पाणी नाही. हवे तर आपण फोन करून विचारून पहा. नियंत्रण ठेवणारा कुणी आहे की नाही?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-जेव्हा पासुन मी महासभेत आहे. मला याबाबत काही माहिती नाही. जसे ओल्ड एम.बी.आर.
येथे मी प्रत्यक्ष भेट दिली. तेथील पाईप लाईन फुटली होती. काम चालु होते. म्हणुन ओल्ड एम.बी.आर पासुन पाणी येत नव्हते.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-मा.महापौरजी, त्यांना विचारा लाईट ऑफिसच्या कामाबाबत बोलत होते की, तेथे आम्ही पैसे भरून आलो आहोत. तो बुस्टर काम का करत नाही? त्याचे कारण काय आहे? ते सांगितले पाहिजे. आम्ही वारंवार विचारतो तेव्हा सांगितले जाते आठ दिवसात होईल पंधरा दिवसात होईल. ३ नंबर मधील तीन इंची पाईप लाईनला बिल्कुल पाणी येत नाही. राहुल नगर झोपडपट्टीतील लोक आम्हाला वारंवार विचारणा करतात की, बुस्टरचे काय झाले? आम्ही दशोरे साहेबांना विचारतो, दशोरे साहेब म्हणतात तो बुस्टर काम करेल, काम करेल. कधी पर्यंत करेल? दशोरे साहेबांच्या अगोदर श्री. धुत होते की, भुत होते त्यांनी श्री. दशोरेंना पदभार दिला आहे. त्याबरोबर परिवहनचाही पदभार त्यांच्याकडे आहे. कार्यकारी अभियंत्त्याचाही कार्यभार त्यांच्याकडेच आहे. कोणत्त्याही अधिका-यांवर एका पेक्षा जास्त पदाचे कार्यभार असता कामा नये.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-मी आजच साहेबांना विनंती केली आहे की, माझ्याकडुन कार्यभार काढुन घेतला जावा. मला यामध्ये काही सारस्य नाही. मी साहेबांना दोनदा विनंती केली आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-त्यांच्याकडे दोन-दोन पदाचा कार्यभार असल्यामुळे ना परिवहन चे काम होत ना पाणी पुरवठ्याचे काम होत.

मा.महापौरः-माझ्यामते श्री. दशोरे यांच्याकडे फक्त पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार आहे. आणखी दुसरा कोणताही नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-आताच्या आता आपण श्री. दशोरे यांना विचारा.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-मी आजच साहेबांना विनंती केली आहे की, माझ्याकडील कार्यभार काढुन घेतला जावा.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-आपणाकडे जे काही पदभार असतील त्याबाबत आयुक्त व महापौर पहातील. परंतु मला हे पहायचे आहे की, तो बुस्टर काम का करत नाही? नगरसेवक निधीतील आमचे पाच लाख रू. त्यासाठी खर्ची घातले जातात आणि तरी सुध्दा त्या कामाचे कार्यादेश काढले जात नाहीत. पाच लाख रू. त्या बुस्टरसाठी खर्च केले त्यास कोण जबाबदार आहे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-बुस्टर मॅकेनिकल ॲरेंजमेंट आहे. व पाईप लाईनच्या ट्रायलमध्ये बरीचशी वेळ जाते.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-आपण इंजिनिअर आहात. टेक्नीकल माणुस आहात. मी फक्त नगरसेवक आहे. परंतु तरीही मला महिती आहे की, आपली तेथे काय चुक झाली आहे. मी खात्रीने सांगु शकतो. महापौर....



उपमहापौर,आयुक्त यांना तेथे नेऊन दाखवुन देऊ शकतो. जर तुमचे तांत्रिक अधिकारी दोषी असतील तर काय दंड देणार? काय कारवाई करणार?

राहुल नगर झोपडपट्टीमध्ये ज्या लोकांना अदयाप पाणी मिळत नाही ते लोक काय करतील? एक हंडा इकडून, एक हंडा तिकडुन पाणी आणतात.

मा.महापौरः-श्री. मोरेजी, दोन दिवसाची वेळ दया. ते प्रत्त्यक्ष जागेवर जाऊन पहाणी करतील काय अडचण आहे ती समजाऊन घेतील.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा.महापौरजी, दशोरे साहेबांकडे ज्या तक्रारी आलेल्या आहेत. मी अपेक्षा करतो की, ते त्या तक्रारी दुर करतील. परंतु मी माझी एक गोष्ट सांगु इच्छितो की, माझ्या प्रभागात काही दिवसापुर्वी पाण्याची खुपच समस्या होती. मी दशोरे साहेबांना सांगितले त्यांनी तीन दिवसामध्ये ती समस्या दुर केली. त्यासाठी मी त्यांना धन्यवाद देतो.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-आपल्याकडे कोणता फार्मुला होता? आमचे तर ते ऐकतच नाहीत. आपणाकडे कोणता फार्मुला होता. तो मला सुध्दा जरा दया.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-आपण माझा मुददा समजुन घेतला नाही. मी काय म्हंटले की, आपल्या सर्वाच्या अडचणी दुर करतील अशी अपेक्षा करतो.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-आपल्या अडचणी तीन दिवसामध्ये दुर होतात. आमच्या अडचणी सात महिन्यात सुध्दा होत नाहीत......

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-माझी एक सुचना आहे की,श्री. दशोरे हे पनवेलला राहतात. इथे पाण्याची जर काही समस्या निर्माण झाली तर आम्ही पनवेलला कुठे फोन करायचा? मी विचार करतो की श्री. दशोरे साहेबांनी उल्हासनगरमध्ये राहीले पाहिजे. महापालिकेने त्यांच्या रहाण्याची सोय केली पाहिजे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-मी कुणावर आरोप करत नाही. परंतु मी बाहेर गावाहुन येत असलो तरी साडे दहा वाजे पर्यंत मी कार्यालयात येत असतो. जर आपणांस स्थानिक अधिका-यास कार्यभार दयायचा असेल तर देऊ शकता. कार्यकारी अभियंत्त्याचा पदभार श्री. जैन साहेब हे जे सर्वात वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांना देऊ शकता. माझी काही हरकत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-नाही.नाही. हरकतीची काही गोष्ट नाही. आम्हाला काम पाहिजे. यासाठी मी बोलत आहे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-काम पाहिजे तर जेव्हा इथे कॉलराची साथ होती तेव्हा रात्री दोन-दोन वाजेपर्यंत मी थांबत होतो. व सकाळी आठ वाजता येत होतो.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-मा.महापौरजी, बालकृष्ण नगरच्या नाल्याबाबत आयुक्तांनी काही उत्तर दिले नाही.

मा.महापौरः-आयुक्त साहेब, खास करून याचे उत्तर दया.



मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-मा.महापौर महोदय, राजीव गांधी नगर येथे जी झोपडपट्टी आहे. त्या संदर्भात मागच्या वेळी लक्षवेधी सुचना आणली होती. त्यावेळी मी सभागृहात असे आश्वासन दिले होते की, याबाबत लवकरच काहीतरी उपाययोजनांचा विचार केला जाईल. त्याबाबत मी जरूर

विचार केला आहे. जमिन मालकास संरक्षण भिंत बांधण्यास महापालिकेने परवानगी दिलेली आहे. तेथुन जो नाला जातो. व अन्य दुस-या ठिकाणाहुन जो पाण्याचा प्रवाह जातो त्यामध्ये फार मोठी पाईप लाईन आहे. या पाईप लाईनचा अडथळा होत असल्याने पाणी व्यवस्थितरित्त्या बाहेर पडत नाही. त्यामुळे मी एक नोटीस सुध्दा तयार करून ठेवली आहे. शहर अभियंत्यांना मी निर्देश दिले आहेत की, त्याबाबत जे अलाइनमेंटची लाईन आहे त्याचा नकाशा तयार करून दया. त्यांना लेखी सुध्दा दिले आहे. व एक दोन वेळा तोंडी सुध्दा सांगितले आहे. परंतु दुर्दैवाने अलाइनमेंट कशी असली पाहिजे याचा नकाशा शहर अभियंता यांनी अदयाप मला दिलेला नाही. त्यास्तव त्यांना ती नोटीस देणे अदयाप प्रलंबित आहे. परंतु मी लवकरच शहर अभियंत्यांना असा आदेश देईन की, अलाइनमेंटची जी लाईन आहे. ती नकाशयावर दाखवुन त्याबाबत लवकरच त्यांना नोटीस दिली जाईल.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, किती दिवसामध्ये याची कार्यवाही होईल. चाळीस दिवस तर आतापर्यंत होऊन गेले आहेत. परमेश्वराच्या कृपेने जोरदार पाऊस झाला नाही. जोरदार पाऊस झाला असता तर पुर्ण झोपडपट्टी वाहुन गेली असती.

<u>मा.महापौरः-</u>मला वाटते की, या प्रकरणामध्ये आयुक्त साहेबांनी बराचसा विलंब केला आहे. त्यांनी खुप अगोदर कार्यवाही करायला हवी होती. ही एक गंभीर बाब आहे. त्याविभागामध्ये पुराचे पाणी शिरते. दोन-तीन तासाच्या पावसाने तेथील १००-१५० घरे पाण्यात बुडतात. तर उदयाच शहर अभियंत्यांना बोलावून याबाबत आपण कार्यवाही करा.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-</u>सन्माननिय महापौरजी, समाजवादी पार्टीचे जे खासदार आहेत त्यांची दिल्ली येथे निर्घुण हत्त्या झाली. त्यांच्या साठी सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण केली जावी. अशी मी विनंती करतो.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>राष्ट्रगीतानंतर अगोदर श्रध्दांजली अर्पण करू.

<u>मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-</u>मा.महापौरजी, या लक्षवेधीबाबत मी दोन शब्द बोलु इच्छिते.

<u>मा.महापौरः-</u>लक्षवेधी पुर्ण झाली त्यावर आयुक्तांचे उत्त्तरही झाले.

<u>मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवार-</u>आयुक्त साहेबांनी जे उत्त्तर दिले त्याबाबत मी बोलु इच्छिते. त्याबाबतच मी जरा सुचना करू इच्छिते. आयुक्त साहेबांनी कॉलरा बाबत जे उत्त्तर दिले खाण्या पिण्याच्या वस्तुबाबत ज्या सुचना दिल्या. कॉलराची जी रोगराई आहे तीची आणखी दुसरी काही कारणे आहेत. सार्वजनिक शौचालये नाहीत. लोक रस्त्त्यावर प्राप्तविधी करतात. पाईप लाईन नाहीत, लोक इकडुन तिकडुन पाणी आणतात. गटारे नाहीत. पाऊसाचे पाणी इतरत्र पसरते. त्यामुळेच कॉलरा व इतर संसर्गजन्य रोग फेलावतात.



तर आपण त्यासाठी काय उपाययोजना करणार? काय करू इच्छित आहात हे आम्हाला पण सांगा. महापौर आयुक्त साहेबांना उत्त्तर दयायला सांगा.

<u>मा.महापौरः-</u>आपले सुचना ते लक्षात ठेवतील आणि योग्य ती कार्यवाही करतील.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-कधी करणार?आयुक्त साहेबांकडे जेव्हा आम्ही जातो आणि त्यांना सांगतो की, पाईप लाईन टाकुन दया. रस्ता तयार करून दया तर ते म्हणतात की, पैसे नाहीत.

मा.महापौरः-नाही. नाही. ते उचित कार्यवाही करण्यासाठी त्यांना सांगितले जाईल.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-आम्हाला याबाबत आश्वासन पाहिजे. आयुक्त साहेब आपण आश्वासन दया.

मा.महापौरः-मी आपणांस सांगितले ना की, उचित कारवाई केली जाईल म्हणुन.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-प्रधान सचिव यांनी, जो निधी जाहिर केला आहे. तो का वापरला जात नाही? हे पहा हसण्यावारी नेऊ नका. पहिले आपण आयुक्तांना म्हंटले होते की, आपण हसु नका. आता आपण स्वतः हसत आहात.
मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, याबाबत त्वरीत कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-मला आश्वासन पाहिजे.

मा.महापौरः-त्वरीत कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्या श्रीमती. पंचशिला पवारः-ठिक आहे. आश्वासन दिल्याबददल धन्यवाद. केवळ महासभेतच आश्वासन नको तर त्याची कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे. अशी आम्ही आपणाकडुन अपेक्षा ठेवतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः-मा. आयुक्त साहेब, झोपडपट्टीसाठी जो पाच टक्के निधी होता तो कुठे गेला? त्यातुन कामे का नाही करत?

मा.महापौरः-श्रीमती. बगाडे मॅडम, कृपया आपण बसुन घ्या.

मा.सचिवः-पुढील विषय
मागील सभेचे दि. ७.७.२००१ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौरजी, दि.७.७.२००१ रोजी जी सभा झाली होती. प्रारूप विकास आराखडयाबाबत दि. ९.७.२००१ रोजी पर्यंत सुचना व हरकती घेण्याची वेळ होती. त्यासभेमध्ये मा.आयुक्त साहेबांनी म्हंटले होते की, या सभेमध्ये जो ठराव पारीत होईल. तो ठराव एम.एम.आर. डी.ए.कडे पाठविला जाईल. येथे जो ठराव दिला आहे,जी प्रस्तावना दिली आहे ती प्रस्तावना न पाठविता ठराव पाठविणार होते. व दोन प्रस्तावना दिल्या होत्त्या. त्या दोन प्रस्तावनांमध्ये तीस लोकांच्या कमिटीने जी ९ मुदयांची



प्रस्तावना तयार केली होती. ते ९ मुददे या ठरावामध्ये पुर्णच्यापुर्ण आलेले नाहीत. जसे की, त्या प्रस्तावनेत ७ नंबरचा जो मुददा होता की, प्रारूप विकास आराखडयामध्ये जी आरक्षित भुखंडे दाखविण्यात आली आहेत त्यापैकी ज्या भुखंडावर इमारती अगर वस्ती आहे ते भुखंड वगळुन रिकाम्या जागेवर आरक्षणे ठेवण्यात यावीत. हे कुठेही परिशिष्टामध्ये आलेले नाही. त्यावेळी सचिवांनी सांगितले होते की, ३० सदस्यांच्या समितीने नऊ मुदयाची जी प्रस्तावना दिली आहे. ती परिशिष्ट म्हणुन संबोधण्यांत येईल. व ती ठरावाचा एक भाग मानला जाईल. परंतु हे जे अ,ब,क,ड, परिशिष्ट आहे

त्यातील ड परिशिष्टात त्यात नविन प्रारूप विकास आराखडयामध्ये २४० भुखंड आरक्षित दाखविले आहेत. परंतु या ड परिशिष्टामध्ये २० मुदयांच्या माध्यामातुन फक्त ४५ आरक्षित भुखंडावर या महासभेने हरकत घेतली आहे. व ते दुर्भाग्याने एम.एम.आर.डी. ऐ कडे पाठविले गेले आहे. आम्ही असा विचार केला होता की, ज्या आरक्षित भुखंडावर वस्ती आहे किंवा इमारत आहे ते आरक्षण रदद केले जावे असे ठरावामध्ये कुठेच आलेले नाही. कारण की परिशिष्ट ड मध्ये फक्त ४५ भुखंड आहेत त्याच बरोबर जो परिशिष्ट क आहे त्यातील अनु.क्र. ६ वर जो मुददा आहे. त्यात असे लिहिले आहे की, मंजुर विकास आराखडयामधील बरीचशी आरक्षणे वगळण्यांत आलेली आहेत. हे परिशिष्ट क आहे त्यामध्ये लिहिले आहे की, प्रारूप विकास योजनेमधील असलेली कमतरता जी कमतरता आहे त्यामध्ये आम्ही ही कमतरता दाखविली आहे. ती या मंजुर विकास आराखडयामध्ये जे आरक्षण वगळण्यांत आलेली आहेत ती आम्हाला मंजुर नाही. असे आम्ही लिहिले आहे. आपल्या अध्यक्षतेखाली जी समिती गठीत केली होती तीची जी सभा झाली होती त्यामध्ये श्री.बी.बी. मोरे होते. मी होतो श्री. आढाव होते. त्यावेळी या मुदयावर हरकत घेतली होती की, नविन विकास आराखडयामध्ये जी आरक्षणे वगळण्यांत आलेली आहेत त्याबाबत आमची काही एक हरकत नाही परंतु आम्ही ठराव पाठविला आहे त्याची परिशिष्ट क मध्ये अनु क्र. ६ वर आम्ही असे लिहिले आहे की, मंजुर विकास आराखडयामधील बरीच आरक्षणे वगळण्यांत आलेली आहेत. ती प्रारूप विकास योजनेमधील बरीच नियोजने करण्यांत आलेली आहेत. याचा अर्थ असा होतो की, जी आरक्षणे आम्ही वगळली आहेत त्यावर आमची हरकत आहे. परंतु प्रत्यक्षात आमची तशी हरकत नव्हती. परिशिष्ट ड मध्ये फक्त ४५ भुखंडाचा समावेश आल्याने, जसे की, आमच्या श्रीमती बगाडे मॅडम आहेत त्यांच्या समतानगर येथील आरक्षण क्र. १७५ आहे. ते या परिशिष्ट ड मध्ये कुठेही आलेले नाही. श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील भरत नगर हे आहे. त्याचा आरक्षण क्र. १७२ आहे ते आरक्षण हटविले जावे अशी येथे कुठेच नोंद आलेली नाही. हे जर पुर्ण आले असते. आम्ही जो बंच दिला होता. ते ऐवढे पुर्ण दिले होते. फक्त ४५ वस्त्यांचे आरक्षण हटविले आहे. बाकीचे जसेच्या तसे ठेवले आहे. ते कुठेच आलेले नाही. व त्यासाठी.........

मा.महापौरः-श्री. महाडिकजी, मी समजतो की, आपल्या सर्वदलीय समीतीमध्ये जे निर्णय झालेले आहेत ते सर्व यामध्ये यावयास पाहिजे होते. जर काही सुटले असतील. तर आज नगररचना विभागाचा कुणी जबाबदार अधिकारी येथे उपस्थित नाही. हवे तर हे इतिवृत्त आज कायम न करता पुढच्या सभेपर्यंत आपण प्रलंबित ठेऊ शकतो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौरजी, दुर्भाग्याची गोष्ट हीच आहे की, आता हरकत घेऊन काहीच फायदयाचे नाही. कारण की, ९ तारखेची जी मुदत होती ती निघुन गेली आहे. व जो ठराव तयार केला होता. त्यामध्ये सर्व पक्षाचे एक एक नगरसेवकाचे नाव सुचक व अनुमोदकामध्ये घेतले जाईल असे त्यावेळी ठरले होते. जर असेच चार-पाच सुचक अनुमोदक असते



तर कुणाच्या तरी हे निर्दशनास आले असते. परंतु त्या ठरावात फक्त दोनच लोकांची सुचक अनुमोदक म्हणुन सभागृहनेता व विरोधी पक्षनेता या दोघांच्याच स्वाक्ष-या आहेत. दुर्भाग्याने ९ तारीख शेवटची तारीख होती. व ७ तारखेला शनिवार होता. ८ तारखेला रविवार होता. व ९ तारखेला हरकत घेण्याची शेवटची तारीख होती. व ठराव पाठवायचा होता. आपण तो ठराव पाठविला आहे. आता त्यानंतर जर आरक्षण ठेवले नाही तर या पुर्ण महासभेचा जो ठराव आहे. तो जबाबदार ठरू शकतो. येथे सोबत जोडलेल्या परिशिष्टातील असे जे शब्द लिहिले आहेत त्याऐवजी प्रस्ताव असे लिहीले असते तर योग्य झाले असते. परंतु परिशिष्ट असे लिहिले गेले आम्ही जे सांगितले होते त्यास परिशिष्टाचा दर्जा दिला गेला नाही. त्यामुळे हे सर्व झाले

आहे. जसे की प्रस्तावनेमध्ये आम्ही हे लिहिले आहे. की उल्हासनगर मध्ये जी हरकती घेण्याबाबत समिती तयार केली जाईल. त्यामध्ये आपण (महापौर)व सोनेसर यांना घेतले जाईल. व ठरावामध्ये येथे आम्ही उपमहापौरांना सुध्दा घेतले जाईल असे लिहिले आहे. आम्ही जे नऊ मुददे दिले होते ते ठरावामध्ये यावयास हवे होते. त्यापैकी ५वा मुददा हा महत्त्वाचा होता. ९ वा मुददा विकास आराखडयामधील जे प्लान मंजुर केले त्याबाबत होता. विषयाशी संबंधित नव्हता. तरीही ५व्या क्रमांकाचा जो अतिशय महत्त्वाचा मुददा होता तोच राहुन गेला आहे. तो या ठरावामध्ये कुठेच आलेला नाही. ज्या आरक्षित भुखंडावर झोपडपटटी आहे, इमारत आहे. ते आरक्षण हटविले जावे. असे या ठरावामध्ये कुठेच आलेले नाही.

मा.महापौरः-हा तर आमचा मुख्य मुददा होता.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-या ठरावामध्ये तो मुददा आलाच नाही. आपण ठराव पहा ठरावात हा मुददा कुठेच आला नाही. सचिव साहेब आपण सांगा.

मा.सचिव :-आपल्या समोर जे इतिवृत आहे त्याचे पृष्ट क्र. २४ पहा. तेथे आपण जो ५ व्या क्रमांकाचा मुददा म्हणता तो तिथे आहे. प्रस्तावना ठरावाशी वेगळी नाही. आपण जर ठराव वाचलात तर ही महासभा वरील प्रस्तावने व कारणा अनुसार असे लिहिलेले आहे. हा ठरावाचा एक भाग आहे. प्रस्तावना ही ठरावाचा एक भाग आहे. दुसरी गोष्ट अशी की, त्यासोबत जे परिशिष्ट जोडले आहेत. ते परिशिष्ट नगररचना विभागाकडुन जसे आले तसेच आम्ही जोडले आहेत. त्यांनी प्रथम इंग्रजीत परिशिष्ट पाठविले होते. प्रत्त्येक परिशिष्टाच्या मागे इंग्रजित सुध्दा लिहिलेले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आपले हे म्हणणे बिल्कुल बरोबर आहे. पृष्ट क्र.२१ बाबत जे आपण बोलत आहात की, परिशिष्ट अ,ब,क,ड जोडले जातील. जे नगररचनाकार आम्हाला देतील ते जोडुन हा ठराव पुर्ण केला जाईल. नगररचनाकाराने जे परिशिष्ट दिले ते आपण जोडले आहेत. परंतु नगररचनाकारांनी फक्त ४५भुखंडाचेच दिलेले आहे.

मा.सचिवः-जे त्या लोकांनी दिले ते आम्ही सोबत दिले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-ते तर आपले मानावेच लागेल कारण की, २४० आरक्षित भुखंड आहेत....

मा.सचिव :-जेव्हा महासभेत आम्ही ठराव ठरविला होता तेव्हा नगररचनाकार आम्हास जे परिशिष्ट देतील त्यास या ठरावाचा भाग मानला जाईल. असे मी स्पष्ट केले होते.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-दुर्भाग्याने नगररचनाकारांनी आपणांस फक्त ४५ भुखंडाचेच दिलेले आहे. १९५ जे आरक्षित भुखंड आहेत. जेथे वस्ती आहेत ते भुखंड राहिले आहेत. त्यासाठी नगररचनाकारांना दोषी मानले जाईल. परंतु त्याचा सुध्दा फायदा नाही ना? कारण की ९ तारीख हरकती घेण्याची शेवटची तारीख होती. ती निघुन गेली ना.

मा.सचिव :-हे तर परिशिष्ट आहे ना? आपण ठरावामध्ये थोडा बदल करत आहोत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-नाही. आपण प्रस्तावना आणि हे जे म्हणतात ते चुकीचे म्हणत आहात. ठराव काय आहे ? ही महासभा वरील प्रस्तावने व कारणा अनुसार नियोजन व विकास समिती.... , आता वरील प्रस्तावना

म्हंटली तर प्रस्तावनेमध्ये फक्त हेच आहे की, मा.महापौर व विशेषतज्ञ श्री. सोनेसर या दोघांना या समितीमध्ये घेतले जाईल. प्रस्तावनेमध्ये हे आहे. ठरावाच्या वरती विषयामध्ये जे आहे. महासभा ठराव क्र. ८ मध्ये वरील दोन लाईन हया आहेत की, समितीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे महापौर व विशेषतज्ञ श्री. बुलचंद सोनेसर यांचा समावेश करण्याकरिता शासनाकडे विचारार्थ व मंजुरीसाठी विनंती करणेस प्रस्तावित. हे प्रस्तावने मध्ये प्रस्तावित आहे. प्रस्तावना व ठरावामध्ये खुपच अंतर आहे. प्रस्तावनेवर चर्चा केल्यानंतर ठराव तयार केला आहे. त्या ठरावात उपमहापौरांना हि घेण्याचे आम्ही घोषित केले आहे. जो ठराव तयार केला आहे त्या ठरावामध्ये असे म्हंटले आहे की, समितीमध्ये सभासद म्हणुन नेमणेस, महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेतर्फे मा.महापौर व मा. उपमहापौर व विशेषतज्ञ श्री. बुलचंद सोनेसर यांना हरकती व सुचना करण्याच्या समितीमध्ये सभासद म्हणुन नेमणेस व महापालिकेच्या सुचना व हरकती विचारात घेतल्या शिवाय सदरच्या विकास नियमावली व योजनेत मंजुरी देण्यात येऊ नये. अशी शासनास विंनती करण्यांत येत आहे. प्रस्तावनेमध्ये आम्ही दोन नावे दिली होती ठरावामध्ये तीन नावे दिली आहेत. त्यांनतर असे सांगितले गेले आहे की, इथेच चुक झालेली आहे,सोबत जोडलेल्या परिशिष्टातील हरकती व सुचना या ठरावाचा भाग मानला जाईल. आता परिशिष्ट म्हंटले तर अ,ब,क,ड हे चार परिशिष्ट आहेत. बरोबर आहे? त्यांनाच ठरावाचा भाग मानला जाईल. प्रस्तावनेचे लिहिले नाही. येथे स्पष्ट लिहिले आहे. सोबत जोडलेल्या परिशिष्टातील हरकती व सुचना या ठरावाचा भाग मानला जाईल. आणि वरील निर्णय अंतर्भुत असलेला ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता कायम करण्यांत येईल. आता जे परिशिष्ट अ,ब,क,ड आहेत त्यामध्ये पाचव्या क्र. मुदयाचा कुठेच उल्लेख आलेला नाही. त्यामुळे फक्त ४५ भुखंडावरील आरक्षण हटविण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. या महासभेच्या निर्णयानुसार १९५ भुखंडावरील आरक्षणाबाबतचा आम्ही काही विचार केलेला नाही. त्याच बरोबर क परिशिष्टात जे बोलले गेले आहे की, ज्या आरक्षित भुखंडावरील आरक्षण हटविले आहे. त्याबाबत आमची काहीही हरकत नव्हती.आम्ही महासभेच्या ठरावाच्या माध्यामातुन त्यांना असे लिहुन पाठविले आहे की,क परिशिष्टामध्ये असे लिहिले आहे की, आरक्षित भुखंड जे हटविले आहेत ते चुकीचे आहे. त्याचबरोबर आपण जी यादी दिली आहे. त्यात रस्त्यांचे इंग्रजि व मराठीमध्ये माहिती दिली आहे. इंग्रजीत जे दिले आहे त्यात ६४ रोड आहेत. व मराठीत जे दिले आहेत त्यात ६१ रोड आहेत. तर कोणते बरोबर समजायचे. जे रोड इंग्रजीत आले आहेत ते सर्व रोड मराठीत आले नाहीत. जे रोड इंग्रजित आले आहेत तर मराठीत आले नाहीत. तर तेथे कोणते रोड घेतले जातील. इंग्रजी यादीतील की मराठी यादीतील?



<u>मा.सचिवः-</u>इंग्रजीतील यादी आपण मान्य करता ना?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u>नाही. कारण कारभार मराठीत चालणार आहे.

<u>मा.सचिव :-</u>नाही. कृपया ऐकुन घ्या. आपण सर्वांनी मिळुन जी यादी तयार केली होती. पहिले पहिले ती इंग्रजीत तयार केली होती.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u>होय.

<u>मा.सचिवः-</u>आपणांस माहित असेलच?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-</u>होय.

<u>मा.सचिवः-</u>जेव्हा ७ तारखेला ठराव पारीत केला त्यावेळेला इंग्रजीचे भाषांतर केलेले नव्हते. दुस-या दिवशी रविवार होता. व ९ तारखेला कोणत्त्याही

परिस्थितीमध्ये हि यादी दयायची होती. जेव्हा आम्ही हरकती सादर केल्या. त्याबरोबर आम्ही इंग्रजीतील यादी सादर केली आहे. नंतर त्याचे भाषांतर करून आम्ही ही यादी इतिवृतांतासाठी तयार केली आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-ठिक आहे. तर तेथे........

मा.सचिव:-कृपया ऐकुन घ्या. मला हे पण माहित आहे की, आम्ही जे पत्र बी. एम.आर.डी.एला पाठविले आहे. ते सुध्दा आपण पाहिले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महडिक:-मी तेच जाणुन घेऊ इच्छितो, आपण तो ठराव पाठविला आहे की, प्रस्तावना पाठविली आहे. कृपया माझे ऐकुन घ्या. आपली जी शंका आहे तीच मी दुर करू इच्छित आहे ना.

मा.सचिव:-आम्ही जे पत्र बी.एम.आर.डी.ऐ ला पाठविले आहे ते आपण चांगल्या प्रकारे वाचले आहे. ते पत्र वाचताना मी आपणास पाहिले आहे. त्यामध्ये लिहिले होते. प्रस्तावना, ठराव व परिशिष्ट हे सर्व ठरावाचा भाग आहेत. त्यास सुचना व हरकती मानल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-पृष्ट क्र.२१ वर स्पष्ट लिहिले आहे की, जो ठराव तयार होईल तो आम्ही एम.एम.आर.डी. ए. कडे पाठवु.

मा.सचिव:-प्रस्तावना व ठराव पुर्णच्या पुर्ण तिकडे पाठविले आहे. तसेच इंग्रजीत त्यावेळेला जे परिशिष्ट तयार केले होते ते सुध्दा पाठविले आहेत. तर कोणतेही पान आम्ही सोडले नाही की, जे आपण दिले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-हे पहा जर आपण असे म्हणत आहात की, पुर्ण २४० भुखंडाचे दिले आहे तर येथे फक्त ४५ भुखंडाचाच उल्लेख करणे उचित नाही.

मा.सचिव:-जे इंग्रजीत होते ते आम्ही पाठविले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-हा जो परिशिष्ट ड आहे. तो इंग्रजीत पण आहे व मराठीत पण आहे. ड मध्ये पहा कुणा कुणाच्या हरकती आल्या



आहेत. उपमहापौरांच्या आल्या आहेत. त्यानंतर श्री. खेमाणी यांच्या आहेत. श्री. नारायण पंजाबी, बच्चो रूपचंदानी, रामभाऊ आढाव, पंचशिला पवार, रमेश चव्हाण, राजेंद्र चौधरी , भगवान भांडे, पांडुरंग लांडे, व आपले सुध्दा आहे.

मा.सचिव :-इंग्रजीत वीस आहेत. मराठीत सुध्दा वीस आहेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-होय. होय. त्यानंतर सुध्दा ब-याचशा लोकांच्या, जसे की, श्रीमती. बगाडे मॅडम यांच्या प्रभागातील आरक्षण १७५ क्र. काचा भुखंड तो यामध्ये नाही.

मा.सचिव :-याची मला माहिती नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-तसेच श्री. प्रमोद टाले यांच्या भरत नगरमधील भुखंडाचा येथे समावेश नाही. समता नगरयेथे श्रीमती. बगाडे या स्वत: राहतात.

मा.महापौरः-महाडिकजी, या परिशिष्टामध्ये जे वीस मुददे आले आहेत. सर्व दलीय समितीमध्ये जी चर्चा केली होती. ज्याची श्री. सोनावणे यांनी नोंद घेतली होती.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-नाही. ना. महापौरजी, तसे झाले नाही. दुर्भाग्याने हेच झाले आहे की, २४० भुखंडामधुन फक्त ४५ भुखंडाबाबतच आम्ही हरकती घेतल्या आहेत. या ठरावाच्या माध्यमातुन, कारण की, आम्ही लेखी दिले आहे. जसे की, पहिला उपमहापौरांचा आहे. आरक्षण क्र. १५१, १५२ ,१५३ ,१५४ ,१५५ ही आरक्षणे प्रारूप विकास आराखडयातुन वगळुन या आरक्षणावर रहिवासी विभाग करणे असे सर्वांचे होते. श्री. खेमाणी यांचे होते. ज्योती भाभी यांचे आले आहे. तसे श्री. नारायण पंजाबी यांचे सुध्दा आले आहे. आरक्षण क्र. ५० हे आरक्षण प्रारूप विकास योजनेतुन वगळुन रहिवासी करण्यांत यावे. आपले आहे. श्री. आढाव यांचे आहे. १६९, १७० ही आरक्षणे वगळावीत. श्री. राजेंद चौधरी, चव्हाण यांचे आहे. परंतु इतर लोकांचे आलेले नाही. हे फक्त ४५ आहेत. बाकी लोकांच्या आम्ही ज्या निश्चित केल्या होत्त्या. त्या सर्वांच्या हरकती यावयास हव्या होत्त्या.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः-मा.महापौरजी, प्रारूप विकास योजनेतुन वगळण्याच्या आरक्षणामध्ये सीट क्र. २२, प्लाट क्र. १७५ ,१७६ हा कुठेच दिसत नाही. प्रकाश महाडिक जे बोलतात ते अगदी खरोखरच आहे. त्यांचा या ठिकाणी कुठेच उल्लेख केलेला नाही. ज्याठिकाणी मी राहते ते समता नगर क्र. २ हे ग्रीन झोनमध्ये होते. त्याचा सुध्दा येथे उल्लेख केलेला नाही.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-महापौरजी, आता आपण म्हणालात ना की, आपले जे नगररचनाकार श्री. सोनावणे होते. ते नोंद घेत होते. जी जी आमची चर्चा होत होती. त्यामध्ये मी सुध्दा एका गोष्टीची आपणांस आठवण देते. सिरू चौक ते लालचंद फुलवाला हा जो रोड आहे. तो कामगार हॉस्पीटलकडे जातो तो रस्ता तीस फुट रूंदीचा सुचविला होता. आता आपण पाहिले तर तो ४० फुट रूंदीचाच आहे.

मा.महापौरः-तीस फुट आहे. मी सोनावणे यांच्याशी नंतर खात्री करून घेतली आहे. सोनावणेंनी सांगितले होते की, मी एक-एक मुददा नोंदवुन घेतला आहे.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आयुक्त साहेब, आपण म्हंटल्याचे पृष्ट क्र. १६ वर नोंद आली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-महापौरजी, शहाड स्टेशन पासुन शिवाजी रोड असे मी म्हंटले होते. शिवाजी चौक अशी येथे नोंद आली आहे अनु. क्र. ५४ वर.

मा.सचिवः-ती दुरूस्ती करून घेऊ.

मा.महापौरः-महाडिकजी, इतिवृताताचे काय करायचे? ते पारीत करत आहात की,....

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-काही फरक पडणार नाही. कारण की, हरकत घेण्याची शेवटची तारीख ९ तारीख होती. आता हरकती गेल्या आहेत. जी काही चुक झाली आहे. अशा प्रकारची चुक पुढे होता कामा नये. कारण की हे शहराच्या हिताचे नाही.

मा.महापौरः-इतिवृत्त कायम.

मा.सचिवः-एकमताने.

मा.महापौरः-मागील दि. ७. ७. २००१ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र सिंग भुल्लर यांनी सुचविलेल्या दुरूस्तीसह दि. ७.७.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिवः-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विकास योजना अंतर्गत संबंधित आरक्षित भुखंडावर रूग्णालय व महाविद्यालय बांधणेकामी नियोजन व विकास समितीचा ठराव क्र. २ दिनांक ५. ७. २००१ कायम करणे बाबत.

मा.महापौरः-यामध्ये माझी एक सुचना आहे. सभागृहासमोर मी एक सुचना ठेऊ इच्छितो. हा जो एक प्रस्ताव आला आहे. रूग्णालय व महाविद्यालयासाठी. शहराच्या या दोन महत्त्वाच्या आणि मोठ्या गरजा आहेत. व ज्यांवर बराचसा खर्च येणार आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता माझी एक सुचना आहे की, जोपर्यंत महानगरपालिकेचे अधिकारीगण या प्रकल्पासाठी सुयोग्य असा भुखंड पहातील तोपर्यंत आपण एक असा प्रस्ताव पारीत करू या की, महापालिकेचे जेवढे काही सन्माननिय सदस्य आहेत ते आपल्या नगरसेवक निधीतुन प्रत्येक वर्षी एक-एक लाख रू. दोन्ही प्रकल्पासाठी खर्च करतील. पाच वर्षासाठी पाच-पाच लाख जर दोन्ही प्रकल्पासाठी देतील तर हे दोन्ही प्रकल्प तयार होतील.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-निवडणुकीनंतर येणा-या सदस्यांकडुन......

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत असल्यामुळे त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-दोन-दोन लाखाचा निधी प्रत्येक नगरसेवकाचा कपात करा सर्वात प्रथम माझा करा.

--६७--

मा.महापौरः-येणा-या अर्थसंकल्पातुन.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौरजी जर पुढच्या वर्षापासुन करत आहात तर पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात यासाठी तरतुद करा ना.

मा.महापौरः-असा ठराव पारीत करू या की, येणारा जो अर्थसंकल्प आहे. त्यामध्ये यासाठी तरतुद केली जावी की, प्रत्येक नगरसेवक.....

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मला असे वाटते की, हा जो प्रकल्प आहे तो देखाव्यासाठी आपण जास्त करत आहात. प्रत्यक्षात नाही. पुढल्या वर्षीसाठी करायचे असेल तर आपण त्यासाठी त्यावेळी तरतुद करू शकतो. आपण हे फक्त देखाव्यासाठी करत आहात. काम करण्यासाठी नाही.

मा.महापौरः- आपणांस वाटत नाही का की, तयार व्हावेत म्हणुन?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-पुढच्या वर्षापासुन नगरसेवक निधी १५ लाख करा. व पाच लाख या कामी ठेवा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- या वर्षापासूनच करा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- मा. महापौरजी, माझी एक सूचना आहे, जर यावर्षापासूनच रुग्णालय व महाविदयालय चालू होत असेल तर त्यासाठी नगरसेवकांची एक-एक लाखाची निधि कपात केली जावी. जर पुढच्यावर्षीपासून काम चालू होत असेल तर त्यावेळी जे नगरसेवक निवडून येतील ते आपल्या नगरसेवक निधीतून निधी देतील. किवा जसे श्री. लाल पंजाबी साहेबांनी सांगितले, की, पुढच्या वर्षापर्यंत जर काम चालू होत नसेल तर पूढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात या कामी तरतूद केली जावी. असा प्रस्ताव पारित केला जावा. परंतू याचा गैरफायदा प्रशासन किंवा अधिकारी यांनी घेऊ नये. कि आपण याकामी दोन-दोन लाखाचा निधी दिलेला आहे. म्हणून , आपला दोन-दोन लाखाचा निधी कपात करीत आहोत. हा निधी तोपर्यंत आम्ही कपात करु देणार नाही, जोपर्यंत काम चालू होत नाही तोपर्यंत....

मा.महापौर:-ठिक आहे, जसे आहे तसे पास करतो.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- मा. महापौर साहेब, या दोन तीन महिन्यामध्ये काही होणार नाही, पुढच्या बॉडीमध्ये ठेऊन बजेटमध्ये तरतुद करा ना त्यासाठी.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-यावर्षापासुन आपण का नाही चालु करत? पुढल्या वर्षापासुन का? पुढल्यावर्षी तर बजेट येईल ना?

मा.महापौर:-पंजाबी साहेब, यासाठी भुखंड पाहिजे. महापालिका भुखंड पाही पर्यंत नियोजन केले जावे. यासाठी वेळ लागेल आज ठराव पास केला आणि उदया होईल. हे काही शक्य नाही.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मा.महापौरजी, माझ्या प्रभागात एक भुखंड रिकामा आहे ना?



मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-त्या बरोबर बोलत आहेत. व तो भुखंड सुध्दा महापालिकेचाच आहे.

मा.महापौर:-महाविद्यालय आणि रूग्णालय तयार करण्याचा प्रस्ताव आपण पारीत करत आहात?
मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-यावर्षासाठी करा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-रूग्णालय व महाविद्यालयाचे काम यावर्षापासुन सुरू करत असतील तर दोन-दोन लाखाचा निधी देण्यास आम्ही तयार आहोत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-यावर्षा पासुन करा. भुखंड सुध्दा आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मुंबई सारखी रूग्णालय उल्हासनगर महापालिका तयार करत असेल तर त्यासाठी आम्ही दोन-दोन लाखाचा निधी देण्यास तयार आहोत.

मा.महापौर:-ठिक आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-परंतु कॉलेजसाठी आरक्षित असलेला भुखंड माझ्या प्रभागात मोकळा आहे ना? तो पारीत करा ना?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-७०५ क्र.काचा प्लाट खाली पडलेला आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-भुखंडाचे रजानी यांच्यावर सोपवु या.

मा.सदस्य श्री. नरेंद्र रजानी:-परंतु.... प्रस्ताव काय पारित करत आहात? त्याच्याशी असे विषय जोडले गेले आहेत. आमच्याकडे क्रिडा संकुल पडुन आहे. त्याची देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी आमच्याकडे निधी नाही. टाऊन हॉल आमच्याकडे आहे तो आम्ही लिजवर बियर बार वगैरेसाठी देत आहोत. त्यासाठी आमच्याकडे निधी नाही. तर निधीची व्यवस्था यावर्षी कशी करत आहात? कोणत्त्या प्लॉटवर करत आहात? याची सविस्तर माहिती आम्हाला दया.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-कोणत्त्या भुखंडावर करत आहात?
मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-प्रस्ताव काय पारीत करत आहात तो आम्हाला वाचुन दाखविला जावा. त्याची आम्हाला माहिती झाली पाहिजे.
मा.महापौर:-हा प्रस्ताव आम्ही पारीत करत आहोत की, महापालिका आपले एक रूग्णालय व महाविद्यालय तयार करीत आहे. त्या प्रस्तावाच्या आपण विरूध्द आहात का?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-आम्ही तर म्हणतो की, आता तयार करा.

मा.महापौर:-कोणता भुखंड आहे. त्यासाठी काय तरतुद आहे हे आयुक्त पाहतील.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, जो प्रस्ताव येथे आला आहे तो असा आहे. की विकास योजने अंर्तगत संबंधित आरक्षित भुखंडावर



रूग्णालय व महाविद्यालय बांधणे कामी नियोजन व विकास समितीचा ठराव क्र. २ दि.५.७.२००१ कायम करणे बाबत. हा ठराव काय आहे?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-कोणता ठराव आहे? भुखंड कुठे आहे? आमच्या निधीपेक्षा महापौरांचा निधी खुपच जास्त आहे. जो जास्तीचा निधी आहे तो रूग्णालय व महाविद्यालयासाठी दिला जावा. भुखंड कोणता आहे?

मा.सचिव:-कृपया लक्ष दया. नियोजन व विकास समितीचा जो ठराव आहे तो सर्वांना सादर केला आहे. त्याव्यतिरिक्त मी आपणांस सुचना देऊ इच्छितो की, नियोजन व विकास समितीचा जो ठराव आहे तो फक्त यासाठी आहे की, आम्हाला तयारी करायची आहे, रूग्णालय व महाविद्यालय शहरामध्ये बांधण्यासाठी. व या ठरावात कुठेही भुखंड निश्चित केलेला नाही. आवश्यक आरक्षित भुखंडावर केले जाईल. कारण की, त्याचे कारण हे आहे जो मागील विकास आराखडा आहे. त्यांनतर आता प्रारूप विकास आराखडा आहे. त्यामध्ये कोणत्त्या भुखंडाची निवड होईल ते अदयाप निश्चित झालेले नाही. व या ठरावामध्ये हे सुध्दा लिहिले आहे की, खाजगी संस्थेसहित याकामी परवानगी दिली जाईल. जर आपण आता पासुन तयारी केली तर प्रोजेक्ट रिपोर्ट व इतर काही सुचना व माहिती जमिनीची व्यवस्था व कोणत्त्या आरक्षणामध्ये निश्चित करायचे याची तयारी केली जाईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, जसे आम्ही प्रारूप विकास आराखडयाबाबत हरकती पाठविल्या आहेत. त्यामध्ये २० क्रमांकाचा जो मुददा आहे त्यामध्ये आम्ही स्पष्ट लिहिले आहे. महासभा ठरावाच्या माध्यमातुन

मागणी केली आहे. आरक्षण क्र ४४ ,४५ ,४६ या आरक्षणांवर रूग्णालय ठेवण्यांत यावी. व माझ्यामते नियोजन समितीचा पण असाच ठराव आहे. आरक्षण क्र. ४४ ,४५ ,४६ हे आरक्षित भुखंड रूग्णालयासाठी ठेवले जावेत असे आम्ही महासभेमार्फत एम.एम.आर.डी. अे. कडे मागणी केली आहे. माझ्यामते नियोजन व विकास समितीचा ठराव सुध्दा अशाच प्रकारचा असेल.

मा.सदस्य श्री. जमनु पुरस्वानीः-जर आरक्षण ठेवले असेल तर तेथेच तयार करू ना? यामध्ये कोणत्त्या भुखंडाचा उल्लेख थोडाच केला आहे.

मा.सचिवः-आपण असे निश्चित केले आहे की, रूग्णालया साठी अमुक-अमुक येथे आरक्षण असले पाहिजे. हे अदयाप फक्त प्रारूप आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-४४ ,४५ ,४६ भुखंडाबाबत काय लिहिले आहे.

मा.सचिव :-मान्य आहे. आपण बरोबर बोलत आहात ना? त्यासाठीच ते आरक्षित आहेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-तेथे रूग्णालयासाठी आरक्षण ठेवा असा आमचा महासभेचा ठराव तेथे गेला आहे. याचा अर्थ आम्हाला तेथेच महापालिकेतर्फे रूग्णालय बांधायचे आहे.

मा.सचिव :-ठरावामध्ये कुठेही असे लिहिले नाही की, आरक्षणामध्ये बदल केला जावा.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आम्ही ज्या हरकती पाठविल्या आहेत त्यामध्ये असे लिहिले आहे की, आरक्षण क्र. ४४ ,४५ ,४६ , वरील आरक्षण रद्द करून ते भुखंड रूग्णालयासाठी आरक्षित केले जावेत. अशा प्रकारचा महासभेचा ठराव तिकडे पाठविला आहे. व येथे आता असा ठराव आला आहे की, रूग्णालयासाठी आम्हाला जागा शोधायची आहे.

मा.सदस्या श्रीमती. बेबी वसिटा, श्री. रामरख्यानी मोहनदास हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा.सचिवः-असे कुठे लिहिले आहे. आपण वाचा ना. कृपया वाचा ना. आपल्यासाठी मी वाचुन दाखवितो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-नियोजन व विकास समितीचा ठराव आपण जरा वाचुन दाखवा.

मा.सचिवः-तोच, मी आपल्यासाठी वाचून दाखवित आहे. त्यामध्ये असे लिहिले आहे की, ही नियोजन व विकास समिती उपरोक्त प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहराच्या विकास योजने अंतर्गत रूग्णालय व महाविद्यालयासाठी आवश्यक क्षेत्रात आरक्षित भुखंडावरील जमिन संपादन, सुधारणा, योजना, नियोजन व पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या तरतुदी अन्वये महानगरपालिकेने स्वतःचे खर्चाने, इतर संस्था व्दारे वा अन्य प्रकारे रूग्णालय व महाविद्यालय बांधणे कामी महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे. हे तर स्पष्ट आहे. जेथे यासाठी भुखंड आरक्षित असेल तेथेच तयार केला जाईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-४४ ,४५ ,४६ हे आरक्षण कुठे कुठे आहेत ते तर सांगा?

मा.सचिवः-आम्ही कुठेही असे म्हंटले नाही की, आरक्षणात बदल करत आहोत म्हणुन?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-४४ ,४५ ,४६ , हे आरक्षण कुठे आहेत ते आम्हाला माहित झाले पाहिजे की नाही?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-अहो, दोन्ही मुददे एकत्रीत करू नका. सचिव साहेबांनी आता आपणांस स्पष्टपणे सांगितले आहे. त्यांनी काय सांगण्याचा प्रयत्न केला ते आपण समजत नाहीत? आम्ही ज्या सुचना केल्या आहेत त्यामध्ये भुखंड क्र. ४४ ,४५ ,४६ वर रूग्णालय तयार केले पाहिजे. परंतु नियोजन समितीने जो ठराव तयार केला आहे त्यामध्ये कोणताही आरक्षण लिहिलेले नाही. परंतु आम्ही तयारी करत आहोत. व एम.एम.आर.डी.ओ कडे आमची जी सुचना आहे ती स्पष्ट तर होऊ दया ना. ती क्लीअर झाल्यानंतर ठरवु.

मा.महापौरः-कृपया आपण सभा सुचना वाचा.

सभा सुचनेवरील इंग्रजीतील विषय मा. महापौरांनी यावेळी सभागृहात वाचुन दाखविला. धिस इज इनप्रीन्सिपल यु हॅव डिसायडेड फॉर दी डेव्हलपमेंट ऑफ दी प्रोजेक्ट.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-त्यांच्या या ठरावा बरोबर आम्हाला एक ताजमहाल बांधायचा आहे. लाल किल्ला बांधायचा आहे. कुतुबमिनार बांधायचा आहे. हे जेवढे काही .....

--७१--

मा.महापौरः-श्री.नरेंद्र राजानी आपण हे ऐकुन घ्या. लाल किल्ला व कुतुबमिनार याऐवजी आपण आपले मत सांगा. आपण या ठरावाच्या बाजुने आहात की नाही. आपण टिका करू नका. ताजमहाल बनवायचा आहे,कुतूबमिनार बनवायचा आहे हि काही भाषा नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-कारण की आम्हाला माहित आहे की आपण तयार करणारच नाहीत. आजपर्यंत काय केले पुर्ण शहराला माहित आहे.

मा.महापौरः-आपणांस वाटते की, शहराचा विकास होऊ नये.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आम्हाला वाटते परंतु साचेबंद असा कार्यक्रम समोर आणा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-पास, पास, पास.

मा.महापौरः-आपणांस वाटत असेल की, सत्ताधारी पक्षाला याचे श्रेय जाईल. तर...

यावेळी काही सत्ताधारी व विरोधी पक्षीय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहे हे नेमके कळुन येत नव्हते.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-नाही. नाही. महापौर साहेब, भुखंड कोणते आहेत ते सांगा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-पास. पास.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-हा प्रस्ताव पास होऊ देणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-पास. पास. मतदान घ्या. मतदान घ्या.

मा. महापौरः-मी हा प्रस्ताव मतदानास टाकत आहे. आता चर्चा पुर्ण झाली. जे सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत. त्यांना कृपया आपले हात वर करावेत.

खालील पालिका सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजुने हात वर केले.

१. श्री. हरदास माखिजा.
२. श्रीमती. ज्योती कालानी.
३. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
४. श्री. पमनानी ईश्वर
५. श्री. रोहडा श्यामसुंदर
६. श्री. गुप्ता प्रभुनाथ
७. श्री. वनवारी किशोर
८. श्री. ढेणवाल बनवारी
९. श्रीमती. साधवानी जया
१० श्री. सुभाष मनसुलकर
११. श्री. जमनादास पुरस्वानी
१२. श्री. नारायण पंजाबी
१३. श्री. सुरेश जाधव

--७२--

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-बोलु तर दया. ही काय पध्दत आहे काय? महापौरजी.

मा.महापौरः-जे सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

सदर प्रस्ताव मतदानास टाकला असता विपक्षातील खालील उपस्थित सदस्यांना ना हात वर केले तसेच कुठल्याही प्रकारचा संकेत मतासाठी दर्शविला नाही. आणि नुसते घोषणा करीत होते.

१. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
२. श्रीमती. सोनावणे यमुना
३. श्रीमती. सुरेखा वेलकर
४. श्री. भांडे भगवान
५. श्री. धनंजय बोडारे
६. श्री. चौधरी राजेंद्र
७. श्री. लांडे पांडुरंग
८. श्री. रमेश चव्हाण
९. श्री. प्रकाश माखिजा
१० श्री. राजानी नरेंद्र
११. श्री. लाल पंजाबी

मा.सचिव :- श्री. बी.बी. मोरे साहेब, आपल्या आर.पी.आय पक्षाचे उपस्थित दोन सदस्यांचे मत प्रस्तावाच्या विरोधात आहे की बाजुने?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-माझा व श्रीमती. सुनिता बगाडे यांचा या प्रस्तावास विरोध आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-कृपया राष्ट्रगीत.

मा.महापौरः-प्रस्ताव बहुमताने पारीत झाल्याचे मी जाहिर करतो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-हे काय महापौर आहेत? बोलु देत नाहीत.

यावेळी काही सत्ताधारी व विरोधी पक्षीय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहे हे नेमके कळुन येत नव्हते.

मा.महापौरः:-कृपया सर्वांनी राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.
मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सचिव साहेब, प्रस्तावाच्या विरोधात किती मते आहेत ती आपण मोजली आहात का? महापौर राष्ट्रगीताचा अपमान करू पहात आहेत काय? प्रस्तावाच्या विरोधातील मते मोजा. दादागिरी चालणार नाही.
मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-शहरामध्ये रूग्णालय व महाविद्यालय व्हावेत असे विरोधी पक्षीय सदस्यांना वाटत नाही.
मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-शहरात महाविद्यालय व रूग्णालय व्हावेत असे या लोकांना वाटत नाही.
मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-भुखंड कुठे आहेत?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-श्रीमती. जया साधवानी यांच्या प्रभागात यासाठी भुखंड उपलब्ध आहे. त्या स्वतः खात्रीने सांगत आहेत. आपण ऐकले नाहीत काय? आपले कान कुठे आहेत?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-भारतमाता की जय.

--७३--

मा.सचिव हे प्रस्तावावर झालेल्या राजकीय पक्षानिशी एकुण मतसंख्या जाहिर करण्यासाठी बेरीज करीत असतानाच...

मा. उपमहापौरांच्या नेतृत्त्वाखाली सर्व विरोधी पक्षीयांनी रात्री ९. १२ वाजता महासभा सभागृहातुन सभात्याग केला.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-जाऊ दया. जाऊ दया.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-राष्ट्रगीत?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-प्रस्ताव पारीत झाला ना?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-ते लोक सभात्याग करून गेले आहेत.

मा.सचिवः-प्रस्तावाच्या बाजुने १३,प्रस्तावाच्या विरोधात श्री. बी.बी.मोरे व श्रीमती. सुनिता बगाडे यांची दोन मते आहेत. भाजपा व शिवसेना पक्षाच्या दहा सदस्यांनी विरोधात......

मा.महापौरः-प्रस्तावाच्या विरोधात कुणीही नाही. ते लोक सभात्याग करून गेले आहेत.

मा.सचिवः-ते गेले आहेत काय? ठिक आहे.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

विषय :-विकास योजना अंतर्गत संबंधित आरक्षित भुखंडावर रूग्णालय व महाविद्यालय बांधणेकामी नियोजन व विकास समितीचा ठराव क्र. २ दि. ५.७.२००१ कायम करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरामध्ये अदयावत व सुसज्ज असे रूग्णालय सद्या उपलब्ध नसल्याने येथील रूग्णांना अद्ययावत वैद्यकिय सोयी/ सुविधांसाठी मुंबई येथील रूग्णालयात धाव घ्यावी लागते. परंतु उल्हासनगर ते मुंबई या दरम्यानच्या दिड दोन तासाच्या प्रवासाच्या कालावधीत काही वेळा काही गंभीर स्वरूपाचा आजार असलेल्या रूग्णाची स्थिती आणखी गंभीर होते व काही वेळा दुदैवी प्रसंगास तोंड दयावे लागते. ही परिस्थिती टाळण्यासाठी उल्हासनगर शहरामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे आधुनिक अद्ययावत सुसज्ज असे रूग्णालय असणे अत्त्यंत आवश्यक आहे.

तसेच उल्हासनगर शहरामध्ये महानगरपालिकेचे एक ही महाविद्यालय सद्या अस्तित्त्वात नसल्याने शहरातील विद्यार्थ्यांना कल्याण-ठाणे-मुंबई या शहरामधील महाविद्यालयात प्रवेश घ्यावे लागतात. तेथे जाण्या येण्याच्या प्रवासामध्येच त्यांचा अधिकाधिक वेळ जात असल्याने त्यांना गैरसोयीचे होते. तर काहीवेळा महाविद्यालयातील प्रवेशाची संख्या मर्यादित स्वरूपात उपलब्ध असल्याने कित्त्येक विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळत नसल्याने त्यांना शिक्षणापासुन वंचीत रहावे लागत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी शहरामध्ये पदवी पर्यंतच्या शिक्षणासाठी एक महाविद्यालय असणे अत्त्यंत जरूरीचे आहे.

--७४--

उल्हासनगर शहराच्या विकास योजनेमध्ये रूग्णालय व महाविद्यालयासाठी आरक्षित केलेल्या भुखंडावर महानगरपालिकेतर्फे रूग्णालय व महाविद्यालय बांधणे कामी आवश्यक जमिन संपादन, सुधारणा, योजना व नियोजन आणि पुढील वर्षात त्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदान उपलब्ध करणेस प्रस्तावित आहे.

<u>नियोजन व विकास समिती ठराव क्र</u>    २    <u>दि ५.७.२००१</u>

सुचकाचे नाव :-श्री. रामभाऊ आढाव.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि नियोजन व विकास समिती उपरोक्त प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहराच्या विकास योजने अंतर्गत रूग्णालय व महाविद्यालयासाठी आवश्यक क्षेत्रात आरक्षित भुखंडावरील जमिन संपादन,सुधारणा, योजना/ नियोजन व पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाचे तरतुदी अन्वये महानगरपालिकेने स्वत:च्या खर्चाने, इतर संस्थांव्दारे किंवा अन्य प्रकारे रूग्णालय व महाविद्यालय बांधणे कामी महासभेच्या मंजुरीस आधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापति / पिठासीन अधिकारी
नियोजन व विकास समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र.</u> ९    <u>दिनांक :-</u> ३०.७.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेप्रमाणे विकास योजना अंतर्गत संबंधित आरक्षित भुखंडावर रूग्णालये व महाविद्यालये बांधणे कामी नियोजन व विकास समितीचा दि. ५.७.२००१ रोजीचा ठराव क्र. २ कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--७५--

मा. सचिवः- कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्री ९. १४ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/८/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/८/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०.८.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
४. श्री. वाघे शामु
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. ज्योती कालानी
२९. श्री. वारिंगे पंढरीनाथ
३०. श्रीमती. टेकचंदानी चंदा
३१. श्री. पारवानी रामचंद्र
३२. श्री. तलरेजा विनोद

७. श्रीमती. वेलकर सुरेखा
८. श्री. यादव नरेश
९. श्री. सोनावणे राजु
१० श्रीमती. दासानी मिनु
११ श्रीमती. पवार पंचशिला
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. आढाव रामभाऊ
१४. श्रीमती. बगाडे सुनिता
१५. श्री. भांडे भगवान
१६. श्री.बनवारी किशोर
१७. श्री. ठाकुर सेवलदास
१८. श्री. तेजी कैलास
१९. श्रीमती.रूपचंदानी भगवंती
२०. श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
२१. श्री.खेमाणी देवेंद्रसिंह
२२. श्री. पमनानी ईश्वर
२३. श्रीमती. वसीटा बेबी.
२४. श्रीमती.राजवानी सुनिता
२५. श्री.चौधरी राजेंद
२६. श्री. लांडे पांडुरंग
२७. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२८. श्री. मोरे भानजी
३३. श्री. रोहडा श्यामसुंदर
३४. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३५. श्री. बहरानी ठाकुरदास
३६. श्री. जाधव सुरेश
३७. श्री. चव्हाण रमेश
३८. श्री. महाडिक प्रकाश
३९. श्रीमती. साधवानी जया
४०. श्रीमती. बनवारी मोना
४१. श्री. राजानी नरेंद
४२. श्रीमती. नाईक यशस्विनी
४३. श्रीमती. राजानी भारती
४४. श्रीमती. कुंदनानी लविना
४५. श्रीमती. भाटिजा इंदिरा
४६. श्री. केणी जयकुमार
४७. श्री. पंजाबी नारायण
४८. श्री. आयलानी कुमार
४९. श्रीमती. पन्ना वारिंगे
५०. श्रीमती.साधवानी आशा
५१. श्री. माखिजा प्रकाश
५२. श्री. रामरख्यानी मोहनदास
५३. श्री. ठाकुर नरेंदकुमार
५४. श्री. पंजाबी लाल

तर

१. श्री. चौधरी गणेश , २. श्रीमती. मोकल सिमा ३. श्री. ढेणवाल बनवारी ४. श्री. उमाप रामदास,५. श्रीमती. मटाई जोनिता, ६. श्री. पुरस्वानी जमनादास, ७. श्री. वाधवा गिरधारी,८. श्रीमती. करोतिया मालती, ९. श्री. भिमसेन मोरे, १० श्री. भाटीया जयप्रकाश ,११ श्रीमती. जेसवानी आशा, १२. श्री. मनसुलकर सुभाष, १३ श्रीमती. वलेचा पदमा, १४. श्रीमती. गजवानी कांता, १५ श्री. अचनानी पम्मीकुमार, १६. श्री. जग्यासी राजु, १७ श्री. बहरानी गोप,



१८. श्री. किशनानी गोदुमल, १९ श्री. सचदेव गिरधारी,२० श्री. केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे.

प्रश्न क्र. ५८० श्री. राजेंद चौधरी यांचा आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u> सभा सुरू होण्यापुवी मी आपणांस एक निवेदन करू इच्छितो की, आपल्या देशाचे गृहराज्य मंत्री लालकृष्ण आडवानी जेव्हा उल्हासनगरमध्ये आले होते. त्यांचे नाव सुध्दा हिटलिस्टवर आहे. त्यांच्या सुरक्षेचा बंदोबस्त उल्हासनगर मध्ये पाहिला तर जेव्हा उल्हासनगरमध्ये प्रवेश केला. तेव्हा प्रवेशाचा जो रोड होता तो इतका खराब होता. जर काही चुकीची घटना घडली असती तर त्यासाठी महानगरपालिका जबाबदार राहिली असती का?

<u>मा.महापौरः-</u>मी सदनाला माहिती देऊ इच्छितो की, भारताचे मा. गृहराज्य मंत्री यांच्या आगमनापुवी मी महानगरपालिकेच्या शहर अभियंता यांना आधीच सांगितले होते की, ते उल्हासनगरमध्ये या तारखेस येणार आहेत. म्हणुन

तुम्ही पोलीसांशी संपर्कात राहुन ते ज्या ज्या मार्गाने येणार आहेत ते रस्ते दुरूस्त केले जावेत. जेणेकरून काही घटना शहरात घडु नये व त्यांची असुविधा होऊ नये. याची माहिती मी आधीच शहर अभियंताना दिली होती आणि मला विश्वास आहे की त्यांनी त्याप्रमाणे तशी काळजी घेतली होती.

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-तुम्ही आदेश दिले आहेत त्याचे पालन त्यांनी केले आहे की नाही ते ही पहा. जिथे पुतळा होता त्याच्या आजुबाजुचा रस्ता आज पण पहाल त्यावेळी पण तीच दुर्दशा होती आज पण तीच आहे. त्यासाठी जबाबदार महापौर आहेत की आयुक्त?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-या विषयावर मी दोन शब्द बोलणे जरूरी समजतो. तुम्ही काही सुचना दिली असेल. पण हे खरे आहे की, आपल्या शहरात मा. गृहराज्य मंत्री श्री. लालकृष्ण आडवानी आले तेव्हा त्यांचा येण्याचा मार्ग सुध्दा पोलिसांना बदलावा लागला. इथपर्यंत की,केंद्राकडुन आलेले त्यांचे इन्फरमेशन सोर्सेस होते त्यांनी सुध्दा असा रिपोर्ट दिला की, त्यांना उल्हासनगरच्या रस्त्यावरून आणु नये कारण उल्हासनगरच्या रस्त्यांची स्थिती ठिक नाही. त्यांच्या महापालिकेची स्थिती ठिक नाही. त्याची क्षमता देखिल नाही की त्यांनी ते रस्ते दुरूस्त करावे. आणि ते करतील असा विश्वास देखिल नाही. म्हणुन त्यांना बाहेरच्या बाहेर अंबरनाथच्या रस्त्यावरून आश्रमापर्यंत आणले. तीन नंबरला आणले तरी देखिल अंबरनाथ वरून आणले. जेव्हा ते परत गेले तेव्हा देखिल त्यांना त्याच रस्त्याने परत नेले. उल्हासनगरच्या रस्त्यावर त्यांचा प्रवास कमी व्हावा याचे प्रमुख कारण हे आहे की, उल्हासनगरचे रस्ते खराब आहेत. ते दुरूस्त करण्यात आपण नाकामयाब झालो हे कबुल करावे लागेल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-महासभा सुरू होण्यापुर्वी, मी सांगू इच्छितो आमचे पत्रकार श्रीचंद आहुजा वारले आणि दुसरे आमचे स्वामी आत्माराम



वसंतशहा दरबार यांच्या पत्नीचे पाकीस्तानमध्ये निधन झाले.सदनास व महापौरांना माझी विनंती आहे की या दोघांना श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मागच्या वेळी श्री. बी.बी.मोरे म्हणाले होते की, श्रीमती. फुलंनदेवी खासदार यांचे निधन झाले आहे. तरी त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी. इतिवृत्तात तसे काही आले नाही. त्यांना श्रध्दांजली वाहिली की माहित नाही. नसेल वाहिली तर त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पित केली जावी.

श्रध्दांजली प्रस्ताव

शोक प्रस्ताव

प्रस्तावना

मिर्जापूर लोकसभा मतदार संघातील समाजवादी पक्षाच्या लोकप्रिय खासदार श्रीमती. फुलनदेवी यांची दिल्लीतील संसद भवनाजवळ काही दिवसापुर्वी निर्घुण हत्या झाली.

दस्यु सुंदरी म्हणुन त्या ओळखल्या जात होत्या. त्यांच्या जीवन चरित्रावर बैंडिट क्वीन हा चित्रपट प्रकाशित झाला होता.

उल्हासनगर शहरातील जेष्ठ पत्रकार जगतवाशी वर्तमानपत्राचे मालक मुद्रक आणि प्रकाशक श्रीचंद आहुजा यांचे दि. ७ ऑगस्ट २००१ रोजी निधन झाले.

तसेच श्रीमती. द्रोपदी आत्मराम जग्यासी यांचे दि. १७ ऑगस्ट २००१ रोजी पाकिस्तानमध्ये निधन झाले. दि. १९ ऑगस्ट २००१ रोजी त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यांत आले.

वरील उल्लेखिलेल्या मृत व्यक्तींच्या कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ९ ब दिनांक:-३१.८.२००१

सुचकाचे नाव :-१)श्री. किशोर वनवारी

२) श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :-१)श्री. राजेंद्र चौधरी

२)श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती. फुलनदेवी, श्री. श्रीचंद आहुजा व श्रीमती. द्रोपदी जग्यासी या व्यक्तींच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

--४--

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकांच्या सहयां-१)

२)

अनुमोदकांच्या सहयां-१)

२)

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-मा.महापौर, आमचे निवेदन आहे की, आताच सांगितले की, रस्त्यांची हालत खुप खराब आहे. मा. गृहमंत्री तर शहराच्या बाहेरील रस्त्यातुन परत निघुन गेले. परंतु आता जो गणपती उत्त्सव येत आहे. त्याआधी रस्ते जर दुरूस्त झाले तर बरे होइल.

मा.महापौर:-याबाबती मा. आयुक्तांनी माहिती दयावी. मा. गृहमंत्री आले होते तेव्हा त्यांनी काय उपाययोजना केल्या रस्त्यांच्या दुरूस्ती बाबत म्हणजे आमच्या सदस्यांना समाधान मिळेल.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, सदनात असा प्रश्न विचारला आहे. भारताचे गृहराज्य मंत्री मा. श्री. लालकृष्ण आडवानी या शहरात आले होते आणि त्याचवेळी ज्या रस्त्यानी ते जाणार होते त्या रस्त्याविषयी काही प्रश्न इथे विचारले आहेत. मी सदनाला सांगु इच्छितो. की आम्ही पोलिसाशी संपर्कात राहिलो. आणि ते ज्या ज्या मार्गाने जाणार आहेत. त्या रस्त्याची दुरूस्ती करण्याचे आदेश आम्ही शहर अभियंता यांना दिले होते. आणि त्याप्रमाणे दुरूस्ती देखिल करण्यात आली. मा. गृहमंत्री यांचा दौरा चांगल्या त-हेने पार पडला आहे. काही अडचण आली नाही. आणि मला असे वाटते की, पोलिसांना काय सांगितले गेले याची आम्हाला काही माहिती नाही. माझ्यामते त्यांचा दौरा खुप चांगल्या त-हेने पार पडला काही अडचण आली नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा.आयुक्त साहेब, रस्त्यांची जी स्थिती होती. राष्ट्रीय वर्तमान पत्रात तीन-चार वर्तमानपत्रात रोडचे फोटो देखिल आले होते. आणि पोलिसांचे यावर वक्तव्य देखिल आहे. खास करून जो पवई चौकातील रस्ता आहे त्याचा फोटो आला होता. आणि खाली लिहिले होते. मी स्वत: तीन वर्तमानपत्रात वाचले आहे की, या रस्त्यांमुळे मा. गृहमंत्री श्री. लालकृष्ण आडवानी यांचा मार्ग बदलण्यांत आला. आपण दिलेल्या सुचना पाळल्या जातात की नाही यावर देखिल आपण लक्ष दिले पाहिजे. तुम्हाला माहित ते शहर अभियंता आपले कितपत मानतात? परंतु वर्तमानपत्रात फोटो देखिल आले होते.एक दिवस आधी देखिल. आणि आता देखिल आपण सदनाला आश्वासन दिले नाही. परवा गणपती येत आहेत. हिराघाट येथे ४ नंबरहुन खुपसे लोक

--५--

विसर्जनासाठी गणपती आणतात. जर रोडमुळे देव न करो गणपतीच्या मुर्तीस काही झाले तर काहीतरी गडबड होण्याचा संभव आहे म्हणुन आम्ही आपणांस पुन्हा विनंती करतो की, रोड बनवावे. त्या रस्त्यावर माती भरली होती. कमीत कमी एसी मिक्स काम करायला पाहिजे होते. त्यांनी फक्त गिरीट भरली होती बाकी काही काम केले नव्हते. कमीत कमी आता गणपती पुर्वी तरी फक्त दोन दिवस उरले आहेत ते काम आता तरी झाले पाहिजेत. नाही तर काहीही होण्याची तिथे शक्यता आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, थोडयावेळा पुर्वी मा. आयुक्तांनी सांगितले की, शहर अभियंत्त्यांना आम्ही आदेश दिले होते. आणि त्याप्रमाणे ते काम झाले होते. मला असे विचारायचे आहे की, साहेब आपण ठाण्यात राहता. तिथले रोड बघा. शहर अभियंत्याना तुम्ही आदेश दिले होते. त्यांनी रस्ते दुरूस्त केल्या नंतर त्याबाबत आपण समाधानी आहात का? आपण थोडयावेळा पुर्वी सांगितले की, माझे काम मी केले मी शहर अभियंत्त्यांना आदेश दिले होते. मला असे विचारायचे आहे की, आपण दिलेल्या आदेशानुसार भारताचे गृहमंत्री येण्याच्या योग्यतेचा तो रस्ता झाला होता का? आपण त्यानंतर त्या रस्त्याची सध्याची स्थिती काय याची पहाणी केली का? तो रस्ता त्या योग्यतेचा आहे असे आपले म्हणणे आहे का?आपण थोडयावेळा पुर्वी सांगितले शहर अभियंत्त्याना मी आदेश दिले त्याप्रमाणे मी काम केले आहे. त्या रोडची सध्याची परिस्थिती काय आपण पाहिली आहेत का? मा. महापौर साहेब आपण कृपया मा. आयुक्त साहेबांना माझ्या प्रश्नाचे उत्तर दयायला सांगा.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, स. गृहमंत्री श्री. लालकृष्ण आडवाणी यांच्या दौ-याच्या आदल्या दिवशी ज्या मार्गाने ते जाणार होते त्या रस्त्याची मी पहाणी केली त्यावेळी मला वाटले होते की, ते रस्ते

बरोबर होते. आणि पावसाळयात सर्व टारप्लान बंद असतात म्हणुन डब्ल्यु.बी.एम. करावे लागले. आणि जे डब्ल्यु.बी.एम. केले होते ते माझ्या मते चांगल्या त-हेने केले होते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-२१ तारखेला गणपतींचे शहरात आगमन होणार आहे. त्यावेळेसाठी तो रस्ता योग्य आहे का? आणि नसल्यास तुम्ही आताच शहर अभियंत्यांना सांगा की, गणेश उत्त्सवापुर्वी तो रस्ता व्यवस्थित झाला पाहिजे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-मा.महापौर साहेब, गणेश उत्त्सव लक्षात घेऊन मी शहर अभियंता व कार्यकारी अभियंता श्री. भिवापुरकर यांची बैठक घेतली आहे आणि ज्या ज्या रस्त्यांने गणरायांचे आगमन होते ते रस्ते ते मार्ग चांगले करण्यासाठी आदेश दिले आहेत. दोन दिवसात ते रस्ते चांगले केले जातील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौरजी, आता जी सर्व सदस्यांनी चर्चा केली त्यावर आयुक्तांनी खुप चांगल्या त-हेने उत्त्तर दिले. समाधानकारक उत्त्तर दिले. परंतु अदयाप हे नाही सांगितले की, जे गणपतीचे रोड आहे. तसेच कॅम्प २ येथील चालीया महोत्त्सव पुर्ण होणार आहे त्यासाठी पण लाखो भाविक येतात. तेथिल महोत्त्सव २४ तारखेला पुर्ण होणार आहे. आणि ५ नंबर येथील २६ तारखेला. ५ नंबर येथे पोस्ट ऑफीस रोड येथे बसस्टॉप बनत आहे. चालीया मंदीर ते राशन ऑफिस पर्यंत मटमंदिर ते गांधी रोड पर्यंत जे रोड या चालीया महोत्त्सवात कामी येतात ज्यांची स्थिती खुप खराब आहे. व आमचे जे श्री. दर्शनसिंग खेमाणी , सभापती क्रिडा



समितीचे आहेत . रोडची हालत खराब आहे. दरवर्षी गणपती येण्यापुर्वी रस्ते दुरूस्त केले जातात. ते रोड तयार होतील का?ते अजुन यांनी स्पष्ट केले नाही. आमचे मा. गृहराज्य मंत्री श्री. लालकृष्ण आडवाणी यांच्या आगमनाच्या वेळी जे रोड सांगितले त्यावरच चर्चा झाली. बाकी जे गणपती विर्सजनाचे जे रस्ते आहेत त्याचे काय?

मा.महापौरः-आयुक्तांनी आता सांगितले ना की, गणपती विसर्जनाचे जे पण रस्ते आहेत ते दुरूस्त केले जातील. त्यासाठी त्यांनी मिटिंग देखिल घेतली आहे. आणि त्यांना याबाबत मी पण पत्र दिले आहे की, गणेश उत्त्सव येत आहे. व चालीया साहेब, यासाठी ज्या ज्या रस्त्यावरून जावे लागते त्या सर्व रस्त्यांना दुरूस्त केले पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-महापौरजी, त्यासाठी खुप वेळ नाही आहे परवा गणपती येत आहे. २४ तारखेला चालीया उत्त्सव आहे. त्वरीत काम सुरू केले गेले पाहिजे. आता पर्यंत विचार करू पाहु अशाने खुप वेळ निघुन जाईल. त्वरीत कार्यवाही केली गेली पाहिजे.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणीः-महापौरजी, या तीन चार ठिकाणी जिथे जिथे गणपती विसर्जन केले जाते तेथील पाण्याची साफसफाई आजुबाजुचा परिसर स्वच्छ करण्यात यावा.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य आमच्या सभापतींनी खुप चांगल्या त-हेने प्रश्न उचलला आहे. जेव्हा मा. गृहमंत्री श्री. लालकृष्ण आडवानी यांनी जेव्हा भेट दिली. ते आले तरी रोड दुरूस्त नव्हते अशी चर्चा येथे झाली. आयुक्त साहेब म्हणतात मी शहर अभियंत्यांना तसे आदेश दिले होते. मला हे म्हणायचे आहे की, शहर अभियंता त्यांना आदेश मिळाल्यावर ते त्याप्रमाणे काम करतात का? शहर अभियंत्यांचे काम काय आहे. त्याची पण माहिती आम्हाला मिळाली

पाहिजे. दोन दिवसाने गणपती येत आहेत. एक नंबर ते गोल मैदान येथुन लोक गणपती आणतात आणि विसर्जनासाठी त्या रस्त्याने नेतात. हिराघाटला देखिल गोल मैदान येथुन लोक जातात. अमन सोसायटी कडुन जातात. आजपर्यंत मी कित्येकदा शहर अभियंता यांना सांगितले. परंतु ते रोड पुर्ण खोदला आहे. अजुन पर्यंत तो रोड तयार नाही केला. तिकडुन गणपती नेले तर काही अपघात घडु शकतो. त्याला जबाबदार कोण शहर अभियंता की आयुक्त साहेब?मी असे समजातो की, सभागृहामध्ये असे विचारले जावे की शहर अभियंता यांची जबाबदारी काय? ही जबाबदारी जर त्यांची असेल तर आम्ही त्यांना विचारू की, ही जबाबदारी जर आपली आहे तर हे काम झाले पाहिजे. शहर अभियंता यांना ठेकेदार सुध्दा मानत नाहीत. मी एक गोपनिय पत्र सुध्दा दिले आहे की, यांची चौकशी केली जावी. तर एक महिन्या नंतर आम्ही सभागहामध्ये यावे. आरडाओरड करावी परंतु त्यानंतर सुध्दा जसे आहे तसेच राहते याचाच अर्थ काम काहीच होत नाही याबाबत आम्हाला सुध्दा आता दुःख होऊ लागले आहे. तर श्री. चिजवानी साहेबांनी व्यासपिठावर येऊन सांगावे की, हि जबाबदारी माझी आहे. व शहरातील हे रस्ते तयार करायचे आहेत. व तयार करत आहे. व ते लवकरच तयार केले जातील. कमीत कमी ऐवढे तरी उत्तर त्यांनी दयावे.

<u>मा.महापौरः-</u>श्री. मोरेजी, आयुक्त साहेबांनी स्वतः याबाबत निवेदन दिले आहे. शहर अभियंता त्यांच्या पेक्षा वरीष्ठ तर नाहीत? त्यांनी सांगितले आहे की, सर्व रस्त्यांची दुरूस्ती केली जाईल.



<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>शहर अभियंता आयुक्तांपेक्षा वरिष्ठ नाहीत. पंरतु रस्त्यांबाबत त्यांनी कित्येक वेळा आश्वासन दिले आहे. तसेच आताच एका सदस्यांनी म्हंटले की, पाणी पुरवठया संदर्भात आपल्या दालनामध्ये जी चर्चा झाली त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी माझ्या कनिष्ठ अधिका-यांना निर्देश दिलेले आहेत. परंतु ते कनिष्ठ अधिकारी त्याची कार्यवाही करत नाहीत त्याचे काय? त्यास जबाबदार कोण?

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा.महापौरजी, जसे श्री. बी.बी.मोरे साहेब बोलत आहेत. हो जो गणेश उत्सव आहे तो तर प्रत्येक वर्षी येत असतो. रस्त्यांची दुरूस्ती त्यापुर्वीच का केली जात नाही. प्रत्येक वेळी प्रत्येक गोष्टीस निकडिची म्हणुन घेण्याची काय गरज आहे. शहर अभियंत्यांचे काम आहे ना की, त्यांनी दहा दिवस पंधरा दिवस अगोदर हे काम केले पाहिजे. तसेच रस्त्यांचे जे काम केले जाते त्याचा दर्जा नियंत्रित केला जात नाही. त्यावर कुणाचे नियंत्रण नाही. दोन-दोन तीन-तीन महिन्यामध्ये रस्ते उखडले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाचा ऐवढा मोठा जो कर्मचारी वर्ग आहेत तो काय काम करतो? शहर अभियंता काय काम करतात. रस्त्याचा दर्जा नियंत्रित करण्याकडे त्यांचे काही लक्ष नाही. व एखादा मोठा सण किंवा उत्सव येण्या अगोदर दहा-पंधरा दिवस अगोदर कार्यवाही झाली पाहिजे. परंतु आपण निर्देश दयाल, आयुक्त साहेब निर्देश देतील, आम्ही लोक सांगु तेव्हा शहर अभियंता जागे होतील काय? हे बरोबर नाही.

<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>मा.महापौरजी, एक मिनिट, प्रत्येक वर्षी रिक्षा संघटनेचा मोर्चा येत असतो. श्री. दर्शनसिंग यांनी सांगितले. ते बरोबर आहे. एकाच वर्षी तर गणपती येत नाहीत. प्रत्येक वर्षी गणपती येत असतात. महापालिकेने याचा विचार केला पाहिजे की पुढच्या वर्षी साठी काय केले पाहिजे. रस्ते खुपच खराब आहेत. अमन सोसायटी, गोल मैदान ते टर्निंग पॉइंट हा रस्ता ठेकेदारांने खोदुन ठेवला आहे. तो कुणाचेच ऐकत नाही. मी मागे पण याबाबत एक प्रश्न विचारला होता, त्याच्या उत्तरात चिजवानी साहेबांनी म्हंटले होते की, ३१ मे पर्यंत त्या रस्त्याचे काम पुर्ण होईल. आतो मे गेला, जुन गेला, जुलै गेला, आता ऑगस्ट महिना सुध्दा जात आला आहे.

तर मला नाही वाटत की, ठेकेदार दिलेल्या वेळेमध्ये आपले काम पुर्ण करेल म्हणुन? तर यासाठी आम्ही कुणाला जबाबदार धरायचे? आयुक्त साहेब आदेश देतात, आम्हाला सभागृहामध्ये याचे उत्तर मिळाले पाहिजे.

मा.महापौरः-श्री. चिजवानी आपण स्पष्टीकरण दया.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-त्यांनी बोलण्या अगोदर मी आणखी एक सुचना करतो की, ज्यादिवशी आयुक्त साहेब असतात त्यादिवशी श्री. चिजवानी आपल्या दालनामध्ये बसतात. ज्यादिवशी आयुक्त साहेब कार्यालयात नसतात त्यादिवशी चिजवानी सुट्टी घेतात. ही कुठली पध्दत आहे? सुट्टी घेतात की, असेच निघुन जातात.

श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-मा.महापौर साहेब, शहरातील गणपती विसर्जनासाठी ज्या रस्त्यावरून जातात. त्यासर्व रस्त्यांच्या कामाची प्राकलने आम्ही तयार केली आहेत. व ते काम करून घेऊ. दोन-तीन दिवसातच ते रस्ते पुर्ण होतील.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुरः-चालीया साहेब वाला जो रस्ता आहे....



श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-त्या रस्त्याचे सुध्दा प्राकलन आम्ही तयार करून साहेबांची स्वाक्षरी घेऊन तो रस्ता सुध्दा दोन-तीन दिवसामध्ये पुर्ण करू.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-दोन दिवसामध्ये कराल? माता मंदिरवाला रोड....

श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-होय.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-दोन दिवसामध्ये म्हणत आहात, परंतु टर्नींग पॉइंटवाला रस्ता केव्हा पासुन पडुन आहे. केव्हा पासुन त्यांनी नाला खोदुन ठेवला आहे. तिथे ट्रक जाऊ शकत नाही.

मा.महापौरः-श्री. मोरे साहेब गणेश उत्त्सवा संदर्भात जो प्रश्न उपस्थित झाला होता त्याचे त्यांनी उत्तर दिले आहे. बाकी जे रस्ते आहेत......

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-व बाकी रस्त्यांचे काम होत राहील?

मा.महापौरः-आता सभेचे कामकाज चालु करू दया.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-जर अशा अधिका-यास जबाबदार धरले नाही ना तर कोणतेही काम होणार नाही.

मा.सचिवः-आता यावेळेस सायंकाळचे ५.०५ मीनिटे झाली आहेत.

प्रश्न क्र. ५८० हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र५८०:- १)उल्हासनगर नगरपालिका अस्तित्त्वात असतांना सन १९८७ साली शासनाचे नगरविकास आराखडयानुसार किती आरक्षित भुखंड ताब्यात दिलेत? ताबा घेण्यासाठीची योग्य ती पूर्तता (कार्यवाही)नगरपालिकेने किंवा महानगरपालिकेने केली काय? त्याबाबतची माहिती दयावी.

२) विकास आराखड्यापैकी आरक्षण असलेल्या भुखंडावर सनदा घेवून नकाशे मंजूर झालेले आहेत. त्याची माहिती दयावी.

नकाशा मंजूर करतांना महाराष्ट्र शासनाने घालुन दिलेले नियम पाळण्यात आले आहेत काय? याबाबतची सविस्तर माहिती दयावी.

उत्तरः-१) उल्हासनगर नगरपालिका अस्तित्त्वात असतांना सन १९८७ साली प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांनी एकुण १५८ आरक्षित भुखंड नगरपालिकेकडे तात्पुरत्त्या स्वरुपात हस्तांतरीत केले होते अशा प्रकारचे पत्र एस.डी.ओ. यांच्या कार्यालयाकडुन प्राप्त झाले आहे. सोबत प्रत जोडत आहे.
२) विकास आराखसड्यापैकी आरक्षण असलेल्या भुखंडावर सनदा घेऊन तीन नकाशे मंजूर झालेले आहेत. १) साईट क्र. १९३ पार्किंगसाठी व शॉपिंग सेंटरसाठी आरक्षित आहेत. २) साई क्र. १४९ होलसेल मार्केटसाठी राखीव आहे. ३) साईट क्र. ८० मार्केटसाठी आरक्षित आहे.

नकाशा मंजूर करतांना उल्हासनगर महानगरपालिकाने एम.एम.आर.डी.ए. चे घालून दिलेले नियम पाळण्यात आले आहे.

--१५--

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सन्माननिय महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब माझा प्रश्न मागच्या महासभेत चर्चेमध्ये आला होता. त्यावेळेस मी सांगितले होते की, आयुक्त साहेब आपण जशी श्री. भडकवाड साहेबांची बदली थांबवली होती तशी नगररचनाकार श्री. सोनावणे यांचीही बदली थांबवावी आणि माझ्या त्या मागणीला सर्व सदस्यांनी सभागृहामध्ये पाठिंबा दिला होता. परंतु नगररचनाकार श्री. सोनावणे यांची बदली झाली आहे. असे मला समजते. तर हे खरे आहे का? त्यांची बदली झाली आहे का?

मा.महापौरः-नविन नगररचनाकार आलेले आहेत, श्री. एस.टी. शिंदे

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-आम्हाला माहित पडले पाहिजे ना? त्यांचा परिचय करून दिला पाहिजे ना? परंतु आमच्या सभागृहाची जी मागणी होती ती आयुक्तांनी ऐकुन घेतली नाही त्याचे कारण काय आहे?

मा.महापौरः-जे नविन नगररचनाकार आहेत ते स्वतः सभागृहात आपला परिचय करून देत आहेत. ते जरा ऐकुन घ्या.

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-माझे नाव सुर्यकांत शिंदे असुन नगररचनाकार उल्हासनगर महानगरपालिका म्हणुन माझी नेमणुक झाली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-प्रश्न क्र. ५८०चे उत्तर वाचुन दाखवितात. ते वरील प्रमाणे आहे. सोबत प्रत जोडत आहे परंतु मागच्या वेळेस ती जोडली नव्हती. मागच्या सभेमध्ये आम्ही मागणी केली होती तेव्हा ती प्रत आता जोडली आहे. पण यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, १५८ भुखंड आहेत. व यादी मात्र २०३ भुखंडाची दिलेली आहे. याचे कारण काय ऐवढे जास्त भुखंड आले कुठून?

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-यामध्ये एकुण १५८ भुखंड आपल्या महानगरपालिकेच्या वतीने विकसित करावयाचे आहेत. उर्वरित जे भुखंड आहेत ते इतर प्राधिकरणाचे आहेत. एकुण २०४ भुखंड होते त्यापैकी १८ भुखंड शासनाने मंजुरी देतानाच शासनाने वगळले आहेत. शासन जेव्हा कलम ३७ खाली मुळ योजना मंजुर करते तर त्यावेळी कलम ३७ खाली १८ भुखंड वगळण्यांत आले आहेत. त्यापैकी ५ भुखंड वेळोवेळी सुधारणा करून वगळण्यांत आले आहेत. त्यानंतर उर्वरित २३ भुखंड इतर विभागांसाठी जसे

टेलिफोन विभाग, जिल्हा परिषद , राज्य शासनाचे इतर जे विभाग आहेत त्यासाठीचे आहेत. एकुण २०४ भुखंड असुन त्यातील १५८ भुखंड आपल्या महापालिकेने विकसित करावयाचे आहे. १२८ भुखंडाचा ताबा उप विभागीय अधिकारी यांनी आपणांस दिलेला आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः-भुखंड दिले आहेत ठिक आहे. आता मी जो प्रश्न विचारला आहे त्यामध्ये साईट क्र. १९३ हा पार्किंगसाठी आरक्षित आहे. शासनानेच आपणाकडे दिलेला भुखंड आहे ना? शासनाने दिलेला आहे. त्यानंतर भुखंड क्र.१९४ हा घाऊक बाजारासाठीचा आहे. आणि येथे दुकानांसाठी दर्शविला आहे, दुकान / केंद्र हे बरोबर आहे का? दुसरे असे की, भुखंड क्र. ८० हा मार्केटसाठी दाखविला आहे आणि येथे जी यादी दिली आहे त्यामध्ये तो प्राथमिक शाळेसाठी दाखविला आहे.

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-कलम ३७ खाली शासनाने सुधारणा करून वाणिज्य व्यापार असे दर्शविले आहे. मुळ योजना जी मंजुर केली त्यांनतर वेळोवेळी शासनाने सुधारित केली आहे.

--१६--

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-दुसरे मी असे विचारले होते की, भुखंड क्र. ७४ बाबत मला उत्तर मिळाले नाही. भुखंड क्र. ७४ वर कशासाठी तरी प्लान मंजुर केलेला आहे. त्याचे मला उत्तर मिळाले नाही. प्लॉट नं ६१९ यावरपण कुठला प्लान आपण मंजुर केला आहे का? भुखंड क्र ७४ हा कशासाठी राखीव आहे? प्राथमिक शाळेसाठीच राखीव आहे का? की त्यात सुध्दा काही बदल झाला आहे का?

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. तो भुखंड प्राथमिक शाळेसाठीच ठेवलेला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह चौधरीः-त्यावर आपण कुठला प्लान पास केला आहे का?

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-नाही केला.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-नाही केला? विचारा जरा. जुन्या लोकांकडुन माहिती घ्या. भुखंड क्र. ६१९ व ७४.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आपल्या माहितीसाठी, महापौरजी, भुखंड क्र. ७४ मध्ये प्लॉट क्र. ६१९ व्हीच इज नोटीफाइड प्लॉट आहे. त्यावर प्लान मंजुर केले आहेत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- उत्तर देण्यासाठी त्यांना बरोबर माहिती नाही म्हणुन त्यांना मार्गदर्शन केले जावे.

मा.महापौरः-हळुहळु त्यांना माहिती होईल.
मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-माहिती ऐवढी होईल की, तीन प्लॉटवर २०० पेक्षा अधिक प्लान मंजुर केले जातील?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मी पुन्हा पुन्हा उठावे, मागील दोन-तीन सभांमध्ये मी सारखा प्रश्न विचारण्यासाठी उभा राहत होतो. परंतु तरीही नियमाप्रमाणे घेऊ. केले गेले आहे. असेच मला उत्तर दिले गेले.

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-आरक्षण क्र. ७४ वर प्राथमिक शाळेसाठीच्या आरक्षणाची आपण कोणतीही कार्यवाही केलेली नाही. परंतु त्याठिकाणी

विस्थापितांच्या घरासाठी जागा देण्याचा प्रस्ताव आपण शासनाला सादर केला होता. परंतु शासनाने त्यास मंजुरी दिलेली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-येथे एक प्रश्नाच्या उत्तरात असे उत्तर दिले आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.ए.च्या सर्व नियमांचे पालन केलेले आहे. तो प्लान मंजुर करताना. त्याबाबत आपणांस आज उत्तर दयायचे आहे. त्यांच्या सर्व नियमांचे पालन झाले आहे का? त्यावर मागील दोन-तीन महिन्यापासुन ज्या हरकती घेतल्या जात होत्या त्या हरकतींवर विधानसभेमध्ये प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावर चौकशी समिती नेमली होती. तर एम.एम.आर.डी.एच्या सर्व नियमांचे पालन झाले आहे का? जसे की, साईट क्र. ८० ची सनद सुध्दा रदद झाली आहे. गंगाबाई हासानंद ची सनद सुध्दा रद झाली आहे. जी पुर्वीची सनद आहे जी रदद झालेली आहे ती दाखवुन येथे प्लान मंजुर करून घेतला जात आहे. याबाबत कित्त्येके उपप्रश्न याशी जोडले गेले आहेत. याबाबतचा पत्रव्यवहार कित्त्येक वेळा माझ्या वतीने



झालेला आहे. त्याचे उत्तर येथे मिळाले पाहिजे. नियमांचे पालन केले गेले आहे नाही, इन्क्वायरी वील टेक केअर.

श्रीमती. भगवंती रूपचंदानी या सभागृहातुन बाहेर पडल्या.

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-इमारत उपविधी नुसार व १५४ कलमानुसार शासनाचे जे निर्देश आहेत. त्यानुसार जी मंजुरी दिली होती त्यानुसार नकाशे मंजुर केले आहेत. मालकी हक्कानुसार म्हणाल तर प्रस्तावासोबत जो प्रस्ताव पाठविला होता त्यानुसार प्लान मंजुर केला आहे. व इमारत उपविधीनुसार उल्लंघन झालेले नाही.

श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई, लविना कुदनानी, इंदु भठिजा या सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मालकी हक्क कुणाचा आहे. याची खात्री आहे का? तुमची खात्री आहे का?

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-मालकी हक्काबाबत उपविभागीय अधिका-यांकडुन स्पष्टीकरण करून घेतले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-स्पष्टीकरण करून घेण्याची मी गोष्ट म्हणत नाही. मालकी हक्क कुणाचा आहे? ज्या प्लाटची सनद रदद केली जाते. ज्या प्लॉटला जो प्लॉट आमचा असुन सुध्दा त्यांना सनद दिली जाते. व त्यांनतर ती सनद रदद केली जाते. व त्यानंतर प्रशासक शहर वसाहत हे त्याचे स्पष्टीकरण देतात. तर ही गोष्ट आपणांस अंतिम आहे का?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-तसेच, नकाशा मंजुर करताना उल्हासनगर महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.एने घालुन दिलेले नियम पाळले आहेत. तर मी लक्षात आणुन देतो की, प्रारूप विकास आराखडयाबाबतजी महासभा बोलावली होती. त्यामहासभेमध्ये एक ठराव करून पाठविला होता की, जे भुखंड आरक्षित असतील त्यांच्यावर जर प्लान पास केले असतील तर ते प्लान रदद करावेत. असे पत्र आपण बी.एम.आर.डी.ए.ला पाठविले आहे. तर मी तुम्हाला एक माहिती विचारू इच्छितो की, जे राखीव भुखंड आहेत त्यावरील कुठला प्लान आपण रदद केला आहे का? आणि जर रदद केला नसेल तर त्यावर बांधकामे चालु आहेत का? याबाबत जर माहिती असेल तर सभागृहाला ती दिली जावी.

श्री.सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-सध्या कोणत्त्याही नकाशाला मंजुरी केल्यानंतर कलम ५१ खाली त्याला नोटीस दयायला पाहिजे परंतु अदयाप कोणत्त्याही प्रकारे नोटीस दिलेली नाही.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-तिथे इमारती तयार झाल्यावर तुम्ही त्यांना नोटीस देणार का?मा.आयुक्त साहेब, तुम्हाला आठवत असेल की, मागे प्रारूप विकास आराखडयाबाबत महासभा झाली होती. त्यामध्ये नववा मुददा असा होता की, आरक्षित भुखंडावर जे नकाशे पास केले असतील ते मंजुर करण्यांत यावेत. तर ते नामंजुर करण्याचे काम सुरू आहे की नाही. त्यांच्या इमारती पुर्ण झाल्यावर त्यांना नामंजुर करण्यांत येईल का? याचा जरा सभागृहामध्ये खुलासा झाला तर बरे होईल. मागच्या महासभेमध्ये आयुक्त साहेबांनी सांगितले होते व त्याची नोंद इतिवृत्तांतामध्ये दोन-तीन ठिकाणी आलेली आहे की, पुढच्या महासभेमध्ये आपणांस पुर्ण उत्तर मिळेल. तर माझी विनंती आहे की, आयुक्त साहेबांनी त्याचे उत्तर दयावे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी उपस्थित केलेल्या मुदयाबाबत सांगु इच्छितो की, हे जे इमारत आराखडा मंजुर झालेला आहे त्याला एम.आर.टी.पी. ॲक्ट सेक्शन ५१



प्रमाणे योग्य ती नोटीस देऊन कार्यपध्दतीचे पालन करून ते नकाशे रदद केले जातील.

मा.सचिव :-प्रश्न क्र.५८४ हा श्री. राजेंदसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ५८४:- उल्हासनगर -३ येथिल भुखंड क्र.१९२ हा डिफेंस करीता राखीव आहे तेथे बांधकाम झाले आहे. याबाबत खुलासा व्हावा.

१) भुखंड क्र. १९२यु.नं. ७३ ते ८५ व १०४ शिट नं. २६ हा भुखंड , भारतीय संरक्षण विभागासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. त्यास परवानगी आहे का? नसल्यास त्यावर कार्यवाही का झाली नाही.

२) आता त्याच ठिकाणी महाराजा कंट्रीबार येथे नविन एक मजला वाढविण्याचे काम चालू आहे. त्यास उमापाची मंजूरी आहे का? नसल्यास त्यावर आजपर्यंत कार्यवाही का झाली नाही याचा सविस्तर खुलासा होणेस विनंती आहे.

उत्तर:- भुखंड क्र. १९२ कल्याण अंबरनाथ रोड येथे आर. सी. चे तळ+ पहिला मजलाचे कर्मशियल बांधकाम करण्यात आलेले आहे.

१) नगररचना विभागात उपलब्ध असणा-या अभिलेख पहाता सदर भुखंड क्र०. १९२ यु. क्र. ७३ ते ८५ व १०० शिट क्र. २६ हा भुखंडावर प्रश्नांकित बांधकामास तत्कालीन नगरपालिका अस्तित्त्वात असतांना दुरुस्ती परवानगी पत्र क्र. युएमसी/टीपीडी/सा/२४१/९६ दिनांक १२.१०.९६ अन्वये दिल्याचे उपलब्ध कागदपत्राद्वारे दिसून येते.

२) सदर ठिकाणी बांधकाम सुरु केल्याचे क्षेत्रीय अधिकारी यांच्या दिनांक २८.३.२००१ रोजी निदर्शनास आल्यानंतर संबंधीतांस त्वरीत थांबविण्यासाठी सुचित केले असता जागेवर संबंधितांनी बांधकाम थांबविले असून सदयस्थिती तेथे नविन मजल्याचे बांधकाम वाढविल्याचे कोणतेही काम सुरु नाही.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर:-मा.महापौर, उपमहापौर, व आयुक्त साहेब मी असे विचारले होते की, प्लॉट क्र. १९२ हा डिफेन्स करिता आरक्षित आहे. त्यावर काही बांधकाम झाले आहे का? आपण उत्तर दिले आहे ते असे की, तळमजला + एक माळा असे बांधकाम करण्यांत आले आहे. तर डिफेन्सचा प्लॉटसुध्दा आपण सांभाळु शकत नाहीत का?

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-मा.महापौर साहेब, उपमहापौर साहेब, आयुक्त साहेब व सर्व सदस्य भुखंड क्र. १९२ कल्याण अंबरनाथ रोड येथे तळमजला + पहिल्या मजल्याचे कमर्शिअल बांधकाम करण्यांत आलेले आहे. त्यावेळेस त्यांना दुरूस्तीची परवानगी दिलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब दुरूस्तीच्या परवानगीचा अर्थ काय होतो?

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-रस्ता रूंदीकरणामध्ये त्यांचे बांधकाम गेले होते त्यामुळे परवानगी दिली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-रस्ता रूंदीकरणात त्यांचे बांधकाम कधी गेले होते?



श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-१३.७८७ ला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-१३.७.८७ला जी रोडकटींग झाली आहे...

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-त्यावेळेस त्यांना दुरूस्तीची परवानगी दिलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-दुरूस्तीची परवानगी फक्त दुकान क्र. ६३४ साठी देण्यांत आली होती. व आता जे पुर्ण बांधकाम केले आहे ते फक्त दुकान आहे काय?

मा. सदस्य श्री. तेजी कैलास, रामरख्यानी मोहनदास हे सभागृहातुन बाहेर पडले.

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-टिपिकल स्ट्रक्चर बाबत बोलत आहे. तेथे जे कमर्शिअल बांधकाम आहे त्याबाबत बोलत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब फक्त ६३४ क्रमांकाच्या दुकानाच्या दुरूस्तीची परवानगी दिलेली आहे. आता जे पुर्ण बांधकाम केले आहे त्यामध्ये ६३४ क्रमांकाचे दुकान आहे की आणखी काही आहे.

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-भुखंड क्र. १९२ येथेच ते बांधकाम आहे ना?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यावर दुकाने तर बरीच आहेत ना? आपण १३.७.८७बाबतचा दाखला दिला आहे. १३.७.८७ बाबतच मी बोलत आहे. १३.७.८७ ला श्री. विनोद नारायणदास यांना परवानगी दिलेली आहे. ती फक्त ६३४ क्रमांकाच्या दुकानाची परवानगी दिलेली आहे.

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):-त्याची सविस्तर चौकशी करून सांगु.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-या प्रश्नाचे उत्तर आपण या महासभेत देऊ शकत नाहीत ना? या प्रकरणात बरेचसे मुददे आहेत. जर हे उत्तर देऊ शकत नाहीत तर मी यांना लेखी देतो. पुढच्या सभेत यांनी या प्रश्नाबाबत तयारी करून यावे. तोपर्यंत हा प्रश्न बाजुला केला जावा. आणखी काही मुददे आहेत त्याचे उत्तर हे देऊ शकत नाहीत. दुसरे विचारु का? त्यांना परवानगी कधी दिली होती?

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):- पहिली-पहिली परवानगी दिली होती, १३.७.८७ दुसरी परवानगी २२.१०.९६ ला दिली होती.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- २२.१०.९६ पासून १२.१०९६ ला दिली होती. दुरुस्तीची परवानगी किती दिवस ग्राहय असते?

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.ब्रा.वि):- एक वर्षासाठी.....

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- एक वर्षासाठी ना?बांधकाम १३.१२.९७ नंतर चालू झालेले आहे. हे बरोबर आहे काय?

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.ब्रा.वि):- आता हे प्रकरण लोक आयुक्तांकडे आहे.

--२०--

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- प्रकरण लोक आयुक्तांकडे आहे,परंतु मी जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर तर दया ना? आपण दुरुस्तीची परवानगी दिलीत, त्याची मुदत एक वर्षासाठी आहे, आणि बांधकाम चालू झाले १३.१२.९७ ला.... , हे माझ्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीत.

मा. महापौर :- श्री. भुल्लर महाराजजी,आपण जो प्रश्नविचारला आहे, त्याचे लेखी उत्तर त्यांनी दिले आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- त्याचाच उपप्रश्न आहे.

मा. महापौर :- प्रत्येक प्रश्नाचे असे उपप्रश्न आले तर कोणताही अधिकारी उत्तर देऊ शकणार नाही.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- साहेब, यांनी मुळ कागदपत्रांची संचिका गायब केली आहे. ती संचिका आपणास रेकार्ड मध्ये मिळणारच नाही. लोक आयुक्तांमध्ये प्रकरण गेले आहे. यांनी संचिका गायब केली आहे. व तसे लोकआयुक्तांना उत्तर दिले आहे. या लोकांनी संचिकेची चोरी केली आहे, अधिका-यांनी केली आहे.

मा. महापौर :- मी आपली गोष्ट मानतो, संचिका गायब आहे. किंवा काही आहे, आपण उपप्रश्नाचा दुसरा प्रश्न विचारा. ते कायदेशीर त्याचे उत्तर देतील.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- जर यांनी संचिकेची चोरी केली आहे,परंतु उत्तर तर दिले पाहिजे ना? त्यांनी काहीही करायचे त्यांना विचारायचे नाही काय?

मा. महापौर :- मी असे नाही म्हणत की, त्यांनी काहीहि करावे. आपण विचारु नये. असे नाही. आपण जो प्रश्न विचारता त्याचे लेखी उत्तर दिले जाते, आपण उपप्रश्न विचारणार त्याचे उत्तर त्यांच्याकडे नसेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- मा. महापौरजी, अधिका-यांनी प्रश्नांच्या उत्तरांची तयारी करुन यावयास पाहिजे. हे किती वेळा सांगायचे? आपण अजमावून पहा, ते उत्तरे देऊ शकत नाहीत.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंग भुल्लरः- यांच्या हातात या प्रकरणाची संचिका उपलब्ध असती ना तर हे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊ शकले असते. यांच्याकडे मुळ संचिका आहेच नाही.... डुप्लीकेट संचिका तयार केली आहे. त्यामध्ये जेमतेम चार कागद आहेत.

मा. महापौर :- पंजाबी साहेब, आपण जे उपप्रश्न विचारता, त्याबाबत त्यांना माहिती नसेल तर ते उत्तर कसे देऊ शकतील.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- तर ते तयारी करुन का येत नाहीत? चार चार महिन्यानंतर प्रश्न उत्तरासाठी महासभेत येतो, आम्ही कोणताही प्रश्न प्रत्येक वेळी पुढे ढकलू शकत नाही.

मा. महापौर :- विचारलेला प्रश्न तर आपण पुढे ढकलत नाहीत ना? त्या प्रश्नाचे ते लेखी उत्तर देत आहेत. जे उपप्रश्न विचारता त्याची ते तयारी करुन येत नसल्याने उत्तर कसे देऊ शकतील?

--२१--

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- पुढच्या महासभेत उत्तर दयावे? हे पाच जन्मात उत्तरे देऊ शकत नाहीत. मी सांगतो, आव्हान देतो,

मा. महापौर :- आपण लेखी प्रश्न विचारा, आपणास लेखी उत्तर दिले जाईल.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- इतिवृत्तांतात याची नोंद आली पाहिजे. पूढच्या महासभेत उत्तर दिले पाहिजे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबीः- _ जो पण प्रश्न यांना गैरसोयीचा होतो,त्याचे हे उत्तर देऊ शकत नाहीत.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- यांनी सांगितले की, १२.१०.९६ ला परवानगी दिलेली आहे.ती एक वर्षासाठी ग्राहय आहे. व काम २३.१२.९७ ला चालू झाले. तर ते बांधकाम कायदेशीर आहे काय? एवढेच मी विचारत आहे? त्याचे ते उत्तर का देऊ शकत नाहीत? मिलीटरीचा प्लॉट आहे तो सुध्दा सांभाळून ठेऊ शकत नाहीत?

मा. सदस्य श्री.नरेंद्र राजानीः- त्याची मुळ संचिका आहे काय? त्यांचे म्हणणे आहे की, संचिका उपलब्ध नाही. तर संचिका उपलब्ध आहे का?

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):- जेवढे कागदपत्र उपलब्ध आहेत त्यानुसार मी उत्तर देत आहे.

म. सदस्य श्री.नरेंद्र राजानीः- जेवढे कागदपत्र उपलब्ध आहेत असे न बोलता संचिका विषयी बोला. यांचा प्रश्न ठराविक स्वरुपाचा आहे,त्याविषयी बोला.

श्री. एस.एस. पाणपटटे (उपायुक्त अ.बा.वि):- संपूर्ण कागदपत्र उपलब्ध नाहीत.
मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी / राजेंद्रसिंह भुल्लरः- कुठे गेलेत?

मा.सदस्य श्री.लाल पंजाबीः- साहेब, ही गोष्ट नमुद करा. रेकॉर्डवर येऊ दया. महापालिकेत कागदपत्र उपलब्ध नाहीत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- यासाठी काय करायचे ते सांगा.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानीः- आरक्षित भुखंडावर बांधकाम पूर्ण होते, आणि तेथे संचिका उपलब्ध नाहीत. या पेक्षा घोर अपराध काय होऊ शकतो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी- यासाठी आपण पोलिस तक्रार कराल का? इतर बाबतीत आपण लवकर तक्रार करता, तुम्हाला प्रश्न विचारतो आयूक्त साहेब,,,,,

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी:- हि खुप गंभीर बाब आहे.... इतर बाबतीत आपण करता. दोन-चारशे चे नुकसान कुठेतरी झाले असेल. इथे लाखो करोडोची जमिनीवर नुकसान झाले आहे.



मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:- आम्हाला माहिती आहे की, तुम्ही पूर्णपणे बचाव करणार.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी:- यावर तुम्हाला आमच्यावर अजून केस करायचे असेल तर करा. आम्ही त्यासाठी तयार आहोत.

काही सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोंण काय बोलत होते, ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:- त्यांना दिलेली परमिशन वैध आहे का? यांना उत्तर दयायला सांगा असे कसे उत्तर नाही देणार?

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी:- काय झाले आयुक्त साहेब उत्तर दया ना? सदस्य तुम्हाला प्रश्न विचारत आहे.

श्री. एस.एस. पाणपट्टे (उपायुक्त अ.बा.वि):- बांधकाम अवैध आहे एक वर्षासाठी त्यांना परवानगी दिली होती.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:- नंतर जे बांधकाम केले ते अवैध आहे ना?

श्री. एस.एस. पाणपट्टे (उपायुक्त अ.बा.वि):- लोक आयुक्तांकडे हे प्रकरण आहे,त्यांच्याकडुन आदेश आल्यावर हे तोडले जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:- अवैध आहे ना? लोक आयुक्तांनी काही लिहून दिले आहे का?

श्री. एस.एस. पाणपट्टे (उपायुक्त अ.बा.वि):- नाही, पुढच्या महिन्यात सुनावणी आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- लोकआयुक्तांकडे एखादे प्रकरण असेल, आपणाकडे स्थगित आदेश आले आहेत का? की आपण इथे कायदेशीर कार्यवाही करु नका. असे काही स्थगन आदेश इथून आले आहेत का?

श्री. एस.एस. पाणपट्टे (उपायुक्त अ.बा.वि):- नाही.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी: - नाहीतर आपण आपली पूढची कार्यवाही करु शकतो,तुम्ही पोलिसात तक्रार करा. तिथले बांधकाम तोडा, नंतर लोकआयुक्तांना पत्र लिहा की, आम्ही इथले बांधकाम तोडले आहे. लोकआयुक्तांकडें प्रकरण आहे म्हणून आपण ऍक्शन नाही घेणार? ज्यांनी अनाधिकृतपणे प्लॉट हडप केला आहे, तिथे बांधकाम केले आहे,त्यांना त्याचा फायदा मिळत आहे. व लोकआयुक्तांच्या आदेशाची आपण कशी वाट पहात आहात. लोकआयुक्तांनी आपल्याला काही स्टे दिला आहे का की स्टेटसला मेंटन करा. असे काही आहे का?

श्री. एस.एस. पाणपट्टे (उपायुक्त अ.बा.वि):- नाही नाही पुढच्या महिन्यात हिअरींगसाठी आणणार आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-स्टे नाही तर तुम्ही कायदेशीर कार्यवाही करु शकता. आयुक्त साहेब यात असे आहे की एकतर संचिका गायब आहे. त्यासाठी पोलिस तक्रार केली पाहिजे. त्याशिवाय रिजर्व प्लॉट वर हे अनधिकृत बांधकाम आहे,

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- ते पण मिलिटरीचा प्लॉटवर .........

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानीः- प्लॉन पास नाहीतर कार्यवाही निश्चितपणे झालीच पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-इतर तर उल्हासनगरचे भुखंड खाल्लेच आहे मिलिटरीचा भुखंड खात आहे. मिलीटरीचा भुखंडपण सोडत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- असे आहे तर सर्वांना परवानगी दया. नाहीतर दुसरा पर्याय सुचवितो. हे उल्हासनगर मध्ये जाहिर करा की, कुठेहि भुखंड दिसेल कुणाला जितकी ताकद असेल ते त्यांनी बांधकाम करून घ्यावे. रस्त्यावर बांधकाम करा. परवानगीची गरज नाही. लोकआयुक्तांकडे प्रकरण चालु राहिल तोपर्यंत उपयोग करून घ्या. तुम्ही अशी परवानगी देता का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. महापौर साहेब,

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः- मला उत्तर तर घेऊ दया आधी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- आपल्या प्रश्नावर श्री. राजानी, पंजाबी, महाडिक बोलता ते चालते, जेव्हा मी बोलतो तेव्हा....

मा.सदस्या श्रीमती. सूनिता राजवानीः- मा. महापौरजी हे चुकीचे आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः- विपक्ष नेत्याचा हा अपमान आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- जेव्हा राजानी बोलतात तेव्हा अपमान नाही वाटत ,मी बोलतो तेव्हा अपमान वाटतो. महापौरजी आपण मला परवानगी दिली आहे,मी बोलणारच.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- मला बोलायचे आहे. राजानी बोलतात ते चालते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-लिंक नका तोडु.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- मला बोलायचे आहे. राजानी बोलतात ते चालते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-लिंक नका तोडु.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- मा. महापौर साहेब, यांना सांगा लिंक नका तोडु.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः- मा. महापौरजी यांना सांगा..........

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानीः- हा काही राजकिय मुददा नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- जेव्हा पंजाबी, व राजानी बोलतात तेव्हा अपमान नाही वाटत, मी बोलायला लागलो की त्रास होतो.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकूरः- सभागृह नेत्त्यांना बोलू दिले जावे.

मा.सदस्य श्री प्रकाश महाडिकः- मा. महापौरजी, .........

मा.महापौरः- महाडिकजी माझे आधी ऐका, महाराजजीच्या प्रश्नावर लाल पंजाबी बोलले, राजानी बोलले, .................

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः-त्यांच्या प्रश्नाला समर्थ असलेले आम्ही त्यांचे उत्तर दिले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- चर्चा नको.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- मी पण यांच्या प्रश्नाला समर्थनीय असे बोलतो.

मा.महापौरः- त्यांना बोलू तर दया.

मा.सदस्य श्री. नरेदं राजानीः- उत्तर किशोर देणार आहेत का?

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः- त्यांच्या आधी मी जे बोलतो ते ऐकून घ्या.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकूर :-सभागृह नेता बोलू लागल्यावर यांना का अडचण वाटते.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः- महापौर, जेव्हा एखादया विषयावर सदनात गंभीरतेने चर्चा चालू असेल...

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी गंभीरतेने बोलत आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीकः- सभागृह नेता एखादा विषय गंभीरतेने चालु असतांना सभागृह नेता मध्येच उभे रहातात. जसे थोडया वेळा पुर्वी रोडचा विषय होता. त्यावेळी चर्चा संपली नव्हती. तर यांनी मध्येच उठुन श्रध्दांजली प्रस्ताव मांडला. त्यांनी विषयच संपवला.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-यापुढे तुम्हाला विचारून बोलत जाईन.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- महाराजजींचा प्रश्न होता तेव्हा महापौर काय म्हणाले. प्रश्न आयुक्तांना विचारला आहे आपण आयुक्तांशी बोला.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-महापौरजी, मला पाच मिनिटे बोलायचे आहे.
मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-प्रश्न आयुक्तांना विचारला आहे आयुक्त उत्तर देतील. तुम्हाला उत्तर देण्याचा अधिकार नाही. हे कायदयात बसत नाहीत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, तुम्ही किशोरना परवानगी दया. परंतु एका अटीवर....

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-बस झाले. खुप दादागिरी झाली. सभा नियमाप्रमाणे चालु करा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- बस झाले. खुप दादागिरी झाली. सभा नियमाप्रमाणे चालु करा.
मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मला महापौरांनी परवानगी दिली आहे, तुम्ही खाली बसा.

मा.महापौरः-मी तुम्हा सर्वांना बोलु दिले आता सभागृह नेत्यांना बोलु दया.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, उत्तर किशोर वनवारी देणार का?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-नाही. नाही. मी सुझाव देणार आहे.

मा.महापौरः-राजानीजी, आपण उत्तर दिले होते का?

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-ते सुझाव देणार आहेत.
इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.
मा.महापौरः-आपण बोला.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-श्री. नरेंद्र राजानी व श्री. लाल पंजाबी बोलतात तर मी पण बोलु शकतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- आम्ही त्यांना सुझाव नाही दिले. आणि किशोरजी सुझाव देत आहेत. आता सुझाव नाही विचारले.
मा.महापौरः-त्यांना बोलु तर दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- जर प्रश्नच पुर्ण नाही झाला तर सुझाव कसले. प्रश्नाचा निर्णय नाही झाला तर सुझाव कसा देणार?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-श्री. राजानी व पंजाबी काय करत होते?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आम्ही प्रश्न विचारत होतो.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी पण प्रश्न विचारतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- तुमचा प्रश्न येऊ दया. आम्ही या प्रश्नाचा खुलासा मागतोय.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी विचारतच आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- हाऊ ही इज विहेवींग.

मा.महापौरः- मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली आहे. तुम्ही त्यांना बोलु दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- प्रश्न हा नाही की तुम्ही त्यांना बोलण्याची परवानगी दिली आहे की नाही? ते उत्तर देणार आहेत का?

मा.महापौरः- मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली आहे. तुम्ही त्यांना बोलु दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- प्रश्नोत्तर तासात तुम्ही त्यांना बोलण्याची परवानगी का देतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-परवानगी फक्त श्री. राजानी, श्री. पंजाबी, व श्री. महाडिक व या मॅडमना दयावी असे यांचे म्हणणे आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-प्रत्येकाला विचार मांडण्याचा अधिकार आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-ठिक आहे. बोलु दया. जर सेवल ठाकुर अनाधिकृत बांधकाम विषयी बोलत असतील तर त्यांना बोलु देऊ. सभागृह नेता उत्तर देतील त्यांना.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-देतील सभागृहनेता उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- तुम्हा दोघांपैकी कोण बोलणार आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-कृपया सदनात शांतता राखावी.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-तुम्ही खाली बसलात तर शांतता राहिल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- तुम्ही उठलात म्हणुन अशांती झाली आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-एवढे सर्व जण उभे आहेत मी कसा बोलु?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

--२७--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौरजी, महाराज यांनी जो प्रश्न विचारला तो खुप चांगला प्रश्न आहे. परंतु आमचे जे संबंधित उपायुक्त आहेत. त्यांच्या कडे रेकॉर्ड आहे का की त्यांनी एका वर्षात बांधले की नाही ते. महाराजजी सांगत आहेत की त्यांना परवानगी मुदत एक वर्ष होती. इकडे काही रेकॉर्ड आहे का? महापालिकेत रेकॉर्ड आहे का किती वर्षात त्यांनी बांधकाम बांधले? त्यानंतर त्यांनी सांगितले की ८७ साली परवानगी दिली होती. ही तर चांगली गोष्ट आहे. ३३ रस्ता रूंदीकरणाच्या मोहिमेत आपण कुणालाही परवानगी दिली नव्हती. तरी पण त्यांनी तळमजला अधिक दोन

बांधले आहे. यांनी तर ८७ मध्ये की ९६ मध्ये परवानगी घेतली आहे. त्यानंतर यांनी सांगितले की, एक वर्षाच्या आत ते बांधायचे असते. परवानगीत असे लिहिले आहे का की त्यांची मुदत एक वर्ष आहे. हे स्पष्ट झाले पाहिजे. तसेच त्यांनी बारा महिन्या नंतर बांधकाम सुरू केले यासाठी काही महापालिकेत पुरावा आहे का? या गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे. नंतर त्यांनी सांगितले की, संचिका हरविली आहे. ती कोणत्त्या संबंधित अधिका-याकडे आहे? कुठे गेली? कुणाचा या प्रकरणाशी संबंध आहे का? जर महापालिकेने परवानगी दिली आहे तर ते वैध आहे. कुणाच्या कालावधीत ती पीसी हरविली आहे. त्यासाठी जबाबदार कोण? (इकडे काही सदस्य बोलत असताना ....) मी बोलत आहे तुम्ही चिंता करू नका. तर या सर्व गोष्टींचा खुलासा केला पाहिजे. किंवा जसे महाराजजी म्हणाले की एका वर्षानंतर बांधकाम सुरू केले तसा काही पुरावा आहे का? तसेच जर त्या जागेवर रिझर्व्हेशन असेल तर महापालिकेने रोड वायडिंगमध्ये लोकांना पर्यायी जागा म्हणुन तळमजला अधिक दोन बांधण्याची परवानगी दिली आहे. इथे पण रोडवायडिंगमध्ये गेले असेल म्हणुन महापालिकेने परवानगी दिली असेल. व त्याने बांधकाम केले असेल. यासर्व गोष्टी गंभीरतेने घेऊन प्रत्येक बाबीचा खुलासा व्हायला पाहिजे. हा खुप गंभीर विषय आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौर मला माहिती पाहिजे इथे आयुक्त पण आहेत. सचिव पण आहेत. आताची जी सत्ता आहे महाराष्ट्र विधान भवन मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस त्यांनी असे म्हंटले वा नियम बनवला आहे की अनाधिकृत बांधकामांना पाठिंबा देणारा नगरसेवकाचे नगरसेवक पद रद्द केले जाईल अशी काही माहिती दिली आहे का? याची माहिती आयुक्तांनी वा सचिवांनी दिली तर बरे होईल. या सदनात अनाधिकृत बांधकामाविषयी चर्चा चालु आहे. एक अधिकारी त्याचे उत्तर देऊ शकत नाही. व आमच्या या शहराचे सभागृह नेता या सदनात त्यांना पाठिंबा देत आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-हे चुकीचे आहे. मी त्यांना पाठिंबा देत नाही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकैः-मा.महापौरांची मी परवानगी घेतली आहे. मला बोलु दया. माझे बोलणे पुर्ण होऊ दया.

मा.महापौरः-महाडिकजी, आधी माझे ऐका.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- मी मत नाही देत आहे. मी माहिती मागत आहे.



मा.महापौरः-महाडिकजी, मला वाटते सभागृह नेता जे बोलले ते तुम्हाला नीट समजले नाही. ते अनाधिकृत बांधकामांना पाठिंबा देत नाहीत. तुमचा गैरसमज झाला आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मग त्यांना काय म्हणायचे आहे.

मा.महापौरः-ते अनाधिकृत बांधकामांना पाठिंबा देत नाही आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक- ते काय म्हणु इच्छितात. त्यांना काय सिध्द करायचे आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- तुम्ही ऐकले नाही का मी काय म्हणालो ते?

मा.महापौरः-ते कायदयाला धरून बोलत होते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-जर कायदयाचा पॉइंट हे म्हणत आहेत तर रोड कटींगमध्ये....

मा.महापौरः-ते स्वतः अधिकारीकडुन स्पष्टीकरण मागत होते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-ज्यांचे रोड वायडिंगमध्ये घर गेले आहे त्यांना आपण परवानगी दिली आहे. आयुक्त साहेबांनी उत्तर दिले आहे लिखित. मा. आयुक्त साहेब मानतात का? रोड वायडिंगमध्ये इमारती, दुकाने, घरे तुटली त्यांना दोन मजले बांधण्याची परवानगी दिली तर अधिकृत आहे का? मला याबाबतीत मा. आयुक्ताकडुन माहिती हवी आहे. कारण मागील सभेत कोणा सदस्यांला उत्तर आयुक्तांनी दिले आहे. व ते हे मानण्यास तयार नाहीत की, सदनात चर्चेच्या माध्यमाने काही ठरले असले तरी माझ्या मते पानपटटेंचाच दावा आहे की, तळमजला अधिक दोन मजले बांधण्याची परवानगी दिली नाही. ते सर्व महासभेत चर्चेच ठरले आहे. जर आयुक्तांनी सागितले भविष्यात तळमजला अधिक दोन मजले बांधणा-यांवर कार्यवाही नाही केली जाणार तर आमचे समाधान होईल. तुम्ही आयुक्तांना सांगायला सांगा.

मा.महापौरः-तुम्हाला तर माहिती आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-एक सेकंद मला बोलु दया. रोड वायडिंग विषयी चालले आहे. याच सभेत हा विषय चालला होता. महाडिक साहेब म्हणाले होते की, माझ्या प्रभागात दोन मजली बांधकाम करू दयावे का? व त्याप्रमाणे तसे त्यांचे प्रभागात बांधकाम झाले आहे. आणि आता या सदनात झाले होते आणि हेच म्हणतात नाही झाले. चुकीचे आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-सेवल बरोबर बोलत आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-मग तुम्ही कसे म्हणता की, सदनात फक्त चर्चा झाली आहे.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-एक मिनिट ,मला बोलु दया. माझे पुर्ण होऊ दया. सेवल ठाकुर मी काय बोलतो ते ऐकुन घ्या. तुमच्यात ऐकण्याची हिम्मत असेल तर ऐकुन घ्या. मा.महापौरजी, तळमजला अधिक दोन मजले बांधल्यावर देखिल तोडले आहे. का तोडले? कारण ते अधिकृतपण नव्हते बांधले.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-महाडिकजी, ते महापालिकेने नाही तोडले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-विचारा त्यांना? पानपटटे साहेबांचे पत्र आले आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-त्यांनी नाही तोडले. एस.डी.ओ. ऑफीस वाल्यांनी तोडले आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-माझ्या तीन प्रश्नांचे उत्तर दया. महापालिकेने रोड वायडिंगमध्ये घरे गेलेल्या लोकांना तळमजला अधिक दोन अशी परवानगी महासभेने दिली आहे. हे आयुक्तांना मान्य आहे का? दुसरी गोष्ट इथे ठराव झाला आहे शहरात खुप ठिकाणी तळमजला अधिक दोन असे मजले बांधले आहेत. जर कुणी प्रांत अधिकारी वा लोकायुक्तांकडे तक्रार केली व त्यांनी तोडले तर चालेल का? जर ते तोडले तर हा विश्वासघात होईल. कारण की आपण सर्वांनी नगरसेवकांनी मिळुन चर्चेच्या माध्यमान्वये ठरवले आहे की, ज्यांचे रोड वायडिंगमध्ये गेले त्यांना आपण अशी परवानगी दिली होती. जर ते बांधकाम प्रांत विभाग किंवा लोकायुक्तांकडुन तोडले गेले तर महासभेमध्ये ठरलेल्या त्या निर्णयाला काहिच अर्थ रहत नाही. जर कुणाला काही करायचे असेल तर ते नगरपालिकेत तक्रार नाही करणार, प्रांत विभाग वा लोकांयुक्तांकडे तक्रार करतील ते त्यांच्या व्दारे तोडुन घेतील तर मग महानगरपालिका म्हणेल आम्ही तोडले नाही त्यांनी तोडले तर महासभेत झालेल्या निर्णयात अर्थ काय झाला? ते चुकीचे होत आहे. आज एकाचे तुटले आहे उदया दुस-याचे तोडतील. शहरात सर्वांवर ही टांगती तलवार आहे. महापालिका तोडणार नाही परंतु लोकांमध्ये आपापसात वैर आहे. मग ते तक्रार प्रांत विभागात किंवा लोकायुक्तांकडे करतील व वैर असल्यामुळे ते तोडले जाईल असे झाले तर या सदनात ठरवलेल्या निर्णयाला अर्थ रहाणार नाही.

मा.महापौरः-महाडिकजी, मी यावर खुलासा करतो. आयुक्त साहेबांना पण हे माहित पडले पाहिजे की, शहरात काय चालले आहे? मागील दोन वर्षात काय निर्णय झाला आहे? त्यांना पण ही माहिती असली पाहिजे. मागील दोन वर्षापासुन शहरामध्ये आय.आर.डी.पी चे रस्ते तयार झाले आहेत त्यात ज्यांची घरे दुकाने तोडली गेली. त्याबाबतीत सदनात खुप वेळा चर्चा झाली आहे आयुक्तांशी चर्चा झाली आहे. व या चर्चे व्दारे निर्णय झाले होते की, ज्यांचे पण दुकान , घर गेले त्यांना महापालिका तळमजला अधिक दोन मजले बांधण्याची परवानगी देईल. त्यानुसार रस्ता रूंदीकरण करताना ज्यांची दुकाने घरे गेली त्यांनी तळमजला अधिक दोन मजले असे बांधकाम केले आहे. उपविभागीय अधिकारींच्या हस्तक्षेपाचा प्रश्न आहे. त्यामध्ेय उपविभागिय अधिकारी तेव्हा कार्यवाही करू शकतील जेव्हा जमिनीवर नव्याने बांधकाम सुरू केले जाईल. जर त्या जमिनीवर फेश अतिक्रमण नसेल तर मला असे



नाही वाटत की महापालिकेच्या अधिकाराचा एस.डी.ओ. वापर करत असेल. म्हणुन त्यांच्या हस्तक्षेपाचा काही प्रश्नच येत नाही. हा महापालिकेचा अधिकार आहे. महापालिका आपल्या वेल फेयर पॉलिसीमधुन हटु शकत नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा.महापौर, आपण म्हणता ते खरे असेल तर पानपट्टे साहेबांना विचारा? एस.डी.ओ. व्दारे माझ्या प्रभागातील बांधकाम तोडले गेले आहे. त्यासाठी महापालिकेकडे पत्र देखिल आले होते. मी स्वतः ते वाचले आहे. त्यात लिहिले आहे की, आमचा कर्मचारी वर्ग व पोलिसांच्या साहाय्याने बांधकाम तोडा असे अधिका-यांच्या सहिचे पत्र आहे. ते जर खोटे असेल तर सभागृहात तुम्ही सांगता ते जर खोटे असेल तर चुकीचे होईल. मला मा. आयुक्तांकडुन सुध्दा याची माहिती हवी. महापालिकेत आल्यानंतर आयुक्तांनी पहिल्याच महासभेत स्पष्ट सांगितले की, कोणतेही अनाधिकृत बांधकाम तोडणे हे नगरसेवकांचे नाही तर आयुक्तांचा अधिकार आहे. यासाठी उदया सभागृह नेता सांगेल की, १२ जुलै ९९च्या पुवीच्या बांधकामांना आम्ही अभय दिले आहे. तर कुणी ऐकणार नाही असा त्यांचा बोलण्याचा नक्कीच अर्थ होता. त्यासाठी मी त्यांना पण विचारू इच्छितो की, महापौरांच्या शब्दावर किंवा सभागृह नेत्त्यांच्या शब्दावर आम्ही जनतेला आश्वासन दिले त्यात जर तुमचे एकमत नसेल तर आम्ही दिलेली आश्वासने पोकळ ठरतील. आणि जनता भरडली जाईल. त्यासाठी आज ही वेळ आहे की, या

सभागृहामध्ये किंवा या सदनामध्ये नगरसेवक जे ठरवतात त्याच्याशी तुम्ही बांधील आहात की नाही? जर बांधील नसाल तर या सदनात कुणी काही ठरवले तर ते तुम्हाला बांधील आहे की नाही? नाही तर तुम्ही कार्यवाही करणार असाल तर अगोदरच सांगा. आता जे महापौर बोलतात त्याच्या विपरित सर्व घडत आहे. असे नाही झाले पाहिजे. आपण जी पॉलिसी ठरवली त्यांना आयुक्त साहेब बांधिल आहेत का हे त्यांना विचारा?

मा.महापौरः-म्हणुनच मी म्हणालो की, आपले जे आयुक्त आहेत त्यांना माहिती पडले पाहिजे की मागील दोन वर्षात आपण या शहरात कोणत्त्या पॉलीसीच्या आधारे चालत आहोत. व यास आयुक्तांचा सहभाग असतो. व मला असे वाटते की, त्याच पॉलिसीला रोड वायडिंगमध्ये कंन्टीन्यु केले जावे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-आपण हे सुध्दा सांगा की, अनाधिकृत बांधकामास माझे सहकार्य आहे?

मा.सदस्य किशोर वनवारीः-आता चर्चा पुष्कळ झाली. त्यामध्ये सहा वेळा माझे नाव घेतले, सभागृह नेता, सभागृह नेता त्यासाठी मी त्यांना धन्यवाद देतो की, ते माझी आठवण करत असतात. मी एक खुलासा करू इच्छितो की, सुरवातीपासनु शेवटपर्यंत मला याची सुध्दा माहिती नाही की, महाराज भुल्लर कोणत्त्या अनाधिकृत बांधकामा बाबत प्रश्न विचारत आहेत. तर मी सहकार्य काय करणार? ते आहे कॅम्प नं.३ मध्ये आणि मी राहतो उल्हासनगर ५ मध्ये तर श्री. महाडिक साहेबांच्या हे लक्षात यायला पाहिजे. दुसरे असे की, जो येथे निर्णय झाला होता तो एकट्या किशोर वनवारी यांनी केला नव्हता. चंद्रशेखर साहेबांसारखा आयुक्त पुर्ण भारतवर्षामध्ये नाही. त्यांनी व श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी तो निर्णय घेतला होता. व सर्व ३३ रस्त्यांवर तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम झालेले आहे. त्यावर आयुक्तांनी कुठेही, कधीही कार्यवाही केली नाही. चंद्रशेखर साहेबांनी व आर. डी. शिंदे साहेबांनी सुध्दा, महासभेमध्ये हे मत तयार झाले होते, आयुक्तांनी सहमती दर्शविली होती त्यानंतर महासभेमध्ये ३३ रस्त्यांच्या कामांना विकास आराखड्यातील रूंदीप्रमाणे मंजुरी दिली होती. त्यांनतर असा सुध्दा निर्णय



घेण्यात आला होता की, लोकायुक्त किंवा उच्च न्यायालयाकडुन असा काही आदेश आला तर त्यास आम्ही थांबवु शकणार नाही. परंतु आपल्या महानगरपालिका स्तरावर हा निर्णय झाला होता. त्यावेळी श्री. चंद्रशेखर साहेब व श्री. आर.डी. शिंदे साहेब यांच्या सहमतीने हे ठरले होते की, जे लोक दोन फुट, तीन फुट जेवढे काही आपले बांधकाम रस्ता रूंदीकरणामध्ये तोडु देतात अशा लोकांना तळ मजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास लेखी परवानगी देणार नाहीत परंतु तोंडी स्वरूपी अशी परवानगी दिली जाईल. आपल्या महानगरपालिकेच्या वतीने त्यांना कोणताही त्रास दिला जाणार नाही. ज्यांची १०० टक्के घर किंवा दुकानाची जागा गेली आहे त्यांना पर्यायी जागा दिली आहे. व ज्या कुणा सदस्याचे बांधकाम तुटले होते ते महानगरपालिकेच्या आदेशान्वये नसुन लोकायुक्तांच्या आदेशान्वये तुटले होते. त्यावेळी या लोकांनीच हरकत घेतली होती. रस्ता रूंदीकरणामध्ये तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करण्यास परवानगी आहे. आता का याबाबत प्रश्न विचारला जात आहे. तर हे सर्व लक्षात घेतले जावे. फक्त सभागृह नेता, सभागृह नेता असे म्हणु नये. सभागृह नेत्त्याचा येथे प्रश्न नाही तर संपुर्ण शहराचा प्रश्न आहे. मी कोणत्त्याही अनाधिकृत बांधकामाला पाठिंबा देत नाहीत. उलट मी उपायुक्तांना मुदयानुसार स्पष्टीकरण मागत होतो की, महाराज जे विचारत आहेत ते सर्व खरे आहे का?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा.महापौरजी, किशोर वनवारी म्हणतात की, महाडिकना हे समजले पाहिजे की, कोणता विषय चालू आहे आणि

कोणत्त्या विषयावर चर्चा चालु आहे. मी थोडयावेळापुर्वीच झालेल्या विषयाबाबत सदनास माहिती देतो की, ज्यावेळी मा.श्री. लालकृष्ण आडवानी शहरात आले होते तेव्हा रस्त्यांविषयी चर्चा चालली असताना त्यांनी श्रध्दांजली प्रस्ताव ठेवला. असे आमचे विदवान् सभागृह नेता आहेत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- हे आधी पण तुम्ही बोललात आता पण तेच बोलत आहात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-इतके तर हे विदवान आहेत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- तुम्ही हे दुस-यांदा बोलत आहात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-बघा कसे उभे राहुन बोलत आहेत. दुसरे असे की, विरोधी पक्ष नेता श्री.भुल्लर महाराज यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याचे पण उत्तर आम्हाला आयुक्तांकडुन पाहिजे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- महापौरजी, एक सेकंद. सभागृह नेत्त्यांनी जे वक्तव्य केले माझ्या मते ते सदनात बोलले नाही पाहिजे. मागच्यावेळी पण सभेत बोलले होते की, श्री. चंद्रशेखर हे कार्यक्षम आयुक्त होते. कोणत्त्याही आयुक्तांना आयुक्तांचे अधिकार असतात म्हणुन मागच्या आयुक्तांचे नाव घेऊन आता कार्यरत असणा-या आयुक्तांना कमीपणा दाखवु नये. हे चुकीचे आहे. असे वक्तव्य कधी सदनात नाही झाले पाहिजे. प्रत्येक आयुक्तांचा मान ठेवला पाहिजे. दुसरे कार्यक्षम आहेत तर हे काय ढिले किंवा अकार्यक्षम आहेत काय? असे कधीही बोलले नाही पाहिजे. आमची हरकत आहे यावर.

मा.महापौरः-त्यांच्या म्हणण्याचा हा अर्थ नव्हता तुम्ही त्यांना चुकीचे समजु नका.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा. महापौरजी, मुदयावर या.

--३२--

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, सदनात चर्चा चालु आहे की, आय.आय.डी.पी अंतर्गत ३३ रस्ते रूंदीकरणाचे काम चालु आहे. या रस्त्यांचे रूंदीकरण करताना ज्या लोकांची घरे गेली. स्पष्ट शब्दात बोलायचे असेल तर मी असे म्हणेन की, ज्यांचे ५०टक्यापेक्षा जास्त बांधकाम गेले किंवा पुर्ण बांधकाम गेले. त्यांना वेगळीकडे जागा देऊन त्यांचे पुर्नवसन केले गेले आहे. ही पॉलीसी होती. दुसरे धोरण असे ठरवले होते की, ज्या लोकांचे ५० टक्यापेक्षा कमी बांधकाम गेले असेल त्या लोकांना तेवढेच बांधकाम तिथेच बांधण्याची परवानगी दिली जाईल.आणि माझे पण असे ठाम मत आहे, जितके बांधकाम गेले आहे. तेवढे बांधकाम ते बांधु शकतात. म्हणजेच रस्ता रूंदीकरणामध्ये जितके बांधकाम त्यांचे गेले आहे तेवढेच बांधकाम ते बांधु शकतील. हा निर्णय मानवतावादी दृष्टीकोनातुन घेतला गेला आहे.त्याला कायदेशिर असा काही पाया नाही. व ज्या लोकांनी जेवढे बांधकाम रस्तारूंदीरकणासाठी दिले. तेवढेच बांधकाम त्यांनी बांधले असेल तर महापालिकेतर्फे त्यांच्यावर काहीही कार्यवाही केली जाणार नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः- याचा अर्थ जितके त्यांनी बांधकाम दिले तेवढेच त्यांना देणार ना? या शहरात दोन-दोन मजली बांधकाम केले गेले त्याला तुम्ही अधिकृत मानणार नाही. या शहरात रस्ता रूंदीकरणामध्ये ज्या लोकांची घरे गेली त्यांना आम्ही तळमजला अधिक दोन अशी परवानगी दिली आहे. त्याप्रमाणे त्यांनी बांधकाम केले आहे. आपल्या म्हणण्यानुसार आपण दुस-या मजल्यावर कार्यवाही करणार. एक माळा ५० टक्याप्रमाणे बनतो. टांगती तलवार शहरवासियांवर नको. मा.महापौरजी, कृपया आपण याकडे लक्ष दया.

मा.महापौरः-आता जे आयुक्त सदनासमोर बोलले, रस्ता रूंदीकरणामध्ये जेवढे नुकसान झाले तेवढे बांधकाम ते बांधु शकतात त्यावर महापालिका मानवतावादी दृष्टीकोनातुन काही कार्यवाही करणार नाही. माझे त्यांना म्हणणे आहे. व सदनातील सर्व सदस्य माझ्या या बोलण्याला सहमत असतील. जे धोरण आम्ही लागु केले आहे या महापालिकेच्या कार्यकक्षेत ते धोरण कायम राहिले पाहिजे व जितके बांधले आहे त्यावर महापालिकेतर्फे काहीही कार्यवाही नाही झाली पाहिजे. व यासाठी सर्व सदस्यांचे एकमत आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-बरोबर? कारण की याच धोरणामुळे आम्ही शहरवासियांना आश्वासन दिले की तुम्ही रोड कटींगला सहकार्य करा आणि तुम्ही त्यावर दोन मजले बनवा. आता जर असे नाही बोललो तर चुकीचे होईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-यावर फक्त ऐवढे बोलायचे की, सदन व आयुक्त यांच्या विचारात अंतर आहे. हे अंतर तुम्ही स्वतःच्या स्तरावर ठिक करण्याचा प्रयत्न करा. नाही तर आपल्याला तरी मत बदजावे लागेल किंवा आयुक्तांना तरी पुन्हा हा चर्चेचा विषय नाही झाला पाहिजे. एकदा जे धोरण निश्चित झाले ते झाले. आयुक्त त्यास किती बांधील आहेत, नियम काय आहेत? आयुक्त व नियम हे पहावे लागेल. परंतु इथे ज्यांचा प्रश्न चालु आहे तो सोडुन वेगळया विषयावर चर्चा करणे  हे ठिक नाही. प्रश्न कंन्टिन्यु करा.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब मुदयावर येऊ. २३.१२.९७ नंतर बांधकाम केले हे खरे आहे का? ९६ मध्ये परवानगी त्याने दिली होती आणि २३.१२.९७ मध्ये बांधकाम चालु झाले आहे.त्याबाबत रेकॉर्ड उपलब्ध नाही. हे तुम्ही चुकीचे बोलत आहात. कारण आपणांस कक्ष अधिकारी मिनल पेडणेकर यांचे १६.६.९८ला पत्र आले आहे की, सरकारी भुखंड हडप होत आहे. त्यावर



कार्यवाही करा. मी जे बोलतो ते मी सिध्द करू शकतो. त्यानंतर २५.८.९८ ला परत त्यांचे पत्र आले की, भुखंडावर काय कार्यवाही केली. त्वरीत कार्यवाही करून आम्हाला त्याचा अहवाल दया. तरीपण तुम्ही काही उत्तर दिले नाही. नंतर ३०.९.९८ ला तुम्ही सेंन्ट्रल पोलिस स्टेशनला पत्र दिले की, आम्हाला पोलिस बंदोबस्त दया. त्याचा रेकॉर्ड तुम्हाला पोलिस स्टेशनात मिळेल.  तुम्ही जागा तोडण्यासाठी पोलिस बंदोबस्त मागितला होता. त्यानंतरही तुम्ही तोडण्यास गेलात नाहीत फक्त नावा पुरताच बंदोबस्त मागितला. लेटर इन्वर्हड केले आणि नंतर सांगितले की पोलिस बंदोबस्त उपलब्ध नव्हता. तेव्हा आपल्याला मिळाले नाही. नंतर आपण ६.११.९८ ला परत डि.सी.पी साहेबांशी मिटींग घेऊन आपण पोलिस बंदोबस्त मागितला. काय कार्यवाही केली आपण? यासर्व गोष्टी तुम्हाला रेकॉर्डवर मिळतील. पोलिस रेकॉर्डवर मिळतील, मंत्रालयातील रेकॉर्डवर मिळतील जर तुमच्याकडे रेकॉर्ड नसतील तर.

मा. उप आयुक्त (श्री. एस.एस. पानपट्टे):-साहेब आम्ही तर त्यावेळी नव्हतो. आम्ही तपासणी करून त्यावर कार्यवाही करू.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही नव्हता तर कोण होते? संचिका गायब झाली याला जबाबदार कोण? आयुक्त साहेब त्यावर कार्यवाही करतील का? पोलिस तक्रार करतील का? आयुक्तांनी यावर उत्तर दयावे. ही जी पीसी गायब झाली. किती अहवाल आहेत त्यात. परवानगी फक्त ६३४ चौ. फुट दुकानवाल्यांना दिली. दुरूस्ती परवानगीचा अर्थ काय होतो. हे तर सांगा.

मा. उप आयुक्त (श्री. एस.एस. पानपट्टे):-जे रस्ता रूंदीकरणामध्ये गेले ते दुरूस्त करण्यासाठी....

मा.सदस्य श्री. राजेंद्र सिंह भुल्लरः-दुरूस्ती परवानगीचा अर्थ तर सांगा ना?

मा. उप आयुक्त (श्री. एस.एस. पानपट्टे):-जे रस्ता रूंदीकरणामध्ये गेले तेवढे ते दुरूस्त करू शकतात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र सिंह भुल्लरः-१३.७.८७ला विनोद नारायणदास यांना परवानगी दिली आहे. त्यावेळी त्यांनी बनविले. त्यानंतर पुन्हा त्यांनी परवानगी मागितली त्यावेळी पुन्हा ९६ ला तुम्ही परवानगी दिली. श्री. शामलाल जिवतराम यांना. त्या दोघांचा आपसात काय मेळ आहे.

मा. उप आयुक्त (श्री. एस.एस. पानपट्टे):-ते माहित नाही परंतु कागदपत्रात त्यांचे नाव आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कोणाचे नाव आहे?

मा. उप आयुक्त (श्री. एस.एस. पानपट्टे):-सेवलदासच्या नावाने परवानगी दिली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-शामलाल कोण आहे? विनोद नारायणदास कोण आहे? त्यांचा काय ताळमेळ आहे. सनद कुणाच्या नावाने आहे तिथे? २०.२.२००१ला पुन्हा बांधकाम चालु होते. यांचे उत्तर आहे. हे लोक पहायला गेले तेव्हा तिथे बांधकाम चालु होते.यांचाच रेकॉर्ड आहे. रेकॉर्ड असुन सुध्दा तिथे जे बांधायचे आहे ते बांधले गेले.



मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः'-महापौर साहेब, एक मिनिट.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-दुरूस्ती परवानगी पाच-पाच वर्ष चालते का?

मा.महापौरः-महाराजजी, यासर्व गोष्टींचा खुलासा आपण वेगळया त-हेने घ्या. आयुक्तांशी पत्रव्यवहार करून त्यांच्याकडुन हे उत्तर घ्या.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-महापौरजी,...

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-एक मिनिट. हा जो प्रश्न चालु आहे,मला हे म्हणायचे आहे की, ९६-९७मध्ये सत्ता कुणाची होती? त्यावेळेस हा जो घोळ झाला आहे. त्यावेळी महापौर कोण होते, सत्ता कुणाची होती? त्यावेळी का नाही विचारले, आता त्यांच्या हे कसे लक्षात आले.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-शासन जर कुणाचे होते तर त्यांना तुम्ही प्रश्न विचारायचा होता ना?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौरजी,

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-नकाशा तुमच्या कालावधीत पास झाला. संचिका पण तेव्हाच गायब झाली. तेव्हा सत्ता तुमची होती आणि तुम्ही आम्हाला विचारत आहात.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा.महापौर, तुमच्या लक्षात असेल याबाबतच मी प्रश्न विचारला होता. दिड वर्ष त्यांना प्रश्न विचारला होता.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते तमेज समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-९७मध्ये तो कुणाचा प्रभाग होता.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-९७मध्ये कुणाचे शासन होते? कुणाचे राज्य होते?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-एक मिनिट.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते तमेज समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, मला फक्त सेवल ठाकुरना हे विचारायचे आहे. रस्त्यांच्या खराब अवस्थेला....

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-आता रस्त्यांचे काय सांगता. आता तो विषय नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-सभापती आर.पी.आय.चे आहेत. रस्त्यांची अवस्था....



मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-९७मध्ये काय झाले ते सांगा. कुणाचे राज्य होते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-बरोबर बरोबर.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-संचिका तुम्ही हरवल्या आहेत.

मा.महापौर:-एक सेकंद आता माझे ऐका. आपण जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर तुम्हाला मिळाले आहे. जितके पण पुरक प्रश्न आहेत हे तुम्ही आयुक्तांशी पत्रव्यवहार करून त्याचे उत्तर घ्या. किंवा वेगळा प्रश्न टाका. आता हा प्रश्न संपवा.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-याच बांधकामाविषयी ५.१०.९८ला श्री. सेवलदास ठाकुर यांची तक्रार आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-एक मिनिट सिध्द करून दाखवा. सांगा काय तक्रार आहे ते.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरजी, सेवलदास ठाकुर यांनी सांगितले की, ९६-९७मध्ये कुणाचे राज्य होते? भले आमचे शासन होते. आम्ही आता पण म्हणतो पोलिस तक्रार करा. ऐवढी हिम्मत आहे का यांची असे म्हणण्याची.

इकडे सदस्य हे हे, म्हणुन ओरडत असताना...

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-भाजी बाजारात आला आहात का?

मा.महापौर:-महाराजजी, आपला प्रश्न इथे संपणार नाही....

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-महापौरजी, एक मिनिट मला बोलु दया.

मा.महापौर:-एक सेकंद तुम्ही खाली बसा. मला बोलु दया.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-मी चारदा आपणाकडे परवानगी मागितली आहे.

मा.महापौर:-महाराजजी, आपले आठ-दहा पुरक प्रश्न आहे एका प्रश्नामागे. आपण त्यासाठी आयुक्तांशी वेगळयाने पत्र व्यवहार करावा.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-महापौरजी, प्रत्येक महासभेच्या प्रश्नाचे यात-हेने उत्तर देणार का? एकटयात देणार का?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-संचिका हरवली आहे त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

मा.महापौर:-कार्यवाही करतील तुम्ही लिखित मध्ये दया.

--३६--

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-महापौरजी,महासभेच्या प्रश्नाचे एकटयामध्येच निर्णय घेणार का?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-बरोबर आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-महापौर मी आपणांस विचारते, महासभेच्या प्रश्नावर महासभेत चर्चा न करता तुम्ही प्रत्येकवेळी एकटयानेच त्यावर चर्चा कराल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-तुम्ही सदनामध्ये उत्तर दया.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-या त-हेने तुम्ही प्रत्येकवेळी अवैध बांधकामांना संरक्षण दिले आहे. आता पण देत राहणार?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-यु कॅन नॉट ॲडव्हाइस अ परसन नॉट टु ऑस्क ॲट टू रेज दी क्वश्चन इन जनरल बॉडी.

मा.महापौर:-आय नेव्हर से दॅट. मी पुरक प्रश्नाविषयी बोलत आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-दुसरे असे की, प्रश्नावर जे उपप्रश्न तयार होतात त्याचे उत्तर देखिल महासभेतच मिळाले पाहिजेत. हि महापालिकेची संपत्ती आहे.

मा.महापौर:-तुम्ही विचारलेल्या प्रश्नावर अधिकारींची देखिल तयारी पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-सर वुई आर क्युरीयस अबाऊट प्लॉट.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-पुढच्या महासभेत तयारी करून या.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आयुक्तांना सांगा याची चौकशी करून या.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-अधिकारींना सांगा याची तयारी करून या. पुढच्या सभेत ठेवा.

मा.महापौरः-आयुक्त साहेब, तुम्ही उत्तर दया.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, प्रश्न क्र. ५८४ यावर सभागृहात चर्चा होत आहे. हे जे अनाधिकृत बांधकाम उल्हासनगरमध्ये झाले आहे.याबाबत आपणांसर्वांना माहित आहे शासनाने नंदलाल समितीची नियुक्ती केली होती. व या समितीच्या कार्यकक्षेत अनाधिकृत बांधकाम हा पण विषय होता. व ज्या लोकांनी कर्मचा-यांनी किंवा अधिका-यांनी अनाधिकृत बांधकामासाठी जे पण जबाबदार होते त्यांच्या विरोधात नंदलाल समितीस चौकशी करण्यास सांगितले होते. व ती चौकशी प्रगतीपथावर आहे. जे या चौकशीत जबाबदार असतील त्यांच्या विरूध्द कार्यवाही केली जाईल. व हा जो प्रश्न आहे त्याचे लेखी स्वरूपात उत्तर दिले आहे. याचे जे पुरवणी प्रश्न आहे. जर सन्माननिय सदस्यांना उत्तर हवे असेल तर त्यांना जेव्हा वाटेल तेव्हा ते नविन प्रश्न विचारू शकतात तशी कायदयात तरतुद आहे. व त्याचवेळी त्यांना त्यांच्या प्रश्नांचे पुर्ण उत्तर दिले जाईल.



मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-स. महापौरजी, हे प्रश्न दुस-या महासभेत घेतले जावे. मी जे काही विचारले आहे ते नमुद झालेले आहे. त्याचे उत्तर पुढच्या महासभेत देण्यांत यावे. मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. नंदलाल समितीचे यांनी नाव काढले आहे. त्या समितीत या बांधकामाचा उल्लेख देखिल नाही आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-या प्रश्नावर जे उपप्रश्न आहेत त्या उपप्रश्नांची चौकशी करून पहिल्या येणा-या सभेत विशेष असो वा सर्वसाधारण त्या सभेत उत्तर दया. महापौरजी, हे योग्य नाही का?आयुक्त वेगळेच काहीतरी बोलत आहेत.

मा.महापौरः-तुम्ही आयुक्तांना विचारा ते तुम्हाला उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पुढच्या महासभेत घ्या ना. इतिवृत्तात माझे सर्व उपप्रश्न आले आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आयुक्त साहेब आपण उत्तर दया. त्यांनी विचारलेल्या उपप्रश्नांची चौकशी करून पुढच्या महासभेत उत्तर दया. आपण त्यांना सांगता प्रश्न विचारा, प्रश्न तर विचारून झाले ना?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय,ज्या संचिकेविषयी हे बोलत आहेत की, ती संचिका हरवली असे सन्माननिय सदस्य व अधिकारींनी सागितले आहे. त्याविषयी पुर्ण चौकशी केली जाईल. व त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-या प्रश्नाला पुढच्या महासभेत घ्या. या प्रश्नाचे पुर्ण उत्तर नाही दिले. हे चुकीचे आहे. गोलमाल करत आहेत त्याचा बचाव करीत आहेत. अधिकारी लोक त्या बांधकामांना संरक्षण देत आहेत. ती या सर्वांची मिली भगत आहे.

मा.महापौरः-आपणांस आयुक्तांनी उत्तर दिले ना?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-नाही साहेब.

मा.महापौरः-कसले उत्तर आपणांस हवे आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आयुक्त साहेबांनी काय उत्तर दिले की, संचिका हरविली आहे. ज्यांनी हरवली आहे अशा अधिका-यांवर कार्यवाही केली जाईल. परंतु बांधकामाचे काय करायचे त्याविषयी त्यांनी उत्तर कुठे दिले?

मा.महापौरः-आयुक्तांना विचारा.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-महापौर साहेब,अनाधिकृत बांधकामाचा ज्यावेळी विषय येतो तेव्हा महापौर साहेब अधिकारींना किंवा इतर कुणाला कंन्सीडर करतात. का अनाधिकृत बांधकामात आपणास काही स्वारस्य आहे का?

मा.महापौरः-माझे कुठेच स्वारस्य नाही.



मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-मग कशाला तुम्ही असे करता? चर्चा चालली आहे तर होऊन जाऊ दे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आयुक्त साहेब, आपण पण अनाधिकृत बांधकामाचा जेव्हाही विषयी निघतो तेव्हा तुमची भुमिका खुप शांत आणि थंड असते. तुम्ही ॲग्रेसिव्ह भुमिका घेत नाहीत. की मी तोडेन हे चुकीचे आहे. असे आपण म्हणत नाहीत. आपल्याला त्यात स्वारस्य आहे का?

मा.महापौरः-ते शांत राहुन ॲगेसिव्ह भुमिका करतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मी त्यांना विचारत आहे त्यांचे काही स्वारस्य आहे का तर ते काही उत्तर देखिल देत नाहीत.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय,...

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौरः-प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-माझा प्रश्नांशी संबंधित प्रश्न नाही आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, आयुक्तांना मी जे म्हणालो त्याचे स्पष्टीकरण देण्याची संधी तरी दया. हे त्यांच्यासाठी खुप महत्त्वाचे आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-एका तासात एकच प्रश्न चालला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आयुक्त साहेब, आपण यावर उत्तर देणे महत्त्वाचे आहे.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगेः-जर तुम्ही शांत आहात तर तुम्ही मान्य करा. मान्य करा की, तुम्ही त्यांना संरक्षण देत आहात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्त १९९७ साला विषयी काय बोलु शकतील.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय,सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी जे म्हणाले अनाधिकृत बांधकामाविषयी आयुक्तांची कार्यवाही

करण्याची पध्दत चांगली नाही. हे चुकीचे आहे. तो आरोप मी अमान्य करतो. मागील तीन महिन्यात २५९ अनाधिकृत बांधकामे तोडली गेली आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपण...

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-हो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आपण यादी दया.



मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-हे जे म्हणतात आमची कार्यवाही करण्याची पध्दत थंड आहे हे चुकीचे आहे. हे मी अमान्य करतो. आणि याविषयी मी हे म्हणु इच्छितो की, जे काही अनाधिकृत बांधकाम आहे त्याविषयी चौकशी केली जाईल व त्याविरूध्द योग्य ती कार्यवाही केली जाईल.

मा.सचिव:-प्रश्नोत्त्तराचा तास संपला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-आम्ही विशेष सभा बोलावू तेव्हा हा प्रश्न पुन्हा घेऊ.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-एका तासात फक्त एकच प्रश्न झाला आहे.

मा.महापौर:-उल्हासनगर शहर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष यांच्याकडुन माझ्याकडे एक सुचना आली आहे. ती महापालिकेतील कॉंग्रेस गटनेता म्हणुन श्री. सेवलदास ठाकुर यांना नियुक्त केले जाते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-अच्छा म्हणुन अभिनंदन...

मा.महापौर:-म्हणुन आम्ही त्यांचे अभिनंदन करीत आहोत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-स्वत: विचारलेले प्रश्न त्यांनी विसरू नयेत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-आमच्या तर्फे तुम्हाला अभिनंदन. मा. महापौर साहेब, मागच्या वेळेस भुल्लर महाराज यांनी लक्षवेधी आणली होती. आमच्या इथे पुर आणतो त्याविषयी नाला काढु असे सांगितले अजुन काही झाले नाही.

इकडे महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, इतर सर्वांनी श्री. सेवलदास ठाकुर यांना अभिनंदन केले.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सहयोगी मी एका हरकतीच्या मुदयाकडे लक्ष वेधले आहे. महानगरपालिका एम. आय.डी.सी ला नियमित रूपाने पाण्यापोटी देय असलेली रक्कम वेळोवेळी न भरल्याने एम.आय.डी.सी कडून पाणी पुरवठ्यात कपात करण्यात येत आहे. त्यामुळे उल्हासनगर रहिवाश्यांना त्रास होऊ नये म्हणुन हरकतीचा मुददा व मला महापौरांनी बोलण्याची परवानगी दिली आहे. कित्येक दिवसांपासुन या महापालिकेत वारंवार हा प्रश्न येतो की, आयुक्त साहेब किंवा प्रशासन पाण्याचे बिल एम.आय.डी.सी.ला वेळेवर देत नाहीत. म्हणुन शहरात पाण्याची कपात केली जाते. मागे काही दिवसापासुन कमीत कमी या दोन महिन्यात अशी स्थिती आहे की, पावणे तीन करोड आम्ही लोकांनी जुलैचे २लाख व जुनचे पाऊण लाख दिले नव्हते. म्हणुन एम.आय.डी.सी. वाल्यांनी पाणी कपात केली आहे. कॅम्प नं. १ ते ५ पुर्ण शहरात लोकांना याचा त्रास भोगावा लागत आहे. आजपण ४ व ५ कॅम्पमध्ये तेथील रहिवाशींनी स्वत: मोर्चा काढला. आपल्या पाण्याचे सप्लायर्स तिथे गेले होते अशी माहिती मिळाली

होती. लोकांची प्रतिक्रिया अशी आहे. आणि वारंवार असे होते. पहिले पण असे झाले होते. फेब्रुवारीतपण लोकांनी उपोषण केले होते. त्यानंतर त्यांना पेमेंट देण्याचे काम नियमितपणे आर.डी.शिंदे साहेबांच्या कालावधीत झाले. आता तर या शहरात चालियाचा महोत्सव चालू आहे, २४ ऑगस्ट, २६ ऑगस्ट, २७ ऑगस्ट लाखो भाविक पाण्यामध्ये डुबकी दयायला येतात. त्यानंतर दोन दिवसानंतर ११ दिवस गणपती उत्त्सव आहे. वारंवार महापालिकेच्या



असफलतेमुळे वेळेवर पैसे न भरल्यामुळे असे होते. कारण आपण शासनाकडे हे मान्य केले आहे. म्हणून कमीत कमी महापालिकेकडुन तरी चुकी नाही झाली पाहिजे. त्यामुळे महापालिकेची प्रतिमा शहरात सुध्दा खराब होत आहे. लोंक म्हणतात तुम्ही पैसे नाही भरत आणि आमच्यावर कार्यवाही करतात. कमीत कमी महापालिकेने तरी पेमेंट नियमित दिले पाहिजे. जर आपणास यावेळी पैशाची अडचण असेल तर आयुक्तांनी वैयक्तिक इंन्टरेस्ट घेंऊन एम.आय.डी.सी. च्या वरिष्ठ अधिका-यांशी चर्चा करुन शहरात पाण्याची कपात नाही झाली पाहिजे. त्याबरोबर अजून एक गोष्ट जानेवारी फेब्रुवारीमध्ये महापौरांच एक वक्तव्य होत एक वर्तमानपत्रात की, वीस एम.एल.डी. पाणी आम्ही पास करुन घेतले आहे. ते पाणी कुठे गेले? परंतु आतापर्यंत पाणी वाढण्याऐवजी पाण्याची कपात मात्र करत आहे. कमीत कमी पाणी वाढवून देऊ नका परंतु पाण्याची कपात तरी करु नका. मंत्रीमहोदयांजवळ, सरकार कडे जाऊन आपण पाणी मात्रा वाढविली तर जास्त चांगले होईल. महानगरपालिकेच्या चुकीमुळे आमच्या पाण्याची कपात होऊ नये याच्यावर पर्यायी उपाय केला पाहिजे हे आयुक्तांनी पाहिले पाहिजे. अशी माझी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-</u> मा. महापौरजी एक मिनिट, मी चालिया साहेब मंदिराविषयी दोन मिनिट बोलू इच्छितो. की, कॅम्प नं. ५ येथे झुलेलाल यांचे जे मंदिर आहे, जे चालिया साहेब नावाने ओळखले जाते. तिथे जी अखंड ज्योत तेवत असते, ते आमच्या सिंधी समाजाने पाकिस्तान मधून आणले आहे. हे मी सदनाला सांगू इच्छितो की, ही जी ज्योत कॅम्प नं. ५ येथे तेवत आहे झुलेलाल मंदिरात. आमच्या सिंधी समाजाने पाण्याच्या जहाजातून त्यांना आणले होते. लाल साई झुलेलाल यांचे आमच्या सिंधी समाजात फार मोठे महत्त्व आहे. संपूर्ण हिंदुस्तानात सर्वात मोठी जत्रा येथेच भरते. आम्ही यास छोटा कुंभमेळा म्हणून संबोधतो. रविवार २६ तारखेला होणार आहे. २४ तारखेला दोन नंबर झुलेलाल मंदिर येथे आहे, आमच्या कॅम्प नं. ५ च्या चालिया ट्स्ट ची जी जत्रा आहे,जी ज्योत तेथुन आणली होती, तेथिल यात्रा जी आहे, ती रविवारी २६ तारखेला आहे. तर या यात्रेसाठी चालिया साहेब यांच्यातर्फे आम्ही सर्वांना निमंत्रण देतो की, तिथे येऊन दर्शन घ्यावे, संध्याकाळी ५.०० ते ११.०० वाजेपर्यंत आम्ही तेथे उपस्थित रहातो. सर्व सदस्य व अधिका-यांनी तिकडे येऊन दर्शन घ्यावे, व ही खुप मोठी आनंदाची गोष्ट आहे की, पहिल्या दिवशी चालिया साहेबांची जत्रा जेव्हा चालू झाली तेव्हा आम्ही आयुक्त साहेब, महापौर साहेब, पाणपटटे साहेब यांच्याकडे आलो होतो, त्यांनी आम्हाला फायर ब्रीग्रेड, पाणी व सफाई यांची जी सोय करुन दिली, त्याबाबत आमच्या चालिया साहेबांच्या ट्स्टतर्फे आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. २६ तारखेला आम्हाला याप्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाव्यात. खास करून विद्युत विभागाच्या श्री. मुकेश आयलानी साहेबांचे आम्ही आभारी आहोत. ज्यांनी आम्हाला पुर्ण सहकार्य दिले. बाकी थोडे फार सार्वजनिक बांधकाम विभागाचे बाकी आहे. त्याबाबत श्री. चिजवानी साहेब आम्हाला सहकार्य देतील. यासाठी मी सर्वांना पुन्हा एकदा निमंत्रण देतो की, तेथे एक वेळ जरूर येऊन दर्शन घ्यावे. जय झुलेलाल.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्र राजानीः-</u>पाण्याचे काय झाले?

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-आता मी चालीया साहेबांबाबत जे बोललो तेथे पाणी आहे.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा.महापौरजी, २ नंबरचा चालीया १४ तारखेला आहे. व यासाठी नगरपालिकेच्या कालावधीत नगरपालिका



कार्यालयास त्यादिवशी अर्ध्या दिवसाची सुटटी दिली जात होती. तर यावेळी सुध्दा चालीयाच्या दिवशी अर्धा दिवसाची सुटटी दिली जावी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- मा.महापौरजी, आता श्री. पंजाबी साहेबांनी जो प्रश्न विचारला तो अतिशय महत्त्वाचा विषय आहे. शहरामध्ये पाणी पुरवठा भलेही वाढला नाही तरी पाणी पुरवठयामध्ये कपात होऊ नये. यास सर्व सदस्य सहमत आहेत. महापौरांची सुध्दा ही फार मोठी उदारता आहे की, पॉइंट ऑफ ऑर्डर केल्यानंतर सुध्दा हा प्रश्न उपस्थित करण्यास परवानगी दिली आहे. कारण की, महापौरांना सुध्दा गंभीर स्वरूपाचा वाटला. तर यासाठी आम्हाला जसे माहित झाले आहे की, कॅम्प ४ व ५मध्ये पाण्याची समस्या होती. दुपार नंतर पाणी पुरवठा पुर्ववत झाला आहे. असे आम्हाला मा. महापौर व अधिका-यांनी सांगितले. यानंतर सर्व गोष्टी बाजुला ठेऊन एम. आय.डी.सीच्या पाणी बिलाची रक्कम त्यांना वेळच्या वेळी दिली गेली पाहिजे. शहरात सर्वात मोठा मुददा पाणी पुरवठयाचा आहे. त्यास सर्व सदस्य सहमत आहेत. व प्रत्येक सदस्यांच्या प्रभागात पाण्यासाठी ओरड होत असते. पाच सहा दिवसापुर्वी कॅम्प ४ व ५ मधील स्थिती अतिशय खराब होती. मा. महापौरांनी संबंधित अधिका-यांना फोन करून जी कार्यवाही केली त्यामुळे पाणी पुरवठा पुर्ववत झाला आहे. मा.महापौरांच्या या प्रयत्नांची आम्ही प्रशंसा करतो. व आम्ही आयुक्त साहेब व महापौरांना अशी विनंती करतो की, एम. आय.डी.सी.च्या पाणी बिला पोटी दरमहा दिड कोटी व ५० लाख रू. थकबाकी पोटी असे एकुण दोन कोटी रू. दरमहा कोणत्याही परिस्थितीत एम.आय.डी.सी. ला पोच केले जावेत. जेणे करून पाण्याची कपात होऊ नये. महानगरपालिका एम.आय.डी.सीचे पाणी बिलाची रक्कम देत नाहीत त्यामुळे एम.आय.डी.सी. पाणी पुरवठयात कपात करते. मात्र नागरिक याबाबत सदस्यांना विचारणा करत असतात. लोक मोर्चा घेऊन नगरसेवकांकडे जातात. हे वर्ष निवडणुकांचे वर्ष आहे. तरी कृपया करून एम.आय.डी.सीच्या पाणी बिलाची रक्कम वेळच्यावेळी दिली जाईल ऐवढे आम्हाला आश्वासन दिले जावे. व आयुक्त साहेबांनी हे आश्वासन दयावे. इतर जी काही कार्यवाही असेल ती त्यांनी करावी. परंतु एम.आय.डी.सी. ला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे.

मा.महापौरः-सन्माननिय सदस्य श्री. पंजाबी साहेब यांनी जी पॉइंट ऑफ ऑर्डर दिलेली आहे. त्याबाबत मी सहमत आहे. शहरामध्ये पाण्याची जी टंचाई निर्माण झाली होती त्याबाबत आयुक्तांशी माझे बोलणे झालेले आहे. उपमहापौरांशी सुध्दा बोलणे झालेले आहे. आयुक्तांशी चर्चा झाली त्यावेळी त्यांनी मला जो खुलासा दिला की, एम.आय.डी.सी. चे मुख्य कार्यकारी अभियंता श्री. जयवंत कावडे आहेत यांच्याशी चर्चा करून त्यांना विनंती केली होती की, पेमेंट देण्यामध्ये भलेही थोडाफार उशिर झाला आहे. परंतु पाणी पुरवठयामध्ये कपात होता कामा नये. त्यांनी आपल्या कनिष्ठ अधिका-यांना असे निर्देश दिले होते की, उल्हासनगर महानगरपालिकेस ११०एम.एल.डी. पाणी देण्यास जी मंजुरी दिलेली आहे त्यानुसार तेवढे पाणी त्यांना दिले गेले पाहिजे. व जी कपात आहे ती पुर्ववत झाली पाहिजे. परंतु दुर्दैवाने कनिष्ठ अधिका-यांनी काही दिवसापर्यंत त्या आदेशाची कार्यवाही केली नाही. परवा मी आयुक्त साहेबांशी चर्चा केली त्यानंतर श्री. कावडे साहेबांशी व एम.आय.डी.सी चे मुख्य अभियंता श्री. धोते यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार आज पाणी पुरवठा पुर्ववत झाला आहे. अशी मला माहिती मिळाली आहे. व धोते साहेबांशी माझी जी चर्चा झाली आहे. मी

त्यांना सांगितले की महापालिकेकडुन पेमेंट येण्यास कधी कधी उशीर होतो. परंतु याचा अर्थ असा नाही की आपण शहराच्या पाणी पुरवठा कापुन टाकावा हे बरोबर नाही. तर त्यांनी

--४२--

मला असे आश्वासन दिले आहे की, हे भविष्यात असे होणार नाही. व त्यांनी मला सांगितले आहे की, गणपती उत्त्सवानंतर येऊन आमचे मुख्य कार्यकारी अभियंता श्री. जयवंत कावडे यांच्या समवेत आपण सभा घेऊ शकता तर असे मला वाटते की, आमच्या सभागृहात सर्व पक्षांची जी नेते मंडळी आहे. उपमहापौर व बाकी सर्व पक्षांचे नेते यांचे एक शिष्टमंडळ गणपती उत्त्सवानंतर त्यांनी बोलावले आहे. तसेच आयुक्तांना माझे हे सांगणे आहे की, एम.आय.डी.सीच्या पेमेंटला अग्रक्रम देण्यात यावा. हे पेमेंट थांबिवले जाऊ नये कारण त्यामुळे पाणी कपात होऊन शहरवासियांना वारंवार असुविधा होत असते. असे भविष्यात होऊ नये असे मी त्यांना सांगितले आहे. व मला याची पुर्ण खात्री आहे की, आयुक्त साहेबांनी इतर पेमेंट थांबवुन एम.आय.डी.सी. च्या पमेंटला प्राधान्य द्यावे. जेथपर्यंत पाणी पुरवठा वाढविण्याचा प्रश्न आहे , त्याबाबत सुध्दा मी एम.आय.डी.सीच्या अधिका-यांशी मागील आठवडयात चर्चा केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, १० एम.एल.डी. पाणी वाढवुन देण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांचा जो आदेश आहे. त्यास आम्ही तयार आहोत. व या पावसाळयानंतर आम्ही ते वाढवुन देऊ शकतो. परंतु त्यासाठी एम.आय.डी.सी ला धरण बांधण्यासाठी जी गुंतवणुक करावी लागते. त्यासाठी त्यांना महापालिकेकडुन ठराविक काही रक्कमेचे पेमेंट पाहिजे. पुढच्या वेळी आयुक्त व मी जेव्हा एम.आय.डी.सीच्या सभेत जाऊ तेव्हा त्यांच्याकडुन या गोष्टीचा खुलासा करून घेऊ. किती पेमेंट पाहिजे व कोणत्या प्रकारे? जेणेकरून १०एम.एल.डी. पाणी आम्ही शहरास वाढवुन देऊ शकु त्यासाठी आम्ही पुर्ण प्रयत्न करू.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा.महापौरजी, एक सुचना आहे. आपणांस माहिती देऊ इच्छितो की, एन.आर.सी. (नॅशनल रेयॉन कार्पोरेशन)ने पाणी घेण्याचे एक दोन महिन्यापासुन बंद केले आहे. असे त्यांनी शासनाला तसे लेखी कळविले आहे. ते ३१ . ५ एम.एल. डी. पाणी ते घेत होते. त्यांना पाण्याची गरज नाही. त्यांनी पाणी घेण्यांचे बंद केले आहे. व त्यासाठी कल्याण महानगरपालिका प्रयत्न करत आहे. तेथील लोक पाणी वाढवुन घेण्यासाठी नगरविकास राज्यमंत्री श्री. सुनिल तटकरे यांनाही भेटले आहेत. आपणांस ही अतिशय चांगली संधी आहे. मी आपणांस सल्ला देतो की, ते ३१ . ५ एम.एल. डी. पाणी उपलब्ध आहे ज्यासाठी आपणांस पैसे सुध्दा दयावे लागणार नाहीत. शहराच्या हितासाठी मी आपणांस असा सल्ला देतो व आयुक्त साहेबांना सुध्दा विंनती करतो की, हा मुददा शासनाकडे उपस्थित करा. ३१ . ५ एम.एल.डी. पाणी अतिरिक्त पडुन आहे. तर विना पैशाने आपण याचा फायदा घेऊ शकतो. जर आपण दोघांनी मेहनत केलीत तर?

<u>मा.महापौरः-</u>सर्व पक्षीय नेत्त्यांचे शिष्टमंडळ घेऊन जाऊन जेणेकरून शहरास पाणी वाढवुन मिळु शकेल.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी, श्रीमती. पन्ना वारिंगे, श्रीमती. यशस्विनी नाईक सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा.महापौरजी, एक सुचना आहे की, महानगरपालिकेचे उत्त्पन्न व खर्च यामध्ये थोडीफार तफावत आहे. तर त्यात उत्त्पन्न वाढविण्यासाठी अशी एक सुचना आहे की, आपल्या शहराच्या सरहददीचा जो भाग आहे, कल्याण व उल्हासनगरच्या सरहददी वरील, तेथील लोक पाण्याची, लाईटची व इतर अनेक सुविधा उल्हासनगर मधुन घेतात. व कर मात्र भरतात कल्याणमध्ये. तर जेथे जेथे अशी प्रकरणे आहेत, तर मेहरबानी करून तो विभाग उल्हासनगर महानगरपालिकेत समाविष्ट करून व त्यांच्याकडुन मिळकत कर घेतला गेला तर त्यातुन आपले उत्त्पन्न वाढु शकेल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी, श्री. प्रकाश माखिजा, श्री. वाघे श्यामु सभागृहातुन बाहेर पडले.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-एमआयडीसी शी आमची बोलणी चालु आहे. आमचे शिष्टमंडळ जाईल, आम्हाला पाणी वाढवुन मिळेल, व त्यानंतर आमची पाणी कपात होणार नाही, जी पाणी कपात झाली होती ती पुर्ववत होणार असल्याचे आश्वासन आपण दोघेही देत आहात. परंतु त्या व्यतिरिक्तही जो पर्यंत ही कार्यवाही पुर्ण होईल तोपर्यंत त्यास कदाचित एक महिना, दोन महिने असा कालावधी लागु शकतो, आज आम्ही शिष्टमंडळ घेऊन गेलो. व उदयाच आम्हाला पाणी वाढवुन मिळेल. अशी काही संभावना नाही. तोपर्यंत आमची जी वितरण प्रणाली आहे. ती कार्यवाहीत आणण्यासाठी आमचे कनिष्ठ अभियंत्त्यांपासुन जे अधिकारी आहेत त्यांनी सक्रियता दाखविली पाहिजे. त्यांनी अधिक प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. त्यांनी हे काम अत्यावश्यक सेवा म्हणुन केले पाहिजे. त्यांनी २४ तास हे काम केले पाहिजे. येथे परिस्थिती अशी आहे की, कुण्या नगरसेवकास पाणी पुरवठ्याबाबत काही तक्रार असेल तर कुणास संपर्क साधावा? हे कळत नाही. अधिकारी आपल्या कार्यालयात उपस्थित रहात नाहीत. आज सकाळी कॅम्प ५ येथिल पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयात गेलो होतो. तेथे तीन-चारशे लोक उभे होते परंतु कुणीही अधिकारी उत्तर देण्यासाठी तेथे उपस्थित नव्हता. आपणास टेलिफोनवरून मी संपर्क साधला होता, तीन चार तास तेथे उभे राहिल्यानंतर सुध्दा एक सुध्दा अधिकारी उत्तर देण्यासाठी उपस्थित झाला नाही. त्यानंतर चिजवानी यांना पाठविण्यात आले. परंतु तेथील ज्या अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे, ज्यांना तेथे काम नेमुन देण्यात आलेले आहे, त्या अधिका-याला कॅम्प ४ किंवा ५ मध्ये अशी माहिती मिळाली नाही काय की त्याठिकाणी तीन-चारशे लोक जमा झाले असल्याने मला तिथे गेले पाहिजे. व पाण्याचा प्रश्न असा आहे की, महिला जेव्हा आपल्या मुला-बाळांना सोडून जेव्हा रस्त्यावर येतात तेव्हा शांतता आणि सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण होते आणि ते तर या पावसाळयाच्या हंगामात , भर पावसाळयात आमच्या शहरात पाण्याची टंचाई निर्माण होते ती केवळ पाणी कपातीमुळे नाही तर ती टंचाई आमच्या असमतोल पाणी वितरणामुळे आहे. कित्त्येक प्रभागात, मी तर हे म्हणतो की, प्रत्येक प्रभागात कुठला ना कुठला असा एक विभाग आहे, तेंथे पाणी पुरवठ्याची ही ज्वलंत समश्या आहे. त्याची सोडवणूक करण्यासाठी काही ना काही गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्वरीत योजना तयार केली पाहिजे. येणा-या दोन-तीन दिवसामध्ये आयुक्तांच्या स्तरावर केवळ या पाणी पुरवठ्याबाबत चर्चा केली जावी. ती अधिका-यां बरोबर, नगरसेवकां बरोबर, महापौरां बरोबर त्याचे त्वरीत सोडवणुक करून. लोकांच्या समस्येचे निवारण केले पाहिजे. बाकी श्री. लाल पंजाबी यांनी जे सांगितले की, एन. आर.सी चे पाणी आपणांस मिळु शकते. एमआयडीसी कडे आम्ही शिष्टमंडळ घेऊन जाऊ वगैरे हे सर्व बरोबर आहे. ती दिर्घ स्वरूपाची कार्यवाही आहे परंतु अल्प मुदतीची काहीतरी कार्यवाही झाली पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. मोना वनवारी, श्रीमती. बेबी वसिटा, श्रीमती. जया साधवानी या सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, गेल्या चार-पाच दिवसांमध्ये एमआयडीसी.चे काही बिल आपण न दिल्यामुळे अचानकपणे पाण्याचा पुरवठा कमी करण्यांत आला होता. याची माहिती मिळाल्यानंतर आम्ही लगेच मी स्वतः, जे एन. कावडे जे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत यांच्याशी संपर्क केला. त्यानंतर जे एमआयडीसी.चे मुख्य अभियंता आहेत श्री. धोते यांच्याशी सुध्दा मी संपर्क साधला. तसेच आमचे नगरविकास विभागाचे जे प्रधान सचिव आहेत, श्री. रमानंद तिवारी व ए.पी.सिन्हा यांच्याशी सुध्दा मी संपर्क साधला. व पाणी पुरवठा पुर्ववत करण्यात मला यश आले. मी आपणांस मागील महासभेत सांगितले होते की, महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. त्यामुळेच आम्ही एमआयडीसी.चे पेमेंट करू

शकलो नाही. पाणी पुरवठ्याबाबत शासनाचे आदेश आताच प्राप्त झाले आहेत. यापुर्वी सुध्दा आदेश होते. परंतु शासनाने आता अत्त्यंत कडक स्वरूपात आदेश दिलेले आहेत. प्रत्त्येक शहराचा व प्रत्त्येक महापालिकेचा पाणी पुरवठा हा ना नफा ना तोटा या तत्त्वानुसारच झाला पाहिजे. अन्यथा शासन महानगरपालिकेस कोणतेही अनुदान देणार नाही. त्यात प्राथमिक शाळांसाठी महापालिकेस जे अनुदान दिले जाते ते सुध्दा दिले जाणार नाही. मला आपणांस हे सांगायचे आहे की, आपली पाणी पुरवठ्याची जी योजना आहे. त्यामध्ये प्रशासनिक खर्च, देखभाल दुरूस्ती खर्च हा सर्व मिळुन २८ कोटी रू. खर्च होतात. व आम्हास फक्त सात कोटी रू. चे उत्त्पन्न मिळते. याचाच अर्थ २१ कोटी रू. तोटा होतो. व याबाबत आम्हाला कधी ना कधी असा विचार केला पाहिजे की, ही योजना ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविली पाहिजे. त्यासाठी जे जे करायला पाहिजे ते केले पाहिजे. कदाचित दर वाढवावे लागले तर तेही वाढविले पाहिजेत. व दुसरी एक गोष्ट माझ्या समोर आहे ती अशी की, शहरास जो पाणी पुरवठा होतो त्याचे समान वितरण झाले पाहिजे. आता शहरात असे होते की, एका ठिकाणी चोवीस तास पाणी मिळते तर दुस-या ठिकाणी दोन तास सुध्दा पाणी मिळत नाही. अशी मला माहिती देण्यांत आली आहे. तर आम्ही याबाबत पुर्णपणे प्रयत्त्न करू की, पाण्याचे वितरण समान झाले पाहिजे व याबाबत मी आपणांस आवाहन करतो, आपणांस विनंती करतो की, आपले जे काही हितसंबंध असतील ते दुर करून पाण्याचे समान वितरण करण्यासाठी प्रयत्त्न केले पाहिजेत. जेणेकरून पाण्याची टंचाई कमी करण्यात आम्हाला यश मिळु शकेल.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मा.महापौरजी, आयुक्त साहेब व सहकारी, मागच्या महासभेत लक्षवेधी सुचना आणली होती. व पुर्ण सभागृहात ॲसेसमेंट बाबत पुर्ण सभागृहाचे एक मत होते की, टाटा इन्फोटेकच्या कामाबाबत स्वतः महापौरांनी आदेश दिले होते, सर्व सभागृहाचे जे मत होते ते सांगितले होते की, त्यांचा जो ठेका आहे तो रदद केला जाईल. व महापौरांनी असे निर्देश दिले होते व त्याची इतिवृत्तांतात सुध्दा नोंद आलेली आहे. व त्यानंतर असे सुध्दा ठरले होते की नुकसान भरपाईसाठी दावा केला जावा. त्याबाबत काय झाले? मला असे माहित पडले आहे की, महापौरांच्या निर्देशानुसार त्याची कार्यवाही झालेली नाही. व कर्मचा-यांना जे काम करण्यांस सांगण्यांत आले होते त्यांना आता ते काम थांबविण्यास सांगण्यात आले आहे. तर हा पुर्ण सभागृहाचा अपमान आहे. खासकरून महापौर जे निर्देश देतात त्याचे पालन झाले पाहिजे. सभागृहाचा जो निर्णय आहे त्याचे पालन झाले किंवा नाही याची माहिती दिली जावी. व झाले नसेल तर तो पुर्ण सभागृहाचा निर्णय असल्याने व महापौरांचा निर्देश असल्याने त्याचे पालन झाले पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई, श्रीमती यमुना सोनावणे, श्रीमती. वेलकर सुरेखा या सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा.महापौर:-</u>आयुक्तांनी याबाबत माहिती देण्या अगोदर मी सभागृहास माहिती देऊ इच्छितो की, टाटा इन्फोटेक बाबत मागील महासभेत श्री. लाल पंजाबी व श्री. राजानी यांच्या कडुन जी लक्षवेधी सुचना आली होती. त्या विषयाबाबत टाटा इन्फोटेकचे काही अधिकारी माझ्याकडे आले होते व त्यांनी आपली बाजु मांडली होती की, आमच्यावर जे आरोप लावण्यांत आले आहेत ते बरोबर नाहीत. मी त्यांना सांगितले की, याविषयाबाबत सभागृहात बरीचशी चर्चा झाली आहे. व सर्व सभागृहाचे हे मत आहे की, शहरामधील मिळकतींची आपल्या कंपनीकडुन जी ॲसेसमेंट झाली आहे त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामध्ये चुका झालेल्या आहेत. ठेका आपणांस दिला होता आपण दुस-या कुठल्या तरी कंपनीस तो दिला. यासर्व गोष्टी झाल्या

आहेत. त्यावर पुर्ण सभागृहाचे हे मत झाले आहे की, हे जे काम चालले आहे ते योग्य प्रकारे चाललेले नाही यासाठी ते काम काढुन घेतले जावे व महापालिका कर्मचा-यांना ते दिले जावे. म्हणजे ते शहरातील मिळकतींची ॲसेसमेंट करून बिले तयार करण्यासाठी ते आयुक्तांसमोर आपला अहवाल ठेवतील. असे मी त्यांना उत्तर दिले होते. व मी त्यांना हे सांगितले होते की, याबाबत आपणांस बाकी जे काही बोलायचे आहे. त्याबाबत आयुक्त साहेब त्यासभेत उपस्थित होते त्यांना सर्व परिस्थिती माहित आहे. आपल्या ठेक्याबाबत काय झाले? त्याबाबत आपणास जी काही माहिती पाहिजे ती माहिती आपण आयुक्तांकडुन घ्या. तर मला असे वाटते की, आयुक्त साहेबांनी याबाबत माहिती दयावी की याविषयाबाबत काय झाले? श्री. पंजाबी साहेब मी आपले आभार मानतो. ठेका रदद केला किंवा तो चालु आहे याबाबत माझ्याशी संवाद साधलेला नाही. तरी आयुक्तांनी याबाबत माहिती दयावी.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:- मा.महापौरजी, काही कालावधीपुर्वी टाटा इन्फोटेकला आम्ही जे काम दिले होते. त्यांचे कर्मचारी लोकांकडे सर्व्हे करण्यासाठी गेले होते. त्यांना बंद करून आता आपल्या महापालिकेचे कर्मचारी ॲसेसमेंट करण्यासाठी जात आहेत. आतो मी असे ऐकले आहे की, त्यांचे सुध्दा आदेश रदद केले आहेत. पुन्हा टाटावाले ॲसेसमेंट करण्यासाठी जातील. अशाने तर लोक त्रासतील.

मा.सदस्य श्री. प्रकाश माखिजा, श्री. ठाकुर बेहरानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, मागच्या महासभेमध्ये टाटा इन्फोटेकचा मुददा उपस्थित केला होता. आता सुध्दा तो मुददा उपस्थित केला गेला आहे. मला हे कळुन येत नाही की, कोणत्त्या नियमानुसार हा मुददा उपस्थित केला आहे? जर सभागृहाला माहिती हवी असेल तर मी माहिती देण्यास तयार आहे. टाटा इन्फोटेकला ॲसेसमेंटचा ठेका देण्यासाठी स्थायी समितीमध्ये जो ठराव झाला होता त्यास उच्च न्यायालयामध्ये सुध्दा आव्हान देण्यात आले होते. माझ्या मते सर्वोच्च न्यायालयात सुध्दा हे प्रकरण गेले होते. म्हणजे या प्रकरणाची पुर्ण न्यायिक छाननी झालेली आहे. व यानंतर ॲसेसमेंटचे काम सुरू झाले होते. माझ्या मते ते योग्य प्रकारे काम चालु होते. मागच्या महासभेमध्ये लक्षवेधी सुचनेव्दारे अचानकपणे हा मुददा उपस्थित केला गेला. व सभागृहामध्ये हा ठराव रदद करण्याचा निर्णय घेण्यात आला. माझ्यामते असा ठराव करणे कायदेशिर दृष्टया योग्य नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, ही जी ॲसेसमेंट होत आहे त्यामध्ये दिरंगाई तर झालेली आहेच परंतु महाराष्ट्र शासनाचे आदेश असे आहेत की, महापालिकेच्या प्रत्त्येक विभागाचे १०० टक्के संगणकीकरण झाले पाहिजे. याबाबत शासनाने वारंवार आदेश दिलेले आहेत. आता जुलै महिन्यामध्ये सुध्दा आदेश देण्यांत आलेला आहे. व महापालिकेमध्ये जी काही कामे आहेत जसे की, ॲसेसमेंट असो, आस्थापना असो, किंवा परवाने असोत त्यासर्व कामांचे संगणकीकरण झाले पाहिजे. आपणास माहित आहेच की, दोन दिवसापुर्वीच मा. मुख्यमंत्री महोदयांनी ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात संगणकीकरण्याच्या कामाचे उदघाटन केले. व शासनाने टी.एस.पी. या कंपनीची नेमणुक केली आहे. त्यामध्ये सुध्दा टाटा इन्फोटेक कंपनीचे नाव आहे. व टाटा कंपनीची आम्ही या अगोदरच नेमणुक केलेली आहे. ज्याची मुदत १० ऑगस्ट रोजी संपत होती. त्यांची मुदत मी वाढविली नाही. आपणांस महसुलाची अत्त्यंत जरूरी असल्यामुळे वसुली वाढविण्यासाठी मागच्या वर्षी जे निर्णय घेण्यात आले होते तसेच निर्णय मी घेत आहे. व हे काम जे डेटा बेस, डेटा बेस आता तयार झाला आहे. तो पुर्ण क्वालिटीचा आहे किंवा नाही जर असेल तर, शासनाचे आदेशानुसार आम्हास चालावे लागेल. जेव्हा



ठेका दिला जातो. ज्यास कॉन्ट्रक्चुअल लायबिलीटी असते. महापालिकेस सुध्दा कॉन्ट्रक्चुअल लायबिलीटी निभवावी लागेल. कदाचित महापालिकेस त्यात

नुकसान सुध्दा होईल. यास्तव मी त्यांची मुदत अद्याप वाढविली नाही. परंतु त्यांनी जो डेटा बेस तयार केला आहे त्याची युटीलिटी पहावी लागेल. वयुटीलिटी पाहिल्यानंतर की सोल्युशन प्रोव्हायडेड असा जो शासनाने आदेश दिला आहे. त्यानुसार आपण कार्यवाही करणे योग्य राहिल असे मला वाटते. व शासनाचा जो पायाभुत आदेश आहे. त्याच्या विरोधात जाणे योग्य होणार नाही. आता टाटा इन्फोटेकचा जो बेसिक डेटा आहे त्याची युटीलिटी कोणत्त्या प्रकारे आपणांस फायदेशिर होईल. हे पाहिल्या नंतर आपण निर्णय घेऊ शकतो. भ्रष्टाचारजो जो मुददा आहे, त्याबाबत जर काही तपशिल दिला तर जरूर काही कारवाई केली जाईल. माझ्यामते महाराष्ट्र शासनाचे जे मुलभुत आदेश आहेत. त्यानुसार निर्णय घेणे योग्य ठरेल.

मा.सदस्या श्रीमती. मिनु दासानी, श्रीमती. सुनिता बगाडे, श्रीमती. टेकचंदानी चंद्रा, श्रीमती. पंचशिला पवार या सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा.महापौरजी, टाटा इन्फोटेकचा हा जो मुददा चालला आहे. मागच्या महिन्यामध्ये याबाबत जो निर्णय झाला. त्यानुसार आयुक्त साहेबांनी आता जे सांगितले त्यानुसार तीन मुददे त्यांच्या लक्षात आणुन देऊ इच्छितो. एक म्हणजे १९७८मध्ये निवडणुका होऊन नगरसेवकांची बॉडी सभागृहात आली. तेव्हा श्री. प्रल्हाद आडवाणी हे नगराध्यक्ष होते. १९६७ नंतर १९७८ मध्ये निवडणुका झाल्या होत्त्या त्यावेळेला श्री. आडवाणी यांनी नगरपालिका कर्मचा-यांना ॲसेसमेंटच्या कामासाठी लावले होते. तर कर्मचा-यांनी त्यावेळेला सांगितले होते की, पुर्वीचे जे खाते नंबर आहेत त्याच्या नोंदी घेऊन आम्ही साईटवर जातो. तर आडवाणी यांनी सांगितले होते की, त्याची काही आवश्यकता नाही. पुर्वीचे खाते राहु दया. नव्याने ॲसेसमेंट चालु करा. नविन ॲसेसमेंट झाली त्यानुसार नविन खाते नंबर देण्यांत आले. तर आज पर्यंत त्या जुन्या खात्त्यांची नोंद शोधुन थकबाकी भरण्याबाबत लोकांना अडचणीचे होत आहे. जेव्हा कुणी मिळकतीवरील नाव बदलण्यासाठी अर्ज करतो तेव्हा त्यास असे सांगितले जाते की, आपला १९८०चा टॅक्स भरला आहे किंवा नाही. यासाठी अंडरटेकींग दिले जावे. व त्यावेळीचा जर ४०रू. किंवा ५० रू. टॅक्स भरावयाचा बाकी राहीला असेल तर त्यावर ४००-५०० रू. व्याज होत आहे. तर आता आयुक्त साहेब टाटा कंपनीबाबत जे बोलत आहेत. तर टाटा इन्फोटेकने स्वतः काही काम केलेले नाही. टाटा कंपनीने हितांशु कंपनी या छोटया ठेकेदाराला काम दिले आहे. त्यांनी जुने खाते नंबर घेतले नाहीत. असेच पुर्ण शहरात गेले बांधकामाची जी स्थिती आहे त्यानुसार ॲसेसमेंट करून आले परंतु आमच्या ठेक्यामध्ये अशी एक अट आहे की, बांधकामाच्या स्थिती बरोबरच त्यांना त्या बांधकामाचा नकाशा काढुन दयायचा आहे की, ही एक खोली आहे. त्यानंतर स्वयपाकघर, बाथरूम आहे असे त्यांना नकाशात दर्शवायचे आहे. परंतु त्यांनी एका सुध्दा मिळकतीचा नकाशा अदयाप काढला नाही. जर आपण श्री. लाल पिंजानींना यांना याबाबतचा खुलासा मागितला तर ते सांगतिल की, एकाही मिळकतीचा त्यांनी नकाशा काढला नाही. हि झाली दुसरी गोष्ट, तिसरी गोष्ट अशी की, टाटाला सांगितले आपण काम बंद करा. व महापालिका कर्मचा-यांना सांगितले की, आपण काम सुरू करा. दोन महिने पर्यंत असे चालले. पहिले टाटावाल्यांना काम करण्यास सांगितले होते. त्यानंतर महापालिका कर्मचा-यांना हे काम करण्यास सांगितले आता पुन्हा टाटा कंपनीवाल्यांना हे काम करण्यांस सांगण्यांत आले. तर हे किती वेळ असे चालत राहणार? आज जो भ्रष्टाचार यामध्ये झाला आहे तो आमचे कर्मचारी सिध्द करण्यास तयार आहेतच ना? की त्यांनी ७५ -८० टक्के चुका केल्या आहेत. आर.सी.सी.



बांधकामाला ए.सी.सी. बांधकाम दाखविले आहे. स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव जेव्हा चर्चेस आला होता तेव्हा आमच्या सर्व पक्षीयांचे असे मत होते की, ज्या काही वादग्रस्त कर आकारणी आहेत. त्यामध्ये टाटा इन्फोटेकच्या कामाची आपणांस मदत होईल म्हणुन आम्ही या कामावर ८४लाख रू. खर्च करण्याचा

निर्णय घेतला. श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी हा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणला. तरी सुध्दा आम्ही मंजुरी दिली. त्यावेळी सर्व संमतीने या प्रस्तावास मंजुरी दिली. त्यामागचे कारण असे होते की, ८४लाख रू. खर्च झाले तर दहा कोटीचे उत्त्पन्न मिळेल. परंतु आज दोनदा आम्ही त्यांना मुदत वाढ दिली आहे. त्यानंतर आणखी ते मुदत वाढ मागत आहेत. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हलाखीची असताना त्यांना हे ६४ लाख रू. न देता. जे पैसे यापुर्वी दिले आहेत. ते वसुल केले जावेत. व महापालिकेचे ६४ लाख रू. वाचतील. आजपर्यंत आमचे विभाग संगणकीकृत नाहीत काय? कर विभागाचे जेवढे काही रेकॉर्ड आहे,आमच्याकडे जेवढे काही संगणक आहेत, संगणकामार्फतच कर विभागाचे काम केले जात आहे. त्यांना हे माहित नाही. ते समजतात की, टाटा इन्फोटेककडेच संगणक आहेत. आज सुध्दा कर विभागाचे सर्व रेकॉर्ड संगणकीकृतच आहे. हे त्यांच्या लक्षात आले पाहिजे. आता संगणकाचा जमाना आहे. तर ते रेकॉर्ड संगणकीकृतच आहे. व आपल्याला मिळकती संगणकात घ्यायच्या नाहीत. की, शहरातील जेवढया काही मिळकती आहेत. त्या संगणकात घ्या. त्यांचे फक्त मोजमाप घ्यायचे आहे. त्याची नोंद संगणकात घ्यायची आहे. टाटा इन्फोटेकवाले काही मेहरबानी करत नाहीत.आमचे रेकॉर्ड संगणकीकृत होते, आहे व राहील. तर त्यांना मुदतवाढ न देता ६४-६५ लाख. जेव्हा पासुन आयुक्त आले आहेत चांगले काम करत आहेत. कुठेपण पैसा शिल्लक ठेवायचा प्रयत्न करतात. जेणेकरून महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारेल. तर ६४ लाखदेखिल त्यांनी वाचवावेत. फार चांगले होईल. हे आपल्या महापालिका कर्मचा-यांवर विश्वास ठेवावा. आज जनता फसली आहे. टाटा गेली बिर्ला आली. आता कुणाला पाठवणार आहात. टाटा, बिर्ला वाले गेला आता मला वाटते रिलायन्स वाल्यांना बोलवतील. हा खुप गंभीर विषय आहे. चार-चार वर्षाने ॲसेसमेंट केली जाते दरवर्षी होत नाही. आपल्याकडे संगणकीकृत रेकॉर्ड आहेत. खुपशा जुन्या मिळकतींची मोजमाप करण्याची देखिल गरज नाही. फक्त नव्या मिळकतींवर लक्ष दयावे लागेल. किती नव्या इमारती, झोपडे, चाळी, किती नवे आर.सी. सी. कंन्स्ट्रक्शन आहे याकडे लक्ष दयावे लागेल तर आपले उत्त्पन्न वाढेल. व टाटा इन्फोटेक कंपनीला दोनदा मुदत वाढत दिली ते पण खुप झाले. त्यांच्याकडुन वसुली केली जावी. व त्यांचा ठेका रदद केला जावा.

मा.सदस्य श्री. केणी जयकुमार, श्री. सुरेश जाधव हे सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>मा. महापौर साहेब, आयुक्तांचे हे म्हणणे आहे की, आम्हाला शासन नियमाच्या आधारे वागायचे आहे. म्हणुन महासभेत कोणत्त्याही प्रकारच्या निर्णयावर एकमत झाले असले त्याच्याशी आयुक्त बांधील नाही राहीले पाहिजे. विशेषतः मी आयुक्तांना विचारू इच्छितो की, टाटांनी काय अहवाल दिला. त्यांनी १०० टक्के काम पुर्ण केले आहे. मला फक्त दोन प्रश्न विचारायचे आहेत जास्त नाही.

<u>मा.महापौरः-</u>तुम्ही आधी पुर्ण बोलुन घ्या मग आयुक्त उत्त्तर देतील.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>आधी त्यांनी या प्रश्नाचे उत्त्तर दिले त्यानंतर मी बोलु शकेन. हॅव दे कंम्प्लीटेड द वर्क.



<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u> टाटा इन्फोटेकला काम करण्यासाठी टप्पेवार सांगितले होते. आधीचे तीन टप्पे आहेत. प्राथमिक टप्पा तो पुर्ण होत आला आहे. पण पुर्ण नाही झाला आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>व्हीच इज दॅट स्टेज.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-इट इज सर्व्हे ऑफ दी प्रॉपर्टी. ॲन्ड प्रीपरेशन ऑफ ॲसेसमेंट रजिस्टर.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-दे हॅव कंम्प्लीटेड दी सर्व्हे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):- ते पुर्ण होत आले आहे. पुर्ण झाले नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-सर्व्हे करून कार्यालयात बसुन रेकॉर्ड बनविणे हा वेगळा विषय आहे. त्यांचा सर्व्हे पुर्ण झाला आहे का?
मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-सर्व्हे पुर्ण नाही झाला. ९०-९१ टक्के झाला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-कुणी मला हे सांगु शकेल का कर विभागातील प्रभाग क्र. ४० चे काम त्यांनी पुर्ण केले आहे का? तसा काही अहवाल दिला आहे का? कुणी कर विभागाचे असतील त्यांनी सांगावे . माझा त्यावर प्रश्न असा आहे. माझ्या घराचे मोजमाप करायला आले नाहीत. जर त्यांनी सांगितले की ते माझ्या घरचे सर्व्हे करून गेले आहेत की, आम्ही दोन्ही नगरसेवक राजीनामे देऊ. ही परिस्थिती आहे. टाटा कंपनीचे नाव मोठे आहे. आम्ही ज्यावेळी त्यांचा प्रस्ताव पास केला त्यावेळी हे एक कारण होते. त्या कंपनीचे नाव ऐकुन आम्ही आमचे समाधान करून घेतले होते. आयुक्तांनी आमचे समाधान केले होते. परंतु त्यांचे काम असे आहे की, आमच्या शहराला नुकसान होणार आहे. येणा-या पिढीला ते भोगावे लागणार आहे. आपल्या शहरातील कर वसुली बरोबर होईल. मी उदाहरण सहित सांगतो की, अशा कित्येक फॅक्ट-या, कारखाने आहेत ज्यात एकाच घरात एकाच मिळकतीचे चार-चार खाते तयार केले गेले आहेत. मी तुम्हाला उदाहरणासहित सिध्द करून दाखवु शकतो. याप्रकारचे बनावट काम ही कंपनी धोखा देऊन करीत आहे. कंपनी कितीही मोठी असो त्यांनी हे काम सबलेट केले होते. ते काम त्यांनी स्वतः नाही केले. हा माझा त्यांच्यावरील आरोप आहे. एकेका खात्त्याचे चार-चार खाते केले आहेत. दिड लाख मिळकतींचा अशा प्रकारे त्यांनी रेकॉर्ड दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. असे असुन देखिल आपण शासन निर्णयावर अवलंबुन भले शहराचे नुकसान होवो. हि स्थानिक स्वराज्य संस्था आहे. इथे आम्ही लोक प्रतिनिधी म्हणुन निवडुन आलो आहोत त्यांचेच विचार आम्ही इथे मांडत आहोत व ६९ नगरसेवकांनी मिळुन एकमताने, एक आवाजाने या कंपनीचा विरोध केला आहे. त्यांना हटविण्यास सांगितले आहे. याउलट तुम्ही त्यांना संरक्षण देतात. आणि तुम्ही असा निर्णय घ्याल की, आम्ही त्यांना दंड पण नाही लावणार. आणि त्यांना कंन्टीन्यु करणार. धिस युवर डिसीजन वील गो वेरी मच अगेन्स्ट डिसीजन ऑफ दी सिटी. पुर्ण शहराचे प्रतिनिधित्त्व आम्ही शासन करणा-या कुणाही व्यक्तीने असे नाही म्हंटले की, टाटा कंपनीवाले ठिक काम करत आहेत. शासनाचे परिपत्रक बंधनकारक आहे फक्त जेव्हा शहराचा टाटा इम्पोटेक्टच्या कामाबाबत शहराचे मत विपरित असेल. आमची इच्छा नाही की, या कंपनीने आमच्या शहराचा विनाश करावा. आम्हाला जर



कुणी सांगितले या रस्त्याने जा त्या रस्त्याने जा. आणि पुढे जाऊन जर आम्हाला तिथे खड्डा, ट्रेन दिसली पाणी दिसले तर आम्ही कसा क्रॉस करणार? काय नियमात लिहिले आहे. इथे आमच्या शहरात धोका निर्माण झाला आहे. आम्हाला तो दिसत आहे. आणि तुम्ही असे अडुन बसलात की, नाही मी नाही करू शकत. म्हणजे काय? कुणी तुमच्या मनात हे घातले आहे का? की हे काम कर्मचारी वर्ग ठिक नाही करणार? टाटा कंपनीवालेच ठिक करतील. का कर्मचारी असे म्हणाले की, टाटा इन्फोटेकवाल्यांना काढा आम्ही करू. तुम्ही पुर्ण सदनाची व शहराची भावना जाणुन घेत नाही. ती भावना

लक्षात न घेता तुम्ही म्हणाल आम्हाला टाटा इन्फोटेकवाल्यांना काम दयायचे आहे तर हे पुर्ण शहरवासियांच्या विरोधात होईल. सर्वच शहरवासिय संतप्त झाले आहेत. आणि तुम्ही म्हणता आम्हाला ती कंपनी हवी आहे. कायदयाचे काहीही असो आमच्या शहराच्या हिताचे नसेल ते आम्ही बिल्कुल सहन नाही करणार?त्यासाठी आम्हाला टाटा इन्फोटेक कंपनीला बदलावे लागले. शासन निर्णयाला धुडकावले लागले. आयुक्तांच्या विशेष निर्णयाला जरी नकार दयावा लागला तरी आम्हाला काही फरक पडत नाही.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:- महापौरजी, आमच्या आयुक्तांनी उत्तर दिले आहे. आम्ही दाव्यासहित सांगु शकतो ते म्हणाले की, त्यांचे काम जवळ जवळ पुर्ण झाले आहे. हे जे उत्तर आहे ते चुकीचे आणि दिशाभुल करणारे आहे. मागच्यावेळेस जेव्हा आम्ही लक्षवेधी आणली होती तेव्हा पण खुप काही सांगितले होते. आता पण मी टाटा कंपनीचे शेडयुल ॲक्स्ट्रेक म्हणतात ते दाखवतो. मी मागच्यावेळेस पण सांगितले होते, चार महिन्यात त्यांनी काम केले नाही. त्यांनी पहिल्यांदा मुदतवाढ मागितली ३१ मे २००० पर्यंत परत दुस-यांदा मुदतवाढ मागितली १० ऑगस्ट २००१ पर्यंत. परत त्यांनी तिसरे पत्र दिले १८ जुलै २००१ला. १० ऑगस्ट २००१ मुदत पुर्ण नव्हती झाली. परत त्यांनी पत्र दिले आम्ही काम पुर्ण करू शकत नाहीत. व त्यांनी आपले शेडयुल दाखविले. मी ते शेडयुल वाचुन दाखवितो, आयुक्त साहेबांच्या माहितीसाठी.
ॲसेसमेंट रजिस्टर तयार करणे - १९.१०.२००१
विशेष नोटीस बजावणे - १४.११.२००१
अंतिम ॲसेसमेंट रजिस्टर तयार करणे. १३.१२.२००१
मागणी रजिस्टर तयार करणे - ३१.१२.२००१
देयके वाटप - ३.१.२००२, साहेब, हे काम २००२ पर्यंत जात आहे. त्यावेळेला शहरामध्ये आचारसंहिता सुध्दा लागलेली असेल तर त्यावेळेस आपण हरकती सुध्दा ऐकुन घेऊ शकणार नाही. या प्रकरणाचे कायदेशिर,बेकायदेशिरतेमध्ये आम्ही गेलो नाही. आपण म्हंटलात की, उच्च न्यायालयात हे प्रकरण गेले होते. वुई आर नॉट गोइंग टू दी लिगलीटी ऑफ अलॉटमेंट ऑफ दी टेंडर आर दी कॉन्ट्रक्ट टु दी अेजन्सी त्याबाबत आम्ही प्रश्न विचारतच नाही आहोत. आम्ही हे सांगु इच्छितो की, टाटा इन्फोटेक कंपनी तीन वेळा अयशस्वी झाली आहे. तीन वेळा मुदत वाढ घेऊन सुध्दा म्हणजे पहिले मुळ ठेका चार महिन्याचा होता. व त्यानंतर दोन वेळा मुदत वाढ अशा प्रकारे तीन वेळा ही कंपनी अयशस्वी झाली आहे. व अशा कंपनीला पुन्हा मुदतवाढ देणे. खुपच चुकीचे होईल. पहिलेच आम्ही यामुळे कमीत कमी पाच कोटी रू. नुकसानीत गेलो आहे. कारण की मला आठवते आमचे श्री. आर.डी. शिंदे त्यावेळी आयुक्त होते. त्यांनी या टाटा इन्फोटेकचे नाव दाखवुन आम्हा लोकांना चुकीची माहिती दीली. आम्ही त्यांचे म्हणणे मानले होते. त्यांनी त्यावेळेस हे सांगितले होते की, जर ठेका दिला तर आपणांस पाच कोटी रू. अधिक वसुली होईल. परंतु यावर्षी सुध्दा हे पाच कोटी रू. आमचे बुडले आहेत. व पाच कोटी रू. यापुर्वीच बुडाले आहेत. व आता आम्ही योग्य तो निर्णय घेतला नाही. तर आमचे पाच कोटी रू. आणखी



बुडणार आहेत.त्यांनी कमीत कमी हा शब्द वापरला होता. तर १० कोटी आणखी बुडतील. व आपण सुध्दा त्यावेळेस सहमती दर्शाविली होती. लिगलीटी ऑफ अव्हायडिंग दी कॉन्ट्रक्ट त्याबाबीकडे आम्ही जातच नाही. आम्ही हे सांगितले होते की, जी कंपनी आपल्या कर्तव्यामध्ये अयशस्वी झाली आहे. व त्यामुळे आम्हाला पाच कोटीचे नुकसान झाले आहे. त्यासाठी ना केवळ आम्हाला हा ठेका रदद केला पाहिजे. परंतु पाच कोटी नुकसान भरपाई साठी आपण त्यांना नोटीस दिली पाहिजे. असा आपला निर्णय झाला होता. व आपण त्या कंपनीकडुन पाच कोटी रू. वसुल करू शकतो. जर आपण योग्य प्रकारे वकीलांमार्फत त्या कंपनीला नोटीस पाठविली तर व त्या दिशेने पावले

उचलली पाहिजेत. याच्या उलट दिशेने जाता कामा नये. असा माझा आपणा सर्वांना अनुरोध आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा.महापौरजी, मागील महासभेमध्ये, एक महिना अगोदर, २० तारखेला टाटा इन्फोटेक कंपनीचा ठेका रदद करण्याबाबत श्री. लाल पंजाबी यांनी जी लक्षवेधी सूचना आणली होती. त्यावेळी सभागृहामध्ये बरीच चर्चा झाली होती. त्यावेळी सर्वांचे एकमत होते. त्या चर्चेमध्ये आयुक्त साहेब सुध्दा सहभागी होते. एक महिना पुर्ण झाल्यानंतर, आज २० ऑगस्ट आहे. या एक महिन्याच्या कालावधीत त्यांचे निर्णय त्याच्या पुर्णपणे विरूध्द होतात. एक महिन्यापुर्वी ते जे बोलले होते त्याच्या बरोबर विरूध्द आज ते बोलत आहेत हे चुकीचे आहे. आम्ही बोलतो असेच नाही तर या सभागृहामध्ये जे इतिवृत्त लिहुन घेतले जाते. त्याचे पृष्ठ क्र. २७ वर आयुक्त साहेबांच्या नावाने अशी नोंद आली आहे की, परंतु मी तुम्हाला सांगतो की, जी काही कंपनी विरूध्द कारवाई करावी लागेल. ती कारवाई केली जाईल. त्यांना जो दंड आकारावा लागेल तो आकारला जाईल. त्यांचा कोणत्त्याही प्रकारे बचाव केला जाणार नाही. हे जे काम आहे मला नाही वाटत की, ते पुर्ण करू शकतील. मा.आयुक्त साहेबांनी, त्यावेळच्या चर्चेमध्ये जे सांगितले ते इतिवृत्तांत सुध्दा आलेले आहे. एवढे असुन सुध्दा आता जर त्यांचे म्हणणे त्याच्या विरूध्द असेल तर या सदनामध्ये जी चर्चा चालते त्यानंतर आयुक्तांच्या आश्वासनानंतर महापौरांनी सांगितले आहे की ,मुदत वाढ दिली जाणार नाही. आम्ही ठेका रदद करणार आहोत. आणि हे सर्व संमतीने ठरले आहे. हा महापौरांचा त्यावरील निर्णय होता. त्या चर्चेच्यावेळी आयुक्त साहेबांनी सुध्दा कबुल केले होते की, चुकीचे चालले आहे ते काम पुर्ण करू शकणार नाहीत. त्यानुसार हा ठेका रददच करणे योग्य ठरेल.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:- महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब टाटा इन्फोटेक या कंपनीचा ठेका रदद करण्याविषयी मागील महासभेमध्ये सर्व पक्षीयांनी आणि महापौरांनी पण आदेश देऊन सुध्दा आज आयुक्त साहेब त्याच्या विरोधात बोलले. मला एक म्हणायचे आहे, टाटा इन्फोटेक सारख्या एका दलाल कंपनीला, ज्याने दुस-याला ठेका दिला आहे. आणि त्यावरील दलाली ते खातात. जर अशा कंपनीला आपण ठेका देत असाल किंवा पुन्हा मुदत वाढ देत असाल तर त्यामध्ये आम्ही काय अर्थ समजायचा? आयुक्त साहेबांना माझा हा प्रश्न आहे. कारण की मागच्या वेळी जेव्हा टाटा इन्फोटेकला ठेका दिला होता त्यावेळी सुध्दा हाच प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी आयत्त्यावेळचा विषय म्हणुन हा विषय आणण्याचा हेतु काय होता. तेव्हा आम्ही शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन हा ठराव पास केला होता. पण तो आयत्त्यावेळी आणण्याचा अर्थ काय होता? याच्या पाठीमागे निश्चित मला काळबैर वाटते. आणि जर महापौर जर आदेश देत असतील जर पुर्ण महासभा आदेश देत असतील, महासभेचे जर मत असेल की ठेका रदद व्हायला पाहिजे. संपुर्ण शहराच्या जनतेलाच नको असेल आणि त्याही पलिकडे



जाऊन तुम्ही त्याच कंपनीला ठेका देत असाल तर हे निश्चितपणे चुकीचे आहे हा या शहराचा अपमान आहे. आणि या टाटा इन्फोटेकचा हा ठेका तावडतोब रदद करण्यात यावा. धन्यवाद.

मा.महापौरः'-मला असे वाटते की, सदनात दुस-यांदा यावर चर्चा झाली आहे की, त्वरीत ठेका रदद केला जावा. व आयुक्तांनी याविषयी त्वरीत कार्यवाही करून ठेका रदद केला गेला पाहिजे. व महापालिका कर्मचा-यांवर ते काम सोपवले पाहिजे.

मा.सचिवः-विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. २०.७.२००१ सह ३०.७.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

काही सदस्यः-पास.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-सन्माननिय महापौरजी, दोन तीन सभेत नाल्याविषयी चर्चा झाली आहे. इतिवृत कायम करतानाच हा विषय येतो. आयुक्त साहेब म्हणतात. दोन-तीन दिवसात करतो. महिना निघुन गेला. चिजवानी साहेब पण इथेच आहेत.

मा.महापौरः-विपक्ष नेत्यांनी जी हरकत घेतली आहे. त्याविषयी मी आयुक्तांना सांगतो की, मागील जुलै ऑगस्टमध्ये जो पाऊस पडला. चार-पाच वेळा या नाल्या संबंधी माझ्याकडे कित्येक फोन आले आहेत राजीव गांधी नगर मधुन. वेगवेगळया ठिकाणाहुन फोन आले आहेत. आमच्या पुर्व विपक्ष नेत्या होत्या श्रीमती. सुनिता राजवानी त्यांच्या व महाराजांतर्फे मी सर्वांना हेच उत्तर दिले आहे की, आयुक्तांनी त्यावर योग्य ती कार्यवाही केली आहे. परंतु आजपर्यंत त्यावरील अतिक्रमण हटविले गेले नाही. तरी आयुक्तांनी यावर खुलासा करावा म्हणजे मला पण माहिती मिळेल.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, आयुक्तांनी नोटीसवर सही केली होती. ती आम्ही पाठविली आहे. परंतु आठ दिवसापासुन ती व्यक्ती घरी नाही. पुर्ण कुटूंब नाही. आम्ही तिथे पंचनामा करून नोटीस त्याच्या दरवाज्यावर लाऊन येऊ नंतर आता पुढील कार्यवाही करू.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ही नोटीस चिटकवल्यावर किती दिवसात तो नाला उघडला जाईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-किती दिवसाची नोटीस आहे.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-आठ दिवसाची नोटीस आहे. याच्या पुढील कार्यवाही आयुक्त त्यांच्या स्तरावर करतील.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- कधी नोटीस चिकटवणार? आठ दिवस म्हणता मग एक महिना निघुन जातो.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-२३ तारखेला चिकटवणार.



मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-महापौर साहेब, मागच्या वेळेस जेव्हा आयुक्त साहेब बोलत होते तेव्हा ते म्हणाले होते की,मी चौकशी करून पुढच्या महासभेत सांगेन. मी सांगितले होते की, पनवेलकरांची गाडी रविवारी येत नाही. इतिवृत्तात लिहिलेले आहे. परंतु अजुन मला हे माहित नाही की, साहेबांनी चौकशी केली आहे की, नाही. त्यावर तो गाडी बदली करून टाकतो. आम्ही जेव्हा त्यांना सांगतो गाडी घेऊन आमच्या प्रभागात चला कचरा आहे. तेव्हा ते म्हणतात की तुमच्या प्रभागासाठी दुसरी गाडी ठरविली आहे. दुसरे जेव्हा त्याचे टेंडर पास केले होते. त्यांनी नव्या गाडया लावायचे ठरवले होते परंतु आताही पहा जुन्या गाडयाच लावल्या आहेत. पावसाळयात त्या चालत नाहीत. त्याबाबतीत पण काही खुलासा केला नाही. पुर्ण प्रभागात कचरा आहे. मी ही काळी पट्टी कशासाठी बांधली आहे. सात इमारतीतुन फोन आला की, पाणी नाही. साडे चार वाजता आयुक्तांशी बोललो. महासभेत

येऊ का टॅंकरसाठी तिथेच बसुन राहु. तिथे कार्यकारी अभियंता येत नाहीत. उपअभियंतावर तीन-तीन, पदांचा भार ठेवला जातो. त्याच्यापेक्षा वरीष्ठ तेथे आहेत. इथे काय वशीला चालतो ते समजत नाही. पाण्यासाठी आम्ही ओरडतो कधीही महापालिकेत या बरोबर उत्तर मिळत नाही.पाणी मिळत नाही. सफाई होत नाही. पाऊस पडत आहे. आम्हाला फोन येतात पाणी येत नाही म्हणुन. आज पण सकाळी फोन आला पाणी येत नाही म्हणुन. कुठे जात आमच्या प्रभागाचे पाणी? सहा लाखाचे आमचे प्राकलन पास करा म्हणतो तर ते करत नाहीत. आणि साठ लाखाचा रोड माझ्या प्रभागातुन पास करतात त्यासाठी आमची संमती घेतलेली नाही. साठ लाखाचा रोड पास करू शकता आणि सहा लाखाचा पाईप लाईन माझ्या प्रभागात टाकु शकत नाही. मी दशोरे साहेब आणि आयुक्तांकडे पंधरादा गेलो आहे. उलटी महापालिका चालत आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-श्री. नारायण पंजाबी साहेब तुम्ही काळी पटटी का लावली?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-सांगितले ना? माझ्या प्रभागात पाणी येत नाही आणि सफाई होत नाही म्हणुन.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक / श्री. नरेंद्र राजानीः-आमच्या नगरसेवकांवर केस दाखल झाली म्हणुन.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः- तुम्ही मलाच काय विचारता इतरांना पण विचारा?

मा.महापौरः-पंजाबीजी, तुम्ही जे सांगता त्यावर आयुक्त लक्ष देतील. इतिवृताबाबत तुम्हाला काही हरकत असेल तर बोला.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-इतिवृतात येते ते काम झाले तर पाहिजे ना? आम्ही फक्त इतिवृत्त पास करत जायचे.

मा.महापौरः-तुम्हाला काय इतिवृतामध्ये स्पष्टीकरण पाहिजे आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः- एक तर माझ्या प्रभागात पाणी नाही. सफाई होत नाही. दुसरे की, माझ्या प्रभागात सहा लाखाची पाईप लाईन टाकायची आहे सी ब्लॉक पासुन. ती नाही टाकली जात.



मा.सचिवः-दि. ३०.७.२००१ रोजीच्या महासभेच्या इतिवृतांतातील ठराव क्र. ९ मध्ये सुचकाचे नाव संगणकाच्या चुकीमुळे श्री. राजु सोनावणे असे लिहिले गेले आहे तेथे सुचकाचे नाव श्री. किशोर वनवारी असे वाचण्यांत यावे.

मा.महापौरः-हे पहा पाण्याविषयी जेव्हा चर्चा झाली तेव्हा आपण बोलायला पाहिजे होते. आता सदरचे इतिवृत्त वरील सुधारणेसह जसे आहे तसे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-नाही. मला विचारले गेले काळी फित का बांधली आहे म्हणुन मी बोललो.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- यांचे म्हणणे असे आहे की, सहा लाख रू. ते नगरसेवक निधीतुन दयायला तयार आहेत. त्या सहा लाखाची पाईप लाईन टाकली तर त्यांच्या प्रभागातील पाण्याची समस्या सुटेल टॅंकरची आवश्यकता

भासणार नाही. जर असे करून त्यांच्या प्रभागातील पाण्याचा प्रश्न सुटत असेल तर या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-माझ्या प्रभागात ११ हजार टॅंकर पुरविले गेले आहे. आहे असा कोणता प्रभाग त्यात ऐवढे टॅंकर लागले असतील पाण्याचे? माझ्या प्रभागातील लोक माझ्या कडे येतात आणि म्हणतात की, टॅंकरने पाणी का देता? नळाव्दारे दया ना.

मा.महापौरः-स्थायी समितीत पास करून घ्या ना?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:- स्थायी समितीत तरी कुठे करतात. दहा लाखाच्या वर करतच नाही.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुरः-माझ्या प्रभागात देखिल पाण्याची समस्या आहे. पंधरा टॅंकर रोज येतात. सात लाखाचा एम.एस.लाईन जर आमच्या प्रभागात टाकली गेली तर त्या पंधरा टॅंकरचे पैसे उरतील. म्हणुन आमची विनंती आहे की, नगरसेवक निधीतुन आमचे हे काम पास केले जावे. त्यावर तर आमचा अधिकार आहे ना? अत्त्यावश्यक गरज आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:- जेव्हा पण आम्ही आयुक्तांकडे जातो तेव्हा ते म्हणतात आर्थिक स्थिती बरोबर नाही. पैसे नाही.
मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-महापौरजी, बक्षी साहेब पण म्हणाले होते की, पाण्याची अडचण नाही झाली पाहिजे. कितीचेही काम करून घ्या नगरसेवक निधीतुन.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः- आमचा जो वैयक्तिक निधी आहे नगरसेवक निधी त्यातुन तरी पाण्याच्या लाईन टाकुन घ्या.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-साहेब बुस्टर लावले आहे. तीन महिने झाले त्यात पाणी येत नाही. अधिकारी लोक येतात व ऐकुन निघुन जातात.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:- महापौर साहेब, यांचे संपल्यावर मला बोलायचे आहे. मला पण नगरसेवक निधी मिळत नाही.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-नारायण पंजाबी पण आपला निधी देत आहेत मी पण देत आहे. आयुक्त साहेब आपण यावर दोन मिनिटे बोला.



मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे:- सन्माननिय महापौर साहेब, उपमहापौर, आयुक्त व सचिव साहेब. ज्याप्रमाणे पाण्याची समस्या काही प्रभागामध्ये आहे तशी माझ्या प्रभागात सुध्दा एक समस्या आहे त्यासाठी दोन-दोन लाख रू. सर्वांचा निधी खर्च केला गेला. परंतु माझ्याकडचा खर्च केला गेला नाही तो तसाच प्रलंबित पडुन आहे. आयुक्तांशी मी या विषयावर चर्चा केली आहे. जर तुम्ही खर्च करणार असाल तर माझ्या प्रभागाची ही अत्त्यावश्यक समस्या आहे तर त्याही समस्येचा आपण विचार करावा. आपल्याशी मी बोललो आहे. जास्त काही मी सभागृहात बोलत नाही. जी काही ज्वलंत समस्या आहे त्याविषयी मी बोललो त्यांना जर आपण निधी देणार असाल तर त्या सोबत माझाही विचार व्हावा. हि आपणांस विनंती.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, नगरसेवक निधीचा मुद्दा इथे उपस्थित केला आहे. व पंजाबी साहेबांचे जे सहा लाखाचे प्राकलन पाण्याबाबतीत आहे. त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो. नगरसेवक निधीविषयी शासनाने आदेश दिले आहेत की, एक काम दोन लाखाच्या वर

नाही असले पाहिजे. व म्हणुन सहा लाखाच्या कामाला मंजुरी देता येत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, मी आधी पण स्पष्ट केले आहे की, महापालिकेची आर्थिक स्थिती खुप ढासळली आहे. व फक्त प्राकलन मंजुर करण्याचेच काम चालु आहे. नगरसेवक निधीला देखिल चार-चार लाखा पर्यंत मंजुरी दिली गेली आहे. व पुढे देखिल जसा जसा निधी उपलब्ध होत जाईल. तसा नगरसेवक निधीचे काम मंजुर केले जाईल. परंतु त्यात हळुहळु जाणे योग्य होईल कारण महापालिकेच्या आर्थिक स्थिती विषयी वारंवार सांगणे ठिक नाही. खुप भयानक स्थिती आहे. अशी स्थिती आहे की, आता फक्त अत्यावश्यक सेवा केली तरी खुप काही झाले असे मला वाटते म्हणुन नवे जे काम घ्यायचे आहे. तुम्हा सर्वांना माहित आहे. बजेट १७३ करोडचे केले आहे. परंतु त्यातील फक्त ७०-८० कोटीच मिळतील. म्हणजे ६० टक्के त्रुटी निर्माण होईल. याला कोण जबाबदार असणार. त्याची पुर्णता कशी करणार. म्हणुन नगरसेवक निधीचे काम पण मंजुर केले जाईल. परंतु सावकाश केले जाईल. मी तुम्हाला असे आव्हान करतो की, नगरसेवक निधीचे काम केले जाईल परंतु टप्याटप्याने केले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>सन्माननिय महापौरजी, व आयुक्त साहेब, सदनातील सर्व सहयोगी, आयुक्त साहेब वारंवार म्हणतात की उल्हासनगर महापालिकेमध्ये जे काही करायचे आहे. तर ते नगरसेवक निधीवर येतात.मी आयुक्तांना चांगल्या त-हेने सांगु इच्छितो की, रोजच्या वर्तमानपत्रात येते महाराष्ट्र शासनाने भरती कमी केली आहे. व सेवानिवृत्त करण्याऐवजी लवकर त्यांना पाठवण्याचा विचार करत आहे. का कारण महाराष्ट्र शासनाचे म्हणणे आहे की, सरकारच्या तिजोरीत पैसा नाही. ठणठणाठण आहे. असे आमचे आयुक्त पण म्हणतात की, उल्हासनगर महापालिकेमध्ये पैसा नाही. आमच्या श्री. नारायण पंजाबी यांचे सहा लाखाचे काम पाण्याविषयी आहे. महापौरांनी रुलिंग दिली आहे. व आयुक्त पण म्हणाले आहेत की, पाण्याची समस्या असेल तर ते काम त्वरीत केले जाईल त्याला प्राधान्य दिले जाईल. परंतु आमचे आयुक्त साहेब वारंवार हे म्हणतात. आमच्या निवडणुका कधी आहेत का आहेत हे माहित असुन देखिल असे म्हणतात. मला असे वाटते महाराष्ट्र शासनावर जसे लोकांचा रोष वाढत आहे. कालच मी वर्तमानपत्रात वाचले. महाराष्ट्र शासन जर इतकी काटकसर करीत आहे . पैसा वाचविण्याचा विचार करत आहे. तर त्यांनी xxxxxxx सुरू केला पाहिजे. असे मी वर्तमानपत्रात वाचले. जर आमचे आयुक्त साहेब यात-हेने काटकसर करू पाहतात तर काय महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारेल? आम्ही आज



ठराव करतो. सर्व लोक प्रतिनिधी ठराव करतो की, आम्ही आमचा नगरसेवक निधी घेणार नाही. जर या निधीमुळे महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारत असेल तर आम्ही धन्यवाद देऊ. ऐवढे करून सुध्दा सुधारत नसेल तर आयुक्त काय केले पाहिजे. मी विचार करतो आयुक्त साहेब की, येणारी वेळ खुप चांगली आहे. आता तुम्ही टाटा इन्फोटेक कंपनी विषयी म्हणालात की, आम्ही शासन निर्णया विरूध्द जाऊ शकत नाही. हे जे तुम्ही सांगता मला वाटते तुम्ही शासनाकडुन तर नाही सर्व वेरीफाय करता. आम्हाला एका गोष्टीचा खेद वाटतो. आम्ही वारंवार सांगु इच्छितो की, आम्ही तुम्हाला प्रत्येक कामात पाठिंबा देऊ. परंतु आमच्या कामात तुम्ही दखल देऊ नका. कारण खुपशा झोपडपट्टी क्षेत्रातुन नगरसेवक निवडुन आले आहेत. एक-एक व्यक्ती म्हणतो. दोन-चार महिन्यात तुमच्या निवडणुका येत आहेत.

इथे काही सदस्य बाहेर गेले व खालील सदस्य सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंदसिंह भुल्लर.

२. श्री. भांडे भगवान
३. श्री. पांडुरंग लांडे
४. श्री. रमेश चव्हाण
५. श्री. प्रकाश महाडिक
६. श्री. रामचंद पारवानी
७. श्रीमती ज्योती कालानी,
८. श्री. देवेंद्रसिंह खेमानी
९. श्री. ईश्वर पमनानी
१० श्री. विनोद तलरेजा
११ श्री.श्यामसुंदर रोहडा
१२ श्री. प्रभुनाथ गुप्ता
१३ श्री.किशोर वनवारी
१४ श्री. प्रमोद टाले
१५ श्री. रामभाऊ आढाव
१६ श्री.बी.बी.मोरे
१७ श्री.नरेश यादव
१८ श्री. ठाकूर सेवलदास
१९ श्री. हरदास माखिजा
२० श्री. राजू सोनावणे
२१ श्री. कुमार आयलानी
२२ श्री. लाल पंजाबी

मा.महापौरः-मोरेजी, गणपुर्ती अभावी आम्ही सभा पुढच्या तारखेपर्यंत स्थगित करत आहोत. ३१ तारखेला ....

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः- दोन मिनिटात मी माझे म्हणणे संपवले असते. आयुक्त साहेब म्हणाले का कानात माझा आवाज बंद करा.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-महापौरजी, क्रिडा समिती तर्फे जो विषय आला आहे. त्याचे काम कसे होईल.

--५६--

मा.महापौरः- सदरची सभा गणपूर्ती अभावी स्थगित करीत आहे हि सभा ३१ तारखेला ४.०० वाजता घेण्यात येईल.

मा.सचिवः-गणपुर्ती नाही. कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्री ८.१४ वाजता सभेचे कामकाज ३१ तारखेला ४.०० वाजे पर्यंत स्थगित केल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-३१/८/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३१/८/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०.८.२००१ रोजी आयोजित करण्यांत आली होती. ती सभा स्थगित करून दि. ३१.८.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
४. श्री. वाघे शामु
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. ज्योती कालानी
७. श्री. ढेणवाल बनवारी
८. श्री. उमाप रामदास
९. श्रीमती. वेलकर सुरेखा
१०. श्री. यादव नरेश
११. श्री. सोनावणे राजु
१२. श्रीमती पवार पंचशिला
१३. श्री. टाले प्रमोद
१४. श्री. आढाव रामभाऊ
१५. श्रीमती. सुनिता बगाडे
१६. श्री. भांडे भगवान
१७. श्री.बनवारी किशोर
१८ श्रीमती. आशा राधवानी
१९. श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
२०. श्री. खेमाणी देवेंदसिंह
२१. श्री. पमनानी ईश्वर
२२. श्री. लांडे पांडुरंग
२३. श्री. मोरे भानजी
२४. श्री. पुरस्वानी जमनादास
२५. श्री. वाधवा गिरधारी
२६. श्री. पारवानी रामचंद्र
२७. श्री. रोहडा श्यामसुंदर
२८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
२९. श्रीमती. करोतिया मालती
३०. श्री. चव्हाण रमेश
३१. श्रीमती. जेस्वानी आशा
३२. श्री. राजानी नरेंद
३३. श्रीमती. यशस्विनी नाईक
३४. श्री. माखिजा प्रकाश
३५. श्री. क्रिशनानी गोदुमल

तर
१. श्री. चौधरी गणेश , २. श्रीमती. मोकल सिमा, ३ श्रीमती. दासानी मिनु ४ श्री. ठाकुर सेवलदास, ५. श्री.तेजी कैलास, ६. श्रीमती. रूपचंदानी भगवंती,७. श्रीमती. मटाई जोनिता, ८ श्रीमती. वासिटा बेबी, ९ श्री. चौधरी राजेंद्र, १० श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे,११. श्री. राजवानी सुनिता, १२. श्री. वारिंगे पंढरीनाथ १३. श्री.तलरेजा विनोद, १४ श्री. बेहरानी ठाकुर, १५. श्रीमती. टेकचंदानी चंदा, १६. श्री. जाधव सुरेश १७ श्री. मोरे भिमसेन, १८. श्री. महाडिक प्रकाश १९. श्रीमती. साधवानी जया, २० श्री. भाटीया जयप्रकाश,२१. श्रीमती. बनवारी मोना, २२. श्री. सुभाष मनसुलकर, २३. श्रीमती. राजानी भारती, २४. श्रीमती. कुंदनानी लविना, २५. श्रीमती. वलेचा पदमा, २६. श्रीमती. गजवानी कांता, २७. श्रीमती. भठिजा इंदिरा, २८. श्री. केणी जयकुमार, २९. श्री. आयलानी कुमार, ३०. श्री. अचनानी पम्मीकुमार, ३१. श्रीमती. वारिंगे पन्ना, ३२. श्री. पंजाबी नारायण ,३३. श्री. जग्यासी राजु, ३४, श्री. रामरख्यानी माहेनदास, ३५.श्री.बहरानी गोप, ३६. श्री. सचदेव गिरधारी, ३७. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार, ३८. श्री. लाल पंजाबी, ३९. श्री. केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.



सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.महापौरः-मी सदनाला सुचित करू इच्छितो मागच्या रविवारी ठाणे जिल्हा शिवसेना शाखा प्रमुख श्री. आनंद दिघे यांचे दुःखद निधन झाले. तर मागच्या स्थगन केलेल्या सभेतील बाकीचे राहिलेले विषय आज न घेता येणा-या नियमित सभेत ते विषय नव्याने घेण्यांत येतील. सदनातील ज्या सदस्यांना दिघे साहेबांना श्रध्दांजली अर्पित करायची असेल काही बोलायचे असेल त्यांनी बोलावे त्यानंतर क्र. ३ ते क्र. ७ पर्यंतचे आजच्या कार्यसुचीवरील विषय वगळण्यांत येत आहे. बाकीचे राहिलेले विषय आज न घेता येणा-या नियमित सभेत ते विषय नव्याने घेण्यांत येतील.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा.महापौरजी, हि जी गणेश उत्सव प्रतियोगिता सुरू आहे. तो विषय प्रलंबित आहे त्याविषयी काय करावे तो कार्यक्रम तर सुरू आहे. त्याबाबतीत आम्हाला मार्गदर्शन दया.

मा.महापौरः-गणेश उत्सव प्रतियोगितेविषयीचा आयटम कार्यसुचीवर आहे. सदनाची पुर्ण सहमती या प्रतियोगितेला आहे. येणा-या महासभेत तो विषय पारीत केला जाईल. तो पर्यंत तुम्ही तुमचे कार्य सुरू ठेऊ शकता.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-धन्यवाद.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-मा.महापौर, उपमहापौर,आयुक्त व सचिव साहेब, शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख धर्मवीर श्री. आनंद दिघे हे एक लढाऊ नेतृत्व पुर्ण ठाणे जिल्हयाने गमावले आहे. तर मी आपणांस विनंती करतो की, आपण दोन मिनिटे त्यांना श्रध्दांजली अर्पित करावी.

शोक प्रस्ताव

प्रस्तावना

शिवसेनेचे अत्त्यंत लोकप्रिय नेते आणि ठाण्याचे १९८६ पासुनचे जिल्हा प्रमुख श्री. आनंद दिघे यांचे रविवार, दि. २६.८.२००१ रोजी रात्री ९.१५ च्या दरम्यान हदय विकाराचा तीव्र झटका येऊन दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने शिवसेनाच नव्हे तर अवघा महाराष्ट्र कळवळला. एक अतिशय चांगल्या स्वभावाचा नेता आणि खंबीर नेतृत्त्व अकाली हरपले.

श्री. आनंद दिघे, गणेश मंडळांना भेट देऊन परतत असतानाच त्यांच्या गाडीला मोठा अपघात झाला. या अपघातात ते जबर जखमी झाले. त्यांचा एक पाय फॅक्चर झाला होता. त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यांत आली होती. व ती यशस्वी झाली होती. मात्र रात्री ९.१५ च्या सुमारास त्यांना हदयविकाराचा तीव्र झटका आला. ते ४९ वर्षाचे होते.

श्री. आनंद दिघे हे १९६६ साली शिवसेनेत दाखल झाले. १९८६ सालापासुन आजपर्यंत त्यांनी ठाणे जिल्हा प्रमुखाची जबाबदारी अत्त्यंत खंबीरपणे सतत सांभाळली. त्यांचे कर्तुत्त्व प्रचंड होते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा त्यांच्यावर दृढ विश्वास होता.

श्री. आनंद दिघे यांच्या अकस्मित निधनाच्या दुःखातुन शिवसेना नेते, शिवसैनिक आणि नागरिक यापैकी कोणी अद्याप सावरलेले नाहीत.



त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ९(अ) दिनांकः-३१/८/२००१.

सुचकाचे नाव :- १)श्री. राजेंद्रसिंह भुल्लर.

२)श्री. पांडुरंग लांडे.

३)श्रीमती. ज्योती कालानी.

४)श्री. किशोर वनवारी.

५) श्री. बी.बी.मोरे.

अनुमोदकाचे नाव :- १)श्री. नरेंद्र राजानी.

२)श्री. रामचंद्र पारवानी

३) श्री. प्रकाश माखीजा

४) श्री. प्रमोद टाले.

५) श्री. रमेश चव्हाण.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. आनंद दिघे यांच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करित आहे.

सुचकांच्या सहया/- १.
२.
३.
४.
५.

अनुमोदकांच्या सहया/-१.
२.
३.
४.
५.

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४--

सर्वांनी दोन मिनिटे मौन पालुन श्रध्दांजली अर्पित केली.

मा.महापौरः-ज्यांना श्री. आनंद दिघे साहेब यांना श्रध्दांजली वाहायची आहे त्यांनी दोन मिनिटे बोलुन श्रध्दांजली अर्पित करावी.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मा.आनंद दिघे साहेब यांचे अकस्मात निधन झाले. कुणी असा विचार देखिल केला नसेल आणि त्यांचे निधन झाले. श्री. आनंद दिघे साहेब यांचे निधन हे केवळ शिवसेना पक्षाचे निधन नसुन ठाणे जिल्हयातील सर्व लोकांचे मोठे नुकसान झाले आहे. सर्व पक्षांचे नुकसान झाले

आहे. समाजाचे नुकसान झाले आहे. मी तर असे म्हणेन की महाराष्ट्रातील एक चांगला नेता, कार्यकर्ता गेल्यामुळे पुर्ण महाराष्ट्राचे नुकसान झाले आहे. श्री. आनंद दिघे साहेब, असे कर्मयोगी व्यक्ती होते. त्यांनी कुठल्याही प्रकारची आशा आकांक्षा राजनितीत ठेवली नाही. त्यांचे जीवन एक उदाहरण होते. ते आपल्यामधुन कित्त्येकांना जे राजनैतिक क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांच्यासाठी प्रेरणा दायक आहे. त्यांनी कधीही निवडणुक लढविण्याची महत्त्वकांक्षा किंवा पद प्राप्त करण्याची आकांक्षा मनात ठेऊन कार्य केले नाही. श्री. आनंद दिघे साहेब, इथपर्यंत की आज पुर्ण ठाणे जिल्हयात कित्त्येक ठिकाणची सत्त्य नारायण पुजा त्यांच्याशिवाय सुनी सुनी वाटेल. त्यांची ही कमतरता या समाजाला अनेक वर्ष जाणवेल. एक अशी व्यक्ती जी दिवसा कधी झोपायची याची माहिती आजपर्यंत कुणाला माहीत नाही की, ते झोपायचे की नाही. ते चोविस तास काम करत राहायचे. गरीब असो, श्रीमंत असो, कुठल्याही समाजातील व्यक्ती असो. मागासवर्गीय असो. भले तो चिखलामध्ये राहत असो, समतल जमिनीवर रहात असो वा मुब्रा पहाडीवर राहत असो. तिथ पर्यंत पोहोचणारी ही एकच व्यक्ती होती. ते आज आपल्यामध्ये नाही. मी भारतीय जनता पक्षातर्फे मा. आनंद दिघे साहेब जे आज आपल्यांत नाहीत. परंतु त्यांनी जे कार्य, प्रेरणा आपल्या साठी करून गेले. त्यांची ज्योती सदा तेवत राहो. येणा-या राजनैतिक नेत्त्यांना त्यापासुन प्रेरणा मिळत राहो. त्यांची हिंम्मत त्यांचा मिलनसार स्वभाव कार्यशैली सदैव आमच्या आठवणीत असेल. देव त्यांच्या आत्तम्यास चरणी विश्रांती देवो. असे दोन शब्द बोलुन श्री. आनंद दिघे साहेबांना श्रध्दांजली अर्पित करतो. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-आज श्री. आनंद दिघे साहेब, यांचे निधन होऊन सहा-सात दिवस झाले. उल्हासनगर नाही तर पुर्ण ठाणे शहरात ते असे नेते होते की, शैक्षणिक असो, राजकीय असो, धार्मिक बाब असो कोणत्त्याही समाजाची व्यक्ती त्यांच्याकडे जायची. ते त्यांना सहानुभूतीने आपल्या जवळ करत व त्यांचे काम करून समाधान मिळवुन देत. ठाणे जिल्हयाचे चांगल्या त-हेने नेतृत्त्व करणारे एक चांगले नेते गेले ही खुप दुःखाची गोष्ट आहे. त्यांचे कार्य नेहमी जिवंत राहिले पाहिजे. मी देवाकडे प्रार्थना करतो की, त्यांनी जे कार्य केले आहे. ते कार्य नेहमी जिवंत राहो व लोकांना प्रेरणा देत राहो. दिघे साहेबांना मी जवळुन ओळखतो. ते माझे चांगले मित्र होते. जेव्हा कधी महापालिकेत यायचे असा नाही विचार करायचे की, हे कार्यकर्ते आर. पी.आय.चे आहेत, कॉग्रेसचे आहेत, वेगळया पक्षाचे आहेत. त्यांना असे वाटायचे की, ही उल्हासनगर महानगरपालिका ठाणे जिल्हयाची महापालिका आहे. ही माझी आहे. सर्व कार्यकर्ते आपले ओहत. ते मनापासुन भेटायचे आणि म्हणायचे, खुप चांगल्या त-हेने काम करा. भेदभाव ठेऊन काम करू नका. शहराची प्रगती करा. शहराचे कामकाज चांगल्या त-हेने करा अशी चालना ते प्रत्त्येक नगरसेवकाला देत. मी तर विचार करतो. दिघे साहेबांकडुन जी प्रेरणा मिळाली त्यानुसार कार्यकर्त्यांनी काम करावे. व एकजुट होऊन शहराचा विकास करावा. अशी मी आज माझ्या आर.पी.आय. पक्षातर्फे व उल्हासनगर



महानगरपालिका आर.पी.आय. गटनेता तर्फे मी अशा नेत्त्याला भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. जयहिंद.

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, गणपती विर्सजनाच्या सातव्या दिवशी सर्व उल्हासित असताना अचानक एक बातमी येते, हा माझा स्वतःचा अनुभव आहे. आजतकच्या स्ट्रीपमध्ये एक छोटीशी स्ट्रिप आली. ठाणे जिल्हा प्रमुख श्री. आनंद दिघे यांचे निधन झाले हे ऐकुन मन गहिवरून आले. या स्ट्रीपवर विश्वासच बसला नाही त्यावेळेस. जेव्हा टिव्हीवर बातम्या आल्या ''पाखरा येशिल कधी तु परतुनी'' लोकांचा टाहो ऐकायला मिळाला आणि मन गलबलुन आले. एक राजकरणी, उत्त्तम राजकरणी, उत्त्तम संघटक असा असलेला हा आमचा आनंद निघुन गेला. याचे

फार मोठे दुःख मला वाटते फक्त एका पक्षाला झाले नसेल. ठाणे जिल्हयातला सर्वात मोठयातला मोठा माणुस आणि अगदी तळाघरातला छोटयातला छोटा माणुस या सर्वांना याचे निश्चित दुःख झाले आहे.मला एक गोष्ट आठवते, जेव्हा माझ्या प्रभागात पाण्याच्या समस्या होत्त्या तेव्हा असेच एकदा भेटायला गेलो असताना माझ्या समस्या मांडल्या असताना, त्यांच्याच माध्यमातुन खासदार निधीमधुन माझ्या प्रभागाच्या पाण्याचा प्रश्न सुटला. आमचा प्रभाग आनंदमय झाला. हा आनंद आज अनंतात विलिन झाला आहे. परंतु त्याच्या विचाराची चळवळ त्यांच्या विचाराची प्रेरणा आम्हाला नेहमी लाभो हिच खरी श्रध्दांजली समजुन मी त्यांना शेवटचा क्रांतीकारी सलाम करतो. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> मा.महापौरजी, आज तुम्ही आम्हाला दिघे साहेबांना श्रध्दांजली वाहण्याची संधी दिली त्याबददल तुमचे आभार मानतो. आज दिघे साहेबांसारखी हस्ती ठाणे जिल्हयात ना दुसरी कोणी असेल ना आहे. आज तीच एक अशी व्यक्ती होती जी २४ तासापैकी १८-२० तास काम करायची. पुर्ण रात्रनंरात्र जागुन लोकांच्या समस्या ऐकायचे. आज ठाणे जिल्हयामध्ये जी एकता होती ती त्यांच्यामुळेच होती. आज त्यांची उणीव दुसरा कुणी भरू नाही शकणार? कोणत्त्याही पक्षाचा व्यक्ती असो त्यांच्याकडे जायचा तर ते त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करायचे. कुणासाठी फोन करायचे, कुणासाठी चिठ्ठी दयायचे, पार्टीपॉलिटिक्स वेगळी गोष्ट आहे. परंतु चांगल्या व्यक्तीस, ख-या व्यक्तीस त्यांना जी धर्मवीर म्हणुन पदवी दिली होती. ते त्या लायक होते. अशी व्यक्ती ना कधी झाली होती ना होईल. मागे मी पण एक समस्या घेऊन त्यांच्याकडे गेलो होतो तेव्हा त्यांनी मला बसवले. ज्या व्यक्तीसाठी मी गेलो त्याला त्यांनी पत्र दिले. जीवन मरण हे माणसाच्या हातात नसते. त्यांचे निधन झाले हि खुप दुःख दायक घटना आहे. त्यांची सेवा अजुन खुप वर्ष जनतेला मिळायला पाहिजे होती अशी आमची पण अपेक्षा होती. हि न होण्यासारखी गोष्ट झाली आहे. याचे आम्हाला पण अत्त्यंत दुःख आहे. तर आज आपण त्यांना इथे श्रध्दांजली देत आहोत. खरी श्रध्दांजली ही होईल की, त्यांनी दिलेल्या प्रेरणेनुसार आम्ही पण वागले पाहिजे. त्यांनी जो मार्ग निवडला तोच मार्ग आपण निवडला पाहिजे. जनतेची सेवा केली पाहिजे. त्यांच्या सारखे कार्य केले पाहिजे. जसे त्यांचे नाव आहे त्याप्रमाणे आपण पण अशी समाजसेवा केली पाहिजे की, आपले पण नाव लोक त्यांच्यासारखे घेतील. हिच त्यांच्यासाठी खरी श्रध्दांजली ठरेल. जयहिंद.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा.महापौरजी, धर्मवीर श्री. आनंद दिघे साहेब, एक अशी हस्ती होती की, ते फक्त शिवसेनाचे नेते नव्हते. फक्त अध्यक्ष होते, परंतु ते नेता संपुर्ण हिंदु धर्माचे होते. ज्या धर्मासाठी आम्ही आपले वतन सोडले त्या धर्माला पुढे आणण्यासाठी त्यांनी खुप प्रयत्न केले. मलंगगड येथील यात्रेची सुरूवात त्यांनी केली. म्हणुन त्यांना धर्मवीर ही पदवी



प्राप्त झाली. असे नेता कदाचित आपणांस आपल्या येणा-या काळात पाहायला मिळतील. अशी महान शक्ती ज्यांनी धर्मासाठी लढाई लढली त्यांचा स्वतःचा काही स्वार्थ नव्हता. त्यांना निवडणुक लढायची नव्हती ना त्यांना स्वतःसाठी काही करायचे होते. त्यांचे पुर्ण आयुष्य मानव सेवेसाठी व हिंदुधर्माच्या सेवेसाठी होते. अशा महान व्यक्तीस मी शतःशत प्रणाम करतो व त्यांना खरी श्रध्दांजली तेव्हा असेल जेव्हा आपण त्यांनी सांगितलेल्या मार्गाने वागलो तर. धर्माच्या मार्गाने व मानव सेवा करून भले तो कोणत्त्याही पक्षाचा असो, गटाचा असा, ते न पाहता, आपण त्यांना आखुन दिलेल्या मार्गाने जाऊन सर्व मानवाची सेवा केली पाहिजे. हिच खरी त्यांना श्रध्दांजली ठरेल.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमानीः-</u>मा. महापौरजी, मी श्री. दिघे साहेबांच्या दुखःद निधनाबाबत युनायटेड शिख असोसिएशनच्या अध्यक्ष या नात्त्याने आमच्या समस्त समाजातर्फे मा. श्री. आनंद दिघे साहेबांना भावपूर्ण श्रध्दांजली

अर्पित करतो. आणि परमेश्वराला प्रार्थना करतो की, त्यांच्या आत्त्म्यास स्वचरणी स्थान दयावे. धन्यवाद.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-म्हणतात चांगल्या माणसाची गरज इथे पण असते व तिथे पण असते. मा. आनंद दिघे हे फक्त ठाणे जिल्हयाचे नेते नव्हते, शिवसेनेचे नव्हते तर पुर्ण ठाणे जिल्हयातील सर्व पक्षाचे ते जणु नेते होते. सर्व पक्षीयांशी त्यांचे चांगले संबध होते. जसे श्री. किशोर यांनी सांगीतले की, वेळोवेळी जेव्हा कुणाचे काम अडायचे ते जनता दरबार लावायचे. रात्रभर जनतेचे म्हणणे ऐकायचे असे निष्फळ भावना ठेवणारे ते सेवाधारी होते. ज्यांनी कधी स्वतःसाठी अपेक्षा ठेवली नाही. योग, साधना, तपस्या हे नेहमी जनतेसाठी करत राहिले. भावपुर्ण श्रध्दांजली आम्ही त्यांना अर्पित करत आहोत. देव त्यांच्या आत्त्म्यास स्वचरणी ठेवो. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची बातमी कानावर पडल्यानंतर आजही विश्वास बसत नाही की ते आमच्यामध्ये नाही आहेत. एक लढाऊ खंबीर नेतृत्त्व कुठल्याही पक्षाचा असो, पंथाचा असो, धर्माचा असो, कधीही त्यांनी अभिमान बाळगला नाही. रात्र असो, अपरात्र असो, दिवस असो, कुठल्याही समस्या आम्ही त्यांच्याकडे घेऊन गेल्यानंतर योग्य ते मार्गदर्शन आणि नेहमी आम्हाला त्यांनी सल्ला दिला. असे एक खंबीर नेतृत्त्व ज्याला सर्व पक्षांनी मान्य केले असा एक लोकप्रिय आणि सर्व मान्य नेता धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा शनिवारी सकाळी अपघात झाला आणि २६ तारखेला त्यांच्या निधनाची बातमी आली. अक्षरशः आजही विश्वास बसत नाही. प्रत्त्येक सरकारी अधिकारी असो, कुठल्या पक्षाचा अधिकारी असो. प्रत्त्येक अधिका-याला ज्या ज्या अडचणी आल्या त्या सन्माननिय दिघे साहेबांकडे मांडल्या. त्यांना आपल्या पध्दतीने कर्तत्त्व मार्गदर्शनाने जिथे जिथे अडचण असेल मग तो कुठल्याही पक्षाचा माणुस असो खात्त्याचा असो. सरकारी कर्मचारी आहेत पोलिस खात्त्याचे कर्मचारी होते. अक्षरशः पोलिस खात्त्यातील कर्मचा-यांनी आपल्या डोळयातुन अश्रु ढाळले आहेत. राजकीय पक्षांनी तर ढाळलेच. ऐवढेच नाही तर लोकसभेला सन्माननिय डावखरे साहेबांनी कबुल केले की, जेव्हा जेव्हा मला मार्गदर्शन लागत असे तेव्हा तेव्हा मी दिघे साहेबांचा सल्ला घेत असे. त्यांनी मला कधीच जाणीव होऊ दिली नाही की, मी शिवसेनेचा आहे, तुम्ही कॉग्रेसचे आहात. असा एक सर्वसामान्य नेता आज ठाणे जिल्हयाने गमवलेला आहे. त्याचे दुःख अनावर झाले आहे. असे एक लढाऊ नेतृत्त्व शिवसेनेचेच नव्हे तर सर्व पक्षाने गमावले आहे. आणि त्यांची प्रेरणा घेऊन त्यांचे राहिलेले अपुरे कार्य संपुर्ण ठाणे जिल्हयामध्ये आमच्या पक्षाच्या वतीने सदैव पुढे चालु ठेऊ हिच आम्ही त्यांना खरी श्रध्दांजली अर्पित करतो. धन्यवाद.



मा.उपमहापौरः-प्रथम महापौरांना धन्यवाद. त्यांनी आमच्या सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेऊन आजची जी होणारी सभा होती ती श्रध्दांजली पर सभा ठेऊन त्यांनी नियमित कार्यसुची पुढे ढकलली त्याबददल धन्यवाद. त्यांनी त्यांच्या भावना अगोदरच माझ्याकडे चेंम्बरमध्ये व्यक्त केल्या होत्त्या. दिघे साहेबांविषयी बोलायचे काय आणि काय? बोलायला गेले तर भरपुर काही आहे. पण शब्दच फुटत नाही म्हणुन काय करायचे? सतत चार दिवस ठाण्यामध्ये अक्षरशः शोककळा पसरली आहे. हे भाग्य सर्वांच्या नशिबी नसते कुणा कुणाच्याच नशिबी असते. असा नशिबवान लाखो करोडोमध्ये एखादाच असतो. ज्यांनी कधी पक्ष, जात , धर्म बघितला नाही. राजकारणाच्या ठिकाणी राजकारण केले , समाजकारणाच्या ठिकाणी समाजकारण केले, धर्माचे देखिल करताना कुठलीही तमा बाळगली नाही. समाजकारण करताना हा अमुक पक्षाचा तमुक पक्षाचा असा कधी विचार केला नाही. त्याची पात्रता बघितली नाही, उंची बघितली नाही. ज्याला जशी मदत करता आली तशी ते सतत करत गेले. सभागृह नेत्त्यांनी सांगितल्या प्रमाणे सतत वीस-वीस तास राबत गेले. श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आयुष्य पन्नास वर्षाचे होते.

तसेच यांचे आयुष्य पन्नास वर्षाचे होते. जणुकाही त्यांना पुढचे सर्व उमगत होते. असे ते सतत रात्रंदिवस काम करत राहिले. जो जो आला त्याला जे देता येईल ते देत गेले. स्वत: कधी कुणाकडुन अपेक्षा ठेवली नाही. निष्काम कर्मयोगी आज ठाणे जिल्हयाने फक्त शिवसेनेनेच गमावला नाही तर प्रत्त्येक तळागाळातील नागरिकाने, संपुर्ण ठाणे जिल्हयाने, संपुर्ण महाराष्ट्राने असा कर्मयोगी जाणता नेता, कार्यकर्ता आज आमच्या पासुन हिरावुन नेला आहे.
''जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला'' नियतीच्या मनात काय असते हे कुणाला सांगता येत नाही पण आज जी दिघे साहेबांमुळे आमच्या शिवसेनेमध्ये व ठाणे जिल्हयातील सर्व लोकांमध्ये जी पोकळी निर्माण झाली ती कधीही न भरणारी आहे. त्यांना आदरांजली हि एकच अर्पित इच्छितो की त्यांनी ज्याप्रमाणे समाजकार्यामध्ये ठसा उमटवला आहे, ज्या पध्दतीने त्यांची कार्यप्रणाली होती त्या पध्दतीने आपण सर्वजण जर गेलो तरच खरी त्यांना श्रध्दाजली होईल ऐवढे बोलुन आज श्रंध्दांजली अर्पण करणे म्हणजे आत्त्म्यास शांती लाभण्यासाठी पण मी तर म्हणतो दिघे साहेब पुन्हा या ठाणे जिल्हयावर त्यांचे जे प्रेम होते त्या प्रेमापोटी ते ठाणे जिल्हयात या उल्हासनगरमध्ये ते वास्तव्य करीत आहेत करीत राहतील हिच इश्वराकडे मागणी आहे.धन्यवाद.

<u>मा.उपायुक्त(श्री. दत्ता भडकवाड):-</u> २६ तारखेला १०.३० च्या दरम्यान घरी फोन खणाणला ठाण्यावरुन दिघे साहेबांचे कार्यकर्ते भालेराव यांनी मला फोन केला की, भडकवाड साहेब, दिघे साहेब गेले. आणि क्षणभर पुढचे जग अंधकारमय झाल्यासारखे वाटले ज्यावेळेस मी पाच मिनिटानंतर थोडासा सावरलो, त्यावेळेस पहिला फोन मी आयुक्त साहेबांना केला. त्यांना पण कल्पना नव्हती, साहेब पण थोडा वेळ काहीच न समजल्यासारखे झाले. मला साहेबांनी विचारले भडकवाड ही धक्कादायक बातमी आहे, आपण खात्रीलायक बोलत आहात का? मी म्हंटले की, साहेब मी उपमहापौंराना फोन करून खात्री करून घेतली आहे. बातमी खरी आहे, बातमी विश्वास ठेवण्यासारखी नसल्यामुळे आयुक्त साहेब म्हणाले, तरी सुध्दा मला निश्चित करावे लागेल आणि मगच त्याबददल प्रतिक्रिया दिली तर बरे होईल. दिघे साहेबांना राजकीय स्तरावर सर्व पक्षांमध्ये मान सन्मान होता त्यांचे कार्य सर्व स्तरावर जसे उल्लेखनिय होते त्याचप्रमाणे दिघे साहेब प्रशासकीय अधिका-यांचे अत्त्यंत चांगले मित्र होते. १९९५ पासुन काल पर्यंत त्यांचे व माझे अत्त्यंत जवळचे संबंध आले त्या कालावधीमध्ये मला कधीही दिघे साहेब राजकारणी वाटले नाहीत. सतत ते एका मित्रासारखी वागणुक आम्हाला देत राहिले. त्यांच्याबददल एकाच शब्दात, एका ओळीत बोलावेसे वाटते, एक सामाजिक बांधीलकी असणारे पर्व आता संपले आहे. माझ्या स्वत:च्या वतीने



प्रशासनाच्या वतीने व माझ्या कुटूंबियांच्या वतीने श्री. दिघे साहेबांच्या आत्त्म्यास परमेश्वर शांती देवो ऐवढी ईश्वर चरणी प्रार्थना करून माझे श्रध्दांजलीचे दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>मा.महापौर महोदय, उपमहापौर महोदय, सन्माननिय नगरसेवक आज आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेची खंडीत झालेली महासभा होती. परंतु गेल्या रविवारी ठाणे जिल्हा शिवसेना प्रमुख मा. दिघे साहेब यांचे अकस्मित निधन झाले. सर्वांनाच हा एक मोठा धक्का होता. दिघे साहेब, खरेखरच एक मोठे व्यक्तीमत्त्व होते. एक महान मानव असे म्हणता येईल. माझा अत्त्यंत जवळचा संबंध त्यांच्याशी आला. प्रशासनाशी जेव्हा त्याचा संबंध येत असे तेव्हा प्रशासनाच्या अडचणी अत्त्यंत तन्मयतेने ते समजावुन घेत ,आणि एकदा प्रशासनाची अडचण समजली तर त्यामध्ये नेहमीच प्रशासनाला अतिशय तन्मयतेने मनापासुन मदत केली. एक मोठे कार्यसम्राट होते. सतत कार्यमग्न राहुन आपल्या समाजाची सेवा करण्यामध्येच त्यांनी आपले पुर्ण आयुष्य व्यतीत केले. मला वाटते आज ते कार्यसम्राट होते. आपण सर्वांनी त्यांच्याकडुन कार्यसम्राट होण्याचा हा सदगुण घेतला तर ख-या अर्थाने त्यांना श्रध्दांजली वाहील्यासारखे होईल. मी अत्त्यंत

दुःखीत मनाने त्यांना श्रध्दांजली वाहु इच्छितो आणि माझे दोन शब्द पुर्ण करतो.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडेः-धर्मवीर श्री. आनंद दिघे साहेब यांना माझ्या तर्फे व प्रभाग क्र. १६ तर्फे भावपुर्ण श्रध्दांजली.

मा.महापौरः-मित्रांनो, २६ ऑगस्ट २००१चा दिवस मी आपल्या आयुष्यात कधीही विसरणार नाही. ते या करता त्यादिवशी चालीया साहेबाचा उत्त्सव होता. त्यादिवशी मी जेव्हा दुपारी तिथे गेलो. झोन ४ चे डि.सी.पी. फडतरे व महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या बरोबर झुलेलालच्या दर्शनासाठी व तिथे चालिया उत्त्सवात मडके घेतात त्यासाठी गेलो असताना मला काहीतरी कमतरता जाणवत होती. त्यावेळी मला आठवले की, मागच्यावेळी जेव्हा चालीया साहेबांचा उत्त्सव होता त्या उत्त्सवात श्री. दिघे साहेब माझ्या बरोबर होते. दुपारची वेळ होती मला असे वाटत होते की, काहीतरी विसरलो आहे. मला कशाची तरी कमतरता जाणवत होती. ती कमतरता दिघे साहेबांच्या उपस्थितीची होती. मागच्या वेळेस जेव्हा चालीयाचा उत्त्सव होता तेव्हा दिघे साहेब महापालिकेत आले होते. त्यावेळी उपमहापौरांनी मला कळवले की दिघे साहेब आले आहेत. कारण महापौरांच्या निवडणुकीनंतर पहिल्यांदा ते महापालिकेत मागच्या वर्षी आले होते. मी तिकडे जाऊन त्यांचे स्वागत केले. व त्यांना माझ्या सोबत नेले. व मी उपमहापौर व ते असे तिघे मिळुन चालीया उत्त्सवात गेलो होतो. जवळ जवळ ते एक-दिड तास माझ्या सोबत होते. खुप गप्पा गोष्टी झाल्या त्यांची हिंदुधर्माविषयी जी निष्ठा होती. ती पाहुन मी खुप प्रभावित झालो होतो. त्याच्या अचानक निधनामुळे असे वाटते की सर्वात मोठी हानी जी झाली आहे ती धर्माची झाली आहे. धर्माच्या हानी बरोबरच समाजाची हानी झाली आहे. कारण की आजच्या युगात अशा व्यक्ती खुप कमी मिळतात. जे आपल्या समाजासाठी धर्मासाठी इतके तत्पर रहातात. दिघे साहेब ठाणे जिल्हयात खुप मोठी उणीव सोडुन गेले आहेत. ती कदाचितच भरून निघेल. मी इश्वराकडे प्रार्थना करतो की, अशी व्यक्ती जी धर्म व समाजासाठी काम करते. अशी व्यक्ती वारंवार या भुमीवर जन्माला येवो. धर्म व समाजासाठी काम करणारे जे लोक आहेत ते नेहमी कार्यरत राहो व धर्माला व समाजकार्याला बढावा मिळो. दिघे साहेब भले कोणत्त्या पक्षातर्फे येत असो. भले ते शिवसेना पक्षाचे होते परंतु त्यांना स्वतःला कधी शिवसेना पक्षापर्यंत सिमित नाही ठेवले. त्यांची जी कार्यप्रणाली होती काम करण्याची



पध्दत होती, कोणत्त्याही पक्षाचा व्यक्ती त्यांच्याकडे जायचा तेव्हा तो हा विचार करत नसत की हा कॉंग्रेसचा आहे, भाजपाचा आहे,का आर.पी.आय.चा आहे का इतर पक्षाचा आहे. पक्ष बाजुला ठेऊन व्यक्ती बघत. त्याच्या भावनेस बघत. व काम करत. आज असे समाजसेवी, अशी व्यक्ती आपल्या मध्ये नाही. पुर्ण जिल्हयातील लोकांचे त्यांच्या प्रती प्रेम होते. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या मनावर आघात झाला. व ते जी कमतरता ठेऊन गेले ती उणीव भरून निघणे कठिण आहे. एका सामान्य माणसास जी भावना असते ते देवाकडे जाऊन दार ठोठवतात तेव्हा देव त्यांचे ऐकतो. त्यांचे प्रेम व श्रध्दा पाहुन त्यांचे म्हणणे ऐकण्यास तयार होते. आणि माझा पुर्ण विश्वास आहे की, समाजामध्ये, आमच्या जिल्हयामध्ये या राज्यात अशा व्यक्ती वारंवार येतील. जे आपल्या परिवाराला सोडुन आपल्या समाजाची व धर्माची सेवा करण्यांत कार्यरत राहतील. मी तुम्हाला हे पण सांगु इच्छितो की, सोमवारी मोनिका मॅरेज हॉलमध्ये एका सार्वजनिक शोकसभा आयोजित केली आहे. वेगवेगळया पक्षाचे जे नेते गण आहेत त्यांनी तिथे येऊन त्या शोकसभेमध्ये श्रध्दांजली अर्पित करावी. ऐवढे दोन शब्द बोलुन मी सभा समाप्त झाल्याचे जाहिर करतो.

मा.सचिवः-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. १० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/९/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/९/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक २०.९.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. चौधरी गणेश
५. श्री. वाघे शामु
६. श्रीमती. सोनावणे यमुना
७. श्रीमती. ज्योती कालानी
८. श्री. ढेणवाल बनवारी
९. श्री. उमाप रामदास
१० श्रीमती. वेलकर सुरेखा
११ श्री. यादव नरेश
१२ श्री. सोनावणे राजु
१३ श्रीमती पवार पंचशिला
१४ श्री. टाले प्रमोद
१५ श्री. आढाव रामभाऊ
१६ श्रीमती. सुनिता बगाडे
१७ श्री. भांडे भगवान
१८ श्री. ठाकुर सेवलदास
१९ श्री.वनवारी किशोर
२० श्री.तेजी कैलास
२१ श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
२२ श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२३ श्री. पमनानी ईश्वर
२४ श्रीमती. मटाई जोनिता
२५ श्रीमती. वसिटा बेबी
२६ श्री. चौधरी राजेंद्र
२७ श्री. लांडे पांडुरंग
२८ श्री. मोरे भानजी
२९ श्रीमती. टेकचंदानी चंद्रा
३२. श्री. तलरेजा विनोद
३३. श्री.पारवानी रामचंद
३४. श्री. रोहडा श्यामसुंदर
३५. श्री. प्रभुनाथ गुप्ता
३६. श्रीमती. करोतिया मालती
३७. श्री. ठाकुरदास बहरानी
३८. श्री. जाधव सुरेश
३९. श्री. मोरे भिमसेन
४०. श्री. चव्हाण रमेश
४१. श्री. महाडिक प्रकाश
४२. श्रीमती. साधवानी जया
४३. श्रीमती. वनवारी मोना
४४. श्री. राजानी नरेंद
४५. श्री. मनसुलकर सुभाष
४६. श्रीमती. नाईक यशस्विनी
४७. श्रीमती. राजानी भारती
४८. श्रीमती. कुंदनानी लविना
४९. श्रीमती. वलेचा पदमा
५०. श्री. पंजाबी नारायण
५१. श्री. आयलानी कुमार
५२. श्री. अचनानी पम्मीकुमार
५३. श्रीमती. राधवानी आशा
५४. श्री. माखिजा प्रकाश
५५. श्री. जग्यासी राजु
५६. श्री. बहरानी गोप
५७. श्री. सचदेव गिरधारी
५८. श्री. ठाकुर नरेंदकुमार

३० श्री. पुरस्वानी जमनादास 	५९. श्री. पंजाबी लाल
३१ श्री. वाधवा गिरधारी 	६०. श्री. केसवानी किशोर
तर

१. श्रीमती. मोकल सिमा, २ श्रीमती. दासानी मिनु ३. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ४ श्रीमती.लक्ष्मीबाई ससाणे,५. श्री. राजवानी सुनिता, ६. श्री. वारिंगे पंढरीनाथ ७. श्री. भाटीया जयप्रकाश,८. श्रीमती. जेसवानी आशा, ९. श्रीमती. गजवानी कांता, १०. श्रीमती. भठिजा इंदिरा, ११. श्री. केणी जयकुमार,

--२--

१२ श्रीमती. वारिंगे पन्ना, १३. श्री. रामरख्यानी माहेनदास, १४ श्री. किशनानी गोदुमल हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-मा.महापौरजी, अमेरीकेतील वर्ल्ड ट्रेड सेंन्टर वर आतंकवादीयांनी जो हल्ला केला....

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-प्रस्ताव दिला आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-प्रस्ताव दिला आहे. ठिक आहे. त्यांच्यावर जो हमला करण्यांत आला त्याचा निषेध करण्यासाठी व तेथे भारतीयांसहीत जे हजारो लोक....

मा.महापौरः- आढावजी, सचिवांना प्रस्ताव वाचु दया. नंतर आपण बोला.

मा.सचिव यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव वाचुन दाखविला.

१)शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :- श्री. बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :- श्री. नरेश यादव

अमेरिका या देशावर दि. ११ सप्टेंबर, २००१ रोजी दहशत वादयांनी मोठा हल्ला केला, त्या हल्ल्यात हजारो अमेरिकन व भारतीय नागरीकांचा नाहक जीव गेला, त्या हल्ल्याचा आम्ही महापालिकेत जाहिर निषेध करतो व त्या हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रध्दांजली दयावी अशी मी विनंती करतो.

२)शोक प्रस्ताव

सूचकाचे नाव :- श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :- श्री. लाल पंजाबी

अमेरिकामधील वर्ल्ड ट्रेड सेंटर इमारतीवर व पेंटॅगान या इमारतीवर दहशतवादयांकडुन अमानुषपणे (अमानवी)नरभक्षी हल्ला मंगळवार दिनांक ११ सप्टेंबर, २००१ रोजी केला गेला. सदर हल्ल्यामध्ये वित्त हानीतर झालीच आहे परंतु विविधी देशातील निर्दोष नागरीक मृत्यूमुखी पडले आहे त्यात भारतीय नागरीकांचा समावेश आहे. या आघोरी कृत्याचा निषेध करून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करीत आहोत. तसेच जगभरात दहशतवादाचे बळी ठरलेल्या लोकांना श्रध्दांजली अपर्ण करीत आहोत.

मा.महापौरः-आता आपण बोला.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-११सप्टेंबरला अमेरिकेतील न्युयॉर्क आणि पेंन्टागॉन येथे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य दहशतवादीयांनी केले. त्यांच्याच विमानांचा वापर करून त्या देशावर खुनी हमला केला. व यामध्ये हजारो निर्दोष नागरिक मारले गेले. या सभागृहात त्यांच्यासाठी सहानुभुती



दाखवुन व त्यांच्या मृतात्त्म्यांस शांतता मिळावी म्हणुन दोन मिनिटे श्रध्दांजली वाहीली जावी. असा माझा प्रस्ताव आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौरजी, मला वाटते की आपण अशा विषयावर सभागृहात कधीच चर्चा करत नाहीत कारण हा चर्चेचा विषय देखिल नाही. आंतरराष्ट्रीय विषय आहे. तरी ११ सप्टेंबरला दहशतवादीयांनी तेथे केलेल्या हमल्याबददल भारताच्या प्रत्त्येक नागरिकाला मग तो लहान असो मोठा असो, ते सर्व या मृतात्त्म्यांच्या दुःखात सहभागी आहेत. मला वाटते पुर्ण भारत वर्ष यासाठी एकजुट आहे. म्हणुन हा चर्चेचा विषय न बनवता दोन मिनिटे मौन आपण पाळले पाहिजे.

मा.महापौरः-चर्चेचा विषय नाही बनविणार? जर कुणी निषेध व्यक्त करू इच्छितो आपल्या शब्दात या घटनेबददल जर कुणास बोलायचे असेल तर बोलाव व नंतर श्रध्दांजली अर्पित करण्यांत येईल.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-महापौर साहेब, अमेरिकेमध्ये काही दहशतवादयांनी जो हमला केला त्यामुळे खुप जिवितांची व मालमत्तेची हानी झाली आहे. त्यात हिंन्दुस्थानचे व इतर देशातीलही खुप सारे नागरिक होते. म्हणुन ज्यांनी पण हे अमानविय कृत्य केले त्यांची आम्ही भत्र्सना निंदा करतो. व मृतात्त्म्यांना शांती मिळो हि प्रार्थना करतो.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य मी आर.पी.आय. तर्फे या विषयी शोक प्रस्ताव दिला आहे. तो यासाठी की अमेरिकेसारख्या देशात ११ सप्टेंबर ला दहशतवादी लोकांनी हमला केला त्यात हजारो अमेरिकन नागरिक व आपल्या भारताचे देखिल नागरिक तेथे मृत पावले. त्या मृतात्त्म्यांना आपल्या महानगरपालिकेतर्फे, सदनातर्फे एक श्रध्दांजली अर्पित करावी. व हमला करणा-यांचा जाहिर निषेध करावा. मला असे वाटते की सर्व शहरवासियांना, सहयोगींना मी विनंती करू इच्छितो की, हा निषेध केवळ सदनातर्फे न देता सर्व शहरातर्फे, सर्व पक्षीयांतर्फे, सर्व व्यापारी वर्गातर्फे निषेध जाहिर करण्यांत यावा. आणि ज्यांचे बळी गेले. त्यांना श्रध्दांजली वाहण्यांत यावी असा मी एक प्रस्ताव सुचित करू इच्छितो.

मा. महापौरः-महाराजजी, तुम्हाला काही बोलायचे आहे?

शोक प्रस्ताव

प्रस्तावना

संपुर्ण जगाची महासत्त्ता म्हणुन ओळखल्या जाणा-या अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला आंतरराष्ट्रिय दहशतवादी कारवायांनी मंगळवार दि. ११ सप्टेंबर, २००१ रोजी जबरदस्त हादरा दिला. न्युयॉर्क मधिल गजबजलेल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या ११० मजली जुळया इमारतीला ८० ते ८५ मजल्यांच्या दरम्यान दोन विमाने एका पाठोपाठ एक धडकली त्यानंतर मोठे स्फोट झाले. आगीचे आणि धुराचे लोळ आकाशात पसरले. या हल्ल्यात काही अनिवासिय भारतीयांसह किमान दहा हजार नागरिक ठार झाले असुन ही

संख्या प्रत्येक सेकंदागणिक वाढत आहे. अमेरिकन वेळे नुसार सकाळी पाऊणे नऊ वाजता ही घटना घडली आणि थोडयाच वेळात या दोन्ही इमारती स्फोट होत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे भुईसपाट झाल्या. त्याचवेळी वॉशिंग्टनमध्ये अमेरिकन संरक्षण खात्त्याच्या मुख्यालयाची पेंटॅगॉन ही इमारतही बॉम्बने



भरलेले अपहत विमान घुसवून उदध्वस्त करण्यांत आली. वर्ल्ड ट्रेड सेंटर हे अमेरीकेच्या व्यापारी वर्चस्वाचे तर पेंटॅगॉन हे लष्करी वर्चस्वाचे प्रतिक दहशतवादयांनी लक्ष्य बनविले.

या हल्यामुळे संपुर्ण अमेरिकेवर शोककळा पसरली. हजारो लोक रस्त्यावर येऊन हंबरडे फोडुन रडत होते. न्युयॉर्क आणि वॉशिंग्टनमधील हल्ले झालेल्या ठिकाणी धुरांचे व आगीचे लोळच दिसत होते.

वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेन्टॅगॉन इमारतींवर झालेल्या बॉम्ब हल्यात मृत्युमुखी पडलेल्या अमेरिकन व अनिवासि भारतीय नागरिकांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.          </u> ९(क)          <u>दिनांक:-२०/९/२००१.</u>

सुचकांची नावे :-१ श्री. बी.बी. मोरे.

२. श्री. किशोर वनवारी.

३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकांची नावे :-१. श्री. नारायण पंजाबी.

२. श्री. रामभाऊ आढाव.

३. श्री. लाल पंजाबी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार अमेरिकेच्या न्युयॉर्क शहरामधिल वर्ल्ड ट्रेड सेंटर व वॉशिंग्टन मधील पेंन्टॅगॉन इमारतींवर झालेल्या बॉम्ब हल्यात मृत्युमुखी पडलेल्या अमेरिकन व अनिवासि भारतीय नागरिकांचे निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकांच्या सहया/-१.
२.
३.

अनुमोदकांच्या सहया/-१.
२.          ३.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित केली.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>महापौर साहेब, मी एक आनंदाची बातमी या सदनातर्फे पुर्ण शहरवासियांना सांगु इच्छितो व अभिनंदन पण देऊ इच्छितो की, इतक्या वर्षानंतर या शहराचे आमदार श्री. पप्पु कालानी हे बाहेर आले आहेत. या सभागृहातर्फे मी पप्पु कालानी व पुर्ण शहरवासियांना अभिनंदन देऊ इच्छितो.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u> मी आपले लक्ष एका गोष्टीकडे वेधु इच्छितो की, मागच्या महिन्यात २० ऑगस्टला २० जणांनी सही करून एक विशेष सभा अनाधिकृत बांधकामाविषयी बोलविण्याचा आपणांस आग्रह केला होता. व तसे निवेदन आपणांस सचिवांना व आयुक्तांना आम्ही दिले आहे. ती सभा आपण कधी बोलविणार याबाबत खुलासा केला तर बरे होईल.

<u>मा.महापौर :-</u>मी सदनाला सुचित करू इच्छितो की, विपक्षा तर्फे एक विशेष सभा बोलविण्याचे जे निवेदन दिले होते ज्यात त्यांनी असे लिहिले होते की, शहरात अनाधिकृत बांधकाम सुरू आहे. व बांधकाम वाढतच चालले आहे. महापालिकेचे त्यावर काही नियंत्रण राहिले नाही आहे. याविषयी सदनात चर्चा करून अनाधिकृत बांधकामावंर कसे नियंत्रण ठेवावे. यासाठी ही सभा बोलवावी. याबाबतीत मी काल आयुक्तांशी व मागच्या आठवड्यात पण आयुक्तांशी बोललो होतो. व त्यांचे लक्ष याकडे केंद्रीत केले आहे. व त्यांना सांगितले आहे की, त्यांचे या सभेबाबतीत मत विचारले असता ते म्हणाले की, ज्या ज्या सदस्यांनी याबाबतीत निवेदन दिले आहे त्यांच्याशी मी बसुन चर्चा करायला तयार आहे. बहुतेक करून सर्व अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण आहे तरी पण सदस्यांना जर असे एखादे खास उदाहरण दिसले असेल तिथे अनाधिकृत बांधकाम चालु आहे. तरी महापालिकेचे नियंत्रण नाही अशा बाबतीत मी चर्चा करायला तयार आहे. माझे आयुक्तांना असे म्हणणे आहे की, उदया त्यांनी आपणांबरोबर ४. ०० वाजता बैठक घ्यावी. जर तुमचे समाधान नाही झाले तर तुम्ही म्हणाल तेव्हा मी विशेष सभा बोलावीन माझी काही हरकत नाही.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>महापौर साहेब, आयुक्त साहेबांचे असे म्हणणे आहे का की, शहरात एकही अनाधिकृत बांधकाम चालु नाही. याचा अर्थ आम्ही खोटो बोलतो असा निघतो. आपण याबाबतीत सभा बोलवा केव्हाही सभेत चर्चा होऊ दया. दुध का दुध, पानी का पानी होऊन जाईल. वेगळी बैठक घेण्याची जरूर नाही यासाठी.

<u>मा.महापौर:-</u>माझे निवेदन आहे तुम्हाला. तुम्ही एकदा आयुक्तांशी याबाबतीत बैठकीत बोला. जर तुमचे समाधान नाही झाले तर मी त्वरीत विशेष सभा बोलाविन.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>ठिक आहे. मंगळवारी बैठक ठेवा. जर आमचे समाधान नाही झाले तर तुम्हाला सभा बोलवावी लागेल.

<u>मा.महापौर:-</u>ठिक आहे. मंगळवारी ४. ०० वाजता. आयुक्त साहेब यांना आश्वासन दया.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः-आयुक्त साहेब असतील का मंगळवारी?

मा.महापौरः-हो. ते असतील.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही पण त्या बैठकीत या.

मा.महापौरः-हो. ठिक आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा.महापौर साहेब, मा. आयुक्त, मा.उपमहापौर साहेब, मी ज्या सुचना मांडणार आहे. सुचना यासाठी मांडत आहे. या उल्हासनगर शहराचा कारभार चालवताना हा शहराचा कारभार इथले अधिकारी चालवतात. नगरसेवक हे या महानगरपालिकेचे विश्वस्त म्हणुन काम करतात. असे असताना आपल्या या शहरामध्ये बरेचसे वर्तमानपत्र असतात. असे बरेचसे वर्तमानपत्र आहेत जे या शहराची , अधिका-यांची माहिती पुरवितात. परंतु गेल्या दोन-तीन वर्षापासुन खरेतर आम्ही आधीच सांगायला पाहिजे होते. परंतु काही पत्रकार काही पत्रक अशा पध्दतीने काढतात की जेणेकरून त्या अधिका-यांची त्या नगरसेवकांची बदनामी करतात. ही पीतपत्रकारीता काही पत्रकारांची रोखण्यासाठी जर आपण या महासभेमध्ये कारण की, सात आठ दिवसापुर्वी ब्युरोकेशन नावाचे वर्तमानपत्र पाहिले त्यामध्ये अधिकारी xxx नगरसेवक xxx आहेत. xxx व्यवसाय करतात. असे जर पेपरमध्ये लिहुन येत असेल तर यामुळे अधिकारी व नगरसेवकांची बदनामी होते. त्यांनी पत्रकारीता जरूर करावी परंतु पत्रकारीतेच्या भाषेत करायला पाहिजे. अशी जर पीतपत्रकारीता करत असतील तर त्यामुळे शहरातील नगरसेवकांची पण अब्रु जाते, अधिका-यांची पण अब्रु जाते. म्हणुन या विषयावर या महासभेमध्ये काहीतरी योग्य निर्णय आपण घ्यावा.

मा.सचिवः-विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे. ४ . ५० वाजले आहेत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-मला उत्तर दया.

मा.महापौरः-या विषयावर आपण सदनात चर्चा नाही करू शकत. आपण वेगळे बसुन या विषयावर चर्चा करू. व नंतर बघु काय करायचे ते.

मा.सचिव :-प्रश्न क्र. ५८५ श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५८५:- १)उल्हासनगर महानगरपालिका बिल्डर लोकांना एक इंची पाण्याचे कनेक्शन दिले जातात परंतु सर्वसाधारण माणसास अर्धा इंची पाण्याचे कनेक्शन देण्यास सुध्दा ओढेवेढे घेतात असे का?
२) प्र. क्र. ३१ मध्ये दिघे बिल्डरला किती इंची पाण्याची लाईन दिली ती केव्हा व का दिली याचा खुलासा व्हावा?

उत्तर :- १) महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातर्फे नागरिकांच्या मागणी नुसार १/२'' ते १'' व्यासाच्या नळ जोडण्या मंजुर केल्या जातात त्या मंजुर करताना बिल्डर किंवा सर्व साधारण नागरिकांना पाण्याचे कनेक्शन मंजुर करण्यात कोणत्त्याही प्रकारचा भेदभाव करण्यांत येत नाही.
२)प्र. क्र. ३१ मध्ये दिघे बिल्डर यांच्या सचदेव नगर कॉ.ऑप सोसायटीस १'' नळ जोडणी दि. २५.१.२००१ रोजी मंजुर करण्यांत आली आहे. सदर जोडणी ही ग्राहकाच्या मागणीनुसार देण्यांत आली आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-मा. महापौर साहेब, मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असुन मला वरील प्रमाणे उत्तर दिलेले असुन. मला असे वाटते की हा प्रश्न सचदेव नगर बाबतीत नसुन कोर्टा संबंधी पण आहे. मागे पण मी विचारले होते व लिखित दिले होते की, उल्हासनगर शहरात जे कोर्ट आहे. या कोर्ट मध्ये देखिल एक एक इंच पाण्याची लाईनी कोणी , कधी , कशा दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे या ठिकाणी देखिल बिल्डरना कशा दिल्या आहेत हे मला विचारायचे आहे. म्हणजे मला विचारायचे आहे की, जे कोर्ट मध्ये दिले आहे त्याबाबतीत कोणीच पाठपुरावा करीत नाहीत. कुठे पास झाले? कोणी पास केले? केव्हा दिले? कशापध्दतीने दिले? याचा पाठपुरावा मी संपुर्ण केला आहे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-जो प्रश्न विचारला आहे त्याचे त्याप्रमाणे उत्तर दिले आहे. कोर्टा बाबतीत त्यात काही विचारले नाही त्यामूळे उत्तर दिले नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-कोर्टमध्ये आणि सचदेव नगरमध्ये दिले गेले आहे ते अधिकृत दिले आहे का?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):- सचदेव नगरमध्ये जे दिले आहे ते अधिकृत आहे. २५. १ .२००० ला पास केले आहे. त्याची प्रत माझ्याकडे आहे.
मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-तुम्ही मला ती प्रत देऊ शकता? याच धर्तीवर तीन-तीन कनेक्शन दिले आहेत. याबाबतीत मी तीन अर्ज दिले आहेत. इतर नगरसेवकांनी कोर्टाबाबतीत असल्यामुळे विचारले नाही पण मी अर्ज देखिल दिला आहे. त्यावेळी मला उत्तर दिले नाही. जर त्यांना कनेक्शन दिले आहे तर पाण्याचे बिल तर असेल.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):- जो आता प्रश्न विचारला त्याचे उत्तर दिले आहे. कोर्टाच्या बाबतीत किंवा इतर सार्वजनिक संस्था हे सार्वजनिक बांधकाम विभाग बघतो. इस्टेट पी.डब्लू.डी. विभाग बघतो.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-मला हेच सांगायचे आहे की, इतर ठिकाणी असे काही केले आहे. आयुक्त साहेब तर फक्त पाण्याची कपात करतात. पाण्यासाठी पैसा नाही. नगरसेवक निधीमधुन काढु इच्छितो. तरी पैसे नाही. आणि आम्ही इथे ओरडतो. आणि ते गप्पा गोष्टी करतात. आयुक्त साहेबांचे लक्षच नाही आमच्या बोलण्याकडे. ते ऐकतच नाही. ते बोलण्यांत इतके मग्न झाले आहेत. आयुक्त साहेब ऐकत आहात का? मी जे काही बोललो ते ऐकले का आपण? मी उपमहापौरांना पण हाथ जोडुन सांगतो. पाण्याची समस्या शहरात बिकट होत चालली आहे. बी. बी. मोरेंना एक दिवस पाणी नाही मिळत दुस-यांना चोवीस तास मिळते. हि जी पाण्याची वितरण व्यवस्था आहे. ती बरोबर नाही म्हणुन आम्ही इथे ओरडतो आहे. एकाला चोवीस तास पाणी मिळते, एकाला मिळतच नाही. एकाला एक इंच कनेक्शन मिळते, एकाला अर्ध्याचे पण मिळत नाही. कुणाला अनाधिकृत कनेक्शन मिळते. उदा. कोर्टात तीन कनेक्शन दिली आहेत. मी याबाबतीत बराच पाठपुरावा केला आहे. परंतु योग्य उत्तर मिळालेले नाही. म्हणुन मी बिल्डर वरून विषय काढला. आयुक्त साहेब जो पर्यंत तुम्ही योग्य त-हेने पाण्याबाबतीत पाठपुरावा करणार नाही. तोपर्यंत पाण्याची समस्या सुटणार नाही. आजही आम्हाला नागरिक विचारतात तुम्ही इतके ओरडता चांगले काम करता. परंतु पाणी कुठे मिळते. पाणी तर मिळत नाही. मी विचार करतो प्रभाग क्र. ६० मध्ये मला वाटते मला ३५-४० वर्ष झाली. कधी तिथे पाण्याचा तुटवडा झाला नाही. परंतु



आज १८-२२ टॅकर तिथे जातात व टॅकरचे पाणी लोक पितात. ते आम्हाला बरे वाटत नाही. वर्षापासुन पाण्याची समस्या शहरात नव्हती. आता पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. आम्ही वारंवार सांगतो साहेब तुम्ही पाण्याच्या

समस्येविषयी विचार करा. किती अनाधिकृत कनेक्शन आहे. आज चार दिवसापुर्वी ठाण्याच्या वर्तमानपत्रात आले होते. ज्यांना अनाधिकृत कनेक्शन दिले होते त्यांच्यावर दंड लावुन ते अधिकृत करावे असेही आले होते. आम्ही पण तुम्हाला सांगितले होते तर तुम्ही म्हणालात की अशी काही तरतुद नाही. पण मी विचार करतो जर तुम्ही अनाधिकृतना दंड लावुन अधिकृत करत नसाल तर कमीत कमी ते कापुन तरी टाका. बारा-बारा हजार, दहा-दहा हजार पाण्याची बिले भरतात. तरी त्यांना पाणी मिळत नाही. आणि जो चोरी करतो तो चांगल्या त-हेने पाणी भरतो. हा भेदभाव जर तुम्ही लक्षात नाही घेतला तर पाण्याची समस्या शहरात जशी आहे तशीच राहील. मी तुम्हाला परत विनंती करतो. भले कोर्ट असो शासकीय कार्यालय असो. महापालिकेने त्यांना पाणी कसे दिले रितसर पध्दतीने दिले की नाही. पाण्याचे बिल ते भरतात की नाही. हे पण तपासले पाहिजे. जर दशोरे साहेबांनी कोर्टाला पाण्याचे बिल पाठवले तर कळेल किती बिल पाठवले आहे तर कळेल किती बिल निघते ते. यात-हेने या शहरात तुम्ही निट लक्ष दिले तरच पाण्याची समस्या सुटू शकेल नाहीतर सुटणार नाही. तर हे कनेक्शन अधिकृत आहे की अनाधिकृत आहे. अधिकृत आहे तर मला किती दिवसात पत्र दयाल. मी एक विनंती करू इच्छितो काल पण आयुक्त साहेबांना सांगितले होते की, जेव्हा एखादा सदस्य प्रश्न विचारतो त्या प्रश्नाचे महासभेआधी नगरसेवकाला लिखित पत्र दिले गेले की, आपले पत्र मिळाले त्यानुसार आम्ही कार्यवाही केली की नाही, अधिकृत आहे की अनाधिकृत असे जर आमच्या प्रश्नाचे उत्तर दिले गेले असते तर आज हा प्रसंग आला नसता हि ऐवढी चर्चा झाली नसती. म्हणुनच माझी सदनाला व आयुक्तांना वैयक्तिक विनंती आहे की, आपण यापुढे याकडे लक्ष दयावे की कुणाचेही सदस्याचे पत्र आले त्याचे उत्तर त्या सदस्यांना दिले गेले पाहिजे.

<u>मा.सचिव :-</u>प्रश्न क्र. ५८६ श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ५८६</u>:- उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत जवाहर हॉटेल पाच मजली इमारत आहे. त्या पाचव्या मजल्याच्या वरती पऱ्याचे शेड टाकता येते का? टाकले असेल तर महापालिकेने परवाना कधी व केव्हा दिला याचा खुलासा व्हावा?

<u>उत्तरः-</u> जवाहर हॉटेलचे पाचव्या मजल्यावरील पऱ्याची विनापरवाना शेड ही माहे जुलै ९९ पुर्वीचे टाकण्यांत आलेली असल्याने तसेच जुलै ९९ सर्वसाधारण महासभेतील चर्चेनुसार माहे जुलै ९९ पुर्वीचे बांधकाम निष्काशन करण्यांत येऊ नये असे सुचित केले असल्याने अदयाप पर्यंत कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

श्री. बी.बी.मोरे यांनी वरील प्रमाणे प्रश्न वाचुन दाखविला.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-</u>सन्माननिय महापौर, मी दरवेळी हा प्रश्न महासभेत विचारत आहे. व त्याचे उत्तर नेहमी असे दिले जाते की, जुलै ९९ मध्ये श्री. चंद्रशेखर साहेब आयुक्त होते तेव्हा स्थायी समिती सभागृहात चर्चा झाली होती. त्यानुसार सर्व कामकाज चालत आहे. तर मी असे समजतो की, विपक्ष सदस्यांनी जो अर्ज दिला आहे की, अनाधिकृत बांधकामाविषयी विशेष सभा बोलावली जावी. व चर्चा केली जावी. मला वाटते ती चर्चा पण निष्फळ ठरेल. कारण हे उत्तर देणार की, ९९ पुर्वीचे बांधकाम आहे. म्हणुन ते



नियमित केले आहेत. ते तोडणार नाहीत. मी जेव्हा जेव्हा प्रश्न विचारला त्या प्रश्नाला हेच उत्तर दिले गेले आहे. आयुक्त साहेब तुम्ही लक्ष दया. मला हे सांगा की आता जबाबदारी आपली आहे. महापौर तर आमचे लोकप्रतिनिधी आहेत. ते आता इथे बोलतील सभागृहाच्या बाहेर बोलतील मी नाही म्हणालो.

पण तुम्ही आम्हाला आश्वासन दया की, ९९ चे हे बांधकाम आहे त्यांना महापालिका आश्रय देते. तर आपण त्यावर काय कार्यवाही करायची?

मा.महापौरः-मोरे साहेब,....

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-नाही. नाही. महापौर साहेब आयुक्त साहेबांचे आम्हाला ऐकु दया की हे ९९ चे बांधकाम आहे. आम्ही महापालिकातर्फे त्यांना आश्रय देतो. मग मी चंद्रशेखर साहेबांना फॅक्सव्दारे विचारेन की आपण आमच्या महापौरांसमवेत बसुन असे काही ठरवले आहे का? तसे रेकॉर्डवर आहे का? जर तसे रेकॉर्डमध्ये असेल तर कशात-हेने आहे हे सर्व मला विचारायचे आहे. कारण की, मागे पण मी अशोक बोधा विषयी प्रश्न विचारला तेव्हा पण तुम्ही मला हेच उत्तर दिले.

मा.महापौरः-मी आयुक्तांना पण सांगतो. ते उत्तर देतील. परंतु लेखी स्वरूपात आपणांस जे उत्तर मिळाले आहे. ते या धोरणानुसार दिले आहे. त्या बैठकीत आपण देखिल हजर होतात. आपण पण त्या धोरणाचे रचेता आहात.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-मी मागे पण म्हणालो होतो आज पण म्हणतो. या पाच वर्षात एका मिटिंगमध्येच मी उपस्थित राहु शकलो नाही कारण मी आजारी होतो. इतर कोणत्त्याही सभेत मी गैरहजर राहीलो नाही. मी प्रत्येक सभेला हजर असतो. मला असे काही चंद्रशेखर साहेबांच्या तोंडुन ऐकायला मिळाले नाही की, ९९ पर्यंतच्या बांधकामांना आश्रय दिला जात आहे. जर असे असेल तर तसा ठराव सदनात करा. सदनात ठराव झाला आहे? नाही झाला. जेव्हा आम्ही प्रश्न विचारतात तेव्हा आम्हाला सांगतात की, ९९ सालाचे आहे आम्ही नाही तोडु शकत.

मा.महापौरः-सदनात ठराव झाला नाही. परंतु दहादा याविषयी उल्लेख केला गेला आहे. अधिका-यांनी व लोक प्रतिनिधींनी मान्यता दिली आहे. त्यासाठी वेगळा ठराव करायची गरज नाही. हे एक सुरळीत धोरण आहे. महापालिकेने ती स्विकारली आहे. व त्यानुसार महापालिका काम करत आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-जे धोरण ठरवले त्याबददल लिखित काहीतरी असेल ना? का नुसते मौखिक आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-मोरे साहेब अशी काही पॉलिसी झालेली नाही. आणि ९९ चे बांधकाम आहे यासाठी तुमच्याकडे पुरावा काय? जर ते बांधकाम ९९ चे असेल तर बिटइन्स्पेक्टरने तसा रिपोर्ट सादर करायला पाहिजे. तो तरी पुरावा आहे का? आणि हॉटेलवाल्यांनी जर पत्र्याचे शेड टाकले असेल तर त्याला आपण परवानगी दिली आहे का? हा ही महत्त्वाचा प्रश्न आहे ना याबरोबर. हे काही पुरावे आहेत का आपल्याकडे? ९९ पुर्वीचे बांधकाम आहे हे एक. दुसरी गोष्ट त्या शेडला परवानगी आहे का?

मा.महापौरः-लांडे साहेब जेव्हा चंद्रशेखर साहेबांनी प्रभारी आयुक्त म्हणुन चार्ज घेतला होता. या महापालिकेत आले आले तेव्हा स्थायी समिती सभागृहात त्यांच्याशी याविषयावर बोलणे झाले होते. व ते बोलणे असे होते की, आपण जेव्हा पासुन महापालिकेचा कार्यभार प्रभारी आयुक्त म्हणुन हाती घेतला आहे.



त्याआधी जे पण अनाधिकृत बांधकाम बांधले गेले आहे. त्यावर आपण काही कार्यवाही करणार नाही. जर आजच्या तारखेत कोणतेही बांधकाम तयार करत आहेत. तर त्यावर आपण व आपले अधिकारी गण कार्यवाही करतील. व त्या धोरणानुसारच महापालिकेच्या अधिका-यांनी आपणांस उत्तर दिले आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-विचारा ना, कधी पॉलिसी ठरली? इथे कोणी हो म्हणतच नाही पॉलिसी ठरल्याचे. सर्व नगरसेवक म्हणतात तोडा. मग कसली पॉलिसी? विचारा ना सर्वांना?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-महापौर साहेब, तुम्ही म्हणता ही पॉलिसी ठरली तर न्यायालयाकडुन जेव्हा आदेश येतात त्या आदेशांचे कसे पालन केले जाते. बांधकाम कसे तोडले जाते. टिल्सन माझ्यासमोर नाही. जेव्हा मी उल्हासनगरमध्ये नव्हतो तेव्हा तयार झाली होती. ते पण तोडले गेले.

मा.महापौर:-कोर्ट हे आपल्यापेक्षा उच्च आहे. त्यांचे आदेश आम्ही डावलु शकत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-कोर्ट आपल्यापेक्षा वर आहे , ठिक आहे.पण महापालिकेने जो ठराव केला तो तरी न्यायालयात दाखविला पाहिजे. या ठरावाची यात-हेने अंमलबजावणी होईल. साईदर्शन इमारत तोडली, हे सर्व कशामुळे होत आहे. ते काय ९९ पुर्वीचे नाही. तर कधीचे आहे? या इमारती तर जुन्या आहेत त्या कशा तोडल्या जातात. या प्रश्नाबाबत मी विनंती करतो की, आपण मला लिखित दयावे मी नागपुरला जाईन आणि चंद्रशेखर साहेबांना विचारेन की तुम्ही मला लिखित दया असे काही ठरले आहे. नाही तर मी त्यांच्यावर याचिका दाखल करेन की, असे काही तुम्ही केले आहे का? ज्यांनी अनाधिकृत बांधकाम केले ते बांधकाम अधिकृत करण्यासाठी चंद्रशेखर साहेबांनी सांगितले असते जसे मागच्या वेळेस सभागृह नेता म्हणाले हेते की, आयुक्त असे पन्नास-पन्नास लाखाचे काहीतरी करून जातात. त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. मला असे वाटते की, चंद्रशेखर साहेबांवर कार्यवाही झाली पाहिजे त्यांनी जर असे केले असेल तर?

मा. महापौर:-लिखित कुणाकडुन पाहिजे महापौरांकडुन का आयुक्तांकडुन?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-तुम्ही दया मला लिखित.

मा.महापौर:-ठिक आहे. मी तयार आहे लिखित दयायला.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-धन्य आहात धन्य महापौर साहेब.

मा.सचिव:-पुढचा प्रश्न क्र. ५८७ हा श्री. बी. बी. मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५८७:- उल्हासनगर महानगरपालिकेत तोडफोड खात्त्यात बिट मुकादम म्हणुन किती आहेत? व खात्त्यात कोण किती वर्षापासुन काम करतो? काही बिट मुकादमांची बदली झाली असता पुन्हा तोडफोड मध्ये घेतात असे का? त्याला बदली करून पुन्हा घेतात?



उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिकेमधील अतिक्रमण विभागात एकुण तीन मुकादम कार्यरत आहेत ते अनु. क्र. १ श्री. रिझवान शेमले २. श्री. श्यामसिंग, ३. श्री. जे. के. भोसले.

संबंधित मुकादमांबाबतची सविस्तर माहिती सोबतच्या तक्यात दिली आहे.

कर्मचा-याच्या एका विभागातुन दुस-या विभागात बदल्या ह्या मा. आयुक्त यांच्या आदेशाने प्रशासकीय कारणासह करण्यांत येतात.

श्री. बी.बी. मोरे यांनी वरीलप्रमाणे प्रश्न वाचुन दाखविला.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-</u>मला असे कळले आहे की, आयुक्तांनी बदली करून एका कॅम्पासाठी एक मुकादम अशात-हेने ठेवले आहे. व आज मला असे कळले की, पुन्हा जुन्या मुकादमांना घेतले जाणार आहे. आयुक्त साहेबांना माझी या सदनासमोर विनंती आहे की, ज्यांची तुम्ही बदली केली त्यांना परत तिथेच ठेवले तर तुम्ही दिलेल्या आदेशाला काही महत्त्व रहात नाही. तर यासाठीच आता ज्या मुकादमांची बदली झाली आहे. त्यांना न घेता दुस-यांना घ्या. परंतु जुन्या मुकादमांना घेऊ नका. कारण त्यांना सगळे धागे दोरे माहित आहेत. म्हणुन त्यांना परत त्या विभागात घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र. ५८८ , ५८९ , ५९० , ५९१ हे श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचे असुन त्यांनी ते मागे घेतले असल्याने त्याची कार्यवृत्तांत नोंद घेता येत नाही.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र. ५९२:- हा प्रश्न श्री. नरेश यादव यांचा असुन त्यांनी तो मागे घेतला असल्याने त्याची कार्यवृत्तांत नोंद घेता येत नाही.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र. ५९३ श्री. नरेंदकुमार ठाकुर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ५९३:-</u>१)वेदन सेंन्ट्रल ऑक्ट्रॉय नाका कॅन बी प्लेस इन द डेन्सीटी ऑफ हेवी फिक्वंन्सी ऑफ स्टुडन्ट ॲन्ड पब्लिक?
२) द हेवी मोटर बायसिकल मे वायुझ ऐनी ॲक्सीडंट टु द स्टुडन्ट ॲन्ड पब्लीक, हु वुल्ड बी रिस्पॉन्सीबल.
३)वेदन स्टेशनरी व्हेकल ॲन्ड पासिंग व्हेकल्स कुल्ड बी अलाऊड टु कॉझ द पोल्युशन ऑफ इन्हारमेंन्ट.
४)वेदर द प्लेस ऑफ सेन्ट्रल ऑक्ट्रॉय नाका वुल्ड बी शिफ्टेड फॉर द यिअर २०००-२००१ टु अव्हाइड पब्लिक ॲन्ड स्टुडन्ट कनव्हेन्स.
५)वुड यु लाईक टु रिकमनंड टु द ट्राफीक पोलिस फॉर हेवींग नो पार्कींग बोर्ड ॲन्ड नो ऐंन्ट्री बोर्ड टु हेवी व्हेकल्स.

<u>उत्तर :-</u> सध्या अस्तित्त्वात असलेल्या जकात अभिकर्त्याच्या कार्यकाल संपल्यानंतर मध्यवर्ती जकात नाका असलेल्या जागेवरून दुसरीकडे हलविण्याचा प्रयत्न महापालिकेचे हित विचारात घेऊन सोयीनुसार केला जाईल.

रहदारी पोलिसांना सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने त्या भागातील जागेतुन रस्त्यावरून जाणा-या येणा-या वाहनांना बंदी घालावी व थांबण्यास



मज्जाव करून त्याठिकाणी योग्य ते निर्देशित तक्ते लावण्याबाबत पत्र पाठवुन विनंती केली जाईल.

<u>मा.सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर:-</u>दि. ३१. ३.२००१ला मी महासभेत प्रश्न दिला होता. मध्यवर्ती जकात नाक्याविषयी. त्याचे उत्तर दिले गेले आहे. दि.

१७४.२००१ला. त्यात लिहिले गेले आहे की, जड वाहनांसाठी पोलिसांना पत्र दिले आहे. सपनागार्डनमधुन जड वाहने हलवण्यासाठी पत्र दिले आहे ते केव्हा दिले ते सांगाल का?

<u>मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-</u>महापौरजी, मला पण याविषयावर जरा बोलायचे आहे. चार महिन्यापुर्वी........

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>आधी मला माझे उत्तर घेऊ दया.

<u>मा.महापौरः-</u>आधी उपायुक्तांना उत्तर देऊ दया मग बोला.

<u>मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-</u>ठिक आहे. मला फक्त हे लक्षात आणुन दयायचे आहे की, चार महिन्यापुर्वी या सभेत मान्य केले होते......

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>महापौरजी, आधी मला माझे उत्तर घेऊ दया. नंतर कुणालाही बोलु दया.

<u>मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-</u>कुमारीजी क्षमा असावी. एक मिनिट मला फक्त महापौरांना आठवण करून दयायची आहे. नंतर तुम्ही बोला माझी काहीही हरकत नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>माझा पण मुददा तोच आहे. मी महासभेत प्रश्न विचारला आहे. मला उत्तर मिळु दया.

<u>मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-</u>मला फक्त महापौरांना आठवण करून दयायची आहे की, निविदा मागवण्यापुर्वी आपण सभागृहात कबुल केले होते की, निविदा भरल्यानंतर त्वरीत तेथील नाका हलविण्यांत येईल. हे तुम्ही लक्षात ठेवा व तसे करा. आता भले आपण कुमारी साहेबांना उत्तर दया. ठिक आहे.

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त):-</u>प्रस्तुत बाब न्याय प्रविष्ट असल्यामुळे आम्ही नाका त्यावेळेस....

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>हिंदीमध्ये बोला.

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त):-</u>नंतर १८.८.२००१ ला पोलिस स्टेशनमध्ये पत्र दिले गेले होते.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>कधी कोणत्त्या तारखेला दिले होते.

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त):-</u>१८.८.२००१ला.



<u>मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>आणि तुम्ही मला उत्तर दिले आहे. १७४. २००१ला त्यात तुम्ही लिहिले आहे की, पोलिसांना पत्र दिले आहे. सभागृहाची दिशाभुल का केली आहे. मला १७४.२००१ला लिखित उत्तर दिले गेले आहे की, पोलिसांना पत्र दिले आहे. पत्र मात्र १८.८.२००१ला दिले याविषयी तुम्हाला काय म्हणायचे आहे?

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त):-</u>आम्ही जे उत्तर दिले होते. त्यात आम्ही पोलिसांना पत्र दिले जाईल असे लिहिले आहे व १८.८.२००१ला पोलिसांना पत्र दिले गेले. नोव्हेंबर अखेर पर्यंत दुसरीकडे जकात नाका बनवायचा आहे. तो बनवला

जाईल असे शहर अभियंता यांनी सांगितले आहे. तोपर्यंत मध्यवर्ती जकात नाका तिथे राहणे योग्य आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-मी सदनाला हे सांगु इच्छितो की, यांनी पोलिसांना पत्र दिले नाही. पोलिसांचे यांना पत्र आले ३१.८.२००१ला आयुक्तांच्या नावाने की, सपना गार्डनमधुन जड वाहने हलविली जावीत. तेथील लोकांनी न्युऐरा शाळा व आजुबाजुच्या शाळांनी तसे पोलिसांना पत्र दिले आहे. कोणताही अपघात घडु शकतो याला जबाबदार कोण? नंतर ३१.८.२००१ला उपायुक्त रिव्हेन्यु यांनी पत्र दिले पोलिसांना की, तीन महिने त्यांना मुदत वाढ दिली आहे. ते कुणाच्या परवानगीने?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर) :-महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी प्रमुख नाक्याविषयी प्रश्न विचारला आहे. हा प्रश्न मार्च २००१चा आहे. आणि त्याचवेळी तत्त्कालिन उपायुक्त जकात यांनी दिले होते. परंतु मी तुम्हाला सांगु इच्छितो की, जेव्हा मी महानगरपालिकेत आयुक्त म्हणुन कार्यभार घेतला त्यावेळी माझ्यासमोर मध्यवर्ती जकात नाक्याविषयी निर्णय घेण्याचा मुददा आला होता. त्याचवेळी मी अग्रक्रमाने प्रस्तावित केलेल्या चार-पाच साईटची स्वतः माहिती घेतली तेथील पहाणी केली. व नंतर मुख्यालयाच्या बाजुला फायरब्रिगेटचे जे कार्यालय आहे ती जागा मला आवडली. फायदया तोटयाचा विचार करावा लागला व मला ती जागा सर्व त-हेने योग्य वाटली म्हणुन तेथे प्रमुख जकात नाका शिफ्ट करण्याचा निर्णय घेतला. तशी कार्यवाही चालु आहे. अजुन थोडा वेळ लागेल. परंतु मी आपणांस व सन्माननिय सदस्यांना विश्वास देतो की, जास्त दिवस त्यांना त्रास सहन करावा लागणार नाही. शहर अभियंतांनी मला आश्वासन दिले आहे. तीन महिन्याच्या आत नाका तयार होईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-तीन महिने केव्हा पासुन?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर) :-आता पासुन.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-ऑगस्टमध्ये त्यांना तीन महिने मुदतवाढ दिली आहे. मोनार्च कंपनीला. हा माझा प्रश्न आहे ३१ मार्च २००१चा व निविदा १२.५.२००१मध्ये उघडण्यांत आल्या. प्रश्न आधीच आला व उत्तर देखिल मला आधीच मिळाले आहे. त्यानंतर देखिल त्यांना तशी परवानगी दिली आहे. तिथे प्रमुख जकात नाका उघडण्यासाठी.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर) :-तुम्हाला माहित आहे. फेब्रुवारी २००१ पासुन जुन पर्यंत आयुक्तांचे पद रिक्त होते. यामुळेच बहुतेक तुम्हाला जसा हवा तसा निर्णय लवकर देऊ शकलो नाही. परंतु मी आपणांस आधीच सांगितले की, मी आल्यावर या कामाला प्राधान्य दिले व ते काम लवकर पुर्ण करण्याचे मी आश्वासन दिले. पाच सहा महिने त्यांना दिले आहेत हि



वस्तुस्थिती आहे. ते मी अमान्य करत नाही. परंतु मी आता आपणांस म्हणालो त्याप्रमाणे आयुक्त पद रिक्त असल्याकारणाने विलंब लागला.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः- साहेब, १९.५.२०००मध्ये झालेल्या महासभेत पान नं. १९ वर महापौरांनी रूलिंग दिले आहे की, येथुन प्रमुख नाका हटविला जाईल व निविदाचे जे ॲग्रीमेंट झाले आहे त्यात लिहिले आहे का तेथुन जकात नाका हलविला जाईल. करारनाम्यामध्ये आपण तशा काही अटी शर्ती टाकल्या आहेत का? त्यांना तसे वर्क ऑर्डर दिले गेले आहेत की नाही? त्यात ही अट टाकली आहे का?

मा.महापौरः-सपना गार्डनमध्ये जो महापालिकेचा मुख्य जकात नाका आहे. तो खाजगी कंपनी मोनार्च हाताळत आहे. याबाबत पुर्वीदेखिल मी आयुक्तांना सांगितले होते की, तेथुन जकात नाका त्वरीत हलविला जावा. कारण जनतेला असुविधा होत आहे. मी त्यांना चार-पाचदा वैयक्तिकपणे सांगितले आहे. ते आपणांस देखिल माहित आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-महापौरजी, मी तुम्हाला चार-पाचदा स्वतः येऊन सांगितले. मी तुम्हाला स्वतः आग्रह केला आयुक्तांना सांगा म्हणुन. मी मार्चला प्रश्न विचारला. तुम्हाला चारदा सांगीतल्यानंतर पोलिसांना पत्र दिले आहे. त्यानंतर ढाकरे साहेबांनी एक पत्र काढले त्याच तारखेला पोलिसांना की, तीन महिने त्यांना मुदतवाढ देत आहोत. तुम्हाला महित आहे की, तीन महिने त्यांना मुदतवाढ देत आहोत. तुम्ही इथे रुलिंग देता तुम्हाला तर हे माहित पाहिजे की, मुदत वाढ देत आहेत.

मा.महापौरः-आता तेथुन नाका हलविण्याचा निर्णय आयुक्त साहेब व शहर अभियंता यांनी घेतला आहे. दुसरे कार्यालय जे बनणार आहे त्याचे प्राकलन तयार झाले आहे. मी आयुक्तांना निर्देश देतो की, या कामाला अत्यावश्यक समजुन ५(२)(२) अंतर्गत काम करून घ्यावे व नाका त्वरीत हलविला जावा.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-आपण म्हणता नाका शिफ्ट होईल, हे वर्ष तर पुर्ण होणार नाही ना नाका शिफ्ट होईपर्यंत? तुमच्या रुलिंगची पण इथे पर्वा करत नाहीत. अधिकारींना आपण रुलिंग दिले होते. मी प्रश्न विचारला होता तेव्हा याच महासभेत आपण सांगितले होते की, त्वरीत सेंन्ट्रल नाका हलविला जाईल. तुम्हाला माहित असेल की डेलिगेशन घेऊन आम्ही प्रभागाची लोक घेऊन आलो होतो.

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-महापौरजी, हा प्रश्न माझा आहे आधी मला उत्तर देऊ दया.

मा.सदस्य श्री. राजु जग्यासीः-आपण भले उत्तर कुमारींना दया. परंतु माझे आपणांस निवेदन आहे. त्वरीत नाका हटविला जावा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-साहेब तुम्ही टाटावाल्यांबददल पण बोलला होतात की, ते करणार नाहीत. अजुनही तेच असेसमेंट करत आहेत. तुम्ही मागे पण रुलिंग दिले होते जकात नाका हटविला जाईल व टाटा विषयी पण



आपण असेच बोलले होतात. आपण रुलिंग देता त्याचा काही फायदा होत नाही.

मा.महापौरः-पुढचा प्रश्न तुमचा आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-त्याचे पण उत्तर मला हवे आहे. तुम्ही दरवेळी रुलिंग देता पण होत काहीच नाही.

मा. सचिव :-प्रश्न क्र. ५९४ हा श्री. प्रमोद टाले यांचा असुन त्यांनी तो मागे घेतला असल्याने त्याची कार्यवृत्तांत नोंद घेता येत नाही.

मा.सचिवः-प्रश्न क्र. ५९५ हा श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५९५:- १)रचनाकार सोनेसरच्या समोर उल्हासनगर -३ येथे तळमजला ते सहा मजल्यांचे बांधकाम असुन ४ गाळे आहे. हे अधिकृत आहे की, अनाधिकृत आहे? जर अनाधिकृत असेल तर आपण अदयाप पर्यंत काय कार्यवाही केली?

उत्तर :- श्री. सोनेसर यांच्या कार्यालयासमोर कॅम्प क्र. १ची हदद असुन सदर ठिकाणी प्लॉट क्र. ६१९ (पै)शिट क्र. ६०-७६ विकासधारक श्री. मुकेश के वाधवानी यांचे नावे बांधकाम परवाना क्र/युएमसी/टीपीडी/बीपी/२९९/९९/१५ दि. ७/४/२००१ अन्वये मंजुर असुन त्यानुसार सदर ठिकाणी आर.सी.सी. इमारतीचे तळमजला + सहा मजले असे बांधकाम सुरू आहे. मंजुर नकाशात तळमजला + सहा मजले व तळमजल्यावर सात दुकाने मंजुर आहेत.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-ठिक आहे.

मा.सचिवः'- प्रश्न क्र. ५९६ हा श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५९६:- १)मधुबन हॉटेलच्यासमोर उल्हासनगर-३ तळमजला + ४ मजल्यांचे बांधकाम असुन तेथे वाढीव बांधकाम आहे? वाढीव बांधकाम असुन त्यावर आपण अद्याप पर्यंत काय कार्यवाई केली आहे?

उत्तर :- उल्हासनगर कॅम्प नं. ३ येथे क्षेत्रीय अधिकारी यांचे मार्फत तपासणी केली असता मधुबन हॉटेल आढळुन आले नाही तथापि उल्हासनगर कॅम्प नं. १ येथे मधूबन हॉटेल असुन त्यासमोर कोणतेही तळमजला + ४ मजल्यांचे बांधकाम चालू नाही. त्यामुळे प्रश्नातील नेमके ठिकाण व विकासधारक बददलचा तपशील असल्यास उत्तर देता येईल.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-सन्माननिय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब मला उत्तर वरील प्रमाणे दिलेले असुन मला वाटते क्षेत्रिय अधिक-यांनी दिशाभुल केली असावी असा माझा अंदाज आहे.

मा.उपायुक्त (श्री. पाणपटटे) :-चौकशी करून सांगतो.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-क्षेत्रिय अधिकारींना लोकेशन देऊन सुध्दा कधी कधी दिशाभुल करतात. तरी आपण त्यांना योग्य ते आदेश देण्यांत यावेत.

मा.सचिवः- प्रश्न क्र. ५९७ हा श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे.



प्रश्न क्र. ५९७:- बॅ. नं.३१ बी, रूम नं. ५,६,७,८ भिमनगर जवळ उल्हासनगर-१ सदर इमारतीचा नकाशा मंजुर आहे का? तसेच तळमजला वाहने उभी करण्यासाठी ठेवण्यांत आला आहे का? किंवा तेथे बांधकाम आहे?

उत्तर :- उल्हासनगर कॅम्प नं. १ बॅ. नं. ३१ बी. रूम. नं. ४ ते ८ येथील बांधकाम परवाना क्र. युएमसी/टीपीडी/बीपी/२१०/२०००/९७४ दि. ५/१२/२००१ नुसार सुरू आहे. मंजुर नकाशा मध्ये तळमजला हा वाहने उभी करण्यासाठी मोकळा ठेवलेला असून कनिष्ठ अभियंता यांनी सदर बांधकामाची दि. २९/१/२००१ रोजी तपासणी केली असुन मोकळी जागा वाहने उभी करण्यासाठी ठेवलेली असून तेथे कोणतेही बांधकाम केलेले नाही.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-जागा आहे का तिथे वाहने उभी करण्यासाठी.

मा.उपायुक्त (श्री. पाणपटटे) :-तिथे वायोलेशन नाही आहे. १९.७.२००० रोजी कनिष्ठ अभियंत्याकडुन चौकशी केली असता तिथे वायोलेशन आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-आहे बरोबर आहे.

मा.उपायुक्त (श्री. पाणपटटे) :-आहे.

मा.सचिव:- प्रश्न क्र. ५९८ हा श्री. पांडुरंग लांडे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५९८:-लभाना दरबारच्या समोर ओटी सेक्शन उल्हासनगर-२ येथे अनाधिकृत बांधकाम असुन नकाशा मंजुर आहे का? असेल तर किती माळयासाठी आहे.

वरील सर्व प्रश्न महासभेत उपस्थित करून त्यावर सविस्तर चर्चा करावी. हि विनंती.

उत्तर :- उल्हासनगर कॅम्प नं. २ येथील लबाना दरबार समोर बॅरेक क्र. ६२८ रूम नं. १ व २ शिट क्र. ६६ येथे सुरू असलेले काम हे मंजुर नकाशा परवानगी क्र. उमपा /नरवि/बाप/२४३/२०००/१०५७ दि. १९/१२/२००० अन्वये सुरू असुन सदर बांधकामास तळमजला + दोन अशी परवानगी आहे.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-हि जी माहिती दिलेली आहे. ती चुकीची आहे असे माझ्या माहितीप्रमाणे वाटते. याची मला आपण लेखी माहिती प्रत उपलब्ध करून देऊ शकाल का? या नंबर प्रमाणे व या दिनांक प्रमाणे.

मा.उपायुक्त (श्री. एस.एस. पाणपटटे) :-ठिक आहे.

मा.सचिव:-प्रश्न क्र. ५९९ श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५९९:-अ) प्र. क्र. ३१, शाळा क्र. १७मध्ये शिक्षकांना बसणेसाठी खुर्च्या व टेबल नाही या शाळेतील मराठी शिक्षकांना टेबल व खुर्च्या का देत नाही व कधी पासून याचा खूलासा व्हावा.
ब) उल्हासनगर शहरात किती मराठी शाळा महानगरपालिकेच्या आहेत. सिंधी व मराठी शाळांचीच दयनीय परिस्थीती का? व शाळेमध्ये रात्रीचा वॉचमन का दिला जात नाही? मराठी शाळेत शिक्षकांची संख्या कमी का याचा खुलासा व्हावा.



उत्तर :-अ) शाळा क्र. १७ मध्ये एकूण १५ खुर्च्या आहेत. चांगले टेबल व ४ नादुरूस्त टेबल ६ आहेत. शाळा सकाळ-दुपार अधिवेशनात भरते. शिक्षण मंडळाने मराठी, सिंधी, हिंदी, गुजराती, शाळांना मागणी प्रमाणे खुर्च्या दिलेल्या आहेत. शिक्षण मंडळाने २०००-२००१ या वर्षी फर्निचर साठी रुपये २५ लाखाची तरतुद केली आहे. तथापि यासाठी महापालिकेकडुन अदयाप निधी मिळाला नसल्यामुळे फर्निचर खरेदीकरीता आले नाही. निधी प्राप्त होताच फर्निचर खरेदी करुन शाळांना पुरविले जाईल.
ब) उल्हासनगर शहरात एकुण ९ मराठी शाळा उल्हासनगर महानगरपालिकेच्या आहेत. मराठी शाळांची स्थिती दयनीय म्हणता येपत नाही. सिंधी शाळांत विदयार्थी संख्या खुपच कमी झाल्याने वर्ग रिकामे आहेत. १३० सिंधी शिक्षक अतिरिक्त आहेत. पालकांचा ओढा इंग्रजी माध्याच्या शाळांमध्ये आहे. वॉचमन- महानगरपालिकेच्या शाळांमध्ये किमान सशस्त्र पाहारेक - यांची आवश्यकता आहे. तथापि वॉचमन नेमण्याचे अधिकार शिक्षण मंडळाला नाही. पदे मंजूर नाहीत. मराठी माध्यमाच्या

शाळांत ३० मराठी शिक्षकांची आवश्यकता आहे. तथापि सिंधी माध्यमात एकूण १३० शिक्षक अतिरिक्त सरपलस् असल्याने मराठी माध्यमाचे शिक्षक भरता येत नाही सोबत सविस्तर टिपणी असे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-मला प्रश्न वाचुन दाखवाल का?

मा.सचिवः-ठिक आहे वाचतो.

मा.सचिव :-प्रश्न क्र. ६०० हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र. ६००:-उल्हासनगर महानगरपालिकेत शिक्षण बोर्डाची स्थापना कधी व कोणत्त्या वर्षी झाली ? व बोर्डाची फेररचना का केली नाही? याला नियम आहे किंवा नाही शिक्षण बोर्डाचा चेअरमन कोण आहे? या चेअरमनच्या कालावधीत आजमितीपर्यंत किती कामे मराठी शाळेंची झाली याचा खुलासा व्हावा.

उत्तर :-शिक्षण मंडळाची स्थापना १९७६ साली झाली आहे. विदयमान शिक्षण मंडळ २१.६.१९८९ पासून आजपर्यंत कार्यरत आहेत. बोर्डाची फेररचना (निवडुन घेण्याचा अधिकार)मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली मधील नियम क्रमांक ६,७,१० या तरतुदीनुसार नगरपालिकेच्या अध्यक्षांना आहेत. महापालिकेच्या संदर्भात महापौरांना आहेत. शिक्षण मंडळाचे सध्याचे चेअरमन श्री. परशराम बी. कालानी हे आहेत. मी ३.६.१९९९ ते आजपर्यंत प्रशासन अधिकारी म्हणून कामकाज पहात आहे. या कार्यकाळात मनपा शाळांतील विदयार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न , विज,शाळा इमारत दुरुस्ती, वालकंपाऊंड , स्वच्छता घरे , मिटींग हॉल इ.कामे सभापतींनी मा. महापौर व मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या आर्थिक सहकार्यातून केली आहेत.

काही सदस्य हसत असताना.....

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-हे सभागृह आहे खेळाचे मैदान नाही. माझा प्रश्न वरील प्रमाणे असुन कोण आहे इथे उत्तर दयायला नाही तर मी नुसता वाचत जाईन...

मा.सचिवः-तोपर्यंत ६०१ घ्या. तुमचाच प्रश्न आहे.



प्रश्न क्र. ६०१ :- उल्हासनगरात ३३ रस्त्याचे रूंदीकरणाचे काम पहिल्या टप्यात घेतले परंतु रस्ता रूंदीकरण होत असता रस्त्यात जे लाईटचे लोखंडी पोल आहेत ते मात्र अदयाप काढले गेलेले नाही जर काढले जात नसतील तर रस्ता रूंदीकरणाचा काहीच फायदा नाही. उदा. वार्ड क्र. ३१ मध्ये ३ पोल लाईटचे आहेत ते काढले जातात किंवा नाही याचा खुलासा महासभेत व्हावा.

उत्तर :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत ३३ रस्त्यांचे रूंदीकरण मधील जे काही म. रा. वि. मंडळाचे खांब येतात ते हलविण्यासाठी पत्र व्यवहार चालु आहे.

मा.सदस्य श्री बी. बी. मारेः-इकडे विद्युत विभागाचे अधिकारी आहेत. त्यांनी सांगावे महापालिकेतर्फे काय कार्यवाही केली जाते.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता. वि. वि):-सन्माननिय महापौर, सदस्य व आयुक्त साहेब ३३ रोडचे बांधकाम ९९ मध्ये ठराव करून सुरू करण्यांत आले. त्यानंतर पहिली सभा जानेवारी २००० मध्ये एम.एस.इ.बी. वाल्यांशी झाली त्यावेळी एम.एस.इ.बी.ला पी.डब्लु. डी. तर्फे रोड आयडेंन्टीफाय

करून दिले होते. रोडच्यामध्ये येणा-या खांबांना हलवायचे होते. जसे जसे रस्त्यांचे बांधकाम चालु झाले. तसतसे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांना पत्र लिहुन रस्त्यामध्ये येणा-या खांबाविषयी माहिती कळवली. व जेव्हा पहिली बैठक झाली होती तेव्हा आपसात चर्चा झाली होती की, हे जे काम आहे त्याचे ५० टक्के खर्च महापालिका भरेल. तर ५० टक्के एम.एस.ई.बी. करेल व त्याप्रमाणे त्यांनी प्राकलन बनविण्यास सुरूवात केली होती. येथील स्थानिक एम.एस.ई.बी. ला प्राकलन पास करण्याचे अधिकार नाहीत. त्यांनी हाय अथॉरीटी सुप्रिटंडन्ट इंजिनिअरकडे पाठवली. त्यांनी चिफ इंजिनिअरकडे पाठवली. त्यानंतर अचानक ऑगस्टमध्ये एम.एस.ई.बी.तुन पत्र आले की, महापालिकेला ५० टक्के नाही तर १०० टक्के खर्च करावा लागेल तरच आम्ही तुमचे प्राकलन पास करू. त्यावेळचे आयुक्त श्री. शिंदे साहेब व सचिव साहेब जे विधी अधिकारी पण आहेत. शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी बसुन निर्णय घेतला की, त्यांना एक कायदेशिर नोटीस दिली जावी. व तशी त्यांना नोटीस दिली की, तुम्ही जे रस्त्यामध्ये खांब उभे केले आहेत ते त्वरीत हटवले जावेत. त्यांनी असे गोलमाल उत्तर दिले की, काही अर्थच नव्हता. आम्ही चौकशी केली असता आम्हाला माहित पडले की, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये एक पीआयएल (जनहितयाचिका)दाखल झाली होती त्यावेळी उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, ज्या शहराची लोकसंख्या पाच लाखावर आहे. तेथे एम.एस.ई.बी. वाल्यांनी त्वरीत आपले ऑब्स्ट्रक्शन हटवावे व स्थानिक प्राधिकरणाकडुन पैसे मिळण्याची वाट पाहु नये व कृपया हटवावे असे आदेश दिले होते. त्या याचिकेची प्रत देखिल आम्ही एम.एस.ई.बी. वाल्यांना दिली तरी देखिल त्यांनी काही केले नाही. नंतर आम्ही त्यांच्याबरोबर एक सभा ठेवली. तेव्हा मी सिव्हील चे डेप्युटी इंजिनिअर व संबंधित अधिकारी पण होते. तेव्हा मी अधिक्षक अभियंताशी बोललो तेव्हा ते स्पष्ट म्हणाले की आम्ही तुमचे हे काम ५० टक्के खर्चात करणार नाही. तुम्ही कृपया शंभर टक्के खर्च भरा. आमचा तुम्हाला असा सल्ला आहे की, तुम्ही स्वत: ते काम करून घ्या व सुपरविजन चार्जेस म्हणुन आम्हाला १५ टक्के दया. तेव्हा आयुक्त श्री. बक्षी साहेब होते. आम्ही त्यांच्या निर्दशनास आणुन दिले असता ते म्हणाले तुम्ही उच्च न्यायालयाचा निर्णय पुन्हा त्यांना दाखवा. आम्ही त्यांना पुन्हा प्रत फॉरवर्ड केली व त्यांना विनंती केली आपण त्यांना हटवा व पैशाची जी पण तडजोड असेल ती आम्ही करू. तरी पण तेथुन काही उत्तर आले नाही. आता आमचे मा. आयुक्त श्री. पोखरकर साहेब आल्यानंतर त्यांना पण मी हे सांगितले तेव्हा त्यांनी देखिल सही करून एक



स्मरणपत्र त्यांना दिले त्यांच्याशी बोललो देखिल, परत एक स्मरणपत्र दिले परंतु एम.एस.ई.बी. वाल्यांकडुन आम्हाला काही प्रतिसाद मिळाला नाही.त्याचे सरळ सरळ म्हणणे आहे. १०० टक्के पैसे भरा. तुम्ही स्वत: काम करून घ्या. आम्हाला फक्त १५ टक्के दया सुपरविझन चार्जेस दया.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-</u>आयलानी साहेब तुम्ही जे सांगितले त्यांनी आमचे समाधान तर झाले. कारण या एकाच अधिका-याने पुर्ण अभ्यास करून आम्हाला उत्तर दिले. आम्हाला आवडले. परंतु आम्ही सुझाव देऊ इच्छितो की, तेथिल अधिक्षक वा मुख्य इंजिनिअर साहेबांची बैठक आयुक्त साहेबांच्या केबीनमध्ये ठेवली तर थोडाबहुत फरक पडेल. दुसरे असे की, ते म्हणतात तुम्ही खांब हटवा. १५ टक्के दया. मला वाटते आपल्या महानगरपालिकेचा जो कर्मचारी वर्ग आहे नाहीतरी आपण त्यांना अनावश्यक पगार देतो. ते पाचव्या वेतन आयोगावर पगार घेतात मग त्यांच्याकडुन का नाही तुम्ही काम करून घेत? रोडचे डिमार्केशन झाले आहे तर रोड बनवणे जरूरी आहे. त्यामध्ये लाईटचे जे खांब येत आहेत ते धोकादायक आहेत. ते काढणे जरूरीचे आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा.महापौर, मी तुमच्याशी एक मिनिट बोलतो. मोरे साहेब तुमच्या प्रश्नासंबधी बोलत आहेत. एम.एस.इ.बी.वाले प्रतिसाद देत नाहीत. १००टक्के आपल्याला भरायला सांगतात. मी तुम्हाला

एक सल्ला देऊ इच्छितो. कृपया यास गंभीरतेने घ्या. डि.पी. रोडवर ज्यांनी बांधकाम केले होते त्यांनी बांधकाम स्वतःच्या पैशाने केले होते की, महानगरपालिकेच्या पैशाने केले. त्यांनी डि.पी रोडवरचे बांधकाम स्वतः मागे घेतले आहे. एम.एस.ई.बी. वाल्यांनी पोल व ट्रान्सफार्मर डिपी रोडच्या मध्ये कसे बांधले. आता ही त्यांची जबाबदारी आहे की,रस्त्यावरील खांब व ट्रान्सफार्मर त्यांनी स्वतःच्या खर्चाने मागे घ्यावे. आपण असे जस्टीफीकेशन देऊ शकतो की तुम्ही डिपी रोडच्या मध्ये खांब आणि ट्रान्सफार्मर कसे लावले. हे सर्व चुकीचे आहे त्यांनी हे करण्याआधी महापालिकेला विचारायला पाहिजे होते की आम्ही खांब आणि ट्रान्सफार्मर लावत आहोत किती अंतरावर लावू? त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे कुठेही लावले आता ते मध्ये येत आहेत त्यांनी स्वतः हटविले पाहिजेत. एम.एस.ई.बी. वाल्यांनी जे खांब लावले आहेत ते बिनाचौकशी न करता डि.पी रोडच्यामध्ये लावले आहेत. तसे गरीब जनतेने देखिल झोपडे बांधले होते परंतु त्यांनी स्वखर्चाने मागे घेतले. त्यांना तर महापालिका खर्च देत नाहीत. तर एम.एस.इ.बी वाल्यांना खर्च देण्याचा प्रश्नच येत नाही. तुम्ही त्यांना विचारा तुम्ही रोडच्यामध्ये तुम्ही हे खांब का लावले. तुम्ही ते काढा नाहीतर आम्ही ते उखडुन टाकू.

<u>मा.महापौरः-</u>मोरेजी, मी आपणांस उत्तर देत आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>एम.एस.ई.बी. जे आहे ते अधिभार घेते. शहराकडुन लाईट बिल घेतले जाते तर त्यांचे कर्तव्य आहे की, त्यांनी खांब व ट्रान्सफार्मर योग्य ठिकाणी लावावे. त्यांनी जर चुकीच्या जागी लावले आहे तर ही त्यांची जबाबदारी आहे त्यांनी ते मागे घ्यावे. महापालिकेवर ओझे टाकण्याचा प्रयत्न करू नये.

<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>महापौर साहेब, दर्शनसिंग म्हणतात परंतु एम. एस.ई.बी. वाले इतके पुढे गेले आहेत की,ते म्हणतील झोपडपटटीवासियांना लाईट देण्यासाठी तुम्हीच सांगितले आता तुम्ही आम्हालाच खर्च करून काढायला सांगता हे ठिक नाही. मी एक गोष्ट आयुक्तांना सांगु इच्छितो की,तिथे जे अभियंता आले आहेत त्यांच्याशी मी चर्चा केली आहे. आयुक्त



साहेबांनी जर मान्य केले तर की ५० टक्के महापालिका खर्च करेल तर ते काम करायला तयार होतील. अशी माझी त्यांच्याशी चर्चा झाली आहे. आपले आयुक्त साहेब जर ५० टक्के खर्च दयायला तयार असतील तर आम्ही एम. एस.ई.बी. वाल्यांनापण तयार करू. आणि हे काम करून घेऊ. मी प्रथम आयुक्तांना विचारतो की, ते ५० टक्के तरी खर्च दयायला तयार आहेत का?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>याबाबतीत श्री. बी.बी.मोरे व श्री. दर्शनसिंग खेमाणी यांची कमिटी नियुक्त करावी.

<u>मा.महापौरः-</u>आपणांस मी हे सांगु इच्छितो की,शहराच्या रस्त्यामध्ये जे पण खांब किंवा ट्रान्स्फार्मर लावले गेले आहेत त्यांना हटविण्यासाठी महापालिकेच्या प्रशासनाने एम.एस.ई.बी.वाल्यांशी जे काही बोलणे झाले आहे. त्यापुढे जाऊन मी उर्जा मंत्री यांना एक पत्र दिले आहे. व लवकरच त्यांच्याशी बैठक घेऊन यातुन काही तरी मार्ग काढु.

<u>मा. उपमहापौर :-</u>महापौर साहेब मला या विषयावर बोलायचे आहे मागच्या वर्षी जेव्हा पुर्ण महाराष्ट्रात लोड शेडींग चालले होते तेव्हा शिवसेनेचे कार्यकर्ते एम.एस.ई.बी. मध्ये मोर्चा घेऊन गेले होते तेव्हा आमदार श्री. साबीरभाई शेख यांनी त्यांच्याशी बैठक घेतली असता लोड शडींग विषयाबरोबरच उल्हासनगरच्या ३३ रस्त्यासंबंधीचा विषय काढला होता. त्यामध्ये येणा-या रस्त्यामधील खांबांचा विषय काढला होता. तेव्हा साबीरभाई यांनी अधिवेशन

चालु असताना त्याची सविस्तर माहिती मागवली. तिथे चर्चा झाली. तिथे उर्जामंत्री यांना जसे आयलानींनी सांगितले ५० टक्के महापालिका खर्च करेल ५० टक्के एम.एस.ई.बी. खर्च करेल. हे सर्व सांगितले परंतु आता एम.एस.ई. बी. म्हणते १०० टक्के तुम्ही खर्च करा आणि वरती १५ टक्के सुपरविझनचे मागत आहेत. असे ११५ टक्के चार्ज लावत आहे. तेव्हा साबीरभाई यांनी विधान मंडळात हे निर्दशनास आणुन दिले. तेव्हा कार्यालयीन विदयुत मंत्री रोहिदास पाटील होते त्यांनी उर्जामंत्रीना आश्वासन दिले की, याविषयी आपण लक्ष दया आणि आधी झालेल्या करारानुसार महापालिकेने व एम.एस.सी.बी. ने काम केले पाहिजे. मी महापौरांना विनंती करतो की, तुम्ही ते जरी फॉलोअप केले तरी काम होऊन जाईल.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-आता आमच्या सन्माननिय उपमहापौरांनी सांगितले त्याआधी महापौरांनी सांगितले आम्हाला आता कागदपत्री काही नको. कारण आता आमचा कार्यकाल कमी आहे. तो कमी असल्यामुळे माझ्या प्रभागातुन जो रोड निघाला आहे. त्यामधुन जर पोल हटविले नाही गेले तर ते अनुचित होईल म्हणुन ही कार्यवाही न होता त्यांना त्वरीत पत्र लिहा त्यांना बोलवा. आयुक्त साहेबांनी सांगावे ते ५० टक्के खर्च दयायला तयार आहेत तर आम्ही उदयाच पत्र देतो आणि स्वतःच्या प्रभागातुन काम करून घेतो.

मा.महापौर:-येणा-या आठवडयात भेटण्याची वेळ निश्चित करून उपमहापौरांना घेऊ तुम्ही पण चला. इतरही गटनेता चलतील......

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे:-मला हे म्हणायचे आहे की, ५० टक्के खर्च आयुक्त भरून दयायला तयार आहेत का? तर मी कार्यकारी अभियंतेला ते काम मंजुर करून करायला सांगतो.

मा.महापौर:-स्थानिक पातळीवर?



मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे:-स्थानिक पातळीवरच नगरसेवक म्हणुन ते काम मंजुर करून घेतो. परंतु आयुक्त साहेब तयार आहेत का ५० टक्के दयायला. जसे आयलानी म्हणाले ५० टक्के प्रमाणे किती खर्च येतो वगैरे ते पाहुन त्यांच्याशी बोलु.

मा.महापौर:-एम.एस.ई.बी. वाल्यांनी ५० टक्केचा प्रस्ताव नामंजुर केला आहे. तुम्ही जर स्थानिक पातळीवर त्यांना राजी करत असाल तर ठिक आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे:-मी तेच म्हणत आहे. माझे त्यांच्याशी बोलणे झाले आहे. ते म्हणतात महापालिका जर ५० टक्के खर्च करायला तयार असेल तर करू. मी आयुक्तांना विचारले तर ते म्हणतात आपल्याकडे ५० टक्के तरी खर्च करायला पैसा कुठे?तर आता काय करायचे?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर:-महापौर महोदय, हि जी एम.एस.ई.बी.ची चर्चा चालू आहे. मी दहा-अकरा वर्षा पासुन महापालिकेत काम करत आहे. जेव्हा रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू होते. ९० सालाची गोष्ट सांगु इच्छितो. त्यावेळी पण हा प्रश्न आला होता. महानगरपालिका जशी पब्लिक युटीलिटी सर्व्हिस साठी आहे तशी एम.एस.ई.बी. देखिल पब्लिक युटीलीटी सर्व्हिस साठी आहे. तसे पाहिले तर त्यांचे देखिल काम आहे. जी काही अडचण नागरिकांना होते. ती अडचण दुर करणे त्यावेळी जेव्हा हा मुददा निघाला तेव्हा त्यांनी १०० टक्के खर्च करून पोल हटवले. जेव्हा जेव्हा शहरात विकास काम सुरू होते व मोठया प्रमाणात ते होऊ लागले तेव्हा त्यांनी २५ टक्के खर्च दयावा

म्हणुन मागणी केली. नंतर ५० टक्के मागणी केली. आता तर १०० टक्के खर्च मागत आहेत. माझे तर स्पष्ट म्हणणे आहे,जशी महापालिका सेवा देते तशी एम.एस.ई.बी पण सेवा देते. व त्याबददल बिल वगैरे सेवाशुल्क म्हणुन वसुल करते. त्यांनी महापालिकेकडे काही मागणी केली नाही पाहिजे. परंतु जनतेला त्रास होत आहे. महापालिकेला देखिल कामात अडचण येत आहे. ते १०० टक्के मागणी करत आहेत परंतु त्यांनी जर ५० टक्के स्वतः काढले तर आम्ही देखिल ५० टक्के भरू. हा खर्च महापालिका देईल. परंतु हे सर्व एकाचवेळी झाले पाहिजे. नाहीतर आधी महापालिका ५० टक्के भरेल नंतर एम.एस.ई.बी. असे नाही चालणार. दोघांनीही एकाचवेळी ५०-५० टक्के खर्च भरला तर महापालिका ५०टक्के खर्च करायला तयार आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>धन्यवाद.

<u>मा.महापौरः-</u>आता तुमचे काम आहे सेटींग करायचे.

<u>मा.सचिवः-</u>प्रश्न क्र. ६०२ हा श्री. बी. बी. मोरे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र.६०२ </u>:- अनिल होटचंदानी याने सोनेसर अपार्टमेंट समोरून जो ४० फुटाचा रोड सी ब्लॉक येथे निघणार आहे, त्या रोड लगत सात मजली इमारत बनवित आहे हया इमारतीचे काम अनाधिकृत आहे की अधिकृत आहे याचा खुलासा व्हावा व सात मजली इमारतीस बांधकामाचा परवाना महापालिका देऊ शकते का? व देत असाल तर केव्हा पासुन याचा ठराव महापालिकेत झालेला आहे याचा खुलासा व्हावा.

<u>उत्तर :-</u> इमारतीचे काम अधिकृत असुन सध्या काम प्रगतीपथावर आहे. नकाशास महानगरपालिकेने दि. २९.१.२००१ रोजी मंजुरी दिलेली आहे. व बी.



एम.आर.डी.ए. यांनी त्यांच्या मंजुर नियंत्रण नियमावली मध्ये दिलेल्या तरतुदीप्रमाणे नकाशा मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मंजुर करण्यांत आला आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>माझा प्रश्न वरील प्रमाणे असुन उत्तर वरीलप्रमाणे दिले आहे. नगररचनाकार शिंदे साहेब, हे जे उत्तर दिले आहे मी मान्य करतो तुम्ही नाही दिले. तुमच्या आधीच्या नगररचनाकाराने दिले. त्यांनी एफ. एस.आय. वगैरे सोडला आहे की नाही काहीच लिहिले नाही. फक्त नकाशा मंजुर आहे आणि त्याचे काम प्रगतीपथावर आहे. येवढेच उत्तर महापालिका आमच्या प्रश्नाचे देते. व सरळ होते. सांगा हे उत्तर बरोबर आहे का? मला वाटते आधी जे करून गेलेत त्यासाठी तुम्ही दोषी होऊ नका. तुम्ही सरळ सरळ सांगा की नकाशा पास आहे?एफ.एस.आय. प्रमाणे बांधकाम आहे? सहा मजली इमारत बांधतात तर महापालिकेत कधी असा ठराव झाला आहे सहा मजली बांधण्याचा ते पण तुम्ही सांगा.

<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>२९.१.२००१ला नकाशा मंजुर केला आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-</u>त्यांनी एफ.एस.आय. सोडला आहे का?

<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>जसे बांधकाम करायला पाहिजे तसे केले आहे. त्यांनी साईड मार्जीन सोडली आहे महापालिकेच्या ठरावाची यासाठी गरज नाही. कारण महाराष्ट्र शासनाने स्पेशल प्लानिंग ॲथोरिटीची नियुक्ती केली आहे. व त्यानुसार त्यांनी काही बायलॉज तयार केले आहेत. त्या बिल्डिंग बायलॉजप्रमाणे त्यांनी नकाशा सबमिट केला होता. व त्यापमाणे नकाशा मंजुर केला गेला आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-आपल्या महापालिकेमध्ये आधी कधी असे झाले आहे.

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-जर कुणी तसा नकाशा सबमिट केला असता छाननी करून त्याचे पैसे महापालिकेत भरायला सांगुन त्याला निर्णय दिला जातो. यांनी बिल्डींग बायलॉज प्रमाणे प्रस्ताव सबमिट केला होता. व तो प्रस्ताव बिल्डीग बायलॉज-पमाणे आहे की नाही याची छाननी करून त्याला नंतर परवानगी दिली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-एक सेकंद तुम्ही जो शासन निर्णय सांगितला आहे तो या बांधकामास लागु होतो का?

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-तो शासन निर्णय नाही आहे. शासनाने मान्यता दिली आहे. बी.एम.आर.डी. ए. ने त्यास मान्यता दिली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-ज्या शासन निर्णयानुसार त्यांना परवानगी दिली आहे. ९४च्या शासन निर्णयानुसार तो जी. आर या बांधकामाला लागु होतो का?

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-हाईट ऑफ बिल्डींग ही डिपेंन्ड ऑफ साईड मार्जिनवर अवलंबून असते.

--२३--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-ज्या ९४च्या शासन निर्णयानुसार याचा नकाशा मंजुर केला गेला. तो शासन निर्णय येथे लागु होतो का?

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-९४चा जी.आर. अकमोडेशन ऑफ रिझर्व्हेशन साठी आहे. परंतु हा जो नकाशा मंजुर केला आहे.तो १९७६च्या उपविधी नुसार आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-राजानी रिझर्व्हेशन मध्ये आहे का?

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-रिवाईज डि.पी.मध्ये. रिझव्हेशन मध्ये नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-जेव्हा जुना मंजुर विकास आराखडा होता. तेव्हा पास झाला आहे.

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-हे जुन्या डि.पी नुसार मंजुर केले आहे. जुन्या डिपीनुसार ते रेसिडेंन्शीअल झोनमध्ये येते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-रिझर्व्हेशनमध्ये येते का?

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-नाही. रिझर्व्हेशन नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-तो शासन निर्णय आरक्षित भुखंडासाठी लागु होतो तर मग इथे कसा तो लागु झाला.

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-ते सर्व रेसिडेंन्शीअल झोनमध्ये आहे. १९७६ मध्ये त्याला बायलॉज प्रमाणे परवानगी दिली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- माझा प्रश्न हा आहे ज्या शासन निर्णयानुसार नकाशा मंजुर केलेला आहे. त्यानुसार आपण दहा टक्के घेणार तो निर्णय याला लागु होतो का? तो जी.आर. या इमारतीला लागु होत नाही.

*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>विकास करतांना १० टक्के बांधकाम भुखंडाच्या स्वाधीका-याने स्वाधीन करण्याचे मान्य केले आहे. ते आता कन्सीडर केले आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u> हा जीआर याला लागु होऊ शकतो का? आपले मत काय? त्यांनी जे केले ते केले. जो शासन निर्णय आरक्षित भुखंडासाठी आहे तो याला लागु होतो का?*

*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>कॉम्पीटंट ॲथोरीटीने मान्य केले आहे लागु करण्याचे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>ते असे करू शकतात का?*

*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>त्यांनी असे केले आहे. ते करू शकतात की नाही? हे तुम्ही ॲथोरीटीला विचारा.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>आयुक्त साहेब, ही इज रेफअरींग टु यू लेट दी कॉम्पीटंट ॲथोरीटी रिप्लाय.*



*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>यात १९७४ साली ओरीजनल मास्टर प्लान मंजुर केला आहे. ते डिपीमध्ये हाऊसिंग फॉर डिसहाऊस यासाठी होते.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>रिझर्व्हेशन होते का?*

*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u> रिझर्व्हेशन आहे पण हाऊसिंग फॉर डिसहाऊससाठी आहे. स्पेसिफीक नंबर ज्याला दिला जातो त्याला रिझर्व्ह प्लॉट म्हणतात.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>जिथे हाऊसिंग फॉर डिसहाऊस असे आरक्षण असते. ते फक्त बेघर झालेल्या लोकांनाच जागा दिली जाते की तिथे जाऊन पुर्नवसन करा. तसे न करता बिल्डरला नकाशा मंजुर करून दिला. शासन निर्णय १९९४ नुसार नकाशा मंजुर केला गेला. इट इज नॉट अप्लीकेबल फॉर धिस पीस ऑफ लॅंड.*

*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u>१९९४च्या जी. आर नुसार दहा टक्के जे त्यांनी दिले पाहिजे. ते त्यांनी हस्तांतर केले आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>याविषयावर मी खुपदा महासभेत तर्कवितर्क केले आहेत. मला फक्त हे म्हणायचे आहे की, हा शासन निर्णय याला लागु होत नाही. हे फक्त तुम्ही मान्य करा. उगाच कशाला इतर काही सांगत बसता. फक्त हे म्हणा ना हा जीआर त्याला लागु होत नाही. चुकीचे झाले आहे. इतके बोलायला काय झाले? यासाठी तुम्ही जुने अधिकारी असे करून गेले म्हणुन आम्ही बोलणार नाही असा विचार नका करू. तुम्ही पुर्ण शहराची दिशाभुल करत आहात.तुमचे जुने साथी, सहयोगी, नगररचनाकार, आयुक्त जर एखादी चुकी करून गेले तर त्या चुकीला तुम्ही कितपत वाचवणार. ज्यांनी चुकी केली ती केली. ती तुम्ही मान्य करा.*

*<u>श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):-</u> महापालिकेने त्यांना बंधन नाही घातले परंतु त्यांनी सुयो मोटो तसे त्यांनी प्रस्ताव सबमिट केला होता.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>मी काय म्हणतो एक नोटीफाईड प्लॉट व रिझर्व्ह प्लॉट यामध्ये फरक आहे ना? जो आरक्षित भुखंडावर कायदा लागु होतो तो*

याला लागु होत नाही. हे डिसहाऊस लोकांसाठी आहे. तुम्ही त्यांना दया बिल्डरला कशाला दिले. ओनरशिप तर जाऊ दे. पण जी.आर.कसा लागु केला.

श्री. एस. टी. शिंदे(नगररचनाकार):- त्यांनी १० टक्के देण्याचे मंजूर केले. म्हणूनच नकाशा मंजूर केला.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:- तो रिजर्व प्लॉट नाही ना? हाऊ कॅन यु अप्लाय टू धिस जी.आर.?

श्री. बी.बी. मोरे:- आयुक्त साहेब, .....

मा. महापौर:- मोरे जी, प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे:- प्रश्नोत्तर तास संपला आहे, तर संपू दे माझा प्रश्न तर पूर्ण होऊ दया. हे पण अर्धवट सोडता काय? मागच्या वेळस पण आपण असेच केले. चार सहा महिने झाले आम्हाला प्रश्न विचारुन. इकडे



लिहिले आहे की, बी.एम.आर.डी.एने हि मंजूरी दिली आहे, मी तर विचार करतो सातव्या मजल्यावर जर आग लागली काही झाले तर उल्हासनगरमध्ये तर दोन-दोन मजल्याच्या इमारती पण पडतात. जर ही पडली तर सातव्या मजल्यावर फायरब्रिगेटचे कोणी जाऊ शकेल का? अशी काही जायची सोय आहे का? आधीच उल्हासनगरमध्ये किती इमारती पडल्या आहेत. ती सहा सात माळयाची इमारत बी. एम.आर.डी.ए.वालेतर वाचवायला येणार नाही. उल्हासनगरमध्ये फायरब्रिगेटमध्ये अशी काही सोय आहे का?आणि खाली बिचारे डिसहाऊस वाले झोपडे बनवुन राहिले आहेत. जर उदया इमारत पडली तर खालचे लोक डिसहाऊस वाले मरून जातील. त्याला कोण जबाबदार आहे? आयुक्त साहेब जरा सदनाला सांगा. उल्हासनगरमध्ये कित्येक अशा इमारती आहेत. इथे असे लिहिले आहे की, बी.एम.आर.डी.ए ने हे केले ते केले. तर असे काही आपण उल्हासनगरमध्ये केले आहे काय?

मा.महापौर:-मी आयुक्तांना सांगतो की, आपणांस उत्तर देऊन प्रश्नोत्तराचा हा विषय पुर्ण केला जावा. जेणेकरून विषय सुचीवरील पुढील विषय घेतले जावेत.

मा.सदस्या श्रीमती. कांता गजवानी, श्रीमती. जोनिता मटाई, श्रीमती. लविना कुंदनानी सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे:-तर माझा हा प्रश्न पुढच्या महासभेत पुन्हा चर्चेस घ्याल?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, प्रश्न क्र. ६०२च्या विषयी नगररचनाकारांनी आपल्या समोर उत्तर ठेवलेले आहे. व त्याचवेळी तत्त्कालिन आयुक्तांनी जो निर्णय घेतला आहे तो माझ्यामते योग्य आहे. व त्यामध्ये कोणताही बदल करण्याची काहीही आवश्यकता नाही.

मा.सचिव :-प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे.

पुढचा विषय क्र. २ मागील सभेचे दि.२०.८.२००१ सह ३१.८.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

पास?

काही सदस्य :- पास-पास............

मा. महापौर :- सदर इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-मा.महापौरजी, प्रत्त्येकवेळी इतिवृत्त कायम करताना नाल्याचा विषय येतो. मागच्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते की,२३ तारखेला नोटीस चिटकविली जाईल. त्याचे काय झाले?आज सहा महिने होत आहेत, आपण कितीतरी वेळा याबाबत आपला निर्णय दिलेला आहात. लक्षवेधी

सुध्दा आली होती. जर एक-दोन दिवस सतत पाऊस पडला आणि त्यामध्ये जर कुणी व्यक्ती मरण पावला तर त्यास कोण जबाबदार असेल?

मा.महापौर:-मागील महासभेत आपणांस सांगितले गेले आहे की, त्यांना नोटीस दिली गेली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, २३ तारखेला नोटीस चिटकविली जाईल त्यानंतर काय झाले? आम्ही जेव्हा विचारणा करतो तेव्हा त्याबाबत योग्य असे उत्तर तर मिळतच नाही. आम्ही याबाबत आयुक्त साहेबांशी सुध्दा बोललो परंतु त्यांनी याबाबत....

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-दोन-दोन वेळा निर्णय देऊनही जर काम होत नसेल तर काय फायदा? तर मग इतिवृत्त कायम करण्यास आमचा विरोध आहे, इतिवृत्त कायम करायचे, निर्णय दयायचे परंतु प्रत्यक्षात काम काहीच होत नसेल तर काय फायदा? कशासाठी इतिवृत्त कायम करायचे?

--२६--

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, त्याबाबत नोटीस दिली होती.त्याबाबत सुनावणी सुध्दा झाली आहे. व त्या जागेवर बांधकाम करण्याबाबत कोणताही नकाशा मंजुर करू नये असे आदेशही दिलेले आहेत. व जो नाला काढायचा आहे त्याचे अलाईनमेंट निश्चित करण्याचे काम करण्यासाठी शहर अभियंत्यांना सांगण्यांत आले आहे. अलाईनमेंट निश्चित केल्यानंतर ते काम केले जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-साहेब, शहर अभियंत्यांचे म्हणणे आहे की,मी सर्व माहिती काढुन आयुक्त साहेबांना दिली आहे. आता हे सर्व आयुक्त साहेबांवर अवलंबुन आहे. व आयुक्त साहेब नाला काढण्यासाठी काही आदेश देत नाहीत. शहर अभियंत्यांशी सुध्दा मी बोललो आहे त्यांना व्यासपिठावर बोलावु विचारणा केली जावी. विचारा ना?शहर अभियंत्यांशी मी बोललो आहे. त्यांना उत्तर देऊ दया.

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-एक मिनिट, आयुक्त साहेब, अधिकारी वर्ग आपली काय जबाबदारी आहे. फक्त दुस-याच्या अंगावर जबाबदारी झटकुन दयायचे ऐवढेच त्यांना माहिती आहे. जे काम आपल्याकडे आहे किंवा साहेबांनी आपणांस नेमुन दिले आहे ते पुर्ण तर केले पाहिजे ना? प्रत्येक जण आपापली जबाबदारी झटकतो आणि मोकळा होतो. महासभेमध्ये याला त्याला पाहतात आणि काहीतरी उत्तर देतात. विनाकारण, त्यांनी आपली जबाबदारी तर समजली पाहिजे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब साहेबांनी यासाठी आम्हाला जे निर्देश दिलेले आहेत की त्याचे अलाईनमेंट करून दया. हे काम कार्यकारी अभियंत्यांना दिले आहे. ते सर्व्हे करून पाणी कोठुन जाईल, जसे की, त्यांना गैरसोयीचे होऊ नये. एक दोन दिवसामध्ये काम पुर्ण होईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-त्यादिवशी तर आपण म्हणालात की, सर्व काम पुर्ण करून आयुक्त साहेबांना दिले आहे....

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-ते पहिले पाठविले होते त्यानंतर फाईल परत आली आहे. साहेबांनी त्यावर जे निर्देश दिले आहेत कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना हे काम दिलेले आहे. ते एक-दोन दिवसामध्ये पुर्ण होईल. १०१ टक्के.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-साहेब दोन दिवसांनी पुर्ण होईल तर नाला केव्हा निघेल? याबाबत उत्तर देण्यास सांगा. नाहीतर पुढील महासभेत इतिवृत्त कायम करताना पुन्हा हा मुददा उपस्थित होता कामा नये. त्या अगोदरच काम पुर्ण झाले पाहिजे. तुम्ही सांगा जरा.

मा. सदस्य / सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक, श्री. गणेश चौधरी, श्री. अचनानी पम्मीकुमार, श्री. माखिजा प्रकाश, श्री. पारवानी रामचंद्र सभागृहातुन बाहेर पडले.

मा.महापौरः-नाला काढण्यासाठी आयुक्त साहेबांनी सांगितले आहे, त्याची अलाइनमेंट वगैरे तयार होत आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-शहर अभियंत्त्यांचे काय म्हणणे आहे की, दोन दिवसामध्ये अलाईनमेंट देऊ. त्यानंतर किती दिवसामध्ये नाला निघेल? हे तर फार मोठे असे काम नाही. जे.सी.बी.लावुन नाला काढायचा आहे.

मा.महापौरः-त्याचे काम तात्त्काळ सुरू केले जाईल.

--१७--

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-मा.महापौरजी, असाच एक प्रश्न मी मागच्या महासभेत उपस्थित केला होता....

मा.महापौर :-श्री. चौधरीजी इतिवृत्त कायम झाले आहे, आता विषय क्र. ३ त्यांना पुकारू दया.

मा.सदस्य /सदस्या श्री. राजु जग्यासी, श्री. किशोर केसवानी, श्रीमती. पंचशिला पवार, श्रीमती. मोना वनवारी सभागृहातुन बाहेर पडले / पडल्या.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः- इतिवृत्त कोणी कायम केले?

मा.महापौरः-झाले ना कायम?

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-कोणी म्हंटले?

मा.महापौरः-सभेने केले मी नाही केले.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-आम्हाला बोलु देणार नाहीत का? आम्हाला जे बोलायचे आहे ते बोलु देणार नाहीत का? इतिवृत्त कायम झाल्याचे कुणी म्हंटले नाही, आपण कुणाला विचारले नाही, ते खाली बसले आणि आम्ही बोलण्यासाठी उभे राहिलो.

मा.महापौरः-मी विचारल्यानंतरच सभेतुन असा आवाज आला की इतिवृत्त कायम म्हणुनच...

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-कुणी म्हंटले?

मा.महापौरः-सर्वांनी म्हंटले.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-आम्ही सुध्दा सभेतच बसलो आहोत. बाहेर थोडी बसलो आहोत?

मा.महापौरः-श्री. महाडिक यांना विचारा.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः-आम्ही नाही बोलायचे का? आपण करा इतिवृत्त कायम. फक्त किशोर वनवारींनी म्हंटले तर पास करायचे का? तर करा पास.

मा.महापौरः-मी आपणांस सांगत आहे , आपल्या माहितीसाठी. तुम्हाला बोलायचे असेल तर बोला.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-आपण जो निर्णय महासभेत जो निर्णय देता त्यावर कार्यवाही होत नाही. त्याबाबत आम्ही बोलत आहोत. आम्हाला जास्त बोलण्याची काही आवश्यकता नाही.

मा.आयुक्त साहेब, मागच्या महासभेत एक प्रश्न विचारला होता. त्यावर आपण उत्तर दिले होते की, प्रारूप विकास आराखडयामध्ये जे राखीव भुखंड आहेत. त्यावर जे नकाशे मंजुर केलेले आहेत. ते नकाशे रदद करण्यासाठी आम्ही त्वरीत कार्यवाही करू. एक महिना झाला त्याबाबत आपण कोणती कार्यवाही केली? जर केली नसेल तर लवकर करावी. कारण की, त्या लोकांनी तेथे बांधकामे सुरू केली आहेत. त्याठिकाणी शहरातील गरीब लोक बुकींग करीत आहेत. आणि ती बुकींग चालु राहीली तर लोकांचे जे नुकसान होणार आहे त्यास जबाबदार कोण?याचे उत्तर दयावे आताच्याआता.

--२८--

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय,श्याम गोपीचंद व इतर सात, प्लॉट नं. १६८, सिट नं. ७२,३२ याबाबत मागच्या महासभेत मी आश्वासन दिले होते की त्याची बांधकाम परवानगी आहे ती रदद केली जाईल. त्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. व त्याचवेळी मी नगररचनाकार यांना सांगितले होते की, हे रदद केले पाहिजे. व त्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. दोन-तीन दिवसातच आदेश निघतील.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-एक सेकंद, मागच्यावेळी आपण म्हंटले होते की,श्री. भिवापुरकर यांना एक अहवाल तयार करण्यासाठी, जसे की, चार भुखंडाचा विषय निघाला होता त्याबाबत निर्णय झाला होता की, ते आपणांस उत्तर देतील. भिवापुरकर यांचे नाव आपण घेतले होते की, ते उत्तर देतील तर ते उत्तर सभागृहासमोर आले पाहिजे. श्री. भिवापुरकर यांच्याकडुन,

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरजी, महासभेस अधिकारी लोक गंभीरतेने घेत नाहीत. आपण असताना,

मा.महापौरः-आपण असा काही विचार करू नका.

यावेळी काही सदस्य आपसामध्ये बोलत असताना कोण काय बोलत आहेत हे नेमके समजुन येत नव्हते.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-श्री. भिवापुरकर यांचे मत जाणुन घेणेस मला आवडेल. चौकशी अधिकारी श्री. भिवापुरकर यांना काय आढळुन आले.

मा.महापौरः-आयुक्त हे सर्वोच्च अधिकारी आहेत. त्यांच्यावर ते आहेत का? आयुक्तांनी आपणांस उत्तर दिले आहे ना?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी:-मला त्या अधिका-याकडुन उत्तर हवे आहे ज्यास चौकशी अधिकारी म्हणुन नेमले होते. अशी माझी विनंती आहे. ज्या माणसाला त्याबाबत चौकशी अधिकारी म्हणुन नेमले होते त्याचे मत महत्त्वाचे आहे?

मा. सदस्य / सदस्या श्रीमती. मालती करोतिया, श्रीमती. लुंड लक्ष्मीबाई, श्रीमती. टेकचंदानी चंदा, श्री. सेवलदास ठाकुर, श्रीमती. सुनिता बगाडे सभागृहातुन बाहेर पडले /पडल्या.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-आपण असा आग्रह का करत आहात? उत्तर कुणी दयायचे हा आमचा प्रश्न आहे.

मा.महापौरः-राजानीजी, जेव्हा आयुक्त उत्तर देतात तेव्हा संपुर्ण प्रशासनाच्या वतीने ते उत्तर असते.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, त्यावेळी मी उत्तर दिले होते की, श्री. भिवापुरकर जे कार्यकारी अभियंता आहेत त्यांना मी श्री. नरेंद राजानी यांनी जे मुददे उपस्थित केले आहेत त्याबाबत चौकशी करण्यासाठी

त्यांची नेमणुक केली आहे. परंतु कालच त्यांच्या कुणाएका नातेवाईकाचे निधन झाल्यामुळे ते कार्यालयात उपस्थित राहु शकले नाही. मध्ये एकदा विधान परिषदेत हाच प्रश्न उपस्थित केला गेला होता. त्यावेळी आम्ही म्हणजे प्रशासनाने जी काही माहिती पाहिजे होती ती माहिती मा. नगरविकास राज्यमंत्री यांना दिली. त्यावेळीच सभागृहात चर्चा झाली. व त्यावेळी सन्माननिय नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिले की, हे जे भुखंड आहेत त्याबाबत वेगळी अशी चौकशी केली जाईल व हे आश्वासन दिल्यानंतर आम्ही त्यांच्या आदेशाची वाट पहात आहोत.



<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>इथे आमच्या महापालिकेच्या वतीने काय होत आहे. हा एक वेगळा मुददा आहे. आमच्या महासभेत असे आश्वासन दिले होते की, श्री. भिवापुरकर साहेबांची त्यासाठी नेमणुक केली आहे. ते चौकशी करून आपला अहवाल सादर करतील. त्यांनी असे सांगितले आहे की, आपण आपली चौकशी पुर्ण करू नका. आमचा चौकशी चालु आहे, जाणीव पुर्वक अशी काही कारणे शोधली जात आहेत. जेणेकरून काही चुकीच्या लोकांना सहकार्य दिले जात आहे. असा माझा आरोप आहे. आुयक्त त्या लोकांना वाचवु पहात आहेत. काय आयुक्त सुध्दा त्यामध्ये सामील आहेत? आम्हाला येथे सांगण्यांत आले होते की, भिवापुरकर यांची त्यासाठी नेमणुक केली आहे. ते चौकशी करून आपला अहवाल सादर करतील.

<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>महापौर महोदय, सन्माननिय सदस्य जे बोलत आहेत त्यात काही तथ्य नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>तथ्य आहे.आयुक्तांची भुमिका आहे ती चुकीची आहे. कमिश्नर वॉन्ट टू शिल्ड दी पिपल. हि इज ऑलसो इनव्हालव्हड इन धिस पिच्चर. शेम ऑन यु कमिश्नर शेम.

विपक्षाचे काही सदस्य आयुक्तांना शेम, शेम म्हणुन ओरडत होते.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>आयुक्त अधिकारींना उत्तर देऊ देत नाहीत.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही पहिल्यांदा पहात आहे आयुक्त अधिकारींना उत्तर देऊ देत नाहीत.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>आय प्रॉटेस्ट अगेन्स्ट धिस कमिश्नर, वुई प्रॉटेस्ट अगेन्स्ट धिस कमिश्नर.

इकडे भाजपा आणि शिवसेनेचे उपस्थित सदस्य सभेतुन ६. १० वाजता बाहेर पडले.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा.महापौर, आता आमच्या विपक्ष सदस्यांनी बायकॉट केले आहे. तर मेहरबानी करून नियमित कार्यसुची लवकर सुरू करावी. आमचा वेळ वाया जात आहे तो कृपया वाचवावा. लवकर कार्यसुची सुरू करा.

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.
<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मागच्या वेळेस महापौरांनी आश्वासन दिले होते. पास करू आता पास.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- सन २००१-२००२ करिता श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता संबंधित क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समितीचा दि. ३१.७.२००१ रोजीचा ठराव क्र. ३ कायम करणे बाबत.

प्रस्तावना:-

--३०--

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती तर्फे दरवर्षी गणपती सणाच्या वेळी दरवर्षी गणेश दर्शन स्पर्धा आयोजित केली जाते. याही वर्षी २००१ साली उल्हासनगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणेश दर्शन प्रतियोगिता चे आयोजन करण्याचे मा. सभापती क्रिडा समिती यांनी योजिले आहे. गणेश प्रतियोगिता मध्ये मंडळास उत्त्कृष्ठ मुर्ती, उत्त्कृष्ठ देखावा, उत्त्कृष्ठ विषय, उत्त्कृष्ठ राष्ट्रीय एकात्मता देखावा, उत्त्कृष्ठ धार्मीक वातावरण, उत्त्कृष्ठ स्वच्छता, उत्त्कृष्ठ शिष्टाचार, चलचित्र देखावा आणि अन्य विशेष प्रदर्शन अशी ९ पारितोषिके १ तमेज ४ क्रमांकाना देण्याचे आहेत. व इतर खर्च याकरिता होणारा खर्च पुढील प्रमाणे आहे.

१) स्पर्धेची पारीतोषिके

बक्षीसे घेण्यासाठी ४ क्रमांक ठेवले आहेत. एकुण ३६ आणि उत्तेजनार्थ १५० बक्षीसे ती पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. १५ इंच ग १५ इंच ट्रॉफी प्रत्येकी ५००० एकूण ९ | ४५,०००/- |
| २. १२ इंच ग १२ इंच ट्रॉफी प्रत्येकी ४००० एकूण ९ | ३६,०००/- |
| ३. १० इंच ग १० इंच ट्रॉफी प्रत्येकी ३५०० एकूण ९ | ३१,५००/- |
| ४. ८ इंच ग ८ इंच ट्रॉफी प्रत्येकी ३००० एकूण ९ | २७,०००/- |

समिती सदस्य २५ व उत्तेजनाथे म्हणुन भाग घेणा-या मंडळास भेट
एकुण १५० बक्षीसे प्रत्येकी १००/-
१५,०००/-

-------------

१,५४,५००/-

बक्षिसांचा अंदाजित खर्च रू. १,५४,५००/- रू. (एक लाख चोपन्न हजार पाचशे रूपये)

२) व्हीडीओ शुटिंग:-

२४ कॅसेट व एक मास्टर कॅसेट
संकलन, ध्वनी मुद्रण इत्त्यादी साहित्त्य दोन मुव्ही कॅमेरा १२ दिवसासाठी
६०,०००/-

३) २५ समिती सदस्यांचा ११ दिवसाचा चहा व जेवणाचा खर्च:-

समितीत एकुण २५ सदस्य, दोन वाहन चालक, दोन मुव्ही वाले, दोन फोटोग्राफर, व दोन कार्यालयाचे कर्मचारी असे एकुण ३३ व्यक्तींचा संध्याकाळी ७ ते रात्री १ वाजे पर्यंत फिरणार आहे. त्यांचा खर्च :-

| | |
|---|---|
| १. चहा दोन वेळा प्रत्येकी ३ रू. चहा ३३ व्यक्तींचा दोन वेळा अकरा दिवस | २१७८/- |
| २. जेवण थाली प्रत्येकी ७० रू. प्रमाणे एक दिवसासाठी ३३ व्यक्ती एकुण ११ दिवस | २५,४१०/- |

-----------

एकुण
चहा जेवण
खर्च :-
२७,५८८/-
एकुण अंदाजित खर्च २७,५८८/-(रूपये सत्ताविस हजार पाचशे अठ्ठयांशि)होणार आहे.



४) फोटोग्राफर खर्च :-

फोटोग्राफी ८० फोटो प्रत्येक दिवस
असे ११ दिवसाचे फोटो व बक्षिस समारंभाचे
फोटो प्रत्येक रू. २६/- (४ इंच ग ६ इंच )
२५,०००/-

५) छपाई खर्च :-

| | |
|---|---|
| प्रमाण पत्र ३ प्रकारचे, १००-१००-१०० प्रत्येकी १० रू. | ३०००/- |
| प्रवेश पत्रिका ५०० प्रत्येकी १ रू. | ५००/- |
| निमंत्रण पत्रिकव (कव्हर सह) ३०० नग प्रत्येकी ६ रू. | १८००/- |
| गुण पत्रिकव २५०० प्रत्येकी १ रू. | |
| कापडी बॅनर ३ फुट ग ९ फुट ५ नग प्रत्येकी ३०० रू. | १५००/- |
| एकुण खर्च | ९,३००/- |

एकुण खर्च ९,३००/- रू. आहे.

६)समितीच्या सदस्यांना फाईल, पेन, बॅचेस देण्याचे खर्च :-

| | |
|---|---|
| १. बॅचेस ३० नग १० रू. प्रत्येकी | ३००/- |
| २. फाईल (एक्झीक्युटीव्ह फाईल) २५ नगर प्रत्येकी १५० रू. | ३७५०/- |
| ३. पेन २५ नग प्रत्येक २५ रू. | ७५०/- |

अंदाजित खर्च रू. ४८००/- (चार हजार आठशे रू) एवढा आहे.

७)बक्षीस समारंभाचे दिवसाचे खर्च :-

| | |
|---|---|
| १. खूर्च्या ४०० नग प्रत्येक ५ रू. | २०००/- |
| २. टेबल १० नग प्रत्येक ५० रू. | ५००/- |
| ३. तीन बाजुने बंद करण्यासाठी ८० फुट पडदा १० रू. फुट | ८००/- |
| ४. ध्वनी क्षेपण | १०००/- |
| ५. नारळ २५ नग १० रू. एक | २५०/- |
| ६. हार २५ नग ४० रू एक | १०००/- |
| ७. शाल २५ नग १५० रू. एक | ३७५०/- |

----------

एकुण :-
९३००/-

८)मुर्ती व सजावट परिक्षक यांना ११ दिवसासाठी मानधन
प्रत्येकी २५००/-रू ५०००/-

उपरोक्त कार्यक्रमाचे अंदाजित खर्च रू. २,९५,४८८/- आहे.

सदरचा खर्च महापालिकेने केलेल्या अंदाजपत्रकातील क-५ ( अ)या शिर्षकाखाली केलेल्या तरतुदीमधून करावयाचा आहे.

तरी उपरोक्त श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता २००१ या वरील एकूण खर्च अंदाजित रू. २,९५,४८८/- सिन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दरसुची तथा निविदाव्दारे कारवाई



करून संबंधित विभागामार्फत करण्याचे प्रस्तावित असून प्रथम क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती समोर ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती ठराव क्र. ३</u>　　　<u>दि.३१.७.२००१</u>

सुचकाचे नाव :-श्री. पमनानी ईश्वर.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुर वेहरानी.

हि क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती वरील तरतुदीप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मुख्य लेखा परिक्षक छाननी अंती ठरवतील अशा अटी, शर्ती व निर्बंधांवर श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता-२००१ आयोजित व कार्यान्वीत करणे कामी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या स्वइच्छेअनुसार नेमलेल्या सदस्यांच्या समितीस व अनंषंगिक पारितोषिके, व्हीडीओ शुटींग, वाहन,प्रमाणपत्रे, जाहिरात, बॅनर, छायाचित्रे इत्यादी व्यवस्थेकामी रू. २,९५,४८८/- च्या अंतर्भूत खर्चास महासभेच्या अधिन राहुन प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच मा. महापौर ज्या सदस्यांच्या समितीची रचना करतील ती अंतिम राहिल आणि ती या ठरावाचा भाग मानला जाईल.

या विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार श्री. गणेश दर्शन प्रतियोगीतेचे आयोजन करून कार्यान्वीत करणे कामी विलंब झाल्यास त्यामुळे अत्यंत गैरसोयीचे होईल असे वाटल्यास सदरचा ठराव महासभेकडुन कायम होण्याची वाट न पाहता श्री. गणेश दर्शन प्रतियोगीतेचे आयोजन करून कार्यान्वीत करता येईल.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापति / पिठासीन अधिकारी
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र.</u>　　१०　　　<u>दिनांक :-</u> २०.९.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. देवेंदसिंग खेमाणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर सेवलदास.

--३३--

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००१-२००२ करिता श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता संबंधित क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समितीचा दि. ३१.७.२००१ रोजीचा ठराव क्र. ३ कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ४ वाचुन दाखवत असताना

काही सदस्य :-पास. पास.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-त्यांना विषय पुर्णपणे वाचु दया.

मा.महापौरः-सचिव विषय वाचत आहेत तुम्ही चिंता करू नका.
सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- श्री. अनिल जयसिंघानी, कनिष्ठ अभियंता यांचे वरील गैरशिस्त व शिस्तभंगाच्या आरोपांची खाते निहाय चौकशी होई तोपर्यंत मा. आयुक्तांचे निलंबन आदेश कायम करणे बाबत.

प्रस्तावना :-

ज्याअर्थी श्री. अनिल जयसिंघानी, कनिष्ठ अभियंता १२.१०.८४ या दिवशी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत लागुन ते दिनांक १.३.२००० पासुन ते दि.१५.१.२००१ पर्यंत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या विभागात कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत असताना दिनांक १.३.२.९९ ते २०.११.२००० या कालावधीत त्यांनी केलेल्या कामाचे लेखा परिक्षण, लेखा परिक्षण विभागाकडुन झाले असताना नियम बाहय कामे व तसेच महापालिकेचा आर्थिक रक्कमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे त्यांच्या गैरशिस्त व गैरवर्तणुकीमुळे त्यांना महापालिकेच्या सेवेतुन दिनांक १५.१.२००१ पासुन कार्यालयीन आदेश क्र. /उमपा/साप्रावि/आस्था/टे-५/१२१ अन्वये निलंबित करणेत आलेले आहे.

त्याचप्रमाणे मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर ३ येथे त्यांचे विरूध्द फौजदारी गुन्हा महापालिकेतर्फे दाखल करणेत आलेला आहे.

--३४--

सबब श्री. अनिल जयसिंघानी (निलंबित) तत्त्कालीन कनिष्ठ अभियंता सु.ज. श.से.यो. यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१)(ब)नुसार महासभेपुढे ठेऊन निलंबन कायम करणे प्रस्तावित आहे.

तसेच सभेच्या चर्चेअंती असे निर्दशनास आले आहे की, प्रशासनातर्फे आयुक्तांनी काढलेले वरील कर्मचा-याचे निलंबन आदेश मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)अन्वये सहा महिन्याच्या विहित मुदतीत कायम करण्यासाठी महासभेपुढे न ठेवल्याने आणि सदरच्या प्रस्तावास महासभेपुढे ठेवण्यास विलंब केल्याने ती जबाबदारी संबधित अधिका-यावर ठेवणे आवश्यक आहे.

श्री. अनिल जयसिंघानी, कनिष्ठ अभियंता, यांचा निलंबन आदेश विहित मुदतीत महासभेपुढे न ठेवल्याने त्याचा फायदा त्यांना होऊ शकतो. परंतु वरील कर्मचा-यास फौजदारी आरोपाखाली सहा महिन्याच्या कालावधीपुढे निलंबनाधिन ठेवता येईल. म्हणुन प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ११ दिनांकः- २०.९.२००१

सुचकाचे नाव :- श्री. सेवलदास ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामभाऊ आढाव.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अनिल जयसिंघानी, कनिष्ठ अभियंता यांचे वरील गैरवर्तन व शिस्तभंगाच्या आणि फौजदारी आरोपाखाली चौकशी पुर्ण होईपर्यंत निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

काही सदस्य :-पास. पास.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :-श्री. विलास सोनावणे, लिपिक यांचे वरील गैरशिस्त व शिस्तभंगाच्या आरोपांची खाते निहाय चौकशी होईस्तोपर्यंत मा. आयुक्तांचे निलंबन आदेश कायम करणे बाबत.

प्रस्तावना :-

ज्याअर्थी श्री. विलास सोनावणे, लिपिक, हे दि. २.११.९६ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत लागुन ते दिनांक १.७.९९ पासुन ते दि. १५.१.२००१ पर्यंत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या विभागात प्रभारी प्रकल्प अधिकारी म्हणुन कार्यरत असताना दिनांक १३.२.९९ ते २०.११. २००० या कालावधीत त्यांनी केलेल्या कामाचे लेखा परिक्षण, लेखा परिक्षण विभागाकडुन झाले असतांना त्यांनी नियम बाहय कामे व तसेच महापालिकेचा आर्थिक रक्कमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे त्यांच्या गैरशिस्त व गैरवर्तणुकीमुळे त्यांना महापालिकेच्या सेवेतुन दिनांक १५.१. २००१ पासुन कार्यालयीन आदेश क्र/उमपा/साप्रावि/आस्था/टे-५/१२० अन्वये निलंबित करणेत आलेले आहे. व त्याचप्रमाणे मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर ३ येथे त्यांचे विरूध्द फौजदारी गुन्हा महापालिकेतर्फे दाखल करणेत आलेला आहे.

सबब श्री. विलास सोनावणे, लिपिक, तत्त्कालिन प्रकल्प अधिकारी, सु.ज.श.रो.योजना यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१)(ब)नुसार महासभेपुढे ठेऊन निलंबन कायम करणे प्रस्तावित आहे.

तसेच सभेच्या चर्चेअंती असे निर्दशनास आले आहे की, प्रशासनातर्फे आयुक्तांनी काढलेले वरील कर्मचा-याचे निलंबन आदेश मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)अन्वये सहा महिन्याच्या विहित मुदतीत कायम करण्यासाठी महासभेपुढे न ठेवल्याने आणि सदरच्या प्रस्तावास महासभेपुढे ठेवण्यास विलंब केल्याने ती जबाबदारी संबधित अधिका-यावर ठेवणे आवश्यक आहे.

श्री. विलास सोनावणे, लिपिक, यांचा निलंबन आदेश विहित मुदतीत महासभेपुढे न ठेवल्याने त्याचा फायदा त्यांना होऊ शकतो. परंतु वरील कर्मचा-यास फौजदारी आरोपाखाली सहा महिन्याच्या कालावधीपुढे निलंबनाधिन ठेवता येईल. म्हणुन प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १२ दिनांकः- २०.९.२००१

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. पमनानी ईश्वर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. विलास सोनावणे, लिपिक यांचे वरील गैरवर्तन व शिस्तभंगाच्या आणि फौजदारी आरोपाखाली चौकशी पुर्ण होईपर्यंत निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:'- हि आमच्या शिवसेना व भाजपा नगरसेवकांची मागणी होती की, सतीश प्रधान यांना अनुदान दिले जावे. त्यांचा मान ठेऊन आम्ही हे पण पास करतो.

मा. महापौर :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन २००१ करिता
अनुदानास मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

दरसालाबाद प्रमाणे यंदाही दिनांक १५ जुलै २००१ रोजी १२ वी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन व इतर रोड रेसेस स्पर्धा चे आयोजन, अध्यक्ष, १२ वी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन यांनी केले आहे.

मा. अध्यक्ष यांनी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन २००१ साठी उल्हासनगर महानगरपालिका तर्फे जास्तीत जास्त अनुदान देण्यात यावी यासाठी विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने मा.महापौर, मा. आयुक्त व मा. सभापती क्रिडा समिती यांच्या मध्ये झालेल्या चर्चान्वये उपरोक्त कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिके तर्फे रू २५,०००/- अनुदान देण्याचे ठरविण्यात आले.

सदरचे अनुदान महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात केलेल्या डी.१ (ग) या शिर्षाखाली असलेल्या तरतुदीतुन करावयाचा आहे.

तरी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन २००१ अनुदान म्हणुन देण्यात आलेल्या रू. २५,०००/- खर्चास मान्यता मिळणेसाठी महासभेपुढे प्रस्ताव करण्यात येत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १३ दिनांकः- २०.९.२००१

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर सेवलदास.

अनुमोदकाचे नाव :- श्री. देवेंदसिंह खेमाणी.

हि महासभा वरील प्रस्तावनेप्रमाणे ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन २००१ करिता रू. २५,०००/- चे अनुदान / खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.
काही सदस्य :-पास.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.



मा. सचिव :-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

काही सदस्य :-पास.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- बेवारशि प्रेतांची विल्हेवाट लावणे कामीच्या खर्चाची रू. ६०० ऐवजी ७५०/- अशी वाढ मंजुर करणे बाबत.

प्रस्तावना :-

तत्कालीन उल्हासनगर नगरपालिकेपासुन उल्हासनगर शहरातील मध्यवर्ती रूग्णालयात अपघाती अथवा बेवारस इसमांचा मृत्यु झाल्यास पोलीस यंत्रणेमार्फत त्यांचेवर अग्नि संस्कार विधी उल्हासनगर महानगरपालिकेच्या खर्चाने करण्यात येत आहे. सदर खर्च करणेबाबत तत्कालीन उल्हासनगर महानगरपालिकेने स्थायी समिती ठराव क्रमांक ३८८, दिनांक ३०.५.९६ अन्वये दिनांक १.६.९६ पासुन प्रत्येक मृतदेहामागे रू. ६००/- खर्च करणेस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार पोलिस यंत्रणेमार्फत बेवारस मृतदेहाची अग्नि संस्कार उल्हासनगर मधील स्मशान भुमी स्वर्गधाम आश्रम उल्हासनगर-३ येथे केला जातो. त्यानंतर सदंर्भाधिन स्मशान भुमी स्वर्गधाम आश्रम दरमहा बेवारस मृतदेहांच्या अग्नि संस्कारासाठी झालेला खर्च महापालिकेकडे मागणी करून महापालिकेतर्फे त्यानुसार अदा केले जाते.

स्मशान भुमी स्वर्गधाम चे अध्यक्ष व माजी आमदार सितलदास हरचंदानी यांनी तत्कालीन आयुक्त श्री. रा. द. शिंदे साहेब यांचेकडे बेवारस मृतदेहांची अग्नि संस्कारच्या विधीसाठी ६०० रूपये खर्चा ऐवजी १०००रू. पर्यंतचा खर्च येतो असे लाकडाचे दर वाढल्यामुळे कळविले असुन भविष्यात १००० रू. प्रत्येक मृतदेहाच्या अग्नि संस्कारासाठी महापालिकेने उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (११)अन्वये बेवारस प्रेतांची विल्हेवाट लावणेची जबाबदारी महापलिकेची असल्याने स्मशानभुमी स्वर्गधाम आश्रमच्या मागणीनुसार प्रत्येक बेवारस मृतदेहांच्या अग्नि संस्कार विधीसाठी ६०० रू. खर्चाऐवजी ७५० रू. पर्यंत वाढ उपलब्ध करून देण्यासाठी मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १५ दिनांक:- २०.९.२००१

सुचकाचे नाव :-श्रीमती. ज्योती कालानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार बेवारशि प्रेतांची विल्हेवाट लावणे कामीच्या खर्चाची रू. ६००/- ऐवजी रू. ७५०/- अशा वाढीव दराने अनुदान/ अंशदान देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा.सचिव :-विषय क्र. ९ वाचुन दाखवत असताना...

भाजपा-शिवसेना सदस्य ६ . १५ वाजता पुन्हा सभागृहात आले....

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-इट वॉज वॉक आऊट नॉट द बायकॉट.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-तुम्हाला जे करायचे ते करा. चालवा मिटिंग तुम्ही.

मा.सचिव:-विषय क्र. ९ वाचणार इतक्यात....

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-हा गोषवारा कुणी तयार केला आहे.

मा.सचिव :-थांबा आधी मला विषय वाचु दया.

मा.उपमहापौरः-एक मिनिट, सचिवजी यापुर्वीचा आठ नंबर विषय तुम्ही वाचला का? आपण प्रशासनातर्फे सभा चालवण्याचे काम आपले आहे. इकडे तुम्ही विषय क्र. ८ वाचता तिथुन आम्ही येतच आहोत. सभागृह नेता म्हणतात पास पास.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-विषय क्र. ७ व ८ न वाचता आमच्या समोर मंजुर केले आहेत.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-हे खोटा आरोप लावत आहेत.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-लाल पंजाबीजी एक मिनिट.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-एक मिनिट. माझे ऐका. हे जर म्हणतात की, आम्ही विषय वाचले तर मी आव्हान करतो की, तुम्ही हा ठराव वाचुन दाखवा. ठराव तुमच्याकडे आहे वाचुन दाखवा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-विषय जर तुम्ही वाचले आहेत तर या ऐवढया वेळात तुम्ही वाचुन दाखवा.

मा. महापौरः-राजानीजी, आठ विषय वाचले गेले आहेत. तुम्ही नव्हता. तुमच्या गैरहजेरीत ते सर्व विषय पास केले आहेत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आमची काही हरकत नाही तुम्ही काय केले त्यावर.

मा.महापौरः-आधी एक मिनिट माझे ऐका. नववा विषय वाचणे चालु असताना तुम्ही आत आलात. पंजाबी साहेबांचे म्हणणे आहे. गोषवारा कुणी तयार केला ते आता ते वाचुन दाखवतील.

मा.सचिव :-नववा विषय मी वाचत असताना तुम्ही आत आलात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-हा प्रस्ताव कुणी तयार केला. असा आमचा प्रश्न आहे.



मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-आम्हाला त्यांना काही प्रश्न विचारायचे आहे माहिती हवी आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-सन्माननिय महापौर, हा जो नवव्या विषयाचा गोषवारा कुणी तयार केला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-कुणी गोषवारा तयार केला ते सांगा ना?

मा. उपमहापौरः-मनसुलकरजी, जागा दयायला तुमचा विरोध आहे का? मग इथे फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने मागणी केली. असे गोषवा-यामध्ये आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-मी पुर्ण महासभेत याबाबत चर्चा केली. सर्व काही केले. त्या एकाही नगरसेवकाचे नाव नाही. एकही नगरसेवक इथे नाही राष्ट्रवादीचा आणि त्यांच्यानावाने गोषवारा तयार केला आहे. आर.पी.आय.चा गटनेता म्हणुन मी हे सर्व समोर आणले होते.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-उपमहापौर साहेब, तो गोषवारा वाचुन दाखवायला सांगा.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-गोषवारा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नावाने तयार केला.

मा.उपमहापौरः-हे आता लक्षात आले. नाही तर नुसते पास चालले होते बोटे नुसती वर करायची.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-नाही. नाही. उपमहापौर साहेब आम्ही हे आधीच ठरवले होते. आमच्या ते लक्षात आले होते. या प्रस्तावात जी चर्चा आहे ती माझी आहे. माझे वर्डींग आहे. ७० ते ८० टक्के मुस्लिम जमात आहे हे सर्व मी बोललो होतो. एकही नगरसेवक त्यांचा नाही. आणि आम्ही महासभेत ओरडलो. आणि त्याचे क्रेडीट राष्ट्रवादीला. हे असे चालणार नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-नविन गोषवारा तयार करून दुस-या महासभेत विषय ठेवा.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-आम्ही असा गोषवारा चालु देणार नाही.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-हा गोषवारा कुणी तयार केला हे आधी सांगा.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-हे आमचे आयुक्त मंत्रालयाच्या इशा-यानुसार वागतात. दुसरे कुणाचे ऐकत नाहीत.श्री. सुनिल तटकरेंनी सांगितले असेल असे असे करा त्यांनी तसे केले असेल.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-महापौर साहेब, आधी आम्हाला हे सांगा हा गोषवारा कुणी तयार केला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आयुक्तांनी स्वतःला राजनीतीत गुंतवायचे नाही हा राजनैतिक विषय आहे आणि आयुक्त स्वतः त्यात सहभागी आहे.



मा.महापौरः-पंजाबीजी, गोषवारा कुणी बनवला असो हायली ऑबजेक्शनेबल आहे. कोणाही राजकीय पक्षाचे नाव नमुद करून गोषवारा तयार करणे हे पुर्णपणे हरकत घेण्यासारखे आहे. ॲण्ड वुई कंन्डॅम इट.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा.महापौरः-एक मिनिट, माझे सदनाला निवेदन आहे. ही ओळ गाळावी कारण कित्त्येक वर्षापासुन मुस्लिम जमात हि मागणी करत आहे. व किती मुश्किलीने आपल्याला ही साईट मिळाली आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-गोषवारा नव्याने तयार करून आणा आम्ही तुमच्या सोबत आहोत.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आमचा कब्रिस्थानला जागा देणे विषयी विरोध नाही परंतु गोषवारा चुकीचा आहे यावर विरोध आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौरजी, या प्रस्तावास कोणत्त्याही पक्षाचा विरोध नाही. लाल पंजाबी व राजानीजी जे म्हणाले कब्रिस्थानला जागा देण्यासाठी कोणत्त्याही पक्षाचा विरोध नाही. त्यांनी जो गोषवारा तयार केला आहे. जसे तुम्ही म्हणालात हायली ऑब्जेक्शनेबल आहे. जर सर्व पक्ष त्यांना यात सहकार्य देत आहेत तर एका पक्षाचाच उल्लेख करणे चुकीचे आहे. राजानी आणि पंजाबी म्हणतात ते बरोबर आहे. प्रशासनातर्फे गोषवा-यात कोणत्त्याही पार्टीचा उल्लेख नाही झाला पाहिजे. ते जे म्हणतात ते बरोबर आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-माझी हरकत आहे. हा विषय आता पुढे ढकला आणि दुस-या महासभेत घेऊन या.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-तो विषय पुढे ढकलु नका. त्यातील ती ओळ गाळुन टाका.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-महापौरजी, माझा एक सुझाव आहे.

मा.महापौरः-हा विषय वगळुन पुढच्या महासभेत आणला जावा.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा.महापौरजी, लक्ष दया. या प्रस्तावात वाक्य आले आहे. कल्चरल आणि वेलफेअर असोसिएशन तर्फे मी क्रिडा व समाज कल्याण समितीचा सभापती आहे. हा प्रस्ताव माझ्या तर्फे आला पाहिजे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-महापौरजी, हा विषय वगळु नका.

मा.महापौरः-आम्ही हा विषय वगळत नाही आहे, पुढे ढकलुन पुढच्या महासभेत आणायला सांगत आहे.

मा.महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

--४६--

विषय :- सुधारित प्रारूप विकास योजनेतील सार्वजनिक, सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयींसाठीचे आरक्षण क्र.१० वरील जमिनीपैकी काही भाग मुस्लिम जमाती करिता दफनभुमीसाठी संपादन करणे संबंधिचा प्रस्त्ताव शासनास सादर करणे बाबत.

मा.सचिव :-विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मला असे वाटते की, जो कर्मचारी वर्ग जास्त वसुली करेल त्याला दोन अंतरीम वाढ देण्यासाठी हा प्रस्ताव आहे. बरोबर आहे ना? आयुक्त साहेब जरा काय ते सांगा मला काही सुझाव दयायचे आहेत.

मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मा.महापौरजी, सदनातील सर्व सदस्य व मा. आयुक्त साहेब महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहुन जास्तीत जास्त वसुलीत वाढ व्हावी. म्हणुन हे प्रयत्न आयुक्त साहेब व पुर्ण प्रशासन करत आहेत. त्यातील हा पण एक असा भाग आहे की, जो जास्त वसुली करेल त्यांना जर काही इनसेटीव्ह मिळेल. तर वसुलीत वाढ होईल. म्हणुन जे जे कर्मचारी व अधिकारी लोक ८० ते ९० टक्या दरम्यान वसुली करेल. त्यांना एक अंतरीम वाढ दिली जाईल. व जे ९० टक्यापेक्षा जास्त वसुली करतील. त्यांना दोन अंतरिम वाढ दिल्या जातील. या ज्या एक-दोन अंतरीम वाढ दयायच्या आहेत. यात अशी शर्त असेल की, वसुली संख्या ही बारा लाख पेक्षा जास्त असेल.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा.महापौर, आयुक्त व सहयोगी हे जे कर्मचारी वर्गांना रिवार्ड देण्याचा जो प्रस्ताव आहे. मला वाटते कर्मचारी वर्गाचे हे सामान्य कर्तव्य आहे वसुली करणे. यापेक्षा वेगळा असा काऊंटर प्रपोझल आहे. जो खास करून ठाणे महापालिकेमध्ये इंट्रोडयुस केला गेला आहे. व त्याविषयी मागच्या महिन्यात एक मोठी बातमी इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात आली होती. ठाणे महापालिकेबददल ठाणे महापालिकेने एक नवी योजना सुरू केली आहे. समजा आपण मे-एप्रिल महिन्यात बिल काढतो. जी व्यक्ती लवकर पेमेंट देते. एक महिन्याच्या आत त्यांना ५ टक्के सुट दिली जाते. जो दुस-या महिन्यात भरेल त्यांना ३ टक्के सुट जो त्यानंतर भरेल त्यास २ टक्के सुट व ठाणे महानगरपालिकेत जे निवासी आहेत जे बिल भरतात त्यांना एका आठवडयाच्या आत रिफंड ऑर्डर पण इश्यु करतात. त्याचा परीणाम असा झाला आहे की, तेथील वसुली चार-पाच महिन्याच्या आत ७० टक्के झाली आहे. तर हा जो फायदा व्हायला पाहिजे. लोकांनी स्वतः येऊन कर भरला पाहिजे. लोकांना असे वाटते की, मी एका महिन्यात बिल भरतो तर मला ५ टक्के सुट मिळते. हा माझा फायदा आहे. जसे एक हजार रू. बिल असेल तर ५० रू. त्यांना कमी भरावे लागतात. लोकांना फायदा झाला पाहिजे. तर लोक स्वतः येतील व ठाणे महापालिकेने असे केले की, रिफंड एका आठवडयात देतात. तुम्हाला आठवत असेल की, एक असे देखिल छापुन आले होते. तेथील एका महिलेने आयुक्तांना पत्र लिहिले होते की, आपले कार्यालय चौथ्या मजल्यावर असल्याने मी चढु शकत नाही. तर कृपया रिफंड मला घरी देऊन जा. तेव्हा तिथल्या आयुक्तांनी आदेश दिले की, चौथ्या मजल्यावरचे कार्यालय खालच्या मजल्यावर आणा व तिथे हा प्रयोग खुप यशस्वी ठरला आहे तर मला असे वाटते की, हा फायदा सामान्य जनतेला मिळाला पाहिजे जेणेकरून ते पैसे लवकर भरतील. मला



वाटते की या प्रस्तावा ऐवजी हा प्रयोग करून पाहिला तर ते ठिक होईल. व जनता आपल्याला सहकार्य देईल. हा माझा सुझाव आहे.

मा.महापौरः-या संदर्भात मी पंजाबी साहेबांना सांगु इच्छितो की, या विषयाबाबत माझे आयुक्त साहेबांशी बोलणे झाले आहे. मा.आयुक्तांचे म्हणणे होते की, ठाणे महानगरपालिकेने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तशी तरतुद आधीच करून ठेवली आहे. आपण असे केले नाही आहे. तर आजच्या तारखेत हे करणे योग्य नाही. पुढच्या वर्षी अर्थसंकल्पात तरतुद करून आपण योजना राबवु.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-कर्मचारी वर्गांना आपण अंतरिम वाढ कायम स्वरूपी देत आहेत.

मा.महापौरः-मला वाटते कुणी कर्मचारी वर्ग जर वसुलीत वाढ करत असेल तर अंतरिम वाढ देण्यात काही हरकत नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-आपले काम आहे. लोकांना फायदा देणे. आपण हा फायदा लोकांना नाही देत आहोत.

मा.महापौर:-पुढच्या अर्थसंकल्पात तरतुद करून लोकांना फायदा देऊ. मला वाटते कुणी कर्मचारी वर्ग जर वसुलीत वाढ करत असेल तर बक्षिस म्हणुन अंतरिम वाढ देण्यात काही हरकत नाही. मला नाही वाटत आपण काही चुक करत आहोत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आपण म्हणता अर्थसंकल्पात तरतुद नाही केली. तर अंतरिम वाढ देण्या साठी जो खर्च येणार त्याची तरतुद केली नाही. परंतु लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी जी योजना लाल पंजाबींनी सुचविली. लोकांचा पैसा लोकांसाठी खर्च केला तर चांगले होईल. जर आपल्या डेव्हलपमेंट प्लानमध्ये जागा गार्डनसाठी, शाळेसाठी आरक्षित असते. तेव्हा आपण लोकांना सांगतो इतके पैसे तुमच्या कडे आहेत तर तुम्ही जर हे बांधले तर आम्ही तुम्हाला इतका फायदा देऊ. अशा आकर्षक योजना आपण लोकांना आकर्षित करण्यासाठी ठेवतो. आमची आर्थिक परिस्थिती याप्रकारची आहे. आमची सफाई व्यवस्था अशी आहे. पाण्याची समस्या आहे. ते सर्व लोकांसमोर जाहिराती व्दारे आणुन त्यानुसार जर आपण वसुलीत वाढ केली तर ठिक आहे. परंतु अधिकारींचे जे कर्तव्य आहे त्या कर्तव्यापुढे जाणे योग्य नाही.व हे एक ट्रेन्ड होऊन जाईल की कर्मचारी असे काम करत नाहीत जर रिव्हार्ड दिला तरच काम करतील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा.महापौरजी, आताच आमच्या श्री. नरेंद्र राजानी व लाल पंजाबींनी जे सांगीतले. त्याच्याशी मी पण सहमत आहे. कर्मचारी वर्ग वसुली करतो हे तर त्यांचे कर्तव्य आहे. जे कर्मचारी बरोबर काम करतात, ठिक आहे. जे करत नाहीत त्यांची आयुक्तांनी सांगितले प्रमाणे त्यांची एक अंतरिम वाढ रोखण्यांत येते. जसे ठाणे महापालिकेने अलाऊंन्स केले आहे. कुणाला ५ टक्के, कुणाला ३ टक्के अशी कर भरणा-याल सुट देत आहेत. कुणाला व्याज माफ केले जाते. ज्यांच्याकडे थकबाकी उरली आहे. पुर्ण भारत वर्षात सर्व शासनाची अशी पॉलिसी आहे. खाजगीकरण केले जात आहे. वा जितकी पण वसुली आहे. ती गतीने करत आहे. कारण शासकीय कार्यालय आजच्या तारखेत वसुलीत मागे पडत आहे. ठाणा महापालिका असो, मुंबई महापालिका असो किंवा उल्हासनगर महापालिका असो. हि गोष्ट लक्षात ठेऊन आपण जर ही योजना लोकांसमोर ठेवली की, आम्ही तुम्हाला ५- १०



टक्के सुट देऊ. महापालिका झाल्यांनतर आपण कुणाकडून व्याज घेत नाही आहोत. ते जर माफ केले तर लोक स्वत: पुढे येऊन कर भरतील. हजारो-लाखो लोक आहेत जे म्हणतात आमचे व्याज माफ करा. किंवा कुणाचे वाद प्रकरण आहे त्यांच्या पुढे जर ही योजना ठेवली तर त्यांना पण पाठिंबा मिळेल. आमच्या लाल पंजाबी, व नरेंद्र राजानी यांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. कर्मचारी वर्गाचे कर्तव्य आहे वसुली करणे हा फायदा जर लोकांना मिळाला तर बरे होईल. तर माझी महापौरांना व सर्व सदस्यांना विनंती आहे की श्री. लाल पंजाबी व श्री. राजानी यांनी जो सुझाव दिला त्याच्याशी मी पण सहमत आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-अजुनही कितीतरी वाद प्रकरण प्रलंबित आहेत. कर विभागात पाणी पुरवठा विभागात बिल्डरना जे कमर्शिअल कनेक्शन दिले गेले होते. लोक तिथे रहायला गेले असुन देखिल त्यांना तिथे कमर्शिअल चार्ज केले जातात. त्यांना बिल दिले जात नाही. त्यांना सांगितले जाते की, तुम्ही वास्तव्याचा दाखला व पुर्णत्त्वाचा दाखला आणा. ते तर देतच नाही. तुम्हाला माहित आहे आपण देत नाही तर त्या गोष्टीची मागणी का करता. मग नवे धोरण ठरवले की वास्तु विशारदा कडुन सर्टीफिकेट आणा. दुसरा वास्तु विशारद तर दाखला देणार नाही कारण जुनी इमारत असते त्या

इमारतीचा वास्तु विशारद शहर सोडुन गेला असेल. जिवंत असेल नसेल. त्याचा परवाना रद्द झाला असेल. तो दाखला देऊ शकत नाही. तर लोकांचे रेशन कार्ड पाहुन वगैरे जर प्रकरण सेटल करतो. ते पैसे आपल्याकडे येतील. अननेस्टी स्कीम सुरू केली तर लोक आपल्याकडे येतील. वीदीन द परव्युव्ह ऑफ रूल्स वुई कॅन डू हे सर्व पाहुन जर आपण आपली आर्थिक परिस्थिती सुधारली तर बरोबर होईल.

मा.आयुक्त(श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, हा जो प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. महाराष्ट्र शासन देखिल वसुलीला महत्त्व देते त्यांनी स्थायी आदेश काही काढले आहेत की, ८० टक्यापेक्षा जास्त जर कर्मचारी वसुली करत असेल त्यांना उत्त्कृष्ठ म्हंटले जाते. ९० टक्यापेक्षा जास्त करणा-याला अतिउत्त्कृष्ठ म्हंटले जाते. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार हे ठेवले आहे. व कुणा कर्मचा-यांना जर प्रोत्त्साहन दिले तर ते अजुन काम चांगल्या त-हेने करतात म्हणुन हा प्रस्ताव आपणा समोर आणला. व आपण जो मुददा उठवला आहे कि जनतेला याचा फायदा मिळाला पाहिजे. त्यांना प्रोत्त्साहन मिळावे म्हणुन काही फायदा झाला पाहिजे. याविषयी आपणांस सांगु इच्छितो की, टॅक्समध्ये कपात करणे मान्य नाही. कायदयात तशी तरतुद नाही. कुणी पण करामध्ये ५ - १० टक्के सुट देऊ शकत नाही. ठाणे महानगरपालिकेने जी योजना आखली आहे. ज्यावेळी अर्थसंकल्प तयार केला जात होता त्यावेळीच हा विचार केला जात होता. त्यासाठी त्यांनी वेगळे लेखाशिर्ष तयार केले गेले. व जो एकत्रीत निधी आहे. त्यामधुन काही ठराविक रक्कम या उददेशासाठी वेगळी ठेवली आहे. व लोकांना जी सवलत दिली जाते ती या लेखाशिर्षामधुन दिली जाते. करामध्ये कपात करणे हे कायदयान्वये मान्य नाही. इट इज हायली ऑबजेक्शनेबल. यासाठी लेखा अधिकारी हरकत घेवू शकतात. तर ज्यावेळी अर्थसंकल्प तयार केला जाईल त्यावेळी आपण हा विचार करू शकतो. ते योग्य होईल. तुम्ही जे म्हणालात की काही वाद प्रकरण निकालात लावली पाहिजेत. किंवा वास्तु विशारदचा दाखला लागतो. कुणा अधिकारी वा कर्मचारीने मागितले त्यांना मी हे मागायला सांगितले नाही. जे वाद प्रकरण आहेत त्यासाठी मी एक आदेश उपायुक्त यांना दिले आहेत. अशी प्रकरणे तर खुप आहेत. पाण्याची, मालमत्ता कराचे. प्रॉपर्टी टॅक्सचे डिसप्युट तेव्हा होते जेव्हा स्पेशल नोटीस काढली जाते किंवा जनरल नोटीस काढली जाते. त्यावर हरकत घेण्यासाठी



एक ठराविक कालावधी असतो. त्या कालावधीतच हरकत घेतली जाते. तेव्हा सेटेल केले जाते. नाहीतर सेटल करण्यासाठी त्याला कोर्टात जावे लागते. म्हणुन मध्ये काढण्यासाठी मी असा एक आदेश दिला आहे की, जे काही आहे खरे ते असेस करा. त्यामुळे कर भरणा-याला असे वाटते की, ही रक्कम योग्य आहे. त्याचवेळी मी त्यांना आदेश देईल की, ती रक्कम मान्य करा. अंडर प्रोटेस्ट. बाकीच्या शिल्लक रक्कमेविषयी आपल्याला विचार करावा लागेल. त्याविषयी मी विचार करत आहे. कदाचित मार्ग निघेल निघणार ही नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौर मला असे वाटते की, सभेचे असे मत आहे की, जसे मगाशी सभागृह नेता पण म्हणाले की, कर्मचारी वर्गाना जी आपण अंतरिम वाढ देणार ती यावर्षी देणार, पुढच्या वर्षी देणार, दरवर्षी देणार अशाने त्यांना पाच वर्षात दहा अंतरिम वाढ मिळते. ही ट्रन्ड चुकीची आहे. कारण आपला कर्मचारी

वर्ग लोकांना जाऊन त्रास देईल. त्यापेक्षा हे चांगले होईल की, आपण लोकांना प्रोत्साहन देऊ या. अजुन आपली बिले दिली गेली नाहीत. म्हणुन मला वाटते की, ठाणे महापालिकेने राबवलेली योजना आपण राबवु यासाठी आपण ठाणे महापालिकेत जाऊ, सभागृह नेता जाऊ शकतात. आम्ही त्यांना सहयोग देऊ. आम्ही जाऊन तिथे ही योजना पाहुन येऊ. मला वाटते ती योजना शहरात प्रभावी ठरेल व यशस्वी होईल. असे आमच्या सर्वांचे मत आहे. म्हणुन मला वाटते तीच योजना कार्यान्वित झाली पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आता जे आयुक्त साहेब म्हणाले की, ठाण्यामध्ये अर्थसंकल्पातच तशी वेगळी तरतुद केली होती. यावर्षी आपण अर्थसकल्पात तरतुद नव्हती ठेवली तरी रिवाइज बजेटमध्ये आपण अशी तरतुद करू शकतो. अंदाजपत्रकात फेरबदल आपण कधीही पुर्ण वर्षात करू शकतो. आयुक्तांनी महासभेसमोर आणावे माझ्यामते सर्व पक्षांची याला सहमती आहे. आयुक्तांच्या मनात कर्मचारी वर्गाविषयी चांगली भावना आहे. म्हणुन त्यांना फक्त शिक्षा दिली जाऊ नये. भविष्यासाठी योजना आखत आहे. एक विभाग उघडला आहे. सकाळी साडे नऊ ते तीन वाजे पर्यंत कर्मचा-यांना शिक्षा देण्यासाठी.  ऐवढे जरी नाही केले तरी खुप झाले. लोकांना जर फायदा मिळाला तर खुप चांगले होईल. बजेटमध्ये आपण केव्हाही तसा फेरबदल करू शकतो. हे मंजुर केले जावे.

मा.महापौर:-पास केला जावा की वगळावा.



मा.सदस्य श्री. किशारे वनवारी:-जनतेला फायदा मिळावा ५ टक्के, १० टक्के तो पास केला जावा. व हा विषय मात्र वगळण्यांत यावा.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:- मा. महापौर, पाण्याचे बिल जे देत आहेत. सर्वांकडे लोक येत असतील मार्च २०००ची बिले, जी लोकांना आता दिली जात आहेत. त्यात १८ टक्के व्याज पण जोडले आहे तर त्यासाठी पण अशी काही योजना काढली पाहिजे कारण मार्च २०००ची बिले आता आपण देत आहोत. व लोकांकडुन १८ टक्के व्याज वसुल करत आहोत. लोकांना खुप अडचण होत आहे. आपण व आयुक्तांनी यावर बसुन किंवा सर्वांना बोलावुन चर्चा करून समस्येचे समाधान काढले तर बरे होईल. जर लोकांना आपण एक महिना सवलत देऊ शकत असु की, तुम्हाला १८ टक्के व्याज  व दंड लावत नाही तुम्ही बिल भरा अशी काही योजना काढली तर लोक आपल्याकडे रांगा लाऊन बिले भरतील.

मा.महापौरः- ठिक आहे. याविषयी पुढच्या आठवड्यात सभा बोलवु.

मा.महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :-मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीचे प्रशंसनिय काम करणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांना प्रोत्साहन देणे बाबत.

मा.सचिवः-विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

मा.महापौर :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--५४--

मा.सचिव :-विषय क्र. ८ व ११ मध्ये इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यांत येईल असा यांचा प्रस्ताव आहे. कारण की राजीव गांधी गतिमान योजनेमध्ये त्यांना हे करायचे आहे. कुणाला हरकत आहे.

काही सदस्य :-ठिक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा.महापौर,मंगळवारी जी तुम्ही बैठक आयोजित केली आहे. आम्हाला आयुक्तांवर भरोसा नाही तुम्ही विशेष महासभा ठेवा.

मा.महापौरः-तुम्हीच तर आता स्विकृती दिली इतक्यात कसे बदललात.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यानंतरच आयुक्तांनी आपला रंग दाखवला.

मा. महापौर :- सदरची सभा समाप्त करण्यांत येत आहे.

मा.सचिव :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६. ४५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१९/१०/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/१०/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९.१०.२००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
४. श्रीमती. सोनावणे यमुना
५. श्री. ढेणवाल बनवारी
६. श्री. उमाप रामदास
७. श्री. यादव नरेश
८. श्री. सोनावणे राजु
९. श्रीमती. दासानी मिनु
१० श्रीमती पवार पंचशिला
११ श्री. आढाव रामभाऊ
१२ श्रीमती. सुनिता बगाडे
१३ श्री. भांडे भगवान
१४ श्री. ठाकुर सेवलदा
१५ श्री.बनवारी किशोर
१६ श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
१७ श्री. पमनानी ईश्वर
१८ श्रीमती. वसिटा बेबी
१९ श्री. चौधरी राजेंद
२० श्री. लांडे पांडुरंग
२१ श्रीमती.लक्ष्मीबाई ससाणे
२२ श्री. मोरे भानजी
२३ श्रीमती. टेकचंदानी चंद्रा
२४ श्री. पुरस्वानी जमनादास
२५ श्री. वाधवा गिरधारी
२६ श्री. माखिजा प्रकाश
२७ श्री. सचदेव गिरधारी
२८. श्री. तलरेजा विनोद
२९. श्री.पारवानी रामचंद
३०. श्री. रोहडा श्यामसुंदर
३१. श्री. प्रभुनाथ गुप्ता
३२. श्रीमती. करोतिया मालती
३३. श्री. ठाकुरदास बहरानी
३४. श्री. मोरे भिमसेन
३५. श्री. चव्हाण रमेश
३६. श्री. महाडिक प्रकाश
३७. श्रीमती. बनवारी मोना
३८. श्रीमती. जेसवानी आशा
३९. श्री. राजानी नरेंद
४०. श्री. मनसुलकर सुभाष
४१. श्रीमती. नाईक यशस्विनी
४२. श्रीमती. राजानी भारती
४३. श्रीमती. वलेचा पदमा
४४. श्रीमती. गजवानी कांता
४५. श्रीमती. भठिजा इंदिरा
४६. श्री. केणी जयकुमार
४७. श्री. पंजाबी नारायण
४८. श्री. आयलानी कुमार
४९. श्री. अचनानी पम्मीकुमार
५०. श्रीमती. राधवानी आशा
५१. श्री. रामरख्यानी मोहनदास
५२. श्री. ठाकुर नरेंदकुमार
५३. श्री. पंजाबी लाल

तर

१. श्री. चौधरी गणेश, २. श्री. वाघे शामु,३ श्रीमती. मोकल सिमा, ४. श्रीमती. ज्योती कालानी,५. श्रीमती. वेलकर सुरेखा, ६. श्री. टाले प्रमोद, ७. श्री.तेजी कैलास ८. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ९ श्री. खेमाणी देवेंद्रसिंह, १०. श्रीमती. मटाई जोनिता ११. श्री. राजवानी सुनिता, १२. श्री. वारिंगे पंढरीनाथ १३ श्री. जाधव सुरेश, १४. श्रीमती. साधवानी जया १५. श्री. भाटीया जयप्रकाश, १६. श्रीमती. कुंदनानी लविना ,१७.श्रीमती. वारिंगे पन्ना, १८ श्री. जग्यासी राजु १९. श्री. बहरानी गोप २० श्री. किशनानी गोदुमल , २१. श्री.

केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.



सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढावः-</u>मा.महापौरजी, कॉंग्रेसचे जेष्ठ नेते श्री. माधवराव शिंदे (सिंधीया) यांचे अपघाती निधन झाले. त्याविषयी एक प्रस्ताव दयायचा आहे. दोन वर्षापुर्वी महाराष्ट्रात जी राजकीय परिस्थिती ढासळली होती. त्याला स्थिर स्थावर करण्यासाठी कॉंग्रेस जेष्ठ नेते महाराष्ट्राचे सुपूत्र ज्यांचा महाराष्ट्राशी संबंध आहे. ज्यांचे मुळ गाव महाराष्ट्रात आहे. यांचे जे अपघाती निधन झाले त्याबाबत आम्ही त्यांना श्रध्दांजली वाहवी असा प्रस्ताव मांडुन त्यांच्या दुःखात सहभागी होऊ असा आमचा प्रस्ताव आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी-</u>आता जे श्री. आढाव यांनी सांगितले, श्री. माधवराव शिंदे हे कॉंग्रेस आय पक्षाचे जेष्ठ नेते होते. त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली दिली जावी. त्याचबरोबर आमचे नगरसेवक श्री. श्यामलाल रोहडा यांच्या आईचे देखिल दुःखद निधन झाले आहे. त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करावी.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आपले सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या वडिलांचे देखिल निधन झाले आहे. त्यांना देखिल दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित केली जावी.

<u>मा.सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>सन्माननिय महापौर, व सभागृहातील सर्व सदस्य आता श्री. आढाव साहेबांनी जो शोकप्रस्ताव ठेवला आहे. आम्हाला पण दुःख आहे की, महाराष्ट्राचा नेता व राजघराण्यातील एक सुपूत्र त्यांनी कॉंग्रेस मध्ये असुन देखिल फक्त हे नाही पाहिले की, मी कॉंग्रेसचा आहे,मी कॉंग्रेस पक्षासाठीच काम करीन हे नाही पाहिले. त्यांनी या देशात महाराष्ट्रात युती कॉंग्रेस आर.पी.आय. युती कशी एकत्र येईल व सत्त्ता प्रस्थापित होईल हे त्यांनी एक मोठे काम केले आहे. व महाराष्ट्रातील प्रत्त्येक कामात त्यांचा सहयोग असायचा अशा नेत्त्याचे अपघाती निधन झाले. त्यामुळे आम्हाला खुप दुःख झाले. ही बातमी ऐकुन महाराष्ट्रात हळहळ निर्माण झाली. महाराष्ट्रातील एक सुपूत्र गेले तरी त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी-</u> महापौर साहेब, आमच्या सचिव साहेबांचे वडील वारले त्याबददल पण....

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः-</u>श्री. लाल पंजाबी यांनी प्रस्ताव मांडला आहे.

<u>शोक प्रस्ताव</u>

<u>प्रस्तावना</u>

महापालिका सचिव श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा यांचे वडील श्री. पंजुमल जिओमल कुकरेजा यांचे वयाच्या ७४व्या वर्षी दि. २१. ९. २००१ रोजी अकस्मित निधन झाले.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ३९चे विद्यमान नगरसेवक श्री. श्यामसुंदर रोहडा यांच्या मातोश्री श्रीमती. नारायणीबाई जानीलाल रोहडा यांचे दि. २९.९.२००१ रोजी निधन झाले.

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री व ग्वाल्हेरच्या राजघराण्याचे महाराज माधवराव शिंदे (५६) यांचे उत्तरप्रदेशातील फारूखबादजवळ मैनपुरी येथे रविवारी विमान अपघातात निधन झाले. दुपारी अडीचच्या सुमारास झालेल्या या अपघातात शिंदे यांचे सचिव व दिल्लीतील चार पत्रकारही ठार झाले. शिंदे यांच्या निधनाने आश्वासक नेतृत्त्वाचा अकाली अंत झाला, अशी प्रतिक्रिया राष्ट्रपतींनी व्यक्त केली आहे. शिंदे यांच्या रूपाने एक उमदा नेता व सच्चा संसदपटू काळाने आपल्यातून ओढुन नेला आहे,अशा शब्दांत वाजपेयी यांनी दुःख व्यक्त केले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६(अ)</u> <u>दिनांकः-१९/१०/२००१.</u>

सुचकांची नावे :-१. श्री. रामभाऊ आढाव

२. श्री. किशोर वनवारी

अनुमोदकांची नावे :- १. श्री. लाल पंजाबी.

२. श्री. बी.बी.मोरे.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पंजुमल जिओमल कुकरेजा, श्रीमती. नारायणीबाई जानीलाल रोहडा व श्री. माधवराव शिंदे यांच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकांच्या सह्या/-१.

२.

अनुमोदकांच्या सह्या/-१.

२.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इथे सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित केली.

मा. सचिव :-विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. महापौर, प्रश्नोत्त्तरे सुरू होण्यापुर्वी मला काही बोलायचे आहे. आजच्या सभेत मा. आयुक्त श्री. पोखरकर साहेब उपस्थित नाही. कुठेतरी प्रशिक्षणासाठी गेले आहेत. व त्यांनी कुणाला लिखित अधिकार देखिल दिले नाही आहेत. जरी दिले असतील तरी आमची इच्छा आहे. कारण प्रश्नोत्त्तराची जी कार्यवाही आहे ती आयुक्तांच्या समोरच झाली पाहिजे. व खास करून जे प्रश्नोत्त्तरे आहेत ते पण आयुक्तांसमोरच झाले पाहिजेत. कारण आम्ही खुपदा पाहतो. आयुक्तांच्या उपस्थितीत देखिल कधी कधी काय तर खुप वेळा बरोबर उत्त्तर दिले जात नाही. शेवटी जबाबदारी आयुक्तांची आहे. ते आता उपस्थित नाहीत तर दुस-या सभेत असे होते की, आयुक्त म्हणतात की, मी मागील सभेत नव्हतो. मागच्या सभेत जो निर्णय झाला तो माझ्यावर लागु होत नाही. म्हणुनच माझे आपणास निवेदन आहे की, आयुक्त साहेब पुढील आठवडयात येतील तर आजची सभा स्थगित करून दुसरी एखादी तारीख निश्चित करा ते योग्य होईल कारण आमची इच्छा आहे की, प्रश्नोत्त्तराची योग्य व खरी उत्त्तरे आपणाला मिळाली पाहिजे व जबाबदार अधिकारी आयुक्त म्हणुन त्यांनी उपस्थित असले पाहिजे म्हणुन मी पुन्हा आपणांस विनंती करतो की, आजची सभा स्थगित करून दुस-या तारखेस ठेवा.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-सन्माननिय महापौरजी, सदनातील सर्व सदस्य व आजचे कामकाज पाहणारे आमचे प्रभारी आयुक्त श्री. भडकवाड साहेब. आता पंजाबी साहेब म्हणाले की आजची सभा आयुक्त नसल्यामुळे स्थगित करा. परंतु माझा एक सुझाव आहे की, निवडणुका दोन-तीन महिन्यावर आहेत ज्या सदस्यांनी प्रश्न टाकले आहेत त्यांना उत्त्तराची आशा आहे व काम होईल अशी त्यांना अपेक्षा आहे. असा प्रत्येक सदस्य विचार करतो. माझी विनंती आहे, प्रश्नोत्त्तराचा तास तेवढा घेऊन सभा स्थगित केली जावी असे माझे म्हणणे आहे. व सदनाला विनंती आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, जसे आज आमचे बंधु श्री. पंजाबी साहेबांनी सांगितले व मोरे साहेब म्हणाले त्यात प्रश्न असा येतो की, एखादा सदस्य योग्य त्या उत्त्तराची अपेक्षा ठेवतो परंतु जर त्याला उत्त्तरच चुकीचे मिळाले तर त्याने कुणाला तक्रार करावी. आज श्री. विनोद तलरेजा यांनी प्रश्न विचारला आहे, त्यांना सर्व उलट उत्त्तरे दिली आहेत. जर आयुक्त आपल्या खुर्चीवर नाहीत. प्रश्नासंबधी अधिकारी जे उत्त्तर देतात ते दिशाभुल करतात. म्हणुन जोपर्यंत नियमित आयुक्त उपस्थित सभेस राहत नाहीत तोपर्यंत कोणत्त्याही सदस्याला प्रश्नाचे समाधानकारक उत्त्तर मिळणार नाहीत. दोन तीन महिन्यानंतर सदस्यांचे उत्त्तर मिळतात त्यात पण अधिकारी लोक दिशाभुल करणारी उत्त्तरे देतात. कशाचेही सरळ उत्त्तर देत नाहीत. जर आयुक्त श्री. पोखरकर साहेब यांना रजेवर जायचे असेल तर त्यांनी लिखित कुणाला तरी अधिकार देऊन गेले पाहिजे. फक्त फोनवर सांगतात की, ही सभा अटेंड करा, स्थायी समिती सभा अटेंड करा हे चुकीचे आहे. आज आयुक्त नाहीत तोपर्यंत कोणतीही सभा यापुढे चालवण्यांत येऊ नये. भले सभा स्थगित करू. कारण खुपशे महापालिकेचे ठराव आहेत त्यावर अदयाप अंमलबजावणी नाही करण्यांत आली. उदा. टाटा इन्फोटॅक्ट कंपनी याविषयी लक्षवेधी आणली होती. अजुन पर्यंत ते प्रलंबित आहे. महासभेच्या निर्णयावर अंमलबजावणी नाही केली जात. रोड वायडिंग करताना



सांगितले होते की,तळमजला अधिक दोन अशी परवानगी दिली होती त्यात पण जाणुन बूजुन तोडफोड करून येतात. यामागे काय उददेश आहे. हे सर्व चुकीचे चालले आहे. आज महापालिकाचे प्रतिनिधी निवडुन आले आहेत. त्यांची

पण दिशाभुल करणे, त्यांच्याशी चुकीचे वागणे, कुणाची जागा तोडणे, कुणाची सोडणे हे जे चालले आहेत त्यात एकही सदस्य समाधानी नाही. जोपर्यंत आयुक्त साहेब उपस्थित नाही रहात तोपर्यंत ही सभा स्थगित करून ३१ तारखेला ठेवण्यांत आली तर खुप चांगले होईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा. महापौरजी, नियमानुसार प्रत्येक महिन्यात एक महासभा झाली पाहिजे जर आज नाही झाली तर या महिन्याच्या अखेरीपर्यंत ही सभा घेण्यात यावी. व त्या महासभेत आमच्या आयुक्त साहेबांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. आता श्री. बी.बी. मोरे साहेब म्हणाले की, दोन तीन महिन्यात निवडणुका येत आहेत. प्रश्नोत्तरे झाली पाहिजेत. प्रश्नोत्तराचा एक तास हा महत्त्वाचा आहे हे सर्व सदस्यांनी लक्षात घेतले पाहिजे. एका तासात एक किंवा दोनच प्रश्न होतात. अजुन खुपसे प्रश्न बाकी आहेत. व आमच्याकडे फक्त तीन-चार महासभा शिल्लक आहेत. या महिन्याच्या महासभेत जास्तीत जास्त कसे प्रश्न संपतील त्याकडे सर्व सदस्यांनी लक्ष दिले पाहिजे कारण की, प्रश्नोत्तराचा कालावधी जर दोन तासाचा केला किंवा प्रश्नोत्तरासाठी जे नियम आहेत त्यानुसार जर सदस्य वागले तर योग्य होईल. म्हणुन सभा आता तहकुब करून जेव्हा आयुक्त साहेब येतील तेव्हा सभा ठेवण्यात यावी.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः-मा.महापौरजी, जसे की आज आयुक्त साहेब नाहीत म्हणुन सभा चालवली जाऊ नये यास मी विरोध करत नाही. माझी पण सहमती आहे. मला हे सांगा पाच वर्षापैकी चार वर्ष निघुन गेली पाचवे वर्ष सुरू आहे. या चार वर्षात मी व माझ्या बंधु भगिनींनी जे प्रश्न विचारले त्याचे कुणाला बरोबर उत्तर मिळाले आहे का? मी विचार करतो की, आयुक्त साहेब असुन देखिल त्या प्रश्नाचे तेच उत्तर मिळते. आम्ही वारंवार ओरडतो. जे उत्तर मिळाले पाहिजे ते मिळत नाही. श्री. पोखरकर साहेबांनी दोन-तीन सभा अटेंड केल्या आहेत. मला सांगा रिटर्निंग वॉलचा प्रभाग क्र. ३१ व ३२ ची समस्या श्री. भुल्लर महाराज विपक्ष नेता यांनी कित्त्येकदा विचारले? आजपर्यंत काही झाले का? ज्या १३२ संचिका हरवल्या त्या मिळाल्या आहेत का?काही पण होत नाही. फक्त औपचारिक उत्तर दिले जात आहे. आम्ही प्रश्न विचारतो उलट सुलट उत्तर देतात. काही अधिकारी तर इथे हजर देखिल राहत नाही. आयुक्त हजर राहुन देखिल काही अधिकारी हजर रहात नाहीत. श्री. विनोद तलरेजा यांना यांच्या प्रश्नाचे उत्तर व्यवस्थित दिले नाही. मी सांगु शकतो या चार वर्षात मला प्रश्नाची उत्तरे कशात-हेने दिली आहेत. कुणाचा नकाशा पास आहे? कुणाचा एफ.एस. आय बरोबर आहे? त्याला एम.आर.डी.पी ने मंजुरी दिली आहे? टी.पी. ने मंजुरी दिली. आम्ही जर हे सर्व पहायला गेलो तर काहीच मिळणार नाही. म्हणुन माझे म्हणणे आहे, सर्व सदनाची जर इच्छा आहे तर मी एकटा विरोध करत नाहीत. कारण यांच्या बरोबर मला देखिल रहायचे आहे. शेवटी शेवटी सर्वां बरोबर मैत्री ठेवायची आहे. तर यासाठी सदन जे ठरवतो त्यास माझी पण मंजुरी आहे. पण मला जे काही सांगायचे होते ते मी सांगितले. एक-एक नगरसेवक विचारतो, समजा झोपडपटटी ऐरीया आहे.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरेः-महापौरजी, हे काय चालले आहे. सरळ सभा तरी सुरू ठेवा. हे काय टाईमपास चालला आहे का? नाही तर सभा स्थगित करा?



मा. महापौरः-मोरे साहेबांना दोन मिनिटे बोलु दया.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरेः-दोन-दोनदा तेच बोलणार का?

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरेः-श्री. भिमसेन तुम्ही पण बोला. तुमचा प्रभाग माझ्या प्रभागात येणार नाही म्हणुन मैत्री राहणार नाही असे आहे का? तर माझे म्हणणे आहे, सभागृहाने जे ठरवले त्याला माझी सहमती आहे. मी फक्त विनंती केली होती. धन्यवाद.

मा.महापौरः-पुर्ण सभेचे असे मत आहे की, महापालिकेचे आयुक्त सभेत हजर नाहीत. व सर्व सन्माननिय सदस्य जे प्रश्न विचारतात त्यांना जी उत्तरे मिळतात. आयुक्तांनी स्वतः जर लक्ष देऊन प्रश्नोत्तराचा तास सांभाळला तर योग्य होईल आज आयुक्तांच्या अनुपस्थितीमुळे व सभेचे मत लक्षात घेऊन आजची ही सभा ३१ ऑक्टोबर २००१ रोजी ४. ०० वाजे पर्यंत स्थगित करण्यांत येत आहे. सदरची सभा स्थगित करण्यांत येत आहे.

मा. सचिव :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. १० वाजता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-३१/१०/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३१/१०/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९.१०. २००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदरची सभा स्थगित करून बुधवार दिनांक ३१.१०.२००१ रोजी सायंकाळी ४. ००वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.उप-महापौर, श्री.धनंजय बोडारे हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :- श्री. हरदास माखिजा (अनुपस्थित)

१)मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

२. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
३. श्री.वाघे शामु बाबु
४. श्रीमती.मोकल सीमा
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्री. ढेणवाल बनवारी
७. श्रीमती. वेलकर सुरेखा
८. श्री. यादव नरेश
९. श्री. सोनावणे राजु
१०. श्रीमती पवार पंचशिला
११. श्री. टाले प्रमोद
२६. श्रीमती. राजवानी सुनिता
२७. श्री. पुरस्वानी जमनादास
२८. श्री. तलरेजा विनोद
२९. श्री. रोहडा श्यामसुंदर
३०. श्री. प्रभुनाथ गुप्ता
३१. श्रीमती. करोतिया मालती
३२. श्री. ठाकुरदास बहरानी
३३. श्री. जाधव सुरेश
३४. श्री. मोरे भिमसेन
३५. श्री. चव्हाण रमेश

१२ श्री. आढाव रामभाऊ
१३ श्रीमती. सुनिता बगाडे
१४ श्री. भांडे भगवान
१५ श्री. ठाकुर सेवलदास
१६ श्री.वनवारी किशोर
१७ श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
१८. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
१९. श्री. पमनानी ईश्वर
२० श्रीमती. वसिटा बेबी
२१ श्रीमती.मटाई जोनिता
२२. श्री. चौधरी राजेंद्र
२३ श्री. लांडे पांडुरंग
२४ श्रीमती.लक्ष्मीबाई ससाणे
२५ श्री. मोरे भानजी
३६. श्री. महाडिक प्रकाश
३७. श्रीमती. जेसवानी आशा
३८. श्री. राजानी नरेंद्र
३९ श्रीमती. नाईक यशस्विनी
४०. श्रीमती. कुंदनानी लविना
४१. श्रीमती. गजवानी कांता
४२. श्रीमती. भठिजा इंदिरा
४३. श्री. केणी जयकुमार
४४. श्री. पंजाबी नारायण
४५. श्री. अचनानी पम्मीकुमार
४६. श्रीमती. वारिंगे पन्ना
४७. श्रीमती. राधवानी आशा
४८. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
४९. श्री. पंजाबी लाल
५०. श्री. सुभाष मनसुलकर



तर

१. श्री. चौधरी गणेश, २. श्रीमती. ज्योती कालानी,३. श्री. उमाप रामदास ४. श्रीमती. दासानी मिनु ५. श्री.तेजी कैलास ६. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ७. श्री. वारिंगे पंढरीनाथ ८. श्रीमती. टेकचंदानी चंदा,९ श्री. वाधवा गिरधारी, १०. श्री. पारवानी रामचंद, ११. श्रीमती. साधवानी जया १२. श्री. भाटीया जयप्रकाश, १३. श्रीमती. वनवारी मोना, १४.श्रीमती. राजानी भारती, १५. श्रीमती. वलेचा पदमा, १६. श्री. आयलानी कुमार, १७श्री. माखिजा प्रकाश, १८. श्री. रामरख्यानी मोहनदास १९. श्री. जग्यासी राजु २०. श्री. बहरानी गोप २१ श्री. क्रिशनानी गोदुमल ,२२. श्री. सचदेव गिरधारी, २३ श्री. केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. महापौर श्री. हरदास माखिजा अनुपस्थितीत असल्याने मा. उपमहापौर श्री. धनंजय बोडारे हे मा. महापौर यांच्या जागेवर पिठासिन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-मा.महापौर आज......

मा. सचिव :-कोणताही विषय सुरू करण्याआधी मा. पिठासिन अधिका-यांकडे एक प्रस्ताव आला आहे. आमच्या मा. महापौरांच्या वहिनींचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रध्दांजली आर्पित करण्यासाठी व आजच्या सभेचे विषय वगळुन पुढल्या कार्यसुचीवर आणावे असे मा. पिठासिन अधिकारी सुचित करण्यात आलेले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-सर्वात आधी श्रध्दांजली वाहण्यात यावी व नंतर कार्यवाही सुरू करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. रामभाऊ आढावः-आधी श्रध्दांजली प्रस्ताव वाचा मग पिठासिन अधिकारी बोलतील.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. धनंजय बोडारे):-आपले मा. महापौर साहेब यांच्या वहिनींचे काल निधन झाले. त्यासाठी शोक प्रस्ताव माझ्या समोर आला आहे.

या विषयावर श्रध्दांजली वाहण्यासाठी कुणा सदस्याला दोन शब्द बोलायचे असतील तर बोलावे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-मा. महापौरजी व सदनातील सर्व सदस्य आज जो शोक प्रस्ताव मांडला आहे आपल्या उल्हासनगर महापालिकेचे प्रथम नागरिक मा. हरदास माखिजा साहेब यांच्या वहिनींचे काल अचानक निधन झाले. आम्हाला ऐकुन खुप दुःख झाले. मी इथे नव्हतो तेव्हा माथेरानला होतो. मला तिथे ही बातमी कळाली. मला दुःख झाले. त्यांचे बंधु त्यांच्या बरोबर



राहतात. त्यांची वागणुक महापौरांसारखी चांगली आहे. महापौरांच्या वहिनींच्या आत्म्यास शांती मिळावी म्हणुन इथे आम्ही आर.पी.आय तर्फे व सभागृहातर्फे शांती मिळो म्हणुन श्रध्दांजली वाहत आहोत. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-माझे शाळा सोबती श्री. रमेश माखिजा जे महापौरांचे बंधु आहेत. त्यांच्या पत्नीचे काल निधन झाले. आम्ही पुर्ण उल्हासनगर शहरातर्फे, सभागृहातर्फे त्यांच्यासाठी शांती प्रार्थना करतो व श्रध्दांजली वाहतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी-मा. महापौरजी, आज महासभा ठेवली होती, आम्हाला माहित नव्हते की, आमचे मा.महापौर श्री. हरदास माखिजा यांच्या वहिनीचे निधन होईल. त्यामुळेच आज सर्व लोकांना जे दुःख झाले आहे त्यात आम्ही सर्व सहभागी आहोत. तसेच आमचे यु.पी.पी नगरसेवक श्री. इश्वर पमनानी यांचे बंधु देखिल वारले त्याचे पण दुःख आहे तरी त्यांनापण श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी. मा. महापौरांच्या वहिनीच्या आत्म्यास देवी मातेचरणी स्थान मिळो व त्यांच्या कुटूंबियांना दुःख सहन करण्याची ताकद देवो. मी आपल्या यु.पी.पी पक्षातर्फे, पुर्ण सभेतर्फे, आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांच्यातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो. तसेच आजची सभा स्थगित न करता कार्यसुचीचे सर्व विषय वगळुन पुढच्या महासभेत कार्यसुचीवर हे विषय आणले गेले तर बरे होईल. ऐवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवतो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. महापौरांची वहिनी व इश्वर पमनानी यांचे बंधु यांचे नुकतेच निधन झाले आहे. या शोक काळात मी आपल्या पक्षातर्फे, शिवसेनेतर्फे व भाजपातर्फे, सर्व सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पित करतो. व देवाकडे प्रार्थना करतो की, त्यांच्या कुटूंबियांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा. उपमहापौरजी व सर्व सदस्य बंधु आपल्या महापौरांच्या वहिनीचे निधन झाले आहे त्यासाठी आम्ही दुःख प्रकट करतो. शिवसेनेतर्फे व सर्व सभागृहातर्फे. देवा कडे ही प्रार्थना करतो की, त्यांच्या कुटूंबियांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-आपल्या मा. महापौरांच्या वहिनीचे काल निधन झाले तरी सर्व सभागृहातर्फे त्यांना श्रध्दांजली वाहण्यांत यावी.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. धनंजय बोडारे):-मा.महापौरांची वहिनी व श्री. ईश्वर पमनानी यांचे बंधु यांच्या आत्म्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी आपण सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळण्यासाठी उभे रहावे.

<u>शोक प्रस्ताव</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २४ चे विद्यमान नगरसेवक श्री. ईश्वर पमनानी यांचे कनिष्ठ बंधु डॉ. विजय पमनानी यांचे दि. २१.१०.२००१ रोजी हदय विकाराच्या झटक्याने अकस्मित निधन झाले.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे विद्यमान महापौर तथा शहराचे प्रथम नागरिक मा. श्री. हरदास माखिजा यांचे बंधु श्री. रमेश माखिजा यांच्या धर्मपत्नी म्हणजेच मा. महापौर यांच्या वहिनीं श्रीमती. भावना रमेश माखिजा यांचे दि. ३०.१०.२००१ रोजी अकस्मित निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६ (ब)</u> <u>दिनांक:-३१/१०/२००१.</u>

सुचकांची नावे :-१) श्री. बी.बी. मोरे.

२) श्री. किशोर वनवारी

३) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

४) श्री. रामभाऊ आढाव

अनुमोदकांची नावे :- १) श्रीमती. सुनिता राजवानी.

२) श्री. लाल पंजाबी

३) श्री. सेवलदास ठाकुर

४) श्री. नारायण पंजाबी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ. विजय पमनानी व श्रीमती. भावना रमेश माखिजा यांच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.



तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकांच्या सहया/-१.

२.
३.
४.

अनुमोदकांच्या सहया/-१.
२.
३.
४.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इथे सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली आर्पित केली.

<u>मा. सदस्य श्री. सेवलदास ठकुरः-</u>मा. महापौर आम्ही एक प्रस्ताव दिला आहे की, आजची सभा संपवुन नंतर ठेवावी. व आजचे विषय पुढील सभेच्या कार्यसुचीवर ठेवावे.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आजची सभा स्थगित करा किंवा नव्याने सभा बोलावण्याच्या बाजुने आम्ही आहेत. आम्ही याचे समर्थन करतो. त्याचबरोबर मला एक गोष्ट सांगायची आहे की, निवडणुका जवळ येत आहेत. पुढच्या महिन्यापासुन बहुतेक एक किवा दोनच सभा होतील. मागची सभा पुर्ण झाल्यावर माझे महापौरांशी बोलणे झाले होते. व माझा त्यांनी सुझाव मान्य देखिल केला होता. आजची सभा आपण घेत नाही नव्याने बोलावत आहोत. त्यामुळे खुप सा-या नगरसेवकांचे प्रश्न प्रलंबित आहेत. आमची इच्छा आहे की, आचारसंहिता लागु होण्यापुर्वी आमच्या मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. माझा एक अजुन सुझाव आहे की, कार्यसुची वगळुन पुढच्या सभेत नव्याने कार्यसुचीवर हे विषय आणले जावेत. परंतु प्रश्नोत्तराचा तास एक तास असतो. तर पुढची सभा चारच्या ऐवजी तीन वाजता ठेवावी.व प्रश्नोत्तराचा तास एक तासा ऐवजी दोन तास ठेवावा. असे बोलणे माझे महापौरांशी देखिल मागे झाले आहे. व त्यांनी मान्य पण केले होते.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-</u>हीच चार वाजेची सभा पाचला सुरू होते.



<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आज आमचे बंधु श्री. लाल पंजाबी यांनी जे सुझाव दिले. कायदयान्वये प्रश्नोत्तराचा अर्धा तास सुरवातीला होता. आमचे प्रथम महापौर श्री. गणेश चौधरी यांनी अर्ध्या तासाचा कालावधी एक तास केला. आता ते म्हणत आहेत एका तासाचे दोन तास करा. त्यांचा उददेश हा आहे की, या निवडुन आलेल्या इलेक्टेड बॉडीच्या कालावधीतच प्रश्नोत्तरे संपु दे. मी त्यांच्या भावनांची कदर करतो. त्याबरोबर एक विनंती करतो की एका प्रश्नावर एक सदस्य एक-एक तास चर्चा करतो त्यावर पण अंकुश ठेवावा. एक प्रश्न दोन मिनिटातच झाला पाहिजे. किंवा त्याच प्रश्नावर इतर सदस्य उठुन उपप्रश्न विचारतात व चर्चा वाढली जाते. म्हणुन एका तासात एक प्रश्न होतो त्यामुळे या गोष्टीवर जर प्रतिबंध लावला तर एका तासाची दोन तास करण्याची जरूर भासणार नाही.

इथे एक प्रश्न सदस्य विचारतो त्यावर दुसरा सदस्य उपप्रश्न विचारतो त्यावर तिसरा सदस्य उपप्रश्न विचारतो. एकाच नगरसेवकाच्या प्रश्नाला धरून इतर नगरसेवक बोलतात. जर त्यावर अंकुश लावला तर माझ्यामते सर्व प्रश्न पुर्ण होतील. त्यावरही लक्ष दिले जावे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा. महापौर, पुढच्या महासभेत फक्त प्रश्नोत्तरे घ्यावीत.

मा. सदस्य श्री.बी. बी. मोरेः-सन्माननिय महापौर साहेब, आताच सभागृह नेता म्हणाले आता फक्त दोन-तीन सभाच होणार आहेत. आयुक्त साहेब जरा ऐका एकतर तुम्ही उशीरा आलात.

मा. सदस्य श्री. रामभाऊ आढावः-आता तुम्ही सभा स्थगित करत आहात की चालवत आहात.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-मला जरा बोलु दया. महापौरजी आता जे सभागृह नेता म्हणाले. सभा स्थगित करत आहात चांगली गोष्ट आहे. परंतु ते म्हणाले की, एक-एक सदस्य एक-एक तास एका प्रश्नावर बोलतात. आमची आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांनी प्रशासनाच्या अधिका-यांना सांगा की जे प्रश्न आम्ही विचारतो त्या प्रश्नाची उत्तरे समाधानकारक व त्याच दिवशी दिले पाहिजे. आम्ही पाच मिनिटे सुध्दा बोलणार नाही. आम्हाला भाषण करण्याची सवय सभागृहा बाहेर आहे सभागृहात नाही. आम्ही एक-एक तास बोलणार नाही. परंतु आमचे अधिकारी उशीरा येतात प्रश्नाचे उत्तर बरोबर देत नाही. म्हणुन आम्हाला जास्त बोलावे लागते. आम्ही प्रश्न विचारतो गल एक आणि ते उत्तर देतात आणि गल दोन. आम्हाला हे म्हणायचे आहे की आम्हाला योग्य उत्तर देण्यात यावे. आमचे सदस्य श्रीमती. पुनम वारिंगे असो सुनिता भाभी असो वा इतर कोणी असो. हे आम्ही का बोलतो कारण आम्हाला आमच्या प्रश्नाचे उत्तर बरोबर मिळत नाही. आज पाच वर्ष झाली. आयुक्तांना मी सांगु इच्छितो की, आज पर्यंत मी प्रश्न विचारले आपल्या आधी असणा-या आयुक्तांना पण विचारले आहे. परंतु विचारलेल्या प्रश्नाचे कधी उत्तर बरोबर ना मिळाले ना मिळणार. तर प्रश्न हा असा आहे की, महापालिकेने ज्या पर्यायी जागा दिल्या आहेत....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-प्रश्नोत्तरे सुरू केली आहेत का?

--७--

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः-आम्ही सभागृह नेता व आयुक्तांना सांगु इच्छितो व आजच्या आमच्या महापौरांना सांगु इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या कालावधीत अधिकारींना बरोबर उत्तर दिले तर आम्ही चर्चा करणार नाही. ऐवढे बोलुन मी माझे बोलणे संपवतो.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. धनंजय बोडारे):-सर्व सभेचे मत असे आहे की, आपले महापौर मा. हरदास माखिजा यांच्या वहिनींचे निधन झाले आहे त्यांच्या दुःखात पुर्ण शहर सहभागी आहे. आम्ही महापालिकेचे सदस्य महापालिकेचे अधिकारी त्यांच्या दुःखात सामील आहोत. आजच्या सभेचे विषय वगळुन नविन नियमित कार्यसुची काढु त्याबरोबरच श्री. पंजाबी साहेब म्हणाले की, आचारसंहिता लागु केल्यावर सदस्यांनी विचारलेले प्रश्न पुर्ण होण्यासाठी प्रश्नोत्तराचा कालावधी वाढवावा. हे पुर्ण सभागृहाचे मत आहे. सर्व सदस्यांचे मत आहे म्हणुन मी सचिव साहेबांना सांगतो की पुढच्या महासभेत या गोष्टीकडे लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-महापौरजी, याच येणा-या सभेत तास वाढवणार की नेहमीच होणा-या सभेत?

मा. पिठासिन अधिकारी (श्री. धनंजय बोडारे):-ही जी सभा आपण काही ना काही कारणास्तव स्थगित करत आहोत. त्या सभेपुरते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-सर्व सभागृहाचे तसे मत आहे का? आता श्री.लाल पंजाबी म्हणाले की, प्रश्नोत्त्तराचा एक तासाचा कालावधी दोन तास करावा. मी म्हणालो की, प्रश्नोत्त्तराचा कालावधी दोन तास करण्यापेक्षा एक प्रश्न दोन मिनिटात संपवावा. एका सदस्याला फक्त दोन मिनिटे बोलु दयावे व त्या सदस्याच्या प्रश्नावर दुस-या सदस्यांनी उपप्रश्न विचारू नयेत. जर असे केले तर एक तास पुरेसा आहे. (मोरे साहेब एक मिनिट) मोरे साहेबांचा हा गैरसमज आहे की, मी फक्त त्यांनाच बोलत आहे. मी तुम्हाला बोलत नाही तुम्ही नीट ऐका. तुमचा प्रश्न होता दहा दुसरे जण विचारत होते. मी त्याचा विरोध करत आहे. असाच एक तास निघुन जातो. त्यावर अंकुश लावला जावा व आपण म्हणालात की, प्रश्नाचे उत्त्तर समाधानकारक मिळाले तर कोणी उपप्रश्न विचारणार नाही. ही गोष्ट प्रशासनाने लक्षात ठेवावी. कोणत्त्याही प्रश्नाचे उत्त्तर चुकीचे देऊ नये व दुसरे की, एका सदस्याच्या प्रश्नावर दुस-या कुणा सदस्यांनी उपप्रश्न विचारू नयेत. दहा-दहा सदस्य उपप्रश्न विचारतात एका प्रश्नातच एक तास जातो. आधीच अर्ध्या तासाचा एक तास कालावधी केला आहे तो पुरेसा आहे. व आपण हा प्रयत्त्न केला पहिजे की, एका सदस्याच्या प्रश्नावर दुस-याने प्रश्न विचारू नये. व महापौरांनी त्यावर अंकुश लावला पाहिजे. त्यांनी दुस-याला त्त्वरीत खाली बसवावे व ज्याचा प्रश्न आहे आहे त्यालाच बोलु दयावे.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-मा. महापौर, आता जसे सभागृह नेता म्हणाले, एक सदस्य एका प्रश्नावर एक तास चर्चा करतो. आम्ही त्यावर चर्चा करतो ज्या प्रश्नाचे उत्त्तर चुकीचे दिले गेले आमचे समाधान झाले नाही. आता त्या प्रश्नाची उत्त्तरे मिटवून पुन्हा आम्हाला उत्त्तर देणार का? हे म्हणतात की दोन मिनिटात प्रश्न संपवा एका तासात नाही. इथे जो

--८--

प्रश्न विचारला जातो तो जनतेसाठी विचारला जातो. आम्ही त्यावर चर्चा करतो ज्यावर समाधानकारक उत्त्तर दिले जात नाही. इकडे प्रत्त्येक सदस्याला समाधानकारक उत्त्तर हवे आहे. सदस्यांना चुकीचे उत्त्तरे मिळतात जसे मी वाचले आहे. कित्त्येक सदस्यांना चुकीची उत्त्तरे दिली आहेत. तर या प्रश्नांची उत्त्तरे खोडुन पुन्हा उत्त्तरे देणार का? किशोर वनवारी साहेब म्हणतात दोन मिनिटात संपवा. जेव्हा यांचा प्रश्न येतो तेव्हा पण असेच चालते कारण की, सदस्यांचे समाधान होत नाही. अधिकारी चुकीची उत्त्तरे देतात दिशाभुल करतात कित्त्येकदा अधिकारी मंचावर येऊन निरूत्त्तर होतात असे आम्ही पाहिले आहे. एक दुस-यावर ढकलतात. किंवा त्यांना उत्त्तरच येत नाही असे झाले आहे. हे आम्ही प्रत्त्यक्ष पाहिले आहे. माझे म्हणणे आहे की, दोन महासभा होणार आहेत या महासभांचा कालावधी वाढवुन विचारलेल्या प्रश्नांचे समाधान करून घ्यावे किंवा एखादा प्रश्न विचारायचा नाही ते ठरवावे. आता कोणी प्रश्न दिले तर ते तिथेच थांबतील कारण आधीच्याच प्रश्नांची उत्त्तरे मिळाली नाहीत. आता पर्यंत जेवढे प्रश्न आलेत त्तेवढेच राहणार की, अजुन प्रश्न सदस्य देऊ शकतील. कारण दोन महिने आहेत त्याआधी सर्व प्रश्न संपवायचे आहेत. त्या प्रश्नांच्या उत्त्तरावर कार्यवाही झाली पाहिजे. कारण आचारसंहिता लागु झाल्यावर आम्ही जनतेचे काय काम करू शकणार म्हणुन हे सर्व आधी लक्षात घेतले तर लवकर संपतील.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा. महापौर....

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरेः-सभा संपवत आहात ना? का चालु ठेवणार आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-हो सभा संपवत आहोत.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः-वनवारीजी, सभा संपवत आहेत. बरोबर आहे. आम्ही याकरिता सुझाव देतो की, सर्व अधिकारी उपस्थित राहिले पाहिजे. म्हणजे प्रश्नोत्त्तरे संपतील.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मॅडम सुनिताजी, मी श्री. भिमसेन मोरेंना उत्त्तर देत आहे. ते विचारत आहेत सभा चालु ठेवणार आहात की, प्रश्नोत्त्तरावर मिटिंग चालु आहे.

मा. सदस्य श्री. सुनिता राजवानीः-वनवारी मी मोरे साहेबांनाच उत्त्तर देत आहे. त्यांनी विचारले ते बरोबर आहे. अधिका-यांनी उपस्थित राहिले पाहिजे म्हणुन मी बोलले.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-प्रश्नोत्त्तरावर अंकुश लावण्याची चर्चा चालु आहे. सचिव साहेबांनी हे सांगावे की, दुस-या महापालिकेत याबाबतीत काय होते. कायदयाप्रमाणे काय असले पाहिजे. किंवा महापौरांनी निर्णय घ्यावा. महापौरजी, दुस-या महापालिकेच्या सदस्याने इथली सभा अटेंड केली होती. ते हसत होते ते म्हणत होते तुम्ही किती वेळ बोलता.

--९--

मा. सचिव :-महापालिकेची जी नियमावली आहे. त्यानुसार प्रश्नोत्त्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा असला पाहिजे. व दुसरा असा पण नियम आहे. तुम्ही जे प्रश्न देता. त्याचे आम्ही तुम्हाला लेखी उत्त्तर देतो. ते याकरिता की वेळ वाया जाऊ नये. व लेखी उत्त्तर मिळाल्यावर आपण त्यावर जास्त चर्चा नाही केली पाहिजे. कारण तुम्हाला लेखी उत्त्तर दिले आहे. प्रश्नोत्त्तराचा उददेश काय आहे ते मी आज सर्वांसमोर स्पष्ट करतो. प्रश्नोत्त्तराचा उददेश हा असतो की, प्रशासनावर नजर ठेऊन त्यांची चुकी पकडणे. जर आम्ही लेखी उत्त्तर देत आहोत प्रश्नाचे. तुम्हाला असे वाटत असेल की, आम्ही तुम्हाला चुकीची माहिती देत आहोत वा चुकीचे उत्त्तर देत आहोत. तर आपण त्यावर जास्त चर्चा करता. चर्चा करून फायदा नाही त्यावर तुम्ही नवा प्रश्न उपस्थित करा व या प्रश्नाव्दारे तुम्ही नविन माहिती मिळवा. जेणेकरून तुम्ही प्रशासनाची चुकी पकडाल व एक दुस-यांच्या नजरेत असाल. नियमावलीत हे स्पष्ट लिहिले आहे की, प्रश्नोत्त्तराच्या कालवधीत चर्चा करायची नाही. व त्यानुसार फक्त अर्धा तास प्रश्नोत्त्तराचा असतो. मागच्यावेळी सर्वांनी मिळुन अर्ध्यातासाचा एक तास करायचा असा सर्वांनी मिळुन ठराव केला होता ते पण चुकीचे आहे. परंतु सर्वांच्या भावना लक्षात घेऊन हे ठरवले होते. ते पण कायदयाने चुकीचे आहे. व आता एका तासाचे दोन तास केले असे कुठेही उदाहरण तुम्हाला मिळणार नाही.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-विषय खुप लहान आहे. त्याला नियमाच्या आधारे पहाण्याची गरज नाही. विषय असा आहे की, ही महासभा मागील काही दिवसापासुन काही ना काही कारणास्तव स्थगित होत आहे. व आज आपण हा निर्णय घेतला की, हि महासभा रदद करून नव्याने बोलवावी. हा जो एक तास आम्हाला मिळाला पाहिजे होता तो मिळाला नाही. आम्ही त्यापासुन वंचित राहिलो. तो एक तास भरपाई करून येणा-या महासभेत तो एक तास आम्हाला जास्त मिळावा. व कोणतीही महासभा एक तास जास्त प्रश्नोत्त्तरावर चर्चा करू इच्छिते तर त्यावर नियम पाहण्याची आवश्यकता नाही. आपण तीन ते पाच पर्यंत एक तासाचे कंम्पेंन्सेशन घेऊ. ज्या एक तासाला आपण वंचित राहिलो. आजची सभा रदद करू. हा एक तास प्रश्नोत्त्तराचा वाचवावा. व सदस्यांनी जे प्रश्न विचारले त्याचे उत्त्तर त्यांना या एक तासात मिळावे. प्रश्नांची रांग लागली आहे. ती श्रृंखला पुर्ण झाली

पाहिजे. हा एक तास वाया जाऊ नये म्हणुन आपण हा एक तास वाढवु शकतो एका सभेपुरता. कधी कधी आपण पण प्रथा पाडु शकतो. जी प्रथा आहे त्यावरच अंमल करणे हे आवश्यक नाही.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. धनंजय बोडारे):-आजच्या सभेच्या कार्यसूचीवरील पुढील विषय क्र. १ ते ६ हे सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय १ :- प्रश्नोत्त्तरे. (मागील सभेतील प्रश्न क्र. ५९९ व ६०० हे प्रलंबित आहेत. ते प्राधान्याने घेण्यांत येतील व त्यानंतर प्र. क्र. ६०३ पासुन पुढचे प्रश्न घेतले जातील).



विषय २ :- मागील सभेचे दि.२०.९.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

विषय ३ :- श्री. शंकर मालवणकर, लिपिक यांना मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे फौजदारी आरोपाखाली निलंबनाधीन ठेवणेस मान्यता देणे बाबत.

विषय ४ :-श्री. जेठनंद शर्मा, मुकादम यांना मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे फौजदारी आरोपाखाली निलंबनाधीन ठेवणेस मान्यता देणे बाबत.

विषय ५ :-लोकशाहिर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा तहसिलदार कार्यालयाजवळील चौकामध्ये बसविणेस मान्यता देणे बाबत.

विषय ६ :- सुधारित प्रारूप विकास योजनेतील सार्वजनिक सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयीसाठीचे आरक्षण क्र. १० वरील जमिनी पैकी काही भाग मुस्लीम जमाती करिता संपादन करणे संबंधीच्या प्रस्तावाची शासनास शिफारस करणे बाबत.

आजचे विषय हे पुढच्या नियमित कार्यसुचीवर येतील. आणि पुढच्या वेळेस जास्तीत जास्त सदस्यांचे प्रश्न पुर्ण होतील. म्हणुन सचिव साहेब जास्तीत जास्त कालावधी वाढवावा म्हणजे सदस्यांचे समाधान होईल. जास्तीत जास्त म्हणजे एक तास आहे तो एक तास सभा रदद केल्यामुळे बुडाला. म्हणुन आम्हाला अतिरिक्त एक तास मिळाला पाहिजे असे सदस्यांचे म्हणणे आहे. त्या एका तासात आपण शहरांच्या प्रश्नावर चर्चा करणार आहोत. त्यामुळे काही खास फरक पडणार नाही. त्यामुळे महासभेची वेळ ४ वाजता ऐवजी तीन वाजता ठेवावी. तर काही मोठी गोष्ट नाही. शहराच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी पुढच्या महासभेत प्रश्नोत्त्तराचा फक्त एक तास वाढवावा. हि प्रथा नाही झाली पाहिजे. परंतु जी सभा स्थगित केली आहे. ती कवर होण्यासाठी वेळ वाढवावी. आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

मा. सचिव :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. १० वाजता सभा संपल्याचे मा. पिठासिन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१९/११/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/११/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.११.२००१ रोजी दुपारी ३. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री. हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.
मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
४. श्री. वाघे शामु
५. श्रीमती. मोकल सीमा
६. श्रीमती. सोनावणे यमुना
७. श्री. ढेणवाल बनवारी
८. श्रीमती. वेलकर सुरेखा
९. श्री. यादव नरेश
१०. श्री. सोनावणे राजु
११. श्रीमती. दासानी मिनु
१२. श्रीमती. पवार पंचशिला
१३. श्री. टाले प्रमोद
१४. श्री. आढाव रामभाऊ
१५. श्रीमती. बगाडे सुनिता
१६. श्री. भांडे भगवान
१७. श्री. ठाकुर सेवलदास
१८. श्री.बनवारी किशोर
१९. श्री. तेजी कैलास
२०. श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
२१. श्री.खेमाणी देवेंद्रसिंह
२२. श्री. पमनानी ईश्वर
२३. श्रीमती. वसीटा बेबी.
२४. श्रीमती. मटाई जोनिता
२५. श्री.चौधरी राजेंद
२६. श्री. लांडे पांडुरंग
२७. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२८. श्री. मोरे भानजी
२९. श्रीमती. राजवानी सुनिता
३०. श्री. पुरस्वानी जमनादास
३१. श्री. पारवानी रामचंद्र
३२. श्री. तलरेजा विनोद
३३. श्री. रोहडा श्यामसुंदर
३४. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३५. श्रीमती. करोतिया मालती
३६. श्री. बहरानी ठाकुरदास
३७. श्री. जाधव सुरेश
३८. श्री. मोरे भिमसेन
३९. श्री. चव्हाण रमेश
४०. श्रीमती. बनवारी मोना
४१. श्री. राजानी नरेंद्र
४२. श्री. सुभाष मनसुलकर
४३. श्रीमती. राजानी भारती
४४. श्रीमती. कुंदनानी लविना
४५. श्रीमती. वलेचा पदमा
४६. श्रीमती. गजवानी कांता
४७. श्रीमती. भठिजा इंदिरा
४८. श्री. केणी जयकुमार
४९. श्री. पंजाबी नारायण
५०. श्री. आयलानी कुमार
५१. श्रीमती. वारिंगे पन्ना
५२. श्रीमती. आशा राधवानी
५३. श्री. प्रकाश माखिजा
५४. श्री. किशनानी गोदुमल
५५. श्री. सचदेव गिरधारी
५६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
५७. श्री. पंजाबी लाल

तर



१. श्री. चौधरी गणेश , २. श्रीमती. ज्योती कालानी ३. श्री. उमाप रामदास ४. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ५. श्री. वारिंगे पंढरीनाथ, ६. श्रीमती. टेकचंदानी चंदा, ७. श्री. वाधवा गिरधारी ,८. श्री. महाडिक प्रकाश, ९. श्रीमती. जया साधवानी, १० श्री. भाटीया जयप्रकाश ,११ श्रीमती. जेसवानी आशा, १२. श्रीमती. नाईक यशस्विनी, १३ श्री. अचनानी पम्मीकुमार, १४.

श्री. रामरख्यानी मोहनदास, १५. जग्यासी राजु, १६ श्री. बहरानी गोप, १७. श्री. केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

मा.सचिव :-सर्व प्रथम वंदेमातरम् होईल तरी सर्वांनी आपापल्या आसनाजवळ उभे रहावे.

वंदेमातरम म्हणुन सायंकाळी ३ . ५० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :-मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त, सर्व अधिकारी, सर्व सन्माननिय सदस्य व आमचे कर्मचारी या सर्वांना आमच्या कॉंग्रेस पक्षाच्या वतीने व सत्ताधारी आघाडीच्या वतीने दिवाळीनिमित्त शुभेच्छा. आपला प्रत्येक क्षण आनंदमय होवो अशी आमची शुभेच्छा आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा. महापौर साहेब, उपमहापौर साहेब, मा. आयुक्त साहेब आताच सन्माननिय सदस्य श्री. सेवलदास ठाकुर यांनी दिवाळी निमित्त शुभेच्छा दिलेल्या आहेत. संपुर्ण भारतभर जेव्हा दिवाळीचा सण साजरा होत होता. लक्ष लक्ष दीप जळत होते. त्यावेळी आपल्या भारतासाठी आपला एक मेजर श्री. राजेश नायर हा काश्मिरमध्ये जेहाद इस्लामी गटाच्या चकमकीमध्ये ठार झाला, त्याच्या घरात घुसून अतिरेक्यांनी त्यास ठार मारेलेले आहे. हा काश्मिरमधील डोढा जिल्हयात हा आपला वीर जवान मारला गेला आहे आणि भारतासाठी जेव्हा त्यांनी हे वीर मरण प्राप्त केले आहे. हा राजेश नायर मुंबईमधील एक सैनिक होता. आणि या सैनिकाला आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे दोन मिनिटाचे का होईना आपण श्रध्दांजली अर्पण करण्यास काही हरकत नाही.

शोक प्रस्ताव

प्रस्तावना

सहा वर्षापुर्वी लष्करी सेवेत दाखल झालेला अवघ्या ३१ वर्षाचा मेजर राजेश नायर हा उमदा लष्करी अधिकारी ऐन दिवाळीच्या दिवशी दि. १४. ११. २००१ रोजी काश्मिर सीमेवर दोडा जिल्हयात अतिरेक्यांच्या एका गटाशी मुकाबला करताना धारातीर्थी पडला. अन् 'जब देश में थी दिवाली वो खेल रहे थे होली, जब हम बैठे थे घरोंमें, वो झेल रहे थे गोली, या पक्तींचे प्रत्यंतर देणा-या घटनेने सारे मुंबईकर सुन्न झाले.



मेजर नायर यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६(क) दिनांकः-१९/११/२००१.

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मेजर राजेश नायर यांच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी सर्वांनी उभे राहून दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित केली.

मा. सदस्या श्रीमती लक्ष्मीबाई लुंड व श्रीमती लविना कुंदनानी या सभागृहातून बाहेर पडल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा.महापौरजी, महासभेचे कामकाज आपण आता चालु करणार आहोत. त्यापुर्वी मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, राज्य निवडणुक आयोगाचे उपायुक्त श्री. डी.जी.वळवी यांचे जे पत्र आले आहे जे आताच आम्हाला वितरीत केले आहे. व ज्याच्या मागील बाजुस आमच्या आयुक्तांनी माहितीस्तव असे लिहिले आहे की, जकात ठेका रद्द करण्याचा जो विषय आहे म्हणून ? त्यावर चर्चा केली जाऊ नये. तर राज्य निवडणुक आयुक्तांचे आज हे जे आदेश आहेत. तर याबाबत विशेष करून हाच विषय निवडणुक आयुक्तांना कसा माहित पडला की, १९ तारखेच्या सभा सुचनेवर हा विषय आहे. आज चटई क्षेत्र निर्देशांक(थ्ैण्ण्)वाढविण्याचा मुददा आहे, कब्रस्थानचा सुध्दा विषय ठेवला आहे एकुण १४ विषय सभा सूचनेवर आहेत.

--४--

तर त्यांनी या एकच विषयाबाबत हे पत्र कसे पाठविले? तर यामध्ये हेराफेरी केलेली आहे. तर या पत्रामध्ये त्यांनी लिहिलेले आहे की, या विषयावर चर्चा न करता कोणताही निर्णय घेऊ नये. या विषयाबाबत आम्ही राज्य निवडणुक आयुक्तांचा आदर ठेऊन या विषयावर चर्चा न करता परंतु आम्हाला असे वाटते की, आजच्या सभेत जकात ठेका रद्द करण्याच्या विषयावर जर चर्चा होत नसेल तर या पुर्ण महासभेचेच कामकाज स्थगित केले जावे. ते पाच दिवसासाठी किंवा सात दिवसासाठी स्थगित करा. आम्ही सर्व राजकीय पक्षांची नेते मंडळी निवडणुक आयुक्तांकडे शिष्ठमंडळ घेऊन जाऊ व त्यांच्याशी याबाबत चर्चा करू की, आचारसंहिता ४ जानेवारी पासुन लागु होणार आहे. त्यापुर्वी हा कोणता मुददा आहे की, ज्यावर आम्ही निर्णय घेऊ शकत नाही? आम्ही हे नाही सांगत की, या ठेकेदाराचा ठेका रद्द करून आपण खाजगीकरण करू नका. महानगरपालिकेनेच जकात वसुली करावी असे नाही. आम्हाला तर असे वाटते की, अन्य दुस-या कुणी हे काम चालवावे. परंतु आमचा जो विषय होता तो व्यापा-यांवर केल्या जाणा-या दादागिरीच्या विरोधातील होता. व्यापा-यांवर अन्याय झाला होता, पुर्ण उल्हासनगर याविषयाबाबत बंद ठेवण्यांत आले होते. जर आम्ही याविषयावर चर्चा करू शकत नाही. तर पुर्ण सभेचे कामकाज चालविण्याची काही गरज नाही.आम्ही सर्व संमतीने सभा सूचनेवरील सर्व कामकाज न चालविता स्थगित करून ही सभा नंतर चालविण्यात यावी असा निर्णय घेत आहोत. आम्ही सर्व निवडणुक आयुक्तांकडे शिष्टमंडळ घेऊन जाऊ. व याविषयाबाबत त्यांच्याकडुन खुलासा घेऊ.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. महापौरजी, उपमहापौरजी व माझे सहकारी, हा जो विषय आहे तो काही राजनैतिक विषय नाही. तो एखादया राजकीय पक्षाचा किंवा निवडणूकीचा मुददा नाही की, ज्या विषयी राज्य निवडणूक आयुक्तांचे आदेश यावेत. हा एक शहराचा मुददा आहे. ज्यावर अधिकाधिक राजकीय पक्ष एक आहेत. निवडणुकीचा मुददा केव्हा तयार होतो? जेव्हा एका पक्षाचा किंवा सत्ताधारी पक्षाचे एक मत असते, व इतरांचे दुसरे मत असते. वेगवेगळया पक्षांचे जेव्हा वेगवेगळे विचार असतात. तेव्हा तो निवडणूकीचा मुददा बनतो. हा जो मुददा आहे तो राजकीय मुददा न होता शहरातील एक व्यवहाराचा मुददा आहे. एक दादागिरीचा मुददा आहे. एका ठेकेदा-याचे जनतेशी वागणे कसे असावे याबाबतचा मुददा आहे. व यासाठीच आमच्या पक्षाचे सुध्दा असे मत आहे की, आजच्या सभेचे कामकाज स्थगित करावे. कारण की, आज ठेकेदारांविषयी लोक त्रस्त आहेत. उदया शहरामध्ये दुसरी काही अडचण उदभवु शकते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तर अशा वेळेला कोणताही निवडणूक आयुक्त असे म्हणणार नाही की, निवडणूकीची वेळ आहे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सोडून दया?म्हणुनच आम्ही या मुददयाबाबत राज्य निवडणूक आयुक्तांचा आदर ठेवतो. आम्हाला असे वाटते की, राज्य निवडणूक आयुक्तांची दिशाभुल केली गेली आहे. खरे ते त्यांना सांगितले गेले नाही. यासाठी आमचा देखिल हाच विचार आहे की, हा एक महत्त्वाचा मुददा समजुन आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करून व महापौर या नात्याने आपले हे कर्तव्य ठरते की, आपण निवडणूक आयुक्तांच्या भेटीची वेळ घ्यावी. आम्ही सर्व पक्षांचे



नगरसेवक त्यांच्याकडे येण्यास तयार आहेत. व त्यांना समजावु शकतो की, हा काही राजकीय मुददा नाही किंवा निवडणूकीचा मुददा नाही. तर आमचे सुध्दा हे मत आहे की, आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करून ती दुस-या कुठल्या तरी दिवशी ठेवण्यात यावी.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-मा. महापौरजी, आज हा जो विषय येथे उपस्थित झाला आहे. आम्ही जेव्हा सभागृहात येत होतो तेव्हा मा. निवडणुक आयुक्तांचे एक पत्र आम्हास देऊन आमची स्वाक्षरी घेण्यांत आली. त्या पत्रामध्ये त्यांनी जी वाक्ये लिहिली आहेत त्यांचे विश्लेषण मी करू इच्छितो. त्यात असे लिहिले आहे की, राज्य निवडणुक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, दि.१९.११.२००१ रोजी होणा-या महानगरपालिकेच्या बैठकीत जकातीच्या खाजगीकरणावर पुर्नविचार होणार आहे. येथे आम्ही कुण्या खाजगी ठेकेदाराच्या पुर्नविचारासाठी बसलेलो नाहीत की, खाजगीकरण करावे किंवा नाही. किंवा महानगरपालिकेने हे काम आपल्या हाती घ्यावे असे धोरणात्त्मक निर्णय घेण्याचा इथे कोणताही विषय नाही. निवडणूक आयुक्तांना कुणीतरी चुकीची माहिती दिली आहे. त्यांनी कुणाची तरी एक बाजु ऐकुन घेतली आहे, निवडणूकीच्यावेळी निवडणूक आयुक्तांनी स्वतंत्रपणे एकाच बाजुने विचार करायचा असतो की, अशाप्रकारची कोणतीही घटना घडु नये की, ज्यामुळे कुणाची तक्रार येऊ नये की, अमुक अमुक अशा प्रकारचा धोरणात्त्मक निर्णय घेतला गेला आहे म्हणुन त्यांनी हे पत्र पाठविले आहे. परंतु त्यांना कुणीतरी चुकीची माहिती दिली आहे. त्यांना योग्य ती माहिती दिली गेली पाहिजे. दुसरा विषय हा आहे की, आम्ही एखादया ठेकेदाराला इमारत बांधण्याचा ठेका दिला. ती इमारत ज्या कायदयानुसार, नियमानुसार बांधली पाहिजे. त्यानुसार जर ती बांधली जात नसेल तर त्या ठेकेदारावर काही अंकुश ठेवणे, परिवर्तन आणणे. त्या ठेकेदारला स्वाभाविकपणे बदलणे, त्याबाबत प्रयत्न करणे. त्याबाबत त्यास सांगणे की, आपण जी इमारत बांधत आहात ती बरोबर बांधली जात नाही. असा अधिकार कोणतेही निवडणूक आयुक्त महापालिकेकडुन हिरावून घेऊ शकत नाहीत. कुठल्याही आयुक्तांकडुन हे अधिकार ते हिरावून घेऊ शकत नाहीत. नियमांच्या आधारावर आपण ज्या कुणाला ठेका दिला तो ठेका नियमानुसार चालू आहे

की नाही. त्यांचा व्यवहार कसा आहे? अशा प्रकारचे अधिकार कोणतेही निवडणूक आयुक्त महापालिकेकडुन हिरावून घेऊ शकत नाहीत. तर या सर्व बाबी आयुक्तांनी निवडणूक आयुक्तांकडे घेऊन जाणे जरूरीचे आहे. व या पत्राच्या आधारे आजच्या या सभेतील आमच्या चर्चेवर जे अंकुश लावण्यांत आलेले आहेत ते योग्य नाहीत. ते यासाठी की, त्यांना योग्य प्रकारे माहिती दिली गेली नाही. जसे आमच्या काही सदस्यांनी येथे सांगितले की, आम्ही सर्वजण मिळुन निवडणूक आयुक्तांकडे जाऊन त्यांना या प्रकरणाची सविस्तर माहिती दिली पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे ती त्यांना सांगितली जावी. भलेही आजच्या सभेचे कामकाज स्थगित करून येणा-या दोन तीन दिवसात सभा बोलावली जावी. त्या सभेत हेच विषय घेतले जावेत. व या विषयावर मोकळेपणाने चर्चा करण्याची निवडणूक आयुक्तांकडून आम्हाला परवानगी मिळावी अशी माझी येथे सूचना आहे.

--६--

<u>मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, निवडणुक आयुक्तांकडून आज जे पत्र आले आहे की, जकातीच्या विषयाबाबत आम्ही चर्चा करू शकत नाही. आज पुर्ण शहर त्यासाठीच बंद आहे. सर्व व्यापारी व संस्था जकात ठेकेदारापासुन त्रस्त आहेत. याबाबत जसे की,आमचे सभागृह नेता, श्री. लाल पंजाबी, श्री. नरेंद्र राजानी यांनी म्हंटले की, ही सभा स्थगित करून.....

मा. सदस्या श्रीमती मिनु दासानी व श्रीमती मोना वनवारी या सभागृहातून बाहेर पडल्या.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>मा.महापौरजी, एक मिनिट. ही जी चर्चा चालु आहे. तत्पुर्वी लक्षवेधीच्या मुददयाचे स्पष्टीकरण करा. कारण की, सभा स्थगित स्थगित करून निघुन जाल. लक्षवेधी सुचना आपण स्विकृत केली आहे की नाही? याचा निर्णय झाला पाहिजे. ती स्विकृत केली आहे की काय केले आहे? हे अगोदर सांगा? चर्चा सुरू होण्या अगोदर सांगा?

<u>मा. महापौरः-</u>यांचे बोलणे पुर्ण होऊ दया.

<u>मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :-</u>विरोधी पक्ष नेता जे म्हणत आहेत की, लक्षवेधी सुचना स्विकारली की नाही? तर महापौर ते जाहिर करतीलच ना? स्विकारली तरी जाहिर करतील, स्विकारली नाही तरीही जाहिर करतील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>सभा चालविण्यासाठी यांनाच मंचावर बसवा?

<u>मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी :-</u>बोलण्यावर अंकुश आहे का? जेव्हा दोन सदस्य बोलत होते तेव्हा आपण काही बोलला नाहीत . जेव्हा मी बोलण्यास उभा राहिलो तेव्हाच आपण बोलत आहात. तर माझ्या बोलण्यावर अंकुश आहे का?.......

<u>मा.महापौर :-</u>महाराजजी, त्यांना बोलु दया.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u>लक्षवेधी सूचना स्विकारली की नाही? त्यानंतर चर्चा सुरू करता येईल ना?

<u>मा. महापौर :- </u>लक्षवेधीचे मी उत्तर देईन.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-एक सेकंद, महाराज भुल्लर जे बोलत आहेत. ते असे की, सभा स्थगित केल्याचे जाहिर करण्यापुर्वी लक्षवेधी सुचना स्विकृत केली की नाही, याचा निर्णय झाला पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-सभा स्थगित करण्यापुवी गटनेत्त्यांना बोलु दया ना.

--७--

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी :-जेव्हा आम्ही बोलतो तेव्हा आमचे बोलणे ऐकुन घेत नाहीत. आम्ही मात्र दुस-याचे बोलणे ऐकुन घ्यायचे का?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-श्री. ठाकुरदास बेहरानी बोलत आहेत त्यांना बोलु दया. नंतर दुस-यांनी बोला.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी:-मी त्यांना मनाई केली नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-महापौरजी, भुल्लर महाराज यांची जी भावना आहे आपण त्यांना जी खात्री दिली की, सभा स्थगित करण्यापुर्वी लक्षवेधीबाबत निर्णय दिला जाईल. आपण निश्चिंत रहा. श्री. ठाकुरदास बेहरांनीना बोलु दया. लक्षेवधीबाबत निर्णय दिल्यानंतर सभा स्थगित केली जाईल.

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी :-यासाठी माझी मा.महापौर, उपमहापौर यांना विनंती आहे की, निवडणूक आयुक्तांना भेटण्याची त्यांच्याकडुन वेळ घेऊन आपण आपल्या सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांच्याकडे जाऊन याविषयावर चर्चा करू या.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :-हा जो विषय अजेंडयांवर आला आहे त्याबाबत मी आयुक्त साहेबांना हे विचारू इच्छितो की, व्यापा-यांच्या प्रशासनाकडे काही तक्रारी आल्या आहेत का?

मा. महापौर:-महाराजजी, सभा स्थगित करण्याचा ठराव/ प्रस्ताव आलेला आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी :-ही तक्रार ५ तारखेला दिलेली आहे. परंतु अदयाप त्यांना चर्चेस बोलावले नाही.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :-आयुक्त साहेबांनी सांगावे ना आम्हाला?

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे :-शेवटी शेवटी आम्ही सुध्दा जास्त बोलले पाहिजे. आम्हाला पण बोलण्याची संधी दया.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसूलकर हे सभागृहातून बाहेर पडले.

मा. महापौर :-महाराजजी, माझ्याकडे दोन लक्षवेधी आल्या आहेत. एक आहे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. राजेंद्र चौधरी यांची उल्हासनरमधील गोल मैदानात रोटरी क्लबच्या फेस्टीव्हलला देण्यांत आलेली बेकायदेशीर परवानगी रदबातल करण्यासंबंधीची.

आणि दुसरी लक्षवेधी आहे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. लाल पंजाबी यांची.

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. १४४ दि. २५.१०. २००० व महासभा ठराव क्र. २०.७.२००० वरील ठरावानुसार जनरल अरूण कुमार वैद्य नावाने ओळखले जाणारे सभागृह ठेकेदारास चालविण्यास देण्यात आला होता. सदर ठराव हा उल्हासनगरच्या जनतेच्या विरोधातव ठेकेदाराच्या फायद्याचे असल्याने उल्हासनगरमधील जनतेने तीव्र आंदोलन छेडले हाते. त्याबाबत विधानसभा अध्यक्षांच्या आदेशानुसार सदरील ठराव विधीमंडळाच्या सभागृहात रद करण्याबाबतच्या सूचना, आदेश संसदीय कामकाज कार्यमंत्री मा. ना. रोहीदास पाटील यांना देण्यात आले होते. त्यामुळे सदरील ठराव (निर्णय) रदद करण्यात येईल असे विधीमंडळ सभागृहात आश्वासन दिले होते. परंतु सदरील ठराव पुन्हा राज्यमंत्री यांनी दिलेला आहे. तरी तो निर्णय रद करण्याबाबत फेर विचार करण्यात यावा.

उल्हासनगरमधील गोलमैदानातील रोटरी क्लबच्या फुड फेस्टीव्हलचा कार्यक्रम कालच पुर्ण झालेला आहे. त्यामुळे या लक्षवेधीचे काही महत्त्व उरलेले नाही.

<u>मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भूल्लर :-</u>साहेब, अर्थ काही नाही हे ठिक आहे परंतु आमची महासभा फनफेअरसाठी महापालिकेचे उदयान न देण्याबाबत एक ठराव मंजुर करते आणि त्यानंतरही येथील अधिकारी फनफेअरसाठी महापालिकेचे उद्यान देतात. ते कसे देतात?

<u>मा. महापौरः-</u>व दुसरी लक्षवेधी आहे श्री. राजेंदसिंह भुल्लर महाराज व श्री. लाल पंजाबी यांच्याकडुन टाऊन हॉल बाबतची त्या दोन्ही लक्षवेधी मी अस्विकृत करीत आहे. दुस-या लक्षवेधीबाबतचे कारण सांगत आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेऊन त्याची उल्हासनगर महानगरपालिकेस माहिती दिली आहे. अशा स्थितीत आम्ही यामध्ये हस्तक्षेप करू शकत नाही. व ते बेकायदेशिर होईल. यासाठी मी ती लक्षवेधी अस्विकृत करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u>मा.महापौरजी, राज्य निवडणुक आयुक्तांचे आपणाकडे पत्र आले आहे की, याविषयाबाबत निर्णय घेऊ नका तरीही त्याबाबत आपण निर्णय घेत आहोत की, त्यांना (निवडणुक आयुक्तांना) भेटून निर्णय घेऊ. असेच हे दुसरे प्रकरण आहे. आपण ही लक्षवेधी स्विकृत करा त्यानंतर आपण त्यावर चर्चा करू.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :-</u>मा. महापौरजी, हा विषय सुध्दा लोकांच्या भावनांशी निगडित आहे. तेवढाच गंभीर विषय आहे.

<u>मा. महापौरः-</u>राजानी साहेब, मी टाऊनहॉलबाबत कायदेशिर बाबींची माहिती घेतली आहे. हा शासनाचा निर्णय आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-</u>यापुर्वी सुध्दा सरकारमधील एका मंत्रीमहोदयांचे पत्र ठराव रदद करण्याबददल आले होते. याच विषयाबाबत याच टाऊनहॉल बाबतचा ठराव रदद करण्याबाबत सरकारच्या एका मंत्रीमहोदयाचे पत्र येथे आले होते की हा प्रस्ताव रदद केला जावा. जर



शासनाचा हाच निर्णय होता की, प्रस्ताव रदद केला जावा, ते सुध्दा कॅबिनेट दर्जाच्या मंत्रीमहोदयांचे पत्र होते. आयुक्त साहेब मी खरे म्हणतो ना?

<u>मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भूल्लर :-</u>महापौर साहेब, आयुक्त साहेबांना सांगु दया व्यापा-यांची काही तक्रार आहे काय?

<u>मा. महापौर :-</u>व्यापा-यांची तक्रार जर आयुक्त साहेबांकडे आली नसेल परंतु आमच्याकडे हजारो तक्रारी आलेल्या आहेत. हजारो तक्रारी एक नाही हजारो तक्रारी आल्या आहेत. मी सभागृहातील सर्व सदस्यांना हे सांगु इच्छितो की,

कॅम्प नं. १ पासुन कॅम्प नं. ५ पर्यंत एक सुध्दा दुकान उघडे नाही. हा सर्वात मोठा पुरावा आहे की, जकात ठेकेदारा विरूध्द व्यापा-यांमध्ये किती रोश आहे. यापेक्षा अधिक चर्चा करू इच्छित नाही.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :-</u>हा चर्चेचा विषय नाही. हा साधासा एक प्रश्न आहे. त्याचे आयुक्तांनी उत्तर दयायला पाहिजे.

<u>मा. महापौरः-</u>निवडणूक आयुक्तांचे जे पत्र आले आहे ते लक्षात घेता या विषयावर आम्ही जास्त चर्चा करत नाही.व सभागृहातील सत्ताधारी व विरोधी पक्षांकडुन मला जो प्रस्ताव प्राप्त झाला आहे तो लक्षात घेता ही सभा येणा-या सोमवार पर्यंत स्थगित केली जात आहे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :-</u>आमचा विरोध आहे त्यास, आमचा विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u>आमचा विरोध आहे त्यास. सभा चालवा ना, आम्ही कुठे म्हंटले की, सभा स्थगित करा म्हणुन? आमचा विरोध आहे. आपण सभा चालवा.व्यापा-यांच्या तक्रारी असतील तर त्यांनी त्या लेखी आयुक्तांकडे दिल्या पाहिजेत. एक सुध्दा तक्रार नाही परंतु शहर बंद करा, हे करा, ते करा म्हणतात. लेखी तक्रारी दया त्यानंतर पाहु या ना आयुक्त जर कार्यवाही करत नसतील तर काय करायचे ते.....

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u>महापौरजी, माझा आपणांस साधासरळ प्रश्न आहे की, जकातीच्या समस्येबाबत व्यापा-यांनी पुर्ण शहर बंद ठेवले आहे. आम्ही त्यांच्या भावनांशी निगडित आहोत. कारण की सर्व व्यापा-यांच्या हिताचा प्रश्न आहे. महासभा त्यांच्या बरोबर असली पाहिजे. परंतु जेथे टाऊन हॉलचा प्रश्न आहे त्याबाबत कुणाच्या हिताचा आपण विचार करत आहात? तांत्रिक मुददा बाजुला ठेऊन कुणा एका ठेकेदाराच्या.... तेथे सुध्दा एक ठेकेदार आहे. येथे सुध्दा एक ठेकेदार आहे. ठेकेदाराच्या हिताचा विचार करून येथे आपण टाऊन हॉल बाबतच्या लक्षवेधीचा मुददा निकाली काढु इच्छिता का?

<u>मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे :-</u>टाऊन हॉलचा विषय सभा सुचनेवर आहे का? टाऊन हॉलचा विषय आज नाही आहे.



<u>मा. महापौर :-</u>टाऊन हॉलच्या विषयाबाबत राज्यशासनाने निर्णय घेतलेला आहे त्यामध्ये आपण हस्तक्षेप करू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>मोरे साहेब, टाऊन हॉलची लक्षवेधी आहे.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u>विधानसभेमध्ये शासनाने आश्वासन दिले होते की, हा मुददा रदद केला जाईल त्यानंतर मंत्रीमहोदयांनी......

<u>मा. महापौर :-</u>आपण त्यास कोर्टामध्ये आव्हान दया.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>मोरे साहेब, लक्षवेधी आहे,लक्षवेधी. आपणांस माहित नाही?

<u>मा. महापौर :-</u>उप महापौर बोलु इच्छितात त्यांना बोलु दया.

<u>मा. उपमहापौर :-</u>श्री. लाल पंजाबी, श्री. नरेंद्र राजानी, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी टाऊन हॉलचा एक मुददा उपस्थित केला होता. जसे श्री.

राजानी यांनी सांगितले की, तेथे एक ठेकेदार आहे तसाच येथे सुध्दा एक ठेकेदार आहे. व्यापा-यांनी या ठेकेदाराच्या विरोधात वातावरण तयार केले आहे. व त्यांची भावना ठेऊन निवडणूक आयुक्तांचा जो आदेश आला आहे त्याचा खुलासा करण्यासाठी आपण तेथे जाणार आहोत. तशीच भावना टाऊन हॉल बाबत श्री. लाल पंजाबी, श्री. नरेंद राजानी, श्री. लांडेजी व महाराज भुल्लर यांनी व्यक्त केली आहे. तर याविषयाबाबत आपण का नाही सांगत की, आपण राज्य शासनाकडे जाऊन याबाबत विचारणा करू. त्याबाबत आपण म्हणता की, राज्य शासनाचा आदेश आहे.

मा. महापौर :-मी म्हंटले की, याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याविरूध्द महासभेत चर्चा करू शकत नाहीत. आपणास वाटत असेल तर आपण अपिल करू शकता.

मा. उपमहापौर :-तेच तर श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, आपण लक्षवेधी स्विकृत करा. आपण राज्य शासनाकडे जाऊ.

मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :-मा. महापौरजी, आपणांस वाटते का की, टाऊन हॉलमध्ये दारू विकली गेली पाहिजे? आपली वैयक्तिक भावना अशी आहे काय?

मा. महापौर :- याबाबत वर्ष दिड वर्षापासुन बरीच चर्चा झालेली आहे. यावर चर्चा न केली तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :-तर मग तेथे दारू विकली गेली पाहिजे?

--११--

मा. महापौर :-सभा पुढील सोमवारी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-आमचा विरोध आहे. सभेचे कामकाज चालले पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर / मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मतदान घ्या. मतदान.

मा. सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-पिठासिन अधिका-यांनी निर्णय घेतलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-आमचा विरोध आहे ना त्यास आमचा विरोध लिहा.

मा. सचिव :-फक्त शिवसेनेचा विरोध आहे की दुस-या कोणत्त्या पक्षाचापण विरोध आहे काय? दुस-या कोणत्त्या पक्षाचा विरोध असेल तर कृपया सांगितला जावा.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :- ब-याचशया सदस्यांचा विरोध आहे.

मा. महापौर :-भुल्लर महाराज यांना मी एक गोष्ट सांगु इच्छितो की, जर शहरवासियांच्या हितासाठी , नागरिकांच्या हितासाठी नगरसेवक पद काय, महापौर पद काय, आमचा गळा सुध्दा कापला गेला तरी आम्ही तो कापण्यास तयार आहोत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-महापौरजी, टाऊन हॉलमध्ये दारू विकली तरी सुध्दा चालेल?

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-असे वाटते की, टाऊन हॉलही आमची शिवसेनेची खाजगी मालमत्ता आहे? जनतेची मालमत्ता नाही? आपण तीचे खाजगीकरण केले आहे? आपला टाऊन हॉलशी काहीही संबंध नाही?

मा. सचिव :-कृपया लक्ष दया. शिवसेना पक्षा व्यतिरिक्त दुस-या कुणाचा विरोध आहे का? कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.
सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधातील मतेः-
श्री. भुल्लर राजेंद्रसिंह

१. श्रीमती. सोनावणे यमुना
२. श्रीमती. वेलकर सुरेखा
३. श्री. भांडे भगवान
४. श्री. तेजी कैलास
५. श्री. बोडारे धनंजय
६. श्री. चौधरी राजेंद्र



७. श्री. लांडे पांडुरंग
८. श्रीमती. सुनिता राजवानी
९. श्री. मोरे भिमसेन
१०. श्री. चव्हाण रमेश

फक्त या ११ सदस्यांचा विरोध आहे. ठिक आहे.
सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांची नावे.

१. श्रीमती. मोकल सिमा
२. श्री. पारवानी रामचंद्र
३. श्रीमती. आशा राधवानी
४. श्री. माखिजा प्रकाश
५. श्री. राजानी नरेंद्र
६. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
७. श्री. पमनानी ईश्वर
८. श्री. तलरेजा विनोद
९. श्री. रेहडा श्यामसुंदर
१०. श्री. गुप्ता प्रभुनाथ
११. श्री. वनवारी किशोर
१२. श्री. यादव नरेश
१३. श्रीमती. पवार पंचशिला
१४. श्रीमती. बगाडे सुनिता
१५. श्री. टाले प्रमोद
१६. श्री. आढाव रामभाऊ
१७. श्री. मोरे भानजी
१८. श्रीमती. करोतिया मालती
१९. श्री. ढेणवाल बनवारी
२०. श्री. ठाकुर सेवलदास
२१. श्रीमती. वसीटा बेबी
२२. श्री. बेहरानी ठाकुरदास
२३. श्रीमती. वलेचा पदमा.
२४. श्रीमती. गजवानी कांता
२५. श्रीमती. भठिजा इंदिरा

२६. श्री. केणी जयकुमार
२७. श्री. माखिजा हरदास
२८. श्री. सोनावणे राजु
२९. श्री. पुरस्वानी जमनादास
३०. श्री. पंजाबी नारायण
३१. श्री. आयलानी कुमार
३२. श्री. जाधव सुरेश

--१३--

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-सन्माननिय महापौर साहेब, जनतेची दिशाभुल करत आहेत.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- सभा स्थगित करण्यास आमचा विरोध आहे. सभा चालवावी. जकातीबाबत आमचा विरोध नाही. सभा चालवावी.

मा. महापौर :-उपमहापौर सुध्दा आमच्या बरोबर आहेत?

मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-नाही. नाही. शहराच्या हितासाठी आपण सभा स्थगित करत नाहीत. इथे चर्चा करण्यासाठी आपणांस वेळ नाही आणि सभा स्थगित करीत आहात?

मा. सदस्या श्रीमती. जोनिता मटाई, श्रीमती. भारती राजानी आणि मा. सदस्य श्री. वाघे शामु हे सायंकाळी ४. १४ वाजता सभागृहात उपस्थित झाले.

मा. सचिव :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४. १५ वाजता हि सभा सोमवार दि. २६.११.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजे पर्यंत स्थगित करित असल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२६/११/२००१.

इतिवृत्त

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २६/११/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.११.२००१ रोजी घेण्यात आली होती परंतु ती मिटींग स्थगित केल्यामुळे ती २६.११.२००१ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. व खाली दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१)मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा- अनुपस्थित

२)मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे -अनुपस्थित

३. श्री. भुल्लर राजेंद विरसिंह
४. श्रीमती. सोनावणे यमुना
५. श्री. उमाप रामदास
६. श्रीमती. वेलकर सुरेखा
७. श्रीमती. पवार पंचशिला
८. श्री. प्रमोद टाल
९ श्री. आढाव रामभाऊ
१० श्रीमती बगाडे सुनिता
११ श्री. भांडे भगवान
१२ श्री. ठाकुर सेवलदास
१३. श्री. किशोर वनवारी
१४ श्री. तेजी कैलास
१५.श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
१६ श्रीमती वसिटा बेबी
१७ श्री. राजेंद्र चौधरी
१८ श्री. पंजाबी नारायण
१९ श्री. मोरे भानजी
२० श्री. पुरस्वानी जमनादास
२१ श्री. महाडिक प्रकाश
२२ श्रीमती साधवानी जया
२३ श्री. अचनानी पम्मीकुमार
२४. श्री. पारवानी रामचंद्र
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्री. रोहडा श्यामसुंदर
२७. श्रीमती. करोतिया मालती
२८. श्री. बहरानी ठाकुरदास
२९. श्री. मोरे भिमसेन
३०. श्री. चव्हाण रमेश
३१. श्रीमती जेसवानी आशा
३२. श्री. राजानी नरेंद्र
३३. श्री. सुभाष मनसूलकर
३४. श्रीमती नाईक यशस्वीनी
३५. श्रीमती पदमा वलेचा
३६. श्रीमती गजवानी कांता
३७. श्रीमती बठिजा इंदिरा
३८. श्री. केणी जयकुमार
३९. श्री. आयलानी कुमार
४०. श्रीमती. आशा राधवानी
४१. श्री. प्रकाश माखिजा
४२. श्री. ठाकुर नरेंदकुमार
४३. श्री. पंजाबी लाल
४४. श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

तर

१. श्री. चौधरी गणेश , २. श्री. वाघे शामु , ३. श्रीमती मोकल सिमा , ४. श्रीमती. ज्योती कालानी , ५. श्री. ढेणवाल बनवारी, ६. श्री. यादव नरेश,



७. श्री. सोनावणे राजु, ८. श्रीमती दासानी मिनु, ९. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, १०. श्री. खेमानी देवेंद्रसिंह, ११. श्री. पमनानी ईश्वर, १२श्रीमती मटाई जोनिता, १३. श्री. लांडे पांडुरंग, १४. श्रीमती राजवानी सुनिता, १५. श्री. वारिंगे पंढरीनाथ, १६. श्रीमती. टेकचंदानी चंद्रा, १७. श्री. वाधवा गिरधारी ,१८. श्री. गुप्ता प्रभुनाथ, १९. श्री. जाधव सुरेश, २०.श्री. भाटीया जयप्रकाश ,२१ श्रीमती. वनवारी मोना, २२. श्रीमती. राजानी भारती, २३. श्रीमती

कुंदनानी लविना , २४. श्रीमती वारींगे पन्ना, २५ श्री. रामरख्यानी मोहनदास, २६ श्री. जग्यासी राजु, २७. श्री. बहरानी गोप, २८ श्री. क्रिशनानी गोदुमल, २९. श्री. सचदेव गिरधारी, ३०. श्री. केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

मा. सचिव :- मा. महापौर व मा. उप-महापौर उपस्थित नसल्याने आपणामधून कुणा एकाला पिठासीन अधिकारी म्हणून बसावे लागेल. तुम्ही हे ठरवा कुणाला पिठासीन अधिकारी म्हणून बसवायचे आहे.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर :- सभागृह नेत्त्याला तिथे बसवा.

सर्व सदस्यांनी या प्रस्तावाला समर्थन दिले.

श्री. किशोर वनवारी, सभागृह नेता हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

सर्व प्रथम वंदे मातरम म्हणून ४. ४० वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः- मा. महापौर, उपमहापौर उपस्थित नसल्याने ही सभा स्थगित करावी असा माझा सुझाव आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- आता हे आहेत ना, महापौर........ महापौरजी, तीन-चार सभा झाल्या नाही आहेत, आमच्या इकडील नाल्याचा प्रश्न अजून तसाच आहे. सहा महिन्यापूर्वी लक्षवेधी टाकली होती, दर महासभेत इतिवृत्त कायम करतांना हा विषय येतोच. आता तिथे नाला कव्हर करुन रुम बांधली आहे. आजची पण महासभा होणार नाही तर कधी होणार?

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- मा. पिठासीन अधिकारी , आजची सभा आपण घेतली तर बरे होईल. खुप सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत ,बहूतेक या पूढे सभा होणार नाहीत. म्हणुन ही सभा स्थगित न करता पूर्ण केली तर बरे होईल.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसूलकरः- मी आजचे पिठासीन अधिकारी यांना विनंती करतो की, खुपसे सदस्य अनुपस्थित असल्याने आजची सभा स्थगित केली जावी.

मा. पिठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारीः- मी आमचे मा. आयुक्त यांना ,आमचे विरोधी पक्ष नेता श्री. भुल्लर यांनी जो प्रश्न विचारला की, आज पर्यंत नाल्याचे काम झाले नाही. तिथे पूर येतो, हा विषय प्रत्येक महासभेत



येतो. यावर आयुक्त साहेबांनी दोन मिनिट खुलासा करावा, नंतर सभेचा निर्णय घेऊ.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- मा. आयुक्त साहेब, मा. पिठासीन अधिकारी साहेब, जेव्हा आम्हाला नाल्याविषयी काम सांगितले तेव्हा आम्ही लाईन रेखांकीत करुन दिली होती, साहेबांनी त्यांना मान्यता दिली आहे. व त्याचे नकाशा व प्राकलन बनविणेचे काम सुरु आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- मी ते नाही म्हणत , नाला कव्हर करुन त्यावर रुम बांधली आहे. त्याविषयी कोण उत्तर देणार? जिथून नाला उघडायचा आहे, ते कल्वर्टच त्यांनी बंद करुन टाकले आहे, ते तर कधी उघडणारच नाही.

श्री.पानपट्टे (उपायुक्त ,अ. बां. वि ):- नाल्यावर जे बांधकाम केले आहे ते आज तोडले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- तुम्ही तोडुन आल्यानंतरच मी तिथे पाहिले आहे. रुम सोडला आहे. फक्त पिल्लर तोडुन आले आहेत.

श्री. पानपट्टे (उपायुक्त, अ. बां. वि ):- पूर्ण बिम तोडुन आलो आहोत साहेब... ....

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- रुम सोडुन दिला आहे तुम्ही, इथून चला मग मी तुम्हाला दाखवितो.

श्री. पानपट्टे (उपायुक्त, अ. बां. वि ):- बरं मी बघतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- साहेब तुम्ही आदेश दया, ते तोडायचे.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकूरः- पानपट्टे साहेब, तुम्ही जे बांधकाम आज तोडले, ते आज तोडायचे कारण काय? महासभा आहे म्हणून? सहा महिन्यापासून हे नाटक चालु आहे, तुम्ही जर नाही सांभाळू शकत तर पदभार सोडा. हे काय नाटक चालवले आहे. दर महिन्याला हेच नाटक. आज होईल ,उदया होईल, हे नाही ते नाही.

श्री. पानपट्टे (उपायुक्त, अ. बां. वि ):- साहेब ते आताच चार दिवसापूर्वी बनविले आहे.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :- आता महाराज जे म्हणत आहेत.....

श्री. पानपट्टे (उपायुक्त, अ. बां. वि ):- नाल्याशी त्याचा काहीच संबध नाही.

--४--

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :- आता महाराजी बोलले मी पाहून आलो की तिथली रुम नाही तोडली आहे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त, अ. बां. वि ):- ते साहेबांना माहित आहे चार दिवसापूर्वी तक्रार दिली होती मी तोडुन आलो हे त्यांना चांगले माहित आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- रुम नाही तोडले आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकूर :- मग फायदा काय, आताच माणसे पाठवा.

श्री. पानपट्टे (उपायुक्त, अ. बां. वि ):- आधी मी वेरिफाय करतो, किती तोडले आहे ते बघतो.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः- जर रुम नाही तोडली तर पुढच्या महासभेत तुम्हाला बसू देणार नाही.

मा. पिठासीन अधिकारी श्री. किशोर बनवारीः- आता श्री. पानपट्टे साहेबांनी जो रिपोर्ट दिला की, तिथे बांधकाम तोडले आहे, त्या नंतर विरोधी पक्ष नेत्त्यांनी म्हटले की, ते बरोबर तोडले नाही आहे. मी पानपट्टे साहेबांना सांगतो की, त्यांनी ते सांयकाळी जाऊन पहावे, बरोबर तोडले नसेल तर ते तोडावे व समस्या सोडवावी. यानंतर मा. महापौरांची तब्येत खूप खराब आहे. मा. उपमहापौर पण उपस्थित नाहीत, तर आजची सभा स्थगित करुन दुस-या तारखेस ठेवावी. सभेचे जसे मत ठरेल तसे करु.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :- आमचा असा सुझाव आहे की, १२ तारखेला सभा ठेवण्यात यावी.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- चार-चार महिन्यापासून प्रश्न पडुन आहेत कधी पूर्ण होणार?

मा. पिठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी:-ठिक आहे, दि.१२.१२.२००१ रोजी ४.०० वाजेपर्यंत सर्वानुमते सभा स्थगित करण्यात येत आहे.

मा. सचिव :- कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४. ४५ वाजता हि सभा दि. १२.१२.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजे पर्यंत स्थगित करित असल्याचे मा.पिठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

प्रश्न क्र.६०९ :- हा श्रीमती. यशस्विनी नाईक यांचा असुन तो वगळण्यांत आला असल्याने त्याची इतिवृतात नोंद घेता येत नाही.

प्रश्न क्र. ६१६ :- उल्हासनगर महानगरपालिकेने जे शहराच्या ३३ रस्त्याचे रुंदीकरण घेतले आहे. आता पर्यंत किती रस्त्याचे काम पूर्ण झाले व किती रस्त्याचे काम अपूर्ण आहे व ज्या ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण केले नाही असे किती ठेकेदार आहेत त्यांची नावे महासभेत प्रसिध्द करावीत व ज्या ठेकेदारांनी मुदतीत काम पूर्ण केलेले नाही अशा ठेकेदारांना किती पॅनल्टी देणार त्याचे नाव काळया यादीत टाकून त्यांना पूढे महापालिकेचे ठेके अजिबात देवू नये, दोन महिन्यापूर्वी मी महासभेत प्रश्न विचारला होता की, ३३ रोडचे काम कधी पूर्ण होणार तर शहर अभियंता यांनी उत्तर दिले होते की, ३१ में, २००१पर्यंत पूर्ण होणार आता में गेला, जुन गेला जूलै जाता आहे. तर शहर अभियंत्याला काय शासन करणार?

उत्तरः-एकंदर ३३ रस्त्यांची खालील प्रमाणे सद्यस्थिती नमुद करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) पूर्ण झालेली कामे | ८ |
| २) काही किरकोळ कामे वगळता बाकी झालेले काम | ८ |
| ३)निष्कासना अभावी प्रलंबित असलेली कामे | ५ |
| ४) प्रगती पथावर असलेली कामे | १० |
| ५) धोरणात्मक निर्णया अभावी प्रलंबित कामे | २ |

महानगरपालिकेचे आर्थिक स्थितीमुळे कामाच्या प्रगतीपथावर परिणाम झाला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीमुळे संबंधित ठेकेदाराला

कामाचे बिल अदा करणे कठिण होत आहे. सद्य स्थितीतील कामामध्ये त्रुटी दिसुन येत नसल्याने शहर अभियंत्याने सभागृहाची दिशाभुल केली हे म्हणणे योग्य वाटत नाही.

प्रश्न क्र. ६१८ :- उल्हासनगर महानगरपालिकेत गार्डन अधिक्षेकची जागा ामहे का? जर असेल तर ती गेल्या दोन वर्षापासुन का भरली जात नाही व नसेल तर उल्हासनगर महानगरपालिकेच्या कक्षेत असणारी गार्डन कोनमेंटन (देखरेख) करतो. माझा वार्ड क्र. ३१ आहे व मी माझ्या नगरसेवक निधीतुन दोन गार्डन बनविले व तीसरा बनविण्याचा विचार आहे. परंतु सन २००० साली मी दोन गार्डन बनविले त्याचे सुशोभिकरण म्हणजे माती टाकणे, गवत लावणे व झाडे लावणे ही झालेली नाही. व आता २००१सालाचा पावसाळा सुरू झाला आहे. तरी ती गार्डन बनविण्याकडे लक्ष नाही. मी दोन वेळा लेखी पत्र देऊन जर करत नसतील तर शहरात गार्डन असावे की नसावे व गार्डनचा चार्ज कोणाकडे आहे त्याचा खुलासा व्हावा.

उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिकेत उद्यान अधिक्षक असे एक पद मंजुर असून सदर पदावर कार्यरत असलेले उद्यान अधिक्षक श्री. अमृतलाल नरसिंघानी यांना दि. १५ ऑक्टोबर ९९ पासुन उल्हासनगर महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ केलेले आहे.तेव्हापासुन सदरचे पद रिक्त असल्याने सदर पदावर योग्य उमेदवाराची नियुक्ती होणे कामी कार्यवाही चालु आहे. दरम्यान उल्हासनगर महानगरपालिकेतील उद्याने व बगीचे यांची देखभाल शहर अभियंता त्यांच्या अधिपत्त्याखालील कनिष्ठ अभियता व इतर कर्मचा-यांकडून देखरेखीचे काम करीत आहे. वार्ड नं. ३१ मधील विकास कामाबाबत सन्माननिय सदस्यांनी जी लेखी स्वरूपात दोन पत्र दिले आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या तिस-या पत्राप्रमाणे देखिल कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे.

प्रश्न क्र. ६१८ :- १) डॉ. लांजेवार यांनी आरोग्य विभागाचा कार्यभार घेतल्यानंतर महापालिकेने बांधलेले शौचालय किती तोडण्यात आले यांची प्रभागावर माहिती देण्यात यावी.
२)तोडलेल्या शौचालयाची मोकळी असलेली जागा कोणत्त्या कामासाठी उपयोगात आणली? याची प्रभागवार माहिती देण्यात यावी.
३)तोडण्यात आलेले शौचालय कोणत्त्या विभागातर्फे तोडण्यात आले व त्यावर महापालिकेची मालकीची जागा आहे असे फलक लावण्यात आले किंवा नाही? तसेच किती जागेवर फलक लावण्यात आले.

उत्तर :-१)आरोग्य विभाग महानगरपालिकेव्दारे मा. नगरसेवक व नागरिकांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे मोडकळीस आलेले व सार्वजनिक आरोगयास धोका उत्त्पन्न होणारे शौचालय संपुर्ण चौकशी करून त्या भागातील रहिवाश्यांचे तोडण्याकरीता ना हरकतीबाबत विचारपूस करून पंचनामा करून मा. आयुक्तांची मंजुरी घेऊन नंतर तोडण्यात आले. हे शौचालय माहे मे,२००० पासुन तोडण्यात आलेले आहे.एकुण ८८ तोडण्यात आलेले शौचालये.
२)तोडलेल्या शौचालयांच्या मोकळया जागेत काही ठिकाणी सी. सी. पॅसेज बांधण्यात आलेले आहे व काही ठिकाणी जागा रिकामी आहे.
३)ही शौचालये आरोग्य विभागाचे कर्मचारी व काही वेळेस सार्वजनिक बांधकाम विभागाची मदत घेऊन तोडण्यात आले, अनोळखी इसमानी अपुर्ण अवस्थेत तोडलेल्या दोन ठिकाणी फलक लावण्यात आलेला आहे.
(सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यात दिलेली आहे)

प्रश्न क्र. ६१९ :- १) इन हुज नेमस द बिल्डींग प्लान्स अप थ्री रत्न गार्डन बिल्डींग निअर साई कुंज अपार्टमेंट ॲन्ड एव्हर ग्रीन लॉन्स आर सेंक्शन्ड?

२)प्लीज स्पेसिफाय द नेमस ऑफ परसन्स ग्रॅन्टेड बिल्डींग परमिशन?

उत्तर :- १)स्मीत सुनिता राजवानी युएमसी टीपीडी.बीपी ५६ ९४/७१७ डेटेड. ऑन २०३.९५
२)स्मीथ सुनिता राजवानी युएमसी टीपीडी.बीपी ५७ ९४/७१८ डेटेड. ऑन २०.३.९५
३)पुनम राजवानी युएमसी टीपीडी.बीपी ५९ ९४/७१९ डेटेड. ऑन २०३.९५
बी) ॲज ॲबव.

प्रश्न क्र. ६२० :-ऐ)वेदर द पॉवरस टू ग्रेट बिल्डींग परमिशन इज डेलिगेटेड टू द टाऊन प्लानर. इफ यस, देन सिन्स वेन?
बी)वेदर द टाऊन प्लार केन एक्सरसाईज द पॉवरस ऑफ प्लानिंग ॲथोरिटी वीथ द रेफरन्स टू सेक्शन १५२ ऑफ एम.आर.टी.पी. ॲक्ट फॉर ग्रॅन्ट ऑफ बिल्डींग परमिशन?
सी) वेदर द टाऊन प्लाानर ग्रॅन्ट बिल्डींग परमिशन डायरेक्टली इन ऑल केसेस ऑर इन सिलेक्टेड केसेस?
डी)वीच आर द एक्सेप्टेशनस ॲन्ड रिस्ट्रक्शन फॉर टाऊन प्लानर इन ग्रॅन्ट ऑफ बिल्डींग परमिशन?
इ)इन वीच केसेस ही कुड डायरेक्टली गॅन्ट द बिल्डींग परमिशन?
एफ)इन वीच केसेस ही कुड नॉट गॅन्ट द बिल्डींग परिमिशन वीथआऊट द ॲप्रुव्हल ऑफ कमिशनर?
जी)हाऊ मेनी बिल्डींग परमिशनस हॅव बीन ग्रॅन्टेड ड्युरींग द टेन्युट ऑफ प्रेझेन्ट टाऊन प्लानर वीथआऊट द ॲप्रुव्हल ऑफ कमिशनर?
एच)हाऊ मेनी बिल्डींग परमिशन हॅव बीन डायरेक्टली गॅन्टेड बाय द प्रेझेंन्ट टाऊन प्लानर, वॉट आर दे?

उत्तरः-ठराव क्र. ३ दि. २२.१०.१९९६ अन्वये एम. आर. टी.पी. एस. १९९६ चे कलम १५२ अन्वये १५०० चौ. मी च्या आत बांधकाम परवानगी नगरचनाकार हे मंजुरी देवू शकतात असे आदेश पारीत केले आहेत.
बी)वरील प्रमाणे.
सी.)वरील प्रमाणे.
डी)मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाने तयार कलेले बांधकाम नियंत्रण नियमावलीतील अधिनियम व अटीनप्रमाणे मंजूरी देणे ब्रंधनकारक आहे.
ई)१५०० चौ. मी. च्या आंत सादर केलेले बांधकाम परवानगी प्रकरणे मंजूरी देण्यांचा अधिकार नगररचनाकार यांचेकडे आहे.
फ) १५०० चौ. मी. पेक्षा जास्त जागेचे बांधकाम परवानगी प्रकरणांना मंजुरी देण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचे अखत्यारीत आहेत असे प्रकरणांना नगररचनाकार मंजूर करू शकत नाहीत.
जी)एकूण ४५० प्रकरण बांधकाम परवानगी मंजूरी दिलेली आहे. ५२५ प्रकरण मा. आयुक्त यांचे परवानगी शिवाय आणि १५ प्रकरण मा. आयुक्त यांची परवानगी घेतली आहे.
एच)वरील प्रमाणे.

प्रश्न क्र. ६२१ :-अ)उल्हासनगर मध्ये सर्व ठिकाणी सुधारीत आराखड्याप्रमाणे शहरातील रस्ते व चौक केले आहेत. त्याप्रमाणे उल्हासनगर कॅम्प-३ मध्ये शिवाजी चौक ते प्रेस बाजार कडे जाणारा मार्ग आराखड्यामध्ये किती फुट आहे. व सद्या अस्तित्त्वात किती फुट आहे. व सद्या अस्तित्त्वात किती आहे. तो नव्याने का बनविला जात नाही. याबाबत महासभेत खुलासा व्हावा.
ब)श्री. मिलिंद सोनावणे नगररचनाकार म्हणून महानगरपालिकेत कधी आहे त्यांच्या कारर्कीर्दीत आजपर्यंत किती बांधकाम परवाने मंजुर केले याची लेखी माहिती मिळावी.

उत्तर :- उल्हासनगर कॅम्प नं. ३ मध्ये शिवाजी चौक ते प्रेस बाजारकडे जाणारा रस्ता सुधारीत आराखडयामध्ये ४५ फुट आहे. व सद्या अस्तित्त्वात ४५ फुट आहे. रस्ता बनविण्याबाबतची बाब शहर अभियंता यांच्या अखत्त्यारित आहे.
ब) श्री. मिलिंद सोनावणे नगररचनाकार म्हणुन महानगरपालिकेत दि. २४.६.९९ रोजी कार्यभार घेतले त्यांची कालावधीत आजपर्यंत ५४० बांधकाम प्रकरण मंजूर केले होते.

प्रश्न क्र. ६२२:-१)कु.शर्मिला सी.तोलानी मेंन्टली रिटायर्ड सिटीझन ऑफ उल्हासनगर हॅज रिक्वेस्टेड द कॉरपोरेशन वे बॅक इन द यीअर १९९९ फॉर ॲलोटमेंट ऑफ स्पेस फॉर इरेक्शन ऑफ टेंम्परारी टेलिफोन बुथ.

दो द रिक्वेस्ट ऑफ मेनी ऑदरस हु हॅव अप्लीड आफ्टर द ॲबव मेंन्शनड मेंन्टली रिटायर्ड गर्ल हॅव बीन कंन्सीडर, हर ॲप्लीकेशन इज पेंन्डींग.

टाऊन प्लानर शॅल रिप्लाय ॲज टू वेन धिस केस वील बी कंन्सीडरड.

उत्तरः-कुमारी शर्मीला सी. तोलानी यांच्या पी.सी.ओ. करीता अर्ज दि. २२.२.२००० रोजी मा. आयुक्त यांच्याकडे मान्यता करिता पाठविले होते मा. आयुक्त यांनी रस्ते रूंदीकरण झाल्यानंतर पूर्न सादर करावे असे आदेश दिले होते.

दि. २२.७.२००१ रोजी पुर्न अर्ज केले आहे. मागणी केलेली जागा सुधारीत विकास योजनेत विद्यमान गार्डन असे दर्शाविण्यात आले आहे. गार्डनमध्ये वाणिज्य वापर अनुज्ञेय नाही पर्यायी जागा सुचविल्यास पूढील कार्यवाही करण्यात येईल.

प्रश्न क्र. ६२३:- मा. लोकआयुक्त, मुंबई यांचेकडुन अनाधिकृत बांधकामाबाबतची प्रकरणे किती आलेली आहेत त्याच प्रमाणे किती अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यात आलेली आहे? व किती बांधकामे तोडुन टाकावीत असे आदेश दिलेले आहेत?

उत्तर :- मा. लोकआयुक्त यांचे कडुन २०००-२००१ या चालू वर्षात एकूण १६ प्रकरणे अनाधिकृत बांधकाम विभागासंदर्भात प्राप्त झालेली आहेत. त्यापैकी ३ अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यात आली. तथापि कोणत्त्याही बांधकामामध्ये निष्काशन करण्याचे आदेश मा. लोकआयुक्त मुंबई यांचेकडुन प्राप्त झालेले नाहीत.

प्रश्न क्र. ६२४:-उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे सुलभ शौचालये बांधकामास किती मंजूरी देण्यात आलेली आहे? व कधी पासून मंजूर करण्यात आलेले आहेत व सदरची सुलभ शौचालये कधी बांधण्यात येणार आहेत?

उत्तरः-सेवानिवृत्त आयुक्त मा. श्री. सुकतनकर व मा. श्री. तिनईकर यांची उल्हासनगर शहरातील सफाई बाबत मार्गदर्शन सुचना देण्याबाबत आदेश दिलेले होते. त्यानुसार त्यांनी सफाई बाबतच्या अनेक सुचना दर्शविल्या होत्त्या त्यात त्यांनी शहरात सुलभ शौचालय बांधणी करावी अशी सुचना देण्यात आलेली होती.

त्यानुसार उल्हासनगर पालिकेने माहे जुन-१९९९ मध्ये शहरात खालील ८ ठिकाणची निवड करून मे. सुलभ इंटरनेशनल सोशियल सर्विस आर्गनायझेशन चेंबुर मुंबई यांचेशी चर्चा करून सुलभ शाचालये बांधणीचा प्रस्ताव तयार केला होता. त्यांनी दि. २१.६.९९ रोजी खालील प्रमाणे खर्चाचा अंदाजपत्रक दिलेले होते. त्यानसुार त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ४८ दि. ८.७.९९ अन्वये प्रशासकीय व वित्तिय मंजुरीही दिली होती त्यानंतर दि. ६.९.९९ रोजी मेसर्स. सुलभ इंटरनॅशनल सोशियल सर्विस ऑर्गनायजेशन यांनी सुधारीत अंदाजपत्रक दिलेल होते.

| अ.क्र. | सुलभ शौचालय बांधणेचे ठिकाण | एकुण शिटस | प्रथम दिलेले अंदाजपत्रक | सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर रेल्वेस्टेशन उल्हासनगर-३ | ०६ | ६,८०,०००/- | १२,२०,८४६/- |
| २. | बसस्टॉप जुनेपोस्ट ऑफिस उल्हासनगर-३ | १६ | ५,९४,०००/- | १५,२१,८७१/- |
| ३. | गोलमैदान गार्डन राजीव अपार्टमेंट | १६ | ५,९४,०००/- | १५,२१,८७१/- |
| ४. | जकातनाका क्रमांक.९ उल्हासनगर-५ | १६ | ५,९४,०००/- | १५,२१,८७१/- |
| ५. | जुने प्रभात सिनेमाजवळ फायर ब्रिगेट जवळ उल्हासनगर-५ | ०५ | ५,४०,०००/- | १०,४०,२०७/- |
| ६. | विठ्ठलवाडी रेल्वेस्टेशन उल्हासनगर-३ | ०५ | ५,९४,०००/- | १०,४०,२०७/- |
| ७. | सपना गार्डन, भारतीय हिंदी स्कुलजवळ | ०५ | ५,९४,०००/- | १०,४०,२०७/- |
| ८. | शहाड रेल्वे ओव्हरब्रिज खाली | ०६ | ६,००,०००/- | ०९,३८,२७२/- |

मे.सुलभ इंटरनॅशनल सोशियल सर्विसेस ऑर्गनायझेशन यांनी प्रथम सादर केलेल्या अंदाजपत्रकातील खर्चाचे रक्कमेत व सुधारीत अंदाजपत्रकात ५६टक्के ते २५६ टक्के वाढ दर्शाविल्यामुळे सदरचा सुलभ शौचालय बांधणीचा प्रस्ताव कार्यान्वित होऊ शकला नाही.

प्रश्न क्र. ६२५:- रस्ता रूंदीकरणात ज्यांची दुकाने, झोपडे, व घरे तोडली गेलेली आहेत अशा लोकांना किती मजले बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे का? सदरचे बांधकाम करण्यास परवानगी का मिळत नाही?

उत्तरः- रस्ता रूंदीकरणामध्ये ज्याचे दुकान किंवा घर पुर्णतः बाधीत झालेली असल्यास संबंधीताकडील कागदपत्राची तपासणी करून त्यांना पर्यायी जागा देण्याचे महापालिकेचे धोरण आहे. तसेच ज्यांची घरे किंवा दुकाने अंशतः बाधीत होतात, त्यांनी जागेच्या मालकीचे कागदपत्र सादर केल्यास बांधकाम परवाना नगररचना विभागाकडुन नियमानुसार देण्यात येते. तथापि जागेच्या मालकाचे कागदपत्रा अभावी अशी परवानगी महापालिकेला देणे शक्य होत नाही.अशा लोकांना त्यांनी रस्ता रूंदीकरणामध्ये स्वतःची बांधकामे तोडुन रस्ता रूंदीकरणाचे मोहिमेस सहकार्य केल्यामुळे मानवतावादी दृष्टीकोनातुन त्यांना बाधीत झालेला भाग उर्वरीत जागेवर दुरूस्तीकरून घेण्याचे धोरण महापालिकेच्या सर्वसाधारण बैठकीतील चर्चेमध्ये ठरविण्यात आले आहे.

प्रश्न क्र. ६२६:- पावसाळा सुरू होऊन तीन महिने होऊन गेले परंतु अदयाप पर्यंत रस्ते बनविण्यात आलेले नाही किंवा बागेमध्ये झाडे लावण्यात आलेली नाही तर रस्ते दुरूस्ती किंवा बागेमध्ये झाडे केव्हा लावण्यात येतील? तसेच रस्त्याच्या कडेला झाडे कधी लावणार?

उत्तर :-महानगरपालिकेतील एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत रस्त्याचे बहुतांश काम पुर्ण करण्यांत आले आहे. सिमेंट कॉक्रिटीकरण रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. धोरणात्मक निर्णया अभावी दोन रस्त्याचे काम सुरू करण्यांत आले नाही.

कल्याण अंबरनाथ रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण करणे.

आझाद सोप ते खेमाणी रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण करणे.
२)महापालिकेने खरेदी केलेली झाडे विविध उद्यानांमध्ये आवश्यकतेनुसार लावण्यात आलेली आहेत.
३)महानगरपालिकेतील बरेच रस्त्यांची दुरूस्ती करण्यात आली आहे.
४)बागेमध्ये झाडे लावण्याचे काम ७५ टक्के पुर्ण झालेले आहे. उर्वरित झाडे लावण्याचे काम प्रगतीपथावर आहेत.
५)रस्त्याच्या कडेला झाडे लावण्याचे अंदाजपत्रक तयार केले होते. परंतु सर्व तपशिल वर्गवारी नसल्याने अंदाज पत्रकाम सुधारणा खामे क्रमप्राप्त झाले. त्यामध्ये अवधि गेल्याने व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती गंभिर असल्याने रस्त्याची कामे पूर्ण केल्यानंतरच पुढील वर्षी प्रायोजक नेमुन ही कामे पुर्ण करण्याचा इरादा आहे.

प्रश्न क्र. ६१७:-शासनाकडुन सुवर्ण जयंती योजने अंतर्गत दुस-या टप्याचे ४४ लाख रूपये आलेले आहेत. त्यांचा विनियोग कधी व केव्हा पासुन सुरू होणार आहे?

उत्तर :-दुस-या टप्यासाठी जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडुन एकूण रू. ४३.३३ लाख प्राप्त झाले आहेत. त्यापैकी रू. ३३.३३ लाख नागरी कामासाठी व रू. १० लाख स्वयं रोजगारासाठी आहेत. त्यासाठी नगर अभियंता यांना उमपा/साप्रवि/आस्था/सुजयो/१८, दिनांक ३.८.२००१ अन्वये कामे तातडीने सुरू करण्यासाठी आदेश देण्यात आलेले आहेत.

वरील कार्यालयिन आदेशान्वये निधीचा विनियोग सुरू करणे व नागरी विकास कामे सुरू करणेची कार्यवाही शहर अभियंता यांचेकडुन केली जाणार आहे.
तसेच स्वयंरोजगार योजनेअंतर्गत कामांचीही सुरूवात लवकरच करणेत येणार आहे.

प्रश्न क्र. ६१८:- महापालिका शाळा क्र. ८ (सीट नं.७७) साठी आरक्षित असलेल्या भुखंडावर ज्यांचे पुनवर्सन केले गेले आहे त्यांचे कोणत्त्या ठिकाणच्या रस्ता रूंदीकरणामध्ये घर, दुकान, किंवा कारखाना गेलेला आहे यावर सविस्तर चर्चा महासभेत घडुन यावी.

उत्तर :- उल्हासनगर शहराच्या मंजुर/सुधारीत विकास योजनेत सदरचा भाग सार्वजनिक व निम्न सार्वजनिक वापरासाठी दर्शविला आहे. सध्या तेथे शैक्षणिक वापरासाठी महापालिकेची शाळा क्र. ८ चालू आहे.
सदर शाळेच्या परिसरातील जागा रस्तारूंदी करण्यामध्ये बाधीत झालेलया व्यक्तिंना देण्यात आलेली आहेत. त्याचा तपशिल सोबतच्या यादी जोडला आहे.

प्रश्न क्र. ६१९:-१)प्रभाग क्रमांक ६० मध्ये कोणत्त्या तारखेपासुन पाण्याचे टॅकर सुरू केलेले आहे?
२)प्रभाग क्र. ६० मध्ये आजपर्यंत किती टॅकर गेले व दररोज किती टॅकर पाणी दिले जाते?
३)ज्या ज्या इमारती मध्ये टॅकर जातात त्या इमारतीचे नावं.
४)पाण्याचे टॅकर केव्हा पर्यंत देण्यात येणार?
तरी दिनांक २०.८.२००१ मध्ये होणा-या महासभेत उपरोक्त प्रश्न प्रश्नोत्त्तरच घेण्यात यावे हि विनंती.

उत्तरः-१)प्रभाग ६०मध्ये नियमीतपणे आहे सप्टेंबर १९९९ पासुन टॅकरने पाणी पुरवठा सुरू केलेली आहे.
२)प्रभाग ६० मध्ये आजपर्यंत (जुलै २००१) सुमारे १०,९१० टॅकर पाणी पुरविण्यात आलेले आहे व दररोज १८-१९ टॅकर्स दिले जातात.

३)आज मितीला टॅकरने पाणी पुरवठा खालील इमारतींना केला जात आहे. शालीमार, साईलिला, सिमा, डेमानी, अमन, जीवन ज्योती, सोनेसर जीवन साई विलायतराय पुनम, साईकूंज मधुसूदन विनायक पुष्पकली, अ, भावना, आशीष, हेटचंदानी, मामा ग्रीन पार्क, स्नो व्हाईट, लिला शहा, साइ नाथ, हरीओम, जय साईबाबा, शारदा, गुडू पेसु इत्यादी.
४)उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था अत्यंत जुनी आहे त्यामुळे शहरात समप्रमाणात पाणी पुरवठा होऊ शकत नाही. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण तर्फे सुधारीत पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेचे काम डिसेंबर २००१ पर्यंत पुर्ण होईल त्यानंतर टॅकरचा पाणी पुरवठा बंद करण्यात येईल.

प्रश्न क्र. ६३२:-भुखंड क्र. १९२ यु. नं. ७३ ते ८५ व १०४ सीट नं. २६, उल्हासनगर-३ येथिल श्री. शामलाल जीवतराम यांस दिनांक १२.१०. ९६ रोजी कोणत्या आधारावर बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आली.

उत्तरः-नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १९५ चा तरतुदीस अधिन राहुन धोकादायक इमारतीस आवश्यकता दुरूस्त करण्याबाबत म्हणुन सदर बांधकाम करण्यास तत्त्कालीन नगरपालिकेचे मुख्याधिकारी हयांनी पत्रांक्रमांकाटीपीडीजीईएन/२४१/९६, दिनांक. २२.१०.९६ रोजी धोकादायक इमारतीची (तळमजला अधिक पहिला मजला)अशी दुरूस्ती करण्या बाबतची परवानगी दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसुन येते.

प्रश्न क्र६३३:-भुखंड क्र. १९२ यु. नं.७३ ते ८५ व १०४ सीट नं. २६, उल्हासनगर-३ येथील दिनांक १६.६.९८ रोजी मिनल पेडणेकर, कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी सरकारी लष्करासाठी राखीव भुखंड चोरी बाबत चौकशी करून त्यावर कडक कार्यवाही करण्याचा आदेश दिला होता का?

उत्तरः- होय.

प्रश्न क्र६३४:-भुखंड क्र.१९२, यु.नं.७३ ते ८५ व १०४ सीट नं. २६, उल्हासनगर -३ येथील दि. १४.८.९८ रोजी बिट मुकादमाने बांधकाम सुरू आहे असा अहवाल सादर केला होता का? बिट मुकादमाने २४ तासाची नोटीस चिकटवुन पंचनामा केला होता का?

उत्तरः- होय.

प्रश्न क्र. ६३५:-भुखंड क्र. १९२, यु. नं.७३ ते ८५ व १०४ सीट नं.२६, उल्हासनगर-३ येथिल दि. २९.९.९८ रोजी बांधकाम तोडण्याचा आदेश दिला होता का?

उत्तरः-दिनांक २९.९.९८ रोजी बांधकाम तोडण्याचा आदेश उपलब्ध संचिकेत दिसुन येत नाही.

प्रश्न क्र. ६३६:-भुखंड क्र. १९२ यु.नं.७३ ते ८५ व १०४ सीट नं. २६, उल्हासनगर-३ येथील दि. ३०.९.९८ रोजी होत असलेले बांधकाम सोडण्यासाठी सेंट्रल पोलिस स्टेशन कडून पुरेसा पोलिस बंदोबस्त मागितला होता का?

उत्तरः-होय.

प्रश्न क्र. ६३७:-वेदर पी.डब्लु.डी. हॅव इंडेन्टीफाइड द एम.एस.ई.बी. पोल्स ॲन्ड ट्रान्सफार्मरस ऑबस्ट्रक्टीग द स्मुथ फ्लोव्ह ऑफ ट्राफिक ॲन्ड हॅव इनफॉर्मड द एम.एस.ई.बी.? इफ यस, पलीज सप्लाय द लिस्ट.

उत्तर :- यस, इंडेन्टीफाइड डयुरींग इन्स्पेक्शन वीथ एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर (इलेक्ट्रीकल)यु.एम.सी ॲन्ड एम.एस.ई.बी. स्टाफ. लिस्ट ऑफ पोल्स ॲन्ड ट्रान्सफार्मरस इज प्रीपेअर्ड बाय एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर (इलेक्ट्री.)यु. एम.सी. (कॉपी एन्क्लोजड)

प्रश्न क्र. ६३८:-वेदर पब्लीक वर्कस डिपार्टमेंटस हॅज एअरमार्कड् द साईट व्हेअर ऑबस्ट्रक्टींग एम.एस.ई.बी. पोल्स आर टू बी रिलोकेटेड?

उत्तर :-यस, एअरमार्कड द साईट डयूरींग जॉइंट इन्स्पेक्शन वीथ एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर(इलेक्ट्रीकल)यु.एम.सी ॲन्ड एम.एस.ई.बी. स्टाफ. लिस्ट ऑफ पोल्स ॲन्ड ट्रान्सफार्मरस इज प्रीपेअर्ड बाय एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर (इलेक्ट्री.)यु.एम.सी. (कॉपी एन्क्लोजड).

प्रश्न क्र. ६३९:-वेदर टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट हॅज एअरमार्कड द अल्टरनेट साईट वेअर ऑब्स्ट्रकींग हयुज ट्रान्सफार्मरस आर टू बी रिलोकेटेड?

उत्तरः-नो स्पेसिफीक साईट इज रिझर्व्हड फॉर रिलोकेशन ऑफ ट्रान्सफार्मर वीच आर ॲफेक्टेड बाय रोड वेंन्डींग लाईन, ॲनी ट्रान्सफार्मर ऑबस्ट्रकींग द रोड इज शिफटेड टू द ॲव्हीलेबल साईट आफ्अर लिव्हींग द प्रपोझड रोड विडथ ऑन रिक्वेस्ट ऑफ एम.एस.ई.बी.

प्रश्न क्र. ६४०:- व्हॉट करस्पोंन्डस लाईट सेक्शन हॅज इंनीटाएड वीथ एम. एस.ई.बी. इन द मॅटर?

उत्तरः- इमीडीएटली आफ्टर आईडेंन्टीफायींग द पोल्स ॲन्ड ट्रान्सफार्मरस ऑबस्ट्रक्टींग द वेहिकलर ट्राफिक वेरी फस्ट करस्पॉन्डस वॉज इनटीगेटेड वीथ एम.एस.इ.बी. इन द मन्थ ऑफ जानेवारी २००० ऑन द बेसिस ऑफ एम.एस.ई.बी. नोरर्मस प्रीवेलीग ॲट दॅट टाईम दॅट इज एम.एस.ई.बी. वॉज रिक्वायर्ड टू अंडरटेक द वर्क ऑन ५०:५० कॉस्ट शेअरीग बेसिस. बीफोर द थीगस् कुल्ड बी फायनलाईज्ड लाकर ऑथराईज्ड ऑफ एम.एस.ई.बी. रिसिर्व्हडद सक्युलर फॉम देअर हायअर अप्स फॉर रिकव्हरींग १०० परसेंट कॉस्ट फॉम लोकल बॉडीज इनटेंन्डींग टू शिफ्ट पोल्स ॲन्ड ट्रान्सफार्मरस. देअरआफ्टर ॲडमिनिस्टेशन हॅज होल्ड नंबर ऑफ मिटिंग वीथ एम.एस.इ.बीज वेरीअस ऑफीशिअर ॲन्ड हॅव रिक्वेस्टेड देम टू अंडरटेक द जॉब ऑन ५०:५० शेअरींग बेसिस, ऑन द प्रटेक्स्ट दॅट द सेड नॉर्मस वेअर प्रीव्हलींग वेन द प्रपोझल वॉज सबमिटेड. इव्हन द हॉन. मेअर हॅज ऑलसो सबमिटेड मेमोरेंडम टू द एनर्जी मिनिस्टर, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र इन दिस रिगार्डस. द एम.एस.ई.बी. इजहाऊएव्हर एट टू फायनलाईज्ड द टर्मस. ॲज सच डयु टू डिले ऑन द पार्ट ऑफ एम.एस.ई.बी. द मॅटर इज पेंन्डींग.

प्रश्न क्र. ६४१:-वेन द जॉब वील बी कंम्प्लीटेड?

उत्तरः-द ॲडमिनिस्ट्रेशन इज कंन्स्टंटली इन टज वीथ एम.एस.ई.बी ऑथराईज्ड ॲन्ड पुटींग इटस सिंन्सीअर इफोर्ट्स टू गेट द वर्क डन ॲट अर्लीएस्ट हाऊएव्हर सिन्स वी आर सोलली डिपेंन्डंन्ट ऑन द एक्सर्टनल ॲजन्सी दॅट इज एम.एस.ई.बी. इट मे टेक सम टाईम.

प्रश्न क्र६४२:-उल्हासनगर महानगरपालिका हददीत खुले आम सडकी पदार्थ / भाजीपाला / शिळे कोंबडीचे मटण / बक-याचे मटन/ मच्छी वगैरे विकली जातात त्यावर महापालिका काय कारवाई करते का?केली असल्यास आता पर्यंत किती लोकांवर कारवाई केलेली आहे, वरील सडकी पदार्थ विकली जातात यांचेवर महापालिकेने देखरेख साठी डॉक्टरची नेमणुक केलेली आहे

काय? असली पदार्थ विकली जातात यावर शहरात रोगाची लागण झाल्यास कोण जबाबदार याचा खुलासा व्हावा?

उत्तर :-उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत सडका भाजीपाला, शिळे कोंबडीचे मटण, बक-याचे मटण, मच्छी विकतातना आढळुन आल्यास संबंधित विभागाचे आरोग्य निरिक्षक असे पदार्थी भाजीपाला इत्त्यादी जप्त करून नष्ट करतात किंवा तक्रारी आल्यास चौकशी करून कार्यवाही करण्यात येते.

याबाबतची अधिकार अन्न व औषध प्रशासन विभागाकडे आहे व अद्याप शासनाने महापालिकेकडे हस्तांतरण केलेले नाही. याबाबत अन्न परवान्याचे कामकाज उल्हासनगर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचा पत्रव्यवहार चालु आहे.

प्रश्न क्र. ६४३:-उल्हासनगरात झोपडपटटी / इमारतीजवळ बॅरेक जवळ म्हशीचे तबेले आहेत त्या तबेल्यात असणारी जनावरे यांची विष्टा व मलमुत्र गल्लीत, नालीत सोडले जाते त्यापासुन रोगराई होण्याची दाट शक्यता असते त्यांच्या मलमुत्रामुळे मोठ मोठी डास व घाण पावसामुळे दुर्गंधी या पासुन नागरिकांच्या जिवाला धोका सिन सुध्दा महापालिका काही करीत नाही याचे कारण काय तबेल्यापासुन तक्रारी एवढया प्रमाणात महापालिकेला देऊन सुध्दा महापालिका काही कारवाई कव करत नाही याचे कारण काय, महापालिका तबेल्यांना शहराबाहेर घालवत नसेल व शहरात रोगराई पसरली तर महापालिकेच्या अधिका-या बाबत काय विचार करावा लागेल याचा खुलासा व्हावा.

उत्तर :- महानगरपालिकेच्या हद्दीत एकुण १६० तबेले आहेत. हे सर्व तबेले नगरपालिका असल्यापासुन आहेत. हया सर्व तबेल्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या परवाना घेणे व नियम व अटीचे पालन करणे बाबत देखरेख करण्याबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे. त्याप्रमाणे नियमानुसार पुढची कार्यप्रणाली व रितसर कार्यवाही कार्यान्वित करण्यात येईल.

प्रश्न क्र. ६४४:-महापालिकेच्या वतीने शहराचे ३३ रस्त्यांचे काम सुरूवात होऊन बराच अवधी झाला परंतु आज मिती पर्यंत किती रस्त्याचे काम पूर्ण झाले व किती रस्त्यांचे काम अपूर्ण आहे. याचा खुलासा मागे महासभेत विचारल्यावर शहर अभियंता यांना सभागृहाला सांगितले की, ३१ मे,२००१ अखेर ३३ रस्त्याचे काम पूर्ण होणार परंतु आजमितीस ३३ रस्त्यांचे काम पूर्ण नाही, याला जबाबदार कोण?मागील महासभेत शांतीनगर ते साईबाबा मंदिर. २)डॉनाफिन क्लब रोड ३) एन्व्ही नारायण रोड याबाबत खुलासा विचारला होता त्याबाबत खुलासा विचारला होता त्याबाबत देखिल गुंतागुतीचे उत्तर दिले होते याचे कारण काय आता देखील हे रस्ते बनविणार किंवा नाही याचा खुलासा व्हावा तसेच शहराचे रस्ते बनविण्यासाठी हया ठेकेदारांना काम दिले होते त्यांनी काम पुर्ण मुदतीत का केले नाही याचे बाबत अशा ठेकेदारांचे नाव काळया यादीत टाकले आहे का?नसेल तर त्यांचे नाव काळया यादीत टाकावे व त्यांचे डिपॉझिट आहे ते दुरू नये याचा खुलासा व्हावा.

उत्तरः- एकंदर ३३ रस्तयांची खालील प्रमाणे सद्यस्थिती नमुद करण्यात येत आहे.

१)पुर्ण झालेली कामे ८
२)काही जुजबी कामे बाकी वगळता झालेले काम ८
३)निष्कासना अभावी प्रलंबित असलेली कामे ५
४)प्रगती पथावर असलेली कामे १०
५)धोरणात्मक निर्णया अभावी प्रलंबित कामे २

महानगरपालिकेचे आर्थिक स्थितीमुळे कामाच्या प्रगतीपथावर परिणाम झाला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीमुळे संबंधित ठेकेदाराला कामाचे बील अदा करणे कठीण होत आहे. उपरोक्त परिस्थितीत काम पुर्ण झालेले नाही याला कोणीही जबाबदार नाही. १)शांतीनगर ते साईबाबा मंदिर रस्ता २)डॉलफिन क्लब रोड ३)एन. व्ही. नारायण रोड याबाबत रस्ते रूंदीकरणाच्या सिमांकन अभावी महासभेचे धोरणात्मक निर्णय अभावी व निधी अभावी सदर रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले नाही.

सदर रस्त्याचे बाबतीत धोरणात्मक निर्णय सिमांकनाचे काम पुर्ण व निधी उपलब्ध झालेनंतर सदरचे काम हाती घेण्यात येईल. निधी उपलब्ध नसल्यामुळे ठेकेदाराचे बील अजुन अदा करण्यात आले नाही. त्यामुळे काम मुदतीत पुर्ण करू शकले नाही तसेच त्याचे नाव काळया यादीत टाकणे व डिपॉझिट न देण्याचा प्रश्न उदभवत नाही.

प्रश्न क्र. ६४५:-प्रकाश ऑटो, उल्हासनगर-३ च्या समोर चालु असलेले बांधकाम (जी - २) हे अनाधिकृत आहे का? त्याच्या प्लॅन पास आहे का? अनाधिकृत बांधकाम आहे का? अनाधिकृत असेल तर त्यावर महानगरपालिकेने काय काय कारवाई केली?

उत्तर :- प्रकाश ऑटो उल्हासनगर-३ च्या समोर चालु असलेले बांधकाम जी + १असे आहे. सदरच्या ठिकाणी पूर्वी रस्ता रुंदीकरणात जूने बांधकाम बाधीत झाले होते त्यास तत्कालीन प्रभारी उपायुक्त व तत्कालीन नगररचनाकार यांना तसे प्रमाणीत केले आहे.

प्रस्तावाच्या बाजुची मते :-

१. श्रीमती. कालानी ज्योती
२. दासानी मिनु
३. श्रीमती. लुंड लक्ष्मी
४. श्री. खेमाणी देवेंदसिंग
५. श्री. पमनानी ईश्वर
६. श्रीमती. टेकचंदानी चंदा
७. श्री. वाधवा गिरधारी
८. श्री. तलरेजा विनोद
९. श्री. रोहडा श्यामसुंदर
१० श्री गुप्ता प्रभुनाथ
११ श्रीमती. वनवारी मोना
१२ श्रीमती. कुंदनानी लविना
१३ श्री. रामरख्यानी मोहनदास
१४ श्री. वनवारी किशोर
१५ श्री. ढेणवाल बनवारी
१६ श्री. ठाकुर सेवलदास
१७ श्रीमती. वसिटा बेबी
१८. श्री. बेहरानी ठाकुर
१९. श्रीमती. साधवानी जया
२० श्री मनसुलकर सुभाष
२१ श्रीमती. वलेचा पदमा
२२ श्रीमती. गजवानी कांता
२३ श्री. केणी जयकुमार
२४ श्री. माखिजा हरदास
२५ श्री. उमाप रामदास

प्रस्तावाच्या विरोधातील मते :-

१. श्री. भुल्लर राजेंदसिंग
२. श्री. चौधरी गणेश
३. श्रीमती. सोनावणे यमुना
४. श्रीमती. वेलकर सुरेखा
५. श्री. बोडारे धनंजय
६. श्री. लांडे पांडुरंग
७. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
८. श्री. मोरे भिमसेन
९. श्री.चव्हाण रमेश
१० श्री. महाडिक प्रकाश

तटस्थ :-

१. श्री. रामभाऊ आढाव
२. श्री. बी.बी.मोरे
३. श्री. प्रमोद टाले

२६ श्रीमती. मटाई जोनिता
२७ श्रीमती. आशा जेसवानी
२८ श्रीमती. आशा राधवानी
२९ श्री. माखिजा प्रकाश
३० श्री. राजानी नरेंद्र
३१ श्री. भारती राजानी
३२ श्री. सोनावणे राजु
३३ श्री. पुरस्वानी जमनु
३४ श्री. पंजाबी नारायण
३५ श्री. आयलानी कुमार
३६ श्री. जाधव सुरेश
३७ श्रीमती. पवार पंचशिला
३८ श्रीमती. बगाडे सुनिता
३९. श्रीमती. करोतिया मालती

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१२/१२/२००१.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१२/१२/२००१ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९.११.२००१ रोजी दुपारी ३. ०० वाजता आयोजित केली होती. सदरची सभा पुढे ढकलून दिनांक २६.११.२००१ रोजी सायंकाळी ४. ००वाजता आयोजित करण्यात आली होती. ती सभा पुन्हा पूढे ढकलून दिनांक १२.१२.२००१ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखिजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्री. हरदास माखिजा
२)मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

३. श्री. भुल्लर राजेंद्र विरसिंह
४. श्री. चौधरी गणेश
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. ज्योती कालानी
७. श्री. ढेणवाल बनवारी
८. श्री. उमाप रामदास
९ श्रीमती. वेलकर सुरेखा
१०. श्री. सोनावणे राजु
११ श्रीमती. दासानी मिनु
१२ श्रीमती पवार पंचशिला
१३. श्री. टाले प्रमोद
१४ श्री. आढाव रामभाऊ
१५ श्रीमती. सुनिता बगाडे
१६ श्री. भांडे भगवान
१७ श्री. ठाकुर सेवलदास
१८ श्री.बनवारी किशोर
१९. श्री. तेजी कैलास
२० श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
२१. श्री. खेमाणी देवेंदसिंह
२२. श्री. पमनानी ईश्वर
२३ श्रीमती. वासिटा बेबी
२४ श्रीमती.मटाई जोनिता
२५. श्री. चौधरी राजेंद
२६ श्री. लांडे पांडुरंग
३५. श्री. प्रभुनाथ गुप्ता
३६. श्रीमती. करोतिया मालती
३७. श्री. ठाकुरदास बहरानी
३८. श्री. जाधव सुरेश
३९. श्री. मोरे भिमसेन
४०. श्री. चव्हाण रमेश
४१. श्री. महाडिक प्रकाश
४२. श्रीमती. साधवानी जया
४३. श्रीमती. बनवारी मोना
४४. श्रीमती. जेसवानी आशा
४५. श्री. राजानी नरेंद्र
४६. श्री. मनसुलकर सुभाष
४७. श्रीमती. नाईक यशस्विनी
४८. श्रीमती. राजानी भारती.
४९. श्रीमती.कुंदनानी लविना
५०. श्रीमती. बलेचा पदमा
५१. श्रीमती. गजवानी कांता
५२. श्रीमती. भठिजा इंदीरा
५३. श्री. केणी जयकुमार
५४. श्री. पंजाबी नारायण
५५. श्री. आयलानी कुमार
५६. श्री. अचनानी पम्मीकुमार
५७. श्रीमती. राधवानी आशा
५८. श्री. माखिजा प्रकाश

२७ श्रीमती.लक्ष्मीबाई ससाणे
२८ श्री. मोरे भानजी
२९. श्रीमती. टेकचंदानी चंदा
३०. श्री. पुरस्वानी जमनादास
३१. श्री. वाधवा गिरधारी
३२. श्री. पारवानी रामचंद
३३. श्री. तलरेजा विनोद
३४. श्री. रोहडा श्यामसुंदर

५९. श्री. रामरख्यानी मोहनदास
६०. श्री. बेहरानी गोप
६१. श्री. सचदेव गिरधारी
६२. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
६३. श्री. पंजाबी लाल



तर

१. वाघे शामु बाबु, २. श्रीमती.मोकल सीमा,३. श्री. यादव नरेश ४. रूपचंदानी भगवंती, ५ श्रीमती. सुनिता राजवानी, ६. श्री. वारिंगे पंढरीनाथ ७. भाटीया जयप्रकाश, ८ श्रीमती. वारिंगे पन्ना ९. श्री. जग्यासी राजु १० श्री. किशनानी गोदुमल ,११ श्री. केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे. प्रश्न क्र. ५९९हा श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मा. महापौरजी, प्रश्नोत्त्तराचा तास सुरू करण्यापुर्वी मी आपणांस विनंती करू इच्छितो की, प्रश्नोत्त्तराची वेळ एक तासाचीच ठेवली जावी.

<u>मा.महापौर :-</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव :-</u>श्री. बी.बी. मोरेजी, प्रश्न क्र. ५९९ हा आपला प्रलंबित प्रश्न आहे. यावेळी ४. ४५ झाले आहेत.

<u>प्रश्न क्र. ५९९</u> :-१) अ) प्र. क्र. ३१, शाळा क्र. १७ मध्ये शिक्षकांना बसणेसाठी खुर्च्या व टेबल नाही या शाळेतील मराठी शिक्षकांना टेबल नाही या शाळेतील मराठी शिक्षकांना टेबल व खुर्च्या का देत नाही व कधी पासुन याचा खुलासा व्हावा.
ब)उल्हासनगर शहरात किती मराठी शाळा महानगरपालिकेच्या आहेत. सिंधी व मराठी शाळांचीच दयनीय परिस्थिती का?व शाळेमध्यी रात्रीचा वॉचमन कव दिला जात नाही? मराठी शाळेत शिक्षकांची संख्या कमी का याचा खुलासा व्हावा.

<u>उत्त्तर :-</u>शाळा क्र. १७ मध्ये एकुण १५ खुर्च्या आहेत. चांगले टेबल ४ व नादुरूस्त टेबल ६ आहेत. शाळा सकाळ दुपार अधिवेशनात भरते. शिक्षण मंडळाने मराठी, सिंधी, हिंदी गुजराती शाळांना मागणी प्रमाणे खुर्च्या दिलेल्या आहेत. शिक्षण मंडळाने २०००-२००१ या वर्षी फर्निचरसाठी रूपये २५ लाखाची तरतुद केली आहे. तथापि यासाठी महापालिकेकडुन अद्याप निधी

मिळाला नसल्यामुळे फर्निचर खरेदीकरता आले नाही. निधी प्राप्त होताच फर्निचर खरेदी करून शाळांना पुरविले जाईल.
ब)उल्हासनगर शहरात एकूण ९ मराठी शाळा उल्हासनगर महानगरपालिकेच्या आहेत. मराठी शाळांची स्थिती दयनीय म्हणता येत नाही. सिंधी शाळांत स्थिती दयनीय म्हणता येत नाही. सिंधी शाळांत विद्यार्थी संख्या खुपच कमी झाल्याने वर्ग रिकामे आहेत. पालकांचा ओढा इंग्रजी माध्याच्या शाळांमध्ये आहे. वॉचमन-महापालिकेच्या शाळांमध्ये किमान १० सशस्त्र पहारेक-यांची आवश्यकता आहे. तथापि वॉचमन नेमण्याचे अधिकार शिक्षण मंडळाला नाही. पदे मंजुर नाहीत. मराठी माध्यमाच्या शाळांत ३० मराठी शिक्षकांची आवश्यकता आहे. तथापि सिंधी माध्यमात एकुण १३० शिक्षक अतिरिक्त सरप्लस असल्याने मराठी माध्यमाचे शिक्षक भरता येत नाही सोबत सविस्त टिपणी असे.

<u>मा. सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u>सन्माननिय महापौरजी,व सदनातील सर्व सहकारीहो शांत रहा.

श्री. बी.बी. मोरे यांनी त्यांचा प्रश्न क्र. ५९९ व त्यास प्रशासनाधिकारी यांनी दिलेले लेखी उत्तर वाचुन दाखविले.
श्री. शिंदे साहेब, मी जो प्रश्न विचारला आहे, व त्यास जे उत्तर दिले आहे की, महापालिकेकडुन तुम्ही २५ लाखाची मागणी केली आहे, शिक्षण मंडळाने. व मी असे विचारतो की, आयुक्त श्री. पोखरकर साहेब यांनी इकडे लक्ष दयावे यांनी मागणी केलेली आहे त्यानुसार आपण त्यांना निधी उपलब्ध करून दिलेला नाही. आणि शाळांची परिस्थिती अतिशय हलाखीची झाली आहे. माझ्या प्रभागातील शाळांमध्ये मी स्वतः पहातो की.... मी हिंदीमध्ये बोलले पाहिजे काय? त्या शाळेमध्ये जी शिक्षिका आहे. जी आठ तास शिकविण्यासाठी येते. तीला आठ तास उभे रहावे लागते. तिला बसण्यास खुर्ची नाही. टेबल नाही. ज्या उल्हासनगर शहराचे नाव संपुर्ण भारतभर प्रसिध्द आहे की हे एक चांगले शहर आहे. येथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. परंतु शैक्षणिकबाबतीत असे का होते? विशेष करून मराठी शाळांमध्ये टेबल खुर्च्या नाहीत असे मला आढळुन आले आहे. तसेच पहारेकरी सुध्दा नाहीत. मात्र सिंधी माध्यमाच्या शाळांमध्ये एका विद्यार्थ्यामागे एक शिक्षक आहे. तर तेथे जे फर्निचर ते इकडे आणले पाहिजे. जर निधी मिळाला नाही तर काय करणार? येथे असे लिहिले आहे की, निधी उपलब्ध झाला तर तेथे टेबल खुर्च्या देऊ परंतु निधी उपलब्धच झाला नाही तर काय करणार?

<u>श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-</u>आता शिक्षण मंडळाने तरतुद केलेली आहे. व तरतुदीनुसार एप्रिल पासुन आजपर्यंत महानगरपालिकेने पाच लाखाचे अनुदान शिक्षण मंडळास दिलेले आहे. या पाच लाखामध्ये शिक्षकांचे पगार दयायचे की, शाळांसाठी फर्निचर खरेदी करायचे? सर्व शाळांची स्थिती एकसारखीच आहे. आज शाळांमध्ये बेंच, टेबल, खुर्च्या नाहीत हे बरोबर आहे. परंतु जेव्हा महानगरपालिका आम्हाला निधी देईल तेव्हाच तर हे फर्निचर खरेदी केले जाईल. याशिवाय आमच्याकडे दुसरा कुठला पर्याय नाही.

<u>मा. सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u>शिंदे साहेब, आपण जे सांगितले ते मला तर मंजुर आहे किंवा नाही? हे कधी व्हायचे? फार पुर्वी, जेव्हा मी लहान होतो



त्यावेळी विद्यार्थी शाळेमध्ये जमिनीवर बसत असत. आज २१वे शतक चालु आहे. यावेळी प्रत्येक विद्यार्थी बेंचवर बसला पाहिजे. विद्यार्थ्यांचे आई वडील चांगले गणवेश घालुन विद्यार्थ्यांना शाळेत पाठवितात. आणि जर ते खाली जमिनीवर बसले तर काय अवस्था होईल? साहेब आपण म्हणालात की, महापालिकेने निधी दिला नाही. तर निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण महापालिकेशी काय पत्रव्यवहार केला आहे?

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-पैसे दयावेत म्हणुन आम्ही महापालिकेस सहा स्मरणपत्र दिली आहेत. मागील आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेब यांच्याकडे एक शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो. व त्यांच्याशी शिक्षण मंडळाच्या समस्यांबाबत चर्चा केली होती. व त्यांना आम्ही या सर्व समस्या सांगितल्या की, फर्निचर नाही, वॉचमन नाही या सर्व गोष्टी आम्ही त्यांना सांगितल्या त्यावर त्यांनी सांगितले की, वॉचमनच्या बाबतीत आम्ही काही करू शकत नाही. महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध नाही. जेव्हा निधी उपलब्ध होईल तेव्हा आम्ही आपणांस देऊ. तर त्यानुसार मागच्या वर्षी जो पैसा आम्हास मिळाला त्यातुन आम्ही कित्त्येक शाळांची दुरूस्ती केली. परंतु यावर्षी महानगरपालिकेकडुन काहीही निधी न मिळाल्याने आम्ही आजपर्यंत काहीहि करू शकलो नाही. महानगरपालिका होण्यापुर्वी या नगरपालिकेने गणवेश वगैरे दिलेले आहेत. १९९० मध्ये फर्निचर खरेदी केले गेले आहे. त्यानंतर फर्निचर खरेदी केलेले नाही.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे :-शिंदे साहेब, मी हे विचारू इच्छितो की, हे केव्हा होईल? कसे होईल? की होणारच नाही? हे फर्निचरचे. जर निधी उपलब्ध झाला तर फर्निचर खरेदी केले जाईल. नाहीतर नाही करू शकत. आपण सांगितले की, पहीले शिंदे साहेब होते. शिंदे साहेबांना आपण काय स्मरणपत्र पाठविली त्यांनी काय केले, नाही केले? आता आयुक्त साहेब म्हणुन श्री. पोखरकर साहेब आहेत. त्यांच्याशी आपण काही लेखी पत्रव्यवहार स्मरणपत्र, पाठविली आहेत का? किंवा आपण काही चर्चा केली आहे काय? की, शाळांची परिस्थिती अशी आहे, विद्यार्थ्यांची स्थिती अशी आहे? याबाबत आपण काही विचार विनिमय केला आहे काय?

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-होय. मी आयुक्त साहेबांना दोन वेळा भेटलो आहे. व पाच सहा स्मरणपत्रे सुध्दा मी पाठविली आहेत. व आयुक्त साहेबांनी सांगितले की, महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. त्यामुळे आम्ही आपणांस निधी उपलब्ध करून देऊ शकत नाही.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-तर आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. शाळांसाठी काही करू शकत नाही. उल्हासनगर शहरांमधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण प्राप्त झाले नाही तर त्यास जबाबदार कोण राहिल? आयुक्त राहतील की, प्रशासन अधिकारी श्री. शिंदे साहेब राहतील?



मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-श्री. शिंदे साहेब, आपली मागणी काय आहे. येथे आयुक्त साहेब आहेत, महापौर आहेत सर्व आहेत...... आपली मागणी काय आहे याचा जरा खुलासा करा.

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-आम्हास निधी उपलब्ध झाला तर आम्ही फर्निचर खरेदी करू शकतो ना? शिक्षण मंडळास शासनाकडुन जे अनुदान मिळते. त्यातुन फक्त शिक्षकांचे पगार व पेंन्शन हे आम्ही देऊ शकतो. परंतु बाकीचे जे आहे जसे की, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम आणि नियमावली यांमध्ये ज्या तरतुदी आहेत. त्याप्रमाणे ती जबाबदारीही नगरपालिकेची / महानगरपालिकेची आहे. तर या ज्या शाळांच्या इमारती आहेत त्या महानगरपालिकेच्या आहेत. तर महानगरपालिकेने निधी उपलब्ध करून दिला तर आम्ही करू.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :-आयुक्त साहेब, मोरे साहेब जे म्हणतात त्या मुदयांचे सविस्तर स्पष्टीकरण केले जावे.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे :-श्री. सेवलदास, माझा प्रश्न आहे. मी बोलत असताना आपण मध्येच बोलत आहात.

मा. सदस्य श्री. कुमार आयलानी :-ते तर आपल्या मुदयास पाठिंबा देत आहेत.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे :-पाठिंबा देत आहेत ते ठिक आहे.मी शिंदे साहेबांना विचारतो, श्री. शिंदे साहेब आपण जे सांगितले त्याबाबत आयुक्तांनी स्पष्टीकरण केले तर बरे होईल. शिक्षण मंडळास निधी का दिला जात नाही? काय कारण आहे? महापालिका चालविण्यात काही अडचणी येत असतील. ठिक आहे. परंतु काहीनाकाही टक्के (रक्कम) दिली जाते. त्याप्रमाणे शिक्षण मंडळास निधी का दिला जात नाही?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री. बी. बी. मोरे यांनी शिक्षण मंडळासंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. आणि शिक्षणाधिकारी श्री. शिंदे यांनी जे उत्तर दिले आहे. परंतु ज्या बाबींबाबत अद्याप सन्माननिय सदस्यांना माहिती हवी आहे. ती देण्यासाठी मी उभा आहे. शिक्षणाधिकारी शिंदे यांनी शिक्षण मंडळाला काही अनुदान, निधी उपलब्ध करून दयावा म्हणुन माझी दोन वेळा भेट घेतली. तेव्हा मी त्यांना असे स्पष्ट सांगितले की, आमचे जे मुख्य लेखाधिकारी आहेत. त्यांच्या बरोबर तुम्ही बसा आणि चर्चा करा. आणि ज्या अत्त्यावश्यक बाबी आहेत. त्या बाबींसंबंधी निश्चितपणे मला असे सांगा की, अत्त्यावश्यक बाबींसाठी आपणांस किती आर्थिक सहाय्य, निधी किंवा अनुदान आवश्यक आहे. त्याची रक्कम मला कळु दया. आणि त्यानंतर मी यावर विचार करेन. प्रश्न असा आहे की, आपली आर्थिक स्थिती बरोबर नाही. हे आपणां सर्वांना विदीत आहेच. अलिकडेच वसुली अधिकाधिक करण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत. त्याला काही प्रमाणात यश आलेले आहे असे मी म्हणेन. आणि शिक्षण



मंडळासाठी वेतन शासनाकडुन मिळत असते. ते सर्व वेतन शासनाकडून मिळण्यासाठी शिक्षणाधिका-यांनी प्रयत्न करायचे आहेत. वेतनाचे अनुदान घेण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. आणि बाकीच्या ज्या अनुषंगिक बाबी आहेत. त्यासाठी लागणारा खर्च किंवा अत्त्यावश्यक रक्कम ही आमचे लेखाधिकारी यांनी निश्चित असा आकडा काढल्यानंतर ती रक्कम शक्य तेवढया लवकर देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-आभारी आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी. मोरे:-आयुक्त साहेब, आताच आपण सांगितले की, अत्त्यावश्यक बाबींसाठी विचार केला जाईल. आणि शाळांबाबत आपण सांगितले की, निधी नाही आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. तर मी असे विचारतो की, महापालिकेची आर्थिक स्थिती किती वर्षापासुन बरोबर नाही?व ती बरोबर होणारही नाही? त्यासाठी उल्हासनगर मधील शाळा बंद कराव्यात काय? त्या शाळांमध्ये विद्यार्थी येणार नाहीत. त्यामुळे त्या शाळा बंद पडतील तर याबाबत महापालिकेची भुमिका काय राहील? महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही हे आपले वाक्य मी चांगल्या प्रकारे नोंद करून ठेवले आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही म्हणुन काहीही करता येत नाही. परंतु शाळांच्या बाबतीत तरी असे होता कामा नये. जेथे त्यांनी २५ लाखाची मागणी केली आहे. त्यापैकी १५ किंवा १० लाख तरी त्यांना दिले पाहिजे होते. कारण की, शाळांचा प्रश्न आहे. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर जाऊ इच्छितात त्यांना उल्हासनगर

महानगरपालिका शिक्षणापासुन वंचित ठेऊ इच्छित आहे. असा माझा आरोप आहे. तर याबाबत आयुक्त साहेब आपण काय म्हणता?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय,

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-महापौर महोदय,मला एक मिनिट बोलायचे आहे. यांचा जो प्रश्न आहे तो आयुक्तांशी आहे. परंतु आयुक्त बिचारे काय करतील? इथली सत्ता आपणाकडे आहे. शिक्षण मंडळातील सत्ता सुध्दा आपणांकडेच आहे. आपण शिक्षण मंडळास पैसे देत नाहीत त्यात आयुक्तांचा काय दोष आहे? दोष आपला आहे ना?

मा.महापौर :-मी आपणांस सांगु इच्छितो पंजाबी साहेब, अनुदानासाठी शिक्षण मंडळाकडुन १५-२० विनंती अर्ज आले आहेत. त्यात आठ-नऊ लेखी अर्ज आहेत. ते आयुक्त, महापौर व इतर संबंधित अधिका-यांना उददेशुन लिहिले आहेत. व तोंडी १०-१२ वेळा त्यांनी सांगितले आहे. शिक्षण मंडळाचे आमचे जे सभापती आहेत त्यांनी वैयक्तिकपणे तीन-चार वेळा फोन केले आहेत. व हे सर्व मी वारंवार आयुक्तांच्या नजरेस आणुन दिले आहे. त्यांना लेखी कळविले आहे. आजसुध्दा त्यांच्याशी माझे बोलणे झाले आहे. व लेखी त्यांना पाठविले आहे. परंतु प्रत्येक वेळा आयुक्तांकडुन असे सांगण्यांत आले आहे की, निधी उपलब्ध नाही. मागील जुन -जूलैमध्ये माझ्या मते पाच लाख रुपये देण्यात आले आहेत. त्यानंतर पैसे देण्यात आलेले नाहीत. व निधीची जी कमतरता आहे त्यामुळेच फर्निचर नाही, टेबल-खुर्च्या नाहीत, तरीही मी



आयुक्तांना सांगितले आहे की, त्यांना कमीत-कमी रक्कम तीन-चार लाख रुपये जर आपण शिक्षण मंडळास देऊ शकत असाल तर त्याने त्यांचे काम होऊ शकेल.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- नाही, आपण म्हणालात की, मंडळाच्या सभापतीनी सुध्दा प्रयत्न केले आहेत. मंडळाचे सभापती किती सभांना आले आहेत? सभापतींचे जे दालन आहे तेथे ते बसतात काय? जर सभापतिच कार्यरत नसतील तर मंडळाची स्थिती काय असेल?

मा.महापौरः- असे नाही आहे , मंडळाचे सभापती त्यांच्या साप्ताहीक बैठकींना नियमितपणे उपस्थित रहातात, मला हे वैयक्तिकपणे माहित आहे, माझी त्यांच्याशी चर्चा होत असते.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-फोन वरून?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-प्रामाणिकपणे सांगा की, शिक्षण मंडळाच्या कार्यप्रणालीवर आपण संतुष्ट आहात काय?

मा. महापौर :-मी पुर्णपणे संतुष्ट आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-कारण की ते कार्यालयात उपस्थित रहात नाहीत? ज्या मंडळाचे सभापती काम करत नाहीत. मंडळाचे सभापती येथे येत नाहीत. श्री. परशराम कालानीजी, त्यांचे येथे काही कार्य नाही. तर शिक्षण मंडळाच्या शाळांची परिस्थिती अशी होईलच. तर ज्या पध्दतीने हे कामकाज चालु आहे त्याची कार्यपध्दतीच बरोबर नाही.

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-असे नाही आहे. आमचे सभापती महोदय प्रत्येक सभेस येतात व जे काही ठराव असतात ते सर्व संमतीने पारीत केले जातात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-वा! वा!! वा!!! याबाबत सत्ताधारी पक्षांनी बाके वाजवावित की आम्ही? सर्वच ठराव सर्व संमतीने पारीत होतात?

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-कारण की, त्यामध्ये शिवसेनेचेही सदस्य आहेत, भाजपाचेही सदस्य आहेत, इंदिरा कॉंग्रेसचे सुध्दा आहेत. सर्व आहेत. त्यामुळे ठराव सर्व समंतीने पारीत होतात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-मागील तीन महिन्यांमध्ये सभापती किती सभांना आले होते?

श्री. शिंदे (प्रशासनाधिकारी):-सर्व सभांना आले होते.

--८--

मा सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-मी आपणांस तारखांसह सांगतो ना, सभापती आपल्या दालनांमध्ये कधी बसतात? महिन्यातुन किती दिवस बसतात?

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-श्री. नरेंद्र राजानी विषयांतर करत आहेत. सभापतींची गोष्ट येथे येत नाही. सिध्दांताची गोष्ट आहे. त्यांना मागील काही महिन्यात पाच लाख रू. निधी दिला गेला आहे. मला असे म्हणायचे आहे की, या पाच लाखामध्ये शिक्षकांचा पगार वगैरे हे आपण कसे भागविले?

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-ज्यांचे सभापतीच कार्यरत नसतील तर पैसे कुठून येणार?

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-आपण विषयांतर करू नका. अमुकएका पक्षाचा सभापती आहे म्हणुन त्यावर दोष ठेवायचा हे बरोबर नाही. इथे प्रशासन बरोबर काम करत नाही.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-ते सभापती कोणत्त्या पक्षाचे आहेत?

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-जर त्यांनी योग्य प्रकारे मागणी केली असती व आयुक्तांनी त्यांना निधी दिला असता.....

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-त्यांनी बरोबर मागणी केली असती तर या आपल्या विधानाशी मी सहमत आहे.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः- आयुक्त साहेबांनी जसे सांगितले की, त्यांनी आमच्याकडे जी मागणी केली आहे. त्यानुसार त्यांनी मुख्य लेखा परिक्षकांशी विचार विनिमय करुन त्यांनी त्यांचे काम करुन घ्यावयास पाहिजे होते. त्यांचे काम ते करुन घेऊ शकत नाहीत त्यात सभापतींचा मुददा येतोच कुठे? सभापतींकडे जे प्रस्ताव येतात ते सर्वसंमतीने पारित होतात.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- सभापती आहेत असे तुम्हाला वाटते का? तुम्ही त्यांना कधी पाहिले आहेत का? आयुक्त साहेब, शिक्षणमंडळाच्या सभापतीना आपण कधी पाहिले आहेत का?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- हे तर असे झाले की, 'उल्टा चोर कोतवाल को डाटे'

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः- मी, मा. महापौर व आयुक्त साहेबांना विनंती करतो की, याबाबत काही आश्वासन मिळेल काय? याबाबत काही होऊ शकते काय?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):- महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री. बी.बी. मोरे यांचा प्रश्न असा आहे की, शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळांना अनुदान नसल्यामुळे काही गैरसोयी होतात. त्यासंबंधी प्रशासनाची प्रतिक्रिया काय आहे किंवा हे योग्य आहे काय? मी आपल्याला असे सांगु इच्छितो की, या शहरामधील प्रत्येक नागरीकाला, प्राथमिक शाळेतील विदयार्थ्याला व शिक्षकांना चांगल्यात चांगल्या सोयी सुविधा किंवा सोयी दयाव्यात अशी माझी इच्छा आहे, परंतु मी यापूर्वीच आपल्याला स्पष्ट केल्याप्रमाणे, सांगितल्याप्रमाणे की, सगळी सोंग करता येतात पण पैशांचा काही सोंग करता येत नाही. आणि यासाठी आपल्याला आपली उत्त्पन्नाची साधने वाढविणे आवश्यक आहे. ही उत्त्पन्नाची साधने वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे . आतापर्यंत उत्त्पन्न का वाढले नाही. किंवा काय झाल? या तपशिलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. उहापोह करु इच्छित नाही. परंतु या क्षणी मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो की, अगोदरच सांगितल्याप्रमाणे वसूलीची प्रक्रिया ही तिव्र करण्यात आलेली आहे, काही प्रमाणात वसूली झालेली पण आहे. आणि निश्चीतपणे शिक्षणमंडळाच्या शाळांसाठी अनुदान आवश्यक आहे त्याची रक्कम शिक्षण अधिकारी आणि आमचे लेखाअधिकारी यांनी निश्चित केल्यानंतर आवश्यक तेवढी रक्कम शक्य तेवढया लवकर शिक्षण मंडळाला अदा केली जाईल.

मा. उपमहापौर(श्री. धनंजय बोडारे):- महापौर साहेबांनी सांगितले की, शिक्षण मंडळाचा कारभार व्यवस्थित चाललेला आहे. मला एक थोडीशी माहिती पाहिजे होती. शिक्षण मंडळाची सदयाची सदस्य संख्या कितीची आहे? १३, पैकी निर्वाचित सदस्य किती? १०, १०पैकी सदयाच्या परिस्थितीत सर्व सदस्य पात्र आहेत का ?

श्री. शिंदे (प्रशासन अधिकारी):- १० पैकी सदया ७ सदस्य कार्यरत आहेत.

मा. उपमहापौर(श्री. धनंजय बोडारे):- सात ? म्हणजेच तीन सदस्य अपात्र ठरलेले आहेत?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- होय... ते तीन सदस्य तीन सलग सभांना उपस्थित नसल्यामुळे ...........

मा. उपमहापौर(श्री. धनंजय बोडारे):- म्हणजे गैरहजेरी मुळे अपात्र ठरले? काय नावे काय त्यांची?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:- अशा माननिय सदस्यांची नावे तर सांगा.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे:- त्या दहा सदस्यांमधून सात सदस्य कार्यरत आहेत. असे तुम्हाला म्हणायचे आहे, आणि तीन सदस्य सभांना गैरहजर राहिल्यामुळे त्यांना अपात्र ठरवलेले आहेत. मग त्या जागांबाबतनिवडणूक का घेत नाहीत? दुसरे सदस्य भरु शकत नाहीत? असेच राहू दयायचे आहेत?



मा. उपमहापौर(श्री. धनंजय बोडारे):- ते तीन सदस्य कोणते त्यांची नावे सांगितली जावीत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:- ते तीन सदस्य कोण त्यांची नावे सांगा.

मा. सदस्य श्री. बी.बी.मोरेः- ते किती दिवसापासून नाहीत? शिंदे साहेब तुम्ही सांगितले की, दहा सदस्य आहेत, त्यापैकी सात सदस्य कार्यरत आहेत. तीन सदस्य अपात्र ठरविलेले आहेत. तर आता किती वर्षापासून ते अपात्र ठरविलेले आहेत? किती वर्षापासून ते येत नाहीत?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- हे जे उपप्रश्न आहेत त्यांची उत्तरे मी तुम्हाला नंतर देतो.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः- नाही,नाही, नाही एक लक्षात घ्या, तुम्ही काय बोललात की, दहा सदस्य आहेत त्याच्यापैकी सात सदस्य कार्यरत आहेत. तीन अपात्र ठरविलेले आहेत. बरोबर आहे का? ते तीन सदस्य किती वर्षापासुन अपात्र ठरविलेले आहेत.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-हा प्रश्न तुम्ही मला इथे अचानक विचारल्यामुळे मला आता उत्तर सांगता येणार नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-नावे तर सांगा.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे :-जेव्हा तुम्ही तीन सदस्य अपात्र ठरविल्याचे सांगता तर त्यांची नावे काय? हा अभ्यास तुमच्याकडे तयार असला पाहिजे. हे तीन सदस्य कधी पासुन अपात्र ठरविले आहेत.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-हे पहा मी १९९९ मध्ये शिक्षण मंडळामध्ये आलो. ते तीन सदस्य त्याच्या पुर्वीच अपात्र ठरविलेले आहेत.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-हे चुकीचे आहे?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-मोरे साहेब, नावे तर विचारा?
श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- नावाचा प्रश्न याठिकाणी नाही आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-हा प्रश्न मी सांगतो त्याबाबत आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :नाही. पहीले नावे सांगा. महापौरजी यांना नावे सांगण्यास सांगा.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा. महापौरजी आपण पिठासिन अधिकारी आहात. आपण आदेश दया की, ते तीन सदस्य कोण आहेत त्यांची नावे सांगा.



मा. सदस्य श्री. दर्शनासिंग खेमाणी :-मा.महापौरजी, माझे निवेदन आहे की, श्री. बी.बी.मोरे साहेब यांचा प्रश्न काय होता. व ही चर्चा कुठून कुठपर्यंत चालली आहे. प्रश्नोत्तराची वेळ घेत आहेत.

मा.महापौर :-श्री. शिंदे आपण ती तीन नावे सांगा. जे सदस्य अपात्र ठरविले आहेत. नावे सांगण्यात काय हरकत आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-ते आपल्या पक्षाचे होते काय? नव्हते ना?

मा. महापौरः-वस्तुस्थिती काय आहे ती मी आपणांस सांगतो. एक सदस्य श्री. रमेश माखिजा हे आहेत. तर....

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-आपण का सांगता, त्यांनी सांगायला पाहिजे ना?

मा. महापौरः-ते सांगु शकत नाहीत. म्हणुन तर मी सांगतो आहे ना?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-जर ते सांगु शकत नाहीत तर याचा अर्थ असा की त्यांना माहित नाही का?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-आपणांस माहित आहे आणि त्यांना माहित नाही हे कसे?महासभेचा हा अपमान आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-अचानकपणे आपण असा प्रश्न विचारत आहात अगोदर विचारला असता तर ते तयारी करून आले असते.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-जे सदस्य कार्यरत आहेत त्यांची नावे मी फलकावर लिहिलेली आहेत. उपप्रश्न आलेले आहेत हे उपप्रश्न जर मला माहित असते तर......

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-जर आपणांस माहिती नाही तर प्रशासनाधिकारी म्हणुन आपण कामकाज कसे पाहता?

मा. महापौर :-मी सांगतो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-महापौरजी, प्रशासनाधिकारी म्हणतात की, नावे फलकावर लिहिलेली आहेत. आपण पाहुन यावीत. हे सभागृहास सांगणे चुकीचे आहे. त्यांनी नावे सांगीतलीच पाहिजेत. हे तर असे झाले की, एखादया माणसास सांगितले की, आपल्या घरच्या सदस्यांची नावे सांगा तर तो असे म्हणेल की मला माहित नाही मी घरी जाऊन विचारून येतो.



मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-अशाप्रकारे हे सभागृह त्यांना विचारत आहे तर ते म्हणतात की, खाली जाऊन सुचना फलकावर नावे पाहुन या. व ते म्हणतात की, तीन नावे मला आठवत नाहीत. हे बरोबर नाही.

मा. महापौरः-मी त्यांना विचारले. त्यांनी मलाही सांगीतले की मला माहित नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-त्यांनी सांगायला पाहिजे आहे की, ती तीन नावे कोणती आहेत? सात कोणती आहेत ती तर सांगावित.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे :-शिंदे साहेब, दिशाभुल करत आहेत.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-तुम्ही त्यांना पाठिशी घालत आहात त्यात तुमचे हीत काय आहे?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-तुम्ही प्रशासन अधिकारी आहात तुम्हाला नावे माहित नाहीत काय?

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-त्यात तुमचे हित आहे असा आमचा आरोप आहे. हे चुकीचे चालले आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-एक-एकानेच उभे राहुन विचारावे.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-श्री. शिंदे साहेब, आपल्या शिक्षण मंडळाचे सदस्य कोण आहेत हे आपणांस माहित नसेल तर आपणांस त्या खुर्चीवर बसण्याचा अधिकारच नाही. हे चुकीचे चालले आहे.

मा.महापौरः-आपल्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो की,

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-ते सांगु शकत नाहीत. तर पगार कसला घेतात?

मा. महापौरः-त्यांना माहित नाही. पुढच्या सभेत ते तयारी करून येतील. तीन सदस्य जे आहेत ते एक श्री. रमेश माखिजा, दुसरे डॉ. भगवानदास अगिचा, व तिसरे श्री. भागु तलरेजा. श्री. भागु तलरेजा यांनी स्वतः राजिनामा दिला होता. दोन सदस्य अपात्र ठरले आहेत.
मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-सात जे सदस्य सध्या कार्यरत आहेत त्यांची नावे तरी माहित आहेत का यांना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी या सभागृहात खुलासा करू इच्छितो की, आता आपण जी नावे सांगितली श्री. रमेश माखिजा, श्री. भगवानदास अगिचा, व श्री. भागु तलरेजा ही जी तीन नावे घेतली. जे सदस्य सलग तीन



सभांना येत नाहीत ते अपात्र ठरतात. याचा अर्थ हा आहे की, आमचे सभापती प्रत्येक सभेस नियमितपणे येत असतात. हे यावरून सिध्द होते हि एक गोष्ट व दुसरे असे की, निवडणुका लक्षात घेऊन राजकिय मुददे सभागृहात आणले नाहीत तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-आम्ही नाही उपस्थित केला आपल्या श्री. बी.बी. मोरे यांनी हा मुददा उपस्थित केला आहे. श्री. बी.बी. मोरे आपले नाहीत काय?

मा. महापौरः-पुढचा प्रश्न पुकारला जावा.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-शिंदे साहेबांना माझा प्रश्न आहे त्यांनी थोडयावेळेपुर्वी म्हंटले होते. सर्व ठराव एकमताने पारित होतात, त्यामध्ये शिवसेना सुध्दा आहे तर शिवसेनेचा कोण सदस्य आहे ते आम्हाला सांगा तर जरा? आता आपण थोडयावेळेपुर्वी म्हंटला होतात. सांगा शिवसेनेचा कोण सदस्य आहे? आपण म्हणताना की सर्व ठराव एकमताने पारित होतात. व त्यामध्ये शिवसेनेचा सुध्दा सदस्य आहे. तर शिवसेनेच्या सदस्याचे नाव सांगा?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-श्री. जोसेफ कोलगे हे शिवसेनेचे सदस्य आहेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-हे आपणांस कोणी सांगितले? माहित आहे ना आपणांस, जे तीन सदस्य अपात्र ठरले त्यांची नावे माहित नाहीत? जो शिवसेनेचा सदस्य आहे तो माहित आहे व अपात्र झालेले सदस्य माहित नाहीत. यामध्ये आपले हीत काय आहे? हे चुकीचे करत आहेत.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- चुकीचे नाही आहे.

मा.महापौरः-पुढील प्रश्न, पुढील प्रश्न. आपल्या एका प्रश्नानेच अर्ध्या तासाची वेळ घेतली.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आम्हास गर्व आहे.जेव्हा आमचे पप्पु कालानी नगराध्यक्ष होते त्यावेळी शिक्षण मंडळ स्थापन केले गेले होते. तेव्हा सर्व पक्षाचे सदस्य त्यात त्यांनी घेतले होते.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-घेतले नव्हते. निवडुन आले होते. सभागृह नेता चुकीचे बोलत आहेत. शिक्षण मंडळात प्रत्त्येक सदस्य स्वबलावर निवडुन येत असतो हे मी सभागृह नेत्त्यांना सांगु इच्छितो.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-व आम्हाला दुःख आहे की, त्यांनी तयार केलेल्या शिक्षण मंडळात शाळांची परिस्थिती अशी झाली आहे की, आपल्या बरोबर असलेल्या युतीतील एका सदस्यास प्रश्न विचारण्यास उभे रहावे लागत आहे की, आमच्या शाळांमध्ये बॅच नाहीत, टेबले नाहीत, खुर्च्या नाहीत. मुले शाळा सोडुन जात आहेत. असे का?



मा. महापौरः-हे केवळ निधीच्या कमतरतेमुळे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-कृपया यामध्ये राजकारण आणु नये.

मा. सदस्य श्री.बी. बी.मोरेः-हा प्रश्न राजकारण करण्याचा नाही आहे. हा प्रश्न शाळांसंबंधीचा आहे. त्यासाठी भलेही सत्ताधारी पक्षात असो किंवा विरोधी पक्षात त्यासाठी येथे राजकारण आणु नये.

मा. महापौरः-श्री. मोरेजी, आपल्या एका प्रश्नाने अर्ध्या तासाची वेळ घेतली आहे.बाकी प्रश्न सुध्दा चर्चेस येऊ दया.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः-मी आपणांस विनंती करू इच्छितो की, हा शाळांसंबंधीचा प्रश्न आहे. व झोपडपट्टीमध्ये मी रहातो. झोपडपट्टीमध्ये शाळा आहे त्या शाळेबाबत जर मी प्रतिनिधीत्त्व केले नाही, आवाज उठविला नाही तर मला त्या झोपडपट्टीतुन निवडुन येण्याचा तेथे रहाण्याचा काहीही अधिकार नाही.

मा. सचिव :-पुढील प्रश्न, प्रश्न क्र. ६०० श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा. महापौरजी, एका प्रश्नाने ३५ मिनिटांची वेळ घेतली.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे :-माझ्या प्रश्नाचा ब भाग आहे. उल्हासनगर शहरामध्ये मराठी माध्यमाच्या किती शाळा महानगरपालिकेच्या आहेत. सिंधी व मराठी माध्यमाच्या शाळांची दयनिय अवस्था का आहे? त्या शाळांमध्ये रात्रीचा वॉचमेन का दिला जात नाही? मराठी शाळेत शिक्षकांची संख्या कमी का?याचा खुलासा व्हावा. तर आपण वरील प्रमाणे उत्तर दिले आहे.आम्ही वांरवार इथे ओरडतो, पुन्हा माझा कार्यकाल येणारच आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-महापौरजी, एका प्रश्नाला ३५ मी. वेळ गेला आता आमचा प्रश्न कधी येणार?

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-सर्व सदस्यांना मी विनंती करतो की, माझ्या प्रश्नावरील चर्चा पुर्ण होऊ दया. कृपया आपण मध्ये कुणी बोलु नये तरच माझ्या प्रश्नावरील चर्चा पुर्ण होईल नाही तर पुढील महासभेपर्यंत माझ्या प्रश्नावरील चर्चा चालेल हे अगोदरच मी सांगतो. कारण की,मी झोपडपट्टीमध्ये राहतो तेथिल शाळेची स्थिती पाहुन माझी मुले सुध्दा मला हसतात.

मा. महापौरः-मोरे साहेब, प्रश्न क्र. ५९९ वरील चर्चा पुर्ण झाली ना?

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-त्याचा व भाग अद्याप आहे ना?

--१५--

मा. महापौरः- क नाही ना?

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः-शिंदे साहेब सांगा. उल्हासनगर शहरात एकूण ९ मराठी शाळा उल्हासनगर महानगरपालिकेच्या आहेत. मराठी शाळांची स्थिती दयनीय म्हणता येत नाही. सिंधी शाळांत स्थिती दयनीय म्हणता येत नाही. सिंधी शाळांत विद्यार्थी संख्या खुपच कमी झाल्याने वर्ग रिकामे आहेत. पालकांचा ओढा इंग्रजी माध्याच्या शाळांमध्ये आहे.वॉचमन-महापालिकेच्या शाळांमध्ये किमान १० सशस्त्र पहारेक-यांची आवश्यकता आहे. तथापि वॉचमन नेमण्याचे अधिकार शिक्षण मंडळाला नाही. पदे मंजुर नाहीत. मराठी माध्यमाच्या शाळांत ३० मराठी शिक्षकांची आवश्यकता आहे. तथापि सिंधी माध्यमात एकुण १३० शिक्षक अतिरिक्त सरप्लस असल्याने मराठी माध्यमाचे शिक्षक भरता येत नाही सोबत सविस्त टिप्पणी असे.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- माहिती तुमच्या प्रश्नाच्या अनुषंगाने दिलेली आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-ती चुकीची आहे.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- माहिती बरोबर आहे.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः- चुकीची आहे म्हणुन तर मी विचारतो आहे.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-चुकीची नाही.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-आता तुम्ही सांगा, मराठी शाळा नऊ आहेत. त्यांची स्थिती काय आहे? तुम्ही जे पाच लाख रू. घेतले त्यातुन या नऊ शाळांमध्ये काय काय फर्निचर घेतले त्याची माहिती तुमच्याकडे आहे?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- फर्निचरचा विषय सोडा. आता....

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः- फर्निचरचा विषय नाही, हा विषय नाही? म्हणजे तुम्ही चर्चा दुसरीकडे वळवत आहात.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-आता फक्त प्रश्न इमारतीच्या संबंधातील आहे. इमारती चांगल्या आहेत तुम्ही पाहु शकता. तुम्ही म्हणता तशी परिस्थिती नाही. तुम्ही १७नंबरची शाळा पहा तेथे काही बदल झाला आहे की नाही हे तुम्हाला दिसुन येईल.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-नगरसेवक निधीतुन कामे करत आहेत. शिक्षण मंडळाच्या वतीने आणि तुमच्या वतीने काही नाही.

--१६--

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- पाच लाखाच्या वर त्या शाळांवर खर्च झालेला आहे. कंपाऊंड वॉल, स्टेज, लादया लावल्या आणि हे सर्व काम यावर्षीच करण्यात आले आहे,हे तुम्हाला सुध्दा मान्य असेल. किंबहुना नगरपालिकेच्या ९० टक्के शाळांची दुरूस्ती झालेली आहे. हे तुम्ही कधीही पाहु शकता.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-लक्षात घ्या. तुम्ही तुमच्या परीने काय केले?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- आमच्या परीने तेथे पाच लाख रूपये खर्च केले आहेत.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-मी तुम्हाला पत्र देखिल दिलेले आहे. तेथे टेबल नाहीत, खुर्च्या नाहीत, त्याबददल तुम्ही काय केले?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- त्याप्रमाणे त्या शाळेला टेबल, खुर्च्या, बेंच पुरविलेले आहेत. त्याबाबतचे शिक्षकांचे अहवाल माझ्याकडे आलेले आहेत की, आम्हाला टेबल, खुर्च्या, बेंच मिळालेले आहेत.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-त्याठिकाणी बघितले तर तशी परिस्थिती नाही आहे. तुम्ही सभागृहाला सांगता तसे नाही.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- मोरे साहेब, तुम्ही यापुर्वी जो प्रश्न केला त्याप्रमाणे ज्या शाळा बंद पडल्या आहेत. तेथील फर्निचर तेथे पाठविले आहे. गजानन मार्केटमधील जी शाळा होती, त्यातील पाच खुर्च्या.......

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-कधी दिल्या आहेत?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- आता महिना झाला असेल? एक महिना झाला असेल?

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-मी पत्र देऊन किती महिने झाले? आयुक्तांना पत्र दिले त्याची प्रत आपणांस दिली आहे. आणि त्यात असे लिहिले आहे की, त्याठिकाणची स्थिती सुधारली नाही, लक्ष दिले नाही तर बालकांचा मी येथे मोर्चा आणेन असे मी लिहिले आहे.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):- फर्निचरचा प्रश्न यापुर्वी चर्चीला गेला आहे. त्यावर पुन्हा पुन्हा चर्चा करण्यात अर्थ नाही. बाकीची जी माहिती आहे. सिंधी माध्यमामध्ये अतिरिक्त शिक्षक आहेत. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शिक्षकांचे प्रमाण...

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-एक शिक्षक किती विद्यार्थ्यांना शिकवु शकेल? किती विद्यार्थी तिथे बसतात?



श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-७०-८० विद्यार्थी काही वर्गामध्ये बसतात.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-आता तुम्हीच सांगत आहात की, ७०-८० विद्यार्थी एका वर्गामध्ये बसतात. एक शिक्षक ७०-८० विद्यार्थ्यांना शिकवु शकतो काय? त्यांना बरोबर शिक्षण देता येईल का? सांगा तुम्ही. तुमच्या मते सांगा, तुम्ही प्रशासनाधिकारी आहात. तुम्ही सांगा किती विद्यार्थ्यांना एक शिक्षक असतो?

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-साधारणतः ५०-६० विद्यार्थ्यांना एक शिक्षक असतो.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही अद्यापही बरोबर सांगत नाहीत तर तिथे ८०-८५ विद्यार्थी एका वर्गामध्ये बसतात व एक शिक्षक शिकवत असतो.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-तसे काही नाही. त्या शाळेमध्ये शिक्षक पुरविले आहेत. थोडे शिक्षक मराठी माध्यमाचे गरजेप्रमाणे पुरविले जातात.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-२० तारखेच्या महासभेत तेथील विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची यादी मी आपणांस आणुन देऊ शकतो. ऐवढे शिक्षक तेथे कमी आहेत. आजच्या तारखेची स्थिती मी आयुक्त व महापौर साहेबांना आणुन दाखविन. तेव्हा माझे एकच मत आहे की, शिक्षणाच्या बाबतीत आपण लक्ष घातले पाहिजे. जे शिक्षक तेथे कमी आहेत ते पुरविले पाहिजेत. एक शिक्षक ८०-८५ विद्यार्थ्यांना शिकवितो त्यात मुलांचे लक्ष किती जाईल?महापौरजी अधिकारीवर्गास विनंती करू इच्छितो की, कृपया आपणांस उत्तर देता येत नसेल तर आपण गुपचूप उभे रहा. आम्ही समजुन घेऊ की, आपणांस उत्तर देता येत नाही. परंतु सभागृहाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करू नका. चुकीचे उत्तर देऊ नका.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-खोटे उत्तर देऊन मला काही त्यामध्ये .....

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-या ज्या ९ मराठी शाळा आहेत त्यांची उदया मी पहाणी करतो आणि तुम्हाला इथे पुढच्या २० तारखेला अहवाल देतो. त्यामध्ये तुम्ही किती खरे सांगितले आणि किती खोटे सांगितले हे दिसुन येईल.

श्री. शिंदे(प्रशासन अधिकारी):-हे पहा निकषाप्रमाणे दरवर्षी शिक्षक दिले जातात.

मा.महापौरः-पुढचा प्रश्न.

मा. सचिवः-प्रश्न क्र. ६००हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

--१८--

प्रश्न क्र. ६०० :-२)उल्हासनगर महानगरपालिकेत शिक्षण बोर्डाची स्थापना कधी व कोणत्त्या वर्षी झाली? व बोर्डाची फेररचना का केली नाही? याला नियम आहे किंवा नाही शिक्षण बोर्डाचा चेअरमन कोण आहे? या चेअरमनच्या कालावधीत आजमिती पर्यंत किती कामे मराठी शाळेची झाली याचा खुलासा व्हावा.

उत्तर :-शिक्षण मंडळाची स्थापना १९७६ साली झाली आहे. विद्यमान शिक्षण मंडळ २१.६.१९८९ पासुन आज पर्यंत कार्यरत आहेत. बोर्डाची फेररचना निवडणुक घेण्याचा अधिकार मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली मधील नियम क्रमांक ६, ७,१०या तरतुदीनुसार नगरपालिकेच्या अध्यक्षांना आहेत. महापालिकेच्या संदर्भात महापौरांना आहेत. शिक्षण मंडळाचे सध्याचे चेअरमन श्री. परशराम बी. कलानी हे आहेत. मी ३.६.१९९९ ते आजपर्यंत प्रशासन अधिकारी म्हणुन कामकाज पहात आहे. या कार्यकाळात मनपा शाळांतील विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न विज, शाळा इमारत दुरूस्ती, वालकंपाऊंड, स्वच्छता, घरे, मिटींग हॉल इत्त्यादी कामे सभापतींना मा. महापौर व मा. आयुक्त उल्हासनगर मनपा यांच्या आर्थिक सहकार्यातुन केली आहेत.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-महापौरजी, असे होत असेल तर प्रश्न विचारण्यात काही अर्थ राहणार नाही. आपण वेळ पहात बसु नका. शहरातील झोपडपट्टयामधील मुले ज्या शाळांमध्ये शिक्षण घेतात त्या शाळांची स्थिती कशी आहे?

मा. महापौरः-पुढचे जे प्रश्न आहेत ते आपलेच आहेत.

श्री. बी.बी. मोरे यांनी वरील प्रमाणे प्रश्न क्र. ६०० वाचुन दाखविला.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-साहेब, यांना सुध्दा सभापती कोण आहेत हे माहित नाही.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-शिक्षण मंडळाचा सभापती कोण आहे हे मोरे साहेब आपणांस माहितच नसेल?

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, आपण संतुष्ठ आहात काय?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-सभापती कोण आहे हे अजुन यांना माहित नाही.

मा. महापौरः-पुढील प्रश्न घेतला जावा.

मा. सचिवः-प्रश्न क्र. ६०३ , ६०४ .

--१९--

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-या प्रश्नाशी माझा एक पुरक प्रश्न आहे. विशेष करून आयुक्त व प्रशासनाधिकारी यांना, नियमात असे लिहिले आहे की, पाच वर्षात निवडणुका घेण्याचे अधिकार महापौरांना आहेत. ११ वर्षामध्ये निवडणुका झाल्या नाहीत याचा अर्थ असा आहे की, महापौर आपले कर्तव्य पार पाडण्यात अयशस्वी ठरले आहेत. पाच वर्षामध्ये निवडणुका झाल्या पाहिजेत असा अहवाल आपण शासनास सादर केला आहे काय? नसेल तर का नाही? का नाही केला?

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा. महापौरजी, इतिवृत्त कायम करताना तीन वेळा असे झाले आहे की, महापौरांनी आश्वासन दिले होते की, पूढल्या महिन्यात निवडणुका होतील. दोन महिन्यात निवडणुका होतील व हे इतिवृत्तांतात आलेले आहे.व इतिवृत्त कायम करताना आम्ही वारंवार हे सभागृहाच्या निर्दशनास आणुन दिलेले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. महापौरजी, आयुक्तांना माझा प्रश्न आहे की, राज्य शासनास अहवाल सादर करणे हे आयुक्तांचे कर्तव्य आहे. तर त्यांनी तसा अहवाल शासनास सादर केला आहे किंवा नाही. नसेल तर का नाही?

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः-मा. सचिव साहेब, माझ्या प्रश्नाचे काय?

मा. सचिवः-आपला प्रश्न झाला ना, पिठासिन अधिका-यांनी तसे जाहिर केले आहे.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-प्रश्न क्र. ६०१ आहे ना?

मा. सचिवः-प्रश्न क्र. ६०१ , ६०२ मागच्या सभेत झाले आहेत.

मा.सदस्य श्री. बी. बी.मोरेः-प्रश्न क्र. ६०१ , ६०२ झाले आहेत तर मग प्रश्न क्र. ५९९ व ६०० हे प्रलंबित होते काय?

मा. सचिवः-आपले दाने प्रश्न तत्त्कालीन आयुक्त श्री. आरडी. शिंदे साहेब यांच्या कालावधीत प्रलंबीत ठेवले होते.

प्रश्न क्र. ६०३ , ६०४ , ६०५ हे श्रीमती. सुनिता राजवानी यांचे आहेत त्या आज उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांचे प्रश्न आणि उत्तर यांची इतिवृत्तांतात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ६०३ :-१) भंगार का टेंडर कब मंगाया गया था? वो कितने रूपये का था?

--२०--

अ) उस भंगार में क्या क्या था? उसका खुलासा करो?
ब)भुतपुर्व आयुक्त शुळ साहेब ने कितने कचरा कुंडी मंगायी थी? वो कुंडी अब किधर है? वो कुंडी कौनसे विभाग में जमा की गई है?
क)भंगार जमा करने के लिए उमपा के पास गोडाऊन है क्या?
ड)भंगार की आज की परिस्थिती क्या है? अंदाज कितने रूपये का भंगार हो सकता है?
उत्तर :- भंगार माल बेचने की निविदा दि. १४.९.९६ को निकाली गयी थी। उसकी किंमत स्थायी समितीने रू. २ ,८० ,८८९/- निर्धारीत की थी ।
अ) उस भंगार माल में लोहे का भंगार (टूटी हुअी हात गाडीयॉ, लोहे के ड्रम्स इत्त्यादी और विद्युत सहित (खराब चोक्स, बल्बस, टयुबलाईटस इत्त्यादी सामान था। )
ब)मा. माजी आयुक्त श्री. शुळ साहेब ने ५० कचरा कुंडीयॉ मंगाई थी । वह कुंडीयॉ आरोग्य विभाग को दी गयी थी । उस विभागसे आज तक भंगार हुअी कुंडीयॉ कव प्रस्ताव भंडार विभाग में नही भेजा गया । जिसका निलाम हो सके ।
क)भंगार जमा करने के लिए उल्हासनगर महानगरपालिका के पास गोडाऊन है ।
ड) महानगरपालिका के गोडाऊन में विद्युत विभाग से दिया गया भंगार सामान रखा हुआ है । महानगरपालिका के अन्य विभागोंको भंगार की सुची देने के लिए भांडार विभाग से लेटर और स्मरणपत्र दिए गये है । लेकीन एक दो विभागोंने छोडकर किसीभी अन्य विभागोंसे भंगार की सुची प्राप्त नही हुअी है । सभी संबंधित विभागोंसे आया हुआ भंगार सामान बेचनेसे अंदाजीत रू. पाच लाख से छ लाख तक की आमदनी महानगरपालिकाको हो सकती है ।

प्रश्न क्र६०४ :-दि. ४.५.२००१ को स्थायी समिती में पास किये गये ३८ लाख रूपये के पॅटोल्स कव काम कौन से हेड में से किया गया है?
अ)सुची में दिये हुये ५४ रस्तों के पॅटोल्स के कामे का सर्वे किसने किया है?
ब) सुची में दिये हुए सभी रस्तो के पॅटोल्स की किंमत लगभग सेम कैसी है?
क)इन पॅटोल्स के कामो का सूचक और अनुमोदक कौन है?

उत्तर :-स्थायी समिती में पास किए गये ३८ लाख रू. के पॉटहोल काम लेखा शिर्ष सो-४ (I) पी-१ महानगरपालिकाके सन २००१-२००२ आर्थिक तरतुद के नुसार किया गया है।
अ) संबंधित कनिष्ठ अभियंता, उप अभियंता इन्होंने उक्त कामो का सर्व्हे किया है ।
ब) सा.बा. विभाग के कनिष्ठ अभियंता और उप अभियंता इन्होंने जो प्राकलन तयार किया गया था इस बारे में स्थायी समिती में चर्चा की गयी थी । उस

अनुसार इस बारे में महानगरपालिका की आर्थिक तरतुद के हिसाब से हर कामपर कितना खर्चा करना चाहिए इस बारे में स्थायी समितीने निर्णय

--२१--

लिया था । पॉटहोल के जो अंदाजपत्रक बनाये गये थे वे सेम और एक जैसी नही है । उस प्राकलनिय किंमत को राऊंड में किया गया है ।
क)स्थायी समिती ठराव क्र. १० दि. ४.९.२०११ के अनुसार सूचक श्री. रमेश चव्हाण अनुमोदक श्रीमती. लविना कुंदनानी यह है ।

प्रश्न क्र६०५ :-प्र. क्र. ३२ में बालकृष्णनगर, संजीव गांधीनगर, महात्त्मा गांधी नगर, संत रोहीदास नगर, इंदिरा गांधी, कॉलनी इन झोपडपट्टी के बाजू से एक बडा नाला जाता है । उस नाले में पुरे शहर का पाणी आता है। उस नाले को आगे पाणी जाने की छोटी जगह जिससे बरसात में यहा १५ साल से बाढ आती है । इस बाढ को रोकने के लिए क्या उपाययोजना बनाई है ।
अ) इस नाले के प्रोटेक्शन वॉल अब तक क्यों नही बनाई गई है ? बडे नालों के लिए बजेट में कितना पैसा रखा गया है?
ब)ऐसे बडों नालों कव काम बाहर से कर्जा लेकर ही कर सकते है क्या? उमपा ऐसे महत्त्वपुर्ण काम के लिए फंड नही दे सकती है क्या?

उत्तर :-इस नाले को बांधणे काम प्रस्ताव हुडकों से कर्जा लेकर करने के लिए प्रस्तावित किया गया है ।
इस नाले को पोटेक्शन वॉल बनाने के लिए हुडकों लोन के लिए प्रस्तावित किया गया है । जो निधी मिलनेवाला है उस निधी से यह काम करने का प्रस्ताव है । हुडको से रू. ६.०० कोटी निधी लेने का प्रस्ताव है उसमें से एम. जे. पी व्दारा डायर्व्हसीफिकेशन बनाने के लिए अंदाजे ४.०० कोटी प्रस्तावित आहे.जो निधी बाकी बचनेवाला है उसमें से नाले के प्रोटेक्शन वॉल बनाने का प्रस्ताव है ।
इस तरह का बडा काम कर्जा लेकेभी किया जा सकता है । उल्हासनगर महान्नगरपालिका ऐसे महत्त्वपुर्ण काम करने के लिए फंड दे सकती है ।

मा. सचिव :-होय. आपले हे दोन प्रश्न तत्त्कालिन आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेब यांच्या कालावधीत प्रलंबित ठेवले होते.

मा.सचिवः- प्रश्न क्र. ६०६हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र६०६ :- १)सुवर्ण जयंती योजने अंतर्गत सन २००० व २००१ व २००१-२००२ वर्षी प्रशिक्षण, बॅंक लोन व रोजगार तसेच नागरी सुविधा यासाठी किती आर्थिक तरतुद आहे? आजपर्यंतया तरतुदीचा झालेला विनियोग तपशिलवार देण्यात यावा.
२)सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत असलेल्या आर्थिक तरतुदीच्या विनियोग करण्याचे अधिकार कोणाला आहेत? आजपर्यंत सदर तरतुदीचा विनियोग कोणाच्या सहीने अधिकाराने केली गेली?
३)सदर योजनेअंतर्गत झालेला भ्रष्टाचार किती रूपयांचा आहे?या भ्रष्टाचाराला जबाबदार कोण?

उत्तर :-१)सन २०००-२००१ या वर्षासाठी जिल्हानागरी विकास यंत्रणा यांचेकडुन नागरी विकास कामांसाठी रक्कम रू. ३३.३३ लाख व

--२२--

स्वयंरोजगारासाठी (बॅंक अनुदान) रू. १०.०४ लाख प्राप्त झाले असुन २००१-२००२ या आर्थिक वर्षासाठी रक्कम प्राप्त झालेली नाही. नागरी विकासाची कामे हाती घेणेसाठी प्रथम साहित्याची खरेदी करणे आवश्यक असुन निविदा मागविण्याची कार्यवाही चालु आहे.

२) प्रकल्प अधिकारी व योजनेवर तांत्रिक दृष्टया पर्वेक्षण करणारे अभियंता त्यांनी केलेल्या छाननी व परिक्षणानुसार तसेच त्यांच्या शिफारसी प्रमाणे आर्थिक विनियोग मा. आयुक्तांच्या नियंत्रणात केला जातो. उपायुक्त (मुख्यालय) व मूख्यलेखा अधिकारी यांचे संयूक्त स्वाक्षरीने धनादेशाचा विनियोग झालेला आहे.

३)सन २०००-२००१ या आर्थिक वर्षापुर्वी प्राप्त झालेल्या निधिच्या अनियमित वापराबददल लेखा परिक्षण अहवालावरून संबंधितांचे वर फौजदारी गुन्हे दाखल झाले असुन प्रकल्प अधिकारी श्री. विलास सोनावणे व कनिष्ठ अभियंता श्री. अनिल जयसिंघाणी यांना निलंबित करून विभागिय चौकशी चालु आहे. तसेच सदर बाबत विभागिय चौकशी पूर्ण झाले नंतर सदर प्रकरणी अधिक माहिती उपलब्ध होईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौर साहेब, प्रश्नावर चर्चा करण्याची मला काही आवश्यकता वाटत नाही. कारण की, बरीचशी उत्तरे दिलेली आहेत. परंतु काही उत्तरे मला असमाधानकारक वाटतात. माझी सदनाला व महापौरांना अशी विनंती आहे. ही जी उत्तरे दिलेली आहेत ती काही उत्तरे मला असमाधानकारक वाटतात. आणि ही सुवर्ण जयंती योजना जेव्हा पासुन सुरू झाली तेव्हा पासुन आजपर्यंत आपल्या शहराला या सुवर्ण जयंती योजनेने काय दिले? याचा उहापोह होणे आवश्यक होते. तसे पाहिले तर सुवर्ण जयंती योजनेमधन, जी शासन जी योजना राबवते त्याचा उपयोग किंवा उपभोग आपल्या शहराला जर घेता आला नसेल तर त्याला जबाबदार कोण आहे? आयुक्त साहेब जबाबदार आहेत की महापौर जबाबदार आहेत की, पदाधिकारी, अधिकारी जबाबदार आहेत? मला निश्चित येथे वास येतो आहे. किंवा अशी शंका येत आहे की, यामध्ये येथील प्रत्येक विभागाचे अधिकारी जे जे या सुवर्ण जयंती योजनेमध्ये संबंधित आहेत जसे सार्वजनिक बांधकाम विभाग, लेखा विभाग हे सर्व विभाग यामध्ये जबाबदार आहेत असे मला वाटते. आणि या दृष्टीकोनातुन या प्रश्नावर आता चर्चा करण्यापेक्षा जर आयुक्तांनी संबंधित सर्व विभागांची जर बैठक बोलविली तर या सुवर्ण जयंती योजनेवर पुर्नविचार करून मागील सर्व इतिहास जर तपासुन काढला तर यामधील नेमकी गोम तुमच्या लक्षात येईल. आणि सुवर्ण जयंती रोजगार योजना पुढे राबविता येईल. आयुक्त साहेब जरा याचे उत्तर दया ना.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी सुवर्ण जयंती रोजगार योजनेबाबत जो मुददा उपस्थित केला त्यांस मी पण सहमत आहे. आज महानगरपालिकेच्या पैशाचा एका कर्मचा-याने किंवा कनिष्ठ अभियंत्त्यांने अपहार केला तर त्यास निलंबित केले गेले. त्यांच्यावर कोर्टात खटला भरण्यांत आला. त्यानंतर सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे काम ठप्प पडले आहे. तर हे चुकीचे आहे. आज राज्य शासनामार्फत जिल्हाधिका-यांकडुन ४४ लाखाचा दुस-या टप्प्याचा निधी येऊन पडला आहे.



त्याबाबतचे काम ३१ मार्च पर्यंत जर आम्ही केले नाही तर ते पैसे (लॅप्स)व्यपगत होवून जातील. म्हणुन दुस-या टप्यात करावयाची जी कामे मंजुर झाली आहेत ती कामे मार्च महिन्यापुर्वी झाली पाहिजेत. जर कुणा कर्मचा-याने चुकी केली असेल तर त्यामुळे पुर्ण उल्हासनगर शहराची गैरसोय करणे सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे काम संपुर्ण महाराष्ट्रात चालु आहे. व येथे बंद आहे हे पुर्णपणे चुकीचे आहेआज जर कोणत्त्याही कर्मचा-यावर कारवाई करण्याचा प्रश्न आला किंवा खटला भरण्याचा प्रश्न आला. जेव्हा जेव्हा असे विषय महासभेपुढे आले तेव्हा जे कर्मचारी दोषी आहेत. त्यांना आम्ही कधीहि मदत केली नाही. त्यांच्यावर कायदेशिर कारवाई चालु आहे. माझा पण हाच प्रश्न आहे की, सुवर्ण जयंती रोजगार योजना बंद का आहे? व मला ऑगस्टमध्ये उत्तर दिले गेले आहे की, शहर अभियंता दुस-या टप्याची कामे चालु करणार आहेत. प्रगती पथावर आहेत यास चार महिने

झाले आहेत. ते काम अद्याप सुरू झालेले नाही. तर कृपया आपण आदेश देऊन दुस-या टप्यातील कामे ज्या ज्या विभागात, प्रभागात करावयाची आहेत ती कामे मार्च महिन्यापुर्वी झाली पाहिजेत जेणेकरून ४४ लाख रू. (लॅप्स)व्यपगत होऊ नयेत.

<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>महापौर महोदय,सुवर्ण जयंती योजने अंतर्गत जे अनुदान उल्हासनगर महानगरपालिकेला प्राप्त झाले होते. त्यासंबंधी काही कर्मचा-यांनी त्यामध्ये गैरव्यवहार केले असल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत. आणि केवळ या कारणामुळेच या कामाची गती कमी झाली आहे. सदरच्या कर्मचा-यांविरूध्द प्रकरण आता न्याय प्रविष्ट झालेले आहे. असे असले तरी त्या अनुदानापासुन नागरिकांनी वंचित राहु नये असा प्रयत्न मी करत आहे यासाठी मा. जिल्हाधिकारी यांना एक प्रस्ताव पाठविले आहे. या कामाचा फायदा सर्व शहरवासियांना मिळाला पाहिजे. अशी माझी इच्छा आहे. त्यासाठीच मी मागील जी कामे झाली आहेत त्याबाबत मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडे एक प्रस्ताव पाठविला आहे. त्यांनी अशी अट ठेवली आहे की, पहिले जे अनुदान दिले आहे त्याचे विनीयोग प्रमाणपत्र दिल्याशिवाय दुसरे काम होणार नाही. तर मी वैयक्तिकपणे सुध्दा त्यांना विनंती केली होती. व एक पत्र ही पाठविले होते. मी पुन्हा त्यांना विनंती करेन की, सोळा विनियोग प्रमाणपत्र सादर करणेची जी अट घातली होती. तिचावर विचार केला जावा. तसेच जे अनुदान प्राप्त झाले आहे. ते नागरीकांच्या हितासाठी उपयोगात आणता येऊ शकेल. तसेच यानंतर १० दिवसातच याविषयी एक सभा घेतली जाईल. त्यामध्ये या कामाचा आढावा घेतला जाईल. व कामाला गति दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> आयुक्त साहेब, मी जी सूचना मांडली की, सुवर्ण जयंती रोजगार योजनेमध्ये विलास सोनावणे नावाच्या कर्मचा-यास भ्रष्टाचारामध्ये अडकवल. त्याच्यावर आरोप सिध्द होतील न होतील हा कोर्टाचा विषय आहे. परंतु माझे असे म्हणणे आहे की, सुवर्ण जयंती रोजगार योजनेसंबंधी जे जे संबंधित विभाग होते त्यासंबधातले सार्वजनिक बांधकाम विभाग ,लेखा विभाग असे जे-जे संबंधित विभाग होते, त्या विभागांनी सुवर्ण जयंती रोजगार योजना राबविण्यासाठी काय काय भुमिका अदा केली. याचा आपण सखोल विचार केला तर त्यातील आपणास निश्चितच असे दिसेल की, इतर सर्वजण दोषी आहेत. नुसता एकटाच



विलास सोनावणे दोषी नाही आहे. इतर सर्व संबंधित विभागाचे लोक त्यामध्ये अटकलेले आहेत. असा निश्चित निष्कर्ष निघेल यासाठी मी तूम्हाला सूचना केली की, तुम्ही या सर्व संबंधितांची बैठक बोलावून , जेव्हा माझ्या प्रश्नावर खास करून मी जे जे प्रश्न विचारले त्यासंबंधी या बैठकीच्या माध्यमातून समाधानकारक उत्तर देऊ शकाल. किंवा या बैठकिच्या माध्यमातून मागील सर्व इतिहास तुम्ही शोधून काढु शकाल व निश्चितपणे भ्रष्टाचार उघड करु शकाल.

<u>मा.महापौर :-</u> पुढील प्रश्न पुकारला जावा.

<u>मा. सचिव :-</u> प्रश्न क्र. ६०७ श्रीमती सुनिता राजवानी यांचा आहे. त्या या सभेत अनुपस्थित असल्याने त्यांचा प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र६०७ :- १)</u>कॅम्प नं. १ से ५ तक दि. १. ४.२००१ से आज तक कितने अनाधिकृत बांधकाम तोड दिये गये? उसका नाम और पता दिजिए?
२) अवैद्य निर्माण तोडने के बाद जो इमारते फीर से खडी हो गई उसपर क्या कारवाई की गई?

३)कॅम्प नं. १ से ५ तक के अनाधिकृत बांधकाम विभाग के कौन कौन से बीट मुकादमोने सिंन्सीअर ड्युटी की है?
४)अनाधिकृत बांधकाम विभाग में अब तक कितने मुकादमों को ससपेंड किया गया? कितनों पर पेनल्टी लगाई गई? और किस नियम के अनुसार उनको फीर से काम पर लिया गया?
५) जो अवैद्य निर्माण तोडे गये थे जो आज फीर से बन गये इसके लिए जिम्मेदार कौन है?

उत्तरः-१)सोबत यादी जोडली आहे.
२)अशी बाबत क्षेत्रिय अधिकारी यांचे मार्फत निदर्शनास आणण्यात आलेली नाही. तथापि अशी घटना घडलेल्या निदर्शनास आणुन दिल्यास कारवाई करण्यात येईल. तसेच अनिाधिकृत बांधकाम तोडण्यात आल्यानंतर पुन्हा बांधले केले असल्यास त्याबाबत तपासणी करून अहवाल सादर करणेबाबत क्षेत्रिय निरिक्षक यांना देण्यात आलेले आहेत.
३)कॅम्प क्र. १ ते ५ मधील बीट मुकादम हे दिलेल्या जबाबदा-या पार पाडतात.
४) दि. १४.२००० पासुन कॅम्प नं. १ ते ५ मधील कोणत्त्याही मुकादमाविरूध्द अद्याप कारवाई करणेत आलेली नाही. अतिक्रमण विभागात बदलुन येणारे कर्मचारी हे मा. आयुक्त साहेब यांच्या आदेशानुसार प्रशासकीय कारणास्तव बदली होवून येतात.
५)अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधीतावर कारवाई करणेत येईल.

मा. सचिवः-प्रश्न क्र. ६०८ हा श्री. सेवलदास ठकुर यांचा आहे.



प्रश्न क्र६०८ :- आपसे यह अनुरोध किया जा रहा है की इस सवालों को पुरा ब्योरा / विवरण लिखित दे.
१)सन १९९७ से अब तक हर साल कितने सी. सी. पॅसेज कहॉ और कभी बनाए गए उनका काम किस कॉस्ट्रक्टर को सौपा गया?
२)हर साल सी. सी. पॅसेजों पर कितना और कहॉ कहॉ खर्चा हुआ कृपया इसका विवरण वार्ड अनुसार और स्थानिक अनुसार लिखित दे.
३)क्या अब तक जो सी.सी पॅसेजों बनाए गए वे सही सलामत है? कितने?
४)बहुत सारे सी. सी. पॅसेज का निर्माण खराब हो चुका है और बहुत सारे तोडे जा चुके है उनके लिए कौन जिम्मेदार है?
५)क्या इनके निर्माण के वक्त और बिल पास करने से पहले, जॉच की गई थी कि सही मटेरियल का उपयोग किया गया है कि नही?

उत्तरः-१)सन १९९७ से अब तक जितने भी सी. सी. पॅसेज बने है और जिस किसी भी ठेकेदार ने बनाए उनका रिकार्ड सा. बां. वि. में उपलब्ध है आप जब भी चाहे देख सकते है.
२)हर साल सी. सी. पॅसेजों पर जितना भी खर्चा किया गया है वह प्रभाग नगरसेवकोंके स्वेच्छा निधी प्राप्त होने के बाद किया गया है उसका विवरण सा. बां. वि. सेक्शन में उपलब्ध है आप जब भी चाहे देख सकते है.
३)जो भी सी. सी. पॅसेज बनाए गये है वह सही सलामत है काम पुरा होने के बाद ठेकेदार की छः महिने तक अनामत रक्कम रखी जाती है.
४)जो भी सी. सी. पॅसेज बनाए बये है. सभी सी. सी. पॅसेज सही सलामत है.
५)सी. सी. पॅसेज निर्माण के वक्त मटेरियल की जांच की जाती है उसकी बाद ही ठेकेदार का बिल अदा किया जाता है. जो भी काम किया गया है वहा सही मटेरीयल उपयोग में लाया गया है.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-महापौर साहेब, आयुक्त साहेब, उपमहापौर साहेब, १९९७ पासुन जे सी सी. पॅसेज झालेले आहेत. व गटारे तयार करण्यांत आलेली आहेत. त्याविषयी मी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर बरोबर नाही. त्याबाबत संबंधितांनी खुलासा केला जावा. ९७ पासुन किती सी.सी. पॅसेज केले आहेत. कोणकोणत्त्या ठेकेदाराने केले आहेत त्याची यादी आपण दिली नाही.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-मा. महापौर साहेब, १९९७ पासुन आता २००१ वर्ष चालु आहे. म्हणजे चार वर्ष झाली या चार वर्षातील सी. सी. पॅसेजच्या कामाची यादी फार मोठी होईल. यासाठी आपणांस जी काही माहिती हवी असेल ती सार्वजनिक बांधकाम विभागातुन मिळेल.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :-मला एकटयाला माहिती नको आहे. संपुर्ण सभागृहास माहिती हवी आहे. त्यामध्ये किती भ्रष्टाचार झाला आहे? आपण यादी दिलीत तर मी सांगु शकेन ना किती किती भ्रष्टाचार झाला आहे. आम्ही आपणांकडुन यादी मागीतली आहे. आपण म्हणता तेथे येऊन पहा. तर काय संपुर्ण सभागृह तेथे जाऊन पाहणार आहे काय? हा जो प्रश्न मी



विचारला आहे. सभागृहास माहित होण्यासाठी जेणेकरून सभागृहात यावर चर्चा व्हावी.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-यादी सध्या तयार नाही. पुढच्या सभेत दिली जाईल.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-पुढच्या सभेत दयाल? सर्व सभागृहास /सदस्यांना यादी मिळाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-जेवढया काही सदस्यांच्या प्रभागात १९९७ पासुन २००१ पर्यंत जे सी. सी. पॅसेज तयार केले आहेत त्याच्या माहितीची यादी मिळत असेल तर जे लोक पुढील निवडणुकीत उभे राहणार आहेत. त्यांना आपल्या प्रभागात आपण काय काय कामे केली हे सांगण्यास पुरावा मिळेल. फक्त ती प्रभाग निहाय तयार केली जावी.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-दुसरा प्रश्न असा की, त्यामधील किती सी. सी. पॅसेज सध्या सुस्थितीत आहेत? ते सुध्दा स्पष्टपणे सांगा, आहेत की नाहीत की, अशीच बिले तयार केली आहेत?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-त्या यादीमध्ये तपशिलवार माहिती दिली जाईल.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-व यापैकी किती बिलांचे पेमेंट अदा केले आहेत?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-जेव्हा यादी तयार केली जाईल तेव्हा हि माहिती सुध्दा दिली जाईल.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-मा. आयुक्तांना माझी विनंती आहे की, आता थोडाच कालावधी बाकी आहे. यानंतर एकच सभा होईल. माझी पुर्ण सभागृहास सुचना आहे की, या प्रकरणामध्ये कमीत कमी दोन-तीन करोड रूपयांचा अपहार आहे. तर या प्रकरणाच्या चौकशीचे काम ठाणे येथील

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर्जा नियंत्रक (क्वालिटी कंन्ट्रोल)विभागाकडे दिले जावे. जशी हे यादी देतील तशी ती तात्काळ त्या विभागाकडे चौकशी साठी देण्यांत यावी. त्यानंतर त्यांचा जो अहवाल येईल तो सभागृहासमोर ठेवला जावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आमचे मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर म्हणतात की, या विभागाने केलेल्या सर्व कामांची माहिती तिकडे पाठवुन दया. परंतु जो कुणी सदस्य बांधकाम विभागाच्या कामात समाधानी नसेल त्याने आपल्या प्रभागापुरते बोलावे. कुण्या सदस्यास या



कामांबाबत शंका असेल किंवा कुणी आपल्या प्रभागात काम करवुन घेऊ शकला नसेल....

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-हा शहराचा प्रश्न आहे. शहरामध्ये कुठेही सी. सी. पॅसेज दिसुन येत नाहीत. आम्ही नगरसेवक पुर्ण शहराच्या हितासाठी केवळ प्रभागासाठी नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-उल्हासनगर महानगरपालिकेत पहिली दोन वर्ष शिवसेना भाजपाचा कारभार राहिला. व तीन वर्षापासुन आमची सत्ता आहे.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-हे जे सी.सी. पॅसेज तयार झाले आहेत ते तीन वर्षामध्ये तयार झाले त्यानंतर ते तयार करण्याचे बंद झाले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-जो सदस्य सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांसंबंधी समाधानी नसेल त्याच्या प्रभागातील कामाची यादी पाठविली जावी.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-कृपया खुलासा केला जावा. आपण खुलासा करा ऐवढया मोठ्या अपहाराचे प्रकरण आहे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री. सेवलदास ठाकुर यांनी जर तक्रारीचा निश्चित तपशिल दिला तर चौकशी करणे योग्य होईल. आपली तक्रार आहे ती मोघम आहे. मोघम तक्रारी वरून चौकशी करणे मुश्किलीचे होते. सदस्यांनी आरोप सभागृहासमोर ठेवले व निश्चित अशी तक्रार केली.तर अशा तक्रारीची चौकशी केली जाते. मोघम तक्रारी बाबत खुप त्रासाचे होते. व चौकशी करणे मुश्किलीचे होते.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-साहेब, शहरामध्ये सी. सी. पॅसेज नाहीच आहेत. हे मोघममध्ये येते का? एवढे सी.सी. पॅसेज तयार केले म्हणतात शहरामध्ये ते नाहीच आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-याबाबत मला एकच खुलासा करायचा आहे. महानगरपालिका जे पण काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करते.जसे कुठे सी.सी. पॅसेज तयार केला तर ते काम करणा-या ठेकेदाराची अनामत रक्कम देणे सहा महिने थांबवुन ठेवली जाते. सहा महिन्यानंतरही जर त्याचे काम चांगल्या प्रतीचे असल्याचे आढळुन आले तर त्याची अनामत रक्कम परत केली जाते. म्हणजे तो मुददा सहा महिन्यापर्यंत असतो. जर त्या ठेकेदाराचे काम चांगल्या प्रतीचे नसेल तर ते पुन्हा करून घेतले जाते. किंवा त्याची अनामत रक्कम परत दिली जात नाही. व जे डांबरी रस्त्याचे काम असते त्याबाबत प्रत्त्येक ठेकेदार जेव्हा करार करतो. तेव्हा त्या करारामध्ये असा खंड एक असतो की, सहा महिन्याच्या आत जर त्यांनी केलेले काम

खराब झाले तर तो ते काम पुन्हा तयार करून देईल. किंवा त्याची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

--२८--

मा. महापौर :-प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-मा. महापौरजी, मागील सभेत आश्वासन दिले होते की, पुढील सभेत प्रश्नोत्तराची वेळ दोन तासाची केली जाईल. आता फक्त एकच तास झालेला आहे. व आमचे बरेचसे प्रश्न प्रलंबित आहेत ते केव्हा पुर्ण होतील? श्री.बी. बी. मोरे यांना न्याय केव्हा मिळेल?

मा. महापौरः-आपण आज सभागृहात येण्यापुर्वी सभागृह नेत्याने निवेदन केले होते की, प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा ठेवला जावा. कारण की, आजच्या सभासुचनेवर बरेच विषय आहेत. ते सर्व कामकाज पुर्ण करायचे असल्याने व कायदयानुसार प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासा ऐवजी दोन तास करता येण्यासारखा नसल्याने प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचाच ठेवावा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-निवडणुका येतात तेव्हा लोकांना सांगतात की, आम्ही २४ तास काम करू आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर राहु. व सभागृहात बसतात तेव्हा म्हणतात की, सात वाजत आले आहेत. सभासुचनेवरचे विषय पुर्ण करायचे आहेत. निवडणुकांच्या वेळेला मोठ-मोठया गोष्टी करतात.

मा. महापौर :-श्री. पंजाबी साहेब, प्रश्नोत्तराचा कालावधी दोन तास करण्यास सभागृहात कुणाचीही हरकत नाही. परंतु कायदयात तरतुद नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-विधी अधिका-यांना विचारा. ते सांगतील ना?

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-तसे तर अर्ध्या तासाचीच वेळ आहे. एक तासाची वेळ कायदयात नाही. अर्ध्या तासाची वेळ वाढवुन एक तास केली जाते. तर एक तासाचे दोन तास का नाही केले जाऊ शकत?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आचारसंहितेपुर्वी सर्व प्रश्न चर्चेस आले पाहिजेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आमचा विषय हा आहे की, आपण सभागृहामध्ये बसुन जाहिर केले होते की, पुढच्या सभेत प्रश्नोत्तराचा कालावधी दोन तासाचा केला जाईल. तर आमचा कायदा तोच आहे.कुणी आम्हाला शिक्षा करणार आहे? फाशी देणार आहे? किंवा सदस्यत्त्व अपात्र होणार आहे की, ज्यामूळे प्रश्नोत्तराचा तास एक तासाऐवजी दोन तास केला म्हणुन.

मा. महापौरः-मी प्रश्नोत्तराचा कालावधी दोन तासाचा केला नव्हता. आपणाशी माझे सभागृहाबाहेर बोलणे झाले होते. सभागृहात अशाप्रकारचे काही आश्वासन मी दिले नव्हते.

--२९--

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-महापौरांच्या आसनावर बसलेल्या व्यक्तीने तसे जाहिर केले होते. प्रश्नोत्तराचा कालावधी दोन तासाचा केला तर केला आहे.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा. महापौरजी, मागच्या सभेत तुम्ही आला नव्हतात मागची सभा दुपारी ३ वाजता ठेवली होती. प्रश्नोत्तरे दोन तास चालविण्यासाठी ४ ऐवजी ही सभा दुपारी ३ वाजता ठेवली होती. व ही सुचना मा. सभागृह नेत्यांचीच होती.

मा. सदस्य श्री. नरेंद्र रजानी :-लोकांच्या हितासाठी आपण नियम तोडले तरी त्यात काही नुकसान नाही. त्याबाबत आपणांस काय शिक्षा भोगायची आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, मागच्यावेळी आपण सभेत अनुपस्थित होतात. आपली तब्येत बरोबर नव्हती त्यामुळे उपमहापौर साहेबांनी महापौरांच्या खुर्चीत बसुन सभेचे कामकाज चालवले. त्यावेळेला आम्ही सभेचे कामकाज पुढे ढकलले होते. त्यावेळी आमचे सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, येणा-या महासभेत प्रश्नोत्तराचा कालावधी दोन तासाचा केला जावा. त्याबाबत जेव्हा आमच्या सचिव साहेबांना विधी अधिका-यांना याबाबत कायदेशिर मत विचारले तेव्हा त्यांना सांगितले की, कायदयानुसार अर्ध्या तासाची वेळ आहे. परंतु ती आपण एक तास केली आहे. आमचे प्रथम महापौर श्री. गणेश चौधरी यांनी प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा एक तास केला होता. तर आज जसेही महासभेचे कामकाज सुरू झाले तेव्हा मी ही हरकत घेतली की, प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचाच ठेवला जावा. त्यावेळेला भाजपाचे गटनेता श्री. प्रकाश माखिजा हे सुध्दा सभागृहात उपस्थित होते. तर मी म्हंटले होते की, आज प्रश्नोत्तराचा कालावधी कृपया एक तास केला जावा. व आपण त्यास संमती दिली होती. तर सर्व सदस्यांचे हे मत आहे की प्रश्नोत्तराचा कालावधी आज एक तास चालावा. व पुढील २० तारखेला एक तास चालावा. निवडणुक आयुक्तांचे जे निर्देश आले आहेत त्यानुसार मार्च महिन्यापर्यंत आम्ही सभा घेऊ शकतो. फक्त धोरणात्मक कोणताही निर्णय घ्यायचा नाही. त्यानुसार आमचे जेवढे काही प्रश्न आहेत ते मार्च पर्यंत पुर्ण होतील. जर पुर्ण झाले नाहीत तर त्यावेळेला आम्ही एक तासाचे दोन तासच काय तीन तास करून शेवटच्या सभेत प्रश्नोत्तरे पुर्ण करू. माझी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती आहे की, आजच्या सभेत सुरवातीस याबाबत चर्चा झाली होती. व आपण निर्णय दिला होतात की, प्रश्नोत्तरे एक तास चालतील.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा. महापौरजी, मी पुन्हा विनंती करतो की, व काही गोष्टींचा पुर्नउच्चार करतो. निवडणुकीच्या वेळेला आम्ही नेहमी म्हणत असतो की, आम्ही २४ तास काम करू आपल्या सेवेस तत्पर आहोत. परंतु जेव्हा या सभागृहात येतो तेव्हा ते विसरून जातो. असा विचार करतो की, आपणांस जनतेस धोका दयायचा आहे. आपण उशीरा पर्यंत बसु शकत नाहीत का? सभासुचनेवरील सर्व कामकाज उरकायचे आहे तर आपण उशिरा पर्यंत बसु शकत नाहीत का? महिन्यातुन एक दिवस तर आपली



सभा होते. आपणांस लोकांची ऐवढी सुध्दा कदर नाही की, आपण दोन तास उशिरा पर्यंत सभागृहात बसावे. इकडे लोक ओव्हरटाईम करतात. कर्मचारी बसण्यास तयार आहेत व आम्ही बसण्यास तयार नाही. सात वाजता आम्हाला सभागृहातुन बाहेर पडायचे आहे?

मा. महापौर:-माझी काही हरकत नाही. परंतु आज सभागृह नेत्त्यांनी सभागृहास विनंती केली आहे. ठिक आहे. पुढच्या वेळेस दोन तास प्रश्नोत्तरे चालवु. आज प्रश्नोत्तरे एक तास चालवु. पुढच्या सभेत सर्वांची सहमती झाली तर प्रश्नोत्तरे दोन तास चालवु. यामध्ये काही हरकतीची गोष्ट नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-आपण जबाबदारी टाळत आहात.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-मा. महापौर, सभागृहातील सर्व सदस्य तयार आहेत त्यामध्ये हरकत काय आहे? व सभागृहाबरोबर आपणांस रहाणे आवश्यक आहे.

मा.महापौर:-मला काही हरकत नाही. सभागृहाची इच्छा असेल तर मला काही हरकत नाही.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-आपण तर म्हणाला होतात की, शहरासाठी मी प्राण सुध्दा देण्यास तयार आहे. आता प्रश्नोत्तरे दोन तास करण्यासाठी सर्व सदस्य तयार आहेत. वेळच दयायची आहे. तर आपण त्यास वेळ दयावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आजच्या सभासुचनेवरील विषय अतिशय संवेदनाशिल आहेत. तरी सर्व सभागृहास माझी विनंती आहे की, आज सभासुचनेवरील विषय घेतले जावेत. कारण की, मागे दोन वेळा सभा स्थगित झाली आहे. कृपया सभा सुचनेवरील विषय घ्यावेत.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा. महापौरजी, मागील महासभेस जेव्हा आपण नव्हतात तेव्हा पिठासिन अधिका-यांच्या खुर्चीत बसुन मा. उपमहापौरांनी आदेश दिला होता की, पुढील महासभेत प्रश्नोत्तराचा कालावधी दोन तासाचा केला जाईल. असे सर्वानुमते ठरले होते. ते इतिवृत्तांतात सुध्दा आले आहे. पिठासिन अधिका-यांनी दिलेला निर्णय जर मा. सभागृह नेत्त्यांच्या निवेदनानुसार जर बदलले जात असेल तर ते योग्य नाही.कारण की, त्या खुर्चीत बसलेल्या माणसाने जो निर्णय दिला त्याचा आदर झाला पाहिजे.

मा. महापौर:-मा. उपमहापौरांनी पिठासिन अधिका-यांच्या आसनावर बसुन जो काही निर्णय दिला आहे त्याचा आम्ही आदर करतो व त्याबाहेर आम्ही जाऊ ही इच्छित नाही. परंतु आज सभागृह नेत्त्यांनी जी विनंती केली आहे की, आजच्या सभा सुचनेवर बरेच विषय आहेत. त्यामुळे आजची सभा सोडुन दुस-या सभेत आपली इच्छा असेल तर प्रश्नोत्तराची वेळ दोन तास करू.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-येणा-या २० तारखेच्या सभेत?



मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-त्यासभेत प्रश्नोत्तराची वेळ दोन तासाची ठेवाल?

मा. महापौर:-आयुक्त साहेब, काही सांगु इच्छितात, कृपया दोन मिनिटे ऐकुन घ्या.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):- महापौर महोदय, प्रश्नोत्तराच्या कालावधीबाबत माझे विचार मी सभागृहासमोर ठेऊ इच्छितो कोणतीही संस्था ही वैधानिक संस्था असते. तीचे कामकाज चालविण्यासाठी नियम तयार केले जातात. व कोणत्त्याही संस्थेचे काम नियमानुसार असले पाहिजे. असा सुध्दा एक संकेत आहे. मला असे वाटते की, हे जे उपविधी तयार केले आहेत. त्यात प्रश्नोत्तराची अर्ध्या तासाची तरतुद केली आहे. तर नियमानुसार प्रश्नोत्तराची वेळ अर्ध्या तासाचीच असली पाहिजे. परंतु उपविधी मध्ये दुरूस्ती करून प्रश्नोत्तराची वेळ एक तास दोन तास करू शकता. तरतुदीच्या विरूध्द कामकाज चालविले तर मला वाटते ते नियमानुसार नाही. ते चुकीचे आहे व ते कामकाज सुध्दा चुकीचे होऊ शकते असे माझे मत आहे. मला आपणांसर्वांना व पिठासिन अधिका-यांना अनुरोध करायचा आहे की, कोणत्त्याही सभेचे काम नियमानुसार, उपविधीनुसार किंवा कायदयानुसार चालले पाहिजे. असे कायदयाच्या कक्षेबाहेर जाऊन निर्णय घेणे योग्य नाही. पिठासिन अधिका-यांना अधिकार जरूर आहेत. परंतु अधिकार कोणत्त्या तरतुदीनुसार असतात. जर उपविधीमध्ये काही तरतुदच नसेल तर त्यांना अधिकार आहेत. परंतु येथे विशेष करून तरतुद आहे. तीच्या बाहेर जाणे योग्य नाही. व ते बेकायदेशिर ठरेल असे माझे मत आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. महापौरजी, मी आयुक्तांचे म्हणणे भिन्न आहे. हे नियम तयार केले आहेत ते सरकारने तयार केलेले नाहीत. हे नियम आम्ही तयार केले आहेत. इथे सभागृहात बसुन आम्ही ही नियमावली मंजुर केली आहे. व सर्व ठिकाणी लोकशाही पध्दत सारखीच आहे. सभागृहात जी प्रथा असते किंवा पिठासिन अधिकारी जे निर्णय घेतात तेच मानले जातात. असे आम्ही टिव्ही वर पाहिले आहे. वर्तमानपत्रामध्ये वाचले आहे. विधानसभेत कधी प्रश्नोत्तराचा कालावधी वाढविला जातो तर कधी प्रश्नोत्तराचा कालावधी कमी केला जातो. हे त्या वेळेनुसार असते व हे नियम आम्ही तयार केले आहेत. जे सरकारने नियम तयार केले आहेत, पाच वर्षानी शिक्षण मंडळाच्या निवडणुका झाल्या पाहिजेत ते नियम आपण पाळत नाहीत. जे नियमानुसार आहे. आम्ही नियम तयार केले आहेत. आमचे स्वतःचे नियम आहेत. आम्ही हे तर करू शकतो ना? आम्ही सभागृहाच्या मतानुसार काहीही करू शकतो. सात वाजल्यानंतर बसु शकत नाही असा काही नियम आहे काय? आमची इच्छा असेल तर आम्ही सभेची वेळ वाढवु शकतो. अशी नियमावलीमध्ये तरतुद आहे. सात वाजेपर्यंत सभेचे कामकाज चालविले पाहिजे असा नियम आहे परंतु आम्ही ८-९ वाजेपर्यंत कामकाज चालवितो. तर ते बेकायदेशिर होईल काय?असे कधी झालेले नाही.



मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, सन्माननिय सदस्यांनी जे सांगितले की, हे उपविधी सभागृहाने तयार केले आहेत. मी मानतो उपविधी सभागृहाने तयार केले आहेत. परंतु वारंवार त्यामध्ये बदल तर होऊ शकत नाहीत ना? उपविधी किंवा नियम सभागृहाने जरूर बनविले आहेत. परंतु त्यामध्ये विधीवत बदल केल्याविना आपण बदल करू शकत नाहीत. असे मला वाटते. उपविधी तयार करण्याचा आपणांस जरूर अधिकार आहे आपण ते तयार केले आहेत. त्यामध्ये बदल केल्यानंतर आपण प्रश्नोत्तराच्या वेळेमध्ये एक तासाचा दोन तासाचा असा बदल करू शकता. परंतु उपविधी मध्ये बदल झाला पाहिजे त्याविना आपण करू शकत नाही असे मला वाटते व वारंवार प्रत्येक सभेत वेगवेगळी वेळ तर ठेऊ शकत नाही. प्रत्येक वेळी आपण त्यात बदल करू शकत नाहीत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, आयुक्त ज्या विषयावर तर्क करत आहेत. तो तर्क येथे योग्य नाही. सभागृहाने जे नियम तयार केले आहेत त्यामध्ये सभागृहच बदल करू इच्छित आहे. वाढवु का इच्छित आहे? एक तासा ऐवजी जर महापौर म्हणत असतील की, पाच मिनिटाची वेळ ठेऊ असे जर होत असेल तर ते चुकीचे आहे. कारण की, त्यामुळे आम्ही सदस्यांना प्रश्न विचारण्यापासुन वंचित ठेवत आहोत. आम्हाला असे वाटते की, जेवढे प्रश्न आहेत तेवढे पुर्ण झाले पाहिजेत. लोकांची कामे पुर्ण झाली पाहिजेत. आम्ही प्रश्नोत्तराची वेळ वाढवु इच्छित आहोत त्यासाठी आम्ही उशिरापर्यंत बसण्यास तयार आहोत.त्यास आयुक्तांची काही हरकत नसावी. लष्कराने असा नियम केला आहे की, डावा पाय पहिला उचलला जावा. जर अशी काही परिस्थिती असेल की, डावा पाय उचलल्याने मी जर दरीत पडणार असेल तर मी उजवा पाय उचलेन त्यावेळी नियम खडयात जाईल. मला माझ्या इच्छित स्थळापर्यंत पोहोचायचे आहे. काम करायचे आहे. माझ्या कामामध्ये काय सुविधा होतील, कामाच्या सुविधेसाठी भलेही मी एखादा नियम तोडत असेल तर त्यावेळी समजा नियम तोडला तर त्यामुळे कुणाचे नुकसान होणार आहे काय? नुकसान हेच होईल की, कदाचित काही अधिका-यांना येथे अधिक वेळ बसावे लागेल. त्याबाबत अधिका-यांची हरकत आहे का? आम्ही लोकप्रतिनिधी येथे बसण्यास तयार आहोत. याने विषय येथे संपतो.

मा. महापौर :-ठिक आहे. श्री. किशोर वनवारी आपण बोलु इच्छिता?

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी:-सभागृहात जी चर्चा चालु आहे. मी सुध्दा सभा चालु होण्यापुर्वी आपणांस हेच म्हंटले होते की,आज प्रश्नोत्तर एक तास चालले पाहिजे. त्यास प्रत्येक सदस्य वेगवेगळया प्रकारे घेत आहे. कोणी म्हणतो आधीच्या महापौरांचा अपमान आहे. २४ तास काम करण्याचे आश्वासन दिले होते. २४ तास काम करण्याचा महासभेशी काय प्रश्न आहे? २४ तास आम्ही प्रभागात रहातो, काम करतो, हे शहरास दिसते. जे काम करतील तेच पुन्हा निवडुन येतील. ते येथे सांगण्यांस आपणास वेळ नाही. आठ वाजेपर्यंत बसु शकत नाहीत. काय काय वाद करत आहेत याबाबत मला दुःख होत आहे. मुददानिहाय बोलले तर बरे होईल. व जसे मी सांगितले की, याबाबत आमच्या सचिव साहेबांनी व विधी अधिका-यांनी खुलासा केला

--३३--

आहे की, फेब्रुवारीमध्ये निवडणुका झाल्यानंतर जोपर्यंत नवनिर्वाचित महासभा गठित होत नाही. तोपर्यंत आमच्या महासभा होतील. शेवटच्या महासभेत सर्व प्रश्नोत्तरे पुर्ण करू. तर त्यासाठी मध्येच डिसेंबर महिन्यामध्येच प्रश्नोत्तरे पुर्ण करण्याची जरूरत नाही. दोन वेळा सभा तहकुब झालेली आहे. त्यामुळे आजच्या सभासुचनेवर जे १४ विषय आहेत. त्यावर बरीच चर्चा होणार आहे. यासाठी आजच्या महासभेत प्रश्नोत्तराची वेळ एक तासाची ठेवावी. जसे मी पहिलेच सांगितले होते. माझ्या भावनेशी सर्व सहमत होतील अशी माझी विनंती आहे. जे प्रश्न प्रलंबित आहेत. ते याच निर्वाचित महासभेच्या कार्यकालावधीत पुर्ण केले जातील.

मा. महापौर:-विषय क्र. २.

मा. सचिव :-विषय क्र. २.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-मा. महापौरजी, उपमहापौरजी व आयुक्त साहेब जकाती बाबतचा जो विषय आहे तो घेतला जावा. कारण की, तो शहराचा खुप मोठा मुददा आहे. त्यासाठी तो विषय प्रथम घेतला जावा. अशी आमची विनंती आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-साहेब, सभासुचनेवरील अनुक्रमांकानुसार विषय घेतले जावेत.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरे:-मा. महापौरजी, सभा सुचनेवर जसे विषय क्र. आहेत, १,२,३,या क्रमानेच विषय घेतले जावेत. दुसरा विषय मध्येच घेतला जाऊ नये.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-श्री. भुल्लर महाराज, श्री. भिमसेन मोरे व श्री. लाल पंजाबी सांगत आहेत तसे, तसेच आजच्या सभासुचनेवर हा विषय १४ व्या क्रमांकावर आहे. आज आम्ही पहिल्या क्रमांकापासुन सुरवात करत आहोत. १४ विषय पुर्ण होत नाहीत तोपर्यंत महासभेचे कामकाज पुर्ण होणार नाही. यासाठी पहिले जे काही मुदयांवर चर्चा न करता याच मुदयांवर चर्चा करायची आहे. सभासुचनेनुसार विषय चर्चेस घेतले तर सभा सुचनेवरील कामकाज आज आम्ही पुर्ण करू.

मा. सचिव :-विषय क्र. २ मागील सभेचे दि. २०.९.२००१, १९,१०,२००१ व ३१.१०.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत. ठिक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-प्रत्येक सभेत नाल्या संदर्भाचा मुददा उपस्थित होतो. इतिवृत्त कायम करताना ती एक डोकेफोड आहे. हा मुददा निर्णायीत काढा ना?

मा. महापौर:-आयुक्त साहेबांनी मागील सभेत आपणांस सांगितले होते की,...

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आपण निर्णय दिल्यानंतरही कार्यवाही होत नाही.

मा. महापौरः-त्यांनी जी कार्यवाही केली आहे. त्याचीही माहिती आपणांस त्यांनी दिलेली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-काहीच माहिती दिलेली नाही याबाबत.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय,भुल्लर साहेबांनी मागील महासभेत याबाबत प्रश्न विचारला होता. हा प्रश्न नियमित सभा सुचनेवर नाही आहे. व मागील वेळेस मी त्यांना याबाबत उत्तर दिले आहे. तीन महिन्या नंतर विचारतील तर त्याचे उत्तर दिले जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- तर इतिवृत्त कायम करण्यास माझा विरोध आहे. आपण इतिवृत्त कायम करा माझा त्यास विरोध आहे कारण की, आपण काम करत नाहीत.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-महापौरजी, मागच्या महासभेत भुल्लर महाराज यांच्या प्रश्नासंबंधी श्री. पानपटटे (उपायुक्त) यांनी सांगितले होते की,तेथे केलेले बांधकाम दोन -तीन दिवसात तोडले जाईल त्याचे काय झाले?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तो मुददा नाही आहे. नाला काढण्याचा मुददा आहे. लोकांच्या घरामध्ये पावसाचे पाणी शिरत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मागच्या सभेत मा. महापौर आपल्या व मा. उपमहापौरांच्या अनुपस्थितीत सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी व सदस्यांनी सर्वसंमतीने निर्णय घेऊन मला पिठासिन अधिका-यांच्या आसनावर बसविले होते. त्यावेळी सुध्दा महाराजजी यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी श्री. पाणपटटे साहेबांनी असे उत्तर दिले होते की,आजच मी ते बांधकाम तोडुन आलो आहे. त्यावेळी महाराजजी यांनी असा मुददा उपस्थित केला होता की, त्यातील काही भाग तोडायचा राहुन गेला आहे. तर त्यावेळेला मी आयुक्तांना सांगितले होते की, आपण याबाबत उत्तर दया.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- ते बांधकाम त्यांनी तोडले आहे. मुददा नाला काढण्याचा आहे,त्यांनी नाला बंद केला आहे. याविषयाबाबत आम्ही लक्षवेधी सुचना मांडली होती. त्यावेळी आपण असा निर्णय दिला होता की, हा नाला एक महिन्यामध्ये मोकळा केला जाईल. आज सहा महिने होऊन सुध्दा तो नाला मोकळा केला गेला नाही. त्याचे कारण काय?

मा. महापौरः-मी आयुक्तांना निर्देश देतो की, जे बांधकाम तोडण्यांत आले आहे. व त्यांनतर व जे नाला काढण्याचे काम आहे. ते काम तात्त्काळ करण्यासाठी आपल्या कर्मचा-यांना त्यांनी आदेश दयावेत.

मा. सचिव :-इतिवृत्त कायम?



मा. महापौरः-मागील सभांचे दि. २०.९.२००१, १९,१०,२००१ व ३१.१०. २००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिवः-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मंजुर?

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- श्री. शंकर मालवणकर, लिपिक यांना मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे फौजदारी आरोपाखाली निलंबनाधीन ठेवणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

ज्याअर्थी श्री. शंकर मालवणकर, लिपिक दिनांक २/११/१९९६ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत लागुन सध्या अनाधिकृत बांधकाम विभागात कार्यरत असताना यांनी तक्रारदार श्री. दिनेश मोदमल जव्हाराणी यांचे उल्हासनगर-३ येथे चालु असलेले बांधकाम प्लान प्रमाणे नसुन ते वाचवायचे असेल तर २० ,०००/- रूपये रक्कमेची मागणी केली होती. त्या रक्कमेपैकी काही रक्कम स्विकारताना दिनांक ३.७.२००१ रोजी श्री. शंकर मालवणकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी /कर्मचारी यांचेकडुन पकडण्यात आले होते. व दिनांक ४.७.२००१ रोजी त्यांचे विरूध्द मध्यवर्ती पोलीस स्टेशन उल्हासनगर-३ जिल्हा ठाणे येथे अटक करण्यात आली होती.

कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रावि/आस्था/टे-६/३४ दिनांक ६ जुलै २००१ अन्वये श्री. शंकर मालवणकर यांना महापालिकेच्या सेवेतुन निलंबित करण्यात आलेले आहे.

सबब श्री. शंकर मालवणकर (निलंबित) तत्त्कालीन रोड मुकादम अनाधिकृत बांधकाम विभाग यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१) (ब) नुसार महासभेपुढे ठेऊन निलंबन कायम करणे प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १७ दिनांकः-१२ .१२ .२००१

सुचकाचे नाव :- श्री. रामभाऊ आढाव.
अनुमोदकाचे नाव :- श्री. सेवलदास ठाकुर

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. शंकर मालवणकर, लिपिक यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--३६--

मा. सचिव :-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मंजुर ?

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- श्री. जेठानंद शर्मा, मुकादम यांना मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे फौजदारी आरोपाखाली निलंबनाधीन ठेवणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

ज्याअर्थी श्री. जेठानंद शर्मा, रोड मुकादम दिनांक १४/२/१९८५ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत लागुन सध्या अनाधिकृत बांधकाम विभागात कार्यरत असताना यांनी तक्रारदार श्री. दिनेश मोदमल जव्हाराणी यांचे उल्हासनगर-३ येथे चालु असलेले बांधकाम प्लान प्रमाणे नसुन ते वाचवायचे असेल तर २०,०००/- रूपये रक्कमेची मागणी केली होती. त्या रक्कमेपैकी काही रक्कम स्विकारताना दिनांक ३.७.२००१ रोजी श्री. जेठानंद शर्मा यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी /कर्मचारी यांचेकडुन पकडण्यात आले होते. व दिनांक ४.७.२००१ रोजी त्यांचे विरूध्द मध्यवर्ती पोलीस स्टेशन उल्हासनगर-३ जिल्हा ठाणे येथे अटक करण्यात आली होती.

कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रावि/आस्था/टे-६/३४ दिनांक ६ जुलै २००१ अन्वये श्री. जेठानंद शर्मा यांना महापालिकेच्या सेवेतुन निलंबित करण्यात आलेले आहे.

सबब श्री. जेठानंद शर्मा (निलंबित) तत्त्कालीन रोड मुकादम अनाधिकृत बांधकाम विभाग यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१) (ब) नुसार महासभेपुढे ठेऊन निलंबन कायम करणे प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १८ दिनांकः-१२.१२.२००१

सुचकाचे नाव :- श्री.बनवारी ढेणवाल.

अनुमोदकाचे नाव :- श्री. जयकुमार केणी.



हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. जेठानंद शर्मा रोड मुकादम यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

मंजुर?

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- लोकशाहिर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा तहसिलदार कार्यालयाजवळील चौकामध्ये बसविणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार लहुजी मातंग समाज सेवा यांनी खालील चार जागेवर पुतळा बसविणेसाठी प्रस्तावित केले होते.

१. महानगरपालिकेसमोरील चौक हायमास्ट जवळ (खाली)
२. पवई येथील डॉ. मुखर्जी यांचे पुतळयासमोर (पवई) ऑफिसच्या रस्त्याच्या बाजुला.
३. तहसिलदार ऑफिस जवळील चौक.
४. कॅ. नं. ७ मधील दसरा मैदानामध्ये.

विकास आराखडयानुसार तहसिलदार ऑफिस जवळील चौकामध्ये लोकशाहीर साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यास वाहतुकीच्या दृष्टीकोनातुन योग्य होणार आहे. तरी प्रकरणात सदर चौकामध्ये कोणताही पुतळा विद्यमान स्वरूपात अस्तित्त्वात नसल्याने सदर ठिकाणी पुतळा बसविण्याचा संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यास हरकत नाही असे स्पष्ट अभिप्राय नगररचनाकार यांनी दिलेला आहे. त्यानुसार तहसिलदार ऑफिस जवळील चौकामध्ये पुतळा बसविण्यासाठी महासभेची मान्यता घेऊन सदरचा



प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी नकाशा पाठवावा लागेल तरी सदरचा प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १९ दिनांकः-१२ .१२.२००१

सुचकाचे नाव :- श्री. बी. बी. मोरे.
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजु सोनावणे.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार विकास आराखडयाप्रमाणे तहसिलदार ऑफीसजवळील चौकामध्ये लोकशाहीर साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यास शासनातील आवश्यक विभागाच्या मान्यतेच्या अधिन राहुन मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर
महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ६ जो आहे त्याबाबत मा. निवडणुक आयुक्तांकडुन निर्बंध आलेले आहेत म्हणुन तो विषय चर्चेस घ्यायचा नाही. त्यासाठी तो विषय चर्चेस घेण्यांत येत नाही. हा विषय कबस्तान बाबतचा आहे.

मा. महापौरः-वरिल कारणामुळे विषय क्र. ६ सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :-सुधारित प्रारूप विकास योजनेतील सार्वजनिक सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयीसाठीचे आरक्षण क्र. १० वरील जमिनी पैकी

काही भाग मुस्लीम जमाती करिता संपादन करणे संबंधीच्या प्रस्तावाची शासनास शिफारस करणे बाबत.

मा. सचिव :-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.
मंजुर?

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- महानगरपालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभागातील भंगार साहित्त्याची विल्हेवाट लावणे कामी मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागातील झोन कार्यालयाच्या क्षेत्रात पडुन असलेल्या भंगार सामानाची विल्हेवाट लावणेसाठी खालीलप्रमाणे तक्ता तयार केला असुन प्रत्येक झोनच्या नं. समोर भंगार सामानाचे अंदाजित वजन व त्याची होणारी अंदाजित किंमत खालील प्रमाणे आहे.

--३९--

| अ.नु. | झोन नं. | अंदाजे एकुण वजन (मेट्रीक टन मध्ये) | दर | अंदाजित किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ३.०० | ५०००/- | १५,०००/- |
| २ | २ | ०.३० | ५०००/- | १,५००/- |
| ३ | ३ | ०.४० | ८०००/- | ३२,०००/- |
| ४ | ५ | १,१२५ | ८०००/- | ९,०००/- |
| ५ | ६ | ०,२२५ | ८०००/- | १,८००/- |
| ६ | ७ | १.०० | ८०००/- | ८,०००/- |
| | | ६.०५ | | ३८,५००/- |

तसेच मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक देखील सामानाची सदर किंमतीत विल्हेवाट लावणेसाठी संमती दिलेली आहे. वरीलप्रमाणे भंगार सामानाचे अंदाजित वजन ६.०५ मेट्रीक टन येत असुन त्याची अंदाजित किंमत रू. ३८,५००/- इतकी होत आहे. सदर भंगार सामानाची विल्हेवाट लावणेसाठी महासभेची मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २० दिनांकः-१२.१२.२००१

सुचकाचे नाव :- श्रीमती. ज्योती कालानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. भिमसेन मोरे.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार उपरोक्त महापालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभागातील भंगार साहित्त्यांची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

--४०--

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे:-या प्रस्तावास मंजुरी देऊ परंतु वाहन भत्ता किती?

मा. महापौर:-मोरे साहेब, कधी कधी दुस-यांनाही बोलण्याची संधी दया.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, प्रभाग समित्त्यांच्या सभापतींना दयावयाच्या प्रवास भत्त्याची जी १०,०००रू ची रक्कम आपण प्रस्तावित केली आहे ती कमी आहे. पुर्ण शहराच्या क्षेत्रामध्ये चार प्रभाग समित्त्यांचे क्षेत्र विभागले आहे. प्रभाग समित्त्यांच्या सभापतींना शहराच्या एक चतुर्थांश भागामध्ये जावे लागते. यासाठी विषय समित्त्यांच्या सभापतींच्या वाहन भत्त्यापेक्षा प्रभाग समितीच्या सदस्यांचा वाहनभत्ता जास्त असला पाहिजे. वीस हजार रूपये असला पाहिजे. आपण उलट त्यांचा वाहनभत्ता कमी केला आहे. यास्तव आमची विनंती आहे की, हा वाहनभत्ता वाढवुन २० हजार रू. करण्यांत यावा.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे :-कॉंग्रेस पक्षाचे गटनेते श्री. सेवलदास ठाकुर यांनी आता जे सांगितले परंतु मी माझ्या वतीने असे सांगु इच्छितो की, इथे १०हजार किंवा १५ हजारांचा प्रश्न नाही. प्रश्न आहे मान, सन्मानाचा. एका सभापतीला १५ हजार रू. दरमहा नियमितपणे दिले जातात. व एका सभापतीस दहा हजार रू......

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-एक लाख रू. दयावेत काय?

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरे:-महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली राहीली तर एक लाख रू. सुध्दा दिले जातील. तर माझे हे म्हणणे आहे की, मान सन्मानाचा प्रश्न आहे पैशाचा नाही. विषय समित्त्यांच्या सभापतींना १५ हजार रू. दिले जातात तर प्रभाग समितीच्या सभापतींना दहा हजार रू. दिले जातील हे बरोबर नाही म्हणुनच माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, यांना सुध्दा वाहन भत्ता १५ हजार रू. केला जावा.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा. महापौरजी, जसे की, दहा हजार रू. वाहनभत्ता देण्याबाबतचा ठराव मंजुरीस आणला आहे. परंतु तो चुकीचा आहे. जसे या दोघांनी म्हंटले तसे मी ही पंधरा हजार रू. वाहन भत्ता दयावा या मताशी सहमत आहे. कारण की, ३०.४.९७ चा स्थायी समितीचा जो ठराव आहे. तो ठराव यासाठी तयार केला होता की, महापालिकेची गाडी सभापतींना देण्या ऐवजी त्यांना वाहनभत्ता देण्याचे ठरले होते. जर सभापतींनी वाहनभत्त्यांचा घेतला नाही तर त्यांना महापलिकेची गाडी दयावी लागेल. व गाडीचा जो खर्च आहे त्यावेळी आयुक्त म्हणुन शुळ साहेब होते त्यांनी सांगितले होते की, ड्राइव्हर व पेट्रोलचा खर्च खुप होत होता. म्हणुन त्यांनी मानधनाचा मुददा काढला होता. आता इथे असे लिहिले आहे की, ड्राइव्हरचा एका दिवसाचा पगार १०० रू. परंतु सभापतींनी जर वाहनभत्ता न घेता अशी मागणी केली की, आम्हाला महापालिकेची गाडी पाहिजे तर काय महानगरपालिका त्यांना गाडी देईल काय? जर १० हजार रू. वाहनभत्त्यामध्ये

सभापतींना परवडत नसेल तर नियमानुसार १९९७ साली जो ठराव पारित केला आहे की,गाडीच्या बदली आपणास १५ हजार रू. वाहन भत्ता दिला जाईल. आपण १५ हजार न देता १० हजार रू. देत आहात. तर ते म्हणतील की, आम्हाला हे दहा हजार नको आहेत. महापालिकेची गाडीच हवी आहे. तर आपण चार सभापतींना, चार गाडया देऊ शकतो का? व चार गाडयांचा जो खर्च येथे दाखविला आहे तो अतिशय चुकीचा आहे. कारण की ड्राइव्हरचा पगार प्रत्येक दिवसाला १०० रू याप्रमाणे एक महिन्याचे तीन हजार रू. होतात. व त्यावेळी शुळ साहेबांनी स्थायी समितीमध्ये सांगितले होते त्यावेळी मी सुध्दा तेथे होतो तेव्हा त्यांनी सांगितले होते की, एक ड्राइव्हर महापालिकेने कामावर ठेवला तर त्याचे वर्षभराचे वेतन किती होईल? तसेच त्याला ज्या सुविधा दयाव्या लागतील त्यासाठी महापालिकेचा किती पैसा खर्च होईल हे त्यांनी सविस्तरपणे सांगितले होते. त्याचा विचार करूनच त्यावेळच्या स्थायी समितीने हा निर्णय घेतला होता की, सभापतींना गाडी देण्याऐवजी वाहनभत्त्ता देणे योग्य ठरेल. म्हणुन दहा हजारा ऐवजी पंधरा हजार रू. वाहनभत्त्ता दिला तर येणा-या नवनिर्वाचित सभापतींसाठीही योग्य राहील.

मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :-विषय याप्रकारचा आहे की, या शहराच्या महानगरपालिकेस अगोदरच आठ सभापती आहेत. त्यांना आपण वाहन भत्ता, दालन इत्यादी देत आहोत. आता चार सभापती आणखी वाढत आहेत. एकुण बारा सभापती होतात. बारा वाहन भत्ते, बारा दालने इत्यादी सर्व होतात. मुख्यत्त्वे करून आम्ही विषय समितीच्या निवडणुकीस विरोध केला होता. प्रभाग समित्त्यांचे सभापती निवडुन आले आहेत. प्रभाग समित्त्यांचे जे चार सभापती निवडुन आले आहेत तर आधीच्या आठ सभापतींचे काय? त्यांची वैधानिकता काय रहाते? त्यांचे काय काम राहते? एक तर या चार सभापतींना आम्ही बजेट देऊ शकत नाही. शहरामध्ये खर्च करण्यासाठी आमच्याकडे काही पैसा नाही. जेणेकरून काही काम करण्यासाठी यांना आम्ही देऊ शकु . दुसरे असे की, त्या आठ सभापतींची वैधानिकता काय? बाकी महानगरपालिकांमध्ये असे एखादे तरी उदाहरण दया की जेथे चार प्रभाग समित्त्यांचे सभापती पण आहेत. व त्याचबरोबर विषय समित्त्यांचे आणखी आठ सभापती आहेत. त्यामधील जी आवश्यक आहे जसे की, महिला बालकल्याण समिती ही आपणांसारखी बंधनकारक आहे. ती समिती ठेऊन बाकीच्या समित्त्या रदद करून त्यांचा वाहनभत्त्ता बंद करा. त्यांना दालने दयायची बंद करा.

मा. महापौरः-येथे हा प्रश्न नाही की, बाकीच्या सभापतींचे काय? तर येथे हा प्रश्न आहे की, वाहनभत्त्याचे काय?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-हा प्रश्न याच्याशी निगडीत आहे. आता नाही तर केव्हा हा प्रश्न विचारू?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आपणांस असा ठराव केला पाहिजे की, दुसरे जे सभापती आहेत त्यांची आम्ही निवड करणार नाही. कारण की, त्या आठ सभापतींची काही भुमिका रहात नाही. कारण की, काही काम नाही, आणि त्यांनी काही कामही केलेले नाही. सर्व सभापतींनी दोन-दोन वर्षामध्ये सभासुध्दा घेतलेल्या नाहीत. त्यांनी सभा घेतली ती फक्त सभापती आणि



उपसभापती यांची निवड करण्यासाठी कित्त्येक समित्त्यांच्या सभा सुध्दा होत नाहीत म्हणुन हा निधीचा अपव्यय आहे. म्हणुन या ज्या प्रभाग समित्त्या आहेत त्याबाबत आम्ही असे समजु शकतो की,त्या वैधानिक समित्त्या आहेत. अवैधानिक समित्त्या ज्या आहेत त्या बंद झाल्या पाहिजेत कारण की, त्या कोणत्त्याही महापालिकेत नाहीत.

मा.महापौर :-हा वाहनभत्त्याबाबतचा विषय आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, तसेही पुढील महिन्यापासुन आचारसंहिता लागु होत आहे. त्यावेळेस हे वाहनभत्ते बंद करावे लागतील. आमचा कालावधीही पुर्ण होत आहे. व आचारसंहितेच्या काळात वाहनभत्ता आपण देऊ शकत नाही. तर याचा काय अर्थ रहतो?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आता जो सभापतींना वाहनभत्ता देण्याबाबतचा जो प्रश्न आहे. त्याबाबत कॉंग्रेसचे गटनेते श्री. सेवलदास ठाकुर यांनी म्हंटले की, त्यांना वीस हजार रू. वाहन भत्ता दिला जावा. मोरे साहेबांनी म्हंटले की, मान सन्मानाचा प्रश्न आहे. पंजाबी साहेबांनी म्हंटले की, एक लाख रू. दया. तर मी याविषयाबाबत असे म्हणतो की, १९९७ पासुन सभापतींना जे १५ हजार रू. वाहन भत्ता म्हणुन दिले जातात. त्यानुसार यांना सुध्दा १५ हजार रू. वाहनभत्ता मिळाला पाहिजे. जसे आमचे बंधु श्री. महाडिक यांनी म्हंटले, १९९७ मध्ये आम्ही विरोधीपक्षीय म्हणुन होतो. त्यावेळेला भाजपा-शिवसेनेची सत्ता होती त्यावेळेला हा प्रस्ताव आलेला होता. व तो तत्कालिन आयुक्त श्री. शुळ साहेब यांच्याकडुन आला होता. त्यांनी स्थायी समितीत असे सांगितले होते की, जर आपण सभापतींना कार दयायची म्हंटले तर तीची देखभाल इत्त्यादीवरील खर्च पहाता महापालिकेस एक-एक सभापतीवरील खर्च ६० हजाराच्या पुढे जाईल. पेट्रोल, ड्राइव्हर, देखभाल दुरूस्ती खर्च, इत्त्यादीचा खर्च ६० हजारावर येईल. यास्तव हेच योग्य आहे की, आपण त्यांना १५ हजार रू. वाहनभत्ता म्हणुन दयावा. जेणेकरून ते आपली स्वत:ची गाडी घेऊन फिरू शकतील. व शहराच्या समस्या सोडवु शकतील. तसेच ज्या आठ विषय समित्त्या आहेत त्यासुध्दा वैधानिक समित्त्या आहेत. व ज्या चार नविन प्रभाग समित्त्या तयार झाल्या आहेत. ठाणे महानगरपालिकेत सुध्दा असेच चालले आहे. वैधानिक समित्त्याही चालु आहेत. प्रभाग समित्त्याही चालु आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-या आठ समित्त्या कुठेच नाहीत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मला माझे बोलणे पुर्ण करू दया ना?

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-जसे ठाण्यामध्ये आहे तसे आपण कबुल कराल?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी ':-आपण गप्प बसाल तर मी बोलेन. जसे प्रभाग समित्त्या नविन नविन तयार झाल्या होत्त्या. कल्याण व ठाणे येथे तेव्हा



विषय समित्त्या व प्रभाग समित्त्या या दोन्ही समित्त्या चालु होत्त्या. मी बोलत आहे कृपया आपण शांतता ठेवावी. जोपर्यंत प्रभाग अधिका-यांच्या नेमणुका होतील प्रभाग कार्यालये तयार होतील त्यानंतर प्राकलनेही तयार होतील. येणा-या अर्थसंकल्पामध्ये प्रभाग समित्त्यांच्या सभापतींसाठी आम्ही तरतुद करून ठेऊ. तोपर्यंत हे १५ हजार रू. वाहनभत्ता मंजुर करून यांना दिला जावा. व बाकीचे सभापती आहेत त्यांना येणा-या कालावधीत तशी तरतुद करुन दिली पाहिजे. जेणे करुन प्रभागात काम करु शकतील.

मा. महापौर :- १५ हजार, ठिक आहे.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :- माझी विनंती आहे जेव्हा पासून सभापती झाले तेव्हापासून देण्यात यावा.

मा.महापौरः- सभापतींची निवडणुका झाल्यापासून सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- प्रभाग समित्त्यांच्या सभापतींना वाहनभत्त्ता देणे कामी मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महानगरपालिकेने मा. स्थायी समिती यांचे ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.९७ अन्वये मा. महापौर, उप-महापौर, स्थायी समिती सभापती तसेच विविध समित्त्यांचे सभापती यांना चारचाकी वाहन देण्याऐवजी प्रतिमहा वाहन भत्त्ता देण्यात येत आहे. त्यानुसार आता चार प्रभाग समित्त्या गठीत होऊन त्यांचे सभापती नेमणूक सुध्दा झालेल्या आहेत. परंतु त्यांना आता पर्यंत कुठल्याही प्रकारचे चार चाकी वाहन देण्यात आलेले नाही. यासाठी सदर सभापतींना सुध्दा चार चाकी वाहन देण्याऐवजी १०००० रूपये प्रति माह देण्याचे प्रस्तावित आहे.

उल्हासनगर शहराचे एकूण क्षेत्रफळ १३ चौरस किती एवढे आहे. सदरचे क्षेत्रफळ मध्ये ४ प्रभाग समित्त्या समाविष्ठ आहेत याचाच अर्थ एका प्रभाग समितीचे क्षेत्रफळ अंदाजे जास्तीत जास्त ५ चौ. कि. मी. एवढे होईल. प्रत्त्येक प्रभाग समितीचे कार्यालय हे महापालिका मुख्यालयापासुन अंदाजे ५ कि.मी. एवढया अंतरावर आहे याचाच अर्थ एकूण एकव दिवसालाला जाणे येणेसाठी १० कि.मी. ऐवऐ अंतराची वाहनची धाव होईल. एक प्रभाग समितीचे अंदाजे क्षेत्रफळ ५ कि.मी. एवढे लक्षात घेता सभापतींना त्या विभागात एकूण १ दिवसाला १० कि.मी. फिरावे लागेल असे दिसते. तसेच अतिरिक्त १० कि.मी. धरून चालल्यास एकूण अशा प्रकारे एकव प्रभाग समिती सभापतीस १ दिवसासाठी जास्तीत जास्त ३० कि.मी. एवढे अंतर वाहनाची धाव होईल असे वाटते.

अशा प्रकारे १ दिवसाला एकव वाहनावर इंधनापोटी अंदाजे रूपये १५०/- खर्च अपेक्षित असून वाहन चालकाला प्रति दिन रूपये १००/- अपेक्षित



आहे. अशा प्रकारे एका महिन्यात इंधन + वाहन चालक असा खर्च मिळुन सुमारे रूपये ८०००/- खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे महिन्याला रूपये २०००/- रूपये वाहन मेंटेंनेन्स पोटी खर्च होईल. (अतिरिक्त देऊ केल्यास) म्हणजेच जास्तीत जास्त एकूण खर्च रक्कम रू.१००००/- अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी, व मुख्य लेखा परिक्षक यांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १९ (अ)(१)अन्वये कार्यवाही करणेस हरकत नसावी असे मत दिलेले असून प्रत्त्येक प्रभाग क्षेत्र सभापतींना रक्कम रूपये १००००/- प्रतिमहा वाहन भत्त्ता चार चाकी वाहन देण्याऐवजी स्थायी समिती ठराव क्रमांक. ६ दिनांक ३०.४.९७ अन्वये मंजुर अटी शर्ती नुसार देण्यास मान्यतेसाठी महासभेपुढे सादर.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २१ दिनांकः-१२.१२. २००१

सुचकाचे नाव :- श्री. बी. बी. मोरे.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता.

हि महासभा वरील प्रस्ताव आणि परिस्थिती विचारात घेता प्रभाग समित्त्यांच्या सभापतींना त्यांची निवड झाल्याच्या तारखेपासून रू. १५,०००/- प्रतिमहा वाहन भत्त्ता देणेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. कारण मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९चे कलम ४ (१)(ब अ) अन्वये प्रभाग समित्त्या आवश्यक प्राधिकारी आहे. आणि विशेष समित्त्या महासभेच्या

स्वेच्छानुसार रचनेस तरतुद आहे. म्हणुन विशेष समित्त्यांच्या सभापतीपेक्षा प्रभाग समिती सभापतींचा वाहन भत्ता कमी निश्चित करणेस अयोग्य होईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:- विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

मंजुर?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-नाही साहेब, सदरचा विषय पुढे ढकलला जावा. कारण की, ठिकठिकाणी रस्त्त्याचे काम चालु आहे त्यामुळे बस कुठे कुठे फिरेल?



मा. महापौरः-महानगरपालिकेचे जेवढे रस्ते तयार झाले आहेत. किंवा तयार होणार आहेत. हा एक वेगळा विषय आहे. या शहरामध्ये महाराष्ट्र राज्याची जी परिवहन सेवा आहे. ती योग्य प्रकारे चालत नाही. व सामान्य माणसास रिक्षाचे भाडे परवडत नाही, जो एखादी स्कुटर घेऊ शकत नाही. त्यांच्यासाठी या शहरात चांगल्या बस सेवेची आवश्यकता आहे. ते लक्षात घेऊन मी आयुक्तांना सांगितले होते की,कल्याण महानगरपालिकेचे जे आयुक्त आहेत त्यांच्याशी चर्चा करून ही सुचना महासभेसमोर आणावी व जर हे शक्य असेल तर कारण की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची बस सेवा भिवंडी पर्यंत बदलापुर पर्यंत जात आहे. तर उल्हासनगरमध्ये का नाही येऊ शकत? व सामान्य माणसासाठी ही बस सेवा एक चांगली सोयीची व सवलतीची बाब होईल. हे लक्षात घेऊन आम्ही हा प्रस्ताव महासभेसमोर आणला आहे. मी असे समजतो की, सर्व सन्माननिय सदस्य यास पाठिंबा देतील. व शहरवासियांसाठी आम्ही ही एक चांगली सुविधा उपलब्ध करून देत आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब, ती बस शहरामध्ये येताच वाहतुकीची कोंडी होईल. कारण की, आपणाकडे तेवढे रूंद रस्ते नाहीत. बस कुठे कुठे चालेल? याची सविस्तर माहिती दिलेली नाही. आम्ही कशी मंजुरी देणार?

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-सन्माननिय महापौर, उपमहापौर, व आयुक्त साहेब, उल्हासनगर शहरामध्ये जे काही ३३ रस्त्त्यांचे बांधकाम झाले आहे ते ही अर्धवट आहे. आणि दुस-या टप्यातील रस्त्याचे बांधकाम पुर्ण व्हावयास पाहिजे. बरेचसे रस्ते अजुनही अर्धवट आहेत. त्यांचे रूंदीकरण पुर्ण झालेले नाही. आणि आपल्या शहरात अगोदरच गेल्या पंधरा वर्षापासुन वाहतुक कोंडीची समस्या भेडसावत आहे. त्यामुळे शहर कितीवेळा बंद झाले किती वेळा वातावरण तंग झाले. याची महापौरांना पुर्णपणे जाणिव आहे. आणि अशा परिस्थितीमध्ये कल्याण महानगरपालिकेच्या बसेस आपल्या शहरामध्ये चालविणे म्हणजे परत वादविवाद आणि वातावरण तंग होणार आहे. तर मी आपणांस विनंती करतो की, कल्याण महानगरपालिकेच्या बसेस कृपया आपल्या उल्हासनगर महानगरपालिका परिसरात चालवु देऊ नयेत. कारण काय की, वाहतुक कोंडीची समस्या भरपुर आहे. कल्याण अंबरनाथ रस्ता घ्या किंवा

अन्य कुठलाही रस्ता घ्या. त्याठिकाणी पार्किंगची समस्या सुटलेली नाही. कल्याण अंबरनाथ रोड बाबत तीन तीन वेळा आम्ही वाहतुक पोलिसांशी चर्चा केली आहे. त्यामध्ये अद्याप कुठल्याही प्रकारचा ठोस निर्णय झालेला नाही. आणि पार्किंग दोन्ही बाजुला आहे. मुळात रोड शंभर फुटाचा आहे. आम्ही तुम्हाला मागणी करतो की, रोड शंभर फुटाचा करा. त्याला तुम्ही विरोध करता. आणि वरून सांगता की, शहराच्या दृष्टीने हिताचा निर्णय आहे की, लोकांना बस सेवेचा फायदा झाला पाहिजे. निश्चित झाला पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत. परंतु रस्ते रूंदीकरण करा शंभर फुटाचे रस्ते तयार करा. कल्याण अंबरनाथ रोड शंभर फुटाचा करा. बसेस येणार कुठे? थांबणार कुठे? त्याचा थांबा तरी आपण तयार केला आहे का अद्याप पर्यंत. त्यांना आपण परवानगी देणार आहोत. नेहरू चौक बघा, सिरू चौक बघा काय परिस्थिती आहे तेथे? इथे मुख्य बाजारात, लोक जाणार आहेत तेथील



परिस्थिती काय आहे? अजुनही आपणांकडे अर्धवट रस्ते बनले आहेत.अशा परिस्थितीत परवानगी देणे चुक आहे. मी महापौरांना विंनती करतो की, कृपया आपण कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बस सेवेस परवानगी देऊ नये.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मा. महापौर, हा विषय अतिशय महत्त्वपुर्ण असा विषय आहे. आम्ही शहरास एक नविन बस सेवा उपलब्ध करून दयावी. आणि ती ही काहीहि विचार न करता हे बरोबर नाही. त्याचे पुढे काय परिणाम होतील? शहरावर त्याचे काय परिणाम होतील? फायदा किती होईल, नुकसान किती होईल. वाहतुकीच्या काय समस्या निर्माण होतील. या सर्वांचा विचार करून वाहतुकीचे मार्ग कुठले असतील. या सर्व विषयांचा विचार केला पाहिजे. हा एक विषय आहे. तर दुसरा विषय असा की, आचारसंहिता जवळ जवळ लागु आहे. कोणत्त्याही निर्णायक विषयाच्या आधारावर, तर त्या आचारसंहितेनुसार कब्रस्थानचा विषय आज आपण चर्चेस घेतला नाही. त्यानुसार हा विषय सुध्दा आचारसंहितेचा आहे असे माझे व्यक्तीगत मत आहे. कदाचित दुस-यांचे मत नसेलही त्यामुळे काही वाद नाही. तिसरा विषय महत्त्वपुर्ण हा आहे की, आम्ही जर आपली स्वतःची बस सेवा येणा-या नवनिर्वाचित महासभेने आपली स्वतःची बससेवा का चालु करू नये? आपल्या शहरामध्ये, आमच्याकडे वाहतुकसेवा चालविण्याची पुर्णपणे व्यवस्था आहे. तर दुस-या महापालिकेस परिवहन सेवा चालु करण्यास देण्याऐवजी आपली स्वतःची परिवहन सेवा का चालु करू नये? व हा मुददा याच कारणांमुळे पुढे ढकलला पाहिजे. येणा-या नवनिर्वाचीत महासभेवर सोपविण्यांत यावा, रदद देखिल करू नये. यावर नीट विचार विमर्श करून गंभिरतेने विचार करून निर्णय घेतला पाहिजे. असे नाही झाले पाहिजे की, अचानक या शहरात परिवहन सेवा सुरू करण्यांत येईल आणि फायदयाऐवजी तोटाच होईल.व अजुन समस्या या शहरात निर्माण होतील. अशा कित्त्येक गोष्टीवर विचार करण्यासारखा आहे. व त्यानुसार आपण विचार केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौर साहेब, आता जी बससेवा चालु आहे त्याची आपण परवानगी दिली ।महे? कल्याण अंबरनाथ रोडवर जागोजागी बस थांबवण्यासाठी फलक लावले गेले आहे? ती परवानगी आपण दिली आहे का? परिवहन सेवा चालु केल्यावर महापालिकेला काय आर्थिक फायदा होईल? याचे उत्तर या सभागृहात दयावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौर, ३३ रस्त्त्यांचे काम अजुन अर्धवट आहे. व उल्हासनगर शहरात ज्या रिक्षा आहेत. जितक्या पाहिजेत त्यापेक्षा तीन चार पट जास्तच आहेत. रिक्षावाले इतके कमी भाडे घेतात. अशी परिस्थिती आहे की, उल्हासनगरहुन अंबरनाथला जी बस जाते कल्याणची

तिचे भाडे रिक्षापेक्षा जास्त आहे. जनतेला या परिवहन सेवेचा काही फायदा होणार नाही. ट्रॅफिकची समस्या वाढेल. रिक्षा ड्रायव्हर बेरोजगार होतील , त्यांचा आधीच धंदा होत नाही. रिक्षा कमी भाडे घेऊन चालवले

--४७--

जातात मीटर पध्दत इथे नाही. या बसेसना आणुन शहरातील रहिवाश्यांना बेरोजगार करणे ठिक नाही. माझ्यामते ठिक नाही. परिवहन सेवा सुरू केल्यामुळे भाडे कमी लागेल अशी काही व्यवस्था नाही. ते किती भाडे घेतील त्यांचे वेळापत्रक देखिल निश्चित नाही. कल्याणहुन कधी बस निघते एक कॅम्प नं. १ स्टॉपवर दोन दोन तास लोक वाट पाहत बसतात. हे सर्व लक्षात घेऊन यावेळी हा विषय मंजुर करू नये ते योग्य ठरेल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. महापौर,दुसरे असे की, कल्याण महापालिकेचे जे बजेट आहे. त्यात त्यांनी यासाठी तरतुद केली होती. जर आपल्याला स्वतःची बससेवा सुरू करायची असेल तर ती तरतुद करावी लागेल त्यांच्या बसेसचा आपल्याला काही फायदा नाही ते सरळ कल्याणहुन अंबरनाथला जातात. अंबरनाथ, टिटवाळा जातात. आपण स्वतःची परिवहन सेवा सुरू केली पाहिजे त्यांची सेवा नाही घेतली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे. या विषयावर काही सन्माननिय सदस्य सांगत आहेत की, ऑटोरिक्षा जादा आहेत. त्यांचाच धंदा होत नाही. कुणी सदस्य म्हणतात की, रोड ठिक नाही. त्यामुळे खुप नुकसान होते. मी हे म्हणु इच्छितो, व सदनासमोर आणु इच्छितो, काही सदस्य म्हणाले महापालिकेला काय फायदा होईल. उल्हासनगर महानगरपालिका या शहरात १३ कि.मी. च्या आत काही रस्ते बनवते, शौचालये बनवते, सी. सी. पॅसेज बनवते तेव्हा महापालिकेला काय फायदा होतो व काय तोटा होतो? हा महापालिका विचार करत नाही. महापालिका असा विचार करते की, जनतेची काही तरी सेवा केली पाहिजे. हाच फक्त फायदा महापालिकेचा आहे. तर मी सदनाला असे सांगु इच्छितो की, रिक्षावाल्यांचे कमीत कमी दोनशे रू. तरी धंदा दररोज होतो. असे काही नाही की, त्यांच्यावर बेकारी कोसळेल, त्यांच्या धंदयात नुकसान होईल. इथुन जर आपण सुभाष टेकडीला जायचे बोललो तर रिक्षावाले पंधरा-वीस रू घेतात. काही गरीब लोक अर्जंट तहसिलदार ऑफीसमध्ये जाऊ इच्छितात तेव्हा त्यांना रिक्षावाले पन्नास रू. मागतात. गरीब माणुस २५-५० रू. रोज कमवतो. जर ही सेवा सुरू झाली तर याचे वाजवी दर असतील. सर्वसाधारण माणसाला हे दर परवडतील. ही सेवा सुरू झाल्यावर शहरातील नागरिक महापालिकेला आर्शिवाद देतील. म्हणतील की, पोखरकर साहेब असताना चांगली सेवा सुरू करण्यात आली. व जनतेकडे त्यांनी चांगले लक्ष दिले आहे. म्हणुन माझे म्हणणे आहे की, बससेवा सुरू केली जावी या प्रस्तावाला संमती दिली जावी. विपक्ष सदस्यांना पण माझी विनंती आहे की, आपले अजुन दोन महिने शिल्लक आहेत विरोध करू नका. हे सर्वसंमतीने पारीत करा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u>सन्माननिय महापौर साहेब, सर्वात प्रथम शहरामध्ये ऐवढी ट्रॅफिकची समस्या आहे त्याबाबत आपण काही विचार केला आहे का? ट्रॅफिकचे जे अधिकारी आहेत किंवा आपले अधिकारी, त्यांच्याशी आपण विचार विनिमय केला आहे का? किवा गटनेत्त्यांना बोलावुन याविषयी बैठक घेतली आहे का? आपल्याला या बससेवेचा काय फायदा आहे? वा

--४८--

शहरामध्ये जे रिक्षाचालक आहेत त्यांच्याबाबतीत आपण काय निर्णय घेतला? रिक्षा चालक / मालक संस्था आहे त्यांना बोलावनु विश्वासात घेतले आहेत

की बस्स आपले आणि कल्याण महानगरपालिका आयुक्तांचे बोलणे झाले आणि आपण निर्णय घेतला. शहरामध्ये अजुन काही नागरिक आहेत. त्यांना विश्वासात घ्या ना हा निर्णय घेताना. ठिक आहे. शंभर टक्के फायदा लोकांना जरी असला तरी किती लोकांचे नुकसान होणार याचा आपण विचार केला का? हॉकर्स उभे राहतात म्हणुन त्रास होतो असे श्री. कुमार आयलानी यांचे म्हणणे आहे. तिथे जी स्कुटर पार्किंग आहे ती दिसत नाही यांना फक्त हॉकर्स दिसतात?

<u>मा. सदस्य श्री. ठाकुरदास बहरानी:-</u>हॉकर्स लोक उभे राहतात तिथे ट्रॅफिक जाम होते.

<u>मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u>नाही. नाही आधी मला बोलु दया. तुम्ही कशाला मध्ये बोलता. मी बोलत आहे ना? आधी मला बोलु दया. मी बोलत आहे मध्ये बोलायचे नाही. आधी माझे बोलणे पुर्ण होऊ दया. एक मिनिट किशोर वनवारी आधी मला बोलु दया. नेहरू चौक ते सिरू चौक जी भानगड होती ती संपली. आता नेहरू चौक ते गोल मैदान भानगड सुरू झाली आहे. आता तुम्ही म्हणता तिथे बसेस सुरू झाल्या पाहिजे. पार्किंगचा तिथे गोंधळ आहे. स्कुटर तिथे ठेवल्या जातात. तिथे वाहनतळ आहे. सर्व गाडया तिकडे पाठवुन दया. बस तिथुन जाईल आरामशिर. पार्किंगपण तिथे पाहिजे बस सेवा पण तिथेच पाहिजे. सर्वांना स्वत:ची गाडी सुध्दा तिथेच उभी करायची आहे असे कसे चालेल? याचा आधी निर्णय घ्या. पार्किंगची जागा रिकामी करा. वाहने बाजारात वगैरे उभी असतात. त्या गाडया सर्व पार्किंगच्या ठिकाणी पाठवुन दया.

<u>मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुर:-</u>ज्याकाही अडचणीच्या जागा आहेत तिथे बस सेवा पाठवु नये.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u>भाडे किती ठरवले आहे? लोकांना काय फायदा होईल?कोणत्त्या मार्गाने जाईल? कोणत्त्या मार्गाने कुठे जाईल?

<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-</u>मा. महापौरजी, परिवहन बस सुरू केल्यावर मिळणारे आर्थिक उत्त्पन्न कल्याण महापालिकेकडे जाईल. शहरातील रिक्षामध्ये बसल्यावर शहरातील लोक शहरातच खर्च करतील. त्यामुळे आपले उत्त्पन्न देखिल वाढेल.

<u>मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:-</u>महापौरजी, आता ज्या बससेवा चालु आहे त्याचे उत्त्पन्न काय महापालिकेला मिळते? तो पैसा पण शासनाकडे जातो ना? हे उत्त्पन्न कल्याणला जाईल, काय फरक पडणार आहे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता कल्याण महापालिकेची बससेवेला परवानगी दयायची की नाही हा जो विषय चालला



आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेची बस बदलापुर पर्यंत जाते, भिवंडी पर्यंत जाते. तिथे त्यांना कोणी थांबवत नाही. आज महापालिकेची आर्थिक स्थिती गंभीर आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन आपण स्वत:ची बससेवा तरतुद ठेऊन चालवु. तोपर्यंत काय करायचे? गरीब लोकांचा तर कोणी विचारच करत नाही. आज हा प्रश्न उपस्थित केला की, यांना विचारले का? त्यांना विचारले का? आपण बस सेवा सुरू कूठे करतो? हा प्रस्ताव मंजुर केल्यावर कल्याण-डोंबिवली महापालिकेचे अधिकारी येतील सर्व पक्षीय गटनेता यांना बोलावले जाईल. सर्वांना विश्वासात घेऊन जे मार्ग आपण ठरवु ३३ रस्त्यांमधील जे रस्ते अर्धवट आहेत तेथुन त्यांना जाण्याची परवानगी दयायची

नाही हे सर्व आपण सर्व पक्षीय गटनेत्त्यांची बैठक बोलावून ठरवु. निर्णय घेतल्यानंतरच बससेवा सुरू करायची. आज फक्त प्रस्ताव पास करायचा आहे. या बससेवा बाहेरच्या बाहेरून जातात जर आपल्या शहरातुन गेल्या तर बरे होईल. आज जी बससेवा सुरू आहे. त्यांचा पण तोच मार्ग आहे. पाच नंबरहुन बस सुटते कल्याणला जाते. कोणत्त्याही स्टॉपवर माणुस चढु शकतो. बदलापुरला बस जाताना आपल्या शहरातुन जाते त्यात जर एखादा गरीब माणुस चढला ज्याची रिक्षाभाडे भरण्याची ऐपत नाही. त्याला ते बरे होईल. अजुन ट्रॅफिक वाल्यांशी बैठक होईल त्यांच्याशी बैठक होईल. आता ज्या गटनेत्त्यांशी किंवा जर कालावधी संपला तर येणा-या गटनेत्त्यांशी बैठक घेऊन सर्वांना विश्वासात घेऊन नंतर ही सेवा सुरू करण्यात येईल. आज फक्त प्रस्ताव पास करायचा आहे. यासाठी कुणाची हरकत नसावी.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा. महापौरजी, आता जसे सभागृहनेता म्हणाले सर्व पक्षीय गटनेत्त्यांची बैठक घेऊन नंतर कोणत्त्या मार्गाने बस जाईल हे ठरवु हे साफ चुकीचे आहे. कल्याण परिवहन समितीची बस कोणत्त्या मार्गाने गेली पाहिजे याचा निर्णय कल्याण परिवहन समितीचे जे नगरसेवक निवडुन आले आहेत ते सदस्य निर्णय घेतील. कल्याण स्टेशन पासुन गोदरेज पार्क पर्यंत बस सुरू केली होती. त्याबाबतीत अजुन तिथे एकमत झाले नाही. त्यांचेच तिथे याबाबतीत अंतर्गत वाद आहेत. सभागृहनेता म्हणतात की, आम्ही उल्हासनगरचे नगरसेवक इथे बसुन निर्णय घेऊ की, बस कोणत्त्या मार्गाने जाईल चार नंबर मार्गाने जाईल की, तीन नंबर मार्गाने जाईल हे चुकीचे आहे. त्यांच्या माहितीसाठी मी हे सांगतो की, परवाच कल्याण परिवहन समितीमध्ये खुप वाद निर्माण झाला व दोन चार बस मार्ग बंद करण्यात आले. तर ही परिवहन सेवा आपली नाही कल्याण महापालिकेची आहे. कल्याण परिवहन समितीचे काय म्हणणे आहे? ती पण माहिती हवी. नाहीतर आपण इथे पारीत करू आणि तिथे ठराव पाठविला जाईल. नंतर ते म्हणतील आम्हाला हा मार्ग योग्य वाटत नाही. नंतर ते म्हणतील आम्हाला फायदा नाही. आम्ही या मार्गाने बस नेणार नाही तर उगाच आपली बदनामी होईल.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे :-सन्माननिय महापौरजी, आपले चांगले व तज्ञ बंधु श्री. प्रकाश महाडिक यांनी जे सांगीतले की, कल्याण बससेवा सुरू झाली तर काय होईल. आणि सभागृह नेत्त्यांनी सांगितल्यावर ते म्हणाले की, बस कोणत्त्या मार्गाने जाणार हे कल्याण महापालिका परिवहन समिती ठराव



करेल हे चुकीचे आहे.मी सांगु इच्छितो की, कल्याणची बस जेव्हा उल्हासनगरहुन जाईल तेव्हा आपण त्यांना विश्वासात घेऊन सांगु, सुझाव देऊ की आम्ही सांगितलेल्या मार्गाने बस जायला पाहिजे. आमचे विचार त्यांना ऐकावे लागतील कारण की, ते आपल्या शहरातुन जाणार आहेत. विरोध करायचा तर तुम्ही करू शकता परंतु काहीतरी कारण असले पाहिजे. परंतु मला असे वाटते की, हे कारण पुरेसे नाही. हा ठराव पास केला जावा.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-कोणताही मार्ग ठरवायचा असला तरी तो अगोदर परिवहन समितीसमोर मांडावा लागतो, याबाबतीत मला आयुक्तांचे म्हणणे पण ऐकायचे आहे. समजा आपली परिवहन सेवा असती आणि कल्याणवाले म्हणाले आधारवाडीला चला, तर तुम्ही पाठवाल का? हे चुकीचे बोलत आहेत. नव्या मार्गासाठी परिवहन समितीची मान्यता घ्यावी लागेल. आपण ठराव पारित केला आणि नाही झाले तर बदनामी होईल. मा. आयुक्तांनी जर याबाबत खुलासा केला तर आम्हाला अधिक माहिती मिळेल.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरेः-मा. महापौर, मला वाटते याचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा कारण त्यांनी हा प्रस्ताव आणला आहे. यात वाद निर्माण झाले आहेत. कुणी म्हणतो स्थायी समितीत निर्णय झाला तरी होईल. श्री. बी.

बी. मोरे साहेब म्हणतात आम्ही ठरवले तरी चालेल. त्यांची महापालिका त्यांची बससेवा आपण निर्णय घेणारे कोण? आपल्या रस्त्त्यावरून जाण्यासाठी ते परवानगी मागत आहेत. ती परवानबी आयुक्त देतील. म्हणुन आयुक्तांनी पुर्ण माहिती आम्हाला दयावी. कोणत्त्या मार्गाने बस जाणार आहे. जेणेकरून आमच्या सामान्य जनतेला याचा फायदा झाला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>मा. महापौरजी, याबरोबर अजुन एक महत्त्वाचा मुददा हा की, जेव्हा एखादे जड वाहन रस्त्त्यावरून जाते तेव्हा त्या रस्त्त्यावरील देखभाल दुरूस्ती खर्च वाढतो. या कल्याण परिवहन बससेवा सुरू करण्यात आली यापासुन मिळणारे उत्त्पन्न कल्याण महापालिकेला मिळते. आपल्याला यापासुन काय उत्त्पन्न मिळणार? रस्त्त्याच्या देखभाल दुरूस्तीच्या खर्चाचा बोजा आपल्यावर येऊन पडेल. आपली आर्थिक परिस्थिती तशी आहे का?

<u>मा. महापौरः-</u>मला वाटते की, आयुक्तांनी आपले म्हणणे मांडावे त्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर पोखरकर):-</u>महापौर महोदय, सन्माननिय सदस्यांनी, जो विषय आपल्या समोर ठेवला आहे त्यामध्ये कल्याण परिवहन सेवा उल्हासनगर महापालिका क्षेत्रात सुरू करावयाची आहे यासाठी पत्रव्यवहार आयुक्तांना करावयाचा आहे. पत्रव्यवहार करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यासाठी आपणासमोर विषय ठेवला आहे. बससेवा ही नागरी सेवा असते. विद्यमान परिस्थितीत उल्हासनगर महानगरपालिका स्वतःची बससेवा सुरू करू शकत नाही. हि वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मला असे वाटते की, जोपर्यंत आपली स्वतःची बससेवा सुरू करण्याऐवढी परिस्थिती



निर्माण होते तोपर्यंत नागरिकांना या बसव्दारे सेवा देणे आपले कर्तव्य ठरते. म्हणुन मी आपणाकडुन परवानगी मागीतली आहे. याचा अर्थ असा नाही की, बससेवा तात्त्काळ सुरू होईल. यासाठी बराच वेळ जाईल. माझी त्यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे. ते सर्व्हे करतील. आमचा पण विचार घेतील ज्या मार्गाने त्यांना आर्थिक फायदा होईल तो मार्ग ते निवडतील आम्हाला विचारतील. नो लॉस नो प्रॉफिट या तत्त्वावर ते बससेवा सुरू करतील. आचारसंहिता भंग होण्याचा काही प्रश्न निर्माण होत नाही कारण आता फक्त आपल्याला पत्रव्यवहार सुरू करायचा आहे. आता बससेवा सुरू करण्याचा प्रश्नच येत नाही. यासाठी एक वर्ष, दोन वर्ष किती वर्ष लागु शकतात हे मला माहित नाही. आधी मी त्यांच्याशी पत्रव्यवहार करेन. त्यांच्याकडुन संमती मिळाल्यावर मार्गाचा सर्व्हे केला जाईल. त्यांच्या आर्थिक बाबींचा अहवाल येईल. नंतर ही बससेवा सुरू करण्यात येईल. यात खुप वेळ जाण्याचा संभव आहे. व ही जी बससेवा सुरू होईल प्रत्त्येक नगराचीच बससेवा ही ना फायदा ना तोटा अशी असते. खुपश्या बससेवा या तोट्यातच चालतात.मला असे नाही वाटत की, त्यांनी जर बससेवा उपलब्ध करून दिली तर होणा-या नफ्याचा काही भाग आपणांस देतील. मी हे स्पष्ट करतो की, ही एक नागरी सुविधा आहे. जोपर्यंत आपली परिस्थिती सुधरत नाही तोपर्यंत आपण काही निवडक मार्गावर बससेवा सुरू करण्यास सांगु. आधी सर्व्हे होईल, रिपोर्ट येईल तुम्हा सर्वांना विश्वासात घेऊन नंतरच ही सेवा सुरू करण्यांत येईल. यात खुप वेळ जाईल. मला पत्रव्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करावे म्हणुन हा प्रस्ताव इथे मांडला आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u>आयुक्तजी, मला एक म्हणायचे आहे. उदया जर नवीन लोकप्रतिनिधी आल्यावर लगेच बससेवा सुरू होणार नाही. जर उदया नविन लोकप्रतिनिधीनी येऊन विचार केला आम्ही स्वतःची बससेवा सुरू करत आहोत. तर आपली ही पुर्ण मेहनत वाया जाईल.

मा. महापौरः-अजुन प्राथमिक टप्पा आहे. महापालिकेतर्फे आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करायचे आहे. मला असे नाही वाटत की, यावर कुणाची हरकत असेल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-गोषवा-यात थेट असे लिहिले आहे की, बससेवा सुरू करायची आहे.

मा. महापौरः-आयुक्तांनी स्वतः तसे स्टेटमेंट दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-गोषवा-यात असे लिहिले नाही की, पत्रव्यवहार करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करायचे आहे म्हणुन? त्यात असे काही नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-गोषवारा हा महत्त्वाचा असतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौर, आता आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले. काही लोकांनी कोड ऑफ कंन्डक्टचा मुद्दा काढला. ते स्पष्ट



म्हणाले की, तो हा मामला नाही. त्यानंतर त्यांनी स्पष्ट सांगितले की, दोन किंवा तीन वर्ष सुध्दा यासाठी लागतील. आज आपण ठराव पास करत आहोत. त्यात स्पष्ट व निश्चित असे लिहा की, सर्वांना विश्वासात घेऊन येणा-या नव्या जनप्रतिनिधी व आयुक्तांना जे मार्ग योग्य वाटतील त्याच मार्गावर आम्ही परवानगी देऊ. हे निश्चित असे ठरावात आले पाहिजे आयुक्तांना फक्त पत्रव्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करीत आहोत. त्यानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्व्हे करेल. त्यांना जे मार्ग योग्य वाटतील ते आपणांस देतील. त्यामधुन आपणाला जे योग्य वाटेल त्यावर आपण निर्णय घ्यायचा आहे. नंतर त्यावर अंमलबजावणी होईल हे सर्व निश्चित असे ठरावामध्ये आले पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आयुक्त साहेब असे म्हणाले की, हा धोरणात्मक निर्णय नाही आहे. मी आयुक्तांना सांगु इच्छितो दुस-या कोणत्या महापालिकेला बससेवा सुरू करण्याची परवानगी देणे किंवा न देणे हा काय धोरणात्मक निर्णय नाही?

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मला यात असे म्हणायचे आहे की, फक्त पत्रव्यवहार करण्यासाठी ठराव करण्याची काय गरज आहे? आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यासाठी ठराव मांडण्याची काय गरज आहे?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-फक्त कल्याण-डोंबिवली का?ठाणे, नवी मुंबई येथुन पण बससेवा सुरू करा. खुप जण येथुन कामाला जातात.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आयुक्त जर कल्याणच्या आयुक्तांना लिहितात की, तुम्ही प्रस्ताव पाठवा, तर निश्चितपणे तो प्रस्ताव महासभेसमोर मांडला जाईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-मा. आयुक्त, उलट आपण सभागृहाला मार्गदर्शन दिले पाहिजे की, हा धोरणात्मक निर्णय आहे. तुम्ही सहभाग घेऊ नका.

मा. महापौरः-मला असे वाटते, विपक्ष नेता गण यांना माझे निवेदन आहे की, निवडणुका लक्षात न घेता तटस्थ होऊन यावर निर्णय घ्यावा.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मला हे सांगा की, पत्रव्यवहार करण्यासाठी ठरावाची काय आवश्यकता आहे.

मा. महापौर :-आयुक्तांनी मोकळया मनाने सांगितले की, मला पत्रव्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करायचे आहे. तरी तुम्हाला वाटते की, बससेवा सुरू करण्यासाठी परवानगी मागत आहे. आज ठराव केल्यावर उदया लगेच सेवा सुरू होईल असे नाही. एक वर्ष, दोन वर्ष, तीन वर्ष सुध्दा लागु शकतात.



मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा. महापौरजी, आपण सांगा ना गोषवा-यात काय लिहिले आहे ते?पत्रव्यवहाराचा उल्लेखच केला नाही. वाच काय लिहिले आहे ते?

मा. महापौरः-ठरावात सुधारणा करून पास करत आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-महाराजजी, गोषवा-यात सुधारणा करीत आहोत. जोपर्यंत ते आपल्याशी मार्ग निवडणे बाबत संमती घेत नाही......

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-नाही. नाही. हा क्लीअर धोरणात्मक निर्णय आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मा. महापौर, मला मार्गदर्शन करावे. कोणत्त्याही आयुक्तांना कुणाशी पत्रव्यवहार करण्यासाठी कोणत्त्याही ठरावाची काय आवश्यकता आहे. आयुक्त स्वतः देखिल पत्रव्यवहार करू शकतात.

मा. महापौरः-तुम्ही आयुक्तांना विचारा ते उत्त्तर देतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-तुम्ही आताच म्हणाला होता की, ठरावामध्ये बदल करून पास करू. त्यांना फक्त पत्रव्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा ठराव करू. तुम्ही जर फक्त पत्रव्यवहारासाठी अधिकार देत आहात तर तो अधिकार तर त्यांना आधीच आहे,त्यांची कोणी अडवणूक करत आहे का की, तुम्ही पत्रव्यवहार करू नका. त्यांनी पत्रव्यवहार केल्यानंतर ते प्रस्ताव आणतील तेव्हा महासभा त्याचा स्विकार करेल किंवा स्विकार करणार नाही हे सरळ आहे. यासाठी ठरावाची काही आवश्यकता नाही.

मा.महापौरः-ऐवढी चर्चा झाल्यावर सदनाचे असे मत दिसते की, होऊ शकते विपक्ष नेता गणाचे मत वेगळे असु शकते. परंतु बहुमत असे आहे की, आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यासाठी ठराव पारीत करू या.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आम्ही कोणत्त्याही गोष्टीचा विरोध करत नाही. आमचे हे म्हणणे आहे की,.......

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आम्ही विरोध नाही करत. जेव्हा हे मार्गाची आखणी करतील तेव्हा ते महासभेसमोर आणले पाहिजे तेव्हा मंजुरी दिली जाईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-महाराजजी म्हणतात त्यास माझी पण संमती आहे की, हा ठराव पत्रव्यवहार आयुक्तांनी करण्यासाठी त्यांना प्राधिकृत करीत आहोत. परंतु जेव्हा मार्गाची आखणी करतील तेव्हा तो ठराव महासभेसमोर आणला जावा.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा. आयुक्त साहेब, ठाणे व नवी मुंबई महापालिका यांच्याशी पण याबाबतीत पत्रव्यवहार करा.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-महासभेमध्ये जर मार्ग आरवणी पध्दत मंजुर झाली तरच ही बससेवा सुरू करण्यात यावी.

मा. महापौरः-ठिक आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-आमचे म्हणणे हे आहे की, आपण याविषयाला पुढे ढकलावे. आपण त्यावर अभ्यास करू.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कशात-हेचा ठराव पारीत करत आहात. फक्त पत्रव्यवहार करण्यासाठी ना? बससेवा सुरू करण्यासाठी नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-तुम्ही म्हणता तसाच ठराव पारीत करत आहोत. फक्त पत्रव्यवहारासाठी मार्ग आरवणीचा प्रस्ताव आल्यानंतरच महासभेत मंजुर झाल्यावरच बससेवा सुरू करण्यात येईल.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वर सुचविलेल्या सुधारणेसह समंत करण्यांत येत आहे.

विषय :- कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेची परिवहन सेवा उल्हासनगर महानगरपालिकेला उपलब्ध करणे कामी मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेत स्वतःची परिवहन सेवा उपलब्ध नाही. उल्हासनगर परिसर परिवहन सेवा उपलब्ध करून दयावयाची असल्यास परिवहन अधिकारी यांचे पद भरणे व बस खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत स्वतंत्र परिवहन सेवा उपलब्ध आहे. त्यांच्या बसेस सेवा उल्हासनगर परिसर सोडुन आजुबाजुच्या काही भागात सुरू आहे. त्याकरिता मा. आयुक्त यांना महासभेने अधिकार देण्यात यावे की, उल्हासनगर परिसरात बस सेवा उपलब्ध करण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त यांचेशी चर्चा करून बस रूट तयार करून तात्काळ परिवहन सेवा उल्हासनगर परिसरात उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना योजावी.



तरी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची परिवहन सेवा उल्हासनगर महानगरपालिकेला उपलब्ध करून देण्यासाठीचा उपरोक्त प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

सुचकाचे नाव :- श्री. बी. बी. मोरे.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्रसिंह भुल्लर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची परीवहन सेवा उल्हासनगर महानगरपालिकेला उपलब्ध करणेकामी भाडे / आकार आणि परिवहन सेवेच्या विहित प्रवास मार्ग निश्‍चिती करिता पुढील महासभेच्या अंतिम मंजुरीस अधिन राहुन आयुक्तांना काटकसरीने व कार्यक्षमतिने उपक्रमांची पुर्तता करणेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. १०. हा जो विषय आहे मा. आयुक्त साहेबांनी विनंती केली आहे की, हा विषय आजच्या कार्यसुचीवरून काढण्यात यावा कारण अजुन काही प्राकलने आहेत.

मा. महापौरः-हा विषय याकरिता वगळण्यांत येत आहे. कारण आयुक्तांचे म्हणणे आहे हा विषय स्थायी समितीचा आहे. याबरोबर अजुन काही प्राकलने आहेत ती सर्व स्थायी समिती समोर आणली जातील म्हणुन हा विषय देखिल स्थायी समितीसमोर आणला जावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौर, हा विषय परत मागे घेण्यासाठी आयुक्तांनी पत्र दिले आहे. मला यावर खुलासा पाहिजे की, इतरही रिवाईज एस्टीमेट पडुन आहेत. ती स्थायी समिती समोर आणली जातील. तो स्थायी समितीचा अधिकार आहे. महासभेमध्ये हे रोड मंजुर झाले आहेत. ही प्राकलने ते कधी स्थायी समिती समोर आणणार? येणा-या आठवडयात स्थायी समिती सभेत प्राकलने आणणार की, कधी आणणार?



जरा यावर खुलासा करावा कारण रिवाईज इस्टीमेटसाठी नऊ दहा रोड प्रलंबित आहेत. ही सर्व प्राकलने स्थायी समिती पुढे कधी येणार?

मा. आयुक्त(श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, हा जो रिवाईज इस्टीमेटचा मुददा निघाला आहे. मला दर वेळेस या मुदयावर खुलासा दयावा लागतो. रिवाईज एस्टीमेट होणे जरूरी आहे. ही गोष्ट मी पण मानतो. परंतु आपणां सर्वांना हे माहित आहे की, आय.आर.डी.पी. चे जे रोड आहेत त्यांचे पेमेंट होत नाही. जेव्हा पेमेंट प्रतीपुर्ती होईल तेव्हा पुढील लोन आपल्याला मिळेल. मी मागील आठवडयात एम.एम.आर.डी.ए.च्या अधिका-यांशी चर्चा केली त्यांना इथे बोलावले होते. त्यांनी पण संमती दिली की, काम तर पुर्ण झाले आहे. रिबेसमेंटची जी कंन्डीशन आहे ती रिलेव्हंट नाही. जेव्हा एखादी संस्था लोन घेते, तेव्हा तीची आर्थिक परिस्थिती चांगली नसते म्हणुन ती लोन घेते. हि जी रिएंब्रेसमेंटची शर्त टाकली आहे. त्यांनी मान्य केले आहे मी तेथील

आयुक्तांना पत्र देखिल दिले आहे की, हि कंन्डीशन त्यांनी शिथिल करून लवकरात लवकर मी अशी आशा करतो की, आठ-दहा दिवसात मला त्याचे उत्तर मिळेल. तो निधी रिलिव्ह झाल्यानंतर रिवाईज एस्टीमेट करण्यात आपल्याला काही आर्थिक अडचण येणार नाही. मी अशी आशा करतो की, आठ-दहा दिवसात ही गोष्ट स्पष्ट होईल व लवकरच स्थायी समिती समोर ही प्राकलने ठेवण्यात येतील.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा. महापौर,आमचे सिमेंट ब्लॉकचे जे काम सुरू आहे. झुलेलाल मंदिर ते रेड क्रॉस त्यामध्ये फक्त ७० मी. चे काम राहीले आहे मध्यभागी. मी आयुक्तांना घेऊन प्रत्यक्ष तिथे दोन महिने अगोदर भेट दिली होती. आजपर्यंत ते रिवाईज इस्टीमेंट स्थायी समिती समोर आणले गेले नाही. तो रस्ता एम.एम.आर.डी.एच्या लोनमधुनच तयार केला आहे. हे तीन रस्ते होते उल्हासनगर क्षेत्रात. गोल मैदान, नेहरू चौक ते शिवाजी चौक त्यानंतर झुलेलाल मंदिर ते रेडक्रॉस पर्यंत. ७० मी. चा रोडचा तो भाग अजुन राहिला आहे. त्यामुळे रहदारीला अडचण होते. तिथे इतकी माती, धुळ उडते. आमच्या विधायकाच्या घरासमोरचा तो रोड आहे. त्यामुळे ते प्राकलन अत्यावश्यक आहे. प्राधान्याने ते प्राकलन स्थायी समिती समोर आणले गेले पाहिजे. आयुक्त साहेबांनी आम्हाला आश्वासन दयावे की, लवकरात लवकर ते एस्टीमेंट आणतील.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मला हे समजत नाही आपली महापालिका कोणत्त्या दिशेने जात आहे. आधी तर हे की, हा विषय महासभेसमोर कसा आणला गेला. जर तो स्थायी समितीचा विषय होता तर इथे आणण्याची काय गरज होती हा माझा पहिला प्रश्न आहे. महासभा ही स्थायी समितीपेक्षा श्रेष्ठ आहे. महासभेने असे म्हणावे की, स्थायी समितीला पाठवा? स्थायी समिती असे म्हणु शकते की, महासभेस पाठवा. जर एखादा निर्णय घेणे योग्य नसेल तर स्थायी समिती महासभेकडे पाठवते. महासभेमध्ये आलेला विषय स्थायी समितीकडे पाठवणे ही कुठली पध्दत आहे? ही काही प्रथा नाही. हे काही उचित नाही. महासभेत जे झाले ते झाले. आणि यामध्ये माझे पण दहा प्राकलन आहे. ते पण पाठवा याप्रकारची चर्चा महासभेत होणे योग्य नाही. हे कशाप्रकारे आपण महासभा चालवत आहोत. कार्यसुचीवर विषय आला आहे



महासभेसमोर ठेवण्यासाठी त्यात आपण हे ठरवायचे की, स्थायी समितीला पाठवा.

मा. महापौरः-आयुक्तांनी विनंती केली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-जर इथे विषय आला आहे तर निर्णय घेऊ या.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-जर स्थायी समितीने निर्णय घेतला की, महासभेकडे पाठवा तर काय करणार?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी,....

मा. महापौरः-आयुक्त साहेब, यावर खुलासा करा.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, रिवाईज एस्टीमेंटचा विषय महासभेसमोर आणला गेला आहे. प्रशासनाची थोडी चुकी झाली आहे. पुर्वी असा एक ठराव झाला आहे की, हे अधिकार स्थायी समितीला दिले गेले आहे. हे चुकीने महासभेसमोर आणले गेले आहे. म्हणुन तो विषय परत घेत आहोत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-माझा छोटासा प्रश्न आहे जेव्हा हे रोड मंजुर केले गेले तेव्हा हा रोड सुध्दा यात होता. स्थायी समितीने नव्हता मंजुर केला. या रस्त्याची जे बेसिक बजेट होते. त्याचे एस्टीमेट देखिल महासभेने मंजुर केले आहे. ते स्थायी समितीत नव्हते पाठवले. मा. चंद्रशेखरसाहेबांनी ही प्रथा आणली होती. शेवटचा आणि पहीलाच असा प्रस्ताव आहे तो महासभेने मंजुर केला आहे. कुणाचे वेगळे मत देखिल असेल, तुम्हाला असे वाटत असेल की, रिवाईज एस्टीमेंट पास न होवो. आता तर स्थायी समितीपुढे ढकलण्यांत यावा. तो विषय वेगळा. एकदा हा विषय महासभेसमोर आला आहे. महासभा मान्यता देऊ शकते का?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):- महापौर महोदय, जेव्हा मा. चंद्रशेखर साहेब आयुक्त म्हणून इथे होते, तेव्हा रस्ता रुंदीकरणाचा मोठा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्याचवेळेस आय.आर.डीपी चा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. माझ्या मते १९९७ चा एक ठराव आहे. त्यात प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे,असे स्पष्ट लिहिले आहे. हा प्रस्ताव चुकीने महासभेत आणला आहे. म्हणुन परत घेत आहोत. पुर्ण शहरासाठी धोरणात्मक निर्णय त्यावेळीच घेतला गेला होता. हा फक्त एकच रस्ता त्यात नव्हता. प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. असे ठरावात दिले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-यात बेसिक पॉइंट असा आहे. कुठे लिहिलेले नाही की, वित्तिय मान्यता देण्याचे अधिकार महासभेला नाहीत. हे बरोबर

--५८--

आहे की, प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत हे नमुद केले आहे. परंतु महासभा मान्यता देऊ शकत नाही असे कुठे लिहिलेले नाही. महासभा ही सर्वश्रेष्ठ आहे. जेव्हा स्थायी समिती एखादा ठराव पारीत करू शकत नाही तेव्हा तो महासभेसमोर मांडला जातो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-महासभेने पास केले तर बेकायदेशिर ठरेल का?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-तसे काही नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः-ठिक आहे. मग पास करू या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौर, आता जो मुददा उपस्थित केला आहे की, शहरातील रस्त्यांचा मुददा महासभेने मंजुर केला होता. त्यावेळी मा. आयुक्त चंद्रशेखर साहेब होते. त्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन हे ३३ रोड रूंदीकरणासाठी आणण्याचा प्रस्ताव महासभेसमोर ठेवला होता. आमचे मा. सदस्य श्री. लाल पंजाबी नेहमी म्हणतात जेव्हा भाजपा शिवसेनाचे राज्य होते तेव्हा ९० टक्के अधिकार स्थायी समितीला दिले होते. नियम उपनियिम बनवतेवेळी. हे नेहमी म्हणतात आणि आम्ही ऐकत असतो. आता आयुक्त म्हणाले की, ३३ रोड पैकी, कुठे ५ टक्के कुठे ३३ टक्के, कुठे १५ टक्के रस्त्याचे रूंदीकरण वाढले आहे. कोणताही नवा रस्ता प्रशासकीय व वित्तिय मंजुरीसाठी आणला नाही. कुठे काम वाढले आहे त्याचे रिवाईज एस्टीमेट बनवुन स्थायी समिती समोर आणणार आहे. आता हा मुददा महासभेसमोर आणला आहे. आयुक्तांनी आधीच पत्र दिले की, हे चुकीने आले आहे हा स्थायी समितीचा मुददा आहे.

इकडे विपक्ष सदस्य पास पास म्हणुन ओरडत होते.

मा.महापौर :-एक मिनिट, सभागृहनेत्त्यांना बोलु दया.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- हे कुठून शिकलेत मध्ये बोलायला. रिवाईज प्राकलने तयार झाली आहेत. आता पण जे मंजुर होत आहेत तो काय माझा रोड नाही. आयुक्त साहेब म्हणत आहेत की, दहा रोडच्या कामाचे रिवाईज एस्टीमेंट तयार आहे. त्यांचे म्हणणे आहे त्या दहाही एस्टीमेंट एकाचवेळी यावेत. यासाठी या एका एस्टीमेंटचा मुददा पुढे ढकलुन दहा रस्त्यांचा मुददा एकत्रितपणे स्थायी समितीपुढे आणला पाहिजे.

मा. महापौर:-मला वाटते की हा विषय स्थायी समितीचा आहे. व हे एकच प्राकलन नाही. अशी आणखी काही प्राकलने आहेत ती मंजुर व्हायची आहेत. म्हणुन आयुक्तांनी म्हंटले आहे की, दहा-बारा प्राकलने एकत्रितपणे मंजुरीसाठी मी स्थायी समिती पुढे ठेवेन. तर हे योग्य होईल की, हे प्राकलन सुध्दा स्थायी समितीकडे पाठवु या.



मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-हे आमचे प्राकलन नाही. हे प्राकलन आजच मंजुर करा.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा. महापौरजी, मा. सभागृहनेत्त्यांनी म्हंटले की, आमच्या कालावधीत स्थायी समितीला अधिकार दिले होते. परंतु आमच्या कालावधीत कधीही महासभेत आलेला ठराव स्थायी समितीकडे पाठविला नाही. हे चुकीचे आहे. आमच्या कार्यकालावधीमध्ये असे कधी झाले नव्हते. आपल्या कार्यकालावधीमध्ये हे नविन नविन पध्दती सुरू झाल्या आहेत.

मा. महापौर :-सभागृहाने हे स्विकारले आहे की, हा प्रस्ताव महासभेपुढे चुकीने आला आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-आपणच प्रस्ताव महासभेसमोर आणता आणि आपणच पुन्हा तो मागे घेता.

मा. महापौर:-मला वाटते की,श्री. विनोद तलरेजा यांनी खेमाणीच्या रस्त्याबाबत जो मुददा उपस्थित केला आहे त्याबाबत आयुक्तांनी खुलासा केल्यास योग्य होईल.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-असा प्रत्त्येक सदस्य उभा राहुन सांगेल मग सर्वांबाबत आश्वासन दयावयास सांगा एकव बाबतच कसे सांगता?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:-महापौरजी, पवईच्या रस्त्याची जी स्थिती आहे त्याबाबत सुध्दा अवगत केले जावे.

मा.महापौर:-पवईच्या रस्त्याबाबत मी आयुक्तांशी चर्चा केली आहे. व तो रस्ता तयार करण्याबाबत दोन-तीन दिवसातच मुहूर्त केला जाईल.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे:-मा. महापौरजी, आता तुम्ही सांगितले व आयुक्तांनी पण सांगितले की, आमच्या इथुन टर्निंग पॉइंट पर्यंतचा जो रस्ता आहे. तो रस्ता पण घेणार का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-३३ रस्त्यांमध्ये ज्यांचे काम आहे त्या सर्वांचे येणार?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे:-रिवाईज बजेटमध्ये जितके येतील तितके होतील ना हेच मी आयुक्तांना विचारत आहे.

मा.महापौर:-हो ३३ रस्त्यामधील ज्यांचे काम आहे त्यासर्वांचे होईल.

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर -४ येथील प्रभात चौक (श्यामसुंदर जनरल

स्टोअर्स) ते दिपक दरबार मार्गे मानेरा जंक्शन पर्यंतचा रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणे कामीचे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सचिव :-विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.



काही सदस्य :-पास. पास.
मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-मला हे सांगा की, केवळ हाच भुखंड का निवडला गेला. याची काय आवश्यकता भासली. तिथे किती रहदारी आहे. शहरात इतर ठिकाणी जिथे खरोखर वाहनतळाची आवश्यकता आहे. ती जागा न निवडता कोप-यातली जागा का निवडली आहे. कोण उत्तर देणार?

मा. उपआयुक्त (श्री. पाटणकर):-अजुनही काही जागांचा सर्व्हे चालु आहे. सर्व्हे झाल्यावर ते महासभेसमोर आणले जाईल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-इतर ठिकाणी रहदारीची इतकी अडचण असते. गाडया थांबवायला जागा नसते. शिवाजी चौक ते शांतीनगरपर्यंत रोड आहे. तेथील गाडया कुठे थांबवायच्या. जिथे गरज आहे त्याचा विचार नाही केला जात. ज्याची आवश्यकता नाही ती जागा दाखवली आहे. विठ्ठलवाडीच्या इथे किती रहदारी असते. तिथे वाहनतळाची आवश्यकता काय आहे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):- महापौर महोदय,सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांनी जो प्रश्न विचारला आहे. या तीन जागा आम्ही निवडल्या महापालिकेचे उत्त्पन्न खुप कमी आहे. त्यामुळे दुय्यम मार्गांवर अजुन पकड घेतली गेली नाही. ही सुरूवात आहे. भुखंड निवडण्यामागे हेतु कोणताच नाही. अजुनही सर्व्हे चालु आहे. जिथे जिथे शक्य होईल तिथे तिथे आम्ही प्रयत्न करू. माझे म्हणणे हे आहे की, आजपर्यंत महापालिकेने याविषयी कधी विचार केला नाही. हि तर सुरूवात आहे. सर्व एकत्र आणणे जरा कठीण आहे त्याला बराच वेळ लागेल. जसा जसा सर्व्हे होईल. तिथे किती वाहतुक आहे. किती गरज आहे याचा प्रश्न येत नाही. तिन्ही जागा स्टेशन जवळ आहे. स्टेशन जवळ खुप काही पार्किंग होते. आज पण तिथे पार्किंग केले जाते पण त्याचा पैसा महापालिकेला मिळत नाही. आम्ही जी जागा निवडली आहे. ती स्टेशन जवळ असुन तिथे भरपुर वाहने पार्क केली जातात. यात कोणताही दुसरा हेतु नाही. तुम्हाला जर विषय वगळायचा असेल तर वगळु शकता. माझे म्हणणे तर हेच आहे की, महापालिकेचे उत्त्पन्न वाढवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. आता हे झाल्यावर इतर ठिकाणी सर्व्हे करून ते पण सभेसमोर आणले जाईल. ठाणे महानगरपालिकेने प्रत्त्येक जागेवर पार्किंगची सुविधा केली आहे. व त्यातुन त्यांना भरपुर उत्त्पन्न मिळते. जर उल्हासनगर महानगरपालिकेने असे केले तर उत्त्पन्न वाढेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-माझे असे म्हणणे आहे की, एम्ब्रोशियाच्या जवळचा भुखंड पैसे दया आणि वापरा या तत्त्वावर आणला आहे. तो भुखंड वादग्रस्त आहे. चौकशी त्याची चालु आहे. तुम्ही म्हणत होतात जोपर्यंत चौकशी पुर्ण होत नाही तोपर्यंत मी उत्तर देणार नाही. जोपर्यंत त्या भुखंडाची पुर्ण चौकशी होऊन अहवाल येत नाही. कार्यवाही होत नाही तोपर्यंत आपण त्या भुखंडाविषयी धोरणात्त्मक निर्णय घेणे योग्य नाही. संबंधित अतिक्रमण करणा-याने आपल्याला जो जमिनीचा तुकडा दिला आहे. याचा अर्थ आपण त्यास मान्य करत आहोत. त्यामुळे इतर जमिनीवर त्याने केलेल्या बांधकामाला मान्यता मिळेल. त्यामुळे माझा मौलिक रूपाने विरोध आहे. या



भुखंडाचा यात समावेश करणे योग्य नाही. आपण अवैध बांधकाम करणा-याला प्रोत्साहन देत आहोत.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-आपला आरोप मी अमान्य करतो. असा काही हेतु नाही. आपण जो आरोप लावला की, मदत करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. हे मी अमान्य करतो.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-नकळत असे झाले असेल. पण मी आता सांगत आहे ना.तो भुखंड वादग्रस्त आहे. आपण त्यास कशी मान्यता देऊ शकतो.

मा. महापौर:-ती जागा वाहनतळासाठीच आहे.

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-आपण काही तिथे बांधकाम करत नाही. त्यामुळे काही अडचण येईल असे मला तरी वाटत नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-उदया तो व्यक्ती चौकशी अहवालात असे म्हणले की, मी जो भुखंड दिला आहे तो महापालिकेने स्विकारला आहे व महासभेने वाहनतळासाठी तिथे ठराव पास केला आहे.

मा. महापौर:-राजानीजी, ॲब्रोसिया हॉटेलच्या बाजुचा जो भुखंड आहे. तो वाहनतळासाठीच आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-माझे म्हणणे आहे पुर्ण भुखंड वाहनतळासाठी आरक्षित आहे.

मा. महापौर:-ठिक आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-त्याने तिथे हॉटेल बांधले आहे ते चुकीचे आहे.

मा. महापौर:-ठिक आहे. मी मानतो. समजा पुर्ण भुखंड वाहनतळासाठी आरक्षित आहे. बिल्डरने त्यावर अतिक्रमण केले आहे. आपण उरलेला जो भुखंड आहे तो वाहनतळासाठी वापरणार आहोत. त्यावर हरकत घेण्यासारखे काय आहे? चौकशी तर चालुच आहे. निर्णय झाल्यावर आपण तो त्याच्याकडुन परत घेऊ.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-माझे म्हणणे जरा लक्ष देऊन ऐका. दॅट बॅलेन्स प्लॉट हॅज बीन गीवन बाय दी कंन्संन्ड बिल्डर ऑर दी इनक्रोचर टु दी कार्पोरेशन त्या संबंधित भुखंडावर आपण हा प्रस्ताव पास केला. तर याचा अर्थ आपण त्या भुखंडावरील बांधकामाला मान्यता देत आहोत. तो भुखंड त्याने आपल्याला दिला असे त्याने लिहिले आहे. त्याने तसे प्रतिज्ञा पत्र दिले आहे.



मा. महापौर:-तसे नाही आहे. असे तुम्ही अंदाज करू नका.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-का नको करू ते सत्य आहे. तो उदया हे म्हणेल की, महासभेने प्रस्ताव पारीत केला आहे. कमीत कमी हा भुखंड या प्रस्तावातुन काढुन टाका. इतर  दोन भुखंड असु दे. आम्ही तयार आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आज महापालिकेची आर्थिक स्थिती दुर्बल आहे. जेव्हा बी. बी. मोरे साहेब बोलत होते. नगरपालिकेच्या परिस्थितीबाबत तेव्हा इथुन श्री. लाल पंजाबी ओरडत होते महापालिकेची स्थिती

कधी सुधारणार देखिल नाही. आमचे आयुक्त साहेब श्री. पोखरकर साहेबांसारखा आपल्याला आयुक्त मिळाला आहे. असा कोषागार ज्याने तिजोरीवर ताबा ठेवला आहे. एक रूपया पण फुकट घालवत नाही.मी त्यांना पसंत करतो. त्यांनी जेव्हा पहिल्यांदा स्थायी समितीमध्ये मुददा आणला महापालिकेतील दवाखान्यातील रूग्ण फी २ रू. वरून ५ रू. करणे बाबत. तो व्यक्ती दोन रू. भरतो व ४०-५० रू. चे औषध घेऊन जातो. महाराष्ट्र शासनाने पण जाहिर केले आहे की, कोणत्त्याही महापालिकेचे दवाखाने असतील तर रूग्ण फी २ रू. वरून ५ रू. घ्यावी. ते आम्ही स्थायी समितीमध्ये सर्व संमतीने मंजुर केले. महापालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन आज जो हा विषय आला आहे. या प्रस्तावामुळे महापालिकेचे उत्त्पन्न वाढेल. तिथे तशापण गाडया उभ्या असतात. जर त्या गाडयांमुळे महापालिकेचे उत्त्पन्न वाढत असेल असे थोडे थोडे मार्ग काढुन जसे आयुक्त साहेब मार्ग काढत आहेत. तर काही वर्षातच महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारेल. बिल्डरने त्यावर अतिक्रमण केले आहे ते प्रकरण येथुन ते महाराष्ट्र विधानसभा, विधान परिषदे पर्यंत ते अधिवेशनमध्ये सुध्दा प्रकरण गेले आहे. अजुन सुध्दा चालु आहे. ते चालुच राहणार. जे लोक गाडी पार्कींग करतात. तो महापालिकेचा भुखंड आहे. तो व्यक्ती स्टेशनवर जावो वा हॉटेलमध्ये जावो. जर महापालिकेने त्याचे पैसे घेतले तर महापालिकेचे उत्त्पन्न वाढेल. हाच आयुक्तांचा हेतु आहे. मला असे वाटते की, महापालिकेला मिळणा-या उत्त्पन्नात आपण अडथळा निर्माण नाही केला पाहिजे. मेहरबानी करून उत्त्पन्न मिळत आहे अडथळा न आणता हा प्रस्ताव पास केला जावा. जसे आमचे पाटणकर साहेब म्हणाले की, उल्हासनगरमध्ये खुपश्या जागा आहेत. सर्व्हे करून आम्ही प्रस्ताव महासभेत आणु. तिथे पण पैसे दया वापर करा तत्त्वावर वाहन तळ चालु करणार आहेत. राजानी साहेब जसे म्हणतात शिवाजी चौकाचा रस्ता, नेहरू चौकाचा रस्ता हे सर्व त्यांची स्वप्ने लक्षात घेतली जावी. तेथील जागांचा पण असा प्रस्ताव आणला जावा. आम्ही तो पण पास करू. राजानी साहेब नेहमी भुखंडाचा मुददा काढतच असतात आम्ही पण त्यांच्या सोबत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>हे मला चुकीचे समजत आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे. आपण जर त्याला मान्यता दिली कारण बिल्डरने आपल्याला भुखंड दिला आहे. आपण जर त्या कायदा किंवा शासन निर्णयाला मंजुर जरी केले तरी बांधलेल्या इमारतीतुन काही भाग आपल्याला मिळण्याचा



आपला अधिकार आहे. त्यामुळे आपली आर्थिक परिस्थिती अजुन सुधारेल. बांधलेल्या इमारतीचा भाग आपण घेतो तिथे जर आपण कुणाला भाडयाने दिले. त्यामुळे महापालिकेची स्थिती सुधारेल. पे आणि पार्क मधुन आपल्याला किती उत्त्पन्न मिळेल. या आधारावर मी म्हणत आहे की, आपण त्यांच्याकडुन भुखंड न घेता इमारतीचा भाग घेऊ यात चुक काय? आणि ही जागा वादग्रस्त आहे. आपण त्यावर काही निर्णय नाही घेऊ शकत.

<u>मा. महापौरः-</u>आपण त्या जागेत अडथळा निर्माण करत नाही. चौकशी नुसार असे वाटते की, बिल्डरने काही भागावर अतिक्रमण केले आहे. ते जर आपणांस परत मिळाले तर मला नाही वाटते या ठरावाचा त्यावर काही परिणाम होईल किंवा बाधा येईल.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-</u>कसे शक्य आहे? समजा तुमच्या आणि माझ्यामध्ये काही वाद आहे. जेव्हा एखादी व्यक्ती एक्स ला आपल्यामधुन अर्धा भाग काढुन देतो जर त्याने तो स्विकारला तर तिथे वाद बंद होतात. मी म्हणतो हे अर्धे नाही पुर्ण माझे आहे. मी जर अर्धे स्विकारले तर वाद बंद होईल.

<u>मा. महापौरः-</u>सदर प्रस्ताव मी मतदानासाठी टाकत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा. महापौर, एक मिनिट इथे शहाड स्टेशनच्या बाजुला लिहिले आहे ही कोणती जागा आहे?

मा. उपआयुक्त (श्री. पाटणकर):- शहाड स्टेशनच्या बाजुला जे देवीचे मंदीर आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तिथुन रस्ता आहे का जायला?

मा. उपआयुक्त (श्री. पाटणकर):- तिथुनच रस्ता आहे. आता पण तिथे पार्किंग होते. दोन चाकी वाहने तिथे पार्क केली जातात.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- तिथे रोड वायडिंग झालेले नाही.

मा. उपआयुक्त (श्री. पाटणकर):-तिथे वाहने आधीच उभी केली जात आहेत. पैसे पण घेतले जातात.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- साहेब तिथे रेल्वे वाले मार्कींग करून जातात. दोन चाकी वाहने वाले कुंपण तोडुन पुन्हा तिथे वाहने उभी करतात. तेथे अनाधिकृतरित्त्या वाहने उभी केली जातात. रेल्व रस्ता दयायला तयार आहे का? तुम्ही पार्किंग कसे करू शकता. तुम्ही रेल्वेवाल्यांकडुन परवानगी घेतली आहे का? का रोड वायडिंग करणार आहात का? रोड वायडिंग करून दुकाने तोडणार आहात. सांगा जरा.



मा. उपआयुक्त (श्री. पाटणकर):- शहाड रेल्वे स्टेशन जवळ जे मंदीर आहे तेथे आता सुध्दा दोन चाकी वाहनांचे पार्किंग केली जाते. बाहेरचा व्यक्ती त्यांच्याकडुन पैसे देखिल घेतात. कमीत कमी दोनशे तरी वाहने तिथे उभी राहातात.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- बरोबर आहे पण ते सर्व अवैध आहे. तुम्हाला तेथुन रस्ता मिळणार नाही. रेल्वेवाले मार्ग बंद करतील तो काय तुम्ही स्वतः तोडणार?

मा. महापौरः-महाराजजी, मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतो.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- साहेब त्यांना उत्तर देऊ दया. रेल्वेवाल्यांनी जर बांधले तर हे ते तोडणार का?

मा. महापौरः-शहाड रेल्वे स्टेशनच्या बाजुला जी अवैध पार्किंग होते. त्याच प्लॉटला....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-पैसे दुसरे लोक घेऊन जातात ते चालते?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्हाला रस्ता मिळणार नाही, तुम्ही वाहनतळ उभारणार कसे?

मा. महापौरः-नाही. नाही. रस्ता तर मिळेल आधीच तिथे मार्कींग केले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तिथे रोड वायडिंग करायचा विचार आहे का?

मा. महापौरः-रोड वायडिंग आधीच झालेले होते.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मी मानतो मार्किंग झालेले आहे, मला हेच विचारायचे आहे तुम्ही तिथे रोड वायडिंग करणार आहात का आता?

मा. महापौरः-आज नाही तर उदया करू. शहाड रेल्वे स्टेशनवर जे जातात त्यांना रस्ता तर पाहिजे जाण्यासाठी? रोड वायडिंग आधीच झाले असते परंतु पर्यायी जागा देण्यासाठी महापालिकेकडे भुखंड नाही म्हणुन ते काम थांबले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ही जी तुम्ही परवानगी घेत आहात तिथे आपला रोड तयार होणार आहे. त्यावेळी तुम्ही काय करणार? पार्किंग कुठे करणार?तुम्ही नगररचनाकारांना विचारा तिथे जी अवैध पार्किंग होत आहे ती आपल्या साठ फुटाच्या रोडवर होत आहे.

--६५--

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :-नगररचनाकारांना विचारा?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- तिथे जी अवैध पार्किंग होत आहे ती आपल्या साठ फुटाच्या रोडवर होत आहे. या ठरावाला मग काही अर्थच नाही याचा अर्थ आपण मेन रोडवर पार्किंगची परवानगी देत आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौर आताच आपले श्री. पाटणकर साहेब म्हणाले की तिथे अवैध पार्किंग होत आहे. आणि त्याचे पैसे दुसरेच घेतात. आजच्या तारखेत आज पर्यंत तिथे पार्किंग होत आहे. महापालिकेचा भुखंड असुन दुसरे लोक पैसे घेतात. जर आपण तिथे वाहनतळ सुरू केले तर महापालिकेला पैसा मिळेल. खाजगी व्यक्ती तो पैसा घेऊन जातो. हे लक्षात घेऊन जे उपायुक्तांनी प्रस्ताव आणले आहेत. त्याने पण तिथे पहाणी केली असेल. जर तिथे कोणी व्यक्ती पार्किंग करत असेल तर वाहनतळ निर्माण झाला तर महापालिकेला उत्त्पन्न मिळेल. या गोष्टी लक्षात घेऊन काही अडथळा न आणता हा प्रस्ताव सर्वानुमते पास करावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुललरः-महापालिकेला उत्त्पन्न मिळेल यासाठी आमचा विरोध नाही. परंतु आपण रोडवर पार्किंगची परवानगी घेत आहोत. हे किती दिवस चालेल? आपण त्यांच्याकडुन एक वर्षाचे पैसे घेऊ. निविदा भरणा-यांकडुन आपण एक वर्षाचे पैसे घेऊ. जर आपण चार महिन्यात रोड वायंडिंग करायला गेलो. तर तो उरलेले आठ महिन्याचे पैसे परत मागेल याला जबाबदार कोण? नंतर आपण त्यांना जागा कुठून देणार?

मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर साहेबांनी जो मुददा उपस्थित केला त्याचे उत्तर देतो. ती रेल्वेची जागा आहे असे म्हंटले जाते. आता तर तिथे पार्किंग होत आहे. ज्या जागेवर पार्किंग होते ती महापालिकेची जागा आहे. आम्ही रेल्वेवाल्यांशी जरूर बोलु काहीना काही मार्ग निघेल. मला असे वाटते की,काही अडचण येणार म्हणुन प्रयत्न करू नये असे नाही आहे. उत्त्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे जरूरीचे आहे. काही अडचण आल्यास जरूर मार्ग निघेल. जसे श्री. भुल्लर म्हणतात की, अडचण येईल निविदा भरणारा पैसे घेईल. बाधा येईल. असे काही नाही. मला विश्वास आहे काही तरी मार्ग निघेल.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा. महापौर, आज जो ठराव आला तो आयुक्तांतर्फे आला आहे. एका वर्षासाठी भाडेपट्टीने जागा दयायचे आहे. उल्हासनगर स्टेशनच्या बाजुला साडे-चार पाच लाखाचे उत्त्पन्न मिळेल. ठेकेदार जर निविदा भरेल काही ना काही तो करार महापालिकेशी करणार. जसे

आपण जकातीबाबतचा करार केला आहे. अशा त-हेचा ठराव केल्यानंतर जर एखादी स्कुटर वा रिक्षा वाहनतळाच्या इथे नाही उभी केली बाजुला उभी केली तर त्यावर जो दंड लावला जाईल तो कोण वसुल करणार? ते वाहन जप्त करण्याचा अधिकार ठेकेदाराला आहे का? समजा त्याचे असेच नुकसान झाले आणि तो म्हणाला तुमच्यामुळे झाले तर तुम्ही काय कराल? करारात ज्या अटी व शर्ती असतात त्या महापालिकेसमोर असतात. जो ठेकेदार ठेका



घेईल तो तर अगोदर हेच म्हणेल की, कुणी जर पार्किंग इथे नाही केली तर समजा ट्रकचे मी पन्नास रू. घेतो. त्याने ट्रक इथे नाही उभा केला बाहेर उभा केला तर त्यावर काय कार्यवाही होईल. जसे आपण जकात विषयी ठरविले, ११ पट त्याच्याकडुन दंड घ्यायचा असा आपण करार केला आहे. अशा काही सूचना आल्या नाहीत. जर आपण ठराव पारित करून ठेकेदाराला ठेका दिला व त्याने बाहेर असलेली स्कुटर जप्त केली तर ते आपल्याकडेच येणार म्हणून आधिच त्यामध्ये काही अटी शर्ती हव्यात हे सदनासमोर आणले पाहिजे, म्हणून हा मुददा आता डिफर करून पुढच्या महासभेत घ्या, त्यावेळेस काय काय अटी शर्ति आहेत हे आम्हाला माहित पाहिजे. नाहीतर ठेकेदार पाच लाख भरेल. आम्हाला ही सर्व माहिती असली तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> मा. महापौर मी फक्त एवढे म्हणालो की,जेव्हा आपण रोडवाईंडिंग करु, चार महिन्यात आपण जर ते केले तर आठ महिन्याचे तो पैसे परत मागेल. त्यावेळेस आपण काय करायचे हे आपण ठरवायचे. आज आपण साठ फुटाची परवानगी देत आहोत. आयुक्तांनी यावर खुलासा केला नाही. नंतर काय करणार?

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u> मला हे विचारायचे आहे कि, यापूर्वी देखील असे कित्त्येक प्रस्ताव पास केले आहेत परंतु त्यावर अंमलबजावणी केली जात नाही. मला आठवते ९७ मध्ये पे आणि पार्कचा प्रस्ताव पास केला होता. मला हे विचारायचे आहे कि त्याचे काय झाले? त्यावेळी ते का नाही सुरु करण्यात आले. आता आचार संहिता आहे वादग्रस्त भुखंड आहे आता आमचा कालावधी संपतच आला आहे आता हे करायची काय गरज आहे, आणि यापूर्वी एवढे ठराव आम्ही याबाबतीत पास केले आहेत. त्याचे काय झाले याचे मला उत्तर दया. ते का नाही यशस्वी झाले हे कशावरुन की आता जर हा ठराव केला तर ही योजना सफल होईल. तुम्ही तर पैसे दया आणि वापर करा म्हणत आहा ना? आम्ही तर सपना गार्डन मध्ये मोफत पार्किंगचा फलक लावला होता. कि जेणे करून लोकांना सवय लागू दे. तरीपण त्यात यश नाही आले, असे खुपसे ठराव झाले. मला आठवते आपल्या महापौरांच्या घराच्या मागे देखिल एक गार्डन आहे. तिथे देखिल आम्ही फलक लावला होता. पे ॲन्ड पार्क. सिरू चौक येथे मेन मार्केटमध्ये जास्तीत जास्त गर्दी असते. व्यापा-यांची सोय व्हावी म्हणुन आम्ही मागच्या बाजुला चांगला रस्ता तयार केला. सी. सी. केले तिथे आता फलक लावला आहे नाना-नानी पार्कचा. तिथे आधी आम्ही पे आणि पार्कचा फलक लावला होता. ठराव पास केला होता. परंतु यशस्वी झालो नाही. त्यात पण मोफत पार्किंगचा फलक लावला होता. परंतु ते पण यशस्वी झाले नाही. अजुन असे काही प्रस्ताव असतील जे अजुन लक्षात येत नाहीत. नगररचनाकारांच्या लक्षात असतील. माझी सदनाला विनंती आहे आचारसंहिता लागु आहे. सन्मानिय सदस्य श्री. नरेंद राजानी यांनी सांगितले की, पहिला मुददा जो आहे विठ्ठलवाडी स्टेशनच्या बाजुचा तिथे अनाधिकृत बांधकाम झाले आहे. त्यावर चौकशी पण सुरू आहे. माझी सदनाला विनंती आहे जो काही निर्णय होईल त्यांनतर नव्याने निवडुन येणारे प्रतिनिधी यांच्यावर हा निर्णय सोपवावा. तोपर्यंत आम्ही जे मागे मंजुर केले त्यावर अंमलबजावणी करावी. प्रतिसाद

काय मिळतो ते बघा. त्यातुन पण आपल्याला काही उत्त्पन्न मिळते का बघा. माझी विनंती आहे तुम्हाला.

मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-मला काही बोलायचे आहे. हा जो प्रस्ताव मी आपणांसमोर मांडला. सन्माननिय सदस्या श्रीमती. ज्योती कालानी यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्त्तर देऊ इच्छितो. ९५ मध्ये काय झाले याचे उत्त्तर मी देऊ शकत नाही. आचारसंहितेचा जो मुददा उपस्थित केला. ही जागा राखीव भुखंडात येते. जर राखीव कारणासाठी त्याचा वापर होत आहे त्यामध्ये आचारसंहिता भंग होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. दुसरे असे की, यातुन महापालिकेचे उत्त्पन्न वाढणार आहे. मला वाटते यात काही अडचण येणार नाही. जर तुम्ही हे केले नाही तर मला पण विचार करावा लागेल की, खर्चांवर कसे निर्बंध ठेवला जाईल. कारण की, उत्त्पन्न वाढविण्याचे माझे प्रयत्त्न आहेत परंतु तुमचा सहयोग मिळत नाही. त्यामुळे जे काही नगरसेवक निधीचे काम आहे त्याबाबतीत मला विचार करावा लागेल. कामाचे आदेश देताना मला थांबावे लागेल अशी शक्यता निर्माण होऊ शकते.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-आयुक्तांनी यात-हेने रिॲक्शनरी नाही झाले पाहिजे. असा व्यवहार नसला पाहिजे. जर आम्ही हे केले तरी महासभेचा कालावधी संपत आला आहे. तोपर्यंत तुम्हाला आम्हाला जो निधी दयायचा आहे. तो दयावाच लागेल. तुम्हाला फक्त सांत्त्वना मिळाली असती की, आम्ही तुम्हाला सहयोग दिला. मला वाटते तुमचे असे रिॲक्शनरी होणे योग्य नाही.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-आयुक्त साहेबांचे उत्त्तर ऐकुन मला पण अतिशय दुःख झाले. महापालिकेची स्थिती काय आहे आम्हाला पण माहित आहे. मी स्थायी समितीची सभापती आहे. हा मुददा आता येईल कधी मटेरियलाइज होईल. किती महिने लागतील? हे सर्व सदनाला सांगा. येणा-या चार दिवसात, येणा-या आठवडयात हे होणार आहे का? आम्ही करायला तयार आहोत. मी काय म्हणाले की, आधी पण असे प्रस्ताव पास झाले आहेत पण ते यशस्वी नाही झाले. तुम्ही सांगा एका आठवडयात तुम्ही करता. किती उत्त्पन्न मिळेल? याविरूध्द जर तुम्ही विचार कराल की, मी नगरसेवकांचा निधी रोखुन ठेवेल तर याविषयी आम्हाला खेद आहे. दोन लाख रू. तुम्ही होल्ड अप कराल. त्यामुळे आम्ही आमच्या प्रभागात काम करू शकणार नाही. जाऊ शकणार नाही. निवडुन येणार नाही असे काही नाही. ज्यांनी आपले वर्चस्व तयार केले आहे,ज्यांनी प्रभागात काम केले नाही, परंतु त्यांचे नाव प्रभागात चांगले आहे. त्यांच्या घरी जाऊन जनता त्यांना निवडुन आणेल. आपल्या दोन लाख रू. मुळे आम्ही हरून जाऊ. जनता आम्हाला निवडणार नाही असे काही नाही.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-मा. महापौरजी, या योजनेमुळे १५ लाखाचे उत्त्पन्न वाढणार आहे. १,४०,००००/- निधी असतो. १५ लाखासाठी आयुक्त नगरसेवक निधी देणार नाहीत. हा प्रस्ताव अजुन अर्धवट आहे.



मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-महापौर साहेब, एक मिनिट हे तीन प्रस्ताव जे वाहनतळासाठी आणले आहेत....

मा. सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मा. महापौरजी, आता आमच्या स्थायी समिती सभापती अशा म्हणाल्या की मला खुप दुःख झाले आयुक्तांच्या बोलण्यावर. फक्त हेच म्हणत असतात की, मी नगरसेवक निधी कमी करेन अजुन काही खर्च नाही का कमी करायला? आम्ही ठराव पास नाही केला ते आमचे अधिकार आहेत. आपण यावर कसे बोलु शकता की, नगरसेवक निधी बंद करेन. तुम्ही असे का वागता. समजत नाही. तुम्ही यावर

स्पष्टीकरण दयाल. तुम्ही फक्त नगरसेवक निधी म्हणत असता. त्यावर तुमची चिड का? तुमच्या म्हणण्यावर आम्ही ठराव पास करायचे? महासभेने तुमच्या म्हणण्यानुसार वागावे?

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :-महापालिकेच्या मोकळया जागा "पैसे दया व वापर करा" या तत्त्वावर वाहन तळाच्या उपयोगासाठी भाडेपटटयाने देणे कामी मान्यता देणे बाबत.

मा. सचिव :-विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.
मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मा. महापौर साहेब, श्री. मेठवानी हे आज महापालिकेचे कर्मचारी नाहीत. त्यामुळे आपण त्यांच्यावर कार्यवाही करू शकत नाही. ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्यावर झालेली केस आधीच डिसचार्ज झाली आहे. मग आपण त्यांच्या विरूध्द कसा ठराव पास करू शकतो? कशी कार्यवाही करू शकतो.

मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मेठवानी आता सेवानिवृत्त झाले आहेत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-साहेब, जरा हिंदीमध्ये बोला.

मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-नगरपालिका असताना त्यांना लाच लुचपत प्रतिबंधक खात्याने पकडले होते. त्यांच्या विरूध्द चार्ज शिट दाखल करण्याची परवानगी मागीतली होती. नगरपालिकेची ही जबाबदारी होती. परंतु त्यावेळी ती नाकारण्यात आली. जेव्हा कोर्टात केस दाखल झाली. त्यावेळी पुर्ण अहवाल आम्ही शासनाला पाठवला होता की, कोर्टातुन समरी मंजुर झाली आहे. ते सेवानिवृत्त झाले आहेत. तरी सुध्दा शासनाकडुन एक पत्र आले की, नगरपालिकाने त्यावेळी परवानगी दिली नव्हती तरी आता महापालिका झाल्यानंतर पुन्हा कार्यवाही सुरू करा व परवानगी दया. म्हणुन हा विषय आला आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-याची परवानगी महापालिकेने दयायची नाही. कारण आज ते इथे कर्मचारी म्हणुन कार्यरत नाही. आणि त्यांच्यावर दाखल झालेली केस डिसचार्ज झाली आहे. तुम्ही तसे शासनाला लिहुन पाठवा.



मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-आम्ही शासनाला पुर्ण प्रकरण कळविले होते. समरी कोर्टाकडुन मंजुर झाली आहे. त्यानंतर देखिल आमच्या पत्राचा संदर्भ देऊन परत पत्र पाठविले की, केस चालविण्याची परवानगी मागितली आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-महापालिकेने पुर्वी पण परवानगी दिली नाही आता पण परवानगी दयायची नाही.

मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-तो निर्णय तुम्ही घ्यायचा आहे. तुम्हाला याचे अधिकार आहेत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-विषय रदद करण्यात यावा. किंवा विधी अधिकारींनी सांगावे.

मा.विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-जेव्हा एखादा कर्मचारी महापालिकेत कार्यरत असतो. त्याला जेव्हा लाच घेताना पकडले जाते. तेव्हा जर

महापालिकेकडुन परवानगी घेतली तर ती योग्य आहे. मागच्या वेळेस अमहासभेने परवानगी नाकारली होती. तेव्हा शासनाकडुन एक पत्र आले होते की, तुम्ही नाकारले आहे पुन्हा मंजुरी दया. दुस-यांदा देखिल त्यांना परवानगी दिली नाही खटला भरण्यासाठी व त्यानंतर लाच लुचपत विभागाने कोर्टाला अशी सुचना दिली होती की महापालिकेने आम्हाला परवानगी दिली नाही. त्यामुळे आम्ही अभियोग चालवु शकत नाही. त्यामुळे यास्तव कोर्टाने याचिका निकालात लावली की, अभियोगाच्या अभावी प्रकरण डिसचार्ज केले गेले. आता ते महापालिका सेवेत नाहीत. सेवा निवृत्त आहेत. ते लोकसेवक नाहीत. जर ते लोकसेवक असते तर आपण परवानगी दिली असती. ते लोकसेवक नाहीत म्हणुन त्यांना परवानगी देण्याचे अधिकार नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-मा. महापौरजी, मला विधी अधिका-यांकडुन हि माहिती हवी की, जर महासभेने परवानगी दिली नाही तर त्याचे काय परिणाम आपल्यावर होतील. कारण की, पाणी पुरवठा विभागातील श्री. शेख नावाच्या कर्मचारीचा विषय स्थायी समितीमध्ये आला होता त्यावेळी विधी अधिकारी असे म्हणाले होते की, जर तुम्ही परवागनी दिली नाही तर तुमच्यावर दोष राहिल. जर आम्ही परवानगी दिली नाही तर आमच्यावर काय परिणाम होईल?

मा.विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-श्री.शेख साहेबांविषयी अभियोग चालविण्याची परवानगी मागत नव्हते. खटला भरण्याची परवानगी मागत नव्हते. त्यात त्यांना बडतर्फ करण्याची परवानगी मागतली होती. तो विषय वेगळा आहे. आणि दुसरे मी तुम्हाला सांगतो की, हे जे श्री. दौलतराम मेठवानी आहेत, महापालिका सेवेत नाहीत. म्हणुन आपण परवानगी देत नाहीत. जर ते आपल्याकडे कार्यरत असतील तर आपण त्यांना परवानगी देण्यास सक्षम झालो असतो.



मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-आपल्यावर तर त्याचा काही परिणाम होणार नाही ना?

मा.विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-आपण जरी परवानगी दिली नाही तरी शासन व लाच लुचपत प्रतिबंधक खाते थेट त्यांच्यावर खटला भरू शकतात. अभियोग चालवु शकतात आता पोलीसांना दोषारोप दाखल करण्यापुर्वी कायदयाने काहीच गरज नाही कारण लोकसेवकाला पाहिजे असेल तर सर्वोच्च न्यायालयाची यावर जजमेंट आली आहे.

मा.उपमहापौरः-जर लोकसेवक नाही म्हणुन आपण परवानगी देऊ शकत नाही तर महासभेसमोर आणले का? जरूर काय होती.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-महापौर महोदय, मी यावर खुलासा करू इच्छितो ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी ते लोकसेवक होते. व परवानगी त्यावेळची आहे. शासनाने आदेश दिले म्हणुन ठराव तुमच्याकडे आणला आणि मला असे वाटते की, ते आता जरी लोकसेवक नसले तरी जेव्हा ही घटना घडली तेव्हा ते लोकसेवक होते. आणि शासनाने सांगितले आहे की, महासभेसमोर ठेवा. म्हणुन आपल्या समोर ठेवले आहे. माझ्यामते शासनाने ते सांगितले आहे ते योग्य आहे. परवानगी देणे उचित ठरेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः'-मी सांगु इच्छितो जेव्हा पप्पु कालानी नगराध्यक्ष होते तेव्हा ही नगरपालिका बरखास्त केली होती. त्यात हे एक कारण होते की, श्री. मेठवानी विरूध्द अभियोग चालविण्याची परवानगी दिली नाही. हे कारण होते का नव्हते? सचिवजी सांगा हे एक कारण होते का?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-त्यावेळी पण परवानगी दिली नव्हती आता पण दयायची नाही.

मा. उपमहापौरः-म्हणजे जे कारण होते त्याची आपण पुनरावृत्ती करत आहोत.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-कोर्टामध्येच केस निकालात लागली आहे पुन्हा कसे त्यावर केस करू शकता.

मा.महापौरः-एक मिनिट, श्री. महाडिकजी जो प्रश्न विचारला आहे. परवानगी दिली नाही तर महासभेवर तर त्याचा परिणाम होत नाही. हे जरा स्पष्ट करा. आमच्यावर तर काही हरकत घेणार नाहीत.

मा. उपमहापौरः-महापौर साहेब, मला एक सांगायचे आहे. जर शासनाने परवानगी मागितली आहे जर ते दोषी असतील तर शिक्षा देतील नाही तर सोडतील. यावर आपणांस काय हरकत आहे?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-आपली परवानगी न घेता देखिल ते करू शकतात.



मा. महापौरः-आमची काही हरकत नाही परवानगी दयायला. विधी अधिकारींचे हे म्हणणे आहे की, आपण परवानगी देऊ शकत नाही. आपण याबाबत सक्षम नाही.

मा. उपमहापौरः-म्हणजे शासनाने जे निर्णय दिले ते चुकीचे आहेत?

मा. महापौरः'-तरी देखिल महाडिकजींनी जे विचारले आहे त्याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

मा. उपमहापौरः-मग हे प्रशासनाने शासनाला पाठवायला पाहिजे होते आपल्याकडे का आले?

मा.महापौरः-आपले हे म्हणणे बरोबर आहे. महासभेत हा विषय आणायलाच. नको पाहिजे होता.

मा. उपमहापौर :-याबरोबरच सचिव साहेबांचे असे म्हणणे आहे की, आपण परवानगी दिली नाही तरी शासन त्यांच्यावर कार्यवाही करू शकते मग आपण त्यांना का संरक्षण दयावे?

मा. महापौरः-आम्ही कुणाला संरक्षण देत नाही.

मा. उपमहापौरः-प्रयत्न तर त्यांना संरक्षण देण्याचा चालला आहे.

मा. महापौरः-मी हे स्पष्ट करू इच्छितो की ही महासभा कुणाही दोषी व्यक्तीला संरक्षण देणार नाही. परंतु जर महासभेला कुणा विरूध्द कार्यवाही करण्याची अधिकारच नाही. तर ती परवानगी देणे चुकीचे ठरेल. असे विधी अधिकारींचे पण म्हणणे आहे. म्हणुन महाडिकजींनी जे विचारले त्यावर विधी अधिकारींनी खुलासा करावा म्हणजे गोष्ट स्पष्ट होईल. नंतर आपण निर्णय घेऊ.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-काय विधी अधिकारी हे म्हणु शकतात की, महासभा परवानगी देण्यास सक्षम नाही.

मा. महापौरः-ते असे नाही म्हणत.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-माझे म्हणणे असे आहे. महासभा सक्षम आहे. तेव्हा जेव्हा एखादा कर्मचारी कार्यरत असतो. जर तो महापालिका सेवेत नाही तर खटला भरण्याची परवानगी देण्याची काही आवश्यकता नाही. लाच लुचपतखातेवाले थेट त्यांच्यावर कार्यवाही / खटला भरू शकतात विना परवानगीने देखिल. हे संरक्षण फक्त महापालिका सेवेत असणा-यांना दिले जाते जेणेकरून पुढे त्यांना त्रास होऊ नये. ही कायदयाची



स्थिती आहे निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे. मला काही हरकत नाही. परंतु कायदयाची स्थिती अशी आहे की, ते आता महापालिकेचे सेवक नाहीत.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आम्ही जर परवानगी दिली नाही तर आमच्यावर काय कार्यवाही होईल?

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-मी कसे सांगु शकतो. ते तर शासन ठरवेल. तुम्ही मला कायदयान्वये काय आहे ते विचारले मी तुम्हाला सांगितले.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरेः-श्री. मेठवानी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचा हा मुददा इथे आणायला नको होता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा. महापौर साहेब,..

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरे :-सभागृह नेता जरा आम्हाला बोलु दया. या आधी हे आणायला पाहिजे होते. जेव्हा सचिव साहेब विधी अधिकारी होते त्यावेळी कोर्टात केस चालु असताना आपल्या येथिल कोणी गेले नाही म्हणुन कोर्टात केस चालु नाही शकली. बरोबर? विधी अधिकारी पण तुम्ही आहात सचिव पण तुम्ही आहात. जेव्हा कोर्टात केस चालु होती तेव्हा महापालिकेतर्फे कोणी गेले नव्हते.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-आमच्या कार्यालयाचा त्याच्याशी काही संबंध नाही. ही केस आरोपी व पोलिसांच्या मध्ये असते. आपणाकडुन कोणी जात नाही.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरे :-माझ्या समोर एक उदाहरण आहे तहसिलदास श्रेणीच्या एका अधिकारीला लाच लुचपत खाते यांनी पकडले. त्याला निलंबित करण्यात आले ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. तरी त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली. त्यांचे पेंन्शन वगैरे सर्व शासनाने रदद केले. आपले विधी अधिकारी इथे दिशाभुल करत आहेत. हे म्हणतात विषय आणला नसता तरी चालले असते. कधी म्हणतात महासभेसमोर आणणे जरूरीचे होते. तुम्ही नगरसेवकांची दिशाभुल करता का?

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-मी दिशाभुल करत नाही. जर ते महापालिका सेवेत असते तर अभियोग चालविण्यासाठी परवानगी देता आली असती. ही परवानगी का घेतली जाते. जर ती व्यक्ती महापालिका किंवा शासनाची कर्मचारी असते. त्यासाठी परवानगी घेतली जाते की, तुमचा तो कर्मचारी आहे. आम्ही खटला भरतो आम्हाला परवानगी पाहिजे आता ते आपल्या सेवेत नाहीत. कायदा असे म्हणतो. यापुवी जर तुम्ही परवानगी दिली असती तर ठिक असते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-महापालिकेचे कामच असे आहे की गाडलेले मुडदे उखडले जातात.

-७३--

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्हाला जर परवानगी दयायची असेल तर देऊन टाका पण मी कायदयाची स्थिती सांगतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आता जो हा मुददा चालला आहे. ते तर आता सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर देखिल या परिस्थितीत त्यांचा मुददा इथे आणला गेला आहे.
(इकडे मा. आयुक्त सभागृहाबाहेर गेले असता)
मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा. महापौर जो पर्यंत आयुक्त येत नाहीत तोपर्यंत वाट पहावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-श्री. मेठवानी आता सेवा निवृत्त झाले आहेत. जर शासन आणि ॲन्टी करप्शन स्वत: थेट देखिल कार्यवाही करू शकतात तर आमच्याकडे त्यांनी आणायलाच नको पाहिजे होते. कारण आजच्या तारखेत ते आपले कर्मचारी नाहीत. तरी दोन वेगवेगळी मते आहेत. कुणी म्हणते परवानगी दिली पाहिजे कुणी म्हणते ते आता सेवानिवृत्त आहेत परवानगी नाही दिली पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, आपण शासनाला परत पत्र लिहावे आता ते येथील कर्मचारी नाहीत. होऊ शकते त्यांच्याकडुन चुकीने पत्र लिहिले गेले असेल वा पुन्हा अधिकारीच्या लक्षात हे आले नसेल म्हणुन शासनाकडुन खुलासा येईस्तापर्यंत हा मुददा डिफर करण्यात यावा व नंतर आल्यावर विचार करू.

मा. उपमहापौर:'-विधी अधिकारी हे सांगा कोणताही शासकीय कर्मचारी सेवा निवृत्त झाला असेल तर त्यावर ४वर्षापर्यंत चौकशी चालु असते.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-हो चौकशी करू शकतात.

मा. उपमहापौर :-म्हणजे शासनाची चौकशी चालु आहे म्हणुन त्यांनी परवागनी मागितली आहे म्हणजे त्यांना का परवानगी दयायची नाही.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-मी चौकशी विषयी नाही बोलत मी काय म्हणतो की, शासन थेट देखिल त्यांच्यावर कार्यवाही करू शकते परवानगी न घेता. आता ते आमच्या सेवेत नाहीत. सेवेत असेल तर आमची परवानगी लागते. जर शासनाने निर्णय घेतला केस चालु केली गेली पाहिजे अंतिम निकाल लागला पाहिजे तर शासन थेट करू शकते.

मा. महापौर:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

मा. सचिव :- विषय क्र. १३ हा विषय मा. राज्य निवडणुक आयोग यांच्याकडुन स्थगित केला गेला आहे. म्हणुन घेतला जात नाही.
मा. महापौर:- सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय:- श्री. दौलतराम मेठवानी निवृत कर अधिक्षक यांचे विरूध्द अभियोग चालविणे कामी मंजुरी देणे बाबत.

--७४--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-का स्थगित केला गेला. निवडणुक आयोगाला कुणी कळवले. याचा खुलासा केला गेला पाहिजे. त्यांना कसे माहित पडले हे करत आहोत? कोणी त्यांच्याशी पत्रव्यवहार केला? कुणाच्या आदेशान्वये आले आहे? जरा याचा खुलासा करावा.
मा. सचिव :-विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आयुक्त साहेबच नाहीत तर चर्चा कशी करायची.
मा. महापौरः-तोपर्यंत चर्चा सुरू करा. ते दोन मिनिटात येत आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तोपर्यंत चर्चा करू नका जोपर्यंत आयुक्त येत नाहीत.
मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-मा. महापौरजी, उपमहापौरजी,

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा. महापौरजी, आयुक्त येत नाहीत तोपर्यंत चर्चा करून देऊ नका.

मा. महापौरः-चर्चा करायला काय आहे. तोपर्यंत आयुक्त येतील ना?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-तोपर्यंत श्री. भडकवाड यांना चार्ज दया.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-मोनार्च कंपनीवाल्यांनी शहरात दहशत निर्माण केली आहे व्यापा-यांमध्ये हे खुप गंभीर प्रकरण आहे. सिंधुनगर व्यापारी महामंडळातर्फे आयुक्तांना तक्रार दिली गेली होती की, मोनार्च कंपनीचे जकातवाले जकात जास्त वसुल करतात आणि सर्वांना धमकी देऊन पैसा वसुल करत आहेत. ही तक्रार १९.११.२००१ला त्यावर आयुक्तांनी काहीएक कार्यवाही केली नाही. त्यांच्याकडे उल्हासनगर मेनीफॅक्चरींग असोसिएशन तर्फे एक शिष्टमंडळ आयुक्तांना भेटले. व १९ तारखेला तक्रार दिली होती त्यावर अधिकारींनी लक्ष दिले नाही. त्यानंतर उल्हासनगर इलेक्ट्रेड व्यापारी महामंडळाने ५.११.२००१ रोजी आयुक्तांना भेटले होते आणि तक्रार दिली होती की, हे लोक जकात जास्त घेतात व शहरात दहशत पसरवत आहेत. यासाठी आपण काहीतरी कार्यवाही करावी. तरी पण आयुक्तांनी त्यावर काही कार्यवाही केली नाही. त्यानंतर ए.बी.रायसिंघानी यांनी २४.१०.२००१ला नोटीस दिली की, मोनार्च कंपनीवाले व्यापा-यांना त्रास देत आहेत. त्यांच्यावर आपण कार्यवाही करून ठेका रदद करावा. तरी देखिल आयुक्तांनी त्यावर काही कार्यवाही केली नाही. आता काही दिवसापुर्वीच सोनार पंचायत शिष्टमंडळ त्यांना भेटायला गेले होते. एक सोनार बंधु जो मेकर होता. त्यांच्याकडे जाऊन दादागिरी करून त्यांच्याकडुन सोने हिसकावुन घेतले त्यांना वॅनमध्ये बसवले आणि रिव्हॉल्वर दाखवुन व्यापा-यांना भयभित करणे पैसा वसुल करणे.

काही सदस्य :-रिव्हॉल्वर दाखवले?

-७५-

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यांनी तशी पोलिसात तक्रार दिली का?

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-ऐकून तर घ्या माझे आधी.

मा. महापौरः-त्यांना आधी पुर्ण करू दया.

मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-त्यांना वॅनमध्ये बसवले व त्याच्याकडुन सोने घेतले. जकात मधुन जो दंड वसुल केला जातो तो त्यांना महापालिकेत दयायचा आहे. परंतु काही संबंधित अधिका-यांनी मिळुन सोनाराचे सोने घेऊन त्याला तिथुन पळवले. त्याला म्हणाले तुम्ही इतके पैसे घेऊन या आम्ही सोने परत करू. यात-हेने शहरातील जितके व्यापारी होते. त्यामुळे भयभीत झाले आहेत. काही व्यापारी वर्ग तर व्यवसाय बदलुन दुसरीकडे गेले आहेत. कुणी

डोंबिवली कुणी भिवंडी कुणी अंबरनाथला गेले, कुणी मुंबईला गेले. कुणी तर आता घर देखिल इथुन बदलुन जात आहेत. हे जे वातावरण यांनी निर्माण केले आहे ते भीतीदायक आहे म्हणुन यांचा ठेका रदद करून दुस-या ठेकेदाराला देण्यात यावा. तसेच अंबरनाथचे गणेश ट्रान्सपोर्टवाला यांच्याकडून त्यांनी दमदाटी करून त्यांनी जकात वसुल केला. त्यांनी एक अमेरीकन ग्रीन कार्ड काढले आहे. जकात भरू नका. कुणाकडुनही थेट पैसा घेतात आणि इथे जमा करत नाहीत. म्हणुन आमची सर्व सदनाला विनंती आहे. अधिकारीना विनंती आहे त्यांचा ठेका रदद करून, व्यापा-यांना ते दमदाटी करतात. रिव्हॉल्वर फिरवुन दाखवतात. व्यापारी यामुळे भयभीत झाले आहेत. म्हणुन ते तक्रार करत नाहीत. जे बिचारे साधे व्यापारी आहेत त्यांनी स्वतःचा व्यवसाय करायचा की यांच्या मागे लागायचे व्यापारी शिष्टमंडळ तीन महिन्यापासुन येऊन आयुक्त व उपायुक्तांना भेटत आहेत काही होत नाही. आम्हाला जे करायचे ते आम्ही करू. आयुक्त व उपायुक्त आमच्या हातात आहे. तुम्ही काही करू शकत नाही. जा इथुन म्हणुन सदनाला आमची विनंती आहे की, या सर्वांचा आयुक्तांनी खुलासा करावा. तुम्हा सर्वांना माहित आहे याकारणास्तव सर्व शहर बंद होते. तरी सदनात सदस्यांनी यावर चर्चा करावी. व तसेच त्यांचा ठेका रदद करून दुस-या निविदा मागवल्या तर आमच्या शहराच्या व्यापा-यांसाठी व आमच्या साठी चांगले राहील.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-सन्माननिय महापौर मी विधी अधिकारींना विचारतो आयुक्त नसताना जी चर्चा होते ती वैध आहे का?सांगण्यास काय हरकत आहे? तुम्ही फक्त चर्चा करत आहात ना का उगाच चर्चा करत आहात. काय अर्थ तर निघाला पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-विधी अधिकारी काय सांगणार?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-हि तुमची बोलण्याची पध्दत आहे., भाषा आहे.



मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-त्यांनीच आधी आम्हाला वाचुन दाखवले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-आयुक्त नाहीत चर्चा केली त्या चर्चेला काही अर्थ आहे का? महत्त्व आहे का?

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-का महत्त्व नाही?

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-इतिवृत्तात तर येत आहे ना?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-विधी अधिकारींनी उठुन सांगावे. सांगण्यास काय अर्थ आहे?

मा. महापौर :- आयुक्तांना पण हे माहित आहे. ज्यांना माहित नाही त्यांना माहित होत आहे.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-आयुक्त नसले तर काय सभा होणार नाही?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-विचारा विधी अधिकारींना, आयुक्त नसताना सभा होऊ शकते का?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-श्री. भडकवाड यांना तिथे बसवा.

मा. महापौरः-चर्चा चालु ठेवा. आयुक्त साहेब आले आहेत.

मा. आयुक्त श्री. पोखरकर हे सभागृहात आले.

श्री. सेवलदास ठाकुर यांनी वरील प्रमाणे पुन्हा चर्चा केली.

मा.महापौरः-अजुन कुणाला याविषयी बोलायचे आहे का?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-कुणी बोलत नाही तर मला बोलावेच लागेल. शहराचा इतका महत्त्वाचा विषय आहे आणि सदस्य कोण बोलेल म्हणुन एकमेंकांकडे बघत आहेत. हे ठिक नाही. मला उत्तर कोण देणार? आयुक्त साहेब देणार की, उपायुक्त?

मा. महापौरः-उत्तर आयुक्त देतील.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मला कुणीही उत्तर दिले तरी चालेल. जकातीचे खाजगीकरण झाल्यानंतर खाजगी ठेकदार कुणाला जकात न भरल्यामुळे पकडतो, त्यावेळी त्यांनी काय करायचे, त्यांच्याकडुन दंड घ्यायचा की, काय करायचे, पध्दत काय? मला उत्तर दिले नाही तर मी खाली बसेन पुढचे बोलणार नाही. मला ठराविक प्रश्नाचे उत्तर हवे तो माझा



अधिकार आहे. मला आयुक्त किंवा कोणी असे नाही म्हणु शकत की आधी तुमचे बोलणे पुर्ण करा. माझ्या या प्रश्नावरच दुसरा प्रश्न आहे.

मा. महापौरः-आयुक्त साहेब, तुम्ही उत्तर देणार का उपायुक्त?

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-श्री. ढाकरे साहेब, माझा प्रश्न असा आहे की, जकात खाजगीकरणानंतर खाजगी ठेकेदार कुणा व्यक्तीला रस्त्यात पकडत आहे. त्याव्यक्तीच्या हाती माल आहे. आणि त्याच्याकडे जकात भरले की नाही याची चौकशी करत आहे. तो जर नाही म्हणाला तर काय करायचे? पध्दत काय?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-त्यांनी जर जकात न भरता माल आणला तर त्याचा माल घेऊन जर त्याने जकात भरला तर दंडासाठी महापालिकेकडे रेफर करायचे आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-अशी किती प्रकरणे आजपर्यंत ठेकेदारांनी रेफर केली आहेत.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-महापालिकेला तीन केस रेफर केली आहेत. संख्या कमी जास्त असु शकते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-म्हणजे याच्या आधी दोन झाले. हा मिळुन तिसरे प्रकरण. याचा अर्थ असा की, या शहरातील व्यापारी प्रामाणिकपणे जकात भरतात. कधी पासुन तीन प्रकरणे आहेत? या ठेकेदाराला ठेका दिल्यापासुन का आधी पासुन.

मा. सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः-तारीख सांगा.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-तारीख आता माझ्याकडे नाही आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-ठिक आहे. जेव्हा नगरपालिकेकडे स्वतःकडे जकात होते तेव्हा अशी किती प्रकरणे व्हायची?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-निश्चित आकडा नाही सांगु शकत परंतु यापेक्षा जास्त.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-याचा अर्थ असा की, आता शहरातील व्यापारी प्रामाणिकपणे जकात भरतात.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-रिझल्ट तर हेच सांगतो. रिझल्ट तर हाच आहे.

--७८--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जर असे आहे की, शहरातील बहुतेक जण जकात प्रामाणिकपणे करतात फक्त तीन प्रकरणे अशी आहेत. खुप जणांना त्रास देतात अशा तक्रारी आल्या आहेत का?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-वैयक्तिक व्यापा-याने किंवा ट्रेडरने तशी ठराविक तक्रार दिली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-व्यापारी संस्थेनी दिली आहे. व्यापारी महामंडळाने मेनिफेक्चरींग असोसिएशनने तक्रार दिली का? संस्थांनी मिळुन व्यापा-यांचे प्रतिनिधी म्हणुन तक्रार दिली असेल.
मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-त्यांनी त्यात असे नमुद नाही केले की, या कारणास्तव ठराविक अशी तक्रार दिली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-जर त्रास देत आहे अशी तक्रार आहे. कंन्डीशनमध्ये एक क्लॉज आहे.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-तक्रारीमध्ये कोणत्त्या कारणास्तव असे निश्चित नमूद केले नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-हेरासमेंटची तक्रार आहे तर आपल्याइथे ॲग्रीमेन्टमध्ये एक क्लॉज आहे. जेव्हा आपण ठेकेदाराशी करारनामा केला तेव्हा ही इज टु कॅरी आऊट हिज बिझनेस स्मुथली ॲन्ड एफिशिएंटली विदआऊट ॲनी हॅन्डरस ॲन्ड हॅरेसमेंट टु दी इंम्पोटर ऑफ दी गुडस् हे स्पष्ट आहे की, त्यांनी हेरासमेंट करायची नाही. ही आपली अट आहे. व त्याव्यतिरिक्त त्याने कोणतेही गुप्त उत्पन्न घ्यायचे नाही. हा पण क्लॉज आहे. जर हॅरासमेंट नाही करायची सिक्रेट इन्कम कमवायचे नाही. असे उदाहरण आहे की, लोकांना कार्ड दिले जाते. त्याआधारे सांगितले जाते की, तुम्ही इतके पैसे भरा कार्ड दाखवा तुम्हाला सोडुन दिले जाईल.अशा किती केसेस आपल्याकडे आल्या आहेत? पुर्ण शहर बंद होते. हेरासमेंट नाही झाली आणि शहर बंद झाले केवळ एक व्यापारी देखिल नाही. कामगार त्याचा माल पकडला जातो आणि पुर्ण शहर बंद होते. म्हणजे त्याला त्यांनी इतके सतावले असेल म्हणुन शहर बंद झाले असेल. याकडे लक्ष देणे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने ते काम बरोबर नाही केले. म्हणजे त्यांना त्यांनी मोकळे सोडले आहे.त्यांचा त्रास इतका वाढला की, केवळ एका व्यक्तीला पकडल्यामुळे शहर बंद ठेवले . माझा पुढचा प्रश्न असा आहे,जर ती व्यक्ती रस्त्त्यात आहे त्याला पकडले. त्याच्याकडे काही सोन्याचे दागिने आहे. त्याला विचारले जाते तुम्ही याचा जकात भरला आहे का? माझ्या मित्राकडे समजा अंगठी आहे, माझ्याकडे घडयाळ आहे. ते बनविणारा व्यक्ती देखिल मीच आहे. त्या अंगठीतील सोने मी दुस-या मित्राकडुन सोने घेऊन मोडीत टाकुन दुसरी वस्तु बनवुन घेतली. त्या मित्राने त्याचा जकात भरला होता की, नव्हता भरला? त्याचा याच्याशी काही संबंध नाही. जेव्हा पासुन ठेका सुरू झाला तेव्हा पासुन

त्यांचा संबंध आहे. त्या दिवसापासुन त्यांनी जकात घ्यायची आहे. जुन्या मालाची जकात त्यांनी घ्यायची नाही. कुणी ९१ मध्ये, कुणी ९५ मध्ये



माल आणला असेल तर त्याचा जकात दयायचा नाही. कोण हे सिध्द करेल की, जेव्हा त्या व्यापा-याचे सोने कच्च्या स्वरूपात बिस्किटाच्या रूपात आले होते ते कोणत्त्या वर्षात आले होते? समजा एखादया गृहीणीने स्वतःचे सोने विकले असेल, स्वतःच्या मुलीच्या लग्नासाठी म्हणुन जुने सोने विकले असेल त्यातुन नवे सोने बनवले असेल, नविन डिझाइन करून विकले असेल ते सिध्द कोण करणार? त्याचा जकात कोण भरणार? त्याउपर उल्हासनगर हददीत जेव्हा तो प्रवेश करताना पकडला गेला असता तेव्हा तो शहरामध्ये होता. तो दुकानातुन खाली उतरत होता. यु वील राईटली रिप्लाय ॲज पर दी रूल्स. की त्याला कुठेही जाऊन माल पकडण्याचा अधिकार आहे?परंतु इथे छळवणुकीचा प्रश्न आहे. त्यानुसार आपण पाहिले पाहिजे. इथे अनेक सोनार बंधु असे आहेत ज्यांच्याकडे त्यांनी कार्ड दिले आहे. एका छोटया व्यापा-यांना त्यांनी हैराण केले. माझे असे म्हणणे आहे की, त्या सोनाराचे सोने परत केले जावे. ते दिले नाही ही त्या व्यापा-यावर जबरदस्ती आहे. जेव्हा त्या व्यापा-याचा माल जप्त केला जातो. तेव्हा त्याला काही इनव्हेंन्टरी देण्यात आली नाही. आपण म्हणणार नाही त्यांना इनव्हेंन्टरी दिली आहे. मागील तीन तारखेत, महापालिकेच्या अधिकारींनी स्वाक्षरी केली आहे. तुम्ही जर याला खोटे म्हणालात तर मी सिध्द करू शकतो. तुम्ही जर आव्हान कबुल केले तर मी ते स्विकारायला तयार आहे. याप्रकारे जर व्यवस्था व व्यवहार असेल म्हणजे त्या व्यापा-यावर जुलूम करत आहात. त्याचे सोने त्वरीत परत केले पाहिजे. त्याला न्याया दिला पाहिजे. सोने इथे ठेऊन त्याच्यावर इथे अन्याय नाही केला पाहिजे. आपण शहराच्या लोकांसाठी काम करत आहोत. शहराची व्यवस्था सुधारण्यासाठी शहराच्या जनतेकडुन उत्पन्न मिळवायचे आहे. त्यांच्यावर अन्याय नाही झाला पाहिजे. तो दुर झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-मा. महापौर, उपमहापौर ढाकरे साहेब एक गोष्ट सांगा. कुणा सोनाराच्या वॉचमेनला मध्य रस्त्यात पकडले. आणि तो वॉचमेन सांगत आहे की, मी दुकानात वॉचमेन आहे. मग जकात वाल्यांनी काय केले पाहिजे? त्यांनी ते सोने दुकानात घेऊन नेले पाहिजे होते का घरी नेले पाहिले होते?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-मी विनंती करतो मला जरा ऐकु आले नाही प्लीज पुन्हा सांगा.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी यांनी पुन्हा वरीलप्रमाणे सांगितले.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-त्यांच्याकडे जर सोने आहे आणि त्यांनी जर जकात भरला नसेल?

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-न भरण्याचा प्रश्न तर नंतर येईल ना? तो म्हणतो मी दुकानदार नाही वॉचमेन आहे. समोर दुकान आहे.जकात वाल्यांनी ते सोने दुकानात नेले पाहिजे की,स्वतःच्या कार्यालयात नेले पाहिजे? तो दुकानाच्या बाहेर आहे आणि तो सांगतो की, मी कारागिर आहे. हे जे सोने आणले आहे ते दुकानदाराचे आहे. जकातवाल्यांनी दुकानदारांकडे जाऊन



त्याचे सोने आहे की, नाही ही चौकशी करायला हवी की सरळ कार्यालयात सोने नेले पाहिजे?माझा प्रश्न सरळ आहे तुम्ही उत्तर का नाही देऊ शकत?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):- प्रश्न सरळ नाही ना?

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-प्रश्न कसा सरळ नाही.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-जकात न भरता माल नेला तर, मग तो सोनार असो व्यापारी असो वॉचमेन असो सावकार असो. त्याचा काही संबंध नाही. जिथे विना जकातीचा माल पकडला जाईल तिथे माल पकडला जाईल. तिथे जर त्यांनी नाही दिला तर मुख्य जकात नाक्यावर आणले जाईल.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-ठिक आहे. तो जर म्हणत आहे माल माझा नाही दुकानदाराचा आहे. तसेच त्यांनी जर सोने ऑफिसमध्ये ठेवले. तर त्याची पावती तर दयायला पाहिजे होती?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-जो माल त्यांनी घेतला त्याची पावती दयायला पाहिजे.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-पावती दिली पाहिजे. पंचनामा तयार केला पाहिजे की नाही?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-किती दिवसांनी पावती दिली पाहिजे, एका आठवडयात, पंधरा दिवसात?

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-पावती तर दिली पाहिजे की, तुमचे इतके सोने आमच्याकडे आहे.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-हा, पावती दिली पाहिजे.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-त्यांनी दिली नाही. का नाही दिली विचारले त्यांना? सोने ठेवले पावती का नाही दिली. तुम्ही विचारणे जरूरी नाही समजलात?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-त्यांनी पावती तयार करून दिली होती पण त्याने ती स्विकारली नाही.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-कोण म्हणाले असे? कुणी सांगितले?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-मी तपासणी केली.



मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-काय तपासणी केली, वॉचमेनला विचारले? तुम्ही जकात वाल्यांना विचारले. आपण वॉचमनला नाही विचारले.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-या प्रकरणात संबंधित सर्वांना बोलवले होते.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-तुम्ही वॉचमेनला नव्हते बोलावले, किशनचंदला बोलावले होते. ज्याच्याकडुन सोने घेतले तो वॉचमेन होता किशनचंद नव्हता. आपण वॉचमेनला विचारण्याची जरूरी नाही समजलात. त्याच्याकडुनच सोने घेतले गेले का?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-पोलिसांनी ज्यांचा यामध्ये समावेश केला होता.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-तुम्ही पोलिसांची गोष्ट काढता मग मी पोलिसांवर येईन. तुम्हाला मी जे विचारतो त्याचे उत्तर दया.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-जे संबंधित होते त्या सर्वांना मी बोलावले होते.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः- मी काय म्हणतो तुम्ही चौकीदाराला नव्हते बोलावले, इतरांना बोलावले होते. ज्याच्याकडुन सोने घेतले त्यांना नव्हते बोलावले.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-महापौर साहेब, बोलु का मी?

मा. महापौर :-यांचे पुर्ण होऊ दया. नंतर तुम्ही बोला.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः-मा. ढाकरे साहेब, आता तुम्ही सांगितले की,..

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-महापौर साहेब,यांना कसे बोलु दिलेत.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-महापौर साहेब, परवानगी घेतली आहे बोलु का?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-त्याला पण बोलावले होते.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-मी चौकीदाराविषयी बोलत आहे. तुम्ही किशनचंदला बोलावले होते. सोने चौकीदाराकडुन घेतले गेले होते कारागिराकडुन नाही.

--८२--

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-ज्यांची नावे माझ्याकडे आली आहेत त्यांना मी बोलावले आहे. तो चौकीदार होता की, कारागिर हे मला माहित नाही.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-तुम्हाला कोणी नावे सांगितली?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-मोनार्च कंपनीवाल्यांनी सांगितले.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-त्यांनी सांगितले. ठीक आहे. १ तारखेला तक्रार दिली होती. २ तारखेला आम्ही आयुक्तांना भेटलो होतो. पुर्ण सोनारांचे शिष्टमंडळ भेटले होते ते तुम्हाला माहित आहे? तेव्हा आयुक्त साहेब म्हणाले होते कुणाचेही सोने घेतले गेले असेल तर त्याच्या दुकानावर जाऊन पावती दिली जाते. पंचनामा तयार करून पत्र दिले जाते. हे तुम्हाला माहित आहे. असे झाले पाहिजे. आयुक्त साहेब म्हणतात तर असेच झाले पाहिजे ना? बरोबर आहे की चुक आहे?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-आयुक्तांशी काय चर्चा झाली ते मला....

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-मी सांगतो ना आता? बरोबर आहे की चुक. आयुक्त साहेब समोर बसले आहेत मी कशाला खोटे बोलु?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. रामभाऊ आढाव:-निर्णय घ्या. चौकशी नका करू.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-सोने कोणत्त्या तारखेला ठेवले, ४ तारखेला की ५ तारखेला?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. महापौर :-बेहरानीजी तुम्ही तुमचे म्हणणे पुर्ण करा.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-सोने ३ तारखेला घेतले. पावती ३ तारखेला दिली का?

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडे:-महापौर साहेब, ऐका यांना एकदम बोलायला सांगा.

मा. महापौरः-तुम्ही बसा, त्यांना बोलु दया.



मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:- तुम्ही सोने महापालिकेत ठेवले असेल. तिथे सोने न ठेवता ९ तारखेला पत्र दिले की, सोने तुमच्या जवळ ठेवा. देशमुख साहेब, ४ तारखेला, ५ तारखेला मोनार्च कंपनीत गेले. त्यांना सांगितले सोने आमच्याकडे आहे. आमचा भागिदार श्रीचंद तो काठमंडुला गेला आहे तुम्ही उदया या तुम्हाला सोने मिळेल. ९ तारखेला पावती देतात ३ तारखेची आणि त्याला सांगितले जाते सोने तुमच्याकडे ठेवा. सोने महापालिकेत ठेवले पाहिजे होते. कधी कोणा महापालिकेने दिले आहे का सोने तुमच्याकडे ठेवा. जितके पण ठेकेदार आहेत वर पासुन खालपर्यंत दोन-तीन सोडुन हे सिध्द होते की, मोनार्च कंपनीवाले मनमानी यांच्या जोरावर करतात. व्यापा-यांना इतके सतावले जाते. अंबरनाथचा माल जातो तर जकात उल्हासनगरवाले घेतात. एका पावतीची दोन पावत्त्या घेतल्या जातात. जर कुणी तेथे ओरडतो. जसा हा गरीब बिचारा ओरडला. तर त्याचे सोने अजुन इथेच पडले आहे. जर त्याने आरडाओरड नसती केली तर सोने त्याला दुस-या दिवशीच सोने मिळाले असते. तक्रार करायची तर काय? तक्रार केल्यावर असे भोगावे लागते. त्याची पुर्ण दिवाळी अशीच गेली तो गरीब काही कमाऊ शकला नाही. उल्हासनगर मॅन्युफॅक्चरींग असोसिएशन हि उल्हासनगरची मोठी व्यापारी संस्था आहे. त्यांनी पत्र दिले होते त्याविषयी यांना काय माहित आहे?आणि हे म्हणाले की, फक्त व्यापारी मंडळाचे पत्र आमच्याकडे आले आहे दुसरे कुणाचे आले नाही. महापौर साहेब आमच्याबरोबर होते. माझे म्हणणे आहे की, तक्रार आयुक्तांपर्यंत पोहचत नाही तर उल्हासनगरचे काय होईल? इथे काही उध्दारच होणार नाही मग. ठेकेदार इतकी छळवणुक करतो. त्याचा ठेका रदद करून दुस-या कंपनीला दिला तर काय हरकत आहे? आपण त्यांना ठेका जकात वसुल करण्यासाठी दिला आहे. व्यापार संपवण्यासाठी नाही. यांच्या दादागिरीमुळे लुम्स बंद झाले आहेत. बर्नल कंपनी बंद झाली, इलेक्ट्रीक असोसिएशनने पत्र दिले आहे. परंतु अजुन त्यांना बोलावले नाही. त्याची प्रत पण मी तुम्हाला देतो. महापौर साहेबांनी आपल्या स्वाक्षरी सहीत पत्र आयुक्तांना पाठवले परंतु यांना अजुन बोलावले नाही. माझे हेच म्हणणे आहे की, यांचे वागणे असेच असेल तर यांचा ठेका रदद करून दुस-या कंपनीला दिले जावे. २५-५० लाख जास्तच मिळतील.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-दोन महत्त्वाचे प्रश्न जे श्री.ठाकुरदास बेहरानी यांनी विचारले त्याचे उत्तर दिले नाही. एक प्रश्न महत्त्वाचा हा होता की, माल ठेवण्याचा अधिकार कुणाचा आहे? ते लोक तिथे उपस्थित होते का? ज्यांना हा महत्त्वपुर्ण प्रश्न आहे याचे उत्तर मिळाले पाहिजे. दुसरा प्रश्न असा की, तो जो माल आहे तो कुणाकडे आहे. महापालिकेकडे आहे का ठेकेदाराकडे आहे.सोने कोणाकडे आहे?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-मोनार्च कंपनीला जकात अभिकरणाचे अधिकार दिले आहेत. जकात न भरलेला माल ते जमा करतात.दुसरा प्रश्न आहे सोने कोणाकडे आहे? सोने महापालिकेकडे देण्यात आले आहे. ते सोने उपायुक्त म्हणुन माझ्या सहिने कस्टडीत सिल केले आहे.



मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- मला हे विचारायचे आहे मोनार्च कंपनींला जकात अभिकर्त्याचे अधिकार आहेत तर तिथे कुणीतरी जाऊन जसे ठाकुरदासजी म्हणाले पंचनामा तयार केला होता. तसा पंचनामा तयार नाही केला गेला. हे सिध्द होते. ही एक कार्यवाही झाली नाही. दुसरे कस्टडी म्हणजे कुठे ठेवले आहे? बॅंकेत डिपॉझिट केले आहे का महापालिकेत ठेवले आहे कव? उपायुक्तांकडे सेफ कस्टडी आहे जिथे आपण ठेऊ शकतो. कुठे आहे सोने कुणी सांगु शकते? कुठे ठेवले आहे ते, महपालिकेत असेल तर ते आता आणुन दाखवा. कुठे आहे सोने?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-सोने महापालिकेच्या सेंन्ट्रल नाक्यावर सेफ तिजोरीत आहे. माझ्या सहिने सिल करून कस्टडीत ठेवले आहे.

मा. सदस्य श्री. भांडे भगवान, श्री. तेजी कैलास सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौर, हे बरोबर आहे?

मा. महापौरः-त्यांचे म्हणणे आहे जकात अभिकर्त्यांच्या मध्यवर्ती जकात नाक्यावरील कपाटातील तिजोरीत सोने ठेऊन सिल केलेले आहे.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानीः-यापुर्वी पहिले कधी असे झाले होते का? कोणतीही वस्तु कोणाकडे ठेवली जाते का? महापालिकेत जागा नव्हती का? का रजिस्टर मध्ये नोंद होत नव्हती.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-तशी पध्दत काय आहे? कुठे ठेवले पाहिजे. नाक्यावरच ठेवले पाहिजे असे आहे का?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा. महापौर साहेब,...

काही सदस्य :-थांबा महत्त्वाचा मुददा आहे.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-आमचा काय मुददा नाही का?

मा. महापौरः-ढाकरेजी, तुम्ही उत्तर दया नाहीतर कुणा सदस्याला बोलु दया. उत्तर नाही देऊ शकत तर सदस्यांना बोलु दया.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, संपुर्ण शहराचा कारभार महापालिका चालवते.

काही सदस्य :-हिंदीमध्ये बोला.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-हिंदी मला बरोबर येत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौरजी, ढाकरे साहेबांना उत्तर देऊ दया नाहीतर विषय अर्धवट रहतो.

--८५--

मा. महापौरः-ढाकरेजी, सोने कुठे ठेवले पाहिजे त्याची प्रोसिजर काय आहे त्याची माहिती दया.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-हा पहिला प्रसंग आहे जेथे मला सुरक्षेची आवश्यकता भासली. आयुक्तांना विचारून ठेवले. महापालिकेत अशी सुरक्षित जागा नाही म्हणुन सेंट्रल नाक्यावर मी तिजोरीत ठेवले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-तो सेंट्रल नाका जो ऑक्ट्रॉय ठेकेदाराकडे आहे. तिथे ठेकेदाराची मॅनेजमेंट आहे.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-परंतु तिथे तो उपायुक्तांच्या स्वाक्षरीने सिल केला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-ज्यांनी ऑक्ट्रॉय एजेंटम्हणुन सोने पकडले त्याला तो अधिकार होता का?

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-महापालिकेने मोनार्च कंपनीला प्राधिकृत केले आहे. त्यांना अधिकार आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- मग कुणीपण व्यक्ती त्यांचे नाव घेऊन कुठूनही माल पकडु शकतो.

मा. उपायुक्त (श्री. जे.एम. ढाकरे):-ठेकेदार ज्याला अधिकृत करेल ती व्यक्ती असे करू शकेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-ज्या तीन व्यक्तींनी माल पकडला त्यांना प्राधिकृत केले होते का? हे तुम्ही तपासले का? ज्यांनी सोने सिल केले त्यांना अधिकृत केले होते का?

मा. सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक हया सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-महापौर साहेब, बोला शंका पुर्ण होऊ दे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-माझे बोलणे अर्धवट राहिले. माझ्या बोलण्यामध्येच दुसरे बोलतात. मला बोलु दयायचे नाही असा विचार केला आहे का?

मा. महापौरः-मला वाटते उपायुक्त उत्तर देण्यास सक्षम नाही. तुम्ही जाऊन बसावे. टालेजी, हिंदीमध्ये बोला.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-मला इतके पक्के माहित आहे की, महाराष्ट्राची शासकीय भाषा मराठी आहे आणि मी मराठीतच बोलणार.

--८६--

काही सदस्यः-आता हे हिंदीमध्ये बोललात ते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी, श्री. अचनानी पम्मीकुमार, श्री. गोप वेहरानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब या उल्हासनगर शहरामध्ये एक सोनार एक छोटासा कारीगर त्याला ऑक्ट्रॉयचा प्रॉब्लेम होतो आणि संपुर्ण शहर व्यापारी बंद करतात. परंतु ही परिस्थिती का उदभवते? या परिस्थितीला जबाबदार कोण? महापालिकेचे प्रशासन जबाबदार आहे की, लोकप्रतिनिधी जबाबदार आहेत की, ज्याने ठेका घेतले ते जबाबदार आहेत? या शहराचा जेव्हा आर्थिक कारभार प्रशासनाकडुन सांभाळला जातो, अधिका-यांकडुन सांभाळला जातो तेव्हा ते लोक भावनेचा कधीही विचार करत नाहीत. लोकप्रतिनिधी हे भावनेचा विचार करतात. अधिकारी लोक हे नेहमी कायदयावर बोट ठेवुनच चालणारे असतात. ते भावनेचा विचार मला नाही वाटत करत असतील. तर भावनेवर जर हे शहर जर चालवत असतील तर हे शहर केव्हाच बेचिराख झाले असते. माझा मुददा असा आहे की, जर ही परिस्थिती आज उदभवली संपुर्ण व्यापा-यांनी हे शहर बंद केले तर आता पर्यंत हे अधिकारी काय करत होते? आता पर्यंत हे व्यापारी काय करत होते? आजपर्यंत जर ऑक्ट्रॉयच्या ठेकेदाराचा व्यापा-यांवर अन्याय होत असेल तर व्यापा-यांनी आजपर्यंत किती तक्रारी केल्या असतील. आणि त्या तक्रारींवर आयुक्तांनी किंवा या अधिका-यांनी काय कार्यवाही केली. पहिल्यांदा हे सिध्द व्हायला पाहिजे. दुसरा मुददा असा आहे की जर व्यापा-यांच्या काही तक्रारींची सुनावणी झाली नसेल परंतु ठेकेदारांनी तरी आयुक्त वा अधिका-यांना सांगितले असेल की आम्हाला हा त्रास होत आहे. ठेकेदारांनी तरी आयुक्तांना सांगितले आहे का? ठेकेदारांनी महापौरांना सांगितले आहे का? जर त्यांनी सागितले असेल तर त्यावर काय कार्यवाही करण्यात आली. या दोन्ही गोष्टींचा पहिल्यांदा विचार व्हायला पाहिजे. आणि आजच्या घडीला, आज हा डिसेंबर महिना आहे. येणा-या फेब्रुवारीला निवडणुका आहेत. या दृष्टीकोनातुन जर आपण ठेका रदद केला उदया दुस-याला देताना त्याची प्रक्रिया व सोपस्कर पुर्ण करणे याला वेळ जाणार नाही का? आणि जर वेळ जाणार असेल तर महत्त्वाची जी नस आहे संपुर्ण शहराचा कारभार चालवण्यासाठी ते जकातीचे उत्तपन्न आहे. आणि जर या जकातीच्या उत्तपन्नामध्ये खोट येत असेल तर उदया पिण्याच्या पाण्याचा पहिला प्रश्न तयार होईल. त्याची बिलाचा प्रश्न तयार होईल. हे बिल थकीत झाले तर, या शहराची नाडी बिघडायला वेळ लागणार नाही.माझा मुददा असा आहे की, या ज्या व्यापा-यांच्या तक्रारी आहेत. या व्यापा-यांच्या तक्रारी प्रत्यक्ष समोर ठेकेदाराला ठेऊन जर याचा निर्णय लागत असेल तर ते फार बरे होईल आणि यामुळे आपल्या शहराची नाडी सुरळीत राहील. असे माझे मत आहे. आयुक्तांनी पण यावर विचार करावा. महापौरांनी पण भावनेवर जाऊ नये. भावनेवर जर खेळ होत असेल तर ते चुकीचे आहे कायदयाच्या दृष्टीकोनातुन जे जे शक्य असेल ते ते सर्व करावे आणि हा ठराव डिफर करावा असे माझे मत आहे.



मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-मा. आयुक्त साहेब, महापौर, उपमहापौर आणि सर्व सन्मानानिय सदस्य, उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक नाडी सांभाळणारी जकात विभाग हा जो विभाग आहे. शिवसेना आणि भाजपाच्या राज्यामध्ये याचे टेंडर काढुन हे खाजगी ठेकेदाराला देण्यात आले आणि त्यानंतर जकातीचे एकदम उत्तपन्न वाढवले आहे. हे आपल्या सर्वांच्या निर्दशनास आलेले आहे. आणि असे असताना सुध्दा सन्मानानिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी उल्लेख केला आहे की, एक छोटेसे सोने जे पकडले जाते. ज्या सोनाराचे सोने पकडले असेल त्यांनी रितसर तक्रार आयुक्तांकडे केली पाहिजे, महापौरांकडे केली पाहिजे. त्यांनी स्वतः त्यांच्या व्यापा-यांच्या शिष्टमंडळ असेल त्यांनी स्वतः येऊन भेटले पाहिजे की आमचे सोने पकडले आहे. सोने किती तारखेला पकडले?त्यानंतर आपण किती तारखेला तक्रार केली हे गरजेचे आहे. विनाकारण व्यापा-यांचे जे काही शिष्टमंडळ असेल किंवा त्यांची संस्था असेल त्यासाठी एवढा मोठा प्रपोगंडा करण्याची गरज नाही. पुर्ण शहरात

वातावरण तापवण्याची गरज नाही. व्यापा-यांचे येऊन जाऊन जरासे काही झाले की पुर्ण मार्केट बंद करा, पुर्ण मार्केट बंद करा ती व्यापा-यांची चुक आहे. महापालिकेची आर्थिक नाडी सांभाळणारे जकात विभाग आहे आणि त्यावर आपले अनेक गोष्टी आहेत. पाण्याचा प्रश्न आहे,स्वच्छतेचा प्रश्न आहे. महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचा प्रश्न आहे. आणि विकासाचा तर आहेच आहे. त्यासाठी आताच आयुक्तांनी बोलुन दाखवले की, मलाही नगरसेवक फंडासाठी विचार करावा लागेल आणि आता एक पाच मिनिटापुर्वी स्वतः सभागृहनेता म्हंटले होते की जिथे जिथे उत्तपन्नाचा मुददा असेल तिथे आपण व्यत्यय आणायचे नाही. आणि असे असताना सुध्दा सत्ताधारी पक्षाकडुन हा जो काही ठराव महासभेमध्ये आणतात. हा पुर्णतः चुकीचा आहे. समोर निवडणुका आहेत. या सर्व गोष्टीचा आपण सारासार विचार केला तर ज्या ठेकेदाराला आपण हा खाजगी ठेका दिला आहे. त्याची रितसर तक्रार असेल आयुक्त आहेत जे त्यांचे दुकानदार असतील त्यांना घेऊन यावे. विनाकारण व्यापारी महामंडळाकडे जावे. सगळया व्यापा-यांना एकत्र करावे. पुर्ण शहर बंद करावे. हि ऐवढी मोठी बाब नाही आहे. ते जर झाले तर पुढे किती अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. हे ही व्यापारी वर्गाने विचार करणे गरजेचे आहे. ते त्यांनी रितसर भेटावे आणि व्यापा-यांनी हा जो काही मुददा उपस्थित केला पुन्हा जकात ठेकेदारांनी ते जे शहर बंद केले त्यांचे जे काही नुकसान झाले असेल नुकसान होऊन सुध्दा ते आज आपल्याला पैसे आगाऊ देत आहेत अशा परिस्थितीमध्ये ठेकेदाराच्या जर काही तक्रारी आहेत का व्यापा-यांच्या विरूध्द. आज कित्येक वर्ष झाली आहेत जकात ठेका महानगरपालिकेकडे होता. असे किती व्यापारी आहेत जे बॅलेन्सशिट बनवतात त्यांनी आता पर्यंत किती भरला आहे. त्यांचे जकात मागुन घ्या. आज त्यांच्याकडुन जकात वसुल करायला लागले तर त्यांना फार नाकी नऊ यायला लागेल. की आमच्याकडुन जबरदस्ती करतात. एका सदस्यांनी सेवलदास ठाकुर यांनी सांगितले की, रिव्हॉल्वर दाखवितात. तुम्हाला रिव्हॉल्वर दाखवे पर्यंत कायदा सुव्यवस्था आहे पोलिस स्टेशन आहे. त्यांच्याकडे रितसर तक्रार केली आहे का?त्यांना जकात ठेका चालवण्यासाठी दिला आहे. दादागिरी करण्यासाठी नाही. याही गोष्टीचा आपण विचार करणे गरजेचे आहे विनाकारण कोणावरती आरोप करणे सुध्दा चुक आहे. आणि मी महापौरांना सुध्दा विनंती करतो की, आपण जो हा ठराव



आणला आहे तो दिशाभुल करणारा आहे. विनाकारण व्यापा-यांना असे कुठल्याही प्रकारचे आश्वासन देऊ नका. त्यांचे शिष्टमंडळ बोलावुन घ्या. समोर आपण स्वतः बसा त्यांना बोलावुन घ्या. आयुक्तांना सांगा आणि काय असेल तो मुददा तिथल्या तिथे सोडवा. पुर्ण शहर बंद करण्याची गरज नाही. तर मी विनंती करतो की, सदरचा जो ठेका आहे हा कृपया आपण रदद करू नये कारण महापालिकेच्या आर्थिक उत्तपन्नाची नाडी आहे. आणि या गोष्टीचा आपण सारासार विचार करावा अशी मी आपणांस विनंती करतो.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानीः-महापौरजी, आम्ही म्हणालो की, याचा ठेका रदद करून दुस-यांना दिला जावा. पाणी बंद होईल हे बंद होईल , ते बंद होईल ते बोलण्याची गरज काय? इथे आम्ही.........

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-महापालिकेचे काम जकातीवर अवलंबुन आहे. हे तर होणारच आहे. उत्तपन्नावर सर्व अवलंबुन आहे. या गोष्टी उत्तपन्नावर अवलंबुन आहेत.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानीः-आम्ही दुस-यांना ठेका दयायला सांगत आहोत ना?

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-उत्तपन्न बंद झाल्यावर करणार काय तुम्ही? बरोबर आहे ना?

मा. सदस्य श्री.रामभाऊ आढावः-सन्माननिय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सर्व सदस्य इथे एक गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झाला आहे. जकातीबाबत जर आपण अंदाज केला तर ९७ सालापासुन महापालिका अस्तित्त्वात आली. लागोपाठ दोन अडीच वर्ष महानगरपालिकेच्या जकातीची स्थिती पहाल तर इतकी दयनिय अवस्था होती. माझ्या मते दुस-या महापौरांच्या कालवधीत एका दिवसात एक लाख चाळीस हजार जकात आली होती. याचा अर्थ हे सर्व मुददे नजर अंदाज केले तर त्यानंतर निविदा काढल्या व जकातीचे खाजगीकरण केले व त्यामुळे महापालिकेला भरपुर नफा झाला. जकातीचे वसुली जास्त झाली. त्यांच्याकडुन काही चुकी झाली आहे. आमच्या महापौरांनी टेलिफोन करून सांगितले होते की आमच्या व्यापा-यांना त्रास देऊ नका. भले तो सोनार असो, वा कोणी असो त्याला त्रास देऊ नका. परंतु त्यांनी ऐकले नाही. आमच्या आयुक्तांना महापौरांनी सांगितले त्यांना नोटीस दया. किंवा त्यांच्या विरूध्द कारवाई करा ते पण काही केले नाही. प्रशासनाने पण काही केले नाही. लोकप्रतिनिधीतर्फे काही झाले नाही. आणि त्यांच्याकडुन सुध्दा अशी गैरवर्तवणुक करण्याचा प्रयत्न झाला. आता या सर्व गोष्टी सदनात सदस्यांनी सांगितल्या आहेत. जर आपण मोनार्च कंपनीचा ठेका रदद केला तर करू शकतो परंतु जसे टाटा कंपनीचे झाले असेसमेंटच्या विषयी तसे याचे पण होईल. महापौर या शहराचे प्रथम नागरिक आहेत. या नात्त्याने त्यांची चुक माफ करण्याचा प्रयत्न कराल. चुकी सर्वांकडुन होते. या सदनाच्या माध्यमाव्दारे एक नोटीस देऊन टाका. त्यांना इशारा दया. जर दुस-यांदा तुम्ही अशी चुकी केली तर आपला ठेका आम्ही रदद करू. परंतु न्याय बुध्दीने, बंधुभाव ठेऊन त्यांना एक संधी दया. व संधी देऊन त्यांना नोटीस दया. माझ्यामते यावेळी जकात ठेका रदद करणे योग्य होणार नाही. असा मी तुम्हाला सल्ला देईन धन्यवाद.

--८९--

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-सन्माननिय सदस्य, व मंचावर बसलेले आदरणीय महोदय, हा मुददा मोनार्च कंपनीचा जकातचा विषय आपल्यासमोर आला आहे. एक-दोन महिन्यापासुन वादविवाद चालु आहे. आम्हाला मराठी कमी समजते आमचे दोन बंधु मराठीत बोलले जेवढे समजले त्यावरून असे वाटत आहे की, जर शहरास त्रास होता तर लोक आधी का नाही आले. आधी पण तक्रार केली होती. अशा किती तक्रारी रेकॉर्डवर आहेत. आपण जनप्रतिनिधी आहोत शहरवासियांनी आपल्याला निवडुन इथे पाठविले आहे. अशा खुपश्या गोष्टी मागच्या वर्षी आमच्या समोर आल्या होत्त्या. त्यावेळी आम्ही एकमेंकाना बोलावुन समस्या सोडावली होती. आमच्या बरोबर सुध्दा अशी घटना सुरवातीस घडली होती. मी आयुक्तांना विचारू इच्छिते शहरातुन कॅम्प नं. ४ व ५ मधुन एखादी वस्तु आणतो तर त्यावर सुध्दा जकात आकारणार का? नाही आकारत ना? एक लहानसे उदाहरण असे आहे, एकदा मी माझ्या घरातुन निघाले आणि एक वस्तु मी ५ नंबर मधुन घेतली होती. मला ती परत दयायची होती. मला ड्रायव्हरने महापालिकेत सोडले, माझ्या नोकराने मला सोडले ड्रायव्हर त्यादिवशी नव्हता. कैलास कॉलनीच्या इकडे आपला जो जकात नाका आहे तिथे त्याला अडविले. एक लहानशी पिशवी होती. मोठा असा खोका पण नव्हता. त्याला तिथे थांबवले गेले. त्याची गाडी थांबवुन त्याची झडती घेतली गेली. व ती पिशवी काढली. व विचारले हे काय आहे. त्याने सांगितले की, ज्योती कालानी भाभीची गाडी आहे. आणि हे छोटेसे पार्सल आहे ते मला रोमा कटपीस मध्ये दयायचे आहे. ते म्हणाले नाही यावर जकात लावला जाईल. तो हैराण झाला. त्याने खुप वाद घातला मी बिल देखिल त्याला दिले होते. त्याने ते बिल देखील दाखवले आणि सांगितले हे बघा बिल, ही वस्तु मी परत दयायला चाललो आहे. परंतु त्यांनी ऐकले नाही. खुप वादविवाद झाले. त्याला ऐवढे नाही समजले की, मी महापालिकेत बसले आहे त्याने मला फोन केला पाहिजे होता. परंतु त्याने घरी फोन केला. माझा मुलगा तिथे होता. दुसरे असे की, जकात नाक्यावर टेलिफोन पण होता. तो म्हणाला की मला घरी कळवु दया. माझ्याकडे पैसे नाहीत. परंतु त्यांनी सांगितले की नाही बाहेरून जाऊन फोन करा. तुम्ही कल्पना करा

तिथुन त्यांनी ऐवढया लांब त्याला फोन करायला पाठवले. त्याने तिथुन फोन केला व माझ्या मुलाला तेथिल फोन नंबर दिला की तुम्ही बोला माझी गाडी सोडत नाही. नंतर माझ्या मुलाने तिथे फोन केला नंतर त्यांनी गाडी सोडली. मी त्याला महापालिकेत म्हंटले मी महापालिकेत होते तुझे काम होते मला फोन करायचे. तुम्ही सांगा मला जर फोन आला असता तर मी काय केले असते. मी सत्ताधारी पक्ष, विपक्ष सदस्य या सर्वांना घेऊन तिथे गेले असते, असा त्रास शहरातील शहरात वस्तु घेतली आहे तरी जकात? ही सर्व सत्य घटना आहे. त्यानंतर मोनार्च कंपनीवाल्यांनी फोन केला क्षमा देखिल मागितली. अशा एक-दोन घटना अशा आहेत ज्या आमच्याशी घडल्या आहेत. आमचे काही उदयोग धंदे नाहीत की बाहेरून इथे माल येईल. मी स्थायी समितीची सभापती आहे मागच्या वर्षी होते आजपण आहे. हे लोक आमच्याशी जर असा व्यवहार करत असतील तर हे जाहिर आहे की, लोकांशी कसा व्यवहार करत असतील. त्यावर त्यांनी सॉरी वगैरे म्हंटले. चुकी झाली. सुंदर गजवानी तिथे महापालिकेचा कर्मचारी तिथे होता. माझी एक मैत्रिण कल्याणला आपल्या माहेरी जात होती. तिचा नवरा तिला स्कुटर वरून घेऊन जात होता. छोटीशी बॅग होती कपडयाची, त्यांना देखिल



विचारले या बॅगेत काय आहे? जकात भरावी लागेल. अशी अनेक उदाहरणे आमच्या समोर आली. शहर आमचे आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती किती गंभीर आहे हे आम्हाला पण चांगल्या त-हेने माहित आहे. यावर मार्ग काढण्यासाठी आम्ही प्रत्येक प्रयत्न केला आहे. आम्ही आमच्या बंधुना हे पण सांगतो की, याविषयावर पण व्यापारी रागावले होते. आम्ही त्यांच्याशी बसुन स्थायी समितीत दोन तीन बैठकी घेतल्या व त्यांना शांत केले. ते शांत होत नव्हते परंतु शहराची परिस्थिती त्यांना सांगितली की तुमचे हे पाऊल आम्हाला खुप भारी पडले. तुम्ही सफर कराल आम्हाला पण सफर करावा लागेल व्यापारावर परिणाम होईल. आम्ही त्यांना हे पण सांगितले की, जेव्हा जकातीच्या निविदा निघतात तेव्हा तुमच्यासारखे व्यापारी का नाही पुढे येत? असे नाही की, आम्ही प्रयत्न करत नाहीत, आम्ही आपले महापालिकेचे आयुक्तांचे नुकसान नाही करू इच्छित. एकमेकांना सहकार्य आम्ही दिले आहे. सर्व पक्षीयांची एक सभा घेतली गेली, त्या सभेमध्ये व्यापा-यांना बोलावुन विचार केला मोनार्च वाल्यांना बोलावुन आपसात समझौता घडवुन आणु. जेव्हा बैठक आयोजित केली तेव्हा मोनार्च कंपनीच्या भागीदाराचा फोन माझ्याकडे आला की जर महापौरांनी जर आम्हाला लिखित पत्र दिले तर आम्ही येऊ नुसत्त्या त्यांच्या बोलावण्यावरून का यायचे? मी महापौरांना फोन केला त्यांनी पत्र देखिल दिले आहे. जितकी औपचारीकता होती त्यांनी पुर्ण केली. हा विषय महासभेपर्यंत का आला. हे मी तुम्हाला सांगत आहे कारण खुपश्या सदस्यांना माहित असेल. ज्यादिवशी बैठक आयोजित केली त्यादिवशी ते आलेच नाहीत. व सांगितले की, आम्हाला बोलायचे नाही आम्ही आयुक्तांशी बोलु तुम्ही कोण आहात आमच्याशी बोलणारे? आम्ही म्हंटले ठिक आहे तुम्ही आयुक्तांशी बोलु इच्छिता, आम्ही कोणी नाही. परंतु माध्यम म्हणुन तर आम्ही तडजोड करू शकतो. व्यापा-यांना शांत करणे ,आपसात समेट घडवुन आणणे हे तर काम आम्ही करू शकतो. आम्ही इतके प्रयत्न केले तरी काही झाले नाही. महापौरांविषयी ते काही पण बोलु लागले. आम्ही निवडुन आलेलो प्रतिनिधी आहोत.दोन बंधु जर भांडु लागले तर दोघांना शांत करण्यासाठी एकाला काहीतरी बोलावेच लागते. याचा अर्थ असा नाही की, तुम्ही कोर्टात जायचे. महापौरांना कोर्ट कचेरीत खेचले जाते. तर साधारण जनतेचे काय हाल होतील हे आपण समजु शकतो. मला हे बोलण्यास बरे वाटत नाही, आता एक छोटासा मुददा उपस्थित झाला होता पार्किंगसाठी, त्यावर पण आयुक्त बोलले की ,मी नगरसेवक निधी मंजुर करणार नाही. तर आम्हाला माहित आहे महापालिकेची आर्थिक स्थिती काय आहे. आम्हाला कोणत्त्या परिस्थितीतुन जावे लागेल.आम्ही सर्व गोष्टी आपणांसमोर ठेवल्या आहेत आपणांस जसे योग्य वाटेल.शहरवासी व्यापारी हे आपल्या पाठीचा कणा असतात. मागील काही महिन्यापासुन हळुहळु व्यापार दुसरीकडे स्थलांतर होत

आहेत. व्यापाराची मंदी आली आहे. दिवाळीपण यावेळी व्यापा-यांची चांगली नाही गेली.असे त्यांचे म्हणणे आहे,मोनार्च कंपनीवाल्यांना आम्ही समजु शकतो ३३ करोडच्या जागी ते ४३ करोड देणार आहे. जाहिर आहे ते शहरातुन वसुली करणार.याचा अर्थ असा नाही की,येणा-या जाणा-या लोकांची, व्यापा-यांच्या,स्थायी समितीच्या मान्यवरांच्या इज्जतीला हात घालाल. हे कुणी सहन करणार नाही. इथपर्यंत गोष्टी झाल्या डोक्यावरून पाणी गेले. नंतर हा मुददा महासभेसमोर आला आहे. आणि आमच्या सर्व सदस्यांचे हे म्हणणे आहे



जसे आमचे बंधु म्हणाले तडजोड होऊ शकते तो तर करण्याचा आम्ही प्रयत्न केला त्यानंतर देखिल आयुक्त साहेब असे समजतात की काहीतरी अजुन होऊ शकते तर आम्ही व्यापारी बंधुना समजवण्यास तयार आहोत. नाहीतर सर्वांचे असे म्हणणे आहे त्यांचा ठेका रदद करून अब्रुपेक्षा पैसा जास्त नसतो. शहर आमचे आहे आम्हाला कोणत्त्या परिस्थितीतुन जावे लागणार आहे हे सर्व लक्षात ठेऊन तुम्ही जर व्यापा-यांसाठी काही करू शकला. त्यांच्या अब्रुचे नुकसान नाही झाले पाहिजे. जर तुम्ही काही करू शकत असाल तर मार्ग काढा. नाहीतर पुर्ण सदन त्यांचा ठेका रदद करण्यास तयार आहे. आपणांस जे ठिक वाटेल ते करावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, जकात याविषयावर भरपुर चर्चा झाली. मी जास्त न बोलता थोडक्यात बोलतो आज १.११.२००१ सोनार नवजवान मंडळातर्फे आयुक्त साहेबांना तक्रार दिली गेली. अजुन त्यांना बोलावले नाही. ५.११.२००१ला उल्हासनगर इलेक्ट्रीकल व्यापारी मंडळातर्फे दिले गेले अजुन त्यांना उत्तर नाही दिले. उल्हासनगर कल्चर असोसिएशनतर्फे १८.११.२००१ ला तक्रार दिली गेली तरी त्यांना बोलावले नाही. तक्रारीची पोच पावती पण आमच्याकडे आहे. आयुक्त साहेब महत्त्वाचे कागदपत्र बघतात बाकी विभागाकडे पाठवुन देतात. मला हे नाही विचारायचे की, त्यांच्यापर्यंत तक्रार गेली की नाही उपायुक्त जकात यांच्याकडे तक्रार गेली असेल. जसे आमच्या श्री. प्रमोद टाले जे नेहमी आमच्या युतीच्या बाजुने असत जसे ते म्हणाले मी त्यांचे लक्ष वेधु इच्छितो की एका तक्रारीमुळे उल्हासनगर बंद नाही होत. प्रत्त्येक व्यापा-याच्या मनात ही पीडा होती. परंतु प्रत्त्येक जण सहन करत होते. अन्यायाचा पेला कधी ना कधी सांडतोच. आणि पेला सांडला. आता जसे विचारले की, ते तीन लोकांना जकात वसुलीसाठी अधिकृत केले होते का? ज्यांनी सोने घेतले. त्याचा खुलासा अजुन नाही केला. ते म्हणाले मोनार्चवाल्यांना दिले जसे त्यांना हवे तसे त्यांना करू दे हे पण चुकीचे आहे. एक पावती महापालिकेतर्फे जकातीची निघाली आहे. त्याची तारीख आहे ११.२.२००१ महापालिकेची पावती कशी निघाली? त्यानंतर अंबरनाथच्या एका व्यापा-याचे बिल आहे. त्याचा जकात उल्हासनगर महापालिकेने वसुल केला आहे. जसे आता श्री. ढाकरे साहेब म्हणाले महापालिकेतर्फे एक तिजोरी सपना गार्डनमध्ये ठेवली आहे. त्याचे उत्तर पण बरोबर देत नाहीत. महापालिकेची तिजोरी आहे का ठेकेदाराची तिजोरी आहे याचा खुलासा पण ते करू नाही शकले. ९ तारखेची ३ तारखेला सही दिली गेली ती पण का दिली मागच्या तारखेला ते पण मी सांगु इच्छितो कारण मी पण उपस्थित होतो. तर आजचा जो विषय आहे उल्हासनगर एका व्यापा-यावर अन्याय झाला म्हणुन बंद केले असे नाही. प्रत्येकाच्या मनात दुःख होते. जसे आमचे बंधु श्री. लांडे पांडुरंग म्हणाले की, सत्ताधारी पक्षातर्फे हा प्रस्ताव यायला नको पाहिजे होता. मी त्यांना सांगु इच्छितो भाजपा गटनेत्त्यांची पण त्यावर स्वाक्षरी आहे. फक्त सत्ताधारी पक्षातर्फे प्रस्ताव नाही आला. त्यानंतर आमचे कोणीतरी बंधु म्हणाले पाणी बंद होईल हे बंद होईल ते बंद हेईल. आम्ही जर जकातीचा ठेका रदद केला तर कायदेशिर रित्त्या करू जर १५ दिवसाचे, एक महिन्याची कायदेशिर नोटीस देऊ जर त्याची सात करोडची सेक्युरीटी आहे. त्यानंतर ही जप्त नाही केली जाणार त्यानंतर एक महिन्यात दुसरा कोणी एजंट ठेकेदार तेवढेच रक्कमेत जेणे महापालिकेला नुकसान नाही होणार. जर दुस-या कोणी ठेकेदाराने पुढे येऊ निविदा भरली कारण की, जकात तिच्या

ठेक्यावर फायदा नाही मिळाला तर उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रकरण जाते दरवर्षी. दोन-चार ठेकेदार आपसात भांडतात व सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातात. तिथुन आदेश आणतात कारण की त्यांची कमाई असते म्हणुन आदेश आणतात. इथे जे लोकसेवक आहेत प्रत्येक सदस्य पाच हजार लोकांमधुन निवडुन आला आहे. आम्ही मोनार्चच्या विरोधात आहोत वगैरे असे काही नाही. ठिक आहे ते पण महापालिकेला उत्पन्न देतात. त्यांच्या आम्ही विरोधात जात नाही.परंतु व्यापा-यांवर अन्याय झाला असता आम्हा लोकप्रतिनिधींचे हे कर्तव्य आहे की, पुर्ण व्यापा-यांना आम्ही सहकार्य दिले पाहिजे हा मुख्य मुददा आहे. त्यानंतर हा विषय महासभेपर्यंत न यावा म्हणुन आम्ही किती प्रयत्न केले. कुणाकुणा लोकांचा यात समावेश आहे. कुणी जाऊन निवडणुक आयुक्तांकडुन पत्र आणले. कोण प्रयत्न करत आहे शासनाकडे की यांचा ठेका रदद नाही झाला पाहिजे? कोण उच्च न्यायालयात प्रयत्न करत आहेत? त्याविषयाकडे मी नाही जाऊ इच्छित. कोण मोनार्चच्या बाजूने आहे विरोधात आहे? परंतु माझी सदनाला विनंती आहे सर्व पक्षीयांचे गटनेते त्यावेळी भाजपाचे नेता गण पण उपस्थित होते. कॉंग्रेस, यु.पी.पी, अपक्ष सर्व पक्षीय सदस्य सोनारा हॉलमध्ये उपस्थित होते तेथिल व्यापा-यांचे दुःख पाहुन जितके पण पुरावे आहेत ग्रीन कार्ड देणे वगैरे. तिथे आम्ही जाहिर केले होते की, आम्ही तडजोड करण्याचा प्रयत्न करू. व मोनार्चवाल्यांनी मला स्वतः फोन केला होता की, जर महापौरांनी लेटर देऊन मला बोलावले तर आम्ही यायला तयार आहोत. मी महापौरांना विनंती करून १२ वाजता सभा ठेवली सर्व व्यापारी मंडळ उपस्थित होते. माझा शिपाई लोखंडे महापौरांच्या सहिचे पत्र घेऊन मोनार्चवाल्यांकडे ११.४५ वाजता गेला. त्यांनी १ वाजता सही करून पत्र दिले व त्यावर लिहिले १ वाजता आम्हाला पत्र मिळाले. त्यांनी स्वतःहुन सव्वा तास उशिरा सही केली त्यांनतर त्यांनी त्या पत्राच्या विरोधात लगेच एक पत्र पाठवले की, महापौरांना सभा घेण्याचा काही अधिकार नाही. जर आयुक्तांनी बैठक घेतली तर आम्ही येऊ. परंतु महापौरांनी जेव्हा सभा बोलावली त्याआधी सुध्दा महापौरांच्या ॲन्टी चेंबरमध्ये मोनार्च व व्यापा-यांची चर्चा झाली होती. तिथे तरी त्यांनी मांडवली(तडजोड) करायला पाहिजे होती. व्यापा-यांचे दुःख ऐकुन घ्यायला पाहिजे होते. म्हणजे महापौरांनी सभा बोलावण्याची गरज नसती झाली. तिथे आयुक्त साहेब पण उपस्थित होते. तिथे का नाही निर्णय झाला? तिथे आयुक्त , महापौर दोन्ही उपस्थित होते त्यावेळी त्यांनी का नाही निर्णय घेतला? आमची पण अशी इच्छा होती की, निवडणुक जवळ येत आहे, ठेका रदद नाही झाला पाहिजे. महापौरांनी पाठवलेले पत्र रिफ्युझ करून उलट सोनारा हॉलमध्ये जे प्रतिनिधी बोलले त्यांच्या विरूध्द अब्रुनुकसानीचा दावा लावला गेला. यांची ही वागण्याची पध्दत तडजोडीची नव्हतीच नाहीतर महापौर व सर्व पक्षीयांचे गटनेते त्यांना तडजोड करण्यासाठी बोलवतात. जर ते खरे होते तर कुणीही त्यांना बोलावले चर्चेसाठी वा तडजोडी साठी तर त्यांनी जरूर यायला पाहिजे होते. मी या जागी असतो तर नक्की गेलो असतो पण मीच जर चुकीचा वागलो तर नसतो गेलो. हे पण आले नाहीत. आम्हाला निवडणुक आयोगातर्फे जी सुचना आली आहे की, हा मुददा मंजुर नाही झाला पाहिजे. यासाठी दोन सभा स्थगित करण्यात आल्या. आज व्यापारी महामंडळांची जीत आहे. त्यांनी उच्च न्यायालयात जाऊन आदेश आणला आहे की, मोनार्चचा ठेका रदद करण्याचा निर्णय महासभा घेऊ शकते. ही व्यापा-यांची जीत आहे. आज जास्त चर्चा न

--९३--

करता आयुक्तांना मी विनंतो करतो व ठरावात निश्चित असे लिहिले पाहिजे की, आयुक्तांनी मोनार्च ठेका रदद करण्याविषयी बाजु मांडायची आहे व जी कायदेशिर नोटीस दिली जाते १५ दिवसाची , एक महिन्याची ती देऊन दुस-या निविदा मागवाव्यात जेणेकरून महापालिकेची परिस्थिती खराब होऊ नये. पगार कपात, पाणी कपात असे होऊ नये जे हे म्हणत आहेत. दुस-या ठेकेदाराने पुढे यावे व त्याला ठेका दिला जावा. व उच्च न्यायालयाने आम्हाला परवानगी दिली आहे आम्ही तसा ठराव पास करू उल्हासनगरमध्ये आठ लाख

लोकसंख्या आहे. १ ते ५ कॅम्प यामुळे बंद करण्यात आले हे सर्व यांच्यामुळे दुःखी आहेत. या गोष्टी लक्षात घेता मी सदनाला विनंती करेन की हा ठेका कायदेशिर रित्त्या त्यांची सुरक्षा अनामत रक्कम सात करोड रूपये जप्त न करता नोटीस देऊन त्यांचा ठेका सर्व संमतीने रद्द केला पाहिजे व आयुक्तांनी उल्हासनगरच्या जनतेबरोबर उभे राहीले पाहिजे. ते उल्हासनगरचे आयुक्त आहेत, जनप्रतिनिधींचे आयुक्त आहेत, जनतेचे म्हणणे काय आहे हे त्यांनी समजुन घेतले पाहिजे. आमची तर इच्छा आहे त्यांनी उल्हासनगरमध्ये येऊन रहावे व जनतेचे दुःख स्वतः पहावे. यांनी पण पाहिले की, मोनार्च वाले तडजोडीच्या मुडमध्ये नव्हते. म्हणुन हा ठेका रद्द केला पाहिजे आणि हा विषय संपवला पाहिजे. जयहिंद, जय महाराष्ट्र, जय झुलेलाल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-सन्माननिय महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब कुणाकुणा व्यापा-याची आपल्याकडे तक्रार आली आहे की, ठेकेदाराने आम्हाला त्रास दिला आहे. मी मागील दोन महासभेत पण विचारले आहे. आयुक्तांनी सांगावे कुणाकुणा व्यापा-याची तक्रार आहे. सांगा आपण. आधी पण यावर चर्चा झाली आहे. तुम्ही आम्ही सांगुन काही फायदा नाही आयुक्तांनी सांगावे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-पुर्ण उत्त्तर देऊ की ऐवढयाचेच उत्त्तर देऊ.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-फक्त ऐवढेच कुणा व्यापा-याची आपल्याकडे तक्रार आली आहे का?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-मला व्यापारी महामंडळाकडुन व असोसिएशन तर्फे अशा दोन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व त्यामध्ये ठराविक निश्चित स्वरूपाची काही तक्रार दिलेली नाही. साधारण तक्रार दिली आहे. जेव्हा ते व्यापारी मला भेटले होते तेव्हा मी त्यांना सांगितले की, जर काही विशिष्ठ तक्रार असेल तर माझ्याकडे दया त्यावर आपण मार्ग काढु. परंतु व्यापा-यांनी व्यापारी असोसिएशनने कुठल्याही प्रकारची निश्चित तक्रार दिली नाही. साधारण तक्रारी आहेत जनरल कंम्प्लेट वरून कुठल्याही प्रकारची चौकशी किंवा इनव्हेस्टीगेशन करता येत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- मोनार्च वाल्यांनी काही तक्रार दिली आहे का?

--९४--

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-माझ्यामते त्यांची तक्रार आली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कुठे तक्रार? काय तक्रार दिली आहे?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-जी तक्रार दिली आहे. त्यावर चौकशी चालु आहे. चौकशी पुर्ण झाल्याशिवाय काही बोलणे योग्य ठरणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- योग्य ठरणार नाही परंतु या ज्या विषयावर चर्चा चालु आहे. कोर्टासमोर सर्व परिस्थिती सांगावी लागणार त्याशिवाय कोर्ट कसा काय निर्णय घेणार. काय पण तक्रार असो तुम्ही सांगा ना.चौकशी चालु दे वर्षानुवर्ष परंतु तक्रार काय ते तर सांगा. व्यापारी महामंडळ तक्रार करते तर तुम्ही चौकशी करता. ठेकेदारानी तक्रार केली आम्ही चौकशी करणार काय तक्रार आहे. कोर्टाला कसे माहित पडेल की तक्रार आली आहे. सांगायला काय हरकत आहे काय तक्रार आहे? आयुक्त

कबुल करत आहेत तक्रार आली आहे महापौरजी, त्यांनी तक्रार काय आहे ती सांगितली पाहिजे. जबाबदार अधिकारी तक्रार करत आहेत. आमचा हा प्रस्ताव कोर्टासमोर जाणार आहे. व आयुक्तांनी इथे मान्य केले आहे की, ठेकेदाराची तक्रार आली आहे तर तक्रार काय आहे. ते व्यापारीला थोबाडीत मारतात, रिव्हॉल्वर दाखवतात अशी तक्रार आहे. ठेकेदारानी कुणा विषयी तक्रार केली आहे. आयुक्तांनी सांगितले पाहिजे.

मा. महापौरः-मला वाटते जकातीच्या मुददयाबाबत सदनात बरीच चर्चा झाली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- महापौरजी, आयुक्तांना उत्तर तर दयावेच लागेल ना? त्यांनी उत्तर दिलेच पाहिजे ठेकेदाराची काय तक्रार आहे.

मा. महापौर :-आयुक्तांनी तर आपणांस उत्तर दिले आहे ना.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- पुर्ण विषयावर त्यांना बोलायचे आहे तक्रारी विषयी पण बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आयुक्त साहेब, व्यापा-यांनी जकात ठेकेदारांचा पर्दाफाश केलाच आहे. जकात ठेकेदारंची जी काही तक्रार असेल व्यापा-यांविरूध्द असेल नागरिकांच्या विरूध्द असेल. काहीतरी तक्रार असेल जी काही वस्तुस्थिती असेल समोर ठेवणे गरजेचे आहे. शेवटी व्यापा-यांनी तक्रार वस्तुस्थितीला धरून केलेली नाही. शहरामध्ये लुटमार चालु आहे याला कुठल्याही प्रकारचा आधार नाही. वास्तविक अशाप्रकारची तक्रार ग्राहय धरू नये हे १०० टक्के सत्त्य आहे.परंतु त्यांनी जर वस्तुस्थितीला धरून काही तक्रार केली असेल सांगायला काही हरकत नाही कारण टाळी एका हाताने



वाजत नाही. निश्चित व्यापा-यांनी सुध्दा कुठेतरी त्यांना त्रास दिला असेल म्हणुन त्यांनी सुध्दा व्यापा-यांविषयी काही तक्रार दिली असेल. जर जकात वाले जबरदस्ती वसुली करत असतील तर त्याठिकाणी व्यापा-यांनीसुध्दा त्यांना निश्चित त्रास दिला असेल जी वस्तुस्थिती असेल ती सभागृहा समोर मांडा त्यामुळे जो काही पर्दाफाश व्हायचा असेल तो संपूर्ण सदनासमोर होईल. मी आपणांस विनंती करतो की, आपण त्यांची तक्रार सदनासमोर वाचुन दाखवावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-लपवता कशाला, जर काही तक्रार आली असेल तर वाचुन दाखवा ना. आम्हाला पण निर्णय घ्यायचा आहे. जोपर्यंत तुम्ही सांगणार नाही आम्ही निर्णय नाही घेऊ शकणार. आम्हाला निर्णय घेणे सोपे होईल तक्रार समजली तर. तुम्ही काय फेवर करत आहात याबाबतीत.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-कुणालाही फेवर करण्याचा यात विचार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही तक्रार सांगा त्यानंतर आम्ही निर्णय घेऊ.

मा. महापौरः-महाराजजींना पुर्ण संधी मिळाली पाहिजे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-तक्रार ही गोपनिय आहे. गोपनिय तक्रार मला प्राप्त झाली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ती तक्रार तुम्ही कोर्टाच्या स्वाधीन करालच. इतिवृत्त पण इथुन जाणार. १४ तारखेला तुम्हाला ती तक्रार कोर्टात दयावीच लागणार.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):- चौकशी झाल्याशिवाय त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-भाष्य करणे योग्य ठरणार नाही, १४ तारखेला तुम्हाला कोर्टात तक्रार दयावीच लागेल. सभागृहात ते सांगत नाहीत त्याशिवाय आम्ही निर्णय कसा घ्यायचा.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-आताच त्यांनी स्पष्ट केले पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-जर ते म्हणत आहेत चौकशी पुर्ण नाही झाली तर पाठवण्यात अर्थ काय?



मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-चौकशी का पुर्ण झाली नाही किती तारखेची तक्रार आहे.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-तक्रार कुणा विरूध्द आहे ते तरी माहित पडले पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कुणा विरूध्द आहे ते तरी सांगा.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-कोर्टात नंतर तक्रार गेली तर ती वैद्य ठरणार नाही.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-माझ्याकडे तक्रार आली ती गोपनिय स्वरूपात आली आहे. पुर्ण चौकशी केल्याशिवाय त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-चौकशी केल्याशिवाय भाष्य करू नका परंतु तुम्हाला किती तारखेला तक्रार आली.

मा. महापौरः-महाराजजी, आता पुरे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-कोर्टाने विचारले तर कोर्टात उत्तर देऊ.

मा. उपमहापौरः-यावर माझा एक विचार आहे. खुप चर्चा झाली आहे जकात विषयी. महापौर साहेबांनी मला बोलण्यास सांगितले आहे. मोरे साहेब माझ्याकडे असे का बघत आहेत? त्यांना बोलु दया. मी नंतर बोलतो.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-मा. महापौरजी व सदनातील सदस्य जकातीच्या मुदयांबाबत खुपशी चर्चा झाली आहे. आणि सदनातील सर्व सदस्य म्हणाले की मी बोलले पाहिजे असा त्यांनी आग्रह केला आहे. मी तर बोलणारच होतो. कारण की मी बोलल्याशिवाय निर्णय होणार नाही असे मला पण वाटते. मी सदनातील सर्व सदस्यांना एक विनंती करू इच्छितो. मी जास्त वेळ घेत नाही. मला माहित आहे ९.१० वाजले आहेत. जकात विषयी काहीतरी निर्णय झाला पाहिजे याबाबत माझे पण असेच विचार आहेत. तर कृपा करून जरा शांततेने सहकार्य दया. अशी मी विनंती करतो. महापौरजी, आता या

ठेक्याबाबत काही सदस्यांनी सांगितले मोनार्चला जो ठेका दिला आहे. व्यापारी वर्गाला व जनतेला त्रास झाला आहे. आताच सदस्यांनी सांगितले की, ठेकेदारानी काही तक्रार दिली आहे का? आयुक्त साहेब म्हणाले की काही तक्रार नाही. त्यांनतर विचारले की अपराधी आणि फिर्यादी असेही होऊ शकते. जर व्यापारी असोसिएशनने तक्रार नाही दिली ठेकेदारानी दिली असे झाले आहे का? आयुक्त साहेब म्हंटले ठेकेदारांनी तक्रार दिली. परंतु तक्रार काय आली ते सांगत नाहीत. मी हे बोलु इच्छितो की, आमच्या काही सदस्यांनी हे पण सांगितले की अजुन काही होऊ शकते का? काही तरी तडजोड केली पाहिजे. काहीतरी निर्णय घेतला पाहिजे. असेही काही सदस्यांनी



सांगितले. तर मी आर.पी.आय तर्फे गटनेता म्हणुन हे सांगु इच्छितो की, आयुक्त साहेबांनी आता सदनात सांगीतले की, जर तुम्ही हा ठराव नाही केला तर मी नगरसेवक निधीवर हरकत घेईन. आणि आमचे सदस्य म्हणाले की, हा ठेका रदद केला जावा व दुस-याला ठेका देण्याची कार्यवाही सुरू करावी. महापालिकेचा कालावधी व महापालिकेची स्थिती लक्षात घेता काय आहे. कुणी सदस्यांनी खोलवर विचार नाही केला परंतु मी आयुक्तांशी याबाबत कित्त्येकदा चर्चा केली आहे. म्हणुन मला चांगल्यात-हेने माहित आहे की, महापालिकेची स्थिती काय होईल. आता सदस्य म्हणाले पाण्याची स्थिती काय, त्यांनी आधीच नोटीस दिली आहे पाण्याचा हप्ता भरला नाही. आम्ही पाणी कपात करू. अशी महापालिकेला नोटीस देखिल आलेली आहे. अजुन वेळ गेली नाही. सदनातील सर्व सदस्य लोकप्रतिनिधी इथे हजर आहेत. या शहरात रहाणारे व्यापारी, प्रतिनिधी व जकातीचा ज्यांनी ठेका घेतला ते पण आपल्या शहराचे एक नागरिक आहेत. सभागृह नेत्यांनी सांगितले महापौरांनी पत्र दिले तडजोड करण्यास सांगितले हे सर्व आम्ही कानाने ऐकले आहे. आम्ही तिथे उपस्थित नव्हतो. जेव्हा स्थायी समितीमध्ये ही चर्चा झाली तेव्हा महापौरांनी पत्र लिहिले त्यांना बोलावले तरी ठेकेदार आला नाही. हे आम्हाला माहित आहे. परंतु आज आपण पाहिले दोन महिन्यावर निवडणुका आहेत. जर ठेका रदद केला तर उदया महापालिकेची स्थिती कशी होईल हा पण विचार करणे जरूरीचे आहे. जसा एक वकील पुर्ण केसवर विचार करतो मी पण अनुमती दिली होती माझी सही देखिल आहे. या पंधरा वीस दिवसात मी नीट अभ्यास केला. याशहरात मी रहातो व्यापारी माझे बंधु आहेत त्यांना मी साथ दिली पाहिजे. परंतु त्यांना खुश करतेवेळी शहरावर काय समस्या येईल नागरिकांना काय अडचण येईल. मग ती पाण्याची असो वा कसली त्या समस्येला जबाबदार एकटे आयुक्त नसतील. आम्ही लोकप्रतिनिधी असु. मी सदनाला विनंती करू इच्छितो जर आजपासुन हा ठेका रदद केला तर महापालिका आर्थिक संकटात येईल. असे मी समजतो. (बाकडे वाजवु नका नंतर वाजवा)

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>कृपया वेळेकडे लक्ष दया. आम्ही मधुमेह रूग्ण आहोत. कृपया मेहरबानी करा आम्ही चार वाजेपासुन इथे बसलो आहोत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> मोरे साहेब जरा देवेंद्रसिंग खेमाणींचा विचार करा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग्र खेमाणीः-</u>त्याच त्याच गोष्टीची पुनरावृती होत आहे. असे नाही झाले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-</u>जर श्री. दर्शनसिंग खेमाणी यांची तब्येत बरी नसेल तर त्यांनी रजा घ्यावी. माझे म्हणणे आहे ठेकेदाराला बोलावुन त्यांना सक्त ताकीद दिली जावी. पुन्हा असे नाही झाले पाहिजे. सहा महिन्याचा कालावधी आमचा शिल्लक असता तर आम्ही आनंदाने रदद करण्याची परवानगी दिली असती. परंतु आज जर ठेका रदद केला तर महापालिका अडचणीत येईल. व आमचे जे विकासाचे काम सुरू आहे ते

होणार नाही. आता जर निवडणुका येतील आपण वोट मागायला गेलो तर खुप अडचणी येतील म्हणुनच सदनाला व महापौरांना माझी विनंती आहे की,तुम्ही त्यांना बोलावले असेल तो आला नसेल आपला अपमान झाला असेल तरी मी आपणांस विनंती करतो शहरवासियांकरता की आजचा हा विषय मंजुर करू नये डिफर करावा व त्यांना बोलावुन तडजोड करा. हा सल्ला मी तुम्हाला देऊ इच्छितो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-अनुमोदक म्हणुन यांची सही आहे का दुस-या कुणाची?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-नाही ते पल्टीनाथ झाले.

मा. सदस्य श्री. पांडुरंग लांडेः-आता त्यांचे मन बदलले असेल.

मा. सदस्य श्री. बी. बी. मोरेः-आताच मी सांगितले की, मी नंतर विचार केला. मी अनुमोदक होतो. जसे आता भाजपावाले आतुन बाहेर जाताना नाही म्हणणार व बाहेरून आत आल्यावर हो म्हणतील असे आमचे आर.पी.आय.चे वागणे नाही.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मोरेजी, तुम्ही भारतीय जनता पार्टीवर आरोप लावत आहात. तुमचे वागणे नेहमीच असे असते. हो म्हणुन नाही म्हणणे हे तुमचे वागणे आहे.

मा. सदस्य श्री. बी.बी. मोरेः-मी आधीच सांगितले...

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- तुमचे वागणे तुम्हीच बघा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- अहो पल्टीनाथ बाबा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा. महापौरः-आता उपमहापौर बोलतील.

मा. उपमहापौरः-लालजी, आताच मोरे साहेबांनी असे सांगितले की मी पंधरा-वीस दिवस अभ्यास केला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-पंधरा वीस दिवस खुप असतात, आज काल मध्येच त्यांचा विचार बदलला असेल.

मा. उपमहापौरः-जकातीविषयी बरीच चर्चा झाली ब-याच सदस्यांनी आपापले विचार मांडले. व्यापा-यांची समस्या काय, तक्रार काय त्याचे विवरण श्री. राजानी, श्री. सेवलदास ठाकुर यांनी केले आहे. श्री. ठाकुर बेहरानी, सभागृह


नेता. चर्चा बरीच झाली आहे. ठेकेदारांना काय  अडचण आहे यावर पण चर्चा झाली आहे त्यात प्रशासनाचे काय म्हणणे आहे हे समजले नाही त्यांना संधी दिली गेली नाही. परंतु सदस्यांचे विचार जुळलेले आहेत. टालेजी म्हणाले की, व्यापा-यांची तक्रार आहे. एका सोनाराची तक्रार आहे. त्यामुळे संपुर्ण उल्हासनगर बंद होते म्हणजे पुर्ण व्यापा-यांना त्यांच्यापासुन त्रास आहे. परंतु त्याचबरोबर जकातीचा हा मुददा आहे. जकात हे महापालिकेचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. ज्यावर आपली महापालिका चालत आहे. नागरिकांना आपण ज्या

सुविधा देतो त्याचा मुलभुत आधार मुख्य कणा जकात आहे. अशा विषयी जर चुकून जरी आपली चुक झाली तर त्याचा परिणाम पुर्ण शहरावर, महापालिकेवर विपरीत होईल. महापालिकेच्या पुढील येणा-या पाच वर्षाच्या प्रशासनावर याचा परिणाम होऊ शकतो. व्यापा-यांची समस्या व आर्थिक परिस्थिती याचा सामना आपल्याला करावा लागेल या गोष्टीं लक्षात घेऊन भाभी ज्योती कालानी यांच्याशी मी सहमत आहे. व किशोरजी म्हणाले की, यासाठी आम्ही मांडवली करण्याचा प्रयत्न केला. तडजोड करण्याचा प्रयत्न केला आहे तर दुस-यांदा पण प्रयत्न करावा ते बरे होईल यासाठी या ज्या ऐकीव गोष्टी आहेत त्याचे विस्तारपणे चौकशी होणे जरूरी आहे त्यासाठी कमिटी नेमुन जर त्यानंतर ज्या तक्रारी आहेत त्यावर चौकशी केली जावी. त्यांनतर ठेकेदार व व्यापारीना बोलवावे. जर ठेकेदाराची चुकी असेल तर त्याला तशी समज दिली जाईल दुस-यांदा असे होऊ नये. मी तुम्हाला अशी विनंती करतो की, जर कमिटी नेमून काही मार्ग निघत असेल तर तसा प्रयत्न करावा.

मा. महापौरः-जकात विषयी जी चर्चा या सदनात झाली आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-महापौरजी, एक मिनिट, एक महत्त्वाचा मुददा की ज्या व्यापा-याचे सोने इथे आहे त्याला ते त्वरीत दिले पाहिजे याविषयावर तरी सदनाचे एकमत असले पाहिजे. बाकी विषयी जी चर्चा झाली त्यावर मंथन करून जे अमृत निघेल. त्या व्यापा-यावर अन्याय नाही झाला पाहिजे.

मा. महापौरः-आता सदनात चर्चा झाली आहे. सर्व सदस्यांनी ऐकले आहे. मी प्रस्ताव सर्वांसमोर मांडत आहे. सदनाने भले जसा आहे तसा मंजुर करावा. किंवा जर काही बदल करायचा असेल तर तो पण करू शकता. जर सदनाची इच्छा असेल की, प्रस्ताव डिफर करण्यात यावा. आयुक्त साहेब काही सांगु इच्छितात.

मा. आयुक्त(श्री.बी. आर. पोखरकर):-सन्माननिय महापौर, ही प्रस्तावाची सुचना ज्याला इंग्रजित मोशन म्हंटले जाते सभागृहासमोर आली आहे खुपसे सदस्य प्रस्तावाची सुचना सभागृहासमोर मांडतात त्यावर बहुतांश चर्चा होत नाही. ती सुचना प्रशासनाला पाठवली जाते असा संकेत आहे. प्रशासन वैधानिक स्वरूपात तांत्रिक प्रात्यक्षिक आर्थिक सर्व बाबीने विचार करतो. ते महापालिकेच्या हिताचे आहे की नाही त्यावर पण विचार केला जातो. व त्यानंतर प्रशासन निर्णय घेतो. ही खरी परिस्थिती चर्चा झाली खुपसा-या सदस्यांनी विचार मांडले. एक मुददा स्पष्ट करू इच्छितो खुप प्रश्नोत्तरे



विचारले गेले , अधिकारीना प्रश्न विचारले गेले. योग्यप्रकारे कायदेशिररित्त्या लेखी स्वरूपात प्रश्न आले पाहिजे व लिखित स्वरूपात उत्तर दिले जाते. इकडे प्रश्नोत्तरे नुसती विचारतात जर कायदेशिररित्त्या लेखी विचारले तर कारभार व्यवस्थित चालेल. सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी म्हणाले आयुक्त मला थांबवु शकत नाहीत. परंतु खुपसे काही प्रश्न काल्पनिक असतात ज्याचे उत्तर देणे प्रशासनाला बंधनकारक नाही. अनुसूचीतील प्रकरण चॅप्टर २ त्याचा भाग एक मध्ये तशी तरतुद आहे. माझ्यामते पुन्हा असे घडले नाही तर चांगले होईल. आयुक्तांचे हे कर्तव्य असते की, कायदेशीर काय आहे ते पहाणे नागरिकांना योग्य ते सांगणे कुणाला चांगले वाटते वाईट वाटते हा प्रश्न येत नाही. मी आधीच सांगितले व्यापा-यांच्या एक-दोन तक्रारी माझ्याकडे आल्या त्यात विशिष्ट अशी काही तक्रार नव्हती. स्पेसिफीक तक्रार असती तर पाहीले असते तशी तक्रार नसल्याने अद्याप त्यावर अनुमान काढले नाही. मला अजुनही माहित नाही पडले की, ठेकेदाराने कोणत्त्या शर्तीचा भंग केला. त्याचा ठेका रदद करण्यासाठी काही पुर्व नियम असतात. कायदेशिररित्त्या दिलेला ठेका रदद करण्यासाठी कायदेशिर कार्यवाहीचा

अवलंब केला जातो. त्यानंतर ते रदद होऊ शकते. कोणताही महत्त्वपुर्ण धोरणात्त्मक निर्णय ते चौकशीकरून प्रशासनाने महासभेसमोर आणले पाहिजे. बाकी ज्या गोष्टी सदस्यांनी सांगितल्या आहेत. अचानक एखादा ठेका रदद केला तर आर्थिक परिस्थिती खराब होऊ शकते. अजुन खराब होऊ शकते. पाणी वगैरेची समस्या निर्माण होऊ शकते. व नविन जो ठेका देऊ त्याची खात्री नाही देता येत की किती रक्कम मिळेल. पुर्वीसारखी रक्कम मिळेल की नाही सांगता येत नाही. मला वाटले खुप चर्चा झाली प्रशासनाची बाजु मांडणे मला योग्य वाटले म्हणुन मी तुमच्या समोर हे सर्व मांडले. जो काही निर्णय घ्यायचा आहे तो तुम्ही घ्यायचा आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः- महापौरजी माझी एक हरकत आहे.आयुक्तांनी ज्याप्रमाणे माझ्या प्रश्नाच्या उत्तराची टिप्पणी दिली ती हरकत घेण्यासारखी आहे. कारण की कोणताही काल्पनिक प्रश्न मी विचारला नव्हता. मी प्रोसिजर विचारली होती. जर असे झाले तर काय होईल, हे प्रश्न स्वाभाविकच छोटे छोटे असणारच कोणताही काल्पनिक प्रश्न नव्हता. त्यानंतर देखिल आयुक्त असे म्हणतील की, असे प्रश्न विचारले जाऊ नयेत. म्हणजे सभा नीट चालेल आम्ही पण कित्येक वर्षापासुन सभेत येत आहोत. आम्हाला पण माहित आहे सभेत कसे बोलले जाते. आम्हाला शिकवण्याची काहीही आवश्यकता नाही. आयुक्त कशा प्रकारे उत्तर देऊ शकतात हे आम्ही पण सांगु शकतो. आम्ही पण त्यावर टिप्पणी करू शकतो. आम्ही करत नाही कारण आम्ही तेवढी मान-मर्यादा ठेऊ इच्छितो तशीच मानमर्यादा आयुक्तांनी आमच्या बाबतीत पण ठेवली पाहिजे.

मा.महापौरः- मी प्रस्ताव सर्वांसमोर मांडत आहे. सदनाने भले जसा आहे तसा मंजुर करावा. किंवा जर काही बदल करायचा असेल तर तो पण करू शकता. जर सदनाची इच्छा असेल की, प्रस्ताव डिफर करण्यात यावा. तर डिफर करू या कारण की वेगवेगळी उलट सुलट अशी मते सदनात मांडली गेली आहेत. सर्वात महत्त्वाचा जनतेचा रस कशात आहे हे लक्षात घेऊन मी सदनावर हे सोडत आहे की त्यांनी निर्णय घ्यावा.



मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-मला आधी हे म्हणायचे आहे की, त्या व्यापा-याला त्याचे सामान परत मिळाले पाहिजे.

मा.महापौरः-त्यासाठी मी आयुक्तांना सांगतो.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानीः-पुर्ण सभागृहाने एकमताने म्हंटले पाहिजे अशी माझी इच्छा आहे.

मा. महापौरः-व्यापा-याला उदयाच्या उदया सामान परत दिले पाहिजे. असे सर्व सदनाचे मत आहे. यावर कुणाचे दुमत नाही. बाकी प्रस्तावाबाबत तुम्ही जोपण निर्णय घ्याल त्यानुसार आपण प्रस्ताव पारीत करू. जर तुम्ही ठेका रदद करू इच्छिता तर तसा प्रस्ताव पारीत करू. जर बदल करायचा असेल तर ते सुचवा. जे तुम्हाला ठिक वाटेल तसे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-माझी महापौरांना विंनती आहे , ठेका रदद करायचा किंवा नाही यावर तुम्ही मतदान घ्या.

रात्री ९. ३० वाजता मा. सदस्य श्री. राजु सोनावणे सभागृहाबाहेर पडले.

मा.महापौरः-ठिक आहे. ज्यांची इच्छा आहे हा ठेका रदद करण्याच्या बाजुने जे आहेत त्यांनी हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुची मते :-

१. श्रीमती. कालानी ज्योती
२. श्रीमती.दासानी मिनु
३. श्रीमती. लुंड लक्ष्मी
४. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
५. श्री. पमनानी ईश्वर
६. श्रीमती. टेकचंदानी चंद्रा
७. श्री. वाधवा गिरधारी
८. श्री. तलरेजा विनोद
९. श्री. रोहडा श्यामसुंदर
१० श्री गुप्ता प्रभुनाथ
११ श्रीमती. वनवारी मोना
१२ श्रीमती. कुंदनानी लविना
१३ श्री. रामरख्यानी मोहनदास
१४ श्री. वनवारी किशोर
१५ श्री. ढेणवाल बनवारी
१६ श्री. ठाकुर सेवलदास
१७ श्रीमती. वसिटा देवी
१८. श्री. देहरानी ठाकुर
१९. श्रीमती. साधवानी जया
२० श्री मनसुलकर सुभाष



२१ श्रीमती. वलेचा पदमा
२२ श्रीमती. गजवानी कांता
२३ श्री. केणी जयकुमार
२४ श्री. माखिजा हरदास
२५ श्री. उमाप रामदास
२६ श्रीमती. मटाई जोनिता
२७ श्रीमती. आशा जेसवानी
२८ श्रीमती. आशा राधवानी
२९ श्री. माखिजा प्रकाश
३० श्री. राजानी नरेंद्र
३१ श्रीमती. भारती राजानी
३२ श्रीमती. इंदिरा भाठिजा
३३ श्री. पुरस्वानी जमनु
३४ श्री. पंजाबी नारायण
३५ श्री. आयलानी कुमार
३६ श्री. जाधव सुरेश
३७ श्रीमती. पवार पंचशिला
३८ श्रीमती. बगाडे सुनिता
३९. श्रीमती. करोतिया मालती

मा.महापौरः-जे सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधातील मते :-

१. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
२. श्री. चौधरी गणेश
३. श्रीमती. सोनावणे यमुना
४. श्रीमती. वेलकर सुरेखा
५. श्री. बोडारे धनंजय

६. श्री. लांडे पांडुरंग
७. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
८. श्री. मोरे भिमसेन
९. श्री.चव्हाण रमेश
१० श्री. महाडिक प्रकाश

मा.महापौरः-जे सदस्य या प्रस्तावात तटस्थ राहु इच्छितात त्यांनी हात वर करावेत.
तटस्थ :-

१. श्री. रामभाऊ आढाव
२. श्री. वी.बी.मोरे
३. श्री. प्रमोद टाले



मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी व अन्य सहकारी सदस्यांकडील प्रस्तावाची सूचना :-शहरातील जकात वसूली अभिकर्ता में. मोनार्च इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांची संविदा फेरतपासणी करणे बाबत.

प्रस्ताव

सुचकांची नावे :-श्री. किशोर वनवारी
श्री. सेवल ठाकुर
श्री. प्रकाश माखिजा
श्री. ठाकुर बेहरानी

अनुमोदकांची नावे :-श्री. कुमार आयलानी
श्री. दर्शनासिंह खेमाणी
श्री. नरेंद्र राजानी

ज्याअर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) अन्वये या महानगरपालिकेने उल्हासनगर शहरात जकात वसुली करणे कामी दि. ३.७.२००१ ते दि. २.७.२००२ पर्यंत मे.मोनार्च इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. यांना दि. १९.५.२००१चे महासभा ठराव क्र. ६ अन्वये जकात अभिकर्ता म्हणुन नेमण्यास मान्यता दिली होती. त्याअर्थी मे.मोनार्च इन्फास्ट्रक्चर कंपनी, प्रा. लि. हे कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करत असल्याचे तसेच जकात वसुलीचे कर्तव्य पार पाडण्यात कसुर करत असल्याचे निर्दशनास आले आहे.

जकात अभिकर्त्याने नेमलेलया काही कर्मचा-यांनी दि. ३१.१०.२००१ रोजी जकात देण्यास पात्र असलेल्या मालाची तपासणी करताना नुकतेच श्री. किशनचंद चेलानी या व्यक्तीशी दुर्व्यवहार व जोरजबरदस्ती केली व त्यांच्या हातात असलेले सोन्याच्या दागिन्याची बॅग खेचुन त्या व्यक्तीला हाताशी धरून मध्यवर्ती जकात नाक्यावर घेऊन गेले. तेथे त्यांच्याकडुन दहा पट जकात वसुलीची मागणी केली. त्यांनी दहा पट जकात देण्यास असमर्थता दर्शविल्याने जकात अभिकर्त्यांने त्यांच्याकडील माल कब्जात / ताब्यात घेतला आणि त्या व्यक्तीस रितसर लेखी नोटीसीसह मालमत्तेच्या कब्जेची यादी दिली नाही.

त्यामुळे त्याव्यक्तीने या दुर्व्यवहारासंबंधी आपली तक्रार व्यापारी महामंडळ या संस्थेकडे केल्यानंतर त्या व्यक्तीस समर्थन देण्याकरिता जकात अभिकर्त्यांविरूध्द मा.महापौर व इतर राजकीय पक्षांचे गटनेत्त्यांशी संपर्क

साधला आणि न्यायाची मागणी केली. जकात अभिकर्त्यांच्या दुर्व्यवहाराच्या निषेधार्थ दि. २.११.२००१ रोजी सोनारांनी आपली दुकाने बंद ठेवली होती व याच दिवशी मा. महापौर यांच्या दालनात व्यापारी महामंडळाचे प्रतिनिधी, मोनार्च कंपनीचे प्रतिनिधी व इतर राजकीय पक्षाचे पालिका सदस्याचे उपस्थितीत सभा बोलावण्यात आली होती. त्यासभेत मेसर्स मोनार्च

--१०४--

इन्फास्ट्रक्चरने हे कबुल केले की, जकात पात्र माल जप्तीचे लेखी नोटीसीसह यादी दिलेली नाही. आणि त्यासभेत असेही निर्दशनास आले की, या जकात अभिकर्त्या संबंधी अनेक तक्रारी असुन त्यातील प्रमुख तक्रारी खालील प्रमाणे आहेत.

१)जकात देण्यास पात्र असलेल्या मालाची तपासणी करण्याच्या अधिकाराचा गैरवापर करणे.
२)जकात वसुलीचा रोजच्या रोज हिसाबकिताब न ठेवणे.
३)सोनार व इतर व्यक्तींना जकाती ऐवजी ठेक वसुलीची सवलत देऊन भरलेल्या जकातीची पावती न देणे.
४)जकात कराबाबत बिले सादर केलेली असतानाही ती मान्य न करता आपल्या मर्जीप्रमाणे मुल्य आकारणे.
५)विनाकारण जोरजबरदस्तीने जकात वसुलीस पात्र असलेल्या वस्तु अटकावुन ठेवणे.
६)मागणी करण्यात आल्यावर व जकात न दिल्यास त्याबाबत रितसर जप्त केलेल्या वस्तुची लेखी नोटीसीसह मालमत्तेची यादी न देणे.
७)अधिकार नसताना जकात चुकविल्याबददलच्या अपराध सिध्दीशिवाय देय असलेल्या जकातीच्या रक्कमेच्या दहा पट रक्कमेची मागणी करणे किंवा जकात पात्र माल जप्त करणे.

वरील सर्व कारणे उपरोक्त सभेत मा. महापौर व इतर सर्वांच्या निर्दशनास आली त्यामुळे व्यापारी महामंडळाने दि. ३.११.२००१ रोजी सोनारांची दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले आणि त्याचदिवशी मा. महापौर, मा. उपमहापौर व इतर राजकीय पक्षांचे गटनेते यांना व्यापारी महामंडळाच्या सभेमध्ये योग्य निर्णय घेण्यासाठी सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले होते. त्या सभेत व्यापारी महामंडळ पुढील काही दिवसासाठी जकात अभिकर्त्यांच्या दुर्व्यवहारा निषेधार्थ पुर्ण उल्हासनगर शहर बंद करणार होते. त्या सभेत मा. महापौर, श्री. किशोर वनवारी सभागृह नेता, श्री. नरेंद्र राजानी, श्री. ठाकुरदास बेहरानी, श्री. प्रकाश माखिजा, भाजपा गटनेता आणि श्री. विनोद तलरेजा या महापालिका सदस्यांनी व्यापारी महामंडळास उल्हासनगर बंदचे आपले आवाहन मागे घेण्यास विनंती केली आणि जकात अभिकर्त्यांबाबत त्यांच्या असलेल्या अडचणी सोडविण्याकरिता सध्या कार्यरत असलेल्या जकात अभिकर्त्यांबददल फेरतपासणी करण्याचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवू असे आश्वासन दिले.

तसेच १९.११.२००१ रोजी उल्हासनगर व्यापारी महामंडळाने उल्हासनगर बंदचा आव्हान देऊन सर्व दुकाने बंद करून प्रेक्षक गॅलरीमध्ये बहुतेक दुकानदार व व्यापारी उपस्थित आहेत. आणि त्यांची उपस्थिती अभिकर्त्याकडुन त्यांना झालेल्या त्रासाचा पुरावा आहे.

ज्यास्पष्ट किंवा गांभिर्यपुर्वक अटीनुसार जकात अभिकर्त्यास कर्तव्य पार पाडण्यास प्राधिकार देण्यात आला आहे. त्या अटीपैकी काही अटींचे उल्लंघन करून त्यांनी गैरवर्तन केले आहे व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सध्या कार्यरत असलेल्या मे.मोनार्च इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. या जकात

--१०५--

अभिकर्त्यांची संविदा फेर तपासणी करण्यास प्रस्तावित आहे. यादरम्यान मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ५८२८/२००१ मध्ये अंतरीम आदेश दिलेला

आहे की, राज्य निवडणुक आयोगाच्या दि. १५.११.२००१ व २०.११.२००१ प्रमाणे जकात ठेका पस्तावाबाबत चर्चा किंवा निर्णय घेण्याविरूध्द स्थगती आदेश दिला आहे. या अटीसहित की, जर या सभेत वरील प्रस्तावाप्रमाणे जकात अभिकर्ता ठेका रदद होण्याचा ठराव पारीत होत असेल तर त्या ठरावाची अंमलबजावणी मा. उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईस्तोपर्यंत करता येणार नाही.

महासभा ठराव क्र. २३ दिनांक :-१२.१२. २००१

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व शहरात शांतता राखण्यासाठी सध्या कार्यरत असलेले मे.मोनार्च इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. यांची प्रतीपुर्ती जप्त न करता त्यांना अभिकरणाने दिलेले जकात वसुलीचे कर्तव्य पार पाडण्यास बंद करणे संबंधी एक महिन्याचा आगाऊ लेखी नोटीस बजावणेस आणि पर्यायी व्यवस्था करण्यास आयुक्तांना निर्देश देत आहे. तसेच या ठरावाच्या आधारावर आयुक्तांसाठी हे आवश्यक राहील की, मा. उच्च न्यायालयात असलेली प्रलंबित याचिका क्र. ५८२८/२००१ या याचिकाकर्त्याच्या मुददयांना समर्थन होईल याप्रमाणे त्यांनी आपली बाजु मांडावी.

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौरः-मी आयुक्तांना निर्देश देतो की, त्यांनी व्यापा-याचे सोने परत करावे उदयाच्या उदया तसेच या ठरावाच्या आधारावर आयुक्तांसाठी हे आवश्यक राहील की, मा. उच्च न्यायालयात असलेली प्रलंबित याचिका क्र. ५८२८/२००१ या याचिकाकर्त्याच्या मुददयांना समर्थन होईल याप्रमाणे त्यांनी आपली बाजु मांडावी.

मा. सचिव :- कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्री ९.४५ वाजता मा. महापौर श्री. हरदास माखिजा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका